

श्री रामचरित मानस

गूढार्थ चंद्रिका

प्रस्तावना खंड

प्रकाशकांचें निवेदन

ईश्वराप्रमाणेंच ईश्वरी वाणीहि युगानुकूल अवतार घेत असते, असें आपण म्हणत असतों. किंबहुना ही अपौरुषेय वाणीच आपणांला ईश्वरी अवतार ओळखण्याची दृष्टि देत असते अशी आपली राष्ट्रीय धारणा आहे. लौकिक दृष्टीनें पाहिलें तर अपौरुषेय मानली गेलेली वाणी कुणातरी आपल्या-सारख्याच देहधारी माणसाच्या तोंडून प्रगट झालेली असते. आणि तरीहि हें वास्तव सत्य बुद्ध्याच डोळ्याआड करून आपण तिला अपौरुषेय म्हणतों. याचें रहस्य काय ? त्याचें रहस्य एवढेंच कीं हा लौकिक पुरुष परमपुरुषाशीं एकरूप, एकरस झालेला असतो. तळाला गाळ नाहीं आणि पृष्ठभागावर शेवाळ नाहीं अशा स्वच्छ जलाशयांत ज्याप्रमाणें आकाशाचें सुस्पष्ट प्रतिबिंब उमटत असतें, त्याचप्रमाणें विकाराचा अंशदेखील ज्याच्या अंतरंगांत उरला नाहीं आणि संकल्प-विकल्प ज्याच्या प्रज्ञेला झांकळीत नाहींत अशा पुरुषाच्या ठिकाणीं ईश्वराचें परम ऐश्वर्य शब्दाशब्दांतून प्रगट होत असतें. त्याच्या ठिकाणच्या करुणाधर्माचा तो एक हृदयंगम आविष्कार असतो. या. आविष्काराची बौद्धिक दृष्ट्या कितीहि छाननी केली तरी त्याच्या रहस्याचा अंतपार लागत नाहीं. म्हणूनच लौकिक वाणींतून प्रगट झालेला अलौकिक चमत्कार अशा पूज्य भावनेनें मानवसमाज या वाणीची उपासना चालवतो. आणि तिच्या द्वारा अभ्युदय आणि निःश्रेयस यांचें रहस्य समजून घेण्याचा पदोपदीनें प्रयत्न करीत असतो.

कित्येक शतकांत एखाद्याच काव्य-ग्रंथाला देववाणीची ही गुरुत्व पदवी प्राप्त झालेली आपण पाहतों. त्याच्या केवळ वाक्चातुर्यानेंही प्राकृत जन सुखी होतात. जीवनरसिक अर्थगौरव उलगडीत त्याचा रस लुटतात. वैयाकरणी आणि भाषाकोविद त्यांतील वाग्विलासाचें मर्म विशद करूं लागतात. ताप-त्रयानें पोळलेले भाविक नैतिक पोषण मिळवतात. मागून येणारे कवि आपल्या प्रतिभेसाठीं स्फुरण मिळवतात. आणि अशा रीतीनें हा ग्रंथ वाढत्या काळाबरोबर अधिकाधिक अर्थघन होत जातो. आणि त्याच्या या बहुविध उपासनेनें मानव-समाज अधिकाधिक जीवनसंशुद्ध आणि संस्कारसमृद्ध होत जातो. पण एवढ्यानें देखील त्याचें रहस्य हस्तगत झालें असें म्हणतां येत नाहीं. असल्या या महान् ग्रंथांत सिद्धप्रज्ञ महापुरुषाच्या आत्मिक प्रवासाच्या पाऊलखुणा पदोपदीं उमटलेल्या असतात. आणि वाचक स्वतः त्याच मार्गावरचा प्रवासी

असल्याशिवाय या खुणा आणि त्यांचें सूचन यांचा मागोवा त्याला घेतां येत नाहीं. आत्मानुभवाच्या कसोटीला या खाणाखुणांची संगति लावून दाखवणारा दर्शनकार जेव्हां निर्माण होतो तेव्हांच अशा ग्रंथाचें खरें रहस्य आपल्या जाणीवेच्या कक्षेंत आलें असें म्हणावयाचें.

असा सद्ग्रंथ म्हणून आपल्याकडे जी ज्ञानेश्वरीची प्रतिष्ठा तीच उत्तर-भारतांत रामचरितमानसाची. 'ज्ञानेश्वरी' ही जसा गीतेचा मराठी अवतार त्याचप्रमाणें मानस हें वाल्मिकी रामायणाचें अभिनव अवतरण.

प्रभु रामचंद्राची जीवनकथा हें तिचें बाह्य रूप पण खऱ्या अर्थानें ती भूतमात्राच्या अंतर्यामीं असणाऱ्या अंतःचंद्राची कथा आणि त्याचमुळें मानसा-वरील या मराठी भाष्याला भाष्यकारानें गूढार्थचंद्रिका असें म्हटलें आहे.

भाष्यकार प. पू. प्रज्ञानानंदसरस्वती हे आत्मानुभवी आहेत, द्रष्टे आहेत. आणि याच शक्तीमुळें मानसाचें आध्यात्मिक रहस्य ते इतक्या लीलेनें उलगडून दाखवीत आहेत. आपण भाषाकोविद नाहीं, व्युत्पन्न नाहीं अशी त्यांची विनयशील भूमिका आहे. आणि जें कांहीं घडलें आहे तें केवळ गुरुकृपेमुळें आणि ईश्वरी प्रसादामुळें घडलें आहे असा त्यांचा प्रांजळ सांगावा आहे.

त्यांचें प्रारंभींचें निवेदन वाचलें कीं त्यांच्या या म्हणण्याची सत्यता आपल्या-लाही पटूं लागते. त्याशिवाय सोज्वळ सारस्वताचा हा थोर प्रपंच असंभव आहे.

पूज्य विनोबाजी परवांच बोलतां बोलतां म्हणाले कीं ज्ञानाचा तपशील माहीत नसतांनाहि ज्ञानाचें रहस्य सहज ज्याच्या हाताला लागतें तोच द्रष्टा पुरुष. अशा पुरुषाची उपपन्न दृष्टि हीच आर्ष दृष्टि. याच आर्षदृष्टीनें प. पू. प्रज्ञानानंद-सरस्वतींनीं मानसाच्या गूढार्थचंद्रिकेचा अमृतानुभव घेतला आहे आणि तोच या ग्रंथाच्या शब्दाशब्दांतून झिरपत आहे. आत्मिक उद्बोधनाचा दिव्य ग्रंथ म्हणून जो जो कोणी रामचरितमानसाकडे वळलेला असेल त्याला त्याला आध्यात्ममार्गावरील वत्सल वाटाड्या म्हणून हा ग्रंथ साह्यकर होईल अशी आम्हांस उमेद वाटते. आणि अशा ग्रंथाचें प्रकाशन करण्याचा सुयोग आम्हांस लाभला हा पूर्व सुकृताचा प्रसाद असें आम्ही समजतों. रामचरितमानसाचा महाराष्ट्राच्या या संतभूमींत अधिकाधिक प्रसार व्हावा आणि त्याच्या प्रसादानें या मऱ्हटीचिये नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळ व्हावा या लेखकाच्या पुण्यवांछितांत आम्हीहि सहभागी आहोंत.

◆◆◆◆

प्रस्तावना व टीका-वाचकांस सूचना

१. प्रस्तावना व टीका-वाचकांनीं प्रथम प्रस्तावना लेखकाचें निवेदन व छंद, सोरठा, दोहा-लक्षणें हीं प्रस्तावनेंतील दोन प्रकरणें मननपूर्वक वाचावींत, म्हणजे प्रस्तावनेंतील मानसांतलीं विपुल अवतरणें वाचतांना अडखळावें लागणार नाहीं.

२. टीकालेखन चालू असतां व प्रस्तावना लेखनांतही द्वितीय अनुवादांतसुद्धां वारंवार किरकोळ बदल करावे लागले व स्मरणशक्तीचा वयोमानानें ह्रास होत गेल्यानें टीकेंत आणि प्रस्तावनेंत दिलेल्या मराठी रामायणांतील अवतरणांत व मराठी रामायणांतील चौपाया, छंद इत्यादिकांत क्वचित शब्दभेद आढळण्याचा संभव आहे; म्हणून ज्या चौपायादिकांवर टीका लिहिली आहे तेच पाठ शुद्ध समजावेत.

३. मानसांतील अवतरणांत जेथें तीन अंक असतील तेथें पहिला काण्डाचा दुसरा दोह्याचा व तिसरा त्या दोह्याच्या अंगभूत असलेल्या चौपाईचा, (मागील दोह्यानंतरच्या पहिल्या चौपाईपासूनचा) समजावा. उदा० श्रीमानसोपलब्ध श्रीतुलसीदास चरित्र या प्रकरणांत पहिल्या परिच्छेदांत १।३१।१२ असे अवतरणांक आहेत. १ पहिलें काण्ड, बालकाण्ड, ३१ म्हणजे दो. ३१ वा व १२ म्हणजे त्या दोह्याच्यापूर्वीची १२ वी चौपाई. ज्या कांडांतील टीका चालू असेल त्याच काण्डांतील अवतरण असल्यास कांहीं ठिकाणीं काण्ड-संख्यादर्शक अंक दिला नाहीं.

४. गूढार्थचंद्रिकेंत व प्रस्तावनेंत श्रुतिवचनें जशींच्या तशीं न देतां पदच्छेद करून दिलीं आहेत; तसेंच कांहीं संस्कृत श्लोकांतसुद्धां मुद्दाम पदच्छेद केलेला आहे; हेतु हा कीं, संस्कृत चांगलें न समजणाऱ्या वाचकांससुद्धां साधारण अर्थबोध होणें कठिण जाऊं नये व शास्त्रमर्यादेचें उल्लंघन न करतां कोणाही वाचकास श्रुतिवचनादि वाचतां यावींत.

५. शब्दांची व्युत्पत्ति व धात्वर्थ **अमर-व्याख्या-सुधा** या अमरकोषाच्या टीकेच्या आधारेंच दिले असल्यानें प्रत्येक ठिकाणीं आधार दिला नाहीं.

६. अवतरण चिन्हें नसलेल्या किंवा अवतरणांक नसलेल्या पद्यपंक्ती टीका लिहितां लिहितां सहज ओघानें बाहेर पडलेल्या या अल्पमति लेखकाच्या समजाव्या. कांहीं ठिकाणीं ॥ प्रज्ञा. ॥ असें आढळेलही.

७. प्रस्तावनेंत अगदीं शिरोभागीं ५।३ इत्यादि जे अंक दिले आहेत ते प्रस्तावनेंतील मुख्य प्रकरण व त्यांतील उप-प्रकरण दर्शक आहेत. अनुक्रमणिकेंतही हा भेद दाखविला आहे.

८. निरनिराळ्या सूचींत जे स्थाननिदर्शक अंक आहेत ते दोन असतील तर दोहा व चौपाई-सूचक व तीन असतील तर काण्ड, दोहा व चौपाई-सूचक समजावेत. त्या त्या चौपाईच्या टीकेंत तो तो विषय सांपडेल.

९. सुमारें २०५ विषय सतत दृष्टीपुढें ठेवून टीका वाचन करून प्रस्तावनेची तयारी करावी लागल्यामुळें पाठभेद-सूची व मानसमणींतील लेखसूची यांशिवाय इतर सर्व सूची अपूर्ण आहेत असें समजावें, कारण वाचतांना २०५ विषय सतत स्मृतींत राहण्याइतकी तीव्र व कुशाग्र बुद्धि या लेखकाची नाहीं व त्यांत वार्धक्य !

◆◆◆◆

— संक्षिप्त चिन्हांचा खुलासा —

अ. – अध्याय
अ. व्या. सु. – अमर-व्याख्या-सुधा
अ. रा. – अध्यात्म रामायण
अ. पु. – अग्नि पुराण
अक्ष. – अक्षमालोपनिषद्
आ. बो. – आत्मबोध
आ. रा. – आनन्द रामायण
ईश. उ. – ईशावास्योपनिषद्
इ. – इत्यादि
उदा. – उदाहरणार्थ
उ. खं. – उत्तर खंड
ए. भा. – एकनाथी भागवत
ऐ. उ. – ऐतरेय उपनिषद्
कठ. उ. – कठोपनिषद्
कै. उ. – कैवल्योपनिषद्
गर्भ उ. – गर्भोपनिषद्
गीता. – गीतावली-हिंदी
गी. प्रे. – गीताप्रेस – गोरखपूर
गी. ल. – गीर्वाण लघुकोश
गू. चं. – गूढार्थ-चंद्रिका-टीका
चौ. – चौपाई
छं. – छंद
छां. उ. – छांदोग्योपनिषद्
जाबा. उ. – जाबालोपनिषद्
तै. उ. – तैत्तिरीयोपनिषद्
त्रि. वि. म. – त्रिपाद विभूति महानारायणोपनिषद्
दोहा. – दोहावली-हिंदी
दा. बो. – श्रीदासबोध
ध. सिं. – धर्मसिंधु
ना. भ. – नारदभक्तिसूत्र
नी. श. – नीतिशतक
नृ. उ. उ. – नृसिंह उत्तर तापिनी उपनिषद्
नृ. पू. – नृसिंह पूर्व तापिनी उपनिषद्
प. पु. – पद्मपुराण
पा. यो. – पातंजल योग
प्र. प्र. – प्रस्तावना प्रकरण
बृह. उ. – बृहदारण्यकोपनिषद्
ब्र. पु. – ब्रह्म पुराण
भ. गी. – श्रीमद्भगवद्गीता
भा. रा. – भावार्थ रामायण
भाग. – श्रीमद्भागवत
म. – मराठी
म. भा. – महाभारत
मनु. – मनुस्मृति
मानस – श्रीरामचरितमानस
मा. नि. – माधवनिदान
मा. पी. – मानस पीयूष टीका-हिंदी
मा. प्र. – मानस प्रसंग-ग्रंथ
मा. म. – मानसमणि मासिक-हिंदी
मां. उ. – मांडुक्योपनिषद्
मू. गो. – मूल गोसाई चरित्र
याज्ञ. – याज्ञवल्क्यस्मृति
यो. उ. – योगतत्त्वोपनिषद्
यो. चू. – योग चूडामणि उपनिषद्
यो. शि. – योगशिखोपनिषद्
रा. चं. – रामार्चनचंद्रिका
रा. उ. – राम उत्तर तापिनी उपनिषद्

रा. पू. – राम पूर्व तापिनी उपनिषद्
रा. र. – रामरहस्योपनिषद्
वा. रा. – वाल्मीकि रामायण
वि. प. – विनयपत्रिका-हिंदी
वे. स्तु. – वेदस्तुति कीर्तन-भास्कर-मराठी
वे. रा. – वेदान्तसार रामायण
वि. पु. – विष्णु पुराण
वि. सा. – विश्वसाहित्यमें रामचरितमानस
शि. पुं. – शिवँ पुरांण
शु. र. – शुक – रहस्योपनिषद्
श्वे. उ. – श्वेताश्वतरोपनिषद्
स. वे. सा. – सर्व वेदान्त सिद्धान्तसार-संग्रह
सु. र. – सुभाषित रत्नाकर
सु. भा. – सुभाषित रत्नभांडागार
सं. गी. – संगीत समश्लोकी गीता
स्कं. पु. – स्कंद पुराण
हिं. – हिंदी

◆◆◆◆

अनुक्रमणिका

◆◆◆◆



१ : महापुरुषचरित्रें

卐 卐 卐 १ 卐 卐 卐

अनन्त श्रीविभूषित श्रीमत्सद्गुरु प.प. श्रीवासुदेवानन्द सरस्वती अवधूत (पोटे स्वामी) यांचें अल्प चरित्र

यत्पाद-पंकज-पराग-पवित्र मौलि-र्भूयो न पश्यति नरो जठरं जनन्याः ।
तं वासुदेवमजमीशमनन्तबोधं श्रीमद्गुरुं शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥

प्रास्ताविक — ज्यांच्या केवळ कृपावलोकनानें परम समाधान प्राप्त झालें व काव्यस्फूर्ति अनावर होऊन श्रीमद् गोस्वामी तुलसीदासांच्या श्रीरामचरितमानसाचा प्रथमानुवाद श्रीभगवदाज्ञेनें सुरू होऊन अवघ्या तीन महिन्यांत एखाद्या यंत्राप्रमाणें लिहिला गेला त्या श्रीसद्गुरुमहाराजांचें चरित्र मराठी रामचरितमानसांतच देणें जरूर होतें; पण मिळालेली माहिती अगदींच अल्प असल्यामुळें आणखी माहिती मिळवून नंतर श्रींचें चरित्र प्रसिद्ध करणें योग्य वाटल्यावरून प्रकाशित रामचरित-मानसांत तें घातलें नाहीं.

त्यानंतर पुष्कळ प्रयत्न करून-करवूनसुद्धां अधिक माहिती उपलब्ध झाली नाहीं व होण्याची शक्यता राहिली नाहीं; म्हणून श्रींच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारें व स्वतः अनेक वेळां जें अनुभविलें त्याच्या आधारावर व श्रींच्या पुष्कळ दिवसांच्या कांहीं परिचितांकडून जें समजलें त्याच्या आधारें अल्पसें चरित्र यथामति दिलें जात आहे.

श्रींचा जन्म — श्रीक्षेत्र परशुराम, तालुका चिपळूण, जिल्हा रत्नागिरी, येथें श्रावण शुक्ल अष्टमीच्या सुमारास शके १८०६ त झाला. मातेचें नांव भागीरथी व पित्याचें नांव विष्णु त्र्यंबक पोटे होतें. श्रींचें पूर्वाश्रमींचें नांव त्रिविक्रम होतें.

विष्णुपंतांस कृष्णा, कमलाकर, विश्वनाथ आणि त्रिविक्रम (चरित्रनायक) असे पुत्र व गंगा, अनसूया (अनी) आणि यशोदा अशा तीन मुली होत्या. सर्वांत मोठे कृष्णा व सर्वांत धाकटे *त्रिविक्रम*. कमलाकर व विश्वनाथ यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला, त्यांचे पुत्रपौत्रादि विद्यमान आहेत; पण प्रयत्न करूनसुद्धां अधिक माहिती मिळाली नाहीं.

परशुराम येथें विष्णुपंतांचें स्वतःचें घर होतें व तें पूर्वाभिमुख होतें. विष्णुपंत शिरसी व चिंचवली या दोन गांवांचे खोत होते.

श्रींची मोठी बहीण गंगा नूनेगांव, तालुका पाटण, जि. सातारा येथील वाघ आडनांवाच्या शांडिल्य गोत्री ब्राह्मणास दिली होती. ते तेथील खंडोबाचे पुजारी होते. या वाघांच्या पुत्रपरंपरेंत आतां कोणी नाहींत असें कांहीं महिन्यांपूर्वीच कळलें.

पितृ-मातृ-निधन — श्रींच्या वयाच्या चौथ्या वर्षींच पिता आणि माता परलोक-वासी होऊन त्रिविक्रम अनाथ झाले; कारण ज्येष्ठ बंधु कृष्णा घर सोडून गेलेले व मधल्या दोघांचे विवाह झालेले नव्हते; त्यामुळें मातापिता निवर्तल्यावर ज्येष्ठ भगिनी सौ. गंगा हिनें त्रिविक्रमास आपल्या घरीं-नूनोगांवीं-नेलें; ७/८ वर्षांचे होईपर्यंत तेथें राहणें झालें. या समयास वडील भाऊ कृष्णाबोवा, रामदासी झालेले होते. हे सासवडच्या श्रीसमर्थ-परंपरेंतील होते. यवतमाळ, येवलें, चासकमान वगैरे ठिकाणी यांचा शिष्यसांप्रदाय व चांगला नांवलौकिक होता.

उपनयन व विद्याभ्यास — श्रींचें उपनयन वयाच्या आठव्या वर्षीं झालें; त्या-पूर्वींच रूपावली, समासचक्र व अमरकोष अगदीं मुखोद्गत झाले होते. कृष्णाबोवा ऊर्फ तात्या (महाराज त्यांस तात्या म्हणत.) त्या वेळीं वाईस राहत असत. त्यांनी श्रींना वाईस नेलें. तेथें संध्या, पूजा वगैरे नित्यकर्म व रुद्र, पंचसूक्त पवमान इत्यादि अध्ययन झालें. अध्ययनाच्या काळांत *पोरांत मिसळून खेळ खेळण्याची प्रवृत्ति मुळींच नव्हती*. एकट्यानेंच हिंडण्याची, झाडांवर चढून आवळे, चिंचा, बोरें, कौठें, कैऱ्या इत्यादि खाण्याची फार आवड होती.

काशीस रवानगी — वाईस असतां श्रीगणपतीची व मारुतीची, रोज त्या देवळांत

जाऊन यथाविधि पूजा नित्य नियमानें करीत असत. श्रींची अत्यंत कुशाग्र बुद्धि व असामान्य धारणाशक्ति पाहून तात्यांनीं ६० रुपये बरोबर दिले व कन्यागताच्या वर्षी म्हणजे वयाच्या ११।१२ व्या वर्षी श्रींना अध्ययनासाठीं काशीस पाठविलें. ११।१२ व्या वर्षी ६० रुपये बरोबर घेऊन, एकटे वाईहून काशीस गेले. त्या काळांत मोटारींचा प्रवास सुरू झालेला नव्हता! या वयाचा कोणता मुलगा अध्ययनासाठीं अशा रीतीनें वडील भावाच्या आज्ञेनें एकटा काशीस जाईल! या एकाच गोष्टीवरून आत्मविश्वास, निर्भयपणा, व्यवहारचातुर्य, अध्ययनाची आवड इत्यादि अनेक सद्गुणांची प्रतीति येते; हे गुण परमोत्कृष्ट दशेस पोंचलेले पाहण्यास सांपडले.

अध्ययन — काशीस वे. मू. भिकंभट पटवर्धन यांच्याजवळ *वेद, वेदांग, कौमुदी* आणि *वार्तिक* यांचें अध्ययन *तीन वर्षांत* केलें; आणि हें *अमरकोषासुद्धां शेवटपर्यंत उत्तम प्रकारें जिवंत होतें* हें आश्चर्य! श्रीमद्भागवताचें अध्ययन श्री. मौनी स्वामी व व सोहोनी शास्त्री यांच्याजवळ केलें. अभंगाचा गाथा वगैरे बरेच ग्रंथ स्वहस्तें लिहून काढले होते; पण परगांवीं जातांना यांतलें कांहींहि बरोबर नसे; सर्व जेथल्या तेथें पडे.

'ज्यांच्या जवळून एखादी विद्या घ्यावयाची त्यांस पाताळांत घालावयाचें' अशी असामान्य बुद्धिमत्ता होती. वरील वाक्य श्रींच्याच मुखांतील आहे, भावार्थ हा कीं ज्यांच्याजवळ एखाद्या शास्त्राचें अध्ययन केलें त्यांनीं यांच्याजवळ श्रवण करावयाचें!

चतुर्थाश्रम — याप्रमाणें ४।५ वर्षे अध्ययनांत गेल्यावर काशीसच एके दिवशीं विधिपूर्वक संन्यास-चतुर्थाश्रम-स्वीकारला; कोणालाहि विचारलें नाहीं कीं कळविलें नाहीं. नंतर प. प. श्रीविविक्रमानंद सरस्वती, दुधाहारी मठ, भोसले घाट काशी यांच्याकडून विधिपूर्वक दण्डग्रहण केलें; त्यांनीं *वासुदेवानन्द सरस्वती* नांव ठेवलें.

शरीर गोंडस, गुटगुटींत; बांधा मध्यम, दिसण्यांत फार कोमल पण सशक्त व निरोगी; वर्ण पिवळट उत्तम गौर; त्यांत बालब्रह्मचारी, त्यांत विद्येचें तेज आणि त्यांतहि १७ व्या वर्षी काषायवस्त्रें परिधान केलेलीं आणि त्यांत विशेष भर म्हणजे स्मितपूर्वभाषी व सदा प्रसन्नमुख! आश्रम घेतला त्याच वर्षी दिल्लीस मोठा दरबार होता; म्हणजे सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानंतरचा १९०१ सालीं भरलेला हा दरबार असावा. 'संन्यास घेतला त्या वर्षीच दिल्ली दरबार पाहण्यास गेलों होतों!' हें श्रींचेंच वचन आहे.

चासकमानला आगमन — श्रीयुत तात्या म्हणजे कृष्णाबोवा रामदासी चास, तालुका खेड, जिल्हा पुणें येथें राहात होते. एक दिवस त्यांच्या दाराशीं बाल व वृद्ध अशा अति तेजस्वी संन्याशांची जोडी अचानक येऊन उभी राहिली! तात्या त्या कुमार यतीला कांहीं क्षण ओळखूं शकले नाहींत; त्यांनीं लोटांगण तर घातलेंच व

बघत राहिले ! पण तें किती वेळ टिकणार ! ओळख पटल्यावर तात्यांच्या–कृष्णाबोवा रामदासी बालब्रह्मचारी यांच्या–हृदयास किती परमानंद व संतोष झाला असेल ! (ही हकीकत चास येथें निवास असतां तेथील वृद्धांकडून या लेखकास कळली.) कांहीं दिवसांनीं या लेखकाचे परमगुरु श्रीत्रिविक्रमानंद तेथून गेले. आपल्या *कनिष्ठ बंधूची* ती वैराग्यज्ञानसंपन्न आत्मतेजोयुक्त *वरिष्ठ स्थिति* पाहून तात्यांना ' कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुन्धरा पुण्यवती च येन ' असें वाटलें असेल.

तीर्थयात्रा — कांहीं दिवस तात्यांच्या जवळ राहून महाराज तीर्थाटनास गेले, व चारी धाम यात्रा केल्या. पैसे कोणीं दिले तर घेत असत; मागतसुद्धां असत. कोणत्याहि वाहनानें प्रवास करीत असत; फक्त घोडा बैलादिकांच्या पाठीवर बसत नसत. प्रवासांत असतां मारुतीच्या किंवा दुसऱ्या देवळांत उतरत असत. कोणा ब्राह्मणानें पूढीला बोलावलें तर जात असत. आश्रमानंतर माधुकरी कधीं मागितली नाहीं. कोणीं न बोलावल्यास उपाशी राहात; पण पैसे वेचून विकत आणून कांहींहि खात नसत. ६२।६३ व्या वर्षापर्यंत जठराग्नि चांगलाच प्रदीप्त होता.

संन्यास घेतल्यावरसुद्धां रुद्राभिषेक, पवमानाभिषेक, करीत असत. चार आणे मागावयाचे व त्यास सांगायचें कीं दिलेत तर तुमच्यासाठीं अभिषेक करीन. पैसे *मागणें व संग्रह करणें या* वृत्तीमुळें त्यांस कोणी संत, साधु मानीत नसत.

कांहीं वर्षे कोल्हापुरास श्रीअंबाबाईच्या मंदिराजवळ पोतनिसांच्या माडीवर राहात होते ; तेथून गेले तेव्हां २।३ शें रुपये किंमतीचीं पुस्तकें व २।३ शें रुपये इत्यादि सर्व तेथेंच टाकून कोणास न सांगतां निघून गेले ! अशी चमत्कारिक वृत्ति होती.

प्रवासांत असतां — १५।२० रुपयांचा खुर्दा (दिडक्या निराळ्या, ढबू निराळे) चवल्या, पावल्या इत्यादि वर्गवारीनें कागदांत गुंडाळ्या करून त्यांचें एक बोचकें कमरेला व एक एका काखेखालून पाठीवर बांधलेलें याप्रमाणें दीडदोनशें रुपये जवळ असत. नोट एकही त्यांत नसे ! कोणता व्यवहारी माणूस एवढें ओझें अंगावर बाळगील ! असा विचित्रपणा अनेक गोष्टींत असे.

चासकमान येथें ५।६ वर्षे होते. त्यापूर्वींच कृष्णाबोवा ऊर्फ तात्या चासेसच मरण पावले होते. त्यांच्याच जागेंत राहात असत. तेथेंहि विचित्रपणाची वृत्ति होतीच. तेथें तर श्रीभीमरथीच्या (भीमेच्या) वाळवंटांत, भर उन्हांत, डोक्यावर ओल्या छाटयांच्या घड्या, पायांत कांहीं नाहीं व नुसतें कौपीन परिधान केलेलें, २।२, ३।३ तास तटस्थ उभे असावयाचे किंवा गारगोटया वेंचीत असावयाचे. या विचित्र वृत्तीमुळें त्यांस कोणी गारगोटेस्वामी म्हणत तर कोणी वेडे म्हणत !

नंतर कांहीं वर्षे खेड, जिल्हा पुणें येथें श्रीचण्डीराम महाराजांच्या मठांत राहात असत. त्यानंतर महाराजांच्या जीवनांतील शेवटचीं १३।१४ वर्षे मुक्काम *आळें*, तालुका जुन्नर, जि. पुणें येथें श्रीयुत कुलकर्णी यांच्या माडीवर गेलीं.

या लेखकाचा संबंध

प्रास्ताविक — १९४० च्या जुलई महिन्यांत (आषाढ शुद्ध एकादशी) अजमीरहून येऊन या लेखकानें खेड, जिल्हा पुणें, येथें श्रीकेदारेश्वराच्या मागल्या मठांत निवास केला. १९४२ अखेरपर्यंतच्या काळांत श्रींच्या बद्दलची परस्परविरुद्ध अशी पुष्कळ हकीकत समजली. पैसे, सोन्याचांदीचे जिन्नस वगैरे मागतात, घेतात, संग्रह करतात इत्यादि सर्व विक्षिप्त वृत्तीची हकीकतहि कळली. पैसे घेणाऱ्या व संग्रह करणाऱ्या संन्याशाचें मुखावलोन करूं नये असें त्या वेळीं पूर्वाश्रमांत वाटत असे. ' द्रव्यं तु मुद्रितं स्पृष्ट्वा सचैलं स्नानमाचरेत् ' असा नियम संन्याशांसाठीं श्रुतिमाउलीनें सांगितलेला आहे. ' *यतीनां कांचनं दद्यात्*, तांबूलं ब्रह्मचारिणां । चोराणामभयं दद्यात् , *दाताऽपि नरकं व्रजेत्* ' असें शास्त्र आहे.

असें असतांहि दिवसेंदिवस अंतरांतून अशी स्फूर्ति होऊं लागली कीं ते श्रोत्रिय ब्रह्मविद् वरिष्ठ आहेत ; व पूर्ण समाधान होण्यास त्यांच्या चरणांवर शिष्यभावानें डोकें ठेवणें जरूर आहे. ही अंतरींची वृत्ति-स्फूर्ति (Inner Voice) बळावत गेली व १८।१।४३ ला खेड येथें चतुर्थाश्रम स्वीकारल्यानंतर दंडग्रहण करण्यासाठीं श्रींच्या-कडेच जाण्याचें ठरविलें. बरोबर येणाऱ्या श्रींच्या परिचयाच्या माणसानें मोटारचें तिकिट काढून दिलें पण मोटारींत एकच जागा रिकामी होती त्यामुळें त्यास बरोबर येतां आलें नाहीं. २।३ तासांनीं मागल्या मोटारीनें तो येण्याचें ठरलें.

प्रथम दर्शन — माघ शुद्ध दशमी रविवार शके १८६४ रोजीं दुपारीं १२॥ च्या सुमारास आळें येथें श्रींच्या निवासस्थानीं जाऊन यथाविधि दर्शनार्थ माडीवर जाणें झालें. तें प्रसन्नमुख व ब्रह्मतेज पाहूनच परमानंद झाला व धन्यता वाटली ; पण महाराज भिक्षाग्रहण करीत (जेवत) होते त्यामुळें वंदन न करतांच स्वस्थ उभें राहणें कर्तव्यच होतें. पूर्वसूचना किंवा पत्र वगैरे कांहीं पाठविलेलें नव्हतें ; पण महाराजांनीं संस्कृत भाषेंतच बोलण्यास प्रारंभ केला आणि पूर्वाश्रमींच्या आडनांवानें संबोधून कुशल वगैरे विचारलें. त्यानंतर ५।६ वेळां पुष्कळ दिवस संगति झाली पण कधीं कोणाजवळ संस्कृत बोलतांना ऐकलें नाहीं ! श्रींचें भोजन झाल्यावर यथाविधि वंदन केलें आणि योगपट्टविधि सायंकाळपर्यंत त्याच दिवशीं उरकला.

शक्तिपातसामर्थ्य — केवळ संकल्पानें शक्तिपात करण्याची अद्भुत शक्ति महा-राजांच्या ठिकाणीं होती हें पूर्णपणें तत्काळ अनुभवास आलें ! *आणखी एक विचित्र प्रकार* असा:— नामकरणाच्या वेळीं श्रींना अनेक वेळां (तीन) विनंति केली कीं रामानंद किंवा राघवानंद नाम ठेवल्यास अनायासें रामस्मरण होईल; पण श्रींनीं निक्षून सांगितलें कीं ' प्रज्ञानानंद ठेवावयाचें आहे ' व तेंच ठेवलें गेलें. **याचा परिणाम म्हणजे १९४३ नंतरचें लेखन ! व जें कांहीं चांगलें वैशिष्ट्य या स्वामींत प्रतीतीस येऊं लागलें तें !** पण हें रहस्य नंतर या मनास कळलें ! **श्रींनीं त्या नांवाबरोबर**

आपलें सर्वस्व या दीन दासास दिलें असें उत्तरोत्तर प्रतीतीस येऊं लागलें.

अर्धांग व मधुमेह — १९४३ च्या पूर्वीच श्रींना अर्धांगाचा झटका येऊन डावें अंग निरुपयोगी झालें होतें; व मधुमेहाचा विकार इतका तीव्र होता कीं लघ्वीच्या पात्रास १।२ बोटें जाडीचे साखरेचे थर माजले होते. महाराज त्यामुळें सदा अवधूत स्थितींतच राहात असत. उठणें, बसणें, कौपीन नेसणें इत्यादि कांहीं करतां येत नसे. शौचादि क्रिया बसल्या जागींच आसनावर होत असत. परातींत उचलून ठेवून स्नान घालावें लागत असे, (क) मांड्या वगैरे भागांवर अनेक वेळां तळहाताएवढालीं फाफरें पडत, त्यांना मुंग्या डसत, पण हूं कीं चूं नाहीं. इतका तीव्र मधुमेह असून खाण्यापिण्यांत पथ्याचें नांव नाहीं! व तीं पडलेलीं फाफरें आपोआप औषधाशिवाय बरीं होत! चहा, साखरेचीं व गुळाचीं पक्वान्नें, मिठाई, भात इत्यादि पोटभर खात असत. एकदां महिनाभर घेण्यापुरतीं औषधें पाठविलीं तीं सर्व एकाच वेळीं खाऊन टाकलीं! दहाबारा वर्षांत दांत घासणें, तोंड धुणें इत्यादि नव्हतें; पण दांत अगदीं स्वच्छ आणि मुखाला जरासुद्धां घाण येत नसे! जेवल्यावर १।२ घोट पाण्याचा चूळ घेऊन तो खळबळून गिळून टाकीत. यापेक्षां अधिक पाणी उन्हाळ्यांतसुद्धां पीत नसत! तृषाजय पूर्ण होता व याचें मूळ बलातिबला विद्या असावी हें पुढें एका प्रसंगीं सहज ओघानें कळलें!

जेवण्याची तऱ्हासुद्धां विचित्रच! —भाताची मूद न फोडतां बाजू बाजूनें घास घेत संपवीत. तूप वाटींत असल्यास प्रथम पिऊन टाकीत असत; नंतर १।१ पदार्थ क्रमानें खात असत. एक पदार्थ खातांना दुसऱ्यास हात लावीत नसत. अमुक पचत नाहीं किंवा आवडत नाहीं असें नव्हतेंच! *जिव्हाजय* पूर्ण होता.

त्रिकाल–सर्व–ज्ञ होते. कोणाच्या मनांत कांहीं शंका किंवा विशेष विचार यण्याची खोटी कीं तो चटकन बोलून दाखवीत असत. योगाचा व छायापुरुषसिद्धीचा अभ्यास केला होता पण तो इतका गुप्त होता कीं तज्ञांससुद्धां कळणें कठिण होतें. आजमात्र संत, योगी म्हणविणारे कांहीं लोक समाधीचें प्रदर्शन करून पुरून घेण्याचें नाटक व इतर नाना प्रकारें प्रदर्शन करतात! श्रींच्या मुखांतून सहज बोलतां बोलतां चुकून जे अल्प खुणेचे शब्द बाहेर पडले त्यांवरून या दासास दीर्घ काळानें उमजलें.

भक्तिप्रेम — सगुण साक्षात्कार झाला कीं नाहीं असें विचारल्यावर 'नाहीं' असें उत्तर मिळालें; तरी पण हृदय इतकें भक्तिप्रेममय झालेलें दिसलें कीं श्रीमत् भ. गीतेंतील 'नमो नमस्तेस्तु सहस्रकृत्वः ...। इत्यादि श्लोक श्रींच्या कानीं पडूं लागतांच अश्रूंचे प्रवाह तर सुरू होतच असत, पण अगदीं हुंदके देऊन ओक्साबोक्शीं रडायलाच लागत व श्रींच ते कष्ट पाहावत नसत व पठण बंद करणेंच श्रेयस्कर ठरत असे. मराठी रामचरितमानस वाचून दाखवितांना सुद्धां असेंच होऊं लागलें.

वेदान्तचर्चा — आश्रमानंतर प्रस्थानत्रयी 'करतलामलकवत् केली होती, पण वेदान्ताची बडबड, चर्चा किंवा गप्पा कधींच नसत. एखाद दुसरा खुणेचा शब्द चुकून

बाहेर पडेल तेवढाच ! काशींतून निघाल्यानंतर ठिकठिकाणीं पुष्कळ पुस्तकें जमवीत असत, पण कधीं उघडून एक पानसुद्धां वाचलें नसेल ! " पलालमिव धान्यार्थी त्यजेद्ग्रंथमशेषतः " (श्रुति) अशीच स्थिति दिसत असे; पण वेदान्तशास्त्र अगदीं पाजळलेल्या तलवारीसारखें सतत जागृत होतें. श्रींच्या जवळ बसून जो ग्रंथ जेथून वाचण्यास प्रारंभ करावा त्याच्या पुढील वाक्यें बिनचूक उच्चारलीं जात असत. अमरकोष, ऋक्संहिता, माघ (काव्य), श्रीमद्भागवत, मल्लारिमाहात्म्य, उपनिषदें अशा विविध प्रकारच्या ग्रंथांच्या बाबतींत वरच्यासारखा अनुभव आला.

वृत्तीचा उपरम — वृत्ति इतकी उपरम पावलेली होती कीं ४।५ मिनिटांपेक्षां ती बाहेर राहातच नसे. एखादा ग्रंथ वाचण्यास सांगत, पण २।४ मिनिटें वृत्ति श्रवणांत राही व लगेच ती आंत धांव घेत असे. पुन्हां वृत्तीवर आल्यावर म्हणत कीं " तुम्हांला वाचा म्हणून म्हटलें आणि थोड्याच वेळांत मी ऐकण्याचेंच विसरलों " ! कित्येक वेळां श्रींना दिवस-रात्र, सकाळ-संध्याकाळ आल्याचें भानच नसे. दुपारीं दोन वाजतां, सूर्यप्रकाश समोर स्वच्छ दिसत असतां म्हणावयाचे कीं अरे ! ' संध्याकाळ झाली ! स्नानाचें पाणी आणा ! ' दुसऱ्या मजल्यावर बसलेले असत. जिन्यांत कोणाचें पाऊल वाजलें कीं चटकन वृत्तीवर येत. यामुळें मागण्याच्या सपाटयामुळें व नग्न बसलेले असल्यानें श्रींच्या पारमार्थिक परम श्रेष्ठतेची कल्पनाच कोणास नव्हती.

निरोगी स्थितींत — हिंडते फिरते असतांना जप, ध्यान वगैरे कांहीं करतांना दिसत नसत; त्यामुळें हा लेखक, स्वामी, प्रथम त्या गांवीं गेला तेव्हां याला लोकांनीं स्पष्टच विचारलें कीं—" या स्वामींजवळ असें काय आहे कीं आपण त्यांचा अनुग्रह घेण्यास आलांत ? " तेव्हां मात्र श्रींच्या विचित्र वागण्यांतील हेतु ध्यानीं आला. लोकांनीं अज्ञानी, साधनहीन इ. इ. समजावें व उपाधि वाढूं नये या हेतूनेंच विचित्र वाटणारे सर्व बाह्य व्यवहार केले जात असत.

भाषण स्वल्प आणि गूढ — या स्वामींशीं अगदीं मोकळे व सरळ बोलत असत; पण इतरांबरोबर बोलतांना जो अनुभव येत असे तो असा कीं अगदीं मोजके शब्द व अर्थ अति गूढ. उदा०

१. एकदां एका शेतकऱ्यानें विचारलें कीं ' महाराज ! मळ्यांत विहीर (बाव) खणायची आहे, खणूं कीं नको ? ' उत्तर मिळालें कीं " इकडे एक विहीर तिकडे एक विहीर, मधें तुमची तयार होईल ! " त्याला कांहीं बोध झाला नाहीं व तो खालीं गेला. त्यानें एका ओळखीच्या ब्राह्मणाला वरील उत्तर सांगितलें. त्यानें विचारलें कीं तुझ्या मळ्याच्या आसपास दोन बावी (विहिरी) आहेत काय ? तो म्हणाला ' व्हय हैत कीं ! ' ' त्यांना पाणी भरपूर आहे का ? ' तो म्हणाला ' डोळ्यासनी लाविन म्हणाल तर टिप्पुस नाहीं. ' ब्राह्मण म्हणाला तुझी विहीर तशीच तयार होईल. वाटल्यास खण असें स्वामींचें मत दिसतें.

२. एका संस्कृत पाठशाळेच्या विद्वान् मुख्याध्यापक शास्त्रीबोवांनीं एकदां विचारलें कीं 'ज्ञान झाल्यावर भक्ति कशी करतां येते ?' श्रींनीं शेजारचें एक पुस्तक घेऊन उघडलें व म्हणाले कीं "माझी रूपावलीसुद्धां झाली नाहीं आणि मी हें शारीर-भाष्य वाचण्यास घेतलें आहे." ते शास्त्री उमजले की नुसती शाब्दिक चर्चा कशाला ? आधीं ज्ञानी व्हा आणि मग विचारा.

३. एका मारवाड्याच्या मुलीच्या सासऱ्यानें दहा हजार रुपये त्याच्याजवळून कर्जाऊ व्याजीं घेतले होते; पण तो व्याजमुद्दल कांहींच देईना, कांहीं काळानें महाराजांकडे जाऊन त्यानें उपाय विचारला तेव्हा कांहीं न बोलतां 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः—' हा भ. गीतेंतला श्लोक उच्चारला, तो या स्वामींकडे चासला आल्यावर त्याला विचारलें तेव्हां तो म्हणाला कीं आपले महाराज कांहींच बोलले नाहींत फक्त हा श्लोक उच्चारला. तेव्हां त्यास सांगितलें कीं त्याला कापलात, तोडलात, भाजलात, पाण्यांत बुडवलात तरी तो कांहीं देणार नाहीं हें उत्तर आहे दिलेलें !

४. श्रींच्या संगतींत ज्यांनीं २०।२५ वर्षे काढलीं आणि आजारीपणांत नीच सेवा केली त्यांनासुद्धां पोटे या आडनांवापेक्षां दुसरें कांहींही स्वतःविषयीं सांगितलें नव्हतें. ज्या कोणीं आग्रहानें विचारलें त्यांस अगदीं अभद्र शिव्या मिळाल्या ! या स्वामीनें विचारल्यावर श्रींना जेवढी व जशी आठवण होती ती तशी सांगितली. १९४३ सालीं अशा रीतीनें जें कांहीं कळलें तें एका वहींत त्या वेळीं लिहून ठेवलें होतें त्यावरूनच १९४३ च्या पूर्वींची माहिती येथें लिहिली आहे. (क) *वीस पंचवीस वर्षें सेवा करणारांनीं महाराजांची सही किंवा अक्षर पाहिलें नव्हतें !* श्रीरामचरित-मानसाचा मराठी हस्तलिखित अनुवाद मधूनमधून वाचून दाखविल्यावर अभिप्राय व आशीर्वाद मागितला तेव्हां असा असा लिहून आणा म्हणून आज्ञा झाली. त्याप्रमाणें लिहून नेल्यावर श्रींनीं खालीं सही केली. ती पाहून तेथील सर्वांस आश्चर्य वाटलें कीं मोठे स्वामी या स्वामींशीं अगदीं सरळ व मोकळेपणानें कसे वागतात ! **श्रींच्या हातची व्यासपूजेची पोथी श्रींनीं या दासास दिलेली आहे.**

अन्य शिष्य—प्रज्ञानानंदाचे दुसरे गुरुबंधु कोण, कुठें आहेत असें विचारतां म्हणाले कीं 'तुमचे दण्डी गुरुबंधु तुम्हीच, नुसते आश्रमी पुष्कळ झाले, त्यांच्याशीं काय कर्तव्य !

असाधारण तितिक्षा व शान्ति—दहा बारा वर्षे देह पराधीन झाल्यामुळें, सर्व दिवस एकाच जागीं बसून राहावें लागे, जेथें बसत तेथें, दुसऱ्या मजल्यावर (खालच्या-सुद्धां तिसरा) तक्तपोशी नसल्यामुळें उन्हाळ्यांत फारच तापत असे व उकडत असे; पण कधीं त्याबद्दल तक्रार नाहीं कीं कुरकुर नाहीं कीं पंखा लागत नसे ! ढेकूण इतके होते कीं दर्शनास येणाऱ्या व ५।७ मिनिटें बसून जाणाऱ्यांस सुद्धां त्यांचें भय वाटे व

जातांना प्रसाद म्हणून ते घरोघर जात असत ! पण चावला व चिमटींत सांपडला तर धरून पाण्याच्याच परातींत टाकला जात असे. कोणावर आरडाओरडा करीत नसत. थंडीच्या दिवसांत कोणीं अंगावर शाल घातली तर घातली; राहील तेवढा वेळ राहील; त्याबद्दल तक्रार नाहीं कीं हातानें (एकाच) सांवरण्याचा प्रयत्न करीत नसत.

(क) झोपविण्यापूर्वी कोणीं उशाला उश्या ठेवल्या तर त्या फेकून देत; उशाला मोठमोठीं चंदनाचीं व बेलाचीं खोडेंच लागत असत. बसल्या बसल्या कुशीस होतांना किंवा बसतांना उजवें कोपर जमिनीवर टेकावें लागत असे; त्यामुळें १-१॥ इंच लांबीचा घट्टा तेथें पडला होता.

(ख) एक दिवस रात्रीं मंडळी झोपवून खालीं गेली. तासाभरानें झोप लागली कीं नाहीं हें पाहण्यास एकजण वर गेला तों महाराज बसलेले ! आणि म्हणाले कीं "अरे या दण्डाला (बाहूला) काय झालें बघ पाहूं; मघाशीं कटकट असा आवाज आंतून निघाला ! पाहातात तों उजव्या दण्डाचें हाड साफ मोडलेलें ! **हाड मोडलें तरीसुद्धां कोणास हांक मारली नाहीं कीं आरडाओरड नाहीं!** पुढें तें हाड पट्टा बांधल्यानें सांधलें गेलें पण वांकडें बसल्यानें (तो एकच) चांगलाहि हात निकामी झाला. अशा स्थितींत २।३ वर्षे काढलीं !

(ग) पात्र जवळच हात सहज पुरेल असें ठेवलेलें असे; तरी पुष्कळ वेळां आसनावरच लघुशंका होत असे व फार घाण सुटत असे; व शौचाविधि तर बहुधा आसनावरच. खालीं कोणी असलें तरी हाक मारीत नसत. ठरलेले सेवा करणारे येतील तेव्हां त्या घाणींतून सुटका व्हावयाची; पण अशाहि परिस्थितींत सदा प्रसन्न असावयाचे. त्या वेळीं अगदीं पाळण्यांतल्या बालकासारखी वृत्ति असावयाची ! अशी तितिक्षा व शान्ति कुठें पाहण्यास सांपडली नाहीं !

"ज्यानें केलें त्यानेंच भोगणें योग्य" — महाराजांच्या देहास होणारे कष्ट पाहवेनात; तेव्हां प्रज्ञानानंद स्वामींनें एकदां विनंति केली कीं "आपले सर्व रोग व पीडा या आपल्या दासास देऊन, पुष्कळ वर्षे भोगीत असलेल्या या असह्य कष्टांतून मोकळें व्हावें. आपल्या कृपेनें या स्वामीच्या देहास ती उपाधि फार काळ बाळगावी लागणार नाहीं." यावर उत्तर मिळालें कीं "मी देऊं शकेन व तुम्हीं घेऊं शकाल, हें अगदीं खरें; पण ज्यानें केलें त्यानेंच भोगणें योग्य, फार त्रास होतो असें मनाला वाटलें कीं *प्राण ब्रह्मरंध्रांत चढवितांच कष्ट मुळींच नाहींत.*" या वाक्यानें पक्कें कळलें कीं महाराजांनीं योगाभ्यास उत्तमच केला असला पाहिजे.

सक्रिय कर्मविपाक-निष्ठा — श्रींच्या परिचयांतील एका शास्त्रीबोवांनीं श्रींस विचारलें कीं 'स्वामी ! शास्त्रविरोध असतां तुम्ही पैसे कां मागतां ?' उत्तर :— 'मागावेसे वाटतात म्हणून मागतों.' प्रश्न :— 'या आंगठ्या, रुपये वगैरे विविध पदार्थ दुकानासारखे सभोंवतीं मांडून ठेवतां, आणि कोणीं डोळा चुकवून नेले तर ?

उत्तर :— ' *हे जिन्नस या स्वामीचे नाहींत व ज्याच्या प्रारब्धांत असतील तो नेईल.* ' प्रश्न :— ' रात्रीं माडीचा दरवाजा व बिनगजाची खिडकी उघडीं असतात; कोणीं रात्रीं येऊन चोप देऊन सर्वच नेलें तर?' उत्तर :—' मार खाण्याचें या देहाचें प्रारब्ध असेल तर तो चुकेल का?'

भावावेशांतील लीला — अर्धांग झाल्यानंतरच्या काळांत फारच विचित्र लीला करीत असत. कधीं हातांच्या दाही बोटांत दहा सोन्याच्या आंगठ्या, पवित्रकें वगैरे घालीत व अंगावर चांगली उंची शालजोडी घालण्यास सांगत. कधीं पायांत चांदीचीं मोठालीं जोडवीं व हातांत काचेच्या बांगड्या घालीत व खण लुगडें मागत; नेसतां येत नसल्यानें डोक्यावर ठेवीत, कधीं बैलांच्या गळ्यांतील घुंगुरमाळा, पितळेचे तोडे इत्यादि गळ्यांत घालीत असत व म्हणत कीं ' आतां नंदीबैल चांगला दिसतो कीं नाहीं?' अशा अनेक लीला करीत असत; त्यामुळें लोक मनांत म्हणत कीं स्वामी वेडे आहेत. या स्वामीलाहि त्या वेळीं त्या लीलांतील मर्म कळलें नव्हतें; पण कांहीं तरी हेतु असला पाहिजे असें वाटे. गेलीं कांहीं वर्षें भावावेशाच्या प्रदेशांत, पुष्कळ संचार करण्यास सांपडल्यानें, प्रत्यक्ष अनुभवानंतर ठरलें कीं त्या त्या भावावेशांत तो तो शृंगार करीत असत.

एक चमत्कार — एक खट्याळ सुशिक्षित ब्राह्मण कांहीं तरी विक्षिप्तपणा करून साधुसंतांची परीक्षा घेत असे. महाराजांची परीक्षा पाहण्याच्या बुद्धीनें तो एक दिवस प्रथमच दर्शनास गेला. त्याच्या खिशांत त्याचे स्वतःचे दहा रुपये व त्याच्या मालकाचे ४१ रुपये होते. गेल्याबरोबर महाराजांनीं म्हटलें कीं *५१ रुपये दिलेत तर बरं होईल.* तो महाराजांच्या नेत्रांवर त्राटक करूं लागला, (टक लावून पाहूं लागला) १/२ मिनिटांत महाराजांचें मुख दिसत नाहींसें होऊन त्याच्या जागीं त्यानें पूर्वी कोल्हापुरास पाहिलेल्या एका संताचें मुख दिसूं लागलें; तेव्हां तो मनांत आश्चर्यचकित झाला; तोंच महाराज उद्गारले कीं कोल्हापुरचें येथें दिसूं शकतें. त्यांत कांहीं विशेष नाहीं. तो चारी मुंड्या चीत झाला, ते ५१ रुपये पुढें ठेवून, पायांवर डोकें ठेवून, क्षमा मागून परत गेला व शेवटपर्यंत श्रींचा भक्त बनला.

द्रव्य मागणें व जनहित — महाराज सर्वांच्याजवळ मागत असत असें नाहीं. मागितलेलें मिळालें न मिळालें तरी प्रसन्नतेंत न्यूनाधिक्य होत नसे. मागितलेलें समाधानानें दिलें गेलें तर देणाराचें ऐहिक कल्याण पुष्कळच होत असे. असिस्टंट कलेक्टर पिअरींजवळ एक हजारांची एक नोट मागितली व सांगितलें कीं दिलीत तर अगदीं लवकर कलेक्टर व्हाल; पण त्यानें दिली नाहीं, अशा अनेक गोष्टी आहेत; पण सार समजण्यास विस्तार फार लागत नाहीं.

अद्भुत हस्तरेषा — महाराजांच्या दोन्हीं पायांवर फारच सुंदर ऊर्ध्वरेषा होती; पण तशी कांहीं संतांच्या व परमार्थी व्यक्तींच्या पायांवर पाहिली होती. **श्रींच्या**

उजव्या हातावर बुधाच्या उंचवटया (mount) वरून चंद्राच्या उंचवटयावर जाणारी अर्धचंद्राकार सुंदर रेषा होती; आजपर्यंत तशी सुंदर रेषा तर राहोच पण साधें वलयसुद्धां त्या ठिकाणीं कुठें पाहण्यास सांपडलें नाहीं. या **रेषेचें वैशिष्ट्य काय याचा शोध होणें आवश्यक आहे. हें कार्य वाचक करतीलच.**

समाधि—कांहीं वर्षें जे कधीं अर्धा पावशेरसुद्धां पाणी रोज पीत नसत व ज्यांचा आहार चांगलाच होता त्यांनीं एकाएकीं अन्न वर्ज्य केलें व पुष्कळ पाणी पिऊनच राहूं लागले. त्या वेळीं तेथील कोणास कांहींच कल्पना आली नाहीं; पण सुमारें १५ दिवसांनीं पौष शुद्ध द्वितीया शके १८७० रोजीं दुपारीं ११-११॥ च्या सुमारास आळें येथेंच वयाच्या ६५ व्या वर्षीं दृश्य पार्थिव देहाचा त्याग केला व श्रीगुरुमहाराज विश्वव्यापक झाले.

त्या वेळीं हा स्वामी नगरला होता हें आळ्याच्या लोकांस विदित असल्यानें त्यांनीं मालमोटार नगरला पाठविली. रात्रीं ८ वाजतां आळ्यास पोंचून त्या पार्थिव देहाचें दर्शन घेतलें; तेव्हां **आश्चर्य वाटलें तें हें कीं १५ दिवस नुसत्या पाण्यावर राहिल्यानंतर आणि देह अचेतन होऊन नऊ तास होऊन गेल्यावरसुद्धां त्या मुखाच्या व देहाच्या तेजांत, गोंडसपणांत व गौर वर्णांत लेशमात्र फरक पडलेला दिसला नाहीं !**

नंतर यथाविधि पुढील सर्व कार्य मोठ्या थाटानें व शांतपणें होऊन पालखींतून सोवळ्यानें मिरवून आणल्यावर समाधिस्थानीं तो पार्थिव देह ठेवून सर्वांनीं शेवटचें दर्शन घेतलें व पुढील कार्य उरकलें तों दोन वाजले. *श्रीयुत दामुअण्णा कुळकर्णी यांच्या आडाच्या* (विहिरीच्या) *पूर्व बाजूस श्रींचें समाधिस्थान आहे.*

महाराज जरी पैसे, आंगठ्या, चांदीचीं भांडीं, पळ्या, वगैरे घेत असत तरी श्रींच्या समाधिमंदिरासाठीं खर्च करण्यास कांहींच शिल्लक राहिलेलें नाहीं असें समाधीच्या दिवशींच दृष्टोत्पत्तीस आलें ! हा जगाचा रूढिमार्ग आणि विशेषेंकरून कलीचा प्रभाव आहे !

निर्ममत्व—जीवनमर्यादा संपत आली आहे असें महाराजांस निश्चितपणें कळल्यानंतरसुद्धां पाठीमागें राहणाऱ्या द्रव्यादि पदार्थांची काय व्यवस्था करावयाची याविषयीं लेख किंवा तोंडीं सूचनासुद्धां कोणास दिली नव्हती असें समजलें ! व हें असत्य मानण्याचें मुळींच कारण नाहीं. 'हे पदार्थ या स्वामीचे नाहींत, ज्याच्या प्रारब्धांत असतील तो नेईल' या वचनांशीं अगदीं सुसंगतच घडलें. यावरून त्या धनादि वस्तूंविषयीं लेशमात्र ममत्व नव्हतें हें सहज सिद्ध झालें.

श्रींचे एक निष्ठावंत सकामभक्त श्रीयुत कुळकर्णी फौजदार यांनीं प्रयत्न करून **समाधिस्थानीं एक लहानसें मंदिर बांधविलें आहे.**

महाराज समाधिस्थ झाले असें या स्वामीच्या मनास कधींच वाटलें नाहीं, वाटत नाहीं व वाटणार नाहीं; कारण कीं त्यांना फार प्रिय असलेल्या या त्यांच्या

नामधारी सेवकाजवळ श्रींची उपस्थिति सतत आहे असें स्वानुभवानें ठरलें आहे.

अलीकडील ४०।५० वर्षांच्या काळांत अशी विभूति महाराष्ट्रांत तरी झालेली नाहीं.

श्रींच्या विचित्र वृत्तीमुळें पारमार्थिक लाभाच्या दृष्टीनें त्यांच्यावर विश्वास बसणें फार कठिण होतें. त्यामुळें खरा पारमार्थिक लाभ फारसा कोणीं घेतला नाहीं. खरा, शुद्ध पारमार्थिक लाभ करून घेण्याची तळमळ फारच थोड्यांच्या ठिकाणीं असते; आणि त्यांतहि **उकिरड्यांत लपविलेल्या चिंतामणीसारखी बाह्य वागणूक !**

ल. ठे. — महाराजांची कृपा झाली नसती तर श्रीरामचरितमानस (प्रकाशित) आणि श्रीमानसगूढार्थचंद्रिकालेखन हीं असंभाव्य कार्यें या मनबुद्धींद्रियांकडून होणें स्वप्नांतसुद्धां शक्य नव्हतें. गूढार्थचंद्रिकेशीं श्रींचा असा घनिष्ट संबंध असल्यानें श्रींचें अल्पसें चरित्र येथें देणें कर्तव्यच होतें.

श्रीगुरुमहाराजांनीं सही करून दिलेला श्रीरामचरितमानस (मराठी) ग्रंथाविषयीं अभिप्राय व आशीर्वाद.

धन्योऽसि कृतकृत्योऽसि पावितं स्वकुलं त्वया ।
अन्तः संतोषमापन्ना श्रुत्वा रामायणं वयम् ॥ १ ॥

सार्की — तुलसीदासकृत–काव्यकुसुमगत मधुपः प्रज्ञानोऽयम् ।
रामचरितमधु निजभाषायामपि तत्रानस्मभ्यः ॥ २ ॥

इदं रामायणं काव्यं जनानां सौख्यदायकम् ।
प्रीतिपात्रं भवेल्लोके शाश्वतं कीर्तिवर्धनम् ॥ ३ ॥

भुक्तिं भक्तिं च कैवल्यं ज्ञानं वैराग्यमेव च ।
सेवनादचिरान्नित्यं दास्यत्येष वरो मम ॥ ४ ॥

नमोऽस्तु गुरवे तुभ्यं शुद्धब्रह्मस्वरूपिणे ।
वासुदेवाय शान्ताय परमानन्ददायिने ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 १।२ 卐 卐 卐

श्रीरामायणगुरु बाबा श्री गंगादास महाराज यांचें अल्प चरित्र

प्रथम दर्शन—श्रीरामचरितमानसमुग्ध रामभक्त महात्मा बाबा श्री गंगादास यांच्या प्रथम दर्शनाचें सौभाग्य या दासास पूर्वाश्रमांत सन १९३१ मध्यें चिंचणी, तालुका डहाणू, जि. ठाणें येथें प्राप्त झालें. रस्त्यानें जात असतां वाटेवरील एका पिंपळाच्या पारावर धुनीजवळ बसलेले दिसले. पिंपळाच्या आड उभें राहून पाहिलें तों एक छोटेंसें पुस्तक [मानस (मूल) गुटका] व एक लोखंडी मोठा चिमटा इतकाच परिग्रह दिसला. त्या दिवशीं दुरूनच नमस्कार करून जाण्याचा विचार होता; पण—

केवळ कौपीनधारी — त्या साधूस नीट पाहिल्यावर अशी भावना उत्पन्न झाली कीं हे पूर्णकाम, जीवन्मुक्त, बालवृत्तींत राहणारे पूर्ण विरागी महात्मा आहेत. त्यांनींहि ८।१० हातांच्या अंतरावरून पाहिलें व शेजारीं बसलेल्या कोणास म्हटलें कीं 'देखो ! उधर एक चोर बैठा है, बड़ा चोर है;' हे शब्द हृदयांत प्रविष्ट होतांच शरीर पुलकित झालें व प्रथम जागृत झालेली भावना अधिक दृढ झाली; पण जवळ जाऊन दर्शन घेणें घडलें नाहीं. प्रथमदर्शनाचा विधि इतकाच.

उत्तर हिंदुस्थानी जटामंडलधारी, अंगाला भस्म फासलेल्या व उंची शालजोडी पांघरलेल्या एका भोंदू, लबाड साधूचा अति कटु अनुभव या लेखकास वयाच्या नवव्या वर्षीं घरांतच पाहण्यास सांपडला होता व तेव्हांपासून अशा साधूंस 'दुरून नमस्कार !' अशीच याची वृत्ति बनली होती; त्यामुळें प्रथमच पाहिलेल्या या अज्ञात साधूविषयीं अंतरांत निर्हेतुक प्रेम जागृत होऊनसुद्धां प्रथम दिवशीं जवळ जावेंसें वाटलें नाहीं; तथापि नंतर वारंवार वाटूं लागलें कीं जाऊन भेटणें जरूर आहे.

परिचय — जगत्सूत्रसंचालक परम दयाघन श्रीरघुनाथाच्या कृपेनें बाबा तारापूर (चिंचणी) येथील किल्ल्यांत राहात असतां परिचय वाढत गेला व पर्यवसान गुरु-शिष्यभावना प्रस्थापित होण्यांत झालें. **बाबांच्या निर्हेतुक कृपेचें व प्रेमाचें दृश्य स्वरूप म्हणजेच श्रीरामचरितमानस (मराठी) असें म्हणणें अयथार्थ नाहीं.** (क) प्रसंगवशात् एक दिवस बाबा म्हणाले "*बाबू ! दो साल भये तू मेरी परीच्छा कर रहा है और मैं तेरी परीच्छा कर रहा हूं ;* ऐसाही करना चाहिये ।" '*गुरु करना बस के। सोना लेना कस के*'। (संगतींत बराच काळ राहून गुरु करावा व सोनें कसाला लावून घ्यावें.)

जन्म व जन्मभूमि — श्रीबाबांचा जन्म ग्वाल्हेर संस्थानच्या सरहद्दीजवळ एका गांवीं झाला, तें गांव श्रीगोस्वामींच्या जन्मभूमीपासून (राजापूर) फार दूर नाहीं. बाबा श्रीतुलसीदासांच्याच जातीचे ब्राह्मण होते. शरीर उंच, सडसडीत, पण पिळदार, सशक्त व तेजस्वी होतें. वर्ण गोरा होता व रूपानें मध्यम होते.

गृहत्याग — घरीं पिता, सावत्र माता व धाकटा सावत्र भाऊ होता. घरची मालकीची जमीन १४० एकर होती; व मालकीचें एक श्रीराममंदिर होतें. पण सापत्न मातेच्या जाचामुळें वयाच्या १५ व्या वर्षी बाबांनीं घर सोडलें. भटकत भटकत कलकत्त्यास गेले. तेथें २।३ वर्षें भय्याची नोकरी केली; पण 'तेंच घडे जें रामा वाटे' याप्रमाणें नोकरीचा कंटाळा आला. मनानें ठरविलें कीं चाकरीच करायची तर जगत्पिता परम कारुणिक श्रीरघुनाथाची कां करूं नये? नोकरी सोडली व श्रीअयोध्येंत गेले.

सक्रिय परमार्थ — अयोध्येंत बाबा श्रीरघुनाथदासजींच्या आखाड्यांत—'बड़ी छावनी में'—प्रवेश मिळाला, तेथील अति कडक शिस्तींत मन रंगूं लागलें. तेथेंच गुरुकृपा झाली. *बडी छावनी* हा एक परंपरागत मोठा साधूंचा आखाडा—सांप्रदाय—आहे.

तीर्थाटन — गुरुसमीप राहून मठांतील महंताची सेवा, पूजा वगैरे विविध सेवा-भूमिकांत कांहीं वर्षें काढलीं व गुरूंच्या अनुज्ञेनें तीर्थाटनास बाहेर पडले. प्रवास कधीं पायीं अनवाणी, तर कधीं तिकीट न काढतां, अपमान सहन न करतां रेल्वेनें केला. प्रवासांत एक लोटा, रस्सी, रामायण (गुटका) व एक चिमटा (चिपिया) इतकेंच बरोबर असे. कपडे म्हणजे एक कौपीन नेसले असतील तें. कमरेला काथ्याचा जाडा दोर हें कटिसूत्र !

प्रवासांत — कोणाच्या घरीं उतरणें, जेवणें, भिक्षा मागणें या गोष्टी कधीं केल्या नाहींत; कोणीं शिधा आणून दिला तर डाळ, रोटी किंवा डाळ भात त्या एका लोटयाच्या साह्यानेंच करीत असत; हें अशक्य वाटेल पण अगदीं सहज शक्य आहे. याप्रमाणें अखिल भारतांत पर्यटण केलें. 'सहज सरलता मनिं न कुटिलता । यथालाभिं संतुष्ट-चित्तता' (७।४६।३) अशीच वृत्ति होती.

देहीं उदासीन — पुष्कळ विचारूनसुद्धां बाबांनीं पूर्वीची जास्त हकीकत सांगितली नाहीं, पण म्हणाले कीं "देख बाबू ' ॥ छिति (क्षिति) जल पावक गगन समीरा । पंचरचित यह अधम सरीरा ॥' इसकी पूछ ताछ जादा करने से क्या लाभ? हम महात्मा तो नहीं हैं । 'सत हरिभजन जगत सब सपना ॥' अब फिर कभी इस चमडे की बातें मत पूछना बाबू!"

केळीच्या सोपटाची लंगोटी — तारापूरच्या किल्ल्यांत राहिले तेव्हां गोणपाटाची लंगोटी होती, पण ती फाटल्यावर केळीचें सोपट नेसत असत तें सुद्धां फाटेपर्यंत बदलीत नसत! त्यांत खाडीच्या खाऱ्या पाण्यांत रोज निदान दोन वेळां तरी स्नान करीत असत; (कारण समुद्रस्नान रोज निषिद्ध आहे). पण अंग चोळणें, पुसणें जणूं माहीतच नव्हतें. सहसा आजारी पडत नसत; पण क्वचित ताप आला तरी स्नान वगैरे चालूच असे व औषध कधीं घेतलें नाहीं.

क्षुधा-रसना-जय — क्षुधेचा व रसनेचा पूर्ण जय केलेला दिसत होता. ८।८ दिवस न जेवतांच राहात असत. कोणी भय्या किंवा साधू असले तर मध्यरात्रीं शिवपूजा

केल्यावर जेवत असत. शिधासामान असूनसुद्धां हातांनीं शिजवून जेवतांना पाहिले नाहीं. श्रीरामापुढें ठेवलेलीं फळें वाळून सुकून गेलीं किंवा नासलीं तरी चालत; पण आपल्या हातांनीं त्यांतील फळ घेऊन खात नसत. दुसऱ्या कोणीं उचलून सोलून वगैरे दिलें, तरच खात असत.

खाण्यांत विक्षिप्तपणा — बोरें, पोपया, केळीं वगैरे फळें सालें बिया वगैरेसुद्धां खात असत. आंबेसुद्धां तसेच; पण कोय टाकावीच लागे! एकदां एकानें ओंजळभर घाटी मिरच्या, हिरव्या, बाबांच्या ओंजळींत टाकल्या! त्या सर्व अगदीं चावून चावून, हाय हुश् न करतां, भक्षण केल्या पण डोळ्यांत पाण्याचा थेंबसुद्धां आला नाहीं!

गांजा ओढणें — न मागतां, न सांगतां कोणीं गांजाच आणून दिला तर २।२ तोळे एकटेसुद्धां एका दिवसांत ओढीत असत; पण पैसे देऊन कधीं विकत आणला किंवा आणविला नाहीं. ८।८, १५।१५ दिवस गांजाशिवायही जात. पुष्कळ गांजा ओढूनसुद्धां कधीं कैफ आला नाहीं कीं डोळे लाल झाले नाहींत. गांजा नसला तर आठवणसुद्धां होत नसे.

पूर्ण अयाचित वृत्ति — बाबा कधींहि कोणाहिजवळ कांहींसुद्धां मागत नसत; किंवा 'मी अयाचित असतों' असा उच्चारहि करीत नसत. न मागतां तेथें विल्ल्यावर आणून दिलेल्या वस्तूंवरच भागत असे. फिरणारे २।४ साधु बाबांकडे बहुधा पडलेले असावयाचेच; तरी कधीं मनानेंसुद्धां अयाचित व्रताचा भंग केला नाहीं. (**क**) बाबा नेहमीं धुनी ठेवीत व रोज स्नान संध्या करून-आल्यावर मौनानें, नियमानें, हवन करीत असत; हवनीय द्रव्यें सरलीं तरीसुद्धां कोणाजवळ याचना करीत नसत; किंवा परिचितांसहि 'आणा' म्हणत नसत; अशा वेळीं म्हणत कीं, 'अभी श्रीरामजी किसी के हाथ भेज देंगे' इतकें म्हणतात न म्हणतात तोंच कोणीतरी नेमका तोच जिन्नस घेऊन येत असे. **बाबा सिद्धसंकल्प होते.**

अढळ निष्ठा — बाबा एकदां अगदीं कळवळून प्रेमानें म्हणाले कीं 'बाबू! तूं रामजी का भगत होकर भिक्षा (माधुकरी) काहे को माँगता है? तेरी इच्छा हो तो चाहे निर्जन अरण्य में जाके बैठ। वहाँ भी श्रीरामजी तेरी सब जरूरिअत पूरी कर देंगे। जिसने अपना देहाभिमान, बासना जगत के सब नाते, सब सगाई, अपना सरबस (सर्वस्व) भगवान के चरणों में समर्पित किया उसके जोग और छेम (योगक्षेम) श्रीरामजी नहीं चलाएंगे?' 'गई बहोर गरीब नेबाजू। गतप्रदायक दीनदयालू' तो हैं ही। **तन के लिये बसन** (वस्त्र, बसन) **और पेट के लिये नाज** (अन्न) भी **नहीं देंगे तो उनका नाम जगत में लेगा कौन?**

बाबांच्या या वचनाची प्रतीति — प्रथम अगदीं निर्जन घोर अरण्यांत नर्मदा तटाकीं ११ अहोरात्र घेतली व लोकवस्तींत धान्याच्या दुर्मिळतेंत श्रीभीमाकाठीं २१ महिने घेतली; कधीं एका घासानेंसुद्धां उपाशीं राहावें लागलें नाहीं! भगवंताच्या

'योगक्षेमं वहाम्यहम्' या वचनावर केवढी दांडगी अढळ निष्ठा व आत्मविश्वास! **अशा विभूतींच्या संगतीनें भ्याडही शूर बनले तर नवल नाहीं.**

सेवाप्रिय स्वयंदास — बाबा साधुसंतांची (वेषधारीच असले तरी) सेवा आदरानें व भगवद्भावनेनें करीत असत. फिरते २।४ साधू बाबांच्या येथें नाहींत असें क्वचितच घडत असे. दुसऱ्यांना खायला घालण्यांत बाबा 'भोज्येषु माता' किंबहुना अधिक होते. फार उदार होते. थोडें देणें व काटकसर हे शब्द जणू त्यांच्या कोषांत लिहिलेलेच नव्हते. तारापूरच्या किल्ल्यांत बाबांच्या इच्छेमुळें जेव्हां विष्णुयाग झाला त्या वेळीं, स्वस्ताईच्या काळांत त्यांनीं आपल्या ओंजळींनीं पेढे व खडीसाखर वांटली. एका दिवसांत १२ शें रुपयांचा प्रसाद त्यांनीं आपल्या हातांनीं वांटला! हें औदार्य एऱ्हवींसुद्धां दिसत असे. (क) खरे महात्मा असून अत्यंत निगर्वी आणि 'स्वयंदासाः तपस्विनः' या कोटींतले होते. तथापि दर्शनास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून यथाधिकार कांहीं तरी भगवत्सेवा करवून घेत. चंदन उगाळणें, बागेंतून बेल आणणें, बेलाच्या प्रत्येक दळावर 'श्रीराम', 'श्रीराम' चंदनानें लिहिणें, तुळशी-फुलें इत्यादींच्या वाफ्यांस पाणी आणून घालणें, श्रीरामायण वाचणें इत्यादि कामें सांगत असत.

परम मानसप्रेमी — बाबांचें मानसावर (तु. रामायणावर) अपार प्रेम होतें. समग्र मानस मुखोद्गत होतें तरी दृष्टि मंद असूनसुद्धां रामायण हातांत घेऊनच पाठ-पारायण—करीत असत. (क) दोन चार लोक आलेले दिसले कीं त्यांना शिस्तींत समोर बसवून मानसांतील चौपायांचीं अर्धें आपण स्वतः भजनपद्धतीनें म्हणत व जमलेल्या मंडळीस 'सीताराम जय सीताराम' किंवा 'जय सियाराम जयजय सियाराम' हें पालुपद म्हणण्यास सांगत. टाळांचे पुष्कळ जोड तेथें ठेवलेले असत.

निर्हेतुक प्रेमसागर — बाबा म्हणजे शुद्ध निःस्वार्थी प्रेमाचा अगाध अनंत सागरच होता. या पामर जीवावर त्या महात्म्याचें जें प्रेम होतें त्याचें वर्णन करण्यास शेष-शारदासुद्धां लाजतील, मग हा 'शाकविक्या मणिगुणगण' वर्णन कसें करणार! त्यांच्या परम पावन प्रेमाची नुसती सहज स्मृति आज झाली तरी वपु पुलकित होते व हृदय भरून येतें. अनंत जननीचें वात्सल्य बाबांच्या प्रेमलेशावरून ओवाळून टाकलें तरी बरोबरी होणार नाहीं. (क) बाबा एकटे असतां या त्यांच्या प्रियतम बाबूनें 'जय सीताराम! बाबा!' असें म्हणून त्यांच्या पदपंकजांस मिठी मारली कीं एखाद्या बाव्हल्याप्रमाणें याला वर उचलून हृदयाशीं धरून प्रेमानें कवटाळीत असत. त्या आनंदा हृदयच अनुभवि। वाणिस न कळे वदे कसें कवि॥ मूक करत पीयूषास्वादन। त्यास सांगवें त्याचा स्वाद न॥ 'तैं कुणि कांहिं न वदले पुसलें। प्रेमभरें मन गतिला मुकलें।' अशी दोघांचीहि दशा होत असे.

शिक्षण आणि विद्वत्ता — बाबा फारसे शिकलेले नव्हते. जेमतेम लिहितां वाचतां येत होतें; पण रामायणाशीं समानार्थक अशीं गीता-भागवतादि ग्रंथांतील वचनें भराभर

मुखांतून बाहेर पडत असत. सिद्धि-चमत्कार त्यांनीं कधींहि करून दाखविले नाहींत. **सिद्धींचा उपयोग करून चमत्कार करून दाखविणाऱ्या साधूकडे निष्काम परमार्थी माणसांनीं दर्शनाससुद्धां जाऊं नये असें बाबांचें आग्रहाचें सांगणें असे.** अशाच एका कल्याण-भिवंडीकडील साधूच्या दर्शनास जाण्याचा बेत बाबांच्या कानांवर घातला. बाबा म्हणाले, 'बेइमान काहे का ! (हें बाबांचें प्रेमाचें पालुपद या दासापुरतेंच होतें.) बाबू ! वह साधु तो सिद्धिवाला है ! कुछ माँगना तो नहीं है न ? फिर तूं काहे को जाता है उसके पास ? सिद्धि-चमत्कारोंपर बड़े हुए (प्रसिद्ध झालेल्या) साधुओंके पास कभी जाना नहीं बाबू ! जग जाचिअ कोउ न, जाचिअँ जौं जियँ जाचिअ जानकि-जानिहि रे ॥ जेहि जाचत जाचकता जरि जाइ जो जारत जोर जहाँनहि रे (कवि. ७।२८) अर्थ : जगांत कोणाजवळ याचना करूं नये, याचना करणेंच असेल तर श्रीजानकीपतिजवळ मनांत याचना करावी; ज्याच्यापाशीं याचन केल्यानें जगाला जबरीनें जाळणारी याचनाच जळून जाते.

वेदान्त-वचन-मूक — बाबांच्या मुखांतून वेदान्ताची पोपटपंची कधींहि बाहेर पडलेली ऐकली नाहीं; त्या विषयांत जणूं ते मुके होते. असें कां म्हणून एकदां विचारतांच सिद्धान्तरूप सूत्रवत उत्तर मिळालें तें :—बाबू ब्रह्मविद्या एक पवित्र अस्त्री (स्त्री) है। इसके साथ जो संग होता है वह क्या खुल्लेपर और चाहे जिसके सामने हो सकता है ? जब कोई सच्चा बिरागी अधिकारी मिलता है तब तो एकान्त में एक ही बात कहने से ग्यान का उदय होता है। ब्रह्मग्यान मुख से बोलने की बात तो है नहीं। अनुभव करके 'देख ब्रह्म समान जग माहीं' (३।१५।७) ऐसा करना पड़ता है। आज-कल तो ब्रह्मग्यान रास्ते में और व्यासगद्दीपर (व्यासपीठावर) पेट के लिये बेचा जाता है। ब्रह्मग्यान बिनु नारिनर कहहिं न दूसरि बात ॥ कौड़ी लागीं लोभबस करहिं विप्रगुरु घात' (७।९९ रा) ऐसा जो गोसाँईजी कह गये हैं वह कितना सत्य है वह तू देख ले !

ज्ञान-प्रबोध-शक्ति — एके दिवशीं कांहीं निमित्तानें बाबू रात्रीं बाबांकडेच वस्तीला राहिला होता. मध्यरात्रीच्या शिवपूजेंतून निवृत्त झालेले बाबा परम प्रसन्न होते आणि तिसरें कोणी माणूस नव्हतें. बाबा म्हणाले "बाबू ! जल्दी आ जा ! अब ग्यान का रहस्य एकही बातमें कहूं गा। तेरी लायकात हो तो परतीति मिल जायगी। देख ! '**जैसा है वैसा रहना, कुछ बनना नहीं**' त्यांच्या मुखांतून निघालेलें हें वाक्य हृदयांत शिरतांच सर्व वेदान्तांच्या व भ. गीतेच्या उपदेशाचा लख्ख प्रकाश हृदयांत पडला. त्या वचनांतील रहस्य अन्तःकरणाच्या हाटकपटावर अविस्मरणीय चिरस्थायी रीतीनें वज्रलेपासारखें चित्रित केलें गेलें, व अपूर्व, अवर्णनीय, परमानंदमय दशा प्राप्त झाली. 'शब्दशक्तेरचिन्त्यत्वात् शब्दादेवापरोक्षधीः' ही श्रीमदाचार्योक्ति सत्यसृष्टींत उतरलेली प्रथम अनुभविली ! ही अद्भुत कृपा २७।१।३४ शनिवारीं रात्रीं

१ वाजल्यानंतर झाली असावी असें पूर्वीच्या कांहीं उल्लेखांवरून ठरते. बाबांनीं त्यांच्या या **प्रियतम बाबूवर अमोघ आशीर्वादांची वृष्टि केली; त्यांपैकीं एकाचा प्रभाव म्हणजेच मानसगूढार्थ रत्नें सहज अश्रम हातीं लागत राहणें व अपूर्व अद्‌भुत शोध मानसांत लागणें.**

नित्यक्रम — सकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास उठत. नंतर झाडझूड करून शौच-स्नानादि उरकीत. खाडींत स्नान केल्यावर खाडीच्या पाण्यानेंच, पाण्यांत उभ्यानेंच संध्या उरकीत असत. नंतर त्या जलानें भरलेला लोटा घेऊन वर आल्यावर तें जल सर्वत्र शिंपडीत व त्या वेळीं कांहीं मंत्र पुटपुटत असत. नंतर धुनींतील अग्नींत तीळ, तूप, गुगुळ, साखर व चंदनभुसा यांच्या मिश्रणाचें हवन मौनानें करीत असत. नंतर हनुमान, सूर्य, तुळस व धेनु यांची पूजा करीत. नंतर निर्माल्यांतील तुलसीपत्रांचा किंवा चहाचा चहा करून घेत असत. मध्याह्नकाळीं श्रीरामपूजन करीत (फोटो होता). कोणी सांप्रदायिक साधु असले तर सूर्यास्तानंतर सांप्रदायिक पद्धतीची शंख, तास, मोठ्या झांझा यांच्या वादनांसह आरती होऊन गुरुपरंपरेचा जयजयकार होत असे. बाकी सर्व काळ श्रीरामायणपठण, भजन इत्यादींत जाई. साधु मंडळी किंवा पुरभय्या असला तर रात्रीं स्वयंपाक होऊन श्रीरामास नैवेद्य समर्पण करून, मध्यरात्रीं शिव-पूजन झाल्यावर भोजन होत असे व २।३ वाजतां झोंपत असत.

पावसाळ्यांत धुनी विझणार नाहीं इतक्यापुरतेंच नारळीच्या झापांचें छप्पर तयार केलेलें असे. तेथें धुनीजवळच एका कांबळीवर झोंपत. पावसाळ्यांत शेणांत जीवजंतु फार लवकर होतात म्हणून धुनींतील गरम गरम मऊ भस्मानेंच सारवण केलें जात असे. *हिंसा होऊं नये हा त्यांतील मुख्य हेतु असे.*

भगवंतास समर्पण न केलेलें तुलसीपत्रसुद्धां मुखशुद्धीसाठीं वापरणेंहि पूजा-पराध — **उपासनापराध**—*मानला जात असे.* शौचास केव्हांहि जावें लागलें तरी त्यानंतर स्नान करीत असत; ही शिस्त तेथें राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस पाळावी लागत असे. उपासनामार्गातील अनेक बारीक सारीक गोष्टी 'सहज बोलणें हित-उपदेश' व 'आधीं केलें मग सांगितलें' या पद्धतीनें ६।७ वर्षांत सहज शिकतां आल्या.

वात्सल्य प्रेमाचे नमुने — बाबांचा प्राणप्रिय बाबू १९३७ सालीं दोनशें मैलांच्या पायीं प्रवासास एकटा निघाला, तेव्हां प्रवासाची संवय तुला नसल्यानें मी तुझ्या-बरोबर येतों असें म्हणून रामायण व चिपिया (मोठा चिमटा) हातीं व केळीच्या सोपटाची लंगोटी नेसलेले अत्यंत शिष्यवत्सल बाबा निघाले बरोबर! पहिला मुक्काम १४ मैलांवर एका झाडाखालीं केला. आपल्यासाठीं या परम विरागी व भक्तवत्सल महात्म्यास उतार वयांत, थंडीच्या दिवसांत कष्ट पडूं नयेत असें बाबूला वाटलें व त्यानें झोपतांना हृदयस्थ श्रीरघुनाथास कळवळून प्रार्थना केली.

सकाळींच बोइसर (७ मैलांवरील, स्टेशनाजवळचा एक गांव) चा एक वृद्ध

भैय्या (व्यापारी) बाबांचा एक भक्त, आला व त्यानें रडत रडतच परत चलण्या-बद्दल बाबांना प्रार्थना केली. तेव्हां बाबा धर्मसंकटांतच पडल्यासारखे झाले. बाबूनें सांगितलें कीं आपण कोणताहि संकोच न मानतां भय्याच्या बरोबरच जाणें इष्ट आहे; कारण एकटया बाबूसाठीं २५ माणसांस दुःखी करणें आवश्यक नाहीं; तेव्हां बाबा ना-खुशीनें परत गेले. जातांना श्रींनीं डोळ्यांत आसवें आणून शुभाशीर्वाद दिला व त्याप्रमाणें ती यात्रा निर्विघ्नपणें सुखानें पार पडली.

१९३७।३८ सालीं बिऱ्हाड मोडून, चिंचणी सोडून, एकांतांत जाऊन राहण्याचें ठरविल्यावर बाबांना फार वाईट वाटलें व बाबा म्हणाले कीं किल्ल्याच्या एका बुरुजावर मी तुला झोपडी बांधवून देतों, तूं वाटल्यास मौन राहा. तुझे फराळाचे जिन्नस तुझ्याकडे पोंचवीत जाईन. तुला उपाधि नको वाटते तर कोणालाहि तुझ्याकडे येऊं देणार नाहीं; पण तूं माझ्याजवळ राहा बाबू ! मला सोडून दूर नको जाऊं ! (बाबा हिंदींतच बोलत असत.) स्वतःसाठीं गुरु व परम श्रेष्ठ रामभक्त महात्म्याकडून सेवा करवून घेणें, ' साधूंकरवीं करविति सेवा ' (१।१८४।२), व निशाचर बनणें बाबूला योग्य वाटलें नाहीं व बाबू जाण्यास निघाला तेव्हां त्यास निरोप देतांना बाबांच्या नेत्रांतून अश्रू गळले !

अशा निर्हेतुक संतप्रेमाचा अनुभव प्रथम बाबांच्या संगतींत सात वर्षें अनेक वेळां मिळाला. त्या प्रेमाच्या तुलनेला भगवंताचें भक्तवात्सल्यहि अपुरें पडेल ! म्हणूनच ' रामदास रामाहुनि मोठे ' असें मानसवचन आहे.

अनुकरणीय वैशिष्टय — सर्वांनींच अनुकरणीय व सर्वच मानवांना सुखद असें विविध वैशिष्ट्य बाबांच्या चरित्रांत दिसून आलें. त्यांतील कांहीं नमुनेः—

१. बोलतांना कांहीं संदर्भ आठवत नाहींसा होतांच बाबा ' श्रीराम, श्रीराम, श्रीराम ' असें मोठ्यानें, भराभर, एका दमांत म्हणतां येईल तितक्या वेळां म्हणत असत व तत्क्षणीं पाहिजे असलेला संदर्भ आठवत असे, तेव्हां म्हणत " बाबू ; ' रामनाम कर अमित प्रभावा ' देख लिया कि नहीं ! " हा अनुभव अनेक वेळां मिळाला आहे.

२. हा दास डहाणूजवळील महालक्ष्मीला गेला असें कळतांच बाबाहि तेथें आले. त्यांच्याजवळ वस्त्र ना पात्र, थंडीचे दिवस, दाट अरण्य ! अशा स्थितींत बाबा एका पिंपळाच्या काळ्या पाषाणांनीं बांधलेल्या पारावरील दगडांवरच आडवे झाले ! अंगावर कौपीनाशिवाय वस्त्र नाहीं ! अशाहि स्थितींत बाबांना सुखाची झोंप आली असती; पण जंगली मोठमोठे डांस व मच्छर अतोनात असल्यामुळें झोंप येईना. तेव्हां बाबा म्हणाले " रामजी इन मच्छडोंके रूप में प्रगट हो कर इस दीन दास को सताने की लीला क्यों करते हो ? तुम्ह साक्षात् प्रगट होकर ईस दास को क्यों नहीं सताते ? जौं इस प्रकार सताओंगे तौ कल सबेरे आपका भजन किस प्रकार बनेगा ? " याप्रमाणें म्हणण्याची खोटी तों ते सर्व डांस एकाएकीं निघून गेले ! हें सर्व या कानांनीं

व डोळ्यांनीं तेथेंच अनुभविलें. हा प्रयोग मुद्दाम करून पाहावा, चांगला यशस्वी होतो. सर्वभूतान्तरात्मा भगवान एकच असल्यानें वाघसुद्धां अशा भावनेनें प्रार्थना करतांच त्रास न देतां मनासारखें करतात. या प्रयोगाचा अनुभव ८।१० वर्षांच्या मुलांनींसुद्धां घेतला आहे.

एकच चमत्कार — रोज नियमितपणें मध्यरात्रीची रामनामांकित बिल्वपत्रांसहित पूजा घेणाऱ्या आशुतोष भोलानाथ शिवजींनीं बाबांना निमित्त करून एक चमत्कार करविलाच ! १९३८।३९ सालची घटना असेल असें वाटतें. महाशिवरात्रीच्या दिवशीं तारापूरच्या किल्ल्यांत शिवलिंगस्थापन करण्याचें बाबांनीं ठरविलें होतें. हा दास चौक, जिल्हा कुलाबा येथील धान्येश्वराच्या पडवींत राहात होता. काशीहून आणलेलें शिवलिंग या दासाजवळ होतें व तें घेऊन हजर राहण्याबद्दल पत्र आलें होतें. वेळेच्या पुष्कळ आधीं पोंचतां येईल अशा बेतानें बाबू चौक येथून निघाला, पण प्रभूचीच इच्छा कांहीं अलौकिक घटना घडवून आणण्याची असल्यानें, प्रारंभापासूनच मोटारी व आगगाड्या यांनीं जणूं असहकारी सत्याग्रहच करण्याचें ठरविलें असावें. चौक पनवेल-मुंब्रा मोटारी; मुंब्रा-दादर, दादर-बोईसर स्टेशन आगगाड्या, मोटारींनीं आगगाडीचा व आगगाड्यांनीं मोटारीचा सांधाच जुळूं दिला नाहीं; व वेळेवर पोंचूं दिलें नाहीं.

स्थापनेचा मुहूर्त चुकवावयाचा नाहीं म्हणून बाबांनीं समुद्रकिनाऱ्यावरील रेती स्वहस्तें आणून ती पाण्यांत भिजवून मोठ्या नारळाएवढें वाळूचें लिंग तयार केलें व त्याची स्थापना योग्य वेळीं केली. पहिल्या दिवशीं अभिषेकाच्या धारेनें पेळ्याएवढा एक खाडा वर पडला तेवढाच ! तें लिंग खालच्या भूमीशीं एकजीव होऊन पाषाणासारखें घट्ट झालेलें बाबू गेल्यावर त्यास दिसलें. त्याचें *नांव श्रीरामेश्वर* ठेवलें. बाबूनें बरोबर नेलेलें पाषाणाचें लिंग त्याच दिवशीं प्रदोषपूजेच्या वेळीं किल्ल्यावरच *काशीविश्वेश्वर* नांवानें स्थापन केलें गेलें.

तें वाळूचें लिंग कोणीं फोडलें नसल्यास अद्यापही तारापुरच्या किल्ल्यांत पाहावयास सांपडेल. बाबा तारापूर सोडून गेल्यावर बऱ्याच काळानें श्री काशीविश्वेश्वराचें लिंग तेथून काढून नेण्याची परवानगी प्रज्ञानानंदानें कोणास तरी दिली होती; त्यामुळें तें असेल नसेल !

तारापूरत्याग — सन १९४१।४२ पर्यंत बाबा तारापूरला होते. बाबांच्या येथील चहा-साखर संपल्याचें कोणीतरी एका ब्राह्मण धनिकास सांगितलें; हें बाबांस माहीत नव्हतें. त्या धनिकानें आपल्या नोकराबरोबर ते जिन्नस पाठविले. ११।१२ वर्षांत ज्यानें तुळशीपत्रसुद्धां पाठविलें नव्हतें, त्याच्याकडून चहासाखर आल्याचें कळतांच बाबांना संशय आला व सर्व मर्म कळलें. ‘ अब यहाँ का अंजल (अन्न जल) ऊठ गया ’ असें म्हणून पूर्वी बाळगलेलें एक माकड होतें तें सोडून दिलें. सर्व पुस्तकें,

भांडींकुंडीं, आसनें, इत्यादि हजार पंधराशें रुपये किंमतीचे पदार्थ, एक सुंदर गाय व तिचें एक वर्षाचें मस्त झालेलें वासरूं (नेहमीं सुटींच असत) इत्यादि सर्व तसेंच टाकून त्याच रात्रीं कोणास न सांगतां बाबा निघून गेले. एक स्थान सोडून दुसरीकडे जातांना छोटें रामायण व चिमटा यांशिवाय सर्व जागच्या जागींच टाकून जाण्याचा त्यांचा स्वभावच होता.

हिमालयांत निवास—बाबा तारापूरहून गेले ते प्रवास करीत करीत हिमालयांत गंगेला मिळणाऱ्या अलकनंदा नदीच्या तीरावर बद्रीनारायणाच्या वाटेपासून किंचित् दूर झोपडी बांधून राहिले असें पुढें तपास करवितां कळलें.

बाबा असे होते—श्रीरामचरितमानसावर अपार प्रेम ! शिवोपासना, रामनाम-निष्ठा, श्रीरामप्रेमभक्ति, परम वैराग्य, गुह्य ज्ञान, निर्हेतुक स्नेह, समता, दयालुता, अयाचित निःस्पृह वृत्ति, प्रसिद्धिपराङ्मुखता, औदार्य, पूर्ण निर्लोभता, तितिक्षा, इंद्रिय-जय, ब्रह्मचर्य, परम नम्रता, स्वधर्मनिष्ठा, निर्भयता, संतसेवेची आवड, इत्यादि अनेक सद्गुणांचें भांडार, म्हणजे बाबा गंगादास ! अत्यंत सरळ बालकासारखें प्रेमळ त्यांचें हृदय होतें. बाबांच्या अंगच्या १।२ गुणांचें स्मरण होतांच काया पुलकित होते व नयन सनीर होतात; सारांश बाबा असे होते :— ' रामनामगुणकीर्तिरत गतममता-मदमोह ॥ त्यांचें सुख ते जाणती परानन्दसंदोह ॥ '

या महात्म्याच्या संगतीनें कित्येक कुमार्गगामी कुमार व युवक सन्मार्गगामी झाले. ' काक होति पिक, बकहि मराल ' ही मानसोक्ति बरीच प्रतीतीस आली. अनेक अभागी लोक बाबांच्या संगतीनें रामनामस्मरण व रामायणपठण करूं लागले व सभाग्य सुखी झाले. त्या पुरातन पडझड झालेल्या किल्ल्यांत हजारों सर्प-विंचू असून बाबा रात्रीं अपरात्रीं अंधारांत हिंडत असत, पण कधीं कोणी चावलें नाहीं. नागांनीं त्यांच्या हातांस विळखे घातले पण दंश न करतां निघून गेले; व बाबा तेथें असेपर्यंत सर्पादिकांनीं इतर कोणासहि कधीं स्पर्शसुद्धां केला नाहीं. *बाबांच्या संकल्पशक्तीचा प्रभावच असा होता !*

ज्या दुर्गांत प्रवेश करण्यास धीरवान मर्दास दिवसांसुद्धां धीर होत नसे तेथें बाबांनीं निवास केल्यावर हळूंहळूं अंधाऱ्या रात्रींसुद्धां पुरुष, स्त्रिया, बाल, वृद्ध निर्भयपणें विहार करूं लागले. भयाण जंगल होतें तेथें मंगल झालें.

श्रीरामधामगमन—ज्या शरिराचा आश्रय करून बाबांनीं या दीन साधनहीन महाराष्ट्रीय दासास श्रीरामचरितमानससुधा पाजली, आणि आपल्या कृपापीयूषानें श्रीरामचरितमानसांत मज्जन करण्याची शक्ति दिली आणि अपार अनवरत कृपावृष्टि केली—पंचरचित त्या सुभगशरीरा ॥ सन १९४९ च्या डिसेंबरांत हिमालयांतील अलक-नंदेच्या तीरावर सोडलें व महात्मा श्रीरामधामास गेले. तारखेचा अंदाजसुद्धां प्रयत्नानें करतां येईल. त्या वेळीं उस्मानाबाद (धाराशिव)ला श्रीनिवास पै यांच्याकडे आसन

असतां, एक दिवस ध्यानाचे वेळीं दिसलें कीं गळयांतील शुद्ध स्फटिकांची माळ तुटून, तिच्यांतील एक मणि गळून पडला; त्यावरून त्या दिवशीं वाटलें कीं गळयांतील तादृशप्रमाणें प्रिय असणाऱ्या संतांपैकीं कोणींतरी देहत्याग केला असावा. ती तारीख टिपून ठेवणें झालें नाहीं. पुढें विविध मार्गांनीं तपास करतां कळलें कीं परमपूज्य बाबा श्रीगंगादास महाराज त्याच सुमारास गेले.

या कराल कलिकालांत अशा परम विरागी, ज्ञानी, परम रामभक्त, शरणागत-वत्सल अन्तर्बाह्य त्यागी महापुरुषाचें दर्शनसुद्धां परम दुर्लभ! पण श्रीरघुनाथकृपेनें ६।७ वर्षें बाबांच्या संगतीचा लाभ मिळाला!

'भेटति संत विशुद्ध तयासी। रामकृपें अवलोकिति ज्यासी॥ विण हरिकृपें भेट नहिं संता। सत्संगति करि संसृतिअंता॥' हें शरीर जिवंत असतां त्याचें चर्म काढून त्याचे जोडे करून बाबांच्या चरणांत घातले तरीसुद्धां बाबांच्या उपकारांच्या ऋणांतून अल्पांशानेंहि मुक्त होतां येणार नाहीं. 'महत्संगो दुर्लभोऽमोघश्च (ना. भ. सू.) अशा परम दुर्लभ हरिभक्तांचा व त्यांना वश होणाऱ्या भगवंताचा महिमा कोणीहि वर्णन करूं शकणार नाहीं.

यस्याशीर्वादघनो मानसगूढार्थवृष्टिना हृदयं।
सततं प्लावयतीदं गंगादासं नमामि भक्त्या तम्॥

जय जय बाबा गंगादास। प्रेमें नमन दास-सुखदास॥
जय जय रघुवीर समर्थ

◆◆◆◆

卐 卐 卐 १।३ 卐 卐 卐

भक्तशिरोमणि श्रीमद्गोस्वामी तुलसीदास महाराजांचें संक्षिप्त चरित्र

श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया।
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वश गा या॥ (मोरोपंत)
आद्यकवेरवतारं भवतारक-रामचरित-विस्तारम्।
कामारिप्रियभक्तम् तुलसीदासं नमामि साष्टांगम्॥ (प्रज्ञानानंद)

श्रीमद् गोस्वामींचें अल्प चरित्र श्रीरामचरितमानसाच्या (मराठी) प्रकाशित प्रथमावृत्तींत सविस्तर दिलेलें आहे व तेंच स्वतंत्र पुस्तकरूपानेंहि प्रकाशित झालेलें आहे, म्हणून येथें अगदीं संक्षिप्त चरित्र दिलें आहे. प्रकाशित अनुवादांत 'लेखकाचें हृद्गत' कविताबद्ध दिलें आहे तें व त्या अनुवादांतील चरित्र मुद्दाम अवलोकन करावें.

दो०। पंधरसों चौव्वन-विसें कालिन्दीके तीर॥ श्रावन शुक्ला सत्तमी तुलसी धर्‍यो सरीर॥ (मू. गो. च.)

जन्म व मातृपितृवियोग — प्रयागच्या जवळ यमुनेच्या दक्षिण तीरावरील **राजापूर गांवीं आत्माराम दुबे** नांवाचे पाराशर गोत्री शरयूपारी **ब्राह्मण** राहात असत. त्यांची **पत्नी** हुलसी मोठी पतिव्रता होती. संवत् १५५४ श्रावण शुक्ल सप्तमीच्या रात्रीं **अभुक्त मूळ नक्षत्रावर** हुलसीचे पोटीं गोस्वामींचा **जन्म झाला. जन्मल्यावर** रडण्याऐवजीं बालकानें **'राम' शब्दाचा उच्चार केला** व त्यास **३२ दांत होते.** (१८।८।५८) (**क**) या सर्व दोषांमुळें त्यांच्या जनकानें तीन दिवस वाट पाहण्याचें ठरविलें. तीन दिवसांत न मेल्यास त्याचा परित्याग करण्याचा निश्चय केला. ही गोष्ट हुलसीला कळली; तेव्हां तिनें आपले सर्व दागिने व प्रिय बालक **चुनिआ नांवाच्या** आपल्या विश्वासू **दासीच्या पदरांत घातला** व त्याचें प्रेमानें संगोपन करण्यास सांगितलें. त्या बालकास घेऊन चुनिआ गुप्तपणें रातोरात हरिपूरला आपल्या गांवीं गेली. तो बालक ५-५॥ वर्षांचा होतो न होतो तोंच चुनिआ मरण पावली. माता हुलसीनें चौथ्या दिवशींच इहलोकास रामराम ठोकला होता! व पिता ६ महिन्यांतच स्वर्गवासी झाला होता. तो मुलगा असा अनाथ झाला आणि दारोदार भटकूं लागला. (**ख**) जगज्जननी पार्वतीला त्याची दया येऊन ती विप्रस्त्रीरूपानें हरिपूरला रोज जाऊन त्या बालकास अन्न व आवश्यक तेव्हां वस्त्रें पुरवूं लागली. अशा रीतीनें अनाथ दशेंतच दोन वर्षें गेलीं.

उपनयन व गुरुकृपा — आठवें वर्ष लागलें; मुंजीचा योग्य काळ आला तेव्हां श्रीमहेशानें रामानुज सांप्रदायांतील एक महापुरुष, भगवद्भक्त श्रीनरहर्यानन्द यांस दृष्टान्त देऊन आज्ञा दिली कीं हरिपूरच्या त्या अनाथ बालकास आणून त्याचें उपनयन करून मग राममंत्रोपदेश द्यावा व त्याचें पालनपोषण करावें. आज्ञेप्रमाणें येऊन ते बालकास घेऊन गेले व त्याचें नांव रामबोला ठेवलें. संवत् १५६१ त माघ शुद्ध पंचमीस रामबोलाची मुंज केली; त्या वेळीं कोणीं शिकविण्यापूर्वींच रामबोलानें गायत्री मंत्राचा उच्चार केला. श्रीनरहरि गुरूंच्या जवळ राहून गुरुसेवा करूं लागले. कांहीं दिवसांनीं ही गुरुशिष्यांची जोडी सूकरखेत या गांवीं गेली. तेथें रामबोलाला राममंत्रदीक्षा मिळाली.

काशींत अध्ययन — मंत्रदीक्षा दिल्यावर गुरूंनीं नवीन नांव ठेवण्याची पद्धति साधूंच्या आखाड्यांत अद्याप अव्याहत चालू आहे. त्यावरून ठरतें कीं गुरूंनींच मंत्रोपदेशानंतर तुलसीदास हें नांव ठेवलें असावें. याच वेळीं गुरु तुलसीकाष्ठाचा एक मोठा मणि, जानव्यांत घालून कंठ्यासारखा शिष्याच्या गळयांत बांधतात; त्याला बाबा गंगादास हिरा म्हणत असत; व तो पाण्यांत बुडवून तें गुरुपादोदकतीर्थ—गुरुचरणामृत—म्हणून बाबा ग्रहण करीत असत. (**क**) तुलसीदास १० वर्षांचे झाले तेव्हां गुरुशिष्यांची जोडी काशीस गेली. तेथील महाविख्यात पंडित शेष सनातनजी यांनीं तुलसीदासाची असामान्य बुद्धिमत्ता वगैरे पाहून त्यांच्या गुरूंकडून त्यांस मागून घेतलें तेथें १५ वर्षें राहून वेदादि सर्वशास्त्रपुराणादिकांचें अध्ययन केलें व तुलसीदास सर्व-

शास्त्रपारंगत झाले. विद्यागुरूंच्या व सहाध्यायींच्या भक्तिहीन संगतीचा परिणाम होऊन भजनांत शैथिल्य आलें व लौकिक वासना जागृत होऊन जन्मभूमीचें स्मरण झालें आणि तुलसीदास राजापूर गांवीं गेले. तेथील ग्रामस्थांनीं सर्व हकीकत सांगून वडिलांचें पडकें घर नीट बांधून दिलें, तेथें राहून तपश्चर्या करून श्रीरामकथा सांगूं लागले.

विवाह — भरद्वाज गोत्राचा एक ब्राह्मण यमुनास्नानास आला असतां या तेजस्वी विद्वान सुंदर तरुणास त्यानें पाहिलें. गोत्राचा वगैरे तपास केला आणि आपली कन्या त्यास देण्याचें ठरवून विनंति केली. तुलसीदासांनीं सांगितलें कीं विवाह कर्तव्य नाहीं. तो ब्राह्मण प्रायोपवेशन सुरू करून धरणें धरून बसला; तेव्हां नाइलाजानें कबूल झाले. *शके १५८३ ज्येष्ठ शुद्ध १३ गुरुवारीं* रात्रीं **२९ व्या वर्षीं विवाह झाला.**

गृहस्थाश्रम — त्यांची पत्नी फार सुंदर व पतिपरायण होती. श्रीतुलसीदास मायेच्या त्या सुंदर नाजूक पाशांत असे बद्ध झाले कीं ६ वर्षांत बायकोला माहेरीं जाण्यास अनुज्ञा दिली नाहीं. शेवटीं एक दिवस हे नित्याप्रमाणें यमुनेवर गेलेले असतां तुलसीदासांचा मेव्हणा आला व बहिणीला घेऊन गेला; ती पण खुशीनें गेली. (क) ब्राह्ममुहूर्तीं उठून नित्याप्रमाणें यमुनेवर गेलेले तुलसीदास नेहमींप्रमाणें मध्याह्न उलटून गेल्यावर घरीं आले. पत्नी घरीं नाहीं असें पाहतांच ते तसेच निघाले व यमुना ओलांडून पलीकडे गेले. *या बाबतींत प्रचलित असलेली कथा तुलसीदासांची नसून बिल्वमंगलची आहे*. तुलसीदास श्वशुरांच्या घरापर्यंत जातात तों बरीच रात्र झाली होती. घरांतील सर्व मंडळी दरवाजे बंद करून झोपली होती. तुलसीदासांनीं हाका मारतांच त्यांच्या पत्नीनें आवाज ओळखला व दरवाजा उघडला; पण नित्याप्रमाणें पतिदेवाचें मधुर शब्दांनीं स्वागत न करतां म्हणाली कीं महाराज आपण प्रेमानें इतके आंधळे झालांत! धिक्कार असो! माझ्या हाडामांसाच्या देहावर जितकें प्रेम करतां त्याच्या निम्में जरी श्रीरामावर केलें असतें तर या भयंकर संसारांतून मुक्त झालां नसतां काय?

दो॰ अस्थिमांसमय देह मम त्यावर इतकी प्रीति। जर तदर्ध रामावर होति नष्ट भवभीति। (मू. गो. च. अनुवाद)

गृहत्याग — तुलसीदासांची खात्री झाली कीं प्रभूंनेंच अपार कृपावृष्टि करून या पतिव्रतेच्या मुखानें मला मोहनिद्रेंतून जागें केलें. वैराग्य एकदम उफाळलें व एक क्षणहि तेथें न थांबतां तुलसीदास निघाले. नरहरि गुरूंच्या एका वचनाची आठवण झाली व त्याचेंच चिंतन करीत ते पळत सुटले! "नरहरि कांचन कामिनी यांपासुन अतिदूर॥ जर इच्छी कल्याण निज रामदास भरपूर॥"—(क) पत्नीच्या भावास ही गोष्ट कळतांच तो रातोरात धावत निघाला; पण सकाळ होईपर्यंत तुलसीदासांची गांठ पडली नाहीं. भेटल्यावर फार आग्रह केला पण तुलसीदास परत गेले नाहींत. तो घरीं जातो, तों बहीण आसन्नमरण होऊन जमिनीवर पडलेली दिसली; व तिचें

देहावसान झालें. ही गोष्ट **संवत् १५८९ आषाढ कृष्ण ९ बुधवारीं घडली**; म्हणजेच २५ वर्षे नुकतींच पूर्ण झालीं होतीं व **३६ वें लागलें होतें.**

तीर्थयात्रा — तुलसीदास निघाले ते आपल्या गांवींसुद्धां गेले नाहींत; ते थेट प्रयागास गेले व साधुवेष धारण करून तीर्थाटनास निघाले. अखिल भारतांत हिंडून मानस-कैलास यात्रेस गेले. त्या यात्रेंत त्यांस काकभृशुंडीचें दर्शन झालें. नंतर यात्रा संपवून ते काशींत आले. **३६ व्या वर्षीं गृहत्याग करून ५० व्या वर्षीं काशींत आले.**

मारुतीचें दर्शन — काशींत राहिल्यावर ते नित्य नेमानें रामकथा सांगत असत. पुढें एक पिशाच्च प्रसन्न झालें व पाहिजे तें माग म्हणालें. श्रीरामरायाचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें, इतर कांहीं नको असें मागितलें. तें देणें त्या पिशाच्चाच्या हातीं नव्हतें; पण मारुतीचा साक्षात्कार करून घेण्याची युक्ति त्यानें सांगितली. त्याप्रमाणें तुलसीदासांनीं केल्यावर हनुमंताचें दर्शन झालें. श्रीरघुनाथाचें दर्शन करवून द्या असें म्हणून पाय धरले. चित्रकूटास जा; तेथें दर्शन होईल असा आशीर्वाद व आज्ञा मिळाली.

चित्रकूटास रामदर्शन — आज्ञेप्रमाणें काशीहून चित्रकूटास गेले. चित्रकूटप्रदक्षिणा करीत असतां दोन परम लावण्यसंपन्न राजकुमार धनुर्बाण धारण करून घोड्यावर स्वार होऊन शिकारीकरितां जात असलेले दिसले; तेव्हां तुलसीदास प्रेममग्न होऊन देहभान विसरले; पण त्यांस ओळखूं शकले नाहींत, हनुमान प्रगट झाले व सर्व मर्म सांगितलें व उद्यां प्रातःकाळीं दर्शन होईल असें आश्वासन दिलें. **संवत् १६०७ मध्यें पौष वद्य** (तिकडील माघ वद्य) **अमावास्येस** बुधवारीं प्रातःकाळीं **श्रीरघुनाथदर्शन झालें**; ती रोमांचकारी हकीकत तुलसीदासचरित्रांत पाहावी.

प्रसिद्धि व श्रीरामचरित्राचें दर्शन — पुढें हळुहळूं त्यांची प्रसिद्धि होऊं लागली. एक उंच माळा उघड्यावर बांधून तेथें त्या माळ्यावर ते बसूं लागले. लोक येऊन दुरून दर्शन घेऊन जात असत. तेथें बसलेले असतां प्रतिदिन त्यांच्या डोळ्यांसमोर श्रीराम-चरित्रांतील विविध लीला क्रमशः दिसूं लागल्या. अनेक संत महंत लांबून लांबून त्यांच्या दर्शनास येऊं लागले. सांप्रदाय वाढत चालला. **'मूल गोसाँई चरित्र'चे लेखक वेणीमाधवदास यांची भेट येथेंच झाली.** सूरदास भेट, मीराबाईचें पत्र व त्याचें उत्तर इत्यादि पूर्वनिर्दिष्ट चरित्रांत पाहणेंच योग्य.

पहिले दोन ग्रंथ — बलादिव नियोजितः प्रमाणें ईशप्रेरणेनें एका बालकाच्या निमित्तानें तुलसीदासांच्या काव्यभागीरथीचा उगम झाला. (गूढार्थ चंद्रिका व बरेंच काव्य यांचाहि असाच बलादिव नियोजितः कांहींतरी निमित्तानें उगम झाला.) **श्रीरामगीतावली व श्रीकृष्णगीतावली** हे दोन ग्रंथ सुंदर संगीत पदांच्या रूपानें बाहेर पडले. श्रीरामगीतावली (= गीतावली) हें सप्तकाण्डात्मक रामायणच आहे, व युद्ध-काण्ड हें नांव नसून लंकाकांडच साहवें (मानसाप्रमाणें) आहे. पहिलें काव्य या दृष्टीनें फारच मधुर व मनोहर आहे. संवत् १६२८ मध्यें वयाच्या ७४ व्या वर्षी हे दोन ग्रंथ

पूर्ण झाले व ते हनुमन्तास गाऊन दाखविले गेले; ते प्रसन्न झाले व अयोध्येंत जाऊन राहण्याची आज्ञा त्यांनीं दिली. गोस्वामी अयोध्येस जाण्यास निघाले. जातांना *प्रयागांत याज्ञवल्क्यभरद्वाज संवाद श्रवण करण्यास सांपडला.* (चरित्र पृ. ३५ पाहा).

श्रीउमामहेश्वरदर्शन — प्रयागाहून काशीस गेले व प्रल्हाद घाटावर एका ब्राह्मणाच्या घरीं राहिले. तेथें काव्यस्फूर्ति अनावर होऊन श्रीरामायणरचना संस्कृतांत सुरू झाली; पण आज लिहिलेले कागद उद्यां दिसत नाहींसे झाले. हा क्रम कांहीं दिवस चालला; शेवटीं स्वप्नांत आज्ञा मिळाली कीं तुम्हीं गीर्वाण भाषेंत काव्यरचना न करतां स्वभाषेंत काव्य लिहावें. सकाळीं उठल्यावर उमामहेश्वरांचें प्रत्यक्ष दर्शन झालें व अयोध्येस जाऊन तेथें श्रीरामायण लिहिण्याची आज्ञा झाली व " माझ्या आशीर्वादानें तुमचें रामायण सामवेदासारखें सफल होईल " असा आशीर्वाद मिळाला. गोस्वामीजी अयोध्येस गेले व तेथें त्यांस एका सिद्धपीठाची प्राप्ति झाली–राहण्यास मिळालें. (चरित्र पृ. ३७ पाहा.)

श्रीरामचरितमानस-रचना — त्या सिद्धस्थानीं केवळ एक वेळ दुग्धाहार करून गोस्वामीजी राहूं लागले. कांहीं काळ अशा रीतीनें गेल्यावर श्रीगोस्वामींच्या जीवनांतीलच नव्हे तर जगाच्या इतिहासांतील अत्यंत भाग्याचा, महत्त्वाचा, दिवस उगवला. संवत् १६३१ चैत्र शुक्ल नवमी मंगळवार उजाडला. हा उल्लेख श्रीमानसांतहि आहे. त्या वर्षी श्रीरामनवमीचे दिवशीं श्रीरामावतारकालीन ग्रहयोगांसारखा ग्रहयोग होता. त्या दिवशीं हनुमान्, उमामहेश्वर, गणेश, सरस्वती, शेष व नारद यांनीं प्रगट होऊन शुभ आशीर्वाद दिले. श्रीतुलसीदासांचें नांव जगांत अमर करणारें सामवेद-तुल्य, मंत्रमय, श्रीरामचरितमानस गोस्वामीजींच्या अमृततुल्य व मंत्रमुग्ध करणाऱ्या अमर वाणीनें प्रगट होऊं लागलें. दोन वर्षे सात महिने व २६ दिवसांनीं संवत् १६३३ मार्गशीर्ष शुक्ल पंचमीला, श्रीरघुवीरविवाहतिथीला, श्रीगोस्वामींच्या वयाच्या ८०व्या वर्षी, ग्रंथलेखन पूर्ण झालें.

सत्यं शिवं सुन्दरं — नंतर श्रीरामाज्ञेनें गोस्वामी काशीस गेले; व आपला अद्भुत ग्रंथ श्रीविश्वेश्वरास गाऊन दाखविला. श्रीविश्वेश्वराच्या अभिप्रायासाठीं पोथी रात्रीं विश्वेश्वरासमीप ठेवण्यांत आली; व सकाळीं मोठमोठ्या पंडितांसमक्ष देवद्वार उघडलें गेलें; पाहतात तों त्या पोथीवर 'सत्यं शिवं सुन्दरम्' आणि त्याच्या खालीं 'सही शंकर' असें लिहिलेलें आढळलें व तें तेथें जमलेल्या सर्वांनीं पाहिलें. यामुळें श्रीगोस्वामींची व रामायणाची प्रसिद्धि काशींत व आजूबाजूला विद्युद्वेगानें होऊं लागली.

विरोधकांचे प्रयत्न व छळ — वरील घटनेमुळें काशींतील पंडितांचा मानसन्मान घटत चालला व श्रीतुलसीदासांचा मानसन्मान अधिक होऊं लागला; व दुसरीकडे द्वेष, मत्सर, निंदा यांचें चक्र जोरांत फिरूं लागलें. श्रीतुलसीदास व त्यांचा अमर ग्रंथ यांचें जगांतून उच्चाटन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. चोर, मारेकरी, मारणाचा

प्रयोग इत्यादींचाहि उपयोग केला गेला. श्रीरघुनाथ व श्रीहनुमान यांनीं ग्रंथाचें व तुलसीदासांचें संरक्षण केलें. (विस्तार चरित्रांत पाहावा).

श्रीमधुसूदनसरस्वतींचा अभिप्राय — सर्व कुटिल कारस्थानें निष्फळ ठरलीं तरी शास्त्री-पंडितांची पोटदुखी व कपाळशूळ थांबला नाहीं. त्यांनीं श्रीमधुसूदनसरस्वतींकडे तक्रार केली. स्वामींनीं ग्रंथ मागवून, समग्र अवलोकन करून, परम प्रसन्न होऊन अभिप्राय लिहून दिला :— ' आनंदकानने ऽह्यस्मिन् जंगमस्तुलसीतरुः । कवितामंजरी यस्य रामभ्रमरभूषिता ॥ ''

श्रीरामचरितमानस सर्वश्रेष्ठ हें श्रीकाशीविश्वेश्वरांनींच पुन्हां दाखविलें. त्यानंतर गोस्वामींना शास्त्रार्थाच्या—वादविवादाच्या—कातरींत पकडण्याचा प्रयत्न केला गेला, पण त्यांतहि गोस्वामींचाच जय झाला. तरीसुद्धां शेवटीं विश्वासघात केला गेला वगैरे सविस्तर हकीकत पूर्वीं छापलेल्या चरित्रांत पाहावी.

अन्य प्रसिद्ध ग्रंथ — विनयपत्रिका, दोहावली, कवितावली (= कवित्तरामायण) हे मानसाच्या खालोखाल प्रसिद्ध असलेले ग्रंथ होत. जानकीविवाहमंगल, सतसई, वैराग्यसंदीपनी, हनुमान्बाहुक, हनुमानचालीसा, वगैरे लहानसहान अनेक ग्रंथ गोस्वामीजींनीं लिहिले आहेत. मानसांतील गूढें उकलण्यास गीतावली ग्रंथाचा आधार सर्व ठिकाणीं उपयोगी पडत नाहीं. तो अगदीं पहिला ग्रंथ असून स्फुट पदांच्या रूपानें त्याची मूळ रचना झाली होती. अनुबंधचतुष्टयादि पुढें ठेवून तो ग्रंथ लिहिला गेलेला नाहीं. विनयपत्रिका, कवितावली व दोहावली हे मानसाचे पूरक ग्रंथ आहेत असें म्हटलें तरी चालेल.

तुलसी कविता–सुरसरितोद्गम जाणा गीतावली ।
तीर्थराज जो प्रयाग मानस-रामचरित्रावली ॥
गंगासागर-संगम गमतो विनयपत्रिका भली ।
काशी कवितावली विराजे मथुरा पद-आवली ॥
शरयू-गंगा शोण-संगमचि दिसतो दोहावली ।
ग्रंथ अन्य भागीरथितीर्थें ठायिं ठायिं शोभलीं ॥ (प्रज्ञा० ३)

पुन्हां तीर्थयात्रादि — नीमसार, वृंदावन, जनकपुरी इत्यादि यात्रांची अद्भुत हकीकत; चमत्कार करून न दाखविल्यामुळें कैद; जहांगिराची भेट व तुलसीची निःस्पृहता; *नाम*प्रेम व *नाम*निष्ठा इत्यादि अनेक प्रकरणें छापील चरित्रांत पाहावींत.

अवतारसमाप्ति — देह पूर्ण स्वस्थ व स्वाधीन असतां, सर्वांस सांगून सवरून श्रीतुलसीदासांनीं इहलोकींची यात्रा संपविली. त्या वेळीं त्यांचें वय १२६ वर्षांचें होतें. **संवत्, १६८० श्रावण शुक्ल तृतीया शनिवारीं काशींत असीच्या कांठीं श्रीतुलसीदास महाराजांनीं आपला पार्थिव देह ठेवला.**

दो० — संवत सोलहसों असी असी गंगके तीर।
श्रावन शुक्ला तीज सनि तुलसी तजो सरीर॥ (मू. गो. च.)

श्रीतुलसीदास, नरहरीगुरु व वेणीमाधवदास यांचा सूकरखेतशीं संबंध — ‘ गुरु वदले मज ती कथा सूकरखेतिं सुजाण ’ (१।३०) असें मानसांतील वचनच आहे. श्रीरामचरितमानसाच्या प्रथमावृत्तींत ‘ सूकर-क्षेत्रीं ’ असा अनुवाद केला आहे. त्या वेळीं सबळ पुराव्याच्या अभावीं तसें करणें भागच होतें.

‘ सूकरखेत ’ नांवाचें गांव कोणतें याविषयीं तुलसीसांप्रदायिकांत दुरभिमान व स्वार्थांधता यांमुळें मतभेद अलीकडे निर्माण झालेले आहेत. कोणी ‘ सोरों ’ गांवालाच सूकरखेत मानतात व कोणी सूकरखेत गांवालाच मानसनिर्दिष्ट सूकरखेत मानतात. पक्षातीत विवेकी व्यक्तीस भरपूर, निःसंशय ऐतिहासिक लेखी पुरावा मानसपीयूषांत मिळाला म्हणून द्वितीयावृत्तींत व गूढार्थचंद्रिकेंत ‘सूकरखेत’ हें विद्यमान गांवाचें प्रचलित नांवच घातलें आहे.

मानसपीयूषमधील माहिती व पुरावा—१. सूकरखेत कुठें आहे — श्रीअयोध्येपासून तीस मैलांवर वायव्य दिशेस *सूकरखेत* नांवाचें प्रसिद्ध असलेलें प्राचीन सूकरक्षेत्र, *गोंडा जिल्ह्यांत आहे*. अयोध्या-तिरहुत रेल्वेच्या कटिहार-लखनौ लाईनवरील **कर्नैलगंज स्टेशनपासून उत्तरेस सूकरखेत १२ मैल आहे.**

२. येथें दरसाल पौषी पौर्णिमेला मोठा मेळा भरतो. काशी-प्रयागादि मोठमोठ्या क्षेत्रांतून पौषमास कल्पवासासाठीं साधूंचे आखाडे सूकरखेतला येतात; हें **गांव पसका राज्याच्या हद्दींत आहे.** पसकापासून एक फर्लांगावर हा मेळा भरतो. येथें एक वराहाचें व एक वाराही देवीचें अशीं दोन मंदिरें आहेत. घाघरा नदीच्या नेहमीं बदलणाऱ्या प्रवाहानें व महापुरानें प्राचीन मंदिरें लुप्तप्राय झालीं होतीं. शंभर वर्षांपूर्वी राजा नैपालसिंहानें नव्या मंदिरांची स्थापना केली. देवीभागवतांतसुद्धां भगवान वराह व वाराही देवी यांचा उल्लेख आहे :— ‘ वराहो चैव वाराही सर्व-सर्वाश्रया सती ॥२५॥ पूर्वरूपं वराहं च दधार स च लीलया ॥ पूजां चकार तां देवीं ध्यात्वा च धरणीं सतीम्॥३३॥ (दे. भा. ९।९) सूकरखेत गांवीं या दोन्ही मूर्ती स्थापित केलेल्या आहेत. वाराहीदेवी वा उत्तरीभवानीचें मंदिर पसकाच्या ईशान्येस आहे.

३. गोस्वामीजींचा संबंध याच ‘ सूकरखेतशीं ’ होता यास हेंही एक प्रमाण मिळतें कीं सूकरखेतच्या मंदिरास लागून एक फार प्राचीन कुटी आहे व ती आसपासच्या भूमीपासून सुमारें ३० फूट उंचीवर आहे. कुटीच्या दारासमोर एक जुनाट विशाल वटवृक्ष आहे आणि मागल्या बाजूस तितकेंच पुरातन एक पिंपळाचें झाड आहे. हे दोन्ही वृक्ष बाबा नरहरिदास (नरहर्यानंद) यांनीं लावलेले असून ती कुटीसुद्धां त्यांचीच आहे हें तेथील विद्यमान मठाधिपति *बाबा राम-अवधदास* यांनीं दाखवून सांगितलें. संतसमाजांतही अशीच ख्याति आहे. (क) बाबा राम-

अवधदास नरहरिदासजींच्या शिष्यपरंपरेंतील दाहव्या पिढींतले आहेत. ते म्हणाले कीं या गादीचे आद्य संस्थापक बाबा श्रीनरहरिदासजींच्या साधुत्वानें मुग्ध होऊन पसका राज्याचा तत्कालीन राजा धौकतसिंह यानें या गादीला कांहीं जमीन इनाम दिली व ती आजतागायत शिष्यपरंपरेनें चालत आली असून आमच्या ताब्यांत आहे.

४. ही माहिती पुरविणारे लेखक महाशय म्हणतात कीं ' माझ्या मतें या भूमीमुळेंच श्रीगुरुदेवांची स्मृति अव्याहत सुरक्षित राहिली आहे; नाहींतर १।२ पिढ्यांतच त्यांची स्मृति नामशेष झाली असती. या भूमीवर अद्यापिही सरकारी आकारणी (पट्टी, धारा, सारा) घेतली जात नाहीं. पसका राज्याचे विद्यमान अधिकारीहि या विधानास पुष्टि देतात. ही वृत्ति देणारे व तिचे भोक्ते या दोन्ही परंपरा अव्याहत चालत आल्या आहेत.

५. गोस्वामी याच *सूकरखेतला* आले ही गोष्ट अन्य प्रकारेंहि सिद्ध होते ती अशीः—'गोसाँईचरित' या ग्रंथाचे लेखक बाबा बेनीमाधवदास या पसकाचेच रहिवासी होते. ' शिवसिंहसरोज ' आणि यू. पी. डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, गोंडा डिस्ट्रिक्ट हीच गोष्ट सिद्ध करतात. ' सेंगर'नें स्वतः ' मूल गोसाँईचरित ' पाहिलें होतें, म्हणून तर ते लिहितात कीं ' त्यांच्या (तुलसीदासांच्या) जीवनचरित्राचें पुस्तक श्री. बेनीमाधवदास कवि, पसकाग्रामनिवासी, जे त्यांच्या संगतींत होते, यांनीं विस्तारपूर्वक लिहिलें आहे. तें पाहिल्यानें या (तुलसीदास) महाराजांचें सर्व चरित्र प्रगट होतें. या पुस्तकांतील विस्तृत कथांचें आम्हीं कोठवर वर्णन करणार ! तुलसी किंवा समकालीन कोणा अन्य महानुभावाचा संबंध दुसऱ्या पसका गांवाशीं आल्याचा उल्लेख हिंदी साहित्याच्या इतिहासांत उपलब्ध नाहीं. गोंडा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्यें उल्लेख आहे तो :— One or two Gonda worthies have attained some measure of literary fame. Beni Madhavdas of Pasaka, was a disciple and companion of Tulsidas, whose life he wrote in the form of a poem entitled 'Goswami Charita'.

District Gazetteer of Gonda By W. C. Bennet

(क) ' शिव-सरोज ' व डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर हे दोन्ही ग्रंथ एकोणिसाव्या शतकाच्या अंतिम चरणांत लिहिलेले आहेत. त्या वेळीं सूकरखेतची स्थिति सर्वमान्य झालेली होती; आजच्याप्रमाणें दुराग्रहांना बळी पडून विवाद्य विषय झाली नव्हती. या दोन ग्रंथांच्या विद्वान् लेखकांवर सांप्रदायिक दुरभिमानाचा शिक्काहि आजच्यासारखा बसला नव्हता.

६. याशिवाय मानसाची भाषा हेंहि एक प्रत्यक्ष प्रमाण ठरविते कीं (श्री) तुलसीदासजींनीं आपलें प्रारंभींचें जीवन अयोध्येच्या आसपास व्यतीत केलें असलें पाहिजे, अन्यथा अवधी भाषेचें पूर्णपणें ग्रहण करतां आलें नसतें. (क) गोंडा

जिल्ह्यांतील सूकरक्षेत्र आजसुद्धां सूकरखेत नांवानेंच प्रसिद्ध आहे आणि मानसांत 'सूकरखेत' असाच उल्लेख आहे, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

वरील लेखाचे लेखक श्री. भगवतीप्रसादसिंहजी आहेत. त्यांनीं आणखी थोडीं कारणें दिलीं आहेत त्यांत एक महत्त्वाचें आहे तें :—पसकाच्या आजूबाजूच्या प्रदेशांत रामु, लखनु, भरतु इत्यादि प्रकारें 'उ'कराचा प्रचार अद्यापही आहे. वरील प्रमाणें पक्षातीत असणाऱ्या आम्हां परप्रांतीयांस अत्यंत सबळ पुरावा वाटतो. 'सूकरखेत' नांवाचें दुसरें गांव उत्तर हिंदुस्थानांत नाहीं. जुनें नांवच सूकरखेत असून व तोच उल्लेख मानसांत असून 'सोरों' गांवाला सूकरखेत ठरविण्याचा प्रयत्न करणें पक्षाभिमानाचें द्योतकच ठरेल.

सूचना (१) वर दिलेल्या माहितींत व पुराव्यांत ( ) कंस, या लेखकाचे आहेत बाकी सर्व मा. पी. मधील लेखाचा सरळ सोपा अनुवाद आहे. **(२) श्रीरामचरितमानसांत श्रीतुलसीचरित्र कुठें कसें आहे हें पुढील प्रकरणांत दाखविलें आहे.**

◆◆◆◆

श्रीमानसोपलब्ध श्रीतुलसीदास-चरित्र

卐 卐 卐 ११४ 卐 卐 卐

१. मातेचें नांव हुलसी — रामकथेविषयीं लिहीत असतां दृष्टान्त देतात :— 'रामप्रिय पावन तुलसीसी । **तुलसिदास हित** हृदिं **हुलसीसी**' (१।३१।१२) रामकथा रामचंद्रांस तुळशीसारखी प्रिय आहे; आणि तुलसीदासाचें हित करणारी हुलसीसारखी (पण) हृदयांत आहे. कथा स्त्रीलिंगी; हुलसीहि स्त्रीलिंगी आहे. कथा तुलसीदासाचें हित करणारी आणि हुलसी तुलसीदासाचें हित करणारीच. (**क**) हितकर्ते कोण असतात पाहा !— 'रामनाम कलिं अभिमत दाता । **हित** परलोकिं **लोकिं पितृमाता**' (१।२७।६) या लोकींचें हित करणारे पिता आणि माता असतात. वरील दृष्टान्तांत पुल्लिंगी दृष्टान्त नाहीं. फक्त हुलसी आहे. म्हणून हित करणारी व्यक्ति शेष राहिली माता = हुलसी हें सिद्ध झालें. बापानें जंगलांत टाकून देण्याचाच विचार ठरविला होता; पण हुलसीमातेनेंच त्यांच्या संगोपनाची व संरक्षणाची सुव्यवस्था लावून तुलसीदासांचें हित केलें आहे. (**ख**) 'हुलसी' शब्द १।३६।१ आणि २।३०३।६ या दोन ठिकाणीं आहे; पण तेथें हुलसी = स्फुरली, उल्लसित झाली, या अर्थाचें क्रियापद आहे. येथें क्रियापद नसून नाम आहे.

२. पालनपोषणादि महेश-भवानींनीं केलें — गुरु-पितृ माय महेश भवानी । प्रणमूं दीनबंधु, दिनदानी ॥ (१।१५।३) येथें नमन करतांना महेशांस गुरु व पिता आणि भवानीस माता म्हटलें आहे व एकास दीनबंधु व दुसऱ्यास दिनदानी

= रोज देणारी किंवा रोज देणारा म्हटलें आहे. माता = दिनदानी – अन्नपाणी देणारी असते. पिता रोज मुलांस कांहीं देत नाहीं; म्हणून भवानी = दिनदानी–माता अन्नादिक पुरवीत असे. (क) येथील गुरु = परमार्थगुरु नाहीं; कारण उत्तरोत्तर श्रेष्ठतेचा क्रम, गुरु, पिता, माता, असा आहे; म्हणून गुरु = विद्यागुरु. पिताच पुत्राच्या विद्याभ्यासाची सोय लावतो. विद्यादात्याला पिता म्हणतातच. ‘ अन्नदाता *भयत्राता* यश्च *विद्यां प्रयच्छति ।* जनिता *चोपनेता* च पंचैते पितरः स्मृताः ’। महेश दीनबंधु = गुरु व पिता आहे. भयापासून रक्षण करणारा बंधुच होय. तुलसीदास दीनासारखे दारोदार भटकत होते, उपनयन करण्यास कोणी नव्हतें, विद्या शिकविण्याची व्यवस्था लावणारा व भयादिकांपासून रक्षण करणारा कोणी नव्हता. या तिन्ही गोष्टींची व्यवस्था शंकरांनींच लावली आहे व भवानीनें रोज अन्न आणून दिलेंच होतें म्हणून स्पष्टपणें सिद्ध झालें कीं हें **नमन चरित्रसूचक आहे.**

३. खरें पाहतां तुलसीदास रामभक्त असल्यानें त्यांनीं रामचंद्रांसच गुरु, पिता, माता इत्यादि मानणें जरूर होतें. श्रीरामसुखानें गोस्वामींनींच सांगितलें आहे कीं ‘ माय बाप गुरु बंधु देवपति । सकल मला मानुनि दृढ सेवति, ’ (३।१६।९०) असें असतां ते शंकरांस गुरु-पिता व भवानीस माता मानतात ! याचें कारण प्रत्यक्ष तसेंच घडलें हें आहे. (क) या चौपाईतील वरील भावार्थामुळें मूल गोसाँईचरित्रांतील वर्णनास आधार मिळाला.

३. अगदीं बालपणींच रामकथा-श्रवण — ‘ गुरु वदले मज ती कथा सूकरखेतिं सुजाण । *बालपणें नुमजे* तशी *तैं मी फार अजाण ॥* (१।३० म) ॥ वारंवार परी गुरु सांगति । कांहीं समजली मला यथामति ’ (१।३१।१). सूकरखेत या गांवीं तुलसीदासांच्या अगदीं बालपणीं गुरूंनीं रामचरितकथा सांगितली पण फार अजाण-लहान-असल्यामुळें ती त्यांना पाहिजे तशी समजली नाहीं, म्हणून गुरूंनीं पुनःपुन्हां सांगितली तेव्हां थोडी समजली.

४. चार वर्षें गुरुसेवा व गुरुभक्ति — ‘ वन्दे गुरुपदकंज कृपासिंधु *नररूपहर ॥* महामोहतमपुंज यद्वचनें रविकर निकर ’ (मं. सो. ५) ‘ वन्दे बोधमयं नित्यं गुरुं *शंकररूपिणम्* ’ (बाल. श्लो. ३) तिरप्या टायपांतील शब्दांची तुलना करावी. वरील सोरठ्यानें ठरलें कीं प्रथम गुरुपादपंकजांस स्पर्श न करतांच वंदन करीत असत; नंतर (१।१।१) ‘ *वन्दे* गुरुपदपद्म*परागा* । ’ गुरुचरणरजाच्या स्पर्शाचा लाभ मिळूं लागला, यानें ठरलें कीं गुरुभावनेनें श्रीनरहर्यानंदांची चरणसेवादिक करूं लागले, व त्यामुळें ‘ सुरुचि सुवास, सरस अनुरागा ’ची प्राप्ति झाली. सुरुचि = सद्वासनारूपी, सुवास (सुगंध) मिळाला, परमार्थाची इच्छा उत्पन्न झाली व पूर्वी सांगितलेल्या रामचरितकथाश्रवणानें रामपदीं अनुरागरूपी रस त्या सरस परागांच्या सेवेनें मिळूं लागला. (क) ती **पदरज-धूलि-विभूति** — ‘ *जनमनमंजुमुकुरमलहरणी ।* *करत*

तिलक गुणगण वशकरणी ॥ ' (१।१।४). बाल तुलसीच्या मस्तकाला-**कपाळाला-लागूं लागली;** म्हणजेच श्रीगुरुचरणांवर मस्तक ठेवण्याचें भाग्य उदयास आलें, व ते आपल्या गुरूचे जन = भक्त, सेवक म्हणून मान्य केले गेले. येथें उपनयनांतील आचार्यपदग्रहण व मंत्रोपदेशविधि सुचविला आहे; म्हणजेच *शास्त्रविधिपूर्वक गुरुशिष्यसंबंध प्रस्थापित झाला.* (ख) यानंतर सद्गुरुसांनिध्य सुटल्याचें सुचविलें आहे. कारण चरणरजाचा संबंध सुटला. यापुढें ' गुरुपदनखमणि ' ध्यानाचा उल्लेख आहे. **गुरुसमीप राहात असतां गुरुसेवा सोडून गुरुचरणांचें मानसिक ध्यान, आत्महित न जाणणारे पढतमूर्खच करतील.** ' मानसपूजा आणि प्रत्यक्ष दर्शन। महदंतर ॥ (दा. बो.) (ग) *गुरुसेवेंत चार वर्षेंच राहतां आलें असें या चारच चौपाया* सुचवितात. प्रत्यक्ष चरित्राशीं तुलना करून पाहावी. ६–१० हीं चार वर्षेंच गुरुसमीप होते.

५. विद्याध्ययन व विद्याप्राप्ति — (१) सद्गुरुवंदनानंतर प्रथम वंदन कोणास केलें पाहा :— ' वन्दे प्रथम *महीसुरचरणा* । मोहजनित संशय सब हरणा ' (१।२।३) चरित्रदृष्टीनें हें वंदन विद्यागुरूंच्या चरणांना आहे. विद्यागुरूंच्या कृपेनें विविध शास्त्रांचें अध्ययन उत्तम झाल्यामुळें शास्त्राऽज्ञानजनित नाना संशय नष्ट झाले व अनेक शास्त्रांचें निःसंदेह ज्ञान प्राप्त झालें. (क) ' *नाना पुराण निगमागम-संमतं* यत् ' (बाल. श्लो.७) यानें ठरलें व नाना = अनेक पुराणें, शास्त्रें व वेद इत्यादींचें अध्ययन केलें.

६. अध्ययनकाळीं सद्गुरुभक्ति व तिचें फळ — (१) विद्यागुरूंजवळ राहात असतां सद्गुरुभक्ति कशी करीत असत आणि काय फळ मिळालें हेंहि मानसांत दिसतें. ' श्रीगुरुपदनखमणिगणज्योती । स्मरतां दिव्य दृष्टि हृदिं होती ॥ दलनमोहतम सुप्रकाश तो । महाभाग्य ज्या हृदयीं पडतो । **रामचरित माणिमाणिक दिसती** । प्रगट गुप्त जिथ जे **खनिं असती** ॥ दो०-नेत्रिं सुअंजन घालितां साधक सिद्ध सुजाण । **वनिं पर्वतिं कौतुकिं बघति भूतलिं भूरि निधान** ' (१।१।–) (क) एकीकडे सद्गुरुचरणनखांच्या (चरणांच्या) ध्यानाचा नित्य अभ्यास व एकीकडे उत्तम विद्यागुरूंजवळ नानापुराण-निगमादिकांचा अभ्यास असा क्रम चालल्यानें ' दुःख दोष भवशार्वर झडती ' (१।१।७) अज्ञानरूपी (शार्वर =) रात्रीचे दोष सद्गुरु चरणध्यानानें नष्ट झाले; वेदपुराणादि वनपर्वतांतील रामकथारूपी खाणी ' हृदयविलोचन विमल उघडती ' (१।१।७) निर्मळ झालेल्या बुद्धीच्या उघडलेल्या नेत्रांना दिसूं लागल्या. जाड ठशांतील वचनें पाहावींत म्हणजे वनिं पर्वतिं भूतलिं भूरि निधान ' कोणतें तें कळेल. ' वेदपुराणें पर्वत पावन । रामकथा रुचिराकर पार न ॥ (७।१२०।१३) आकर = खाणी, खनि, हाच शब्द ८ व्या चौपाईत आहे.

(२) आधींच सद्गुरुमुखानें अनेक वेळां श्रवण केलेलें, त्यांत सद्गुरुचरण ध्यानानें आत्मज्ञान प्राप्त होऊन स्वरूपाज्ञानरूपी मोह नष्ट झाला. वेदपुराण शास्त्रादींच्या

अध्ययनांत व अनेक रामायणांत ' रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ॥ (बाल. मं. श्लो. ७) अनेक रामकथारूपी खाणींत रामचरित्र व त्यांत भक्तिमणि दिसूं लागले. म्हणजेच रामभक्तिसंपन्न झाले.

७ ज्ञानभक्तिसंपन्न रामकथा–वक्ते झाले — **(१)** वरील उभयविध अभ्यासाचा परिणाम असा झाला कीं ' गुरुपदरज-मृदु-मंजुल-अंजन । नयनामृत दृग् दोष विभंजन ॥ तत्कृत विमल विलोचन। *वर्णित रामचरित भवमोचन* ॥ (१।२।१-२) येथें स्पष्ट दिसतें कीं विद्यागुरूंकडून आशीर्वाद घेऊन निघाले आणि रामकथा वर्णन करून सांगूं लागले. ' विमलविवेकविलोचन.' विवेक = ज्ञान, ' *ज्ञानविरागनयन* उरगारी ! ' (७।१२०।१४)

८ संतसंगतीचा लाभ —(१) ' वर्णित रामचरित भवमोचन' (१।२।२) इत्यादि मंगलाचरणपूर्वक रामकथा सांगण्यावर संतमंडळी (संतसमाज) श्रवणास येऊं लागली हें या चौपाईनें व पुढील ' साधुसमाज प्रयाग ' वर्णनावरून ठरतें. **(क)** रामकथा सांगतांना आलेला अनुभव. ' रामभक्तिभूषित मनिं जाणुनि । *परिसाति सुजन* सुवाणीं वानुनि '(१।९।७) ' बोल बोबडे बालक बोलति । माता पिता मुदित मन ऐकति ॥ ' (१।८।९) तसे सज्जन रामकथा ऐकत असत आणि ' खल परिहासें हित मम थोरचि ' (१।९।१) खल परिहास करीत असत. इत्यादि पुष्कळ स्वानुभवच वंदन प्रकरणांत पदोंपदीं सुचविले आहेत.

९ मायारूपी नारी —आतांपर्यंत वर्णन केलेली स्थिति प्राप्त होईपर्यंत श्रीतुलसीदास ऐन तारुण्यांत आले असतील. त्याबरोबर मायारूपी नारीनें ' नारी विष्णुमाया प्रगट.' आपले कोमल, रमणीय व सुखद वाटणारे पण, ' अति दारुण दुःखद असणारे प्रेमपाश त्यांच्यावर टाकले व त्याचा भयंकर परिणाम झाला; तोच श्रीगोस्वामीजींनीं नारद-रामसंवादांत अरण्यकाण्डांत श्रीराममुखानें वर्णिला आहे. वैशाख महिन्यांत विवाहाला संमति दिली व ज्येष्ठांत (आपल्याकडील वैशाख वद्यांत) विवाह झाला आहे. या कारणांमुळेंच नारी षड्ऋतुरूपकाचा प्रारंभ वसंतवर्णनापासून केला आहे. बालकाण्डांत शरयूरूपकांत ऋतुवर्णन हेमंत (हिम) ऋतूपासून आहे (१।४२।२) कारण हिमगिरिजा-शंभुविवाह हेमंतांत झाला आहे. नारी वसंताचें आगमन वसंत ऋतूंतच झालें होतें; म्हणून मायारूपी नारीऋतुवर्णन वसंतापासूनच केलें आहे, ' श्रुणु मुनि वेद पुराण व संत । म्हणति *मोहवार्नि नारिवसंत* ॥ ' (३।४४।१–८ व दो. ४४ पाहावा.) ' अवगुणमूलहि शूलदा प्रमदा सुदुःखखाण ॥ हें *जाणुनि मीं निवारण केलें मुनि ! मनिं जाण* ॥ ' (१।४४।–) वरील चौपाईपासून या दोह्यापर्यंतच्या दहा ओव्यांवरील गू. चं. पाहावी• प्रमदापाणिग्रहण केल्यानें तुलसीदासांच्या दैवी संपत्तीला ओहोटी कशी लागला होती याचें स्वानुभवसिद्ध वर्णन जगांतील अनुभवांची व शास्त्रसिद्धांतांची भर पडून बाहेर पडलें आहे. तुलसीचरित्र अवलोकन करावें व येथें केलेलें विधान कपोलकल्पित कीं यथार्थ हें वाचकांनीं ठरवावें.

(क) मूल गोसांई चरितांत तुलसीदासांना शंकरांनी ' मुनि ' च म्हटलें आहे. त्या मोहपाशांतून कोणीं सोडविलें याविषयीं आपलें मत तुलसीदासांनीं वरील दोह्यांत प्रदर्शित केलें नाहीं असें कोण म्हणेल ? ' हें जाणुनि मीं निवारण केलें मुनि ! मनिं जाण ' हें श्रीरामवचन आहे. रामप्रभूंनींच आपल्या ' बालक सुतसम दास अमानी ' (३।४३।८) भक्ताला त्या मोहांतून सोडविलें. स्त्री केवळ निमित्त केली गेली. (ख) मानसांतील सर्व वचनांचें याप्रमाणें साधार निरूपण करण्यास शंभर पृष्ठें पुरणार नाहींत, म्हणून आतां अतिसंक्षेपरूपानें नुसता नामनिर्देश करून दुधाची तहान ताकावर भागविणें जरूर आहे.

१० विवाह केल्याबद्दल पश्चात्ताप — साधुवेष घेऊन बाहेर पडतांना जो पश्चात्ताप झाला, होत होता, तो कसा प्रतिबिंबित झाला आहे पाहा :—' वंचक मिरविति रामभक्त वर । काम कोप कनकांचे किंकर ॥ अशांमधें जगीं गणा प्रथम मज । वृष धाण्याचा धिग् धर्मध्वज ' (१।१२।३–४).

११ संतमुखानें रामकथाश्रवण — तीर्थाटन करीत असतां पुष्कळ संतांच्या मुखानें रामकथाश्रवण केलें. (१।३४।३-४ व पुढें पाहा) ' सुमति भूमि थळ हृदय अगाधू । वेदपुराण-उदधि घन *साधू* ॥ *वर्षति रामसुयश वर* वारी । मधुर मनोहर मंगलकारी ॥ ४ ॥

१२ अनेकभाषाकोविद व परिचित — तुलसीदास संस्कृत भाषेचे महापंडित होते हें प्रसिद्धच आहे. श्रीरामचरितमानसाची मुख्य भाषा *' अवधी '* आहे. शिवाय फार्सी, अरबी, उर्दू या भाषांतील शब्दांचाहि पुष्कळ उपयोग मोठ्या कौशल्यानें व धात्वर्थानें केला आहे. बंगाली, गुजराथी व मराठी शब्दहि एखादा आढळतो. ' स्याम करन हय अगनित *होते* । ते तिन्ह रथन्ह सारथिन्ह जोते ' यांत ' होते ' हा शब्द शुद्ध मराठी आहे;. हें मर्म न कळल्यानें होते = हवन करणारे या अर्थाशीं सांगड घालतांना टीकाकारांची गाळण उडाली आहे. Near या इंग्रजी शब्दाचीं निअराए, निअरावा वगैरे रूपें मोठ्या सफाईदार पद्धतीनें वापरलीं आहेत.

१३ व्युत्पत्ति व शब्दशास्त्रनिपुण — तुलसीदासांनीं ज्या अर्थानें विविध शब्द वापरले आहेत ते शब्दार्थ व त्यांची व्युत्पत्ति कळण्यास अमरकोषासह २५ संस्कृत कोषांचे आधार घ्यावे लागले आहेत; हें संदर्भ-ग्रंथसूचींतील कोषसूचीवरून कळेल. या एकाच गोष्टीवरून गोस्वामींच्या पाठांतर-शक्तीची व धारणाशक्तीची अंधुक कल्पना करतां येते. ५० वर्षें ग्रंथव्यासंग सुटल्यानंतर मानसाची रचना झाली आहे. ७७ व्या वर्षीं त्यांच्या स्मरणशक्तीची कल्पना करतां येणें म्हणजे आकाशास हात लावण्यासारखेंच आहे. ७।८ वेळां एखाद्या शब्दाची व्युत्पत्ति कोषांत पाहिली तरी ९ व्या वेळीं पुन्हां कोष पाहावाच लागतो अशी मंद आहे या लेखकाची बुद्धि !

१४ आयुर्वेदच कवि तुलसी झाला — (१) असें अनेक ठिकाणीं प्रत्ययास येतें.

मानसांतील नुसतें एक विषमज्वर रूपकच याविषयीं पूर्ण विश्वास उत्पन्न करण्यास **समर्थ** होईल,' जरहिं विषमजर लेहिं उसासा ' (हिं.) ' श्वास घेति जळती विषमज्वारिं (मराठी) **(क) हा विषमज्वर कोणता** हें निश्चित करण्यासाठीं सटीक माधवनिदान ग्रंथांतील विषमज्वर प्रकरणाचें सूक्ष्म अवलोकन अति चिकित्सक बुद्धीनें करावें लागलें. येथें टीकेंतील अगदीं आवश्यक तेवढाच उतारा देणें चांगलें.

(**ख**) विषमज्वराचे सतत, संतत, अन्तर्वेग, बहिर्वेग, कष्टसाध्य, असाध्य इत्यादि अनेक प्रकार आहेत. त्यांपैकीं **अन्तर्वेग, संतत, असाध्य विषमज्वराचीं लक्षणें स्पष्ट दिसतात** — उसासे-श्वास-घेणें, पाण्यावांचून तळमळणें म्हणजे अत्यंत तृष्णा, ' जणुं जलचरगण पाणी आटत ' (२।५१।६) जीविताची निराशा ' रामाविण जीवन-आशा तरि ? ' (२।५१।५) म्हणजेच असाध्यता.

(ग) माधवनिदानोक्त ज्वर लक्षणें — *अन्तर्दाहोऽधिकस्तृष्णा, प्रलापः श्वसनं भ्रमः । संध्यस्थिशूलमस्वेदो दोषवर्चोविनिग्रहः ॥* ' अशीं आठ लक्षणें आहेत.

(**१**) **अधिकः अन्तर्दाहः**—आंतल्या आंत विशेष दाह होणें. ' **दुःसह दाह हृदीं,** गत उत्सव. (२।४९।२) लोकांच्या हृदयांत दुःसह दाह होत आहे आणि उत्साह गेला. **(२) तृष्णा**—तहान लागणें, **कोरड** पडणें, **मुख सुकणें, ' मुख सुकती,** स्रवती नयन उर अपुरा शोकास ' (२।४६।–) तोंडें सुकून गेलीं आहेत, कोरड पडली आहे, नेत्रांतून अश्रू वाहात आहेत, शोकाला हृदय अपुरें पडत आहे. **(३) प्रलापः**—बडबड, असंबद्ध भाषण, लोक कैकयीबद्दल ' म्हणति मंदमति अभागी ' ' बुडविली दैवें राज्य करित ही । हिनें कृत जसें कुणी करि नहीं ॥ *विलपति* यापरिं *पुरनरनारी । देति कुचाळिस गालिहिं भारी ॥* ' (२।५–१।३·४) **शिव्यागाळी देणें हे प्रलाप आहेत, बाकीची बडबड आहे** विषमज्वरांतील. **(४) श्वसनं** — जोराजोरानें श्वास घेणें व सोडणें, उसासे-श्वास-टाकणें. ' *श्वास घेति* जळती विषमज्वारिं ॥ **(५) भ्रमः**— तापांत वात होऊन भ्रम उत्पन्न होतो तो. ' *घोर जंतुमय पुरनरनारी । बघुनि परस्पर भितात भारी ॥ जणूं भूतें परिजन,* मसाण घर । *मित्र सुहृद सुत जणुं यमकिंकर ॥* (२।८३।६-७) तापांत भ्रम झाला म्हणजे जवळचीं माणसेंच भुतांसारखीं दिसूं लागतात, यमदूत-यमकिंकर दिसतात पुष्कळांना. **(६) संध्यस्थि-शूलम्**—सांधे व हाडें दुखणें, तेथें शूळ उत्पन्न होणें; असा शूळ, पीडा, होण्यामुळें रोगी विव्हळतो. ' विपुल वियोगें **प्रजा विव्हळत.** ' (२।५१।६) **(७) अस्वेदः**— **घाम न येणें.** रामवियोगाची दुःसह बातमी पसरल्यापासून शोक, विलाप, प्रलाप, रडारड, हातपाय गळणें इत्यादि सर्व गोष्टींचें वर्णन आहे, पण दो० ४९।१ पासून दो० ८३ अखेरच्या ३५० ओळींच्या या प्रकरणांत **पुरनरनारींना घाम आल्याचें वर्णन एकदांसुद्धां नाहीं !** हा सर्व भाग 'घामा'साठीं शोधून पाहिल्यावर खात्री झाली कीं श्रीतुलसीरूपी आयुर्वेदानें तें **वर्णन हेतुपूर्वक गाळलें आहे. (८) दोषवर्चो**

विनिग्रहः—दोष व वर्चस यांची अप्रवृत्ति असा अर्थ मधुकोषटीकेंत दिला आहे. वात सरण्याचें बंद होणें व मलमूत्रावरोध होणें = दोषवर्चो विनिग्रहः, सर्व लोकांच्या खाणें पिणें इत्यादि **सर्वच प्रवृत्ति बंद आहेत** व प्रलाप, भय इत्यादि चालू आहेतच. **(९) हा रोग असाध्य आहे** असें जाणून त्याचा त्याग करावा. औषधादि शहाण्या वैद्यानें देऊं नये असें सुश्रुतांत म्हटलें आहे (सु.उ. तं. ३९ पाहा.) ' व्याधि असाध्य समजुनी त्यजती ' (२।५१।२) कैकयीचा मत्सर व अविवेकरूपी ज्वर-व्याधी असाध्य ठरला म्हणून लोकांचा विषमज्वरही असाध्यच ठरला. **(१०) मुदत** —७-१०-१४ इत्यादि माधवनिदानांत सांगितली आहे. लोकांचा हा विषमज्वर **१४ वर्षांच्या मुदतीचा आहे. (११)** मुदतीनंतर **रोगमुक्ति किंवा देहमुक्ति** (मरण) – १४ वर्षांनीं राम परत आले तर हा ज्वर उतरणार व लोक रोगमुक्त होणार. राम नाहीं आले तर लोक मरणार. ' **रामाविण-जीवन आशा तरि ?** ' (२।५१।५)

याप्रमाणें **अंतर्वेग, संतत, असाध्य विषमज्वराचीं ग्रंथोक्त सर्व लक्षणें मानसांतच सांपडलीं! वि. ल. ठे.** (१) तुलसीदासांनीं २५ व्या वर्षी अध्ययन-समाप्ति केली. त्यानंतर ते वैद्यकीचा धंदा करीत नव्हते. वयाच्या ७७ व्या वर्षी रामायण-लेखन सुरूं झालें व ८० व्या वर्षी पूर्ण झालें. असें असतां संपूर्ण लक्षणांचें साम्य इतस्ततः कसें भरून ठेवलें आहे हें पाहून काय तें अनुमान करावें. **(२)** मानसांत रस (= पारद) सिद्धि व अनेक रोगांचें वर्णन रूपकांच्या साह्यानें केलेलें असून असेंच आश्चर्यकारक साम्य सर्वत्र आहे. गू. चंद्रिकेनें यथास्थान यथामति पण ग्रंथाधारें सविस्तर स्पष्टिकरण केलें आहे.

१५ सर्वशास्त्रविशारद होते — (१) श्रीमद्गोस्वामी सर्वशास्त्रविशारद होते असें मानसाचें सूक्ष्म निरीक्षण करून त्या त्या शास्त्रग्रंथांशीं तुलना केल्यानें कोणालाहि म्हणावें लागेल.

(**अ**) **वनस्पतिशास्त्र** — उदाहरणार्थ यवासा (धमासा) या वनस्पतीची संस्कृतांतील विविध नांवें व त्यांचा अर्थ दृष्टीपुढें ठेवूनच हें नांव उपमारूपकादि अलंकारांत उपमान म्हणून वापरलें आहे. २।५४।२; ३।४४।६; ४।१५।३ या चौपायांच्या गू. चं. टीकेंत पाहा. चिकित्सा प्रभाकरादि अनेक ग्रंथ आणि शब्दकोष अवलोकन केले गेले तेव्हांच समाधानकारक टीका लिहितां आली.

(आ) वास्तु-शिल्प-ज्ञान — जनकपुरींतील विवाहमंडपादि निर्मितीचें वर्णन गू. चं.त पाहावें, *ताजमहालच्या* निर्मात्यांनीं गोस्वामींच्या त्या वर्णनावरूनच रचना केली असें उत्तर हिंदुस्थानांतील इतिहास-संशोधकांचें म्हणणें आहे. *ताजमहालची रचना मानसनिर्मिती नंतरच झालेली आहे.*

(इ) खगविज्ञान — भरणीपक्ष्याचें रूपक गू. चं. त स्पष्ट केलें आहे तें (१।३१।६ टी.) पाहावें व २।२८।८ व दोहा यांतील ससाण्याचें रूपक टीकेंत पाहावें. हे नुसते थोडे नमुने आहेत.

(ई) जलचर-विज्ञान — मानसरूपकांत व शरयूरूपकांत विविध जलचर व मीनांच्या जाती यांचीं रूपकें वापरलीं आहेत; त्यांचा उलगडा गू. चंद्रिकेच्या प्रकाशांत पाहावा म्हणजे आश्चर्य वाटेल.

(उ) शकुनशास्त्र — मानसांतील शकुनांचें वर्णन पुढें प्रस्तावनेंत व टीकेंत पाहावें. विशेषतः शकुनांचा अर्थ लावण्यांतील दक्षता पाहावी. (२।१९२।४ टी. पाहा.) अग्निपुराणांत अध्याय आहेत तेहि वाटल्यास तुलनेस घ्यावेत.

संगीतशास्त्र, तालज्ञान, स्वरज्ञान, धर्मशास्त्र, मंत्रशास्त्र, ज्योतिषशास्त्र, साहित्यशास्त्र, सांख्यशास्त्र, योगशास्त्र, तंत्रशास्त्र, वेदान्तशास्त्राच्या सर्व संप्रदायांचें ज्ञान, भक्तिशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांत ते **पूर्ण पारंगत होते** हें गू. चंद्रिकेंत ठिकठिकाणीं केलेल्या उल्लेखांवरून कळून येईल. श्रीरामचरितमानस सर्व ग्रंथांचें सार आहे **'सब ग्रंथन को रस'** असें तुलसीदासांनींच रामायणाच्या आरतींत म्हटलें आहे तें गू. चंद्रिकेंतील विविध ग्रंथांच्या आधारांवरूनसुद्धां कळेल. ५३।५४ उपनिषदांतील अवतरणें द्यावीं लागलीं आहेत.

१६ भरतचरित्राचा परिणाम — तुलसीदासांच्या चरित्रावर श्रीराम-प्राणप्रिय भरताच्या चरित्राचा विशेष परिणाम झाला असून तुलसीदासांची 'आर्ती विनय दीनता' भरतचरितांतूनच त्यांच्या हृदयांत शिरली आहे व मानसांत सर्वत्र पसरली आहे. रामवनवास-कारण होण्याचा विषाद भरतास आहे, तर गोस्वामींस नारीरूपासक्त झाल्याचा विषाद आहे. तुलसीदास स्वतःच म्हणतातः—

छंद–' श्रीरामसीता–प्रेमपीयुष–सम न जन्मत भरत कीं ॥ व्रत विषय शमदम नियम यम मुनिमन–अगम कुणि करत कीं ॥ दारिद्र्य दूषण दंभ दुःखानल सुयशमिषिं-हरत कीं ॥ कलिकालिं *तुलसी सम शठा कुणि रामसन्मुख करत कीं* ॥ सो०—भरत चरित, *युतनेम तुलसी सादर जे श्रवति । सितारामपदिं प्रेम होइ नक्की भवरस विरति* ' (२।३२६।–) यावरून स्पष्ट दिसतें कीं तुलसीदास आदरानें व नेमानें भरत-चरित्र श्रवण करीत असत, आणि त्यामुळेंच त्यांना वैराग्य व सीतारामपदप्रीति प्राप्त झाली. (क) मानसांतील भरतचरित्र-चित्रण इतकें विस्तृत आणि अनुपम रमणीय, चेतोहर व भावोद्दीपक वठलें आहे हें वरील विधानाचें सत्यत्व पटविणारें आहे.

१७ रामनामप्रेम — मानसांतील दो. १९।१—२८।१ (बाल कांड) यांतील रामनामनिरूपण गू. चं. टीकेसह पाहिल्यानें खात्री होईल कीं श्रीतुलसीदासांचें रामनामप्रेम अलौकिक होतें. ब्रह्म आणि राम (रघुपति) यांच्यापेक्षां रामनामश्रेष्ठ (=गुरु) हा त्यांचा स्वतःचा अनुभव, प्रीति व रुचि त्यांनीं उघड सांगितलीं आहेत व आपला अनुभव सोपपत्तिक रीत्या स्पष्ट करून दाखविला आहे. नाम हेंच साधन व नाम हेंच साध्य आहे.—' दोघांहुनि गुरु नाम मम मतें । जें उभयां निजबल-वश करतें ॥ प्रौढि सुजन माता न जनाची । *रति रुचि वदें प्रतीति* मनाची ॥ (१।२३।२–३).

१८ रामचरित-गान-प्रेमी — '*रघुवीरचरित* पुनीत *निशिदिन दासतुलसी गातसे*' (३।६। छंद) तुलसीदासांनीं ग्रंथाच्या उपसंहारांत काय मागणें मागितलें पाहा :— 'कामि नरा प्रिय नारि जाशी लोभि नरा प्रिय दाम ॥ मज रघुनाथ निरंतर व्हा प्रिय तसेच राम ' (७।१३०।) रघुनाथ शब्दानें रघुनाथरूपासक्ति आणि राम शब्दानें (दाम) नामजपासक्ति मागितली आहे. कामी रूपासक्त असतो आणि लोभी धनसंख्यासक्त असतो, आणि हें मागणें केव्हां मागितलें ? तुलसीदासांचीं सर्व रामायणें संगीतांत आहेत !

१९ रामप्रेमांत — **रामरूपात रंगलेले** असतांना—मागितलें. ' ते धन्य *तुलसीदास* आस विहाय *हरिरंगी* रत. ' (३।४६। छंद)

२० पूर्ण विश्राम पावले होते — ज्याच्या कृपालेशामुळें मतिमंद तुलसीदासही । पावे परम विश्राम तो प्रभु राम सम कोठें नहीं (७।१३०। छं.)

२१ श्रीतुलसीदासांची दीनता व नम्रता — संपूर्ण रामायणांत अथपासून इतिपर्यंत श्रीतुलसीदासांची उत्कट दीनता व परम नम्रता पाझरत आहेत. स्वतःच सांगतात कीं ' माझी आर्ती विनति दीनता। लघुता सुजलीं थोडि न, ललिता ॥ ' लघुता = हलकेपणा-नीचता, असा अर्थ असला तरी पाण्याचा हलकेपणा लोकहितकारी असतो ; उत्तम गुण आहे ! गोस्वामींसारख्या परमश्रेष्ठ, अवतारी, अनेक देवतांचा सगुण साक्षात्कार झालेल्या, सर्वशास्त्रपारंगत, परम विमल कीर्तिसंपन्न महापुरुषाची ही भूमिका पाहून हे दोनच गुण जर कोणी कमावील तर तो धन्य होईल. श्रीमानसांतच नव्हे तर मानसानंतर जन्मलेल्या काव्यकन्यकांतसुद्धां अशाच किंवा यांहून अधिक दीनता व नम्रता आहेत.

(१) सर्व जग राममय जाणून सर्वांना हात जोडून प्रणाम करून विनवितातः— ' मजसि कृपाकर-किंकर समजुनि । कृपा करा सर्वहि छल विसरुनि ॥ ' तुमजें अंगां एक उपाया । *मनमतिरंक* मनोरथ राया ॥ ' *मति अति नीच* उच्च रुचि रुचिरहि. ' (१।८।६–७) (२) मम मति भोळी प्राकृतिं रचना । हसण्या योग्य, हसोत दोष ना ॥ कवि न, वचनिं मी नसें प्रवीण । सकल कला सब विद्याहीन ॥ काव्यविवेक न एकहि मातें । सत्य लिहिं नव कागदिं हातें ॥ (१।९।४, ८, ११) ' मम रचना सब गुणरहित ' (दो. १।९।–) ' भाषा ग्राम्य ' (१।१०।१०). (३) जे जात किं कलिकालिं करालीं । कृति काकांची वेष मराली ॥ गति-कुपथीं श्रुतिपथा सांडिती । कपटकाय कलिपंक भांडितीं ॥ वंचक, मिरविति रामभक्तवर । काम कोप कनकांचे किंकर ॥ अशांमधें जगिं गणा प्रथम मज । वृष घाण्याचा धिग् धर्मध्वज ॥ निज अवगुण वर्णित जर सांगें । वाढे कथा, न पारहि लागे ॥ चतुर न म्हणवित मी कवि नाहीं । गात यथामति रामगुणांही ॥ (१।१२।१–५, ९) ' मम मति कुठें निरत संसारहि ' (१।१२।१०) ' सुधनी राम कुसेवक मी तों ' (१।२८।४). (४) ही

अशा प्रकारची दीनता आणि परम नम्रता कोठें आणि आपण स्वतःच आपणांस ब्रह्मनिष्ठ, ब्रह्मविद्यापरायण, स्वानंदसाम्राज्यरत, भगवान, वैराग्यभास्कर, धर्ममार्तंड इत्यादि म्हणणें व म्हणविणें कोठें ! याचा विचार वाचकांनीच करावा. ' उथळ पाण्याला खळाळी फार ' आणि ' न भरलेली घागरच आवाज करते ' या म्हणी नेहमीं स्मरणांत असाव्यात. *गोस्वामींची दीनता आणि नम्रता हेंच खऱ्या मोठ्यांच्या मोठेपणाचें खरें मोठें लक्षण आहे. जो लहानाहून लहान होईल तोच मोठ्याहून मोठा होऊं शकतो !* (५) प्रत्येक काण्डांत शठ, जड, मंद, मंदमति, जडमति, मोहवश, प्रभुदया विसरणारा इत्यादि प्रकारचीं वचनें तुलसीदासांनीं स्वतःला वापरलीं आहेत. भरतचरित्रांत, सुतीक्ष्णचरित्रांत व शबरीचरित्रांतसुद्धां हीं लक्षणें प्रमुख आहेत. *येथें नमुन्यादाखल अगदीं थोडीं वचनें दिलीं आहेत.*

२२ मानसांतच मानसमहिमावर्णन — श्रीरामचरित-मानसांतच त्याच्या विविध महतीचें वर्णन अनेक ठिकाणीं आहे —(१) ' रघुनाथगाथाभाषानिबन्धं *अतिमंजुलम्* आतनोति ' (बाल. मं. श्लो. ७) या रामचरितास *अतिमंजुल* म्हटलें आणि वाल्मीकिरामायणास ' सखर सुकोमल *मंजु* दोषरहित *दूषणसहित* ' (१।१४ द्रा) म्हटलें. वा. रा. पेक्षां मानस अधिक मधुर व सुंदर आहे व यांत ' दोष नाहींच पण दूषणहि नाहीं ' (गू. चं. पाहा.). (२) करि मंगला हरि कलिमला (१।१० छंद). (३) *सुरसरिसम सकलां हितकारक* (१।१४।९). (४) रामप्रताप आहे प्रकटहि. (१।१०।७). (५) '*प्रिय सकलां अति होइ मम काव्य* रामयशरंगिं । दारुविचार किं करि कुणि वंदिति मलय-सुसंगिं ॥ ' (१।१० रा). ' श्याम-सुरभि पय विशद अति गुणद करिति सब पान ' (१।१० म) अति विशद (= निर्मल) व अति गुणद असून *याचें पान सर्व करतील असें जें म्हटलें तें दिवसेंदिवस अधिकाधिक खरें ठरत आहे.* (६) होति *काव्यमुक्तामणि* चारू ॥ (१।११।९) ओंविति वेधुनि युक्तिनें रामचरित वर ताग । घालति सज्जन विमलहृदिं शोभा अति अनुराग ॥ (१।११।–) रामचरित्र, रामकथा हा तागाचा धागा (दोरा) आहे व तो काव्यरूपी सुंदर मुक्तामण्यांत ओंवला—गोवला—आहे; बालकांड दो. १६।१ पासून ४३ अखेरपर्यंत सर्व रामचरित्र अशा रीतीनें चार वेळां उघडउघड ओंवलें आहे; तरी तें सहज दिसत नाहीं अशी कला आहे ! दो. ३० व ३२ च्या चौपायांत श्रीरामचरित इतक्या कौशल्यानें ओंवलें आहे कीं साधारण वाचकांस तें दिसत नाहीं यांत नवल नाहीं; पण चांगल्या पंडितांस, टीकालेखकांस, रामायणी, व्यास इत्यादींस तें कथासूत्र अद्यापपर्यंत दिसलेलें नाहीं. ज्यांनीं तें ओंवलें त्यांनींच या दीनावर कृपादृष्टि केली व टीकालेखनसमयींच तें दाखविलें; तत्पूर्वीं दिसलें नव्हतें (गू. चं. पहा.).

प्रत्येक कांडांत मागल्या व पुढल्या कांडांचा मुख्य विषय अशा बेमालूमपणें ओंवलेला आहे कीं आपण मागल्या काण्डाचें सार वाचीत आहोंत अशी कल्पना शंभर पारायणें

झालीं तरीसुद्धां येत नाहीं. हीं सर्व रामायणें प्रस्तावनेंत दाखविणें शक्य नाहीं, गूढार्थ चंद्रिकेंत पाहावींत (७) **मानस काव्य कसें विराजलें पाहा** — ' कविता मम शिवकृपें विराजे । जणुं सोडुप उडु सुनिशा भ्राजे ' (१।१५।९) शिवकृपेनें माझी कविता अशी विराजत आहे कीं जणूं नक्षत्रें (उडु) व नक्षत्रपति (उडुप) चंद्र यांच्यासह निरभ्र सुंदर रात्रच भ्राजमान झाली आहे. (८) येइ कथेमधिं दोष न कसला । अगदीं पूर्ण निर्दोष काव्य आहेच. (९) अति सुंदर संवाद वर......ते या *पावन सुभग* सरिं घाट मनोहर चारि (१।३६।–) चार संवाद अति सुंदर असून ते या पावन व सुंदर रामचरित-मानसाचे चारी मनोहर उत्तम (वर) घाट आहेत. (१०) सप्तप्रबंधसुभगसोपान— सात काण्डें रूपी सात सुंदर सोपान आहेत, (१।३७।१) उपमा वीचिविलास मनोरम (१।३७।३) पासून दोहा ३७ पर्यंत पुष्कळ वर्णन आहे तें व त्यावरील गूढार्थ चंद्रिका पाहावी. (११) ' कथाप्रबंधा विचित्र बनवुनि ' विचित्र = रम्य, अपूर्व व अद्भुत असा हा कथाप्रबंध आहे. विचित्र कथाप्रबंध हें पुढें प्रस्तावनेंतच स्वतंत्र प्रकरण आहे व अद्भुततेचे कांहीं नमुने एका स्वतंत्र प्रकरणांत दाखविले आहेत.

२३ श्रीतुलसीदासजींच्या दिव्य भावना — (१) गोस्वामीजी आपणांस रामसेवक म्हणतात व मानतात. त्यांची दिव्य भावना भरताच्या मुखानें बाहेर पडली आहे, (२।२०३।६–७) पायींपायिं राम तर गेले । आम्हांस्तव रथ हय गज केले ! ॥६॥ *' उचित मला जाणें कीं मस्तकिं । सेवक धर्म कठोर समस्त कि* ॥ ७ ॥ ' तुलसीदास रामदर्शन होणार या आनंदानें काशीहून चित्रकूटला जाण्यास निघाले तेव्हां त्यांच्या हृदयाची जी भावना होती ती वरच्या चौपाईंत प्रतिबिंबित झाली आहे. (गूढार्थ-चंद्रिका पाहा).

(२) प्रभु श्रीरघुवीराच्या आगमनाचा समाचार कळल्यानंतर अगस्त्य शिष्य सुतीक्ष्णाच्या भावनेचें व प्रेममग्न स्थितीचें जें वर्णन आहे ती भावना व तशी प्रेममग्न दशा तुलसीदासांची काशीहून चित्रकूटास जातांना झाली होती. आपणांस साधनहीन रामसेवक मानणाऱ्या गोस्वामींना साक्षात् हनुमन्तानें अभिवचन दिलें होतें कीं चित्र-कूटास दर्शन होईल. त्यानंतर गोस्वामी चित्रकूटास चालले होते ही गोष्ट ध्यानांत ठेवून सुतीक्ष्णचरित्राचा प्रारंभींचा भाग वाचावा. ' होतिल आज सुफल मम लोचन । बघुनि वदनपंकज भवमोचन ' या आनंदांत मग्न होऊन निघाले तेव्हांच्या त्यांच्याच प्रेमदशेचें वर्णन सुतीक्ष्ण वर्णनांत (३।१०।९–१२) बाहेर पडलें आहे.

(३) चित्रकूटला श्रीरामदर्शन व भेट झाली त्या वेळच्या स्थितीचेंच वर्णन किष्किंधा काण्डारंभीं श्रीहनुमान-रघुवीर भेटींत बाहेर आलेलें दिसतें. विप्रवेषानें आलेल्या प्रभूस श्रीतुलसीदासजी प्रथम ओळखूं शकले नाहींत (किष्किंधा. २।६ पासून दो. ३ अखेर गू. चं. सह पाहणें) इतकीं उदाहरणें मार्गदर्शन करण्यास पुरतील.

२४ तत्कालीन परिस्थितीचें प्रतिबिंब — श्रीतुलसीदासांनीं अखिल भारतांत

१४ वर्षें पायीं पर्यटन केलें; अकबर, जहांगीर व शहाजहान यांच्या कारकीर्दी पाहिल्या आणि तोडरमल्ल त्यांचे स्नेही होते. या सर्व कारणांनीं तत्कालीन परिस्थितीचें प्रतिबिंब श्रीरामचरितमानससारख्या अद्वितीय *नाट्यमहाकाव्यांत* न पडलें तरच नवल. (१) दशरथनंदन राम केवळ एक राजपुत्र होते असा बुद्धिभेद हेतुपुरःसर हिंदु समाजांत प्रसृत केला गेला होता; याचें निदर्शन भरद्वाज व उमा यांच्या मुखानें विचारलेल्या शंकांनीं केलें आहे. 'एक राम तों अयोध्येशसुत। संसारीं तच्चरित्र विश्रुत ॥ नारी विरहें दुःखी पार न। येई रोष रणिं वधिला रावण ॥ दो० ॥ प्रभु तो राम किं अपर कुणि ज्या जपती त्रिपुरारि ॥ सत्यधाम सर्वज्ञ तुम्हिं वदा विवेक विचारिं ॥ (१।४६।–) अशी शंका परमार्थपथप्रवीण भरद्वाज मुनींनीं विचारली. सार हें कीं अशा शंका परमार्थी म्हणविणाऱ्या मोठमोठ्या लोकांत, ज्ञानी तपस्व्यांतसुद्धां शिरल्या होत्या. (२) अशाच प्रकारची शंका उमा-पार्वतीनें विचारली आहे. (१।१०८।७–१०९।१) उमेच्या निमित्तानें हें दाखविलें आहे कीं नारीवर्गांतसुद्धां त्या बुद्धिभेदानें चांगलाच प्रवेश केला होता. (क) यामुळें सगुण भक्तीचा उच्छेद केला जात होता व वेदान्ताची–ज्ञानाची–पोपटपंची खालपासून वरपर्यंतच्या समाजांत चालू झाली होती म्हणून गोस्वामींनीं जिथें तिथें रामपदपंकज, रामरघुवीर, ब्रह्मरघुपति, रामरूप हरि, इत्यादि प्रयोग करून निर्गुण निराकार, सगुण निराकार, व सगुणसाकार-अवतार यांतील अभेद शास्त्र, युक्ति व दृष्टान्तादिकांच्या साह्यानें सतत दृग्गोचर केला आहे.

२५ शैव-वैष्णवादि-विद्वेष — श्रुतिस्मृतिपुराणेतिहासांत ब्रह्मा, विष्णु, शिव, गणेश, उमा, सूर्य इत्यादि देवतांचें पूर्ण ऐक्य प्रतिपादन केलेलें असून, एकाच पुराणांत राम शंकराची स्तुति आणि शंकर रामाची स्तुति करीत असतां, 'अद्वेष्टा सर्वभूतानां' हें संतांचें, भक्तांचें प्रमुख लक्षण भ. गीता शंखरवानें सांगत असतां शैव वैष्णवादि द्वेषाला बाळसें आलें होतें; म्हणून नानापुराणनिगमागमसंमत शिव-विष्णु-राम अभेद मानसांत धोक्यांचें शिंग फुंकून प्रतिपादन केला आहे. भवानीची पूजा व प्रार्थना सीता करते व राम शिवपार्थिवपूजन करतात. मानसांत रघुकुल इष्टदेव शिव असल्याचे उल्लेख वारंवार असून (शिवपुराणांत स्पष्टच उल्लेख आहेत.) जनकराजा शिवपूजक, भरत शिवपूजक असून आजहि मानसप्रेमी सांप्रदायिक टीकाकार तें मान्य करीत नाहींत. (पुढें प्रस्तावनेंतच स्वतंत्र लेख आहे) व आजहि तुलसीसांप्रदायिकांतसुद्धां हे झगडे आढळतात हें आश्चर्य आहे (शिवरामअभेद प्रकरण पुढें आहे.)

२६ सत्ताधीशादि व लक्षाधीशादि कसे होते — (१) सुरपति इन्द्राचें व स्वर्गस्थ देवांचें निन्देसारखें वाटणारें वर्णन मानसांत सर्वत्र भरपूर आहे. त्यांत स्वर्गस्थ देवांच्या स्वार्थी स्वभावाचें यथार्थ चित्र रेखाटलें आहेच, पण त्या निमित्तानें अन्योक्ति अलंकारानें केलेलें मोंगल बादशहा व इतर राजे, संस्थानिक, दिवाण, सरदार,

अमीर, इनामदार वगैरे सत्ताधीश आणि कोटयाधीश, लक्षाधीश इत्यादि लक्ष्मीपुत्र व प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या लोकांच्या स्वभावाचें व कृष्णकारस्थानांचें तें वर्णन आहे. (स्वर्गस्थ देवस्वभाव प्रकरण प्रस्तावनेंत पाहावें). (२) सुन्दरकाण्डांत बिभीषणानें रावणास जो उपदेश केला आहे त्यांत तत्कालीन साम्राज्यशाहीपदाचें दिग्दर्शन केलेलें दिसतें. (५।३८।५ पासून दो. ३८ पर्यंत गू. चं. पाहा) ' मोंगल साम्राज्यांतील हिंदूच्या दुर्दशेचें व त्यांच्या अंतस्थ भावनांचें प्रतिबिंब येथें पडलेलें दिसतें ' अशी सूचना टीकेंत आहे; त्यापुढील ' उपदेश ' पाहावा.

२७ साधुसंतांस कसें राहावें लागे — त्या काळांत हिंदु साधुसंत-सज्जनांस कसें राहावें लागत असे याचें चित्र एका चौपाईत रेखाटलें आहे. बिभीषण हनुमन्तास आपली दशा सांगतात :— (५।७।१-२) ' पहा पवनसुत अमचि राहणी। जेवीं जीभ बिचारी दशनीं ॥ ' ३२ दशनांच्या—चावणारांच्या (दांतांच्या)—मंडळांत जशी एकटी जीभ राहते तसें त्या काळीं खऱ्या साधु-सज्जनांस राहावें लागत असे. जिभेचें ३२ सद्‌गुण आणि बत्तिशीचे बत्तीस दुर्जन गुण—दुर्गुण—गू. चं. नें दाखविले आहेत. (मा. मणि. मासिकांत लेख पाहावा.)

२८ सर्वसाधारण हिंदु समाजाची दशा —(१) तत्कालीन हिंदु समाज निःशस्त्र केलेला नसतांहि किती दीन दुबळा झाला होता व त्यामुळें शठ, दुर्जन, गुंड, इत्यादि कसे शेफारले होते याचें दिग्दर्शन सागरनिग्रहकथेंत केलें आहे. (क) श्रीरघुवीरानें तीन दिवस धरणें धरून, अनशन करून सागरास प्रार्थना केल्या तरी तो दाद देईना तेव्हां रघुवीर म्हणालेः— दो.—' विनति जलधि जड मानिना जरि गेले दिन तीन। वदले राम सकोप तैं *प्रीति न भीतीवीण* ॥ (५।५७) ' लक्ष्मण आण शरासन सायक। सिंधु शोषितो विशिखें पावक ॥ *शठां विनय कुटिलांशीं प्रीति* ' करणें ऊखर *भूमींत बीज पेरल्यासारखीं ठरतात.*

मोठमोठ्या हिंदु सरदारांनीं, रजपुतांनीं—क्षत्रियांनीं कुटिल राजनीतिपटु अकबराशीं प्रीति जोडली होती; त्यामुळें ' कुटिलाशीं प्रीति ' हें वचन तेथें आलें. इतर लोक दुर्जनांच्या पायधरण्या करीत होते हें ' शठांविनय ' शठांना—दुर्जनांस—विनंत्या करणें, यानें दर्शविलें आहे. गोस्वामी म्हणतात कीं अशा शठांना भीति उत्पन्न केल्याशिवाय ते खरी प्रीति करणार नाहींत; ' प्रीति न भीतीवीण '. आणखी सांगतात कीं, ' कोटियत्नि शिंपाकदलि कापुनि फळते तीच ॥ श्रुणु खगेश *मानि न विनाति धाकें नमतो नीच.* ' (५।५८). नीच, शठ, गुंड दादा बाबा करून, त्यांच्या तंत्रानें वागून वळत नाहींत, त्यांच्या छातींत धडकी बसेल अशी कृति करून दाखविली पाहिजे; म्हणजे मग ते रेशमाहून नरम होतात; कारण कीं शठ, गुंड इत्यादि खरे शूर नसतात, ते भित्रे असतात.

२९ सत्ताहंकारी व धनिकादिकांच्या भावना — रावण-अंगद-संवादांत (६।३४।५-६) रावण म्हणतो ' रावण हसला श्रवुनि युक्तिसी। मूढ कुठें *अनृता*

अति शिकसी ॥ वालि न कधिं *जल्पला असें अति । होसी लबाड तापससंगाति ॥* ' हीं वाक्यें रावणाच्या मुखांत घालून दाखविलें आहे कीं तत्कालीन सत्ताधीश, धनाढ्य, प्रतिष्ठित, पंडित वगैरे वर्गांत अशी भावना रूढ झाली होती कीं तपस्व्यांच्या संगतीनें तरुण बिघडतात; लबाड होतात; अति असत्यवादी होतात व वृथा टेंभा मिरविण्याची संवय लागते. *त्यांच्या मतें अति* असत्य, अति जल्पना दोष आहे;: म्हणजेच थोडेंसें असत्य, थोडीशी बढाई दोष नाहीं.

३० दांभिक कसें वागत असत — दांभिक कसें वागत असत हें हनुमान-कालनेमी संवादांत *कपटमुनि बनलेल्या कालनेमीच्या शब्दांनीं दाखविलें आहे.* कपटमुनि वेषांतील कालनेमी म्हणतो, ' चालू रावण राम महारण । जिंकिति रामहि संशय यांत न ॥ ५ ॥ इथें बसुनि मी सगळें पाहें । ज्ञानदृष्टिबल मज बहु आहे ॥ ६ ॥ जल मागतां कमंडलु देतों । म्हणे कपि न मज पुरेल हें तों ॥ ७ ॥ सरीं शीघ्र या करुनी स्नाना । दीक्षा देउं किं पाना ज्ञाना ॥ ८ ॥ (गू. चं. पाहा.) तत्कालीन दांभिक गुरूंचें हें शब्दचित्र आहे. असे लोक प्रवचनांत, कीर्तनांत, प्रथम भेटींतील संभाषणांत आपल्या मुखानें आपल्या विशेष सामर्थ्याची वगैरे प्रशंसा करतात.

३१ दुर्जन काय करीत असत — ' मोहें द्रोह परावा करती । संतसंग हरिकथा न रुचती ॥ अवगुणसिंधु मंदमति कामी ॥ श्रुतिदूषक परवित्तस्वामी ॥ ७ ॥ विप्रद्रोह परांहुनि भारी । दंभ कपट हृदिं, सुवेषधारी ॥ दो० ॥ असे मनुज खल अधम, युगीं कृत नी त्रेता नाहिं ॥ द्वापरिं होतिल कांहिं, बहु वृंद चि कलीयुगांहि ॥ (७।४०) हीं वचनें असंतलक्षणांत श्रीरघुनाथांनीं भरतास सांगितलीं आहेत.

सूचना (१) गूढार्थचंद्रिकेंतील थोडथोडे नमुनेच येथें दिले आहेत. याप्रमाणें मानसांत निरीक्षण करावें, म्हणजे आणखी पुष्कळ माहिती बाहेर पडेल.

(२) मानसांतील कांहीं वचनांमुळें श्रीतुलसीदासांची निंदा केली जाते म्हणून पुढील ' श्रीतुलसीदास व नारीवर्ग ' हें प्रकरण लिहावें लागलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १।५ 卐 卐 卐

श्रीतुलसीदास व नारीवर्ग

प्रास्ताविक — पाश्चात्य भाषारूपी *वाघिणीचें दूध* (चिपळूणकरांचा निबंध पाहा) ज्यांस पचलें नाहीं आणि जे त्या विद्यावारुणीपानानें अंध झाले असे, आपणांस सुशिक्षित व स्त्री-दाक्षिण्यवादी म्हणविणारे उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं पदवीधर व कांहीं अर्धवट सुशिक्षित स्त्रिया, सर्व विकारहीन, अतिदीन, परम नम्र, महाभगवद्भक्त व महाकविकुलचूडामणि श्रीतुलसीदासांवर आरोप करतात कीं तुलसीदास नारीवर्गनिंदक

आहेत! या आक्षेपाचें उत्तर एका आंग्ल कवीच्या शब्दांत प्रथमच देणें चांगलें.

Little knowledge is a dangerous thing!
Drink deep or taste not the Pierion spring.
Knowledge says I know so much,
Wisdom says I know no more.

Wisdom = शहाणपणा. शहाणपणा न मिळवितांच शिकलेले व आपणांस विद्वान समजणारेच तसा आरोप करतील.

(क) वरच्यासारखा आरोप करणारांनीं एक तर श्रीमानस सादर श्रवण केलें नसावें; किंवा विवेकभ्रष्ट न होतां वाचलें नसावें असें वाटतें. ज्या वचनांवरून हा आरोप केला जातो तीं वचनें दोनच आहेत. अरण्यकांडांत शूर्पणखावर्णनांतील वचन व शरण आलेल्या सागरानें उच्चारलेलें एक वाक्य. (ख) या विषयावर हिंदींत नारी-अंक (गी. प्रे. गोरखपूर) आणि 'कल्याण' चे अंक यांत कांहीं पदवीधरांनीं व पदवीधारिणी विदुषींनीं व इतरांनीं सत्य स्थितीचें निदर्शन करून वरील आरोपाची योग्य ती वासलात कधींच लावली आहे. या अंकांपैकीं एकहि अंक जवळ नाहीं. (ग) भविष्यकाळीं महाराष्ट्रांत अज्ञानानें वा अर्धवट जाणल्यानें वरच्यासारखा गैर-समज उत्पन्न होऊन *संतनिंदेचें पातक लोकांच्या पदरांत*–खिशांत–*पडूं नये म्हणून* गू. चं. सारख्या मोठ्या टीकेच्या प्रस्तावनेंत त्या आक्षेपाचें खंडन करणें क्रमप्राप्त कर्तव्य वाटतें. 'वातभूतवश जे मदमस्त। ते बोल अविचारें ग्रस्त॥ तिहिं कृत महामोह-मद-पाना। त्यांचे शब्द न घेणें कानां। (१।११५।७–८) हें शिववचन जरी खरें असलें तरी वरील तिरप्या टाइपांतील शब्दांनीं दाखविलेल्या हेतूस्तव लिहिणें भाग आहे. म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ सोकावतो म्हणूनहि लिहावें लागत आहे.

१ मुख्य वचन (३।१७।३-९) — शूर्पणखा जी *रावणभगिनी* / दुष्टहृदय दारुण जशि अहिनी॥ ३॥ पंचवटिस एके दिनिं आली। बघुनि कुमारां विकल जहाली॥ ४॥ *भ्राता पिता पुत्र उरगारी!। पुरुष मनोहर निरखत नारी॥ ५॥ होइ विकल नावरूं शके मन / जसा द्रवे रविमाणि रवि पाहुन*॥ ६॥ रुचिर रूप धरि ये प्रभुपासी। स्मित बहु करुनि वदे वचनासीं॥ ७॥ पुरुष तुम्हांसम ना स्त्री मजसम। विधि विचारिं रचि हा योगोत्तम॥ ८॥ मम अनुरूप पुरुष बघतांही। शोधुन लोकत्रयांत नाहीं॥ ९॥

(१) यांतील क्रमांक ५।६ च्या दोन चौपाया हा या आक्षेपकांचा बालेकिल्ला आहे. संदर्भाकडे पाहिल्यानंतर कोणीहि विचारवंत माणूस हेंच म्हणेल कीं शूर्पणखेसारख्या दारुण, दुष्टहृदयी, रावणाची बहीण शोभणाऱ्या कपटी कुटिल कुलटांच्या व्यभि-चारिणींच्या स्वभावाचें हें चित्र आहे.

(२) असत्यवादी, अतिक्रूर, दुष्टहृदयी राक्षसीण असून, *विधवा असून*, कपटी सुंदरी तरुणी बनून रामचंद्राजवळ वरच्यासारखी प्रणयप्रार्थना करीत आहे! (क) त्या

दोन चौपायांतील सिद्धान्ताचे जनक तुलसीदास नसून संस्कृत भाषेंतील श्लोकांतील अश्लीलता कमी केलेलें त्यांचें सार त्यांत आहे. अश्लीलताप्रिय असतील त्यांनीं मा. पी. मध्यें मूळ श्लोक पाहावेत.

(३) या आक्षेपकांना माहीत नसावें कीं ' मानस ' महाकाव्य आहे. **महाकाव्यांत असती = व्यभिचारिणी स्त्रियांच्या स्वभावाचें अद्भुत वर्णन असलें पाहिजे असा नियम** साहित्यदर्पणांत दिसला नाहीं तरी **अग्निपुराणांत आहे.** अल्पज्ञान, अर्धवट ज्ञान फार भयंकर वस्तु आहे ! (क) अग्निपुराण अध्याय ३३७ मध्यें महाकाव्य लक्षणांत म्हटलें आहे. ' नगरार्णवशैलर्तु चंद्रार्काश्रमपादपैः ॥ २९ ॥ उद्यानसलिल-क्रीडामधुपानरतोत्सवैः ॥ दूतीवचनविन्यासैर*सतीचरिताद्भुतैः* ॥ ३० ॥ कोणत्या विषयांचें अद्भुत वर्णन महाकाव्यांत असावें हें वरील श्लोकांत सांगितलें आहे; त्यांत *अद्भुत असतीचरित्र* हा एक विषय आहे. हाच विषय शूर्पणखाचरित्रानें मानसांत वर्णिला आहे. एवढें एकच असतीचरित्र मानसांत आहे. असतीस्वभावाची अद्भुत विशेषताच त्या दोन निंद्य समजल्या जाणाऱ्या चौपायांत सांगितली आहे !

(४) सतीनें शंकराशीं कपट केलें; कैकयीनें दशरथाशीं कपट केलें असलें तरी त्यांना असती म्हटलें नाहीं; सतीच म्हटलें आहे. पुनीत कौसल्या देवी, पतिप्रेमपुनीता सीता, मंदाकिनीला भूतलावर आणणारी श्रीदत्तात्रेयजननी अनसूया, सीतामाता होण्यास लायक असणारी वरवर्णिनी सुनयना, दानवकन्या व रावण पट्टराणी मंदोदरी, सुमित्रा, पतिव्रताशिरोमणि पार्वती, तारा, इत्यादि कोणातरी नारीला असती ठर-विली आहे काय ? अति दुष्ट ताटकेलासुद्धां असती ठरविलेली नाहीं. (क) श्रीराम-कथेसाठीं अग्निपुराणाची अनुक्रमणिका पाहात असतां महाकाव्यलक्षणें हें शीर्षक दिसलें व सहज अध्याय ३३७ वा पाहिला तों **आजपर्यंत कोणींहि पुढें न आणलेला अत्यंत प्रबल पुरावा तेथें सांपडला !** अग्निपुराणांतील या पुराव्यानंतर इतर चर्चेची जरुरी नाहीं.

२ दुसरें वचन — ' ढोल गवार शूद्र पशु नारी । हें सब ताडनास अधिकारी ' ॥ (५।५९।६) मी जड आहें वगैरे सांगणाऱ्या विप्ररूपानें शरण आलेल्या सागराचें हें वचन आहे. ही चौपाई एक तेजस्वी तलवार आहे असें आक्षेपकांस वाटतें.

(१) ढोल, गवार, शूद्र, पशु आणि नारी, ताडनास अधिकारी आहेत असा अयोग्य अर्थ घेतला तरीसुद्धां तुलसीदास नारीनिंदक ठरत नाहींत. (क) स्त्रियांना पशूंच्या दावणींत कां घातल्या असा आक्षेप असेल तर त्या आक्षेपकांनीं असा आक्षेप घेणें जरूर आहे कीं संतांना विटप, सरिता, गिरि, धरणी यांच्या पंक्तींत कां बसविलें ? ' संत विटप सरिता गिरि धरणी । सर्वांची परहितार्थ करणी ॥ ' पण असा आक्षेप कोणी घेत नाहींत. (ख) नारी-कैवारी मंडळीस त्याच चौपाईतला शूद्र शब्द दिसला नसावा ! अन्यथा दुधारी तलवार त्यांच्या हातीं आली असती. ' Frailty, thy

name is woman' हें शेक्स्पीअरचें नारीनिंदक वचन वरील आक्षेपकांस दिसलें नसावें. (ग) '*ताडनास अधिकारी*' —याचा अर्थ रोज ताडन करावें असा घेत असतील तर त्यांस वेड लागलें आहे असें म्हणावें लागेल ! 'ताडन करावें' असें म्हटलें नसून 'ताडनास अधिकारी' इतकेंच म्हटलें. ताडन करावें अशा अर्थाचें वचन पाहा—'लालयेत् पंचवर्षाणि *दशवर्षाणि ताडयेत्।* प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्' पांच वर्षांचा होईपर्यंत पुत्राचे लाड करावेत; पुढें दहा वर्षे त्याला ताडन करावें व सोळावें वर्ष लागलें कीं त्याच्याशीं मित्राप्रमाणें वागावें; असा वरील सुभाषिताचा अर्थ आहे. दहा वर्षे ताडन करावें असें स्पष्ट म्हटलें असतांसुद्धां त्याचा अर्थ अन्नपाण्याप्रमाणें रोज मार द्यावा असा घेतील तेच ताडनास अधिकारी ठरतील ! मग या चौपाईतील 'ताडनास अधिकारी' चा अर्थ तर फारच सौम्य आहे. (घ) अज्ञानामुळें, हित-अहित कळत नसल्यानें दादा बाबा करून भागत नसेल तर ताडन करण्यास हरकत नाहीं इतकाच वरील मानसवचनाचा अर्थ आहे.

(२) ढोल, गवार = अडाणी मनुष्य, शूद्र, पशु आणि नारी असा अर्थ घेणें योग्य नाहीं. सर्वच शूद्र आणि सर्व नारी ताडनास अधिकारी असतील असें नाहीं; म्हणून ढोल, गवार, शूद्रपशु, पशु आणि पशुनारी असा अन्वय करणें जरूर आहे. पशूप्रमाणें वागणारा शूद्र व पशूसारखें वर्तन करणारी स्त्री यांस अशा वेळीं ताडन करणें योग्य आहे असाच अर्थ आहे.

(३) स्त्रीस्वभावांतील साहस, अनृत, चपलता, माया इत्यादि आठ दोषांचें रावणानें मंदोदरीला उद्देशून केलेलें वर्णन नवीन नसून 'अनृतं साहसं माया'— या श्लोकाला सुभाषितसंग्रहांत मानाचें पान आधींच मिळालेलें आहे, म्हणून तें वचन विचारांत घेण्याची आवश्यकता नाहीं; आतां **दुसरी बाजू पाहा व उत्तर द्या !**

ही दुसरी बाजूसुद्धां कोणीं प्रकाशांत आणलेली स्मरणांत नाहीं.

(१) साहस, माया, अनृत, चपलता। भय, अविवेक, अशौच, अदयता ॥ हे स्त्रियांचे स्वभावगुण कवींनीं वर्णिले आहेत ते खोटे नाहींत असें म्हणून ज्या रावणानें मंदोदरीचा हितोपदेश धुडकावून लावला, ती मंदोदरी रावणाला, खद्योत व रघुपतीला दिनकर म्हणाली, तरी रावणासारख्याच्या मुखांत ज्या कवीनें एकहि अपशब्द घातला नाहीं तो कवि नारीवर्गनिंदक कीं स्त्रीदाक्षिण्यवादी ?

(२) रावणासारख्या महादुष्टशिरोमणि, त्रैलोक्य-विजयी वीराला त्याच्या तोंडावर मंदोदरी नीच, पुरुषार्थहीन म्हणजे नामर्द, निर्लज्ज, म्हणाली तरीसुद्धां रावणाकडून मंदोदरीला ताडन करविलें नाहीं कीं एक वाकडा शब्द त्याच्या मुखांत घातला नाहीं हें नारीनिन्दक कवि करूं शकेल काय ?

(३) सतीनें शंकरापाशीं कपट केलें, धडधडीत असत्य बोलली तरी क्रोधमूर्ति रुद्र तिला कांहींहि दोष देत नाहींत किंवा तिच्यावर जरासुद्धां रागावले नाहींत; हें

नारीनिंदक कवि करूं शकला असता काय ? नारी ताडनास अधिकारी म्हणणाऱ्या कवीकडून हें कसें लिहिलें गेलें ?

(४) ज्या कैकयीनें धडधडीत विश्वासघात करून कपटानें गळा कापला त्या कैकयीवर वाल्मीकीचे दशरथ पुष्कळ रागावले आहेत व तिला *अपशब्दांनीं ताडनहि केलें आहे;* पण मानसांतील दशरथ जरासुद्धां न रागावतां सर्व दोष आपल्याच कर्माला देतात ! हें नारीवर्गाचा आदर राखल्याचें चिन्ह कीं नारीनिन्दक कवीची निन्द्य कृति ?

(५) सर्व देव ब्राह्मण रूपानें येऊन रघुवीरविवाह पाहात ब्राह्मण-वर्गांत बसले असतां जनक राजानें त्यांना ओळखलें नाहीं पण ईश्वरभावनेनें त्यांची पूजा एकदांच केली. (बाल. ६–८ पाहा) पण — स्त्रीवेषीं ज्या सुरवररामा। सहज सुंदरी सगळ्या श्यामा ॥ त्यां देखुनि सुख पावति नारी। प्राण-प्रिय परिचयविण भारी ॥ *पुनःपुन्हां राण्या सन्मानीति। सम-शारदा-रमोमा मानिति ॥* (१।३२२।५–७) गुप्त रूपानें आलेल्या देवस्त्रियांना जनकाच्या राण्यांनींहि ओळखलें नाहीं; तरीसुद्धां उमा-रमा-शारदांच्या समान मानून त्यांचा पुनःपुन्हां त्यांनीं सन्मान केला.

(क) ब्राह्मण पुरुषरूपानें आलेल्या *देवांचा सन्मान एकदांच कराविला,* पण ज्या कवीनें क्षत्रिय स्त्रियांच्या रूपांत असलेल्या *देवस्त्रियांचा सन्मान अनेक वेळां कराविला तो कवि नारीनिंदक कीं हे आक्षेपक संतनिंदक?* नारीनिंदक कवीची लेखणी असें करूं शकेल काय ?

(६) भरतादि सर्व अयोध्यावासी चित्रकूटास गेल्यावर मानस *कवि तुलसीचे राम-लक्ष्मण* सर्व मातांच्या आधीं कैकयीस भेटले व सर्वांच्या शेवटीं कौसल्येला भेटले. माता चित्रकूटाहून परत जाण्यास निघाल्या तेव्हां रघुनाथानें प्रथम कैकयीला पालखींत बसविलें आणि शेवटीं कौसल्येला. अयोध्येंत परत आल्यावर तुलसींचे रघुनाथ प्रथम कैकयीच्या महालांत गेले; व मग स्वतःच्या वाड्यांत गेले. हें नारीनिंदक कवीला करतां येईल काय ? नारीनिंदक कवीच्या ठिकाणीं असें परमउदार चरित्रचित्रण करण्याची बुद्धि व इच्छा तरि असूं शकेल काय ?

(७) स्त्रियांना अबला म्हणणाऱ्या कवीनेंच त्यांचा प्रभाव किती अगाध वर्णिला आहे पाहा — 'मुनि ते ज्ञाननिधान मृगनयनी विधुमुख बघुनि। विवश होति हरियान ! नारि विष्णुमाया प्रगट' (७।११५ म) परमविरागी ज्ञाननिधान मुनीसुद्धां शशिमुखी मृगाक्षींना पाहून त्यांना वश होतात. हें वर्णन स्त्रीवर्गाची निंदा करणारें आहे कीं पुरुषवर्गाची दुर्बलता, कमकुवतपणा दाखविणारें आहे ? नारीनिंदक कवीच्या हातांना असें लिहितां आलें असतें काय ?

(८) **अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें मानसांत आहेत** पण *'थोडक्यांत उमजे सुज्ञांना'* **वाल्मीकि रामायणांतील नमुना पाहा.**

सीता रामचंद्राबरोबर वनवासांत आलेली पाहून, प्रसन्न होऊन, अगस्ति (वाल्मीकि रामायणांतले हो !) रामास म्हणाले ' दुष्करं कृतवत्येषा वने त्वामनुगच्छती '। आतां वाल्मीकींचे अगस्ति सर्व नारीवर्गाचा स्वभाव सांगतात तो ऐका आणि त्यावरून ठरवा कीं तुलसीदासजी नारीवर्गनिंदक आहेत काय ? (वा. रा. अरण्य. १३।४–६) ' एषाहि प्रकृतिः स्त्रीणामासृष्टे रघुनन्दन । समस्थमनुरज्यन्ति विषमस्थं त्यजन्ति च ॥ ५ ॥ शतन्हदानां लोलत्वं शस्त्राणां तीक्ष्णतां तथा । गरुडानिलयोः शैघ्र्यमनुगच्छन्ति योषितः ॥ ६ ॥ अर्थ — हे रघुनन्दना, सृष्टीच्या आरंभापासून स्त्रीजातीचा हा स्वभाव आहे कीं सुखांत असेपर्यंत त्या पुरुषावर (पतीवर) प्रेम करतात–अनुरक्त असतात; पण विपत्तींत त्याला सोडतात. विजांचा चंचलपणा, शस्त्रांची तीक्ष्णता व गरुड आणि वारा यांची शीघ्रता (वेग, गति) यांचें अनुकरण स्त्रिया करतात. याहीपेक्षां अधिक कटु कठोर वचनें वा. रा.मध्यें पुष्कळ आहेत. असें असतां वाल्मीकींना नारीवर्गनिंदक ही पदवी आक्षेपक पदवीधर कां देत नाहींत ? कां त्यांना संस्कृत येत नाहीं ? वाल्मीकी-सुद्धां नारीवर्गनिंदक नाहींतच.

शुकरंभा-संवादांत शुक स्त्रियांविषयीं काय म्हणतात तें जरा कान टवकारून ऐका — " मायाकरण्डी नरकस्य हंडी तपोविखंडी सुकृतस्य भंडी । नृणां विखंडी चिरसेविता चेद् वृथा गतं तस्य नरस्य जीवितम् ॥२५॥ समाधिहंत्री जनमोहयित्री धर्मे कुमंत्री कपटस्य तंत्री । सत्कर्महंत्री कलिता च येन वृथा गतं तस्य नरस्य जीवितम् ॥२७॥ चिंताव्यथादुःखमयी सदोषा संसारपाशा जनमोहकर्त्री । संतापकोशा भजिता च येन वृथा गतं... ॥२९॥ कापट्यवेषा जनवंचिका सा विण्मूत्रदुर्गन्धदरी दुराशा ॥ संसेविता येन सदा मलाढ्या वृथा गतं...॥३१॥ उन्मत्तवेषा मदिरासुमत्ता पापप्रदा लोकविडंबनीया । योगच्छला येन विभाविता सा वृथा गतं...॥३३॥ अशौचदेहा पतितस्वभावा वपुःप्रभावा बललोभशीला । मृषावदन्ती कलिताच येन *वृथा गतं तस्य नरस्य जीवितम्* ॥३५॥ याचा अर्थ देणें बरें वाटत नाहीं.

श्रीशुकाचार्यांनीं स्त्रीशरिराचें व स्त्रीस्वभावाचें वगैरे केलेलें हें वर्णन पाहावें आणि भगवत्प्रिय परमात्मस्वरूप तुलसीदासांसारख्या संतांची निंदा करण्याचें सोडून आक्षेपकांनीं स्त्रियांची संगति सोडावी तरच ' वृथा गतं तस्य नरस्य जीवितम् ' अशांमध्यें गणना होणार नाहीं.

उपनिषदांतसुद्धां स्त्रीस्वभावाचें व प्रभावाचें वर्णन आहे. नमुना म्हणून याज्ञवल्क्योपनिषद् श्लोक ५ पासून १३ पर्यंत मुद्दाम पाहण्यासारखे आहेत.

सार हें आहे कीं श्रीरामचरितमानसांत श्रीगोस्वामींवर दोषारोप करण्यासारखें एकहि स्थान नाहींच नाहीं; पण वा. रा.तील वर्णन किंवा शुकरंभासंवादांतील वर्णन-सुद्धां नारीनिन्दा नाहीं. स्त्रियांच्या पाशांत बद्ध होऊन पुरुषांनीं पशूंहून हीन बनून मनुष्यदेहाचा दुरुपयोग करून, जीवित वृथा घालवून, ईश्वराशीं कृतघ्न होऊं नये या

सद्धेतूनेंच स्त्रीदेह व स्त्रीस्वभावादिकांचें वर्णन सद्ग्रंथांत केलेलें असतें.

गूढार्थचंद्रिकेंत लिहिलें आहे कीं स्त्रियांनीं वैराग्यशील बनून, मुलाबाळांचा, पतीचा त्याग करून वनांत निघून जावें असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं पुरुषांची कठोरता, स्वार्थी वृत्ति, संशयीपणा, निष्ठुरता, अरेरावी, स्त्रीदुःखशीतलता, हुकूमशाही, अविश्वासूपणा इत्यादि हजारों दोषांचें भडक वर्णन करून, तें कन्याशाळांतून बालवर्गापासून शिकविण्यास प्रारंभ करावा; पण *आधीं केलें मग सांगितलें या न्यायानें स्वतःच्या घरांत आधीं हा प्रयोग करावा* व तो स्त्रियांस, पुरुषांस, समाजास व देशास किती सुखकारक व हितावह होतो हें ठरवावें. अन्यथा हलवायाच्या घरावर तुलसीपत्र ठेवणारे समाज-देश-धर्म-सेवक काय थोडे आहेत!

जय जय तुलसीदास लोकहितकारी ॥ जय जय तुलसीदास विश्वसुखकारी ॥

◆◆◆◆

२ : प्रस्तावना-लेखकाचें अल्प निवेदन

कोणताहि ग्रंथ प्रकाशित करतांना त्या ग्रंथारंभीं त्या ग्रंथाचें वैशिष्ट्य सांगून ग्रंथांतील विषयांचें थोडक्यांत सार काढून दाखविणें हें वाचकांच्या सोईच्या दृष्टीनें आवश्यक असतें. हें ध्येय प्रस्तावनेंत साधतात. याच कारणासाठीं ही गूढार्थचंद्रिका-टीका-प्रस्तावना लिहिली गेली आहे.

आधुनिक पद्धति —अलीकडे बरींच वर्षें अशी एक पद्धति प्रचलित झाली आहे कीं, ग्रंथ-लेखकापेक्षां अधिक विद्वान् व लोकविख्यात लेखकाची प्रस्तावना नवीन ग्रंथास जोडलेली असते. या पद्धतींतील हेतूंचा विचार स्पष्ट करण्याचें हें स्थान नाहीं. या लेखकाची प्रसिद्धि लोकांत नाहीं; व ती होऊं न देणें ही गोष्ट लेखकाच्या हिताच्या दृष्टीनें जरी सत्य असली तरी ग्रंथाचा प्रचार लोकांत लवकर होण्याच्या दृष्टीनें अन्य विख्यात लेखकाची प्रस्तावना असणें सद्यःकालीन व्यावहारिक परिस्थितीस सोडून नाहीं. गूढार्थचंद्रिकेसारख्या अवाढव्य ग्रंथाचा प्रसार लेखकाच्या जीवनकाळांत होणें अशक्यवत् वाटतें म्हणून पुढील प्रस्तावना गूढार्थ-चंद्रिकालेखकानेंच लिहिली आहे.

पुढील प्रस्तावना स्वतंत्र ग्रंथाची नसून जगविख्यात संतमहाकवि श्रीमद्गोस्वामी तुलसीदासांच्या श्रीरामचरितमानस (मराठी) ग्रंथावरील गूढार्थचंद्रिका या टीका-ग्रंथाची आहे. टीकाग्रंथाची प्रस्तावना लिहिणारा लेखक मूळ ग्रंथाचें उत्तम परिशीलन केलेला काव्यरसज्ञ असावा लागतो; व त्या टीकाग्रंथाचें सूक्ष्म अवलोकन करून त्याचें सांगोपांग सार काढावें लागतें. महाराष्ट्र व मराठी भाषा यांना विद्वान् लेखकांचा व सखोल परिशीलन करणारांचा तुटवडा कधींच पडला नाहीं; व वर्तमानकाळींहि श्रीतुलसीरामायणाचे भक्त, प्रगाढ व्यासंगी, चतुरस्र विद्वान्, लेखक महाराष्ट्रांत नसतील असें नाहीं. या लेखकापेक्षां शतपटीनें विद्वान, प्रसिद्ध, लोकप्रिय लेखक महाराष्ट्रांत आहेत.

तथापि प्रस्तावनालेखनाच्या दृष्टीनें, एवढ्या अवाढव्य नवीन टीकेचा अभ्यास करून प्रस्तावना लिहिण्यास लागणारा वेळ कोणास कसा मिळणार ! ज्यानें गूढार्थ-चंद्रिका टीका लिहिली त्यालाच सर्व टीका नुसती धावत्या नजरेनें अवलोकन करून, रोज १५ तास लेखन-वाचन-मननादि करून प्रस्तावनालेखन संपविण्यास पक्के सहा महिने लागले. हा लेखक कांहीं काम नसलेला, सदा रिकामा-रिकामटेकडा, म्हणून इतका काळ खर्च करूं शकला. हल्लींच्या तीव्र जीवनकलहाच्या काळांत इतका वेळ खर्चण्याची भीड कोणास घालणें जिवावर आलें म्हणून ही प्रस्तावना गूढार्थचंद्रिका—लेखकासच लिहावी लागली.

गूढार्थचंद्रिकाटीकेएवढी विस्तृत टीका मराठी भाषेंत कोणत्याहि ग्रंथावर आज-पर्यंत झालेली नाहीं. तुलसीरामायणावरसुद्धां कोणाहि एका टीकालेखकाची एवढी

विस्तृत टीका नाहीं. आजपर्यंतच्या तुलसीरामायणटीकांचें संकलन केलेली मानस-पीयूष नांवाची बृहत्कोषवजा टीका या टीकेच्या दुप्पट आकारापेक्षां थोडी मोठी आहे !

प्रस्तावनालेखन फार किचकट कार्य आहे व त्यामुळें, टीकालेखनांत जसा प्रत्यहीं नवीन व अधिक आनंद मिळत गेला तसा, प्रस्तावनालेखनांत मिळेल अशी मुळींच आशा व कल्पना नव्हती. पण प्रत्यक्ष अनुभव मात्र अगदीं उलट आला. श्रीगोस्वामींच्या अद्‌भुत काव्यकलेंतील नवे नवे अनेक अपूर्व शोध लागले, व त्यामुळें आनंदसागरास भरतीच येत गेली.

प्रस्तावनेंत ध्येय — टीका लिहितांना जें ध्येय दृष्टीपुढें ठेवलें होतें तेंच ध्येय प्रस्तावनालेखनांत पुढें ठेवलेलें आहे. टीकालेखकाची विद्वत्ता किंवा टीकालेखन-कौशल्याचें प्रदर्शन करणें हा हेतु नसून, **श्रीमद् गोस्वामींच्या अद्‌भुत, अपूर्व व वैचित्र्यपूर्ण ग्रंथाचें अंतरंग विविध प्रकारांनीं व विविध अंगांनीं वाचकांच्या दृष्टि-पथांत आणणें हा मुख्य हेतु आहे.** यामुळें प्रस्तावनेंतील ११/१२ भाग याच ध्येयाच्या सिद्धीसाठीं लिहिला गेला आहे व १/१२ पेक्षां थोडा कमी भागच टीकाविषयक लिहिला गेला आहे. पुढील १४ मुख्य प्रकरणांपैकीं याच्या पुढलें एकच प्रकरण टीकेविषयीं आहे व शेवटच्या प्रकरणांत गूढार्थचंद्रिका-टीका वाचकांच्या सोईसाठीं अनेक सूची वगैरे आहेत.

गद्य लेखनाची आवड प्रथमपासूनच कमी असल्यानें व तो व्यासंगही नसल्यानें प्रस्तावनेंतील व गूढार्थ-चंद्रिका **भाषा** सर्वच **वाचकांच्या समाधानास** व **आदरास पात्र होण्याचा संभव फार कमी.** तशांतही गेलीं २५ वर्षें वर्तमानपत्रें व आधुनिक मराठी ग्रंथ यांचा संबंध नसल्यामुळें भाषा कदाचित जुनी पुराणी वाटेल; पण त्याला कांहीं इलाज नाहीं. टीका व प्रस्तावनालेखन श्रीरघुनाथसेवा या भावनेनेंच, प्रारब्ध-कर्माच्या प्रवाहांत सांपडून केलें गेलें असल्यानें 'वेडें वांकुडें गाईन परी तुझा म्हणवीन' या भूमिकेवरूनच झालें आहे. प्रस्तावनेंतील मुख्य व पोटविषयांची विस्तृत अनुक्रमणिका प्रारंभींच दिली असल्यानें प्रस्तावनेचा सारांश पुन्हां येथें देऊन पिष्टपेषण करण्याची आवश्यकता नाहीं.

प्रस्तावनेंतील विविध विषयांच्या विवेचनांत श्रीरामचरितमानसांतील अवतरणें वारंवार आलीं असल्यानें व मराठी वाचकांस चौपाई, छंद, सोरठा व दोहा या वृत्तांचा विशेष परिचय नसल्यानें, प्रस्तावना वाचतांना रसभंग होणें साहजिक आहे हें जाणून या वृत्तांचीं लक्षणें व उदाहरणें पुढील मुख्य प्रकरणांत शक्य तितकीं जवळ घातलीं आहेत. वास्तविक पाहतां तें त्यांचें योग्य स्थान नाहीं; पण उपयुक्तता व सुकरता यांचा विचार मुख्य आहे. हिंदी भाषेंतील त्या वृत्तांची माहिती दिल्यामुळें इतर परिचित वृत्तांचीं लक्षणेंहि त्यांच्या पाठोपाठ देणें क्रमप्राप्त झालें.

प्रस्तावनेचा विस्तार टीकेच्या १/१२ एवढा भरेल असें वाटतें. कोणी वाचक

म्हणतील कीं ही प्रस्तावना फार लांबलचक झाली. कोणी काव्यरसज्ञ व तुलसीकाव्य-मर्मज्ञ म्हणतील कीं प्रस्तावना त्रोटक झाली. एकच प्रस्तावना भिन्नरुचि व भिन्न दर्जाच्या वाचकांच्या आकांक्षा पुरवूं शकणें अशक्य.

हीच प्रस्तावना हिंदी वाचकांसाठीं लिहिली असती तर $\frac{3}{8}$ विस्तार कमी झाला असता. प्रत्येक अवतरणाचा स्थाननिर्देश व पूर्वापर संदर्भ जसा या प्रस्तावनेंत द्यावा लागला तसा हिंदी प्रस्तावनेंत द्यावा लागला नसता. मराठी वाचकांचा तुलसी-रामायणाचा व्यासंग व परिचय अगदींच स्वल्प किंवा नसल्यासारखाच असल्यानें विषयग्रहण करण्यास लागणारा कमींत कमी संदर्भ द्यावाच लागला.

सात कांडें सात सोपान — सात कांडें हे रामभक्तिप्राप्तीचे किंवा रामचरितमानस-रूपी मानस सरोवराचे सात सोपान असल्याचें वर्णन मानसांतच आहे. त्यामुळें तुलसी-रामायणांतील सर्व मुख्य विषय व महाकाव्याचीं मुख्य लक्षणें प्रत्येक काण्डांत कशीं आहेत हें दाखविणें भाग पडलें व त्यामुळेंहि प्रस्तावनेचा विस्तार दुपटीपेक्षां जास्त झाला आहे. (क) हिंदी टीकाकारांपैकीं कोणींहि इकडे लक्ष न दिल्यानें पुढें मागें किंवा ही टीका व प्रस्तावना मराठींत प्रकाशित होण्यापूर्वींसुद्धां हिचा हिंदी अनुवाद होऊन हिंदींत आधीं प्रकाशित होण्याचाहि संभव नाहीं असें नाहीं; म्हणून सात सोपान हे नांवाप्रमाणें स्वतंत्र कसे आहेत हा अभूतपूर्व शोध प्रत्येक मुख्य विषयाचीं अवतरणें देऊन काण्डशः सिद्ध करावा लागला. या व अशा अनेक कारणांमुळें प्रस्ता-वनेचा विस्तार अपेक्षेपेक्षां थोडा जास्त झाला आहे.

मात्र इतका पूर्ण विश्वास आहे कीं *मानसाभ्यासी वाचकांस* ही प्रस्तावना वाचतांना कंटाळा तर नाहींच येणार पण प्रत्येक लहानसें प्रकरणसुद्धां त्यांच्या आनंदांत व उत्साहांत भरच टाकील, आणि त्यांस क्षणोक्षणीं आश्चर्यचकित करील, यांत लेशमात्र संदेह नाहीं.

ही टीका मराठी भाषेंत प्रसिद्ध होण्यापूर्वींच हिंदींत कदाचित प्रकाशित झाली तरी त्यांत महाराष्ट्राचा किंवा मराठी वाचकांचा कांहींच दोष नाहीं. हिंदींत अनुवाद करून पाठवा असें एका मानस-प्रकाशन संस्थेचें पत्रहि आलें आहे; पण ज्या प्रकारचें भाषांतर हिंदींत व्हावयास पाहिजे त्या प्रकारचें हिंदी भाषेवरील प्रभुत्व या लेखकाच्या बुद्धींत नाहीं. जेथें संवाद आहेत तेथें मराठी टीकेंत खाजगी घरगुती संवादांची भाषा वापरली असल्यानें **हिंदी घरगुती बोलभाषेंतच त्या भागांचें भाषांतर होणें आवश्यक आहे, व या लेखकाचें तें ज्ञान अगदीं शून्य !** शिवाय गेलीं कित्येक वर्षें सतत लेखनांतच गेल्यानें नेत्रहि बिचारे सत्याग्रह करूं लागले व आतां उजवा हातहि त्यांना सामील होऊं लागला आहे. त्यामुळें हिंदी भाषांतर या हातांनीं लिहिलें जाणें अशक्य वाटतें.

श्रीतुलसीदासांच्या रामायणाचें वैशिष्ट्य — श्रीरामचरितमानस (मराठी) प्रथमावृत्तींत श्रीतुलसीदासांचें चरित्र व लेखकाचें अल्प निवेदन या प्रकरणांत दाखविलें

आहे तसें प्रस्तावनेंतसुद्धां नुसत्या शब्दांनीं सांगतां आलें असतें; पण तो मार्ग न पत्करतां तुलसीदासांची अपूर्वता प्रत्यक्ष उदाहरणांनींच दाखविण्याचा मार्ग पुढील प्रस्तावनेंत आक्रमिला आहे. तथापि त्याविषयीं थोडें तरी लिहिणें जरूर आहे.

नाट्यमहाकाव्य — श्रीतुलसीरामायण हें नाटयमहाकाव्य आहे. **अशा प्रकारचा** ग्रंथ जगांतील कोणत्याही भाषेंत नाहीं. संपूर्ण ग्रंथ महाकाव्य व नाटयमय आहे हें आश्चर्य असलें तरी प्रत्येक काण्ड हें एक स्वतंत्र नाटयमहाकाव्य आहे! हें विशेषच आश्चर्य आहे. *चार हजार ओळींच्या बालकाण्डांत जे मुख्य विषय आहेत ते सर्व व सर्व महाकाव्यलक्षणें ३१० ओळींच्या सर्वांत लहान असलेल्या किष्किंधा काण्डांतसुद्धां आहेत.*

सर्वांगसुंदर, पूर्ण निर्दोष, अनुपम, अद्वितीय काव्य आहे — एकही अश्लील शब्द नाहीं, स्त्रियांच्या अवयवांचें वर्णन न करतां रूपाचें रमणीय **वर्णन** करण्याची कला अद्‌भुत आहे. तुलसीदासांच्या लेखणीनें कोणाहि सज्जनांची किंवा मोठ्यांची निंदा लिहिली नाहीं. जिथें जिथें अशी निंदा प्रगट दिसते तिथें तिथें व्याजस्तुति-अलंकार आहे. नाटय असल्यानें लांबलचक वर्णनें, भाषणें युद्धवर्णनांतसुद्धां नाहींत!

साहित्यशास्त्र — कथित शंभर मुख्य अलंकार व त्यांचे पोटभेद यांचीं उदाहरणें मानसांत आहेत, हिंदी लेखकांनीं स्वतंत्र ग्रंथांत तीं लक्षणांसुद्धां दाखविलेलीं आहेत. हाव आणि भाव यांचे साहित्यशास्त्रोक्त सर्व प्रकार मानसांत आहेत. अनेकार्थी शब्दांचा अर्थ निर्णय करण्याचे साहित्यशास्त्रोक्त बारा प्रकारहि आहेतच. शब्दालंकारांत अनुप्रासाचें प्राधान्य अनुपम असलें तरी तेवढ्यासाठीं अर्थाची ओढाताण कुठेंच नाहीं; अन्त्ययमकानुप्रासासाठीं मोरोपंत किंवा वामन यांच्याप्रमाणें खटाटोप केलेला नाहीं; त्यामुळें तो थोडा आहे. भाषेच्या तीन मुख्य गुणांपैकीं *प्रसाद गुण* सर्वव्यापक असून *माधुर्य गुण* तर इतका आहे कीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध आधुनिक लेखक व साहित्यिक विद्वान् श्री. न. चिं. केळकर श्री तुलसीमानसास 'वीणामधुर संगीत लहरी' असें म्हणाले आहेत. मानसांत *ओज* या *भाषागुणाचाही* उपयोग रस-भावानुकूल भरपूर केला आहे. मराठी भाषा महाराष्ट्रीयांसारखीच निसर्गतःच ओजस्वी असली तरी युद्धवर्णनांतील तुलसीनिर्मित ओजाची ती बरोबरी करूं शकली नाहीं व कोणाहि अनुवादकास मराठी भाषेंतील शब्दांचें स्वरूप न बदलतां तितकें ओज निर्माण करतां येणें अशक्य आहे. *लंकाकांडांतील युद्धवर्णनांत असें वाटतें कीं कवीच्या सर्व शरिरांतच रणरसानें प्रत्यक्ष संचार केला आहे.*

आदर्श निर्दोष चरित्राचित्र — तुलसीरामायण नाटयमहाकाव्यच आहे असें नव्हे तर आदर्श निर्दोष चरित्रचित्रणांत *सर्व रामायणांत श्रेष्ठतम आहे.* (क) *आदर्श नीति आणि भगवत्प्रीतिशिक्षक आहे. श्रद्धा आणि नीति यांचा मानसासारखा दुसरा शिक्षक नाहीं असें के. गांधी म्हणाले आहेत. शास्त्र, वेद व लोकमर्यादा-*

पालनाची दक्षता मानसाएवढी दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांत दिसत नाहीं.

सुभाषितें व वाक्प्रचार यांचा सागर आहे — कोणत्याहि विषयावर बोलतांना जशी भगवद्गीता आधारास पुढें येऊं शकते त्याप्रमाणें किंवा त्याहूनही अधिक व्यापक क्षेत्रांत मानसांतील वचनांचा व सुभाषितांचा आधार सहज सांपडतो.

संस्कृत शब्दांचा भरणा सुद्धां इतका आहे कीं *नुसत्या वाचनानेंसुद्धां अमरसार बुद्धींत प्रविष्ट होतें.* मराठी मानसांत हें त्याहूनहि अधिक प्रमाणांत घडतें.

सर्व शास्त्रांचा व सर्व ग्रंथांचा रसच श्रीरामचरितमानसांत सांठविला आहे. '*छओ सास्त्र सब ग्रंथनको रस*' असें रामायणाच्या हिंदी आरतींत श्रीतुलसीदासच म्हणाले आहेत. याविषयीं 'मानसोपलब्ध श्रीतुलसीचरित्रांत पूर्वींच लिहिलें आहे; व कांहीं नमुनेहि दाखविले आहेत. मानसांत वरवर पोहणारांना जो आनंद होतो त्याच्या अनंतपट आनंद मानसाच्या तळापर्यंत बुड्या मारणारांस होतो; पण हें मानस-पाणबुड्याचें काम करणाऱ्याची शक्ति व युक्ति नुसत्या विद्वत्तेनें किंवा हजार पारायणें करून सुद्धां प्राप्त होत नाहीं; 'तो जाणे ज्या जाणूं देती' श्रीहरिगुरुकृपा ज्याला जितकें जेव्हां जाणूं देईल तितकेंच तो मानस-पाणबुड्याचें काम करण्यांत सफल होतो; हा अनुभव जसा टीकालेखनांत प्रत्यहीं आला तसाच प्रस्तावना-लेखनांतहि आला.

श्रीगोस्वामींच्या रामचरितमानसाच्या गुणांचें वर्णन व या लेखकाच्या अकल्पित अपूर्व भाग्योदयाचें वर्णन पूर्णांशानें करणें अशक्य आहे, तसें करणें म्हणजे आकाशाची लांबीरुंदी मोजून त्याचें क्षेत्रफळ काढण्यासारखेंच आहे. वाचकांस ही अतिशयोक्ति वाटेल; पण वाचक जर नुसती प्रस्तावना लक्ष लावून व अर्थ समजून वाचतील तर त्यांसही असेच उद्गार काढावे लागतील.

गेल्या दोन तपांच्या सतत व्यासंगानंतर आणि गूढार्थ-चंद्रिका व प्रस्तावना यांत लागलेल्या विपुल अपूर्व शोधांनंतरसुद्धां असेंच वाटतें कीं गूढभावार्थरत्नांचा मानस हा एक अनंत अपार रत्नाकर(सागर)च आहे. *२५ वर्षांच्या सखोल व्यासंगानंतरसुद्धां असें म्हणवत नाहीं कीं मानसांतील सर्व मर्म समजलें व सर्व गूढांचा शोध लागला.*

अद्‌भुत मंत्रमय ग्रंथ — श्रीरामचरितमानस हा एक अद्‌भुत मंत्रमय ग्रंथ आहे. सकाम व निष्काम मार्गांतसुद्धां मानसांतील चौपाया-दोह्यांचा उपयोग प्रत्यक्ष केला जात आहे; मराठी मानसाचासुद्धां अनेकांनीं तसा अनुभव घेतला आहे.

भाषेचा सहज प्रभाव — मराठी अथवा हिंदी मानसाच्या भाषेचा असा कांहीं अद्‌भुत प्रभाव आहे कीं एकदां त्याचें वाचन वा प्रवचन सुरूं झालें म्हणजे लहान लहान ८।१० वर्षांचीं मुलेंसुद्धां श्रवणांत गुंगतात व अगदीं शांत असतात. हा या लेखकाचाच अनुभव नसून महाराष्ट्रांत समच्छंद समश्लोकी मराठी अनुवादाचें पठन

व प्रवचन करणाऱ्या जुन्या व नव्या व्यक्तींचाहि आहे. परगांवाहून त्या अर्थाचीं आलेलीं पत्रें शिल्लक आहेत, हें या लेखकाच्या बुद्धीचें कौशल्य नसून केवळ *महापुरुष-त्रयांची व श्रीरघुनाथाची कृपाच कारण आहे. हा लेखक एक भारवाही खर आहे.*

टीकेंत वा प्रस्तावनेंत जें कांहीं अद्भुत व चांगलें असेल तें हरिसंतगुरुकृपेचें फळ आहे, व जे कांहीं दोष असतील ते या लेखकाच्या मंदबुद्धीचे आहेत; म्हणून —

दो :—वाचक सांडुनि दोषजल घेतिल गुणदुग्धास ।
मिळे सविस्मय मुदमहा ग्रंथ-विलोकनिं त्यांस ॥ १ ॥
अतां पुढें प्रस्तावना आहे मुख्य विभाग ।
त्यांत मुख्य बघणें अतां अग्रिम 'टीका' भाग ॥ २ ॥
'प्रज्ञा'—मतिचें कार्य हें नसे सांगुं सत्यास ।
जलद नभांतुन वर्षती द्याल कुणा श्रेयास ॥ ३ ॥

जय जय बाबा गंगादास । जय जय सद्गुरु वंदुं पदास ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।१ 卐 卐 卐

श्रीवासुदेव-चरणाम्बुज-रस-मत्तालि-गुंजितं मधुरम् ।
श्रुण्वन्तु बुधाः सततं मानस-गूढार्थ-चंद्रिका-टीकाम् ॥ १ ॥
भवभीषणार्कभीतास्तृष्णार्ता ये चकोर-पोतास्ते ।
कामं पिबन्तु सततं मानसगूढार्थ-चंद्रिकां सुखदाम् ॥ २ ॥
दर्शनानि न साहित्यं न वा व्याकरणं श्रुतम् ।
हिन्दी भाषा न चाऽधीता धाष्टर्यमंगीकृतं खलु ॥ ३ ॥
मानस-टीका-लेखन-भारं वोढुं क्षमं परिज्ञाय ।
दूषणखरहा दूषणखरता-युक्तं खरं युजोजैनम् ॥ ४ ॥
निगमां महिष-मुखानें वदवी । गौरी-शृंगीं पंगुस चढवी ।
तो मानसगूढार्थ-चंद्रिका – । लेखक हरि करि तुच्छ भिक्षु-का ॥ ५ ॥

पूर्वपीठिका — महाराष्ट्रांत ज्याला तुलसीरामायण म्हणतात त्यास श्रीतुलसीदासांनीं दिलेलें नांव श्री '*रामचरितमानस*' असून 'मानस' या नांवानें त्याचा उल्लेख केला जातो. मानस = मन आणि मानस सरोवर. या लेखकानें स्वतः हिंदी भाषेचा अभ्यास मुळींच केलेला नसतां या ग्रंथाबद्दलची जिज्ञासा मोक्षपत्रिका नांवाच्या गुजराथी मासिकांतील श्रीमानसाच्या अवतरणांवरून उत्पन्न झाली, व तो ग्रंथ अलौकिक असावा असें वाटूं लागलें. पुढें १९३१–३२ च्या सुमारास अनपेक्षित रीतीनें या ग्रंथाशी संबंध आला, आणि दिवसेंदिवस त्याची अलौकिकता अधिकाधिक प्रतीतीस येऊं लागली. गेल्या २५ वर्षांच्या सतत वाढत्या अभ्यासांत व अवगाहनांत त्याची अलौकिकता अधिकाधिक प्रतीत होत आहे. 'दिने दिने यन्नवतामुपैति तदेवरूपं रमणीयतायाः' हें आजच्या दिवसापर्यंत श्रीरामचरित-मानसाच्या बाबतींत अनुभवास येत आहे. याला मूळ प्रेरक बाबा श्री गंगादास महाराज यांची श्री रघुनाथ कृपा-प्रसादानें सहज लाभलेली अलभ्य संगति ! बाबा गंगादासांचें अल्प चरित्र पूर्वीं दिलेंच आहे.

२ श्रीयुत जामदार यांचें भाषांतर, दोन गुजराथी भाषांतरें व पंडित ज्वालाप्रसाद यांचें टीकावजा सविस्तर हिंदी भाषांतर यांच्या साह्यानें २१ दिवस सतत मानसाचा अभ्यास केला गेला; पण अर्थाच्या बाबतींत पुष्कळच ठिकाणीं समाधान होईना. त्या वेळींच (१९३१।३२) मानसपीयूष या बृहत्कोषवजा मानसटीकेची माहिती मिळाली पण प्रयत्न करूनसुद्धां तो सात हजार (डेमी) पृष्ठांचा ग्रंथ मिळूं शकला नाहीं.

पुढें श्रावण शुक्ल द्वितीया शके १८६७ गुरुवारीं अनपेक्षित रीत्या श्रीमानसाच्या समश्लोकी समवृत्त अनुवादास प्रारंभ करावा लागला व तें कार्य अवघ्या तीन महिन्यांत (९०० तासांत) पुरें झालें. त्या विषयींची विशेष माहिती श्रीरामचरितमानसाच्या प्रथमावृत्तीच्या निवेदनांत पाहावी.

नंतर १९४८ सालीं मानसपीयूष ग्रंथ (प्रथमावृत्ति) मिळविण्याचा प्रयत्न जुन्या ग्रंथांच्या विक्रेत्यांकडेहि काशीस करविला, पण जुनी प्रतसुद्धां मिळाली नाहीं. कल्याण मासिकाच्या मानसांकांत दिलेल्या अर्थानें समाधान झालेलें नसतांच प्रथमानुवाद त्यावरूनच त्या वेळीं (१९४६) करावा लागला.

या टीकेचा अल्पसा जन्मेतिहास — १९३७ च्या पावसाळ्यांत चिंचणी (तारापूर) येथील देवीच्या देवळांत *संपूर्ण रामचरितमानस* प्रवचन रूपानें *पांच महिन्यांत सांगितलें गेलें*. बाबा श्रीगंगादास १। मैल दूर रात्रीं श्रवणास येत असत. नंतर १९३८–३९ मध्यें चौक जि. कुलाबा येथील गांवाबाहेरच्या श्रीधान्येश्वर मंदिरांत राहात असतां *संपूर्ण रामचरितमानस सांगण्यास नऊ महिने लागले*. नंतर खेड, जि. पुणें येथील गांवाबाहेरील श्रीकेदारेश्वर मठांत वास्तव्य असतां तेथेंच *नऊ महिन्यांत* केवळ *बालकांड सांगतां आलें*. **जेथें सहज योग येईल तेथें श्रीमानसाचा प्रसार करणें ही गुरुदक्षिणा बाबांनीं मागितल्यामुळें** किरकोळ प्रवचनें अनेक ठिकाणीं झालीं. याप्रमाणें मूळ हिंदी मानसाच्या पारायण, प्रवचन, चिंतनादिकांत **बाबांच्या** आशीर्वादबलानेंच मानसाचें गूढ अंतरंग, अधिकाधिक प्रतीतीस येऊं लागलें. सुभाषारूपी सुवासानें प्रथम चित्तभृंगास आकर्षिला. मग अनुपम अर्थरूपी परागानें मनोभ्रमर रंगूं लागला; आणि १९४४।४५ पासून मानसांतील भावरूपी मकरंद आपोआप प्रगट होऊं लागतांच प्रज्ञामानसभ्रमर त्या मकरंदपानांत दंग होणारा मधुप बनला. ‘ अनुपम अर्थ, सुभाव सुभाषा । गणुं पराग मकरंद सुवासा ॥’ (१।३७।६)

(१) अनुपम अर्थपरागांचा व परमोत्कृष्ट भावमकरंदाचा अनुभव उत्तर हिंदुस्थानांतील मानसाभ्यासी प्रकाण्डपंडित, व्यास, रामायणी इत्यादिकांस किती व कसा आला आहे हें तुलनेच्या दृष्टीनें पाहण्याच्या जिज्ञासेनें शोध करीत असतां, मानसप्रचारासच वाहून घेतलेल्या **‘ मानसमणि ’** नांवाच्या **मासिकाचा** शोध लागून ग्राहक होण्याचा योग १९५० मध्यें आला असेल. मानससंघानें प्रकाशित केलेले मानसमणीचे ८।९ वर्षांचे अंक, अनेक मानसचर्चात्मक पुस्तकें व गीताप्रेसनें (गोरखपूर) प्रसिद्ध केलेलीं *मानसचर्चात्मक पुस्तकें मागवून एखाद्या दुष्काळपीडित परम बुभुक्षिता*प्रमाणें चर्वण करून गिळलीं पण स्वतःस स्फुरलेले गूढ भावार्थ त्यांत कोठेंच आढळले नाहींत.

(२) मानसमणींतील एक लेखक, महापंडित, कवि, वेदान्तभूषण, रामायणी, पंडित रामकुमारदास मणिपर्वत अयोध्या व मानसराजहंस विजयानंदजी त्रिपाठी

यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. त्यांत इतकें निष्पन्न झालें कीं मानसपीयूषची द्वितीयावृत्ति निघत असून बालकाण्डाच्या प्रकाशित प्रथम भागांत मंगलाचरण श्लोकां-विषयीं जिज्ञासित भाव प्रकाशित झाले आहेत इतकें कळलें; तेव्हां नोव्हेंबर १९५१ मध्यें श्रीमानसपीयूष-ग्राहक होण्याविषयीं संपादकांस पत्र लिहिलें त्या पत्रांत इतर काय लिहिलें होतें हें स्मरणांत नाहीं; तथापि *तें पत्रच परंपरेनें या गूढार्थचंद्रिकेचें उत्पादक बनलें* असें मानसपीयूषसंपादकांनीं अरण्यकाण्डटीका विभागारंभीं प्रकाशित केलेल्या परिचयावरून ठरलें. मंगलाचरण श्लोकांतील अपेक्षित गूढ भाव मानसपीयूष (बृहत्कोष) टीकेंतहि मिळाले नाहींतच. (बालकांडाच्या पहिल्या ४३ दोह्यांवर कल्याण मासिकाच्या आकाराची ७४४ पृष्ठांची ही टीका आहे) **(क)** *मानसपीयूष संपादकांनीं दिलेला परिचय गूढार्थ चंद्रिका नमुना अंकांत प्रकाशकांच्या निवेदनांत पृ. २ वर आहे तो पाहावा.*

टीकेचा जन्म—पुढें मानसपीयूषसंपादकांचें पत्र आलें की परशुरामप्रसंगावर (भार्गवदर्पविमर्दन) भाव लिहून पाठवावे. त्यांस कळविलें गेलें कीं स्वामीला व्याकरण-शुद्ध हिंदी लिहितां येत नाहीं इत्यादि. आपण जी हिंदी भाषा पत्रांत लिहितां ती मला पसंत आहे असें त्यांचें उत्तर आलें. त्या पत्रानुसार *बाल कांड दो. २६८-२८५ यांतील मधले मधले भाव भीत भीत लिहून* पाठविले गेले. ४।६।५२ ही त्या लेखनाची तारीख स्थळ प्रतीवरून ठरली. याप्रमाणें *या टीकेची हिंदी भाषेंतील गर्भधारणा ४।६।५२ रोजीं इस्लामपूर येथें* डॉ. बा. श्री. वैद्य यांच्या बंगल्यांतच *झाली.*

(क) त्यानंतर मानसपीयूष संपादकांनीं अरण्यकाण्ड रामगीतिपासूनच्या भागावर सविस्तर टीकाच लिहून मागविली. ती हिंदींत प्रथम लिहून नंतर मराठींत लिहून ठेवून पाठविली; ता. ८।८।५२; म्हणजे **मराठी टीकेचा जन्म ८।८।५२ ला ईश्वरपूर येथेंच झाला.** याप्रमाणें संपूर्ण अरण्यकाण्ड, श्रीरघुवीरविवाह (बाल. २८६।५–३६१), किष्किंधा व सुंदर या भागांची टीका मराठींत लिहून त्यांतील जे भावार्थ मानस-पीयूष प्रथमा वृत्तींतील १५।२० टीकाकारांच्या टीकांत नसतील. ते मानसपीयूषकडे पाठविले गेले. प्रथमावृत्तीचे ते ते विभाग मानसपीयूष संपादकांकडून येत व त्यांस परत पाठविले जात. त्या मराठी टीकांच्या चोपड्यांत समासांत ८ अशी खूण असलेले भावच मानसपीयूषकडे पाठविले गेले. नंतर वेळेच्या अभावीं व संपादकांच्या सूचनेनुसार अयोध्या, लंका व उत्तरकांड यांतील फारच महत्त्वाच्या कांहीं भागांवरच अगदीं संक्षिप्त भाव केवळ हिंदींतच लिहून पाठविले गेले. बालकांड दो. २६९ पर्यंतची व अरण्यकांड दो. १४ पर्यंतची मानसपीयूष टीका आधींच प्रकाशित झाली होती. पाठविलेली बहुतेक टीका मानसपीयूषमध्यें कधींच प्रकाशित झाली आहे.

(ख) अरण्यकांड पूर्वार्धावरील पाठविलेले सर्व भाव मानसपीयूष परिशिष्टांत संपादकांनीं अभिवचन दिल्याप्रमाणें छापले आहेत. मानसपीयूष टीका प्रकाशित झाल्यावर

बालकांड टीकेचीं बरींच पुस्तकें वाळवीनें भक्षण केल्यानें निरुपयोगी झालीं म्हणून त्या भागाची *तृतीयावृत्ति त्यांस तातडीनें काढावी लागली* व त्यामुळें बालकाण्डाच्या २६९ दोह्यांतील अत्यंत महत्त्वाचे भाव फारच तातडीनें गूढार्थचंद्रिका-लेखन समाप्त झाल्यानंतर पाठवावे लागले. वरील हिंदी टीकालेखन इस्लामपूर, चासकमान, गोंदिया (नागपूर) व इस्लामपूर या ठिकाणीं झालें. मानसपीयूषकरितां सुमारें ३५० छापील पृष्ठें डेमी आकाराचीं होतील एवढी टीका लिहून पाठविली गेली; व बहुतेक सर्व मानसपीयूषमध्यें छापली आहे.

नामकरण–गूढार्थचंद्रिका हें नांव या टीकेला कधीं दिलें गेलें हें निश्चित सांगण्यास लेखी पुरावा उपलब्ध नाहीं; तथापि हिंदी टीकालेखन सुरू असतां शके १८७४ च्या चातुर्मासांत (१९५२ च्या) ईश्वरपूर येथेंच दिलें गेलें एवढें नक्की स्मरतें.

या टीकेचा जन्म – *या विस्तृत टीकेच्या लेखनाचा आरंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८७५ (७।११।५३) रोजीं सकाळीं ईश्वरपूर येथें झाला.* कोणता भाग कधीं कोठें लिहिला या विषयींचे उल्लेख प्रत्येक भागांत आहेत. *परिशिष्ट लेखनासह टीका-लेखनसमाप्ति श्रावण कृष्ण पंचमी शके १८७७ (८।८।५५) सोमवारीं सातारा येथें झाली.* **(क)** टीकालेखनास पावणेदोन वर्षेंच लागलीं असें यावरून ठरलें तरी १९५१ पासूनच बरेचसे नवीन शोध लागत गेले व लिहून ठेवलेले होते; व पूर्वी सांगितल्याप्रमाणें हिंदी मराठींत संक्षिप्त टीकालेखन झालेलें होतें.

या टीकेचा विस्तार — प्रत्येक पृष्ठांत २५ ओळी असलेलीं एक्झरसाईझच्या आकाराचीं ११४०९ पृष्ठें (लेखी) या टीकेनें व्यापलीं आहेत. काण्डशः विस्तार ४३३६, २६८९, ७१८, ४४९, ७००, ९९७ व उत्तरकाण्ड १५२० पृष्ठांचा आहे. डेमी आकाराचीं छापील पृष्ठें सुमारें ६५०० होतील असा अंदाज आहे. यांत मूळ हिंदी श्रीरामचरितमानस असल्यानें सुमारें ४०० छापील पृष्ठें वाढलीं आहेत.

टीकालेखनास अनपेक्षित मदत — (१) १९५२ च्या नोव्हेंबर महिन्यांत **'मानस (काव्य) दोषारोपनिराकरण'** हा लेख मानसमणींत प्रकाशित झाल्यामुळें इंटर पास होऊन पोस्टांत नोकरी केलेल्या कुं. धनसिंह भदौरिया नांवाच्या (कानपूरजवळील परौख पोस्ट नोनारी, जि. कानपूर) क्षत्रियाच्या दर महिन्यास ६।७ शंका, समाधानासाठीं येऊं लागल्या; व त्या टीकालेखनसमाप्तीपर्यंत नियमितपणें येत होत्या. त्यामुळें सुमारें १५० शंकांचें समाधान मानसाधारें करावयास सांपडलें; व त्यामुळें टीकालेखनास फार मदत झाली. आश्चर्यकारक घटना ही कीं टीकालेखन-समाप्ति व त्या भैय्या धनसिंह भदौरियाचें देहावसान समकाळींच झालें. **ही अनपेक्षित ईशयोजनाच नव्हे काय?** परस्परांचें दर्शन नाहींच! (२) माधवगढ, सटना मध्य-प्रदेश येथील एक सेवानिवृत्त **संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषांचे एम्. ए. चे प्राध्यापक** श्रीयुत तरुणेन्दुशेखर तिवारीजी **मानसमणि मासिकाचे संपादक,** यांच्याहि अनेक

मानसशंकांचें समाधान लिहून पाठविण्याची सुसंधि १९५३ जूननंतर मिळत गेली; व त्यामुळें टीका पुष्ट होत गेली.

आभारप्रदर्शन—मानसमणि संपादक, 'मानससंघ रामवन 'चे मंत्री श्री शारदाप्रसादजी, पं. रामकुमारदास रामायणी आणि मुख्यतः मानसपीयूष संपादक श्रीयुत अंजनीनन्दनशरणजी बी. ए., एलएल. बी. यांच्याकडून माहिती आणि टीका-लेखनाची व्यावहारिक प्रेरणा मिळाली नसती तर द्वितीयानुवाद आणि गूढार्थचंद्रिका टीका यांचा जन्मच झाला नसता. या सर्वांचा व वरील दोन शंकापृच्छकांचा हा लेखक ऋणी आहे. या टीकालेखनामुळेंच तुलसीमानसाचें परम रमणीय अंतरंग व बहिरंग सौंदर्य अनुभवून अपार अनिर्वचनीय परमानंदाचा लाभ पदोपदीं घेतां आला. (क) लेखक जसा या सर्वांचा ऋणी आहे, तसेंच या टीकेच्या वाचनानें ज्यांना आनंद लाभेल ते सर्व वाचक वरील सर्वांचे व जे कोणी टीका प्रकाशित करतील त्यांचें ऋणी होतील यांत शंका नाहीं. (ख) '**प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण**' सर्वांनाच असला तरी व्यवहार व्यवहारदृष्टीनेंच करणें योग्य, म्हणून वरील आभारप्रदर्शन लिहिलें. हें त्या पुरुषांस कदाचित् रुचणार नाहीं; पण सत्याचा अपलाप करणें या अल्पमतीस कधींच रुचत नाहीं म्हणून लिहावें लागलें; यामुळें ते सर्व महाभाग क्षमा करतील अशी आशा आहे.

टीका-लेखन कोणीं केलें?—कागदावर शब्द लिहिण्याचें काम नेत्रांच्या मदतीनें करांनीं केलें. **प्रज्ञानानन्दानें या टीकालेखनांत कांहींच केलें नाहीं हें सत्य सत्य त्रिवाचा.** कोणा तरी अदृश्य शक्तीच्या प्रेरणेनें ऐन वेळीं, एक निमिषार्धहि न लागतां सहज भराभर सर्व गूढार्थ प्रगट होत गेले; मानसांतील आधारभूत अनेक वचनें चलच्चित्रपटांतील (सिनेमा) चित्राप्रमाणें बुद्धीच्या नेत्रांपुढें नाचूं लागलीं; त्यांचा समन्वय बुद्धिस्थ प्रेरकानेंच बुद्धींत प्रगट केला व एखाद्या यंत्राप्रमाणें लिहिण्याचें काम करांनीं केलें! कागद, शाई, पुस्तकें—नवीं—जुनीं, इत्यादि सर्व दुसऱ्यांनीं पुरविलें. आयत्या वेळीं अनपेक्षित रीत्या वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र ग्रंथ, अनेक कोष व अनेक पुराणें हातीं येऊन त्यांतील उपयुक्त भागच तेवढा मन, बुद्धि व नेत्र यांना चटकन सांपडत गेला. उपनिषदादिकांचें परिशीलन त्या हृदयप्रेरकानें मनबुद्धींद्रियांकडून पूर्वाश्रमांतच करवून घेतलें होतें. **या लेखकाची लायकी व प्रगट झालेली टीका यांत जन्मदरिद्र्याच्या घरांत मिणमिण जळणारा घासलेटाचा रात्रिदीप आणि सुधामय राकाचंद्रिका यांच्यांतील अंतरासारखें महदंतर आहे. 'महती दासां सदा देतसां' हें अगस्तिवचनच सत्य झालें आहे.** या लेखकाची लायकी किती तें या प्रकरणारंभीं दिलेल्या शेवटच्या तीन श्लोकांत सांगितलें आहेच. कोणी म्हणतील कीं हा केवळ विनय आहे; पण या स्वामीजवळ विनयाचा अभाव आहे हें परिचित व्यक्तींपैकीं पुष्कळांच्या अनुभवास आलेलें आहे; आक्षेपखंडणांतील

सणसणीत तडाकेमुद्दां हेंच सांगतील !

हें लेखन या मंदबुद्धीनें स्वतःच्या बळावर केलें नाहीं याविषयीं टीकेंत गद्यपद्यरूपानें निघालेले जे सहज उद्गार आहेत त्यांतील कांहीं नमुने येथें देणें इष्ट वाटतें. असले पुष्कळ उल्लेख मुद्रण प्रतींत गाळले आहेत. कारण विस्तार वाढणें इष्ट वाटलें नाहीं.

प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण — मानस गुरु बाबा श्रीगंगादासजींचा अमोघ आशीर्वाद, मानसजनक श्रीतुलसीदास व मोक्षगुरु यांचा अनुग्रह आणि श्रीरघुनाथाची कृपा यांच्या समन्वयानेंच हें टीकालेखन झालें आहे. गुरु व देव यांत भेद नसल्यानें वरील शीर्षक घातलें आहे. **'भक्तिभक्त भगवंत गुरु। रामकथा गुणनाम ॥ काम–कपट–विण सेवितां। देति परम विश्राम ॥ हें एका दोह्यांत देण्यासारखें मानसाचें सारसर्वस्व आहे.**

किष्किंधा कांड दोहा २६ च्या टीकेंतील एक नमुना

१

अभंग :—नाहींत हे स्वामी–मतिजात भाव। राम देवराव लिहविता ॥ १ ॥
ठायींठायीं प्रतिदिन हें चालतें। सुख न मावतें अंतरांत ॥ २ ॥
नाहीं हिंदीभाषा–ज्ञान लवलेश। कैसा कोसलेश सूत्रधार ॥ ३ ॥
नाहीं ज्ञानभक्ति नाहीं कर्मयुक्ति। मागतो ना मुक्ति कदाकाळीं ॥ ४ ॥
तयानेंच हातीं बाहुलें प्रज्ञान। धरोनि अज्ञान नाचविलें ॥ ५ ॥

२

काय त्याची लीला कैसा करि खेळ। कोण घाली मेळ विश्वामाजीं ॥ १ ॥
भाषाशास्त्रमूक भक्तिज्ञानमूक। पदोपदीं चूक करीतसे ॥ २ ॥
पार ना, अगाध भावसागरांत। काव्यमानसांत बुडवितो ॥ ३ ॥
मानस तळाशीं क्षणें प्रज्ञा नेतो। तुलसीभाव देतो मणि हातीं ॥ ४ ॥

३

तयाच्या प्रकाशीं पहात रहावें। चित हें भरावें परानन्दें ॥ १ ॥
ऐशा आनंदांत क्षुधातृषाभान। नाहीं काळज्ञान स्थानाचेंही ॥ २ ॥
खद्योत-तेजानें धवलवी जग। सीताजीवलग जरी वांछी ॥ ३ ॥
अंध-मूक पंगु दीन मतिमंद। तया सुखकंद धरी हातीं ॥ ४ ॥
यांत जें जें रम्य गुण ते रामाचे। घ्यावे, प्रज्ञानाचे दोषां त्यागा ॥ ५ ॥

४

अमृताचे परि आकारें कारलें। कधीं तें वारलें सज्जनांनीं ॥ १ ॥
ऊंस तो वाकडा परि रस गोड। कोण ठेवी खोड रसज्ञ त्या ॥ २ ॥
आतां आली पुन्हां पूर्ववृत्ती वरी। मानसा विवरी त्याचा तोच ॥ ३ ॥
अंतरीं वसोनि चालवितो खेळ। प्रज्ञानाचा वेळ जातो मोदें ॥ ४ ॥

या अभंगांच्या प्रतिलेखनास जेवढा वेळ लागला तेवढ्याच वेळांत विचार न करावा लागतां हे सहजोद्गार निघाले आहेत.

(२) [२।१८४।२ च्या टीकेंत] हे उतारे सांपडले नसते तर अनुवाद व अर्थ चुकलेच होते, ते निर्दोष झाले नसते; पण बिनतारी संदेशाप्रमाणें एकाएकीं अंतरांत 'जरहिं विषमजर लेहिं उसासा। कवनि रामबिनु जीवन आसा' ही हिंदी चौपाई ऐकूं आली. ही अदृश्यशक्तीची प्रेरणा नव्हे तर काय ?

(३) "या चौपाया [२।१८५।५–७] लिहिण्यापूर्वीं प्रश्न उठला कीं सातच (चौपाया) कां ? पुष्कळ शोध केला, विचार केला. पण कांहीं सुचेना; पण मनानें लगेच हा उच्चार केला कीं या प्रश्नाचें उत्तर योग्य वेळीं बिनतारी संदेशानें मिळेल. शोध सोडून लेखन सुरू केलें व 'जविनलाभ न कुणा आवडत' याचा अर्थ लिहीत असतांच जो संदेश मिळाला तो वर लिहिला आहे. या बुद्धीची कुठली ताकद !" हें टीकेंतलें अवतरणच दिलें आहे.

(४) "ल. ठे. — या दोह्याच्या [अयो. २०२।–] अंगभूत नऊ चौपाया आहेत; म्हणजेच नियमापेक्षां एक जास्त आहे. याचें समाधानकारक कारण अद्याप सांपडलें नाहीं. (हें लिहून भगवत्स्मरण केल्याबरोबर) कारण सांपडलें, तें हें कीं नऊ खेपांत सैन्यासह सर्व मंडळी पलीकडे उतरली; व शेवटच्या नवव्या खेपेला भरत उतरले व त्यांनीं सर्वांचा शोध घेतला, काळ किती लागला हें नवव्या चौपाईंत स्पष्ट सांगितलें; भरत शेवटीं उतरले हें शब्दांनीं सुचविलें व किती खेपांत [सर्व] गेले हें चौपायांच्या संख्येनें सुचविलें." टीकेंतील उताराच दिला आहे फक्त [ ] अशा कंसांतील शब्द नवीन आहेत.

(५) "{ वि. सू. — 'कंदमूलफलफूलाहारी' (अयो. २०१।१) यांतील 'फूलाहारी' वर टीका लिहिण्यापूर्वीं बा. श्री. वैद्य [डॉ. M.B.B.S.] यांस विचारलें कीं आहार करण्यासारखीं फुलें कोणतीं ? (२३।१०।५४). ते म्हणाले कीं *योगरत्नाकरांत* सांपडतील. वाटलें कीं योगाचा ग्रंथ असावा. २४।१०।५४ ला त्यांनीं तो शोधून आणून दिला, उघडून पाहतां वैद्यक ग्रंथ ! फुलांची माहिती — सांपडली नाहींच, पण पारदाचे प्रयोग सहज दृष्टीस पडले. त्या ग्रंथाची आवश्यकता नसल्यानें तो परत दिला; पण आज २५।१०।५४ या [२०८ अयो.] दोह्यावर टीका लिहितांना तो ग्रंथ आणविला. योगरत्नाकर अशा विचित्र पद्धतीनें हातीं आला म्हणून या दोह्याचा यथार्थ व गूढार्थ समाधानकारक पद्धतीनें लावतां आला. यावरून हें पटेल कीं ही टीका लिहविणारी कोणी तरी अदृश्य शक्ति आहे }" चौकोनी कंस नवीन आहेत. सर्व उतारा (अयो. २०८) दोह्याच्या टीकेंत पाहावा.

(६) { ल. ठे. या आठ चौपायांचा [अयो. २१५।१-८] अर्थ आज लिहिला तेव्हां वर दिलेले कोणतेहि भाव सुचले नव्हते; व वाटलें कीं एका पृष्ठांत सर्व टीका

उरकणार. पण कोठेंतरि उगमाकडे खूप वृष्टि व्हावी व खालच्या भागांत, कोरड्या ठणठणीत असलेल्या नदींत एकदम लोंढा यावा त्याप्रमाणें वर लिहिलेल्यांतील बहुतेक भाग (मानस पीयूषाच्या प्रसिद्ध झालेल्या १०।२० ओळींशिवाय) आपोआप बाहेर पडला. } चौकोनी कंस टीकेंत नाहींत.

टीकेच्या दोनच हस्तलिखित भागांतील अगदीं थोडे नमुने येथें दिले आहेत. असे सर्व उल्लेख मूळ (४७ भाग) हस्तलिखितांतून एकत्र केल्यास एक पुस्तकच तयार होईल ! **'थोडक्यांत उमजे सुज्ञांना'** म्हणून इतका विस्तार पुरे.

ज्या तीन महापुरुषांच्या परम कृपेनें व ज्या रघुवंशविभूषणाच्या निर्हेतुक स्नेहानें, ही टीका, आहे या स्वरूपांत बाहेर पडली त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं या देहाला घृताक्त वस्त्रें गुंडाळून, जिवंतपणीं याचा काकडा करून त्यांच्यावरून ओवाळला तरीहि ऋणमुक्त होणें शक्य नाहीं. **'यांच्या उपकारांची फेड' हे शब्द मनांत उच्चारणें सुद्धां कृतघ्नपणाचें ठरेल !**

गूढार्थचंद्रिका टीकालेखनास मुख्य आधार कोणता घेतला; कोणत्या रामचरितमानसावर ही टीका लिहिली, याविषयीं आवश्यक तेवढी चर्चा पुढील उपप्रकरणांत केली आहे.

जय बाबा श्री गंगादास। जय मानस कवि तुलसीदास ॥
वासुदेव जय जय गुरुराज। जय जय हृदयस्थित रघुराज ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।२ 卐 卐 卐

श्रीमानस गूढार्थ-चंद्रिकेस आधार

श्रीमन्महाकविकुलचक्रचूडामणि श्रीतुलसीदासांच्या श्रीरामचरितमानसाचा द्वितीयानुवाद (अप्रकाशित) या टीकेस आधार आहे. हा अनुवाद मुख्यतः गीताप्रेस गोरखपूरच्या श्रीरामचरितमानसाधारें केला आहे. मुख्यतः म्हणण्याचें कारण इतकेंच कीं त्या प्रतींतील पाठ जेथें असमाधानकारक वाटले, तेथें कांहीं ठिकाणीं अन्यत्र उपलब्ध पाठ घेतले आहेत, व त्यांविषयीं अधिक स्पष्ट खुलासा याच प्रकरणांत पुढें आहे.

द्वितीयानुवादाची आवश्यकता — मागील प्रकरणांत कथन केल्याप्रमाणें मा. पी. साठीं हिंदींत टीका लिहीत असतां असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं मूळ हिंदींतून जे गूढार्थ व भावार्थ सहज निघूं शकतात ते प्रथमावृत्तींतील अनुवादांतलि शब्दांधारें कांहीं ठिकाणीं निघूं शकत नाहींत. (क) प्रथमानुवादलेखन शके १८६७ मध्यें अवघ्या तीन महिन्यांत कसें व कां झालें इत्यादीविषयीं खुलासा प्रथमावृत्तीच्या निवेदनांत केला आहे. त्या अनुवादांत मूळांतील शब्द शक्य तितके कायम ठेवण्याचा कसून प्रयत्न

केला होता, त्यानंतर मूळ-हिंदी-मानसाच्या पारायणादिकांत जे भावार्थ सहज स्फुरले ते प्रगट होण्यास लागणारी शब्दयोजना प्रथमानुवादांत सांपडेना. (ख) एका ठिकाणचा अर्थ निश्चित करण्यास लागणाऱ्या आधार-वचनांतील खुणेचे शब्द अपुरे पडतात असें दिसलें. विशिष्ट शब्दांनीं जे भाव प्रगट होतात ते त्या ठिकाणीं प्रगट होण्यास लागणारे विशिष्ट शब्दच त्या ठिकाणीं उपयोजिलेले दिसले नाहींत. उदा०—सरोरुह आणि सरोज, पंकज, जलज, कंज, या शब्दांचा सामान्यार्थ कमल हा एकच असला तरि सूक्ष्मार्थांत फार भेद आहेत. अशा भेदांचें निदर्शन करण्यास लागणारी शब्दयोजना अपुरी व अयथार्थ ठरूं लागली; या व अशा अन्य अनेक कारणांमुळें पुन्हां अनुवाद लिहून त्यांतहि टीका लिहितांना, प्रस्तावना लिहितांना व क्वचित् मुद्रणप्रत करतांनासुद्धां बदल करावा लागला.

या आवृत्तींत विशेष काय साधलें हें प्रस्तावनेंत उदाहरणांसह स्पष्ट करून दाखविलेल्या अनेकविध अर्थ व भावादि प्रकाशनकलांच्या नमुन्यांवरून कळेलच; तथापि या प्रकरणांत अल्पसें दिग्दर्शन करणें जरूर आहे.

१. काण्डारंभीं दिलेल्या अनुवादक-कृत मंगलाचरणाच्या श्लोकांत किरकोळ फरक केला गेला आहे. त्या श्लोकांची संख्या व श्लोक तेच आहेत.

२. मानसांत रामचंद्र शब्द १५ वेळां वापरलेला आहे. तीं १५ वचनें घेऊन संगतवार लावलीं म्हणजे एक स्वयंपूर्ण सुसंबद्ध, स्वतंत्र विषय तयार होतो. यांतील एकाच स्थळीं रामचंद्र शब्द नसेल किंवा अधिक स्थळीं असेल तर हा स्वतंत्र विषय सांगोपांग पूर्ण होत नाहीं. हरियान, श्रुतिसिद्धान्त, विश्राम, रघुराया इत्यादि अनेक शब्द अशाच पद्धतीनें वापरले असून ते ते शब्द असणाऱ्या सर्व वचनांच्या संयोगानें १-१ स्वतंत्र विषय तयार झाला आहे. अशांचे अनेक नमुने स्वतंत्र प्रकरणांनीं पुढें दिले आहेत.

३. आंग्लभाषा–काव्यसमालोचक **रस्किननें म्हटल्याप्रमाणें,** कांहीं ठिकाणीं **मूळांतील शब्दांचा नुसता क्रम बदलणें सुद्धां अनर्थकारक ठरतें.** उदा० ' बंदौं नाम राम रघुबरको। हेतु कृसानु भानु हिमकर को ॥ (१।१९।१) यांतील शब्दांचा क्रम आणि नाम, राम रघुवर, हेतु, कृशानु, भानु, हिमकर हे शब्दसुद्धां बदलतां येत नाहींत; बदलल्यास अनर्थ होतो. (टी. प.)

४. कांहीं नवीन शब्द — मूळांतील यथार्थ वा गूढार्थ प्रगट करण्यास मराठी भाषेंतील व संस्कृतांतील शब्द अपुरे पडूं लागले म्हणून कांहीं अगदीं नवे शब्द योजावे लागले. उदा०—स्वागता = स्वागत करण्यास पुढें जाणारी मंडळी, भाती = लहान भाता, राजधानी = नृपधानी इत्यादि. (क) कांहीं नामांवरून क्रियापदें बनवावीं लागलीं. उदा०—आव्हान = आव्हानणें; आहेर = आहेरणें, बधिर = बाधरणें, भस्म = भस्मणें इत्यादि. (ख) कोंकणी बोलभाषेंतील कांहीं शब्द वापरावे लागले. उदा०—हेरणें, = शोधणें, पाहणें; तुकणें = उचलणें; निसण, निसणी = शिडी; थळ = स्थळ, इत्यादि.

(ग) कांहीं संस्कृत रूपें वापरावीं लागलीं. उदा०-यस्य = ज्याचा; विहाय = सोडून, टाकून; श्रुत्वा = ऐकून इ० (घ) ' नामैकदेशे नामग्रहणम् ' या संस्कृत भाषेच्या नियमानुसार सत्या, भामा = सत्यभामा; अमा = अमावास्या इत्यादि प्रयोग संस्कृत भाषेंत आहेत तसेच श्रीतुलसीदासांनीं वापरलेले कांहीं शब्द वापरले आहेत; उदा०— हनू = हनुमान; अनी = अनीकिनी = सेना; दामनी = दामिनी = सौदामनी, पय = पयस्विनी इत्यादि.

५. संस्कृत असून असंस्कृत वाटणारे शब्द—श्रीतुलसीमानसांत असे पुष्कळ शब्द आहेत कीं जे प्रज्ञानानंदासारख्या अल्प–शब्द–ज्ञ व अल्पसंस्कृतज्ञास अ-संस्कृत किंवा अपभ्रंश वाटले; पण शब्दकोषांनीं चांगलें नेत्रांजन घातलें ! उदा० धाम (धामन्), तम (तमस्), प्रेमा (प्रेमन्), सर (शर), निरुपधि, मसि, किण, घुण, रय, तनू (तनु), सुषमा, भाग (भाग्य), चंद (चंद्र), गिरा (गीः), वाचा (वाग्), रुजा, (रुज् , रोग), वाल (रोम, केश), यवासा, भल्ल, भल्लक, भल्लूक (= कोल्हा मराठी), रिषि (ऋषि), लच्छन (लक्षण). शेवटले दोन मराठींत वापरले नाहींत. कंसांत दिलेले शब्द आज प्रचलित आहेत; पण कंसाबाहेरचे समानार्थक शब्द संस्कृत शब्दकोषांत आहेत; अमर व्याख्यासुधा पाहून खात्री करून घ्यावी. असे अनेक शब्द आहेत म्हणून पंडितंमन्यांनीं जरा संभाळून बोलावें ! प्रचलित आणि अप्रचलित (प्रयुक्त–अप्रयुक्त) हा भेद देशकालसापेक्ष असतो ! शब्द आधीं भाषेंत कुठें तरी प्रचलित असतात तेव्हांच कोषांत येतात.

६. युक्तपूर्वदीर्घ — जोडाक्षरापूर्वीचें ह्स्वाक्षर काव्यांत दीर्घ समजण्याचा संस्कृतानुसारी मराठींतील नियम प्रथमावृत्तींत पाळला नव्हता; हिंदीप्रमाणेंच पद्धति ठेवली होती; द्वितीयावृत्तींत या नियमाचें उल्लंघन सहसा झालेलें नाहीं. चरणांतील यति म्हणजे विश्रामस्थानानंतरच्या जोडाक्षरानें पूर्वाक्षरास उच्चार पद्धतीप्रमाणें दीर्घत्व येण्याचें कारण नसतें. (**क**) प्र आणि ऱ्ह या जोडाक्षरांपूर्वीच्या अक्षरास दीर्घत्व द्यावें किंवा देऊं नये; ' **प्र, ऱ्हे वा** ' असा संस्कृत भाषेंतहि नियम आहे. त्याचा फायदा पुराणांतून व बृहत्स्तोत्ररत्नाकरांत वगैरे घेतलेला आढळला तसा या आवृत्तींत कांहीं स्थळीं घेतला आहे.

७. विरामचिन्हें — नवीन–अपरिचित–वृत्तें वाचतांना वाचनांत सुकरता यावी या हेतूनें प्रथमावृत्तींत विरामचिह्नांचा मुख्य उपयोग केला होता. या आवृत्तींत विरामचिन्हें त्या हेतूनें वापरलीं नसून अर्थनिश्चय सुकर व्हावा व मतभेदांस जागा राहूं नये या हेतूनें वापरलीं आहेत.

८. एक आवश्यक नवीन प्रथा — जड (मराठी) जड (संस्कृत), जरा (म.) जरा (सं.), जग (म.) जग (सं.) इत्यादि शब्द लेखनांत सारखेच असतात पण उच्चारानुसार अर्थ बदलतो किंवा अर्थानुसार उच्चार करावा लागतो. संदर्भाचा

विचार केल्यानें अर्थनिश्चय सहज होतो हें जरी खरें असलें तरी वाचतांना अर्थग्रहण करणें जड जातें; व भिन्न उच्चारांचे अनेक शब्द एकापुढें एक असले म्हणजे जीभ अडखळते आणि रसभंग होतो. म्हणून *आवश्यक तेथें संस्कृतानुसार उच्चार असणारे* ज़ग, ज़रा, ज़गतीं वगैरे शब्द ज खालीं टिंब देऊन लिहिण्याची प्रथा सुरूं होणें जरूर आहे. अन्यथा अनुप्रासांतील माधुर्याची हानि होईल; म्हणून ही प्रथा या अनुवादांत आवश्यक तेथें अवलंबिली आहे. ही सूचना कांहीं सुशिक्षित पदवीधर वाचकांकडूनच आली होती.

९. क्वचित् हिंदी शब्द किंवा त्यांचें रूपांतर वापरावें लागलें. उदा०— वरात = मिरवणूक; दरागा = कोतवाल; घमंड = घमेंड व समुदाय, द्वयर्थी, (क) मराठी संत कवींनीं वापरलेले कांहीं शब्द वापरले आहेत.

१०. तृतीया व सप्तमीचीं — अनेकवचनीं रूपें ईं या प्रत्ययानें होतात व त्याचें निदर्शन जिहीं, जिहिं, (यांतील) अनुस्वारानें होतें. लोकीं = लोकांनीं किंवा लोकांत. हा तृतीयेचा उपयोग जसा अनेक वचनांत केला जातो तसा फार क्वचितच, पण एकवचनांत सुद्धां करावा लागला आहे. मूळांतील वाच्यार्थ व गूढ भावार्थ यांच्या संरक्षणासाठीं अशा नाना युक्त्या योजाव्या लागल्या आहेत.

११. महाकाव्यदूषण पण नाट्यकाव्यभूषण — मानस नाट्य-महाकाव्य आहे हें प्रथमावृत्तीच्या वेळीं ध्यानीं आलें नव्हतें; भासमान महाकाव्यदोष हेतुपुरःसर निर्माण केलेले आहेत असें वाटत असूनसुद्धां हेतु ध्यानीं न आल्यानें, मूळांतील यतिभंग, छंदोभंग, लयभंग, मात्रान्यून, वृत्तदोष, क्रमभंग इत्यादींचें संरक्षण प्रथमावृत्तींत केलें नव्हतें. पण मानस नाटयमहाकाव्य आहे हें जेव्हां दिसून आलें व त्यास तद्देशीय प्राच्य-पौर्वात्य भाषाकोविदांच्या वचनांचा आधार मिळाला तेव्हां मूलानुसारी रचना मुद्दाम करणें भागच पडलें. नाटकांत लहान मुलाच्या तोंडीं सुसंस्कृत शुद्ध भाषा घालून नाटयसौंदर्य व स्वभावोक्ति साधणार नाहीं, बोबडे बोलच तेथें पाहिजेत !

(क) उदा०—मूळांत पुष्कळ ठिकाणीं चौपायांच्या व दोह्यांच्या कांहीं चरणांत १।१ मात्रा न्यून आहे. " यांत कवीचा कांहींतरी हेतु असावा, पण तो अद्याप ध्यानीं आला नाहीं, तथापि श्रीरामकृपेनें केव्हां तरी त्यांतील हेतु कळेल " असा उल्लेख प्रथमावृत्तीच्या निवेदनांत केलेला आहे. त्यानंतर २८।११।५१ रोजीं मानसपारायण चालूं असतांच हेतु प्रगट झाला. तशीं सर्व स्थळें शोधून सुचलेल्या हेतूची यथार्थता पडताळून पाहिली व ती भावप्रकाशक नाटयकला असल्याचें निरपवाद ठरलें. असेंच यतिभंगादिकांचें झालें. (ख) शब्दक्रमभंग, अर्थक्रमभंग, शब्दांची व चरणादिकांची द्विरुक्ति-त्रिरुक्ति, यमकभद इत्यादि प्रकारची मूळांतील रचना नाटय वा भावमाधुर्यपोषक व प्रकाशक असल्यानें द्वितीयावृत्तींत त्या त्या काव्यकलांचें संरक्षण त्या त्या स्थळीं करावें लागलें व तें साधलें गेलें.

१२. कांहीं अन्य काव्यकला — शब्दश्लेष, वाक्यश्लेष, लिंगभेदानें अर्थनिर्णय, अर्थविशदीकरणार्थ अन्यत्र खुणेचे शब्द, पर्यायवाचक शब्द वा वाक्यें, भावप्रकाशनार्थ दोह्यांत किंवा चौपाईत विशिष्ट शब्दसंख्या, शब्दांचा किंवा वाक्यांचा देहलीदीपाप्रमाणें उभयान्वयी उपयोग, इत्यादि विविध विपुल काव्यकलांचा उपयोग या आवृत्तींत मूलानुसार केला आहे. (क) प्रथमावृत्तींत कांहीं ठिकाणीं दोह्याच्या जागीं सोरठा किंवा सोरठ्याच्या जागीं दोहा वापरला होता; पण या वृत्तांचा उपयोग निरपवादपणें रस-भाव-पोषक सहेतुक असल्याचें ठरल्यामुळें तसा प्रमाद या आवृत्तींत घडला नाहीं. (ख) कार्यांतील त्वरानिदर्शक युक्ति, अध्यात्मपर अर्थास आधारभूत शब्द, योगपर अर्थास खुणेचे शब्द, दार्शनिकमतभेदांस वाव ठेवणारी शब्दरचना, संक्षेपयुक्ति, कालनिदर्शन कला, विविधमतसमन्वयकारक शब्दकला, इत्यादि गोस्वामीजींच्या अनेक काव्यकलांचें रक्षण या आवृत्तींत झालें आहे.

१३. कविता कामिनीचीं अंगें व भूषणें,–ध्वनि; गुणीभूत व्यंग; रस; भाव; रीति; गुण इत्यादि अंगें व शब्दालंकार अर्थालंकारादि भूषणें यांचें मूलानुसार संरक्षण प्रथमावृत्तीपेक्षां या आवृत्तींत बहुतांशानें साधलें आहे असें म्हणणें धाष्ट्याचें ठरणार नाहीं. (क) क्वचित् कांहीं ठिकाणीं युद्धांतील अलंकारांत थोडा बदल झाला असेल तर कांहीं ठिकाणीं मूळांत नसलेल्या जागीं अलंकार चढले असतील; पण अशीं स्थळें फार तर १५।२० च असतील. अलंकारांत भर हें एक प्रकरण पुढें आहे. (ख) तुलसी-मानसांत अंत्य यमकांमध्यें यमकानुप्रास नाहींच म्हटलें तरी चालेल; पण या आवृत्तींत या अलंकारांचा भरणा पुष्कळ आहे.

१४. निःसंदिग्ध अर्थ — श्रीतुलसी *मानस* अगाध असल्यानें त्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं अर्थनिश्चयासाठीं पूर्वापर संदर्भ व ग्रंथसंदर्भ यांचा सूक्ष्म विचार करावा लागतो, तेव्हांच निःसंदेह वाच्यार्थ सिद्ध होतो; अशा स्थळीं *मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला ॥* (दा. बो.) अशी दशा टीकाकारांत उत्पन्न झालेली दिसते; तसें होऊं नये म्हणून प्रज्ञामानस उथळ असल्यानें निःसंदेह एकच अर्थ घेतां येईल अशी रचना या आवृत्तींत झाली आहे. पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत कांहीं नमुने दिले आहेत.

१५. मराठी म्हणींचा उपयोग — 'विषीनें औषधांवाचून रोग दूर केला,' 'थोड्यानें उमजे सुज्ञांना' इत्यादि अर्थांच्या हिंदी म्हणींच्या समानार्थक मराठी म्हणींचा अधिक उपयोग या आवृत्तींत सहज साधला आहे.

१६. व्यावसायिक पारिभाषिक शब्द — निरनिराळ्या धंद्यांतील मराठी पारिभाषिक शब्दांचा उपयोग या आवृत्तींत अधिक केलेला आढळेल.

१७. कमलिनी-कमल-संबंध — चौपायारूपी कमलिनी व छंद, सोरठा व दोहा-रूपी त्यांचीं फुलें असा संबंध व असाच क्रम मूळांत असल्यानें चौपायांच्या जागीं

विविध वृत्तें व छंद, सोरठा, दोहा यांच्या जागीं विविधवृत्तें अनुवादांत वापरल्यास पुरइनि सघन चारु चौपाई । जुगति मंजु मनि सीप सुहाई ॥ छंद सोरठा सुंदर दोहा। सोई बहुरंग कमलकुल सोहा ॥ या मूळांतील चौपया एक तर अनुवादांत गाळाव्या लागतील, किंवा 'बोले एक करी एक' हा दोष अनुवादकाला शिरावर घ्यावा लागेल, याशिवाय तिसरा मार्ग नाहीं. हें जाणूनच जणूं काय प्रथमानुवाद समान वृत्तांतच करण्याची आज्ञा झाली असावी, असें आतां खात्रीपूर्वक वाटतें; म्हणूनच हा द्वितीयानुवादसुद्धां समवृत्तांतच केला गेला. (क) समवृत्त अनुवाद नसेल तर आणखी किती तरी दोष अनुवादांत उत्पन्न होतील; आणि मूळ लेखकाचे अर्थ व भाव प्रगट होणार नाहींत. (ख) कमललता तलावांत कुठें तरी उगवते व वाढत जाऊन तलावांत कुठें तरी अन्य भागीं फुलते; म्हणजेच तिचें कमल दिसूं लागतें. हें जसें तलावांत सहज घडतें तसेंच तुलसीमानसांतील चौपाया कमलिनी आणि त्यांची छंद, सोरठा, दोहा-कमलें यांचें घडलें आहे. हा कमलिनीकमलसंबंध ध्यानीं येण्यास संबंधदर्शक खुणेचे शब्द मूळांत जसे आहेत तसेच न वापरल्यास मानसांतील शेकडों वचनांचा अर्थ नीट लागणार नाहीं. कमलिनीचा विकास व सौंदर्यवृद्धि जशी कमलांच्या योगानें होते, तसाच एका ठिकाणच्या कित्येक चौपाईंचा पूर्ण अर्थविकास होण्यास तत्संबंधीं छंद, सोरठा किंवा दोहा उपयोगी पडतो. कमलांना आधार जसा कमलता असतात तसा दोहे, सोरठे, छंद यांना आधार कुठली तरी चौपाई किंवा चौपाया असतात. म्हणून कमलिनीकमलसंबंध मूलानुसार सुरक्षित ठेवणें ही एक फार मोठी जबाबदारी अनुवादकावर आहे. मूळांतीलच वृत्तें व मूळानुसार खुणेचे शब्द अशी रचना झाल्यामुळें ही जबाबदारी या आवृत्तींत पूर्णपणें पार पडली आहे, असें मानसाभ्यासी श्रद्धावंत, संतसंगतिमंत, काव्यरसिक भविष्यकाळीं म्हणतील किंवा गूढार्थचंद्रिका वाचक म्हणतील. 'श्रद्धापथधन ना जया नहि संतांची साथ। त्यांना मानस अगम अति ज्यां प्रिय ना रघुनाथ ॥ (१।३८) असें परमपूज्य गोस्वामीजीच म्हणाले आहेत व तें अगदीं अक्षरशः खरें आहे; हें २५ वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे. (ग) ही जर श्रोत्यांची स्थिति तर मग तुलसीमानसानुवाद लेखक कसा असला पाहिजे हें वाचकांनींच ठरवावें. या लेखकाचा तसा अधिकार नसतांहि श्रीसंत-रघुनाथ-कृपेच्या अनवरत वर्षावानें रेड्याच्या मुखांतून वेद बाहेर पाडावा, किंवा पांगळ्याला गौरीशंकर शिखर गांठतां यावें, किंवा देहेंद्रियादिकांनीं काक असून काकभ्रुशुंडीसारख्यानें कोकिळेच्या पंचम स्वरांत गावें इत्यादि परम अद्भुत गोष्टींप्रमाणच हा अनुवाद व गूढार्थचंद्रिका यांचें लेखन करविलें.

१८. समच्छंद अनुवादांत अडचणी — एका भाषेंतील काव्याचा दुसऱ्या भाषेंत समच्छंद अनुवाद करण्यांत अनुवादकाचे हातपाय बांधलेले असतात; तो पूर्ण परतंत्र असतो व भाषाभेदाच्या अडचणी असतात त्या निराळ्याच. तशांतहि तुलसीदासांच्या परमोत्कृष्ट व अप्रतिम मानसाचा मराठींत सरळ साधा वाच्यार्थच सांगणारा

अनुवाद लिहितांना अडचणींचे किती विशाल डोंगर आणि अगण्य, अपार सागर असतात याचें दिग्दर्शन प्रथमावृत्तींत केलें आहे. तशांतहि गूढार्थ, भावार्थ, भाव, अध्यात्मपर अर्थ, आधिदैविक अर्थ इत्यादि सर्वांचें रक्षण करणें तर अतिशयच कठिण; असें असतां या आवृत्तींत या सर्व गोष्टी सहज साधल्या, हें केवळ श्रीसंत-हरि-कृपेनेंच घडलें.

१९. बोलभाषेचा उपयोग — या आवृत्तींत जसं, तसं, असं, कसं, इथं इत्यादि बोलभाषेंतील अनेक शब्द वापरले आहेत; यामुळें मात्रांची बचत होऊन भावार्थादि संरक्षणाकडे विशेष लक्ष पुरवितां आलें. (क) दुसरा अनुवाद प्रथम लिहिला तेव्हां त्यांत गोस्वामींच्यासारखीं चार मात्रात्मक अंत्य यमकें वापरण्याचा प्रयत्न पुष्कळसा साधला होता. परंतु टीका लिहितांना आठवलें कीं यमकसौंदर्यासाठीं प्रसाद, अर्थसौकर्य व भावरम्यता यांची हानि झाली आहे. शब्दसौंदर्यापेक्षां अर्थगांभीर्य, प्रसाद व रसभावरम्यता यांचें महत्त्व विशेष असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं एकाक्षरी किंवा द्विमात्रात्मक यमकें वापरावीं लागलीं. (ख) यमकांचें बंधन न पाळतां निर्यमक काव्यरचना केली असती तर प्रसाद व माधुर्य गुण अधिक साधला असता, अनु-प्रासहि जास्त साधला असता; पण मूळ काव्यच सयमक असल्यानें त्याच्या प्रतिकृतींत निर्यमक रचना अयोग्य ठरली असती, व कर्णमधुरता कमी *वाटली असती*. संस्कृतांत द्वितीया व षष्ठी विभक्तींचे अनुस्वार ' योऽनुस्वारः ' माधुर्याची भरती करून निर्यमक काव्यसुद्धां कर्णमधुर बनवितात; शिवाय संस्कृत काव्यांत यमकांची अपेक्षाच कान करीत नाहींत. (ग) **श्लेषालंकार** — जेथें आहेत (फार नाहींत) तेथें क्वचित् हिंदी शब्द वापरूनसुद्धां अर्थविविधता साधली आहे, किंवा श्लेषोक्त अर्थांचे दोन शब्द वापरले आहेत. स्वतंत्र लेख ' श्लेषालंकार ' पुढें पाहावा.

२०. सर्वांगसुंदर व निर्दोष नाहीं — या अनुवादांत मूळांतील सौंदर्य व निर्दोषता बहुतांशानें साधली असली तरी अनुवाद सर्वांगसुंदर व पूर्ण निर्दोष झाला आहे असें म्हणण्याचें धाडस या मंद, मलिन मतीस करवत नाहीं.

२१. कठिण शब्दांचे अर्थ — कठिण शब्द कोणते हें ठरविणें फारच कठिण आहे, कारण ही कठिणता वाचक-सापेक्ष असते; तथापि आवश्यक वाटणाऱ्या शब्दांचे अर्थ, वक्ता कोण याचें स्पष्टीकरण व मात्रान्यूनतेच्या सूचना या गोष्टी पादटीपांत द्यावयाच्या आहेत; पण अनुवादाच्या छोट्या आकाराच्या पुस्तकांत हें करतां येणार नाहीं. मोठ्या आकाराची आवृत्ति निघाल्यास व तोंपर्यंत हा देह राहिल्यास या हातांनीं तें घडेल; अन्यथा मुद्रण प्रत वगैरे लेखनाच्या कार्यानंतर देह राहिल्यास हस्तलिखित अनुवादांत हें लिहून ठेवलें जाण्याचा संभव आहे. *' तेंचि घडे जें रामा वाटे '*.

२२. वासरांत लंगडी गाय शहाणी — प्रथमावृत्तीचें स्वागत व कौतुक वाचक व श्रोते समाजांत करीत असले तरी त्या अनुवादांत परिस्थिति व भगवदिच्छाजनित

आणि तुलसीमानसाच्या अपूर्ण ज्ञानानें उत्पन्न झालेले असे पुष्कळ दोष आहेत हें या बुद्धीस स्पष्ट दिसत आहे. त्या मानानें ही आवृत्ति पुष्कळ निर्दोष झाली असली आणि प्रथमावृत्तीपेक्षां द्वितीयानुवाद फार सोपा झाला आहे असें त्याचे वाचक (हस्तलिखिताचे) म्हणत असले आणि प्रकाशित झाल्यावर सर्व समाजानें (वाचक व श्रोते) अधिक कौतुक व प्रशंसा केली तरी तें सर्व वासरांत लंगडी गाय शहाणी किंवा ' विरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ' याच्यासारखेंच आहे व होईल असें या बुद्धीस वाटतें. (क) ज्यांना दोष दिसत नाहींत किंवा दिसत असून बघत नाहींत, अथवा तुलसीरामायणप्रेमामुळें 'दोष गुण वाटतात ते प्रशंसा करतात व द्वितीयावृत्तीची शतपट प्रशंसा करतील. (ख) दोष शोधणारांस निर्दोष असलेल्या तुलसीमानसांतसुद्धां ते दिसतात व त्यांचें खंडन झणझणीत नेत्रांजन घालून हा लेखक आवडीनें करतोहि; मग खरोखरच ज्यांत दोष आहेत त्यांत दोषशोधकास ते दिसतील यांत नवल काय ?

उपसंहार — हा अनुवाद कां व कसा जन्मास आला व यांत विशेष काय साधलें इत्यादींची अगदीं संक्षिप्त रूपरेषा द्विरुद्रसंख्याक परिच्छेदांत यथामति दाखविली.

पूर्वीं सुचविल्याप्रमाणें प्रस्तावना-वाचकांच्या सुखसोईसाठीं चौपाई, छंद, सोरठा, दोहा या हिंदी वृत्तांचीं लक्षणें उदाहरणांसह देवून वैशिष्ट्य सांगण्याचें कार्य पुढील प्रकरण करील.

जय जय रघुवीर समर्थ ।

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।३ 卐 卐 卐

चौपाई, छंद, सोरठा व दोहा-लक्षणादि

कमलिनि सघन चारु चौपाया ।
छंद सोरठा दोहा मंजुल ॥
शोभे बहुरंगी अंबुज कुल ॥ (१।३७।४-५).

श्रीरामचरितमानसांत चौपाई, छंद, सोरठा आणि दोहा या चार हिंदी भाषेंतील वृत्तांचाच भरणा जास्त आहे. मानसाची रचना मुख्यतः चौपाई वृत्तांतच आहे; म्हणून तिकडे कोणी त्यास चौपाई रामायणहि म्हणतात. श्रीरामचरितरूपी मानससरोवरांत चौपाया = कमलिनी = कमलवेली आहेत; व त्या सघन-दाट-असून चारु-सुंदर आहेत. सुंदर छंद, सुंदर सोरठा, व सुंदर दोहा हीं विविध वर्णांचीं कमलें आहेत. या प्रकरणांत या वृत्तांचीं लक्षणें व उपयोग यांचा विचार करावयाचा आहे.

१. चौपाई — हें मात्रागणवृत्त आहे. चार चरणांची म्हणून चौ-पाई हें नांव

पडलें असावें; म्हणूनच हिंदींत *खाटेला चौपाई*च म्हणतात. (क) चौपायांच्या संख्येच्या गणनेंत उत्तर हिंदुस्थानांत दोन प्रथा चालू आहेत. एका प्रथेंत १६।१६ मात्रांच्या चार चरणांस चौपाई म्हणतात. ही प्रथा गीताप्रेस (गोरखपूर) च्या व इतर कांहीं प्रतींत प्रचलित आहे. कांहीं प्रतींत चौपायांना संख्याक्रमच दिलेला नसतो. कल्याणच्या मानसांकांत जेथें चौपायांना क्रमांक दिले आहेत तेथें पुष्कळ ठिकाणीं दोन चरणांनासुद्धां चौपाई मानली आहे. ७।९।११।१३ अशा विषमपंक्ती जेथें आहेत तेथें ४, ५, ६, ७ अशीच चौपायांची गणना केलेली आहे. वाल्मिकी रामायणांत सर्गाच्या शेवटीं असणाऱ्या अर्ध्या श्लोकाला संख्या दिलेली नसतांहि, कांहीं टीकाकार वा. रामायणाचें उदाहरण ठोकून देतात !

(१) सोळा मात्रांच्या दोन चरणांना (दोन चरणी लहान अभंगाप्रमाणें) चौपाई गणल्यानें गणनेंत वरच्यासारखी असंबद्धता येत नाहीं, अन्यथा हा दोष वारंवार स्वीकारावा लागतो. सेवानिवृत्त हिंदी संस्कृत इंग्रजीचे प्राध्यापक तरुणेंदुशेखर तिवारीजींनीं कल्याणच्या मानसांकांतील गणनेवर आक्षेप घेऊन या लेखकास शंका विचारली होती (पत्र शिल्लक आहे).

(२) **हनुमानचालीसा** (चाळीसा) हें स्तोत्र तुलसीदासांचेंच आहे हें त्यांतील मंगलाचरण व उपसंहार यांवरून ठरतें. त्यांत दोन चरणांच्या समूहालाच एक चौपाई गणल्यामुळें चाळीस ही संख्या झाली आहे व *चाळीसा* हें नांव त्या स्तोत्रांसच दिलेलें आहे. 'जो यह पढ़ हनुमान-*चालीसा*' हें स्तोत्र तुलसीदास विरचित आहे हें '**तुलसीदास** सदा हरि-चेरा' या त्यांतील उल्लेखावरून स्पष्ट आहे.

(३) **प्रो. राजबहादूर लमगौडाजी** M. A. LL. B. '**विश्वसाहित्यमें रामचरितमानस**' या आपल्या पुस्तकांत लिहितात कीं "चौपाई छंद में चार पद (चरण) होते हैं, पर फारसी भाषा के प्रभाव से मलिक महम्मद नायसी, और उन के प्रभाव से *तुलदासजी ने उसका प्रयोग इस प्रकार किया है कि हम बहुधा अर्धाली को* [दोन चरणांना] *चौपाई कहते हैं।*" हा पुरावा १२।८।५१ रोजीं मिळाला.

(४) **पं. हरिप्रसाद व्यासजी** रामायणी, सूर्य मोहोल्ला, बनारस यांच्या घराण्यांत वंशपरंपरेनें रामलीला चालू आहे. ते दोन चरणांच्या समूहालाच चौपाई मानतात हें १९३९ सालीं अजमीर येथें दोन महिन्यांच्या त्यांच्या संगतींतील श्रीमानसचर्चेंत त्यांच्याकडून समजलें.

(५) **सत पंच चौपाई** — दोन चरणांच्या समूहालाच चौपाई मानल्यानें मानसांतीलच 'सत पंच चौपाईं मनोहर' (पांच सात चौपाई मनोहर...' ७।१३०। छंद गू. चं. पाहा.) याचा निश्चित, सुंदर, यथार्थ लागतो व कल्पनांच्या काननांत भटकत राहून १० पुरभय्ये व ११ चुली अशी दशा होत नाहीं; कारण कीं, ५ + ७ = १२ (ओळींत) चौपायांत ध्यानयोग्य रामरूपाचें वर्णन फक्त एकाच ठिकाणीं आहे.

(६) श्रीमानस गुरु बाबा श्रीगंगादासजी दोन चरणांच्या समूहालाच चौपाई म्हणत असत. हा सांप्रदायिक परंपरेचा पुरावा आहे.

(७) **या अनेक सबळ पुराव्यांमुळें या आवृत्तींत १६।१६ मात्रांच्या दोन चरणांना चौपाई म्हटलें आहे,** व दुसऱ्या प्रथेचें अनुकरण केलें आहे. (**क**) प्रथमावृत्तीच्या वेळीं या गोष्टांचा विचार करण्यास वेळच नव्हता; आणि कल्याण मानसांकाची प्रत जवळ होती; आणि बाकीचे सर्व आधार जवळ होतेच, पण प्रो. लमगौडाजींच्या ग्रंथाचा पुरावा मिळाला नव्हता म्हणून मानसांकानुसार गणना केली गेली.

उदाहरणार्थ पहिल्याच चौपाया घेऊं :—

वन्दे गुरुपद–पद्म परागा। सुरुचि सुवास, सरस अनुरागा ॥ १ ॥ अमृतमुळीमय चूर्ण सुचारू। शमन सफल भवरुज-परिवारू ॥ २ ॥ अशा पद्धतीनें चौपायांची गणना या आवृत्तींत केली आहे. दोन दोन चरणांतच वाक्य आणि अर्थ यांची पूर्ति झाली आहे. अशा एका चौपाईत अर्थ पूर्ण होत नाहीं अशीं उदाहरणें मानसांत फारच थोडीं आहेत.

लक्षणें — चौपाईला १६।१६ मात्रांचे दोन चरण असतात. लहान अभंगाप्रमाणें यमक चरणांच्या शेवटीं असतें. यति (विश्रामस्थान) मुख्यतः ८ मात्रांवर असतो; पण संगीतानुरोधानें ७ किंवा ९ मात्रांवरही यति आढळतो; अशीं उदाहरणें हिंदींत थोडीं आहेत; मराठींत फारच थोडीं आहेत. (**क**) आर्या किंवा गीति मात्रागणवृत्त असूनसुद्धां त्यांत पहिला जगण (जनास सारखा, मध्यदीर्घ) चालत नाहीं. असाच नियम चौपाईतही आहे. मात्र दोन शब्दांतील तीन अक्षरांत जगण असला तरी चालतो. उदा. ‘ रहे *महा* भट ताके संगा ’ (५।१९।६) यांतील रहे*म* मिळून मोजण्यांत जगण होत असला तरी उच्चारांत होत नाहीं; कारण दोन शब्दांच्या उच्चारांत मध्यें थोडा वेळ जातो. सदोष उदाहरण पहा; — ‘ *विनंति* तुजला करूं रावणा ’ यांत एकाच शब्दांत आरंभीं जगण आहे म्हणून हा दोष आहे.

या आवृत्तींत हा नियम कसोशीनें पाळला असल्याचें स्मरतें; चुकून प्रमाद झाला असल्यास न कळे. **या गणनेप्रमाणें मानसांत सुमारें दहा हजार चौपाया आहेत.**

चौपाई कशी म्हणावी — चौपाया म्हणण्याची पद्धति हिंदी भाषिकांत पुष्कळच भिन्न भिन्न आढळली. पण ‘ अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ’ या चर्पटपंजरिका स्तोत्रांतील *पादाकुलक* वृत्तीची चाल सोपी व उत्तम आहे. परंपरेनें श्रवण करून समजून घेणें अधिक चांगलें.

कटाव व चौपाई एकच वृत्त — मराठींतील कटावांची रचनासुद्धां चौपायांसारखीच आहे; ही गोष्ट कांहीं कीर्तनकारांस-कथेकऱ्यांस-सांगितली तेव्हां ते उपहासात्मक हसले ! त्यांस खरेंच वाटेना; पण कटाव चौपाईच्या चालीवर व चौपाई कटावाच्या चालीवर म्हणून दाखविल्या तेव्हां पटलें व ते लाजले. **कटावाचें उदाहरण** = रत्नजडित अडणीवर

ताट । बसण्याला सोन्याचा *पाट* ॥ रांगोळ्यांचा थाट मनोहर । उदबत्त्यांचा सुगंध सुंदर ॥ चरणांतील अंत्य ह्रस्वाक्षर दीर्घ वाचण्याची मराठींतील व संस्कृतांतील प्रथा हिंदींत नाहीं. तथापि मराठींतील पद्धतीप्रमाणें या आवृत्तींत तसे प्रयोग कांहीं ठिकाणीं आहेत.

सूचना — या आवृत्तींतील चौपायांची प्रथमावृत्तींशीं तुलना करतांना येथील क्रमांक त्यांतील ओळींचा (अर्धालींचा) समजावा म्हणजे झालें.

२. छंद — हिंदी भाषेंतील छंदांपैकीं तीन प्रकारचेच छंद मानसांत आहेत. '*विश्वसाहित्य में रामचरितमानस*' या पुस्तकांत '*पिंगल*' प्रकरणांत दोनच छंदांचा निर्देश केला आहे पण ती नजरचूक आहे. तिसऱ्या प्रकारचा छंद अति अल्प प्रमाणांत असल्यानें प्रोफेसरांचें लक्ष गेलें नसावें.

(१) हरिगीतिका छंद — मानसांतील पहिलाच छंद या जातीचा आहे तेंच उदाहरण घेऊं. हिंदींत कुटिलगति निदर्शनासाठीं मुद्दाम छंदोभंग केलेला आहे, पण पहिलाच छंद आणि मराठी वाचकांस अपरिचित, म्हणून तेथें मराठींत छंदोभंग ठेवला नाहीं; आधीं उदाहरण घेऊन त्यावरून लक्षण सांगणेंच अधिक उपयुक्त होईल :— छंद–करि मंगला हरि कलिमला रघुनाथगाथा परम । गति काव्यसरितें, कुटिल जेवीं, पुण्यपाथांची मही ॥ (१।१० छंद). हे हरिगीतिका (हरिगीति) छंदाचे दोन चरण आहेत. अशा चार चरणांची एक हरिगीति होते, व **प्रत्येक चरणांत २८ मात्रा** २, ३, ४; ३, ४; ३, ४; २, ३; या क्रमानें असाव्या लागतात. यांतील *चार मात्रांच्या विभागांत जगण नसावा*. **(क)** '*यति*' – गणनेंत ग्रंथकारांत मतभेद आहेत; म्हणून प्रत्यक्ष तालावर म्हणतांना जेथें 'यति' येतो व उत्तम ताल-सुरावर वाचतां–म्हणतां येतें त्या स्थानीं वरील दुसऱ्या चरणांत स्वल्पविराम दिले आहेत व मात्रागणनेंत तींच स्थानें अर्धविरामानें दर्शविलीं आहेत. यति ९, ७, ७, व अंतीं समजणें उच्चारानुसार योग्य ठरतें. २, ७, ७, ७, ५ असे मात्राखंड पडले पाहिजेत. **पहिल्या दोन मात्रा सोडून पुढील अक्षरांवर ताल घ्यावा म्हणजे मानसांतील कोणताहि छंद सरळ वाचतां व म्हणतां येईल.** या हरिगीतिका छंदांचा भरणा अधिक आहे.

(२) चवपैया छंद–चौपदी (मराठींत म्हणावें) — चवपैया हें नांव मानस-राजहंस पं. त्रिपाठीजींनीं **'मानसप्रसंग'** ग्रंथांत पृ. १२८ वर दिलें आहे. या प्रकारालाच प्रो. लमगौडाजींनीं 'विश्वसाहित्यमें रामचरितमानस' या पुस्तकांत पृ. १२९ वर त्रिभंगी हें नांव दिलें आहे, पण ते म्हणतात कीं **शुक्लजींनीं** दिलेल्या माहितीवरून हें मीं लिहिलें आहे (पृ. १२२), मी यांतील तज्ञ नाहीं; इत्यादि. त्यांनीं 'चवपैया'चा उल्लेखच केलेला नाहीं. हे असे मतभेद व अनास्था तिकडील सुप्रसिद्ध मानसाभ्यासी पंडित, शास्त्री, पदवीधर ग्रंथलेखकांत आहेत ! त्रिपाठीजींनीं दिलेलें

नांव योग्य मानून **आपण या छंदास ' चौपदी ' हें समानार्थक पण सोपें नांव देऊं.**
चौपदी छंदाचें उदाहरणः ब्रह्मस्तुतींतील पहिला छंद घेऊं (१।१८६।१).

जय जय सुरनायक जन-सुख-दायक *प्रणतपाल भगवन्ता।*
गो द्विजहित-कारी; जय असुरारी; सिंधुसुताप्रिय; कान्ता॥

या चौपदी छंदांत प्रत्येक चरणांत वर दाखविल्याप्रमाणें ३० मात्रा असतात. यति १०, ८, ८, ४ मात्रांवर समजणें योग्य. त्रिपाठीजी व लमगौडाजी (= शुक्लजी) १०, ८, १२ मात्रांवर यति मानतात. या छंदांतही चार चरण असतात. यांची संख्या हरिगीतिपेक्षां कमी आहे.

(३) त्रिभंगी छंद — त्रिभंगी छंदांत चार चरण असून प्रत्येकांत ३२ मात्रा असतात. यति १०, ८, ८, ६ मात्रांवर असतो. याचें उदाहरण अहल्याकृत स्तुतींतील पहिला छंद :— (१।२११।१)

स्पर्शत पद पावन शोक-विनाशन तीं प्रगटे तपराशि खरी।
देखत रघु-नायक, जनसुखदायक, राहि पुढें कर, जुळुनि, परी॥

चरणांतील अंत्याक्षर या सर्व छंदांत दीर्घच असावें; ताल पहिल्या दोन मात्रांपुढील अक्षरावर घ्यावा. त्रिभंगी छंद फारच थोडा आहे.

या छंदांचा उपयोग — मानसांत जेथें हे छंद वापरले आहेत तेथें चौपायांनंतर एक किंवा अधिक छंद वापरले आहेत. चौपाया व असल्यास छंद यांची गणना दोह्यांच्या अंगभूतच केली जाते म्हणून मानसाच्या पुष्कळ प्रतींत चौपाया व छंद यांना क्रमांक दिलेले नाहींत. गोरखपूरच्या मोठ्या टायपाच्या (केवल मूल पाठ) प्रतींत व गुटक्यांत चौपायांना अंक दिलेले नाहींत. एका दोह्याच्या अंगभूत अधिक दोहे किंवा सोरठे असतात व या सर्व समूहाला एक दोहा म्हणतात. १४ ठिकाणीं दोह्याच्या अंगभूत चौपाया मुळींच नसून नुसते चार किंवा अधिक छंदच अंगभूत आहेत. अशी विचित्र रचना करण्यानें सरोवरांतील कमलिनी व कमलें यांचें सादृश्य पूर्णपणें दाखविलें आहे. कांहीं ठिकाणीं अनेक भिन्नवर्णी कमलें फुलून तेथें कमलिनीचें दर्शन होत नाहीं. छंदांनंतर सोरठा किंवा दोहा असतो, किंवा दोन्ही असतात; म्हणून आतां थोडा क्रमभंग करून दोहा-लक्षण प्रथम पाहूं :—

२. दोहा — दोहा वृत्त हिंदी भाषेंत विपुल आहे. मयूरकवींनीं दोहारामायण व सोरठारामायण लिहिलें असलें तरी हीं वृत्तें त्यानंतर मराठींत रूढ होऊं शकलीं नाहींत; तीं आतां रूढ होत आहेत. हीं वृत्तें मराठी सर्वसाधारण वाचकांस अपरिचितच आहेत. **नवीन वृत्तदर्पणांत दिलेलें दोहालक्षण चुकीचें आहे.** (क) दोहा वृत्तांत आर्येसारखे चार चरण असतात. पहिल्या व तिसऱ्या चरणांत १३।१३ (८+५) मात्रा असून दुसऱ्या व चौथ्या चरणांत ११।११ (८+३) मात्रा असतात व याच दुसऱ्या व चौथ्या चरणांत यमक असतें. यमकांतील अंत्याक्षर ह्रस्व व उपान्त्याक्षर दीर्घ असावें लागतें.

सूचना — पहिल्या आणि तिसऱ्या चरणांत लेखनांत व गणनेंत १३।१३ मात्रा असल्या तरी उच्चारांत १४।१५ होतात.

उदाहरण — **धर्ममूल आहे दया पापमूल अभिमान।**
प्रज्ञा दया न सोडणें जोंवर देहीं प्राण ।।
२२ १२ १ २१२ २११ २२ २१

उच्चार — **धर्ममूल आ, हे दयाSSपापमूल अभि, माSSन।**
प्रज्ञा दया न, सोडणेंSSजोंवर देहीं, प्राSSण ।।

यति — प्रत्येक चरणांत आठ मात्रांवर यति असतो, उच्चाराच्या उदाहरणांत त्या जागीं स्वल्पविराम चिन्हें दिलेलीं आहेत व जेथें उच्चार लांबवावा लागतो तेथें SS अशीं चिन्हें दिलीं आहेत. हा श्रीतुलसींच्या प्रसिद्ध दोह्याचाच लिहितां लिहितां झालेला अनुवाद आहे.

दुसरें उदाहरण —

हिंदी — निसिचर निकर पतंग सम रघुपति बाण कृसानु ।।
जननी हृदयँ धीर धरु जरे निसाचर जानु ।। (५।१५।–)

मराठी — निशिचर-निकर पतंगसम रघुपति बाण कृशान ।
जननी हृदयीं धीर धर दग्ध निशाचर जाण ।।

(५।१५।–) लेखनांत १३।११; १३।११ मात्राच आहेत; पण उच्चारांत 'म' आणि 'र', 'शा' आणि 'जा' च्या १।२ मात्रा वाढवाव्या लागतात. हिंदी दोह्यांत तिसऱ्या चरणांत लेखनांत १२ मात्राच आहेत; पण 'धरु' मधील रु उच्चारांत दीर्घ होतो, म्हणून मात्रान्यून नाहीं. **ही दोह्याच्या शुद्ध उच्चाराची पद्धति आहे. दोहा हें घोषणा–ललकारणी–करणारें वृत्त आहे.**

३. **सोरठा** – वरील दोह्याच्या चरणांची अदलाबदल केली कीं सोरठा तयार होईल.

सो० — रघुपति बाण कृ*शान* निशिचर निकर पतंग*सम* ।
दग्ध निशाचर *जाण* जननी हृदयीं धीर धर ।।

शान आणि जाण यांचा उच्चार दोह्यांतल्या सारखाच शाSSन, जाSSण असा करावयाचा पण *सम* आणि धर यांतील म, र लांबवावयाचे नाहींत इतका उच्चारांत फरक आहे. पापमूल अभिमान धर्ममूल आहे दया ।। जोंवर देहीं प्राण प्रज्ञा दया न सोडणें ।। याप्रमाणें सोरठा वृत्तांत ११।१३; ११।१३; अशा मात्रा क्रमशः चार चरणांत असतात; यमक पहिल्या व तिसऱ्या चरणांतीं दीर्घ व ह्रस्व (गुरु लघु) अशा दोन अक्षरांचें असतें. दुसऱ्या व चौथ्या चरणांतीं यमक पाहिजेच असें नाहीं. असलें तरी चालेल व नसलें तरी चालेल. यति प्रत्येक चरणांत दोह्याप्रमाणेंच ८ मात्रांनंतर असतो.

दोहा-सोरठा-उपयोग — या वृत्तांच्या उपयोगाविषयीं मानसाच्या हिंदी टीकाकारांनीं निश्चयात्मक सिद्धान्त (निदान मानसापुरता तरी) सांगितलेला नाहीं; परंतु

श्रीगोस्वामींनीं **यांचा उपयोग रसभावानुसारीच केलेला आढळतो.** या दोन वृत्तांतील रचनाभेद व उच्चारभेद वर दाखविलाच आहे; त्या भेदांमुळें यांच्या रसभावोत्पादक व रसभावपोषक शक्तींत मोठेंच अंतर पडतें. ' धर्ममूल आहे दया पापमूल अभिमान। प्रज्ञा दया न सांडणें जोंवर देहीं प्राण ॥ यांत प्रत्येक चरणांत उत्साह व उच्चारांतील स्वर दीर्घ होत जातो. आरोहानंतर आरोह पुनःपुन्हां आहे व अवरोह मुळींच नाहीं. यामुळें घोषणा करण्यासारख्या, ललकारून जाहीर करण्यासारख्या, भावना या वृत्तानें उद्दीपित होतात व उत्साहादींची वृद्धि होत जाते; म्हणून वीर, भयानक, रौद्र इत्यादि कठोर रसांच्या पोषणांत व त्यांच्या भावना उद्दीपित करण्यांत याचा चांगला उपयोग होतो. **याच हेतूनें दोहा वृत्ताचा उपयोग मानसांत केला आहे.**

सोरठा वृत्ताच्या पहिल्या व तिसऱ्या चरणांत आरोह असला, उत्साह असला, तरी शेवटच्या अगदीं ह्रस्वोच्चारानें कठोरता थोडी कमी होते व पुढील चरणांत व शेवटीं अवरोहच असल्यानें उत्साह कमी होतो व कोमलताच उत्पन्न केली जाते. म्हणून या वृत्ताचा उपयोग कोमल रसांचा परिपोष व त्यांच्या भावनांचें उद्दीपनादि करण्यांत चांगला होतो. क्रोधाचें भाषण सोरठा वृत्तांत केलें तर तो क्रोध आपलें कार्य शब्दांनीं करूं शकणार नाहीं; आणि करुणा, विरह, विषाद, वात्सल्य यांचें वर्णन दोहा वृत्तांत केलें तर ऐकणाराच्या ठिकाणीं तो रस व त्याचे भाव जागृत होणार नाहींत. अशाच हेतूनें मानसांत सोरठा वापरला आहे; म्हणून सोरठ्यांची संख्या दोह्यांच्या मानानें फारच कमी आहे. रघुवीराचेंच चरित्र असल्यानें वीर रसच जास्त प्रमाणांत आहे. **सोरठ्याच्या उपयोगांतील वरील नियमाला मानसांत एकहि अपवाद नाहीं.**

श्रीमानस नाट्यमहाकाव्य असल्यानें तें श्राव्य व अभिनेय आहे; म्हणून वृत्तांचा असा उपयोग करणें आवश्यकच होतें, या अशा सहेतुक सापेक्ष उपयोगामुळें श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या चित्तांत ते ते रस व भाव उद्दीपित करण्याचें सहज सामर्थ्य मानस-काव्यांत आलें आहे.

छंदांचा उपयोगही सहेतुक — दोहा व सोरठा हीं वृत्तें जशीं रसभावानुकूल वापरलीं आहेत, तसेंच हरिगीतिकादि तीन छंद किंवा तोमर, तोटक, प्रमाणिका व भुजंगप्रयात हे छंदसुद्धां दोह्यांच्या अंगभूत व सहेतुक सापेक्षतेनेंच वापरलेले आहेत.

जेथें एखाद्या रसाचा किंवा तदंगभूत भावाचा विशेष परिपोष किंवा उद्दीपन करावयाचें असतें तेथें या छंदांचा उपयोग केलेला आहे. रस किंवा भाव जितके जास्त पुष्ट करावयाचे असतील, किंवा पुष्ट झालेले असतील तितकी त्या दोह्यांत छंदांची संख्या जास्त झालेली दिसेल. एका हास्यरसाशिवाय इतर सर्व रसांच्या परिपोषांत छंदांचा उपयोग केलेला आहे. हास्य हा पूर्ण स्वतंत्र रस नसून विविध रसांतून तो प्रगट होतो; म्हणून छंदांत हास्यरस मुळींच नाहीं असें नाहीं.

वि. ल. ठे. — कांहीं कांहीं ठिकाणीं कवि त्या त्या रसांत इतके रंगले आहेत कीं दोह्याच्या अंगभूत असणाऱ्या किमान ८ चौपायांची संख्या ५,२ अशी झाली आहे व कांहीं (१४) ठिकाणीं तर मुळींच चौपाई नाहीं. प्रमाणिका, तोटक वगैरे छंदांची संख्या तर १०–१२ पर्यंत गेली आहे.

सूचना — (१) चौपायांनंतर येणाऱ्या दोह्याच्या अंगभूत एकपासून सात-पर्यंत दोहे किंवा दोहे-सोरठे आहेत; अशा ठिकाणीं इतर प्रतींत व प्रथमावृत्तींत क, ख, ग, घ, ङ इत्यादि अक्षरें आवश्यकतेनुसार वापरलीं आहेत. पण हीं अर्थहीन अक्षरें वापरण्यापेक्षां भगवंताचें स्मरण करविणारीं अक्षरें (वा मंत्र) वापरणें भक्तिप्रधान ग्रंथांत अधिक सयुक्तिक व उपयुक्त वाटल्यामुळें **द्वितीयावृत्तींत ' रामचंद्राय-नमः ' या सप्ताक्षरी राममंत्रांतील अक्षरें आवश्यक तेवढीं क्रमानें वापरलीं आहेत.** सातापेक्षां जास्त दोहे कुठेंच नाहींत म्हणून सप्ताक्षरी मंत्र घेतला. १४ रा, १४ म, १४ चं, १४ द्रा, १४ य, १४ न, १४ मः अशाप्रकारें गणना केली आहे. (२) शेवटीं केवळ सोरठाच असला तरी काव्यसंख्यागणनेंत तो दोहाच म्हटला जातो. अयोध्या कांडांत ३२६ दोहे आहेत असें म्हणतात; पण १३ ठिकाणीं दोहा नसून सोरठाच आहे. ही तिकडे सर्वमान्य असलेली परिभाषा व गणनापद्धति मानसाविषयीं मराठींतही चालू झाली आहे. प्रभातफेरींत दोहे म्हटले जात आहेत.

छंद, सोरठा, दोहा—बहुरंगी अंबुजकुल कसें व चार वर्णांच्या कमलांची वांटणी छंद, सोरठा, दोहा या तीन प्रकारांत कशी करावयाची याचें सविस्तर वर्णन गूढार्थ-चंद्रिकेंतच पाहणें बरें. बालकांड दोहा ३७ च्या ५ व्या चौपाईच्या टीकेंत ही चर्चा केली आहे.

ल. ठे. — दोहे, सोरठे यांच्या उपयोगांत रचनाभेदानुसार व उच्चारपद्धतीप्रमाणें भेद करावा लागला तसा हरिगीतिका, चौपदी व त्रिभंगी यांचे प्रयोगसुद्धां सहेतुक सापेक्षतेनें केलेले असावेत असें वाटतें; पण त्या दृष्टीनें सूक्ष्मावलोकन करण्यास वेळ मिळाला नाहीं. त्या सर्व छंदांचें तौलनिक निरीक्षण केलें कीं श्रीहरि-गुरुकृपेनें रहस्य बाहेर पडेल असा अनेक वेळां आलेल्या अनुभवानें पूर्ण भरंवसा वाटतो.

चौपाई, छंद, सोरठा व दोहा यांचीं सोदाहरण लक्षणें आणि मानसांत त्यांचा उपयोग सहेतुक व सापेक्ष कसा आहे हें दाखवून त्यांच्या वाचनाविषयीं आवश्यक व उपयुक्त सूचनाहि या प्रकरणांत दिल्या गेल्या. मानसांत वापरलेल्या संस्कृत भाषेंतील बारा छंदांचीं लक्षणें पुढील (४ थ्या) प्रकरणांत सांगितलीं आहेत.

जय जय अद्‌भुत कविवर तुलसी । कविता रामप्रिय सम तुलसी ॥
जय तुलसीप्रिय राम रमेश्वर । रघुकुल सरसिज विपिन दिनेश्वर ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।४ 卐 卐 卐

इतर छंदांचीं (वृत्तांचीं) लक्षणें

१. श्रीमानसांतील प्रमुख हिंदी वृत्तांचें विवेचन पूर्व प्रकरणांत यथामति केलें. संस्कृतांत वृत्तांना छंद म्हणतात; व छंदोरचनाशास्त्रास छंदःशास्त्र म्हणतात; यामुळेंच गोस्वामींनीं इतर सर्व वृत्तांस छंद संज्ञाच दिली आहे. (क) पूर्वीं वर्णिलेल्या चार हिंदी वृत्तांशिवाय इतर १२ वृत्तांचा (छंदांचा) उपयोग मानसांत केला आहे. त्यांतील अनुष्टुभ्, शार्दूलविक्रीडित, वसंततिलका, वंशस्थ, इन्द्रवज्रा, मालिनी, स्रग्धरा आणि रथोद्धता या आठ वृत्तांचा उपयोग सात कांडांतील मंगलाचरणांत व ग्रंथाच्या उपसंहारांत केलेला आहे; आणि कथाभागांत नगस्वरूपिणी (प्रमाणिका) तोमर, तोटक आणि भुजंगप्रयात या चार छंदांचा उपयोग केलेला असून क्वचित् अनुष्टुभ् छंद आहे.

प्रथम मंगलाचरणांतील वृत्तांचीं लक्षणें काण्डक्रमानुसार देऊन नंतर शेष चार वृत्तांचीं लक्षणें काण्डक्रमानुसारच दिलीं आहेत.

१. **अनुष्टुभ्** (अनुष्टुप्) (**अनु.**) (बाल. श्लो. १) — अनुष्टुभ् छंदांत चार चरण असतात व प्रत्येकांत आठ अक्षरें असतात. प्रत्येक चरणांतील पांचवें अक्षर लघु (ह्रस्व) आणि सहावें अक्षर गुरु (दीर्घ) असतें. दुसऱ्या व चौथ्या चरणांत सातवें अक्षर दीर्घ असतें. मात्रांच्या संख्येचा व गणांचा नियम नाहीं. उदा० — ' वर्णानामर्थ-संघानां रसानां छंदसामपि ।। मंगलानां च कर्तारौ वन्दे वाणीविनायकौ ।। १ ।।

२. **शार्दूलविक्रीडित (शा. वि.)** (बाल. श्लो. ६)—या वृत्तांत चार पाद असतात व प्रत्येकांत १९ अक्षरें असतात, यति १२ व्या अक्षरावर असतो. प्रत्येक चरणांत म, स, ज, त, त, ग(गुरु)असे गण असतात. उदा०—'यन्मायावशवर्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवासुराः।'

३. **वसंततिलका (व. ति.)** (बाल. श्लो. ७) — यांत चार पाद असून प्रत्येकांत १४ अक्षरें असतात. त, भ, ज, ज, ग, ग, (दोन गुरु अक्षरें) हे गण प्रत्येक चरणांत असतात; उदा० — ' नानापुराणनिगमागमसंमतं यद् । '

४. **वंशस्थ (= वंशस्थविल, वंशस्तनित**) (अयोध्या. श्लो. २) — या वृत्ताच्या चारी चरणांत प्रत्येकीं १२ अक्षरें असतात व प्रत्येक चरणांत ज, त, ज, र, हे गण असतात. उदा० — ' प्रसन्नतां या न गताऽभिषेकतः । '

५. **इन्द्रवज्रा** (अयोध्या. श्लो. ३) — यांत चार चरण असून प्रत्येकांत ११ अक्षरें व त, त, ज, ग, ग, हे गण असतात. उदा० — ' नीलाम्बुजश्यामलकोमलाङ्गं सीतासमारोपितवामभागम् । '

६. **मालिनी** (सुन्दर. श्लो. ३) — यांत चार चरण असून प्रत्येकांत १५ अक्षरें व न, न, म, य, य हे गण असतात. यति ८,७ अक्षरांवर असतो. उदा० — ' अतुलित बलधामं स्वर्णशैलाभदेहम् । '

७. स्रग्धरा (लंका. श्लो. १) — यांत चार चरण असतात; प्रत्येकांत २१ अक्षरें व म, र, भ, न, य, य, य हे सात गण असतात. यति ७।७ अक्षरांवर असतो. उदा० — रामं कामारिसेव्यं भवभयहरणं कालमत्तेभसिंहम् ।'

८. रथोद्धता (उत्तर. श्लो. २,३) — या छंदांत चार चरण असतात; व प्रत्येकांत ११ अक्षरें आणि र, न, र, ल, ग (लघु व गुरु अक्षरें) हे गण असतात; उदा० — ' कोसलेन्द्रपदकञ्जमञ्जुलौ कोमलावजमहेशवन्दितौ ।'

ल. ठे. — अनुष्टुभ् छंद बालकांड मंगलाचरणांत ५ वेळां, लंकाकांड मंगलाचरणांत १ वेळां व उत्तरकाण्डांत कथाभागांत २ वेळां आहे. शार्दूलविक्रीडित बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा व सुंदर या काण्डांच्या मंगलाचरणांत आणि उत्तरकाण्डांत ग्रंथाच्या उपसंहारांत आहे. वसंततिलका बाल व सुंदर कांडांच्या मंगलाचरणांत आहे; स्रग्धरा लंका व उत्तर काण्डांच्या मंगलाचरणांत आहे. बाकीचे श्लोक उदाहरणें दिलीं आहेत तेथेंच व तेवढेच आहेत.

९. शेष चार छंद (वृत्तें)—**नगस्वरूपिणी (प्रमाणिका)** हा छंद अरण्यकाण्डांत अत्रिस्तुतींत आहे. चार चरण असून प्रत्येकांत आठ अक्षरें आणि ज, र, ल, ग हे गण असतात. उदा० — ' नमामि भक्तवत्सलं। कृपालु शीलकोमलं । ' (अरण्य. ४।१)

१०. तोमर छंद — हें मात्रागणवृत्त आहे, प्रत्येक चरणांत १२ मात्रा असतात. त्यांचे २।३।४।३ असे मात्राखंड पडलेले असतील तर उच्चारांत यतिभंग होत नाहीं. प्रत्येक चरणांतील उपान्त्याक्षर दीर्घ व अन्त्याक्षर लघु असणें चांगलें. उदा० — ' रणि कोपले श्रीराम । शर सुटति निशितशित निकाम ' । (अरण्य. २०।१) हा छंद अरण्य. दो. २०, लंका. दो. १०१ व ११३ च्या अंगभूत वापरला आहे.

११. तोटक छंद — चार चरणांत प्रत्येकीं १२ अक्षरें व चार ' स ' गण असतात. उदा० — ' जय राम सदा सुखधाम हरे । रघुनायक सायकचाप करे ' लंका. १११।१ ब्रह्मदेवकृत स्तुतींत आहे. हा छंद लंकाकांड. ब्रह्मदेवस्तुतींत, उत्तरकांडांत शिवस्तुति दो. १४ आणि कलिवर्णनांत दो. १०१ व १०२ यांत आहे.

१२. भुजंगप्रयात — चार चरण, प्रत्येकांत १२ अक्षरें आणि चार ' य ' गण असतात. उदा०—नमामीशमीशाननिर्वाणरूपं । ' ही स्तुति उत्तर. दो. १०८ मध्यें रुद्राष्टक नांवानें प्रसिद्ध आहे.

याप्रमाणें मानसांतील सर्व छंदांचीं लक्षणें व त्यांचीं स्थानें यांचा निर्देश वर केला.

वि. ल. ठे. — हे सर्व छंद (वृत्तें) यांच्या नांवांवरून प्रगट होणाऱ्या अर्थाची यथार्थता करण्याच्या पद्धतीनें मानसांत वापरले आहेत, **हें एक परम आश्चर्य आहे.** सविस्तर लेख मानसमणि मासिकांत प्रकाशित झाला आहे. उत्तरकाण्ड परिशिष्टांत दिला आहे व *प्रस्तावनेंत स्वतंत्र प्रकरणांत त्यांतील नमुना दाखविला आहे.*

जय जय रघुवीर समर्थ ।

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।५ 卐 卐 卐

अनुवादांत निःसंदेह–रचना—नमुने

प्रास्ताविक — हिंदी मानसांत कांहीं थोडीं स्थळें अशीं आहेत कीं अर्थ करतांना संदेह उत्पन्न होतो. पूर्वापर वचनांचा विचार करून एकच वाच्यार्थ निश्चित होतो हें गूढार्थचंद्रिकेंतील शंकासमाधानांवरून जरी ठरलें तरी एकाच सांप्रदायांतील टीकाकारांत मतामतांचा गलबला व अनेक शंकांचा गोंगाट उत्पन्न झालेला ऐकूं येतो; म्हणून या द्वितीयावृत्तींत अशी रचना केली गेली आहे कीं संदेह उत्पन्न होण्यास जागाच राहूं नये. कांहीं नमुने मूळासह खालीं दिले आहेत.

१. हृदयँ सराहत सीय लोनाई । गुर समीप गवने दोउ भाई ॥

बाल. २३७।१

वानित मनिं सीतारूपासी । गेले अनुजासह गुरुपासीं ॥

सीतेच्या रूपाची हृदयांत प्रशंसा करीत दोघे भाऊ (रामलक्ष्मण) गुरुसमीप गेले असा अर्थ ही हिंदी चौपाई वाचतांना किंवा श्रवण करतांना घेतला जातो; यामुळें, ठरतें कीं सीतारूपाची प्रशंसा लक्ष्मणानेंसुद्धां केली ! हें अनर्थकारक व लक्ष्मणाच्या स्वभावाविरुद्ध आहे. या शंकेचें समाधान गूढार्थचंद्रिकेंत केलें आहे, या भ्रममूलक अनर्थकारक अर्थाला अनुवादांत जागाच नाहीं हें सहज कळेल.

२. मुनि प्रसन्न लखि सहज सनेहू । कहेउ नरेस रजायसु देहू ॥

अयोध्या. ३।८

" सहज स्नेह पाहून (लखि) मुनि प्रसन्न झाले आणि म्हणाले (कहेउ) कीं हे नरेश ! आज्ञा द्या," असा अर्थ पुष्कळसे टीकाकार करतात; पण गुरु वसिष्ठ मुनि ' आज्ञा द्या ' असें दशरथास (शिष्याला) कसें म्हणतील ? ' कहेउ ' हें तृतीय पुरुषी एकवचनी क्रियापद नरेश शब्दाच्या अगदीं जवळ असतां ' मुनि कहेउ ' असा अन्वय करण्यानें दूरान्वय दोष उत्पन्न करून *औचित्यभंगदोष* व *आचार-व्यवहार-विरुद्ध दोष उत्पन्न करून कवीच्या माथीं न कळत मारला जातो* म्हणून अनुवाद तयार झाला तो :—

सहज स्नेहें प्रसन्न मुनिवर–। दिसत; म्हणति ' आज्ञा द्या ' नृपवर ॥

सहज स्नेहानें मुनिवर प्रसन्न झालेले दिसतांच नृपश्रेष्ठ (दशरथ) म्हणाले कीं आज्ञा द्या (द्यावी). यांत संशयाला व दोषोत्पादनाला जागाच राहिली नाहीं.

३. मुदित महीपति मंदिर आए । *सेवक* सचिव सुमंत्र बोलाए ॥

अयोध्या. ५।१

श्रीगोस्वामीजींच्या हातची मानसपोथी उपलब्ध नाहीं. छापील पुस्तकांत तृतीयेचा व सप्तमीचा (ँ) हा प्रत्यय पुष्कळ ठिकाणीं छापला आहे व पुष्कळ ठिकाणीं

छापलेला नाहीं, सेवकँ असें छापलेलें असतें म्हणजे सरळ निर्दोष अर्थ सहज केला गेला असता. येथें सेवक ही तृतीया विभक्ति आहे. सेवकानें (किंवा सेवकाकडून) सचिवांना व सुमंत्रास बोलावून आणलें. (क) कांहीं हिंदी टीकाकारांनीं अर्थ केला आहे कीं दशरथराजानें सेवकांना, सचिवांना व सुमंत्रास बोलावून आणलें. सचिवांची गुप्त सभा भरवून रामराज्याभिषेकास त्यांची संमति घ्यावयाची आहे, तेथें राजा सेवकांना कशाला बोलावील? आणि दशरथ राजा सेवकांना, सचिवांना व सुमंत्राला बोलावण्यास त्यांच्या घरोघर गेले कीं काय? मराठी अनुवाद झाला तो :—

आले मंदिरिं मुदित महीपति । सेवक सचिवसुमंत्रा आणति ॥

अर्थ — दशरथ राजा आनंदित होऊन घरीं (मंदिरिं) आले आणि सेवक सचिवांना व सुमंत्रास आणते झाले; म्हणजेच सेवकांकडून बोलावून आणविलें. वर दाखविल्यापेक्षां अधिक विस्तार टीकेंत केला आहे. प्रत्येक ठिकाणीं उहापोह केला आहे. आतां चर्चा न करतां हिंदी व मराठी वचनें देणेंच इष्ट वाटतें.

४. तुम्ह पै पाँच मोर मात्री । आयसु आसिष देहुसु बानी ॥

अयोध्या. १८३।७

(आयसु = आज्ञा किंवा जातांना निरोप.) म०—तुम्हिंहि पंच मानुनि मम हित पर । या निरोप आशीर्वच सुंदर ॥ असा एकच निश्चित अर्थ घेतला.

५. सकल सनेह सिथिल रघुबर कें । गए कोस दुइ दिनकर ढरकें ॥

अयोध्या. २२६।१

ढरके = मावळला; ढरकें = मावळल्यावर, असा अर्थभेद केवळ अनुस्वारानें होतो, (गूढार्थचंद्रिका पाहा).

रामस्नेह-शिथिल सगळे जरि । दोन कोस गत, अस्त होय तरि ॥

दोन कोस गेल्यावर दिवस मावळला हें सांगण्यांत रामस्नेहाचें वैशिष्ट्य तें काय? रामस्नेहानें हातपाय गळलेले असतां सूर्यास्त झाल्यावरसुद्धां ते सगळे दोन कोस गेले. यांत भावरम्यता व प्रेमाची तळमळ व्यक्त होते.

६. माल्यवंत अतिसचिव सयाना । तासु बचन सुनि अति सुख माना ॥

सुंदर. ४०।१

सयाना = शहाणा, चतुर. सयाना = वयानें मोठा, हे दोन्ही अर्थ येथें ग्राह्य आहेत.

सचिव माल्यवान चतुर वयस्कर । अति सुख मानी श्रवुनि वचनवर ॥

वर = उत्तम, श्रेष्ठ. 'सयाना'चे दोन अर्थ सांगणारा एक शब्द मराठींत नाहीं, म्हणून दोन स्वतंत्र शब्द घालून मुळांतील सर्व अर्थ व्यक्त केला गेला.

७. रुंड प्रचंड मुंड बिनु धावहिं । धरु धरु मारु मारु धुनि गावहिं ॥

लंका. ६८।८

धावति रुंडें प्रचंड मुंडहि । ध्वनि गर्जति धर धर धर मारहि ॥

८. तब सत बान सारथी मारेसि । परेउ भूमि जय राम पुकारेसि ॥
लंका. ९१।७

रामसाराथिस **शत शर मारत । पतित महीं जय राम पुकारत ॥**

कोणाच्या सारथ्याला बाण मारले हें अनुवादांत अगदीं स्पष्ट झालें.

९. छंद तोमर—**अब देखि प्रभुपद कंज । गत मानप्रद दुख पुंज ॥** लंका. ११३।६ दुखपुंजप्रद मानगत असा अर्थ आहे. 'प्रद' 'पुंज'च्या पुढें असता तर अर्थ अधिक सरळ झाला असता, व प्रसादगुण वाढला असता. मान-प्रद असा अर्थ घेण्याची प्रवृत्ति झाली नसती.

बघतां अतां प्रभुपाय । अतिमान दुःखद जाय ॥

अति दुःखद अतिमाल जाय = गेला.

१०. राकाससि रघुपति पुर सिंधु देखि हरषान ।
बढ़यो कोलाहल करत-जनु नारितरंग समान ॥
उत्तर. दो. ३ चं. (हिं. ३ ग. १)

राकाशशि रघुपति बघुनि नगरसिंधु हर्षीत ।
वाढे कोलाहल किं करि नारितरंग-सहीत ॥

'राकाशशि रघुपति पुर' येथें चरणसमाप्ति होत असल्यानें थांबावें लागतें व पुर शब्द रघुपतिबरोबर घेतला जातो; पण 'पुरसिंधु' असा संबंध आहे. हा घोटाळा मराठींत राहिला नाहीं.

संदेहानें प्रवेश करण्याची शक्यता जेथें कुठें दिसली तेथें अशा प्रकारें संदेहरहित अर्थ होईल अशी रचना या अनुवादांत झाली आहे. विस्तारभयास्तव आणखीं उदाहरणें देतां येत नाहींत.

प्रेरक हृदिं जय रघुकुल-भूषण.

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।६ 卐 卐 卐

अनुवादांत थोडी अलंकार-भर

आर्या — **तुलसी-कविता-दुहिता प्रभुप्रतापार्कपतिस येवोनी ।**
या देशिं महाराष्ट्रीं वसली गृहिं बंधुच्याहि येवोनी ॥ १४ ॥
भगिनी-सौंदर्याला रूपाला पालटील जो बंधु ।
सुधन हरील तिचें तो सज्जनवृंदांत ठरत जड अंधु ॥ २१ ॥
कौशल्य-धनें निज तिज घालि अलंकार अधिक जो कांहीं ।
सौंदर्य खुलवि सुखविहि तो तोषा मिळवि अधिक ना कांहीं ॥

(लेखकहृद्गत प्रथमावृत्ति, किंचित् बदल करून)

या द्वितीयानुवादांतहि मुळांत नसलेल्या कांहीं ठिकाणीं थोडी अलंकारांची भर सहज पडली आहे. त्यांतील कांहीं नमुने :—

१. निसिचरी एक सिंधु महुँ रहई । करि माया नभुके खग गहई ॥

सुन्दर. ३।१

वसे सिंधुमधिं एक निशाचरि । ती मायेनें *नभग खगां* **धरि ।।** पुनरुक्तिवदाभास.

२. सोइ रावन कहुँ बनी सहाई । अस्तुति करहिं सुनाइ सुनाई ॥

सुन्दर. ३८।१

तोच रावणा योग मिळाला । घालिती किति कानीं *स्तुतिमाला* **।।** रूपक.

३. जौं पै दुष्ट हृदय सोइ होई । मोरें सनमुख आव कि सोई ॥

सुन्दर. ४४।४

दुष्टहृदय सत्यचि असता जर । ममसन्मुख येता तो *कातर ?* **।।**

श्लेष. कातर = भ्याड.

४. जब तेहिं कीन्हि राम कै निन्दा । क्रोधवंत अति भयउ कपिंदा ॥

लंका. ३२।१

निन्दी जैं रामास दशानन । भडके *क्रोध* **कपीन्द्र** *हुताशन* **।।** रूपक.

५. होईहि कीन्ह कबहुँ अभिमाना । सो खोवैचह कृपानिधाना ॥

उत्तर. ६२।८

खोवैचह = घालवूं इच्छितात.

कधिं असेल अभिमान किं झाला । *उपटूं बघाति* **कृपाब्धि तयाला ।।**

उपटणें क्रियेनें अभिमान-वृक्ष हें रूपक ध्वनित केलें.

अशा प्रकारें आणखी फारतर ५।१० स्थळीं भर पडली असेल. गूढार्थचंद्रिकेंत मूळ व अनुवादही असल्यानें वाचकांस सहज तुलना करतां येईल. हे *नमुने येथें देण्यांत* हेतु इतकाच आहे कीं अशा ठिकाणीं कांहीं अलंकारदोष तज्ज्ञांस आढळल्यास त्यांनीं ते श्रीगोस्वामींच्या नांवावर न लिहितां या अज्ञ लेखकाच्या साहित्यज्ञानहीन बुद्धीचे ते दोष समजावेत व त्याच्या नांवावर घालावेत.

अलंकारांची थोडीशी वृद्धि जशी दाखविली, तसेंच हेंहि दाखविणें जरूर आहे कीं मुळांतील कांहीं थोड्या गोष्टी अनुवादांत साधल्या नाहींत! हें प्रदर्शन पुढील प्रकरणीं पाहावें.

वासुदेव जय जय गुरुनाथ । झाला हा तव कृपें सनाथ ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।७ 卐 卐 卐

मूळांतील गूढार्थादि कांहीं स्थळीं अशक्य

प्रास्ताविक — द्वितीय अनुवाद लिहितांना, टीका लिहितांना आणि शेवटीं प्रस्तावना लेखनकाळांत अलंकार जसे वाढले, तशीं अगदीं थोडींच कां असेनात कांहीं स्थळें अशीं आढळलीं कीं मूळांतील गूढार्थ, माधुर्य इत्यादि गोष्टी प्रयत्नांनींसुद्धां साधल्या नाहींत व याचीं कारणें शब्दश्लेष, भाषाभेद इत्यादि अनेक आहेत. अलंकार-वृद्धि सहजासहजीं साधली; मुद्दाम प्रयत्न करावा लागला नाहीं; अशक्यतेचीं फारच थोडीं असलेलीं उदाहरणें अयोध्याकाण्डांतच आहेत.

१. **' रहसना '—**

सब बिधि गुरु प्रसन्न जियँजानी । बोले राउ रहँसि मृदुबानी ॥

अयोध्या. ४।१

यांतील ' रहँसि ' शब्द ' हरषि 'चें उलट केलेलें रूप आहे. याला तुलसीदासांनींच हिंदी भाषेंत स्थान दिलें असें हिंदी टीकाकार म्हणतात. रहँसि = हर्षुनि असा वाच्यार्थ असला तरी ' उलट ठरणारा हर्ष झाला ' असा गूढार्थ आहे. ज्या गोष्टींबद्दल आतां हर्ष होत आहे त्याच गोष्टीमुळें पुढें शोक करावा लागणार आहे. *हे दोन अर्थ व्यक्त करणारा एक शब्द मराठींत नाहीं.* रहसना हें ' हरषना ' याचें उलट केलेलें रूप आहे. मराठींत रहसणें हें क्रियापद तसेंच वापरतां आलें असतें व रह*सुनि* हा शब्द वापरला असता तर मूळांतला गूढार्थ आणखी तीन ठिकाणींहि रक्षण करतां आला असता; पण रह*सुनि शब्द वापरण्यास संकोच वाटला हा या मनबुद्धींचा कम-कुवतपणा व धडाडीचा अभावच म्हटला पाहिजे.* ' बघुनि गुरुवरा प्रसादखाणी । वदति भूप हर्षित (रहसुनि) मृदु वाणीं ' असा रहसुनि शब्द घालतां आला असता. ' रह*सुनि ' हा पाठभेद पादटीपेंत द्यावा लागला.* अयोध्या ७,१७।२ व ४३।१ या आणखी तीन ठिकाणीं ' रहसना ' क्रियापदच वापरलेलें आहे. तेथेंहि पादटीपेंत पाठ-भेद दिले आहेत. हा ' रहसना 'चा प्रयोग इतर तुलसीग्रंथांतही आहे.

२. **निषादांची भाषा** — शृंगवेरपुरच्या निषादराज व निषाद यांच्या संवादांत निषादांच्या भाषेंतील युद्धसंबंधी शब्दांचा उपयोग श्रीगोस्वामींनीं केलेला आहे. तसे स्वभावोक्तिदर्शक शब्द मराठींत वापरतां आले नाहींत. मराठीभाषिक नावाड्यांत युद्ध-कलेचा लोप झाला असल्यानें तसले शब्द व ती भाषा कानांवर पडणेंहि अशक्य झालें आहे. नौकांच्या व्यवसायांतील त्यांचे पारिभाषिक शब्द वापरतां आले असते; पण कोकणांत समुद्रकांठीं जाऊन ते शिकावे लागले असते. येथें तर ' नाहीं भरंवसा देहाचा । नवें शिकण्या वेळ कैंचा । भार मोठा लेखनाचा । उतरेल केव्हां ! ॥ ' *कारणें कांहींहि*

असलीं तरी मूलानुसारी स्वभावोक्तिपूर्ण अनुवाद त्या प्रकरणांत झाला नाहीं हें लपवून व नाकारून भागणार नाहीं.

३. अयोध्याकांडांतील विशेष कोमलता — सिय, लखनु, रामु, धर्मबद्दल धरमु इत्यादि प्रकारें या काण्डांत हेतुपूर्वक खचून भरलेली कोमलता सीता, लक्ष्मण, राम, धर्म, प्रिय, प्रेम, परस्पर इत्यादि शब्दांमुळें मराठींत उतरतां आली नाहीं, आणि या व अशा शब्दांतील मात्राधिक्यामुळें इतर रमणीयतेंतहि न्यूनता आली. *पंख उपटून टाकलेल्या विहंगमासारखी स्थिति लेखकाची झाली!* कांहीं अगदीं थोड्या ठिकाणीं ' सिय ' शब्द वापरला आहे.

४. कांहीं श्लेष —उदा०—

मोरें *जान* भरत रुचि राखी । जो कीजिअ सो सुभ सिव साखी ॥

अयोध्या. २।५८।८

यांत जान = ज्ञान, मत, समज; आणि प्राण, जीवित असे दोन अर्थ येथें आहेत. हे दोन्ही अर्थ सांगणारा एक शब्द मराठी भाषेंत नाहीं; आणि प्राण व रुचि-मत, हे दोन्ही शब्द वापरण्यांत यमकाचें बंधन! त्यामुळें ' मम मत ' राखुनि भरत रुचीला । जें कराल, शुभ, शिव साक्षीला ॥ असा अनुवाद करावा लागला. अशीं फारतर आणखी २।४ उदाहरणें असतील.

गूढार्थचंद्रिकेस आधार असणाऱ्या मराठी द्वितीयानुवादाचें विविध अंगांनीं करावयाचें निदर्शन येथें पूर्ण झालें. आतां या चौथ्या मुख्य प्रकरणाचें सूत्र पुढील आठव्या प्रकरणापासून हातीं घेतलें जाईल.

वासुदेव जय जय अवधूत । तव पदरज करि दासा पूत ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।८ 卐 卐 卐

गूढार्थचंद्रिकेचें वैशिष्ट्य

टीकालेखन-हेतु — ही टीका कशी जन्मास आली हें या चौथ्या मुख्य प्रकरणारंभींच दाखविलें आहे. काव्यादि ग्रंथलेखनांत यश, धन (अर्थ), व्यवहारज्ञानवृद्धि, अकल्याण-पाप-क्षति, व परम समाधान यांची प्राप्ति किंवा प्रेमळ मित्राप्रमाणें उपदेश करणें, हे हेतु बहुधा असूं शकतात. **यांतील कोणत्याहि हेतूनें गूढार्थचंद्रिका-लेखन हातीं घेतलें नाहीं हें या टीकेच्या जन्मेतिहासावरून स्पष्ट कळण्यासारखें आहे.**

परम कारुणिक रघुवंशविभूषण श्रीरघुनाथाच्या प्रेरणेनें श्रीरामधाम श्रीअयोध्येंतूनच टीकालेखनाचा मंदरपर्वत मंदमति प्रज्ञानानंद बालमरालाच्या मस्तकावर न कळत ठेवला गेला. कार्यभार घालणारा स्वामी कार्यभार वहन करण्यास लागणारी शक्तियुक्ति

इत्यादि पुरवितो हें जाणून श्रीरघुनाथ-सेवा-भावनेनेंच प्रारंभ केला गेला, परम मधुर, परम रमणीय मानसमुक्ताफळांचा चारा खाऊं घालून या बालमरालास परमानंद-पूर्ण करून श्रीतुलसी-मानसविहारी राजहंस बनविण्याचा त्या प्रभूचाच हेतु असावा असें लेखनांत आलेल्या अनुभवांवरून वाटतें. या हेतूशिवाय त्या करुणावरुणालयाचे अन्य काय हेतु असतील ते भविष्यकाळच दाखवूं शकेल. *महाराष्ट्राचें नांव उत्तर हिंदुस्थानांत उज्ज्वल करणें हाहि एक हेतु असावा असें वाटतें.*

टीकापद्धति — प्रथम हिंदी चौपाया, दोहे वगैरे खंडशः देऊन त्यांखालीं त्यांचा मराठी अनुवाद आहे. त्यानंतर त्या चौपायादिकांचा सरळ अर्थ दिला आहे. त्यांत मधून मधून कंसांत मूळांतील हिंदी शब्द व कुठें कुठें कठिण मराठी अथवा संस्कृत शब्द अर्थज्ञान होण्यासाठीं व काव्यांतील संदर्भ ध्यानांत येण्यासाठीं दिले आहेत. *चौपाया-दिकांचा अन्वय स्वतंत्र दिला नाहीं.* जेथें अन्वयाची *आवश्यकता वाटते तेथें तो टीकेंतच दाखविला आहे.* सरळ अर्थानंतर गूढार्थादि प्रकाशक चंद्रिका आहे.

(क) प्रत्येक काण्डारंभीं असलेल्या अनुवादककृत मंगलाचरणाच्या श्लोकांवरसुद्धां आवश्यक तेवढी टीका लिहिली आहे. या मंगलाचरण श्लोकांचे आधार मुख्य टीकेंत कोठेंहि घेतलेले नाहींत. **टीकेंत दिलेले मंगलाचरणश्लोकांचे संदर्भदर्शक अंक मूळ श्लोकादिकांचेच समजावेत.**

(ख) मंगलाचरण श्लोकांचा पदच्छेद प्रथम देऊन जरूर तेथें अन्वयदर्शक क्रमांक पदच्छेदांतील पदांवर घातले आहेत. प्रथम सरळ वाच्यार्थ देऊन वाच्यार्थानुसारी टीका नंतर लिहिली आहे; आणि नंतर गूढार्थादि दर्शक टीका स्वतंत्र लिहिली आहे. मूळ मानसांतील हिंदी शब्दांचें ज्ञान वाचकांस अधिकाधिक व्हावें व मुळाशीं तुलना करतां यावी म्हणून टीकेंतही मधून मधून कंसांत हिंदी शब्द दिले आहेत.

टीकेचें धोरण — श्रीमानसटीकांत असें आढळून आलें कीं कांहींनीं अनावश्यक, कंटाळवाणी शास्त्रचर्चा करून पांडित्यप्रदर्शन करून विस्तार वाढविला आहे; कांहींनीं आपलीं सांप्रदायिक मतें श्रीगोस्वामींच्या माथीं मारलीं आहेत; कांहींनीं असे भावार्थ काढले आहेत कीं महाराष्ट्रांतील मराठी ६।७ इयत्ता शिकलेला एखादा हुशार मुलगा-सुद्धां ते वाचून पोट धरून हसेल! कांहींनीं निराधार कल्पनांचे उंच मनोरे असे उभारले आहेत कीं ते एका फुंकरीनें धुळीस मिळतील. कांहीं आपल्या मताच्या पुष्टीसाठीं हळूच पाठभेद बदलून व मानसांतील वचनांकडे मुद्दाम कानाडोळा करून तात्पुरती वेळ मारून नेतात; व *अशा टीकांच्या वाचनांत असंबद्धतादि आढळतांच सुशिक्षित, विवेकी हिंदी मानसाभ्यासी कानपूरकडून महाराष्ट्राकडे धाव घेतात. टीकांचे असे विविध नमुने श्रीहरीच्छेनें पाहण्यास सांपडल्यानें पुढच्यास ठेंच मागचा शहाणा असें सहजच घडलें; हा त्या त्या टीकांनीं उपकारच केला.*

(क) टीकेची खरी मदत वाचकांस जेथें भासते तेथें बहुतेक टीकाकार मौनी

झालेले दिसतात. ज्या शंका, पूर्वपक्ष, मांडून समाधान करणें आवश्यक असतें तेथें मूग गिळलेले दिसतात; व ज्या शंका घेण्यास मुळांत मुळींच आधार नाहीं अशा निराधार बिनबुडाच्या शंका उपस्थित करून वडाची साल पिंपळास लावतात. या विविध प्रकारांचा पुष्कळ अनुभव मिळाल्यानें वाचकांस काय पाहिजे असतें व काय नको असतें याचा अंदाज चांगला करतां येऊं लागला; व वीस वर्षांच्या शिक्षकाच्या व्यवसायानें निर्माण केलेल्या तशा धोरणास उजळा मिळाला; त्यामुळें **गूढार्थचंद्रिकेंत खालील धोरण प्रमुख ठेवलें गेलें.**

(**ख**) हा लेखक शास्त्री, पंडित, साहित्यिक, विद्वान्, वगैरे नसल्यानें पांडित्य-प्रदर्शन न करण्याचें धोरण स्वभावतःच पाळलें गेलें. हा लेखक सांप्रदायिक कोंड-वाड्यांत अडकलेला नसल्यानें सांप्रदायिकताप्रदर्शनासाठीं मलखांबाच्या उड्या माराव्या लागल्या नाहींत. लोकरंजन करून प्रशस्ति व पैसा यांच्या पुरांत वाहात जावयाचें नसल्यानें तसे परिश्रम केले गेले नाहींत. **स्वतःचीं मतेंसुद्धां बाजूस ठेवून, श्रीगोस्वामींना अभिप्रेत असलेला वाच्यार्थ, गूढार्थ व भावार्थ प्रगट करणें व श्रीतुलसीदासांची अलौकिकता उघड करून सांगणें हेंच धोरण ही टीका लिहितांना सतत ठेवलें गेलें आहे.**

मानसपीयूषचा उपयोग — बृहत्कोषासारख्या या मानसटीकेंत २०।२२ टीकाकारांचें निरूपण लंकाकांड पूर्वार्धापर्यंत पाहावयास सांपडलें. याचा मुख्य फायदा हा झाला कीं मोठमोठ्या संस्कृत पंडितांनीं दिलेलीं संस्कृत ग्रंथांतील अवतरणें आयतीं तयार मिळालीं व त्यांतील अत्यंत आवश्यक तेवढीं गूढार्थचंद्रिकेंत घेतां आलीं. त्यांच्यापुढें (मा. पी.) असें लिहिलें आहे.

(**क**) ज्या शब्दांच्या अर्थाविषयीं हिंदी टीकाकारांतसुद्धां पुष्कळ मतभेद आहेत अशा कांहीं हिंदी शब्दांचे अर्थ तोलून, जोखून तत्त्वनिकषावर घासून घेतां आले. टीकाकारांनीं दिलेल्या अवतरणांच्या साह्यानें मूळांतील रम्य भावार्थ व गूढार्थ सहज बाहेर पडणें सोपें झालें.

(**ख**) अनुबंधचतुष्टय, उपक्रमोपसंहारादि अर्थनिर्णायक सहा साधनें, पूर्वापर-संगति, मानसग्रंथसंदर्भ, प्रकरणसंदर्भ, आणि विषयसंदर्भ यांचा समन्वय इत्यादिकां-कडे टीकाकारांनीं फारसें लक्ष न दिल्यामुळें अयुक्त, भ्रामक व काल्पनिक अर्थ प्रगट केलेले दिसले. त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचें खंडन करून युक्तार्थ कथन करणें भाग पडलें, पण त्यामुळें ग्रंथाचें कलेवर वाढूं लागलें; म्हणून पुढें ही पद्धति सोडून देऊन ' हा अर्थ मान्य नसल्यास (मा.पी. पाहा) ' असा किंवा कांहीं हास्यास्पद, असंबद्ध अर्थ केलेला दिसल्यास (मा. पी. पाहा !) असे उल्लेख करणें सुरु झालें. ठरविलेलें धोरण पूर्णपणें तडीस जाण्यासाठीं अर्थनिश्चय करतांना खालील चार गोष्टींकडे सतत लक्ष ठेवूनच ही टीका लिहिली गेली आहे.

अर्थनिर्णायक साधनें

१. अनुबंधचतुष्टय — विषय, अधिकारी, संबंध आणि प्रयोजन यांस अनुबंधचतुष्टय म्हणतात.

२. उपक्रमोपसंहारादि सहा — उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वताफलम् । अर्थवादोपपत्ती च लिंगं तत्त्वार्थनिर्णये ॥ (१) उपक्रम आणि उपसंहार, (२) अभ्यास, (३) अपूर्वता, (४) फल, (५) अर्थवाद आणि (६) उपपत्ति हीं सहा लक्षणें सतत अवलोकन करावीं लागलीं; इतर ग्रंथांत अनुबंधचतुष्टयाचा विचार एकदां ग्रंथारंभींच केलेला आढळतो; पण परम अद्भुत मानसांत अनुबंधचतुष्टय व उपक्रमोपसंहारादि लक्षणें अगदीं लहानशा १२,१०,८ ओळींच्या, फार काय सांगावें ३।४ ओळींच्या प्रकरणांतसुद्धां आढळतात ! कदाचित् ही अतिशयोक्ति वाटेल; म्हणूनच '*काव्यरचनाकौशल्य-नमुने*' या आठव्या मुख्य प्रकरणांत '*उपक्रमोपसंहारादि*' हें पहिलेंच उपप्रकरण घातलें आहे. संशयितांनीं हा सूर्य व हा जयद्रथ अशी खात्री करून घ्यावी. या प्रस्तावनेंत केलेलीं सर्व विधानें भरपूर आधार मिळाल्यावरच केलेलीं आहेत, हें जाणून **सर्व प्रस्तावना अवलोकन करण्यापूर्वीं वाचकांनीं संशयपिशाचग्रस्त होऊन मन मलिन करून घेऊं नये अशी कळकळीची विनंति आहे.** उपक्रमोपसंहारादिकांचा उल्लेख टीकेंत ठायीं ठायीं केलेला दिसेल.

३. संगति — पूर्व चौपाई वगैरेंतून पुढील चौपाई दोहा वगैरे साहजिक क्रमानें कशीं निघतात व त्यांचा परस्परसंबंध काय, म्हणजेच काव्यपंक्तींची *परस्परसंगति*, पहिल्या ४३ दोह्यांच्या टीकेंत व तशा तात्त्विक सिद्धान्तमय वर्णनांत सर्व ग्रंथांत प्रत्येक ओळीच्या टीकेच्या शेवटीं दाखविली आहे. कांहीं ठिकाणीं तर चरणांची संगति विचारांत घ्यावी लागली तेव्हांच निर्भ्रम निश्चित अर्थ सांपडला व या बुद्धीस येणाऱ्या शंकांचें समाधान झालें.

४. समन्वय — (क) ग्रंथसंदर्भ = ग्रंथांतील अन्य वचनें, प्रकरणसंदर्भ व चालू विषय यांस परस्पर विरोध उत्पन्न होऊं न देतां अर्थसिद्धि करणें म्हणजेच समन्वय साधणें फार कठिण असतें. मागील एका वचनाचा अर्थ ग्रंथांतीलच अन्य वचनांनीं खंडित होणें म्हणजे यथार्थ न सांपडणें होय. पुढला मागला विचार न करतां कांहीं तरी तात्पुरता अर्थ ठोकून देणें सोपें असतें.

(ख) गूढार्थचंद्रिकेंत संगति आणि समन्वय सर्वत्र साधला याचें श्रेय या लेखकाकडे नसून 'नट मर्कट इव जगा नाचाविति' असे जे निर्हेतुक स्नेही श्रीरघुनाथ आणि गुरु यांच्याकडेच सर्व आहे. श्रीरघुनाथकृपेनें कसें घडलें पहा.

५. हा लेखक जन्मानें कोंकणांत जन्मलेला कोंकणस्थ; वंगभंगाच्या चळवळींत सन्मित्र-समाज-मेळयाच्या पदांचा लहानपणींच पक्का पगडा बसलेला; शालेय शिक्षणांत अनेक जिल्ह्यांचें पाणी प्यालेला; विश्वविद्यालयीन शिक्षण परप्रांतांत, पारतंत्र्यांत,

पहिल्या महायुद्धाच्या धामधुमींत, पुरें करून तें वाघिणीचें दूध पचनीं पडलेला; आयाळ, नखें व दंष्ट्रा काढून न टाकलेल्या अव्वल केसरीची लेखरूपी गर्जना उत्तम प्रकारें प्रतिबिंबित झालेला, मिठाच्या सत्याग्रहांतील शामळूपणा, दिखाऊपणा व गैर-शिस्तपणा इत्यादींचा अनुभव घेऊन कंटाळून त्या चक्रांतून भाग्यानें बाहेर पडलेला; वगैरे वगैरे संस्कारांनीं युक्त झालेला, सहज स्वावलंबी, कोंकणस्थ पुरुषार्ची सहज चिकित्सक, सहजासहजीं कोणावरही विश्वास न ठेवणारी आणि तारुण्यांत शुद्ध स्वाभिमानी असलेली, निर्भीड बुद्धि, तिचें पूर्ण समाधान झाल्याशिवाय *भोळ्या भावानें समाधान मानून स्वस्थ बसणारी नसल्यानें*, अदृश्य शक्तींनीं अंतरींच भराभर प्रेरणा देऊन तिच्यांतून यथार्थ बाहेर पाडलें; तें इतक्या द्रुत गतीनें कीं त्या गतीनें कागदावर लिहितांना हातांनीं अनेक ठिकाणीं निर्माण केलेले दोष (हस्तदोष) मुद्रणप्रतींत सुधारावे लागत आहेत. असें सहज समाधान प्राप्त होण्यास त्या बुद्धीला खालील गोष्टी कराव्या लागल्या.

अर्थनिर्णायक उपाय — **(क)** भासमान द्विरुक्ति आदि दोषांचा निरास पूर्व-कथित सर्व साधनांच्या आधारें केला गेला. **(ख)** अर्थनिश्चितीसाठीं मानसांतील जागोजागींचीं अवतरणें मदतीस धावलीं; श्रुतिपुराणादि विविध शास्त्रग्रंथांतील आधार अहमहमिकेनें पुढें आले व क्वचितच अर्थनिर्णयासाठीं मानसेतर ग्रंथांचा आधार घ्यावा लागला. कधीं नांवसुद्धां श्रवणांत नसलेले ग्रंथ गूढार्थचंद्रिका सुधामय करण्या-साठीं युक्तिप्रयुक्तीनें अनपेक्षित रीत्या मदतीला धावले. **(ग)** श्रीगोस्वामींच्या अन्य ग्रंथांपैकीं गीतावली (रामायण), कवितावली (कवित्तरामायण), विनयावली (विनय-पत्रिका) व दोहावली यांतील पदें, पदांचे अंश व दोहे अर्थनिश्चितीसाठीं किंवा तुलनेसाठीं मूळ रूपांतच टीकेंत आले आहेत किंवा टीका लिहितां लिहितांच त्यांनीं मराठी वेष (अनुवाद) धारण केला आहे. **(घ)** कांहीं ठिकाणीं अर्थस्पष्टीकरणार्थ किंवा समस्यापूरणार्थ कवितादुहिता स्वतंत्र रूपानेंच सहज ओघानें प्रगट झाली आहे. हा हिंदी पदादिकांचा अनुवाद व स्वतंत्र पद्यरचना यांना स्वतंत्रपणें संकलित करून ठेवण्यासही अद्याप अवसर सांपडला नाहीं ! **(ङ) अन्य भासमान काव्यदोषांचें निरसन** वरील पद्धतीनेंच केलें गेलें. *छंदोभंग, यतिभंग, क्रमभंग, मात्रान्यून, दूरान्वय* इत्यादि प्रगट काव्यदोष, वेडीवाकडी पद्यरचना करणाऱ्या या अल्प-मंदबुद्धीलासुद्धां सहज कसे टाळतां येण्यासारखे आहेत हें प्रत्यक्ष दाखवून नाट्य, अभिनय, रस भावादींचें प्रकाशन महाकविमूर्धन्य श्रीगोस्वामींनीं कसें केलें आहे हें गूढार्थचंद्रिकेमध्यें दाखविलें आहे व *वाटणारीं दूषणें भूषणें आहेत हें स्पष्ट केलें गेलें आहे*. अशांचे कांहीं नमुने स्वतंत्र प्रकरणांतून पुढें दिले आहेत.

धर्मशास्त्राचा संबंध जेथें आला (उदा० जातकर्म, विवाह इ.) तेथें त्या कर्मादिकांचे नियमादि धर्मशास्त्राधारें दिले आहेत. मानसांतील उल्लेखांत येणाऱ्या शंकांचें मानसाधारें

किंवा धर्मशास्त्रग्रंथाधारें समाधान केलें आहे. कांहीं ठिकाणीं त्या संस्कारांतील (उदा० जातकर्म) मंत्र व त्यांचा भावार्थ देऊन अशा संस्कारांचे परिणाम व महत्त्व निदर्शनास आणले आहेत. ज्या गोष्टींची माहिती या बुद्धीस नव्हती किंवा माहिती असून ग्रंथ मिळाले नाहींत त्या विषयांची साधार माहिती धर्मशास्त्रज्ञांकडून मिळविली.

ज्योतिषशास्त्राचा संबंध — श्रीरामजन्मकाल, विवाहमुहूर्त इत्यादिंचे निश्चयात्मक उल्लेख मानसांत जेथें नाहींत तेथें अन्य रामायणाधारें ते दिले आहेत; आणि आजची प्रचलित पद्धति व रामायणांतील उल्लेख यांची तुलना वगैरे केली आहे. रामजन्म-काळाचें जें एकच वर्णन दोन तीन रामायणांत सांपडतें तें प्रचलित निरयण वा सायन पद्धतीनें कसें अशक्य आहे हें दाखवून त्या काळीं कोणती गणना व पंचांगपद्धति प्रचा-रांत असली पाहिजे याचें दिग्दर्शन केलें आहे. (क) ज्योतिषशास्त्र व धर्मशास्त्र-विरोधी कांहीं प्रचलित भ्रमांचें दिग्दर्शन केलें आहे.

वैद्यशास्त्राचा संबंध जेथें आला तेथें माधवनिदान, योगरत्नाकर इत्यादि सर्व-मान्य वैद्यशास्त्रग्रंथांतील रोगलक्षणें देऊन तीं सर्व त्या रोगाच्या वर्णनांत मानसांत कशीं सांपडतात हें गूढार्थचंद्रिकेंत दाखविलें आहे. उदाहरणार्थ विषमज्वराचें रूपक '*मानसोपलब्ध श्रीतुलसीदासचरित्र*' (प्रस्ता. ११४) यांत पाहावें.

शिष्टाचारादि मर्यादापालन — जेथें प्रत्यक्ष कृतीनें करून दाखविलें आहे तेथें टीकेंत त्याचें स्पष्टीकरण करून तदनुसार असणारे नीति, शास्त्र, नियम, कार्य इत्यादि दाख-विलें आहे व आवश्यक तेथें धर्मशास्त्रवचनें आधारास दिलीं आहेत. उदा० नमस्कार केव्हां करूं नये, पत्नी वामभागीं केव्हां असावी इ. इ.

घटनाकालनिदर्शन — तुलसीमानसांत विशिष्ट घटनांचे कालनिर्देश नाहींतच म्हटलें तरी चालेल. ही *सर्वमतसंग्राहक युक्ति आहे*. वाल्मीकि रामायण आणि पद्म व स्कंद पुराणें यांतील उल्लेख आणि मानसांतील अन्तर्गत पुरावे व विविध कविसंकेत यांच्या समन्वयानें महत्त्वाच्या सर्व ठिकाणीं गूढार्थचंद्रिकेनें कालगणना स्पष्ट करून दाखविली आहे.

(क) **पद्मपुराणांतील** सीताहरणापासून राज्याभिषेकापर्यंतचें **श्लोकात्मक तिथिपत्र** परिशिष्टांत देऊन (परिशिष्ट सूची पाहा.) शिवाय कोष्टकरूपानें स्पष्टीकरण केलें आहे. याशिवाय त्या त्या स्थळीं आधार दिले आहेतच. वालीवधादिकांच्या तिथि दोन्ही पुराणांत नाहींत; पण मानसांतील कांहीं गुप्त उल्लेख व पद्मपुराण यांच्या समन्वयानें तेहि काळ गूढार्थचंद्रिकेंत दाखविले आहेत.

(ख) **टीकाकार म्हणतात कीं** *चैत्र शुक्ल पंचमीस पुष्य नक्षत्र असतां राम वनवासास गेले;* पण हें म्हणणें अशास्त्रीय आहे. हेच *टीकाकार बालकांडांत म्हणतात कीं चैत्र शुक्ल नवमीला पुनर्वसु नक्षत्र होतें !* वाचकांनींच विचार करावा ! **चैत्र शुक्ल पंचमीला पुष्य नक्षत्र असणें कधींहि शक्य नाहीं** हें कोणीहि विद्वान् पंचांग-कर्ता सांगू शकेल किंवा शंभर वर्षांचीं पंचांगें पाहिल्यास कोणासही कळेल. **वैशाख**

शुक्ल पंचमीला १४ वर्षें पूर्ण झाल्याचे उल्लेख दोन्ही पुराणांत आहेत; व पुष्य योगावर उद्यां राम भेटतील असें वाल्मीकि रामायणांत हनुमन्तानें भरतास सांगितलें आहे. *वैशाख शुक्ल पंचमी, षष्ठी किंवा सप्तमीला पुष्य नक्षत्र असूं शकतें;* इत्यादि प्रकारची साधकबाधक चर्चा गूढार्थचंद्रिकेंत केली आहे.

शंकासमाधान — पूर्वीं प्रकरण ३।१ मध्यें 'टीकालेखनास मदत' या परिच्छेदांत उल्लेखिलेल्या हिंदी मानसाभ्यासींच्या महत्त्वाच्या शंका, पूर्वपक्षाप्रमाणें मांडलेल्या शंका आणि कोणाही साधारण वाचकास येण्यासारख्या मानसांतील शंका यांचें समाधान बहुधा मानसाधारेंच केलें आहे. शंका येण्यासारखीं स्थळें गोस्वामीजींनीं मुद्दाम जागोजागीं निर्माण करून ठेवलेलीं दिसतात. शंकासमाधानयुक्त केलेलें सश्रद्ध श्रवण चित्तांत सहज ठसतें. दुस्तर्करहित श्रद्धायुक्त शंका विचारणारा खऱ्या वक्त्यास प्रिय वाटतो, उपकारक वाटतो; म्हणून गोस्वामीजींनीं असें केलें असावें.

अध्यात्मपर अर्थ — श्रीरामावताररूपी नाटकांतील मुख्य पात्रें, स्थळें, ऐतिहासिक घटना इत्यादींचा अध्यात्मपर अर्थ लावण्यास लागणारे आधार व खुणेचे शब्द मानसांत भरपूर आहेत. *अध्यात्म रामायण हें नांव असणाऱ्यांतसुद्धां असे आधार नाहींत.* मानसांतील आधारांच्या पायावर मुख्य मुख्य सर्व ठिकाणीं अध्यात्म-पर अर्थ गूढार्थचंद्रिकेंत स्पष्ट केला आहे; व मानसांतील वचनांच्या तुलनेनें तो सिद्ध केला आहे. कांहीं महत्त्वाचे नमुने पुढील एका स्वतंत्र प्रकरणांत दिले आहेत. श्रीराम-चरितमानसांत सांपडलेल्या आधारांमुळेंच *वेदान्तसार अभंग रामायण* लिहितां आलें; व नागपूरला प्रकाशित होऊन महाराष्ट्रांत उपलब्ध झालें आहे. अध्यात्मपर अर्थाचें व शंकासमाधानांचें संकलन केल्यास १।१ पुस्तक तयार होईल, वेदान्तसार अभंग रामायणापेक्षां अधिक विस्तृत व साधार स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकेंत आहे.

योगपर अर्थ — पार्वती-तपश्चर्या व विवाह, मनुशतरूपातपश्चर्या आणि सीताशोधास निघाल्यापासून परत येऊन रामभेटीपर्यंतचें हनुमंताचें चरित्र हीं प्रकरणें उत्तम प्रकारें कुण्डलिनीमहायोगपर लावून दाखविलीं आहेत. असा अर्थ लावण्यास लागणारे खुणेचे शब्द गोस्वामीजींनीं मानसांत हेतुपूर्वक योजिलेले आढळतात. पुढील एका प्रकरणांत एक नमुना दिला आहे.

(क) मानसांतील 'योग' वर्णन योगशास्त्राधारें टीकेंत सिद्ध केलें आहे, आणि मा. पी. संपादकांनीं मा. पी. मध्यें मांडलेल्या शंकेचें समाधान उपनिषदादिकांच्या आधारें गूढार्थचंद्रिकेंत केलें आहे. अष्टमहासिद्धींच्या व्याख्या ऐन वेळीं आर्यावृत्तांत तयार झालेल्या गूढार्थचंद्रिकेंत आहेत. तसेंच मानसांतील अष्टमहासिद्धींचीं उदाहरणें व पातंजल योगसूत्रें विभूतिपादांत वर्णिलेल्या ३० प्रकारच्या इतर सिद्धींचीं मानसांतील उदाहरणें चंद्रिकेंत दाखविलीं आहेत.

टीकेंतील भाषा — कोणाहि मानस-वाचकाला सहज कळेल अशी सोपी, चित्ताकर्षक

व मधुर भाषा वापरण्याचा प्रयत्न या बुद्धीनें केला आहे; व अशी खात्री वाटते कीं ज्यानें १०।२० वेळां श्रीरामचरितमानस वाचलें असेल असा कोणीहि वाचक अगदीं मंत्रमुग्ध होऊन ही टीका वाचील व पुस्तक खालीं ठेवणें त्याच्या जिवावर येईल. (हा हस्तलिखित टीका-वाचकांचा अनुभवच लिहिला आहे.) (क) संवादांवरील टीका घरीं होणाऱ्या खाजगी संवादाप्रमाणें बोलभाषेंतच लिहिली असल्यानें ती वाचतांना स्वभावतःच फार सोपी, आकर्षक आणि स्वाभाविक वाटते. मराठी भाषेंतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील वाक्प्रचार व म्हणी प्रयत्न न करतांच जागोजागीं टीकेंत प्रविष्ट झाल्या आहेत. या प्रस्तावनेंतहि हें वैशिष्ट्य नजरेस आलेंच असेल. (ख) पुष्कळ ठिकाणीं सोपें गद्यकाव्य व अनुप्रास यांचा रस चाखावयास सांपडतो. (ग) थोडक्यांत, मार्मिक सहज विनोदही अनेक ठिकाणीं हास्यरस उत्पन्न करील.

तात्त्विक चर्चा सर्वसाधारण वाचकांस झेपेल व सहज समजेल आणि कंटाळवाणी वाटणार नाहीं अशा पद्धतीनें अल्प प्रमाणांतच विस्तारली आहे. (क) वैराग्य, योग व ज्ञान या प्रकरणांतील टीका शास्त्रीय दृष्टीनें अत्यंत आवश्यक तेवढीच लिहिली आहे; कारण कीं असल्या विषयांचा जास्त विस्तार करण्यास पांडित्य लागतें; व त्याचा तर या बुद्धींत अभाव आहे. **वैराग्याचे मुख्य दोन भेद** व अपर वैराग्याचे चार प्रकार इत्यादींचीं लक्षणें व मानसांतील उदाहरणें दिलीं आहेत. **योगाच्या विविध प्रकारांचा उल्लेख** व त्यांतील साधनभेद आणि सर्व योगांमध्यें आवश्यक सामान्य गोष्टी कोणत्या हेंहि स्पष्ट दाखविलें आहे.

उपदेश — मानसांतील विविध संवाद, कृति, उक्ति, घटना इत्यादिकांवरून वक्ते, श्रोते व वाचक यांनीं ग्रहण करण्यासारखें सार ‘ उपदेश ’ या नांवानें टीकेंत मुद्दाम दाखविलें आहे. त्या सर्वांचें संकलन केल्यास एक अत्यंत उपयुक्त पुस्तक तयार होईल. ‘ उपदेशनमुने ’ हें एक प्रकरण पुढें आहे.

तुलना — मोठमोठीं सांगरूपकें किंवा एका निरंगरूपकाचीं या मानसांत न वर्णिलेलीं अंगें, उपमांतील गुणांचा विस्तार, इत्यादींचें मानसांतील उदाहरणांनीं तुलनात्मक वर्णन करून शिवाय कोष्टक रूपानें त्यांच्या व इतर अनेक तुलना केल्या आहेत. प्रस्तावना परिशिष्टांत ९९ तुलनांची सूची दिलेली आहेत.

श्रीतुलसीचरित्रादि — मानसांतील वर्णनांत श्रीतुलसीदासांचें चरित्र व तत्कालीन परिस्थितिनिदर्शक वचनें, गुप्त वा प्रगट, जेथें जेथें आढळून आलीं तेथें त्यांचें स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकेंत केलें आहे. ‘ श्रीमानसोपलब्ध श्रीतुलसीदासचरित्र ’ या प्रकरणांत पूर्वीं बरीच माहिती दिली आहे.

कांहीं कविसंकेत — मानसांत आढळून आलेल्या विशिष्ट गूढ संकेतांचा उलगडा मानसाधारेंच करून दाखविला आहे. उदाहरणें पांचव्या मुख्य प्रकरणांत, स्वतंत्र प्रकरणांत दिलीं आहेत. हे संकेत व त्यांची विशिष्ट रचना पाहिल्यावर मोठमोठे

भाषाकोविद आश्चर्यानें थक्क होतील व '*अशी काव्यकला जगांतील कोणत्याहि भाषेंत मिळणें अशक्य !*' असे सहजोद्गार काढतील. पक्षाभिनिवेशांध असतील ते अपवाद ठरतील. '*विश्वसाहित्यमें रामचरितमानस*' *या प्रो. लमगोडाजी एम्. ए, एल् एल्. बी. यांच्या पुस्तकांत गूढार्थचंद्रिकेंत लागलेल्या अद्भुत शोधांचा थांगपत्ताहि नाहीं तरी त्यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं श्रीरामचरितमानस एकमेव अद्वितीय ग्रंथ आहे.* '*मानसमहत्त्व*' हा हिंदी ग्रंथ वाचून पाहिल्यानेंहि तसेंच मत बनेल; *मग ही सर्व प्रस्तावना वाचून पाहिल्यावर* तसें मत बनलें व सहजोद्गार निघाले तर त्यांत नवल काय ?

साहित्यशास्त्र — बालकाण्डांतील मानसरूपकांतच या शास्त्राच्या विविध अंगांचे उल्लेख असल्यानें त्या प्रकरणाच्या गूढार्थचंद्रिकाटीकेंत ध्वनि, गुणीभूत व्यंग्य, रस, भाव, रीति, गुण, दोष, अलंकार इत्यादींचीं लक्षणें, प्रकार, उपयोग इत्यादिविषयीं लिहावेंच लागलें. भाव, स्थायीभाव, आलंबनविभाव, उद्दीपनविभाव, अनुभाव, संचारीभाव इत्यादि पारिभाषिक शब्दांची चर्चा आली; शृंगारादि नऊ रस व भक्ति हा दहावा रस यांची माहिती अगदीं आवश्यक तेवढीच दिली आहे. टीकेंतहि ठिकठिकाणीं रस व भावविश्लेषण केलें आहे.

(**क**) उपमा, रूपकें, उत्प्रेक्षा, दृष्टान्त, अपह्नुति इत्यादींचा पूर्ण विकास करून दाखविला आहे. मानसांत जेथें अनेक उपमानें वापरलीं आहेत तेथें तीं सर्व सहेतुक सापेक्ष आहेत हें मानसांतील उदाहरणांनींच स्पष्ट करून दाखविलें आहे. 'अनेक उपमादृष्टान्तादि सहेतुक' हें प्रस्तावनेंतील प्रकरण वाचून आश्चर्यचकितच व्हावें लागेल. (**ख**) प्रसाद, माधुर्य व ओज या काव्यगुणांचीं डोळ्यांत भरण्यासारखीं उदाहरणें जेथें आलीं तेथें माधुर्य व ओज कां व कसें निर्माण झालें हें तुलना करून दाखविलें आहे. (**ग**) सर्वसाधारण वाचकांस कंटाळवाणी वाटणारी आणि गूढार्थादि समजण्यास अनावश्यक असणारी अलंकारांची चर्चा गूढार्थचंद्रिकेंत टाळली आहे. मानसांतील सर्व अलंकारांची व त्यांच्या पोटभेदांची चर्चा उदाहरणें व लक्षणें यांच्यासह करावयाची म्हणजे एक 'तुलसी—अलंकारदर्पण' ग्रंथच लिहावा लागेल. लेखकाच्या अज्ञानावर पांघरूण घालण्याच्या ज्या अनेक लेखकयुक्ति आहेत त्यांतील एका युक्तीचा उपयोग येथें केला असें मात्र कोणी समजूं नये. हा लेखक अन्य—शास्त्रज्ञानांत जसा फारच कच्चा आहे हें पूर्वी अनेक वेळां स्पष्ट सांगितलें आहे तसेंच अगदीं स्पष्ट सांगावेंसें वाटतें कीं *या लेखकाच्या बुद्धीचें साहित्यशास्त्रज्ञान अगदीं तुटपुंजें आहे.* पदवी परीक्षेकरितां या शास्त्राचा जो अभ्यास केला जातो तो तें शास्त्र विसरण्याच्या तयारीनेंच केलेला असतो ! तसेंच या बुद्धीनेंहि केलें. फक्त एक श्लोक 'काव्यं यशसेऽर्थकृते' आणि काव्य शब्दाची व्याख्या एवढेंच भांडवल ४० वर्षांनंतर शिल्लक होतें ! *गूढार्थचंद्रिकेचा भार ज्यांनीं शिरावर दिला त्यांनींच विविध शास्त्रांची माहितीसुद्धां मिळवून दिली.*

संदर्भचरित्र-कथा — गणेश, गणेश प्रथमपूज्य, अगस्ति इत्यादि अनेकांच्या चरित्रांचे संदर्भ मानसांत आले आहेत; त्या सर्वांच्या पौराणिक कथा गूढार्थचंद्रिकेंत दिल्या आहेत. (सूची पाहावी)

नदीपर्वतादिकांचे संबंध — मानसांत जेथें जेथं आले तेथं त्यांची माहिती व आवश्यक तेथें समन्वयात्मक स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकेंत केलं गेलं आहे. *सूची परिशिष्टांत पाहावी.*

पक्षीवर्णन — ज्या खगांची माहिती महाराष्ट्रीय वाचकांस फारशी नाहीं असें वाटलें त्यांचें वर्णन टीकेंत केलें आहे.

वनस्पतिवर्णन — सर्वसाधारण वाचकांस अपरिचित अशा वृक्ष-वनस्पति इत्यादींची विस्तृत माहिती दिली आहे.

काण्डवैशिष्ट्य — प्रत्येक काण्डाचें वैशिष्ट्य त्या काण्डाच्या मंगलाचरण श्लोकांच्या टीकेनंतर दिलें आहे.

सप्त मोक्षपुरी — अयोध्या, मथुरा, माया, काशी, काञ्ची, अवन्तिका व द्वारवती (द्वारका) या सात मोक्षपुरी बाल, अयोध्या, अरण्य इत्यादि सात काण्डें क्रमशः आहेत, हें काण्डारंभीं किंवा शेवटीं सिद्ध केलें आहे.

इतर वैशिष्ट्यें — चित्रकूटचा लक्ष्मणक्रोध, लक्ष्मण स्वभावाचें मर्म, लक्ष्मणभरत यांची तुलना, श्रीसीताहरण, त्यांतील रावणाचा हेतु, वालीवध, बिभीषणनिष्कासन (हद्दपारी) व मानसांतील विविध चरित्रांचें श्रेष्ठत्व आणि आदर्श चरित्र-चित्रण, इत्यादिविषयीं भरपूर चर्चा केली आहे.

(क) मानसांत वर्णन न केल्यासारख्या वाटणाऱ्या सीतापरित्याग, कुशलव यांचा विजय, सीतेचा भूविवरप्रवेश, लक्ष्मणनिर्याण, व श्रीरघुनाथाचें स्वधामगमन या गोष्टी मानसांतच अति गूढ ध्वनीनें कशा वर्णिल्या आहेत हें मानसांतील आधारानेंच टीकेंत स्पष्ट केलें आहे. ती टीका पाहिली किंवा तें वर्णन ऐकलें म्हणजे वाचक व श्रोते श्रीगोस्वामींच्या ध्वनिकौशल्याची तारीफ आश्चर्यचकित होऊन करतात असा प्रत्यक्ष अनुभव आहे.

(ख) किष्किंधाकाण्ड सर्वांत अगदीं लहान कां व दोहे ३० च कां? याचा उलगडा तुलसी ग्रंथांधारें त्या कांडाच्या टीकेच्या शेवटीं सविस्तर तुलनेनें केला आहे. ' कामधेनु किष्किंधा काशी ' हें प्रकरण पहा.

(ग) सुन्दरकाण्डांत ६० दोहे कां? याचें उत्तर ' किष्किंधा काशी ' पुरीनें दिलें व सुन्दरकांड = कांचीपुरी याची सार्थकता दाखविली आहे. ' सुन्दर ' शब्दाच्या अर्थानुसार सुंदरकाण्ड हें नांव फक्त मानसांतील सुन्दरकाण्डासच कसें यथार्थ आहे, व मानसांतील इतर काण्डांस सुन्दर कां म्हणतां येणार नाहीं हें टीकेंत तुलना करून दाखविलें आहे.

(घ) **लंकाकाण्ड हें नांव कसें यथार्थ आहे** व वाल्मीकी रामायणांतील युद्धकाण्ड हें **नांव** कसें अयथार्थ आहे आणि **लंकाकाण्डांत १२१ दोहे कां ?** या प्रश्नांची चर्चा व समाधानकारक उत्तरें गूढार्थचंद्रिका देते.

(ङ) **अरण्यकाण्डांत ४६ दोहे कां** आणि **उत्तरकाण्डांत १३० दोहे कां ?** याचा उलगडा–शोध लागला आहे, पण या चिकित्सक बुद्धीचें पूर्ण समाधान–खात्रीपूर्वक झालें नसल्यानें त्या शोधास गूढार्थचंद्रिकेंत स्थान मिळालें नाहीं. अयोध्याकाण्डांतील दोह्यांच्या संख्यांचें कारण दिसूं लागलें आहे. पण संशोधन करावयास पाहिजे आहे. बालकांडांतील दोह्यांच्या संख्येचें कारण अजून दृष्टिपथांत झळकत नाहीं.

चौपाया-संख्या-विषमता — दोह्यांच्या अंगभूत असणाऱ्या चौपायांची संख्या सर्वत्र सारखी नाहीं. अरण्य, *किंष्किधा*, सुंदर व उत्तर काण्डांचा पुरवणी परिशिष्ट भाग यांत जास्त विषमता असणेंच कसें नैसर्गिक आहे हें टीकेंत दाखविलें आहे. या चार काण्डांच्या मानानें लंकाकांडांत विशेष विषमता कां नाहीं हेंहि गूढार्थचंद्रिकेच्या प्रकाशांत दिसतें. बाल. दो. १८८ पासून म्हणजेच श्रीरामजन्माख्यानापासून अयोध्याकाण्डसमाप्तीपर्यंत दोह्याच्या अंगभूत चौपाया आठ (८) हा नियम कसोशीनें पाळलेला आहे. जेथें या नियमास अपवाद दिसतात तेथें ते सहेतुक व गूढार्थप्रकाशक आहेत. ते हेतु व गूढार्थ, चंद्रिकेंतच दिसतात; गूढार्थचंद्रिकेनेंच दाखविले आहेत. पांडित्य-भास्कराच्या दिपविणाऱ्या चण्ड प्रकाशांत हिंदी टीका अशा गूढ गोष्टी दाखवूं शकत नाहींत.

अयोध्येंतील सरोवरांत कमलिनी–चौपाया — श्रीराम–चारुचंद्र–उगवणार असें दिसतांच जिकडेतिकडे सौंदर्यवृद्धि व सुव्यवस्थितपणा दिसूं लागला, तेव्हां तेथील तलावांत कमल-लतांना (कमलिनींना) अव्यवस्थितपणें कोण वाढूं देणार ! त्यामुळें नियमबद्धता दिसूं लागली. पण अरण्यांतील, काननांतील तलावांत त्या मनसोक्त वाढल्या व फुलें–कमळें थोडीं दिसूं लागलीं व नैसर्गिक वृद्धि झाली; म्हणून दोह्यांच्या अंगभूत चौपायांची संख्या अनियमित व पुष्कळ वाढली; पण लंका रावणाची राजधानी ! तेथेंहि नियमबद्धता वाढली; पण रामपुरी अयोध्या व रावणपुरी लंका यांची बरोबरी कशी होणार ? म्हणून लंकाकांडांत थोडा अनियमितपणा आहेच; हे व असे अन्य हेतु ध्यानीं धरून *चौपायांची संख्या परिस्थितिसापेक्ष ठेवली आहे* वगैरे गूढार्थचंद्रिकेंत दिसेल. जेथें *चौपाया मुळींच नाहींत अशीं १४ स्थानें व त्या अभावांतील हेतु चंद्रिकाच दाखविते.*

मानस नाट्यकाव्य — नाट्यकाव्याचे सुंदर नमुने प्रस्तावनेंत स्वतंत्र प्रकरणांत दिले आहेत. टीकेंत ठायीं ठायीं नाट्याचा स्पष्ट उलगडा करून दाखविला आहे.

मानस महाकाव्य आहे — साहित्यदर्पणोक्त महाकाव्य लक्षणें मानसांत कशीं आहेत हें एका मुख्य (६ व्या) प्रकरणांत उदाहरणांसह सिद्ध केलें आहे. **(क) मानसाचे सप्तसोपान**—सात कांडें सात सोपान–घाटावरील दगडी पायऱ्यांचे मार्ग आहेत.

एकाच सरोवरांत जाण्यास सात मार्ग असतील तर कोणत्याहि एका मार्गानें गेल्यावर सरोवराच्या जलापर्यंत जातां येतें; तसे हे सात सोपान 'रघुपतिभक्तीचे पंथान' (उत्तर. १२९।३) आहेत. म्हणून एका सोपानांत जे विषय असतील ते बाकीच्या प्रत्येक सोपानांत असणें जरूर आहे. या निष्कर्षानुसार **सात काण्डें सात स्वयंभू महाकाव्यें आहेत** हें महाकाव्यलक्षणांत सोदाहरण दाखविलें आहे. प्रत्येक काण्ड सोपान असल्यामुळें रामभक्तीची सर्व साधनपरंपरा, भक्तिप्राप्ति व त्याचें फळ शुद्ध, पूर्ण स्वांतःसुख हें प्रत्येक काण्डांत असलें पाहिजे.

प्रत्येक काण्डांत संपूर्ण रामायण व इतर अनेक विषय कसे भरले आहेत हें प्रस्तावनेंतील विविध प्रकरणांत दाखविलें आहे.

काण्डविषय — प्रत्येक काण्डांत भक्तिसोपानपरंपरा म्हणजेच इतर सर्व काण्डांचे मुख्य विषय व रामायण असलें तरी प्रत्येक काण्डाचा मुख्य विषय स्वतंत्र असून तो त्या काण्डांत प्रामुख्यानें आहे हें गूढार्थचंद्रिका दाखविते.

(क) बालकाण्डाचा मुख्य विषय — त्रिविध रामस्वरूपाचें सर्वांगपूर्ण परोक्ष ज्ञान व अवतारहेतु रामजन्म व रामविवाहापर्यंत म्हणजे ब्रह्म आणि माया यांचा विवाह-निमित्तानें सहयोग. रामरूपाची सीतालक्ष्मणांसह हृदयसिंहासनावर स्थापना करून शाश्वत शुद्ध पूर्ण निर्भय सुखाची प्राप्ति हें ध्येय आहे.

(ख) अयोध्याकाण्डाचा विषय — त्या ध्येयप्राप्तिसाठीं विश्वासाश्रित सात्त्विक श्रद्धेनें धर्माचरण करून त्या धर्माचरणाचें फळ *अपरवैराग्यप्राप्ति करणें*—होणें— अयोध्याकाण्डाचें फल, मुख्य विषय आहे. उपसंहारांत शेवटीं *'होइ नाकिं भवरस-बिरति'* हेंच सांगितलें आहे. आदर्श भरतचरित्र आहे.

(ग) अरण्यकाण्डाचा मुख्य विषय — शमादिषट्कसंपन्न *अपरवैराग्यवान साधकास सद्गुरुकृपेनें*—मायावरणनिरासपूर्वक अपरोक्ष साक्षात्कार-*ज्ञान-प्राप्ति हा अरण्यकाण्डाचा विषय आहे*. अरण्यकांड मायापुरी कशी हें अरण्यकाण्ड वैशिष्ट्यांत (मा. मणि, व मा. पी. टीकेंत) पाहा.

(घ) किष्किंधाकाण्डाचा मुख्य विषय — ज्ञानाग्नीनें वासनाबीज जळून गेलें म्हणजे मग *रामनामरति* (आवड) *आणि रामकथारति यांची प्राप्ति होणें, हा या काण्डाचा मुख्य विषय आहे.* 'संत चरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळुनी जाय ।। *मग रामनामीं उपजे आवडी ।* सुख घडोघडीं वाढों लागे ।। (तुकोबा) किष्किंधाकाण्ड रामनामपर आहे, हें मंगलाचरण श्लोकांतच सिद्ध होतें. उपक्रमोपसंहा-रादि सर्व लक्षणांनीं गूढार्थचंद्रिकेंत सिद्ध केलें आहे.

(ङ) सुन्दरकांडाचा विषय — रामनामरति व रामकथारति प्राप्त झाल्यावर *प्रेमभक्तीची* याचना करण्याचा अधिकार प्राप्त होतो; म्हणूनच या काण्डाच्या मंगला-चरणांत *प्रेमभक्तीची याचना* केली आहे. ज्ञानिप्रति झाल्यावरसुद्धां कामक्रोधादि

भयानक दुष्ट राक्षस व त्यांचा राजा अहंकार रावण यांचें भय असतेंच, म्हणून.

(च) **लंकाकांडांत** — *'रामं कामारिसेव्यं भवभयहरणं* कालमत्तेभसिंहं...' इत्यादि मंगलाचरणांतच सांगितलें. रामनामरत व रामकथारत राहून रामलक्ष्मणांच्या साह्यानें *रावणादिकांचा निर्वंश झाला कीं प्रेमभक्तीची प्राप्ति होते*, हा लंकाकांडाचा मुख्य विषय आहे.

(छ) **उत्तरकाण्डाचा मुख्य विषय** — त्या *प्रेमभक्तीला वश झालेले राम, सीता व लक्ष्मणांसह देहरूपी अयोध्यापुरींत हृदयसिंहासनावर येऊन बसतात;* व मग कामक्रोधादि जवळ येऊंच शकत नाहींत व त्या देहपुरींत, देहराष्ट्रांत, रामराज्य सुरू होतें व तो जीव शाश्वत परमानंद-संदोह होतो.

कांडांची परस्पर संगति ही अशी लागते. हें सर्व बालकाण्ड मंगलाचरणाच्या सात श्लोकांत ग्रथित केलेलें असून काण्डांच्या उपक्रमोपसंहारांत व काण्डांत त्या त्या काण्डांचा उपरिनिर्दिष्ट विषय कसा दाखविला आहे याचें साधार सविस्तर विवेचन गूढार्थचंद्रिकेंत पाहावें.

श्रीमानसाच्या विविध हिंदी आवृत्तींत प्रत्येक काण्डाच्या शेवटीं लिलेल्या पुष्पिकेंत दाखविलेल्या विषयाच्या बाबतींत एकवाक्यता नाहीं. श्रीगोस्वामींच्या हातची मानसप्रत किंवा ज्या वर्षी मानस लिहिलें किंवा समाप्त झालें त्या संवत १६३१ व १६३३ ची प्रत उपलब्ध नसल्यामुळें अनेक पाठभेद व मतभेद उत्पन्न झाले आहेत, त्यांत काण्डविषय हा एक होय; परंतु त्या त्या काण्डांतील उपक्रमोपसंहारादि लक्षणांनीं जो विषय निर्णीत होतो तोच मानसगूढार्थचंद्रिकेंत दाखविला आहे व त्याचें सारच येथें दिलें आहे. (हें मानस पीयूष मध्यें प्रसिद्ध झालें आहे.)

अशा विश्वविख्यात अनुपम ग्रंथाची मूळ प्रत उपलब्ध नसावी यापेक्षां आम्हां भारतीयांच्या श्रद्धेचें, निष्ठेचें, आस्थेचें, व संतभक्तीचें हिडिस चित्र कोणतें असेल ? श्रीज्ञानदेवी (ज्ञानेश्वरी) वगैरे, अत्यंत श्रेष्ठ संतांच्या, ग्रंथांविषयींही हीच दशा ! श्रीसमर्थांचें बहुतेक काव्य श्रीकल्याणस्वामींच्या हातचें लिहिलेलें उपलब्ध असून त्यांचे स्वतःचे कांहीं स्मरणीय अवशेष आहेत हें अपवादभूत वैशिष्ट्य आहे !

या प्रकरणांत दर्शविलेल्या वैशिष्ट्यांशिवाय आणखी अनेक गोष्टी गूढार्थचंद्रिकेंत साधल्या आहेत. अनेक अगदीं नवीन अद्भुत शोध लागले आहेत, पण येथील विस्तारास कांहीं सीमा असणें जरूर असल्यानें अधिक विस्तार करणें श्रेयस्कर नाहीं. (**क**) आतां पुढील कांहीं प्रकरणांत चंद्रिकेंतील कांहीं नमुने देऊन हें तिसरें मुख्य प्रकरण समाप्त केलें जाईल. यापुढील प्रकरण 'गूढार्थचंद्रिकेंतील अध्यात्मपर अर्थाचा एक नमुना' हें आहे,

रामचंद्र जय तापत्रयहर। जय चंद्रिका-प्रकाशक रघुवर ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।९ 卐 卐 卐

गूढार्थ-चंद्रिकेंतील अध्यात्मपर अर्थाचा एक नमुना

प्रास्ताविक — श्रीमानसाधारें सर्व रामायण अध्यात्मपर लावून झाल्यावर, १३।३।४७ ला वेदान्तसार अभंग रामायण अनावर स्फूर्तीनें लिहून झालें. मानस-पीयूषासाठीं टीका लिहीत असतां मानसांतील एका ओळींत अति भरभक्कम पुरावा आधारास मिळाला व ज्या एका अर्थानें सर्वांवर कळस चढविला तेंच वचन, तीच मानसांतील एक ओळ अध्यात्मपर कशी लागते व त्याच प्रकरणांत भरपूर दुसरे आधार कसे भरून ठेवले आहेत, हें या प्रकरणांत दाखवावयाचें आहे.

संदर्भ — श्रीरघुवीरविवाहांत सप्तपदी विधि उरकल्यावर आणि रामचंद्रांनीं सीतेच्या भांगांत शेंदूर भरल्यावर (बाल. ३२५.)

छंद — **बसलीं वरासनिं रामजानकि मुदितमन दशरथ अती ।**
तनु पुलक, किंति निज सुकृत-सुरतरु बघुनि फल नव वर्षती ॥
उत्साह भरला भुवनिं, झाला म्हणति राम विवाह हा ।
तो वर्णुनी कीं सरत रसना एक, हें मंगल महा ॥ १ ॥
मग जनक मिळत वसिष्ठ शासन, लग्न-साजां सजवुनी ।
घे *माण्डवी श्रुतकीर्ति उर्मीला* **मुली बोलावुनी ॥**
कुशकेतु-कन्या प्रथम जी *गुण--शील-सुख-शोभाथिलि* ।
सप्रीति सर्वहि रीति करुनी नृपतिनें *भरता* **दिली ॥ २ ॥**
लघु जानकीभगिनी *सकल-सुंदरि-शिरोमणि* **जाणुनी ।**
जनकें दिली ती *लक्ष्मणा* **विधि सर्व करुनि विवाहुनी ॥**
श्रुतकीर्ति **नामें जी** *सुलोचनि सुमुखि सर्व गुणागरी* ।
रिपुसूदना **ती देइ भूपति** *रूप-शील-सुभास्वरी* **॥ ३ ॥**
अनुरूप वर नववधु परस्पर बघुनि लाजति हर्षती ।
सौंदर्यमोदें स्तविति सर्वहि सुमन सुरगण वर्षती ॥
सब सुंदरी सुंदर वरांसह एक *मण्डपिं राजती* ।
जणुं जीव-उरिं चारी अवस्था सहविभू विभ्राजती ॥ ४ ॥

यांतील शेवटच्या ओळींत अध्यात्मपर अर्थ भरलेला आहे. मागल्या वर्णनांतील सार :—

१. रामविवाह झाला व रामजानकी एका सिंहसनावर बसलीं. नंतर *माण्डवी*, श्रुतकीर्ति व उर्मिला या मुलींना बोलावून घेऊन माण्डवी भरतास दिली, उर्मिला लक्ष्मणाला दिली व श्रुतकीर्ति शत्रुघ्ना (रिपुसूदना) ला दिली. मुलींना बोलावण्याचा क्रम आणि विवाह करण्याचा क्रम (माण्डवी, श्रुतकीर्ति, उर्मिला; आणि माण्डवी, उर्मिला व श्रुतकीर्ति) यांतील भेद नीट लक्षांत ठेवावा.

(**क**) अनुरूप वर आणि वधू परस्परांस (एकमेकांकडे) पाहून लाजत आहेत, यानें ठरलें कीं *प्रत्येक वराच्या समोर त्याची वधू बसलेली आहे.* अशा रीतीनें हीं चार जोडपीं त्या एका लग्नमंडपांत विराजत आहेत. '*एक*' हा *शब्द आवश्यक नसतां मुद्दाम घातलेला आहे* हेंहि लक्षांत असावें. मंडपांत शोभत आहेत असें म्हटलें असतें तरी वाच्यार्थास बाध आला नसता; कारण कीं एकच विवाहमंडप राजवाड्याजवळ घातल्याचें पूर्वींच सांगितलें आहे. एकाच मंडपांत बसलेलीं हीं चार जोडपीं कशीं शोभतात पाहाः—' **जणुं जीव-उरिं चारी अवस्था सहविभू विभ्राजती** ।। जणूं जिवाच्या हृदयांत चारी अवस्था विभूंसह विराजत—भ्राजमान झाल्या—आहेत.

२. चार बहिणींना चार अवस्था, चार भावांना चार विभू व हृदयाला मंडप म्हटलें. जिवाच्या हृदयांत चार अवस्था असूं शकतात पण एकाच वेळीं असणें शक्य नसतें म्हणून उत्प्रेक्षा केली; कारण मंडपांत एकाच वेळीं चार जोडपीं आहेत.

(**क**) मंडप स्वतः कांहीं करीत करवीत नाहीं, पण त्याच्या आश्रयानें लोक विविध व्यवहार तेथें करतात. आंतील सर्व पोकळीचा मंडपांतच समावेश होतो; म्हणजेच मंडप सर्वव्यापक निष्क्रिय ब्रह्मासारखा आहे ' न तस्य कार्यं करणं च विद्यते ' (श्रुति) ब्रह्म सच्चिदानंदघन असलें तरी चलनवलनादि कोणतेंच कर्म, क्रिया तें करीत नाहीं. ' कारणकार्यपरं ' (६।११११६) कारण व कार्य यांच्या अतीत आहे. मायेचा उद्भव झाल्याशिवाय ब्रह्माच्या चेतनत्वाला क्रियाशील, कार्यप्रवण, होतांच येत नाहीं. त्यालाच मायासंपर्क झाला म्हणजे तेंच जडांना जीवविणारा जीव होतो. ' जीवयति जडान् इति जीवः ' ' जें जडातें जीववी ' (ज्ञानेश्वरी). चेतनशील प्राणमय कोषाला चेतना तोच देतो, ' चेतना तें चेववी ' (ज्ञानेश्वरी) मन आदि मनोमय कोषाचें कार्य व बुद्धि आदि विज्ञानमय कोषाचें कार्य त्याच्याच आधारानें होतें. तसाच वरचा निष्क्रिय मंडप व आंतला सक्रिय भाग (जीवहृदय) आहे. चारी अवस्थांचीं कार्यें त्यांच्या त्यांच्या विभूच्या—अभिमानीच्या—आश्रयानें, सर्वव्यापक ब्रह्ममंडपाचाच अंश असलेल्या जिवाच्या हृदयांतच होतात. *विभू अवस्थांचे द्रष्टे असतात,* तसे हे चौघे त्या चौघींकडे, आपापल्या समोर असलेल्या नववधूरूपी अवस्थेकडे बघत आहेत.

जाग्रत्	स्वप्न	सुषुप्ति	आणि	तुर्या	या चार अवस्था होत.
विश्व	तैजस	प्राज्ञ	व	प्रत्यगात्मा(ब्रह्म)	हे चार विभु

आपापल्या अवस्थेचे अभिमानी आहेत, चौघी बहिणी अवस्था आहेत व चौघे भाऊ त्यांचे अभिमानी विभु आहेत.

(**ख**) चौघा भावांत कोण कोणता विभु हें उपनिषदाधारें ठरवूं. बालकाण्डांत नामकरणांत आधींच तें ठरविलें आहे. *विश्व*—अकाराक्षरसंभूतः *सौमित्रिर्विश्वभावनः* = लक्ष्मण; *तैजस*—उकाराक्षरसंभूतः *शत्रुघ्नस्तैजसात्मकः* = शत्रुघ्न; *प्राज्ञ — प्राज्ञात्मवस्तु भरतो* मकाराक्षरसंभवः = भरत; *प्रत्यगात्मा*—ब्रह्म = ' अर्धमात्रात्मको *रामो* ब्रह्मा-

नन्दैकविग्रहः = राम. (राम. उ. ता. उ.) यावरून ठरलें कीं (१) *उर्मिला*=जाग्रदवस्था, लक्ष्मण विश्व विभु; (२) *श्रुतकीर्ति* = स्वप्नावस्था, शत्रुघ्न तैजस विभु; (३) *माण्डवी* = सुषुप्ति अवस्था, भरत प्राज्ञ विभु; (४) *जानकी* = तुर्यावस्था, राम प्रत्यगात्मा ब्रह्म विभु; सीतेचा विवाह आधीं झाला आणि मग *माण्डवी, श्रुतकीर्ति, उर्मिला* यांना बोलावून घेतलें. वरील क्रम सीतेपासून माण्डवी, श्रुतकीर्ति, उर्मिला असाच आहे कीं नाहीं नीट तपासून पाहावें. ' घे *माण्डवी श्रुतकीर्ति उर्मीला* मुली बोलावुनी ' (छंद पाहा) हा क्रम सहेतुक वापरला कीं निष्कारण हें ठरवावें.

(ग) माण्डवी व श्रुतकीर्ति सहोदर बहिणी (जुळया); माण्डवी मोठी, श्रुतकीर्ति लहान. उर्मिला व सीता या जनकतनया, बहिणी; सीता मोठी, उर्मिला लहान. सीता चौघींत मोठी. म्हणून विवाह करतांना माण्डवी, उर्मिला, श्रुतकीर्ति असा क्रम व्यवहारानुसार ज्येष्ठ कनिष्ठ दृष्टीनें ठेवला व तसाच भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न हा क्रम ठेवला. नामकरण तात्त्विक दृष्टीनें केलें म्हणून क्रम राम, भरत, शत्रुघ्न, लक्ष्मण असा तेथें ठेवला. (१।१९८।१ टी. पाहा.)

(घ) हीं चार जोडपीं कोणत्या क्रमानें समोरासमोर बसविलीं तें पाहूं पण ' दक्षिणे लक्ष्मणः ' रामाच्या उजव्या बाजूस लक्ष्मण आला पाहिजे. चौघे भाऊ पूर्वेस तोंड करून बसले असें समजूं.

	पश्चिम				
दक्षिण	भरत	शत्रुघ्न	लक्ष्मण	राम	
	माण्डवी	श्रुतकीर्ति	उर्मिला	जानकी	उत्तर

यांत रामाच्या दक्षिणेस लक्ष्मण पूर्वाभिमुख आहे. माण्डवी, श्रुतकीर्ति सहोदर भगिनी व उर्मिला, जानकी सख्ख्या बहिणी जवळजवळ आहेत. छंद २ मध्यें *माण्डवी, श्रुतकीर्ति, उर्मिला* असाच क्रम आहे. अवस्था ही विभूची शक्ति असते. 'श्रीरामो देवता, सीता शक्तिः ' असेंच म्हणतात.

३. चौघा भावांचीं नांवें व त्यांच्या शक्तींचीं नांवें वरील वर्णनास धरून कशीं आहेत तें पाहूं.

(१) **लक्ष्मण–उर्मिला = विश्व–जागृति–(क) लक्ष्मण** — ' लक्षणधाम राम-प्रिय सर्व *जगा आधार*' (१।१९७) हा लक्ष्मण नांवाचा अर्थ आहे. जग म्हणजे सर्व दृश्य विषयांचा पसारा; त्याचें ज्ञान होण्यास विश्वाभिमानी विभु (विश्व) = लक्ष्मण नसेल तर विषयांचें ज्ञान होणार नाहीं, म्हणून *जगाला आधार* हें *यथार्थ* ठरलें. ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व प्राण यांच्या साह्यानें जगाचें ज्ञान करून देण्यास लागणारीं सर्व लक्षणें विश्व-विभूच्या ठिकाणीं नसतात काय ? तथापि विश्वाला-लक्ष्मणाला-जागृतीच्या साह्याशिवाय जगाचें ज्ञान होत नाहीं. उर्मिला = जागृति अवस्था ही विश्वविभूची शक्ति आहे. मनुष्य जन्मतो त्या वेळीं जागृति अवस्थेंतच जन्मतो (मृत मूर्छित हे अपवाद

होत). जागृति = **जाग्रत् अवस्था म्हणजे इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करणें.** विषयांचें ग्रहण करण्यास अन्तःकरण वृत्तीच्या ऊर्मि=लाटा, तरंग, वीचि विषयांपर्यंत पसराव्या लागतात; म्हणजेच ही अवस्था ऊर्मिमय असते. ऊर्मिमय = ऊर्मिला = उर्मिला. जागृति = उर्मिला हें याप्रमाणें अध्यात्म दृष्टीनेंहि सिद्ध झालें. हें जग स्वप्नावस्थेंत व सुषुप्ति अवस्थेंतही नसतें. विश्व व जागृति असतील तरच हें जग असतें. जागृतीला आधार विश्व विभु, म्हणून 'सर्व जगा आधार ' हें लक्ष्मणाच्या नांवांतील लक्षण या दृष्टीनेंहि सत्य ठरलें.

(ख) उर्मिला — लघु जानकी भगिनी *सकल-सुंदरि-शिरोमणि*–' सकल सुंदरि शिरोमणि ' हें एकच विशेषण उर्मिलेला आहे. सीता–जानकी–' सुंदर सुंदरतेला करते ' (१।२३०।७) अशी आहे. जागृति अवस्था, स्वप्नावस्था व सुषुप्ति यांच्यापेक्षां सुंदर वाटते कीं नाहीं ? जगांतील सर्व सौंदर्याचा अनुभव या जाग्रत अवस्थेंतच येतो. स्वप्नें पडूं नयेत असेंच वाटतें व गाढ झोपेंत (सुषुप्तींत) कांहींच दृश्य नसतें मग सौंदर्य कुठलें ? म्हणून ' सुन्दरिशिरोमणि ' असें उर्मिलेला म्हटलें तें यथार्थ ठरलें.

(ग) जागृतींतूनच तुरीयावस्थेंत जातां येतें; तसें स्वप्नावस्थेंतून किंवा सुषुप्तींतून तुरीयेंत जातां येत नाहीं. जागृति आणि तुर्या–तुरीया यांचा असा अति निकट संबंध आहे; म्हणूनच सीता जानकीची सख्खी ' *लघुभागीनी* ' उर्मिला; दोघी जनकाच्याच मुली.

(घ) जागृतीचा अभिमानी विश्व–लक्ष्मणच जागृतीचा त्याग करूं शकतो आणि स्वप्नावस्था व सुषुप्ति यांना वश होत नाहीं म्हणूनच तो *रामप्रिय* ' लक्ष्मणधाम रामप्रिय ' असें लक्ष्मणाबद्दल म्हटलें तें खरें कीं खोटें तें ठरवावें ! विश्वानें जागृतीचा (विषय-ग्रहणाचा) त्याग केला व स्वप्नसुषुप्तींपासून अलिप्त, दूर, राहिला कीं तोच प्रत्यगात्मा होतो; तुरीयेंत जातो. म्हणजेच रामसीता यांची सेवा लक्ष्मण विश्व करतो. सेवणें = ग्रहण करणें व सेवा करणें असे दोन अर्थ आहेत. वाच्यार्थानें सेवा करतो, अनुगामी बनतो व अध्यात्म दृष्टीनें रामसीता–प्रत्यगात्मा–*ब्रह्म व तुरीया* यांचें ग्रहण, सेवन करतो. त्याला तुरीयावस्था व ब्रह्म यांची प्राप्ति होते व जो जागृतींत विश्व होता तोच जीव ब्रह्म बनतो-होतो. ' ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ' — ब्रह्म, आत्मा–प्रत्यगात्मा–अवस्था-त्रयातीत आहे.

लक्ष्मणानें तीन अवस्थांचा त्याग केला तेव्हांच त्याला रामसेवेचा लाभ मिळाला, तोच रामसीता यांच्याबरोबर गेला, राहिला. लक्ष्मण वनांत जाण्यापूर्वी उर्मिलेचा निरोप घेण्याससुद्धां गेला नाहीं; माण्डवी व श्रुतकीर्ति अयोध्येंत नव्हत्या; म्हणजेच स्वप्न व सुषुप्ति लक्ष्मणाजवळ येऊं शकल्या नाहींत. लक्ष्मणानें वनवासकाळांत निद्रा घेतली नाहीं. पहारेकऱ्याचें काम केलें. जेथें झोपण्याची क्रियाच घडली नाहीं तेथें स्वप्नावस्था तरी कोठली ? लक्ष्मण बारा वर्षें आहार घेत नव्हता; कंदमूलादिसुद्धां घेत नव्हता, म्हणजेच विषय ग्रहणच करीत नव्हता. विषय तो त्याचा सितारामसेवा । कधीं

अन्य देवा मनीं नाणी ॥ लक्ष्मणाची जागृति म्हणजेच रामसीतासेवा, म्हणजे तुर्यावस्था.

(२) **शत्रुघ्न श्रुतकीर्ति = तैजस-स्वप्नावस्था**–(क) **शत्रुघ्न** – शत्रुघ्न व लक्ष्मण सहोदर असून लहानपणापासूनच ते एकत्र राहिले नाहींत. '*जाणुनि निजहितपति* आशिशु-पण । रामचरणरत झाले लक्ष्मण ॥' (१।१९८।३). लक्ष्मण रामानुगामी, रामसेवक, रामानुज झाला. 'भरत शत्रुघ्न दोन्ही भ्रात्यां । प्रभुसेवकशां प्रीती स्तुत्या ॥ (१।१९८।४). शत्रुघ्न बालपणापासूनच भरतसेवक, भरतानुगामी, भरतानुज बनला; याचें कारण हेंच कीं स्वप्नावस्था व सुषुप्ति (गाढ निद्रा) तैजस आणि प्राज्ञ यांचा फार निकट संबंध आहे. बाह्य विषयांचें ग्रहणरूपी शत्रूचें व इंद्रियरूपी शत्रूंचें हनन केल्याशिवाय म्हणजे त्यांना दूर ठेवल्याशिवाय तैजसविषयांचें ग्रहण करतांच येत नाहीं. '*यत्स्मरणें रिपु नाश पावतो । श्रुतिविश्रुत शत्रुघ्न* नाम *तो* ॥' शत्रुघ्न तैजस विभु–तैजसात्मा–प्राज्ञांत विलीन होऊं शकतो पण विश्व = लक्ष्मण आणि प्रत्यगात्मा राम यांच्याशीं तादाम्य पावणें त्याला अशक्य असतें; म्हणूनच तो भरतानुगामी झाला.

(ख) **श्रुतकीर्ति** — श्रुत = ऐकलेलें व उपलक्षणेनें दृष्ट = पाहिलेलें यांची जी कीर्ति ती श्रुतकीर्ति म्हणजे पूर्वी केलेल्या, घडलेल्या पराक्रमादि गोष्टींचा शब्दादिकांनीं विस्तार करून दुसऱ्यांच्या प्रतीतीस आणणें. 'कीर्ति – प्रसादयशसोर्विस्तारे' (अ. व्या. सु.) (१) स्वप्नावस्था — इंद्रियें लीन झालीं–त्यांचा उपसंहार झाला–असतां जागृतींतील संस्कारांपासून उत्पन्न होणारी जी विषयप्रतीति ती स्वप्नावस्था–तें स्वप्न. '*इन्द्रियेषु संहतेषु जागरित संस्कारजः प्रत्ययः स विषयः स्वप्नः*' अशी स्वप्नाची व्याख्या आहे. अशी स्थिति जिच्यांत असते ती स्वप्नावस्था. श्रुतकीर्ति हें नांवसुद्धां किती यथार्थ आहे ! स्वप्नावस्थेंत असणारे, प्रतीतीस येणारे विषय बाह्य जड विषय नसतात व जागृतींत जीं इंद्रियें–कान, नाक, डोळे, हात, पाय इत्यादि असतात तीं स्वप्नांत नसतात. (२) शत्रुघ्न नांव ठेवतांना वर्णन केलेला अर्थ पाहा :—'यत्स्मरणें रिपु नाश पावतो । *श्रुतिविश्रुत* शत्रुघ्न नाम तो ॥ बाह्य विषय, त्यांचें ग्रहण व ग्रहण करणारीं इंद्रियें शत्रू आहेत. 'इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः' (भ. गीता) या इंद्रियांचा संहार–संहति–झाल्याशिवाय स्वस्थता, शान्ति मिळत नाहीं. ज्याच्या नुसत्या स्मरणानें शत्रूंचा संहार होतो तो शत्रुघ्न. तैजस विभूचें स्मरण झालें कीं इंद्रियांचा संहार होतोच; म्हणून शत्रुघ्न नामही यथार्थ आहे. आतां श्रुतकीर्तीचें मानसांतील वर्णन पाहूं.

(ग) श्रुतकीर्ति नामें जी *सुलोचनि समुखि सर्वगुणागरी* ॥ रिपुसूदना ती देइ भूपति *रूप–शील–सुभास्वरी* ॥ १ सुलोचनि, २ सुमुखि, ३ सर्वगुणागरी, ४ रूपवती, ५ शीलवती व ६ सुभास्वरी (तेजस्विनी). अशीं सहा विशेषणें श्रुतकीर्तीला आहेत. (१) **सुलोचनि** — स्वप्नांत सात्त्विक, राजस, तामस या सर्व गुणांची कार्यें घडतांना

दिसतात त्या वेळीं जागृतींतील लोचन–डोळे बंद असतात. जागृतींतील लोचनांपेक्षां सु = अति (विचित्र) लोचन असतात. जागृतींतील लोचनांना फार लांबचें वगैरे दिसत नाहीं; पण स्वप्नांतले डोळे काय काय पाहूं शकतात व किती *अति* लांबचें पाहूं शकतात हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. स्वतः उडतांना स्वतःस पाहतों; स्वतःचें मरण पाहतों; हजारों मैलांवरील गोष्टी दिसतात; जगांत असंभाव्य असणाऱ्या गोष्टीसुद्धां दिसतात! *असे अति (सु) लोचन जिला आहेत ती सुलोचनी स्वप्नावस्था नाहीं काय?* उर्मिलेचे व मांडवीचे नेत्र सुंदर नव्हते कीं काय? त्यांच्या वर्णनांत हें विशेषण नाहीं!

(२) **सुमुखि** = सुमुखी. झोपलेल्या देहाचें मुख बंद असतें; पण स्वप्नांतील मुख किती प्रकारचीं विचित्र कामें करीत असतें! बोलणें, भांडणें, आरडाओरड करणें, प्रवचन, कीर्तन, खाणेंपिणें, थुंकणें इत्यादि विविध क्रिया करतें पण किती वेगानें व द्रुतगतीनें करतें! तसें जागृतींतल्या मुखाला करतां येतें काय? मुळींच नाहीं; म्हणून स्वप्नांतलें मुख *अति* बलवान विचित्र असतें. *असें आतिमुख = सुमुख जिचें आहे ती स्वप्नावस्था नाहीं काय?*

(३) **सर्वगुणागरी** — सर्व गुणांची खाण. शुद्ध सात्त्विक, सात्त्विक, राजस, तामस यांच्या मिश्र गुणांची खाण स्वप्नावस्था = श्रुतकीर्ति यथार्थ आहे.

(४) **रूपवती** — स्वप्नावस्थेंत विविध, विचित्र, विपुल रूपें दिसतात, असतात; या जन्मांत न पाहिलेलें व जगांत, प्रत्यक्ष सृष्टींत अशक्य अशीं रूपेंसुद्धां स्वप्नांत असतात; म्हणून स्वप्नावस्था श्रुतकीर्ति रूपवती आहेच.

(५) **शीलवती** — शील = चरित्र; एका क्षणांत किती तरी वर्षांचें चरित्र स्वप्नांत घडतें. स्वतःच मरतो व मेलों म्हणून रडतो, इत्यादि.

(६) **सुभास्वरी** — अति तेजस्विनी; सु = अति. शत्रुघ्न विभु तैजसात्मा, तैजस आहे. त्याची भार्या अति तेजस्विनी नसेल तरच नवल.

ल. ठे. — उर्मिलेचे नेत्र, गुण, शील, तेज श्रुतकीर्तिपेक्षां कमी सुंदर होतीं कीं काय? तिला एकच विशेषण ' सकल सुंदरिशिरोमणि '! आणि श्रुतकीर्तीच्या वर्णनांत हीं सहा विशेषणें! *मुद्दाम वरील अर्थ ध्यानीं धरूनच हीं घातलीं असें कोणीहि विचारवंत म्हणेल*, पण या सर्व वर्णनांत *सुख देणारी, भूषणवती, सुंदरी हीं विशेषणें कां नाहींत?* श्रुतकीर्ति कोणास सुख देत नव्हती कीं ती सुंदर नव्हती? सर्व वधूवरें अनुरूप आहेत असें म्हणूनसुद्धां हीं विशेषणें गाळलीं. उर्मिला व माण्डवी कुमुखी होत्या कीं काय? अवस्थांचें साम्य सिद्ध करण्यास आवश्यक तेवढींच विशेषणें घातलीं; व विरोधी असणारीं गाळलीं. स्वप्नावस्था सुखदायक, भूषणास्पद, सुंदर वाटतच नाहीं. ती नकोशीच वाटते माणसांना.

(घ) स्वप्नावस्थेस तुरीयेची भेट होणें शक्य नाहीं. त्यांचा अति निकट संबंध

नाहीं. तसाच श्रुतकीर्ति व जानकी यांचा अति निकट संबंध नाहीं. भरत, शत्रुघ्न रामदर्शनासाठीं चित्रकूटला गेले; पण *श्रुतकीर्ति, माण्डवी चित्रकूटला गेल्याचा किंवा सीतेला भेटल्याचा उल्लेख मानसांत मुळींच नाहीं,* याचें कारण आतां ध्यानांत येईल.

(ङ) **विश्व** = लक्ष्मण—स्थूल जागतिक विषयांचें ग्रहण करूं शकतो; व तैजस = शत्रुघ्न सूक्ष्म, तैजस विषयांचें ग्रहण करतो. विषयग्रहण ही गोष्ट दोघांत सामान्य आहे, म्हणून हे दोघे सहोदर जुळे भाऊ. ' लक्ष्मण रिपुसूदन रूपं सम ' *विषयग्रहण हें दोघांचें समान रूप,* जागृतींतील विषय जागृतींत विश्वविभूला जितके सत्य आणि सुखदुःखादि द्वंद्वोत्पादक वाटतात तितकेच स्वप्नांतले विषय तैजस विभूला स्वप्नांत सत्य वाटतात, म्हणूनही दोघे सारखे. स्वप्नावस्थेंतून जागृतींत आल्यावर स्वप्नांतले विषय मिथ्या वाटतात; तसा अनुभव येतो; तसाच विषयजागृतींतून आत्मजागृतींत आल्यावर जागृदवस्थेंतील विषय मिथ्या असल्याचा अनुभव येतो. तुरीयाप्राप्ति (तुरीयासेवन) झाल्याशिवाय आत्मजागृति होत नाहीं.

या दोघांची माता सु-मित्रा आहे. मानसांतील सुमित्रा प्रवृत्तिप्रिय, प्रवृत्तिपर आहे हें चरित्र-चित्रण प्रकरणांत सुमित्राचरित्रांत साधार दाखविलें आहे. जागृति व स्वप्नावस्था प्रवृत्तिपरच असतात; सुषुप्ति निवृत्तिपर असते.

(च) मानस किंवा कोणतेंहि ऋषिप्रणीत रामायण घ्या व पाहा, हेंच दिसेल कीं शत्रुघ्नाचें चरित्र अगदीं अल्प ! मनुष्याच्या आयुष्यांतील किती काळ स्वप्नांत जातो विचार करावा ! असें हें साम्य आणखी पुष्कळ गोष्टींत वाढवितां येईल; अनेक मुद्दे पुढें उभे आहेत पण वाचकांच्या सुमतीस व पंडितांच्या कुशाग्र बुद्धीस व्यायाम करण्यास सवड पाहिजेच !

(३) **भरत – माण्डवी = प्राज्ञ – सुषुप्ति – (क) भरत** — ' जोही विश्वभरण-पोषण करि ' (१।१९७।७). विश्व = स्थूलसूक्ष्म, अंतर्बाह्य विषयांचा पसारा. त्याचें भरणपोषण करणारें असतें मूळ अज्ञान; त्याचा जो अभिमानी तो प्राज्ञ विभु, प्राज्ञात्मा. सुषुप्तीला बीजभावही म्हणतात; कारण तेथें स्वप्नांतील जगाच्या सत्यतेचें बीज व जागृतींतील जगाच्या सत्यतेचें बीज = कारण असतें. तें जर तेथें नसेल तर झोंपेंतून जागृतींत आल्यावर हें जग सत्य वाटणार नाहीं. सुषुप्तींत बीजरूपानें असलेलें अज्ञान व गुप्त संस्कारच जागृतींत कार्य करूं लागतात. आडांतलि, विहिरींतील, पाण्याचें भरणपोषण जमिनींतून गुप्तपणें वाहणारे झरे करतात; तसेच निद्रेंत गुप्त असलेले संस्कारच जागृतीचें भरणपोषण करतात. विपरित ज्ञान हें पोषण आहे, व अज्ञान हें भरण आहे. (ज्ञानेश्वरी अध्याय १५ व शंकरानंदी टीका ' कूटस्थोऽक्षर उच्यते 'ची पाहावी).

(ख) **राम व भरत दिसण्यांत सारखे;** तसेच प्रत्यगात्मा ब्रह्म व प्राज्ञ रूपानें

सारखे, दोघेहि आनंदमयच; पण सुषुप्तींतील आनंदमयता अज्ञानाच्या आवरणांत (अज्ञानावृत) असते, आणि म्हणूनच त्याला आनंदमय कोष म्हणतात. राम प्रत्यगात्मा ब्रह्म अज्ञान, विपरीत ज्ञान इत्यादि सर्वरहित आनंदमय कोषातीत आहे.

भरताची माता कैकयी तमोगुणप्रधान सत्त्वगुणी आहे. तमोगुणप्रधान सत्त्वगुणी बुद्धिवृत्ति = कैकयी आहे. 'प्रिय बहु निद्रा गायां गिरयां,' 'घर शाकारुनि लावि अग्निस,' 'करिं काढुनी नयन बघुं बघते' इत्यादि कैकयीचें वर्तन तमोगुणीच आहे.

(ग) **माण्डवी** — मण्डनरूप वाटणारी, भूषणरूप वाटणारी 'मडि भूषायाम्' (अ. व्या. सु.) गाढ निद्रा–सुषुप्ति कोणास बरें भूषण वाटत नाहीं ? ही अवस्था जरी अज्ञानावृत असली, कोणत्याहि विषयाचें अस्तित्व व विषयज्ञानादि नसलें, तरी ही अवस्था जिवांना किती प्रिय असते हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. ही अवस्था जो आनंद, जें सुख देऊं शकते त्याचा लेशही स्वप्नावस्था देऊं शकत नाहींच, पण जागृतींतसुद्धां तो आनंद मिळूं शकत नाहीं. ही सुषुप्ति अवस्था जर १।२ दिवस प्राप्त झाली नाहीं तर जागृतींत मिळणारा आनंदहि दूषण वाटूं लागतो इतकी ही अवस्था भूषणभूत आहे.

(घ) **प्राज्ञ व तैजस** — भरतशत्रुघ्न, सेव्यसेवकांसारखे आहेत. प्राज्ञ विश्वाचा व जागृतीचा बीजभूत असल्यामुळें लक्ष्मणापेक्षां मोठा भरत व उर्मिलेपेक्षां मोठी माण्डवी. हेंहि योग्यच आहे. आतां माण्डवीचें मानसांतील वर्णन पाहूं.

(ङ) **मांडवी** — 'कुशकेतु–कन्या प्रथम, जी *गुण-शील-सुख-शोभा*थिली,' गुणाढ्य, शीलाढ्य, सुखाढ्य व शोभाढ्य आहे. गुणवती, शीलवती, सुखमयी व शोभामयी मांडवी = सुषुप्ति (गाढ निद्रा) आहे. श्रुतकीर्तीची ही मोठी बहीण. गुण, शील व शोभा हे तिचेच गुण हिच्या धाकट्या बहिणींत श्रुतकीर्तींत (स्वप्नावस्थेंत) आहेत, कारण माण्डवी–सुषुप्ति अवस्था–स्वप्नावस्थेचें बीज आहे. स्वप्नावस्था सुखमयी नसते; व सर्वसाधारण जिवांना जाग्रदवस्थासुद्धां *सुखमय* असत नाहीं; कारण दुःखांचें मिश्रण असतेंच. *गाढ निद्राच सुखमय असते* हा सर्व मानवांचा अनुभव आहे. गाढ निद्रेंत सुख हीच शोभा आहे. गुण व शील बीजरूपानें गुप्त असतात. गाढ निद्रा नाहीं, तर मुखाची शोभासुद्धां कमी झालेली दिसते.

(च) **श्रीराम व भरत यांचीं चरित्रें** मानसांत वाचतांना अशी शंका येते कीं या कथेंत मुख्य नायक राम कीं भरत ? लक्ष्मण भरताहून कोणत्याहि बाबतींत कमी नसतां व बालपणापासूनच निष्काम, निरंतर, रामसेवारत अनन्यगतिक असतां, भरताबद्दल जी सहानुभूति व जें प्रेम उत्पन्न होतें तसें तितकें लक्ष्मणाविषयीं होत नाहीं; याचें कारण इतकेंच कीं राम व भरत या दोघांच्या स्वरूपांत विलक्षण साम्य आहे. समाधिसुख चाखणारा जीव विरळा, अपवादभूतच; पण निद्रेंतील निर्विषयानंद, ब्रह्मानंद अनुभवणारे सर्वच मानव असतात. 'भरत किं रामाचे अनुसारीं सहज न

जाणुं शकति नर-नारी ' (१।३११।६) निद्रानंद व शुद्ध ब्रह्मानंद यांतील भेद अनुभवलेले किती नरजीव असतील ? प्रपंचांत असून सर्व विषयांचा त्याग भरतानेंच करावा, प्राज्ञच करूं शकतो; निद्रेंत कोणताच विषय नसतो. लक्ष्मणानें सर्वस्वाचा त्याग केला हें खरें; पण मथूनमथून, रामसेवांगभूत कां असेना, तमोगुणाचा आश्रय केला आहे. लक्ष्मणाचें चरित्र भरतापेक्षां मोठें असलें, सर्व कांडांत असलें तरी तें स्वतंत्र नाहीं; ध्वजदंडासारखें आहे.

अयोध्याकाण्डांत राम आणि भरत यांच्या चरित्राचा विस्तार जवळजवळ सारखा आहे. प्राज्ञाच्या ठिकाणीं–निद्रावस्थेंत–विपरीत ज्ञानाचा मागमूस नसतो. भरताच्या मनांत रामलक्ष्मणांविषयीं विपरीत भावना कधींच उत्पन्न झाली नाहीं. भरताविषयीं विपरीत भावना–रामस्नेहातिरेकानें कां असेना–लक्ष्मणाच्या ठिकाणीं अल्प काळ तरी उत्पन्न झाली आहे !

(छ) **अध्यात्मदृष्टीनें स्वप्न = विपरीत ज्ञान;** तें बद्ध जिवांच्या ठिकाणीं स्वप्नांत व जागृतींत पण असतेंच म्हणूनच *श्रीगौडपादकारिकेंत* म्हटलें आहे कीं, ' स्वप्ननिद्रायुतौ आद्यौ ' विश्व व तैजस हे दोघे स्वप्न (= विपरीत ज्ञान) व निद्रा (= अज्ञान,) युक्त असतात; आणि ' प्राज्ञस्तु अस्वप्ननिद्रया ' प्राज्ञ मात्र स्वप्नरहित निद्रेनें म्हणजे केवळ अज्ञानानें युक्त असतो, त्याच्या ठिकाणीं स्वप्न = विपरीत ज्ञान नसतें. याप्रमाणें ज्ञान आणि सुषुप्ति यांचें भरत व माण्डवी यांच्याशीं पूर्ण साम्य सिद्ध झालें.

(४) **राम-जानकी = ब्रह्म** (प्रत्यगात्मा) **तुरीया**–(**क**) **राम** = जो आनंदसिंधु सुखरासी । त्रिजगीं पावे लवें सुखासी ।। तो सुखधाम रामतन्नाम । दायक लोकां सब विश्राम ।। (१।१९७।५-६) असें नामकरणांतच म्हटलें आहे. ' चिदानंदमय अपली काया । विगतविकार ...... (२।१२७।५) ' राम सच्चिदानंद दिनेशीं । नाहीं मोहनिशा लवलेशीं ।। ' ' *तो परमात्मा राम* भवानी ! ।। ' ' व्यापी *ब्रह्म राम* ' इत्यादि विपुल आधार आहेत. ' प्रत्यगात्मा ब्रह्म ' (श्रुति) ' अर्धमात्रात्मको रामो ब्रह्मानन्दैकविग्रहः ' (रा. उ. ता. उ.)

(ख) **जानकी–सीता** — ' आदिशक्ति जी निर्मि जगा या । ती ही मम अवतरेल माया ।। ', 'गुण वश जींतें ', ' उद्भवस्थितिसंहारकारिणीं *क्लेशहारिणीम् । सर्वश्रेयस्करीं सीतां ......* ' (बाल. मं. श्लो. ५) **ही विद्यामाया, मूलप्रकृति आहे.** ' श्रीराम-सांनिध्यवशात् जगदाधारकारिणी । उत्पत्तिस्थितिसंहारकारिणी सर्वदेहिनाम् ।। ३ ।। *सा सीता भवति ज्ञेया मूलप्रकृतिसंज्ञिता ।।* प्रणवत्वात्प्रकृतिरिति वदन्ति ब्रह्मवादिनः ' (रा. उ. ता. उ.) विद्येच्या योगानेंच अज्ञान, अहंकार, मोह, काम इत्यादि सर्व राक्षसांचा विनाश होतो. रावणकुंभकर्णादिकांच्या व खरादिकांच्या विनाशास सीताच कारण झाली आहे. **विद्या = ब्रह्माकारवृत्ति = तुरीया, ही गुणातीत अवस्थातीत स्थिति आहे. ' तीन अवस्था त्रिगुण** त्या काढि कापसांतून ।। तूल **तुरीया** पिंजुनी

जाडी वात वळून ॥ ' असा **पेटवी दीप तेजराशि विज्ञानमय** ' (७।११७ चं. द्रा.) ' **सोऽहमस्मि ही वृत्ति अखंडा । दीपशिखा** ती महाप्रचंडा ' (७।११८।१) **सीतेलाहि दीपशिखा** म्हटलें आहे. ' छबिगृहिं **दीपशिखा** जणुं जळते. ' (१।२३०।७) हीच **ब्रह्माकार अखंड वृत्ति.** आधार भरून ठेवण्याची अप्रतिम कला आश्चर्यकारक आहे ! *ब्रह्म व ब्रह्माकार*-वृत्तिसंबंध जलवीचिवत् असतो. ' गिरा अर्थ *जलवीचि सम* म्हणती भिन्न, *न भिन्न* ॥ वन्दे *सीताराम ......*' (१।१८।-) जानकी = चिदानंद-लहरी = ब्रह्माकार अखंडवृत्ति. पाणी आणि तरंग–वीचि–लाट भिन्न नसून भिन्न भासतात. पण लाट निराळी करतां येत नाहीं; म्हणूनच सीता रामाबरोबर वनांत गेली. मानसानुसार खरी सीता रावणाला–अहंकाराला–चोरतां आली नाहीं. लाट जशी पाण्यांतच अदृश्य होऊन राहते तशी सीता गुप्त राहिली. **सीता = शीता** (अ. व्या. सु. पाहा) = **शान्ति. हिची प्राप्ति भवचापभंग केल्याशिवाय होत नाहीं. भव = संसृति**–जन्ममरणपरंपरा. **भवरूपी धनुष्याचा भंग विमल ज्ञानरूपी रामाशिवाय इतर साधनभूपांना करतांच येत नाहीं.** हें धनुष्य मोडून शान्तिसीता मिळवूं शकेल तोच महावीराग्रणी ! ' महाअजय संसाररिपु जिंकुं शके तो वीर (६।८० रा.) **राजयोगानें प्राप्त होणारी निर्विकल्प समाधि म्हणजेच तुर्या-तुरीया.**

५. ल. ठे. – (१) जागृति असतांच समाधीचा अभ्यास-सेवा-करीत राहिल्यानें अज्ञान व विपरीतज्ञानयुक्त तीन अवयवांचा त्रिगुणांसह त्याग लक्ष्मण जीव करूं शकतो, व तो सीतारामांच्या बरोबरीनें वंद्य, पूज्य होतो. लक्ष्मणानें तिन्हीं अवस्थांचा त्याग केला व सीतेची–रामासह–सेवा केली. सीतेच्या कृपेनेंच रामकृपा–रामप्राप्ति–होऊं शकते.

(२) **शुद्ध सत्त्वगुणी बुद्धिवृत्ति = कौशल्या** — ' योगः कर्मसु कौशलम् ' (भ. गीता) हें कौशल–कौशल्य–जिच्याजवळ आहे ती कौशल्या (कौसल्या)च ज्ञानरूपी रामाची जननी होऊं शकते. जिथें अशी शुद्ध सात्त्विक बुद्धि असेल, तेथेंच शुद्ध ज्ञान–विमल बोधरूपी राम प्रगट होतात.

(३) *सतत ब्रह्मानंदांत मग्न असणाऱ्या जनक विदेहालाच शान्ति-सीतारूपी कन्या हृदयभूमींत सांपडते.* ब्रह्मानंदजनित सुख-शान्ति सीता जेव्हां रामाला दिली तेव्हांच जनकाला परम प्रेमरूपा पराभक्ति प्राप्त झाली. विवाहवर्णनास प्रारंभ झाल्यापासून सप्तपदी होईपर्यंत फक्त ' सीता ' शब्दच वापरला आहे. ' जानकी ' त्या भागांत मुळींच नाहीं. (' अद्भुत शब्दकला ' प्रकरण पाहा.) ब्रह्मानंदजनित सुखाकार वृत्ति शान्ति-सीता सगुण साकार ब्रह्माच्या ' ब्रह्मानन्दैकविग्रहा 'च्या जवळ सगुण साकार ब्रह्माकार होऊन बसली तेव्हां जानकी झाली. ' बसलीं वरासनिं राम-*जानकि* ' (बाल. ३२५ छंद १)

६. उत्प्रेक्षा कां केली ? — (१) बद्ध व मुमुक्षु जिवांना चार अवस्थांतील *शेवटची* =

तुर्या-तुरीया, कधींच प्राप्त होत नाहीं. त्यांना बाकीच्या तीन अवस्थांतील कोणती तरी एकच एका वेळीं प्राप्त होते. येथें म्हटलें आहे कीं चारी अवस्था व चारी विभु त्या एकाच मंडपांत, एकाच वेळीं आहेत. ब्रह्मनिष्ठांच्या ठिकाणींसुद्धां चार अवस्था एकाच वेळीं असूं शकत नाहींत. कधीं कोठेंहि न घडणारी गोष्ट संभवली अशी कल्पना केली म्हणून उत्प्रेक्षा केली.

(**क**) जीवन्मुक्त ब्रह्मनिष्ठांच्या ठिकाणीं एका वेळीं दोन अवस्था असूं शकतात *असें कदाचित् म्हणतां येईल,* शरीरादि व्यवहार करीत असतां बुद्धि आत्मस्वरूपीं जागृत असते व व्यवहार स्वप्नवत् चाललेला असतो या अर्थानें तसें म्हणवेल फार तर; पण अज्ञान = **सुषुप्ति** आणि अज्ञानजनित विपरीत ज्ञान व अज्ञानानें युक्त **स्वप्न व जागृति त्यांच्या ठिकाणीं नसतात; म्हणून तत्त्वतः ते सदा सर्वदा तुर्यंतच असतात; त्यांच्या समाधीचें व्युत्थान होत नाहीं. हिलाच सहजसमाधि म्हणतात.**

७. मरण केव्हां येतें ?— दशरथ सात्त्विक जीव आहे, दशमुख तमोगुणप्रधान सात्त्विक आहे, इतकाच भेद. राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांपैकीं कोणीहि जवळ नसेल (व लवकर जवळ येत नाहीं अशी खात्री झाली) म्हणजे दशरथाला मरण येतें. मरण म्हणजे स्थूल देहाचा (जड देहाचा) व त्यांत वास करणाऱ्या जिवाचा संबंध कायमचा सुटणें. अध्यात्म दृष्टीनें सर्वच मानव *दशरथ* किंवा *दशमुख* आहेत. विश्व, तैजस, प्राज्ञ आणि प्रत्यगात्मा यांपैकीं कोणीहि एक जोंपर्यंत जिवाच्याजवळ (हृदयांत) असतो तोंपर्यंत मरण येत नाहीं; त्यास मृतावस्था प्राप्त होत नाहीं. विभु-विरहित अवस्था असून नसल्यासारखीच; म्हणून उर्मिला जवळ असूनहि दशरथ जगूं शकले नाहींत. सीता आणि राम यांचा अभेद संबंध आहे; म्हणून दशरथानें सांगितलें आहे कीं रामलक्ष्मण न आले आणि सीता परत आली तरी प्राणांस आधार होईल. सीता = तुर्या समाधि अवस्था असल्यावर मरण येणें शक्यच नाहीं. सार हें कीं **जागृति, स्वप्न, सुषुप्ति किंवा समाधि यांतील कोणतीहि अवस्था नाहीं अशी स्थिति येते त्या वेळींच त्या देहाला मरण येतें, त्या देहाचा त्याग घडतो.** मूर्च्छा येते त्या वेळीं जागृतावस्था मूर्छित असते इतकेंच.

८. श्रीरामविवाहानंतर बाकीचे विवाह कां ?— वाल्मीकि रामायणाप्रमाणें सर्वांचे विवाह एकदमच झाले आहेत. *मानसांतील उल्लेख अध्यात्म दृष्टीनें आहे.*

तुर्यारूपी सीतेची प्राप्ति झाल्यावरच तो प्रत्यगात्मा ब्रह्म होतो. (तसा अनुभव येतो.) मग तिन्ही विभूंनासुद्धां आपापल्या अवस्था दुःखशोकरहित सुखमय होऊं शकतात. ‘ सुखमय तया सदा सब आशा ’ (आशा = दिशा). ‘ प्रेममग्न फिरती स्वसुखानें । स्वप्निंहि शोक न...... ’ सार हें कीं पत्नी–परिग्रह दुःखद व्हावयास नको असेल तर श्रीएकनाथ महाराजांप्रमाणें तुर्येचा व ज्ञानोत्तरभक्ती (जानकी)चा लाभ आधीं करून घ्या; असें न कराल तर विवाह = लग्न हें परमार्थांत (दुःखरहित सुखप्राप्तीच्या मार्गांत)

महाविघ्न आहे ! कांहीं थोडेंसें साधन करीत असाल तर तेंहि विराम पावेल. ' मोहवनिं नारिवसंत ' (३।४४।१ पासून ३।४४ पर्यंत नारीषड्ऋतु रूपक पाहावें).

उपसंहार — जागृत, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या–विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा असा क्रम सर्व श्रुति पुराणादि ग्रंथांत उल्लेखिलेला आहे. प्राणी जन्माला येतो त्या वेळीं प्रथम जागृति–जागृतावस्था असते. मूल रडूं लागलें कीं जन्म झाला असा सर्वसाधारण समजही आहे. उलट क्रम घेतला कीं राम प्रथम व लक्ष्मण शेवटीं येतात. तीं दोन टोकें मिळविलीं कीं लक्ष्मण रामाच्याजवळ येतात (१।१९८।१ गूढार्थचंद्रिका आकृति पाहा). असाच तात्त्विक दृष्टीचा क्रम नामकरणांत ठेवला आहे.

लं. ठे. — रामलक्ष्मणादिकांचीं लक्षणें नामकरणांत; अवस्थांचीं लक्षणें ' जणुं जीव–उरिं चारी अवस्था—' या ओळीच्या पूर्वीच्या छंदांत; कौसल्या, कैकयी यांच्या स्वभावाचीं लक्षणें अयोध्याकाण्डांत; ब्रह्माकार सोऽहमस्मि वृत्तीचें वर्णन उत्तरकांडाच्या शेवटीं ११८।१ मध्यें; तुर्येचें लक्षण उत्तर. ११७ द्रा. मध्यें; व सीतेला दीपशिखा म्हटलें बाल. २३० मध्यें. याप्रमाणें अनेकानेक ठिकाणीं आधार निर्माण करून ठेवलेले आहेत. त्याच आधारांवर हा लेख मुख्यत्वें उभारला गेला. हे *चार बंधु = वेदतत्त्व* हा उल्लेख (१।१९८।१) असल्यामुळेंच उपनिषदांचा आधार घेतां आला.

सूचना :— लक्ष्मण व शत्रुघ्न सुमित्रापुत्र असल्याचें वर्णन उपनिषदें, वाल्मीकि, अध्यात्म व इतर रामायणें, पद्म, स्कंद, अग्नि पुराणें यांत आहे. महाराष्ट्रांत जो समज पसरला आहे तो भावार्थ रामायणामुळें व त्याला आधार फक्त आनंद रामायण !

याप्रमाणें ' जणुं जीव–उरिं चारी अवस्थांसह विभू विभ्राजती ' या ओळींत भरून ठेवलेला अध्यात्मपर अर्थ श्रीराम-गुरुकृपेनें यथामति यथाविस्तर मानसाधारें स्पष्ट केला गेला. या एकाच उदाहरणांत अनेक कोडीं उलगडलीं असल्यानें, लहान लहान अनेक उदाहरणें न घेतां हें एकच व्यापक व फार मजेदार उदाहरण घेतलें.

अध्यात्मपर बऱ्याच अर्थांची सूची परिशिष्टात आहे. सारांशरूपानें सर्व रामायणांचा अध्यात्मपर अर्थ ' *वेदान्तसार अभंग रामायण* ' या छोटयाशा पुस्तकांत पाहतां येईल व अभंग वाणीनें स्मरणांत अभंग ठेवतां येईल. पुढील प्रकरणांत योगपर अर्थांचीं ११२ उदाहरणें दिलीं आहेत.

जय मानसगुरु गंगादास । वंदन सद्गुरुपदकमलांस ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।१० 卐 卐 卐

गूढार्थचंद्रिकेंतील योगपर अर्थाचे नमुने

प्रास्ताविक — योगपर असें म्हटलें असलें तरी योगाचा उपयोग ज्ञानप्राप्तीसाठींच असल्यानें, प्रथम योग व ज्ञान यांचें संमिश्र वर्णन असलेलें उदाहरण घेऊं व नंतर योग-प्रमुख असलेलें एक उदाहरण घेऊं.

१. ' अशिववेष शिवधाम शिव शिव—(शंकर) आपल्या विवाहास जाण्यासाठीं निघावयाच्या पूर्वी त्यांच्या शृंगाराचें जें वर्णन केलें आहे; त्याच्याशीं या विषयाचा संबंध आहे. शिवशृंगार-वरवेष-वर्णनः—

शिवगण शिवशृंगारा करिती । *जटामुकुटिं अहिमौर* सजविती ॥
***व्याल-कुंडलें कंकण* घालिति । *व्याघ्राजिन-पट विभूति लाविति* ॥**
***शशि ललाटिं गंगा शिरिं* सुंदर । *नयन तीन उपवीत सर्पवर* ॥**
***गरल-कंठ उरिं नृमुंड-माला । अशिववेष शिवधाम* कृपाला ॥**
करीं *त्रिशूल* नि डमरु विराजे । निघति *वसुनि वृषिं* वाजति बाजे ॥
(१।९२।१-५)

अशिव–अमंगल वेष असून शिव–शंकर शिवधाम = मंगलधाम आहेत. ' *चिदा-नन्दरूपः* शिवोऽहं शिवोऽहम् ' यांतील शिव शब्दाचा जो अर्थ तोच शंकरांच्या ' शिव ' नामाचा आहे. *अमंगल वेष असून शिव मंगलधाम-शिवधाम–कसे ?*

(१) जटामुकुटिं अहिमौर — जटामुकुट हें शुभ लक्षण; पण त्यावर सर्पमौर हें अशिव लक्षण आहे. तो सर्पाचा मौर सांगतो कीं मोठे तपस्वी असलांत तरी वासना-रूपी सर्पाची फडा जोंपर्यंत वर पसरलेली आहे, तोंपर्यंत तो चावणारच ! जन्ममरण चुकणार नाहीं.

(२) गंगा शिरिं — त्या सर्पभयापासून मुक्त होण्यास *ज्ञानगंगा* मस्तकावर अखंड धारण केली पाहिजे. त्याशिवाय शीतलता, पूर्ण पवित्रता व शांति मिळणार नाहीं. ज्ञान मिळविण्यास—

(३) शशि ललाटिं — तुम्हीं चंद्रासारखे कलंकित, क्षयी असलांत तरी सद्गुरु-रूपी शिवाचा आश्रय केलात कीं चंद्रासारखी शीतलता, शांति ज्ञानप्राप्तीनें मिळेल. ' यमाश्रित्य हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते ' (बाल. मं. श्लोक ३)

(४) व्यालकुंडलें — व्याल = भुजंग, नाग. त्यांचीं कुंडलें कानांत आहेत. सर्व बाजूंनीं *आसमंतात्-विरुद्ध* जाणारें = व्याल (अ. व्या. सु.) असें मन आहे. तें कानांत ऐकूं येणाऱ्या ध्वनीवर जर लावाल (*योगतारावलींत* नादानुसंधान पाहा) तर तें मन (व्याल) आपला स्वभाव सोडून महाविभूषण बनेल. येथें *नादानुसंधान-रूपी योगाभ्यास सुचविला आहे:* ' योग दे ज्ञाना '.

(५) **व्याल-कंकण** — वरीलप्रमाणें योगाभ्यास केलात कीं विषयरूपी व्याल तुम्हांला चावणार नाहींत. तुम्हीं त्यांना हातांनीं खेळवूं शकाल; ते तुमच्या हातांत भूषणांसारखे शोभतील.

(६) **व्याघ्राजिन पट** — शिव व्याघ्रचर्म नेसले आहेत. योगाभ्यास व्याघ्राजिनावर करावा; त्यानें योग लवकर सिद्ध होतो. (क) व्याघ्र-वाघ-जरी क्रूर असला तरी त्याचें चर्म पवित्र आहे. याप्रमाणें दोष न पाहतां दुसऱ्यांचे गुण पाहात अभ्यास करा, *गुणग्रहण करा*, पण *दोषांकडे बघूंसुद्धां नका*.

(७) **विभूति लाविती** — चिताभस्म शिवाच्या सर्वांगाला लावलें. *विभूति = अणिमादिक अष्टधा ऐश्वर्य*, योगाभ्यासानें अशा महासिद्धिसुद्धां मिळतील; पण त्या चिताभस्माप्रमाणें अमंगल समजा; मग तुमच्या अंगावरील भस्मानेंसुद्धां कल्याण होईल, करूं शकाल; पण सर्व दृश्य शेवटीं भस्म व्हावयाचें आहे हें सतत स्मरणांत असूं द्या.

(८) **नयन तीन** — शिवाला तीन नयन आहेत. नयन = सुखासमाधानापर्यंत नेऊन पोचविणारे. कृशानु, भानु आणि हिमकर (अग्नि, सूर्य व चंद्र) हे नेत्र आहेत. 'हेतु कृशानु भानु-हिमकरचें' श्री 'राम' नाम जवळ नसेल जर तीन नेत्र असले तरीसुद्धां अंधच बनाल, राहाल.

(९) **उपवीत सर्पवर** — उपवीत = डाव्या खांद्यावरून धारण केलेलें जानवें-यज्ञोपवीत. सर्पाचें जानवें आहे शंकराच्या गळ्यांत. सर्प, भुजंग कुटिलगति असतात. भाव हा कीं रामनामानें कुटिलगति असणारे कामक्रोधादिक मोठे सर्प—नागसुद्धां वश होतील.

(१०) **गरल-कंठ** — शिवाच्या कंठांत गरल = विष आहे; पण रामनामप्रभावानेंच तें त्यांना बाधलें नाहीं; उलट भूषण बनलें. 'कालकूट विष सुधा समर्पित' (१।१९।८) तें अमृत बनलें. तसें मरणाचें भय रामनामामृतानें राहणार नाहीं.

(११) **नृमुंडमाला** — जे असे रामभक्त असतील ते जिवंत असतां भगवान् शिवाला प्रिय असतातच; पण ते मेल्यावर त्यांचीं मुंडेंसुद्धां शिवाला भूषणास्पद वाटतात.

(१२) **करीं त्रिशूल** — श्रीरामनामरत रामभक्तांचे तीन शूल—आधिभौतिकादि त्रिविध पीडा शिव निवारण करतात. 'श्रीरामभूपप्रियम्' (अयोध्या. मं. श्लो. १) शिव रामाला प्रिय आहेत व राम शिवाला प्रिय आहेत.

(१३) **करीं डमरु विराजे** — डमरूचा ध्वनि रामभक्तांच्या सर्व विघ्नांना व शिव = कल्याण = मोक्ष विरोधकांना पळवून लावतो तसा रामनामध्वनि सर्व विघ्नें व सर्व विरोध नष्ट करतो.

(१४) **निघति बसुनि वृषिं** — शिव वृषारूढ होऊन लग्नाला निघाले. वृष = धर्म.

'*वृषो धर्मे बलीवर्दे*' (मेदिनी) 'शुक्ले मूषके श्रेष्ठे सुकृते ऋषभो वृषः (अमर) जो कोणी धर्मारूढ होईल—वेदपुराणोक्त धर्माचा आश्रय करील त्यासच वरील गोष्टी क्रमाक्रमानें प्राप्त होतील हें येथें सुचविलें.

उपसंहार—जटामुकुटापासून-कळसापासून-वर्णनास प्रारंभ केला व धर्मरूपी पायापर्यंत वर्णन केलें. (क) विरतिस धर्म योग दे ज्ञाना। ज्ञान मोक्ष दे श्रुति करि गाना' (३।१५।१) यांत धर्मरूपी पायापासून मोक्षरूपी कळसापर्यंत कारण-माला सांगितली. येथें आधीं कार्य सांगून मग कारण सांगितलें इतकाच फरक.

सूचना—गूढार्थचंद्रिकेंतून अलग करून येथें लिहिल्यामुळें थोडथोडा विस्तार करावा लागला. गूढार्थचंद्रिकेंत आधीं सविस्तर टीका लिहून मग सार सांगितलें आहे. आधार टीकेंत पाहावेत.

ज्या पार्वतीशीं विवाह करण्यासाठीं कैलासाहून निघून अशिववेष शिवधाम कृपाल [illegible] आरूढ होऊन निघाले आहेत, तिनें शिवप्राप्तीसाठीं तपश्चर्यारूपी योगसाधन कसें केलें हें पुढील उदाहरणांत पाहावें.

२. पार्वतीतपश्चर्या—उमाशिवचरित्र हा जसा इतिहास आहे, तसेंच तें एक प्रदीर्घ रूपक आहे. श्रीमदाचार्यकृत '*सौंदर्यलहरी*'च्या ४१ श्लोकांत अध्यात्मयोगाचें—कुंडलिनी-महायोगाचें विस्तारानें वर्णन आहे तें साररूपानें खालीं दिलें आहे.

(१) सती (दक्षकन्या) उमा व सच्चिदानंदघन शिव म्हणजेच शिवशक्ति, यांचा निवास ब्रह्मरंध्ररूपी कैलासशिखरावर होता; पण ती सती उमा हरिमायामोहित झाल्यामुळें तिचा आणि त्यांचा हजारों वर्षें वियोग झाला; नंतर तिनें योगाग्नीनें देहत्याग केला व पुष्कळ **काळानें पर्वताच्या घरीं पार्वती रूपानें जन्मास आली.** उमा = महेशाची – शिवाची – मा = माया = शक्ति, ओः महेशस्य मा = उमा (उ = महेश, एकाक्षर कोष व अ. व्या. सु.) हिलाच कुंडलिनी म्हणतात. (गीता ६।१४ वरील ज्ञानेश्वरी) **पर्वत = पाठीचा कणा;** [illegible] कर म्हणजे पृथ्वीतत्त्वाचें स्थान मूलाधारचक्र, त्याच्याजवळ, खालीं असलेल्या कुंडलाकार नाडींत ही शिवाची शक्ति राहते. जी सती उमा होती ती अशा योगानें पर्वताच्या घरीं जन्मली. पुढें शिवसंयोग, शिवाची प्राप्ति करवून घेण्यासाठीं *नारद* [illegible] हिला शिवावांचून अन्य पति नाहीं वगैरे सांगितलें; परंतु शिवप्राप्ति [illegible] कठिण असलें तरी 'जर तप तुमची करिल कुमारी' तर शिव पति मिळेल असें सांगितलें. (१।६६।५०–७०) पुढें उमा तपश्चर्येकरितां पर्वतावर गेली व तप करूं लागली (१।७४।१).

धरिं उरिं उमा प्राणपतिचरणां। **गत वनिं लागे तप आचरणा** ॥ १ ॥
अति कोमल तनु योग्य तपा ना। **स्मरुनि पतिपदां त्याजि भोगांना** ॥ २ ॥
नित्य अधिक मन चरिं अनुरागे। **विसरे देह तपीं मन लागे** ॥ ३ ॥
खाइ मूल फल वर्षें दशशत। शाक खात संवत्सर शत गत ॥ ४ ॥

(२) तिनें सर्व भोगांचा त्याग केला, व फलमूलादि भक्षण केले. फलमूलादि पृथ्वी तत्त्वाचे विकार आहेत. *जागृत झालेल्या कुंडालिनी शक्तीनें पृथ्वीतत्त्व भक्षण केलें.* ' पार्थिव धातु आघवी । आरोगिली कांहीं नुरवी ' (ज्ञाने. ६।२३०) मग,

(३) **किति दिन गेले** जळ-वातावर — *जलतत्त्वाच्या स्वाधिष्ठानचक्रावर आली* आणि जलतत्त्व प्राशन करून टाकलें. ' आणि आपातें तंव ठेवा । ' पुसोनियां ' (ज्ञाने. ६।२३१). पुढें अग्नितत्त्वाचें मणिपुरचक्र भेदून वातावर – *वायूवर राहूं लागली.* म्हणजेच *वायुतत्त्वाच्या अनाहतचक्रांत आली;* पुष्कळ दिवस वायुभक्षण करून राहिली; आणि मग,

(४) **करि उपवास कठिण किति वासर** (चौ. ५) — वायूचाहि त्याग केला आणि कठिण उपवास केले; म्हणजेच अनाहतचक्राचा त्याग करून *आकाशतत्त्वाच्या विशुद्धिचक्रांत येऊन राहिली.* तरीसुद्धां शिव प्रसन्न होत नाहींत असें पाहून,

(५) **' बिल्वपत्र पडलेलें वाळुनि । तें वर्षें त्रय सहस्र खाऊनि '** (चौ. ६) राहिली. वायूचाहि त्याग करून आकाशतत्त्वावरच राहणारी पुन्हां बिल्वपत्र कां खाऊं लागली अशी शंका येऊन (सर्वांनाच येते व आली आहे) तिनें हा अर्थ प्रगट करण्याचा पाया घातला. बिल्वपत्र त्रिदल असतें; तें तीन हजार वर्षें खाल्लें; त्यावर जगली. *एका बिल्वपत्रावर तीन हजार वर्षें राहिली* ! येथेंच मजा आहे. इडा, पिंगळा व सुषुम्ना जेथें एकत्र येतात (तेथें) त्यावर राहिली, जणूं हींच तीन दलें, एका बिल्वपत्राचे भाग. सार हें कीं *आज्ञाचक्रावर तीन हजार वर्षें राहिली.*

(६) आज्ञाचक्रांत तीन घटका स्थिर राहिल्यानें ज्ञानप्राप्ति होते असें योगग्रंथ सांगतात. आ = ईषत्, ज्ञा = ज्ञान ज्यांत प्रवेश केल्यानें होतें तें आज्ञाचक्र भ्रूमध्याच्या ठिकाणीं दाखविलें जातें. यालाच कोणी त्रिवेणी म्हणतात, कोणी त्रिकूट म्हणतात; येथें त्रिदल असणारें बिल्वपत्र म्हटलें. अशी तपश्चर्या केली तेव्हां,

(७) **' पुन्हा त्यागिती शुष्कहि पर्णा '** (चौ. ७) — तें बिल्वपत्र खाणेंसुद्धां सोडलें, म्हणजेच *आज्ञाचक्रांतून सहस्रारांत प्रवेश केला.* तेव्हां,

(८) **' क्षीण बघुनि अति उमाशरीरा । ब्रह्मगिरा गगनीं गमीरा '** (चौ. ८)— आकाशवाणीनें भगवंतांनीं (रामानें) सांगितलें कीं तुझे मनोरथ पूर्ण होतील, ' क्लेशां दु:सह थांबवी मिळति अतां त्रिपुरारि । ' (दो. ७४). आज्ञाचक्रांतून सहस्रारांत (गगनांत) प्रवेश केल्यावर जो ध्वनि ऐकूं येतो त्याचें हें प्रतीक आहे. **इतका अभ्यास झाला कीं शिवप्राप्ति होणार हें निश्चित ठरतें;** पण पुढें सप्तर्षिरूपी विविध सिद्धि येऊन भुलविण्याचा प्रयत्न केला जातो; पण गुरुवचनावर पूर्ण विश्वास असल्यामुळें व निष्काम तपश्चर्या करीत असल्यानें सिद्धींचे प्रयत्न भगवत्कृपेनें निष्फळ ठरतात.

(९) नंतर आकाशवाणीनें सांगितल्याप्रमाणें ती पुन्हां खालीं येते पण भवानी-भवनांतच शुद्ध स्वरूपानें राहते. खालीं आल्याबरोबर नाना विघ्नें आलीं; सप्तर्षिरूपी

सिद्धी पुन्हां आल्या तरी त्या परीक्षेंतून पुन्हां उत्तीर्ण झाली. नंतर शिव ब्रह्मरंध्रांतून (कैलास) जरा खालीं डोकावून हिमालयांत आले. त्यांनीं तिचें पाणिग्रहण केलें; तिचा हात पकडून तिला जवळ बसविलें. खालीं असलेल्यास वर चढण्यास कोणीं वरून हात दिला कीं चटकन् वर चढतां येतें; तसेंच 'अशिववेष शिवधाम कृपाल' शिवांनीं केलें. पुढें दोघेंहि वृषावर बसून–धर्मारूढ होऊन–आपल्या मूळ निवासस्थानीं कैलासास आलीं आणि *आत्मरति, आत्ममिथुन, आत्मक्रीड अशा स्थितींत हजारों वर्षें घालविलीं*. तो ब्रह्मानंदाचा महापूर ओसरला व *मोक्षरूपी षडानन पुत्राची प्राप्ति झाली*. (क) मानसांतील हें प्रकरण फार विस्तृत असल्यानें आकाशवाणीनंतरच्या भागाचा सारांश येथें थोडक्यांत दिला. मोक्षाचा त्याग करून, त्याची इच्छा टाकून पार्वतीला रामकथारति उत्पन्न झाली व मग तिनें प्रश्न विचारल्यावरून महेशांनीं श्रीरामचरितमानसकथा सांगून तिच्यावर कृपा केली व तिला पराभक्तीची प्राप्ति झाली आहे.

(१०) **उपसंहार** — योगाचा संबंध कसा जोडून ठेवलेला आहे हें मुख्यतः दाखवावयाचें होतें; तें आकाशवाणीचें आश्वासन मिळेपर्यंत दाखविलें आहे. गूढार्थचंद्रिकेंत या सर्वच भागावर आधीं टीका लिहिली गेल्यानें शेवटीं सार अगदीं थोडक्यांत सांगितलेलें आहे (१।१०५।८ व दोहा). या टीकेनंतर दिलेलें सारच येथें किंचित् विस्तारानें व थोडे आधार देऊन सांगितलें आहे.

यापुढें गूढार्थचंद्रिकेंतील शंकासमाधान नमुने हें छोटेंसें प्रकरण आहे.

वासुदेव जय बुद्धिप्रेरक। वारंवार नमीं पदसेवक ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।११ 卐 卐 卐

गूढार्थचंद्रिकेंतील 'शंकासमाधान' नमुने

प्रास्ताविक — श्रीमानसाची रचना मानससरोवरासारखी प्रसादगुणप्रधान असल्यानें अर्थ सहज समजतो. भाषा कोमल, रसाळ व मनो-हर असल्यानें कमलांच्या सुगंधानें जसे भ्रमर आकर्षिले जातात तसेंच सर्व श्रोत्यांचें होतें. वरवर वाचणारास फारशा शंका येत नाहींत; पण प्रसादपूर्ण असूनसुद्धां मानससरोवरापेक्षां अधिक खोल, अगाध, असल्यानें पूर्वापर संदर्भ लक्षांत घेऊन वाचणारास पदोपदीं शंका येतात; याचें कारण ग्रंथाचें श्रवण संतमुखानें न करतां वाचन केलें जातें व रहस्य उकलत नाहीं. मानसांतील शंकांचें समाधान करण्यास मानसांतील वचनेंच समर्थ आहेत; व मानसवचनांनीं शंकानिरास झाला तरच तें समाधान खरें; असा सर्व-साधारण नियमच समजावा. नियम सापवाद असतात हा एक नियम आहेच ! श्रीतुलसीदासच म्हणतात :—

दो० – श्रद्धा पथधन ना जयां नहिं संतांची साथ ।
त्यांना मानस अगम अति ज्यां प्रिय ना रघुनाथ ।। (१।३८)

(क) गूढार्थचंद्रिकेंतील शंकासमाधान आणि पूर्वनिर्दिष्ट परप्रांतांतील दोन हिंदी सुशिक्षितांच्या शंकांचें समाधान संकलित केल्यास छापील १५० पृष्ठांचें पुस्तक सहज तयार होईल. येथें अगदीं थोडे नमुने देऊन दुधाची तहान ताकावर भागविणें भाग पडत आहे.

सुधारती शठ सुसंग पावुनि । **लोहिं हेमता परीस लागुनि ।। (१।३।९)**
करिती *खलहि* **भले सत्संगें । तरी** *स्वभाव मलिन ना भंगे* ।। **(१।७।४)**
प्रेमें वायस फार पाळले । काक निरामिष कधीं जाहले ।। (१।५।२)

शंका १ ली — संतसंगति मिळाली म्हणजे शठ सुधारतात असें (१।३।९) एकदां म्हटलें व १।७।४ मध्यें म्हटलें कीं संतसंगतीनें खलांनीं चांगलें कार्य जरी केलें तरी त्यांचा मलिन स्वभाव जात नाहीं. हीं दोन वचनें विरोधी आहेत ना ?

समाधान — (१) **(क)** कोणी हिंदी टीकाकार शठ व खल हा शब्दभेद दाखवून आपली सुटका करून घेऊन बुद्धिभेद करतात. **(ख)** कोणी टीकाकार कच्चा खल व पक्का खल असा भेद करून पळवाट काढतात; पण हे दोन्ही मार्ग भ्रामक आहेत.

(२) श्रद्धाविश्वासयुक्त होऊन, संतसमागम करून, हरिहरकथात्रिवेणींत, अनुराग-जलांत खल जर मज्जन करतील तर तेसुद्धां सुधारतील हा सिद्धान्त वरील १।३।९ च्या पूर्वींच सांगितला आहे.

परिसुनि समजुनि मुदित मन मज्जति अति अनुरागिं ।
लाभ चारि फल या तनूं साधुसमाज-प्रयागिं (१।२।–)
मज्जनफल तत्काळ पहावें । बकें हंस, पिक काकें व्हावें ।। १।३।१ ।।

संतसमाजरूपी प्रयागांत, हरिहरकथात्रिवेणींत, अनुरागरूपी पाण्यांत प्रसन्न मनानें जे अति बुड्या मारतील ते काक असले तरी कोकिळ होतील व बगळे असले तरी हंस होतील. (क) *संतसंगानें शठांना–खलांना कसें सुधारतां येईल याचा विधि या तीन ओळींत* (१।२ व १।३।१) *सांगून ठेवलेला आहे*. या विधिप्रमाणें जे शठ संतसमागम करतील ते सुधारतील, असा संतसंगाचा महिमा आहे. या तीन ओळी व सुधारती शठ सुसंग पावुनि *हीं वचनें संतमहिमावर्णनांत आहेत*. हे टीकाकार पण ध्यानीं घेत नाहींत; तसेंच पुढील विरोधी वाटणारी चौपाई (१।७।४) खलस्वभाव-वर्णनांतली आहे हें शंका विचारणार ध्यानीं घेत नाहींत.

(३) शठांनीं सुधारण्यास त्यांनीं ज्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत त्या त्यांच्या सहज मलिन स्वभावामुळें त्यांच्याकडून पाळल्या जात नाहींत; म्हणून खल, शठ यांना संतसमागम घडला तरी ते सुधारलेले दिसत नाहींत. फारतर संतसंगतींत असेपर्यंत बाह्य कृति चांगली करतांना दिसतील. याला दृष्टान्त देतात— कावळ्याला सोन्याच्या

पिंजऱ्यांत ठेवून त्याचें प्रेमानें पालनपोषण केलें तरी तो पिंजऱ्यांत असेपर्यंतच मांस (आमिष) वगैरे घाणेरडे पदार्थ खाणार नाहीं; तुम्ही घालाल ते चांगले पदार्थच खाईल. असें झालें तरी कावळ्याचा स्वभाव बदलला असें समजूं नये. तो पिंजऱ्यांतून सुटला कीं उष्टेखळींत, घाणींत भक्ष्य शोधणारच; म्हणून चांगली कृति करतांना दिसणाऱ्या खलांविषयीं सावध असावें.

(४) खलांची सुधारणा होणें त्यांच्या स्वभावावर व मनावर मुख्यतः अवलंबून आहे. स्वभाव बदलणें किती दुष्कर आहे याला दृष्टान्त दिला— 'लोहिं हेमता परीस लागुनि' (१।३।९) लोहाला परिसाचा स्पर्श झाला कीं लोखंड सोनें होतें हा जसा *परिसाचा महिमा* तसाच संतांचा आहे; पण लोखंडाची व परिसाची भेट झालेली कोणीं पाहिली आहे काय ? विद्यमान पृथ्वीतलावर जसा एकहि परीस कोणाजवळ दिसत नाहीं, तसेंच खलांना संत दिसतच नाहींत. यांत दोष संतांचा कीं खलांचा ? भाव हा आहे कीं *खलांचा संतांवर विश्वासच बसत नाहीं*. विश्वास नाहीं म्हणून श्रद्धा, आदर नाहीं; हरिहरकथांवरसुद्धां विश्वास नसतो; त्या त्यांना आवडतच नाहींत.

'मोह द्रोह **परावा करती । *संतसंग हरिकथा न रुचती //*** ' (७।४०।६)

हें लक्षण श्रीरामचंद्रांनींच भरतास सांगितलें आहे. जें रुचत नाहीं तें श्रवण केलें तरी त्यांत मन लागत नाहीं, मग प्रसन्न मनानें श्रवण वगैरे पुढल्या गोष्टी अशक्यच असतात. म्हणून चुकून जरी खलांना-काकांना संतसमागम साधला तरी ते कोकिल होत नाहींत, सुधारत नाहींत हा त्यांच्या स्वभावदोषांचा परिणाम आहे. परीस प्रत्यक्ष सांपडला तरी तो परीस आहे असा विश्वास असला तरच तो त्याचा स्पर्श लोखंडाला करील; अन्यथा गारगोटी समजल्यामुळें त्या परिसाचा महिमा प्रगट होणार नाहीं. दुर्योधनाला भगवान कृष्णसुद्धां एक दुष्ट मनुष्यच वाटत होता !

(५) तथापि ईश्वरकृपेनें अपवाद म्हणून जर एखादा खल विश्वास-श्रद्धायुक्त होऊन संतसमागम करील तर तो सुधारेल यांत शंका नाहीं. अशा अपवादाचेंच एक मोठें उदाहरण म्हणजे काकभुशुंडीची शूद्रजन्मकथा, विप्रजन्मकथा, लोमशऋषीचा शाप. कावळा होणें व सुधारणें इत्यादि उत्तरकांडांत पाहा.

(६) आतां विरोध कुठें गेला ? व शठ–खल भेद मानून सुटका करून घेणें किंवा कच्चा खल व पक्का खल इत्यादि खल करीत बसणें आवश्यकच नाहीं. (क) कावळ्यानें मानस-सरोवरांत बुडी मारली तर तो हंस होईल; पण कावळा मानसापर्यंत जात नाहीं व जातांच लागले तरी तो त्या पाण्याला स्पर्श करीत नाहीं असें वर्णन मानसरूपकांतच आहे.

'**बगळे काक विषायि अति खळ ते । जाति अभागिन सराजवळ ते**'। (१।२८।३)

कष्ट करूनि जरी कोणी पावले । जातहि निद्राहिवें ग्रासले ॥

करवेना सरिं मज्जन पाना । परत येति घेऊनि अभिमाना ॥ (१।३९।१-३)

याप्रमाणें मानसकारांनीं या शंकेला जागा ठेवलेली नाहीं; पण लक्षांत कोण घेतो ! यापेक्षां अधिक विस्ताराची येथें आवश्यकता नाहीं.

शंका २ री — *शुचि* **सुंदर आश्रम बघुनि हर्षे राजिवाक्षास ।**
श्रवुनि रघुवरागमन मुनि पुढें येति नेण्यास ॥ (अयोध्या. १२४)

(१) राजीवाक्ष श्रीरघुनाथ वाल्मीकि-आश्रमांत प्रवेश करतात त्या वेळचें हें वर्णन आहे. तुलनेस

भरद्वाज-आश्रम *अतिपावन* । परम रम्य मुनिवर मन-भावन ॥ (बाल. ४४।६) घ्या. *भरद्वाजाश्रमाला अतिपावन = अति शुचि* व *परम रम्य = परम सुंदर* म्हटलें; आणि वाल्मीकि–आश्रमास शुचि व सुंदर म्हटलें. (क) भरद्वाज ऋषि वाल्मीकींचे शिष्य; आणि भरद्वाजाश्रमांत पशुपक्षी स्वभाव वैर विसरल्याचें वर्णन नाहीं. वाल्मीकि आश्रमांत तें आहे.

खग मृग बहु कोलाहल करती । विरहित वैर मुदित मन चरती ॥ (२।१२४।८) असा भेद असतां वाल्मीकि-आश्रम फक्त शुचि व सुंदर पण भरद्वाजाश्रम अति शुचि व अति सुंदर हें कसें ? **ही आहे शंका.**

(२) **समाधान** —(क) भरद्वाजाश्रम अति पावन व अति रम्य आहे हें खरें; पण असा तो कोणास वाटला हें तेथेंच सांगितलें आहे :— ' मुनिवर-मन-भावन ' = मुनिवरांच्या मनास आवडणारा आहे. (ख) वाल्मीकि-आश्रम शुचि व सुंदर वाटला. कोणाला ? राजीवलोचन श्रीरघुनाथास. कोटिमनोजां लाजविणारे जे सौंदर्यसिंधु, जे आनंदसिंधु सुखराशी राम त्यांना तो सुंदर वाटला. ज्यांच्या पदनखापासून निघालेली गंगा, '*परम पावन* जान्हवी ' जगाला पावन करते, ज्यांच्या दर्शनानें कोटि-विप्र-हत्यापातक नष्ट होतें, त्या प्रभु रघुनाथास रामास तो शुचि = पावन वाटला. ' नख-निर्गता मुनि-वंदिता त्रैलोक–पावन सुरसरी ' (७।१३।४). ' निरुपम न उपमा आन राम समान रामहि ' ज्यांची शुचिता व सौंदर्य यांना विश्वांत उपमा नाहीं त्या श्रीरामास वाल्मीकि-आश्रम सुंदर व शुचि दिसला व त्यांस हर्ष झाला—आनंद झाला—सुख झालें. अशा त्या आश्रमाच्या शुचितेला व सौंदर्याला कोणतें विशेषण लावतां येईल ? *ध्वनि हा आहे कीं वाल्मीकि-आश्रमाची शुचिता व सुंदरता अनुपम, अनिर्वचनीय आहे !* ' आनंदा आनंदहि दाते ' असे रामलक्ष्मण असून त्यांना ज्या आश्रमाच्या शुचितेनें व सौंदर्यानें हर्ष झाला त्याची शुचिता व सौंदर्य कोणकोणत्या शब्दांनीं वर्णन करणार ! असा गूढ ध्वनि येथें आहे.

(३) ध्वनि काव्याचा आत्मा आहे आणि रस प्राण आहे. आत्मा नेहमीं अति गूढच असतो. ' आत्मा अस्य जन्तोः निहितः गुहायाम् ' (श्रुति)

(४) खेडेगांवांत राहणाऱ्या संन्याशानें गणेशखिंड बंगला व तेथील बगीचा पाहिल्यावर तो म्हणणार कीं अत्यन्त सुंदर ! पण दिल्लींतील राजप्रासादांत राहणारे व

तेथील बगीचांत रोज सहल करणारे महाराजा ज्याला सुंदर म्हणतील त्या प्रासादाला व बगीचाला तो संन्याशी कोणतें विशेषण लावील? तो म्हणेल कीं तें सौंदर्य तर अवर्णनीय आहे.

शंका ३ री — संदर्भ—लक्ष्मण व सीता यांच्यासह श्रीरघुनाथ लंकेतून अयोध्येंत परत आल्यावरः—

धावति माता कौसल्यादिक । बघुनि वत्स जणुं गो नवसूतिक ॥ ९ ॥

छंदः—' जणुं धेनु नव शिशु तजुनि गृहिं परवश वनीं चरण्या गता ।

सूर्यास्ति नगरा स्रवत सड ' हुं ' करित धावति कीं अतां ॥ (७।६ छंद).

शंका — कौसल्यादिमाता अयोध्येंतच होत्या आणि राम वनांत गेले होते; असें असतां, मातांना जणूं वनांत चरण्यास गेलेल्या गाई असें कां म्हटलें?

समाधान — मागील वचनें व संदर्भ श्रोत्यांच्या, पाठकांच्या व टीकाकारांच्या किती ध्यानांत आहेत आणि ते आपला मूर्खपणा कवीवर लादतात कीं काय हें पाहण्यासाठीं म्हटलें असावें! (**क**) सुमित्रा म्हणाली आहे—

' अवध तिथें जिथं रामनिवास । तिथें दिवस जिथं रविप्रकाश ' (२।७४।३)

अवध = अयोध्या. *जिथें राम राहतील ती अयोध्या.*

(**ख**) **नगर सफल वन गव्हर भारी । खगमृग विपुल सकल नरनारी** (२।८४।२) अयोध्यानगर हें एक स-फल वन आहे व सर्व नारीनर विपुल पशुपक्षी (मृग, खग) आहेत. सर्व माता जणूं धेनु = पशूच आहेत. त्या अयोध्यावनांत प्रारब्धवश चरत होत्या व राम शिशु—वत्स वनरूपी अयोध्येंत सोडला होता. आतां शंका राहिली काय?

(**ग**) २।७४।३ ही चौपाई आणि २।८४।२ ही चौपाई ७।६ मधील छंदरूपी मोठ्या कमलाच्या कमलिनी आहेत! असे धागेदोरे जुळवितां आले कीं शंका आकाशांत उडून जातात! अशी ही तुलसीमानसरचना-कला आहे!

थोडक्यांत उमजे सुज्ञांना म्हणून इतके नमुने पुरेत. पुढील प्रकरणांत गूढार्थ-चंद्रिकेंतील **' उपदेश '** नमुने आहेत.

मर्म राम-गुरु-कृपें समजतें । समाधान सुख मधुर सहज तें ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।१२ 卐 卐 卐

गूढार्थ-चंद्रिकेंतील ' उपदेश ' नमुने

श्रीमानस-गूढार्थ-चंद्रिका-टीका लिहीत असतां, विविध वर्णनांतील व घटनादिकांवरून मनुष्यानें धडा शिकण्यासारखें जागोजागीं जें सार दिसलें तें ' उपदेश ' नांवानें गूढार्थ-चंद्रिकेनें दाखविलें आहे; त्यांतील कांहीं नमुने :—

१. उपदेश — बाल. ५८।१-४ च्या टीकेच्या शेवटीं:—येथें हा उपदेश मिळतो कीं

स्वतःचें अहित करून घेणाऱ्या पढतमूर्ख अहंकारी व्यक्तीवर न रागावतां, न बोलतां अशी शिक्षा करावी कीं कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, पश्चात्तापपावकाच्या भट्टींत भाजून भाजून, सर्व मळ जळून जाऊन अहंकाराची राख होईल व हृदय निर्मळ सुवर्णासारखें शुद्ध होईल, आणि ती व्यक्ति भगवन्तास अनन्य भावानें शरण जाईल. (क) *श्रीरामकृपेशिवाय असा पश्चात्ताप होत नाहीं* म्हणून शिक्षा करणारानें भगवंतास अशी प्रार्थना करीत राहिलें पाहिजे कीं जेणेंकरून त्या व्यक्तीवर प्रभु कृपा करतील.

२. उपदेश — अयोध्या. १५१।२-३ येथें हा उपदेश मिळतो कीं एखाद्याचें भाषण वस्तुस्थितीशीं विसंगत दिसलें तरी तो मनुष्य खोटें बोलला असें ठरत नाहीं. त्यानें *सांगितलेली माहिती त्यानें कोणत्या स्थितींत कशी मिळविली याचा विचार करणें आवश्यक असतें;* अन्यथा निष्कारण गैरसमज माजून संशयकल्लोळांनीं भावना दुखावतात व निर्दोष व्यक्तीवर वृथा दोषारोप (निन्दा) केल्याचें घोर पातक पदरांत पडतें.

३. उपदेश — (अयोध्या. २१८५।१–२) **वि. ल. ठे.** — भरताच्या मनांत कोणत्याहि प्रकारचा स्वार्थ नसून, व भरत परमश्रेष्ठ रामभक्त असतां, केवळ संशयामुळें कसे अनर्थ घडले, किती त्रास झाला हें पाहण्यासारखें आहे. ' मुलगा आईसारखाच असणार ' या एका गैरसमजुतीमुळें पुष्कळांना संशयपिशाचानें पछाडलें होतें. म्हणून *कोणाहि सज्जनाविषयीं संशयग्रस्त होणें फार वाईट आहे.* **सत्याचा निर्णय अनुमानांनीं होत नाहीं.** *दोषारोप न करतां अशा वेळीं उदासीनता पत्करणें हा मध्यम मार्ग उत्तम !*

४. उपदेश — (अयोध्या. २३३।७–८) येथें हें दाखविलें कीं आपल्या अति निकट संबंधी व्यक्तीनें एखादा मोठा अपराध किंवा पाप केलें तर आपला स्वतःचा कांहीं दोष नसतां कलंक लागतो व सज्जनांसमोर जाण्यास लाज वाटते; म्हणून *आपल्यामुळें आपल्या नातेवाईकांस मान खालीं घालण्याची पाळी येणार नाहीं असें आपण स्वतः व सर्व नातेवाईकांनीं व मित्रादिकांनीं वागलें पाहिजे.*

५. उपदेश — (अयोध्या. २४७।३) सावधान ! जीवन्मुक्त ज्ञानी म्हणविणारांनीं दाराधनपुत्रादि हानि झाल्यावर शोक करीत बसून रामचंद्रांचें उदाहरण देऊन, आपल्या दंभावर व अज्ञान-मोहादिकांवर पांघरूण घालणें आत्मघातकीपणाचें व परवंचकतेचें लक्षण आहे व घोर अधःपाताचें सोपें साधन आहे. *' न देवचरितं चरेत् । ' हें वचन कृतींत जागृत पाहिजे. जगांतील कोणत्याहि गोष्टीच्या हानिवियोगादिकांनीं शोक-दुःखाचा लेश जर हृदयांत उत्पन्न होत असेल तर मोहरूपी कुंभकर्णाचा व अहंकार-रावणाचा वध झाला नाहीं असें ज्याचें त्यानें निश्चित समजावें.*

६. उपदेश — (अयोध्या. २४७।४) यावरून स्पष्ट झालें कीं कोणीहि दुसऱ्यास दोष देण्यास तयार नाहीं. जी ती व्यक्ति स्वतःसच दोषी मानीत आहे !

आम्हीं मात्र नेमकें याच्या अगदीं उलट वागतों आणि *त्यामुळेंच स्वतःस, कुटुंबांत व समाजांत समाधानाच्या उलट अनुभव मिळतात !*

७. उपदेश — (अरण्य. ३०) आसन्नमरण व्यक्तीची भेट झाल्यावर, कांहींहि न बोलतां, न विचारतां, शोकाकुल न होतां, त्या *व्यक्तीची पीडा निवारण करण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे.*

८. उपदेश — (अरण्य. ३२।६) एखाद्या व्यक्तीनें हरिनामोच्चार केला व प्राण गेले असें दिसलें तरी त्या नामोच्चाराच्या वेळीं अंतरांत एखादी वासना, कामनादि उठली आहे किंवा नाहीं हें इतरांस कळणें अशक्यवत असतें. नामोच्चाराबरोबर प्राण गेले असें मानलें तरी मुक्ति मिळतेच असें नाहीं. मानसांतील दशरथांनीं ' राम-राम ' म्हणत प्राणत्याग केला तरी ते मुक्त झाले नाहींत किंवा अनित्य वैकुण्ठांतसुद्धां गेले नाहींत. ते इन्द्राच्या अमरावतींतच राहिले. (क) सार हें कीं कोणाला गति मिळाली, कोणा मुक्त झाला किंवा नाहीं *याची चर्चा* न मेलेल्या लोकांनीं *करणें निरुपयोगी व इतरांच्या भावनांवर आघात करणारें असतें. ' ज्ञानाशिवाय मुक्ति नाहीं '* हा सिद्धान्त अपवादरहित आहे.

९. उपदेश — (अरण्य. ३७।५-६) रघुनाथाच्या या विरहविलापांच्या निमित्तानें विषयलुब्ध जिवांस, पंडितांस, शूरांस, देशभक्तांस, साधकांस, सिद्धांस, संन्याशांस, तापसांस, इत्यादि सर्वांसच कवि विचारतात कीं कांचनमृग जन्मास येत नाहीं हें निश्चित असतां श्रीरघुवीर त्या मृगाच्या मागें धावले हें ऐकून तुम्हीं त्यास हसतां पण, " शाहण्यांनो ! तुम्ही रात्रंदिवस काय करतां ? कांचनमृगाप्रमाणें सुंदर सुखमय भासणाऱ्या कनक, कामिनी, कीर्ति इत्यादि विषयरूपी शतशः कांचनमृगांच्या मागें तुम्ही सतत धावत असतां कीं नाहीं ? सोन्याच्या हरणाचा जन्म जसा असंभव तसा विषयांत सुखलाभ असंभव ! विषयरूपी मायिक मायामृगांच्या मागें लागून स्थिर चिर-शान्तिरूपी सीता तुम्ही गमावून बसलां आहांत याचें भान तरी आहे का तुम्हांला ? रघुवीरानें एका वर्षाच्या आंत-बाहेर सीता परत मिळविली ! तुम्हीं कल्प कल्प काळ कंठीत क्लेशांनीं कण्हत कुंथत कुरकुरत काय केलेंत ?

१०. उपदेश — (किष्किंधा. २०।४-५) एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला आपणांस अत्यंत प्रतिकूल व विघातक असा विकार शान्त करावयाचा असेल तर प्रथम जाऊन २।४ साष्टांग नमस्कार घालावेत. नंतर त्या व्यक्तीला परमपूज्य वाटणाऱ्या व त्या व्यक्तीचें अत्यंत प्रेम ज्याच्यावर असेल अशा व्यक्तीचे गुण, यश इत्यादीचें वर्णन करावें व त्यांत त्यांची क्षमाशीलता, परम दयाळुता इत्यादि सद्गुणांचें वर्णन करावें, म्हणजे आपणांस विघातक ठरणारा विकार उपशम पावेल.

गूढार्थचंद्रिकेंतील असे सर्व ' उपदेश ' एकत्र केल्यास ४०।५० पृष्ठांचें छोटेसें पुस्तकच तयार होईल; त्यांतील केवळ नमुने म्हणून थोडेसे येथें दिले. पुढील प्रकरणांत

गूढार्थचंद्रिकेंतील काव्यविनोदाचे कांहीं नमुने दाखवून हें टीकेविषयींचें मुख्य प्रकरण पुरें होईल.

जय जय रघुवर भवभयभंजन। जय सीतापति असुरनिकन्दन ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ३।१३ 卐 卐 卐

गूढार्थचंद्रिकेंतील 'काव्यविनोद' नमुने

गूढार्थचंद्रिकालेखनांत अनेक ठिकाणीं सहज स्वाभाविक विनोद लिहिला गेला आहे. प्रस्तावनेच्या या विविध विचित्र विस्तारांत वाचकांचें विनोदन करण्यास उपयोगी पडतील असें जाणून कांहीं नमुने खालीं दिले आहेत.

१. अयोध्याकाण्ड अध्याय विसावा पूर्ण होऊन एकविसावा अध्याय टीकेकरितां पुढें आला; तेथें प्रारंभींच खालील परिच्छेद आहे.

विसाव्या अध्यायांत भरद्वाज मुनींनीं भरताला **विसावा** देण्याचा प्रयत्न केला; पण भरतास वाटेल तेथें विसावा मिळणें शक्य नाहीं. भरद्वाजांनीं केलेल्या पाहुणचारानें भरताशिवाय बहुतेकांना कमीअधिक प्रमाणांत **विसावा** मिळालाच. म्हणून मागील अध्यायानें आपल्या '**विसावा**' या नांवाची पुष्कळच सार्थकता केली, हें खरें आहे.

एकविसावा अध्याय स्पष्टपणें बजावील कीं भरतास **एकच विसावा** देऊं शकेल.

बाविसावा अध्याय अनन्य अप्रतिम सेवामूर्ति श्रीरामसेवकास, लक्ष्मणास सांगेल कीं "**बा! जरा विसावा** घे व असा अधीर आणि साहसी बनूं नकोस".

तेविसावा अध्याय प्रारंभींच भरतास सांगेल कीं **ते** (तुझा) **विसावा** जेथें आहे तें, तें स्थान पाहा! त्याच अध्यायांत भरताचा विसावा भरतास भेटेल.

सहज जुळलेल्या गोष्टींतून हा काव्यविनोद उत्पन्न झाला इतकेंच; अध्यायविभागणी करतांना हें वैशिष्ट्य पुढें नव्हतें.

२. '**या सभेचा समारोप**' (अयोध्या. २५७।४ नंतर) — ही *चित्र*कूटवरील सभा म्हणजे कार्यकारी मंडळाची पहिली बैठक झाली. कूटप्रश्नाप्रमाणें वाटणाऱ्या श्रीराम आणि भरत यांच्या विचित्र चरित्रांचीं **चित्रें** येथें बीजरूपानें रेखाटलीं आहेत. स्वागताध्यक्ष वसिष्ठ व कार्यकारिणीचे सरचिटणीस भरत यांच्यांतील चर्चा यांत झाली. वर्तमानपत्रांचे लघुलेखक व बातमीदार यांस **बंदी** होती; पण रावणाच्या **बंदींत** पडलेल्या **लेखांचे** (लेख = देव) गुप्त **लेखक** अदृश्य रूपानें तेथें होतेच!

सरचिटणिसांनीं आपल्या अलौकिक त्यागबुद्धीनें व अवर्णनीय रामप्रेमानें स्वागताध्यक्षांस असें भारून टाकलें कीं पुढें भरणाऱ्या दरबाराच्या अध्यक्षांपुढें सरचिटणिसांची बाजू स्वागताध्यक्ष स्वतःच मांडतील; व दरबाराच्या अध्यक्षांनाच घंटा वाजवून सावध करतील कीं मुख्य विषय बाजूस पडतो आहे, तरी त्याचा विचार प्रथम व्हावा.

स्वागताध्यक्ष इतके उतावीळ झाले आहेत कीं अध्यक्षांच्या मंडपांत जाऊन या सभेचेंच रूपांतर चित्रकूट-प्रथम-दरबारांत होईल.

३. भूप, भरत, मुनि, सहित समाजा। गत जिथं विबुध-कुमुद-उडुराजा ॥
(२।२९४।४ टीका).

मिथिला-भूप विदेही जनक, भरत आणि मुनि वसिष्ठ हे त्या सभेंतील सर्व सभासद-समाजासह, विबुध = देव, रूपी कुमुदांचे उडुराज = चंद्र जे रामचंद्र, ते जेथें होते तिकडे जाण्यास निघाले; यावर थोडा विनोद आहे.

अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सरचिटणीस, सहकारी चिटणीस इत्यादि सर्व कार्यकारी मंडळ आणि कार्यकारिणीचे सर्व सभासद, सभासद नसलेल्या पण कार्यकारिणीस मान्य अशा सत्तारहित पण सर्वसत्ताधीश धर्मधुरंधर, सत्यसंघ, नीति-प्रीति-संरक्षक अशा महा-पुरुषाकडे—पुरुषोत्तमाकडे गेले.

या वेळच्या कार्यकारिणींत झालेली चर्चा पहिल्या सभेप्रमाणें गुप्त न ठेवली गेल्यानें ती द्विपदचारी मुखपत्रांनीं चारी दिशांस प्रसृत केली ! ती कळल्यावर परिणाम काय झाला तो पुढल्या (५ व्या) चौपाईंत सांगितला आहे. अतारी-तारायंत्रांनीं व ध्वनिक्षेपकांनीं ही बातमी विबुधांना कळली तेव्हां त्यांच्यावर काय परिणाम झाला व त्यांनीं म्हणजे सत्तासूत्र हातीं नसलेल्या डाव्या गटानें (विरोधी पक्षानें) काय केलें तें सहाव्या चौपाईपासून सांगतील. दोन्ही पक्ष चिंतातुर ! असें फक्त आतांच घडलें.

विसाव्या शतकांतील कोणालाहि विसावा देणाऱ्या राजविहीन राजकारणाचें चित्र श्रीतुलसीदासांना दिसलें असावें काय ! पण चित्रकूटच्या आश्रमांतील पुरुषोत्तमासारखा महापुरुष या विसाव्या शतकांत कुठला !

४. सभा-भूप-गुरु-महिसुर-मंत्री। मतिला भरत-सुभक्ति नियंत्री ॥ (२।३०३।२.)

भरताचें भाषण ऐकल्यावर या सर्वांची अशी दशा झाली कीं काय बोलावें हें कोणाच्याच बुद्धीस सुचेना; जणूं काय भरतभक्तीनें **असा वटहुकूमच काढला कीं आतां पूर्ण भाषणस्वातंत्र्य आहे पण कोणीहि आपला विचार प्रगट करावयाचा नाहीं !**

५. परीक्षा घेणें—(अरण्य. जयंत-कथेंत. दोहा २ च्या १२ व्या चौपाईच्या टीकेंत)

काकरूप सुरपति सुत धरतो। शठ रघुपतिबल पाहूं बघतो। (३।१।५)

सुरपतिसुतानें श्रीरघुवीराची परीक्षा घेण्याचा जो असा उपक्रम केला त्या परीक्षेची परिणामपत्रिका पाहा ! ३।१।५ पासून ३।२।१२ पर्यंतच्या चौपाया वाचून पाहावें म्हणजे संदर्भ कळेल व हास्यरसाला पूर येईल.

परीक्षितानें दिलेलें उत्तर(= ब्रह्मास्त्र) पाठीशीं घेऊन स्वतः परीक्षकच विश्वमहा-विद्यालयांच्या चौदा प्रमुख केंद्रपतींना-कुलगुरूंना-दाखविण्यास गेले; पण तें दृश्य पाहूनच त्या सर्वांची बोबडी वळली. त्या परीक्षकाचें आदरानें स्वागत करणें तर दूरच राहिलें; पण नुसतें 'या बसा !, एक कोप × × घ्या,' असें म्हणण्याचें सौजन्यसुद्धां

दाखवितां आलें नाहीं !

' कोणि तया ' बस ' असें म्हणेना ! रामद्रोह्या कोणि रक्षिना ' (३।२।५).

परीक्षिताला आगाऊ परीक्षामूल्य (फी) भरावें लागलें नाहीं; पण परीक्षा घेण्याची फी परीक्षकानें आपला एक डोळा देण्याची वेळ जवळ आली आहे ! ती फी दिल्याशिवाय त्याची सुटका होणार नाहीं !

६. संहारघरट (सुंदरकाण्ड) — हनुमानरूपी संहारघरट अशोकवनांत चालू झाला आहे; व त्याच्या गतीनें अशोकवन असलेली लंका शोकवन बनणार आहे.

या घरटांत जीं पहिलीं वैरणें पडलीं तीं धान्यनियंत्रण काळांतील जोंधळीपोत ओवण्यास श्रम न पाडणाऱ्या जोंधळ्यांप्रमाणेंच ठरल्यामुळें घरटाला गर्जना-तर्जनारूप घरघराट करावा लागला नाहीं. (क) पुढील वैरणें घालण्याचें काम वीस बाहूंचा लंकाधीश रावणच करणार आहे. प्रथम तांदूळ, मग वाटाणे, मग पावटे, वाल अशीं भारी भारी वैरणें घातलीं जातील व तसतसा संहारघरट अधिकाधिक गर्जू लागेल आणि त्या सर्वांचें सहज पीठ पाडील, शेवटीं एक मोठा गणंग येईल व तो भरडला जाऊं लागला कीं घरटाची गति बंद पडल्यासारखी दिसेल !

७. रावण-अंगद-संवाद (लंका. २०।७) — अंगदानें रावणास सांगितलें कीं दातीं तृण धरून आणि कंठांत कुऱ्हाडी बांधून अशा अशा प्रकारें प्रभु श्रीरघुनाथाकडे जा !

रावणाच्या दशमुखांतील दातांत राहील असें तृण धरणें म्हणजे प्रत्येक तोंडांत गवताचा १।१ मोठा भाराच धरला पाहिजे. मोठ्या दरीसारख्या मुखांत १।१ काडी शोभेल तरी कशी व दिसणार तरी कशी ? हें जाणूनच जणूं रावणानें अंगदाचें म्हणणें धुडकावून लावलें. १।१ भारा धरून जा असें अंगदानें सांगितलें असतें तर त्याच्या विशाल मुखांचा अपमान केल्यासारखें वाटलें नसतें व तो गेला असता !

वाचकांच्या चित्तविनोदनास इतके नमुने पुरेत. अधिक नमुने गूढार्थचंद्रिका वाचतांना दिसतीलच.

गूढार्थचंद्रिकाटीका या मुख्य प्रकरणांतील हें तेरावें शेवटचें प्रकरण येथें संपूर्ण झालें. गूढार्थ-चंद्रिका-टीकेविषयीं प्रस्तावनेंत सांगण्यासारखें व दाखविण्यासारखें वाटलें तें येथपर्यंत सांगून दाखवून झालें.

ही प्रस्तावना टीकेचे गोडवे गाण्यासाठीं नसल्याचें निवेदनांत सांगितलेंच आहे. *महाकविमूर्धन्य भक्तशिरोमणि श्रीतुलसीदासांच्या अद्भुत, अतिमानुष, अपूर्व काव्यकलादिकांचें यथार्थ स्वरूप थोडक्यांत प्रगट करून दाखविणें* हाच मुख्य हेतु असल्यानें पुढील *बारा* मुख्य प्रकरणें त्याच हेतूच्या पूर्तीसाठीं आहेत. श्रीगोस्वामीजी श्रीरामचरितमानसाला '·विचित्रकथा-प्रबंध ' म्हणाले आहेत म्हणून पुढील मुख्य प्रकरण ' *श्रीरामचरितमानस विचित्रकथाप्रबंध* ' हें आहे.

जय रघुवर सेवक सुख-कं-दा । नाचविशी प्रभु ! या मति-मंदा ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ४।१ 卐 卐 卐

मानसांतील अपरिचित कथांवरील आक्षेप-निरास

श्रीगोस्वामी तुलसीदास महाराजांनीं श्रीरामचरितमानसास 'विचित्रकथा-प्रबंध' असें म्हटलें आहे. विचित्र म्हणजे चित्रविचित्र, सुंदर, अपूर्व आणि आश्चर्यभूत.

१. श्रीरामचरित-मानसाच्या नवीन वाचकांस अशी शंका येते कीं, श्रीतुलसीदासांनीं त्यांच्या रामायणांत ज्या अनेक कथा दिल्या आहेत त्या वाल्मीकि-रामायणांत व अध्यात्म रामायणांत नाहींत; तुलसीदासांनीं त्या कोठून आणल्या? (क) कांहीं लोक याच्या पुढें जाऊन असें म्हणतात कीं त्या कपोलकल्पित आहेत. या दोन्ही प्रकारचे लोक (यांत कांहीं टीकाकारहि आहेत!) एकतर मानस–रामायण डोळे मिटून वाचीत असले पाहिजेत; किंवा जें वाचलें त्याचा अर्थ त्यांस कळत नसावा; अथवा एक ऐतिहासिक चटकदार कादंबरी लिहिली आहे असें त्यांस वाटत असावें; म्हणजेच श्रीगोस्वामी मिथ्याप्रलापी आहेत असा त्यांचा समज असावा आणि आपण सर्वज्ञ आहोंत अशी त्यांची भावना असावी. कारण श्रीतुलसीदासांनीं मंगलाचरणांत आणि उपक्रमांत सांगितलें आहे कीं :—

नाना पुराण निगमागम-संमतं यद्। रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ॥
स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथ-गाथा । भाषानिबंधमतिमंजुलमातनोति ॥

(बाल. मं. श्लो. ७)

नाना पुराणें, निगम (शास्त्रें, तंत्र) आणि आगम (वेद) यांना संमत असलेलें आणि (शंभुकथित) रामायणांत वर्णिलेलें आणि क्वचित अन्यत्र वर्णन केलेलें श्रीरामचरित्र आहे, त्याच्या आधारें स्वतःच्या अन्तःसुखासाठीं हा श्रीरघुनाथ-कथारूपी निबन्ध स्वतःच्या भाषेंत तुलसीदास अति सुंदर रचीत आहे.

२. श्रीमानस कधीं, केव्हां व कोठें प्रकाशांत आलें आणि 'श्रीरामचरितमानस' हें नांव कोणीं व कां दिलें हें सांगण्यापूर्वीं तुलसीदासांनींच सांगितलें आहे कीं —

उमा प्रश्न करि जशा प्रकारें। शंकर वदले जसें विस्तारें ॥ १ ॥
सकल हेतु तो वदुं विस्तारुनि । *कथा प्रबंधा विचित्र* बनवुनि ॥ २ ॥
कथा श्रवणिं ही आली न जया । मानुं नये तेणं आश्चर्या ॥ ३ ॥
ज्ञानी कथा अलौकिक ऐकति । जाणुनि असें, न विस्मय मानाति ॥ ४ ॥
रामकथेला मिति जगिं नाहीं । अशी प्रतीति तयां मनिं राही ॥ ५ ॥
नाना रीतिं राम-अवतारहि । *रामायण शतकोटि अपारहि* ॥ ६ ॥
कल्पभेदिं हरिचरित सुशोभन । मुनिवरिं केलें विविधा गायन ॥ ७ ॥
समजुनि असें न विस्मय धरणें । श्रवणा प्रेमें सादर करणें ॥ ८ ॥

दोहा — **राम अनंत अनंत गुण अमित कथा-विस्तार ।**
परिसुनि विस्मया करिति ना ज्यांना विमल विचार ॥
(बाल. ३३।१–दो. ३३)

ज्यांना विमल विचार प्राप्त झाला आहे ते ही विचित्र कथा ऐकून विस्मय मानीत नाहींत; म्हणजेच जे *कोणी विस्मय मानतील त्यांचे विचार मलिन आहेत.* कपोलकल्पित आहे असें म्हणतील त्यांच्या विचारांना काय म्हणावें ?

३. पूर्वीच्या संतकवींचें व ग्रंथलेखकांचें एक ब्रीदवाक्य होतें कीं 'नामूलं लिख्यते किंचित्' ज्याला मूळ नाहीं (आधार नाहीं) असें कांहीं लिहावयाचें नाहीं. अलीकडील सुधारलेल्या व सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांना स्वतःच निराधार विधानें करण्याची संवय पडली आहे. शिवाय अशांचें ग्रंथावलोकन कूपांतील मंडुकाच्या जगाएवढें ! आणि 'आम्हांला जें माहीत नाहीं तें पूर्वीं जगांत नव्हतें, नाहीं व असणें शक्य नाहीं' असा वृथाभिमान वाढला आहे. त्यामुळें संतसज्जनांवर भलतेच आरोप केले जाऊन संतनिंदेचें घोर पाप आपोआप पदरांत पाडलें जातें !

४. महाराष्ट्रांत छापून प्रकाशित झालेलें *आनंद रामायण, अद्भुत रामायण* आणि नाथांच्या *भावार्थ रामायणांतील* फक्त *अरण्यकाण्ड अध्याय २१ वा,* इतकेंच अवलोकन केलें असतें तरी असें संतनिंदापातक पदरीं बांधून घ्यावें लागलें नसतें. (क) भावार्थरामायण अरण्यकाण्ड अ. २१ ओंव्या १४०–१५१ यांत २६ संस्कृत रामायणांची माहिती असून, त्या त्या रामायणांतील संवाद कोणामध्यें झाले हें पण स्पष्ट वर्णिलें आहे, यावरून ठरतें कीं श्रीएकनाथांनीं २६ संस्कृत रामायणें वाचलीं होतीं. (ख) आनंद रामायणाच्या छापील प्रतींत मनोहरकाण्ड, सर्ग १७ मध्यें ९० संस्कृत रामायणांचीं नांवें श्लोकांत दिलेलीं आहेत, त्यांची व भावार्थरामायणांतील २६ रामायणांची यादी याच प्रकरणांत पुढें दिली आहे. शतकोटि श्लोकात्मक रामायणाचा उल्लेख आनंद रामायण, मनोहरकांडांत सर्ग १७ मध्येंच आहे तो पाहा.

नवलक्षाणि काण्डानि शतकोटिमिते द्विज ॥ १४ ॥
सर्गा नवतिलक्षाश्च ज्ञातव्या मुनिकीर्तिताः ।
कोटीनांच शतं ज्ञेयं श्लोकमानं विचक्षणैः ॥ १५ ॥

वाल्मीकींनीं रचलेल्या शतकोटि रामायणांत ९ *लक्ष काण्डें, ९० लक्ष सर्ग आणि श्लोकांची संख्या शंभर कोटि आहे.* शतकोटिसंख्याक रामायणांतून २४ हजार श्लोकांचें वाल्मीकि रामायण झालें आहे आणि तें ९० रामायणांत पहिलें आहे व *आनंद रामायण तिसावें* आहे. शेवटीं म्हटलें आहे कीं

एवं सहस्रशः सन्ति श्रीरामचरितानि हि ।
कः समर्थोऽस्ति तेषां हि संख्यां वक्तुं सविस्तरम् ॥

'*शतकोटि अपाराहि*' असें जें १।३३।६ (अवतरणांत पाहा) म्हटलें त्यांत वरील

श्लोकांचें सारच ' अपार ' शब्दानें दिलें आहे.

५. **कल्पभेदिं हरिचरित सुशोभन**—प्रत्येक कल्पामध्यें कोणत्या तरी त्रेतायुगांत रामावतार होतो, एक कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. विद्यमान ब्रह्मदेवाचीं ५० वर्षे पुरीं झालीं आहेत; म्हणजे १८ हजार वेळां रामावतार झाले व ते विद्यमान ब्रह्मदेवानें पाहिले आहेत, ' कल्पीं कल्पीं प्रभु अवतरती ' (१।१४०।२) (क) एका कल्पानंतर जलप्रलय होतो. मागल्या कल्पांतील इतिहास पुढच्या कल्पांत सांगणारे, महाकल्पांतांतसुद्धां नाश न पावणारे लोमश व काकभुशुंडीसारखे मुनि असतात, हें दाखविण्यासाठींच लोमश व काकभुशुंडी या कथा मानसांत आहेत. ' रामचरित शतकोटि अपारहि ' असें मानसांत उपसंहारांत म्हटलें आहे तें यामुळेंच कीं प्रत्येक कल्पामधील रामावताराचें वर्णन मुनिवर करतात व अपार-संख्यात्मक रामायणें तयार होतात.

६. एखादें नाटक रंगभूमीवर दाखवितांना, पात्रांचीं नांवें तींच तींच असलीं तरी पात्रांचीं कामें करणाऱ्या व्यक्ति कालांतरानें भिन्न भिन्न असतात; व आवश्यकते-नुसार फेरफार केला जातो; तसेंच भगवंताच्या अवतारांचें असतें. रावण, कुंभकर्ण, दशरथ, कौसल्या, इत्यादि पात्रें तींच असलीं तरी प्रत्येक कल्पांतील रामावतारांत तीं तीं कामें करणारे जीव भिन्न भिन्न असतात. शिवाय कालपरिस्थितिभेदानेंहि त्या त्या पात्रांच्या चरित्रांत किरकोळ भेद निर्माण होतोच म्हणून म्हटलें कीं ' कल्पभेदिं हरिचरित सुशोभन । मुनिवरिं केलें विविधा वर्णन '. ' *राम अनंत* अनंत गुण अमित कथाविस्तार ' असें १।३३।– मध्यें म्हटलें तें या अनंत काळाच्या ओघांत होणाऱ्या अनंत रामावतारांमुळेंच !

७. श्रीरामचरितमानस ' **सब ग्रंथन को रस** ' (सर्व ग्रंथांचा रस) आहे असें गोस्वामींनींच रामायणाच्या आरतींत म्हटलें आहे. *सर्व पुष्पांचा रस जसा मध तसा सर्व ग्रंथांचा रस तुलसीरामायण.* (क) श्रीगोस्वामींसारख्या अवतारी पुरुषानें आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें त्या काळांत उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ अवलोकन केले. त्या सर्व ग्रंथांचें तुलनात्मक सूक्ष्म दृष्टीनें ज्यानें अवलोकन केलें असेल अशा एखाद्यानें म्हटलें कीं अमुक कथा कपोल-कल्पित आहे तरीसुद्धां तें म्हणणें योग्य होणार नाहीं; कारण कीं श्रीतुलसी*मानसास मूल आधार* ' यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशंभुना दुर्गमम् ' (उत्तर. उपसंहार श्लो. १) *श्रीशंभूंनीं केलेलें दुर्गम रामायण आहे आणि तें* लेखनपरंपरेनें प्राप्त झालेलें नसून, गुरुपरंपराक्रमानें *श्रवणानें प्राप्त झालेलें होतें.* (ख) महाराष्ट्रांत किती रामायणें उपलब्ध आहेत हें विदित नाहीं; तरीपण पुष्कळ संस्कृत रामायणांचें अवलोकन करूनच मोरोपंतांनीं १०८ रामायणें लिहिण्याचा उपक्रम केला; हें तत्कालीन लेखी पुराव्यांनीं सिद्ध आहे. मोरोपंतांसारख्या महापंडितानें व रामायणें रचणारानें दहा वर्षे खर्च करून पंचवटींतील श्रीराममंदिरांत प्रवचनें करून एकदां सांगितलें, असा पुरावा (मानसांक कल्याण) आहे. या महाराष्ट्र-मयूर

कवीनें श्रीतुलसीरामायणाविषयीं कांहीं शंका, कुशंका, दीर्घशंका नाहींच घेतल्या पण लिहिलें आहे कीं,

श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया ।
तरिच *प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वश गा या ॥*

(ग) त्या काळच्या काशींतील सर्व पंडितवर्गानें तुलसीरामायणाचा द्वेष सुरू केला; पण आधुनिकांसारखे आक्षेप त्यांनाहि घेतां आले नाहींत, त्यांना पूज्य व मान्य असलेल्या श्रीमधुसूदन सरस्वतींकडे त्यांनीं तक्रार केली व त्यांना उलट परमोत्कृष्ट अभिप्राय दिला वगैरे हकीकत श्रीतुलसीचरित्रांत दिली आहे. (घ) मोरोपंतांचा वरील अभिप्राय व मधुसूदन सरस्वतींचा अभिप्राय अहंमन्य कूपमंडुकांच्या शंकांनें उत्तर देण्यास पुरेसे आहेत; आणि श्रीगोस्वामींचीं वचनें भरपूर आधार आहेत म्हणून अधिक आधार देण्याची आवश्यकता नाहीं. तथापि मनुष्याची जिज्ञासा व शोधकवृत्ति संशोधकांस स्वस्थ बसूं देत नाहींत व अशा प्रकारच्या शंकांस निरुत्तर करणारे आधार हुडकावेसे वाटतात. याचा परिणाम झाला तो मानसपीयूषांत उत्तर. पृ. ३३१–३३५ यांत पाहण्यास सांपडला.

प्रोफेसर गौडजींच्या ‘ धर्मसारसंग्रह ’ नांवाच्या हस्तलिखित संग्रहांत बऱ्याच रामायणांचीं नांवें व त्या त्या रामायणांतील महत्त्वाच्या विविध विषयांची जंत्री, त्या रामायणांचे कर्ते, संवाद कोणामध्यें झाला, ग्रंथांचे स्थूल लेखनकाल व कांहींतील अवतारा-विषयीं विशेष माहिती मानसपीयूषसंपादकांस मिळाली ती लेखकांच्या परवानगीनें त्यांनीं छापली आहे. (क) संपादकांस विचारतां कळलें कीं लेखकाला तीं रामायणें लामाच्या ग्रंथालयांतील रामायणांत मिळालीं ! लामाच्या ग्रंथसंग्रहांत ४६ हजार संस्कृत पोथ्या आहेत असें अलीकडे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे ! त्या अमोल सरस्वती-भांडाराचीं द्वारें भारतांत उघडल्यास अनेक आधुनिक भ्रमांचा निरास झाल्याशिवाय राहणार नाहीं ! मानसपीयूषमधून आवश्यक तितकी माहिती पुढें दिली आहे.

वाल्मिकि रामायण आणि अध्यात्म रामायण यांत नसलेल्या अनेक कथा भावार्थ रामायणांतसुद्धां आहेत. प्रो. गौडजींच्या जवळील माहितीनें मानसांतील सर्व कथांना व त्यांतील बारीक सारीक तपशिलांनासुद्धां आधार मिळाले आहेत हें पुढें दिसेलच; *फक्त चित्रकूटवरील सीतास्वप्नास आधार मिळाला नाहीं.*

गोस्वामींच्या पश्चात् औरंगजेबाच्या काळांत हजारों पोथ्यांची होळी केली गेल्यानें श्रीतुलसीदासांना उपलब्ध झालेले सर्व ग्रंथ आज मिळणें अशक्य आहे इत्यादि उल्लेख गूढार्थचंद्रिकेंत अनेकवार आधींच केलेले आहेत. ‘ श्रीतुलसीदासांनीं आधाराशिवाय कांहींहि लिहिलेलें नाहीं अशी खात्री बाळगावी ’ असा उल्लेखहि अनेक ठिकाणीं पूर्वी केल्यानंतरच मानसपीयूषमधील माहिती मिळून तिनें ते उल्लेख यथार्थ ठरविले !

वि. ल. ठे. – श्रीतुलसीरामायण गोस्वामींच्या हयातींतच अत्यंत लोकप्रिय होऊनसुद्धां श्रीरामप्रिय *तुलसीच्या हातची श्रीरामचरितमानसाची पोथी उपलब्ध नाहीं* ! मग त्यांनीं अवलोकन केलेल्या सर्व पोथ्या कशा मिळणार ? तथापि 'सीतास्वप्न'-कथेला आधार नाहीं किंवा मिळणार नाहीं हें म्हणणें अविचाराचेंच ठरेल.

या लेखकास सहज, सायासांशिवाय उपलब्ध झालेले आधार :—(१) **सतीनें श्रीरघुनाथाची परीक्षा घेणें** व तिची फटफजीती भावार्थ रामायणांत अरण्यकांडांत. (२) **जलंधर कथा** पद्मपुराणांतच दोन आहेत. एकींत *जलंधर* नांव आहे व दुसरींत *जालंधर* आहे; बाकी सर्व कथाभाग किंचित् नाममात्र भेदानें अगदीं सारखा आहे. दोन कल्पांतील कथा आहेत. (गूढार्थचंद्रिका पाहा) (३) **जलंधर-जालंधर-पत्नी वृंदा** हिनें भगवान नारायणास व त्यांचा शिष्य झालेल्या शेषास शाप दिला आहे तो मानसांतील नारदशापासारखाच आहे. (गूढार्थचंद्रिका पाहा.) (४) स्वायंभूमनु शतरूपा-तपश्चर्या गोमतीतीरीं व द्वादशाक्षर मंत्राचें अनुष्ठान आणि भगवंतांनीं पुत्र होण्याचा वर मागणें पद्मपुराण, उत्तर खंड, अ. २६९ (आनंदाश्रम) व अ. २४२ (व्यंकटेश मुद्रणालय) यांत आरंभींच आहे. गूढार्थचंद्रिका, बालकाण्ड-परिशिष्टांत पाहा. (५) **सीतापरित्यागास कारण** होणाऱ्या रजकाची पूर्वजन्मकथा व सीता कुमारी असतां तिला शुकाचा (पोपटाचा) शाप, ही कथा पद्मपुराण, पाताळ खंडांत आहे (उत्तरकांड परिशिष्टांत पाहा.) (६) कुबडीनें रामवैर कां केलें याचें कारण - अग्निपुराणांतील सप्त काण्डात्मक रामायणांत आहे. (७) *अग्निपुराणांतील जयन्तकथेचा विस्तारच मानसातील अतिसंक्षिप्त सुरपतिसुतकथा आहे. जयन्ताचा गुन्हा तुलसीदासांनीं मुद्दाम सौम्य दाखविला असें वाटणें चुकीचें* ठरलें. (गूढार्थचंद्रिका) (८) शबरीनें स्वतः फळें (बोरें) चाखून भगवंतांस दिलीं याला आधार मानसांत, वाल्मीकि, अध्यात्म, आनंद, अद्भुत हीं रामायणें, स्कंद, अग्नि, वायु, ब्रह्म हीं पुराणें व भागवत यांत नसला तरी पद्मपुराणांत सांपडला ! (गूढार्थचंद्रिका पाहा.) फक्त बोरांचा उल्लेख नसून फळांचा आहे (९) भरत आणि शत्रुघ्न भगवान विष्णूच्या शंखचक्रांचे अवतार आहेत हें गोस्वामींनीं गूढ ध्वनीनें सुचविलें असून त्यास आधार स्कंदपुराणांत आहे. (१०) '*रामेश्वर*' समास तिघांनीं तीन प्रकारांनीं सोडविल्याचें वर्णन रामेश्वर-स्थापना वर्णनांत स्कंदपुराणांत आहे. (११) रामचंद्रांनीं रामेश्वरस्थापनेच्या वेळीं शिवाची अनेक वेळां पूजा व प्रार्थना केली व शिव साक्षात् प्रगट झाले ही कथा शिवपुराणांत ज्ञानसंहितेंत आहे. (१२) इक्ष्वाकु, मांधाता, दिलीपादि *दशरथापर्यंत सर्व रघुवंशी शिवोपासक होते व कौसल्या वसिष्ठांच्या आज्ञेनें पार्थिव पूजा करीत असे व रामचंद्रही पार्थिव पूजन करीत असत* असा उल्लेख शिवपुराण, ज्ञानसंहिता, अ. ६२ मध्यें आहे. (१३) दशरथाच्या हातून तीन ब्रह्महत्या व त्यांत एक स्त्रीहत्या घडल्यामुळें त्यांस यातनादेहानें अनेक नरकांत यातना भोगाव्या लागल्या

ही कथा ब्रह्मपुराणांत अध्याय १२३ मध्यें विस्तारानें आहे ती पाहावी. (१४) *श्रीरामचंद्रांनीं निवास केला ती पंचवटी व आजची नाशिकजवळची पंचवटी* एकच ही गोष्ट वरील ब्रह्मपुराण अध्यायांतील वर्णनानें अगदीं पूर्णपणें निश्चित झाली. (विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पाहा.) (१५) कल्पभेदानुसार किती भेद असतात हें दाखविण्यासाठींच वरील ब्रह्मपुराणांतील उल्लेख येथें मुद्दाम करावा लागला.

'कल्पभेदिं हरिचरित सुशोभन। मुनिवरि केलें *विविधा वर्णन* ॥

हें श्रीगोस्वामींचें वचन प्रतीतीस आणण्यासाठींच ब्रह्मपुराण अचानक हातीं आलें असावें असें वाटतें! (क) कल्पभेदानुसार भेद रामचरित्रांतच होतात असें नसून इतर अनेक कथांत आहेत. वक्ता व श्रोता एक असून विश्वामित्र-मेनका-कथा अगदीं भिन्न पाहणें असतील तर कल्याणच्या स्कंद पुराणांकांत पाहा. तेथें श्रोत्यानें शंका विचारल्यावरून कल्पभेदानुसार भेद आहे हेंच उत्तर मिळालें आहे. (१६) सार हें कीं पुराणादि ग्रंथसागराचें दर्शनसुद्धां न करणारे आणि विश्वास श्रद्धाविहीन आधुनिक, कूपमंडूक बनून वृथा डरॉंव डरॉंव करतात! म्हणूनच श्रीआचार्य सांप्रदायांतील श्रीमुकुन्दवनशिष्य आनन्दवन स्वामीविरचित श्रीरामार्चनचंद्रिकेंत म्हटलें आहे कीं,

'अन्तर्गतोऽपि वेदानां सर्वशास्त्रार्थवेद्यपि।
पुमानश्रुतपौराणो न सम्यग्गतिमाप्नुयात् ॥
वेदार्थादधिकं मन्ये पुराणार्थं च भामिनि।
पुराणमन्यथा कृत्वा तिर्यग्योनिमवाप्नुयात् ॥'

[श्रीरामार्चनचंद्रिका, पटल ४ परिच्छेद २ (पाद्मे शिवराघवसंवादे)]

तिर्यग्योनि होण्याचें कारण इतकेंच कीं पुराणश्रवण न केलेले लोक संत व सद्ग्रंथ यांची निंदा करतात. आतां पुढील प्रकरणांत मानसपीयूषमधील २० रामायणांची माहिती दिली आहे व नंतर आनंद रामायणांतील व भावार्थ रामायणांतील रामायणांचीं नांवें दिलीं आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 ४।२ 卐 卐 卐

मानस-पीयूषमधील रामायणांची माहिती

प्रोफेसर गौडजींच्या हस्तलिखित 'धर्मसारसंग्रह' वरून मानसपीयूष, उत्तरकांड, पृ. ३३१–३३५ मध्यें मिळालेली माहिती :— कर्ता, रचनाकाल व श्लोकसंख्या पुढील प्रत्येकांत प्रथम दिली आहे व मानसांतील अपरिचित कथांस आधार असलेल्या कथांचा उल्लेख तिरप्या किंवा ठळक टाइपांत केला आहे.

१. संवृत्त रामायण — कर्ता नारद, रैवत मन्वन्तराचें पांचवें सत्ययुग, श्लोक **१४ हजार.** *स्वायंभुव-मनु-शतरूपा, तपश्चर्या व पुत्रप्राप्तीसाठीं वरयाचना; दोघे दशरथ-कौसल्या होतात.*

२. अगस्त्यरामायण — अगस्त्य ऋषि, स्वारोचिष मन्वन्तराच्या दुसऱ्या सत्ययुगांत, **१६ हजार.** *१ शिवजींचें अगस्त्याश्रमाकडे जाणें. २ भानुप्रताप व अरिमर्दनकथा.* **३ राजा कुंतल व सिंधुमती दशरथ–कौसल्या होतात.** ४ वार्ष्णेय यज्ञभूमींत जानकीजन्म. ५ समुद्रोत्पत्ति. ६ मुद्रिका देण्याचें कारण. ७ रामेश्वर-स्थापनेचें कारण. ८ ऋष्यमूकपर्वतस्थिति. ९ मय व दुंदुभी-उत्पत्ति. १० कालनिग्रह-कारण.

३. लोमशरामायण — लोमश, स्वायंभुव मन्वंतराचें एक हजार बासष्टावें त्रेतायुग, ३२ हजार. *१ जलंधर-वृंदाकथा.* **२ राजा मुकुंद व वीरमती दशरथ-कौसल्या.** ३ मिथिलाधिप जनकास शिकारीच्या वेळीं वनांत योगमायादर्शन (जानकीजन्म). *४ सतीमोह व परित्याग. ५ शंभु-पण. ६ कामदहन व रतिवरदान. ७ पार्वतीविवाह.*

४. मंजुल रामायण — सुतीक्ष्ण, स्वारोचिष मन्वंतराचें १४ वें त्रेतायुग, **१ लक्ष २० हजार.** *१ भानुप्रताप व अरिमर्दनकथा.* २ त्यांची यज्ञव्यवस्था. *३ विभ्रम व विप्रशापहेतु.* ४ अशोकवाटिकेंत सीता-मारुती-संवाद. ५ मुद्रिकाकथा व सीतेचें आश्चर्य. ६ सीतासंदेश ऐकून प्रभूंनीं हनुमन्तास भक्तीची विशेष व्याख्या सांगितली. *७ शबरीला नवविधाभक्ति*–उपदेश. ८ भक्तिलक्षणें. ९ भक्तलक्षणें. १० रागानुगा व वैधी या भक्तींचें निरूपण.

५. पद्म रामायण — आत्रिऋषि, रैवत मन्वंतराचें १६ वें त्रेतायुग, **६२ हजार.** *१ नगरदर्शन. २ मिथिलानारी–स्नेहवर्णन. ३ बालकांचें प्रेम. ४ पुष्पवाटीकाकथा.* ५ विवाहवर्णन. *६ यमुनातीरस्थ नारींचें प्रेम. ७ त्यांचा आपसांत संवाद.* ८ जनकनन्दिनीविलाप. ९ रघुनंदनविलाप. **१० शबरीचरित्र.** *११ नारदभेट.* १२ सुग्रीवमैत्री. १३ अग्नींत सीताप्रवेश (अग्नीच्या हातींच कां सोंपविली).

६. रामायणमहामाला — शिवपार्वतीसंवाद, तामस मन्वंतराचें १० वें त्रेतायुग, ५६ हजार. *१ शिवपार्वतीसंवाद. २ शंकरांचा नीलगिरीवर हंसरूपानें निवास. ३ मरालरूप घेण्याचें कारण. ४ काकभुशुंडीमुखानें रामकथाश्रवण.* ५ गरुडास उपदेश. *६ गरुडमोह. ७ ज्ञानी भक्तास मोहाचें कारण. ८ शंकर-गरुड-भेट व त्यास भुशुंडीकडे पाठविणें. ९ तेथें गरुडमोहनिवृत्ति.* १० सुग्रीवशरणागति. ११ बिभीषण-शरणागति. *१२ कौसल्येस विश्वरूपदर्शन. १३ सतीला विश्वरूपदर्शन.* १४ रामेश्वर-स्थापना–हेतु.

७. सौहार्द रामायण — शरभंग, वैवस्वत मन्वन्तराचें ९ वें त्रेतायुग, **४० हजार.** १ दण्डकारण्याची उत्पति. *२ दण्डकारण्यास असलेला शाप.* ३ दण्डकारण्यांत

निवास करण्यांत प्रभूचा हेतु. ४ नारदमोह. ५ *कामविजयगर्व*. ६ शीलनिधिचरित्र. *७ विश्वमोहिनीसौंदर्य व स्वयंवर. ८ नारदमोह. ९ नारद प्रभुरूपयाचना करतात पण भगवान देत नाहींत—हेतु. १० रुद्रगणांनीं* केलेला *परिहास* व त्यांतील हेतु. *११ नारदक्रोध. १२ भगवंतास शाप. १३ शापस्वीकार. १४* रुद्रगणांवर *अनुग्रह* व उद्धार. १५ शूर्पणखाप्रसंग—कामयाचनादि. १६ खरदूषणयुद्ध. १७ रावणमारीच-संवाद व मारीचवध. १८ मारीचाची आरोळी व सीता लक्ष्मणांस मर्माहत करते. १९ धनुष्यरेखा व तिची शक्ति आणि **धनुर्विद्येचा महिमा.** २० रावण **ब्राह्मण भिक्षेकरी होऊन येतो.** २१ सीतेकडून रेखा-उल्लंघन, सीताहरण, सीताविलाप. २२ जटायुयुद्ध. २३ जटायु-उद्धार. २४ **रामलक्ष्मणांस वानरी व पैशाची** (राक्षसांच्या) **भाषांचें ज्ञान.**

८. रामायण मणिरत्न — वसिष्ठ-अरुन्धती-संवाद, तामस मन्वंतर, १४ वें त्रेतायुग, **३६ हजार.** १ गोदावरी व पंचवटी यांची उत्पत्ति व तेथें निवासकारण. २ चित्रकूट-निवास-कारण. ३ कामदाशिखर-वर्णन, महिमा. ४ *श्रीरामवाल्मीकिसंवाद* व *निवासस्थानें सांगणें*. ५ अत्रिभेट. ६ अनसूया-सीता-संवाद. ७ चंद्रोदयवर्णन. ८ अयोध्या व मिथिला येथील भिन्न उत्सव. ९ सख्यांचा मोह व प्रभूंनीं केलेलें निरा-करण. १० लंकेंतील सीतारामभेट. ११ वेदस्तुति, शंभुस्तुति, इंद्र, ब्रह्मा, गंगा इत्यादि रामस्तुति करतात. १२ राज्याभिषिक्त रामचंद्रांचा संतसमागम. **१३ गुरुगीता, देवगीता, भक्तिगीता, ज्ञानगीता, कर्मगीता, शिवगीता व वेदगीता** (अशा **सप्तगीता**) **आहेत.**

९. चान्द्र रामायण — हनुमान-चंद्रमा-संवाद, श्वेतमन्वंतर, ३२ वें त्रेतायुग, **७५ हजार.** *१ नारदतप. २ इंद्र-काम-प्रेरणा. ३ नारदमोह.* ४ भरताची चित्रकूटयात्रा. ५ केवट (नावाडी) संवाद व त्याचे पूर्वजन्मसंस्कार. ६ भरद्वाजाश्रमांत वस्ती. ७ कपींचा विवरप्रवेश व तपस्विनीभेट. ८ संपातिचरित्र. ९ *चंद्रमाऋषींचें आगमन व संपातीवर दया. १० संपाति-वानर भेट व पंख फुटणें.* ११ जटायूसाठीं शोक, संपाति दूरदृष्टि व कपींस मदत.

१०. सौर रामायण — हनुमान-सूर्य-संवाद, वैवस्वत मन्वंतर, २० वें त्रेतायुग, **६२ हजार.** १ हनुमानजन्मवर्णन. २ शुकचरित्र. ३ शुक रजक होतो. ४ त्याच्यामुळें जानकीपरित्याग, दंड. **५ लंकेंतून परत येतांना इंद्रावलपूरला उतरणें.** ६ श्री-अंजनी-हनुमान-संवाद. ७ अंजनीद्वारा हनुमंताचा प्रथम धिक्कार व नंतर प्रसन्नता. ८ श्रीअंजनी-सीता-राम-लक्ष्मण भेट, सर्वांची प्रशंसा. ९ श्रीऋक्षराज-जाम्बवंताची प्रशंसा व प्रयागास आगमन.

११. मयंद रामायण — मयंद-कौरव-संवाद, रैवत मन्वंतरांतील २१ वें त्रेतायुग, **५२ हजार.** १ पुष्पवाटिकाकथानक. २ गुरुसेवा. ३ अहल्योद्धार. ४ श्रीगंगावर्णन व गंगेची आत्मीयता. ५ मालीसंवाद. ६ रामेश्वरमाहात्म्य. ७ रावणमंत्र. ८ बिभीषण-मंत्र. ९ हनुमच्चरित्र (सुंदरकांडांतील).

१२. **स्वायंभुव रामायण** — ब्रह्मा-नारद-संवाद, स्वायंभुव मन्वंतराचें ३२ वें त्रेतायुग, **१८ हजार.** *१ गिरिजापूजन.* २ विवाह. ३ वनवास. ४ सुमन्ताची भेट. *५ गंगापूजन.* ६ सीताहरण. ७ रावणास मुनिदंड व **मंदोदरीच्या गर्भापासून सीतेची उत्पत्ति. ८ कौसल्याहरण.** ९ दीर्घबाहु, दिलीप, रघु, अज व दशरथ यांविषयीं विशेष माहिती.

१३. सुब्रह्म रामायण — नांव दिलेलें नाहीं. वैवस्वत मन्वंतर, १३ वें त्रेतायुग, **३२ हजार.** १ प्रयागमाहात्म्य. २ भरद्वाजदर्शन. ३ भरताचा सत्कार. ४ देवतामंत्र. ५ *तापसमीलन.* ६ चित्रकूटनिवास. ७ *अनसूया–उपदेश.*

१४. सुवर्चस् रामायण — सुग्रीवतारासंवाद, वैवस्वत मन्वंतर, १८ वें त्रेतायुग, **१५ हजार.** १ किष्किंधेवर लक्ष्मणाचा कोप. २ सुग्रीवभेट. ३ तारेची सीताभेटीची उत्कंठा व अयोध्येस परत जातांना भेट. ४ वालीतारा संवाद. ५ वालीरामसंवाद. ६ रावणदरबार. ७ सभेंतील प्रसंग. ८ मंदोदरीचा रावणास उपदेश. ९ सुलोचना-विलाप. १० समुद्राचें गांभीर्य. ११ लक्ष्मणास शक्ति लागते. १२ संजीवनी आणणें. १३ *पर्वतासह हनुमंताचें अयोध्येवरून उड्डाण, भरत-हनुमान-संवाद.* १४ धोबी-धोबीण संवाद. १५ **रावणाचें चित्र काढल्याबद्दल शांतानें चहाडी केली.** १६ **शांतास सीतेचा शाप व पक्षियोनी प्राप्त होणें.** १७ सीतात्याग. १८ लवकुश-जन्म. १९ अश्वमेधाचा घोडा बांधणें इत्यादि. २० **महारावणयुद्ध व वध.** २१ लवणासुरयुद्ध व वध. २२ राज्याची वांटणी. २३ श्रीरामाचें वैकुंठास निर्याण.

१५. देव रामायण — इन्द्र-जयन्त-संवाद, तामस मन्वंतराचें साहावें त्रेतायुग, **संख्या एक लक्ष.** १ जयन्ताचा कायापालट. २ रामपरीक्षा. ३ कोप. ४ नारदभेट व उपदेश. ५ जयन्तशरणागति. ६ रामविजय. ७ **भरतविजय.** ८ शत्रुघ्नविजय. ९ हनुमान-विजय. १० कपींचें घरीं परतणें. ११ अंगदमोह. १२ बिभीषणपुत्राची अयोध्या-कोतवाली. १३ **जानकीविजय.** १४ नाम, रूप, लीला, धाम; चतुर्व्यूह भक्ति. १५ धाममहिमा. १६ शरयूमहिमा. १७ **हनुमत्-राज्याभिषेक.** १८ हनुमत्कार्य. १९ उपासना-विधि. २० सत्संग-महिमामाधुर्य. २१ **तीर्थांचा परस्परांशीं सत्संग.** २२ ग्राम व पुरी-निरूपण. २३ नगर-निरूपण. २४ **भाषापरिवर्तनविधि.** २५ शब्द-परिशिष्टवर्णन.

१६. श्रवण रामायण — इन्द्र-जनक-संवाद, स्वायंभुव मन्वंतर, ४० वें त्रेतायुग, **१ लक्ष २५ हजार.** १ दशरथ-शिकार. २ श्रवणकथा. ३ मंथरेची उत्पत्ति. ४ **मृगी-शाप.** ५ भरताच्या मातामहीचें सख्य. ६ दशरथ-प्राणघाताचें कारण. ७ सुमंत्राचें स्मरण. ८ राजांग विशेष वर्णन. ९ चित्रकूटास राम-भरत-संवाद. १० *वासिष्ठांचें भाषण.* ११ *जनकागमन.* १२ *मिथिला समाज व अयोध्या समाज यांची एकत्र सभा* आणि *निवास.* १३ पादुकांसाठीं भरताची याचना व पादुकांस राज्याभिषेक.

१४ नन्दिग्रामीं निवास व *पादुकांच्या* आज्ञेनें राज्यकारभार.

१७. दुरन्त रामायण — वसिष्ठ-जनक-संवाद, वैवस्वत मन्वंतर, १५ वें त्रेतायुग, **६१ हजार संख्या.** १ भरतमहिमा व भरतशपथ. २ भरतविलाप. ३ कैकयीचा क्षोभ. ४ रामप्रभूंनीं परतावें अशी भरताची उत्कट इच्छा. ५ लक्ष्मण-रोष. ६ निषाद-भरत-संवाद. ७ निषादरोष. ८ चूडामणीची कथा. ९ चूडामणि आणि मुद्रिका यांच्या परिवर्तनांतील हेतु. १० सीतेला संदेशप्राप्ति व तिची विकलता. ११ प्रवर्षणावर गुहेंत निवास. १२ जगांतील सर्व वानरांवर वाली व सुग्रीव यांची सत्ता. १३ देव वानररूपानें अवतरण्याचें कारण. १४ दुंदुभि-अस्थि आणि ताल-वर्णन. १५ वालीवधप्रतिज्ञा. १६ मधुवन-विशेष माहिती. १७ समुद्रतीरावर अंगदाचें भाषण. १८ वानरांनीं आपापलें बलकथन. १९ *हनुमंताचें मौन !* २० जांबवंतानें स्मरण देतांच अनंतपट बलप्राप्ति. २१ रामप्रसादाचा अधिकार. २२ लंकादहन. २३ बिभीषणगृह न जळण्याचें कारण. २४ *बिभिषणास राज्यतिलक.* २५ समुद्रास विनवणी. २६ समुद्राची निर्भर्त्सना, त्याला भीति व त्याची शरणागति. २७ सैन्य उतरून जाण्याचा मार्ग सांगणें. २८ नलनीलांचें सामर्थ्य. २९ दगड-पाषाण तरणें.

१८. रामायण-चंपू — शिवनारद संवाद, श्राद्धदेव मन्वंतराचें पहिलें त्रेतायुग, **१५ हजार.** १ *शीलानिधि राजाकडे दोन रुद्रगण येण्याचें* कारण. २ *नारदपरिहास.* ३ *नारदक्रोध.* ४ *रुद्रगणांस शाप.* ५ वीरभद्राची उत्पत्ति. ६ सतीदेहत्याग. ७ दक्ष-यज्ञविनाश. ८ शिवअखंड समाधि. ९ त्रिपुर-उत्पत्ति. १० सतीचा पार्वतीजन्म. ११ कामप्रेरणा व कामदहन. १२ पार्वतीविवाह. १३ मुण्डमालाधारण-कारण. १४ गणेश जन्म, कार्तिकेयजन्म व वैषम्य. १५ कैलासवर्णन. १६ रामभक्तिप्रकार, रामध्यान, राम-वनवासी-स्वरूप, वीरस्वरूप. १७ इंद्रानें रथ धाडणें. १८ पाताळांत जाणें. १९ अरुण-गरुड-संवाद. २० कालनेमि-छल. २१ संजीवनीमहिमा व शक्ति लागल्यावर **सूर्योदयाबरोबर मृत्यूचें कारण.** २२ *सुषेण वैद्यास आणणें.*

१९. रामरहस्य रामायण — श्लोक २२ हजार, इतर माहिती नाहीं.

(२०) **महारामायण — साडेतीन लक्ष श्लोक** — जास्त माहिती नाहीं. (पण या रामायणांतील अनेक अवतरणें मानसपीयूषमध्यें टीकाकारांनीं दिलीं आहेत.)

सूचना — श्रीगोस्वामींनीं विविध कथा कोठून आणल्या व त्या कपोलकल्पित आहेत, असें वाटणारांनीं वर दिलेल्या माहितीशीं मानसांतील कथांची तुलना करून पाहावी व आपलें समाधान करून घ्यावें. एवढ्यानें समाधान न झाल्यास त्यांनीं ब्रह्मदेवाकडे जाऊनच समाधान करून घ्यावें; झाल्यास ! (**क**) यांतील कथांची कोष्टकरूपानें तुलना गूढार्थचंद्रिका, उत्तरकाण्ड, परिशिष्टांत दिली आहे. *हीं वीस रामायणें पुढील १० रामायणांत नाहींत.*

◆◆◆◆

卐 卐 卐 ४।३ 卐 卐 卐

आनंद रामायणांतील व भावार्थ रामायणांतील रामायणें

आनंद रामायण, मनोहरकाण्ड, सर्ग १७ मध्यें वर्णिलेलीं नव्वद रामायणें तेथील क्रमानुसार खालीं दिलीं आहेत व त्यानंतर भावार्थ रामायण, अरण्यकांड, अ. २१ मधील २६ रामायणांचीं नांवें दिलीं आहेत. (क) मागील प्रकरणांतील वीस रामायणें व पुढें उल्लेखिलेलीं सर्व रामायणें मिळवून, वाचून मानसांतील अपरिचित कथांशीं तुलना करून मग वाटल्यास श्रीगोस्वामींवर आक्षेप घ्यावेत.

आनंद रामायणांतील रामायणांची यादी.

१ वाल्मीकि	रामायण	२५ मंगल	रामायण	४९ कलि	रामायण
२ योगवासिष्ठ	,,	२६ विश्वामित्र	,,	५० कालिका	,,
३ अध्यात्म	,,	२७ सुतीक्ष्ण	,,	५१ कुमार	,,
४ हनुमद्	,,	२८ सुग्रीव	,,	५२ गणेश	,,
५ नारद	,,	२९ बिभीषण	,,	५३ गरुड	,,
६ लघु	,,	३० आनंद	,,	५४ चंपु	,,
७ बृहद्	,,	३१ व्यासोक्त	,,	५५ जैन	,,
८ अगस्ति	,,	३२ शुक	,,	५६ जांबवंत	,,
९ सार	,,	३३ शेष	,,	५७ दुर्वासस्	,,
१० देह	,,	३४ आगम	,,	५८ नन्दि	,,
११ वृत्त	,,	३५ कूर्म	,,	५९ नल	,,
१२ ब्रह्म	,,	३६ स्कंद	,,	६० नाटक	,,
१३ भरद्वाज	,,	३७ अरुण	,,	६१ नील	,,
१४ शिव	,,	३८ पद्म	,,	६२ नरसिंह	,,
१५ क्रौंच	,,	३९ धर्म	,,	६३ पद्य	,,
१६ भरत	,,	४० आश्चर्य	,,	६४ पाराशर	,,
१७ जैमिनी	,,	४१ अद्भुत	,,	६५ बकदाल्भ्य	,,
१८ आत्मधर्म	,,	४२ अत्रि	,,	६६ ब्रह्मवैवर्तक	,,
१९ श्वेतकेतु	,,	४३ अंबिका	,,	६७ ब्रह्माण्ड	,,
२० जटायु	,,	४४ अवधूत	,,	६८ भविष्योत्तर	,,
२१ रवि	,,	४५ आचार्य	,,	६९ भागवत	,,
२२ पौलस्ति	,,	४६ औशनस	,,	७० भार्गव	,,
२३ देवी	,,	४७ ईश्वर	,,	७१ भारत	,,
२४ गुह्यक	,,	४८ कपिल	,,	७२ मैंद	,,

७३ मरीचि रामायण	७९ लिंग रामायण	८५ श्रीरंग रामायण
७४ माहेश्वर ,,	८० वरद ,,	८६ सनत्कुमार ,,
७५ मानव ,,	८१ वरुण ,,	८७ वामन ,,
७६ मार्कण्डेय ,,	८२ वसिष्ठ ,,	८८ स्कंद ,,
७७ मारुति ,,	८३ वायु ,,	८९ सूर्य ,,
७८ मुद्गल ,,	८४ विष्णु ,,	९० हरिवंशीय ,,

भावार्थ रामायणांतील रामायणें.

१ शिव रामायण	१० महाकाली रामायण*	१९ महाभारत रामायण*
२ शैव ,, *	११ स्कंद ,,	२० क्रौंच ,,
३ आगम ,,	१२ अगस्ति ,,	२१ धर्म ,,
४ पंचरात्र ,, *	१३ पौलस्ति ,,	२२ श्वेतकेतु ,,
५ हनुमंत नाटक ,, *	१४ पद्म ,,	२३ शिवभवानी ,, *
६ गुह्यक ,,	१५ रवि ,,	२४ आत्म ,, *
७ मत्स्य ,, *	१६ अग्नि ,, *	२५ जैमिनी ,,
८ कूर्म ,,	१७ वरुण ,,	२६ अध्यात्म ,,
९ वराह ,, *	१८ भरत ,,	

सूचना — यांतील * अशी खूण केलेलीं १० रामायणें वरील ९० रामायणांत नाहींत. म्हणजेच *आनंद रामायणांत उल्लेखिलेल्या ९० रामायणांपैकीं १६ रामायणें श्रीएकनाथ महाराजांस उपलब्ध झालीं होतीं.*

वि. सूचना — (१) आनंद रामायणांतील यादींत जीं रामायणांचीं नांवें दिसतात त्यांत पुराणें व उपपुराणें यांत असलेल्या रामायणांचा अन्तर्भाव केलेला दिसतो. उदाहरणार्थ जैमिनी, कूर्म, स्कंद, पद्म, लिंग, कालिका, गणेश, गरुड, ब्रह्मवैवर्तक, ब्रह्मांड, ब्रह्म, वायु, वामन, भविष्योत्तर, मुद्गल, विष्णु, हरिवंश हीं पुराणांचीं वा उपपुराणांचीं नांवें आहेत. प्रत्येक पुराणांत थोडीफार रामकथा असतेच. हें विधान **केवळ तर्क आहे.** कदाचित् संवादी भ्रम ठरेल किंवा विसंवादी भ्रम ठरेल; म्हणजेच **हा तर्क खरा ठरेल अथवा खोटाहि ठरेल;** कारण स्कंद रामायण दोनदां आहे. दोन स्कंदपुराणें नाहींत. असो, मिळालेली माहिती वाचकांच्या उपायोगासाठीं यथामति दिली आहे.

(२) अनेक पुराणें, अनेक रामायणें वगैरे ग्रंथांतील उत्तमोत्तम सारभूत रस मानसांत भरला आहे हें या व पूर्वीच्या प्रकरणांवरून खात्रीपूर्वक सिद्ध होतें व 'नानापुराणनिगमागमसंमतं...' या श्लोकाची सत्यता दिसून येते; व 'सब ग्रंथन को रस' याचीहि प्रतीति येते. अपरिचित वाटणाऱ्या व अलौकिक दिसणाऱ्या अनेक कथांमुळें मानसाला एका प्रकारें विचित्रता आली आहे. 'कथा प्रबंधा विचित्र बनवुनि'

हें कसें साधलें याची थोडी कल्पना येते. (क) पुढील प्रकरणांत आणखीं थोडीं कारणें दिसतील व ' विविधकथाप्रबंध ' हें पांचवें मुख्य प्रकरण पूर्ण होईल.

जय रघुपति अति विचित्रचरिता । तूं भवसरिता-तरणि करविता ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ४।४ 卐 卐 卐

विचित्र-कथा-प्रबंध-विचित्रता

अनेक अलौकिक कथारससंग्रह हें श्रीमानसाच्या विचित्रतेचें एक कारण आहे हें मागील तीन प्रकरणांत दाखविलें. या प्रकरणांत आणखी कांहीं कारणें विशद केलीं आहेत.

१. श्रीमानसांत मुख्य चार संवाद असून ते मानससरोवराच्या चार घाटांसारखे अति मनोहर घाट आहेत.

दो० — **अतिसुंदर संवादवर विरचित बुद्धि-विचारिं ।**
ते या पावन सुभग सरिं घाट मनोहर चारिं ।। (१।३६)

(क) *चार संवादांत चार कल्पांतील रामावतारांचें वैशिष्ट्य दाखविलें आहे हें एक अपूर्व आश्चर्यकारक वैचित्र्य आहे.*

२. **चार संवाद** — काकभुशुंडी-गरुड-संवाद, उमा-शंभु-संवाद, याज्ञवल्क्य-भरद्वाज-संवाद आणि चौथा श्रीतुलसीदास आणि त्यांचे श्रोते (किंवा त्यांचें मन) यांचा संवाद असे कालानुक्रमानें चार संवाद आहेत. (क) सर्वज्ञ सर्वदर्शी जगद्गुरु महेशांनीं प्रथम श्रीरामचरिताची रचना फार पूर्वीं केली—

' यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशम्भुना दुर्गमम् ।
श्रीमद्रामपदाब्जभक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम् ' ।। (उत्तर.उ. प. श्लो. १)

तें त्यांनीं आपल्या मानसांतच ठेवलें; *आपल्या मुखानें कोणास प्रथम सांगितलें नाहीं.* तें कोणत्या कल्पांत केलें हें त्यांच्याशिवाय कोणास माहीत नाहीं. (ख) तें रामचरितमानस (रामायण) काकभुशुंडीच्या रामभक्तीची परीक्षा पाहून त्यास *दिलें* (अर्पिलें) असें म्हटलें आहे. आपल्या मुखानें त्यास सांगितलें नाहीं :—

' शंभु चरित हें सुंदर रचिती ' ।।
' तें शिव काकभुशुंडिस *अर्पिती* । रामभक्त अधिकारि परीक्षिती'।।(१।३०।३-४)

(ग) लोमशमुनींना तें काकभुशुंडीला सांगितलें तेव्हां ते म्हणाले —

' रामचरितसर गुप्त मनोहर । मज लाभलें प्रसादें शंकर ' ।। (७।११३।११)

शंकरांनीं मला सांगितलें असें न म्हणतां लोमश म्हणाले कीं मला शंकरांच्या *प्रसादानें लाभलें.* रहस्य हें आहे कीं शंकरांनीं आपल्या कृपासामर्थ्यानें तें लोमशांच्या

हृदयांत प्रगट केलें; तेव्हां लगेच लोमशांनीं भुशुंडीला सांगितलें. *लोमशमुनि माध्यमासारखे वापरले गेले.* म्हणून तत्त्वतः तें शिवानेंच भुशुंडीला दिलें.

३. स्वतः रचलेलें रामायण स्वतःच्या मुखानें सांगतांना ‘ यथाश्रुत ’ = ‘ जसें श्रवण केलें तसें ’ असें म्हणतां आलें नसतें; व ‘ मीं रचिलेलें ’ अशी अहंकाराची भाषा वापरावी लागली असती; म्हणून वरील सर्व खटाटोप केला; आणि महेशांनीं स्वतः हंसरूपानें नीलगिरीवर (निलगिरी नव्हे) काकभुशुंडीजवळ श्रवण केलें; आणि मग योग्य वेळीं उमेला सांगितलें. काकभुशुंडी-गरुड-संवाद झाला तो *यथाश्रुत यथामति* शंभूंनीं उमेला सांगितला; पण तो सर्व सांगतांना त्या फारच प्राचीन इतिहासांत नवीन इतिहासाची थोडी भर घातली. (क) काकभुशुंडीकथेंत शेषशायी नारायण राम झाले, शेष लक्ष्मण झाले, शंख भरत झाले व चक्र शत्रुघ्न झाले. हा अवतार नारदशापानें झाला. नारदशापानुग्रहानेंच रुद्रगण रावण-कुंभकर्ण झाले. ही शंकरांनीं प्रथम रचिलेली कथा भुशुंडीनें श्रवण केल्यावर २७ कल्प गेल्यानंतर त्यानें ती गरुडास सांगितली. तीच कथा शंकरांनीं श्रवण केली. मध्यंतरीं २७ रामावतार होऊन गेले. नंतर पुष्कळ वर्षांनीं त्यांनीं तीच उमा–पार्वतीला सांगितली. त्या २७ रामावतारांपैकीं एक रामावतार सतीनें पाहिला होता; व त्या रघुनाथाला पाहून सतीला मोह उत्पन्न झाला होता. सतीच पार्वती झाली; व तिला पूर्वजन्मस्मृति होऊन तिला त्याच रामावताराबद्दल शंका आल्या व प्रश्न विचारले; म्हणून *सतीनें पाहिलेल्या रामावतार-कथेची भर महेशांनीं घातली.* भुशुंडीकथेंतील रामावताराचीं कारणें नारदमोह-कथेनें सांगितली व नंतर भर घातली.

४. सतीनें पाहिलेला रामावतार ब्रह्माचा = परमेश्वराचा, ज्यांचे अंश नारायण, ब्रह्मा, विष्णु, महेश असतात त्यांचा झाला. हें मनुशतरूपातपश्चर्येच्या कथेनें सांगितलें. त्या अवतारांत शतरूपा कौसल्या झाली व मनु दशरथ झाले. त्याच अवतारांत रावण, कुंभकर्ण व बिभीषण कोण झाले हें प्रतापभानुकथेनें सांगितलें. या रामावतारांत नारायण लक्ष्मण झाले, विष्णु भरत झाले व रुद्र–महेश–शत्रुघ्न झाले. *ही दुसऱ्या संवादाची भर पडली आहे.*

५. तिसरा संवाद याज्ञवल्क्य-भरद्वाजांचा. याज्ञवल्क्यांनीं काकभुशुंडीजवळच श्रवण केलें होतें (१।३०।५). म्हणज पहिला, दुसरा व तिसरा संवाद–यांना मूळ एकच कथा आहे. भरद्वाजाला ती कथा ज्या कल्पांत सांगितली त्या कल्पांत रामावतार कोणाचा इत्यादि भर त्यांनीं घातली. त्या कल्पांत रामावतार नारायणाचाच म्हणून भरत, लक्ष्मण, शत्रुघ्नसुद्धां पहिल्या कथेसारखेच; पण रामावताराला कारण वृंदेचा शाप झाला आणि जलंधर रावण झाला. (जलंधरकथा व वृंदाशाप गूढार्थचंद्रिकेंत पाहा). त्या कल्पांतील वैशिष्ट्य इतकेंच.

६. चौथा संवाद तुलसीदासांचा. तुलसीदासांनीं उमा-शंभु-संवाद अनेक वेळा

गुरुमुखानें श्रवण केला. त्यांनीं प्रयागांत *याज्ञवल्क्य-भरद्वाज-संवाद श्रवण केला.* म्हणजेच तीन कल्पांच्या विशेष कथा व काकभुशुंडीसंवाद त्यांस श्रवणानें मिळाले. त्यांत त्यांनीं चालू कल्पांत पूर्वी झालेल्या रामावताराची विशेष कथा संतमुखानें श्रवण केलेली व वाल्मीकि रामायण इत्यादिकांत वर्णिलेली भरीला घातली. या कल्पांत रामावतार विष्णूचा; सनकादिमुनींचा शाप जयविजयांना मिळून ते प्रथम हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु झाले व नंतर रावण व कुंभकर्ण झाले वगैरे कथा सांगितली आहे. विष्णूचे अवतार राम, शेषाचे अवतार लक्ष्मण, विष्णूच्या शंखाचा अवतार भरत व चक्राचा अवतार शत्रुघ्न; कश्यप-अदिति दशरथ-कौसल्या; हें वैशिष्ट्य अत्यंत संक्षेपानें भरीला घातलें आहे.

(क) याप्रमाणें चारी संवादांत काकभुशुंडी-गरुड-संवाद सामान्य आहे. राम-रावणादि अवतार कोणाचे व कां इतकी भर प्रत्येक वक्त्यानें घातली. तथापि अवतारी (अवतार घेणारांतील) भेदामुळें कथावर्णनांत भेद आहेत; उदाहरणार्थः—

(ख) नारायणावतार लक्ष्मण 'विष्णुशंकरांनासुद्धां ठार मारीन' असें म्हणूं शकेल व शेषकूर्मादींना आज्ञा देऊं शकेल; पण शेषाचा अवतार लक्ष्मण तसें म्हणूं शकणार नाहीं. शंखचक्रांचे अवतार असणाऱ्या भरतशत्रुघ्नांस ठार मारीन असें म्हणूं शकेल पण विष्णुशंकर मदतीस आले तरी त्यांनासुद्धां मारीन असें तो म्हणूं शकणार नाहीं.

(ग) *कोणत्या कल्पाची कथा कशी ओळखावी याविषयीं निःसंदेह मार्गदर्शन गूढार्थचंद्रिकेनें केलें आहे, हें हिंदी टिकाकारांनीं केलेलें नाहीं.* उलट कित्येक व्यास, महापंडित, रामायणी यांनीं चक्रव्यूह निर्माण केले आहेत व ते स्वतःच त्यांत अडकले आहेत, कोणाचे अवतार केव्हां, कोण इत्यादि पुष्कळ मार्गदर्शक माहिती कोष्टक-रूपानेंहि गूढार्थचंद्रिकेंत दिसेल. प्रस्तावना-परिशिष्टांत तुलनासूची पाहावी.

७. असें मिश्रण करण्यांत हेतु — (१) रामावतार फक्त तिघांचाच होऊं शकतो. राम = परमात्मा-परमेश्वर; शेषशायी नारायण आणि वैकुण्ठाधीश विष्णु यांपैकीं कोणाचा तरी होतो हें दाखविणें; आणि तिघांच्या चरित्रांत थोडा भेद दिसत असून-सुद्धां तत्त्वतः तिघे एकच आहेत ही भावना दृढ करणें आणि या निमित्तानें तिघांचेंहि गुणगान करून, शिवाय काळाच्या अनंतत्वाची कल्पना वारंवार पुढें मांडून कलियुगांतील माणसांचें आयुष्य किती क्षुद्र याची कल्पना सहज करतां यावी या हेतूनेंहि हें मनोहर मिश्रण केलें असावें असें मानसांतील वर्णनावरून वाटतें. (क) या निमित्तानें श्रोते, वक्ते यांनीं पुराणें व रामायणें यांचें परिशीलन करण्यास खरोखरच सहज प्रेरणा दिली आहे. पुराणावलोकन केल्याशिवाय मानसरहस्य कळणार नाहीं हें जाणून एका सर्वसंग-परित्यागी महात्म्यानें संस्कृत पाठशाळेंत प्रवेश मिळवून पुराणादिकांचा अभ्यास केला. याप्रमाणेंच अनेकांना पुराणादि ग्रंथांचें अवलोकन करावें लागलें आहे. प्रो. गौडजी, लमगौडाजी इत्यादि पाश्चात्यविद्यापंडितांनासुद्धां पुराणें, साहित्य, इत्यादि ग्रंथांचें

अवलोकन करावयास लावणारें श्रीतुलसीमानसच आहे.

(२) रावणकुंभकर्णादींचे अवतार अमुकच जिवांचे किंवा व्यक्तींचे होतात असें नाहीं; प्रत्येक कल्पामध्यें हे बदलतात; पण त्यांच्या अवतारांससुद्धां कांहीं तरी विशिष्ट कारण घडावेंच लागतें. कर्मविपाकसिद्धांत अखंडित आहे हें अनेक अवतारकारणांनीं ठसविलें आहे. रावणावतारकथांनीं हेंहि दाखविलें आहे कीं पूर्वजन्मीं हे कोणीतरी परम भाग्यवंत, समर्थ, पुण्यशील, तपस्वी, किंवा जयविजयांसारखे भगवद्भक्तसुद्धां असतात. साधे पामर जीव किंवा दुष्ट दुराचारी नसतात.

(३) सीतापरित्याग, कैकयीकलंक, मंथराचरित्र यांनासुद्धां कर्मविपाकसिद्धान्तच लागू आहे हें पण सुचविलें आहे.

(४) हरि शब्दाचा उपयोग सर्व कल्पांतील रामावतारांस लावतां यावा या हेतूनेंच केला आहे; व त्यानें परमात्मा, नारायण व विष्णु यांचा अभेद सुचविला आहे. तसेंच सीता, रमा, श्री हे तिन्ही शब्द निरनिराळ्या वेळीं सीतेला वापरून लक्ष्मी, महालक्ष्मी आणि आदिमाया सीता यांचा अभेद दर्शविला आहे. *एकाच कल्पाच्या कथेनें या गोष्टी साधल्या नसत्या, आणि भक्तिमार्गातील उपासनाविषयक अज्ञान कमी करणें* सहज साधलें नसतें. *अशा अनेक उदार हेतूंनींच हें परम मनोहर मिश्रण केलें गेलें आहे* असें या लेखकाच्या मंद मतीस वाटतें.

श्रीगोस्वामींनीं मुख्य विषयप्रवेश कसा केला हें सांगून विचित्रकथा-प्रबंध प्रकरण विराम पावेल.

विषयप्रवेश — (१) मानसांतील पहिले ४३ दोहे म्हणजे सर्व मानसाचें सार आहे. ते मोठमोठ्या पंडितांच्या मतीससुद्धां कुंठित करणारे असून साधारण जनांस मुखोद्गत करावेसे वाटतात इतके सरळ व प्रसादपूर्ण आहेत; सुभाषितांचें भांडारच आहेत. यांत मंगलाचरण, अनुबंधचतुष्टयकथन, रामावतार घेणारे देव, गुरु, विप्र, संत, खल, चराचर जीव, भूतभविष्यवर्तमानकाळांतील संतकवि, प्राकृतभाषाकवि, आयोध्यादिपासून सर्व रामपरिवार, राम, सीता, रामसेवक, रामनाम इत्यादींचें वंदन आणि वंदनाच्या निमित्तानें मधुर मनोहर वाणीनें स्वभावादि प्रभाववर्णन आहे. मानसपरंपरा, मानसप्रकाशन-स्थल-काल, तुलसी कवि नसून 'मानसकवि तुलसी' कसे झाले, श्रीरामचरितमानसमहिमा, रामकथामहिमा, रामगुणग्राममहिमा, आणि मानसशरयू रूपकद्वारा साहित्य, योग, वैराग्य, ज्ञान, विज्ञान इत्यादि शास्त्रज्ञान, मानस-कथासार, मानस सुगम कोणास व दुर्गम कोणास, मानसाचे चतुर रक्षक कोण, मानसांत अवगाहन करणारे शूर कोण इत्यादि सांगण्यांत हे ४३ दोहे खर्चीं पडले आहेत. साहित्यादि शास्त्रांच्या चर्चेत अगदीं थोडा विस्तार करूनसुद्धां या भागावरील टीकेचीं सुमारें साहाशें पृष्ठें होतील; म्हणजेच बालकाण्ड-टीकेचा $\frac{1}{3}$ पेक्षां थोडा कमी भाग आणि संपूर्ण गूढार्थचंद्रिकेचा $\frac{1}{6}$ भाग या ४३ दोह्यांची टीका होईल !

(२) या वंदनादि उपक्रम प्रकरणानंतर श्रीतुलसीदास म्हणतात —

दो. — रघुपति पदाब्ज धरुनि हृदिं पावोनियां प्रसाद।
अतां वदूं द्वय मुनिवरीं मिलन, सुभग संवाद ॥ ४३ य ॥

याज्ञवल्क्य व भरद्वाज या दोन मुनिवरांच्या भेटीची हकीगत आणि त्यांचा संवाद सांगतों असें म्हणून कथा सांगण्याचा उपक्रम करतात.

(क) प्रयागांतील भरद्वाजाश्रमाचें व भरद्वाजांचें वर्णन, माघ-मकर-मेळा, याज्ञवल्क्य-भरद्वाज-भेट व भरद्वाजांनीं याज्ञवल्क्यांस शंका-प्रश्न विचारून रामकथा सांगण्याची विनंति करणें इतक्या गोष्टी दो. ४७।१ पर्यंत गोस्वामींनीं सांगितल्या आहेत. भरद्वाज याज्ञवल्क्यांस विचारतात कीं,

" ज्या रामाच्या नामाचा जप अविनाशी शंभु सदा करीत असतात व ज्या राम-नामाच्या प्रभावानें काशींत मरणारास मोक्ष मिळतो तो राम कोण हें मला सांगा. " आणि विनंति करतात कीं,

जाइल जेणें श्रम मम भारी। प्रभु अशि कथा वदा विस्तारीं ॥ ४७।१॥

यानंतर प्रस्तावनापूर्वक याज्ञवल्क्य सांगतात —

करि संशय ऐसेच भवानी। महादेव विस्तृत वाखाणी ॥ ८ ॥

दो० — ॥ **अतां यथामति सांगुं तो उमा-शंभु-संवाद।**
कारण काळहि सांगतों श्रुणु मुनि मिटे विषाद ॥ ४७ ॥

(ख) तुलसीदास म्हणाले कीं मी आतां उभय मुनिवरांचा संवाद सांगतों; मुनिवर याज्ञवल्क्य म्हणाले कीं मी आतां उमा-शंभु-संवाद सांगतों; तो कां व केव्हां झाला तें सांगतों.

(ग) कारण सांगण्यासाठीं जी कथा सांगतात ती वाचतांना वाचकांस शंका येते कीं रामजन्माच्या व विवाहवर्णनाच्या आधींच सीताहरणाची कथा कशी आली !

(३) उमा-शंभु-संवाद म्हणजे पार्वती-शंभु-संवाद होय. पार्वतीनें शंकरांस कांहीं प्रश्न विचारले व शंकरांनीं रामकथा सांगितली तो उमा-शंभु-संवाद. पार्वतीनें जी शंका विचारली तिचें कारण सांगावयाचें आहे; तें कारण पार्वतीदेहांत घडलेलें नसून, तिच्या मागल्या जन्मांत ती सती असतांना घडलें. (क) पार्वतीनें शंका विचारली रामावतार समाप्तीनंतर अगदीं कमींत कमी लाख-दीड लाख वर्षांनीं व तिला शंका आली होती ती सती असतां. श्रीराम रघुनाथ पंचवटीस राहून बरींच वर्षें गेल्यानंतर श्रीरघुनाथाला अरण्यांत पाहिल्यानंतर, जी घटना शंकेला वगैरे कारण झाली ती सती-मोहकथा याज्ञवल्क्य प्रथम सांगतात.

(ख) सती देहत्यागापूर्वीं झालेल्या रामावतारकालांत राम वनवासांत पंचवटीस राहात असतां रावणानें सीतेला चोरून नेली; व रघुनाथ विरहव्याकुल होऊन तिचा शोध करीत लक्ष्मणासह हिंडत होते; अशा स्थितींत सतीसह शंभु अगस्त्याश्रमांतून

उत्तरेकडे कैलासाच्या दिशेनें जात असतां लांबून त्यांस रघुपति दिसले. जवळ जाऊन भेटणें, दर्शन घेणें वगैरे अप्रासंगिक वाटल्यानें त्रिपुरारींनीं लांबूनच तें रामरूप पाहिलें व प्रेममग्न होऊन 'जय सच्चिदानंद जगपावन' असें म्हटलें व मनांतच नमस्कार केला. बायकोसाठीं रडत, विव्हळत, भटकत असलेला रघुनाथ, परमात्मा ब्रह्म किंवा विष्णु असणें शक्य नाहीं; मग महेशांनीं नृपसुताला प्रणाम कसा केला? इत्यादि विविध शंका सतीच्या मनांत घुसल्या. तिला आलेले संशय सर्वज्ञ महेशांनीं जाणले व जातां जातां तिची पुष्कळ समजूत घातली. शंकर सर्वज्ञ त्रिकालदर्शी आहेत हें सतीला माहीत असूनहि त्यांच्या म्हणण्यावर तिचा विश्वास बसला नाहीं. ती रघुनाथाची परीक्षा पाहण्यास गेली; जातां जातां अविवेकी विचार करून सीता बनली. फजीती पावून व विश्वरूप पाहून परत आली, पण शंकरांजवळ खोटें बोलली. ध्यान लावून पाहतांना त्यांस सतीकृत कपट कळलें. हें सर्व हरिमायेनें करविलें, सती अपराधी नाहीं हें जाणलें; पण ती सीता बनली होती म्हणून पत्नी या नात्यानें तिच्याशीं संबंध ठेवणें अयोग्य ठरलें. सतीवर न रागावतां, तिनें केलेल्या कपटाविषयीं कांहीं न बोलतां तिला कथा सांगत सांगत कैलासास गेले व ८७ हजार वर्षें समाधि लावून बसले. या काळांत सतीनें पाहिलेल्या त्या रामावताराची समाप्ति होऊन हजारों वर्षें गेलीं. पुढें सतीदेहत्याग, पार्वतीजन्म, तिची तपश्चर्या इत्यादि गोष्टी घडल्या. शिवपार्वतीविवाह होऊन षडाननाचा जन्म होऊन पुष्कळ काळ गेल्यावर पार्वतीला पूर्वजन्माची आठवण झाली व तिनें शंका व प्रश्न विचारले व उमाशंभुसंवाद सुरू झाला. वर जें सारांशरूपानें सांगितलें तेंच उमाशंभुसंवादाच्या कारण आणि कालकथनाचें सार आहे. दो. ४८ पासून १०३ अखेरपर्यंत कारण व काळ-कथन केलें आहे.

दो. १०४।१ पासून उमाशंभुसंवादाची प्रस्तावना सुरू होते. नंतर पुन्हा प्रिया पार्वती शंकरांजवळ गेली आणि

'हर्षित ती शिवसमीप बसली। मागील जन्मकथा आठवली ॥' (१०७।४)

नंतर तिनें प्रस्तावना, विनंति वगैरे करून भरद्वाजांसारखीच शंका विचारली व मग रामकथेविषयीं १२ प्रश्न विनंतिवजा विचारले. (११०।४–१११।४). पार्वतीच्या शंकेचें उत्तर दो. ११५ पासून ११९ अखेर आहे. **त्या भागास गूढार्थचंद्रिकेनें 'श्रीशिवगीता' असें नांव दिलें आहे.**

पार्वतीचे हे बारा प्रश्न आणि उत्तरकांडांतील तिचे व गरुडाचे प्रश्न व त्यांची उत्तरें कोठपासून कोठपर्यंत याची माहिती *'ग्रंथ-प्रतिज्ञा, प्रश्न व उत्तरें'* या पुढल्या प्रकरणांत दिली आहे.

पहिल्या १२ प्रश्नांचीं उत्तरें म्हणजेच 'श्रीरामचरितमानस' मुख्य कथा. हिचा प्रारंभ बालकांड दो. १२१ मध्यें होऊन उत्तरकांड दो. ५२ मध्यें महेशांनीं उपसंहार केला आहे. नंतर पार्वतीचे पुरवणी प्रश्न आणि काकभुशुंडीकथा व तिच्यांतील गरुडप्रश्न

यांनीं उत्तरकांड दो. १२२ पर्यंतचा भाग व्यापला आहे. १२३।१ पासून उपसंहार प्रकरण सुरूं होतें. ज्या क्रमानें संवादकथन सुरूं झालें त्याच्या उलट क्रमानें उपसंहार आहे. याप्रमाणें श्रीरामचरितमानसाच्या वैचित्र्याचें थोडें विवेचन केलें; **पण हें मुख्य वैचित्र्य नाहीं.**

श्रीतुलसीमानसाची सर्वांगीण अपूर्वता व मनोहरता शब्दांनीं दाखविणें म्हणजे 'दीपानें भास्कर दाखवणें' ठरेल; म्हणून पुढील अनेक प्रकरणांत मानसांतील विविधविध अपूर्वतेचे आश्चर्यचकित करून सोडणारे नमुने गवाक्षांतून येणाऱ्या दिनकर-करांसारखे दाखविले आहेत.

विचित्र कथा-प्रबंध हें मुख्य प्रकरण समाप्त.

अति विचित्र हरिचरिताला जे। रचिती, स्तुति मति करिता लाजे ॥
जय विचित्र मानस-कवि तुलसी!। मानस मानी समान तुलसी ॥

◆◆◆◆

५ : अद्भुत अपूर्व मानस-नमुने

श्रीमानस-गूढार्थ-चंद्रिका-प्रस्तावनेंतील हें *पांचवें मुख्य प्रकरण* असलें तरी मागील चार मुख्य प्रकरणांत मानसाची गूढता व चंद्रिकेची सुधामय प्रसन्नता दिसली नाहीं; त्याचा वचपा या पांचव्या प्रकरणांतील बारा प्रकरणें काढतील. या बारा प्रकरणांतील अत्यंत गूढ, अपूर्व व अद्भुत कला श्रीतुलसीमानस कंठगत केलें तरीसुद्धां समजत नाहीं. *राम जाणुं देती तो जाणे* । न घडे मति-विद्वत्ता-ज्ञानें ॥ सद्गुरु-राम-कृपेनें कळतें । मनमति-करिं जर देतिल कळ ते ॥ (प्रज्ञा.) पुढील १२ नमुन्यांपैकीं १० अपूर्व शोधच आहेत व त्यांतील पांच प्रस्तावना-तयारींतच श्रीरामगुरुकृपेनें कळ दाबल्यानेंच दिसले आहेत. अशा अद्भुत गोष्टी मानसांत असतील याची कल्पना गेल्या २५ वर्षांत आली नव्हती ! 'अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दे करानें ॥'

卐 卐 卐 ५।१ 卐 卐 卐

ग्रंथप्रतिज्ञा, प्रश्न व उत्तरें

प्रास्ताविक — हें शीर्षक पाहिल्यानें अर्थ कळणार नाहीं हें खरें, पण गोस्वामींची मानस-रचनाच अशी अति गूढ आहे ! श्रीरामचरित-मानसाच्या बालकाण्डांत प्रारंभापासून दो. ४३ पर्यंत ग्रंथकर्त्यानें ग्रंथकथनाची प्रतिज्ञा २२ वेळां केलेली आहे; तसेंच बावीस प्रश्नांच्या निमित्तानें उत्तरें देऊन बालकांडांतील रामचरिताच्या आरंभापासून उत्तरकांड उपसंहारापर्यंतची (दो. १२२ पर्यंत) सर्व कथा सांगितलेली आहे. एकाच लेखकानें कथा-चरित्रादि कथनाची प्रतिज्ञा २२ वेळां करण्यांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे असें अंतःस्फूर्तीनें खात्रीपूर्वक वाटल्यामुळें संशोधनास प्रारंभ झाला; रामगुरुकृपा प्रकाश पाडीत राहिली व निष्कर्ष निघाला कीं २२ प्रश्नांनीं अपेक्षित असणाऱ्या २२ कथा वगैरे सांगण्याच्या त्या बावीस प्रतिज्ञा आहेत.

(क) मानसराजहंस पं. त्रिपाठीजी '***मानसप्रसंग***' ग्रंथांत पृ. ४४८ वर म्हणतात कीं प्रतिज्ञा वीस आहेत; पण प्रत्यक्ष मानसांत गोस्वामींनींच केलेल्या प्रतिज्ञा २२ आहेत हें पुढें कोष्टक रूपानें दिसेलच. त्याच ग्रंथांत त्रिपाठीजींनीं पृ. ३७०–३७३ मध्यें प्रश्नांची संख्या (भरद्वाज २, पार्वतीचे पहिले १२, पुन्हां ६, नंतर गरुडाचे ५ व पुन्हां ७ =) ३२ दाखविली आहे. मानसपीयूषमध्यें प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या टीकेंत २४ दाखविली आहे; आणि रामचरिताचे वीस अंश कल्पून रामसुयशजलाच्या गुणांशीं त्यांचा बादरायण संबंध दाखवितांना प्रश्नांची संख्या वीस झाली आहे. पार्वतीनें शंकरांस विचारलेल्या १० व्या प्रश्नाचें जें उत्तर म्हणून दाखविलें (पृ. ३७४ पासून) तें

परिशिष्ट भागांत गरुडानें विचारलेल्या पांचव्या प्रश्नाचें उत्तर आहे. पार्वतीच्या १२ प्रश्नांचीं उत्तरें उत्तरकाण्ड दो. ५१ अखेर समाप्त झालीं आहेत असें तेहि अन्यत्र म्हणतातच ! यावरून स्पष्ट दिसतें कीं जिथें जसें सोयीचें ठरेल तसें जमवून कांहीं तरी नवीन अद्भुत भाव काढून लोकांना चकित करण्याची ही हातचलाखी आहे. **एकदं लेखकाची प्रसिद्धि झाली कीं त्यानें एरंडाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलें तरी तें पचलें असा जनस्वभाव आहे.**

२. प्रथम प्रश्न किती तें पाहूं — भरद्वाजांनीं याज्ञवल्क्यांस प्रथम दोन प्रश्न विचारले. त्यावर याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें कीं,

करि संशय ऐसेच भवानी / **महादेव विस्तृत वाखाणी** ॥ (१।४७।८)

म्हणजेच भरद्वाजांच्या प्रश्नांचा अन्तर्भाव पार्वतीच्या प्रश्नांत झाला. (क) पार्वतीनें बालकाण्डांत बारा प्रश्न विचारले व त्यांचीं उत्तरें उत्तरकाण्ड दो. ५१ अखेरपर्यंत दिलीं गेलीं. पार्वतीच्या शंकेचें निरसन करून झाल्यावर तिनें पुन्हां प्रार्थना केली तेव्हां तिच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास आरंभ करतांना शंकरांनीं उपक्रम केला तो असा :—

सोरठा — **श्रुणु शुभ कथा भवानि रामचरितमानस विमल ।**
जी भुशुंडि वाखाणि । **ऐके खगनायक गरुड** ॥ (१।१२० म

त्या प्रश्नांच्या उत्तरांच्या रूपानें सर्व कथा सांगून झाल्यावर शंकर उपसंहार करतात. तो असा :—

उमे ! *कथा सब* **रुचिर वर्णिली ।** ***भुशुंडिनें जी*** **गरुडा कथिली** ॥ ६ ॥
कथित रामगुण वर्णुनि कांहीं । ***सांगूं काय भवानि अतांही*** ॥ ७ ॥ (७।५२)

जी कथा सांगण्याचा उपक्रम केला होता ती सर्व सांगितली असा उपसंहार शंकरांनीं केल्यानंतर पार्वती म्हणाली नाहीं कीं माझ्या अमुक अमुक प्रश्नाचें उत्तर राहिलें आहे इत्यादि. उलट शंकरांनींच सुचविलें कीं तूं विचारलेल्या **' कथा सब '** (वर चौ. ६ पाहा.) सांगून झाल्या आतां आणखी काय सांगूं ?

तेव्हां पार्वतीनें ६ नवे प्रश्न विचारले; त्यांतील तीन प्रश्नांचीं उत्तरें शंकरांनीं दिलीं. चौथ्याचें उत्तर काकभुशुंडीच्या मुखानें दिलें गेलें असलें तरी तो सर्व संवाद शंकरांनींच सांगितला आहे. दोन प्रश्न गरुडाच्या पहिल्या चार प्रश्नांत अंतर्भूत झाले आहेत. म्हणजे १२ + ४ + ४ = २० प्रश्न झाले. *ज्ञान भक्तिभेद* व *सप्तप्रश्नात्मक* एक प्रश्न असे *दोन प्रश्न* नंतर गरुडानें सुटे सुटे विचारले आहेत; असे हे एकंदर बावीस प्रश्न आहेत; हें पुढील कोष्टकांत दाखविलें आहे. या बावीस प्रश्नांच्या उत्तरांच्या कथा कोठपासून कोठपर्यंत हेंहि त्या कोष्टकी तुलनेंत दिसेल.

पार्वतीनें प्रथम विचारलेल्या बारा प्रश्नांतील पहिल्या आठ प्रश्नांच्या उत्तरांनींच सर्व प्रगट रामचरित्रवर्णन व्यापलें आहे. शेष चार प्रश्नांत तीन प्रश्न केवळ तात्त्विक

आहेत त्यांचीं उत्तरें व शेवटच्या बाराव्या प्रश्नाचें उत्तर कथेच्या अनुषंगानें चरित्र-वर्णनांत दिलें गेलें आहे. कोष्टकी तुलनेंत प्रश्न दिले असले तरी जागेच्या अभावीं संक्षिप्त दिले आहेत; म्हणून येथें प्रथम प्रश्न व त्यांच्या उत्तरांचीं स्थानें स्वतंत्र देणें योग्य.

पार्वतीनें बालकाण्डांत विचारलेले १२ प्रश्न; यांतच भरद्वाजांच्या प्रश्नांचा अन्तर्भाव होतो.

पार्वतीचे पहिले बारा प्रश्न (बालकाण्ड)

क्रम	विचारलेला प्रश्न	उत्तर कोठपासून कोठपर्यंत
१	प्रथम विवंचुनि वदा कारणहि । ब्रह्म अगुण कां धरि वपु सगुणहि ॥ (११०।४)	११६।६—१२०।३
२	प्रभु मग वदा राम-अवतारा ॥ (११०।५)	११२१।१—११९२।—
३	पुढें बालचरिताहि उदारा (वदा) ॥ (११०।५)	११९३।१ — १२०५
४	वदा जानकिस कशी विवाही ॥ (११०।६)	१२०६।१—बालकाण्ड-समाप्ति
५	त्यजि राज्या त्या दूषण कांहीं ॥ (११०।६)	संपूर्ण अयोध्याकांड.
६	बसुनि वनीं कृत चरित्र पार न । वदा नाथ हत केवीं रावण ॥ (११०।७)	अरण्यकाण्डापासून लंकाकांडसमाप्तिपर्यंत.
७	राज्यीं बसुनी कृत बहु लीला । वदा सकल शंकर सुखशीला ॥ (११०।८)	उत्तरकाण्डारंभापासून उत्तरकाण्ड दो. ३२।२पर्यंत.
८	वदा कृपाकर कृत कसें रामें आश्चर्यास । गत सप्रज रघुवंशमणि कैसे निजधामास ॥ ११० ॥	७।३२।३—५१ अतिगूढार्थानें दिलें आहे.
९	मग तें तत्त्व वदावें विवरुनि । यद्विज्ञानीं ज्ञानि मग्न मुनि ॥ (१११।१)	७।३२।३—७।३५; ७।४२—७।४६; ७।५२।१—५ उपसंहार.
१०	ज्ञान भक्ति विज्ञान विरागा । सकल सांगणें सहित विभागां ॥ (१११।२)	३।१४।५ ते ३।१७।१ (७।६६।३ पाहा).
११	रामरहस्यां अनेक अपरां । प्रभु ! अति विमल विवेकी विवरा ॥ (१११।३)	अरण्यकाण्डापासून लंका-कांडसमाप्तीपर्यंतचीं रहस्यें,
१२	नाथ ! न जें मज पुसतां आलें । ठेवुं नये तें गुप्त दयाळें ॥ (१११।४)	७।२५।६—८ व गूढ सीता-परित्याग व भूमिप्रवेश.

हे पार्वतीचे पहिले बारा प्रश्न आहेत.

पार्वतीनें उत्तरकाण्डांत सहा प्रश्न विचारले ते त्याच क्रमानें खालीं दिले आहेत व त्यांच्या उत्तराचा क्रम निराळ्या कोष्टकांत दिला आहे.

पार्वतीचे उत्तरकांडांतील प्रश्न

क्रम	विचारलेला प्रश्न	उत्तर-क्रम	उत्तर कोठपासून कोठपर्यंत
१	ती हरिभक्ति काक कशि पावे। (५४।८)	१६	७।७४।१—७।९३।८
२	नाथ वदा कारण कवण मिळण्या काकशरीर। (दो. ५४।–)	१७	७।९५।४—११२ रा.
३	सुंदर हें प्रभुचरित पुनीत। कुठें कृपालु वायसा प्राप्त ॥ (५५।१)	१८	७।११३।१—११४।१५
४	कसें श्रुतहि आपण मदनारी। सांगा मज अति कौतुक भारी ॥ (५५।२)	१३	७।५६।१—५८।१
५	गरुड महाज्ञानी गुणराशी। ...काकापाशीं ॥ कवण हेतु...कथा श्रवण करि ॥ (५५।३–४)	१४	७।५८।२—६२ रा.
६	सांगा केविं घडे संवाद। तो हरिभक्त काक उरगाद ॥ (५५।५)	१५	७।६२ म—७३ म.

सूचना —कथासंगतीच्या सोयीप्रमाणें पार्वतीचे यांतील पहिले तीन प्रश्न पाठीमागून घेतले आहेत व तिचे ४, ५, ६ हे प्रश्न आधीं घेऊन त्यांचीं उत्तरें शंकरांनीं दिलीं आहेत; नंतर प्रश्न १, २, ३ हे घेतले आहेत व त्यांतील पहिल्या प्रश्नाचें उत्तर भुशुंडी-मुखानें गरुडसंवादांत सांगितलें आहे व राहिलेले दोन प्रश्न २ व ३ यांचा अन्तर्भाव गरुडाच्या पहिल्या चार प्रश्नांत होतो; म्हणजे येथें *पार्वतीचे स्वतंत्र प्रश्न चारच*. या प्रश्नांच्या पुढील कोष्टकांतील अंक उत्तरांच्या एकंदर क्रमाचे निदर्शक आहेत.

गरुडाचे पहिले चार व नंतरचे दोन प्रश्न. (उत्तरकांडांत)

क्रम	प्रश्न	उत्तर कोठपासून कोठपर्यंत
१	तुम्हि......रघुनाथाचे प्रिय दासहि । कारण काय काय हा पावां । (९४।२-३) हा *पार्वतीचा* मागील *प्रश्न* ? रा	७।९५।४-११२ रा.
२	स्वामी ! रामचरित सर नामी । प्राप्त कुठें सांगा नभगामी ॥ (९४।४) हा पार्वतीचा *प्रश्न तिसरा* आहे.	७।११३।१-११४।१५
३	व्यापी तुम्हां न काळ अति कराल कारण कवण । तें मज वदा कृपाल...... (दो. ९४ रा)	७।११३ रा व ११४।१
४	प्रभु ! तव आश्रमिं येतां श्रम मम मोहहि ठार । नाथ कवण कारण सकल सांगा... ॥ (दो. ९४ म)	७।११३ म
५	ज्ञान भक्ति यांमधिं किति अंतर । सकल सांगणें प्रभो कृपाकर । (११५।१)	७।११५।१२-१२० रा
६	नाथ ! मला निज सेवक जाणुनि । सप्त प्रश्न मम सांगा वर्णुनि ॥ (१२१।२)	७।१२१।३-७।१२२ पूर्ण

याप्रमाणें पार्वतीचे पहिले १२ प्रश्न. नंतरचे तिचे स्वतंत्र ४ प्रश्न व गरुडाचे ४+२, प्रश्न = २२ प्रश्न आहेत. *प्रश्न किती, कोणते व कोणाचे याविषयीं शंका राहूं नये म्हणून हा विस्तार करावा लागला.* या प्रश्नांत कांहीं अद्भुतता नाहीं असें वाटणें साहजिक आहे. यापुढें प्रतिज्ञा व ती ज्या प्रश्नाचें उत्तरदर्शक आहे त्यांची क्रमशः यादी दिली आहे. (पान १४८, १४९, १५० पाहा)

सूचना —पुढील बावीस प्रतिज्ञा हिंदी मानसांत आहेत यांची रुजुवात वाचकांस करतां यावी म्हणून त्यांचा स्थाननिर्देश मुद्दाम केला आहे. गूढार्थचंद्रिका बाल. दो. ४३ च्या टीकेनंतर हिंदी व मराठी प्रतिज्ञांची तुलना कोष्टकरूपानें लिहिली आहे; तरीहि गीताप्रेस गोरखपूरच्या रामायणांत रुजुवात ध्यावी.

(१) **ल. ठे.** —पं. त्रिपाठीजी '*मानसप्रसंग*' पुस्तकांत म्हणतात कीं प्रतिज्ञा वीस वेळां केली आहे. पुढील प्रतिज्ञांपैकीं ३ री आणि १७ वी त्यांनीं सोडल्या आहेत. हें त्यांनीं हेतुपूर्वक केलें कीं चुकून घडलें तें त्यांचें त्यांस ठाऊक ! किंवा वाचकांनीं ठरवावें.

प्रतिज्ञा आणि उत्तरदर्शक प्रश्न

अनुक्रम	प्रतिज्ञा-स्थान	मागील अंतर	ग्रंथप्रतिज्ञा	प्रश्न	प्रश्नस्थान
१	बालकांड मं.श्लो. ७	ओळी १८	स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा भाषानिबन्ध...मातनोति ॥	प्रथम विवंचुनि वदा कारणहि । ब्रह्म अगुण कां धरि वपु सगुणहि ॥	१।११०।४
२	२।२	२२	तत्कृत विमल विवेक विलोचन । वर्णिन रामचरित भवमोचन ॥	प्रभु मग वदा राम-अवतारा ।	१।११०।५
३	१२।९	१५१	चतुर न म्हणवित मी कवि नाहीं । गात यथामति राम गुणांही ॥	पुढें बालचरिताहि उदारा ॥	१।११०।५
४	१३।९	१४	त्याच बळें रघुपति-गुण-गाथा । वदतों नमुनि रामपदिं माथा ॥	वदा जानकिस कशी विवाही ॥	११०।६
५	१४।१	४	यापरि करुनि मना बल अर्पण । करिनहि रघुपतिकथेस शोभन ॥	त्याजि राज्या त्या दूषण कांहीं ॥	११०।६
६	१४ म	१४	करा कृपा हरियश वदें... विनवीं वारंवार ॥	वसुनि वनीं कृत चरित्र पार न । वदा नाथ हत केवीं रावण ॥	११०।७
७	१५।८	१८	स्मरुनि शिवशिवा प्रसादपानें । वदतों रामचरित हर्षानें ॥	राज्यीं बसुनी कृत बहु लीला । वदा सकल शंकर सुखशीला ॥	११०।८

अनुक्रम	प्रतिज्ञा-स्थान	मागील अंतर	ग्रंथप्रतिज्ञा	प्रश्न	प्रश्नस्थान
८	२८।२	१३१	स्मरुनि नाम तें राम-गुण-कथा। वंदें नमुनि रघुनाथा माथा॥	वदा कृपाकर कृत कसें रामें आश्चर्यास। गत सप्रज...निजधामास॥	दो. ११०
९	२९ चं	२७	वर्णी रघुवर विशद यश– श्रवणें कलिमल नाश॥	मग तें तत्त्व वदावें विवरुनि। यद्विज्ञानीं ज्ञानि मग्न मुनि॥	११११
१०	३०।२	२	त्या संवादा वदुं विस्तारुनि। ऐका सुजन सकल सुख मानुनि॥	ज्ञानभक्ति-विज्ञान-विरागा। सकल सांगणें सहित विभागां॥	१११।२
११	३१।२	१२	ती करीन मी भाषाबद्धहि। जिनें होइ मम मनीं प्रबोधहि॥	रामरहस्यां अनेक अपरां। प्रभु! अति विमल विवेकीं विवरा॥	१११।३
१२	३१।३	१	ज्ञानबुद्धिबल अंतरिं जेवीं। प्रेरी हरि मज वदेन तेवीं॥	नाथ न जें मज पुसतां आलें। ठेवुं नये तें गुप्त दयाळें॥	१११।४
१३	३१।४	१	भ्रम संदेह मोह निज हरणी। करीं कथा भवसरितातरणी॥	कसें श्रुतहि आपण मदनारी। सांगा मज अति कौतुक भारी॥	७।५५।२
१४	३३।१-२	३२	उमा प्रश्न करि जशा प्रकारें...। सकल हेतु तो वदुं...बनवुनि॥	गरुड महाज्ञानी गुणराशी...काकापाशीं। कवण हेतु तरि...कथा श्रवण करि॥	७।५५।३-४
१५	३४।३	११	नमुनी सादर शिवास माथा। वर्णीं विशद राम-गुण-गाथा॥	सांगा केविं घडे संवाद। दो हरिभक्त काक उरगाद॥	५५।५

अनुक्रम	प्रतिज्ञा-स्थान	मागील अंतर	ग्रंथप्रतिज्ञा	प्रश्न	प्रश्नस्थान
१६	३४।४	१	संवत सोळाशें एक्तीसां । करूं कथा नमुं हरिपदिं शीसा ॥	ती हरिभक्ति काक कशि पावे । विश्वनाथ हें मज सांगावें ॥	५४।८
१७	३५।६	१२	विमल कथेच्या कृत आरंभा । श्रवत विनाश काममददंभा ॥	रामपरायण बोधरत गुणागार...। नाथ वदा कारण कवण मिळण्या काक... ॥	७।५४।–
१८	३५।१३	७	वदूं कथा ती सुखदा सुंदर । श्रवा सुजन मन लावुनि सादर ॥	सुंदर हें प्रभुचरितं पुनीत । कुठें कृपाल वायसा प्राप्त ॥	५५।१
१९	३५	२	जसं मानस...जगीं प्रचारा हेतु । तो प्रसंग वदतों सकल स्मरुनि उमावृषकेतु॥	व्यापी तुम्हां न काळ अति कराल कारण कवण । तें मज वदा कृपाल ज्ञानशक्ति कीं योगबल ॥	७।९४ रा
२०	३६।२	२	करी मनोहर मतिअनुसारहि । सुजन सुधारुन सुमनें ध्यालहि ॥	प्रभु तव आश्रमिं येतां भ्रम मम मोहहि ठार । नाथ कवण कारण सकल सांगा प्रेमें फार ॥	७।९४ म
२१	४३ रा	१०	गणुनि सुजल गुण...मना घालुनी स्नान । स्मरुनि भवानी शंकरां वदे कथा कवि छान ॥	ज्ञान भक्ति यांमधिं किती अंतर । सकल सांगणें प्रभो कृपाकर ॥	७।११५।१
२२	४३ म	२	रघुपति पदाब्ज...पावोनियां प्रसाद ॥ अतां वदूं द्वय मुनिवरीं मिलन सुभग संवाद ॥	नाथ ! मला निज सेवक जाणुनि । सप्त प्रश्न मम सांगा वर्णुनि ॥	७।१२१।२

(२) या बावीस प्रतिज्ञा मानसांत ज्या ठिकाणीं आहेत तेथें तेथें पूर्वापर संबंधाशीं त्या अगदीं सुसंगत आहेतच पण आश्चर्य हें कीं ज्या प्रतिज्ञेचा संबध ज्या प्रश्नाशीं दाखविला त्या प्रश्नाचें उत्तर कथन करण्याविषयीं ती प्रतिज्ञा आहे. उदा. पहिली प्रतिज्ञा ' निर्गुण ब्रह्म सगुण देहधारी कां होतें ' या प्रश्नाच्या उत्तराचें कथन करण्याविषयीं आहे. दुसरी प्रतिज्ञा रामावताराच्या कारणांचा इतिहास सांगण्याविषयीं आहे. तिसरी प्रतिज्ञा, रामजन्म व बालचरित सांगण्याविषयीं आहे. याप्रमाणें इतर प्रतिज्ञांचें समजावें. २२ प्रतिज्ञा २२ प्रश्न व त्यांचीं २२ उत्तरें यांची तुलना गूढार्थचंद्रिकेंत बाल. दो. ४३ रा च्या टीकेनंतर स्पष्ट करून दाखविली आहे; तत्प्रीत्यर्थ छापील सुमारें २२ पृष्ठें खर्चीं पडतील.

(३) ही तुलना करतांना निःसंशयपणें असें दिसून आलें कीं प्रतिज्ञा व प्रश्न यांतील खुणेचे शब्द त्या त्या प्रश्नांच्या उत्तरांत सांपडतात. ज्या तुलनांत फार विस्तार करावा लागला नाहीं अशा तीन प्रतिज्ञा, प्रश्न व उत्तरें यांच्या तुलना नमुन्यासाठीं पुढें दिल्या आहेत. त्या पाहिल्यानंतर प्रत्येक रसज्ञ वाचकाच्या तोंडून उद्गार निघतील कीं हें कमालीचें आश्चर्य आहे ! अशी काव्यरचना पाहण्यास सांपडणें अशक्य !

(४) वरील कोष्टकी तुलनेंत तिसऱ्या कोष्टकांत जे अंक दिले आहेत त्यांवरून एक कल्पनातीत शोध लागला आहे. त्याविषयीं टीकेंत आवश्यक तेवढें स्पष्टीकरण साधार केलें आहे. (क) पहिली प्रतिज्ञा ग्रंथारंभापासून १८ व्या ओळींत आहे. इतरांतील अंतर तिसऱ्या कोष्टकांत दिलें आहे. त्याचें अवलोकन केल्यावर दिसतें कीं कुठें लागोपाठ तीन ओळींत तीन वेळां प्रतिज्ञा आहेत तर कुठें ९०,१३१,१५१ ओळींचें अंतर आहे. असें कां हा प्रश्न टीका लिहितांना पुढें आला, त्या दिवशीं (९।१।१९५४) टीकेंत केलेला खालील उल्लेख नंतर आढळला.

" असें करण्यांत हेतु काय तो अद्याप ध्यानीं आला नाहीं म्हणून प्रतिज्ञा व प्रश्न यांचें लेखन पुढील पृष्ठावर केलें आहे; त्यांच्या तुलनेंत कदाचित् हेतु सांपडण्याचा संभव आहे. या लेखकास न सांपडला तरी कदाचित् भविष्यकाळीं कोणा वाचकास शोध लागेलही. "

दुसऱ्या दिवशींच प्रतिज्ञा व प्रश्न क्रमानें लिहितां लिहितां हेतूचा सुगावा लागला व कोडें उलगडण्यास लागणारे ग्रंथाधारही २।३ दिवसांतच सांपडले !

पूर्व घटनेपासून पुढील घटनेपर्यंतच्या काळाचें निदर्शन दोन प्रतिज्ञांतील अंतराच्या अंकांनीं कलेलें आहे. कुठें वर्षें, कुठें शत वर्षें, कुठें सहस्र वर्षें, इत्यादि प्रकारें घेऊच इतिहासाशीं समन्वय होतो. कालगणनेंत विविध ग्रंथांत मतभेद असल्यानें तुलसीदासांनीं स्पष्ट उल्लेख कशाचेहि केलेले नाहींत; पण आपलें स्वतःचें मत अशा अद्भुत काव्यरचनायुक्तीनें सुचविलें आहे. कोणी मान्य करा न करा ! यापेक्षां अधिक सांगण्यास प्रस्तावनेंत जागा नाहीं.

नमुना १ ला—प्रतिज्ञा व प्रश्नोत्तर-तुलना. प्रतिज्ञा ६ वी प्रश्न ६ वा.

प्रतिज्ञा :— ***विमल कीर्ति*** **कविता सरल सुज्ञ आदरिति तीस ॥**
सहज वैर विसरुनि रिपु परिसुनि वानिति जीस ॥ १४ रा ॥
तें न होइ विण विमल मति मम मतिबल लवभार ॥
करा कृपा *हरियश वदें* विनवित वारंवार ॥ १४ म ॥

अशी ही संपूर्ण प्रतिज्ञा आहे.

प्रश्न —वसुनि वनीं कृत चरित्र पार न। वदा नाथ हत केवीं रावण ॥ (१।११०।७)

(१) या प्रश्नानें *अरण्यकाण्डारंभापासून रावणवधापर्यंतचा कथाभाग व्यापला आहे.* अरण्यकाण्डारंभींचें वचन आश्चर्यचकित करणारें आहे.

पुरनर भरतप्रीतीवर्णन। अनुपम मतिअनुरूप सुशोभित ॥
आतां प्रभुचरिता अति पावन। श्रुणु! कृत वनिं सुरनर मुनिभावन ॥

श्रुणु! हें संबोधन शंकरांनीं *उमेला* उद्देशून वापरलें आहे, कारण प्रश्न *उमेनें* केलेला आहे.

प्रतिज्ञेंत — 'मम मतिबल लवभार', 'विमल' व 'हरि' शब्द आहेत. **उत्तरांत**—'मतिअनुरूप', सुशोभित' व 'प्रभु' शब्द आहेत. **प्रश्नांत**—'वसुनि वनीं कृत चरित्र' **उत्तरांत**—'प्रभुचरिता वनिं कृत' **प्रतिज्ञेंत**—'विमलकीर्ति', '*हरियश वदें*' आहेत तर **उत्तरांत**- (अरण्य. ६ रा.) 'कलिमलशमनदमन मन *रामसुयश* सुखमूल.' यांत *हरियश*च वर्णिलें आहे.

(क) हरि-यश = वानरांचें-कपींचें यश—कीर्ति असाहि अर्थ होतो. हा अर्थ उत्तराच्या शेवटीं रावणवधानंतरच आहे—श्रीरघुवीरच रावणवधानंतर (लंका. १०६ छंद) कपींना म्हणतात—

'मम सहित *शुभही कीर्ति तुमची गाति* जे प्रेमें अती।
संसारसिंधु *अपार* पार किं नर विनाश्रम पावती' ॥

येथें **उत्तरांत**—ही तुमची (= कपींची) शुभ कीर्ति गाति' असें आहे; तर **प्रतिज्ञेंत** '*विमल कीर्ति हरि (कपि) यश वदे*' असे शब्द आहेत. **प्रश्नांत**—, कृतचरित्र *पार न* (= अपार) आहे, **उत्तरांत** 'अपार' शब्द आहे. हिंदींत दोन्ही ठिकाणीं 'अपार'च आहे.

(**ख**) *वदा नाथ हत केवीं रावण* — हा प्रश्नांतील एक भाग आहे; त्याचें उत्तर वरील लंका. १०६ छंदांतच पुढल्या दोन चरणांतच आहे—'केलें सुखी त्यां वाक्सुधें *तुमचे बळें रिपु मारले*। पावे बिभीषण राज्य *तुमचें सुयश* जगतीं पसरलें ॥ तुमचें सुयश = कपींचें सुयश. प्रतिज्ञेंत हरियश = कपियश आहेच.

(**ग**) **विनवित वारंवार** — असें **प्रतिज्ञेंत** म्हटलें आहे तर वरील छंदाच्याच दोह्यांत (१०६) पाहा :—'पुनः पुन्हां नमिती शिर सकल धरिती पदकंज' हें उत्तरांत म्हटलें.

(२) प्रतिज्ञा व प्रश्न यांतील साम्य हें असें उत्तराच्या आदिअंतीं भरून ठेवलें आहे ! यापेक्षां आणखी किती साम्य पाहिजे ? *पाहिजे असल्यास घ्या* :—

' सहज वैर विसरूनि रिपु परिसुनि वानिति जीस ' अशी ' विमल कीर्ति ' ॥

(१।१४ रा)

असें प्रातिज्ञेंत आहे. रावणाचा वध ज्या रामानें केला त्या रामाचीच कीर्ति रावणाची पट्टराणीच वर्णन करते. ज्यांनीं तिला विधवा केलें, सर्व सत्ता नष्ट केली, तिचे सर्व पुत्र मारून तिचा निर्वंश केला, असें सहज वैर असून मंदोदरी रावणवधानंतर म्हणाली, ' अहह ! नाथ ! रघुनाथसम कृपासिंधु नहिं आन ' (६।१०४) दो. १०४ पूर्वीच्या चौपाया पाहाव्या, मंदोदरीविलाप सर्वच पाहावा !

येथें जसें प्रतिज्ञा, प्रश्न व उत्तर यांचें तंतोतंत साम्य आहे तसेंच सर्व ठिकाणीं आहे.

नमुना २ रा — प्रतिज्ञा १३ वी व प्रश्न १३ वा

प्रतिज्ञा—भ्रम संदेह मोह निज हरणी । करूं *कथा भवसरितातरणी* ॥

प्रश्न — सुंदर हें *प्रभुचरित* पुनीत ।...*कसें श्रुतहि* आपण मदनारी । सांगा मज अति कौतुक भारी ॥ कसें श्रुत काय ? हें स्पष्ट करणें जरूर आहे म्हणून वरील चरण घ्यावा लागला. या प्रश्नाचें उत्तर उत्तरकांड ५६।१ पासून ५८।१ पर्यंत आहे. त्यांत :—

उत्तरांत — मी जशी **कथा** *श्रुता* **भवमोचनि** (७।५६।१) **ल. ठे. — प्रश्नामध्यें 'कसें श्रुत'** इतकेच शब्द असून उत्तरामध्यें ' *जशि* **कथा** *श्रुता* ' असे शब्द वापरले ते प्रतिज्ञेंतलि **कथा** शब्दाशीं साम्य दाखविण्यासाठींच ना ? ' मीं श्रुत कसें ' असें म्हणतां आलें असतें व प्रश्नाच्या दृष्टीनें–संबंधानें तसेंच म्हणावयास पाहिजे होतें.

(क) **प्रश्नामध्यें** ' *भवमोचन* ' किंवा त्या अर्थाचा एकही शब्द नसतां उत्तरांत **' भवमोचनि '** शब्द वापरला तो प्रतिज्ञेंतलि **' भवसरितातरणी '**शीं साम्य दाखविण्यासाठींच ! प्रश्नानुसार ' मीं श्रुत कसें उमे तुज वदतों ' असें म्हणणेंच योग्य ठरलें असतें; पण त्यानें प्रतिज्ञेशीं–संबंध कसा निश्चित करतां आला असता ?

(ख) **प्रश्नांत** ' सांगा मज ' आहे ' *तो प्रसंग वदुं* सुमुखि सुलोचनि ' असें उत्तरांत म्हटलें. **प्रश्नांत** ' अति *कौतुक* भारी ' हे शब्द आहेत, व उत्तरांत

सुंदर गिरि-वन-सरित-तडागीं । *निरखित* कौतुक *फिरे विरागी* ॥

असें म्हटलें आहे.

२ **' भ्रमसंदेहमोह निजहरणी '** असें प्रतिज्ञेंत आहे. **उत्तरांत** ' मायाकृत गुण-दोष अनेकहि । *मोह मनोज आदि अविवेकहि* ॥ त्या गिरि संनिध कधिं न फिरकती. (७।५७।२-३) असें आहे.

(३) प्रतिज्ञा व प्रश्न यांतील अनेक शब्द व वचनें यांची अशी सांगड उत्तरामध्यें घातलेली पाहिली म्हणजे परमाश्चर्य वाटतें. (क) प्रथम घेतलेल्या उदाहरणाचा

कथाभाग अनेक कांडें व्यापणारा म्हणून तें उदाहरण घेतलें. दुसरें अगदीं त्याच्या उलट दोन दोह्यांचच अगदीं अल्प कथा असलेलें घेतलें. **कौतुक शब्द दुसऱ्या कोणत्याही प्रश्नांत किंवा उत्तरांत नाहीं.**

नमुना ३ रा – प्रतिज्ञा १४ वी व प्रश्न १४ वा

प्रतिज्ञा — उमा प्रश्न करि जशा प्रकारें। शंकर वदले जसं विस्तारें ॥
सकल हेतु *तो* **वदुं विस्तारुनि।** *कथा* **प्रबंधा विचित्र बनवुनि ॥**

सूचना — प्रतिज्ञा दुसऱ्या चौपाईतच आहे पण 'तो' शब्दाचा संबंध पूर्व चौपाईशीं असल्यानें ती घेणें आवश्यक आहे.

प्रश्न — **गरुड महाज्ञानी गुणराशी। हरिसेवक अति निकट निवासी ॥**
काकापाशीं कवण हेतु **तरि। त्यजुनि निकर मुनि** *कथा* **श्रवण करि ॥**

उत्तर — **कथित सकल इतिहासा पार्वति। कसा कदा मी गत काकाप्रति ॥**
अतां *कथा* **ती श्रुणु** *तो* हेतू। ***काकनिकट* गत खगकुलकेतू** ॥ (७।५८।१-२)

(१) **ल. ठे.** —**हेतु** शब्द प्रतिज्ञा, प्रश्न व उत्तर या तिन्हींत आहे; *हा शब्द इतर कोणत्याहि प्रश्नांत किंवा प्रतिज्ञेंत नाहीं.* कथा शब्दसुद्धां तिन्ही ठिकाणीं आहे.

(२) *प्रतिज्ञेंत* —**' कथाप्रबंधा *विचित्र* बनवुनि '** –
उत्तरांत —**रामचरित *विचित्र*विध नाना ॥ प्रेमानें सादर करि गाना ॥**

' विचित्र ' शब्द इतर कोणत्याहि प्रतिज्ञेंत नाहीं.

(३) **गरुड महा*ज्ञानी* गुणरासी।** *हरिसेवक* **अति निकट निवासी ॥**
असें *प्रश्नांत* **म्हटलें.** *उत्तरांत* **' काकनिकट गत '**
' *ज्ञानी* *भक्त शिरोमणि* **त्रिभुवनपतिचें यान ॥**
तया मोहि माया नरपामर करिति गुमान ॥ (७।६२।२)

असें उत्तरांत आहे. महाज्ञानी = ज्ञानी शिरोमणि; हरिसेवक = भक्त व अतिनिकट-निवासी = त्रिभुवनपतिचें यान '

हें उदाहरण मागल्याच्या पुढचेंच घेतलें. अशाच प्रकारें प्रतिज्ञा व प्रश्न यांतील खुणेचे शब्द उत्तरांत व क्वचित प्रतिज्ञा व प्रश्न यांतच भरलेले आहेत. प्रत्येक प्रतिज्ञेंतील शब्दांत जी विविधता आहे ती केवळ द्विरुक्तिदोष टाळण्यासाठीं नसून वर दर्शविलेल्या हेतूस्तव आहे.

प्रतिज्ञा बालकाण्डाच्या आरंभापासून ४३ दोह्यांतच आहेत. प्रश्न बालकाण्डाच्या ११०–१११ या दोन दोह्यांत; व उत्तरकांडांत ५४।५५; ९४, ११५ व १२१ या दोह्यांत आहेत. प्रश्नांचीं उत्तरें बालकाण्ड १२१ पासून उत्तरकाण्डसमाप्तिपर्यंत विभागलेलीं आहेत; असें असतां जेथें प्रतिज्ञा आहेत तेथें पूर्वापर संगतींत न्यूनता येऊं न देतां हे असे खुणेचे शब्द परस्परांत भरून ठेवणारी काव्यप्रतिभा कशी असेल? शेकडों पारायणें करून आम्हांस संदर्भवचनें शोधण्यास किती तरी खटपट करावी

लागते व अंदाज चुकतात! (क) 'ग्रंथप्रतिज्ञा, प्रश्न व उत्तरें' या शीर्षकाचा अर्थ आतां वाचकांच्या ध्यानीं येऊन यांत अपूर्व अद्भुतता काय? असें विचारण्याची वृत्ति संतृप्त झाली असेल. (ख) विस्तारभयास्तव जास्त नमुने देतां येत नाहींत. गूढार्थ-चंद्रिकेंत सर्व प्रतिज्ञा—प्रश्नोत्तरांची अशीच तुलना केलेली आहे. बाल. दो. ४३ रा च्या टीकेनंतर आहे.

हें प्रकरण प्रथम घेतल्यानें मागल्या प्रकरणाशीं सांधा सहज जुळला. प्रश्न किती, कोणते, कोणाचे, कोठें आहेत; व त्यांच्या कथा मानसांत कोठें आहेत ही आवश्यक मार्गदर्शक माहिती देतां आली व 'अद्भुत अपूर्व मानस नमुने' यांचा एक प्रकार सहज दाखवितां आला.

या प्रकरणाचा व पुढील प्रकरणाचा अपूर्व अद्भुत रचना-कला इतकाच संबंध असला तरी मानस-पाठकांस नित्य वाचनांत त्यामुळें अधिक आनंद मिळूं शकेल; व मानसाकडे पाहण्याची एक शोधक दृष्टि सहज मिळेल. श्रीतुलसीदासांचे कांहीं विशिष्ट संकेत हें पुढील प्रकरण आहे.

मानसगूढ-रहस्यां प्रगटवि । रघुवर गुरुवर कृपा नित्य नवि ॥
उकलुनि गूढां तनुतरु फुलवित । काळ-वेळ-तनुभाना भुलवित ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।२ 卐 卐 卐

'श्रीतुलसी-संकेत अद्भुतहि'

'अद्भुत अपूर्व मानस नमुने' यांत श्रीतुलसींच्या कांहीं अद्भुत संकेतांचा समावेश झाला आहे. या लेखांत जे नमुने दिले आहेत ते मुख्यतः विशिष्ट संख्येचा सापेक्ष उपयोग हेतुपूर्वक केल्याचे आहेत.

नमुना १ ला (१।११) — '*मणिमाणिकमुक्ता* छबि जैसी' असा उपक्रम केला आणि 'होति काव्य *मुक्तमणि* चारू' असा त्या वर्णनाचा उपसंहार केला. त्या ११ व्या दोह्यांत **नवरत्नसूचक ९ चौपाया आहेत.**

नमुना २ रा (१।१३) — या तेराव्या दोह्यांत १० चौपाया आहेत, त्या सहेतुक सापेक्ष आहेत. 'देह धरुनि कृत चरित्र अनंत' असें भगवंताच्या अवतारांचें वर्णन त्यांत आहे. **या १० चौपाया दशावतारसूचक आहेत.** (क) अवतार घेणाऱ्या भगवंताचें वर्णन १० विशेषणांनीं !

'एक अनीह अरूप अनाम । अज सच्चिदानंद परधाम ॥
व्यापक विश्वरूप भगवंत । देह धरुनि कृत चरित्र अनंत ॥

नमुना ३ रा (१।१५) — या दोह्यांतील सर्व चौपायांचा संबंध शंकरांशीं आहे, म्हणून **एकादश रुद्र—सूचनार्थ चौपायांची संख्या ११ आहे.**

' नमूं शारदा नी सुरसरिता । युगल पुनीत मनोहर चरिता ॥
मज्जनपानिं पाप हरि एका । श्रवाण कथनीं दुजि हरि अविवेका ॥

श्रवणानें व कथनानें अविवेक हरण करणारी शारदा = श्रीरामचरितमानस; त्याचे मूळ जनक शंकर आहेत; व श्रीरामचरितमानस त्यांच्या मानसांत आहे. सुरसरिता शिरावर आहे; अशा रीतीनें सर्व चौपायांत शंकरांचा संबंध आहे म्हणून चौपाया-संख्या एकादशरुद्रसूचक ११ आहे. ' जर हर गौरिपसाय ' असा शंकरांचा संबंध उपसंहारांतसुद्धां आहेच. (क) दुसरें नवल म्हणजे महेश, भवानी, *गिरिजा*-हर; महेश, उमेश, शिव-शिवा, शिव, आणि हर-*गिरिजा* **हे शब्दही ११ च आहेत.** ज़्याप्रमाणें सीताराम अभिन्न त्याप्रमाणेंच शिवभवानी अभिन्न हेंहि सुचविलें गेलें.

नमुना ४ था (१।३२) — यांतील चौपायादिकांची रचना हा एक परम अद्भुत, अनुपम व अपूर्व काव्य-कलेचा मनोहर नमुना आहे. यांत *अनेक संकेतांचें ग्रथन एकाच रचनेंत केलेलें आहे.* (१) रामगुणगणांची—गुणग्रामांची—महती हा बाह्य—प्रगट विषय आहे. (२) मानसांतील २८ स्तुतिरूपी नक्षत्रमंडळांतील २८ स्तुतींची फलश्रुति स्तुतींच्या ग्रंथांतील क्रमानुसार यांत आहे. (३) प्रेमभक्तिप्राप्तीचा अथपासून इतिपर्यंतचा सर्व साधनमार्ग मानसांतलि क्रमानुसार आहे. (४) सात कांडांचे मुख्य विषय काण्डानुक्रमानें सुचविले आहेत. या चार गोष्टी एकसमयावच्छेदें साधल्या आहेत. या दोह्यांतील सर्व चौपायांची गूढार्थचंद्रिका पाहिल्यावर कोणीहि विचारवंत वाचक आश्चर्यानें थक्कच होईल. १४ चौपाया व एक दोहा यांवरील टीका छापील ३० पृष्ठें होईल ! (मानस-पीयूष-टीकेशीं मुद्दाम तुलना करून पाहावी).

नमुना ५ वा (१।३४।४—३५।७) — **कन्येचें नामकरण तेराव्या दिवशीं करावें हें सुचविलें आहे.**

संवत सोळाशें एक्तीसां । करूं कथा नमुं हरिपदिं शीसा ॥ ४ ॥
भौमवार नवमी मधुमासीं । येइ अयोध्यें *कथा प्रकाशीं* ॥ ५ ॥

श्रीगोस्वामीजींची रामकथारूपी अद्भुत कन्या संवत् १६३१ मध्यें चैत्र महिन्यांत नवमीला (रामजन्मदिनीं) मंगळवारीं प्रकाशांत आली -जन्मास आली. *प्रगट झाल्याचा उल्लेख पांचव्या* चौपाईंत आहे. ५,६,७,८ या चार चौपाया + ३४ व्या दोह्याच्या २ ओळी = ६ दिवस झाले व पुढील सातव्या चौपाईंत म्हणजे ६ + ७ = १३ व्या ओळींत त्या कथाकन्यकेचें नामकरण केलें आहे. कथा स्त्री आहे. ' रामचरितमानस ' *हिज* नामहि. ' **हिचें नांव रामचरितमानस हें जन्मापासून तेराव्या ओळींत सांगून कन्येच्या नामकरणाचें शास्त्र सुचाविलें.** याचेंच आणखी उदाहरण निराळ्या प्रकारें आहे तें पाहावें.

नमुना ६ वा (१।३९।११-१२) — **कीर्तिशरयूचें नामकरण तेराव्या पदामध्यें !**

हिंदी — "**चली सुभग कविता सरिता सो।**
राम बिमल जस जल भरिता सो॥ सरजू नाम"

म० – निघे सुभग कविता सरिता ती। राम विमल यश जल भरिता ती॥ शरयू नाम ...। (१।३९।११-१२) पदसंख्या १३ आहे, मोजून पाहावी. चली = 'निघे' या पदांत जन्म झाला व 'नाम' या तेराव्या पदांत नामकरण झालें. **कन्येचा नामकरण विधि तेराव्या दिवशीं करावा असें धर्मशास्त्र सांगतें; तेंच येथें सुचविलें आहे! गूढभावार्थ निदर्शनाचे संकेत अपूर्व, अद्‌भुत व मनोहर नाहींत काय?**

नमुना ७ वा (१।१९३।१-१९७।२) — क्षत्रियपुत्राचा नामकरणविधि तेराव्या दिवशीं करावा असें धर्मशास्त्र सांगतें (धर्मसिंधु पाहा.) तेंच यांत सुचविलें आहे. **श्रीरामचंद्रांचा नामकरणसंस्कार १३ व्या दिवशीं केला हें काव्यपंक्तींच्या संख्येनेंच सुचविलें आहे!** देश, कुल, रूढी आणि शास्त्र यांत भेद असल्यानें नामकरण कितव्या दिवशीं झालें हें शब्दांनीं वर्णन केलें नाहीं; पण *शास्त्रच मानावें असें स्वतःचें मत श्रीगोस्वामींनीं यांत ध्वनित केलें आहे.*

श्रीरामाचा जन्मदिवस ३० दिवसांचा झाला असें दो. १९५ मध्यें सांगितलें आहे; म्हणजेच त्याच्या पुढें बाराव्या ओळींत नामकरणाचा दिवस उजाडला पाहिजे; म्हणजेच जन्म झाल्याच्या वर्णनापासून ३० + १२ = ४२ व्या ओळींत नामकरणाचा दिवस आला पाहिजे.

(क) **प्रिय अति शिशुरुदनाला ऐकत। शीघ्र येति राण्या सब चालत॥**(१९३।१) यांत जन्म झाल्याचा उल्लेख आहे. १९३, १९४ दोह्यांच्या चौपाया ८ + ८, + ४ ओळी दोन दोह्यांच्या, + ८ ओळी १९५ च्या चौपायाच्या = २८ ओळी झाल्या. आतां १९५ वा

दो. — '**मासदिनांचा दिवस तो नुमजे मर्म कुणास।**
सहित रथा रवि थबकला निशा सभय येण्यास' ॥ १ ॥

पहिला दिवस मासदिनांचा = ३० दिवसांचा झाला हें येथें सांगितलें. या दोह्याच्या दोन ओळींनीं ३० दिवस पूर्ण झाले. *तीस ओळी झाल्या!* १९६ व्या दोह्याच्या एकंदर दहा (८ + २) ओळी = ४० झाल्या, १ + १० = ११ दिवस पूर्ण झाले. आतां पुढें पाहा.

कांहीं दिन या प्रकारिं पळले। रात्रदिवस जातां नहिं कळलें॥ १॥
नामकरण अवसरास जाणुनि। **बोलाविले नृपें ज्ञानी मुनि॥ २॥**

नामकरणाचा योग्य समय जाणून दशरथ राजानें ज्ञानी मुनि वसिष्ठांस बोलावलें. पहिला दिवस-द्योतक दोहा सोडून १२ व्या ओळींत हा उल्लेख आहे; म्हणजे १ + १२ = **तेराव्या दिवशीं नामकरण झालें हें ध्वनित केलें.**

लक्षांत ठेवण्यासारख्या अशा पुष्कळ मजा तुलसीमानसांत आहेत ! *वरील तिन्ही उदाहरणें नामकरणाविषयींच आहेत.* या तिन्ही ठिकाणीं काकतालीय न्यायानें हें सहज घडलें असें म्हणवेल काय ?

या कविसंकेताकडे लक्ष गेलें असतें तर नामकरण केव्हां झालें याविषयीं मानसटीकाकारांत मतभेद व वादविवाद झाले नसते ! पण 'तो जाणे ज्या जाणूं देतां' (२।१२७।३) 'हें रामवाल्मीकीसंवादांतलें वाल्मीकिवचन खोटें कसें होणार ! प्रभु रघुनाथ ज्याला जेवढें रहस्य जेव्हां जाणूं देतील तेवढेंच मानसरहस्य तेव्हां कळतें हें अगदीं खरें आहे.

नर-मति-गति मानसांत नाहीं । जर रघुपति न कृपेनें पाही ॥

नमुना ८ वा (१।१८६ – १८७।७) — *रामावताराविषयींची आकाशवाणी सात चौपायांत ! रामावतार सातवा.*

ब्रह्मदेवानें स्तुति केल्यानंतर 'होइ गभीरा नभगिरा हरणि शोक संदेह' (दो. १८६) असें सांगितलें आणि 'भिऊं नका मुनि सिद्ध सुरेश्वर' (१।१८७।१) पासून 'निर्भय आतां राहा देवगण' (१८७।७) पर्यंत सात चौपायांत, **सात ओळींत आकाशवाणीचें कथन आहे. रामावतार दशावतारांत सातवा म्हणून हा संकेत.**

सूचना — येथें तुलसीदास लेखक असते तर हा नमुना सातवा घेतला असता ! पण एवढा पोच या लेखकाच्या मंदबुद्धीस कोठला ! कच्च्या लेखनाच्या वेळीं हें सुचलेंच नाहीं ! पाठीमागून बदल करण्यांत अर्थ नाहीं ! हा सातवा नमुना घेतला गेला असता तर पुढला नमुनाहि यथार्थ झाला असता संख्येनें ! पण मतिमंद त्यास काय करणार !

नमुना ९ वा — (१।१८७।८ – ८८।१) *कृष्णावताराचा उल्लेख आठव्या ओळींत; आठवा अवतार !*

महेशांनीं मदनदहन केल्यावर त्याचा सर्वसाधारण परिणाम काय झाला हें सांगितलें आणि भोगी लोकांवर काय परिणाम झाला तें वर्णन करतात —

स्मरुनि कामसुख शोचति भोगी । होति अकंटक साधक योगी ॥ ८ ॥

नंतर कामसुखभोगी व्यक्तींत 'रति' मदनपत्नी भोगिशिरोमणि म्हणून तिचें वर्णन केलें व कामसुखाच्या आठवणी काढून शोक करणारांच्या वर्णनापासून *आठव्या* ओळींत वर्णन आहे कीं,

'**जैं यदुवंशिं कृष्ण-***अवतार* **। हरण्या होई महामहिभार ॥**' (८८।१)

भोगी अवतार कृष्ण आठवा, त्याचा उल्लेख भोगी लोकांच्या वर्णनापासून आठव्या ओळींत ! काकतालीय न्यायाची आठवण वाचकांस होऊं नये म्हणून असलेंच आणखी एक उदाहरण घेऊं.

नमुना १० वा (६।११०।२–७) लंकाकांडांत देव स्तुति करण्यास आल्यापासून साहाव्या ओळींत परशुरामाचा उल्लेख आहे; साहावा अवतार !

देव सदा **स्वार्थी ठाकले । वदति जणूं परमार्थी भले** ॥ २ ॥

मीन कमठ **सूकर नरहरी । वामन** *परशुराम* **व्हा तरी** ॥ ७ ॥

परशुराम साहावा अवतार म्हणून साहाव्या ओळींत उल्लेख !

(क) अशीं आणखीं उदाहरणें आहेत; पण तीन पुरे झालीं. परशुरामानें केलेली रामस्तुति ६ चौपायांतच (१।२८५।१ – ६) आहे ! त्यांनीं सातव्या चौपायींत (सातव्या म्हणजे) रामावताराचा जयजयकार केला व ते तपासाठीं निघून गेले ! (१।२८५।७)

नमुना ११ वा — (१।२०७,२०८) बालकांड दोहा २०७ व २०८ मध्यें १०।१० चौपाया आहेत त्या विश्वामित्र व दशरथ यांच्या भावना प्रगट करण्यासाठीं आहेत.

दो. २०७ च्या चौपायांत विश्वामित्र-दशरथ-भेट व विश्वामित्रांनीं केलेली याचना यांचें वर्णन आहे. विश्वामित्राची भावना आहे कीं ' राम ' हा १ पूर्णांक मिळाला पाहिजे; बाकी इतर कांहींहि मागणें वा मिळणें म्हणजे १० या संख्येंतील पूर्णांक न मागणें किंवा न मिळणें याच्यासारखें आहे. १० तील पूर्णांक १ गेला कीं बाकी राहतें ० शून्य, तेंच हातीं येणार ! एक पूर्णांक असल्यावर त्यावर जेवढीं शून्यें चढवावीत तेवढी दसपट किंमत वाढेल. तुलसीदासच दोहावलींत म्हणतात :—

नाम राम को अंक है सब साधन है सून ।
अंक गएँ कछु हाथ नहिं अंक रहें दसगून ॥ १० ॥

हा दोहा दोहावलींत दहावाच आहे ! मुद्दाम मूळ दोहा दिला आहे ! अनुवाद दिला नाहीं.

(क) दशरथांनीं आपली भावना बोलून दाखविली आहे :—

' मागा भूमि धेनु धन कोषा । देउं आज सर्वस्व सहर्षा ॥ ३ ॥
प्रिय न तनू-प्राणांहुनि कांहीं । ते मुनि देउं निमिषिं एकाही ॥ ४ ॥
स्वामि ! न देणें घडे राम मम ' ॥ ५ ॥

भावना ही आहे कीं दहां (१०) तील किंवा त्यावर असलेलीं सर्व शून्यें दिलीं गेलीं तरी चालेल पण राम हा १ पूर्णांक देणें शक्य नाहीं. तो एक (१) असेल तर सुखप्राप्ति प्रतिदिन दसपट वाढूं शकेल, तो अंक गेला कीं देह, प्राण इत्यादि सर्वच शून्यवत् होणार ! दो. २०८ मध्यें १० चौपाया घालण्यांत ही भावना मुख्य आहे.

श्रीरामजन्माख्यानापासून (दो. १८८) अयोध्याकाण्ड समाप्तीपर्यंत दोह्याच्या अंगभूत चौपायांची संख्या आठ (८) हा नियम आहे; आणि कमी किंवा अधिक असणें सहेतुक अपवाद होय. अपवादभूत सर्व ठिकाणीं असलेला हेतु व गूढार्थ या चंद्रिकेंत स्पष्ट दिसतात.

विविध प्रकारचे अनेक गूढ संकेत मानसांत विपुल आहेत; त्यांतील कांहीं प्रकारांचे नमुने थोडे येथें दिले आहेत. सर्व *विदित* गूढ संकेत चंद्रिकेंत साधार स्पष्ट केले गेले आहेत.

नमुना १२ वा — शंकरांचा संबंध व ११ ही संख्या — मागील वर्णनांत क्रमांक तीनमध्यें एक उदाहरण दिलें आहे. आणखी कांहीं येथें देऊं.

१. पार्वतीचीं शुभ लक्षणें ११ आहेत. — १ सबगुणखाणी, २ सुंदर, ३ सुशील, ४ शाहणी, ५ सर्व लक्षणसंपन्न, ६ सदा पतिप्रिय, ७ सदा अचलसौभाग्य, ८ मायबाप यश पावतील, ९ जगांत पूज्य होईल, १० हिच्या सेवेनें कांहीं दुर्लभ नाहीं, ११ हिचें नाम स्मरतील त्या उत्तम पतिव्रता होतील (१।६७।१–६).

२. शंकरांचे ११ दोष — (१।६७।८ व दोहा). १ अगुण, २ अमान, ३ मातृहीन, ४ पितृहीन, ५ उदासीन, ६ शंकाक्षीण (रहित), ७ जोगी, ८ जटिल, ९ अकाममन, १० नग्न, ११ अमंगलवेष. या सर्व दोषांचे स्तुतिपर अर्थ गूढार्थचंद्रिका दाखविते. व्याजस्तुतीनें दोष वर्णिले आहेत.

३. शिवपार्वती विवाहांत ११ छंद वापरले आहेत. विवाह ठरूनसुद्धां शिवाची दृढ समाधि लागल्यामुळें विवाह होणें अशक्य झालें होतें म्हणून शिवसमाधिभंग व मदनदहन झाल्यानंतरच शिव-पार्वती-विवाह वर्णनाचा आरंभ मानणें जरूर आहे. षण्मुखजन्मवर्णन शिव-पार्वती विवाहांत घेतां येत नाहीं. दो. ८७ व ९३–१०२ (दोन्ही धरून) ११ छंद आहेत. १०२ मध्यें शिव पार्वतीसह वृषारूढ होऊन कैलासास जाण्यास निघाले आहेत.

४. शिवचापभंग प्रकरण-पूर्वार्ध — ११ दोहे आहेत. दो २४१–२५१.

‘ राजकुमर आले त्या समयीं । प्रसृत मनोहरता जणुं कायीं ’ (१।२४१।१) या चौपाईंत रामलक्ष्मणांनीं धनुर्मखमंडपांत प्रवेश केला; व २५१ व्या दोह्यांत ठरलें कीं भवचापभंग करण्यास समर्थ असा कोणी विरंचीनें निर्माणच केला नाहीं.

५. शिवचापभंग-उत्तरार्ध — ११ दोहे आहेत. दो. २५२–२६२. १५२।८ मध्यें लक्ष्मण रुष्ट झाले; २५२ मध्यें बोलण्यास प्रारंभ केला आणि २६२।१ मध्यें

‘ प्रभु दो चापखंड महिं टाकति । पाहुनि सकल लोक सुख पावति ॥ ’

६. शंकरांनीं केलेल्या (लंकाकांड) **स्तुतींत** — ११ ओळी व ११ उपमानें. ‘ मामभिरक्षय रघुकुलनायक ’ (६।११५।१) पासून ‘ कृपासिंधु येईन मी बघुं उदारचरितास ’ (६।११५).

(क) यांत — १ प्रभंजन, २ अनल, ३ मंदिर, ४ दिवाकर, ५ पंचानन, ६ तुषार, ७ मंदर, ८ (कुशल नाविक) संसृतितारक, ९ राजीव, १० मंडण व ११ सिंधु– हीं ११ उपमानें रामस्तुति करतांना महेशांनीं वापरलीं आहेत.

७. शंभुकृत स्तुतींत — (उत्तरकांड) ११ उपमानें वापरलीं आहेत, आणि १० छंद + १ दोहा = ११ पद्यें वापरलीं आहेत. उपमानें — १ शमन (= यम), २ पावक, ३ मंडन, ४ दिनकरतेज, ५ पंकज, ६ पंकज, ७ पंकज, ८ भृंग, ९ महाऽमद, १० (मान-) अरि आणि ११ आयतन.

नमुना १३ वा — नऊ (९) या अंकाचें महत्त्व व उपयोग — श्रीमानसांत गोस्वामींनीं ९ या अंकाला विशेष महत्त्व दिलेलें आढळतें तें कां ?

नऊ हा अंक (१) सर्व अंकांत मोठा. (२) श्रीरामावतार नवमीस झाला. (३) **श्रीसीतावतार वैशाख शुद्ध नवमीस झाला.** तो दिवस जानकीनवमी (नौम) म्हणून तिकडे पाळला जातो. (४) हा अंक स्वतः निर्विकार आहे. (५) ज्यांत हा मिळेल त्याच्या मूळ (एकांकी रूपांत) हा न्यूनाधिक्य करीत नाहीं.

(क) **सर्वांत मोठा** — १ पासून ९ पर्यंत अंक नऊ (९) त्यांत हा सर्वश्रेष्ठ. कितीहि मोठी संख्या असली तरी तिच्यांतील सर्व अंकांची एकांकी बेरीज नऊपेक्षां कमीच येते. उदा० १८७८ = २४ = ६. संख्येंत इतर कोणताच अंक नसेल तरच बेरीज ९ येईल उदा. ९९९९ = ३६ = ९.

(ख) ९ ला वाटेल त्या संख्येनें गुणलें तरी येणाऱ्या गुणाकाराची एकांकी बेरीज शेवटीं ९ च. ९ × २५ = २२५ = २ + २ + ५ = ९; १२६ × ९ = ११३४ = १ + १ + ३ + ४ = ९.

(ग) कोणत्याहि अंकांत यास मिळावा; बेरीज शेवटीं मूळचा अंकच येते. उदा० १२३ + ९ = १३२ = १ + ३ + २ = ६; १२३ = ६ च. १ + ९ = १० = १; २ + ९ = ११ = २; ३ + ९ = १२ = ३; ४ + ९ = १३ = ४; ५ + ९ = १४ = ५; ६ + ९ = १५ = ६; ७ + ९ = १६ = ७; ८ + ९ = १७ = ८; ९ + ९ = १८ = ९.

(घ) कोणत्याहि संख्येंतून ९ वजा केल्यास त्या संख्येचें पूर्वीचें एकांकी रूपच शिल्लक राहतें. १६−९ = ७, १६ = १ + ६ = ७ च. १९५७ − ९ = १९४८ = २२ = ४; १९५७ = २२ = ४.

(ङ) कोणत्याही संख्येला ९ नें भागल्यास बाकी राहील ती त्या संख्येच्या एकांकी बेरजेएवढीच राहील. ७१८ ÷ ९ बाकी राहते ७; ७१८ = १६ = ७.

अशा रीतीनें हा अंक पूर्ण निर्विकार आहे. १ पासून ८ पर्यंतच्या कोणत्याहि अंकाचा असा स्वभाव नाहीं; हें वाचकांनीं पडताळून पाहिल्यास सहज कळेल. असा हा अंक सर्व प्रकारें निर्विकार असल्यानें मर्यादापुरुषोत्तमाचा, श्रीरामाचा अवतार नवमीस झाला. श्रीजानकीचा अवतारहि याचमुळें नवमीस झाला. निर्दोष व सर्वांग-सुंदर अशा श्रीरामचरितमानसाचा अवतारसुद्धां श्रीरामनवमीसच झाला. श्रीरामचरित-मानसाचें पारायण सप्ताह पद्धतीनें होत नसून नवाह (नऊ दिवस) पद्धतीनेंच होतें. रामायण कवींची परंपरा संभाळावयाची नसती तर गोस्वामींनीं मानसरचना नऊ कांडांतच केली असती ! व महाकाव्यलक्षणाची चांगली पूर्ति झाली असती.

श्रीगोस्वामीजींस हा अंक फार प्रिय असल्याचीं मानसांतील कांहीं उदाहरणें पाहा —

१ मंगलाचरणापासून गुरु, संत, खल इत्यादि सर्वांच्या वंदनांत पहिले १८ दोहे = ९

२ नामवंदन प्रकरण दो. १९–२७ = ९ दोहे ... ९

३ सतीमोह प्रकरण, पूर्वार्ध (४७–५५) परीक्षा घेऊन येईपर्यंत. दोहे ९ ... ९
४ सतीमोह, उत्तरार्ध ५६–६४ दोहे ९ ... ९
५ पार्वतीजन्मापासून तपासाठीं निघेपर्यंत ६५–७३ = दोहे ९ ... ९
६ पार्वतीतपश्चर्या व घरीं परत येणें ७४–८२ = ९ दोहे ... ९
७ शिव वऱ्हाडासह निघाल्यापासून विवाहसमाप्ति. ९४–१०२ = ९ दोहे ... ९
' जसा वर तसें वऱ्हाड आतां ' ही ९४ ची पहिली चौपाई आहे.
८ श्रीपरशुरामगर्वहरण प्रकरण; १८ दोहे (२६८–२८५) = ... ९
९ श्रीरामवरवेषवर्णनापासून पाणिग्रहण व सप्तपदी. दो. ३१६–३२४ = ९ ... ९
१० भरतादि बंधूंचे विवाह व विवाहोत्सवसमाप्ति. ३२४–३३३ = ९ दोहे ... ९
११ जनकपुरींतून प्रयाणाच्या उपक्रमापासून प्रयाणारंभ ३३४–३४२ = ९ दोहे ९
१२ प्रयाणापासून गृहप्रवेश; ३४३–३५१ = ९ दोहे ... ९
१३ विश्वामित्रनिवासापासून विश्वामित्रगमन; ३५२–३६० = ९ दोहे ... ९
१४ श्रीतुलसीदासांचें आयुष्य १२६ वर्षें = ९ ... ९

श्रीरामजन्म, श्रीजानकीजन्म, श्रीरामचरितमानसजन्म व मानसाचे पारायणा-दिवस ९ हीं चार उदाहरणें या १४ च्या पूर्वींच दिलीं आहेत. ४+१४=१८=९ च.

सूचना :— इतर कांडांतहि ९ च्या उपयोगाचीं उदाहरणें आहेत तीं वाचकांनीं शोधून काढावींत; मात्र अरण्यादि लहान कांडांत कोणत्याहि प्रकरणास ९ दोहे सांपडणार नाहींत; कारण त्यांत प्रकरणें पुष्कळ व विस्तार अगदीं थोडा. त्यांत ९,१८,२७ अशा ओळींत कांहीं उदाहरणें सांपडणें शक्य आहे. शिवाय जेथें राक्षसांचा-दुष्टांचा निवास आहे व अनेक संकटें आहेत तेथें निर्विकारता दिसणें कठिणच !

असे आणखी विविध प्रकारचे संकेत आहेत ते गूढार्थचंद्रिकेंत दिसतील. श्रीतुलसी-दासांच्या गूढ अद्भुत संकेतांपैकीं कांहीं प्रकारांचें नुसतें दिग्दर्शन येथें केलें. आणखी पुष्कळ शिल्लक असले तरी खरोखरच तुलसीमानस अगाध असल्यानें सर्व संकेत या मंदमतीला कळले आहेत असें म्हणण्याचा मूर्खपणा तो स्वप्नांतहि करणार नाहीं. पुढील प्रकरण ' मानसिं गंगा-कथा अद्भुतहि ' हें आहे.

नव-नवीन मानस अद्भुतता । प्रगटे हरिगुरुकृपा वर्षतां ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।३ 卐 卐 卐

मानसिं गंगा-कथा अद्भुतहि

अद्भुत अपूर्व मानस नमुने या मुख्य प्रकरणांतील हें तिसरें प्रकरण आहे. मानसांत श्रीजगपावन गंगेची कथा अथपासून इतिपर्यंत आहे; हें उत्तर हिंदुस्थानां-तील रामायण व्यास, रामायणी, हजार पारायणें केलेले अशांनासुद्धां खरें वाटणार

नाहीं ! अशी वस्तुस्थिति असून मानसांत श्रीभागीरथीची संपूर्ण कथा आहे हें त्रिसत्य आहे; म्हणूनच अद्‌भुत अपूर्व मानस नमुन्यांत या लेखाचा प्रवेश झाला आहे. स्वतः या लेखकासमुद्धां हा शोध १।२।५६ पर्यंत लागला नव्हता.

श्रीरामचरितमानसांत गंगा, सुरसरिता, किंवा या अर्थाच्या शब्दांचा मिळून ५५ ठिकाणीं उल्लेख आहे. अरण्य, किष्किंधा व सुंदर या कांडांत गंगेचें नांव नाहीं. लंकाकांडांत गंगेचे उल्लेख आहेत; पण ते लंकेंत नाहींत. लंकेंतून निघून प्रभु भारतांत येऊन चित्रकूटाहून पुढें गेल्यानंतरच्या वर्णनांत आहेत. लंकेमध्यें फक्त एकदां गंगा नांवाचा उल्लेख अंगदानें केला आहे. ' शठा ! गंगेला नदी म्हणशील काय ? ' असें त्यानें रावणास विचारलें आहे. लंका १२०,१२१ या शेवटच्या दोन दोह्यांत ५ वेळां व उत्तरकांडांत ४ वेळां गंगेचा उल्लेख–वर्णन आहे. बाकीचीं वचनें बाल व अयोध्या या कांडांतच आहेत.

हीं सर्व वचनें एकत्र केल्यावर असें आढळून आलें कीं सुमारें तीस वचनांत मिळून गंगेच्या जन्मापासून ती सागराला मिळेपर्यंतची सर्व कथा आहे. ज्या क्रमानें मानसांत वचनें आहेत त्या क्रमानें वचनें घेऊन मात्र ही कथा तयार होत नाहीं. इतिहासक्रमानुसार क्रम लावला कीं सर्व कथा सुसंगत तयार होते; तीच पुढें दिली आहे.

१. ' **गाधिज वदले सकल कथेला** । (सुरसरिता जशि येई धरेला) १।२१२।२. यांतील प्रथम चरणच येथें घ्यावयाचा आहे. विश्वामित्रांनीं गंगावतरणाची कथा रामलक्ष्मणांस सांगितली असा जो उल्लेख केला त्याची सत्यता मानसांतील अनेक स्थळीं असणाऱ्या उल्लेखांनीं दाखविली आहे. *विश्वामित्रच गंगेचा सर्व इतिहास सांगत आहेत असें समजूं !*

२. ज्या पदिं सुरसरिता परम पुनीता प्रगट होइ (१।२११ छं. ४) तें पद कोणतें व कशी प्रगटली तें ऐका:—

३. प्रभु बलिबंधानें वाढले ती तनु वर्णिल कोण ॥ (४।२९) जे प्रभु बलीला बंधन करण्यासाठीं वाढले त्यांच्या पायांपासून प्रगट झाली. ते प्रभु कोण तें ऐकावें.

(**क**) ' **शचीपति-प्रियानुज** ' (३।४।६) शचीपति-इंद्राचें प्रिय करणारे अनुज जे वामनावतार प्रभु त्यांच्या पायापासून प्रगट झाली. (**ख**) ' ज्यांच्या त्रिपदां विश्व न पुरतें ' (२।१०१।४) ज्यांच्या तीन पावलांना विश्व अपुरें पडलें त्या श्रीवामनप्रभूच्या चरणांपासून प्रगट झाली. कुठें व चरणाच्या कोणत्या भागापासून प्रगट झाली तें सांगतों, लक्ष देऊन ऐकावें.

४. ' *नखनिर्गता मुनि-वंदिता* जगपावनी *सुरसरि* ' — (७।१३।४) ब्रह्मलोकांत पोचलेल्या प्रभुचरणाच्या उजव्या आंगठ्याचें प्रक्षालन मुनि ब्रह्मदेवानें केलें व त्या चरणामृताला ब्रह्मदेवानें वंदन केलें. असा हा गंगेच्या जन्माचा इतिहास आहे.

५. ज्यांच्या पदनखापासून गंगेचा असा जन्म झाला तेच प्रभु राम, दशरथनंदन.
' *पदनख निरखुनि सुरसरि हर्षित* ' । प्रभुवचनें मोहें मति कर्षित ॥ (२।१०१।५)

ज्या पदनखांपासून गंगेचा जन्म झाला; तें पदनख गंगेनें निरखून पाहिलें तेव्हां आपल्या जनकाचें दर्शन झालें व आतां कांहीं सेवा करतां येईल असें वाटून गंगेला हर्ष झाला. सुरसरि=गंगा–देवनदी.

६. ब्रह्मलोकांतून गंगा प्रथम कुठें आली तें सांगतों:— '*शिव शिरीं धरी*' (१।२११।छं.४) तिला शिवानें प्रथम आपल्या मस्तकावर धारण केलें. 'प्रभुचरणामृत जाणून मस्तकीं धारण केलें' स्फुरन्मौलिकल्लोलिनी चारु गंगा' (७।१०८।३) गंगा फार सुंदर म्हणून शंकरांनीं तिला डोक्यावर बसविलें असें मांडीवर बसणाऱ्या पार्वतीस वाटलें व तिला तें दृश्य सहन होईना म्हणून शंकरांनीं काय युक्ति केली ती ऐका तर खरी! (क) '*जटामुकुटिं शिरिं सुरनदी*' (१।१०६) तिला मस्तकावरच पण जटामुकुटांत लपवून ठेवली. तेथून '*सुरसरिता जाशि येइ धरेला*' (२।२१२।२ प्रथम घेतलेल्या अवरणांतील तेथें न घेतलेला चरण) *ती गोष्ट सांगतों.* सावधानतया श्रुणुत.

७. '*भूप भगीरथ गंगे आणी* । **स्मरतां सकल सुमंगल खाणी** ॥ (२।२०९।७) रामा! तुमचेच पूर्वज-भगीरथ भूपति यांनीं तिला पृथ्वीतलावर प्रथम आणलें. पृथ्वीतलावर कोठें प्रगट झाली तें पण ऐका.

८. *हिमगिरी गुहा एक अति पावनि । सुरनादि वाहे*— (१।१२५।१)

९. त्या पर्वतांतून सुंदर वनांतून ती वाहत जाते; तें दृश्य पाहिलें म्हणजे भक्तांचें मन भगवत्प्रेमांत रंगतें:— 'बघुनि गिरिनदी-विपिनविभागीं । रमे रमापतिपदानुरागीं ॥ (१।१२५।३).

१०. 'सुरसरिधार नांव *मंदाकिनी*' (२।१३२।६) हिमालयांतून वाहात असतां *मंदाकिनी*, अलकनंदा, शेषगंगा, स्वर्णगंगा, रामगंगा, व्यासगंगा इत्यादि नद्या तिला मिळतात. हें अवतरण मूळ संदर्भास चित्रकूटजवळील मंदाकिनीविषयीं आहे. पण येथें तें सहज लागू पडतें कारण गंगेला मिळणाऱ्या नद्यांत एक मंदाकिनी आहेच.

११. पुढें प्रयागांत गंगेला यमुना मिळाली व तो तीर्थराज झाला.

'मुदमंगलमय (संतसमाजहि) । जो जगिं (जंगम) तीर्थराजहि ॥
(रामभक्ति) *जिथ* धार *भागिरथि* । (ब्रह्मविचार-प्रचार) ***सरस्वति*** ॥
विधिनिषेधमय *कलिमलहरणी* । (कर्मकथा ती) ***भानुनन्दिनी*** ॥
'*वेणी* (हरिहरकथा) *विराजे* ॥
वट (विश्वास) *अचल* ॥ (१।२।७-११)

याप्रमाणें गंगेला भानुनन्दिनी = रविकन्या—यमुना मिळाली. सरस्वति (गुप्तरूपानें) मिळाली व तेथें त्रिवेणी झाली व तेथेंच अक्षय (अचल) वट आहे. 'सुरसरि सरस्वती रविकन्या' (२।१३८।४). याप्रमाणें तीर्थराज प्रयाग तयार झाला.

१२. आतां गंगा-यमुना-जलांचा वर्ण व थोडा प्रयागमहिमा ऐका.

'सविधि सितासित नीरीं स्नाती । दान मान विप्रांना देती ॥

बघतां *श्यामल धवल* तरंगां । ××× बद्धकर पुलकहि अंगां ॥ (२।२०४।४-५).

दो०– सेविति सुकृती साधु शुचि पावति सब मन काम ॥

बंदी वेद पुराणगण गाती सुगुणग्राम ' ॥ (२।१०५)

१३. प्रयागाहून पुढें गेल्यावर जगपावन गंगेला मोठ्या नद्या कोणत्या मिळाल्या पाहाः 'शरयू नाम सुमंगलमूला', 'नदी पुनीत सुमानसनन्दिनि ॥'(१।३९।१२,१३.), 'जाउनि सुरसरिते । शरयु ××× मनोहर मिळते ॥ (१।४०।१), *महानद शोण* सुशोभन (१।४०।२) तेथेंच (पाटणा शहराजवळ) मिळतो. असा हा तिठा तयार झाला.

१४. त्रिका *त्रासिका त्रयतापातें* । ......*सिंधुस जाते* ॥ (१।४०।४) त्रयतापांना त्रासविणारी गंगा पुढें सागरास जाऊन मिळते.

१५. '*करी प्रथित गंगा त्रिस्थानां*' (२।२८७।४) गंगेनें तीन स्थानें विशेष प्रसिद्ध केलीं; पैकीं सर्वांत मुख्य अशा तीर्थराज प्रयागाचें वर्णन पूर्वींच केलें आहे. जेथें ती हिमालयांतून बाहेर पडते तें हरिद्वार–कनसल-मायापुरी आणि सागरास मिळते तें तिसरें *गंगासागरसंगम*, 'सरितसिंधुसंगमिं ।' (२।३०२।६)

याप्रमाणें गंगेच्या मूळ उत्पत्तीपासून सागराला मिळेपर्यंतची कथा थोडक्यांत सांगितली. आतां जगत्पावनी गंगेचा थोडा महिमा सांगतों तो ऐका.

हें सर्व वर्णन मानसांतील वचनांच्या आधारेंच केलें आहे हें अवतरणांतील उल्लेखांवरून कळेलच. सांधे जोडण्यासाठीं घेतलेलीं वचनें मानसांतीलच आहेत हेंहि सहज दिसून येईल.

श्रीभागीरथीमहिमा — वरील कथेंत गंगेचा महिमा दर्शविणारीं वचनें फारच थोडीं आहेत.

१ गंगाजल ब्रह्ममय-ब्रह्मद्रव आहे—

करिती प्रणमन पुरनरनारी । सुखी *ब्रह्ममय* बघुनी *वारी* ॥

स्नान करुनि कर जोडुनि मागति ॥ (२।१९७।४-५).

गंगेचें जल ब्रह्ममय (= ब्रह्मद्रव) आहे; व तें *वारि* = विविध पापांचें अपवारण (निवारण) करणारें आहे; तथापि (क) '*अतिपरिचयादवज्ञा*' या न्यायानें तिच्या तीरीं राहणारे भिल्ल, कोळी वगैरे लोक गंगाजलाला फक्त पाणी (पिण्यास योग्य = पानीय, संस्कृत) च समजतात.

'**नाविक रामाज्ञेस पावुनी । काष्ठवटभर ये पाणि घेऊनी**' (२।१०१।६ टीका) कवितावलींतसुद्धां त्या नावाड्यानें 'पाणी'च आणलें आहे.

२. गंगा-यमुनांचा प्रवाह अखंडित असतो.

'सदा अचल सौभाग्य असो तव । गंगायमुनाजल वाहे जंव' (२।६९।८)

३. **'सलिल सकल शुभ अशुभ वाहतें । गंगे कुणि अपवित्र न म्हणतें'** (१।६९।७) यावरून ठरलें कीं गोस्वामींच्या काळांतसुद्धां शहरांचें सांडपाणी–घाणेरडें पाणी–गंगेंत सोडलें जात असे. गंगाजलाचा अपूर्व अनुपम प्रभाव आधुनिक संशोधनांनींसुद्धां अप्रतिम ठरला आहे. (हिंदुसंस्कृति अंक पाहावा).

४. गंगेच्या मस्तकावर-पृष्ठभागावर-सदा तरंग येत जात असतात, त्यामुळें ती नयनमनोहर दिसते.

'स्फुरन्मौलि कल्लोलिनी चारु गंगा' (७।१०८। छं. ३).

(चामर) यामुन गांगतरंग । बघत दुःख-दारिद्र्यां भंग (२।१०५।८)

५. **'सुरसरि–सकलां हितकारक'** (१।१४।९)

गंगा सब मुदमंगलमूला । सब सुख करणि हरणि सब शूलां' (२।८७।४)

६. **'भरत वदति सुरसरि तव रेणू । सकल सुखद सेवक सुरधेनू'**

(२।१९७।७). रेणु = जलकणिका.

७. गंगेवर व वेदपुराणादिकांवर विश्वास श्रद्धा असलेले लोक *गंगेची पूजा प्रार्थना नवस वगैरे करतात*. भरतानें प्रार्थना–याचना केली आहे.

'जोडुनि कर वर हाच मागतों । सितारामपदिं स्नेह सहज तो ॥ (२।१९७।८)

(क) सीतेनें प्रार्थना करून नवस केला आहे.

'कर जोडुन मग सीता विनवी । गंगे माइ ! मनोरथ पुरवी ॥

पतिदीरांसह येतां मागें– । कुशल, करिन कीं तव पूजा गे ॥ (२।१०३।२-३)

(वाल्मीकि रामायणांत तर सीतेनें यापेक्षां फार मोठा नवस केला आहे. टीका पाहा.)

(ख) श्रीरघुनाथानें स्नान करून नंतर निघतांना गंगेला नमस्कार केला आहे. 'गंगे नमुनि शिरास' (२।१०४).

(ग) लंकेतून परत येतांना पुष्पकविमान उतरवून सीतेनें नवस फेडला आहे. 'तैं सीता पूजी सुरनदी'

८. 'धन्यदेश जेथें सुरसरी' (७।१२७।५).

९. वेदांनीं स्वतः भाटरूपानें येऊन राज्याभिषेकाच्या वेळीं स्तुति केली त्यांत म्हटलें कीं,

'नखनिर्गता मुनिवंदिता *जगपावनी* सुरसरि हरे ! (७।१३।४).

१०. गंगासुद्धां आकाशवाणीप्रमाणें जलवाणीनें आशिर्वाद इत्यादि देऊं शकते. विमल जलीं वरवाणि जाहली (२।१०३।४).

याप्रमाणें प्रथम उल्लेखिलेल्या ५४ वचनांपैकीं बरींचशीं वचनें वरील कथेंत उपयोजिलीं आहेत. द्विरुक्ति टाळण्यासाठीं कांहीं सोडावीं लागलीं. अवतरणांत घेतलेल्या

कोणत्याहि वचनांत कानामात्रेचासुद्धां बदल करावा लागला नाहीं.

सूचना — श्रीतुलसीदासांनीं गंगेचा महिमा कांहींतरी कपोलकल्पित लिहिला असें ज्या पंडितांस, पदवीधरांस वा वेदान्त्यांस वाटत असेल त्यांनीं श्रीमदाद्यशंकराचार्यकृत गंगादि नदीस्तोत्राणि (बृहत्स्तोत्ररत्नाकर), पुराणें, वाल्मीकि रामायण, महाभारत, इत्यादींत वर्णिलेला याहीपेक्षां अद्भुत प्रभाव पाहावा.

श्रीगंगाकथा आमूलाग्र अखंड सिद्ध होण्यास लागणारीं अनेक वचनें मानसांत इतस्ततः अशीं घालून ठेवलेलीं सांपडलीं व कथासूत्र कुठेंहि तुटलें नाहीं ही गोष्ट अपूर्व व अद्भुत नाहीं काय ? ' मानसिं 'रामचंद्र' अति अद्भुत ' हें पुढील प्रकरण आहे.

छंद-हरिगीतिका—**ते धन्य तुलसीदास अद्भुत काव्य अनुपम विरचिते ।**
बहु धन्य जें प्रज्ञानभाग्यहि गुरुकृपाहरि संचि तें ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।४ 卐 卐 卐

मानसिं 'रामचंद्र' अति अद्भुत

श्रीरामचरितमानसांतील अद्भुत अपूर्व रचना—नमुन्यांत 'रामचंद्र' शब्दाचा उपयोग हा एक अति अद्भुत नमुना आहे.

मानसांत *रामचंद्र शब्द* फारच थोडा वापरला आहे. जेथें चंद्रांतील सद्गुणांचें निदर्शन करावयाचें असतें तेथेंच हा शब्द वापरला असल्यानें सात सोपानांत मिळून *१६ वेळां वापरला आहे.* हीं सोळा वचनें विषयसंगतिक्रमानें घेतलीं म्हणजे श्रीमानसाचा मुख्य सिद्धान्त व त्या सिद्धान्तानुसार ध्येयप्राप्तीचा साधनक्रम सांगणारा एक सुसंबद्ध स्वतंत्र विषयच तयार होतो. आवश्यक असणाऱ्या क्रमानुसार १६ वचनें पुढील विषयप्रतिपादनांत घेतलीं आहेत. व त्या वचनांच्या पूर्वापर वचनांचें साह्य घेऊन विषयप्रतिपादन केलें आहे.

१. दो०—'***रामचंद्र*** **भजनाविण इच्छी पद निर्वाण ।**
ज्ञानवंत अपि तो नर पशु विण-पुच्छविषाण ॥' (७।७८ रा)

श्रीरामचंद्रांच्या भजना—भक्ती—वांचून जो सायुज्य मोक्षाची इच्छा करील तो नर ज्ञानवंत असला तरी पुच्छविषाणहीन (शिंगें शेंपूट नसलेला) पशु आहे. सार हें सांगितलें कीं मोक्षाची इच्छा करणारा जर भजन—भक्ति—करणार नाहीं आणि केवळ ज्ञानमार्गाचें अवलंबन करील तर मायापाशांतून सुटणें शक्य नाहीं. पश्यते = बध्यते इति पशुः; म्हणूनच ईश्वराला *पशुपति* म्हणतात. भक्तीशिवाय तरणोपाय नाहीं हा मुख्य सिद्धान्त सांगितला. मोक्षप्राप्ति हें *प्रयोजन* निर्वाण शब्दानें सुचविलें; रामभक्ति हा *विषय* सुचविला, इच्छी निर्वाण = मुमुक्षु *अधिकारी* सांगितला. भज्य-भजक-*संबंध* सुचविला. भजन हें *साधन* सांगितलें. (भजन = भक्ति हें ' पर्याय शब्दनिदर्शन ' लेखांत पाहावें.)

भजनानें भक्ति कशी प्राप्त करतां येईल तें आतां सांगतात.

२. श्रवणभक्ति—रामगुणश्रवण, दुःखनाश :

रामचंद्र गुण वर्णूं लागे । श्रवतांहि दुःख सितेचे भंगे ॥ (५।१३।५).

संतमुखानें रामगुणश्रवण केल्यास दुःखविनाश होईल. कारण कीं रामगुणांच्या ठायीं चंद्रासारखी ताप (दुःख) नाशक व सुखदायक शक्ति आहे. हनुमान अशोक वनांतील वृक्षांत गुप्त राहून रामचंद्रगुणवर्णन-गान-करूं लागले. त्याच्या श्रवणानें सीतेचें दुःख गेलें.

३. रामसुयशश्रवण :

कपिचेष्टांनीं त्यांस दटाविति । रामचंद्रसुयशास ऐकविति ॥ (६।४४।५)

लंकाकाण्डांत अंगद व हनुमान रावणाच्या घरावर चढून त्यांनीं तें बळसासकट ढकललें; तेव्हां 'करें नारीगण बडविती छाती' असें दिसतांच त्या दोघांनीं कपिचेष्टांनीं त्यांस दटावलें आणि रामचंद्राचें सुयश त्यांस ऐकविलें. या संदर्भानुसार येथें भाव आहे कीं तमोगुणी बुद्धीला रामगुण, रामयश श्रवण करणें आवडत नसलें तरी बळजबरीनें, मुद्दाम रामयश श्रवण करावें. मात्र तें रामभक्तांच्या मुखानें श्रवण करावें म्हणजे संवयीनें श्रवणाची गोडी उत्पन्न होईल व मग छाती बडवून शोक करीत बसण्याची वेळ येणार नाहीं. (क) रामगुण व रामयशकथनगान कशाच्या आधारें करावें वगैरे आतां सांगतात.

४. चरित्रश्रवण-कीर्तनभक्ति :

सुंदर रामचंद्र चरितांना । कल्पकोटि पुरति न गातांना ॥
हा प्रसंग मी कथित भवानी । मोहति मुनि हरिमायें ज्ञानी ॥
प्रभुकौतुकी प्रणत-हितकारी । सेवत सुलभ सकल दुखहारी ॥ (१।१४०।६-८)

(१) कोणी म्हणतील कीं जमन्भर ऐकण्यास रामचरित्र कसें पुरेल ? त्यावर सांगतात कीं रामचरित्र इतकें अपार आहे कीं एक जन्मच काय कोटि कल्पें श्रवण केलें व कथन-कीर्तन केलें तरी तें सरणार नाहीं (विचित्र कथा-प्रबंध प्रकरण पाहावें).

(२) **चरित्र कसें असावें** हें 'सुंदर' या विशेषणानें सांगितलें आहे. सुन्दर=चित्तास पाझर फोडणारें व आदरणीय असे दोन अर्थ आहेत (अ. व्या. सु.), दोन्ही अर्थ आवश्यक आहेत. नानापुराणनिगमागमसंमत, अतिमंजुल असें असून श्रोत्यांच्या व वक्त्यांच्या हृदयास द्रवविणारें, पाझर फोडणारें, असावें. वक्त्यानें तें असें गावें, सांगावें कीं श्रोत्यांच्या हृदयास पाझर फुटेल. ज्यांनीं पूर्वी रामगुणसुयशपूर्ण चरित्र श्रवण केलें असेल त्यांनीं रामचंद्रचरित्रकथन-गान-कीर्तन करावें, कीर्तन-भक्ति करावी, असें करतांना वक्त्यानें कंटाळूं नये व श्रोत्यांनींहि कंटाळूं नये. कितीहि श्रवण वा कथन –कीर्तन केलें तरी तें अपुरेंच वाटलें पाहिजे.

रामचरित ऐकुनि जे धाती । न कळे त्यां रसविशेषजाती ॥

रामचरित श्रवण वा कथन न केल्यास काय होतें तें पुढील दोन चौपायांत सांगितलें आहे.

(३) 'मोहति मुनि हरिमायें ज्ञानी' हें तीन ओळींचें अवतरण नारदमोह प्रकरणाच्या उपसंहारांतलें आहे. नारदासारखे *ज्ञानी मुनिसुद्धां* अहंकाराला वश होऊन *मायेनें मोहित होतात* म्हणून प्रथमच म्हटलें कीं 'रामचंद्र भजनाविण इच्छी-पदनिर्वाण' तो नर ज्ञानवंत असला तरी पुच्छविषाणहीन; पशुच; म्हणून ज्ञान झाल्या-वर, ज्ञानी झाल्यावरसुद्धां श्रवण-कीर्तन करावें व तें सुंदर रामचरित्राचें करावें. मानसांतील इतर वचनें येथें घेण्याचा मोह पक्का आवरून हें प्रतिपादन करावयाचें आहे. जे श्रवण-कीर्तनादि रामभजन करणार नाहींत त्यांना हरिमाया पशु बनविते. म्हणून सांगतात कीं,

(४) प्रभु कौतुकीं प्रणत *हितकारी* । सेवत सुलभ सकल दुखहारी ॥

जे कोणी श्रीरामचंद्रांस शरण जाऊन श्रवणकीर्तनादि भजन करीत राहतील, ते जरी हरिमायेला वश झाले तरी प्रभु रामचंद्र त्यांचें *हित करतात*, व मायामोहानें उत्पन्न झालेलें *दुःख हरण करतात;* हें नारदमोहप्रकरणानें दाखविलें आहे. आतां स्मरण-भक्ति सांगतात.

५. स्मरणभक्ति :

मुदित नारिनर देखति शोभे । *अनुपम-रूपि नयन मन लोभे ॥*
टकमक सब शोभति चौफेर । *रामचंद्र* मुखचंद्र चकोर ॥ (२।११५।४–५)

श्रीरामचरित्राचें श्रवण-कीर्तन सतत करीत राहून चित्तास पाझर फुटूं लागला म्हणजे तें रामचंद्राच्या अनुपम रूपाची कल्पना करूं शकेल. मग प्रथम बाहेर सुंदर राममूर्तीचें ध्यान टक लावून करावें. चकोर जसा चंद्राकडे पाहात राहतो तसें राममुखाचें ध्यान करीत राहावें म्हणजे नेत्र व मन इतर रूपांचें दर्शन व चिंतन करण्याचें हळुहळु विसरतील (नयन मन लोभे). मग अशाच प्रकारें रूपाचें स्मरण = ध्यान हृदयांत करीत जावें म्हणजे मन त्या रूपावर लुब्ध होईल = मन लोभे. मन आपला चंचलपणा सोडील. सगुणाचें भजन सोडून निर्गुणाचें चिंतन करूं लागलांत तर मनास चिकट-ण्यास आधार नाहीं आणि नेत्रांस आनंद देण्यास कांहीं आश्रय नाहीं. म्हणून मोक्षाची इच्छा असणारांनींसुद्धां भजन = भक्तीच करावी, म्हणजे त्यांची इच्छा 'सेवत सुलभ' सहज पूर्ण होईल.

(क) नयन व मन याप्रमाणें एकाग्र होऊं लागलीं कीं बाकीचीं इंद्रियें पण स्तंभित होतील; तीं चौफेर धावणार नाहींत; पण नुसत्या रामचंद्रांचें ध्यान-स्मरण करून भागणार नाहीं; म्हणून सांगतात,

६. सानुज-सहजानकी-स्मरण

सानुज सहजानकी प्रभु चापबाणधर *राम* ।
हृदय गगनिं मम इंदुसे संतत वसा निकाम ॥ (३।१९।१)

या वचनांत रामचंद्र शब्द नसला तरी गगनांत असणाऱ्या इंदु = चंद्र – से राम = रामचंद्रच आहेत.

(१) **ध्यान कोठें करावें, कोणाचें कसें करावें** हें यांत अधिक स्पष्ट केलें. लक्ष्मण व जानकीसहित धनुर्बाणधारी रामचंद्रांचें ध्यान हृदयांत करावें म्हणजे वैराग्य (लक्ष्मण), ज्ञान (राम) व भक्ति (जानकी) यांची प्राप्ति होईल. पण हें ध्यान अगदीं चकोरचंद्रन्यायानें झालें पाहिजे. म्हणजे प्रसन्नता, तापहरण व शीतलता इत्यादींची प्राप्ति सहज होईल. वरील दोहा सुतीक्ष्णानें वरयाचना केली त्याचें वर्णनपर आहे. अशीच प्रार्थना नेहमीं करीत जावी. मात्र हें ध्यान कामनारहित होऊन केलें पाहिजे. पण लक्ष्मण व राम यांच्या ध्यानानें कामना सहजच नष्ट होतील. ध्रुवचरित्र पाहावें. प्रथम तो बालक सनाम' होता; पण ध्यानाच्या प्रभावानें निष्काम झाला. अशा रीतीनें निष्काम झाल्यावर काय करावें तें सांगतातः

७. सर्व राममय पाहणें व प्रेमाची याचना करणें :

करिती प्रणमन पुरनरनारी । सुखी ब्रह्ममय बघुनी वारी ॥
स्नान करुनि कर जोडुनि मागति। *रामचंद्र चरणीं प्रेमा अति* ॥ (२।१९७।५,६)

(१) वैराग्य ज्ञानसंपन्न होऊन पूर्ण निष्काम झाल्यावर सर्व ब्रह्ममय=राममय पाहूं लागावें. रामभावनेनेंच नमन करीत जावें; देवदेवता, तीर्थें इत्यादिकांच्या जवळ इतर कांहीं म्हणजे मोक्षसुद्धां न मागतां रामचंद्रचरणीं अत्यंत प्रेम (भक्ति) मागावें (क) स्नान = मज्जन, बुडी मारणें. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें लक्ष्मण-राम-सीता यांच्या ध्यानांत मज्जन करून-मग्न होऊन त्यांच्याजवळसुद्धां प्रेम मागावें. *सुचविलें कीं प्रेम साधनांनीं मिळत नाहीं तें कोणीं तरी दिलें तर मिळतें.* विशेषतः ही मागणी लक्ष्मण व जानकी यांच्याजवळ करावी. याप्रमाणें हात जोडून म्हणजे अत्यंत लीनतेनें प्रेमाची याचना करीत राहिल्यावर काय फलप्राप्ति होईल तें सांगतात.

८. प्रेम मोद अति थोर प्राप्ति :

दो०— ***रामचंद्र* मुखचंद्र छवि लोचन चारु चकोर ॥**
करिति पान सादर सकल *प्रेम मोद अति थोर* ॥ (१।३२१)

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें लक्ष्मण, रामचंद्र, सीता यांच्या ध्यानांत मग्न होऊन कळवळून प्रेमासाठीं चकोराप्रमाणें त्या रूपावर आसक्त होऊन प्रार्थना–याचना करीत राहिल्यानें अति मोठा आनंद व अत्यंत प्रेमाची प्राप्ति होईल. मात्र मनानें आदरानें प्रेमयाचना करीत नेत्रांनीं ध्यानांत-रूपामृतपान करीत राहिलें पाहिजे. लक्ष्मण भक्तिप्रद आहेत.

९. सकल-सुखलाभ हें फल सांगितलें आहे :

सकल सुखें पुरजनां समस्तां । *रामचंद्र* मुखचंद्र निरखतां ॥ (२।१।६)

देह हें पुर आहे; मन, बुद्धि व सर्व इंद्रियें हे त्यांतील रहिवासी आहेत. (श्रीमद्भागवतांतील पुरंजनाख्यान पाहावें) आतांपर्यंत सांगितल्याप्रमाणें स्मरण-ध्यानाचा अभ्यास घडला व श्रीरामकृपेनें किंवा लक्ष्मण वा जानकीकृपेनें प्रेम-भक्तिलाभ झाला कीं मन,

बुद्धि, इंद्रियें इत्यादि समस्तांना सर्व प्रकारचें सुख लाभेल. दुःखनाश पूर्वीच श्रवणानें सांगितला आहे.

१०. अर्चन, वंदन, पादसेवनादि सांगतात :

जरी गृहीं सेवक सेवकिणी । विपुल सदा सेवाविधि-गुणी ॥

स्वकरें गृह-परिचर्या करते । *रामचंद्र*-आज्ञा अनुसरते ॥

कृपासिंधु सुख मानिति जेणें । तें श्री करि सेवाविधि जाणे ॥ (७।२४।५-७)

(१) हें उत्तरकांडांत श्रीसीतेविषयीं म्हटलें आहे; पण येथें परिचर्या = सेवा व आज्ञापालन इत्यादि शब्दांनीं सेव्यसेवकसंबंध सुचविला आहे. सेवाविधि शब्दानें तेंच सुचविलें आहे. रामप्रेम प्राप्त होऊन सर्व प्रकारचें सुख मिळूं लागलें तरी भक्ति दृढ होण्यासाठीं रामसेवा केली पाहिजे.

(२) येथें पादसेवन, अर्चन-वंदन-भक्ति सुचविली आहे. रामपूजेंत लागणारी प्रत्येक गोष्ट स्वतः आपल्या हातांनीं करावी. घरांत कितीहि सद्गुणी कुशल सेवक असले तरी रामसेवा-पूजादि कार्यांत त्यांची सेवा, मदत मुळींच घेऊं नये. जें केल्यानें कृपासिंधु रामचंद्रास बरें वाटेल तें तें सर्व केलें पाहिजे व प्रभूला न आवडणारें करतां उपयोगी नाहीं.

११. दास्यभक्ति-रामसेवा कशी करावी :

मनतनवचनिं यत्न योजावे । *रामचंद्र* कार्या साधावें ॥ (४।२३।३)

(१) येथें दास्यभक्ति स्पष्ट सांगितली आहे. रामदूत कपींप्रमाणें आज प्रत्यक्ष रामकार्य करतां येत नसलें तरी क्रमांक ७ मध्यें सांगितल्याप्रमाणें सर्व जग, चराचर, राममय-ब्रह्ममय पाहून जाणून दास्यभक्ति, सेवा, परोपकार, परहितसाधनरूपी रामदास्य करीत असावें. *येथें अनन्यभक्ति सुचविली*. किष्किंधा दो. ३ मध्यें अनन्य भक्ताचें लक्षण सांगितलें आहे तें पाहावें. (क) हें दास्य शरिरानें, मनानें व वाणीनें प्रयत्नपूर्वक करावें. कसें करावें याविषयीं विस्तृत वर्णन अर्चन, वंदन, दास्यभक्ति—निरूपणाच्या समासांत श्रीदासबोधांत पाहावें. संक्षेपानें अरण्यकाण्ड रामगीता टीकेंत श्रवणादि नवविधा भक्तिवर्णनांत (३।१६।४ गूढार्थचंद्रिकेंत) पाहावें.

१२. याचा परिणाम—फल—पाहा :

प्रमुदित मुख तनु तेजें भ्राजे । साधि *रामचंद्रांचीं* काजें ॥

भेटुनि होति सुखी सब भारी ॥ (५।२८।४-५)

अनन्य भक्ति-भावानें जी रामसेवा (रामदास्यभक्ति) करावयाची ती प्रसन्न चित्तानें झाली पाहिजे. म्हणजे रामदास्य घडल्याचें समाधान, प्रसन्नता, आनंद सदासर्वदा मुखावरसुद्धां दिसूं लागेल. आणि जे कोणी त्याला भेटतील, त्याच्या संगतींत येतील त्यांनाहि त्याच्यामुळें सुख होईल.

१३. राम हृदयांत राहतील :

द्विज हो ! हर्षें द्या अनुशासन । *रामचंद्र* भूषिति सिंहासन ॥ (७।१०।५)
हें गुरु वसिष्ठांचें वचन आहे. भाव हा कीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें श्रवणभक्तीपासून प्रेमभक्तिलाभ व दास्यभक्ति घडली म्हणजे सद्गुरुकृपेनें *राम सीतेसह हृदयसिंहासनावर विराजमान होतील* व लक्ष्मण त्यांच्याजवळच राहील ! येथें आणि पूर्वीच्या प्रत्येक ठिकाणीं मानसांतील वचनें पुराव्यास घेतलीं असतीं तर हा लेख दुप्पट, तिप्पट वाढला असता ! शिवाय हा विषय पूर्णपणें स्वतंत्र रीतीनें सिद्ध झाला नसता.

देहपुरींतील *हृदयसिंहासनावर* धनुर्धारी रामचंद्र प्रेमभक्तीला वश होऊन येऊन राहिले म्हणजे **तेथें रामराज्य सुरू होतें**; व

१४. त्या हृदयांत भेद आणि दंड नष्ट होतात :

दो०- ' भेद ' नृत्य-नर्तकगणिं दंड करीं संन्यासिं ।
रामचंद्र-राज्यीं श्रवणिं ' जिंका ' शब्द मनासि ॥

मग त्या रामभक्ताच्या हृदयांत राजनीतींतील 'भेद' राहात नाहीं; कोणाला दंड, शिक्षा, विरोध करण्याची बुद्धि-इच्छा-राहात नाहीं. तो सर्वांशीं सामानें-सामोपचारानें वागतो; आपल्याजवळ असलेलें भजनभक्तिधन दान देतो. कामक्रोधादि शत्रु जिंकण्यास ते उरतच नाहींत. ते मित्र बनतात. फक्त तो मनाला मात्र जिंकीत राहतो. रामचरणांपासून–रामस्मरण गुणगानादिकांतून इतरत्र जाऊं देत नाहीं.

१५. आणखी काय होतें पाहा :

विधु निजकरिं करि पूर्ण महि रवि वांछित तपतात ॥
वारिद याचित देति जल *रामचंद्र*-राज्यांत ॥

येथें मात्र दोन वचनें आधारास दिल्याशिवाय मराठी वाचकांस अर्थ मान्य होणार नाहीं.

रविविधु = ' रा म ' (रा आणि म) म्हणजेच रामनाम. रामनामांतील ' म ' या चंद्रानें त्याची हृदयभूमि सुधामय बनते; आणि ' रा ' रूपी रवि आवश्यक तेवढी वैराग्याची उष्णता व ज्ञानाचा प्रकाश त्या भूमीस देत असतो. आणि कृपावारिधर राम खरारियाचित प्रेमभक्तिजलाची वृष्टि करीत राहतात. ' *दोन्हि अक्षरें* मधुर मनोहर ॥ (१।२०।१)...विश्वहितार्थ *विमल विधु-पूषण* ' (१।२०।६) असें रामनामांतील रा व म या दोन अक्षरांबद्दल म्हटलें आहे. ' *प्रेमभक्तिजलाविण* रघुवर तों । अभ्यंतर मल कधीं न जातो ॥ (७।४९।६) असें वासिष्ठ म्हणाले आहेत. *प्रेमभक्ति जल आहे*. ' कृपा *वारिधर* राम खरारी ' (६।७०।४) वारिधर = मेघ = वारिद = राम असें मानसाधारेंच ठरलें. सार हें कीं असा ज्ञानी भक्त सदा रामनामरत राहतो व प्रेमभक्ति वाढत जाते. शीत (चंद्र), उष्ण (रवि) व सुखदुःखादि द्वंद्वें त्यास सारखींच वाटतात.

१६. विरुद्ध-प्रतिकूल–परिस्थितींत पूर्ण सुखी :

रामचंद्र पति सो वैदेही । सुप्त महिं, न विधि वाम कुणाही ॥ (२।११।७)

रामचंद्र पति असलेली वैदेही, जमिनीवर झोपली आहे—गाढ झोप लागली आहे. दैव कोणावर उलटत नाहीं हा मूळ वाच्यार्थ आहे.

या भक्ताचे पति = स्वामी रामचंद्र हृदयांत, अति समीपच असल्यामुळें, दैव कितीहि वाम झालें तरी त्याला जरासुद्धां दुःख होत नाहीं; तो वैदेही-दशेंत सीतेसारखाच वाटेल त्या विरुद्ध परिस्थितींत, सुखानें, निश्चितपणें निद्रा घेऊं शकतो. [चंद (चंद्र) हा शुद्ध संस्कृत शब्दच आहे. (अ. व्या. सु. पाहा) चंद आणि चंद्र यांतील भावार्थभेद गूढार्थचंद्रिकेंत दिसेल.]

उपसंहार = (१) भक्ति हा *विषय, निर्वाणाची* किंवा रामपदप्राप्तीची इच्छा असणारा हा *अधिकारी*, सेव्यसेवक (भज्य-भजक) *संबंध* सांगितला व दुःखशोक-रहित निर्भय नित्य सुख हें फल, *प्रयोजन* सांगितलें आहे; याप्रमाणें अनुबंधचतुष्टय **सुचविलें आहे.** (२) श्रवणादि नवविधा भक्तीनें वैराग्य ज्ञानप्राप्ति व प्रेमभक्ति-प्राप्तीनें हृदयांत रामनिवासापर्यंत **सुसंगत साधनमार्ग सांगितला आहे.** (३) प्रेमभक्ति साधनानें मिळत नसून **संत वा रामकृपेनें,** त्यांनीं दिली तर **मिळते** हेंहि दाखविलें आहे. (४) संतमुखानें श्रवण सांगून **संतसमागम हें अनुपान** सांगितलें आहे; आणि **निष्काम साधन हें पथ्य** वर्णिलें आहे. मानसांतील मुख्य सिद्धान्त व सर्व साधन आणि साध्य हें असेंच आहे. याप्रमाणें मानसांत इतस्ततः विखुरलेल्या आणि त्या त्या ठिकाणीं पूर्वापर संदर्भाशीं अगदीं सुसंबद्ध असलेल्या ' रामचंद्र ' युक्त १६ वचनांनीं हा एक सांगोपांग स्वतंत्र विषय सिद्ध झाला. ही रचनाकला अति अद्भुत व अपूर्व आहे असें कोणती सुविचारी व्यक्ति म्हणणार नाहीं ?

मागील प्रकरणांतील गंगाकथा जशी श्रीहरि–गुरुकृपेनें प्रस्तावना लिहितांनाच दिसली व कळली तसेंच या रामचंद्र शब्दाचें घडलें आहे; त्यामुळें यासंबंधी उल्लेख गूढार्थचंद्रिकेंत नाहींत. *रामचंद्र शब्द असलेलीं हीं १६ वचनें म्हणजे जणूं चंद्राच्या १६ कलाच आहेत !* आणखीहि असेच पुष्कळ नमुने ऐन वेळीं दृष्टिपथांत आले आहेत; त्यांतील एक ' मानसीं ' रघुराया ' अतिअद्भुत ' पुढील प्रकरणांत आहे.

सूचना — या लेखांतील प्रतिपादनास आधार पाहिजे असल्यास ' श्रुतिसिद्धान्त मानसीं अद्भुत ' हें (५।६) प्रकरण पाहावें.

जड पाषाणां जो जाळिं तरवी । प्रगट गुह्य तो रघुपति करवी ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।५ 卐 卐 卐

मानसिं ' रघुराया ' अति अद्भुत

श्री ' रामचंद्र ' शब्द असलेल्या १६ वचनांनीं एक स्वतंत्र सुसंबद्ध विषय सिद्ध झाला हें मागील प्रकरणांत दाखविलें. ' रघुराया ' शब्दाचा उपयोगही विशिष्ट हेनतूंच केलेला आढळला. राजाचें कर्तव्य करण्याचा संबंध असलेल्या ठिकाणींच ' रघुराया ' हा शब्द वापरला आहे हें गूढार्थचंद्रिका दाखवते; पण प्रस्तावनेचीं टाचणें काढीत असतां या शब्दांतून एक स्वतंत्र विषय प्रगट झाला, *ही रचनासुद्धां अति अद्भुत आहे.*

मानसांत ' रघुराया ' शब्द १९ वेळां वापरलेला आहे; पैकीं ११ ठिकाणीं दयेचा संबंध अगदीं प्रगट आहे; व बाकीच्या ठिकाणीं तो अप्रत्यक्ष आहे. शिवाय या १९ अवतरणांतील अन्य शब्दांनीं रघुवंशी राजांच्या स्वभावाचें वर्णन सुचविलेलें आहे.

१. तेथें रघुराया दिन कांहीं । राहति करिती *दया* विप्रांही ॥ (बाल. २१०।७) विप्रांवर दया करण्यासाठीं रघुराया राम विश्वामित्रांच्या आश्रमांत कांहीं दिवस राहिले. गेले होते विश्वमित्रयज्ञरक्षणासाठीं '*भक्तिहेतु* किती कथापुराणें । कथिलीं विप्रें–'

गूढार्थ — रघुवंशीं राजांचा हा स्वभाव आहे कीं विप्र संकटांत असतील तेथें जाऊन त्यांस निर्भय करण्यासाठीं त्यांच्यावर दया करतात. येथें उपक्रमांत भक्तीचाच संबंध आहे; मात्र —

२. रघुराया! निज-उदयमिषें रवि । प्रभूप्रताप नृपांना दाखवि ॥ (बाल. २३९।५) रवि जसा तमावर दया करीत नाहीं आणि उलट आपल्या करांनीं (किरणांनीं) त्याला प्रचंड ताप देतो तसेंच रघुराया गर्विष्ठ, अभिमानी नृपांवर दया न करतां आपला प्रताप त्यांस दाखवितात. तसेच राम.

३. ज्यांमधिं कपट दंभ नहिं माया । त्यांचे हृदयिं रहा रघुराया ॥ (अयोध्या.१३०।२) हें वाल्मीकींनीं रघुराया रामास सांगितलें आहे. असे जे असतील त्यांवर ***दया*** करून त्यांच्या हृदयांत राहा. रघुरायांच्या हृदयांत कपट, दंभ आणि माया नसते; आणि दंभी, कपटी कुटिलांवर ते दया करीत नाहींत हा स्वभाव दाखविला.

४. जाती तिथें देव रघुराया । तेथें करिति गगनिं घन छाया ॥ (अरण्य. ७।५) रघुवंशी राजे जेथें जातील तेथें गर्विष्ठ राजे आणि दंभी, कपटी इत्यादि सोडून सर्वांवर मेघांप्रमाणें दयेची छाया करतात. मेघांसारखेच तेहि गरीब, श्रीमंत इत्यादि भेद पाहात नाहींत.

५. अस्थिराशि रघुराया दिसती । येइ *दया* अति मुनींस पुसती ॥ (३।९।६) असें कांहीं असामान्य पाहिलें म्हणजे रघुराजांना दया येते व स्वतःच विचारपूस करून मुनि, विप्र इत्यादींचें संकट दूर करतात. येथें या नवव्या दोह्यांत निशाचरवधाची प्रतिज्ञाच केली आहे.

६. **हे विधि ! दीनबंधु रघुराया । करिति किं मजशा शठा दया या ॥** (३।१०।४)
दीनबंधु असले तरी शठ जर दीन झाला नाहीं तर त्याच्यावर दया करीत नाहीत. शठ असूनही दीन झाला तर रघुराया दया करतात.

७. **हा जगदेकवीर रघुराया । काय गुन्हा किं दया विसराया ॥** (अरण्य. २९।३)
गुन्हा-अपराध-करणारावर मात्र रघुवंशी राजे (रघुराया) दया करीत नाहीत. अपराध्यांवर दया करणें हें नृपांना दूषण आहे म्हणून दया करीत नाहींत. 'अपराधिषु सत्त्वेषु नृपाणां सैव दूषणम्'

८. **पाहुनि सुंदर तरुवर छाया । बसले अनुजासह रघुराया ॥** (३।४१।२-४)
सुचविलें कीं वटवृक्षाच्या छायेसारखी दयेची सुंदर छाया लवकरच कोणावर तरी करणार. नारदावर दया करून लवकरच त्यांस वर देणार आहेत.

गूढार्थ —रघुवंशी राजे प्रतापी व परोपकारी असले तरी इतके साधे असतात कीं झाडाच्या सुंदर छायेखालींसुद्धां बसतात व प्रसन्न असतात.

९. श्रीराम रघुरायास नारद विचारतात :—

राम यदा प्रेराने निज माया । मला मोहिला श्रुणु रघुराया ॥

तदा लग्न मी करूं पाहिलें । कारण कवण किं करूं नहिं दिलें ॥ (अरण्य. ४३।२-३)
नारदास लग्न करूं दिलें नाहीं हीच त्याच्यावर दया केली हें कवींनीं आधीं सुचविलें. पुढें राम स्वतःच सांगणार आहेत. नारदाची कींव आली म्हणूनच त्याच्यावर दया करून मायेला प्रेरून त्याचें परमहित केलें.

गूढार्थ — राम आणि रघुराया हे दोन शब्द वापरून सुचविलें कीं इतर रघुवंशी राजे अतुल पराक्रमी व दयाशील असले तरी मायेवर त्यांची सत्ता चालत नसे. रघुराया असून राम मायाप्रेरक, मायापति, मायेवर सत्ता गाजविणारे आहेत.

१०. **रघुराया मग पुढें चालले । ऋष्यमूक गिरि-निकट पातले ॥**

वास समंत्रि तिथें सुग्रीवा । (किष्किंधा. ११।१-२)
ऋष्यमूक पर्वतावर राहणाऱ्या कोणावर तरी दया करणार हें सुचविलें, पण 'सुग्रीवा'च्या आधीं समंत्रि शब्द असल्यानें सुचविलें कीं सुग्रीवाच्या आधीं त्याच्या मंत्र्यावर दया करणार. असेंच घडलें आहे. सुग्रीवसचिव हनुमंतावर प्रथम दया केली व मग सुग्रीवावर केली आहे.

११. **तारा विकल दिसत रघुराया । दिधलें ज्ञान निरसली माया ॥** (४।११।३)
तारेला व्याकुळ झालेली पाहतांच इतकी दया आली कीं तिनें पुन्हां कधीं शोकविव्हल होऊं नये अशी व्यवस्था केली. तिनें न मागतां आत्मज्ञान दिलें व मायेचा निरास केला. तारेच्या व्याकुळतेला प्रत्यक्ष कारण रघुरायाच.

गूढार्थ—आपल्या निमित्तानें कोणी दुःखी; व्याकुळ झाल्याचें दिसतांच रघुवंशी राजांस फार दया येते व त्या व्यक्तीचें दुःख-शोकादि दूर करण्याचा ते प्रयत्न करतात.

१२. **नारिनयन शर जया न लागे । क्रोध घोर तम निशिं जो जागे ॥**
लोभपाश ज्या गळां बद्ध ना । तो नर *रघुराया* ! सम अपणां ॥
हा गुण साधन करुनि न लाभत । *तुमचें कृपें* कुणी कुणि पावत ॥
(किष्किंधा. २९।४-६)

(१) येथें पांचव्या चौपाईत दयेचा संबंध न दिसला तरी तो पुढल्या चौपाईत दिसतोच. रघुराया रामचंद्रास दया आली तर त्यांच्या कृपेनेंच या तीन नरकद्वारांतून सुटतां येतें; व मग ती व्यक्ति रघुराया रामचंद्रासारखीच ठरते. (क) मागील वचनाशीं मेळ घालतां स्पष्ट होतें कीं तारेला ज्ञान व भक्ति देऊन तिच्यावर अपार दया करून आपल्या कृपेनें तिला या तीन महारोगांतून मुक्त केलें; त्यामुळें ती आतां रघुरायासारखीच निर्विकार झाली आहे. *ज्ञान व प्रेमभक्तिलाभ ज्याला होईल तो रामासारखाच समजावा हें सुचविलें.*

१३. म्हणे **जांबवान् श्रुणु *रघुराया* । ज्यावर करतां नाथ! तुम्हि *दया* ॥**
त्यास सदा शुभ कुशल निरंतर । सुर नर मुनी प्रसन्न तयावर ॥
(सुन्दर. ३०।१-२)

गूढार्थ-रघुवंशी राजे दया करून ज्याला सनाथ करतात त्याचें नेहमीं कुशल असतें; व सुर, नर, मुनी त्याच्यावर प्रसन्न असतात. ‘ समर्थाच्या घरचें श्वान । त्यासि सर्वहि देती मान ’ याचें हें उदाहरण आहे.

१४. पद बघुनीहि कुशल *रघुराया* । जैं जन जाणुनि करा तुम्हि *दया* ॥
(सुंदर. ४६।८)

गूढार्थ–रघुवंशी राजांनीं दया करून एकदां ज्याला आपला म्हटलें त्याचें त्यांच्या नुसत्या दर्शनानेंच कुशल होतें.

१५. मंदोदरी रावणास म्हणते :

***ते कोसलाधीश* रघुराया । आले करण्या तुम्हांवर *दया* ॥** (लंका. ७।७)

ते = भगवान, परमात्मा.

गूढार्थ — इतर कोसलाधीश मात्र अशा दुष्ट व उद्दाम शत्रूवर दया करण्यासाठीं स्वतः जात नसतात. इतर कोसलाधीश कशासाठीं जातात हें बालकांडांतील दुसऱ्या उदाहरणांत दाखविलें आहे. (१।२३९।५).

१६. दीनबंधु दयाल ***रघुराया*** । देव ***दया*** कृत देवनिकायां ॥ (लंका. ११०।३)
असें सर्व देव स्तुति करतांना म्हणाले.

गूढार्थ-रघुवंशी राजे देवांवरसुद्धां दया करतात. दशरथाचें उदाहरण प्रसिद्धच आहे.

१७. करुनि ***दया*** **निरखुनि समुदाया । वदले मृदुल वचन *रघुराया* ॥**
तुमच्या बळें मारिला रावण । राज्यीं स्थापित सखा बिभीषण ॥
(लंका. ११८।३-४)

गूढार्थ–रघुवंशी राजे परम प्रतापी असूनसुद्धां ते कोमल वाणीनें आपल्या सेवकास मोठा मान देतात.

१८. ' सदय करा उपदेश असा या । निज नयनीं निरखिन *रघुराया* ॥

(उत्तर. १११।१०)

गूढार्थ-रघुवंशी राजांचा स्वभाव वर वर्णिल्यासारखा असल्यानें त्यांचें दर्शन घेण्याची लालसा सर्वांना असे. जो कोणी दर्शनाचा मार्ग दाखवील, किंवा दर्शन करवून देईल त्यानें मोठी दया केली असें वाटत असे. रघुवंशी राजांच्या ठिकाणीं एवढी मोठी पात्रता येण्याचें कारण सांगून शेवटच्या वचनांत आतां भक्तिरसानेंच उपसंहार करतात.

१९. सानुकूल भक्तिस *रघुराया* । म्हणुन घाबरे तिज अति माया ॥

(उत्तर. ११६।५)

रघुराया रामाला भक्तीच प्राणप्रिय वाटते. त्यामुळें जिथें भक्ति असेल त्याच्यावर ते दया करतात, हें जाणून माया भक्तीला भिते; ज्ञानाला भीत नाहीं.

गूढार्थ–रघुवंशी राजे सदा भक्तिमार्गाला अनुकूल असें वागत असत म्हणून त्यांच्या ठिकाणीं मोठा प्रभाव असे.

वि. ल. ठे. (१) या १९ स्थानांची विभागणीसुद्धां सहेतुक दिसते. बाल. २; अयोध्या. १; अरण्य. ६; किष्किंधा. ३; सुंदर. २; लंका. ३ व उत्तरकांडांत २ वेळां आहे. अरण्यांत इतर काण्डांपेक्षां ' रघुराया ' जास्त आहेत. अरण्यकांड मायापुरी आहे. मायापुरींत राहणारांवर रघुराया राम जर दया करतील तरच सद्‌गुरुकृपेनें मायापाशांतून सुटतां येईल. किष्किंधाकाण्ड अरण्याच्या निम्में असून त्यांत ३ वेळां आहे. म्हणजे बरोबरीच आहे. किष्किंधा दंडकारण्यांतच आहे. (क) लंकाकाण्डांत रघुराया आणि दया यांचा संबंध तीन वेळां जोडलेला असला तरी त्या स्थानांकडे पाहतां असें दिसतें कीं दयेचा उपयोग लंकाकाण्डारंभीं व रावणवधानंतरच केलेला आहे. दाखविलें कीं युद्धाला आरंभ होईपर्यंतच रघुराया दया करण्यास सिद्ध असतात. संधि अमान्य करून शत्रु अहंकारी बनला कीं ते दया करीत नाहींत. त्या शत्रूचा पूर्ण विनाश करून नंतरच आपले सेवक, सखे, सैन्य व देवादिकांवर दया करतात. अशा रीतीनें वाचक आणखी निरीक्षण करूं शकतील व आणखीं रहस्यें बाहेर पडतील.

(२) या अद्भुद रहस्याचा शोध दुसरा अनुवाद करतांना किंवा हिंदी-मराठी टीका लिहितांना अथवा गूढार्थचंद्रिकाटीका लिहून झाली तरी लागला नव्हता ! त्यामुळें सर्व ठिकाणीं मूलानुसार रघुराया शब्द घातला गेला नव्हता; व कांहीं ठिकाणीं जास्त पडला होता. प्रस्तावनेची तयारी–टांचणें–करतांना हें रहस्य अचानक बाहेर पडलें. तेव्हां न्यूनाधिक्य दूर करून मुलानुसार १९ जागींच मराठींत या शब्दाची योजना केली गेली.

(३) जेथें दयेचा उल्लेख आहे तेथें रघुराया शब्द आहेच असें मात्र नाहीं. सिद्धान्ताचा व्यत्यास नेहमीं खरा असतोच असें नाहीं. धूर असेल तेथें अग्नि असावयाचाच पण अग्नि असेल तेथें धूर असतोच असें नाहीं. याप्रमाणें श्रीहरि-गुरु-प्रेरणेनें हा एक अति अद्‌भुत नमुना यथामति दाखविला. पुढील प्रकरण 'श्रुति सिद्धान्त-मानसीं अद्‌भुत' हें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।६ 卐 卐 卐

श्रुति-सिद्धान्त मानसीं अद्‌भुत

श्रीमानसाच्या अद्‌भुत अपूर्व नमुन्यांत '*श्रुतिसिद्धान्त*' शब्द फक्त सात वेळां वापरला आहे. बालकाण्डांत एकदां आणि उत्तरकाण्डांत ६ वेळां. भिन्न भिन्न स्थळीं असलेल्या **सात वचनांचा क्रम न बदलतां,** तीं एकत्र केल्यानें एक सुसंबद्ध, न्यायघटित, सर्व-लक्षणसंपन्न विषय तयार होतो, हें परम आश्चर्य या प्रकरणांत प्रगट करून दाखविलें आहे.

१. बालकाण्ड. दो.—**नाक घासुनी नमुनि पदिं विनवीं कर जोडून ।**

विवरा रघुवर विशद यश *श्रुतिसिद्धान्त* **मिळून ॥ १०९ ॥**

(१) रघुवराचें उज्ज्वल, विमल यश विस्तारपूर्वक सांगून त्यांत श्रुतींचा सारभूत सिद्धांत सांगा असें उमा महेशांस म्हणाली. येथें श्रीरघुवराचें विशद यशवर्णन हा **विषय सुचविला;** व पूर्वार्धानें अधिकारी सुचविला. *जो रामकथाश्रवणासाठीं अति आर्त झाला असेल तो या विषयाच्या श्रवणाचा* **अधिकारी होय.** नाक घासणें, पायां पडणें व हात जोडून विनंति करणें हें अतिआर्ताचें लक्षण आहे. हें पुढें उमेनें स्पष्टच सांगितलें आहे.

' पुसतें अति आर्ता सुरराया । रघुपतिकथा वदावी सदया ॥ ' (११०।३)

(क) जें यश **श्रुतींच्या सारभूत सिद्धान्तास अनुकूल, श्रुतिसारसिद्धान्तानुसारी,** नसेल तें उज्ज्वल-विमल यश नव्हे, **तें मलिन यश होय** हा सिद्धान्त येथें सहज सुचविला.

२. उत्तरकाण्ड. दो. — ***भक्त मला प्रिय सर्वदा*** **जाणुनि हें श्रुणु काग ।**

तनुमनवचनें मम पदीं कर अविचल अनुराग ॥ ८५ म ॥

श्रुणु मम बाणा अतः, *विमल अति । सत्य सुगम निगमादिक वानाति* ॥ ८६।१ ॥

निज सिद्धान्त **सांगतों तुजला । श्रुणु मानिं धर, सब तज भज मजला** ॥ ८६।२ ॥

असें श्रीरघुपतीनें भुशुंडीस सांगितलें.

(१) **भक्त मला प्रिय सर्वदा** हें जाणून कायावाचामनानें माझ्या पदकमलीं दृढ अनुराग कर असें प्रथम (दोह्यांत) सांगितलें. पुढील चरणांत सुचविलें कीं असे भक्त मला प्रिय असतात हा माझा बाणा-पण = प्रतिज्ञा आहे. अशा भक्तांवर प्रेम करणें हा

माझा बाणा आहे. पण हा बाणा श्रुतिसिद्धान्तास सोडून असला तर ? अशी शंका येईल म्हणून सांगतात कीं, **जो माझा बाणा आहे तोच** *सत्य सुगम अति विमल* **निजसिद्धांत आहे असें निगमादिक (श्रुतिपुराणादिक) वानति;** तोच सांगतों, तो ऐक, मनांत धारण कर आणि सर्व सोडून मला भज. **येथें श्रुतिसारसिद्धान्त स्पष्ट सांगितला. जो सर्व सोडून भगवंताचें भजन करतो तो भगवंतास प्रिय होतो हा श्रुतिसारसिद्धान्त आहे.**

(**क**) भगवान रघुवराचा हाच बाणा असल्यानें त्यांचें यश या सिद्धान्तानुसारी कसें आहे हें श्रीरघुवरच अधिक स्पष्ट करतात. वरील दोन चौपायांच्या पुढल्याच चौपायांत भगवान रघुवर काकाला सांगतात कीं माझ्या मायेनें निर्माण केलेल्या संसारांत नाना प्रकारचे अनंत जीव आहेत, ते सर्वच मला प्रिय आहेत; कारण कीं मींच त्यांस उपजविलें आहे, पण त्या सर्व जिवांमध्यें

प्रिय इतरांहुनि नर मज गमले ॥ ४ ॥

त्यांत विप्र, विप्रीं श्रुतिधारी । त्यांतहि वेदधर्म-अनुसारी ॥ ५ ॥
त्यांत विरागी, विरतीं ज्ञानी । ज्ञान्यांहुनिही प्रिय विज्ञानी ॥ ६ ॥
प्रिय अति त्यांहुनि मानूं दासा । ज्या गति ममहि, न दुसरी आशा ॥ ७ ॥
सत्य सत्य मी कथितों तुजला । प्रिय सेवकसम कोणि न मजला ॥ ८ ॥
भक्तिहीन जरि विरिंचि असला । तो प्रिय सबजीवांसम मजला ॥ ९ ॥
जीव भक्तिमान् नीच जरि महा । प्राणप्रिय मज बाणा मम हा ॥ १० ॥

' *श्रुणु मम बाणा* ' असा *उपक्रम* केला व ' *बाणा मम हा* ' असा *उपसंहार* केला. हा बाणाच वेदपुराणोक्त अतिविमल, सत्य, सोपा व निज = चिरस्थायी. (अमर, व्याख्या-सुधा व गीर्वाण लघुकोष पाहा.) = शाश्वतसिद्धान्त आहे, ही *उपपत्ति सांगितली.* ' श्रुणु ' ' श्रुणु ' हा *अभ्यास* आहे. भक्तिहीन विरिंचीपेक्षां भक्तिमान अति नीच प्राणी भगवंतास प्राणप्रिय असतो ही *अपूर्वता सांगितली.* (क) ' नरसहस्रमधि... ' पासून ' यांहुनि तो दुर्लभ सुरराया ! रामभक्तिरत गत मदमाया ' (७।५४।१-७) पर्यंत पार्वतीनें अन्य प्रकारें हा बाणाच सांगितला आहे.

३. संबंध व अभ्यास स्पष्टपणें सांगतात (७।११९।३-१०)

***अतिदुर्लभ कैवल्य परमपद* । संतपुराण निगम आगम वद ॥ ३ ॥**
***स्वामि मुक्ति ती रामा भजतां । येई जबरिनें इच्छा नसतां* ॥ ४ ॥**
स्थळविण जळ कधिं राहुं न शकतें । यत्न कोटि ही करुन विविध ते ॥ ५ ॥
तसें *मोक्षसुख बघ खगराया । टिकुं न शके हरिभक्ति विना* या ॥६॥
हें समजुनि हरिभक्त सुज्ञ जे । *मुक्ति अनादृति भक्तिलुब्ध ते* ॥ ७ ॥
भक्ति करत यत्नांविण कष्टां । संसृतिमूल अविद्या नष्टा ॥ ८ ॥
तृप्ति हितास्तव करिति भोजना । पचवि जसें जठरानल अशनां ॥ ९ ॥

तशि हरिभक्ति सुगम *सुखदाती* । असा कोण जड न रुचे ज्या ती ॥१०॥
सेवक-सेव्य भावविण भवतरण न उरगारि ।
भजा राम-पद-पंकजां या *सिद्धान्त-विचारी* ॥ ११९ ॥

या वचनाच्या अंगभूत चौपायांत श्रीरामकथित सिद्धान्तच सांगितला आहे; हा *अभ्यास आहे*. मुक्तीचा अनादर करून भक्तिलुब्ध राहतात यानें 'सब तज' = सर्व सोड या रामोक्तीचा अर्थ स्पष्ट केला. मोक्षाचामुद्धां त्याग करून भजन करणारा श्रीरामास प्राणप्रिय होतो. 'सत्य सुगम' असें पूर्व वचनांत म्हटलें त्याचें स्पष्टीकरण करून *उपपत्तीचा* विस्तार येथें दृष्टान्तासह केला. 'भवतरण' हें *प्रयोजन* सांगितलें. पण *सेवकसेव्य* भावाशिवाय हें साधणें शक्य नाहीं असें सांगून *संबंध*विषयक सिद्धान्त सांगितला. 'सुखदाती' नें प्रयोजनाचें फल सांगितलें.

४. 'समजाविला **ज्ञानसिद्धान्त**' (७।१२०।१). श्रुतींचा ज्ञानाविषयीं सिद्धान्त कोणता हें मागील वर्णनांत सांगितलें. ज्ञानानें कैवल्यमोक्ष मिळतो पण तो अति दुर्लभ, दुष्कर आहे. मोक्षसुख प्रेमभक्तिशिवाय टिकत नाहीं; आणि भक्तीनें तो कैवल्यमोक्ष सहज जबरीनें जवळ येतो, दूर लोटला तरी जात नाहीं इत्यादि मागील दोह्याच्या चौपायांत सांगितलें; ही मूळ सिद्धान्ताची *उपपत्ति* आहे व हेंच *ज्ञानसिद्धान्ताचें सार आहे*.

५. वारि मथुनि घृत होइ जरि सिकतेपासुनि तेल ।
विण हरिभजन न भवतरण *सिद्धान्ताचि*, न टळेल ॥ ७।१२२ रा ॥

यांत भवतरण या *प्रयोजनाचा अभ्यास व्यतिरेकानें* सांगितला. रामभक्तीनें यत्नांविण कष्टांविण भवतरण हें फल मिळतें हा *अन्वय* पूर्वीं सांगितला. रामभक्तीवांचून भवतरण शक्य नाहीं हा व्यतिरेक सांगितला; व सिद्धान्त अटळ आहे हें विशेष सांगितलें.

६. उरगारी! हा *श्रुतिसिद्धान्ताहि* । राम भजा भुलुनी सब काजहि ॥ (७।१२३।२)
श्रीरघुवरानें सांगितलें कीं 'सब तज' = मोक्षादि सर्व कामनांचा त्याग सांगितला. येथें भजन करण्याची पद्धति *सांगितली. भजन करतांना इतर सर्व कार्यांचा सहज विसर पडला पाहिजे.*

७. कुपथ्य सांगून महेश उपसंहार करतात :

तो सर्वज्ञ गुणी तो ज्ञाता । तो महिमंडित पंडित दाता ॥ १ ॥
धर्मपरायण कुलत्राता तो । रामचरणीं मन ज्याचें रत तो ॥ २ ॥
नीतिनिपुण तो परम शहाणा । *श्रुतिसिद्धान्त-सुज्ञ तो जाणा* ॥ ३ ॥
तो कवि कोविद तो रणधीर । *भजे त्यजुनि छळ जो रघुवीर* ॥ ४ ॥

(७।१२७।१-४)

याच्या पूर्वींच्या चार ओळी संदर्भास घेणें जरूर आहे.

साधन जितकें *श्रुति वाखाणी* । *सर्वां फल हरिभक्ति* भवानी ॥ ७ ॥
***श्रुतिगीता** रघुनाथभक्ति* **ते । रामकृपें कुणि एका मिळते ॥ ८ ॥**

दो. — **मुनिदुर्लभ हरिभक्ति नर पावति विना प्रयास ॥**
जे *ही कथा* निरंतर ऐकति *युतविश्वास* (७।१२६)

येथें शंकरांनीं दोन गोष्टींची भर घातली. या श्रीरघुनाथकथेचें *युतविश्वास श्रवण* हें अनुपान सांगितलें; आणि ' त्यजुनि छल ' = इतरांचा व इतर साधनांचा भरंवसा हा भक्तींत छल आहे; हें कुपथ्य आहे. ***या कुपथ्याचा त्याग सांगितला.*** ' तो सर्वज्ञ...' इत्यादि वचनें भक्तीचा व भक्ताचा अनुपम महिमा वर्णन करणारीं *अर्थवाद* आहेत.

(क) ' श्रुतिसारसिद्धान्तयुक्त रघुवर विशदयश सांगा ' अशी प्रार्थना पार्वतीनें केल्यावरून श्रीशंकरांनीं रघुनाथकथेची फलश्रुति श्रुतिसिद्धान्तयुक्त सांगून कथेचा व येथें या प्रकरणाचा उपसंहार केला.

(ख) *रघुवीर* (वरील चौ. ४ पाहा) शब्दानें ६ प्रकारची वीरता सूचित केली. (१) *धर्मवीर* असल्यानें

'' जीव भक्तिमान् नीच जरि महा। प्राणप्रिय मज *बाणा मम हा* ॥ ''

हा त्यांचा बाणा–प्रतिज्ञा ते मोडणार नाहींत व तुमच्या नीचतेकडे न बघतां प्राणांहून अधिक प्रेम करतील. (२) *विद्यावीर* असल्यानें तुम्हांला ज्ञानी करतील. (३) *दान (त्याग) वीर* असल्यानें तुम्हांला वैराग्य व प्रेम देतील व योगक्षेम चालवितील. (४) *ऋजुतावीर* असल्यामुळें तुमच्याशीं अगदीं सरळपणानें वागतील. (५) *युद्धवीर* असल्यामुळें कामक्रोधादि समस्त शत्रूंपासून तुमचें रक्षण करतील. (६) *दयावीर* असल्यानें तुम्हीं याचना, प्रार्थना न केलीत तरी त्यांनाच तुमची दया येईल व वरील सर्व गोष्टी ते आपण होऊन करतील, फक्त तुम्हीं मागील सहा सिद्धान्तवचनांत सांगितल्याप्रमाणें रामकथाश्रवणादि भजन-भक्ति करीत राहिलें पाहिजे.

सूचना — हें विवेचन गूढार्थचंद्रिकेंत नाहीं. ५।२।५३ रोजीं या ' सिद्धान्त युक्त वचनांचा परस्पर संबंध अचानकपणें या मंदमतीच्या पुढें प्रगट झाला ! त्या वेळीं किती आनंद झाला असेल याची कल्पना अनुभवी करूं शकतील !

लक्षांत घ्यावें — बालकांडांत (दो. १०९) एक वचन व बाकीचीं सहा उत्तरकाण्डांत दो. ८५।८६, ११९।१२०, १२२, १२३ व १२७ या भिन्न भिन्न स्थळीं आहेत; पण यांच्या साहचर्यानें, मूळच्याच क्रमानें वचनें घेऊनसुद्धां, उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ति यांनीं सुसंघटित; विषय, अधिकारी, संबंध आणि प्रयोजन या अनुबंधचतुष्टयानें युक्त, आणि अनुपान व पथ्य यांच्यासह श्रीरामचरितमानसाचा सारभूत ' श्रुतिसिद्धान्त ' या एका स्वतंत्र न्यायघटित विषयाची निष्पत्ति सहज झाली ! हें पाहिलें म्हणजे कोणीहि सुविचारी व पक्षाभिमानरहित वाचक म्हणेल कीं अशी परम अद्भुत अपूर्व काव्यकला कुठें दिसणें शक्य नाहीं.

श्रीरामचरितमानसांतील मुख्य सिद्धान्त कोणता हें येथें अगदीं स्पष्ट झालें. हा

श्रुतिसारसिद्धान्त सतत ध्यानीं ठेवूनच मानसांतील विविध ठिकाणच्या वचनांचा अर्थ संगतियुक्त लावणें जरूर आहे. गूढार्थचंद्रिकेंत हें सहज साधलें आहे. (हा लेख मानस-मणिमध्यें प्रकाशित झाला आहे.)

सूचना — '*हरियान*' शब्द अरण्यकाण्डापासून उत्तरकाण्डसमाप्तीपर्यंत ९ वेळां आहे. तीं नऊ वचनें संगतिवार लावल्यानें असाच रामभक्तिप्रतिपादक स्वतंत्र सुसंबद्ध विषय तयार झाला आहे. तोसुद्धां गूढार्थचंद्रिका लेखनानंतर प्रगट झाल्यानें उत्तरकाण्ड परिशिष्टांत दिला आहे. (तो मानसमणि मासिकांत, जानेवारी १९५६, प्रसिद्ध झाला आहे.)

भूमिगत विविध तृण-वनस्पतिबीजें शोधूनसुद्धां उन्हाळ्यांत दिसत नाहींत; पण एक जोराचा पाऊस भरपूर पडला कीं भूमींतून विविध वनस्पति प्रगट होतात, तसेंच मानसांतील गूढ रहस्यांचें झालें, होत आहे; श्रीराम-गुरु-कृपा वृष्टि. भरपूर झाली कीं या वैराण प्रखर हृदयभूमीवर हे असले शोध प्रगट होतात! 'मानसिं मिळे परम विश्राम' हें पुढील प्रकरण आहे.

पार न अंत राम-उपकारा। पदिं वंदन करूं जयजयकारा ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।७ 卐 卐 卐

मानसिं मिळे परम 'विश्राम'

मागील प्रकरणांत श्रीरामचरितमानसांतील जो सारभूत श्रुतिसिद्धान्त सांगितला त्याचेंच प्रतिपादन अन्य प्रकारें मानसांतच केलेलें सांपडलें. जिवाला परम विश्राम केव्हां व कसा मिळेल या विषयाचें विवरण 'विश्राम' शब्द असलेल्या वचनांनींच केलेलें आहे; तेंच या लेखांत विशद करून दाखविलें आहे. विश्राम शब्द असलेलीं वचनें विषयसंगतिक्रमानें घेतलीं कीं एका स्वयंसिद्ध, संपूर्ण, निर्दोष विषयाचें प्रतिपादन सहज करतां येतें.

(१) **सिद्धान्त दो०—तौंवरि जीवा कुशल नहिं स्वप्निं मना *विश्राम* ॥**
जों न राम भजतो; (५।४९)

सूचना — येथें आवश्यक तेवढेंच वचन घेतलें आहे, इथें नसे शेष वच काम ॥

१. प्रत्येक जीव दुःखशोकरहित नित्य-सुख-शान्तीची इच्छा करतो व त्यासाठीं तो प्रयत्नही करीत असतो, पण त्याला पाहिजे तसलें सुख-समाधान-शांति = विश्राम, मिळत नाहीं; व त्याचें कुशल = कल्याण होत नाहीं; याचें मुख्य कारण वरील दोह्यांत सांगितलें आहे. जोंपर्यंत जीव रामभक्ति करीत नाहीं तोंपर्यंत स्वप्नांतसुद्धां विश्राम मिळत नाहीं व कुशल होत नाहीं.

२. पण हा राम कोणता ?

' पद पाताल शीर्ष अजधामहि । अंगीं इतर लोकां *विश्रामहि* ॥ ' (६।१५।१)
पाताल हे ज्याचे पाय आहेत, ब्रह्मलोक (अज = ब्रह्मा) ज्याचें मस्तक आहे, व इतर सर्व लोक ज्याच्या इतर अंगांत विश्राम पावले आहेत (राहतात) तोच तो राम.

३. तो कोण व कसा आहे ?

जो ***आनंदसिंधु सुखराशी*** **। त्रिजगीं पावे लवें सुखासी ।**
तो ***सुखधाम*** **राम तन्नाम ।** *दायक* **लोकां सब** *विश्राम* ॥ (१।१९७।५-६)
हें दशरथनंदनाच्या नामकरणाच्या वेळचें वर्णन आहे; म्हणून तो राम म्हणजे दशरथनंदन रामच सर्व लोकांना विश्राम देणारा आहे.

४. तो रघुनंदन कौसल्यानंदवर्धन सुख-विश्राम कोणाला देतो ?

जय राम शोभाधाम । *दायक प्रणत विश्राम* ॥ (६।११३।१)
त्याचा जयजयकार करीत जो कोणी प्रणत होईल, अनन्य भावानें शरण जाईल त्यालाच ते विश्राम देतात.

५. तो विश्राम कसा देतो ?

ज्याच्या कृपालेशामुळें मतिमंद तुलसीदासहीं ।
पावे *परम विश्राम*, **तो प्रभुराम, सम कोठें नहीं** ॥ (७।१३० छं. ३)
ते केवळ अल्पशी कृपा करून मतिमंद जिवालासुद्धां विश्राम देतात म्हणून त्यांनाच अनन्यगतिक होऊन शरण जाऊन त्यांचें भजन करावें म्हणजे ते कृपा करतील.

६. तो कृपा करतो म्हणजे काय होतें ?

' *बुध-विश्राम* **सकलजनरंजनि । रामकथा कलिकलुषविभंजनि** ॥ ' (१।३१।५)
बुध = ज्ञानी भक्त, संत. परमविश्राम पावलेल्या संतांची भेट राम करवितात व त्या संतांकडून विश्राम देववितात. (विण हरिकृपें भेट नहिं संतां).

(क) त्या संतांना रामकथेनें विश्राम प्राप्त झालेला असतो, व ती रामकथा ' सकलजनरंजनि ' = सर्व लोकांचें मनोरंजन करणारी आहे. ती प्रथम सकलकलिदोष व कलुष = पाप यांचा विनाश करते.

७. ही रामकथा कोणती ?

' रामचरितमानस हिज नामहि । श्रवणिं पडत *पावति विश्राम* **हि** ॥ '(१।३५।७)
या कथेचें नांव रामचरितमानस आहे; आणि संतमुखानें ही श्रवणीं पडत गेली कीं ते जीव विश्राम पावतातच.

८. पण नुसत्या श्रवणानें भागणार नाहीं.

' पावन रामगुणग्रामां श्रुत । *चित्त तव कृपें विश्रामें युत* ॥ ' (७।११५।७)
श्रीरामचरितमानसकथा काकभुशुंडीमुखानें श्रवण केल्यानंतर गरुड त्यास हें म्हणाले आहेत. ज्या संतांच्याजवळ रामचरितमानस-कथा श्रवण करावयाची त्यांच्या कृपेनें त्या

श्रवणानें विश्राम-लाभ होतो; म्हणून गुरु *(संत)* *कृपा संपादन केली पाहिजे.*

९. गुरु-कृपा-प्राप्तीचें साधन सांगतात :—(क) ' ऋषिसमेत रघुवंशमणि कृत भोजन **विश्राम** ' (१।२१७). विश्वामित्र संगतींत असलेल्या श्रीरघुनाथानें हें करून दाखविलें आहे. सद्गुरु-संगतींत राहावें. त्यांच्या *बरोबर भोजन,* ते करतील त्या प्रकारचें, *करावें. आधीं करूं नये.* त्यांच्या बरोबर त्यांच्या आज्ञेनें भोजनोत्तर विश्रांति घ्यावी. रात्रीं विश्रांति घेणें ती —

(ख) ' **मुनिवर-पद पंकजीं प्रणामा । करुनि** *कारिति आज्ञें विश्रामा* ॥ (१।२३८।५) रात्रीं गुरुचरणसेवा आवडीनें प्रेमानें करून त्यांनीं आज्ञा दिल्यानंतर विश्राम करावा; पण त्यापूर्वीं गुरुचरणकमलांस वंदन करावें. गुरूची पाद-सेवन व वंदनभक्ति सेवकभावानें प्रेमानें, आदरानें करावी. (ग) विश्रांति-निद्रा कुठें घ्यावी तें सांगतात —

' रघुवर शुचि शिंशुपातळीं जिथं करिति *विश्राम* ॥ ' (२।१९८)

ज्या रघुवराचें भजन करून, कृपा संपादन करून, परम विश्राम मिळवावयाचा ते रघुवरच जिथें (जर) पवित्र वृक्षाखालीं झोपत होते, तेथें त्यांच्या सेवकांनीं निदान तशा ठिकाणीं तरी झोपावें. पवित्र (शुचि) एकान्त ठिकाणीं चांगल्या वृक्षाखालीं झोपावें. (बाबा श्रीगंगादासचरित्र पाहा.) व लवकर उठून

(घ) ' **राम करुनि** *विश्राम* **निशिं, स्नान उदयिं तीर्थांत** ' (२।१०८)

एखाद्या तीर्थांत सविधि स्नान करावें; व नंतर श्रवणादि भजन करावें.

१०. अत्यंत आदरानें, चिकाटीनें व तितिक्षेनें श्रीरामकार्य-रामसेवा समजून श्रवणादि भजन केलें पाहिजे. श्रवणाचे वेळीं, गुरुसेवेचे वेळीं, ' पुरे आतां, विश्राम करा थोडा ' असें जरी गुरुजींनीं सांगितलें तरी असें वाटलें पाहिजे कीं,

दो०– ' रामकार्य केल्याविना कुठला मज *विश्राम* ॥ ' (५।१)

रामभक्ति व रामप्राप्ति हें कार्य झाल्याशिवाय विश्राम मिळणें शक्य नाहीं असें मनापासून वाटलें पाहिजे. आदर (= श्रद्धा) तितिक्षा, चिकाटी इत्यादि असल्या-शिवाय असें वाटणें शक्य नाहीं. आदर वगैरे केव्हां मिळतात पाहा —

११. ' विश्वासाविण भक्ति ना, द्रवति न तीविण राम ।

स्वमिंहि रामकृपेविण *जीवा नाहि विश्राम* ॥ ' (७।९० रा)

विश्वासाशिवाय श्रद्धा = आदर व दुसरे गुण मिळत नाहींत, मग भक्ति कशी मिळेल !

विश्वासादि असल्याशिवाय भक्ति नाहीं,भक्तीशिवाय रामकृपा नाहीं (राम द्रवत नाहींत) व रामकृपेशिवाय जिवाला विश्राम नाहीं. येथें *अभ्यास* = सिद्धान्ताचा पुन्हां उल्लेख *केला.* रामाच्या कृपाळु इत्यादि स्वभावावर, गुरुवचनावर व रामकथाश्रवणादि साधनां-वर दृढ विश्वास पाहिजे. (क) विश्वासादि असून गुरुमुखानें रामकथाश्रवणादि करून जर रामप्रेम उत्पन्न होत नसेल तर निश्चित समजावें कीं ' शोकधाम जो काम ' त्याचा त्याग झालेला नाहीं. म्हणूनच पहिल्याच सिद्धान्तभूत अवतरणांत सांगितलें आहे कीं;

‘ तोंवर जीवा कुशल नहिं स्वप्नि मना *विश्राम* ।

जों न राम भजतो *त्यजुनी शोकधाम जो काम* ॥ ’ (५।४६)

त्यजुनी शोकधाम जो काम—सर्व कामना व स्त्रीपुरुष-विषयक कामविकार यांना शोकाचें माहेरघर समजून-जाणून त्यांचा त्याग करूनच श्रवणादि भजन केलें पाहिजे तरच प्रेमभक्तिलाभ होऊं शकेल, अन्यथा हें शक्य नाहीं. तथापि रामकृपेनें व गुरु-संत-कृपेनें शोकधाम कामाचा नाश होईल; व कामनाश झाला का भक्तीनें संतोष होईल.

१२. कधिं *विश्रामा* **ठाव तात सहज संतोष विण ।**

चले किं जलविण नाव मरमर केले कष्टतरि ॥ (७।८९ म)

सहज संतोष प्राप्त झाला कीं विश्राम मिळेल.

१३. ‘ त्या किं संपदा शकुन शुभ स्वप्निंहि मनिं *विश्राम* ।

भूतद्रोही मोहवश, रामविमुख ... ॥ (६।७८)

भक्ति प्राप्त झाल्यावरसुद्धां तो जर भूतांचा द्रोह करील तर तो मोहवश होऊन रामविमुख होईल; व विश्राम मिळणार नाहीं.

१४. भूतद्रोह करणें म्हणजेच रामविमुख होणें.

जगदात्मा प्राणाधिप रामहि । तद्विमुखा किं मिळे *विश्रामहि* ॥ (६।३५।६)

सर्व जगाचा, सर्व भूतांचा आत्मा रामच आहे, तोच स्वतःच्या व इतरांच्याहि प्राणांचा अधिपति आहे. यामुळें भूतांचा द्रोह, वैर, विरोध करणें म्हणजे सर्व भूतान्तरात्मा जो राम त्याचाच द्रोह करणें होय; मग अशानें विश्राम कसा मिळेल ? (क) भक्तांच्याकडून चुकून भूतद्रोह घडला तर त्याला राम आपल्या मायेनें मोहित करतात. ‘ भूतद्रोही मोहवश ’ होतो. राममायेनें मोहित झाला कीं,

१५. बहुतपरीं समजावितां मना नव्हे *विश्राम* । (७।८२ म)

हें राममायामोहित झालेल्या काकाचेंच वचन आहे. अशा वेळीं पूर्वीं सांगितलेला एकच उपाय आहे,

जय राम शोभाधाम । *दायक प्रणत विश्राम* ॥ (६।११३।१–)

असें म्हणून पुन्हां शरण जावें व क्षमा मागावी म्हणजे मग मायेला आकर्षून घेऊन,

१६. जगनिवास प्रभु प्रगटे अखिल लोक *विश्राम* ॥ (१।१९१)

प्रभु जगन्निवासच असल्यामुळें तेथेंच प्रगट होतील; आणि

१७. घेति दुःखिजन दोन दिन मुखदर्शन-*विश्राम* ॥ (२।२४८)

त्या दुःखी जनाचे (भक्ताचे—दासाचे) दीन झालेले दोन (डोळे) श्रीराममुखदर्शनानें विश्राम घेतील ! त्या शोभाधाम, आनंदसिंधु सुखराशी, सुखधाम राममुखाकडे निरखून पाहिलें म्हणजे विश्राम मिळेल. आणि त्यानें प्रार्थना केली कीं,

१८. *हृदयकमार्ली त्यांचे सदा करतों मी विश्राम* ॥ (३।१६।–)

असें ज्या रामप्रभूंनीं म्हटलें आहे ते स्वतः सीतालक्ष्मणांसहित त्या जिवाच्या हृदयांत

निवास करतात. ज्याच्या हृदयांत धनुर्बाणधारी श्रीरघुवीर विश्राम करतील त्याला परमविश्राम सतत मिळेल यांत नवल काय?

लक्षांत घ्यावें — १८ परिच्छेदांनीं केलेल्या वरील सर्व विवेचनांत जीं २१।२२ मानस-अवतरणें वापरलीं आहेत त्या प्रत्येकांत '*विश्राम*' शब्द आहे. इतर कोणतेंहि मानसवचन भरतीस घ्यावें न लागतां हें सर्वांगपूर्ण, सुंदर, सोपें प्रकरणच तयार झालें कीं नाहीं याचा वाचकांनींच विचार करावा. बालकाण्डापासून उत्तरकाण्डापर्यंत भिन्न भिन्न संदर्भानें भिन्न भिन्न ठिकाणीं वापरलेलीं हीं वचनें एकत्र करून विषयानुरोधानें त्यांचा क्रम लावणें इतकेंच साधें कार्य सहज अल्पावकाशांत घडल्याबरोबर सुसंबद्ध स्वतंत्र विषयाचें एक प्रकरणच त्यांतून निघालें.

'जिवाला विश्राम केव्हां मिळतो' हें सांगणारीं वचनें प्रत्येक काण्डांत आहेत कीं नाहींत, हें पाहण्यासाठीं काण्डानुक्रमानें त्यांचें संकलन करण्याचें कार्य एका व्यक्तीस करण्यास सांगितलें. त्या व्यक्तीनें विश्राम शब्द असलेलीं सर्वच वचनें काण्डानुक्रमानें लिहून तो कागद पुढें ठेवला. तीं वचनें वाचून पाहतांनाच हृदयांत प्रकाश पडत गेला व ठरलें कीं यांत एक सुसंगत विषय गोंवलेला आहे. पुढलें कार्य करण्यासाठीं संगति लावून क्रमांक घातले गेले व एका तासाच्या आंत प्रकरणलेखनास प्रारंभ (२५।२।५६) होऊन तें सहज लिहिलें गेलें! मागल्या दोनचार प्रकरणांचेंहि असेंच घडलें. वचनें एकत्र करण्यांत हेतु एक व त्यांतून निराळीच फलप्राप्ति म्हणजे वरच्यासारखे अनेक लेख!

श्रीरामचरितमानस-कथा श्रवण, कथन कुठें करावें? — श्रद्धावान, अतिआर्त, तळमळीचा, भाविक श्रोता व परम विश्राम पावलेला रामभक्त मानसवक्ता-गुरु यांनीं श्रीरामचरितमानसकथा-श्रवण-कथन कुठें करावें हेंसुद्धां '*विश्राम*' युक्त वचनानेंच सुचविलें आहे.

(१) **त्रिविध पवन शीतल छाया अति । शिवविश्राम-विटप गाती श्रुति ॥**
(१।१०६।३) हा उल्लेख वटवृक्षाचाच आहे.

तिथें *विटप* वट विशाल, गिरिवर । नित्य नवा त्रयकाळीं सुंदर ॥ (१।१०६।२)
कैलासपर्वतावर विशाल वटवृक्षाखालीं शिव-पार्वतीसंवाद होऊन तेथेंच श्रीरामचरितमानसकथा-श्रवण-कथन झालें.

(२) भुशुंडीसुद्धां पर्वतशिखरावरील विशाल वटवृक्षाखालींच रामकथा सांगतात. 'वटतळिं करि हरिकथा मनोरम' (७।५७।७) व तेथेंच

'पावन रामगुणग्रामां श्रुत । *चित्त* तव कृपें *विश्रामें युत*' (७।११५।७)
असें गरुडानें सांगितलें आहे.

(३) चित्रकूटास ज्या वेदीवर बसून रघुवीर, सीता, लक्ष्मण श्रवण करीत ती वेदिका अशा सुंदर विशाल वटवृक्षाखालींच बनविलेली होती.

'वटछाये वेदिका विरचिली– । सुंदर सीतेनें करकमलीं ॥

दो.– बसुनि स-मुनिगण जेथ नित सीताराम सुजाण ।
श्रवति कथा इतिहास सब आगम निगम पुराण ॥ (२।२३७।–)

तेथेंच अयोध्यावासी

' **घेति दुःखिजन दोन दिन मुखदर्शन** *विश्राम* ' (२।२४८). ॥

(४) एखाद्या पावन, एकान्त, रम्य पर्वतशिखरावर सुंदर विशाल वटवृक्षाखालीं वर सांगितल्यासारखे गुरुशिष्य यांनीं श्रीरामचरितमानस कथन व श्रवण केलें तर जो विश्राम मिळतो तो कसा असतो पाहा —

' **असे रामगुण-गणांस सांगत । अनिर्वाच्य विश्रामा पावत** ' (५।८।२)

त्या परमोत्तम सुखसमाधानाचें वर्णन कोणीहि करूं शकणार नाहीं । *त्यांचें सुख ते जाणती परानंद-संदोह* '

सूचना — ' विश्राम ' शब्द असलेल्या आवश्यक तेवढ्याच वचनांचा या लेखांत उपयोग केला आहे. एकंदर वचनें तीस आहेत. येथें २३।२४ सच वापरावीं लागलीं.

अनुपम अद्‌भुत कला तुलसिची । निरुपम अद्‌भुत कृपाहि हरिची ॥
श्रीमानसगूढार्थ-चंद्रिका । दाखवि ना या परम कौतुका ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।८ 卐 卐 卐

मानसिं ' मंदिर ' सुकवि-भावना

महाकविकुलचक्रचूडामणि श्रीगोस्वामींनीं आपल्या स्वतःच्या गूढ भावना व गूढ भावार्थ प्रदर्शित करण्यासाठीं वापरलेल्या विविध संकेतांत व काव्यकलांत ' मंदिर ' शब्दाचा उपयोग, आपली स्वतःची भावना प्रदर्शित करण्यासाठीं केलेला आहे हें रहस्य कांहीं वर्षांपूर्वींच केवळ श्रीहरि-गुरुकृपेनें प्रगट झालें व ७।६।१९५२ रोजींच एक विस्तृत लेख लिहिला गेला; त्याचें सार येथें थोडक्यांत दिलें आहे.

१. सकल विराजति मंदिरिं राणी । शोभा शील तेज सत्खाणी ॥ (१।१९०।७)
मूळांत ' मंदिर रानी ' असा अप्रत्यय शब्द असल्यानें श्लेष साधतो पण मराठींत अप्रत्यय सप्तमी वापरण्याचा प्रघात नाहीं त्यामुळें मंदिर शब्दाचा मूलानुसारी तंतोतंत उपयोग सर्वत्र साधला आहे असें नाहीं. ल. ठे. *मानसांत बालकांडांतील १८९ दोह्यानंतर या चौपाईत हा शब्द प्रथम वापरला आहे.* एकंदर ३५ वेळां मंदिर शब्द वापरला असून गुणमंदिर, सुखमंदिर, क्षमामंदिर व सुंदरतामंदिर मिळून ९ वेळां (५,२,१,१) वापरले आहेत.

२. मंदिर शब्दाचा अर्थ गृह, घर असा संस्कृत कोषांत असला तरी संस्कृतांत-सुद्धां ' मन्द्यते सुप्यतेऽत्र ' जेथें निद्रा घेतली जाते (अ. व्या. सु.) या अर्थानें गृह घर = मंदिर ठरतें पण ' मदि स्तुत्यादौ (भ्वादि. आ. सेट) स्तुति, पूजा, इत्यादि

जेथें केलें जातें तें मंदिर हा अर्थ आहेच. खालील उदाहरणांवरून हें मानावेंच लागेल कीं मानसांत मंदिर शब्द विशिष्ट हेतूनेंच वापरलेला दिसतो.

(१) 'विप्रवास *सुरसदनें* सुंदर' (१।१५५।८), (२) गिरिजागृह (१।२२८।४), गौरिनिकेत (१।२२८।५) आणि 'भवानी-भवन' (१।२३५।४), **(३)** '***मंदिर*-मणिगण जणुं तारा अति । *नृपगृह*कळस किं पूर्ण निशापति ॥**' (१।१९५।६) यांत मंदिर = कौसल्येचा महाल आणि नृपगृह = चक्रवर्ती दशरथ महाराजांचा वाडा ! **(४)** 'प्रतिमंदिरिं मंदिरीं करीं शोधा' (५।५।५), राक्षसांच्या घरांना मंदिर म्हटलें ! दशानन-मंदिर (५।५।६), **(५)** 'हरिमंदिर' (५।५।८), **(६)** रामायुध-अंकित *गृह* (५।५।–) *बिभीषणाच्या घरास,* (७) 'कृपासिंधु मंदिरिं गत' (७।९०।३) श्रीरामप्रासादास, (८) 'रघुपति निज मंदिरिं गत' (७।४२।३), **(९)** 'शिवमंदिरिं' (७।१०५।८), 'हरमंदिरीं' (७।१०३ रा), (१०) 'हाटवाट *मंदिर* **सुरसदनें**' (१।२८७।४).

३. वरील अवतरणांत दिसणाऱ्या चमत्कारिक गोष्टी

(**क**) देवांच्या देवळांना व देवीच्या देवळास *मंदिर* न म्हणतां सदन, निकेत, भवन, गृह म्हटलें (१) व (२) पाहा. आणि लंकेंतील राक्षसांच्या सर्व घरांना व रावणाच्या राजवाड्याला *मंदिर* म्हटलें ! (४) पाहा. (**ख**) विप्रवास, सुरसदनें व दशानन मंदिर ! (१) व (४) पाहा. (**ग**) लंकेंतील इतर सर्व राक्षसांचीं घरें *मंदिरें* पण बिभीषणाचें मात्र गृह ! (४,५ पाहा). (**घ**) हरिमंदिर, शिवमंदिर आणि रघुपति-निवासस्थान *मंदिर* आहेत. (५,९,८ पाहा) (**ङ**) कौसल्येचा महाल *मंदिर* आणि दशरथ महाराजांचा राजवाडा *गृह* ! (**च**) एकाच वाक्यांत मंदिर आणि सुरसदनें हे शब्द ! या सर्व गोष्टी उचित वाटतात का ? श्रद्धावंत हिंदू वाचकांच्या कानांना व मनाला या कशा वाटतात ?

४. जोंपर्यंत मंदिर शब्दाच्या उपयोगांतील मर्म समजत नाहीं तोंपर्यंत यांत औचित्यभंग, आचारविरुद्ध व पुनरुक्ति हे दोष दिसतात; पण हेतु कळल्यावर या कल्पनांची व वाटण्याची वाफ होऊन त्यांची जागा आदर व आश्चर्य पटकावतात !

(**क**) महारुद्र हनुमंताची पाषाणादिकांची अचेतन जडमूर्ति जेथें स्थापन केलेली असते त्या स्थानास आपण हनुमानमंदिर, मारुतीचें देऊळ, म्हणूं कीं मारुतीचें घर म्हणणारांस वेडे म्हणूं ? (**ख**) पाषाणांच्या अचेतन मूर्तींच्या अस्तित्वानें तीं घरें जर मंदिरें, देवळें होतात, तर ज्या घरांत किंवा घरांच्या छपरांवर साक्षात् चालते बोलते अंजनीकुमार उभे राहिले तीं राक्षसांचीं घरें मंदिरें झालीं कीं नाहीं ? रामभक्त नसणारेसुद्धां त्यांना मंदिरेंच म्हणतील; मग श्रीतुलसीदास परमरामभक्त असल्यामुळें त्यांच्या अंतर्दृष्टीस त्या त्या घरांत, हनुमान शिरलेले, उभे असलेले, हिंडत असलेले दिसल्यावर ते त्या घरांना मंदिर म्हणतील यांत नवल काय ? लंकेंतील बिभीषणाच्या

घरास मंदिर न म्हणतां रामायुध अंकितगृह म्हटलें; तेव्हां हनुमान त्या घराच्या बाहेर होते, घरांत गेलेले नव्हते, म्हणून तें मंदिर नाहीं हें योग्यच आहे. लंका-दहनाच्या वेळीं ज्या घरांवर मारुति चढले तीं त्या वेळीं मंदिरें झालीं. बिभीषणाचें गृह जाळावयाचें नव्हतें म्हणून त्यावर पवनकुमार चढले नाहींत म्हणून - पुन्हां 'बिभीषणगृह 'च म्हटलें आहे. या भावनेमुळें सुंदरकाण्डांत मंदिर शब्द राक्षसांच्या घरांना वापरला आहे; *त्याचा संबंध हनुमंताशीं आहे.*

५. गोस्वामीजी रामभक्त असल्यामुळें श्रीराम ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष राहतात तीं स्थानें मंदिरें झालीं कीं नाहीं ? यामुळेंच कौसल्येचा महाल मंदिर झाला आणि दशरथांचा राजवाडा घरच राहिला, तें (१।१९५।६) वचन श्रीरामजन्मोत्सव-वर्णनांत आहे. त्या वेळीं श्रीराम कौसल्येच्या महालांतच होते. जोंपर्यंत बाल रामचंद्र दशरथांच्या राजवाड्यांत गेले नव्हते तोंपर्यंतच तो घर राहिला पुढें मंदिर झाला आहे.

(क) ज्याच्या हृदयांत धनुर्धारी किंवा अन्य सगुण साकार रूपानें श्रीराम रघुनाथ राहिले तीं हृदयें व त्या व्यक्तिसुद्धां राममंदिरेंच बनल्या आहेत.

' मायपिता गुरु सखा धनि ज्यां सब तुम्हींच तात ।
मनमंदिरिं **त्यांचे रहा** *सीतेसह रघुनाथ* ' (२।१३०।–).

(ख) ज्यांच्या हृदयांत राम-रघुपति राहिले त्या व्यक्ति जेथें राहतात *तीं स्थानें-सुद्धां राममंदिरच बनतात.* प्रभु रामचंद्र कौसल्येच्या गर्भांत अवतीर्ण झाल्याचें ठरतांच तें अंतःपुर मंदिर झालें आहे. (१।१९०।७). *याप्रमाणें श्रीरामनिवास-स्थानांत मंदिर शब्द वापरला आहे.* श्रीराममंदिरांत हनुमान असतातच तरी त्याला मारुति-मंदिर म्हणत नाहींत; त्या प्रमाणेंच सुन्दरकाण्डाशिवाय इतर कांडांत *हनुमंतांचीं मंदिरें* नाहींत; तीं फक्त *सुन्दरकाण्डांतच आहेत.* याप्रमाणें श्रीराम-निवासस्थानांस मंदिर शब्द वापरला आहे. राम आणि हरि एकच '*रामाख्यमीशं हरिम्* ' (बाल. मं. श्लो. ६) म्हणून सुंदरकांडांत बिभीषणाच्या हरिमंदिरास हरिमंदिर म्हटलें आहे.

६. शिवमंदिर, हरमंदिर हे शब्द उघडच वापरले असल्यानें *शंकरांचें देवालय मंदिर आहे.* आतां ' हाट वाट मंदिर सुरसदनें ' (१।२८७।४) (पूर्वी परिच्छेद २ मध्यें दिलेलें १० वें उदाहरण) यांत द्विरुक्ति राहते का ?

(क) शिव, हनुमान किंवा राम या तिघांच्या स्थानांसच मंदिर शब्द वापरला आहे. जनकपुरींतील ' हाट वाट सुरसदनें ' शृंगारण्यास सांगितलीं त्या वेळीं हनुमान जनकपुरींत नाहींत. विश्वामित्र गुरु आणि राम शिष्य असा संबंध असून दोघे एकाच सुंदर सदनांत राहत असल्यानें जनकपुरींतील शृंगारण्यासारखें घर राममंदिर असणें शक्य नाहीं, म्हणून मंदिर = एक विशिष्ट शिवमंदिर हा अर्थ सिद्ध झाला. एकाच शिवमंदिराचा स्वतंत्र उल्लेख जनकराजानें केला आहे, म्हणून जनकराजांचें शिवमंदिर

असा अर्थ स्पष्ट झाला. मानसांतील जनकराजा शिवपूजक आहेत हें एका स्वतंत्र लेखानें मानसाधारें सिद्ध झालें आहे; तो लेख = प्रस्तावना प्रकरण १६।३ पाहा.

सूचना :— मूळ हिंदी मानसांत जेथें मंदिर शब्द आहे तेथें मराठींत या आवृत्तींत त्याचें संरक्षण झालें आहे. जास्त ठिकाणीं मंदिर शब्द मराठींत नाहीं. (**क**) सुंदर काण्डांतील 'मंदिर' हनुमानमंदिरवाचक शब्द आहे. (**ख**) किष्किंधा काण्डांतील विवरांत 'मंदिर' = शिवमंदिर आहे. मानसांत शिवमंदिरें फार थोडीं आहेत. (**ग**) लंकाकांडांत युद्धवर्णनांत एक 'मंदिर' आहे तो 'मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद' या श्रीभागवतोक्तीच्या आधारें राममंदिरसूचक आहे. जेथें जेथें मंदिर शब्द वापरला आहे तेथें गूढार्थ चंद्रिकेनें त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. हिंदी टीकाकारांना हें मर्म न कळल्यामुळें उडालेला सावळा गोंधळ किंवा मौन त्यांच्या टीकांत पाहावें.

हें रहस्य तुलसीचें सुंदर। विदित गुरुकृपें मतिस मदंतर ॥
तदा मोद जोम हा मिळाला। कसा वाणिला ये बोलाला ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।९ 卐 卐 卐

मानसिं मंगल विपुल हि दुर्मिळ ॥

श्रीरामचरितमानसांत मंगल शब्द (सुमंगल व समासगत धरून) १७७ वेळां वापरला आहे. त्यांत बालकांडांत १००, अयोध्या ६७, अरण्य ०, किष्किंधा १, सुंदर ३, लंका ० व उत्तरकांडांत ६ वेळां आहे.

१. बालकाण्ड मंगलाचरण श्लोक १ मध्यें '*मंगलानां च कर्तारौ*' म्हटलें आहे तें राम व सीता यांविषयीं आहे हें गूढार्थचंद्रिकेंत सप्रमाण, मानसाधारें व विनयपत्रिकेंतील वचनें यांनीं सिद्ध झालें आहे.

(**क**) जिथें कुठें मंगल शब्द वापरला आहे तिथें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राम किंवा सीता यांचाच संबंध आहे. गंगा रामचरणोद्भव, विप्रचरणचिह्न रामहृदयावर इत्यादि प्रकारें राम किंवा सीता यांचा संबंध दिसतो. जास्त प्रमाणांत रामसंबंधच आहे. बाल. मं. श्लो. १ च्या टीकेंत पुष्कळ नमुने दाखविले आहेत.

(**ख**) राम 'मंगलभवन अमंगलहारी' (१।११२।४) आहेत.

बालकांड १०० वेळां 'मंगल' — बालकाण्डांतील मंगल शब्दाचीं स्थानें पाहिलीं कीं कवीच्या अद्भुत काव्यप्रतिभेचें साश्चर्य कौतुक करावेंसें वाटतें.

१. दो. १ – ४२ पर्यंत २२ वेळां 'मंगल' आहे; पण दो. ४३ पासून 'मंगल' दिसेनासा झाला तो ६६।४ पर्यंत! असें कां? या भागांत सतीमोहापासून सती देहपरित्यागापर्यंतची कथा आहे. या प्रकरणांत श्रीरघुनाथानें उपासनात्मक सात्त्विक

विश्वरूप सतीला दाखविलें असूनसुद्धां सतीचें मंगल = कल्याण होण्याची शक्यता 'मंगल' शब्दास न दिसल्यानें तो आला नाहीं. (क) हिमालयाच्या येथें पार्वतीचा जन्म झाल्यानें त्याला एकदां (६६।४) यावेंच लागलें.

२. दो. ६६।४ नंतर तो दिसेनासा झाला आणि ९१।८ मध्यें त्याला येतां आलें. असें कां? शंकर पति मिळाले तरच आपलें मंगल = कल्याण होणार अशी पार्वतीची दृढ भावना असल्यामुळें, शंकरांशीं विवाह ठरूनसुद्धां शिवसमाधीनें त्यास येऊं दिलें नाहीं. जेव्हां विवाहाची तयारीच सुरू झाली तेव्हां त्याला येतां आलें. (९१।८). रामचंद्रांनींच *शिवास* विवाह करण्याची गळ घातली तेव्हां शंकर कबूल झाले.

३. नारदमोह प्रकरणांत विश्वमोहिनीचा स्वयंवर *मंगलोत्सव असूनसुद्धां 'मंगल' मुळींच नाहीं हें आश्चर्य नव्हे काय?* नारदासारख्या महाभगवद्भक्तास, शिवप्रिय-रामभक्तास, मोहित करून त्याची फटफजीती करण्यासाठींच विश्वमोहिनी स्वयंवर भगवंताच्या विश्वमोहिनीनेंच विरचित! तिथें शिवप्रिय रामभक्ताची फजीती पाहण्यास 'मंगल' येतो कशाला! (*शिवं भद्रं कल्याणं मंगल* शुभम्)

४. दो. १४१ मध्यें मनु-शतरूपा-आख्यानाचा उपक्रम करतांना त्या *सर्व कथेला* (१४१–१५२) 'रामकथाकलिमलहरणि सुंदर *मंगलकारि*' (१।१४१) म्हटलें आहे. या कथेनेंच 'मंगलभवन अमंगलहारी' रामचंद्रांच्या अवताराची पूर्व-तयारी केली.

५. प्रतापभानु-आख्यानांत त्यानें *दिग्विजय केल्याचें वर्णन असूनही 'मंगल' नाहीं!* रावणादींचे अवतार, तपश्चर्या, दुर्लभ वरप्राप्ति इत्यादींत तर 'मंगल' नाहींच नाहीं पण रावणविवाह, व कुंभकर्ण बिभीषणविवाह इत्यादींतसुद्धां 'मंगल' नाहीं! रावणाच्या भयानें आला नाहीं!

६. रामजन्म-पुत्रजन्म-झाल्याचें दशरथास व अयोध्येंत कळतांच 'मंगलायतनं हरिः'चाच जन्म झाल्यानें तेथें त्यांच्या दर्शनास 'मंगल' वारंवार आला नसता तर तो अभागीच ठरला असता! (१९४।४)

७. विश्वामित्रांबरोबर निघाल्यापासून *'अमंगलहारी' चरित्राचा प्रारंभ झाला* तो अहल्योद्धारापर्यंत. (२११) नंतर *मंगलभवन चरित्राचा प्रारंभ होतो.* अमंगलाचा नाश केल्याशिवाय मंगल होत नाहीं.

८. धनुर्भंग होऊन जयमाला-समर्पण होईपर्यंत 'मंगल' अगदीं तोऱ्यानें वारंवार मिरवते आहे. (२६३।१ पर्यंत).

९. नंतर दुष्ट राजांचा उर्मटपणा व त्यांनीं चिलखतें चढविलेलीं पाहून तो दचकला व मंडपांतून पळाला; ही फुसकी फुशारकी फुकट जाणारच व मग मंगलवेष करून आपण जाऊं; म्हणून कुठेंतरी लपून बसला होता; पण 'शांत वेष करणी कठिण' असा वीररसच येत असलेला त्याला दिसला (परशुराम आले) तेव्हां मात्र त्याची

बोबडीच वळली ! चिंताग्रस्त होऊन राहिला लांब जाऊन ! परशुराम धनुष्यबाण-रहित, निस्तेज झालेले, तपश्चर्येस जातांना त्यानें पाहिले तेव्हां तो निर्भय झाला.

१०. दो. २८६।१ मध्येंच 'मंगल' परम प्रसन्न होऊन आला व त्याची उत्तरोत्तर एकदम भरभराट होत गेली ती अगदीं बालकाण्डाच्या समाप्तीपर्यंत. 'मंगलायतन रामयश' (१।३६१). (क) पहिल्या ४२ दोह्यांत २२ वेळां, ४३ पासून २८५ पर्यंत फक्त १५ वेळांच मंगल आहे; पण २८६ पासून ३६१ या ७६ दोह्यांत ३६ वेळां आहे. एकदम खूप भरभराट झाली कीं नाहीं ?

२. **अयोध्याकांड — ६७** वेळां-विस्तार वांचविणें आवश्यक असल्यानें व विचाराची दिशा बालकाण्डांत सविस्तर दाखविली असल्यानें येथें नुसतें दिग्दर्शन करणें भाग आहे.

	दोहे		वेळां
१– १५	१५	कैकयी रामप्रेमी असेपर्यंत	१८
१६– ५३	३८	वनवासवार्ता पसरेपर्यंत	७
५३– ८७	२४	रामशृंगवेरपुरास पोंहोचेपर्यंत	०
८७–१३९	५२	राम चित्रकूटास जाऊन राहीपर्यंत	८
१३९–१५१	१२	फक्त एकदां रामसंदेशांत	१
१५२–१९२	४०	भरत शृंगवेरपुरास येईपर्यंत	०
१९३–३२६	३३	भरत शृंगवेरपुरास पोंहोचल्यापासून पादुका घेऊन परत येऊन अयोध्या काण्डसमाप्तीपर्यंत.	३३

यावरून ठरवावें कीं मंगलानां कर्तारो सीताराम कीं सरस्वती-गजानन ? राम गेले तेव्हां त्याच्याबरोबर 'मंगल' गेला. श्रीरामपादुका मिळाल्या म्हणून शेवटीं मंगल पुष्कळ वेळां आहे. मंगलाची विपुलता, दुर्मिळपणा व अभाव यांचीं कारणें फार उद्बोधक आहेत, तीं वाचकांनींच शोधावींत.

३. **अरण्यकाण्ड—मंगलाचें नांवहि नाहीं !** या काण्डांत मंगल शब्द कां असूं नये ?

(१) **जैं येउनि राहति रघुनायक। तैं पासूनि** *वन मंगलदायक* ॥ (२।१३७।५) **असें जर चित्रकूटास घडलें** तर मग तेच रघुनायक कित्येक वर्षें सीतेसह व लक्ष्मणा-सह पंचवटीवनांत पवित्र गोदातटीं राहिले तरी पंचवटीवन मंगलदायक कां झालें नाहीं !

(क) चित्रकूटवन मंगलदायक झाल्यावर :—

'**नानाविध तरु फुलले फळले । मंजुलता मंडप वर बनले** ॥ ६ ॥
सुरविटपांसम सहज सुशोभन । येती जणुं सोडुनी विबुधवन ॥ ७ ॥
गुंजति मधुकर मंजु कदंबक । त्रिविधवायु वाहे सुखदायक ॥ ८ ॥

दो०—**नीलकंठ कलकंठ शुक चातक चक्र चकोर ।**
बोलति बहुविध विहग बहु श्रवणसुखद मनचोर ॥ (२।१३७) ॥

(**ख**) राम पंचवटीस येऊन राहिल्यावर काय घडलें पाहा —

तिथें राम जैं निवास करती । सुखी होति मुनि भया विसरती ॥
छविपूरित गिरि सरसरिता वन । होती प्रतिदिन अतिशय शोभन ॥
खगमृग-गण आनंदें नांदति । मधुप मधुर गुंजति छवि पावति ॥
वर्णुं न शकति वना अहिराजे । जिथें प्रगट रघुराज विराजे ॥ (३।१४।१–४)

बाकी सर्व गोष्टी, सर्व परिणाम चित्रकूटाला झाला तसाच पंचवटीस झाला. परंतु वन मंगलदायक बनलें नाहीं ! असें कां ? आतां प्रवर्षणगिरीवर काय घडलें पाहा —

(**ग**) **सुंदर वन कुसुमित अति शोभे । गुंजति मधुप निकर मधुलोभें ॥**
कंद मूल फल पत्र रुचिर अति । झालीं विपुल यदा प्रभु पावति ॥
शैल मनोहर अनुपम पाहति । अनुजासह सुरभूपति राहति ॥
मंगलरूप बने वन तैं तें । करिति निवास रमापति जैं तें ॥

येथेंसुद्धां वन वगैरेवर सारखाच परिणाम झाला; व ***वन मंगलरूप बनलें.*** असें असतां अरण्यकांडांतील पंचवटीवन मंगलदायक न झालें तरी मंगलरूप कां होऊं नये ? टीकाकार म्हणाले असतील कदाचित् कीं दोन्हींपैकीं कोणतें तरी वचन अध्याहृत ध्यावें. किंवा ते मौनच राहिले असतील ! अध्याहृत घेणें म्हणजे तुलसीमानसाचें सौंदर्य नष्ट करणें होय; व दोन वचनांपैकीं एक घेतांना व एक सोडतांना कारणें दाखवावीं लागतील ! मौन राहणें म्हणजे अज्ञान झांकून ठेवणें होय.

(२) रघुनायक मंगलायतन असून, मंगलभवन असून पंचवटीवन मंगलरूप किंवा मंगलदायक वगैरे झालें नाहीं हेंच अगदीं योग्य व सकारण आहे. जोंपर्यंत हिंगानें भरलेले विपुल डबे आजूबाजूला उघडे आहेत तोंपर्यंत मध्यें असलेल्या मृगमदानें भरलेल्या उघड्या डब्यांतील कस्तूरिका–आमोद दरवळूं शकेल काय ? अमंगलकारी शूर्पणखा, खरदूषणत्रिशिरादि हजारों राक्षसांचा निवास जेथें आहे तेथें त्यांचा संहार होण्यापूर्वी मंगल झाल्याचें वर्णन केलें असतें तर *'मंगलभवन अमंगलहारी'* (दशरथ-अजिर-विहारी) (१।११२।४) या मानसांतील वचनावर हरताळ फासावा लागला असता कीं नाहीं ? अमंगलाचा संहार केल्याशिवाय मंगल होऊं शकत नाहीं.

(**क**) त्या अमंगलांचा संहार केला तरी आधींच अमंगल असलेली व नाककान कापले गेल्यानें, अति अमंगल झालेली, पळून गेलेली, सूप-नखा अमंगलांच्या मुकुटमणीला केव्हां घेऊन येईल याचा नेम नव्हता. कारण, 'तिचे करीं रावणा जणुं दिधलें कीं आह्वान' (३।१७) असें खरदूषणवधापूर्वीच घडलें आहे. पुढें लगेच सीताहरण झालें व रघुनाथ पंचवटींतून गेले; म्हणून पंचवटीवनांत मंगल नाहीं व अरण्य-कांडांत 'मंगल' नाहीं.

४. किष्किंधाकांड– फक्त एकदांच (१–३,५) मंगल शब्द आहे. (१) अवतरण वर १ (ग) दिलें आहे. वालीसारखा रावणसखा-अमंगलकारी जिवंत होता तोंपर्यंत या काण्डांत ' मंगल ' नव्हतें. सुग्रीवाचें पूर्ण कल्याण झालें आणि मग ' मंगलरूप बने ' वन तें. (क) वन मंगलरूप बनलें पण सीतेचा शोध न लागल्यामुळें रघुनाथ विरहातुर झाले आहेत म्हणून वन मंगलदायक झालें नाहीं.

५. सुंदरकांड–तीन वेळां ' मंगल ' आहे. (१) या कांडाच्या पूर्वार्धाचा संबंध लंकेशीं असल्यानें व सीता-शोध-समाचार रघुनाथास न मिळाल्यामुळें पूर्वार्धांत मंगल नाहीं. (क) कपिकटकांसमेत युद्धप्रयाण केलें तें जगमंगलकारक ठरणार असल्यानें प्रयाणारंभीं मंगल शकुन झाले. (३५।५). ३७।२ मध्यें रावणानें सर्व आयुष्यांत एकदांच ' मंगल ' उच्चारला आहे. रघुवीर सेनेसह परतीरावर उतरल्याचा समाचार मंदोदरीला मिळतांच तिनें जो प्रथम उपदेश केला, तो ऐकल्यावर रावण तिला म्हणाला कीं ' भित्रा नारीस्वभाव साचें। *मंगलांत* भय मन अति काचें ' ॥ (३७।२). रामप्रभूच्या बाणांनीं मरून आपलें मंगल होणार अशी त्याची खात्री झाली; पण मंदोदरीला मर्म कळलें नाहीं. सेतुबंधनाची युक्ति दो० ६० मध्यें (शेवटीं) कळली; तेव्हां आतां रावणाचा वध व सीताप्राप्ति होऊन जगमंगल होणार हें ठरलें म्हणून उपसंहारांत एकदां मंगल आहे.

६. लंकाकांड–मंगल औषधालासुद्धां नाहीं. लंका अमंगलांचा बालेकिल्ला असल्यानें रावणवधानें ' अमंगलहारी ' खरें ठरेपर्यंत मंगल असणें शक्यच नाहीं. रावणवध होऊन बिभीषण, रामभक्त, लंकाधीश झाला तरी अमंगलखाण शूर्पणखा व सर्व राक्षसस्त्रिया जिवंत राहिल्याच व युद्धांतून पळून गेलेले वगैरे राक्षस राहिलेच म्हणून नंतरसुद्धां मंगल नाहीं आणि भरतभेटीची चिंता रघुथानास लागली म्हणूनही मंगल नाहीं.

७. उत्तरकांड–सहा वेळां ' मंगल ' आहे, व तेंहि दबलेलेंच ! (१) रघुनाथाच्या आगमनाचा समाचार कळला नव्हता म्हणून अरण्यासारख्या झालेल्या अयोध्येंत मंगल कोठलें ? ७।३।५ पासून दो० १० पर्यंत ६ वेळां ' मंगल ' आहे पण तेंसुद्धां दबलेलेंच. (क) *श्रीरामराज्याभिषेकाच्या वेळींसुद्धां अयोध्येंत मंगलवाद्यघोष नाहीं !* देवांनीं आकाशांत वाद्यें वाजविलीं तेवढींच ! दशरथांच्या स्वर्गवासामुळें सर्व राण्या (माता) विधवा झालेल्या दिसत असतां मंगलोत्सव करण्यास उत्साह कुठला ?

दहाव्या दोह्यानंतर श्रीरामकथासमाप्तीपर्यंत ' मंगल ' नाहीं याचें कारण दशरथांची अनुपस्थिति ! मातांचें झालेलें अमंगल दूर करणें नरचरित्रास अशक्य असल्यानें शेवटपर्यंत मंगल नाहीं !

या सर्व गोष्टींचा विचार करतां ' *मंगलभवन अमंगलाहारी* ' या बालकांडांतील वचनाची सत्यता अद्भुत दक्षतेनें मानसांत सर्वत्र दाखविली आहे हें दिसतें; व महाकवि शिरोमणि श्रीगोस्वामींच्या अद्भुत काव्यकलाप्रतिभेचें साश्चर्य कौतुक वाटतें. हा

शोध लागण्याचें भाग्य पांच वर्षांपूर्वीच महाराष्ट्राच्या वांट्यास आलें हेंहि आश्चर्यच ! मागले सर्व शोध महाराष्ट्राच्या भाग्याचें फळ आहे, व असे अनेक आहेत. त्यांतील आणखी एक अद्भुत नमुना काव्यसृष्टींतच अपूर्व असणारा पुढील '*सापेक्ष छंद मानसीं सहेतुक*' या प्रकरणांत आहे.

अद्भुत गूढ अपूर्व मनोहर । अनुपम मानस सदैव सुंदर ॥
प्रगटुनि दाखविण्यास जगासी । हरि करि निमित्त या मूढासी ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।१० 卐 卐 卐

सापेक्ष मानसीं सर्वहि छंद सहेतुक

श्रीतुलसीमानस परम रमणीय अद्भुत अनुपम काव्यकलाप्रतिभेचा अगाध निधि आहे. श्रीमानसगूढार्थचंद्रिकालेखनांत जीं अनेक रमणीय भावरत्नें वेळोवेळीं सहज हातीं लागलीं त्यांतील परम रमणीय अद्भुत अपूर्व असा एक नमुना मानसांत केलेला संस्कृत छंदांचा उपयोग हा आहे.

प्रास्ताविक — गूढार्थचंद्रिकालेखनसमयीं श्रीरघुनाथाच्या अहैतुकी कृपेनें अनपेक्षित रीत्या असें प्रतीतीस आलें कीं मानसांत छंदांचा उपयोग हेतुपूर्वक त्या वृत्तांच्या नांवांची सार्थकता दाखविण्यासाठीं सापेक्षतेनें केलेला आहे.

हें रहस्य प्रथम लंकाकांडारंभीं बुद्धींत प्रगट झालें; व गूढार्थचंद्रिका-लेखन-समाप्ती-नंतर तुलनात्मक संशोधनानें पूर्वीचें अनुमान निरपवाद सिद्धान्तच ठरला. यामुळें गूढार्थचंद्रिकेंत याचा समावेश होऊं शकला नाहीं. छापील २५ पृष्ठें होतील एवढा विस्तृत स्वतंत्र लेख लिहावा लागला व त्याचा हिंदी अनुवाद ९ लेखांत केलेला मार्च १९५६ पासून *मानसमणि मासिकांत* क्रमशः प्रकाशित झाला.

अयोध्या, अरण्य, किष्किंधा व सुंदर या कांडांच्या मंगलाचरणांचा प्रारंभ शार्दूल-विक्रीडित वृत्तानें केलेला आहे. लंकाकांड मंगलाचरणाच्या पहिल्याच श्लोकांत श्रीरघु-वीरास 'कालमत्तेभसिंह' म्हटलें आहे; परंतु प्रताप-तेज-बलनिदर्शक 'शार्दूल-विक्रीडित' तेथें नाहीं; व उलट त्याच्या जागीं कोमलता, प्रसाद, माधुर्यादि निदर्शक 'स्रग्धरा' छंद कां वापरला ? लंकाकांडांतच रावण, कुंभकर्ण, मेघनाद इत्यादि असंख्य कालमत्तेभांचा संहार केला आहे; हें कर्म, ही करणी, शार्दूलाच्या-सिंहाच्या विशेष क्रीडितासारखी (विशेष क्रीडेसारखी) नाहीं काय ? विश्वविजयी, महाअजय निशाचरराज-विनाशाची करणी स्रग्धरा (स्रक् = माला, हार; धरा = धारण करणारी) कशी ? इत्यादि जे प्रश्न २४ वर्षांत उत्पन्न झाले नव्हते ते चित्तांत नाचूं लागले; व गेल्या कांहीं वर्षांच्या अनुभवाप्रमाणेंच ही शंका आपलें समाधान पाठीवरच

घेऊन आली. अति चिकित्सक बुद्धीनें तें मानसांत सर्वत्र तोलून, जोखून, घासून पाहिलें व सिद्धान्त ठरला. कुठेंहि अपवाद नाहींच दिसला; पण आधार मानसांतच भरून ठेवलेले आढळून विशेष आश्चर्ययुक्त खात्री झाली.

मानसाच्या सात काण्डांतील मंगलाचरण श्लोक २३ आहेत व ग्रंथोपसंहारांत २ आहेत. या २५ श्लोकांत ८ छंद (वृत्तें) आहेत; शिवाय प्रमाणिका, तोमर, तोटक व भुजंगप्रयात हीं कथेंत आहेत. ('इतर छंदलक्षणें' पाहा). वरील सिद्धान्त २३+२+१,३,४,१=३४ ठिकाणीं पडताळून पाहून लेख लिहिला गेला; त्यांतील फक्त एकच नमुना प्रस्तावनेंत देतां येत आहे त्यास उपाय नाहीं.

१. रावणादि राक्षसांच्या दुराचारांनीं त्रस्त व पीडित झालेली लंका नगरी–तिची अधिष्ठात्री देवता-लंका– 'लंकिनी', श्रीरघुवीराची शार्दूलाच्या विशेष क्रीडेसारखी तेज-प्रताप-बल-लीला जाणून व रामदूत महावीर हनुमंताचें शार्दूलविक्रीडित स्वतः अनुभवून, कोशलाधीश श्रीरघुवीराच्या गळ्यांत रावणविजयमाला घालण्यासाठीं स्रग्धरा बनली आहे; लंका-रावण-विजयमाला हातीं धरून ती रघुवीराच्या आगमनाची प्रतीक्षा करीत (वाट पाहात) लंकाद्वाराशीं अहर्निश उभी आहे. प्रभु येतांच त्यांना रावणविजयमाला (स्रक् = हार) लंका घालणार हें सूचित करण्यासाठींच लंकाकांड-मंगलाचरणांत पहिला श्लोक स्रग्धरा आहे. **लंका स्रग्धरा आहे हें सुचविलें.** उत्तम कवि मंगलाचरणांतच वस्तुनिर्देश करतात व त्यास वस्तुनिर्देश-मंगल म्हणतात. तुलसींनीं श्लोकांतील शब्दांनीं वस्तुनिर्देश केलाच आहे (कालमत्तेभसिंहम् इत्यादि); **पण मंगलाचरण श्लोकाच्या नांवावरून वस्तुनिर्देश करण्याची ही कला अपूर्व व अद्‌भुत नाहीं काय?** पंचवीस श्लोकांची सार्थकता अशीच सिद्ध झाली आहे. या विधानाची सार्थकता लंकाकांडांत कशी झाली आहे पाहा —

(**क**) शत योजन विस्तीर्ण मकरालयावर सहज लीलेनें सेतु बांधणें आणि त्यांत रावणानें विघ्न न करणें म्हणजे रावण-विजयश्रीमाला गळ्यांत पडणें नाहीं काय?

(**ख**) कपिभल्लनर राक्षसांचा आहार असून, जेथें काळाचा पाहारा होता त्या सुवेल शैलावर एका नरराजपुत्रानें '१८ पद्में यूथप वांदर' असलेल्या सेनेसह तळ देणें म्हणजे रावणविजयस्रक् (माला) गळ्यांत पडणेंच आहे.

(**ग**) श्रीरघुवीराचा एक अदृश्य बाण 'छत्रमुकुट ताटंक तैं तोडी' (लंका. १३) आणि तें रावणाचें छत्र; त्याचे सर्व मुकुट आणि मंदोदरीचीं कर्णफुलें (ताटंक) छिन्नभिन्न होऊन धुळींत पडलीं; पण मर्म कोणास कळलें नाहीं हें रावणविजयस्रक् (माला) गळ्यांत पडणें नव्हे काय?

(**घ**) इंद्रजितासारख्या अगणित धीर, वीर, घोर, महापराक्रमी राक्षसवीरांनीं सभासदांनीं भर सभेंत एका वानराचा अंगदाचा पाय आपल्या दोन्हीं हातांनीं धरला.

‘ इंद्रजीत आदिक विविधा भट । हर्षित बलवान् उठले पटपट ॥

बिलगुनि, बळ बहु उपाय करुनी । पद न ढळे बसले शिर नमुनी ॥

***हरले सबमानिं* कपिबल बघुनी ’**

असा सर्वांचा पराभव झाला आणि रावणसुद्धां

‘ तेजोहत झाला श्रीगता । नभिं मध्याह्नीं शशि पाहतां ॥

***बसला सिंहासनिं शिर नमवुनि* । जणूं सकल संपत्ती गमवुनि ॥**

असा तेजोहीन दीन होऊन खालीं मान घालून पराभूत होऊन बसला. हें श्रीरघुवीराला विजयस्रक् (माला) घालणें नाहीं काय? अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत पण ‘ थोडक्यांत उमजे सुज्ञांना ! ’

२. श्रीजनकनन्दिनी अशोक वाटिकेंत बसून श्रीरामनाममहामणिमाला अहर्निश आपल्या कंठांत धारण करून स्रग्धरा झाली आहे. ही जनकनन्दिनीस्रग्धरा रावण-विजयस्रग्धर श्रीरघुनाथास मिळेल हेंहि स्रग्धरा छंदानें सुचविलें आहे.

३. हेंहि सूचित केलें आहे कीं प्रत्यक्ष काळरूपी उन्मत्त हत्तीला सहज लीलेनें मारणारे श्रीरघुवीर आहेत. ‘ काल-मत्तेभ-सिंह ’ (मत्त + इभ–हत्ती) असें असतां रावणासारख्या मशकांना पतंगांना मारण्यास शार्दूल-विक्रीडिताची आवश्यकता काय? फुलांचा हार (स्रक्) गळ्यांत घातला जात असतां जसे अल्पही श्रम, कष्ट पडत नाहींत तशी रावणादिकांच्या वधाची करणी स्रग्धरा आहे, हेंहि सुचविलें आहे. घडलेंहि असेंच. ‘ निशिचर निकर पतंगसम रघुपति बाण कृशान ॥ ’ (५।१५) असें हनुमंतानें आधींच सांगितलें आहे.

४. ज्या ज्या वेळीं रघुवीरानें रावणादि राक्षसांच्या अगम्य मायेचा विनाश केला, किंवा रावणकुंभकर्णादिकांचा संहार केला तेव्हां तेव्हां ते हंसले विहसले आहेत. फुलांचा हार गळ्यांत घातला जात असतां प्रतिष्ठाप्रिय अभिमानी माणसाला हर्षानें आनंदानें जसें हंसूं येतें तसेंच **श्रीरघुनाथ रणांगणांत वारंवार हंसत आहेत.**

(**क**) ‘ प्रभु *हंसुनी* म्हणती किं भिऊं नका ॥ ’ (६।३२।९). (**ख**) *हंसुनि* कृपानिधि *चाप जोडिती* । पावकसायक सपदिं सोडिती ॥ (६।४७।३). (**ग**) प्रभु *सास्मित*, जाणुनि अभिमाना । करिति कार्मुकीं शरसंधाना ॥ (६।१३।८). (**घ**) राम, पाहुनी कौतुक, *हंसले* ॥ (५२।६). (**ङ**) ‘ प्रभु *सास्मित*...मग रघुवीर निरीक्षिति बाणा । ’ (८६।७). (**च**) चमु चकित बघुनी *हंसुनि* लाविति चापिं शर । (८९ छंद). (**छ**) दुर्वच परिसुनि...वदति कृपानिधि *सास्मित* । (९०।९). (**ज**) मग *हंसुनि* रघुकुलमणि–शिरें सब वेधिती । (९३ छं.). (**झ**) सुर वानर बघुनी विकल *हंसति* कोसलाधीश । कार्मुकिं लावुनि एक शर हत सगळे दशशीश ॥ (९६।-).

नऊ उदाहरणें पुरेत; आणखी ८।९ वेळां तरी प्रभु लंकाकाण्डांत हंसले आहेत.

५. ज्या अगणित रावणांना पाहून लक्ष्मण, हनुमान, अंगद इत्यादि महावीराग्रणी

भयचकित आणि किंकर्तव्यमूढ झाले त्या असंख्य रावणांना पाहून श्रीरघुवीर हंसले ! कारण कीं त्या दशमुखी रावणांना मारणें म्हणजे गळ्यांत पुष्पमाला घालून घेण्याइतकेच श्रम ! प्रभूचें नुसतें हास्यच त्यांचा संहार करण्यास समर्थ होते. ' मायाहास ' (६।१५।५) श्रीराममायेला पाहतांच इतर सर्वांच्या माया पळ काढतात ! इत्यादि सर्व भाव ध्वनित करण्यासाठीं शार्दूलविक्रीडित न वापरतां स्रग्धरा वृत्त वापरलें !

लंकाकांडारंभीं प्रथम स्रग्धरा कां हें याप्रमाणें दाखविलें, पण आतां असा प्रश्न उद्भवतो कीं अरण्यकांडांत खरदूषणादिकांचा वध केला आणि किष्किंधाकाण्डांत वालीचा वध केला. हें कार्य रावणवधासारखें कठिण आणि कष्टदायक नव्हतें; मग त्या कांडांच्या आरंभीं शार्दूलविक्रीडित कां ?

ही शंका प्रथम जितकी निरुत्तर करणारी भासली तितकी ती गोस्वामीजींनीं ठेवलेली नाहीं असें नंतर या मंदमतीस दिसून आलें. या शंकेचें साधार निरसन त्या कांडांच्या छंदविवरणांत केलें असलें तरी येथें संक्षेपानें लिहिणें जरूर आहेच.

१. अरण्यकाण्डांत *खरदूषणांची सेना दिसण्यापूर्वीं* ' धूलिपूर्ण नभ-मंडल बने ' असें पाहिल्यानंतर

राम वधुनि (जाणून) रिपुदळ ये चालुनि । चढवि कठिण कोदंडा ***विहसुनि*** **॥**

(३।१८।१३)

असे या वेळीं *एकदांच हंसले आहेत*. या हास्यानें मायेला जी प्रेरणा दिली ती त्यांचा किंवा त्यांच्या मायेचा विनाश करण्यासाठीं दिली नसून शत्रूनें संधि (तह-साम) करून परत जाऊं नये अशी त्यांची बुद्धि फिरविण्यासाठीं दिली आहे; तथापि खरदूषणांनीं राम-लक्ष्मणांस पाहिल्यावर सचिवांना पाठवून संधि करण्याचा प्रयत्न करून पाहिलाच. यानंतर त्या युद्धांत रघुवीर एकदांहि हंसले नाहींत. सार हें कीं तें युद्ध करतांना रघुवीरानें आपल्या मायेचें साह्य मुळींच घेतलें नाहीं. केवळ आपल्या भुजबलानें व युद्धकलाकौशल्यानें शत्रूंच्या मायेचा व शत्रूंचा संहार केला.

(क) रावणाचा वध करणें म्हणजे स्वतःच्या पापांनीं ज्याला मारलें आहे त्यास, मृतास, मारणें होतें. ' मृता मारणें नहिं पुरुषत्वहि ' (६।३१।१) इत्यादि अंगदानें रावणास स्पष्टच सांगितलें आहे. (ख) अनरण्य राजाचा शाप, वेदवतीचा शाप वगैरेनीं रावण आधींच शापदग्ध झाला होता. (ग) सीताहरण-महापातकानें त्याला मारलेंच होतें. (घ) महाभागवत बिभीषणाचा अपमान व त्याला लाथा मारणें यामुळें रावण व त्याची सर्व सभा कालवश झालेलीच होती. ' राम सत्यसंकल्प प्रभु सभा तुझी वश काळ ' (५।४१।–), ' गत हें वदुनि बिभीषण जेव्हां । आयुहीन सब झाले तेव्हां ' (५।४२।१) असें महेशाच म्हणाले आहेत. ' जगद्द्रोहरत *हा खल कामी । नष्ट अवें निज* कुमार्गगामी ' (६।११०।५) असें सर्व देव म्हणाले आहेत. (ङ) संततक्रोधी, विष्णुविमुख, श्रुतिसंतविरोधी, तनुपोषक, निंदक, अघखाणी, जिवंत शवा-

सारखा रावण होताच (६।३९।३-४).

२. खरदूषणादि आणि वाली यांची अशी स्थिति नव्हती. ते शापदग्ध किंवा निज पापांनीं मारलेले नव्हते; म्हणूनच वाली व खरदूषणादि यांचा वध करणें शार्दूल-विक्रीडितासारखेंच होतें, वालीनें तर रावणास काखेंत दाबून चतुःसमुद्रांची फेरी मारली होती व वालीचा पराभव कोणींच केला नव्हता; रावणाला सहस्रार्जुनानें किड्यासारखें पकडून नेलें होतें; म्हणून वालीचा वध करण्यास शार्दूल-विक्रीडिताची जरूर होतीच. खरदूषण रावणासारखेच बलवान होते असें रावणच म्हणाला आहे ! विस्तार उत्तरकांड परिशिष्टांत पाहावा.

३. सुन्दरकाण्डारंभीं शार्दूलविक्रीडित एवढ्याचसाठीं कीं कपिकेसरी महावीर हनुमंताची सिंहासारखी सहज विशेष क्रीडा—लीला—मुख्यतः सुन्दरकांडांतच पाहण्यास सांपडते. हनुमान रामप्रिय होऊन राम ऋणी झाले ते कपिशार्दूलाच्या असामान्य सहज विक्रीडितानेंच !

४. अयोध्याकाण्डारंभीं शार्दूलविक्रीडित एवढ्याचसाठीं कीं दशरथांच्या साम्राज्या-सारखें साम्राज्य धर्मनीतिन्यायानें स्वतःच्या हक्काचें असतां, पिता दशरथ घरीं राहा असें सांगत असतां, आणि परत आणण्यासाठीं दशरथांनीं निरोप देऊन सुमंत्रास मुद्दाम पाठविलें असतां, रघुसिंहानें तृणासमान त्याचा त्याग केला. अन्य पशूंनीं उष्टावलेल्या भक्ष्यास, सिंह जसा स्पर्श करीत नाहीं तसा साम्राज्याचा व सर्व प्रेमळांचा त्याग केला आणि त्या वेळीं १७ वर्षें नुकतींच पुरीं होऊन १८ वें लागलें होतें ! ' *दश सप्त च वर्षाणि तव जातस्य राघव ।* आसितानि प्रकांक्षन्त्या मया दुःखपरिक्षयम् ॥ असें (वाल्मीकि रामायण) कौसल्या वनगमनसमयीं रघुनाथास म्हणाली आहे.

' शार्दूल 'चा साधारण अर्थ वाघ आहे; पण सिंह या अर्थानेंहि तो वापरला जातो.

याप्रमाणें हा एक नमुना दाखविला. बाकीच्यांच्या विवरणांत इतका विस्तार करावा लागला नाहीं. ही लेखमाला मानस-मणि मासिकांत प्रसिद्ध झाली आहे. सगळ्याच छंदांचा उपयोग त्यांच्या नांवाप्रमाणें असलेली परिस्थिति दाखविण्यासाठीं केलेला आहे. कांहीं थोड्यांचें अति संक्षेपानें दिग्दर्शन करून हें प्रकरण समाप्त होईल.

१. **अयोध्याकांडांत** दुसरा श्लोक **वंशस्थ** आहे. त्याला '**वंशस्थविल**' व '**वंशस्तनित**' हीं आणखी नांवें आहेत. वंश = वंश (कुल) आणि वंश = वेणु. वंशस्थ = वंशांतील, कुळांतील आणि वेणूंतील = वेणूंच्या घर्षणानें उत्पन्न होणारा अग्नि, आग. दशरथ कैकयी रामभरतादि सर्व रघुवंशस्थ आहेत; पण कैकयी वंशस्थ (अग्नि) बनणार, वेणुवनिं आग होणार हें सुचविलें. कैकयी ' वेणुवनआग ' बनली असा उल्लेख (अयोध्याकांड ४७।४). आहेच.

वंशस्थविल = वंशस्थांत भेद उत्पन्न करणारा-री-रें. कुबडीनें कैकयीच्या ठिकाणीं भेद उत्पन्न केला आहे. ' घरफोडी ' असें प्रथम कैकयीच कुबडीला म्हणाली आहे.

'**वंशस्तनित**–वंशांतील स्तनित. रामवनवासानें–रामविरहानें अतिप्रलाप, शोक, इत्यादींचें भरपूर वर्णन आहेच.

२. तिसरा श्लोक **इंद्रवज्रा** आहे. इन्द्राचें वज्र जिच्यावर पडलें ती अयोध्यापुरी इंद्रवज्रा झाली आहे. कैकयीनें अयोध्येवर वज्राघात केलाच आहे. 'कौसल्या करि काय बिघाडा। ज्यास्तव *तुम्हीं वज्रपुरिं पाडा॥*' (२।४९।८) असें कैकयीला विचारलेंच आहे. पुन्हां दशरथमरणाच्या वेळीं अयोध्येवर वज्र पडल्याचा उल्लेख मानसांत त्याच कांडांत आहे. (दो. १५३).

३. **उत्तरकांडांत** पहिला श्लोक स्रग्धरा आहे. सुचविलें कीं राम-आगमनाचा समाचार मिळतांच अयोध्यापुरी स्रग्धरा होणार. सर्व नगरी शृंगारल्याचें वगैरे वर्णन पुढें आहेच.

(क) **दुसरें वृत्त रथोद्धता** (रथ + उद्धता) आहे. ज्या नगरीच्या रस्त्यांत रथहयगज इत्यादींचें दर्शन १४ वर्षांत झालें नाहीं ती अयोध्या आतां रथांनीं उद्धत होणार हें सुचविलें आहे; पुढें तसें वर्णनही आहेच. असेंच सर्व कांडांतील सर्व छंदांचें आहे; अगदीं संक्षेपानें आणखी चार वृत्तांचें दिग्दर्शन केलें.

अशा प्रकारची अद्‌भुत काव्यकला कोणींहि आजपर्यंत कुठें पाहिली नसेल. 'अद्‌भुत अपूर्व' मानसनमुने या पांचव्या मुख्य प्रकरणांतील ही भिन्न भिन्न प्रकारचीं दहा प्रकरणें पाहिल्यानंतर कोणास असें म्हणवेल काय कीं या सर्व गोष्टी केवल काकतालीय न्यायानें घडल्या? अशा ज्या अनेक गोष्टी प्रगट झाल्या आहेत त्यांतील हे थोडे नमुने दिले. काकतालीय न्यायानें घडलेले असे निरपवाद, सुसंबद्ध, निर्दोष असे कांहीं नमुने इतर ग्रंथांतून दाखवितां येतील काय?

मानसांत अश्विनी आदि अभिजित् सह २८ स्तुतींचें अद्‌भुत नक्षत्रमंडल आहे. त्याविषयीं थोडी माहिती पुढील प्रकरणांत दिली आहे.

जें स्फुरलें हरिकृपें उमजलें। तेंच यथामति इथें उतरलें॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।११ 卐 卐 卐

नक्षत्र-मंडला पहा मानसीं कौतुक

श्रीरामचरित-मानस-निर्मात्यांनीं मानसांत ज्या अनेक अनुपम अद्‌भुत काव्यकला प्रयुक्त केल्या आहेत व जे अनेक अति गूढ संकेत पाळले आहेत त्यांत २८ नक्षत्रात्मक (अश्विनीपासून अभिजित्‌सुद्धां रेवतीपर्यंत) स्तुतिनक्षत्रमंडळाची हेतुपूर्वक सकारण अति गूढ रचना चित्ताला अत्यंत विस्मित करणारी व कवीच्या अतिमानुष अलौकिक काव्यप्रतिभेची प्रतीति देणारी एक फार महत्त्वाची काव्यकला आहे.

दो०-राकारजनी भक्ति तव रामनाम तो सोम ।
अपरनाम उडुगण विमल वसो भक्तहृद् व्योम ॥ (३।४२)

रामभक्ति पौर्णिमेची रात्र होय, *रामनाम हा पूर्णचंद्र* व भगवंताचीं इतर नामें हा विमल नक्षत्रसमुदाय भक्तांच्या हृदयरूपी आकाशांत वसोत असा वर नारदानें मागितला.

१. चंद्र आकाशातून भ्रमण करतो व विशिष्ट ठराविक मार्गानेंच जातो. त्या मार्गात अश्विनी आदि २८ नक्षत्रें आहेत. अश्विनी आदि नक्षत्रांतून चंद्र भ्रमण करतो. या २८ नक्षत्रांनाच येथें विमल उडुगण असें म्हटलें. उडु = नक्षत्र, तारा; गण = समुदाय, उडुगण = नक्षत्रसमुदाय. असाच २८ नक्षत्रांचा समुदाय = नक्षत्रमंडल, मानसांत असणें जरूर आहे. हें नक्षत्रमंडल म्हणजेच बालकांडांत (दो. १८६) ब्रह्मदेवानें केलेल्या स्तुतीपासून उत्तरकांडांत श्रीरामनिर्याणसमयीं (दो. ५१) नारदानें केलेल्या स्तुती-पर्यंतच्या २८ स्तुती होत.

(क) स्तुतींत मुख्यतः भगवंताच्या गुणांचें वर्णन करणारीं नामेंच असतात. श्रीविष्णुसहस्रनाम, रकारादि श्रीरामसहस्रनाम, मकारादि श्रीरामसहस्रनाम इत्यादिकांत त्या त्या नामांनीं भगवद्गुणच वर्णिलेले असतात. *स्तुति करणें म्हणजे गुणवर्णन करणें*, हें मानसांत स्पष्टच दाखविलें आहे. शंकरकृत स्तुतीच्या उपक्रमांत म्हटलें कीं ' *स्तुति करिती* गदगदगिरें पूरित पुलक शरीर ' (७।१३ म) आणि उपसंहारांत म्हटलें कीं ' शिव गत *वर्णुनि रामगुण* हर्षें कैलासास ॥ (७।१४ म) गुण-वर्णन विविध सार्थ नामांनीं केलें जातें; म्हणून अपरनाम = गुणवर्णनपर इतर नामांचे समुदाय म्हणजे स्तुती हे उडुगण = नक्षत्रसमुदाय = २८ नक्षत्रेंच होत.

२. अश्विनी आदि २८ नक्षत्रांना नक्षत्रमंडल म्हणतात. मंडल = चक्र = वर्तुल; जेथून प्रारंभ झाला त्या ठिकाणीं, परत न फिरतां, येतां आलें तरच मंडल तयार झालें असें म्हणतां येईल. (क) या २८ स्तुतींच्या फलश्रुतींतसुद्धां मंडल पूर्ण करून दाखविलें आहे. २८ स्तुतींची (बाल. १८६ पासून उत्तर. ५१ पर्यंत असलेल्या) फलश्रुति बाल. दो. ३२।२ या चौपाईपासून दो. ' ३२ रा ' पर्यंत क्रमशः दिलेली सांपडते. २८ स्तुतिनक्षत्रें त्यांचीं स्थानें आणि त्यांची वरील ठिकाणची फलश्रुति या लेखाच्या शेवटीं कोष्टकरूपानें दिसतील.

३. पहिल्या स्तुतीची फलश्रुति ' जगमंगल *रामाचे गुणगण* ' ही आहे. शेवटच्या स्तुतीच्या फलश्रुतींत ' दहन *रामगुणगण* जसा अनल इंधना चंड ' यांत *रामगुणगण* शब्द आहेतच. यांशिवाय इतर कोणत्याहि फलश्रुतींत ' रामाचे गुणगण ' = ' *राम-गुणगण* ' शब्द नाहीं. असा हा मंडलाकार फलश्रुतींत पूर्ण करून दाखविला आहे. (क) पहिली स्तुति ब्रह्मदेवानें-विधीनें केली आहे आणि शेवटची स्तुति (रेवती) करणारे ' सुप्रेमें मुनिनारद गावुनि *रामगुणांस* ॥ धरुनी शोभासिंधु हृदिं गेले

विधिधामास ' (७।५१). नारद ब्रह्मलोकास गेले. पहिली स्तुति करणारांकडे शेवटची स्तुति करणारे गेले असें सांगून स्तुतिनक्षत्रमंडल पूर्ण करून दाखविलें. २८ गांठी असलेल्या वेताच्या छडीचीं दोन्ही टोकें एकत्र आलीं कीं मंडल झालेंच.

४. बालकांडांत सांगितलेल्या *फलश्रुतीचें साम्य* त्या त्या स्तुतींत क्रमशः पूर्णपणें मिळतेंच; शिवाय आकाशस्थ अश्विनी आदि नक्षत्रांतील *तार्‍यांची संख्या, नक्षत्रांचा शास्त्रोक्त आकार* (रूप), *नक्षत्रदेवता, नक्षत्राचें नांव* व *अनुक्रम* या सर्व गोष्टी अगदीं तंतोतंत सर्व स्तुतींत जमतात ! (क) ज्योतिषशास्त्रग्रंथांत जेथें दोन नक्षत्रांचा मिळून एक आकार वर्णिला आहे, तेथें त्या दोन स्तुतींतील तार्‍यांत आणि स्तुति करणारांतहि परस्परसंबंध आहे. **उदा०**—पूर्वाफाल्गुनी व उत्तराफाल्गुनी यांचा मिळून एक आकार दिसतो व ग्रंथांत वर्णिला आहे; तर मानसांत या दोन स्तुतींच्या कर्त्यांचा सुतीक्ष्ण आणि अगस्ति यांचा, शिष्यगुरुसंबंध आहे. *सुतीक्ष्ण अगस्तिशिष्य असा उल्लेख मुद्दाम तेवढ्यासाठींच केलेला आहे; कारण इतर कोणाहि मुनीच्या वर्णनांत कोणाचा शिष्य हें सांगितलेलें नाहीं !* आणि अगस्ति स्तुति करतात तेव्हां सुतीक्ष्ण तेथें हजर आहे. **उदा० २ रें.** पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा या दोन नक्षत्रांचा मिळून आकार लंबचौरस वर्णिला आहे. पूर्वाभाद्रपदा स्तुति अयोध्यावासी सभास्थित लोकांनीं केली आहे; (उत्तर दो. ४७) आणि उत्तराभाद्रपदा वसिष्ठांनींच केली आहे (उत्तर. दो. ४८,४९) वसिष्ठ अयोध्यावासीच आणि पुरजनांनीं ज्या सभेंत स्तुति केली त्या सभेंत ते हजर होते !

५. जीं आकाशस्थ नक्षत्रें अगदीं जवळजवळ दिसतात तीं स्तुतिनक्षत्रेंसुद्धां *अगदीं तशींच जवळजवळ आहेत.* **उदा०** विशाखा-अनुराधा; ज्येष्ठा-मूळ; पूर्वाषाढा-उत्तराषाढा; पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा. तशींच स्तुतिनक्षत्रें पाहा :— (क) सर्व-देवकृत स्तुति (विशाखा) लंका. दो. ११० च्या पूर्वार्धांत संपते व उत्तरार्धांत ब्रह्मदेव स्तुतीचा (अनुराधा) उपक्रम होतो, व दो. १११ त ती संपते. विशाखा व अनुराधा हीं दोन नक्षत्रें आकाशांत व नक्षत्रमंडल-नकाशांत अगदीं एकमेकांस चिकटलेलीं दिसतात ! (एवढ्यासाठीं नकाशा मुद्दाम मागवावा लागला). (ख) अनुराधा व ज्येष्ठा नक्षत्रें इतकीं चिकटलेलीं दिसत नाहींत; किंचित्, थोड्या अंतरावर जवळच आहेत; तर अनुराधास्तुति दो. १११ मध्यें संपते व दो. ११२ मध्येंच ज्येष्ठास्तुति सुरू होते; पण मध्यें ८ *चौपाया मुद्दाम दुसर्‍या विषयाच्या घातलेल्या दिसतात* ! *ज्येष्ठा* नक्षत्रस्तुति सर्व देवांत *ज्येष्ठ* जो इंद्र त्यानें केली आहे. (ग) ज्येष्ठा व मूळ नक्षत्रें अशींच किंचित् दूर आहेत; तर ज्येष्ठा स्तुति दो. ११३ मध्यें संपते व ११४ व्या दोह्यांत मूळ नक्षत्र स्तुति करणारे शंकर येतात पण मध्यें थोड्या चौपाया आहेत. (घ) पूर्वाषाढा व उत्तराषाढा अगदीं जवळजवळ आहेत; तर उत्तरकांडांत वेदस्तुति दो. '**१३ रा**' मध्यें संपते व वेद जातात आणि दो. '**१३ म**' मध्यें शंभु स्तुति

करण्यास येतात!

६. (क) सीताजननीनें केलेल्या स्तुतीची फलश्रुति 'सीताराम प्रेमाची *जननी*'-ही आहे. (ख) जनकानें-सीताजनकानें केलेल्या स्तुतीची फलश्रुति 'सीतारामप्रेम-*जनक* 'ही आहे. (ग) जनककृत स्तुति *आर्द्रा*नक्षत्र आहे तर ती स्तुति रामप्रेमानें *आर्द्रा* (ओली) झालेली आहे. (घ) अत्रिकृत स्तुति *आश्लेषा* नक्षत्र आहे आणि अत्रिमुनीचे नेत्र भगवंतास वारंवार *आश्लेष* (आलिंगन) देत आहेत. (ङ) जटायु-कृत स्तुति *हस्त* नक्षत्र आहे (१३ वी) तर रघुनाथानें जटायूच्या मस्तकावर आपला *हस्त* (हात) ठेवला आहे आणि त्याची *क्रिया आपल्या हातांनीं* केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ' कर ' शब्द मुद्दाम वापरला आहे. (अरण्य. दो. ३२). (च) हनुमत्कृत स्तुति (१४ वी) *चित्रा* नक्षत्र आहे. हनुमंतानें केलेली स्तुति चित्र ! आहे, व हनुमंताचें सर्व चरित्र चित्र ! नाहीं काय ? या स्तुतीची फलश्रुति ' प्रियतम पूज्य पुरारिअतिथि हे ' अशी आहे. हनुमान पुरारीचे (शंकराचे) अवतार असून सामोरें येऊन प्रियतम अतिथिप्रमाणें घेऊन गेले आहेत पाठीवर बसवून! हनुमान लंका-पुराचे अरि पुढें झालेच आहेत! (छ) ' *कुंभज* ' हें अगस्तीचें नांव मानसांत अधिक वेळां आलें आहे. त्यांनीं केलेल्या स्तुतीची फलश्रुति ' *कुंभज* अपार लोभोदधिचे ' ' लोभरूपी अपार उदधीचें—सागराचें—शोषण करणारा कुंभजमुनि, ' ही आहे. (ज) बिभीषणकृत स्तुति (१५ वी) *स्वाति* नक्षत्र आहे. स्व + अति = स्वाति, बिभीषण रामाचा *अति स्वकीय* नाहीं काय ? (झ) सर्वदेवकृत-स्तुति (१६ वी) *विशाखा* नक्षत्र आहे. वि + शाखा = विविध शाखा. त्या सर्व देवांत देवांच्या *विविध शाखा* आहेतच. (ञ) ब्रह्मदेवकृत (दुसरी; लंका.) स्तुति (१७ वी) हिची फलश्रुति '*पुसाति कठिण जे कुअंक भाला*' ही आहे. भालावर-कपाळावर अंक = लेख लिहिणारे ब्रह्मदेवच. ते स्वतः आपण लिहिलेल्या चांगल्या किंवा वाईट लेखास पुसूं शकत नाहींत; पण त्यांनीं केलेली स्तुति 'जय राम सदा सुखधाम हरे' नें आरंभ होणारी भालावरील वाईट लेख पुसूं शकते. या फलश्रुतीचें संपुट प्रत्येक चरणास लावून या स्तुतीचे शेकडों पाठ प्रेमानें केल्यास प्रतिकूल प्रारब्ध बदलेल अशी खात्री वाटते. *वाचकांनीं सविधि अनुष्ठान करून पाहावें.* (ट) अंगदकृत स्तुति (२३ वी) श्रवण नक्षत्र आहे. (२२ वें अभिजित्) ही एकच स्तुति अशी आहे की जिच्यांत *स्तुतिकर्ता ' श्रुणु '* (ऐका) *हा शब्द प्रथम वापरून प्रार्थना करूं लागतो*; व ही एकच स्तुति अशी आहे कीं जणूं प्रभूंनीं श्रव-न (श्रव = श्रवण, ऐकणें; अमरकोष पाहा.) श्रवण केलीच नाहीं ! स्तुतींत केलेली विनंति रघुपतीनें अमान्य केली असेल तर याच *श्रवण* (श्रवण न करणें) *स्तुति* करणाऱ्या अंगदाची! (ठ) अयोध्या-पुरजनांनीं (समोर न केलेली) केलेली पहिली स्तुति *धनिष्ठा* नक्षत्र (२४ वी) आहे. धनिष्ठ = सर्वांत अत्यंत धनैश्वर्य संपन्न. सर्वांत अति धनैश्वर्यसंपन्न अयोध्या—रामपुरी—

घनिष्ठा नाहीं काय ? ' सकल सुकृत फल भूरि भोगसे ' ही फलश्रुति आहे. अयोध्येंतील लोकांस रामराज्यांत सकल सुकृताचें फल भूरि (विपुल) ऐश्वर्यभोग मिळत नव्हते काय ?

७. याप्रमाणें सहज वरवर पाहूनसुद्धां १२।१५ ठिकाणीं अद्भुत साम्य दाखवितां आलें. (क) फलश्रुति बालकांडाच्या ३२ व्या दोह्याच्या २ऱ्या चौपाईपासून दो. ' ३२ रा ' पर्यंत अगदीं क्रमानें आहेत. रामगुणग्रामाचा प्रभाव दाखविणें हा तेथील मुख्य विषय आहे; व त्यांतच फलश्रुतींचा क्रम साधला आहे. स्तुति बाल. दो. १८६ पासून उत्तर. दो. ५१ पर्यंत आहेत! (ख) हें इतकें विविध प्रकारचें साम्य काकतालीय न्यायानें आपोआप जमणें शक्य आहे काय ? नितांत अशक्य आहे. स्तुतींची व नक्षत्रांची सविस्तर तुलना स्तुतिटीका समाप्तीनंतर प्रत्येक ठिकाणीं केली आहे. अनुक्रम, नक्षत्रनाम, देवतानाम, तारेसंख्या, त्या नक्षत्राचा आकार (रूप) आणि फलश्रुति या गोष्टींचें साम्य तुलनेनें गूढार्थचंद्रिका दाखविते. (ग) तीन चार स्तुतींची सविस्तर तुलनाच प्रस्तावनेंत देण्याचा विचार होता; पण प्रस्तावनाविस्तार अमर्याद वाढविणें वेडेपणाचें ठरेल म्हणून तो विचार बाजूस सारावा लागला.

८. अशा प्रकारचीं एकच नव्हे तर अनेक आश्चर्यकारक उदाहरणें पूर्वीं सांपडलीं आणि प्रस्तावनालेखनतयारींत नवनवीन पुष्कळच सांपडलीं ! पुढेंहि सांपडतील कदाचित् ! (क) या विषयावर प्रथम लेख १९५२ च्या पूर्वीं लिहिला गेला. परशुरामकृत स्तुतीपासून पुढील बहुतेक स्तुतींची संक्षिप्त तुलना मानसपीयूषमध्यें प्रकाशित झाली आहे. त्या वेळीं फक्त २।४ गोष्टींचें साम्य सांपडलें नव्हतें; त्यामुळें तसा उल्लेख तेथें कांहीं ठिकाणीं सांपडेल. प्रस्तावनालेखनकालापर्यंत सर्व साम्य सांपडलें ही भगवत्कृपाच !

ल. ठे. — या शोधाचे मूळ जनक मानस-राजहंस पं. त्रिपाठीजी आहेत; म्हणून या लेखाचें बरेंचसें श्रेय त्यांनाच देणें योग्य.

१. (क) त्यांच्या *मानसप्रसंग* आणि *मानसमूल* या दोन पुस्तकांत या बाबतींत समन्वय नाहीं; पुष्कळच विरोध आहे. तीं पुस्तकें वाचतांना त्यांच्या लेखांची स्तुतींशीं तुलना करून पाहतां तेथेंहि पुष्कळ स्तुतींत कशीतरी व असंबद्ध जुळवाजुळव केलेली दिसली. (ख) नक्षत्रदेवतासाम्य व नक्षत्रनामसाम्य त्यांनीं विचारांतच घेतलें नाहीं; कारण तें जमणें फार कठिणच आहे. (ग) नक्षत्रांतील ताऱ्यांचें साम्य दाखवितांना ठोकून देतों ऐसाजे हा मार्ग बऱ्याच ठिकाणीं अवलंबिला आहे. (घ) ' ह्याचा नीट उलगडा झाला नाहीं ' असा उल्लेख कोठेंच केलेला नाहीं. (ङ) किंवा एका ग्रंथानंतर दुसरा ग्रंथ छापतांना पूर्वीच्या ग्रंथांतील नजरचुकीचा किंवा चुकीचा उल्लेख कोठेंच केलेला नाहीं !

(२) शततारका नक्षत्र-स्तुति जेथें आहे तेथें लक्ष न गेल्यानें ते ' शत ' शब्द धुंडीत बसले व जेथें तो सांपडला तें वर्णन मुख्य रामचरित्रांतील नसतांना व भुशुंडी

गरुडाला जो रामप्रभाव सांगतो त्याचें तें वर्णन असून, तो भाग मुख्य रामचरित्रांतील शततारका स्तुति मानली; म्हणून पुढल्या तीन स्तुति त्यापुढील भागांत जुळवाव्या लागल्या व त्यामुळें मुख्य भागांतील वसिष्ठांनीं केलेली स्तुति व इतर सोडून द्याव्या लागल्या. तुलसीदासांनीं उत्तरकांडाच्या शेवटीं केलेला ग्रंथोपसंहार शेवटची-रेवती स्तुति मानली ! त्यामुळें मंडलाकार पूर्ण करून दाखवितां येणें अशक्य झाल्यानें त्या बाबतींत मौन धारण केलें.

(क) *मानसप्रसंग* पुस्तकांतील महत्त्वाची त्रिपाठीजींची टीका मानसपीयूषमध्यें घेतली असून व त्याच पुस्तकांत नक्षत्रसाम्य दाखविणारा लेख थोडक्यांत असून तो भाग मानसपीयूषमध्यें प्रविष्ट होऊं शकला नाहीं !

३. अशी अनेक प्रकारची धरसोड, असंबद्धता, परस्परविरोध, इत्यादि अनेक गोष्टी दिसल्यानें ज्योतिषशास्त्रग्रंथ, नक्षत्रमंडळाचे नकाशे व आकाशस्थ नक्षत्रांचें अवलोकन यांच्या साह्यानें अभ्यास केला गेला तेव्हां श्रीरामगुरुकृपेनेंच सर्व गोष्टींचें साम्य *शेवटीं* जुळलें. प्रथम लेखनाच्या वेळीं जेथें समाधानकारक साम्य मिळालें नव्हतें, तेथें तसें स्पष्ट उल्लेख केलेले अद्याप आहेतच. याविषयीं (८ क) या परिच्छेदांत पूर्वी लिहिलें आहे. गूढार्थचंद्रिका मूळ प्रतींतसुद्धां २१४ तसले उल्लेख केलेले दिसतातच.

४. श्रीयुत त्रिपाठींचा शोध नवीन असल्यानें त्यांच्याकडून चुका घडणें साहजिक होतें हें खरें असलें तरी शास्त्रवृद्धीची आवड असलेला संशोधक जाणूनबुजून डोळेझांक करून धूळफेक करीत नाहीं. आपलें समाधान कोठें झालें नाहीं व कोठें अनिश्चितता वाटते याविषयीं तो न लाजतां स्पष्ट उल्लेख करतो. वसिष्ठस्तुति आदि कां सोडल्या याचा उल्लेख करणें जरूर होतें.

(क) असें असलें तरी त्यांचे लेख प्रसिद्ध झाले म्हणून पूर्वी वाटत असलेल्या अनुमानाला आधार मिळाला व संशोधन करण्यास प्रेरणा मिळाली; अन्यथा आणखी कांहीं काळ गेला असता. कोणत्याहि नवीन शोधांत असें होण्याची शक्यता असतें; कारण ‘ न हि सर्वः सर्वज्ञोऽस्ति ’ पण आपली न्यूनता लपवून ठेवण्यास संकोच न वाटणें हें सरळ हृदयाचें द्योतक असतें.

‘ मूळाहुनी सरस मानस अति ’ हें या पांचव्या मुख्य प्रकरणांतील शेवटचें प्रकरण आहे. स्तुतिनक्षत्रमंडळ व त्याची फलश्रुति कोष्टकरूपानें दाखवून हें ११ वें प्रकरण समाप्त होईल.

श्रीमानसांत स्तुति-नक्षत्रमंडल व स्तुतींची फलश्रुति

स्तुतिक्रम	स्तुतिकर्ता	नक्षत्र	स्तुतीचा आरंभ	मानसांतील स्थान	फलश्रुति (१।३२।२ — ३२ रा).
बाल.					
१	ब्रह्मदेव	अश्विनी	जय जय सुरनायक	११८६	जगमंगल *रामाचे गुणगण-*
२	कौसल्या	भरणी	ते प्रगट कृपाळू	११९२	दायक मुक्ती धाम धर्म धन ॥ २ ॥
३	अहल्या	कृत्तिका	स्पर्शत पद पावन	१२११	सद्गुरु बोध-विरागां योगा
४	भृगुपति	रोहिणी	जय रघुवंश वनजवनभानू	१२८५	विबुध वैद्य भवभीषण रोगा ॥ ३ ॥
५	सीताजननी	मृग	विनवुनि सिता रामा समर्पुनि	१३३६ छंद	जननि सिय-राम-प्रेमा
६	सीताजनक	आर्द्रा	जळुनि रुचिर पंकेरुहपाणी	१३४१।३	जनक सिय-राम प्रेमा ।
अयोध्या.					
७	भरद्वाज	पुनर्वसु	आज सुफल सब तीर्थें त्यागहि	२।१०७।५	बीज सकल धर्मां व्रत नेमां ॥ ४ ॥
८	वाल्मीकि	पुष्य	सहज सरल रघुवरवच...	२।१२६।७	शमन पाप-संतापा-शोका ।
अरण्य.					
९	अत्रि	आश्लेषा	नमामि भक्तवत्सलं...	३।४।१	प्रिय पालक परलोकालोका ॥ ५ ॥
१०	शरभंग	मघा	वदले मुनि रघुवीर कृपाला	३।८।१	सचिव विवेक भूपतिचे ।

स्तुतिक्रम	स्तुतिकर्ता	नक्षत्र	स्तुतीचा आरंभ	मानसांतील स्थान	फलश्रुति (१।३२।२ — ३२ रा).
अरण्य.					
११	सुतीक्ष्ण	पूर्वाफा.	मुनि वदले प्रभु एक विनंती	३।११।१	सुभट विवेक भूपतिचे ।
१२	कुंभज मुनि	उत्तरा.फा.	प्रभुवच परिसुनि करिती स्मित	३।१३।४	कुंभज अपार लोभोदधिचे ॥ ६ ॥
१३	जटायु	हस्त	जय राम अनुपमरूप	३।३२। छं.१	काम कोप कलि कलुष करिगणां
					केसरिशावक दास मन-वना ॥ ७ ॥
किष्किंधा.					
१४	हनुमान	चित्रा	स्तुती करी मग सुधीर धरुनि	४।२।७	प्रियतम पूज्य पुरारि-अतिथि हे ।
सुंदर.					
१५	बिभीषण	स्वाति	पद-अंबुज धृत वारंवारां	५।४९।४	कामद धन दारिद्र्य-दावि हे ॥ ८ ॥
लंका.					
१६	सर्व देव	विशाखा	देव सदा स्वार्थी ठाकले	६।११०।२	मंत्र महामणि विषयां व्यालां ।
१७	ब्रह्मदेव	अनुराधा	प्रेमें अति पुलकित विधि…	६।११०	
				उत्तरार्ध	पुसति कठिण जे कुअंक भाला ॥ ९ ॥
१८	इंद्र	ज्येष्ठा	सह जानकि अनुजा प्रभु…	६।११२। –	हरण मोहतम दिनकर करसे ।
१९	शंभु	मूळ	सुसमय बघुनी प्रभु-निकट	६।११४ रा	सेवक शालिपाल जलधरसे ॥१०॥

स्तुतिक्रम	स्तुतिकर्ता	नक्षत्र	स्तुतीचा आरंभ	मानसांतील स्थान	फलश्रुति (१।३२।२ — ३२ रा).
उत्तर.					
२०	वेद	पूर्वाषाढा	जय सगुण निर्गुण रूप	७।१३।१	अभिमतदानि देवतरुवरसे ।
२१	शंभु	उत्तराषाढा	श्रुणु विनतासुत शंभु तैं	७।१३ म	सेवत सुलभ सुखद हरि हरसे ॥११॥
२२	सुग्रीवादि	अभिजित्	प्रभुवच परिसुनि सगळे मग्नहि	७।१७।१	सुकवि शरद मन-नभिं उडुगणसे
२३	अंगद	श्रवण	अंगद नमि शिर उठुनि...	७।१७ म	रामभक्तजन जीवन धनसे ॥१२॥
२४	पुरजन	धनिष्ठा	जिथतिथ नर रघुपति गुण...	७।३०।१	सकल सुकृत फल भूरि भोगसे ।
२५	सनकादिक	शतभिषक्	प्रभुवचनें हर्षित मुनि चारी	७।३४।१	जगहित निरुपधि साधुलोकसे ॥१३॥
२६	पुरजन	पूर्वाभा.	श्रवुनि सुधासम वच रामाचे	७।४७।१	सेवक मन मानसमरालसे ।
२७	वसिष्ठ	उत्तराभा.	येति एकदां वसिष्ठ मुनिवर	७।४८।१	पावन गांग-तरंग-मालसे ॥१४॥
२८	नारद	रेवती	त्या अवसरिं मुनि नारद	७।५०।–	कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट दंभ पाखंड । दहन *रामगुणगण* जसा अनल इंधना चंड ॥३२ रा॥

साधनाहीना बुद्धिमलीना दीना अपला म्हणती । करिं धरूनी प्रभु राम देति निज संतत दासा महती ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ५।१२ 卐 卐 卐

मूळाहुनी सरस मानस अति

श्रीरामचरितमानस 'सब ग्रंथन को रस' (सर्व ग्रंथांचा• रस) आहे असें श्रीगोस्वामीजीच श्रीरामायणाच्या आरतींत म्हणाले आहेत. मानसांत शेंकडों संस्कृत ग्रंथांतील अवतरणें आधारास घेतलीं आहेत हें बहुश्रुत वाचकांस सहज दिसतें. पण एवढ्यानेंच श्रीतुलसींची अतुल कलासरसता सिद्ध होत नाहीं.

गोस्वामींनीं जेथें श्रीमद्भागवत, भगवद्गीता, वाल्मीकि रामायण, अध्यात्म रामायण, नीतिशतक, वैराग्यशतक, चाणक्यनीति, हनुमन्नाटक, पुराणें इ. इ. ग्रंथांतील कल्पना मानसांत घेतल्या आहेत तेथें त्यांनीं स्वतःची काव्यप्रतिभा, प्रेमभक्ति, भावना, मर्यादापालनदक्षता, औचित्यरसिकता इत्यादींचें प्रतिबिंब त्यांत पाहून मूळ ग्रंथापेक्षां कितीतरी सरस, श्रेष्ठतम मनोहर काव्यनिर्मिति केलेली दिसते. याच्या उलट हनुमन्नाटकांत कांहीं श्लोक शाकुंतल, अग्निपुराण इत्यादींतून चोरलेले दिसतात.

कांहीं ठिकाणीं तर मूळ वचनांत केवळ १।२ शब्दांची भर घालून मुळांत नसलेला परम रमणीय ध्वनि मानसांत भरून ठेवलेला आढळतो. (क) मानसांत दिसून आलेल्या अशा सर्व वचनांची तुलना करणें गूढार्थचंद्रिकेंतसुद्धां विस्तारभयास्तव शक्य झालें नाहीं. कांहीं ठिकाणीं तुलना केली आहे; कांहीं ठिकाणीं 'तुलना करून पाहावी' असें सुचविलें आहे व कांहीं ठिकाणीं हेंहि केलें नाहीं. सांपडलेल्या सर्व स्थळांची तुलना करावयाची तर छापील ५०० पृष्ठांचा ग्रंथ पुरणार नाहीं, तथापि हा उद्योग कोणीतरी करणें जरूर आहे. आतां या लेखकाच्या हातीं तो उद्योग होणें शक्य नाहीं. गूढार्थचंद्रिकेंत लिहिलेल्या थोड्या तुलनांपैकीं थोडक्यांत दाखवितां येण्यासारखीं कांहीं थोडीं उदाहरणें येथें आहेत.

१. मंगलाचरणांतच.

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥

हा श्लोक सर्वांच्या परिचयाचा आहे.

मानस-सोरठा—मूक होइ वाचाल पंगु चढे गिरिवरिं गहन ।
कृपया यस्य, दयाल द्रवु तो सब कलिमलदहन ॥

हा श्रीमानसाच्या हिंदी (मराठी) मंगलाचरणांतील दुसरा सोरठा आहे. याला आधार वर दिलेला प्रसिद्ध संस्कृत श्लोक आहे हें स्पष्ट आहे.

(१) **श्लोकाचा अर्थ**—ज्याची कृपा मुक्याला वाचाल करते व पांगळ्याला गिरि (पर्वत) ओलांडविते त्या परमानन्द माधवाला मी वन्दन करतों. (क) **सोरठ्याचा अर्थ** — ज्याच्या कृपेनें मुका वाचाल होतो, व पांगळा गहन गिरिश्रेष्ठावर चढतो

तो सर्व दोषांचें दहन करणारा माझ्यावर दया करो.

(२) (क) **लंघयते** — ओलांडण्यास लावते. याचा अर्थ असा होतो कीं तो पांगळा पुन्हां डोंगरापलीकडील खालच्या जमिनीवरच राहतो. (ख) दुसरा कोणीतरी त्यास डोंगरावरून पलीकडल्या बाजूस पोंचवितो असाहि अर्थ ' कृपा **लंघयते** ' याचा होतो; विमानांत बसवून पलीकडे उतरविला जातो असा अर्थ हल्लीं होऊं **शकेल**.

(३) **वन्दे** — नुसतें नमन आहे, कशासाठीं नमन हें स्पष्ट नाहीं. कृपा सूचित आहे असें म्हटलें तर, नुसत्या वंदनानें अनधिकारी पापी व्यक्तीवर कृपा कशी करतील, इत्यादि आक्षेप येऊं शकतात.

आतां तुलसीवचन पाहा. (१) **चढे** — तो पांगळा, लंगडा स्वतः चढतो, असा अगदीं स्पष्ट अर्थ आहे. (क) पुन्हां पूर्वस्थिति प्राप्त होतें असें म्हणण्यास तिळमात्र जागा राहिली नाहीं. (२) वन्दन न करतांच कळवळून प्रार्थना केली आहे कीं तो प्रभु द्रवो, दया करो. (क) कशा प्रकारें दया करो हें ' सब कलिमलदहन ' यानें स्पष्ट सांगितलें ' मूळ श्लोकापेक्षां किती रम्य फरक झाला हें रसज्ञ वाचक जाणतीलच ! ' मूकाला वाचा येते ' इतकेंच मुळांतलें साम्य राहिलें आहे; बाकीचें सर्व तुलसीदासांचें आहे.

२. श्रीमद्भागवतापेक्षां सरस.

श्रेयः सृतिं भक्तिमुदस्य ते विभो, क्लिश्यन्ति ये केवलबोधलब्धये ।
तेषामसौ क्लेशल एव शिष्यते *नान्यद्यथा स्थूलतुषावघातिनाम्* ।।

(भाग. १०।१४।३).

स्थूल तुषाचें (तुसाचें) कंडण करणारांच्या पदरांत केवळ कांडण्याचे कष्टच पडतात. दुसरें कांहीं (दाणे, धान्य इ.) मिळत नाहीं, तसेंच जे सर्वश्रेयस्करी भक्तीचा त्याग करून केवळ ज्ञानासाठीं क्लेश–कष्ट करतात त्यांच्या पदरांत केवळ क्लेशच पडतात, सामान्य कणसुद्धां मिळत नाहीं; आतां याच विषयाला मानसांतील दृष्टान्त पाहा :— रामस्तुति करीत असतां वसिष्ठ म्हणाले,

तव पदपद्मीं प्रीति निरंतर । सकल साधनां हें फळ सुंदर ।। ४ ।।
मळें धुवुनि कधिं मळ किं नाशतो । *वारि मथुनि कुणि घृत किं पावतो* ।। ५ ।।
प्रेमभक्तिजलविण रघुवर तो । अभ्यंतर मल कधीं न जातो ।। ६ ।।

(१) येथें तीनच ओळींत तोच सिद्धान्त सांगितला पण सरसता, श्रेष्ठता व शास्त्रीयता पाहण्यासारखी आहे. (क) तव पदपद्मीं प्रीति हा *उपक्रम* केला व प्रेमभक्तिजल हा *उपसंहार केला*. केवळ ज्ञानमार्ग इत्यादि सर्व साधनें मलरूप आहेत म्हणून त्यांनी चित्तमल जात नाहीं ही *उपपत्ति सांगितली*. मळानें मळ जातो हें खरें असलें तरी निर्मल जलाशिवाय जात नाहीं हा *हेतु सांगितला*, व दृष्टान्त दिला तो ' **वारि मथुनि कुणि घृत किं पावतो.**' भागवतांतील चार ओळींत उपक्रम, उपसंहार, उपपत्ति

व हेतु आहेत का पाहा ? मानसांतला केवळ दृष्टान्तच इतका सरस, समर्पक, निर्दोष, सर्वलोकपरिचित, सर्वकाळपरिचित आणि सर्वदेशपरिचित आहे कीं त्या एका दृष्टान्तानेंच भागवतापेक्षां सरसता व सर्व प्रकारें श्रेष्ठता ठरते. जलाचें मंथन करून कधीं कोणाला घृत मिळतें काय ? केवळ ज्ञानासाठीं भक्तिविहीन प्रयत्न करणें म्हणजे पाण्याचें मंथन, घुसळण, करून घृत मिळविण्याचा प्रयत्न होय. (ख) हा दृष्टान्त सर्व काळीं, सर्व देशांत, सर्व लोकांच्या अधिक परिचयाचा कीं तुषकंडणानें धान्यकण मिळविण्याचा ? (ग) तुषकंडण केलें तर धान्यकण मुळींच मिळत नाहीं असें नाहीं, पण जलमंथन करून लेशमात्रसुद्धां घृत मिळत नाहीं, मिळणें शक्य नाहीं. गिरण्यांच्या बाहेरील तुसाच्या ढिगावर बसून तो पाखडून कांहीं कातकरी लोक धान्य मिळवितात ! हें प्रत्यक्षप्रमाणसिद्ध आहे. निर्दोष दृष्टान्त कोणता ? (घ) घृत = अमृत = मोक्ष असाहि अर्थ आहे. "अप्सु घृताऽमृते" (अमर). विषय आहे भक्तीवांचून ज्ञानानेंच मोक्ष मिळविण्याची अशक्यता सांगण्याचाच. ध्वनि कशांत आहे ? (ङ) प्रसाद हा काव्यगुण श्लोकांत आहे कीं चौपायांत ? भक्ति हा मधुर कोमल रस असतां श्लोकाची भाषा ओजपूर्ण आहे, चौपायांची माधुर्ययुक्त आहे; हें सर्व असून थोडक्यांत सर्वांगीण वर्णन कशांत आहे हें आतां रसज्ञ काव्यमर्मज्ञ वाचकांनीं ठरवावें.

३. स्कन्दपुराण व मानस

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः ।
अमितस्य हि दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥

(स्कंद. ब्राह्म. धर्मारण्यमाहात्म्य ७।४७).

अर्थ—पिता मोजकें देतो, भाऊहि मोजकें देतो, पुत्रहि मोजकें देतो; (म्हणून) अमित (मोजमापरहित, अपार) देणाऱ्या पतीची पूजा (सेवा) कोणती स्त्री करणार नाहीं ? (क) यांत माता, भगिनी इत्यादि अनेकांचा उल्लेख नाहीं; सासरीं गेलेल्या, राहाणाऱ्या, कन्येवर पित्यापेक्षां मातेचें प्रेम अधिक असतें म्हणून ती अमित देऊं शकेल असें निर्दोष सहेतुक अनुमान यांतून निघतें. (ख) 'अमित देणाऱ्या पतीची पूजा करतील' यांतून अर्थ निघतो कीं अमित न देणाऱ्याची पूजा करणार नाहींत. पति अमित देणारा असतो असा स्पष्ट नियम सांगितला नाहीं. (ग) अमित देणाऱ्या पतीची पूजा (सेवा) सर्व स्त्रिया करतील असा अर्थ वरील वचनांत अभिप्रेत आहे. परंतु या तिन्हीं गोष्टी प्रत्यक्षांत दिसत नाहींत.

मानस—

माता पिता बंधु हितकारी । सकल मितप्रद राजकुमारी ॥
वैदेही ! अमितद भर्ता ही । अधम नारि जी सेवित नाहीं ॥

(अरण्य. ५।५।६)

१. यांत माता, पिता, बंधु यांचा स्पष्ट उल्लेख असून पुत्रादि इतर सर्वांचा अन्तर्भाव

'**सकल**' शब्दांत केला आहे. म्हणजे श्लोकांतील एका बाजूनें अव्याप्तिदोष व दुसऱ्या बाजूनें अतिव्याप्तिदोष मानसवचनांत नाहीं. (क) 'पति अमित देणारा नसेल तर' असा अर्थ काढण्यास मानसवचनांत सवडच नाहीं; कारण, 'वैदेही! अमितद भर्ताही' = वैदेही! अमित देणारा फक्त भर्ताच असतो. असा सार्वत्रिक नियमच सांगितला आहे. (ख) 'का न पूजयेत्' आणि 'अधम नारि जी सेवित नाहीं' यांत कोणतें काव्य सरस हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. 'खलु' **खद्योत– दिवाकरिं अंतर!**

४. हनुमन्नाटक व मानस

विषय–शृंगार-रसांगभूत कोमल मधुर विनोद व तोहि नारीवर्गांतला आहे. चित्रकूटच्या मार्गावरील भिल्लिणी आणि कोळणी रामलक्ष्मणांकडे बोट दाखवून संकोचानें, नम्रतेनें, मधुर हृदयस्पर्शी विनोदानें सीतेला विचारतात कीं, (२।११६।८-११७।१)

राजकुमरयुग सहज सुशोभन। यद्-द्युतिनें द्युति मरकत-कांचन ॥
दो०—**श्यामल गौर किशोर वर सुंदर सुषमा क्षेत्र** (हिं.–ऐन)।
शरद शर्वरीनाथमुख शरद सरोरुह–नेत्र ॥ ११७ ॥
कोटिमनोजां लाजविणारे। सुमुखि कोण हे तव, वद सारें ॥ १ ॥

(हिंदींत द्युति = दुति, क्षेत्र = ऐन, नेत्र = नैन हे अधिक मधुर शब्द असल्यानें मराठीपेक्षां माधुर्य थोडें जास्त आहे.) हावभावयुक्त वरील विनोदी प्रश्नाचें उत्तर मानसांतील सीता कसें हावभावयुक्त लाजत मुरकत देते पाहा.

प्रेमळ मंजुळ वचना परिसत। मनिं सस्मित सीता संकोचत ॥
तयां विलोकुनि विलोकि धरणी। उभयीं संकोचित वरवर्णी ॥
प्रेमें, लाजुनि, मृगशिशु-नयनी। वदली मधुर वचन पिकवचनी ॥
सहज सुशील गौरतनु सुंदर। लक्ष्मण नाम सान मम देवर ॥
वदनविधुस मग पदरें झांकुनि। प्रियपति निरखुनि भृकुटि वाकवुनि ॥
खंजन-मंजुल वक्र अधांगें। तयां खुणेनें निजपति सांगे ॥

(२।११७।२-७)

यावर मल्लीनाथी करणें म्हणजे विविधरंगी कोमल कुसुमांनीं डंवरलेल्या मंजुल लता-कुंजाला माकडानें गदगदां हलविणें होय! प्रश्न आणि उत्तर या दोन्हींत मनोहर नाट्य आहे व विषय सात्त्विक शृंगार-विनोदाचा आहे.

हनुमन्नाटकांतील हाच कथाभाग पाहा—

पथि पथिकवधूभिः सादरं पृच्छ्यमाना।
कुवलयदलनीलः कोऽयमार्ये तवेति ॥

हे आर्ये! हा नीलकमलाच्या पाकळ्यांसारख्या नीलवर्णाचा तुझा कोण? असें मार्गस्थ वधूंनीं सादर विचारलें. याची मागल्या चार ओळींशीं तुलना करून पाहावी. येथें

एकट्या नीलवर्ण रामाबद्दल विचारलें. यांत कृत्रिमता दिसते. सीता, राम, लक्ष्मण या तिन्ही व्यक्ती अगदीं अपरिचित असतां सीतेला एकट्या नीलवर्ण पुरुषाबद्दलच हा तुझा कोण असा प्रश्न विचारणें स्वाभाविक आहे कीं त्या दोघांच्या अप्रतिम लावण्याचें वर्णन करीत त्यांच्याकडे बोट दाखवीत हे दोघे तुझे कोण असें विचारणें स्वाभाविक नाट्य व स्वभावोक्ति आहे? आर्ये! हें संबोधन कुठें व 'सुमुखि!' हें कुठें? (क) विनोद व माधुर्य कोणत्या प्रश्नांत अधिक आहे? आतां उत्तर पाहा :—

स्मितविकसितगण्डं व्रीडविभ्रांतनेत्रं ।
मुखमवनमयन्ती स्पष्टमाचष्ट सीता ।। (ह. ना. ३।१६)

यापुढील श्लोक असाच ओजानें भरलेला आहे. (क) शृंगारविनोदाच्या वर्णनास ही भाषा शोभते का? गंड, व्रीड, विभ्रांत, नेत्र, स्पष्ट, चष्ट हे वीर, भयानक, रौद्र रसांना पुष्ट करणारे कठोर शब्द कोमल मधुर, मंजुल शृंगार-विनोदास वापरले आणि नाटकांत! यांत मधुर स्मित करणें आणि खालीं मान घालणें इतकाच अभिनय आहे. नाट्य आहे!

मानस केवल नाट्यकाव्य नसून नाट्यमहाकाव्य असतां भाषा अगदीं रस-भावानुकूल आणि हावभाव, अभिनय मूळ नाटकांतल्यापेक्षां फारच मनोहर! मूळ नाटकांत एका-विषयींच प्रश्न विचारण्यांत विनोद अगदीं खालच्या प्रतीचा, नीरस व अस्वाभाविक वाटतो.

५. मानस व वाल्मीकि रामायण—रिकामा रथ घेऊन अयोध्येंत परत आल्यावर सुमंत्र दशरथांकडे गेला त्या वेळेचें वर्णन आहे.

जात सुमंत्रा दिसले राजे । अमृतरहित जणुं इंदु विराजे ।। ४ ।।
भूषण आसन शयन न कांहीं । पतित मलिन अति भूमितला ही ।। ५ ।।
घेत उसासे शोचति ऐसे । स्वर्गपतित जणुं ययाति जैसे ।। ६ ।।
घडि घडि शोकें भरती छाती । पतित जळुनि छद जणुं संपाती ।। ७ ।।
राम! राम! हे रामा! स्नेही । वदति राम! लक्ष्मण! वैदेही! ।। ८ ।।

वाल्मीकि रामायण "......**राजानं दीनमातुरं । पुत्रशोकपरिद्यूनमपश्यत् पाण्डरे गृहे ।। ... आसीनम्**" (अयो ५७।२४-२६)

सुमंत्राला दशरथ या स्थितींत दिसले. कोणतें वर्णन दशरथांचें यथार्थ-चित्र डोळ्यां-समोर उभें करतें? दीन, आतुर, पुत्रशोकानें क्षीण झालेले बसलेले दिसले. रामविरह-व्यथेची यथार्थ कल्पना कोणत्या वर्णनानें सहज करतां येते?

अभिगम्यतमासीनं नरेन्द्रमभिवाद्य च ।
सुमंत्रो रामवचनं यथोक्तं प्रत्यवेदयत् ।। २५ ।।
स तूष्णीमेव तच्छ्रुत्वा राजाविभ्रान्तचेतनः ।
मूर्च्छितो न्यपतद्भूमौ रामशोकाभिपीडितः ।। २६ ।।

हे तीन श्लोक व मानसांतील वरील पांच ओळी यांची विविध बाजूंनीं तुलना करून पाहावी म्हणजे खात्री होईल कीं मानसांतील वर्णन फारच सुंदर, स-रस, भावपूर्ण व नीतिशिक्षक आहे. तेथें (वाल्मीकि रामायण) दशरथ बसलेले असून सुमंत्र काय सांगतो तें ऐकत आहेत; पण सुमंत्राला पाहतांच 'राम !' असा उच्चार झाला नाहीं; व परिणाम हा झाला कीं सुमंत्रानें सांगितलेलें ऐकून कांहीं न बोलतां दशरथ मूर्छित पडले.

येथें मानसांत आधीं नुसत्या जमिनीवर आर्त, मलिन व म्लान झालेले, बेहोष पडलेले होते. रामनामाचा उच्चार होतांच त्या 'श्रीरामनामामृतं' नें (किष्किंधा. मं. श्लो.२) शरिराला व मनाला इतकी शक्ति व शीतलता आली कीं पुढें दशरथांनीं सुस्थितींत सुमंत्राशीं संभाषण केलें आहे. *रामनामाला अमृत म्हटलें आहे त्याची सक्रिय सत्यता किती सहज दाखविली !*

येथें पांच उदाहरणेंच दाखवितां आलीं. गूढार्थचंद्रिकेंत अनेक ठिकाणीं यापेक्षां अधिक विस्तारानें केलेल्या तुलना प्रत्येक काण्डांत आहेत. प्रस्तावनेंत देण्यासाठीं नमूद केलेल्या ३० उदाहरणांपैकीं फक्त पांचच दिलीं तरी इतकीं पृष्ठें लागलीं तरी विस्तार फारच कमी केला असें वाचक म्हणतीलच ! टीकेंतील कांहीं तुलना-स्थलांचा निर्देश खालीं केला आहे. मानसमर्णांतील 'श्यामसरोज दाम–' आणि 'मानसका आमलक और बदर' हे लेख पाहावेत.

गूढार्थचंद्रिकेंतील कांहीं तुलनास्थानें :— १।२२।६-७ (भ. गीता. ७।१५-१७ श्लोक): १।३०।७; १।७२।५; १।७२।६-७; १।७९; १।११३।२; १।११७।२; १।१९८।५; १।३५६।२; २।१०।१-३; २।२९।२-३; २।१२७; ३।२८ व पुढें; ३।२३।३-४; ४।४; ५।१०।३-६; ५।४२।१-२; ५।४९ म; ६।११ म; ६।१२।१-४; ७।२।४ इत्यादि पुष्कळ आहेत. वर नमूद केलेल्या उदाहरणांत-भगवद्गीता, अध्यात्म रामायण, चाणक्यनीति, नीतिशतक, वाल्मीकि रामायण, भागवत व हनुमन्नाटक यांतील वचनांशींच मुख्यतः तुलना केलेली दिसेल.

मूळ ग्रंथांतील वचनांपेक्षां मानसांतील वर्णन कसें सरस आहे याचें दिग्दर्शन अल्प प्रमाणांत यथामति केलें. या लेखकाची बुद्धि साहित्यशास्त्र विसरली असल्यानें अधिक विस्तार करतां आला नाहीं.

'**अद्भुत अपूर्व मानस नमुने**' या पांचव्या मुख्य प्रकरणांतील हें शेवटचें १२ वें प्रकरण येथें समाप्त झालें. या बारा प्रकरणांत व त्या पूर्वींच्या अनेक प्रकरणांत अनेक वेळां उल्लेखिलें आहे कीं मानस नाट्यमहाकाव्य आहे. म्हणून पुढील सहाव्या मुख्य प्रकरणांत प्रथम महाकाव्य-लक्षणें सांगून तीं मानसांत कशीं आहेत हें १२ उपप्रकरणांत साधार सिद्ध केलें आहे.

अद्भुत अपूर्व मानस-पारा । जाववे न, परि नमुने बारा ॥
प्रेरक रामकृपेचा वारा- । दाखवि; त्या नमुं वारंवारा ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।१ 卐 卐 卐

महाकाव्य लक्षणें.

श्रीरामचरितमानस हें नाट्यमहाकाव्य आहे हें सिद्ध करावयाचें असल्यानें प्रथम तें महाकाव्य आहे हें सिद्ध करणें जरूर आहे. त्यासाठीं महाकाव्याचीं लक्षणें कोणतीं हें प्रथम पाहिलें पाहिजे; म्हणून या पहिल्या प्रकरणांत **साहित्यदर्पण** या सर्वमान्य ग्रंथांत दिलेलीं महाकाव्यलक्षणें दिलीं आहेत.

(१) महाकाव्याचा नायक कोणी देवता किंवा सत्कुलोत्पन्न, धीरोदात्तगुणसंपन्न क्षत्रिय असावा; किंवा अनेक सत्कुलोत्पन्न राजेहि असूं शकतील. (२) शृंगार, वीर आणि शान्त या रसांपैकींच एक अंगी असावा आणि बाकीचे सर्व रस अंगभूत असावेत. (३) नाटकाच्या सर्व संधींनीं तें युक्त असावें. (४) एखादी ऐतिहासिक कथा किंवा एखाद्या सज्जनाचें तें चरित्र असावें. (५) आरंभीं वंदन, आशीर्वाद किंवा वस्तुनिर्देश (मुख्य विषयकथन) केलेला असावा. (६) महाकाव्यांत धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचें वर्णन असावें; पण सर्वांचें फल एकच सांगितलेलें असावें. (७) कुठें कुठें खलांची निन्दा व संतांचें गुणवर्णन असावें. (८) महाकाव्यांत आठांहून अधिक (काण्डें) मुख्य विभाग असावेत; व ते फार मोठे किंवा फार लहान नसावेत. (९) प्रत्येक मुख्य विभागांत व सर्गादिकांत एकच मुख्य वृत्त असावें व प्रत्येक सर्ग, अध्याय, इत्यादींची समाप्ति निराळ्या वृत्तांनीं केलेली असावी. (१०) प्रत्येक विभागाच्या अंतीं पुढील विभागाचा मुख्य विषय सुचविलेला असावा. (११) महाकाव्यांत-संध्या, चंद्र, प्रदोष, अंधार, प्रातःकाल, सूर्य, सूर्योदय, दिवस, मध्याह्न, ऋतु, पर्वत, वन, नदी आणि सागर या चौदा विषयांचें आणि मृगया, संभोग, विप्रलम्भ, रणप्रयाण, रण, विवाह, मंत्र, पुत्र, जलकेलि व मधुपान यांचें यथायोग्य वर्णन असावें. (१२) मुख्य विभागाचें नांव कविचरित्र, नायकचरित्र किंवा त्या विभागांतील कथेशीं संबंध असलेलें असावें.

वर नमूद केलेलीं सर्व महाकाव्यलक्षणें मानसामध्यें दाखविणें जरूर आहे. शिवाय मानसांतील प्रत्येक काण्ड हा एक स्वतंत्र सोपान आहे; म्हणून प्रत्येक सोपानांत हीं लक्षणें असणें जरूर आहे; म्हणून पुढील सर्व उपप्रकरणांत महाकाव्यलक्षणें दाखवितांना प्रत्येक कांडांतील अवतरणें दिलीं आहेत. पण प्रस्तावना-विस्तार अनावर होऊं नये म्हणून एका काण्डांतील सविस्तर उदाहरणें व इतर काण्डांतील अगदीं संक्षेपानें दाखविलीं आहेत. पुढील प्रकरण ‘ महाकाव्यनायक सत्कुलोत्पन्न क्षत्रिय ’ हें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।२ 卐 卐 卐

महाकाव्यनायक सत्कुलोत्पन्न क्षत्रिय

महाकाव्याचा नायक कोणी देवता किंवा धीरोदात्तगुणसंपन्न, सत्कुलोत्पन्न, क्षत्रिय असावा हें लक्षण श्रीमानसनायकास कसें लागू पडतें हें पाहिलें पाहिजे. मानसाचे मुख्य नायक श्रीराम आहेत, व ते रघुकुलोत्पन्न दशरथ महाराजांचे पुत्र आहेत. मानसांतील राम परमात्माच आहेत व धीरोदात्तगुण-संपन्न सत्कुलोत्पन्न क्षत्रियही आहेत. *या प्रकरणांत त्यांतील 'सत्कुलोत्पन्न क्षत्रिय' हें लक्षण मानसाधारें सिद्ध करावयाचें आहे.* रघुकुल हें क्षत्रिय सत्कुल आहे हें दाखविणें म्हणजे **दाखविण्यातें दिवाकरा। घेणें थोरहि दिवा करां॥** अशासारखेंच आहे; तथापि,

(१) मानसांतील रघुकुलश्रेष्ठता पाहा — रघुवीर रामच लक्ष्मणास म्हणतात,

(क) ***सहज रघुकुलीं स्वभाव राया। मन कुमार्गीं कधिं टाकि न पाया॥***
मला प्रतीति मनाची भारी। स्वप्निंहि दृष्ट न कधिं परनारी॥
रणिं रिपु ज्यांची पाठ न पाहति। मन किं नजर परनारि न पावति॥
याचक कधिंहि न ऐकति 'नाहीं'। **ते नरवर थोडे जगिं पाहीं॥** (१।२३१।५-८)

(ख) लक्ष्मण म्हणाले आहेत (१।२५३।१–२;४–६)

जिथें असेल कुणी रघुवंशी। त्या समाजिं कुणि असें न भाषि॥
जनक असें वच अनुचित वदले। **जाणुनि रघुकुलमणि बसलेले॥२॥**
जर आज्ञा आपली पावतों। कंदुकसें ब्रह्मांड उचलतों॥ ४॥
कच्चा घटसें टाकिन फोडुन। मेरुमुळ्यासम देइन मोडुन॥ ५॥
भगवन्! प्रतापमहिमा तव तर। कोण विचारें पिनाक जर्जर॥ ६॥

(ग) लक्ष्मण परशुरामास म्हणाले (१।२७३।५–७)

'भृगुसुत कळुनि जानवें पाहुनि। सोशिन बोलां तें रूप दावुनि॥ ५॥
धरणीसुर सुर सुरभी हरिजन। यांवर अमचे कुळिं न शूरपण॥
वधें पाप अपकीर्ति हारतां। ***पायां पडुंही तुम्ही मारतां॥ ७॥***

(घ) श्रीरघुपति भृगुपतीस म्हणाले (१।२८४।१–४)

देव-दनुज-भट-भूप जगांतिल। समबल अथवा अतिबल असतिल॥
जर कुणि देइ समर-आह्वाना। सुखें लढूं काळासिहि जाणा॥
क्षात्रिय-तनुधर रणा कचरतो। लावि कलंक कुला पामर तो॥
वदूं स्वभाव, **न कुला प्रशंसीं।** ***कुणि न डरे काळा रघुवंशी॥***

(ङ) दशरथ कैकयीस सांगतात

रघुकुल रीतिस कदा खंड ना। जावो प्राण हि **वचन-भंग ना॥**
(२।२८।४)

(च) श्रीराम भरतास म्हणाले,

जाणां तात ! तरणिकुलरीती । सत्यसंध, पितृकीर्ती-प्रीती ।। (२।३०५।१)

याप्रमाणें मानसांत रघुकुळाची महती गाइली आहे.

(२) **दशरथ-महिमा** — परमात्मा श्रीराम ज्यांचे पुत्र झाले त्या दशरथ भूपतींचा महिमा मानसांत पुष्कळ वर्णिला आहे.

(क) **रघुकुलमणि जे अयोध्याधिपति । नामें दशरथ विदित वेदिं अति ।।**

धर्म धुरंधर गुणधी ज्ञानी । हृदयिं भक्ति मति शारङ्गपाणीं ।। (१।१८८।७–८)

(ख) **जयां निर्मुनी धन्य विधाता । महिमासीम रामपितृमाता ।।** (१।१६।८)

' दशरथ कौसल्या विख्याता ':।

(ग) जनकपुरवासी म्हणतात,

' यांसम कोणि न शिव आराधित । कोणि न यांसम फलास साधित ।। '

(घ) **अयोध्येश भाग्य नि विभव पाहुनि देव अजादि ।**

स्तवुं लागति दशशतमुखा म्हणुनि जन्म निज बादि ।। (१।३१ श.)

(ङ) **सकल सुकृत-मूर्तिच नरनाहो** (२।२।२)

(च) **त्रिभुवनिं कोणि त्रिकाळीं जगतीं । भूरिभाग्य दशरथसम नसती ।।** (२।१।४)

' सुरेशसखा रघुरावहि ।। (२।९।१।६)

(छ) सीता म्हणते—

' सम्राट् श्वशुरहि कोशलराव । भुवनिं चतुर्दश प्रगट प्रभाव ।।

पुढें येउनी सुरपति नेती । आसन सिंहासनार्धे देती ।।' (२।९८।३–४)

(ज) वसिष्ठ भरतास सांगतात,

' शोचनीय नाहिं कोशलरावहि । भुवनिं चतुर्दश प्रगट प्रभावहि ।।

झाला ना, होणें ना, नाहीं । भूप भरत ! सम तव जनकाही ।।

विधि हरिहर सुरनाथ दिशापति । दशरथ-गुणगाथा सब वानति ।। '

(२।१७३।५–७)

(झ) भरद्वाज मुनि भरतास सांगतात,

' दशरथगुणगणवर्णन न घडे । त्यांसम जगिं नहिं अधिक कुणिकडे ।।

(२।२०९।७–८ व दो. २०९)

दशरथवर्णनपर आणखी पुष्कळ वचनें आहेत पण इतकीं पुष्कळ झालीं. याप्रमाणें रघुकुल हें सर्वोत्तम क्षत्रियकुल आहे. श्रीरामजनक दशरथ अनुपम क्षत्रियोत्तम आहेत म्हणजेच श्रीराम उत्तम सर्वश्रेष्ठ सत्कुलोत्पन्न क्षत्रिय आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।३ 卐 卐 卐

महाकाव्यनायक देवता किंवा धीरोदात्तगुणसंपन्न क्षत्रिय

श्रीमानसांतील मुख्य नायक श्रीराम सत्कुलोत्पन्न व क्षत्रियोत्तम दशरथांचे पुत्र आहेत हें दाखविलें. श्रीराम सामान्य देवता नसून 'ब्रह्मादि शंकरसेव्य' आहेत हें प्रत्येक कांडांत अगदीं उघड आहे. धीरोदात्तगुणसंपन्न आहेत हें दाखविणें जरूर आहे.

धीरोदात्त — १ अविकत्थन, २ क्षमावान, ३ अति गंभीर, ४ महासत्त्व, ५ निगूढमान, आणि ६ दृढव्रत हे सहा गुण ज्या ठिकाणीं असतील त्यास धीरोदात्त म्हणतात.

१. **अविकत्थन** — आत्मश्लाघा न करणारा, आपला मोठेपणा आपल्या मुखानें न सांगणारा.

(क) **' नाथ ! शंभु-धनु-भंजन जो करि । कुणि असेल अपला सेवेकरि ।। '** (१।२७९।१); ६।११९।११; ७।८।६–८; ४।१८।४; टीका पाहा.

२. **क्षमाशील** — सहज क्षमा करणारा. (क) क्षत्रिय कुलद्रोही असें स्वतःस म्हणण्यांत मोठेपणा मानणारे भृगुपति परशुराम म्हणाले,

नेणुनि वदलों बहु अनुचित तें । क्षमा *क्षमामंदिर दो भ्राते ।।* (१।२८५।६) अयोध्याकांडांत कैकयीला क्षमाशीलतेचा पूर्ण अनुभव आला. अरण्यकांडांत जयन्त-कथा पाहा. किष्किंधाकांडांत सुग्रीवाला क्षमा केली (४।२१।७ व तत्पूर्वी पाहा). ५।२२; ६।२०।६; ७।७।१-२ पाहा.

३. **अतिगंभीर**–सिंधु कोटि शवसम गंभीर (७।९२।३); ६।८९:–; १।१९०।१. पाहा.

४. **महासत्त्व**–सुखदुःख, लाभहानि इत्यादींनीं ज्याला हर्ष किंवा विषाद वाटत नाहीं *तो महासत्त्व.* (क) विस्मय (= विषाद) हर्ष न मुळिं रघुरावा ' (२।१२।३) असें इंद्रादि देवांनीं सरस्वतीस सांगितलें आहे. १।११६।५; २।१६५; २।१६६।१; अयोध्या. मं. श्लो. २ रा पाहा. *वाल्मिकि रामायणांतील राम इतके महासत्त्व नाहींत* (गूढार्थचंद्रिका पाहा).

५. **निगूढमान**–अंगीं सामर्थ्य असून, स्वाभिमान असून, मोठेपणा असून जो या गुणांना लपवून नम्रतादि धारण करतो *तो निगूढमान.*

(क) **' कृपा कोप वधबंधन मजला । करणें जाणुनि दास आपला ।।'** (२।२७९।४) असें परशुरामास सांगितलें.

(ख) **' त्यज छल, कर रण शम्भूद्रोही । ना तर सानुज तुज वधतोंही ।। '** असें **' परशु उगारुनि भृगुपति बकती '। तरी** *सस्मित मनीं राम शिर नमती ।। '* (१।१८१।३–४; २।४१।५–६, ६।९०।९–१० व छंद पाहा). रावणाशींसुद्धां निगूढमान ! *वाल्मिकि रामायणांतील राम इतके निगूढमान नाहींत.* (गूढार्थचंद्रिका पाहा).

६. **दृढव्रत—** व्रत, प्रतिज्ञा, वचन इत्यादींचा कधींहि भंग न करतां दृढतेनें चालविणारा तो दृढव्रत.

(क) 'सत्यसंध रघुराव दृढव्रति' (२।८२।१) 'सत्यसंध पाते श्रुतिसेतू (२।२५४।३). २।२६४; २।२९२; ३।९ मध्यें केलेला पण अक्षरशः तडीस नेला आहे. ४।६ मध्यें केलेली प्रतिज्ञा पूर्ण केली आहे. ४।७।२३ पाहा. ५।४१; ५।४३।८; ६।६८।३; ६।९४।१–२ पाहा. बिभीषणाला मागें सारून ती प्राणघातक शक्ति स्वतःवर घेऊन 'शरणागतभयहारी' पण पाळला आहे.

याप्रमाणें **मानसाधारें ठरलें कीं राम धीरोदात्तगुणसंपन्न आहेत.**

◆◆◆◆

फ फ फ ६।४ फ फ फ

महाकाव्य व रस

महाकाव्यांत शृंगार वीर आणि शान्त या तीन रसांपैकीं कोणता तरी एक अंगी (मुख्य) असावा आणि इतर रस त्याच्या अंगभूत असावेत असा नियम आहे. साहित्यशास्त्रानें शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र आणि शान्त असे नऊ रस मानले आहेत, व भक्ति रसाचा अन्तर्भाव शान्त रसांत केला आहे.

श्रीमदाचार्य मधुसूदन सरस्वतींनीं '*भक्तिरसायन*' या संस्कृत ग्रंथांत भक्ति हा दहावा स्वतंत्र रस आहे असें सशास्त्र सिद्ध केलें आहे. श्रीवामनपंडितांनींसुद्धां मराठींत 'भक्तिरसायन' या स्वतंत्र ग्रंथांत (अनुवाद नव्हे) भक्ति हा स्वतंत्र रस सिद्ध केला आहे. मानसांतसुद्धां 'नवरस' असा उल्लेख करून नंतर त्याच प्रकरणांत '*हरिपदरति रस ...*' (१।३७।१४) हा भक्तिरसाचा स्वतंत्र उल्लेख केला आहे. 'रामभक्तिरस-सिद्धि' (अयोध्या. २०८ टीका) तदनुसार *महाकाव्यलक्षण म्हणून सर्वत्र, युद्धवर्णनांतसुद्धां, सर्व रसांचें पर्यवसान भक्तिरसामध्यें केलेलें आढळतें* तें इतकें स्पष्ट आहे कीं उदाहरणें देण्याची आवश्यकताच नाहीं. **भक्तिरस हा तर मानसाचा प्राण** आहे. हा ज्याच्यापाशीं निर्दोष असेल तो प्रभु रामचंद्रांस प्राणप्रिय होतो असा मानसांत श्रुतिसिद्धान्त वर्णिला आहे. (प्रस्तावना प्रकरण ५।६ पाहा).

मानस नाट्यमहाकाव्य असल्यानें व नाट्यकाव्यांत *शृंगार किंवा वीर रसच अंगी असावा* असा नियम असल्यानें *नाट्यदृष्टीनें अनेक ठिकाणीं वीर रस मुख्य आहे.*

१. **बालकांडांत** आरंभीं व पुष्पवाटिका, नगरनिरीक्षण इत्यादि प्रकरणांत शृंगार पुष्कळ असला तरी त्या प्रकरणांतसुद्धां भक्तिरसच प्रधान आहे. (क) विश्वामित्र-यज्ञरक्षणास निघाल्यापासून (कांहीं प्रकरणें सोडून) धनुर्भंग व परशुरामगर्वहरणा-पर्यंत वीररस प्रधान आहे. बालचरित्रांतसुद्धां मृगयावर्णनांत वीर रस आहे.

दो. २४१-२४२ मध्यें बीभत्साशिवाय सर्व रस आहेत. शिववऱ्हाडवर्णनांत बीभत्स आहे व इतरहि पुष्कळ आहेत पण *शृंगार रस मुळींच नाहीं !*

२. अयोध्याकांडांत सर्व रसांचा उत्तम परिपोष झाला असला तरी करुणेचा सागर, करुणेच्या सर्वत्र नद्याच, आहेत. पण त्यांत भक्ति रस अंगी आहेच. वीर रसाचा अभाव आहे असें मात्र नाहीं. निषादराजाची युद्धाची तयारी, लक्ष्मणाचा क्रोध, कैकयीकुबडी-संवाद, कैकयी-दशरथ संवाद यांत तो पुष्कळ आहे.

३. अरण्य-पूर्वार्धांत वीर-भक्ति व **उत्तरार्धांत** करुणा-भक्ति व अंगभूत सर्व रस आहेत.

४. याप्रमाणें पाहिल्यास दिसेल कीं वीर रस सातही सोपानांत आहे. बाल. दो. २०८ पासून श्रीरघुनाथाचें रूपच शृंगार व वीर यांचें अद्भुत मिश्रण आहे. गूढार्थ-चंद्रिकेंत स्तुति व मंगलाचरणांचें श्लोक, रामरूपवर्णन इत्यादि लहान लहान विभागांतीलसुद्धां रसांचें स्पष्ट निदर्शन व पुष्कळ ठिकाणीं रससंबंधीं भावांचें निदर्शन केलें आहे. विस्तार नको.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।५ 卐 卐 卐

महाकाव्यांत नाटक-संधि

महाकाव्य नाटकांच्या पंच संधींनीं युक्त असावें असा नियम आहे. मानसांत सर्व संधि अगदीं उत्तम रीतीनें ग्रथित आहेत. हा विषय बहुसंख्य वाचकांस कंटाळवाणा असला तरी शास्त्राचा निरादर करणेंहि योग्य नाहीं म्हणून शक्य तितक्या सुलभ भाषेंत वर्णन केलें आहे.

संधि पांच वर्णिले आहेत. मुखं प्रतिमुखं गर्भो विमर्शश्च तथैव च । तथा *निहरणं* चेति क्रमात् पञ्चैव संधयः ॥ (अग्निपुराण अ० ३३८।२१) '*निर्वहणम्*' असा, पाठभेद पाद टीपेंत दिला आहे, व तोच शब्द प्रचलित आहे. १ *मुख*, २ *प्रतिमुख*, ३ *गर्भ*, ४ *विमर्श* आणि ५ निर्वहण असे क्रमानें पांच संधी असले पाहिजेत हे मानसांत आहेत.

१. मुख-संधि — अनेक अर्थ व कार्यें यांच्या बीजाची उत्पत्ति प्रारंभदशेच्या संयोगानें होते त्यास **मुखसंधि म्हणतात.** 'ग्लानी अति धर्माची कळतां–' (१।१८४।४) **पासून** 'गिरिकाननिं भरपूर निवसुनी । निज निज सेना रुचिर बनवुनी ' (१।१८८।५) **पर्यंत मुखसंधि आहे.** भूमीचें देवांकडे जाणें व ब्रह्मदेवकृत स्तुति *यांनीं प्रारंभदशा सुरू झाली.* आकाशवाणीनें दिलेलें आश्वासन आणि देवांनीं ऋक्षवानरांचे अवतार घेऊन प्रभूच्या आगमनाची वाट पाहात राहणें यानें रामादि अवतार व रावणवधादि *विविध कार्यांच्या बीजाची उत्पत्ति झाली.*

२. प्रतिमुख-संधि — मुखसंधीनें निर्दिष्ट केलेल्या मुख्य उपायांचें स्पष्टास्पष्ट निदर्शन ज्यांत असतें त्यांस **प्रतिमुख संधि म्हणतात.** 'रघुकुलमणि जे अयोध्याधिपति। नामें दशरथ विदित वेदिं अति।' (१।१८८।७) **पासून** 'रामगमन वनिं शोभन कथिलें' (१।१४२।४) **पर्यंत प्रतिमुखसंधि आहे.**

(क) दशरथचरित्र व रामावतारापासून सर्व बालकाण्ड आणि राम चित्रकूटास जाऊन राहीपर्यंतचा (अयोध्या. १४२।४) **सर्व भाग प्रतिमुखसंधींत आहे.** रामावतार कां झाला, विश्वामित्रांबरोबर कां गेले, वनवासास कां गेले *इत्यादि गोष्टींचें स्पष्ट ज्ञान* विश्वामित्र-वसिष्ठादि कांहीं मुनींसच आहे, कांहींना *अस्पष्ट कल्पना* आहे व बहुसंख्य लोकांस राम मनुष्यच वाटत आहेत.

३. गर्भसंधि — पूर्वीच्या संधीनें किंचित स्पष्ट केलेल्या मुख्य उपायाचा ज्यांत हळूहळू विकास होतो **त्यास गर्भसंधि म्हणतात. (क)** 'ऐका सचिव जसें पुरिं आले' (२।१४२।४) पासून 'लक्ष्मण तिचे सुलाघवें हरिती नासाकान। तिचे करीं रावणा जणूं दिधलें कीं आह्वान ॥' (३।१७।–) **पर्यंत गर्भसंधि आहे.** सुमंत्र परत निघाल्यापासून पुढील सर्व अयोध्याकाण्ड व शूर्पणखाविरूपीकरणापर्यंतचा अरण्यकांडाचा **भाग गर्भसंधींत आहे.**

४. विमर्शसंधि — विमर्श = वाटाघाट, विचार, चर्चा, संशय. मुख्य कार्यसिद्धीचा उपाय गर्भसंधीनें अधिक स्पष्ट केला असला तरी शापादिकांमुळें विघ्नयुक्त झालेला असतो व ज्यांत कार्यसिद्धीविषयीं विशेष विचार, वाटाघाटी कराव्या लागतात **त्यास विमर्शसंधि म्हणतात.**

(क) 'नाककानविण विकाळा अति' (अरण्य. १८।१) पासून 'समाचार लंकेतला सांगे वालिकुमार'। (लंका. ३८ म) **पर्यंतचा सर्व भाग विमर्शसंधि आहे.** शूर्पणखाविरूपीकरणानंतरचा खरदूषणवध, सीताहरण, शबरीभेट, सुग्रीवसख्य इत्यादि सर्व भाग, सुंदरकांड आणि लंकाकाण्डांतील अंगदशिष्टाई **हा सर्व भाग विमर्शसंधींत आहे.**

(ख) शूर्पणखेच्या हस्तें रवाणास आह्वान दिलें गेलें तरी नारदाच्या शापामुळें सीताहरण, सुग्रीवसख्य इत्यादि गोष्टी करण्याचा प्रसंग येऊन ठेपला, स्त्रीविरहशाप खरा करण्यासाठीं सीताहरण; कपिसाह्याचा शाप खरा करण्यासाठीं सुग्रीवसख्य व सागरबंधनापर्यंतचें सर्व कार्य; आणि रावणानें संधि न करतां युद्धासच प्रवृत्त व्हावें म्हणून अंगदशिष्टाई इत्यादि सर्व नाटक करावें लागलें. इतकें झाल्यामुळें कार्यसिद्धि होणार हें निश्चित ठरलें.

५. निर्वहणसंधि — मुखादि चार संधींत जुळवीत आणलेल्या कार्याची सफलता ज्यांत होते **त्यास निर्वहण संधि म्हणतात.** 'रिपुचा समाचार जैं पावति' (६।३९।१) **पासून** उत्तरकाण्ड दो. ५१ नारदस्तुती**पर्यंतचा सर्व भाग निर्वहण संधि आहे.**

लंकेतील युद्धारंभापासून सर्व लंकाकांड आणि प्रजेसह रामनिर्याण व नारदस्तुति **या भागाचा अंतर्भाव निर्वहणसंधींत होतो.**

उत्तर दो. ५? मध्यें श्रीरामचरितकथेचा उपसंहार महेशांनीं केला आहे. उत्तरकांडाचा पुढला भाग पुरवणी-परिशिष्टांसारखा आहे.

याप्रमाणें मानसांत नाटक-पंचसंधी कुठून कोठपर्यंत इत्यादि अल्पशा विस्तारानें दाखविलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।६ 卐 卐 卐

मानस महाकाव्यांत अर्थ, धर्म, काम व मोक्ष.

श्रीरामचरितमानस हें महाकाव्य असल्यानें त्यांत धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचें सांगोपांग वर्णन व त्या सर्वांचें एकच फल वर्णिलेलें असणें जरूर आहे. हें सर्व वर्णन मानसांत कसें व कोठें आहे हें या प्रकरणांत दाखवावयाचें आहे.

मानसांतील भिन्न क्रम — संस्कृत व मराठी ग्रंथांत धर्म, अर्थ, काम व मोक्ष असा क्रम सर्वत्र आढळतो; पण मानसांत अर्थ, धर्म, काम व मोक्ष असाच क्रम आहे. **(क)** अर्थ आणि काम यांच्यामध्यें धर्म घालून सुचविलें कीं अर्थार्जनादि आणि कामभोग या दोन्हींत धर्म पाहिजे. **(ख)** धर्मार्थकाममोक्ष यांत अर्थाला मध्यें घालून सुचविलें आहे कीं धर्म आणि काम अर्थावर अवलंबून असतात. या दोन्हींत धन-द्रव्य (अर्थ) पाहिजे असतें. **(ग)** दोन्हीं प्रथा सहेतुक आहेत. तथापि धर्म व काम यांत धन लागतें हें सर्वांस सहज कळतें; पण अर्थ आणि काम यांत धर्म असला पाहिजे हें थोड्यांसच कळतें आणि फारच थोड्यांस वळतें! यांतील कोणती प्रथा चांगली हें सांगणें या लेखकाचें काम नाहीं; तें वाचकांनीं ठरवावें.

'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः', 'प्रपंचीं पाहिजे सुवर्ण' प्रत्येक कार्य अर्थावर अवलंबून असतें. पैशाची मुळींच जरूर नाहीं व नसला तरी पूर्ण समाधान असतें अशा व्यक्ती परम वंद्य, पण अपवाद होत. अर्थ = पैसा सर्व गोष्टींच्या आरंभीं लागतो हा बहुजन समाजाचा नित्याचा अनुभव आहे, म्हणून गोस्वामींनीं त्याला अग्रस्थान दिलें असावें. मोक्षाची आठवण करणारे, त्याची आवश्यकता वाटणारे फार थोडे आणि मोक्षाच्या मार्गानें जाणारे फार दुर्मिळ म्हणून दोन्ही प्रथांत त्याला शेवटीं ठेवला असावा.

१. अर्थ — अर्थ म्हणजे पैसा, धन, द्रव्य, अर्थशास्त्रांत धनार्जन (धन मिळविणें) त्याचें संरक्षण, उपयोग, व्यय इत्यादिविषयीं जे मुख्य नियम सांगितले आहेत त्या सर्वांचा उल्लेख साररूपानें मानसांत आहेत एवढेंच नव्हे तर प्रत्येक सोपान स्वतंत्र, महाकाव्य, असल्यानें अर्थशास्त्राचे सिद्धांत प्रत्येक कांडांत सांपडतात, आहेत.

(क) पैशाची गरज सर्वांनाच असते व अलीकडे तर पैसाच परमेश्वर वाटूं लागला आहे ! निर्धनपणासारखें, दारिद्र्यासारखें दुःख नाहीं (७।१२१।१३) धनहीन-दरिद्री-माणसाची व त्याच्या कुटुंबांतील व्यक्तींची स्थिति पाणी आटत जाऊन सुकत चाललेल्या जलाशयांतील माशांसारखी असते (४।१६।८).

(ख) **अर्थासाठीं अनर्थ** कसे होतात हें मानसांत बालकांडापासूनच दाखविलें आहे. एका राजानें कपटमुनि बनून प्रतापभानु सम्राटाचा विश्वासघातानें घोर विनाश केला तो पैशासाठींच (बाल.). कैकयीनें अनर्थ केले ते अर्थासाठींच (अयोध्या.). जयन्तानें काक बनून रघुवीर-परीक्षा घेतली त्याचें कारण धनैश्वर्याची आशाच (अरण्य.). वालीनें सुग्रीवाला बेदम मारून हाकलून दिलें वगैरे सर्व अर्थासाठींच (किष्किंधा.) रावणानें लाथ मारून बिभीषणास हद्दपार केलें तें अर्थामुळेंच (सुंदर.). रावणानें पुत्रपौत्रादिकांना बळी दिलें तें अर्थामुळेंच (लंका.) रामराज्यांत मात्र अशीं उदाहरणं नाहींत ! (उत्तर.)

२. शास्त्रानें अर्थसंपादनाचे ६ उपाय सांगितले आहेत.—१ भिक्षा, २ सेवा, ३ कृषि (शेती), ४ विद्या, ५ कुसीद (व्याजबट्टा) आणि ६ वाणिज्य (व्यापार).

(१) **भिक्षा**—'*भीक मागुं* त्यागुनी स्वधर्मा ।' (२।२०४।७); रावण भिकारी बनला आहे—भिक्षा मागण्यास गेला आहे. १।७९; ३।२८।७; ४।१६; यांत भिकारी भिक्षेकरी आहेत !

(२) **सेवा** — कर्मविपाकप्रकरणांत (११ वें) सेवाधर्म हें १५ वें प्रकरण पाहा; विस्तृत वर्णन आहे.

(३) **कृषि**— 'चतुर शेतकरी कृषी खुरपती ।' (४।१५।८). १।१९; ३।३६।७; २।२५३।१; ७।२३।६ पाहा.

(४) **विद्या** — 'आणविती ते गुणी बहुजना । सुज्ञ कुशल जे वितानरचना ॥' (१।२८७।७). १।२०४।४-६; १।२७८।३; २।२७६।४; ३।२१।९; ४।१४।३; ४।१५।१; ७।१०६।६, ७।१२६।६ वगैरे ठिकाणीं उल्लेख पाहावेत.

(५) **कुसीद** — व्याजबट्टा—'गुरुरिण राहि फार मनिं सललें ॥ तें पतिवर अमच्या किं काढलें । व्याज बहू दिन जात वाढलें ॥ घ्या आतां धनको बोलावुनि । शीघ्र देत मी थैली खोलुनि ॥ (१।२७६।२–४). २।९९।८; ५।३२।७; ७।२।१४ पाहा.

(६) **वाणिज्य**—'बाजार सुंदर वर्णवेना वस्तु फुकटहि मिळतसे ।', 'बसले बजाज, सराफ, वाणि अनेक जाणुं कुबेर ते ।' (७।२८ छंद). १।२१३।२-५, २।८६।३, ४।१६ इत्यादि पाहा.

याप्रमाणें अर्थार्जनाचे सहाही प्रकार मानसांत आहेत. प्रत्येक काण्डांत कमी-अधिक प्रमाणानें ६ पैकीं प्रकार वर्णिले आहेत.

(क) **धर्में धन मिळवावें** — वरील सहा साधनांचा उपयोग धर्मानुसार केला

पाहिजे. 'धर्माविण धन......श्रम फल पावुनि' (३।२११९-१०) धर्माला सोडून धन मिळविणें म्हणजे वृथाश्रमरूपी फळ मिळविणें.

(ख) धनाचा व्यय — 'तें धन धन्यचि जया प्रथम गति' (७।१२७।७) प्रथम गति = दान करणें हा धनादिकांचा व्यय करण्याचा उत्तम मार्ग; मध्यम प्रकार म्हणजे विषय भोगांत तें खर्च करणें. शेवटची गति = नाश. पहिल्या दोन मार्गांनीं जें खर्च केलें जाणार नाहीं तें तिसऱ्या मार्गाला लागतें! 'प्रगट धर्मपद चार, हा एकचि कलीं प्रधान। येन केन विधि देती दान करी कल्याण॥' (७।१०३ म.) विषयभोगांत होणारा धनाचा व्यय मात्र धर्मानुकूल झाला पाहिजे. 'धन्य पुण्यरत पावन ती मति।' (७।१२७।७) पुण्य = धर्म.

(ग) धनाचा दुरुपयोग — व्यसनांत व व्यभिचारादिकांत धन खर्च करणें हा दुरुपयोग असून धनहीन होण्याचा मार्ग आहे. 'व्यसनी धन सुगती व्यभिचारी।' (३।१७।१५-१६) इच्छितील तर ते 'बघति काढुं नभ-दुध हे प्राणी।'. अविचारानें, अविवेकानें, धनाचा व्यय करणें दारिद्र्यदायक ठरतें 'अबुध कुटुंबि जसा धनहीन।' (४।१६।८)

(घ) संरक्षण —'असे सकल रघुपति संपत्ती। त्यजुनि जाउं जर विना यत्न ती॥ तर परिणामिं भलेपण मम ना। स्वामीद्रोह अघाग्रणि गगना॥' अशा भावनेनें संपत्तीचें संरक्षण केलें पाहिजे.

(ङ) क्षत्रियादि तीन वर्णांनीं भिक्षा मागणें हा अधर्म आहे. 'भीक मागुं सोडुनी *स्वधर्मा।*' (२।२०४।७) 'नहिं तोष विचार न शीतलता। सब *जाति-कुजातिंत याचकता॥*' (७।१०२।६) हें कलियुगांत केल्या जाणाऱ्या अधर्माचें वर्णन आहे. (गूढार्थचंद्रिका) सेवा व कुसीद ब्राह्मणांनीं करणें अधर्म आहे.

वि. ल. ठे.— **सागरिं सरिता जाति जशा ही। जरी कामना तयास नाहीं॥**
तशि न मागतां सुखसंपत्ती। सहज धर्मशीलासी जमती॥ (१।२९४।२-३)

जे दरिद्री असतील ते एकतर अबुध, व्यसनी वा अधर्मी असले पाहिजेत किंवा पूर्वजन्मांत त्यांनीं दान आणि धर्माचरण केलें नसलें पाहिजे. (**क**) अर्थाची गणना चार पुरुषार्थांत केली जाते. मानसांत पुरुषार्थ असें म्हटलें नसून 'चार फल' असें म्हटलें आहे. अर्थ हा केवळ धर्म आणि काम यांच्या संपादनाचें एक *साधन* आहे. दानधर्म, परोपकार, यज्ञयाग, व्रतें, पूजा, इत्यादि विविध धर्माचरणास धनाची थोडी तरी जरुरी असतेच; पण *धनाला यापेक्षां अधिक महत्त्व देणें म्हणजे धर्माचा व देशाचा विनाश करणें होय*. याप्रमाणें चार फलांतील *अर्थ* या फलाचें मानसाधारें यथामति विवरण केलें गेलें.

३. *राजनीतीचा* अन्तर्भाव अर्थशास्त्रांत होतो. या अंगाचें सविस्तर वर्णन '*भूपधर्म*' या स्वतंत्र प्रकरणांत (प्र. ११।११) केलें आहे, तेथें पाहावें.

२. धर्म — (१) चारी फलांत-पुरुषार्थांत धर्म मुख्य आहे. धर्मानेंच अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ति होऊं शकते. धर्म = पुण्य = सुकृत हें समीकरण (१।२९४।१-६) मानसांत स्पष्ट दाखविलें आहे. पुण्य-पाप, सुकृत-दुष्कृत हें ठरविण्याचें मुख्य साधन वेद व पुराणें आहे.

'वर्णाश्रम *निज निजधर्म-निरत वेदपाठी लोक । वर्तंति,* पावति सदा सुख नहिं भय रोग न शोक ॥ ' (७।२०). धर्म = वेदपुराणोक्त धर्मांचें आचरण. ' जपतप-नियमयोग *निजधर्म । श्रुतिसंभव नाना शुभकर्म ॥* ' (७।४८।१). वेद परमेश्वराचे निःश्वास आहेत (१।२०४।५ व ६।१५।४) पुराण व इतिहाससुद्धां भगवंताचे निःश्वास असल्याचा पुरावा बृहदारण्यकोपनिषद् २।४।१० त आहे. श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मांचें आचरण म्हणजे धर्म. त्यांतील निषेधांचा त्याग व विधींचें पालन म्हणजे धर्म. कर्मविपाक (प्रकरण ११ वें) प्रकरणांत याविषयीं बराच ऊहापोह केला असून, वर्णाश्रमधर्म, नारीधर्म, पुत्राशिष्यधर्म, भूपधर्म, सेवाधर्म, संन्यासधर्म, मित्रधर्म, वैद्यधर्म इत्यादि प्रकरणें त्यांत आहेत. त्यांत न सांगितलेल्या सर्वसामान्य गोष्टीच येथें दाखविणें आहे. (२) **धर्माचें मूळ सत्य** — वेदशास्त्रपुराणोक्त धर्माचें आचरण सत्याच्या पायावर झालें तरच तें सुखसमाधानकारक दुःखहारक होतें.

सत्यमूल सब सुकृत शोभती । वेदपुराणिं विदित मनु वदाति ॥ (२।२८।३)
सत्यविहीन धर्माचरण म्हणजे छिन्नमूल कल्पवृक्ष !

धर्म न दुसरा जगिं सत्यासम । वानिति वेद पुराण आगमें । (२।९५।५)
(३) **सत्यमूल असून दया नसेल** तर धर्म सुफल होणार नाहीं. ' धर्म किं दया सदृश हरियाना ! । (७।११२।१०). दया हरिमार्गाच्या बरोबरीची आहे. *दया नसेल तर* (४) **अहिंसारूपी परमधर्माची प्राप्ति** व पालन होणार नाहीं. ' *परम धर्म* वेदोक्त *अहिंसा* ' (७।१२१।२२). पण, (५) **श्रद्धा नसेल**--सात्त्विक श्रद्धा नसेल तर सात्त्विक धर्माचरण–दया, अहिंसा, सत्य यांचें पालन होणार नाहीं. ' श्रद्धेवीण धर्म कांहीं न घडे ' (७।९०।४), ' श्रद्धा सात्त्विक धेनु शोभना (७।११७।९ गूढार्थचंद्रिका) पण **श्रद्धेची प्राप्ति** (६) **विश्वास असल्याशिवाय होणार नाहीं.** ' श्रुतिस्मृति पुराणादि सद्ग्रंथांवर विश्वास पाहिजे ' कवणहि सिद्धि किं विश्वासाविण ' (७।९०।८). याप्रमाणें *विश्वास, श्रद्धा, सत्य, दया, अहिंसा या पंचकाच्या आधारानें वेदपुराणोक्त धर्माचरण झालें पाहिजे; हें श्रीरामचरितमानसांतील धर्मसार आहे.* या पंचकाला सार्ववर्णिक धर्म किंवा मानवधर्म म्हणणें शास्त्रविरुद्ध नाहीं.

मानवधर्माचा शुष्क डांगोरा पिटणाऱ्यांकडून या पांच गोष्टींचा अवलंब केला जातो काय ? या वेदधर्मानुसारी भारतांतच आज प्रत्यक्ष काय दिसतें ? पैसा हाच परमेश्वर व तो येनकेन प्रकारेण मिळविणें हा धर्म असेंच पुष्कळांना, बहुसंख्यांना वाटूं लागलें आहे ना ?

वर्णाश्रमधर्म असो कीं व्यक्तिधर्म व समाजधर्म असो वरील पंचविध मानवधर्म सर्वांनीं पाळलाच पाहिजे. असें झालें तरच मनुष्यांत माणुसकी येईल व आजची हिंस्र पशु बनण्याची प्रवृत्ति थांबून जगांत सुखसमाधान नांदेल !

(७) याप्रमाणें सर्व सत्कर्माचरण घडलें तरी '*कर्म हरिस करतां समर्पण। ...नासाति* शीघ्र असें श्रुति वदे ' (३।२१।८-९) वैराग्य प्राप्ति हें धर्माचें फळ आहे. ' विरतिस धर्म दे ' (३।१६।१). **धर्माचरण घडत असून वैराग्य उद्भवलें नाहीं तर नक्की समजावें कीं धर्माचरण करण्यांत कांहींतरी मोठी न्यूनता आहे.**

(८) ' नहिं असत्य सम पातक-पुंजा ', ' परनिंदा अघ अधिक गिरीशहि ', ' पाप पिशुनता सम कीं आन ', 'करी क्रोध कीं धर्मा दूरीं ' (४।१५।९), 'त्यजुनि सत्य जागीं अपयश घेणें ', ' पुण्याविण किं मिळे यश पावन ', ' अपयशलाभ किं जेथें पाप न ' इत्यादि शेकडों वचनांनीं श्रीमानस अथपासून इतिपर्यंत भरलेलें आहे. **धर्मनीति हा श्रीरामचरितमानसाचा देह आहे** असें म्हणणें वावगें होणार नाहीं. **भक्ति प्राण आहे** हें पूर्वीं दाखविलेंच आहे. येथें थोडक्यांत सार दाखविलें आहे.

३. काम–विषयसुखेच्छा व विशेषतः स्त्रीपुरुषविषयसुखेच्छा यांना काम म्हणतात. विषय भोगतांना जितक्या अधिक ज्ञानकर्मेंद्रियांना अनकूल वेदना होतील, व ज्या प्रमाणांत होतील, आणि विषय भोगति असतां ज्या प्रमाणांत चित्ताची एकाग्रता होईल त्या प्रमाणांत कामतृप्ति तेवढ्या वेळेपुरती झालीसें वाटतें. **(क)** धर्मानें व न्यायानें मिळविलेल्या धनादिकांच्या आधारें धर्मानुकूल कामभोगच परिणामीं सुखावह होतो. ' काम कोप मद लोभ सब नाथा ! नरका पंथ ' (५।३८), ' कामी जनांचा संग हा भवाब्धि पंथ आहे ' (७।३८), ' सत्य, अहिंसा, दया व इंद्रियनिग्रह यांचें पालन करणारा धर्मशील मनुष्यच विषयसुख भोगूं शकतो. धर्मविरोधी नसणारा कामच दुःखरहित सुख देऊं शकतो'. ' श्रुतिपथपालक धर्मधुरंधर । गुणातीत नी भोग पुरंदर ॥ ' (७।२४।१-२), ' शतकोटिशत सदृश विलासहि ' (७।९१।८); १।३०४।६-८; १।३५६।१-५ यांत वर्णिलेलें सुख भोगणारांनाच तृणशय्येवर चटकन स्वस्थ झोप लागली ! २।२१४।४; २।२१५।८; २।२१५; २।९२।३-९३; २।१५०।५-८; ४।१६।६ पाहा.

परंतु विषयसेवनानें, कामभोगेच्छेनें, कधीं पूर्ण सुख मिळत नाहीं; म्हणून तर मोठमोठे सम्राटसुद्धां सर्वस्वाचा त्याग करून आनंदानें वनवासाचा अंगीकार करीत असत. १।१४२-१४३।१; १।१५३।८; २।५६।४; ६।७।३-४ पाहा.

४. मोक्ष– विरतिस धर्मयोग दे ज्ञाना। ज्ञान मोक्ष दे–'(३।१६।१) विधियुक्त यथोक्त धर्माचरणानें वैराग्य प्राप्त होतें; वैराग्यानें योग साधतो, योगानें ज्ञानप्राप्ति होते व ज्ञानानें मोक्ष मिळतो असा मानसांतील सिद्धान्त आहे. '*मानसांतील दार्शनिक सिद्धान्त* ' या मुख्य प्रकरणांत **' ज्ञान–मोक्ष–वैकुंठ '** हें स्वतंत्र प्रकरण (प्र. ९।९) असल्यानें येथें आणखी विस्तार अनावश्यक आहे. साती सोपानांत ज्ञान व मोक्ष यांचें **वर्णन आहे.**

' मोक्ष सकल सुखखाण । ' असे परि भक्ति करी ' सुखदान ' ॥

' भक्तिहिन गुण सब सुख तैसें । विनालवण शाकादिक जैसें ' ॥ (७।८४।५).

याप्रमाणें मानसांतील अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष यांचें निदर्शन थोडक्यांत केलें गेलें.

५. सर्वांचें एकच फल भक्ति हें आहे. महाकाव्यांत अर्थ, धर्म, काम, मोक्ष या सर्वांचें एकच फल वर्णिलेलें असावें असा नियम आहे. ' तव (= प्रभु राम) पदपद्मीं प्रीति **निरंतर** । सकल साधनां हें फल सुंदर ' (७।४९।४), ' सकल सुकृत फल रामीं स्नेहो ' (१।२७।२), **प्रेमभक्ति हेंच सर्व साधनांचें फल मानसांत सांगितलें आहे.** ' मानसांत भक्ति ' (प्र. प्र. १२), ' भाग्यवंत आणि अभागी ' (प्र. प्र. १२।१२), धन्य कोण (प्र. प्र. १२।१३), ' सकल सुकृत फल ' (प्र. प्र. ११।६) इत्यादि पुढील अनेक प्रकरणांत व मागील, प्र. प्र. ५।४; ५।६; ५।७ यांत याच विषयाचें प्रतिपादन केलें आहे; म्हणून येथें पिष्टपेषणानें विस्तार नको.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।७ 卐 卐 卐

मानसांत महाकाव्य–कथा–लक्षण

महाकाव्यांत इतिहासप्रसिद्ध कथा असावी किंवा तें एखाद्या सज्जनाचें चरित्र असावें असा नियम आहे. मानसांतील नायकाच्या चरित्रास हीं दोन्हीं लक्षणें पूर्णपणें लागू आहेत.

१. ऐतिहासिक प्रसिद्ध कथा — महाभारत व रामायण यांस इतिहास म्हणतात. महाभारतांतील वनपर्वांत रामकथा आहे. संस्कृतांतील वाल्मीकि रामायणादि ९० रामायणें, संवृत्तरामायणादि वीस प्रचंड रामायणें; व या ११० रामायणांत नसलेलीं १० रामायणें यांची यादी व माहिती प्र. प्र. ४।२ व ४।३ यांत पूर्वींच दिलेली आहे. उपनिषदांत (रा. पू. ता.) हि रामचरित्र आहे; आणि चारी वेदांमध्येंहि रामकथा आहे. (हिंदींत प्रसिद्ध झाली आहे). अशी जी सर्व सद्ग्रंथविश्रुत रामकथा तीच मानसांत आहे हें पूर्वीं दाखविलेंच आहे.

२. सज्जनाचें चरित्र — श्रीरघुवीर रामचंद्रांच्या सज्जनतेविषयीं इतकी ख्याति आहे कीं त्याविषयीं पुरावा देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे,

अंध दाखवी भानु डोळसां । दिवसा घेउनि दीप करिं जसा ॥

असेंच ठरणार !

३. आधुनिक सुधारलेल्या व पुढारलेल्या **रशियासारख्या निधर्मी राज्यांत तेथील सरकारनें श्रीरामचरितमानसाच्या रशियन भाषेंतील भाषांतराच्या तीन लाख प्रतींची**

प्रथमावृत्ति काढली ! इतर देशांतसुद्धां रामकथेचा मोठा आदर आहे; आणि मानसाचें भाषांतरहि अनेक परदेशी भाषांत झालें आहे. यापेक्षां अधिक विस्ताराची आवश्यकता नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।८ 卐 卐 卐

मानस महाकाव्यांत ग्रंथारंभीं मंगलाचरण

महाकाव्यांत ग्रंथारंभीं देवतावंदन, वस्तुनिर्देश आणि आशीर्वाद यांपैकीं कांहीं तरी असावें असा नियम आहे.

१. मानसारंभीं पहिल्या सात श्लोकांत प्रगटपणें वंदन आहे व तें मानससंबंधीं मुख्य देवतांनाच आहे. (क) याच सात श्लोकांत गूढार्थानें वस्तुनिर्देश = ग्रंथविषयकथन-पण आहे. सातव्या श्लोकांत ' रघुनाथगाथा भाषानिबन्धम् अति मंजुलमातनोति ' असा स्पष्ट उल्लेखहि आहेच. (ख) याच सात श्लोकांत क्रमशः सात काण्डांचा मुख्य प्राप्तव्य विषय सांगितला आहे. (ग) यांतच अनुबंधचतुष्टयसुद्धां आहे. (गूढार्थ-चंद्रिकेंत विस्तार पाहा).

२. प्रत्येक काण्ड सोपान असल्यानें—महाकाव्य असल्यानें, प्रत्येक काण्डाच्या आरंभीं देवतावंदन व वस्तुनिर्देशात्मक मंगल श्लोकांत आहे.

३. आशीर्वादात्मक मंगलाचरण ग्रंथारंभीं व काण्डारंभीं संस्कृत श्लोकांत नसलें तरी मुख्य विभागाच्या उपक्रमांत आशीर्वाद असून प्रत्येक कांडाच्या उपसंहारांतहि आशीर्वाद आहे. उपक्रमांत आशीर्वाद ,

जे स्नेहें ही कथा सांगतिल । सावधान समजुनी ऐकतिल ।। १० ।।
होतिल रामचरण-अनुरागी । कलिमलरहित सुमंगलभागी ।। ११ ।।
दो. — **जर हरगौरि-पसाय कीं मजहि खरा स्वप्नांत** ।।
जो प्रभाव कथिला, खरा हो प्राकृत काव्यांत ।। (१।१५)

उपसंहारांतील आशीर्वाद प्रत्येक काण्डाच्या शेवटीं दोहा किंवा सोरठादिकांत असल्यानें येथें दाखविण्याची जरुरी नाहीं.

४. जेथें तिघांपैकीं एक असून भागतें तेथें मानसांत वर सांगितल्याप्रकारें अनेक गोष्टी सहज व फारच मार्मिक रीतीनें सांगितल्या आहेत. गूढार्थचंद्रिकेंत वरील सर्व मुद्दे अगदीं स्पष्ट करून दाखविले असल्यानें त्या सात श्लोकांची गूढार्थचंद्रिका सुमारें ५५ पृष्ठें भरेल. येथें यापेक्षां अधिक विस्ताराची आवश्यकता नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।९ 卐 卐 卐

मानस-महाकाव्यांत संतप्रशंसा व खलनिंदा

महाकाव्यांत कुठें कुठें संतगुणवर्णन व खलनिंदा असावी असा नियम आहे. मानसांत कुठें कुठेंच नव्हे तर स्वतंत्र प्रकरण रूपानें बाल, अरण्य व उत्तर या तीन कांडांत संतगुण-स्वभाव-महिमावर्णन आहे.

१. बालकाण्ड — 'सुजन समाज सकलगुणखाणी।' (१।२।४) पासून 'रामपदीं या रति कृपें बालविनति ऐकून।' (१।३ म.) पर्यंत संतवंदनाच्या निमित्तानें संतगुणमहिमा-वर्णन आहे.

२. अरण्यकाण्ड — 'श्रुणु मुनि संत-गुणांना वदतों।' (४५।६) पासून 'श्रुणु मुनि! साधूंचे गुण जितके। वदुं न शकति वाणी श्रुति तितके॥' (४६।८) पर्यंत भक्तप्रिय रामांनींच संतगुण गाईले आहेत.

३. उत्तरकाण्ड — 'संतलक्षणें श्रुणु बंधो! तीं। अगणित वेदपुराणीं ख्याती॥' (३७।६) पासून 'प्राणप्रिय मज संत ते गुणमंदिर सुखपुंज।' (दो. ३८) हीं संतलक्षणें श्रीरामचंद्रांनींच सांगितलीं आहेत.

४. अयोध्याकाण्ड — यांत दो. १२८।३ पासून दो. १३२ अखेर जीं १४ प्रकारच्या भक्तांचीं लक्षणें सांगितलीं आहेत तें संतगुणवर्णनच स्वतंत्र प्रकरणरूपानें आहे.

५. सुंदरकांड — 'जननी जनक बंधु सुत नारी।' (४८।४) पासून 'नर ते प्राणांसम मला द्विजपदिं ज्यांचें प्रेम।' (दो. ४८) पर्यंत श्रीरघुनाथानेंच संतगुण-वर्णन केलें आहे.

६. स्वतंत्र रूपानें असलेल्या वरील वर्णनाशिवाय प्रत्येक सोपानांत संतगुणवर्णन आहे. मानसांत संत, साधु, सुजन, सज्जन व बुध हे शब्द समानार्थक वापरले आहेत. सुजन, सज्जन व बुध हे शब्द क्वचित् सामान्य अर्थानेंहि वापरले आहेत. संतगुण-वर्णनपर कांहीं प्रमुख स्थानें काण्डशः खालीं दाखविलीं आहेत.

बाल — ४।५ पासून ७ म पर्यंत संत-असंत-तुलना आहे. ८।८; ८।१४; ८; २७।२; ३१।७; ३२।१३; ३६।३; ३७।१२-१४; ३९; ४५; ८४।२; ११०।२; १६७; २७९।६ पाहा.

अयोध्या — १९०।७; १९०।८; २२८।२; २३८; २५०।५; २६१।२; २७७।४; २७७।८.

अरण्य — २।९; १३।११; १३।१२; १६।४; १६।९; ३६।२; ३६।३; ३७।८; ३९।७; ४४।१

किष्किंधा — १४।४; १४।७; १६।४; १५ म; १७।६; ७।६; ७।१६; १७.

सुंदर — ४; ६।१; ६।३; ६।४; ७।४; २६।५; ४१।७; ४२।७; ३८.

लंका — मं. श्लो. ३; ३१।३; ३४ म व ११६ द्रा.

उत्तर — १४।८; १४ म; १६।१; ३३।८ व ३३.

मानसांत संत, साधु, सज्जन, सुजन, सत्संग इत्यादि सर्व शब्द एकंदर २२९ वेळां वापरले आहेत. त्यांत प्रत्येक ठिकाणीं संतगुण–स्वभाव–महिमा इत्यादींचें वर्णन आहे. त्यांचें काण्डशः वर्गीकरण व कांडांतील दोहे-संख्या इत्यादि कोष्टकांत दाखविलें आहे. ही माहिती फार उद्बोधक आहे.

विषय	बाल	अयोध्या	अरण्य	किष्किंधा	सुंदर	लंका	उत्तर	एकूण
दोहे-संख्या	३६१	३२६	४६	३०	६०	१२१	१३०	१०७४
संत—शब्दसंख्या	७६	४३	२०	७	११	५	६७	२२९
प्रमाण—दोहे : संत	४·६५	७·६	२·३	४·३	५·५	२४·२	१·९४	४·६९
यथाप्रमाण अनुक्रम	४	६	२	३	५	७	१	

(**क**) या कोष्टकी तुलनेवरून ठरलें कीं लंकाकांडांत ‘ संत ’ फार कमी आहेत लंका निशिचरनिकरनिवासहि । येथें कुठला सज्जनवासहि ॥ (५।६।१) या सुंदरकाण्डांतील मारुतिवचनाची यथार्थता दाखविली. (**ख**) अयोध्याकांडांत ‘ साधु ’ ४१ वेळां व इतर २ वेळां = ४३ आहेत. यानें संतसाधूंचें प्रमाण कमी दिसत असलें तरी ‘ खल ’ शब्दाच्या प्रमाणांत पाहिल्यास अयोध्याकांड पहिल्या प्रतीचें ठरतें. या कोष्टकानें प्रेरणा दिल्यामुळें शोध करतां असें साधार ठरलें आहे कीं ‘ संत ’ शब्दाची ही विषमता सहेतुक व सापेक्ष आहे. ‘ मानसांत संतवर्णन ’ याविषयीं १४।१५ पृष्ठें पूर्वतयारीच्या वेळीं लिहिलेलीं आहेत; पण नवीन शोधांनीं प्रस्तावनेंत प्रवेश केल्यामुळें स्थलसंकोचास्तव या सर्व मुख्य प्रकरणांतच कात्री लावावी लागली, याप्रमाणें मानसांत संतगुणवर्णन आहे.

खल-वर्णन—खल, असंत, असाधु, असज्जन, दुर्जन व दुष्ट हे शब्द मानसांत समानार्थक आहेत. खलनिन्दा, खल-दोष-स्वभाव इत्यादींचें वर्णन मानसांत स्वतंत्र रूपानें व सर्व सोपानांत स्फुट पद्धतीनें आहे. *स्वतंत्र प्रकरणांत बाल व उत्तर या दोन काण्डांत आहे.*

१. बालकाण्डांत संत वंदनानंतर खलवंदनाच्या निमित्तानें खलस्वभाववर्णन ‘ अथ वन्दे सद्भावें खलगण । ’ (१।४।१) पासून ‘ प्रेमें वायस फार पाळले । काक निरामिष कधीं जाहले ॥ ’ (१।५।२) पर्यंत आहे. (**२**) **उत्तरकांडांत** ‘ अतां असंतस्वभाव ऐका । ’ (७।३९।१) पासून ‘ द्वापरिं होतील कांहीं । बहु वृंदचि कलीयुगाहि ॥ ’ (७।४०।–) पर्यंत श्रीरघुनाथानें स्वतःच वर्णन केलें आहे. (**क**) बाल-

कांडांत ५।४ पासून ७ म पर्यंत जशी साधु-असाधु तुलना आहे तशीच उत्तरकाण्डांत ३७।७–८ व दोहा ३७ यांत संत-असंत तुलना आहे. याशिवाय प्रत्येक काण्डांत खलवर्णन खालील स्थळीं आहे.

२. (क) बालकाण्ड — १।८; ११।११; ११।१२; १४ न; १६।५; १७; २४।३; २४; ३८।३; ४१; १७०।५-७; इत्यादि ठिकाणीं आहे. (ख) **अयोध्या** — २०७।७; २९९।२ आणि इतर ३ ठिकाणींच. (ग) **अरण्य** — या लहानशा कांडांत १४ ‘ खल-दुष्ट ’ आहेत. १४ हजार खलांची सेना तेथें होतीच ! पैकीं कांहीं स्थळें — १९।९; २४।८; २९ रा; ३८ रा. हीं पाहावीं. (घ) **किष्किंधा** — १४।२; १४।४; १४।५; १५।३; १७।४ इतके पांचच आहेत. (ङ) **सुंदर** — ४६।५; ४७।१-२; ४६।७; ६०।५ पाहा. (च) **लंका** — ३३।५; ४५।३; ७५।४; ९१।६; ११०।४ पाहा. (छ) **उत्तर** —१०५ रा १०६।१४,१५,१६; १०७।४; १२०।६; १२१।१७-१८ पाहा.

सूचना — मानसांत ‘ संत-साधु ’ २२९ आहेत पण ‘ खलदुष्ट ’ १२७ च आहेत; तथापि काण्डशः वर्गवारी व ‘ खल ’ शब्दाशीं तुलना फार बोधप्रद आहे.

विषय	बाल	अयोध्या	अरण्य	किष्किंधा	सुंदर	लंका	उत्तर	एकूण
दोहे-संख्या	३६१	३२६	४६	३०	६०	१२१	१३०	१०७४
खल—शब्दसंख्या	२९	५	१४	५	१५	३६	२३	१२७
संत—शब्दसंख्या	७६	४३	२०	७	११	५	६७	२२९

या तुलनेनें दिसतें कीं अयोध्याकांडांत खलांच्या ८·६ पट ‘ संत ’ आहे. किष्किंधा कांडापर्यंत संत अधिक व खल कमी आहेत; पण सुंदरकांडांत खलांच्या ११/१५ व लंकाकांडांत ५/३६ संत आहेत. सुंदरकांडांतील बराचसा भाग लंकेंतील आहे व लंकेशीं अप्रत्यक्ष संबंध आहे. लंका तर खलांचें वसतिस्थानच ! या विषमतेची कारणपरंपरा सांपडली आहे पण स्थलसंकोच लिहूं देत नाहीं. याप्रमाणें मानसांत खलवर्णन आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।१० 卐 卐 卐

महाकाव्यविभाग—लक्षणें

महाकाव्यांत आठापेक्षां अधिक मुख्य विभाग–कांडें–सोपान–इत्यादि असावेत, (क) ते फार लहान किंवा फार मोठे नसावेत. (ख) प्रत्येक विभागांत व सर्ग, अध्याय इत्यादींत एकच मुख्य वृत्त असावें व सर्गादिकांची समाप्ति भिन्न वृत्तांनीं केलेली असावी. (ग) काण्डादि मुख्य विभागांच्या अंतीं पुढील कथेची सूचना

असावी. हे नियम मानसांत किती पाळले आहेत तें या प्रकरणांत पाहूं.

१. महाकाव्यनियमाप्रमाणें मानसांत ९ कांडें घालण्यांत श्रीगोस्वामींना विशेष आनंद झाला असता हें पूर्वीं प्रकरण ५।२ मध्यें 'श्रीतुलसीसंकेत अद्भुतहि' यांत सांगितलेंच आहे. रामायण–निर्मात्यांच्या पूर्वसांप्रदायास अनुसरून मानसांत सातच विभाग–काण्डें आहेत; त्यांना सोपान असेंहि नाम आहे. बालकाण्ड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकाण्ड, लंकाकांड व उत्तरकांड हे मुख्य सात विभाग आहेत. हिंदी मानसांत सर्ग, अध्याय, इत्यादि पोटविभाग नाहींत, पण *मराठींत वाचकांच्या सोयीसाठीं आहेत.*

(क) काण्डें फार लहान किंवा फार मोठीं नसावींत हा नियम निश्चित प्रमाणाच्या अभावीं फार लवचिक आहे; म्हणून कोणतेंच काण्ड फार मोठें किंवा फार लहान म्हणतां येत नाहीं. **किष्किंधाकाण्ड** इतर कांडांच्या मानानें लहान वाटतें पण त्यास महत्त्वाचीं कारणें आहेत. तें शरिरांतील हृदयासारखें *मानसाचें हृदय आहे*; हृदय हा अवयव फार लहान असला तरी अत्यंत गूढ व अत्यंत महत्त्वाचा असतो. तसेंच किष्किंधाकाण्ड आहे; इत्यादि विवेचन त्या काण्डाच्या वैशिष्ट्यांत गूढार्थचंद्रिकेंत पाहावें.

एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते कीं, वाल्मीकि रामायणानें जेथें संक्षेप केला आहे तेथें मानसांत विस्तार आहे. वाल्मिकि रामायणाचें सहावें काण्ड युद्धकाण्ड आहे; पण *कोणत्याहि प्रचलित रामायणांत नसलेलें 'लंकाकाण्ड'* हें नांव मानसांतील सहाव्या काण्डास आहे. गीतावलींतसुद्धां *लंकाकांडच* आहे.

(ख) श्रीरामचरितमानसांत मुख्य वृत्त चौपाई हें एकच आहे, त्यामुळें कांहीं लोक त्यास *चौपाई रामायण* असें म्हणतात. प्रत्येक दोहा व त्या पूर्वीच्या चौपायादि भाग १।१ सर्ग किंवा लहान अध्यायासारखा आहे. प्रत्येक कांडाच्या शेवटीं छंद, सोरठा किंवा दोहा हीं भिन्न वृत्तेंच आहेत.

(ग) पुढील कथाभागाची सूचना मागील कांडाच्या शेवटीं असावी हा नियमसुद्धां पूर्णपणें पाळलेला आहे. एका हिंदी टीकाकारानें महाकाव्य लक्षणांची मानसांत रुजुवात करून देतांना इतर सर्व लक्षणांचें मानसांतील अस्तित्व उदाहरणांनीं थोडक्यांत दाखविलें आहे; पण फक्त याच लक्षणाविषयीं नुसता उल्लेख केला आहे कीं पुढील विषय प्रत्येक कांडाच्या शेवटीं सुचविलेला आहे; पण एकाहि स्थळाचा नुसता निर्देशसुद्धां केलेला नाहीं! या गोष्टी त्यांना न सांपडल्यामुळेंच असें करावें लागलें यांत संदेह नाहीं; कारण हे उल्लेख कांहीं ठिकाणीं अति गूढ, कांहीं ठिकाणीं साधारणपणें थोडे उघड व कांहीं ठिकाणीं अगदीं स्पष्ट आहेत.

(१) बालकाण्डांत — मुदमगल नित्योत्सवीं दिनरजनी पळताति।

***अयोध्येंत* आनंदभर अधिक अधिक अधिकाऽति'**

(दो. ३५९)

'*अयोध्येंत*' हा शब्द श्लिष्ट आहे. '*अयोध्याकांडांत*' हा गूढार्थ आहे; पण तो चटकन् ध्यानांत येत नाहीं अशीच रचना आहे. अयोध्येंत आनंदाला अधिक, अधिक, अति अधिक, भर आला केव्हां ? रामराज्याभिषेकाची बातमी लोकांना समजली तेव्हांच ना ? या दोह्यांतील खुणेचे शब्द अयोध्याकाण्डारंभींच पाहा.

'*मुदमंगल नित्योत्सवीं —*' (बाल. ३५९;) '*मुदमंगल उत्सव* नव चाले।' (अयोध्या. १।१).

(२) अयोध्याकाण्डांत —भरत चित्रकूटाहून परत गेल्यावर प्रभु रघुनाथ भरत-प्रेमानें व भरतविरहानें व्याकुळ झाले तेव्हां,

विबुध बघून दशा र*घुपति*ची । कथिति सुमन वर्षुनि गति घरची ॥ (३२१।७) देवांना वाटलें कीं भरतप्रेमाला वश झालेले रघुपति येथें चित्रकूटलाच राहणार. तसेंच घडलें तर आपल्या दुर्दशेचा अंत कसा होणार ? म्हणून त्यांनीं आपली सर्व दुःसह दशा = गति निवेदन केली तेव्हां,

***प्रभुनीं* नमुनि *दिलें आश्वासन* । फिरले प्रमुदित मनिं भयभास न ॥** (३२१।८) प्रभूंनीं देवांना आश्वासन दिलें व देव प्रमुदित मनानें परत गेले व त्यांच्या मनांत भयाचा भाससुद्धां राहिला नाहीं. काय आश्वासन दिलें असेल व देवांचें कसलें भय साफ पळालें ? मी लवकरच येथून दण्डकारण्यांत जातों व तुमच्या सर्व शत्रूंचा संहार करतों, आपण कांहीं काळजी न करतां निर्धास्त असावें. हेंच *पुढील कथेचें अतिगूढ सचन आहे*. इतक्या गूढ पद्धतीनें सुचविण्याचें कारण रामजन्मापासून पुढील सर्व बालकाण्ड व अयोध्याकाण्ड यांतील चरित्र *प्रतिमुखसंधींतलें आहे*. (लक्षण प्र. ६।५ मध्यें पाहावें) येथून पुढें गूढता कमी झालेली दिसेल.

(३) अरण्यकांडांत —

पंपासरि रघुराज जाल जर । घडे *तिथें सुग्रीवसख्य तर ॥*
***तो सांगेल सर्व* रघुवीरा ! । जाणुनि सब पुसतां मतिधीरा ॥**

(३६।११–१२).

सुग्रीवसख्य हाच किष्किंधाकांडांतलि प्रमुख विषय आहे. या सूचनेप्रमाणें प्रभु पंपासराला गेले आहेत, तेथें जवळच किष्किंधा आहे.

(४) किष्किंधाकांडांत अगदीं उघड वर्णन आहे; कारण हा भाग विमर्शसंधींतील आहे. जांबवान् हनुमन्तास म्हणाले,

'जाउनि इतकें तात ! करावें । *सीते बघुनि वृत्त आणावें* ॥' (३०।११) हाच सुंदरकाण्डपूर्वार्धांतील मुख्य विषय आहे.

(५) सुन्दरकाण्डांत— '*रामविरोधिं न जगासि* विधि–हरिहरशरणहि जात' (५६ रा) असा निरोप लक्ष्मणानें रावणास पाठविलेला आहे.

'सागरिं गिरिवर । तव प्रतापें तरति जलावर' (६०।२)

हें लंकाकांडारंभींच मानसांत घडलें आहे व पुढें रावणवधहि झाला आहे.

(६) लंकाकांडांत—सुर सब गत (वर्षुनि सुमन) बसुनी *रुचिर विमानिं* ।। (११४ रा). सर्व वानर सुरांचे अंशावतार आहेत; व ते रुचिर विमानांत बसून अयोध्येस गेले आहेत. तेथें ज्या विमानांतून गेले त्याला '*रुचिर विमान*' च म्हटलें आहे. (६।११९।६) आणखी पाहा,

' नाथ यदा *कोशलपुरीं होईल तिलक तुम्हांस* ।
कृपासिंधु येईन मी बघुं उदार चरितास ।। ' (६।११५।१)

हाच विषय उत्तरकांडांत मुख्य आहे.

याप्रमाणें प्रत्येक काण्डाच्या शेवटीं पुढील विषय सुचविलेला आहे. यांतील अतिगूढ उल्लेखांचा उलगडा केवळ श्रीरघुनाथकृपेनेंच झाला.

जय रघुनाथा ! गूढ दाखविसि। हीन दीन दासास तोषविसि ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।११ 卐 卐 卐

महाकाव्य–विभागांचीं नांवें

महाकाव्यांतील काण्डादि मुख्य विभागांचीं नांवें कविचरित्र, नायकचरित्र किंवा त्या विभागांतील कथा यांच्याशीं संबंधित असावींत असा नियम आहे.

मानसांतील मुख्य विभागांस काण्ड व सोपान हीं नांवें आहेत. मानसांतील नांवें जितकीं यथार्थ आहेत तितकीं इतर प्रचलित रामायणांतील कांडांचीं नांवें नाहींत.

१. बालकाण्ड व उत्तरकाण्ड *हीं मानसांतील नांवें* नायकाच्या चरित्राशीं पूर्णपणें सुसंबद्ध अशीं आहेत. (क) विवाह होऊन राम घरीं आल्यानंतर लगेच बालकांडाची समाप्ति झाली आहे. हें नांव मानसांत जसें यथार्थ आहे तसें वाल्मीकि रामायणांत पण आहे. (ख) **उत्तरकाण्ड** हें नांव वाल्मीकि रामायणांत यथार्थ नाहीं; कारण कीं १४ वर्षांच्या वनवासानंतर, मुख्य अवतारकार्यसमाप्तीनंतरचें जें चरित्र तें उत्तर चरित्र; व तें ज्या कांडांत असेल तें उत्तरकांड, भरद्वाजाश्रमांत येणें, हनुमंतास पाठविणें इत्यादि व रामराज्याभिषेक, ११ हजार वर्षें राज्य करणें, अश्वमेधादि अनेक यज्ञ करणें, रामराज्यवर्णन इत्यादि सर्व भाग वाल्मीकि रामायणांत *युद्धकांडांतील* १२७-१३१ या पांच सर्गांत आहे. युद्धकथेशीं यांचा कांहीं संबंध नाहीं. म्हणून युद्धकाण्ड हें नांवसुद्धां अयथार्थच ठरतें. मानसांत श्रीरघुनाथ भरद्वाजाश्रमांत येऊन शृंगवेरपुरास आले, १४ वर्षें पूर्ण झालीं आणि लंकाकाण्डसमाप्ति झाली. हे शेवटचे दोन दोहे (१२०,१२१) संधिकाळांतले आहेत. तत्त्वतः *लंकेंतून राम निघाले आणि लंकाकाण्ड संपलेंच आहे.* हनुमान भरतभेट मानसांत उत्तरकांडांत आहे.

२. अयोध्याकाण्ड—हें नांव रामचरित्राशीं अयोध्येंतील लोकांचा संबंध असल्यामुळें आहे. भरत अयोध्येंत परत जाऊन, पादुका स्थापन करून राहिले, आणि *अयोध्या-कांडाचा उपसंहार मानसांत सुरू झाला*. वाल्मीकि रामायणामध्यें अत्रिआश्र-मांत गमन, अनसूया-सीता-भेट इत्यादि अत्रिआश्रमांतील कथा, जिचा अयोध्येशीं कांहीं संबंध नाहीं अशी, अयोध्याकांडांत आहे. मानसांत ती कथा अयोध्याकांडांत नसून अरण्यकांडांत आहे. कोणतें नांव पूर्ण यथार्थ तें वाचकांनींच ठरवावें. अयोध्येचा संबंध पूर्णपणें सुटला असें ठरतांच अयोध्याकाण्ड समाप्त झालें; म्हणून चित्रकूटावरील जयन्त-कथासुद्धां मानसांत अरण्यकाण्डारंभींच आहे.

३. अरण्यकाण्ड— हें नांव मानसांत व वाल्मीकि रामायणांतसुद्धां यथार्थ आहे. पंपासरोवराहून निघेपयतचा भाग यांत आहे. फरक इतकाच कीं वनसौंदर्य पाहून सीताविरहानें व्याकुळ झाल्याचें वर्णन वाल्मीकि रामायणांत किष्किंधाकाण्डारंभीं आहे तें अरण्यकांडांत असतें तर अधिक उचित झालें असतें. मानसांत तें अरण्यकांडांतच आहे; कारण किष्किंधावनाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं.

४. किष्किंधाकांड— हें नांव नायकचरित्रसंबंधानें आहे. सुग्रीवमैत्री आदि सर्व गोष्टी सीताशोधाच्या प्रयत्नांच्या अंगभूत आहेत. हनुमंतादि रामदूतांस संपातीकडून सीताशोध लागला व तदनुसार कर्तव्याचा विचार (विमर्श) ठरला आणि किष्किंधा-कांड समाप्त झालें. वाल्मीकि रामायणांतसुद्धां असेंच आहे, म्हणून हें नांव दोन्हींत यथार्थ आहे.

५. सुंदरकाण्ड— ' सुंदरे किं न सुन्दरम् ' या वचनाचा विचार केला कीं हें नांव कां याचा पूर्ण उलगडा होतो. मानसांतील सुंदरकाण्ड आणि वाल्मीकि रामायणांतील सुन्दरकाण्ड यांत कथाभागाच्या व नामसार्थकतेच्या दृष्टीनें महदंतर आहे. (**क**) हनुमान परत येऊन सीतेचा निरोप व सीतेचें आश्वासन केल्याची हकीकत सांगतात व वाल्मीकि रामायणांत सुन्दरकाण्ड समाप्त होतें. मानसांतील पुढील सुन्दरकाण्डकथा यथार्थतेनें सुंदर आहे; पण ती वाल्मीकि रामायणांत युद्धकाण्डांतील पहिल्या २१ सर्गांत आहे. येथें फक्त कथा व नाम यांचाच संबंध असल्यानें त्यांचाच विचार कर्तव्य आहे. (**ख**) **सुन्दर** = ' उन्दि क्लेदने ' *द्रवित करणें* या धातूपासून सुन्दर शब्द झाला आहे. *चित्ताला* द्रवित करणारें, *पाझर फोडणारें तें सुन्दर*, हा एक अर्थ आहे. ' दृ ' आदरणें, आदर उत्पन्न करणें या धातूपासून सुन्दर शब्द झाला आहे. *आदरणीय असणारें तें सुन्दर* हा दुसरा अर्थ आहे. (अ. व्या. सु.) वाल्मीकि रामायणांत सुंदर कांडांतील रावणाची भाषा व रामाची केलेली निंदा आदरणीय आहेत असें कोण म्हणेल ? (**ग**) मानसांतील सुंदरकांडांतील प्रत्येक कथाभाग हृदयाला पाझर फोडणारा, किंवा आदरणीय किंवा उभयविध आहे हें गूढार्थचंद्रिकेंत त्या काण्डारंभींच अगदीं सविस्तर दाखविलें आहे. रावणानें सीतेशीं ग्राम्य भाषा वापरली नाहीं, तिच्या अवयवादिकांचें वर्णन वगैरे केलें

नाहीं; 'माझ्याकडे एकदां बघ' इतकीच विनंति केली आहे. रामनिंदा केली नाहीं! मानसांत 'सुन्दर' नांवाची सार्थकता करण्याचा प्रयत्न कवींनीं दक्षतेनें मुद्दाम केल्याचें स्पष्ट दिसतें. लक्ष्मणसुद्धां कोमलहृदयी दयाशील बनला आहे. 'सुन्दरे किं न सुन्दरं' हें वचन फक्त मानसांतील सुन्दरकाण्डासच पूर्णपणें यथार्थतः लागू आहे.

६. लंकाकाण्ड — सेतुबंधनास प्रारंभ होतांच मानसांतील लंकाकाण्डाचा प्रारंभ होतो. लंकेशीं संबंध जोडणाऱ्या रामचरित्राचा प्रारंभ सेतुबंधनप्रारंभानेंच होतो. त्यापूर्वीं बिभीषण शरणागति व सागरनिग्रह या गोष्टी घडल्या असल्या तरी ससैन्य रामचंद्रांचा लंकेशीं कांहींच संबंध नव्हता.

(**क**) वाल्मीकि रामायणांत या सहाव्या काण्डास युद्धकांड हें नांव आहे. रावणाशीं युद्ध *करण्याच्या* हेतूनें कपिसैन्यासह प्रयाण केलें म्हणून ती कथा युद्धकाण्डांत घेणें योग्य असें मानलें तरी, लंकेंत जाण्याच्या मार्गाचा विचारसुद्धां कोणी मनांतहि केलेला नसतां रावणाशीं युद्धाची इच्छा काय कामाची ? सेतु कसा बांधावयाचा हें सुंदर रीतीनें ठरल्यानंतरच युद्धाची इच्छा बाळगणें योग्य ! श्रीरघुवीरानें जटायु-भेटीनंतर प्रयाण केलें तेव्हां रावणाशीं युद्धाची इच्छा नव्हती असें थोडेंच आहे ? वाल्मिकि रामायणाच्या युद्धकाण्डांतील शेवटच्या पांच सर्गांबद्दल पूर्वींच लिहिलें आहे. मानसांत ११९ व्या दोह्यांत जानकीला सेतु दाखविला आहे व रामेश्वरस्थापनेविषयीं सांगून रामेश्वरास विमानांतून नमन केलें आहे; म्हणजेच ११९ व्या दोह्यानंतर लंकेचा संबंध साफ सुटला. पुढील दो. १२० व १२१ हे संधिकाळांतील उपसंहारात्मक आहेत; म्हणून लंकाकांड हें नांव पूर्ण यथार्थ आहे.

७. उत्तरकाण्डाविषयीं आरंभींच लिहिलें आहे.

याप्रमाणें मानसांतील सातही कांडांच्या नांवांची पूर्ण सार्थकता झालेली आहे. तशी वाल्मिकि रामायण, अध्यात्म रामायण, आनंद रामायण, इत्यादि कोणत्याहि रामायणांत दिसली नाहीं.

महाकाव्यलक्षणांतील एक लक्षण दाखविणें राहिलें. संध्या, सूर्य, चंद्र, इत्यादि २४ गोष्टींचें वर्णन महाकाव्यांत असलें पाहिजे. साहित्यदर्पणांत दिलेला क्रम नैसर्गिक क्रमानुसारी नाहीं म्हणून त्या विषयाचे दोन विभाग पाडून त्यांतील निसर्गवर्णन नैसर्गिक क्रमानें एका भागांत देणें अधिक सयुक्तिक वाटतें. ग्रंथोक्त विषयांत नदीवर्णनाचा अन्तर्भाव नाहीं; पण पर्वत व सागर यांचा संबंध जोडणाऱ्या नद्यांचें वर्णन मानसांत फारच सुंदर आहे; म्हणून त्याचाहि अन्तर्भाव निसर्गवर्णनांत केला आहे. मृगयादि बाकीचे दहा विषय 'मृगयादि अन्य विषयवर्णन' या शेवटच्या प्रकरणांत दिले आहेत.

जय मुकुंद जय सुबुद्धिदायक । जय रघुनायक धृतधनुसायक ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ६।१२ 卐 卐 卐

मानस-महाकाव्यांत निसर्ग-वर्णन

संध्या, चंद्र, प्रदोष, अंधार, प्रातःकाल, सूर्य, सूर्योदय, दिवस, मध्याह्न, ऋतु, पर्वत, नदी आणि सागर या १३ विषयांचे मानसांतील नमुने अगदीं संक्षेपानें या प्रकरणांत दिले आहेत. अरुणोदयानंतर सूर्योदयापूर्वींचा जो काल असतो त्यास प्रातःकाल म्हणतात म्हणून तो येथें सूर्यापूर्वीं घेतला आहे.

१. संध्या (काल)—

प्रभुदर्शना निशा जणुं आली ॥

जणुं भानुस पाहुनि संकोचित । परि बनली संध्या किं यथोचित ॥

अगरु धूप बहु जणूं सम तमा । पसरे उडुनि गुलाल ललिमा ॥

मंदिर मणिगण जणुं तारा अति । नृपगृह-कळस किं पूर्ण निशापति ॥

वेदपाठ अति मृदु जो भवनीं । जणुं खग मुखर किं पुरीं-उपवनीं ॥(१।१९५।३ – ७)

१।२३६।१; १।२३६।६; १।२९६ व पुढें; २।८९।६; ६।१०।६; ६।५।१४; या ठिकाणीं थोडथोडें वर्णन आहे.

२. चंद्र – दो. – **पूर्वदिशे प्रभु पाहतां दिसला उदित मयंक ।**

वदति पहा सकलहि शशिसि मृगपति-सदृश अशंक ॥ (६।११ म).

पूर्वदिशा-गिरिगुहा-निवासी । अतिप्रताप तेज बलरासी ॥ १ ॥

मत्तनागतम-कुंभ विदारी । शशि-केसरी गगन-वनचारी ॥ २ ॥

नभिं विकीर्ण मुक्ताफल तारा । निशासुंदरी करि शृंगारा ॥ ३ ॥

प्रभु वदले शशिमाधिं मेचकता, । कसली सांगा तुम्हीं निज मतां ॥ ४ ॥

यापुढे दोहा १२ पर्यंत व गूढार्थ-चंद्रिका पाहा. हनुमन्नाटकांतल्यापेक्षां हें वर्णन फारच सरस आहे. इतर ठिकाणीं पाहा :— १।२३७।७ – २३८।४; १।२८१।६; २।२०९।१– २१०।१; ३।१२; ४।१७।६–७; ५।१२।९; ५।१५।२; ७।३ चं.

३. प्रदोष — सूर्यास्तानंतरचा काळोख पडेपर्यंतचा जो काल तो प्रदोषकाल; (६।४६।४)

जैं प्रदोषबल कौणप (= राक्षस) पावति । दशमुख जय जय करीत धावति ॥ (६।९८।११ पाहा).

४. नभ — तात पडे अंधार वदे तो । सत्तर योजन पुर तुमचें तों ॥ ८ ॥

निशाघोर गंभीर वन सुझा न दिसे वाट ।

रहा आज हें जाणुनी होतां जाल पहाट ॥ (१।१५९ रा)

आणखी ३।८३।५–७; ३।४४।७; ४।१५।६; ५।४७।३–४; ६।५२।४; ७।१४।३ याप्रमाणें प्रत्येक सोपानांत अनेक वेळां अंधाराचें वर्णन आहे.

५. **प्रातःकाल** — सूर्योदयापूर्वीचा काळ हें खालील वर्णनावरूनच सिद्ध होतें; शास्त्रही असेंच सांगतें; असें असतां एका सुप्रसिद्ध मानसपंडितांनीं सूर्योदयाचें वर्णन ज्यांत आहे तेंच 'प्रातःकाळ'वर्णन दिलें आहे व पुन्हां सूर्योदयवर्णन दिलें आहे! तसेंच सूर्यास्तानंतरचा रात्र पडेपर्यंतचा जो काळ तो प्रदोषकाळ, असें असतां सूर्यास्तवर्णन ज्यांत आहे तेंच प्रदोषकाल-वर्णन दिलें आहे! एकदां प्रसिद्धि मिळाली कीं, गाढवाला घोडा म्हटलें तरी खपतें.

उदा० — **प्रातः शुचिकालीं प्रभु जागति । अरुणचूड वर बोलूं लागति ॥५॥**
मागध बंदि गाति गुण, भारी । ये जनगण जोहारा द्वारीं ॥ ६ ॥
नमुनि विप्र सुर गुरु पितृ माते । आशिस मिळुनि मुदित ते भ्राते ॥७॥
सादर जननी आनन बघती । नृपासवें द्वारीं मग निघती ॥ ८ ॥

दो० — **करुनि शौच सब सहज शुचि, पावन सरिता-स्नान ॥**
नित्यकर्म कृत पितृनिकट चौघे येति सुजाण ॥ (बाल. ३५८)

अरुणचूड = कोंबडा. कोंबडे आरवूं लागले त्या वेळेपासूनच्या काळालाच येथें प्रातःकाळ म्हटलें आहे. प्रातःस्नान म्हणजे सूर्योदयापूर्वी स्नान; व प्रातःसंध्या म्हणजे सूर्योदयापूर्वी तीन घटका (हा उत्तम काळ) आरंभिली जाणारी संध्या. *सूर्योदयापूर्वीच्या ३ घटिका म्हणजे प्रातःकाळ होय.* (क) आणखी महत्त्वाचीं उदाहरणें — १।२२६; १।२०५।७; २।३७।५–७; ३।३८।५–९; ५।६।२–३; ६।१७।१; ७।२६।१.

६. **सूर्य** — **भानु कमलकुल पोषणकर्ता । होइ जलाविण त्या संहर्ता ॥** (२।१७।७)
रविमंडल देखत लघु वाटे । उगवें तैं त्रिभुवन तम आटे ॥ (१।२५६।८)

हें केवल सूर्यवर्णन आहे. इतर कांडांतही उदाहरणें आहेत.

७. **सूर्योदय** — **भानु उदित तम अश्रम सरला । तारे लपले प्रकाश भरला ॥**
रघुराया! निज-उदयमिषें रवि । प्रभू-प्रताप नृपांना दाखवि ॥
(१।२३९।४–५)
जेव्हां रामप्रताप दिनपति । प्रबल परम उदया ये खगपति! ॥
तदा त्रिलोकीं प्रकाश भरला । सुख बहुतांना शोक जाहला ॥

इत्यादि पुढील चौपाया पहाव्यात. (७।३१।१–८). (क) १।११६।५–६; १।११७।२; २।२७७।१; ३।११।२–५; ४।२३।४; ५।९।७; ५।१६।२; ६।९३।४. याप्रमाणें प्रत्येक सोपानांत सूर्योदयवर्णन आहे. *सूर्य उगवला कीं दिवस सुरू होतो.*

८. **दिन** — 'तिथें दिवस जिथं रविप्रकाश' (२।७४।३) 'प्रभुपदपद्मां पळ-पळ पाहिन। कोकी प्रमुदित *दिनिं* तशि राहिन ॥ (२।६६।४) 'वेळ न लागे दिवसां जाया' (२।६२।२), 'युग सम दिन जातात' (१५।८). आणखी – **१।१९५;** ३।२८।८. (दिनिं अन्न न गिळती); ४।१५ म; ५।७।८; ६।३२।७; ७।२३; **आणखी**

पुष्कळ उदाहरणें आहेत.

९. मध्याह्न — 'दान प्रहरिं ये नगरिं भूप तो।' (१।१७२।५) दोन प्रहर = मध्याह्न. भरत तिसरे प्रहरीं प्रयागांत प्रवेश करतात; पण भर दोन प्रहरीं उन्हांत चालल्याचा परिणाम पाहा :— 'फोड झळकती पायीं कैसे। पंकजकोषीं दंवकण जेसे ॥' (२।२०४।१). आणखी — ३।४१।१,२,४; ४।८।७-८ (गूढार्थ-चंद्रिका पाहा). उन्हाच्या त्रासामुळें रघुवीर झाडाच्या आडोशाला उभे राहिले आहेत. ५।३।१० पासून पुढील लंकादर्शन-वर्णन मध्याह्नकालीन आहे. ६।३५।४; ७।५०।३ च्या पुढील भाग (गूढार्थचंद्रिका पाहा.) याप्रमाणें सर्व सोपानांत मध्याह्न-वर्णन आहे. *सूर्योदयापासन किती वेळानें मध्याह्नकाळ होतो हें ऋतुमानावर अवलंबून असतें म्हणन यापुढें ऋतुवर्णन घेतलें आहे.*

१०. ऋतुवर्णन (१) कांहीं प्राचीन ग्रंथांत पांच ऋतूंचेंच वर्णन आहे; आणि *सुभाषितरत्नाकरांत*सुद्धां पांच ऋतूंचेंच वर्णन दिलेलें आहे. हेमंत आणि शिशिर यांतील फार सूक्ष्म भेद निसर्गात सहज ध्यानीं येत नसल्यामुळें हें असावें. मानसांत एकदां हेमंत, शिशिर, वसन्त, ग्रीष्म, वर्षा, शरद् हा क्रम दाखविला आहे. (१।४२।१-६ पाहा.) प्राचीन काळीं मार्गशीर्ष महिन्यापासून वर्षारंभ होत असे; त्याचें दिग्दर्शन व मानसांतील कथाक्रमनिदर्शन या दोन्ही गोष्टी या उल्लेखानें साधल्या आहेत.

(क) प्रचलित ऋतुगणना-पद्धति अरण्यकाण्डांत नारीषड्ऋतुवर्णनांत सुचविली आहे; व शिवाय त्या वर्णनांत मानस-कवि तुलसींनीं आपल्या स्वतःच्या व नारदाच्या पूर्वचरित्रांतील गुह्य सुचावलें आहे. (३।४४।१ पासून दो. ४४ गूढार्थचंद्रिका पाहा.) त्यांत वसन्त, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमन्त (हिम) आणि शिशिर असा क्रम आहे.

(ख) **कीर्तिशरयू-षड्ऋतुवर्णन** आणि **नारीषड्ऋतुवर्णन नीट लक्षांत ठेवल्यास मानसांतील अल्पस्वल्प ऋतुवर्णनाचीं स्थानें सहज समजतील.**

(२) *मानसांतील प्रत्येक सोपनांत सहाही ऋतूंचें वणन आहे.* **श्रीतुलसीदास रूपकालंकाराचे सम्राट** असल्यानें ऋतु, कानन, सरिता, सूर्योदय, चंद्रोदय इत्यादि विविध विषयांचे वर्णनांत रूपकालंकाराचा भरणा खूपच आहे. एखाद्या काण्डांत एखाद्या ऋतूचें विस्तृत वर्णन करून इतर कांडांत त्याचें संक्षेपानें किंवा अतिसंक्षेपानें वर्णन केलेलें आहे. उदा. वसन्तऋतूचें वर्णन अरण्यकांडांत विस्तारानें केलें आहे; इतर कांडांत संक्षिप्त आहे. शरद् व वर्षावर्णन किष्किंधाकाण्डांत सविस्तर आहे व इतर कांडांत संक्षेपानें केलें आहे.

(क) ग्रीष्म, हेमंत आणि शिशिर हे तीन ऋतु मनुष्यांस सुखद वाटत नसल्यानें त्यांचें सविस्तर वर्णन कोठेंच नाहीं; संक्षिप्त किंवा अतिसंक्षिप्त आहे. हेमंत आणि शिशिर यांतील भेद सहज समजण्यासारखा नसल्यान शिशिर ऋतूचें वर्णन कांहीं

काण्डांत शोधावेंच लागतें, व लागलें.

(ख) वसंत आणि शरद् हे दोन ऋतु मनुष्यांना अति प्रिय वाटतात; त्यामुळें या दोन ऋतूंचें वर्णन प्रत्येक काण्डांत काण्डविस्तारानुसार अनेक वेळां आहे, वारंवार आहे. वर्षाऋतु इतका प्रिय वाटत नसला तरी तो हवासा वाटतो; म्हणून त्याचें वर्णनही प्रत्येक काण्डांत अनेक वेळां (काण्डविस्तारानुसार) आहे. ग्रीष्मांत वनश्री व फलसंपत्ति विपुल असली तरी तो तापदायक असतो व हेमन्त शिशिरांत वनश्री निसर्गसौंदर्य, नष्ट झालेलें असतें म्हणून व अतिशीत व्ययेमुळें ते नकोसे वाटतात. **असलेल्या परिस्थितींत समाधान मानणें हें मानवाच्या स्वभावांत नाहीं** हें याचें कारण आहे. आतां काण्डक्रमानें ऋतुवर्णन दाखविणें सोयीचें होईल.

बालकाण्ड—(१) किर्तिशरयू-रूपकांत हेमन्तादि सहा ऋतूंचें वर्णन आहे. 'किर्तिसरित साही ऋतु सुंदर।' पासून 'विशद सुखद ती *शरदरम्यता* ॥' (१।४२।१–६) पर्यंत पाहावें.

(२) मानसरूपकांत आरंभींच *वर्षारूपक* आहे (३६।३–९). नंतर *शरदवर्णन* (३७।३-८) व पुढें (३७।९ – दो. ३७) *श्रद्धावसंत* रूपक आहे.

(३) ३४९।१–३ मध्यें *वर्षा*रूपक फारच सुंदर आहे.

(४) **वसन्तवर्णन** अनेक ठिकाणीं आहे; पैकीं कांहीं रमणीय नमुने :— (**क**) 'शीघ्र रुचिर *ऋतुराजा* प्रगटवि' (८६।६) पासून पुढें पाहा. (**ख**) 'त्या आश्रमा-मदन जैं आला। निज मायें ऋतु वसंत केला ॥' (१२६।१) पासून पुढें. (**ग**) जनक-पुरीजवळ जातांच २१२।६ पासून दो. २१२. (**घ**) 'भूपबाग वर जाउनि पाहति।' (२२७।३) पासून दो. २२७ पर्यंत; इतकीं उदाहरणें पुरेत. लेखणीरूपी अश्वचा काटेरी लगाम खेचावा लागत आहे, उपाय नाहीं (अश्वा = घोडी).

अयोध्याकाण्ड (१) आरंभींच परमानंदाची अधिक अधिक अति अधिक (१।३५९ मध्यें सूचित) **वृष्टि होणार असल्यानें काण्डारंभींच वर्षावर्णन आहे**, (१।२–३) हा वस्तुनिर्देश आहे.

भुवन चार दश भूधर भारी। वर्षति सुकृतमेघ सुखवारी ॥
ऋद्धि सिद्धि संपत् शुभ सरिता। येति अयोध्यांबुधींत भरिता ॥

(२) **शिशिर – जैंहुनि राम विवाहुनि आले। *मुदमंगल* नित्योत्सव चाले ॥** माघ, फाल्गुन, हे लग्नें, मुंजी इत्यादि मंगलोत्सवांचे सर्वांत सुखद महिने! (**क**) अयोध्येंत सर्व गोष्टी विपरीत, उलटापालट करणाऱ्या, होणार असल्याचें हे ऋतुसुद्धां सांगत आहेत. कारण हें *शिशिरवर्णन अगदीं पहिल्याच चौपाईत आहे;* आणि याच्यापुढें वर दिलेलें वर्षावर्णन आहे. म्हणजे *शिशिरऋतूनंतर वसंत न येतां एकदम वर्षाऋतूच आला!* आतां *वर्षाऋतूनंतर शरद न येतां एकदम*

३. ग्रीष्म — ऋतूच आला आहे – '*दुःसह दाह* हृदीं गत उत्सव' (४९।२),

' विपुल वियोगें प्रजा विव्हळत । जणुं *जलचरगण पाणी आटत* ॥ (५१।६) ग्रीष्म-ऋतूंत जलाशयांचें (नदी, तलाव इ.) पाणी आटतें तेव्हां मासे मरतात; पण इतर जलचर अगाध जलाशयांत जातात ! विचार करावा कीं दशरथ-मरण आणि अयोध्या-जनांचें चित्रकूटास गमन या गोष्टी सुचविल्या कीं नाहींत ? (हा अर्थ या क्षणीं निघाला !) यापुढें वर्षाऋतु गळला ! व

४. शरद — ' जशिं चातक-चातकि तृषित, वृष्टि शारदी स्वाति ' (५२)

५. हेमंत — ऐकत लक्ष्मण विव्हळ भारी । ... *सुकवी* शीतलवचन तयाला । *तुहिनपात* जणुं *तामरसाला* (७१।७–८) पण श्रीरामचंद्रांचें भरतावर प्रेम आहे असें भरद्वाजाश्रमांत ऐकतांच

६. वसंत — ऋतुपति, वारा त्रिविधा वाहत । चारि पदार्थ सुलभ सर्वांप्रत ॥ स्रक्‌चंदनवनितादिक भोगहि (२१५।७–८) भरतानें या गोष्टींचा उपभोग घेतला नाहीं ही गोष्ट निराळी. वरील वर्णन काण्डक्रमानें घेतलें आहे. हें दोह्यांच्या संख्येवरून कळेल. फक्त प्रथम शिशिर न घेतां वर्षा घेतला आहे. (आज ही एक नवीन दृष्टि मिळाली ! संशोधनाचा एक नवा विषय प्रगट झाला ! ही या लेखकाच्या जड मतीची का करामत आहे ? छे ! छे ! प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण ! प्रथम कच्च्या लेखनांत हाच क्रम घेतलेला असतां त्या वेळीं हें रहस्य कां दिसलें नाहीं ? कच्चें लेखन शिल्लक आहे त्यांत रुजुवात घ्यावी.) येथें प्रथम *शिशिर* नंतर *वर्षा, ग्रीष्म, शरद, हेमंत* व *वसंत* असा उलटसुलट क्रम आला आहे !

अरण्यकाण्ड (१) **वसंत** — याचें विस्तृत वर्णन रूपकानें आहे. ' तात वसंता बघ शोभामय । ' ३७।१० पासून ३८।१० पर्यंत, (२) नारी षड्‌ऋतु रूपक — ' श्रुणु मुनि ! वेद पुराण व सन्त । म्हणति मोहवनिं नारि वसन्त ॥ ' ४४।१ पासून ४४।६ पर्यंत (व गूढार्थचंद्रिका) (३) गोदातटीं व पंपावर्णनांत वसंतवर्णन आहेच. हा ऋतुराजा असल्यानें त्याची सत्ता (अस्तित्व) सर्वत्र पाहिजेच !

किष्किंधाकांड (१) **ग्रीष्म** — हनुमान-रघुवीर-भेट ग्रीष्मऋतूंतच झाली आहे. 'मृदुल मनोहर सुंदर जरि वपु । सहतां *दुःसह* वनिं *वातातपु* ॥ ' (१।९).

(**२**) **वसंत** — वालीवध ग्रीष्म ऋतु संपतां संपतां झाला; व चातुर्मासासाठीं राम प्रवर्षणगिरीवर राहण्यास गेले. तेव्हां तेथें वसंतनिर्मिति झाली ! (१३।१-५) सुंदर वन कुसुमित अति शोभे । गुंजति मधुपनिकर मधु लोभें ॥ इत्यादि. मंगलरूप बनेवन तैं ते । करिति निवास रमापति जैं तें ॥ येथें ग्रीष्मानंतर वसन्त ! *सुग्रीवाला असाच अनुभव आला आहे !*

(**३**) **वर्षा** — मानसांतील विस्तृत वर्षावर्णन याच कांडांत आहे; व या वर्णनाच्या निमित्तानें प्रतीपोपमांनीं व दृष्टान्तांनीं अनेक सिद्धान्त प्रदर्शित केले आहेत. रघुवीराच्या मनःस्थितींचें प्रतिबिंब (पाहणारांस) त्यांत दिसतें. भाव गुप्तपणें भरून

ठेवण्याची वर्षाशरद्-वर्णनांतील तुलसीकला या पामराला निमित्त करून भाव प्रगट करण्याची श्रीतुलसीप्रिय *श्रीरघुनाथाची* बुद्धिप्रेरक *कृपाकला* पाहिली म्हणजे या मंद-बुद्धीस आश्चर्य वाटतें ! ' वर्षाकालिं मेघ नभिं भरले । ' (१३।८) पासून ' वर्षा विगत शरदऋतु आला । ' (१६।१) पर्यंत आहे.

(४) **शरद** — शरद्वर्णनांतसुद्धां वर्षावर्णनांतील सर्व वैशिष्ट्य आहेच. अद्भुत काव्यकला व कालनिदर्शनादि अनेक संकेत या दोन्ही वर्णनांत सांपडतात. (गूढार्थ-चंद्रिका पाहा.) वर्षाविगत शरद ऋतु आला । पाहा लक्ष्मणा परम शोभला ।। (१६।१) पासून ' वर्षा*गत* निर्मल ऋतु आला । ' (१८।१) पर्यंत. यांतील ' गत ' शब्द देहलीदीपाप्रमाणें आहे.

(५) **हेमंत** — ' पाठिं पोटिं रवि वन्हि भजावें । ' (२३।४) मार्गशीर्ष-पौषांतच ऊन खाणें व विस्तवाजवळ शेकणें गोड वाटतें.

(६) **शिशिर** — ' राज्य, कोष, पुर, *नारी* ' मिळाल्यानें सुग्रीव सुखी, निर्भय व निश्चिंत होऊन ऐश्वर्यभोगांत दंग आहे. ' *ममता* यवासगण पालवतो । *नारि शिशिर ऋतु* जैं वावरतो ।। ' (३।४४।६). ' शिशिर सुखद ' (१।४२।२) दोन्ही मिळून शिशिरलक्षण सांगितलें आहे.

सुंदरकाण्ड (१) वसंत — हनुमान लंकेच्या तीरावर उतरले मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला मध्याह्नाच्या जरा आधीं. मग तेथें वसन्त कसा दिसला ? लंका दक्षिण गोलार्धांत आहे–होती हें आम्हीं विसरतों ! दक्षिण गोलार्धांत ऋतुमान उत्तर गोलार्धाच्या उलट असतें. ' जाउनि तिथें बघति वन शोभे ।। इत्यादि ' (३।६-७ व १२।१०-११) (२) **ग्रीष्म** – ' कालनिशेसम निशि ' (१५।२) गूढार्थ-चंद्रिका पाहा. (३) **वर्षा** – जलद तप्ततेला जणुं ओती । ' (१५।३) (४) **शरद** – ' कुवलय विपिन कुंतवन होती । ' (१५।३) (५) **हेमंत** – दुःखद तव कुल-कमल वनासी । आली सीता शीत-निशासी ।। (३९।९) (६) **शिशिर** – ' भानूशशि ' (गूढार्थचंद्रिका पाहा).

लंकाकांड — **वसंत** — वीर वसंत सैन्य ७९।२-५; **ग्रीष्म** – ११५।३; **वर्षा** – ८७।१-८८।७ पर्यंत; **शरद** –' मोहमहाघनपलटप्रभंजन ' (११५।५); **हेमंत** – ९३।४; **शिशिर** – दो. ११२ पाहा.

उत्तरकाण्ड — **वसंत** — २३।१-४; **ग्रीष्म** – ३११।१-२; **वर्षा** – दो. २३ उत्तरार्ध; **शरद** – ' बहु वासनामशक हिमराशिस (३०।९), ४।१७।८ शीं तुलना करावी; **हेमंत व शिशिर** – दो. २६. याशिवाय प्रत्येक कांडांत आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. विस्तार वाढूं लागला म्हणून शेवटीं कात्री लावावी लागली !

११–१२ शैल-वन — प्रत्येक काण्डांत शैल (पर्वत) व वन-वर्णन आहे. हे दोन विषय असले तरी वनें-काननें शैलांच्या आश्रयानेंच असतात; व मानसांत बहुधा एकत्रच

वर्णन आहे; म्हणून येथें एकत्रच दाखविलें जात आहे.

(१) **बालकांण्ड** — हिमशैल-वन-वर्णन – ' यदा उमा गिरिगेहिं जन्मली । ' १।६५।७ पासून ६६।३ पर्यंत आहे. शिवाय १२५।१-३ इत्यादि अनेक ठिकाणीं आहे. या दोन्ही ठिकाणीं नदीवर्णनही आहेच. (२) **अयोध्याकाण्ड** – चित्रकूट गिरिवर्णन १३२।३– दो. १३२; १३७।५–१३९।३ पर्यंत; २३५।२–२३६ (३) **अरण्यकाण्ड** –' पाहा लक्ष्मणा कानन शोभा । ' ३७।३-९ व पुढें. शिवाय १४।१-४ व ३३।४-५ पाहा. (४) **किष्किंधाकांड** – प्रवर्षणगिरिवर्णन दो. १२ पासून १३।५ पर्यंत. (५) **सुंदरकाण्ड** – सुवेलशैलवर्णन; येथें आधीं वनवर्णन व मग शैलवर्णन आहे; कारण हनुमान वनांतून शैलावर जातात. ' जाउनि तिथें बघति वन-शोभे । ' (३।६) पासून ' गिरिवर चढतां लंका देखे । ' (३।१०). (६) **लंकाकांड** –' कज्जल' गिरि-वन-वर्णन ' (१९।४-६) ' दिसे अंगदा दशमुख कैसा । सप्राणचि कज्जल-गिरि जैसा ।। इत्यादि. सुवेल-शैल-वर्णन ११।१-२; (७) **उत्तरकाण्ड** – नील-गिरि-वर्णन (५६।६-१० व दो. ५६; २३।१-७).

१३. नदी — (१) **बालकाण्डांत** अनेक ठिकाणीं अंशतः वर्णन असून *कविता सरयूचें* विस्तृत वर्णन आहे. ' निघे सुभग कवितासरिता ती ' (३९।१० पासून ४३ रा पर्यंत) हें सांग परंपरित रूपक ४६ ओळींचें आहे, शिवाय काव्यसरिता १० छंद; मानसांतील विविध वचनांच्या संकलनानें तयार झालेली श्रीगंगेची समग्र कथा पूर्वी (प्र. प्र. ५।३) दिली आहे. (२) **अयोध्याकांड** — रोषतरंगिणी ३४।१–४; मंदाकिनी–१३२।५–६; करुणासारित ' आश्रम सागर शान्त रस ' दो. २७५ पासून पुढें. (३) **अरण्यकांड** — ६।४; १३; ३०।५. (४) **किष्किंधाकांड** — १४।५; १४।८; १६।४-५; १६।८; १७।१. (५) **सुंदरकांड** — प्रभुपद भीति सरित (४९।६); २३।६. (६) **लंकाकांड** — रुधिरसरिता (रणनदी) ८७।१०–८८।८; हें सुंदर सांग रूपक आहे. (७) **उत्तरकांड** — २३।८; २८; २०।१-६. याप्रमाणें शैल-वन-नदी-वर्णन सातही सोपानांत आहे.

१४. सागर — नद्या-सरिता-सागराला जाऊन मिळतात. सागरास नदीपति, सरितापति म्हणतातच. (१) **बाल.** — सज्जन सकृत सिंधुसम कोणी । जया वृद्धि विधु पूर्ण नद्यांनीं ।' (१।८।१४); २४७।७-८ व दोहा २४७ व ३०५. (२) **अयोध्या.**— आश्रम सागर; शान्त रस पूरित पावन पाथ । २७५ पासून २७६।६-८. रोषतरंगिणी विपत्ति वारिधीला मिळाली आहे. (३४।४); भरतपयोधि २३८. (३) **अरण्य** — *भवांबुनाथ*–मंदरं, अत्रिस्तुतींत. या स्तुतींत सागरमंथनाचें सर्व रूपक गूढ आहे; गूढार्थ-चंद्रिका पाहा. (४) **किष्किंधा.** — १४।८; २५।६; २९।३ पाहा. (५) **सुंदर.**– सागरलंघन, (१।५–३।५ पर्यंत); ५०।५-६; पाहा. (६) **लंका.** — सेतुबंधतटिं रघुपति चढती । ४।३ पासून दोहा ४; ५।१० व दोहा ५; २६।३; २८।३-४;

(७) **उत्तर.** — 'सागर निजमर्यादा पाळति '...(२३।९); ७।१२० रा.

याप्रमाणें सातही कांडांतलि थोडे थोडे नमुने येथें दिले आहेत. निसर्गवर्णनांतील १४ गोष्टींचें अस्तित्व मानसाच्या प्रत्येक सोपानांत असल्याचें येथवर दाखविलें.

◆◆◆◆

६।१३

मृगयादि अन्य विषयवर्णन

मृगया, संभोग, विप्रलंभ, रणप्रयाण, रण, विवाह, मंत्र, पुत्र (जन्म), जलकेलि व मधुपान या दहा विषयांचा संबंध मानवी जीवनाशीं असल्यामुळें, प्रस्तावनेंत त्यांचें वर्णन या निराळ्या प्रकरणांत दिलें आहे. मृगयेचा संबंध वनाशीं येतो म्हणून तो विषय निसर्ग-वर्णनानंतर आरंभींच घेतला आहे.

१. मृगया = शिकार हें क्षत्रियांचें एक आवश्यक कर्तव्य आहे: (२०५।१–३)

(क) बाल. — घेति सवें मित्रां भावांला । जाति नित्य मृगयेस वनाला ।।
पावन मृग मारिति जिविं जाणुनि । ***नित्य दाखविति भूपा आणुनि ।।***
जे मृग रामशरांनीं वधले । तनू त्यजुनि सुरलोकीं वसले ।।

तिरप्या टाईपांतील शब्दांनीं शिकारीचे शास्त्रीय व सरकारी नियम सुचविले आहेत, (गूढार्थचंद्रिका पाहा). १५६।३ पासून १५७. प्रतापभानु सम्राटमृगया-वर्णन आहे. **(ख) अयोध्या.** — १३३।२–४; १३६।६–७; १३८।१–२. **(ग) अरण्य.** — १९।९; स्वर्गमृगशिकार २७।१–१६. **(घ) किष्किंधा.** — 'व्याधासम मारिलेंत मजला ' (९।५) असा आक्षेप वालीनें घेतला आहे. **(ङ) सुन्दर.** — हनुमन्तानें खलमृगांची शिकार अशोकवनांत केली. **(च) लंका.** — 'मत्तनागतम-कुंभ विदारी । शशि केसरी गगन-वनचारी ।। रघुवीररूपी कालमत्तेभ-सिंहानें रावणादि मत्त हत्तींची शिकार केली आहे. ' जय राम रावणमत्तगज-मृगराज सुयशा वानिति ' (७९।६ छंद). **(छ) उत्तर.** —श्रीराम ' लोभमोहमृगयूथकिरात ' (३०।६) आहेत. लोभमोहादि मृगयूथांची शिकार करणारे किरात श्रीराम आहेत.

२. संयोगशृंगार — शृंगाराचे मुख्य दोन प्रकार आहेत; संयोग (संभोग) शृंगार आणि वियोग (विप्रलंभ) शृंगार. मानसांत बाल, अयोध्या व अरण्य दो. २१ पर्यंत *मुख्यतः* संयोगशृंगाराचें वर्णन आहे; पण तें अति सात्त्विक व संयमित आहे. सीता-हरणापासून लंकेंतील अग्निदिव्यापर्यंत *मुख्यतः* वियोग-विप्रलम्भ-शृंगाराचें वर्णन सांपडेल.

[क] **बाल.** — पुष्पवाटिकाप्रकरण, जयमालासमर्पण, विवाहवर्णनांत. **अयोध्या.**— शृंगवेरपुरास रामजानकी एकाच तृणशय्येवर झोपतात, इत्यादि. **अरण्य.** — ' रुचिर एकदां सुमन जमविलीं । स्वकरिं भूषणें रामें रचिलीं ।। प्रभु घालुनि सीतेला सादर ।

बसले स्फटिक शिलेवर सुंदर ॥ (३।१।३-४), हें एक उदाहरण पुरें. लंकाकांडांत रामांकावर पुष्पक-विमानांत बसणें व उत्तरकांडांत उभयतांनीं एकाच सिंहासनावर बसणें हीं उदाहरणें आहेत. (ख) **बाल.** व **अयोध्या** विप्रलंभशृंगारवर्णनही आहे; पण थोडें आहे; विवाहवर्णनांतसुद्धां आहे. 'विरहभयवशजानकी' (१।३२७। छंद ३). **अयोध्या.**— वनगमनाच्या वेळीं, दो. ५७ व ५८।१-७. (ग) **किष्किंधा.**— सुग्रीवचरित्रांत संयोग शृंगाराचें वर्णन आहे. (घ) **सुन्दर.** — रावण सीतेला प्रार्थना करतो तें संयोग शृंगाराचेंच उदाहरण आहे. याप्रमाणें साती सोपानांत आणखीहि पुष्कळ उदाहरणें आहेत.

३. **विप्रलंभशृंगार** — **बाल.** व **अयोध्या** कांडांतील १।१ उदाहरण वर दाखविलेंच आहे. सीताहरणानंतर वेळोवेळीं केलेला विलाप. **अरण्य, किष्किंधा** या **कांडांत** व वर्षा व शरद् वर्णनांत; **सुन्दरकांडांत** रघुनाथानें सीतेला पाठविलेला संदेश, सीतेची विरहदशा, इत्यादि आहेत. **लंकाकांडांत** चंद्रोदयवर्णन, व सीतेची विरहव्यथा, **उत्तरकाण्डांत** सीतापरित्यागादि आहेत पण प्रगट वर्णन नाहीं, अति गूढ ध्वनि आहेत.

४-५. रणप्रयाण व रण (युद्ध)—हें वर्णनहि प्रत्येक कांडांत आहे. (क) **बाल.**— प्रतापभानूनें दिग्विजयासाठीं ससैन्य प्रयाण करून अनेक लढाया मारून दिग्विजय करून साम्राज्य संपादन केलें आहे. (ख) **अयोध्या.** — रामवनगमन हें रणप्रयाणच आहे. ' देति तात मज कानन-राज्य । कार्य बहुत मज तेथें प्राज्य ॥ (२।५३।६) असें रामच म्हणाले आहेत व तें राज्य घेण्यासाठीं धनुर्बाणधारी रघुवीरानें प्रयाण केलें आहे; याला पुरावा मानसांतच पाहा. राम अयोध्येंतून निघाले त्या वेळीं '*कुशकुन लंके*',- पुरिं अति शोकहि । हर्ष-विषाद *विवश सुरलोकांहि* (२।८१।४). निषादराज गुहानें युद्धाची पूर्ण तयारी केली, रणढोल पिटणेंच बाकी होतें. (ग) **अरण्य.**—खरदूषणांनीं सेनेसह युद्धासाठीं प्रयाण केलें व युद्ध करून सर्व मेले व मुक्त झाले. (घ) **किष्किंधा.** — वालीनें ' मायावी ' नांवाच्या दैत्याशीं युद्ध करण्यास प्रयाण केलें व युद्ध करून त्याला मारलें. सुग्रीवानें युद्धासाठीं प्रयाण करून वालीला आह्वान दिलें आहे व दोघांचें द्वंद्व-युद्ध झालें आहे. (ङ) **सुंदर.** — हनुमन्तानें फलभक्षणाच्या निमित्तानें युद्धा-साठींच प्रयाण केलें (अशोकवनांतील फलबागेंत) व अनेक लढाया झाल्या आहेत. *मुख्य रणप्रयाण* कपिकटकांसमत रघुवीरानें केलें तें. ' करा प्रयाण-तयारी, सांगति ' (३४।६) पासून ' असे कृपानिधि उतरले जाउनि सागरतीरिं ।' दो. ३५ पर्यंत. या प्रयाणाच्या वेळींसुद्धां 'शकुन जानकिस जो जो झाला । *तो तो अशकुन दशाननाला* ॥' (३५।७). (च) **लंका.** — कुंभकर्ण, मेघनाद व रावणादिकांनीं लंकादुर्गांतून युद्धासाठीं प्रयाण केलें आहे व अनेक लढाया व शेवटीं द्वंद्वयुद्धही झालें आहे. (छ) **उत्तर.** — रणप्रयाणाचा व युद्धाचा उल्लेख मुद्दाम मोठ्या युक्तीनें केला आहे. ' *कटकासहित यथा रघुवीरा । घडे आगमन सागरतीरा* ॥ ' *निशिचर कीश लढाई* वर्णी बहू प्रकार । कुंभकर्ण-घननाद बल-पौरुषादि संहार ॥ (६७ म) रावणवध (६८।२).

अवतरणें देण्यानें विस्तार फार झाला असता व नुसता स्थाननिर्देश केल्यानें बोध झाला नसता म्हणून हा मध्यम मार्ग स्वीकारावा लागला.

६. **विवाह** — (क) **बाल.** — उमाशंभुविवाहाचें विस्तृत वर्णन; विश्वमोहिनी-स्वयंवरविवाहाचें सविस्तर वर्णन व श्रीरघुवीरविवाहाचें सु-विस्तर, मनोहर, अद्भुत वर्णन आहे. रावण-कुंभकर्ण-बिभीषणांच्या विवाहांचीं वर्णनें अति संक्षिप्त आहेतच. (ख) **अयोध्या.** — ' जैहुनि *राम विवाहुनि आले* ' (१।१) 'कर्णवेध उपवीत *विवाहां* । सर्व बरोबर कृत उत्साहां ॥ ' (१०।६). (ग) **अरण्य.**—शूर्पणखेनें रामलक्ष्मणांशीं विवाह करण्याच्या इच्छेनें प्रार्थना केली आहे. (१७।७–१७). (घ) **किष्किंधा.** — सुग्रीवाला बायको मिळाली आहे. '*पावे* राज्य कोष पुर *नारी* ' (ङ) **सुंदर** — रावणानें सीतेला वश करण्याचा प्रयत्न केला आहे. (९।३-५). (च) **लंका.** — ' जनकसभे भूपांमधिं अगणित । होतां तुम्हि बलशाली अतुलित ॥ *भंगुनि चापा जानकि वरिली* । तदा करुनि रण कां न जिंकिली ॥ (३६।१०-११) हे *असे उल्लेख प्रत्येक काण्डाचें महाकाव्यत्व सिद्ध करण्यासाठीं विविध युक्तींनीं* व उपमा दृष्टांतादिकांनीं सर्व कांडांत विविध विषयांविषयीं मुद्दाम भरून ठेवलेले, पण सहज न कळणारे असे आहेत. (छ) **उत्तर.** — ऋषि आग-मना *वदे मग* श्रीरघुवीरविवाह ' (दो. ६४) याप्रमाणें साती सोपानांत विवाहा-विषयींचे उल्लेख आहेत.

७. **मंत्र** — श्रीमानसांत मंत्र शब्द दोन अर्थांनीं वापरला आहे. श्रीराम-कृष्णादि देवतांचे जपादिसाधनाचे मंत्र आणि राजनीतिशास्त्रांत ज्याला मंत्र म्हणतात तो म्हणजेच सल्लामसलत, गुप्त बेत इत्यादि. हे दोन्ही प्रकार सर्व सोपानांत आहेत. प्रथम जपमंत्रांचे उल्लेख पाहूं.

(क) **जपमंत्रांचे उल्लेख :**

(१) **बाल.** —' महामंत्र जो महेश जपती ' (१९।३) … **' राम हा महामंत्र '**
' अनुरागें द्वादशाक्षरी मंत्रा मग जपतात ' (१४३) *वासुदेवमंत्र*
' वेदमंत्र मुनिवर उच्चरिती ' (१०१।४) … *वेदमंत्र*

(२) **अयोध्या.** — मंत्रराज तव नित्याचि जपती ॥ … **रामषडक्षरमंत्र**
' परिवारासह तुम्हां पूजिती ' (१२९।६–७) पुरश्चरण सुचविलें आहे.

(३) **अरण्य.** — ' सुटे ब्रह्मशर मंत्रें प्रेरित ' (२।१) … *ब्रह्मास्त्रमंत्र*
जे राममंत्र जपति संत (३२ छं २) कोणताहि **राममंत्र**

(४) **किष्किंधा.**—' नामबळें ज्या शंकर काशीं । दे सकलां समगति अविनाशी '
' राम ' महामंत्र

(५) **सुंदर.** —श्रुणु *यन्नामा जपुनि* भवानी । भवबंधन नर तोडी ज्ञानी (२०।३)
' राम ' महामंत्र

येथें रामनामाचा जप सांगितला. '*ब्रह्मशरा* जर मानुं ना' *ब्रह्मास्त्रमंत्र*

(६) लंका. — '*नामजपें* ज्याच्या उमे, नर तोडिति भवपाश' (७३)

राम महामंत्र

(७) उत्तर. — *तव जपुनि नामा* श्रमविना भव तरति त्या स्मरतों हरे ! (१३ छं.)

राममंत्र

'वेदमंत्र तैं द्विज उच्चरिती' (१२।४) *शंभुमंत्र* मज देती मुनिवर ॥

वेदमंत्र, शिवमंत्र

याप्रमाणें रामनाममंत्राचा महिमा साती सोपानांत सांगितला आहे. येथें केवळ १।१ उदाहरणच दिलें. 'राम' महामंत्र (महावाक्य), रामषडक्षरमंत्र, इतर राममंत्र, द्वादशाक्षरी वासुदेवमंत्र, शिवमंत्र, वेदमंत्र व ब्रह्मास्त्रमंत्र यांचा उघड उल्लेख आहे. याशिवाय अभिचार प्रयोगाच्या उच्चाटन मंत्रांचाही दोन वेळां (अयोध्याकांडांतच) उल्लेख आहे. पुरश्चरणाचा, दीक्षा देण्याचा, व नाममंत्रोपदेशाचाहि उल्लेख आहे.

(ख) राजनैतिक-मंत्रांचे उल्लेख :

(१) **बाल.** — 'मंडलीकमणि रावणा शासनिं *अपला मंत्र*।' (१८२ रा); योगयुक्ति तप *मंत्रशक्ति* ती। फळे तदा जैं गुप्त रक्षिती॥' (१६८।४) हें *दोन्ही प्रकारच्या मंत्रांस लागू आहे.*

(२) **अयोध्या.** — 'करुनि *कुमंत्रा* साजा साजति।' (२२८।५); 'भरत ! *मंत्र* शुभ फार' (१८४).

(३) **अरण्य.** — '*मंत्र* अतां प्रभु ! मज तो देणें। मुनीद्रोहि मी मारिन जेणें ॥ (१३।३); 'भूप *कुमंत्रें*...नाशति' (२१।१०-११); '*मंत्राचि* हा दृढ मन वच वपुनें' (२३।५) रावणाचा गुप्त निश्चय.

(४) **किष्किंधा.** — '*नारीमंत्र* न घेशी कानां' (९।९)

(५) **सुंदर.** — वदले सगळे '*मंत्र* भला वा !' (२४।८)

(६) **लंका.** — 'वदे *मंत्र* लंकेश्वर कानां (११।६).

(७) **उत्तर.** — यांत राजनैतिक 'मंत्र' शब्दाचा उल्लेख नाहीं. कारण कीं कोणी पाप, अपराध करीतच नव्हते व रामचंद्रास कोणी शत्रु उरला नव्हता. तथापि राज्याभिषेकाविषयीं वसिष्ठांनीं सर्व विप्रांस जी विनंतीवजा आज्ञा दिली व सुमंत्रास जें सांगितलें तो राजनैतिक विचारच आहे. वसिष्ठ उवाच :—'द्विज हो ! हर्षे द्या अनुशासन। रामचंद्र भूषिति सिंहासन ॥' त्यानंतर विप्रांनीं आपलें मत सांगितलें :—'जग अभिराम राम—अभिषेचन ॥ मुनिवर ! वेळ न अतां लावणें। महाराज अभिषेका करणें ॥' (१०।५, ७–८) हा जो विचारविनिमय झाला तो मंत्रच आहे. '*सुमंत्रास* मुनि कथिति तैं, श्रवुनि मुदित जातात' (१०) यांतही मंत्रकथनच आहे.

सूचना — उत्तर व किष्किंधा कांडांशिवाय इतर कांडांत या मंत्रांचे आणखी पुष्कळ उल्लेख आहेत.

८. **पुत्र (जन्म) वर्णन** – (१) **बाल.** — ' जन्मे तदा कुमार षडानन ' (१०३।७); ' प्रिय अति शिशुरुदनाला ऐकत ' पासून ' पुत्रजनन दशरथास कळलें. पर्यंत (१९३।१–३) व पुढें (२) **अयोध्या.** — ' पुत्रवती युवती जगीं तीच किं। रघुपतिभक्त जिचा सुत होत किं ।। न तरि वांझ बरि, विते वृथा ते । ' (७५।१-२) (३) **अरण्य.** — स्पष्ट उल्लेख नाहीं. परंतु अत्रिकृत स्तुतींत रामचरित्र सूचित करीत असतां ' दिनेशवंशमंडनं ' यानें सूर्यवंशांत रामजन्म सुचविला आहे व पुढें ' महेशचापखंडनादि चरित्र स्पष्ट ' सांगितलें आहे. (४ छं. ३) (४) **किष्किंधा.**— ' कोसलेश दशरथसुत *जन्मुनि* ' (२।१). (५) **सुंदर.**— ' अजर अमर गुणनिधि *सुत !* होशिल ।। (१७।३) याप्रमाणें सीतेनें प्रथम हनुमन्तास आपला पुत्र मानलें म्हणून पुढें श्रीरघुवीरानेंहि त्यास पुत्रत्व दिलें आहे. ' श्रुणु ! सुत ! अनृण तुझा मी नाहीं। ' (३२।७). (६) **लंका.**— ' अतिबल मधुकैटभ जो मारी । ... तो भूभार-हरण अवतरला। ' (६।७-८). (७) **उत्तर.** —' सीते सुंदर सुत युग झालें ', ' झाले दो दो सुत भावांप्रति ' (२५।६-८) याप्रमाणें पुत्रजन्मवर्णन सर्व सोपानांत आहे. ' पुत्रधर्मवर्णन ', ' पुत्रशिष्यधर्म ' प्र. प्र. ११।१० या प्रकरणांत पाहा.

९. **जलक्रीडा** –(१) जलकेलि = जलक्रीडा. कामदेवाच्या अनेक कलांपैकीं एक आहे. त्यांत ग्राम्यता असल्यानें व मानसांत सात्त्विक शृंगार असल्यानें गोस्वामींनीं स्पष्ट वर्णन केलें नाहीं; तो आदर्श लोकांपुढें ठेवणें देशकालपरिस्थितीस उचित नाहीं; तथापि ' व्यापिन *कामकला* मुनिला लव ' (१।१२६।७) यांत अप्सरांबरोबर ' जलकेलि ' वगैरे सर्वांचा अंतर्भाव केला आहे. *वात्स्यायन कामसूत्र* किंवा मानसपीयूषमध्यें कामकलांचें वर्णन दिलेलें पाहा.

(२) जलक्रीडेचा आणखी एक प्रकार आहे व तो उघड वर्णिला आहे. नौकेंत बसून जलक्रीडा करणें (६।८८।६) ' भट वाहति बहु खगवर बसती । जणुं नदींत नौक्रीडा करती ।। ' हीं दोनच उदाहरणें *आज* डोळ्यांपुढें दिसत आहेत. **सूचना** —' *क्रीडति* विविधा *पाणिपतंगा* ' (१।१२६।५) याचा अर्थ जलकेली असा एका जाड्या विद्वान् हिंदी पंडितांनीं केला आहे, पण ती धूळफेक किंवा आत्मवंचना आहे. केवळ पाणि (हात, जल) या सादृश्यानें हातचलाखी करून वडाची साल पिंपळास लावली आहे. श्रीमद्भागवताधारें गूढार्थचंद्रिका दाखविते.कीं पतंग = कंदुक – चेंडू. (पतन् गच्छति). हातांनीं कंदुकक्रीडा करीत होत्या.

१०. **मधुपान** — मधु = मद्य – मदिरा, व मध या दोन्ही अर्थांनीं मानसांत उल्लेख आहेत.

(१) **अयोध्या.** — ' करिती मनोरथ जे ज्यां सुचती । *स्नेह-सुरा-उन्मत्त* चालती ।।

शिथिल अंग पद पथिं लट्पटती । प्रेमें विव्हळ वचनें वदती ॥ ' (२२५।३-४). (२) **अरण्य.** — ' *करिसि पान* निजसी दिनरातीं । शुद्धि न तिळ ...' (२१।७-१०) ' लज्जापानें ' नाश पावते. (३) **लंका.** — ' मागवि रावण कोटि घट मदिरा, महिष अनेक ॥ ६३ ॥ ' खाउनि महिष *करुनि मदपान ।* गर्जे वज्राघात-समान ॥ (६४।१). (४) **बाल.** — ' वातभूतवश *जे मदमस्त ।* ते बोलति अविचारें ग्रस्त ॥ जिहिं कृत महामोह – *मदपाना ।* त्यांचे शब्द न घेणें कानां ॥ (११५।७-८). (५) **सुंदर.** — ' सकलहि ते मग मधुवनिं जाती । अंगदसंमत *मधुफल खाती* ' (२८।७) येथें मदिरापान नसून मधु = मध असा अर्थ आहे. ' मधुपान ' उल्लेख नसून मधुभक्षण आहे.

सूचना — प्रथम लेखनांत पहिलीं तीनच ' मदपान ' उदाहरणें आठवलीं होतीं. आज (१४।४।५६) चौथें बालकांडांतलें सांपडलें–आठवलें, यावरून खात्री वाटते कीं रूपकानें मदपानवर्णन शेष कांडांतहि सांपडेल ! (सांपडलें !) (६) **उत्तर.** — ' *धनमदमत्त परम वाचाळहि* ' (७१९।७।३). (७) **किष्किंधा.** — ' नाथ ! *विषय-सम मद* ना कांहीं । मुनिमनमोहित करी क्षणां ही ॥ ' (२०।७) ही विषयमदिरा मुनींच्या मनालासुद्धां क्षणांत मोहित करते ! विचार करावा कीं ही कोणाची बुद्धि ! कोणाची कृपा !

येणेंप्रमाणें सर्व महाकाव्यलक्षणें मानसांतच आहेत असें नसून प्रत्येक सोपानांत आहेत. न सांपडल्यास तो पहाणाराच्या बुद्धीचा दोष समजावा !

कोण वर्णि गुरु-उपकारांना । वंदन वारंवार पदांना ॥

महाकाव्य लक्षणें हें सहावें मुख्य प्रकरण येथें समाप्त झालें.

◆◆◆◆

७ : नाट्याचे सुंदर नमुने

卐 卐 卐 ७।१ 卐 卐 卐

श्रीरामचरितमानस नाट्य–महाकाव्य आहे असे उल्लेख पूर्वील प्रकरणांतून अनेक वेळां केले असल्यानें महाकाव्य लक्षणांचे नमुने दाखविल्यावर आतां नाट्य नमुने देणें क्रमप्राप्त झालें. महाकाव्यलक्षणें दाखवितांनाच नाट्यकाव्यांतील एक महत्त्वाचा नियम दाखविला गेला आहे. येथें कांहीं नाट्यनमुनेच स्पष्ट करून दाखविले आहेत.

१. श्रीसीतामातेला वंदन करून महावीर हनुमान —

निघे नमुनि शिर शिरला बागे। खाइ फळें तरु तोडूं लागे ॥

तिथें सुरक्षक भट बहु असती । कांहीं हत, गत कांहीं कळवती ।।

नाथ ! एक आला कपि भारी । तो अशोक वाटिके विदारी ।।

फळें भक्षुनी विटप उपटले । रक्षक मर्दुनि महीं पाडले ।। (५।१८।१–४)

यांतील तिसऱ्या व चौथ्या चौपायांत फार सुंदर नाट्य आहे; पण वरवर पाहाणारास दिसत नाहीं.

(१) अशोकवाटिकेचा विध्वंस करून बहुतेक रक्षकांना मर्दून, पीठ करून फेंकून दिलेलें ज्यांनीं पाहिलें व जे जीव घेऊन धांवत पळत रावणापुढें आले, ते अति घाबरलेले धापा टाकीतच आलेले असणार; अशा दशेंत त्यांना नीट बोलतां कसें येईल ? धापा टाकीत, श्वास घेत घेतच ते बोलणार. यथा :—

'नाऽऽथ !' म्हणून एक सुस्कारा सोडणार ! त्यावर रावणासारखा अति अहंकारी नि निर्भय राजा काय म्हणेल बरें ! तो जरा तिरस्कारानें वाकडें तोंड करीत म्हणतो–नाथ, नाऽथ ! ओरडतोस ! काय, झालं काय तुला ? रक्षकः–*एऽक आला !!* रावणः– कोण तुझा × × आला कीं काळ ? काळाची छाती आहे यायची ? कोण आला ? बोल. रक्षकः– कपि. रावणः– हँ हँ, (मोठ्यानें हंसून), गिळलात कां नाहीं ? रक्षकः– भाऽऽरी. रावणः–भारी झाला तरी राक्षसांचें भक्ष्यच ! त्याला भ्यालांत, भ्याडांनो ? रक्षकः–(अहो नाथ) *तो अशोक वाटिका विदारी.* रावणः–अँ ! काय, म्हणतोस काय ? अशक्य ! अशक्य ! रक्षकः–' फळें भक्षुनी विटप उपटले. ' (चटकन् उच्चारतो) रावणः–अस्सं ! ठीक आहे. रक्षक चटकन् म्हणतोः—' रक्षक मर्दुनि महीं टाकले ' रावणः–ठीक, ठीक; नामर्दांनो ! जा, जा ! बघतों त्याचा समाचार.

२. रावणानें सर्व राण्यांसह सीतेकडे जाऊन तिला प्रार्थना केली तेव्हां सीता तीन चौपायांत त्याचा अधिक्षेप करते त्यांतील एक चौपाई—

तृण धरि आड वदे वैदेही । स्मरुनि अवधपति परमस्नेही ।।

श्रुणु दशमुख खद्योत उजेडें । कधीं तरी नलिनी कीं उघडे ॥
असं मनिं समज म्हणे जानकी । खल ! न शुद्धि रघुवीर बाण कीं ? ॥
शठ ! शून्यीं मज हरुनि आणली । अधम निलज्ज ! लाज तुज नुरली ॥

(१) तिरप्या टायपांतील चौपाई 'श्रुणु ! दशमुख-खद्यो ऽ ऽ त, उजेडें—' अशी रुष्ट झालेल्या महापतिव्रतेच्या भूमिकेवरून उच्चारावी; म्हणजे किती सुंदर नाट्य, उपहास आणि तिरस्कार व्यक्त होईल याची कल्पना करावी, आणि 'श्रुणु ! दशमुख, खद्योत उजेडें—' अशी वाचून पाहावी म्हणजे भेद कळेल. (क) पहिल्या उच्चारांत नाट्य आहे; ऐक ! दहा तोंडांच्या काजव्या ! ऐक ! श्राव्य काव्यांत (श्रवण करावयाच्या) बोलणाराच्या मनांतील अर्थ भिन्न असला तरी उच्चारानुसार व उच्चारपद्धत्यनुसार शब्दक्रमानेंच अर्थ ग्रहण केला जातो. वाक्य पुरें न होतांचसुद्धां, शब्दांचा उच्चार होऊं लागतांच, अर्थ घेतला जाऊं लागतो. केवळ पाठ्य काव्यांत असें होत नाहीं; तेथें सर्व वाक्य दृष्टीसमोर असतें. 'उजेडें' शब्दाच्या उच्चारापूर्वींच 'श्रुणु, दशमुख खद्योत' हें शब्द आपला अर्थ सांगतात व तोच हृदयांत शिरतो. या उदाहरणानें **उपदेश मिळतो** कीं कोणाशीं बोलतांना या शब्दशक्तीकडे लक्ष ठेवून बोलावें; अन्यथा बोलणाराच्या ध्यानीं मनीं नसलेला अर्थ ते शब्द सांगतील आणि गैरसमज पसरून भावना दुखावतील.

३. सीतेची गांठ पडून तिच्याशीं संभाषणादि झाल्यावर हनुमान सीतेला विनवितात,

'श्रुणु । माते मज भारी भूक । लागे, बघुनि रुचिरफल रूख ॥
श्रुणु सुत ! कानन-रक्षण-कारी । परम सुभट रजनीचर *भारी* ॥
त्यांचें भय मज माते ! नाहीं । जर सुख वाटे तुझ्या मनाही ॥ (सुंदर. १७।७-९)

(१) यांतील पहिल्या व तिसऱ्या चौपायांत नाट्याभिनय आहे. हें बघ आई ! सुंदर फळांनीं भरलेले हे वृक्ष पाहून, मला भाऽऽरी भूक लागलीय ! असें वृक्षांकडे बोट दाखवीत व डावा हात पोटावर मारीत, क्षुधार्त व केविलवाण्या मुद्रेनें हनुमान सीतेला म्हणाला; म्हणूनच पुत्रवात्सल्यानें थबथबणारें सीतेचें पुढील वचन आहे. 'कनकभूधराकार शरीर । समरभयंकर अतिबल वीर ' (१६।८) असें हनुमंताचें रूप पाहिलेलें असूनसुद्धां सीता म्हणते कीं, 'श्रुणु सुत ! काननरक्षणकारी । परम सुभट रजनीचर भारी ॥ हा केवळ पुत्रवात्सल्य जागृत झाल्याचा परिणाम आहे ! शेवटची चौपाई 'त्यांचें भय ? मज ! माते ऽऽना ऽऽहीं ' अशी वाचावी—उच्चारावी म्हणजे नाट्याची यथार्थ कल्पना येईल.

त्या वृक्षांकडे हात करून आणि तुच्छतायुक्त साश्चर्य-हास्यमुद्रा करून 'त्यांचें भऽऽय ' हे शब्द 'त्यांचें' नंतर किंचित् थांबून, 'भ' वर जोर देऊन उच्चारले आणि जरा थांबून, वीर्य शौर्याचा आवेश आणून, उत्साहयुक्त मुद्रेनें, छाती पुढें काढीत व उजव्या हाताचीं चार बोटें छातीवर मारीत 'मज' हा शब्द उच्चारला; आणि

मातेSS हा शब्द कळवळून भुकेनें तळमळणाऱ्या मुलाप्रमाणें उच्चारून नाSSहीं, असें 'ही 'ला हिसका देऊन उच्चारलें व 'जर सुख वाटे तुझ्या मनाही' हें वाक्य भरकन सीतेकडे हात (तुझ्या) करीत उच्चारलें म्हणूनच सीतेला दिसलें कीं 'बुद्धिबल-निपुण कपि' आणि 'म्हणे जानकी जाइ'.

'बघुनि बुद्धिबलनिपुण कपि। म्हणे जानकी जाइ' (चौ. १०)

कपीचें बुद्धिबलनिपुणत्व जानकीला दिसलें (चौ. १०) 'त्यांचें भय मज माते नाहीं। जर सुख वाटे तुझ्या मनाही॥' ही चौपाई पारायण-वाचन पद्धतीनें उच्चारली असती तर कपीची बुद्धि आणि बल यांची निपुणता जानकीला *दिसली* असती काय?

४. हनुमान—उलटसुलट सब लंके जाळी। उडी सागरीं नंतर घाली॥ ८॥

दो० — पुच्छा विझवुनि हरी श्रम, पुन्हां सान होऊन

जानकि सम्मुख राही उभा पाणि जोडून **॥ २६॥**

आई! मज दे कांहिं खूण तरि। **देत जसे रघुनायक मम करिं॥** (२७।१)

(१) पहिल्या दोन ओळी संदर्भासाठीं घेतल्या आहेत. तिसऱ्या ओळींत नाट्याभिनय आहे. 'जानकि सम्मुख राही' या चरणांत १ मात्रा कमी आहे व ती मुद्दाम कमी ठेवली आहे. यानें हनुमंताची प्रेमविरह—विषादमग्नता व कंठावरोध ही दशा दाखविली आहे. लंका दहन करून समुद्रांत उडी टाकली आणि खलस्पर्शदोष, दोन दिवसांच्या युद्धांतील श्रम व लंकादहनश्रम यांतून मुक्त झाले. श्रीरामप्रभूकडे त्वरेनें परत जाण्याच्या हेतूनें हनुमान लहान रूपानें सीतेकडे आले, दोन्ही हात जोडले आणि समोर उभे राहिले. मी जातों, मला प्रेमानें निरोप दे, वगैरे सांगण्याची इच्छा आहे; पण सीतेच्या स्नेहानें, तिला अशा वेळीं वाटणाऱ्या दुःखाच्या कल्पनेनें, व सीतेला सोडून जातांना होणाऱ्या विरहव्यथेनें, कपीचें हृदय भरून आलें आहे, आणि बराच वेळ सीतेच्या चरणांकडे बघत 'राSSही' चित्रांतील कपीसारखा स्तब्ध राहिला आहे; हें दोह्यांतील मात्रान्यूनतेनें होणाऱ्या छंदोभंगानें व लयभंगानें प्रथम दाखविलें आहे. हें अभिनेय दृश्य आहे कीं नाहीं? अभिनेय दृश्य दशेचें वर्णन नाट्यकाव्यांत शब्दांनीं करण्याचें कारण नसतें.

(२) अशा परमस्नेहमग्न व विरहव्यथामग्न दशेंत जो बोलूं लागेल तो 'आई मज दे कांहीं खूण तरि' असें वाचनासारखें बोलूं शकेल काय? 'आईSS मज देS!! कांहिं, खूण! तरि' असें थबकत थबकत, हुंदके देत, शोकाकुल खिन्न मुद्रेनें म्हणाला हळुहळु; तेव्हां पूर्ववृत्तीवर येऊन पुढला चरण नेहमींसारखा सावकाश उच्चारला. 'दे कांहीं' म्हणून जरा थांबला असेल तेव्हां जानकीनें विचारलें असेल कीं बाळा! काय देऊं तुला? तेव्हां म्हणाले 'खूण.'

(३) रामायण पठन-पाठन करतांना अशा नाट्यांकडे लक्ष देऊन विचारपूर्वक

सावकाश वाचलें तर वाचकांचें व श्रोत्यांचें हृदय विरघळेल व तो तो रस आणि त्याचे **अनुभाव** (सात्त्विक भाव) वाचक व श्रोते यांत उत्पन्न होतील; परंतु नाट्य आहे ही कल्पनाच नसल्यानें भरधाव वाचन चालतें !

(४) एकाच कांडांतील नमुने कां घेतले ? (क) प्रो. लमगौडाजी आपल्या पुस्तकांत म्हणतात कीं बाल आणि अयोध्या या कांडांत नाट्य अधिक असून पुढील कांडांत तें कमी होत जाऊन महाकाव्याची वृद्धि झाली आहे, हें म्हणणें किती यथार्थ आहे याची कल्पना वाचकांना यावी म्हणून असें करावें लागलें. (ख) हे नमुने लहान असल्यानें फार विस्तार करावा लागला नाहीं. (ग) नाट्यांतील विविध रस-भावांचा विस्तार कसा करावा याची दृष्टि वाचकांस यावी इत्यादि हेतु आहेत. सुंदर कांडांत आणखी पुष्कळ नमुने आहेत, पण विस्तारभयास्तव स्पष्ट करतां येत नाहींत.

५. मागील व पुढील कांहीं प्रकरणांत सहज ओघानें आलेल्या नाट्याचे नमुने आहेत. अरण्य, किष्किंधा व सुंदर या कांडांचा विस्तार जसा लहान तसे त्यांतील नाट्य-नमुनेसुद्धां अगदीं थोडक्यांत व संक्षिप्त रीतीनें चित्रिले आहेत. बाल व अयोध्या हीं कांडें जशीं विस्तृत तसा त्यांतील नाट्यप्रसंगांचा विस्तारहि मोठा. लंका व उत्तर यांतील नाट्य मधल्या तीन कांडांच्या मानानें अधिक सविस्तर आहे.

इतर सोपानांतलि नाट्य-नमुने — आतां नाट्य नमुन्यांचा नुसता नामनिर्देश करणेंच भाग आहे.

बालकांड — (१) सतीमोह प्रकरणांत 'शंभु समयिं त्या रामा पाहति' (४९।१) दोहा ५५ पर्यंत हा भाग कांहीं फरक न करतां **सिनेमांत दाखविण्यासारखा आहे.** (२) संपूर्ण नारदमोह प्रकरण हें एक स्वतंत्र नाटक व **सिनेमा-चित्र करण्यासारखें आहे.** नारद हिंडत हिंडत हिमालयांत जाऊन गुहेंत समाधि लावून बसतात हा एक प्रवेश. इन्द्रानें कामदेवाला बोलावून कामाला पाठविणें हा दुसरा प्रवेश; कामदेव सहकाऱ्यांना घेऊन जातो हा तिसरा प्रवेश; मिळून एक अंक. कामदेवाचे प्रयत्न व त्याचा पराभव हा दुसरा अंक. नारद कैलास, सत्यलोक व क्षीर सागरांत जाऊन परत निघतात हा तिसरा अंक आणि **शीलनिधि राजाचें नगर दिसल्या-पासून पुढील सर्व भाग हें एकांकी परम मनोहर रोमांचकारी प्रहसनच आहे.** (३) प्रतापभानु शिकारीस निघतो तेथपासून डुकराची शिकार व निष्फलता हा एक अंक. रस्ता भुलून कपटमुनीची भेट, संवाद व राजा झोपतो तेथपर्यंत दुसरा अंक. कालकेतु-कपटमुनि-भेटीपासून राजा पुन्हां शिकारीस जाईपर्यंत तिसरा अंक, आणि पुढील विप्रशापाच्या प्रकरणापर्यंत चौथा अंक असें चार अंकीं शोकपर्यवसायी स्वतंत्र नाटक होईल. **हें प्रकरण सिनेमा-चित्रास अगदीं योग्य.** (४) मनुशतरूपा-तपश्चर्येपासून सर्व प्रकरण सात्त्विक भक्तिमय आहे. (५) पार्वतीजन्मापासून शिव-पार्वतीविवाहसमाप्तीपर्यंत, फारच रम्य, विविध रसांनीं परिपूर्ण असें सुंदर नाट्यमय

कथानक आहे. **सिनेमा चित्रास अगदीं उपयुक्त आहे.** (६) **श्रीरामचरित्रांत**— विश्वामित्राश्रमांतून निघाल्यापासून आमराईंत विश्वामित्र–जनकादि–समागम आणि तेथें **रामलक्ष्मणांचा अचानक प्रवेश.** (७) जनकपुरीप्रवेशापासून नगरदर्शन-समाप्तीपर्यंत. (८) पुष्पवाटिका-प्रकरण, धनुर्भंग–प्रकरण आणि परशुरामगर्वहरण-प्रकरण हीं तीन स्वतंत्र तीन प्रकारचीं नाटकें होतील. पहिलें अत्यंत सात्त्विक शृंगार-प्रधान वीररसात्मक; दुसरें शृंगारादि आठ रस व भक्तिरसयुक्त आणि तिसरें वीर, भयानक, रौद्र व भक्तिरसात्मक.

अयोध्याकांड — (१) मंथरा–कैकयी-संवाद. (२) दशरथ–कैकयी–संवाद. (३) राम-निषादराज–भेटीपासून गंगापार जाणें. (४) यमुनातीरस्थ व चित्रकूट मार्गावरील प्रवास, राम–वाल्मीकि–भेट व चित्रकूट–निवास. (५) सुमंत्र शृंगवेरपुराहून निघाल्यापासूनं कौसल्या–भरत–भेट समाप्ति. (६) अयोध्येंतील दरबारापासून शृंग-वेरपुर-गमन व गंगापार जाणें इत्यादि अनेक सुंदर, मनोहर नीति व भक्तिमय, इतर प्रचलित रामायणांत नसलेलीं, पुष्कळ प्रकरणें आहेत तीं कोठवर वर्णावीं ! **अयोध्याकाण्ड म्हणजे तुलसीकाव्यकलेचा, चरित्रचित्रणाचा परमोत्कृष्ट भक्तिरससागरच आहे.**

अरण्यकाण्ड — (१) जयन्तकथा, (२) सुतीक्ष्णचरित्र, (३) राम–अगस्ति-भेट व संवाद, (४) शूर्पणखाप्रकरण, (५) जटायुभेट व हरिरूपानें रामस्तुति, (६) शबरीभेट, (७) नारद–राम–संवाद. हें काण्ड लहान असून प्रकरणें अधिक ! इतर रामायणांत व यांत महदंतर.

किष्किंधाकाण्ड—(१) हनुमान–राम–भेट व संवाद, (२) सुग्रीवभेट व संवाद (३) वालीवध–संवाद–तारेला उपदेशापर्यंत, (४) लक्ष्मणक्रोध व सुग्रीवभेट, (५ , रामदूतप्रयाण–विवरप्रवेशादि, (६) संपातीप्रकरण. सर्व लहान लहान पण चटकदार) इतर रामायणें व हीं प्रकरणें यांत पुष्कळ भेद ! यांशिवाय लहान लहान पुष्कळ आहेत.

सुंदरकाण्ड — यांतील चार अगदीं छोटे छोटे नमुने आधींच दिले आहेत. (१) हनुमन्तास ब्रह्मास्त्रानें मूर्छित करून नागपाशांत बांधून नेणें, (२) त्यापूर्वीं मुद्रिका–प्रकरण, (३) रावणसभेंत गमन व रावण–हनुमान–संवाद, (४) बिभीषण शरणा-गति, (५) रावणदूत शुकचरित्र.

लंकाकाण्ड — (१) सुवेल शैलावर रामविश्राम, चंद्रोदय व रामबाणप्रतापादि, (२) अंगदशिष्टाई हें स्वतंत्र नाटक किंवा **सिनेमाचित्र अद्‌भुत आहे.** ही रोमांचकारी अद्‌भुत अभिनव कथा आहे ! (३) युद्धवर्णनांत मधेंमधें छोटे छोटे पुष्कळ भाग आहेत, (४) लक्ष्मणास शक्ति लागल्यापासून हनुमंतानें **द्रोणागिरी अयोध्येवरून घेऊन येणें**, (५) सीतागमनापासून लंकाकांडसमाप्तिपर्यंत (मधल्या स्तुती वगैरे सोडून).

उत्तरकाण्ड — (१) हनुमान–भरत–भेट, (२) राम–सनकादि–भेट, (३)

लोमशविप्रभेट, (४) इतर किरकोळ कांहीं लहान लहान प्रसंग. **इतर कांडांच्या मानानें नाट्य कमी आहे.**

ल. ठे. (१) आमराईत जनक–विश्वामित्र–भेटींत रामलक्ष्मण–प्रवेश, (२) नगर-दर्शन, (३) पुष्पवाटिका–प्रकरण, (४) धनुर्यज्ञमंडपांत परशुरामप्रवेशादि, (५) कैकयी–भरत–भेट व कौसल्या–भरत–भेट, (६) नावाडी–संवाद व पदप्रक्षालन, (७) निषाद राजाची युद्धाची तयारी व पुढील भाग, (८) जयंताख्यान, (९) राम-हनुमान–भेट, (१०) मुद्रिकाप्रकरण, (११) रावण–अंगद–संवाद हीं प्रकरणें त्यांतल्या त्यांत अप्रतिम नाट्यमय असून वेड लावणारीं आहेत. सुटसुटीत वर्णन, थोडक्यांत संवाद, विविध रस–भावांचा परिपोष, ध्वनि, अलंकार, इत्यादि सर्व काव्य सौंदर्यपरिपूर्ण असून पूर्ण रसानुकूल भाषा हें वैशिष्ट्य ! आणि काव्यदूषणसुद्धां नाहीं !

नाट्य आणि महाकाव्य एकत्र असलेला हा जगांतील एकच ग्रंथ आहे असें 'विश्व-साहित्यमें रामचरितमानस' यांत प्रो. लमगौडाजी M. A. L L. B. **लिहितात.** पुढील प्रकरण 'मात्रान्यून नाट्यकला' हें आहे.

दीन दास हा जडमति भारी । परि रघुनाथ दास–सुखकारी ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ७।२ 卐 卐 卐

मात्रान्यून नाट्यकला

श्रीतुलसीमानसांत चौपाया व दोहे यांच्या चरणांत पुष्कळ ठिकाणीं १।१ मात्रा कमी असलेली आढळते; व त्या ठिकाणीं ते चरण वाचतांना गतिभंग होऊन हिसका बसतो. चौपायांत १६।१६ मात्रांऐवजीं १५।१५ व क्वचित १५।१६; १६।१५ अशा मात्रा आढळतात. दोह्यांतील प्रथम-तृतीय चरणांत १३।१३ ऐवजीं कांहीं ठिकाणीं अन्त्याक्षर दीर्घ असूनसुद्धां १२।१२ च मात्रा आहेत.

अनुवादाच्या प्रथमावृत्तींत 'अनुवादाविषयीं लेखकाचें अल्प निवेदन' यांत पृ. ४ वर उल्लेख आहे कीं "यांत कांहीं तरी हेतु असला पाहिजे; पण तो अद्याप ध्यानांत आलेला नाहीं." 'हा एक चौपाईचा प्रकार आहे' असें सांगून हिंदी टीकाकार पळवाट काढतात; पण हा प्रकार कोणत्या ग्रंथांत आहे, कोणत्या पूर्वकवींनीं वापरला आहे इत्यादि मुळींच सांगत नाहींत ! २८।११।५१ रोजीं सुन्दरकाण्डपारायण चालू असतां हेतु दिसला; तेव्हां अशा सर्व स्थळांची (१३५ पेक्षां अधिक) यादी करून स्फुरलेल्या हेतूची सत्यता पडताळून पाहणें सुरू झालें; व १८।६।५२ ला तो हेतु निरपवाद सत्य असल्याचें ठरलें व २०।६।५२ पर्यंत त्या मुख्य स्थळांतील न्यून मात्रांच भावनिदर्शन एका वहींत लिहून झालें; ती वही शिल्लक आहे.

न्यून मात्रांचें उदाहरण फक्त अयोध्याकाण्डांत नाहीं. बालकाण्डांत ६ उदाहरणें असून तीं दोह्यांत व बाललीला प्रकरणांतच आहेत.

मुद्दाम मात्रा कमी करून कथासंक्षेप करण्याच्या या कलेचा प्रारंभ मुख्यतः अरण्यकांडांत शूर्पणखाप्रसंगांत झाला. सीताहरणाची अत्यंत दुःखद व तापद असह्य कल्पना कवीच्या हृदयांत उद्भवली. 'दुष्ट-उदय जगदार्तीहेतू । प्रथित अधम जैसा ग्रह केतू ॥' कवीच्या भक्तिरसार्द्र, परम कोमल, परम विशुद्ध, हृदयास धक्का बसला. शोक, भय, उत्साह, क्रोध, आनंद, आश्चर्य इत्यादि भावांच्या उद्दीपनादिकांचें आणि स्तंभ, रोमांच, अश्रु, स्वरभंग, वैवर्ण्य, वेपथु इत्यादि अनुभावादिकांचें चित्रण शब्दांनीं करून, कथा वाढवून सीताशोध रावणवध लांब नेणें अप्रशस्त वाटूं लागलें. चौपायांच्या चरणांतील यमकांच्या चार मात्रांपैकीं उपान्त्य अक्षराची एक मात्रा कमी करून, वाणीच्या गतीस धक्का बसेल व लयभंग होऊन अडखळल्यासारखें वाटेल, अशा रचनेनें भाव व अनुभावादिकांचें निदर्शन करण्याची अद्भुत अभिनव काव्यकला उपयोगांत आणली जाऊं लागली. १३५ पेक्षां अधिक चरणांचीं उदाहरणें शूर्पणखा प्रसंगापासून उत्तरकाण्ड समाप्तीपर्यंत आहेत. बाल. दो. १९१, २००, २०१ व २०२ यांत सहा चरणांत १।१ मात्रा कमी आहे. मूळांत जिथें जिथें मात्रा कमी आहेत तिथें या अनुवादांतसुद्धां मात्रा कमी आहेत; चुकून राहिली असल्यास अपवादच !

शूर्पणखाप्रसंगापासून कथावर्णनाचा संक्षेप झाला असला तरी काव्यसौंदर्यहानि कुठेंच झालेली नाहीं. चौपाईचें पहिलें उदाहरण मानसांतील पहिलें उदाहरणच घेऊं.

१. हिंदी – तब खिसिआनि रामपहिं गई । रूप भयंकर प्रगटत भई ॥
मराठी–चिडुनि जाइ मग रामाप्रती । प्रगटी भेसुर रूपा अती ॥ (अरण्य. १७।१९)

(१) कवि नसलेल्या या लेखकासमुद्धां ही हिंदी चौपाई नीट लिहितां येते :— 'तब खिसिआनि रामपहिं जाई । रूप भयंकर प्रगटेउ भाई ॥' मग १।१ मात्रा वाढवून गतिभंग व वृत्तदोष वांचविणें महाकवीस अशक्य होतें काय? (क) 'रामपहिं' किंवा 'रामा' (मराठींत) उच्चारल्यानंतर पुढील तीन मात्रा उच्चारतांना वाणीच्या गतीला असा हिसका बसतो कीं जणूं *वेगात* असलेल्या मोटारला एकाएकीं ब्रेक लावला जावा ! रामाकडे जाऊन शूर्पणखा भेसुर–भयानक रूप प्रगट करणार हें मनांत येतांच 'सीतेची काय दशा होईल !' हा विचार कविहृदयांत घुसला, आणि प्रथम त्या हृदयालाच धक्का बसला. भय हा भयानक रसाचा स्थायीभाव जागृत झाला व सीतेच्या देहालाहि हिसका बसून शरीरकंप, स्वेद, विवर्णता इत्यादि भयानक रसाचे अनुभाव प्रगट झाले हें येथील न्यूनमात्रेनें बसणारा धक्का सांगतो.

२. हिंदी – मसक समान रूप कपि धरी । लंकहि चलेउ सुमिरि नरहरी ॥
मराठी– मशक-समान रूप कपि धरी । लंके निघे स्मरुनि नरहरी ॥ (सुंदर. ४।१)

ही चौपाई गोस्वामींच्याच भाषेंत अशी लिहितां येतेः— 'मसक समान रूप कपि

धरेऊ । नरहरि सुमिरि लंकप्रति चलेऊ ॥ धरी (हिंदी) = धरून; मराठींत धरी = धरता झाला. दिवसां सुवेल शैलावरून हनुमन्तानें लंका पाहिली; आणि रात्रीच्या अंधारांत गुप्तपणें लंकेंत शिरतां यावें म्हणून हनुमान 'अतुलितबलधामं स्वर्णशैलाभदेहं । दनु अवन कृशानुं...' असा असतां मशकाएवढें लहान रूप घेतलें, हें आश्चर्य नव्हे काय ?

येथील न्यूनमात्रा आश्चर्याचे भाव प्रगट करण्यासाठीं आहेत. सर्व निशाचरांचा वध व रावणाचा वध करण्यास समर्थ असणाऱ्या व त्रिकूटपर्वतासुद्धां लंका उपटून श्रीराम-चरणीं नेऊन ठेवण्याची भाषा बोलणाऱ्या (४।३०।९) हनुमन्तानें डासापेक्षां लहान रूप घेऊन रात्रीं चोरून लंकेंत शिरण्याचा प्रयत्न करणें अति आश्चर्य आहे. असें विचित्र कां केलें याचा विचार करावा म्हणजे परम आश्चर्य वाटेल. (गूढार्थचंद्रिका पाहा).

३. कैलास पर्वत उचलल्याचा व शिरें अनलांत होमल्याचा उल्लेख दशमुखानें वारंवार केला, तेव्हां त्यास अंगद म्हणाला,

हिंदी – '**सिर अरु सैल कथा चित *रही* । तातें बार बीस तैं *कही* ॥**'

मराठी–**शिर-गिरि कथा मनीं *राहिली* । वीसवेळ यास्तव *गाइली* ॥** (लंका.२९।७)

यांत तिरस्कारयुक्त उपहास आहे. हास्य रस आणि त्याचे अनुभव अंगदाच्या मुखा-दिकांवर प्रगट झाले, हें बसणाऱ्या हिसक्यानें व गतिभंगानें सुचविलें. (क) गूढार्थ-चंद्रिकेंत अशा प्रत्येक ठिकाणीं रस-भावादिकांचें स्पष्टीकरण केलेलें आहे; पण अनवधानानें कांहीं स्थळीं राहिलेंहि असेल. त्यांतील बरेच भाव मानसपीयूषमध्यें छापले आहेत. अशा दृष्टीनें न्यूनमात्रा-स्थानांचा विचार केल्यास आनंद लाभेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ७।३ 卐 卐 卐

यतिभंग नाट्यकला

श्री तुलसी-मानसांत कांहीं ठिकाणीं जाणूनबुजून यतिभंग केलेला आहे. त्यामुळें ते चरण वाचतांना अडखळल्यासारखें होतें; पण हा दोष नसून नाट्यकाव्यांत सकारण असेल तेथें भूषण आहे. यति म्हणजे छंद-वृत्त-वाचतांना किंचित विश्रांति घेण्याचें स्थान. चौपाईंत व दोहा सोरठा वृत्तांत आठ मात्रांवर यति असतो. कांहीं उदाहरणें:—

१. हिंदी – **सीता *हरन* तात जनि कहहु पिता सन जाइ ।**
जौं मैं राम त कुलसहित कहिहि दसानन आई ॥

मराठी – **सीता *हरण* तात नच वदा पित्या जाऊन ।**
मी जर राम, दशास्य तें वदे सकळ येऊन ॥ (अरण्य. दो. ३१)

संदर्भ — जटायु आसन्नमरण असतां राम त्यास भेटले. त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याची सर्व पीडा दूर केली व म्हणाले,

'**तात ! त्यजुनि तनु जा मम धामा । देउं काय तुज पूर्तकामा ॥**

आणि मग वरील दोह्यांतील विनंति केली. हे तात ! तुम्हीं जाऊन सीताहरणाची गोष्ट (माझ्या) पित्यास सांगू नका; मी जर राम असेन तर दशानन येऊन ती गोष्ट (दशरथांस स्वर्गांत) सांगेल. (क) दोह्याच्या पूर्वार्धांत सीताहरणाचा उल्लेख करतांना लज्जेनें व विषादानें कंठ दाटून आला व 'सीताहरण' उच्चारल्यावर शब्द चटकन उमटेना. रंगभूमीवरील पात्राची ही दशा या नाट्यमहाकाव्यांत यतिभंगानें प्रदर्शित केली आहे. हिंदींत 'सीताहरनहि' आणि मराठींत 'सीताहरणा' सहज जमलें असतें; पण त्यामुळें वक्त्याची भावदशा व रसनिष्पत्ति दिसली नसती.

२. संदर्भ — श्री रघुवीर आपले स्वामी आहेत हें ओळखून, विप्ररूपधर हनुमान पायां पडले; व उठून त्या अद्भुत वेषाकडे पाहून परम सुखी झाले. नंतर प्रार्थना (स्तुति) केली तिच्यांत हें स्थान आहे. ही भेट व संवाद नाट्यकाव्य आहे.

हिं. दो. — एकु मैं मंद मोहबस कुटिलहृदय अग्यान ।
पुनि प्रभु मोहि बिसारेउ दीनबंधु भगवान ॥

म. दो. — **एक मी मंद मोहवश कुटिल-हृदय अज्ञान ।**
त्यांत मला प्रभु भुलविती दीनबंधु भगवान ॥ (किष्किंधा. दो. २)

(१) पहिल्या चरणांत तिरप्या टाईपांत दिलेल्या शब्दांत यतिभंगानें छंदोभंग निर्माण केलेला आहे. 'एकु मंद मैं मोहबस' (एक मंद मी मोहवश) हा चरण आणि वरील दोह्यांतील चरण वाचून पाहावेत म्हणजे भेद कळेल. इकडला शब्द तिकडे घातला; तो श्रीगोस्वामींना घालतां आला नसता काय ? पण नाटकांतील पात्र ज्या प्रकारचें असेल त्या प्रकारची भाषा, कृति व वेष असतील तरच तें नाट्य सुंदर दिसतें–ठरतें. तीन वर्षांच्या बालकाच्या मुखांत शुद्ध संस्कृत भाषा व वेड्या, मूर्ख माणसाच्या मुखांत शुद्ध भाषा कशी दिसेल ? तें स्वाभाविक दिसणार नाहीं ! येथें वक्ता म्हणतो कीं मी मंद, कुटिल, अज्ञान व मोहवश आहें. अशाच्या मुखांत सदोष भाषा असेल तरच, त्याच्या म्हणण्यावर सहज विश्वास बसेल. ८ मात्रा ३,३,२ किंवा ४,४ अशा असाव्या लागतात; तशा येथें नसून ३, २, २, १ अशा आहेत; त्यामुळें छंदोभंग झाला; महाकाव्यदोष नाट्यकाव्यविभूषण ठरला !

३. संदर्भ — अंगदानें लंकेंत प्रवेश केल्याबरोबर रावणाच्या एका पुत्रास ठार मारलें व तो रावणदरबारांत गेला. तेथें रावण-अंगद-संवाद होऊन अंगद परत गेला आणि मग रावणाला त्या मुलाच्या मरणाची बातमी कळली; तेव्हां तो फार दुःखी झाला; तेव्हां —

हिंदी दो. — **साँझ जानि दसकंधर भवन गयउ बिलखाइ ।**
मंदोदरीं रावनहि बहुरि कहा समुझाइ ॥

मराठी दो. — **सांज बघुनि दशकंधर गेला भवनिं उदास ।**
रावणा मंदोदरि तैं समजावी स्वहितास ॥ (लंका. दो. ३५ म)

(१) अंगदानें केलेला पुत्रवध व सभेंत केलेला पराभव मंदोदरीला आधींच कळला होता; त्यांतहि कधीं खिन्न व उदास न दिसणारा रावण अगदीं उदास दशमुखांनीं घरीं आलेला पाहिला; तेव्हां मंदोदरीसारख्या पतिव्रतेची काय दशा झाली असेल बरें? तीच उत्तरार्धांत यतिभंगानें छंदोभंग मुद्दाम निर्माण करून दाखविली आहे. कोणत्या हृदयस्थितींत रावणास उपदेश करते हें अशा प्रकारें उपक्रमांतच सुचविलें आहे. 'तब मंदोदरि रावनहि' (तें मंदोदरि रावणा) किंवा 'बहुरि कहा मंदोदरी रावनही समुझाइ' (तदा वदे मंदोदरी दशानना स्वहितास) असें गोस्वामी सहज लिहूं शकले असते. (क) मं दो द रि रा व न हि 'हि' उच्चारांत दीर्घ आहे; ७ व ६ किंवा ९, ४ असे मात्राखंड पडतात व त्यामुळें अडखळावें लागतें. मराठींतही मुद्दामच मूलानुसार छंदोभंग केला आहे; पण या नाट्ययुक्तीनें मंदोदरीची भावनावश दशा व्यक्त केली आहे.

४. हिंदी—अंधकारु बरु रबिहि नसावै। *राम बिमुख न जीव* सुख पावै ।।
मराठी— अंधारें जरि रविस गिळावें । *राम विमुख न जीव* सुख पावे ।।
(६।१२२।१८)

यांत 'रामविमुख न = ७ मात्रा होतात 'जी' मागें घेतल्यास ९ होतात; पण यति ८ मात्रांनंतर पाहिजे; तथापि हा यतिभंग सहेतुक आहे.

(१) यांतील दुसऱ्या चरणाचा उच्चार करतांना यतिभंग होतो, हिसका बसतो. असेच हिसके, धक्के रामविमुख जिवास खावे लागतात; त्याच्या मनोगतीचा भंग होतो; वाणीचा भंग होतो; मनासारखें बोलल्यासारखें होत नाहीं हें या यतिभंगानें सुचविलें. (क) राम बिमुख न, असा अन्वय केला कीं दुसरा अर्थ 'जीव सुख पावे' असा निघतो.

(२) 'रामविमुख जीव न सुख पावे' असें म्हटलें असतें तर ऐकणारांना 'राम विमुख जीवन सुख पावे' असा भलताच अर्थ सांगितला गेला असता. (क) 'जीव न राम-विमुख सुख पावे' असें म्हटलें असतें तरी भलताच अर्थ कानांनीं घेतला असता. (मानसपीयूष तुलनेस घेऊन पाहा !)

◆◆◆◆

卐 卐 卐 ७।४ 卐 卐 卐

दूरान्वयादि नाट्यकला

दूरान्वय, विषयांतर, इत्यादींस काव्यदोष म्हणतात पण मानसांत त्यांचा भूषणां-सारखा उपयोग केला आहे. थोडीं उदाहरणें :—

१. सुरपति-सुत कथेंत

स्त्रवे रुधिर, रघुनायक जाणति । कुशधनुवर सायक संधानति ।।

दो० — *अति कृपालु रघुनायक* **संतत** *दीनीं स्नेह ।*

त्यांसीं छल करि येउनी मूर्खांहे अवगुण-गेह ॥

सुटे *ब्रह्मशर मंत्रें प्रेरित* ॥ (अरण्य. १।८–२।१)

(१) कुशधनुष्यावर कुशबाण लावून नेम धरला; इतकें सांगितलें; नंतर एक दोहा मध्यें घातला आणि नंतर बाण सुटल्याचें सांगितलें. मध्यें एक दोहा अगदीं भिन्न विषयाचा कां ? व शरमोचन दूर कां ? (क) याचें उत्तर *ब्रह्मशर* आणि *मंत्रें प्रेरित* यांनीं दिलें आहे. बाण लावून नेम धरल्यावर मंत्रानें त्याचें अभिमंत्रण करण्यास कांहीं वेळ लागणार कीं नाहीं ? तेवढ्या मधल्या वेळांत रंगभूमीवरील सूत्रधारानें पडद्यामागून श्रीरामस्वभाव व सुरपति-सुत-स्वभाव प्रेक्षकांस सांगितला !

(२) रघुनायक अति कृपालु असल्यामुळें बाणाचा नेम धरल्यावर त्यांनीं त्या मूर्ख सुरपतिसुताला शरण येण्यास थोडी संधि दिली, नेम धरतांक्षणीं जर तो शरण आला असता तर रघुनायक दीनांवर स्नेह करणारे असल्यानें त्यांनीं त्यास क्षमा केली असती असें पडद्यामागून सूत्रधारानें सुचविलें; पण तो दीन बनला नाहीं; कारण तो *अवगुणगेह* आहे; हेंहि सांगितलें. येथें दूरान्वय आणि विषयांतर दूषण आहे कीं भूषणभूत आहे हें रसज्ञ ठरवतील. (क) ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रण करण्यास कांहीं वेळ लागतो याचा पुरावा असाच पाहा —

२. इन्द्रजित हनुमंतावर चाल करून येतांच मारुतीनें एक ठोसा मारून त्यास मूर्छित केलें. मूर्छेतून उठल्यावर पुष्कळ युद्ध झालें पण ' जिंकू न शके प्रभंजनतनया ' तेव्हां—

दो० – ब्रह्मास्त्रा तो योजी, कपि मनिं करी विचार ।

ब्रह्मशरा जर मानुं ना महिमा-नाश अपार ॥ (सुंदर दो. १९)

ब्रह्मास्त्र योजीपर्यंत जो वेळ लागला तेवढ्यांत कपीच्या मनांतील विचार पडद्यामागून सूत्रधारानें सांगितले, इतक्यांत —

ब्रह्मबाण कपिला तो मारी । पडत पडत कटकां संहारी ॥

कपि मूर्छित पडला तो पाहे । नागपाशिं बांधुन नेताहे ॥ (सुंदर. २०।१-२)

प्रेक्षकांच्या समोरील, पडद्यापुढील, रंगभूमीवरून (स्टेज) कपि नेला जात असतां, दिसत नाहींसा झाल्यावर व पुढील प्रवेशाचा पडदा वर जाईपर्यंत, पडद्यामागून शंकर उमेस सांगतात,

' श्रुणु ! मन्नामा जपुनि भवानी । भवबंधन नर तोडी ज्ञानी ॥ ३ ॥

बंधनिं कीं तद्दूत सांपडे । प्रभुकार्यार्थी स्वयें कपि पडे ' ॥ ४ ॥

हें भाषण होऊन पडदा वर गेला तेव्हां प्रेक्षकांस रंगभूमीवर काय दिसलें पाहा !

कळत बद्ध कपि, निशिचर धावति । कौतुक पाहुं सभे सब पावति ॥ ५ ॥

इतक्यांत मेघनादानें बांधून नेलेला कपि सभेंत प्रवेश करतो —

***कपिगत* दशमुख सभेस पाही ॥ ६ ॥**

वाल्मीकि रामायणांत सुंदरकाण्ड सर्ग ४८ मध्यें ब्रह्मास्त्र लागून पडल्यावर, प्रथमच

त्यास नागपाशांनीं न बांधतां इतर दोर वगैरे बांधले गेले व त्यास ओढून नेऊं लागले (श्लो. ५१). नेतांना काय काय घडलें वगैरे विषय व रावण सभेचा संबंध, वाटेंत कपीला राक्षसांनीं मारझोड इत्यादि कशी केली वगैरे एकच विषय रावणसभेंत नेला जाईपर्यंत आहे (श्लो. ५७). येथें मध्येंच शंकरांचें भाषण आहे. सुंदर नाट्यनिर्मिती-साठीं ही अशी रचना केली आहे. एक प्रवेश संपून दुसरा सुरूं होईपर्यंत प्रेक्षकश्रोत्यांस मंत्रमुग्ध ठेवण्यासाठीं विषयांतरासारखें वाटणारें शंकरांचें भाषण मध्यें घातलें. अशी रचना या छोट्या छोट्या कांडांत वारंवार दिसेल.

अशा प्रकारें जेथें दूरान्वय, विषयांतर इत्यादि दोष दिसतील तेथें त्या भासमान दोषांतील हेतु नाट्यनिदर्शन, भावनिदर्शन इत्यादि कांहीं ना कांहीं आहेच हें निश्चित समजून हेतु शोधून काढला म्हणजे अवर्णनीय आनंद होतो.

◆◆◆◆

卐 卐 卐 ७/५ 卐 卐 卐

क्रमभंग नाट्यकला

१. शब्दक्रमभंग, अर्थक्रमभंग, निसर्गक्रमभंग, घटनाक्रमभंग इत्यादि काव्यदोष गणले आहेत; पण महाकविविभूषण नाट्यमहाकाव्य-निर्माते श्रीगोस्वामीजी यांनीं सद्वैद्याप्रमाणें विषाला अमृत कसें बनविलें याचे कांहीं नमुने या प्रकरणांत आहेत.

संदर्भ — शृंगवेरपुरास जाऊन स्नानादि झाल्यावर भरताच्या मनांत विचार आला कीं जेथें सीतारामलक्ष्मण यांनीं रात्रीं शयन केलें असेल तें स्थान डोळे भरून पाहावें. मातृसेवेचें कार्य शत्रुघ्नाकडे सोंपवून आपण एकटेंच निषादराजाकडे (गुह) गेले. मनांत आलेला प्रश्न त्यास विचारावा असें वाटून प्रश्न करणार तोंच श्रीराम-प्रेमानें हातपाय गळले; निराधार चालण्याची शक्ति राहिली नाहीं; तेव्हां काय केलें तें सांगतात,

जाती घालुनि मित्र करीं कर । स्नेह न थोडा, शिथिल कलेवर ।।
मित्र ! मला तें स्थान दाखवा । **जरा नयन–मन–जळजळ निववा ।।**
सितारामलक्ष्मण जिथं निजले । **वदतां नेत्रकोनिं जल भरलें ।।** (२।१९८।५-७)

' मित्र ! मला तें स्थान दाखवा ' यापुढें अर्थक्रमानुसार ' सिताराम लक्ष्मण जिथं निजले ' हा चरण यावयास पाहिजे होता, ' तें स्थान ' कोणतें हें त्या चरणानंतर सांगितलेंच नाहीं !

येथें सुंदर भावप्रदर्शक-नाट्य आहे. ' तें स्थान ' हे शब्द बाहेर पडतांच, त्या स्थानाशीं संबंधित घटना मनांत आली आणि सीतारामप्रेमाला पूर येऊन वाणी शिथिल झाली. ' शिथिल कलेवर '–शरीर झालें हें स्पष्टच सांगितलें आहे. बुद्धींत व वाणींत शैथिल्य आलें हें न सांगतां, त्या उभयविध शिथिलतेचा परिणाम म्हणजे

भाषणांत असंबद्धता हा दाखविला. या शैथिल्यानें 'जरा नयनमनजळजळ निववा' ही मनांतील मुख्य भावना मध्यें घुसली. 'ना दिसतां रघुनाथपद उरजळजळ ना जाइ ॥' (२।१८२।–) पण जरा जाईल असें वाटलें तें पुढें आलें.

'मित्र ! मला तें स्थान दाखवा...' हा चौपाई श्रवण केल्यानंतर बिचारा गुह बुचकळ्यांतच पडला; आणि भरताच्या मुखाकडे साश्चर्य जिज्ञासामुद्रेनें त्यानें पाहिलें; तेव्हां मग पूर्वसंबंध जोडून वाक्य पूर्ण केलें ! आतां विचार करावा कीं हा क्रमभंग काव्यदोष आहे कीं शब्दलाघवांत अर्थगौरव भरणारी भावनिदर्शक सुंदर नाट्य-कला आहे ?

२. **क्षिति जल *पावक गगन समीर। पंचरचित* अति अधम शरीर** ॥ (४।११।४) क्षिति = पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश असा निसर्गक्रम असतां येथें 'पावक' च्या पुढें समीर न येतां 'गगन' (आकाश) आल्यानें क्रमभंगदोष दिसतो; पण हा दोष नसून *पंचरचित* शरिराची रचना कोणत्या क्रमानें होते हें येथील क्रमानें दाखविलें आहे. *गर्भोपनिषदांतील* आधारांसह गूढार्थचंद्रिका दाखविते कीं गर्भाशयांत शरिराची रचना '*क्षिति जल पावक गगन समीर।*' याच क्रमानें होते. (गूढार्थ-चंद्रिका पाहा)

३. '**अनुजा सांगत कथा अनेका। भक्ति विरति नृपनीति विवेका** ॥' (४।१३।७) येथें भक्ति, विरति (वैराग्य), राजनीति आणि विवेक (= ज्ञान) असा क्रम आहे. ३।१७।२ मध्यें अरण्यकांडांत प्राधान्य पाहा :—'गेले कांहीं दिवस या रीतीं। वदतां ज्ञान विरति गुण नीती ॥' यांत ज्ञानाला प्राधान्य आणि नीतीला अगदींच गौणत्व दिलें आहे. वरील प्रवर्षणगिरि–निवासवर्णनांत भक्तीला प्राधान्य व ज्ञानाला अगदींच गौणत्व देऊन नीतीला ज्ञानापेक्षां अधिक महत्त्व दिलें असें कां ?

असा क्रम बदलण्यांतच श्रीतुलसीकाव्यकलासौंदर्य भरलेलें आहे. अरण्यकांडांतील उल्लेख लक्ष्मणास भक्तियोग सांगितल्यानंतरचा, शूर्पणखाप्रसंगाच्या पूर्वीचा, म्हणजेच सीताहरणापूर्वीचा आहे. बायको जवळ असली म्हणजे ब्रह्मज्ञानाच्या गप्पा मारण्याची हौस कलियुगांत पुष्कळांना असते पण त्या वेळीं ते वैराग्याला ज्ञानापेक्षां गौणत्व व नीतीला तर अगदींच कमी मान देतात हें दाखविलें आहे.

किष्किंधाकांडांत पावसाळ्यामुळें प्रवर्षणगिरीवर राम राहिले आहेत, स्फटिकशिलेवर बसलेले आहेत व जानकीविरहित आहेत. सुग्रीवाला राज्य, कोष, पुर, नारी, मिळाल्यानें तो तोंडसुद्धां दाखवीत नाहीं; व जानकीचा शोध लागत नाहीं; यामुळें रघुनाथास भक्तीची = जानकीची सारखी आठवण होत आहे. वर्षाकालारंभीं रघुनाथानेंच म्हटलें आहे कीं,

घन घड्घड् गर्जति नभिं घोर। *प्रियाहीन मम मनिं भय थोर* ॥'

हें वचन आणि वरील ७ वी चौपाई यांत फक्त तीन ओळींचेंच अंतर आहे. '*प्रिय*

रघुवीरा *भक्तिच भारी* ।' (७।११६।४) 'सीतां *रामवल्लभाम्*'. प्रियाहीन, पर्वतावर निवास, मित्र विचारीत नाहीं, अशा दशेंत वैराग्य आहेच, म्हणून भक्तीनंतर *विरति* आहे. सुग्रीव अग्निसाक्षिक सख्य विसरला; कृतज्ञता विसरला, सीतेला पळवून नेणाऱ्याला शासन केलें पाहिजे हे विचार वारंवार पुढें येतात म्हणून वैराग्यानंतर राजनीति! जेव्हां या त्रयीची [जानकी (भक्ति), रावण व सुग्रीव] आठवण होणार नाहीं तेव्हां ज्ञानाची चर्चा चालत असे. वर्षावर्णन टीका २४ पृष्ठें व शरदवर्णन टीका सुमारें २४ पृष्ठें भरेल इतकी वाढण्याचें कारण या त्रयीविषयींचे रघुनाथाच्या वचनांतील गूढार्थ! (या टीकेची वाल्मीकि रामायण व मानसपीयूष यांच्याशीं तुलना करावी!) 'कामीजन दीनता दाखविति' असें म्हटलेंच आहे.

४. रावण-हनुमान संवादांत —

बळें जयाच्या विधि हरि ईश। पालति सृजति हरति दशशीस! ।। (सुंदर. २१।५)

(१) विधि हरि ईश = ब्रह्माविष्णुमहेश, असा क्रम असल्यानें यांच्या कार्यांचा क्रमही तदनुसारच पाहिजे; सृजति पालति हरति असा क्रम हवा असें वाटतें व क्रमभंग दोष आहे असें अति शहाण्यांस वाटतें! तसें केलें असतें तर *यथासंख्य* हा अलंकार साधला असता; पण अर्थ हा निघाला असता कीं एकेक जण एकेकच कार्य करूं शकतो. येथें *गूढार्थ आहे कीं प्रत्येकजण तिन्हीं कार्यें करूं शकतो*. हें विधान मानसांतील अवतरणांनींच गूढार्थचंद्रिकेंत स्पष्टपणें सिद्ध केलें आहे.

(२) 'पालति सृजति हरति' हे शब्द शेवटाकडून वाचावे म्हणजे काय मजा दिसते पाहा! संहार, सृजन व पालन असा क्रम दाखविला जातो. संहार झाल्याशिवाय सृजन नाहीं व सृजन झाल्याशिवाय पालन नाहीं! हरति, सृजति, पालति; पालति, हरति, सृजति; सृजति, पालति, हरति असें हें चक्र चालूं आहे.

५. दो. — सचिव वैद्य गुरु हे प्रिय लोभ-भयें वदतील।
राज्य धर्म तनु तीनि तरि सत्वर विनाशतील ।। (सुंदर. ३७)

सचिवाचा संबंध राज्याशीं, वैद्याचा रोग्याच्या देहाशीं व गुरूचा शिष्याच्या धर्माशीं संबंध असतो. तदनुसार राज्य, तनु, धर्म, असा क्रम पाहिजे होता असें अतिशहाण्यांस व साहित्यदोषसंशोधकांस वाटतें. तसा क्रम ठेवला असता तर किती अनर्थ झाला असता पाहा :— सचिवानें फक्त राज्याचाच विचार करावा; धर्माचा व राजाच्या देहाचा करूं नये; वैद्यानें फक्त देहाचाच विचार करावा, धर्म व राज्य यांचा विनाश झाला तरी पर्वा करूं नये व गुरूनें फक्त धर्माचाच विचार करावा; शिष्यदेहाचा व राज्याचा (विधर्मी, अधर्मी, निधर्मी इ.) करूं नये; असें यथासंख्य अलंकारानें ठरलें असतें! (क असा अनर्थ केला जाऊं नये, होऊं नये म्हणून, 'धर्म' दोहोंच्या मध्यें घातला आहे. दाखविलें कीं सचिवानें राज्य, धर्म व राजाचा देह यांच्या रक्षणाचा प्रयत्न करावा; वैद्यानें धर्माला अनुसरूनच देहरक्षण केलें पाहिजे व गुरूनें धर्म, शिष्यदेह व राजकीय

परिस्थिति यांचा विचार केला पाहिजे. कोणीहि धर्माचा त्याग करतां किंवा करवितां नये. आणखी एक उदाहरण घेऊन हें प्रकरण पुरें करूं.

६. धन्य देश जेथें सुरसरी । ती *स्त्री* धन्य पतिव्रत धरी
धन्य *भूप* जो नीती पाळी । धन्य *विप्र* निज धर्म न टाळी ।।
***तें धन धन्यचि* जया प्रथम गति । ...** (उत्तर. १२७।५ – ७)

(१) शोचनीय कोण हें सांगतांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व स्त्रिया असा क्रम पाळला आहे. चौ. ३ – विप्र, चौ. ४ – नृपति, चौ. ५ – वैश्य, चौ. ६ – शूद्र व चौ. ७ – नारी असा क्रम अयोध्या (१७२।३ – ७) कांडांत असतां वरलि वर्णनांत क्रमभंग कां

(२) हा क्रमभंग धर्मशास्त्र व राजनीतिशास्त्र-सिद्धांताचें निदर्शन करण्यासाठीं आहे. धन्य देश असला आणि स्त्रिया जर धन्य नसल्या तर कोणत्याच वर्णांत धन्यता येणार नाहीं; वर्णसंकार होईल. ‘ स्त्रिया स्वतंत्र × × बिघडती ’ (४।१५।७) स्त्रिया शुद्ध राहण्यास राजा स्वतः धार्मिक, राजनीति व धर्मनीतिपालक पाहिजे. ‘ राजा कालस्य कारणम् ’ (महा. भा.). म्हणून येथें या दोघांपुरता क्रमभंग केला. देश, स्त्रिया व राजा धन्य असल्यानें बाकीच्यांत धन्यता सहजच येईल. पुढें क्रम शास्त्रोक्त आहे.

क्रमभंगांत विविध हेतु आहेत हें या ६ उदाहरणांनीं कळेल. मानसांत क्रमभंग पुष्कळ ठिकाणीं आहे; पण सहेतुक आहे. गूढार्थचंद्रिकेंत प्रत्येक ठिकाणीं हेतूचें स्पष्टीकरण केलें आहे. (मानसपीयूष पाहा)

येथें हें पांचवें प्रकरण आणि *नाट्यकाव्य नमुने* हें सातवें मुख्य प्रकरण समाप्त झालें. ‘ अनुपम साहित्य कला नमुने ’ हें पुढलें मुख्य प्रकरण आहे.

गुरुवर-रघुवर-कृपा भांडवल । व्याजचंद्रिका लिहि मतिदुर्बल ! ।।

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१ 卐 卐 卐

अपूर्व उपक्रमोपसंहारादि

'अद्भुत अपूर्व मानस नमुने' या पांचव्या मुख्य प्रकरणांतील १२ प्रकरणांत बारा प्रकारचे अद्भुत काव्यकलाप्रतिभेचे नमुने दिले गेले आहेत. तशा प्रकारची अद्भुत अपूर्व काव्य-कला जगांत कुठें असेल याची कल्पनाहि साहित्यशास्त्राचार्यांस नसेल; पण महाकवींच्या सुंदर काव्यांत ज्या गोष्टी असतात त्यांतहि श्रीतुलसीदासांची मानसांतील साहित्यकला अपूर्व अनुपम आहे हें या मुख्य प्रकरणांतील १८ प्रकरणांत दाखवावयाचें आहे. मानस महाकाव्य आहे हें सिद्ध करून मानस नाट्यकलेचे कांहीं नमुने मागील प्रकरणांत दाखविले.

या पहिल्या प्रकरणांत मानसांतील उपक्रमोपसंहारादि अर्थनिर्णायक लक्षणांचा अपूर्व उपयोग दाखविला आहे.

१. बालकांड मंगलाचरणाच्या ७ श्लोकांची अपूर्वता पुढील प्रकरणांत दाखविली आहे.

२. बालकांड मं. सोरठा ५ पासून दो. २।२ पर्यंतच्या १३।१४ ओळींवरील गूढार्थचंद्रिका पाहावी. तसेंच 'व्हा प्रसन्न हें या वरदान।' (१।१४।७) पासून 'करा कृपा हरियश वदें विनवित वारंवार ॥' (१४ म) पर्यंतच्या ९ ओळींच्या काव्यांत उपक्रमोपसंहारादि सहासात व पक्ष, हेतु, दृष्टान्तादि यांसह अगदीं न्यायघटित रचना आहे. टीकेंत स्पष्टीकरण पाहावें.

३. तीन ओळींच्या अगदीं छोटया प्रकरणाचें उदाहरणच घेऊं म्हणजे शितावरून भाताची परीक्षा होईल.

उ०–१. बगळे काक *विषयि अति खळ* ते। जाति अभागि न सराजवळ ते ॥
का कुंभेक शैवाल-जंतुगण। विषय-कथारस नाना अन्न न ॥
येत यामुळें हृदयीं कचरले। कामी काक बिचारे *बगळे* ॥ (१।३८।३-५).

(१) अति-विषयी लोक या मानसाजवळ येत नाहींत हा *विषय* सांगितला. (२) येथें नाना विषय कथारस नाहीं ही *उपपत्ति* सांगितली. (३) श्रीरामचरित-*मानसा*-जवळ येण्यास कचरतात ही *अपूर्वता* सांगितली; (सर्वांचें कल्याण करणारें, श्रवण-सुखद असून कचरतात हें अपूर्व आहे). (४) ते खल बनले हें फल सांगितलें. (५) अतिविषयी म्हणजे *कामी* जात नाहींत हा *उपक्रम* केला. (६) *कामी* काक बिचारे बगळे हा *उपसंहार* केला. (७) अभागि आहेत हा हेतु सांगितला. (८) काक बकां-सारखे आहेत हा *दृष्टान्त* दिला. (९) कामतृप्ति-विषयभोग हें त्यांचें *साध्य* सांगितलें.

(१०) काकांसारखे दुष्ट व बगळ्यांसारखे दांभिक असतात हा *अर्थवाद* शेवटच्या चरणांतील ‘ काक बगळे ’ यांनीं सूचित केला. **तीन ओळींच्या काव्यांत या १० गोष्टी असून शिवाय प्रत्येक ओळींत रूपक अलंकार आहेच! हें साहित्यकलेंतील मोठें अपूर्व आश्चर्य नव्हे काय ?**

उ० २. पांचसहा ओळींच्या काव्यांत या सगळ्या गोष्टी आहेतः—

निघे सुभग कवितासरिता ती । रामविमलयश-जलभरिता ती ।।
शरयू नाम सुमंगलमूला । लोक-वेद-मतमंजुलकूला ।।
नदी पुनीत सुमानसनन्दिनि । कलिमल तृणतरु-मूलनिकन्दिनि ।।

(१।१३९।११-१४)

दो०– त्रिविधा श्रोतृसमाज पुर-ग्रामनगर युगकूलिं ।
संतसभा अनुपम अवध सकल सुमंगलमूळि ।।
जाउनि रामभक्ति सुरसरितें । सरयु सुकीर्ति मनोहर मिळते ।। (दो. ४०।१)

[१] (१) *उपक्रम*—सरिता निघे. (२) सुरसरितें जाउनि मिळते हा *उपसंहार*. (३) *अभ्यास*—*नदी* पुनीत. (४) *फल*—रामभक्ति मिळे. (५) अर्थवाद = महिमा–सुभग, मनोहर, पुनीत आणि लोकवेदमतमंजुलकूला. (६) *अपूर्वता*—रामविमलयश-जलभरिता. (७) *उपपत्ति*—कलिमलतृणतरूमूलनिकन्दिनि, सुमानसनन्दिनि.

[२] (१) *विषय*—कवितासरिता शरयू, (२) *अधिकारी*—लोकवेदमतमंजुल–कूलां-वर (तीरावर) राहणारे म्हणजेच लोकमर्यादा व वेदमर्यादा पालन करणारे (= विश्वास श्रद्धावंत). (३) श्रोतावक्तासंबंध, आश्रय-आश्रितसंबंध, श्रोतृसमाज व संतसभा या शब्दांनीं सुचविला. संतसभेचा आश्रय केला पाहिजे. (४) *प्रयोजन*—रामभक्तिप्राप्ति. याप्रमाणें *अनुबंधचतुष्टय आहे*.

[३] पावन कां यास *हेतु* सुमानसनन्दिनि व विमलजलभरिता. *दृष्टान्त* (रूपक) शरयू नदी.

[४] वस्तूचें वा व्यक्तीचें महत्त्वमापन करणाऱ्या चारी गोष्टी उत्तम आहेत. (१) *जन्म* (*कुल*) सुमानसनन्दिनि—उत्तम मानससरोवराची कन्या आहे. (२) *रूप*—सुभग, मनोहर आहे. (३) *शील-स्वभाव*—कलिमलतृणतरुमूलनिकन्दिनि व पावन आहे. (४) *संगति*—रामभक्ति सुरसरितें मिळते व रामविमलयशजलानें भरलेली आहे. (वस्तूचें वा व्यक्तीचें महत्त्व चार गोष्टींवर ’ हें प्र. प्र. १६।७ पाहा.)

सहा ओळींच्या काव्यांत इतक्या सर्व गोष्टी भरून ठेवल्या आहेत! यावरून इतर स्थळीं काय काय असेल याची कल्पना करतां आल्यास करावी! हें सर्व असून पुन्हां सांगरूपकालंकार सुंदर व निर्दोष आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।२ 卐 卐 卐

कौतुकास्पद अपूर्व काव्यरचना—नमुने

नमुना १ ला — बालकाण्ड-मंगलाचरणाची अपूर्वता (१) साती सोपानांत (कांडांत) मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकांत **आरंभीं मगण आहे.** मगण मंगलश्रीकारक आहे असें छंदःशास्त्र सांगतें.

(२) मंगलाचरणांतील सर्व संस्कृत श्लोक त्या त्या वृत्ताच्या नांवाच्या अर्थानुसार सहेतुक सापेक्षतेनें वापरले आहेत हें पूर्वी प्र. ५।१० या स्वतंत्र प्रकरणांत दाखविलें आहे.

(३) **बालकांड मं. श्लोक १ ला** — यांत वाच्यार्थानें वाणीविनायकांना वंदन आहे यांत वैशिष्ट्य नाहीं; पण लक्ष्यार्थानें वाणी = सीता व विनायक म्हणजे धनुर्धारी प्रभु राम हें मानसांतील आधारांनीं सिद्ध झालें आहे; विनयपत्रिकेंतील वचनांनीं त्यास पुष्टि आली व इतर संस्कृत ग्रंथांतील आधारांनीं गोंडसपणा आला आहे. **(क)** या श्लोकांत अमंगलहारी मुदमंगलकारी श्रीरामचरित्र हा ग्रंथाचा *विषय* सुचविला आहे. **(ख)** सीतारामांना भिन्नाभिन्नरूपानें वंदन आहे. **(ग)** शिवाय हा श्लोक बालकांडांतील श्रीरामचरित्राचा वस्तुनिर्देश करणारा म्हणजेच *बालकांडाचा प्रतिनिधि आहे.*

४. **श्लोक २ रा** — यांत विश्वासाश्रित श्रद्धावान हा *अधिकारी* आणि स्वान्तस्थ ईश्वराचा साक्षात्कार हें *प्रयोजन* सुचविलें आहे. (क) हा श्लोक *अयोध्याकाण्डाचा प्रतिनिधि आहे. सात्त्विक विश्वासश्रद्धायुक्त धर्माचरणानें वैराग्यप्राप्ति हा अयोध्याकाण्डाचा प्राधान्य विशेष विषय आहे.*

५. श्लोक ३ रा — यांत आश्रय–आश्रित (गुरु-शिष्य) *संबंध* सुचविला आहे. (क) हा तिसरा श्लोक तिसऱ्या म्हणजे *अरण्यकाण्डाचा प्रतिनिधि* आहे. *वैराग्य-प्राप्तीनंतर सद्गुरुकृपेनें माया–निवृत्ति आणि ज्ञानप्राप्ति हें अरण्यकाण्डाचें ध्येय* या श्लोकानें सुचविलें आहे.

६. श्लोक ४ था — यांत कवीश्वर वाल्मीकि आणि कपीश्वर हनुमान यांना त्यांच्या उलट्या (प्रतिलोम = मरा) व सुलट्या ' राम ' नामरतिमुळें व रामचरित्र-कथारतिमुळें वंदन आहे. (क) हा चौथा श्लोक चौथ्या म्हणजे *किष्किंधाकांडाचा प्रतिनिधि आहे*. ज्ञानप्राप्तीनंतर रामनामरति व रामकथारतिप्राप्ति हें किष्किंधाकाण्डाचें ध्येय आहे.

७. श्लोक ५ वा — यांत सीतेला भिन्न रूपानें वंदन असून सीता म्हणजे मूल प्रकृति हें सुचविलें आहे. ती रामाहून भिन्न असून अभिन्न आहे हें ' रामवल्लभा ' शब्दानें सुचविलें आहे. (क) हा पांचवा श्लोक पांचव्या म्हणजे सुन्दरकाण्डाचा प्रतिनिधि आहे. विरागी, ज्ञानसंपन्न व रामनाम-कथा-रत झालेल्यानें रामप्रेमभक्ति-प्राप्तीचा प्रयत्न

करणें हा या काण्डाचा मुख्य विषय आहे.

८. **श्लोक ६ वा** — मायाधिष्ठान ब्रह्म = राम आहे, जगदधिष्ठान ब्रह्म = राम आहे व जग मिथ्या आहे, हें सुचवून निर्गुण निराकार ब्रह्म = राम; सगुण निराकार ब्रह्म = ईश्वर = राम; आणि सगुण साकार ब्रह्म = राम = रघुपति यांना वंदन आहे. (**क**) हा सहावा श्लोक सहाव्या म्हणजे लंकाकांडाचा प्रतिनिधि आहे. रामप्रेमभक्तिप्राप्तीनें मोह कुंभकर्ण, काम इंद्रजित व अहंकार रावण इत्यादि राक्षसांचा उच्छेद करणें हा या काण्डाचा मुख्य विषय या श्लोकांत सुचविला आहे.

९. **श्लोक ७ वा** — स्वान्तस्थ ईश्वराचा साक्षात्कार या *प्रयोजनाचें फल* स्वान्तः सुखप्राप्ति (परमविश्राम) हें यांत स्पष्ट सांगितलें आहे. (**क**) यांत रघुनाथगाथा-भाषानिबंधाची पहिली प्रतिज्ञा केली आहे व या निबंधाला नानापुराणनिगमागमादि व शिवरचित मानसरामायण आधार आहे हें सुचविलें आहे. (**ख**) हा श्लोक सातव्या म्हणजे उत्तरकाण्डाचा प्रतिनिधि आहे. प्रेमभक्तिप्राप्तीनें काम-मोह-अहंकारादिकांचा नाश केल्याचें सुफल म्हणजे सीतेसहित रामचंद्रांनीं हृदयसिंहासनावर आरूढ होणें व त्यायोगें सदा पूर्ण, निर्भय व सुखसंदोह मोहमायापर होणें हें आहे.

याप्रमाणें या सात श्लोकांची अपूर्वता अगदीं संक्षेपानें दाखविली गेली. या सात श्लोकांची टीका छापील सुमारें २५ पृष्ठें भरेल इतकी लिहावी लागली. अशा प्रकारची विविध वैचित्र्यपूर्ण मंगलाचरणरचना इतर कुठें आढळल्यास दाखवावी. वरील शोध १९४८ मध्यें लागला.

नमुना २ रा – मंगलाचरणाचे पांच सोरठे — हिंदी मंगलाचरणांतील पांच सोरठे हाहि एक अद्भुत नमुना आहे, हें गूढार्थचंद्रिका सेवन करतांना सहज कळेल. यांवरील टीका छापील १५ पृष्ठें भरेल !

(१) **सोरठा पहिला** — विघ्नहर्ता म्हणून गजाननाला प्रगट वंदन असून राम = ब्रह्म एका कल्पांतील अवतारी म्हणून त्यांना गूढार्थानें वंदन आहे. नाम, रूप, ऐश्वर्य व धाम सूचित आहेत.

(२) **सोरठा दुसरा** — यांत वैकुण्ठाधिपति विष्णूला वंदन आहे; याचें कारण विष्णु एका कल्पांतले अवतारी आहेत. (तुलसीसंवाद).

(३) **सोरठा तिसरा** — हा क्षीरसागर निवासी श्रीनारायणपर आहे. भुशुंडी व याज्ञवल्क्यकथित रामकथेंतील ते अवतारी आहेत, म्हणून त्यांस प्रार्थना आहे.

(४) **सोरठा चौथा** — उघडपणें श्रीशंकरांस प्रार्थना आहे; पण यांत सद्गुरु-लक्षणें सुचविलीं आहेत. शंकर रामचरितमानसाचे मूळ कर्ते म्हणून त्यांस प्रार्थना आहे.

(५) **सोरठा पांचवा** — यांत गोस्वामीजींनीं आपल्या स्वतःच्या सद्गुरूला, नर-रूपानें असणाऱ्या हराला नरहरि नांवाच्या गुरूंना वंदन केलें आहे व गुरुमुखानें रामचरितमानसकथा श्रवण केल्यानें गुरुकृपेनें महामोहतमपुंज नष्ट होतो हें

सांगितलें आहे.

या सर्व गोष्टी गूढार्थचंद्रिकेनें मानसाधारेंच सिद्ध करून दाखविल्या आहेत. हिंदी टीकांत या सोरठ्यांच्या अर्थाविषयीं मतामतांचा निराधार गलबला आहे, व पंचायतन देवतांना यांत वंदन आहे हें दाखविण्यासाठीं पुष्कळ द्राविडी प्राणायाम केलेला आहे; पण तो हटवादीपणा आहे.

नमुना ३ रा — सद्गुरुवंदन व महिमा (म. सा. ५ पासून २।२ पर्यंत) या १४ ओळींत सद्गुरु उपासनेचें – सेवेचें वर्णन फारच रमणीय काव्यांत केलें असून, त्यांत सद्गुरुमाहिमा सुचविला आहे. यांत अनुबंधचतुष्टय, उपक्रमोपसंहारादि सर्व चिन्हें, इत्यादि सर्व शास्त्रीय पद्धतीचा उपयोग केलेला आहे. या प्रकरणांत श्रीतुलसींच्या चरित्राचें प्रतिबिंब आहे !

नमुना ४ था — बालकांड दोहा ३२ च्या १४ चौपाया व दोहा. या रामगुणवर्णन-प्रकरणाची रचना तर मोठमोठ्या पंडितांच्या मतीस गुंग करणारी परम अद्भुत व अपूर्व आहे. चार विषयांचें वर्णन एकाच वर्णनांत साधलें आहे; पण क्रमभंग एकाहि विषयांत नाहीं ! बहुतेक सर्व (गुजराथी, हिंदी) टीकाकारांनीं या प्रकरणाच्या टीकेंत गडबडगुंडा उडविला आहे. चार विषयांचें निदर्शन वा स्पष्टीकरण कोणींच केलें नाहीं; पण विस्तार मात्र भरपूर आहे ! *मानसप्रसंग* पुस्तकांत दोन विषय दाखविले आहेत. पण नक्षत्रमंडलफलश्रुतींत धरसोड केली आहे वगैरे पूर्वीं या प्रस्तावनेंतच (प्र. ५।११) दाखविलें आहे. याच्या एवढ्या अडचणी सर्व टीकालेखनांत कुठेंच आल्या नाहींत; पण श्रीराम-गुरुकृपेनें अंतस्थ प्रेरणेनेंच सव कोडीं उलगडलीं.

नमुना ५ वा—नामवंदन प्रकरण (१९।१–२८।१) – मानसांतील हें प्रकरणसुद्धां अद्भुत काव्यकलेचा नमुना आहे. पहिल्या १० ओळींत सुचविलेले सिद्धान्त त्यापुढील २।३ दोह्यांत स्पष्ट केले आहेत. मंत्रशास्त्रदृष्टीनें केलेलें असें नामनिरूपण कोणत्याही मराठी काव्यांत नाहीं हें सप्रमाण सिद्ध करतां येईल. रूप नामाधीन असतें आणि रामनाम, निर्गुण ब्रह्म व श्रीरघुनाथ राम यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे हें सांगून सप्रमाण तुलनेनें सिद्ध केलें आहे. *रामनाम राकेश आहे* हें (३।४२) अरण्यकाण्डांत सांगितलें असून '*रामचरित राकेश-कर*' आहेत हें बालकांड दो. ३२ मध्यें सांगितलें आहे.

(क) दो. २० मध्यें रामायणकथा गूढार्थानें सुचविली आहे. रा आणि म हे वर्ण राम व लक्ष्मणांसारखे, इत्यादि परस्परसंबंध व यांचा प्रभाव वर्णिला आहे. 'मरा' (उलटामंत्र) आणि 'राम' यांचा प्रभाव सारखाच हें फारच मार्मिक मनोहर रीत्या सुचविलें. **(ख)** राम आणि नाम त्यांच्या तुलनेंत भरतचरित्राखेरीज बाकीचें सर्व रामचारित्रकथासूत्र सुंदर काव्यमुक्तामण्यांत ओंवलें आहे, पण वाचतांना असें वाटत नाहीं कीं आपण रामचरित्रसार वाचीत आहा. **(ग)** नाम *मुखानें जपल्यानें* आर्त जिज्ञासु व अर्थार्थी आपल्या कामना पूर्ण करूं शकतील; मुमुक्षूला मोक्ष मिळेल, व

ज्ञानी, मोक्षत्यागी, प्रेमभक्तिसंपन्न रामप्राणप्रिय होतील हें दाखविलें आहे. नाममहिमा रामसुद्धां वर्णूं शकत नाहींत.

या प्रकरणावर साधार विवेचन करण्यास, कमींत कमी लिहूनसुद्धां, छापील ९० पृष्ठें होतील इतकी टीका लिहावी लागली.

नमुना ६ वा–मानस (व शरयू) रूपक (३४–४३ रा)– (१) मानसरूपक हें एक प्रदीर्घ सांग परंपरित (५० ओळींचें) रूपक आहे. यांत ८५ गोष्टींचें साम्यादि वर्णिलें असून संपूर्ण श्रीरामचरितमानसकथेचें सार या मानसशरयूरूपकाच्या ९६ ओळींत भरून ठेवलें आहे. कोठेंहि अतिव्याप्ति, अव्याप्ति, असंबद्धता, क्रमभंग, दूरान्वय, ग्रंथसिद्धान्त वा ग्रंथवचनविरोध, किंवा कोणताहि काव्यदोष नाहीं. दो. ३५ मध्यें उपक्रम करून ३९।१० मध्यें मानसरूपकाचा उपसंहार केला आहे. यालाच जोडून मानसांतून उगम पावणाऱ्या रामसुकीर्तिकविताशरयूचें रूपक आहे.

(२) मानसरूपकांत सर्व साहित्यशास्त्र, धर्मशास्त्र, वैराग्य, योग, ज्ञान भक्ति यांचें सांगोपांग सारसर्वस्व रमणीय व निर्दोष अशा अनेक रूपकांनीं भरून ठेवलें आहे. ५० ओळींच्या मानसरूपकाचें अगदीं अत्यावश्यक तेवढेंच स्पष्टीकरण करण्यास छापील ८५ पृष्ठें भरतील एवढी व शरयूरूपकाचीं ७० पृष्ठें भरतील एवढी टीका लिहावी लागली ! या मानसशरयूरूपकाला हिंदुस्थानांत मानसप्रसंग किंवा मानसमुखबंध म्हणतात. या मानसप्रसंगावर पं. त्रिपाठींची टीका *‘ मानसप्रसंग ’* या क्राऊन आकाराच्या सुमारें ५०० पृष्ठांचा ग्रंथ आहे. गूढार्थचंद्रिकेच्या त्या भागावरील टीकेच्या दुप्पट आहे !

(३) मानसरूपकाच्या गूढार्थचंद्रिकेंत मानससरोवराची लांबी, रुंदी व आकार दर्शविणारा नकाशा दिला आहे. (क) एक वर्षभर मानससरोवराच्या तीरीं विहार करणाऱ्या परमहंस स्वामी प्रणवानंदांच्या इंग्रजी पुस्तकाच्या आधारें व धावती भेट देणाऱ्या इतरांनीं दिलेल्या माहितीच्या आधारें लिहिलें आहे. (ख) मीनांसह १९ प्रकारच्या जलचरांची तुलना आणि नवरस-जप-तप-योगविरागादिकांशीं श्रीरामचंद्रांच्या मानसांतील नांवांची तुलना गूढार्थचंद्रिकेंत दिसते. इतर टीकाकार, *‘ मानसप्रसंग ’* ग्रंथ लेखकांसुद्धां मौन !

(ग) **शरयूरूपक** (३९।१०–४३ रा) (१) शरयू–सरयू नदी हा जसा मानस सरोवरांतील जलाचा स्वाभाविक ओघ आहे, तशीच कवितासरयू तुलसी मानसांतून सहज निघाली आहे; म्हणून हें स्वतंत्र रूपक न मानतां मानस रूपकाचेंच प्रधान अंग मानणें चांगलें. ४६ ओळींचें हें मोठें रूपक शरयूनदीशीं पूर्ण साम्य व कांहीं बाबतींत श्रेष्ठता दाखवून केलेलें आहे. मानसरूपांतही कांहीं बाबतींत मानससरापेक्षां श्रेष्ठता दिसतेच. मानसशरयूरूपक ९६ ओळींचें आहे ! एवढें मोठें विस्तीर्ण, पूर्ण निर्दोष, परम मनोहर, प्रसादमाधुर्यपूर्ण अनेक शास्त्रांचें अवगाहन करणारें रूपक कोणीं कोठें पाहिलें आहे काय ? यांतील कांहीं अंशांवर ११ ग्रंथ लिहितां येईल.

श्रीगोस्वामींचें इतर कोणतेंहि काव्य शिल्लक न राहतां हें ९६ ओळींचें रूपकच राहिलें असतें तरी त्यांची दिगंत कीर्ति झाली असती !

नमुना ७ वा—पाहिले ४३ दोहे — मानसांतील मंगलाचरणापासून दो. ४३ अखेर-पर्यंतचा भाग म्हणजे सर्व मानसाचें सारामृत आहे. हा भाग बऱ्याच अंशानें तात्त्विक असला तरी रसाळ व मनोहर आहे; सुभाषितांचें भांडार आहे. या भागांत श्रीरामायणकथा चार वेळां प्रगट रूपानें व दोन वेळां गुप्त रूपानें गोवून ठेवलेली आहे. (क) प्रारंभींचा *प्रस्तावनात्मक भाग* जसा अत्यंत महत्त्वाचा, तसाच उत्तर कांडांतील काकभुशुंडीसंवाद व उपसंहार हे भाग अत्यंत महत्त्वाचे आहेत. उत्तर हिंदुस्थानांतील मोठमोठे आंग्ल-विद्याविभूषित मानसपंडित म्हणतात कीं या आदिअंतांच्या विभागांत आमची अक्कल तळाशीं जाऊं शकत नाहीं; पण सांप्रदायाभिमानी संस्कृतज्ञ पंडित असें म्हणण्यास तयार नाहींत !

अयोध्याकांड — या काण्डाची रचना श्रीतुलसीदासांनी आपलें शक्तिसर्वस्व एकवटून अत्यंत कौशल्यानें अशी अवर्णनीय केली आहे कीं यांतील उत्तरार्ध, म्हणजे भरतचरित्र काढून टाकल्यास रात्रंदिवस सर्व प्रकारचें सुख समाधान देणारें ऐश्वर्य असून व त्याचा दुःखरहित उपभोग घेणाऱ्यास, रात्रीं किंवा दिवसां मुळींच निद्रा न येणाऱ्या माणसाच्या समाधानासारखेंच ठरेल. तो भाग काढल्यास मानसाची लोकप्रियता, प्रेम-भक्ति, चरित्रचित्रण, इत्यादि विविध प्रकारच्या सौंदर्यांतील $\frac{3}{4}$ भाग काढून टाकल्या-सारखें ठरेल. या काण्डाची रचना अगदीं सूत्रबद्ध, परम कोमल व पाषाणहृदयांनासुद्धां पाझर फोडील अशी विशिष्ट प्रकारची आहे; या भागाच्या श्रवणपठनांत जें हृदय द्रवणार नाहीं तें केवळ वज्रापेक्षांसुद्धां कठिण व कठोर ठरेल; वज्रालासुद्धां द्रव फुटल्याचा उल्लेख भरतचरित्रांत आहे.

(१) प्रत्येक दोह्याच्या अंगभूत चौपाया (ओळी) आठ (८) हा नियम आहे. याला ६।७ अपवाद आहेत; पण ते सहेतुक आहेत. (क) प्रत्येक २५ व्या दोह्यांत छंद आहे व दोह्याच्या जागीं कोमलवृत्त सोरठा आहे. याला एकच अपवाद म्हणजे १२५ व्यांत छंद व सोरठा न येतां १२६ व्यांत आला आहे, हा अपवाद अनपेक्षित पण सहेतुक आहे. (गूढार्थचंद्रिका पाहा.). (ख) प्रत्येक छंदांत किंवा सोरठ्यांत श्रीतुलसीच्या नांवाचा उल्लेख आहे; पण वाल्मीकींच्या मुखांतील म्हणजे १२६ व्या छंदांत किंवा सोरठ्यांत 'तुलसी' नाहींत. 'श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया' हें त्याचें कारण ध्वनित केलें आहे.

(२) अयोध्याकाण्ड आधींच करुणरसप्रधान आणि त्यांतहि मानसांतील भरत-चरित्र इतर रामायणांपेक्षां अधिक करुणामय आहे; आणि भरताची आत्मग्लानि, विषाद व मूर्तिमंत रामस्नेह यांनीं तें सतत पाझरत असल्यानें; व पूर्ण निर्दोष, परमो-त्कृष्ट, शासनीतियुक्त व सर्वांगीण काव्यसौंदर्यसंपन्न असल्यानें दो. २०८ पासून

पुढील भाग तर अत्यंत कोमल व परमप्रसादमाधुर्ययुक्त भाषेनें नटविलेला आहे. (क) धर्म, प्रेम, परस्पर, सीय, लछिमन, राम अशा किंचित् कठोर वाटणाऱ्या शब्दांना, भरताची दीनता, कोमलता, नम्रता, रामस्नेह इत्यादि पाहून जणूं लाज वाटली आणि त्यांनीं धरम, पेम, परसपर, सिय, लखनु, रामु अशीं अधिक कोमल रूपें घेतलीं. (ख) पण अरण्यांतील नैसर्गिक कठोरता, पंचवटींतील भेसुर सूपनखा (शूर्पणखा), खरदूषणादि राक्षस व युद्ध इत्यादि पाहून त्या शब्दांना वाटलें कीं येथें आपलें नवें कोमल रूप मुळींच उपयोगी पडणार नाहीं; तेव्हां त्यांनीं आपलें पूर्व स्वरूप धारण केलें. कांहींनीं तर पूर्वींपेक्षांहि कठोर रूप धारण केलें. सिय, सीय जाऊन एकदम 'सीता' आला; व हिंदी मानसांत कुठेंहि दुसरीकडे नसलेला 'लक्ष्मण' अरण्य-काण्डाच्या मंगलाचरणांतच आला !

(३) अयोध्याकांडांतील हें मार्दव मुद्दाम मृदुल मनोहर हिंदी शब्द वापरून निर्माण करण्यास ही मंद, जड, कठोर, बुद्धि जरा कचरली ! अनुवादांत सर्वत्रच सीता, सिता व लक्ष्मण हे कठोर शब्द वापरावे लागले, फारच क्वचित 'सिय' वापरला आहे. कुठें सिय, लखनु, रामु यांचें कोमलत्व आणि कोठें सीता, लक्ष्मण व राम शब्दांतील सहज कठोरता ! 'राम' जरी कठोर नसला तरी 'रामु' पेक्षां कठिण आहेच. हे शब्द वापरण्याची सुभा असती तर अनुवादांतील बरीच अडचण कमी होऊन प्रसादहि वाढला असता व माधुर्य सहजच जास्त आलें असतें. तुलनात्मक अभ्यासासाठीं सात कांडांतील कांहीं शब्दांच्या संख्येची तुलना कोष्टकरूपानें पुढें केली आहे. बालकांडांतसुद्धां वरील अतिकोमल शब्द आहेत पण कमी प्रमाणांत आहेत. अयोध्या पूर्वार्ध व उत्तरार्ध यांत या बाबतींत भेद असावा असें वाटतें; पण निश्चयानें सांगण्यास अवलोकन करण्यास वेळच मिळाला नाहीं !

२. श्रीराम-वाल्मीकि-संवाद (दो. २२४–२३२) — श्रीराम वाल्मीकि संवाद हें सर्वच प्रकरण अलौकिक आहे; पण त्यांत श्रीरामसीतालक्ष्मणनिवासासाठीं जीं १४ स्थानें सांगितलीं आहेत तीं १४ भुवनांसारखीं आहेत व त्यांत अद्भुत अलौकिकता विशेष आहे.

(१) जीं १४ स्थानें सांगितलीं ते भक्तांचे १४ प्रकार आहेत. प्रत्येक काण्डांत पूर्वार्धांत एक प्रकार व उत्तरार्धांत एक प्रकार असे २।२ प्रकार अगदीं क्रमानें आहेत. त्या त्या प्रकाराची वाल्मीकींनीं सांगितलेलीं लक्षणें क्रमशः प्रत्येक काण्डांतील २।२ उदाहरणांत उत्तम प्रकारें सांपडतात. गूढार्थचंद्रिका ही तुलना स्पष्टपणें दाखविते. '*मानसप्रसंगांत*' ही त्रिपाठीजींनीं साधारण तुलना केली आहे.

(क) अध्यात्म रामायणांत अशीं स्थानें सांगितलीं असलीं तरी तीं थोडीं आहेत व येथल्यासारखें त्यांचें अस्तित्व सात कांडांत सांपडत नाहीं. येथील रचनाकौशल्य व अलौकिकता त्यांत मुळींच नाहीं. एका ठिकाणीं थोडीं लक्षणें देणें सोपें आहे. पण तीं

३. हिंदी मानसांतील कांहीं शब्दांच्या उपयोगाची तुलना.

शब्द	बाल	अयोध्या		अरण्य	किष्किंधा	सुंदर	लंका	उत्तर	एकूण
		दो. २०७ पर्यंत	दो. २०७ नंतर						
धरम	३३	६८		१	१	१	२	५	१११
धर्म	८	—	१ दो. २४८	१८	३	२	११	३८	८१
पेम*	—	—	३६	—	—	—	—	—	३६
प्रेम	८२	४४	२९	१५	—	९	९	३५	२२३
परसपर	११	११		१	१	—	१	१	२६
परस्पर	६		१ दो. २६४	—	—	—	—	१	८
सिय†	५१	१४७		—	—	—	—	—	१९८
सीय†	४७	३१	२८	—	—	—	—	—	१०६
सीया†	३	१	—	—	—	—	—	—	४
सीता	२३	११	८	३१	१३	२६	१९	११	१४२
राम	२९१	२५४	१६२	७५	३७	६५	१३४	२१५	१२३३
रामु	४८	८३	३७	४	५	३	१३	६	१९९
लखन†	२२	९२		—	—	—	—	—	११४
लखनु†	२०	—	४१	—	—	—	—	—	६१
लछिमन	८	१	२	१९	१३	७	३०	८	८८
लक्ष्मण	—	—	—	१ मं. श्लो. १	—	—	—	—	१
दोहे	३६१	२०७	११९	४६	३०	६०	१२१	१३०	१०७४

* पेम शब्द फक्त अयोध्याकांडांत आणि दो. २०७ नंतरच वापरला आहे.

† सिय, सीय, सीया, लखन, लखनु अयोध्याकाण्डानंतर मुळींच नाहींत. तुलना करतांना कांडांतील दोह्यांची संख्या ध्यानीं घ्यावी.

क्रमशः मागील व पुढील भागांतील भक्तांच्या चरित्रांत तंतोतंत भरून ठेवणें हें मानवी बुद्धीच्या कक्षेच्या बाहेरचें आहे, म्हणूनच हें केवळ दैवी व अलौकिक आहे.

बाल व अयोध्याकाण्डांतील श्रीरामचरित्र केवळ माधुर्यभावाचें आहे, ऐश्वर्य प्रगट नाहीं.

अरण्यकांड – (१) 'उमे। रामगुण गूढ' असें गढ ऐश्वर्यलीलाचरित या काण्डापासून प्रकटपणें मधून मधून होऊं लागलें व त्यामुळें भाषेंतील कोमलता थोडी कमी होऊन ओज वाढलेलें दिसतें.

(२) हें काण्ड सप्तमोक्षपुरीपैकीं तिसरी, मायापुरी असल्यानें '*मायारूपि नारि*' हा सिद्धांत यांत सांगितला आहे व जिकडेतिकडे, मंगलाचरणश्लोकांपासूनच मायाच माया दिसते. १६ प्रकारचीं मायेचीं रूपें यांत आहेत ! (क) गुरुमुखानें उपदेशश्रवण केल्यानें मायानिरास होऊं शकतो म्हणून या कांडांत ४६ दोह्यांत १६ वेळां उपदेश आहे; व त्या प्रत्येकांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें मायारूपी नारीचाच संबंध आहे. सीतेचा संबंधच जास्त ठिकाणीं आहे.

(३) *विशेष आश्चर्यकारक नमुना म्हणजे मंगलाचरणाचा पहिला श्लोक*—यांत उघडउघड वंदन शंकरांस आहे; पण त्यांत सद्गुरुलक्षणें आणि शिष्याच्या साधनाचा, विश्वासापासून सर्व क्रम यांचें वर्णन आहे. अत्रिस्तुति, श्रीरामगीता, वसंतरूपक व नारीषड्ऋतुरूपक हे अलौकिक काव्यरचनेचे नमुने आहेत. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

किष्किंधाकाण्ड — (१) हें कांड काशीपुरी आहे. विनयपत्रिकेत (पद २२) 'काशीस्तुति' आहे. त्या पदांत 'कामधनु कलिकासा' हें सांग प्रदीर्घ रूपक आहे. त्यांत ३० गोष्टींचें साम्य स्पष्ट दाखविलें आहे. त्याच तीस गोष्टींचें पूर्ण साम्य किष्किंधाकांडांत अगदीं तंतोतंत जुळतें. काशीचें तीस गोष्टींचें साम्यसूचक तीस दोहेच या कांडांत आहेत. काशीकामधेनु आणि किष्किंधाकाशी यांची सविस्तर तुलना गूढार्थचंद्रिका काण्डसमाप्तीनंतर त्या पदाच्या अनुवादासह केली आहे. '*कामधेनु किष्किंधा काशी*' हा लेख *मानसमणींत* पाहावा.

(२) या कांडांतील *मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकांत* लक्ष्मण व राम यांना प्रगट वंदन असून त्यानें रामलक्ष्मणांची पूर्ण समता उघड सांगितली आहे हें खरें पण हें वाच्यार्थानें आहे. (क) *गूढार्थानें* 'मरा' या उलट्या नामाचा प्रभाव वर्णन करून त्यांतील म आणि रा या दोन अक्षरांना वंदन केलें आहे. हे सर्व शोध महाराष्ट्राच्याच भाग्यांत लिहिले होते असें वाटतें ! टीकेंत मानसाधारें वरील सर्व गूढार्थ सिद्ध केले आहेत. (ख) *या कांडांतील कथाक्रम या पहिल्या श्लोकांतील विशेषणांच्या क्रमानेंच आहे हेंहि परम आश्चर्य नव्हे काय ?*

(३) '*ब्रह्माम्भोधिसमुद्भवं*' या श्लोकांतील *सात विशेषणांची प्रगति सात काण्डांत क्रमानें मिळते* हेंहि अद्भूत अपूर्व आहे. (क) 'ब्रह्माम्भोधिसमुद्भवम्' हा

समास 'ब्रह्माम्भोधेः समुद्भवः यस्मात्' असा पंचमी बहुव्रीहि घेणें जरूर आहे. मोठ-मोठे संस्कृत पंडित येथें फसले आहेत ! कारण मानसांतील २।३ सिद्धान्तभूत वचनें येथें त्यांच्या दृष्टिपथांत आलीं नाहींत आणि मानसवचनविरोधी व मानससिद्धान्त-विरोधी अर्थ लावला गेला. गूढार्थचंद्रिका किंवा *'ब्रह्माम्भोधिसमुद्भवम्' हा लेख मानसमणींत पाहावा.*

४. वर्षा-शरद्वर्णन — या कांडांतील वर्षा व शरद्-वर्णन म्हणजे अद्भुत गूढ काव्यकलेचा एक अप्रतिम सुंदर नमुना आहे; तथापि कोणाहि हिंदी-गुजराथी टीका-कारानें गूढार्थ स्पष्ट केले नाहींत. पण याहून मोठें आश्चर्य म्हणजे हिंदी टीकाकार म्हणतात कीं वर्षा-ऋतु-वर्णनांतील सर्व दृश्यें रघुनाथानें लक्ष्मणास एकाच (पहिल्या) दिवशीं दाखविलीं ! ! वर्षाकालमेघ आकाशांत जमणें आणि सर्व भूभाग हिरव्या गार गवतानें आच्छादला जाऊन पायवाटासुद्धां दिसत नाहींशा होणें व शेतकऱ्यांनीं शेती खुरपणें (बेणणें) या सर्व गोष्टी पहिल्याच दिवशीं कशा शक्य होतील हा विचारसुद्धां कोणीं कसा केला नाहीं ? *अशी असंबद्धता कोणाहि मराठी लेखकाच्या लेखणींतून बाहेर पडणें शक्य नाहीं;* आणि बृहत्कोषवजा टीकेंत छापली जाणें त्याहून अशक्य !!

२. वर्षाशरद्वर्णनांत दिवसांची गणना १।१ चरणानें सुचविली आहे. तशी गणना केल्यानें 'मंडूकांचें ओरडणें, बटूंच्या वेदपठनासारखें आहे' हें श्रावण शुक्ल चतुर्दशीला उपाकर्माचें वर्णन बरोबर जमतें. प्रौष्ठपदी, दसऱ्याचें सीमोल्लंघन इत्यादि सर्व गोष्टी एक चरण = एक दिवस या गणनेनें अगदीं पूर्णपणें जमतात. गूढार्थचंद्रिका हें सर्व उघड करून दाखवते.

सुंदरकाण्ड — (१) सुन्दरकांड हें नांव मानसांतील सुन्दरकाण्डासच अक्षरशः यथार्थ आहे. या काण्डाची रचना अशाच हेतूनें केलेली दिसते कीं यांत अ-सुन्दरता कुठेंच शिरूं नये. याविषयीं प्र. प्र. ६।११ यांत पूर्वीं लिहिलें आहे. गूढार्थचंद्रिका काण्डा-रंभींच पाहा व 'मानसका सुन्दर कांड' हा लेख मानसमणींत पाहावा.

(२) हें काण्ड कांचीपुरी आहे. शिवकांची व विष्णुकांची असे कांचीचे दोन भाग आहेत. येथें शिवकांचीनिदर्शक पहिले तीस दोहे शिवावतार हनुमंताच्या चरित्राचे आहेत. शिवपुरी-काशी = किष्किंधेचे दोहे ३० म्हणून शिवकांचीचे ३० आणि शिव-विष्णु अभेद दर्शविण्यासाठीं पुढील रामचरित्ररूपी विष्णुकांचीचेहि दोहे ३० च; म्हणून या कांडांत दोहे ६०.

(३) 'अतुलितबलधामं'—या पवनतनयवंदनाच्या श्लोकांतील विशेषणांचा जो अनुक्रम आहे त्या अनुक्रमानेंच हनुमंताचें सुंदरकांडांतील अति सुन्दर चरित्र आहे ! सातवें विशेषण 'रघुपतिप्रियभक्तं' रामचरित्र सुरूं झाल्यावर ३२।५-८ मध्यें प्रतीतीस येतें. ही अशी काव्यरचना अद्भुत, अपूर्व व परम कौतुकास्पद नाहीं काय ?

(४) रावण-हनुमानसंवाद हा सुद्धां एक कौतुकास्पद नमुना आहे.

लंकाकाण्ड. — (१) रावण-अंगद-संवाद हा लक्ष्मणभार्गवसंवादासारखाच वक्तृत्व-कलेचा व दोन महावीरांच्या वाग्युद्धाचा अप्रतिम नमुना आहे. (**क**) युद्धवर्णनांत-सुद्धां नीतिपर सुभाषितें भरलीं असून भक्तिसूत्र तुटलेलें नाहीं. (**ख**) रणनदी, वीर-वसंतसेना, वर्षाकाल इत्यादि सांग रूपकें अगदीं चटका लावणारीं आहेत. (**ग**) मराठी भाषा भाषिकांसारखीच ओजस्वी असली तरी युद्धवर्णनांतील मानसांतील ओजाची बरोबरी ती स्वभावतः करूं शकली नाहीं ! (**घ**) अर्जुनाला *रणभूमींत* गीता सांगितली. मानसांत रणधुमाळी जोरांत चालूं असतां भगवंतांनीं बिभीषणाला उपदेश केला आहे, तो *धर्ममयरथ* नांवानें ओळखला जातो; पण प्रस्तावनेंतील ' एकादश गीता ' (प्र. प्र. १०।५) प्रकरणांत त्याला धर्मगीता हें नांव दिलें आहे. युद्धांतील रथाच्या रूपकानें हें वर्णन आहे. धर्म-वैराग्य-योग-ज्ञान-भक्तिसार यांत भरलें आहे. (**ङ**) युद्धाचें कंटाळवाणें वर्णन कुठेंच नाहीं !

उत्तरकाण्ड — हें काण्ड तर

सर्व सुखाचें आगर । ज्ञानभक्तीचा सागर । रामचरित्राचें सार । संदेह हारी ॥

(१) यांतील दो. ८९ (चौ. सोडून) पासून दो. ९० पर्यंतचा सुभाषितमय सर्व भाग फारच गूढ पण कौतुकास्पद काव्यकलेचा सुंदर नमुना आहे. यांत ज्ञानदीप प्रकरणाचें सार भरलें आहे. टीकाकारांनीं वरवरच पाहिलें आहे व घोटाळा केलाच आहे. (२) ज्ञानदीप, भक्तिचिंतामणि व परस्पर-संबद्ध सप्त प्रश्न हीं प्रकरणें व सप्त प्रश्नांच्या उत्तरांतील मानसरोगरूपक हे भाग अद्भुत अपूर्व कलेचे नमुने आहेत. (३) सीतापरित्याग केवळ व्यावहारिक साध्या शब्दभेदानें गूढ ध्वनीनें सुचविला आहे. (४) रामाश्वमेधांत कुशलवांनीं मिळविलेला विजय एकाच शब्दानें ध्वनित केला आहे. (५) त्या यज्ञमंडपांत कुशलवांनीं केलेलें रामायणगान फक्त एकाच शब्दानें सुचवून तदनुषंगानें सीतेचा भूविवरप्रवेश ध्वनित केला आहे. (६) श्रीलक्ष्मणाचें निर्याण यांहूनही गूढ ध्वनीनें अलौकिक रचनाकौशल्यानें सुचविलें आहे. (७) प्रभूचें महाप्रस्थान व निर्याण यांची पूर्वसूचना सनकादिकांच्या आगमनवर्णनांत उपक्रमरूपानें केवळ एका शब्दानें देऊन ठेविली आहे व शेवटीं दो. ५० मध्यें नारदागमनवर्णनांत तसलाच खुणेचा शब्द उपसंहारसूचक घातला आहे; व दो. ५० च्या चौपायांत निर्याण ध्वनित केलें आहे. हीं प्रकरणें अशा गूढ ध्वनीनें सुचविलेलीं कुठेंहि दिसत नाहींत. (**क**) ज्या गोष्टी विचारणें पार्वतीला अशक्य झालें त्या स्पष्ट वर्णन करणें कवीच्या अति कोमल हृदयास अशक्य झालें. जें पार्वती सहज विचारूं शकली तें वर्णन करण्यास हृदय वज्र करण्याचें गोस्वामीजींना जमलें नाहीं; आणि कांहीं रामभक्तांच्या भावना दुखविल्या जाण्याचा संभव असल्यानें हीं प्रकरणें गूढ ध्वनीनें वर्णिलीं गेलीं असें वाटतें.

श्रीरामचरितमानस म्हणजे एक सुभाषितमणिभांडागार आहे, कित्येक ठिकाणीं

क्रमानें ८–१०–१२ सांपडतील. मानस-सुभाषित भाण्डागार हा एक स्वतंत्र ग्रंथ तयार होईल आणि 'श्रीतुलसीभक्तिसूत्रावली' हा स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यासारखा आहे

याप्रमाणें साती सोपानांतील अपूर्व रचनेचे कांहीं कांहीं ठळक नमुने दाखविले. आतां पुढील प्रकरणांत 'मानसांतील उपमांची सुसंबद्धता' दाखविली आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।३ 卐 卐 卐

उपमादिकांतील सुसंबद्धता

श्रीतुलसीमानसांत एकच उपमादि वापरतांना परिस्थितिप्रमाणें केलेल्या सूक्ष्म भेदामुळें कुठेंहि असंबद्धता निर्माण झालेली नाहीं. उपमेयांतील सूक्ष्म भेदानुसार उपमानांत पूर्ण समतोल भेद निर्माण करण्याची दक्षता सर्वत्र आढळते. उदाहरणार्थ :—

१. (अ) **वन्दे गुरुपदकंज कृपासिंधु नररूप हर ।**

महामोहतमपुंज यद्वचनें रविकर-निकर ॥ (बाल. मं. सो. ५)

(ब) **श्रुणु ! गिरिराज-कुमारि *भ्रमतमरविकर वचन* मम** ॥ (बाल. दो. ११५)

(अ) पहिल्यांत महामोह आहे म्हणून तमपुंज = तमोराशि आहे; म्हणून वचनें रूपी **रविकरनिकर** = सूर्यकिरणांचा समूह आहे.

(ब) दुसऱ्यांत महामोह नसून भ्रम आहे म्हणून तमपुंज न म्हणतां तम म्हटलें. तमपुंज नाहीं म्हणून रविकर समूह (निकर) जरूर नाहीं; नुसत्या एका किरणानें तो तम जाईल म्हणून वचनें न म्हणतां वचन म्हटलें; किती दक्षता ! ही काव्यभाषेंतील सुसंबद्धता रम्य आहेच पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशीच घडली आहे.

(क) तुलसीदासांचा महामोहरूपी अंधारराशि नष्ट होण्यास सद्गुरुमुखानें अनेक वेळां रामकथा श्रवण करावी लागली; पण गिरिराजकुमारींत महामोह–तमपुंज नव्हता केवळ भ्रमतम होता; तो शंकरांनी फक्त चार दोह्यांच्या एका विषयानें नष्ट केला. (बाल. दो. ११६ – ११९), तशी जबाबी गिरिजेनें ११९ व्या दोह्यांतच दिली आहे. अशी समन्वयदक्षता कुठें दिसते का ? (ख) हीं दोन रूपकें जेथें वापरलीं तेथें त्यांत अंतर सुमारें १३७२ ओळींचें आहे ! मधल्या भागांत शेंकडों उपमारूपकादि आणि ८५ उपमानांचं एक सांग परंपरित रूपक इत्यादि असतां असा उभयविध समन्वय साधणें केवळ अलौकिक आहे.

२. रघुपति शशिचारु (१।१६।५) (३।२८।६) – (१) '*प्रगट जिथुनि रघुपति शशि चारू ।*' — वंदन प्रकरणांत कौसल्यारूपी पूर्व दिशेला वंदन करतांना हें रूपक केलें आहे. श्रीरघुपति रामचंद्रास पूर्व दिशेस प्रगट झालेला चारु शशी म्हटलें. शशी-मध्यें कलंकादि १६ दोष असतात (३।२८।६ टीका) ते नसलेला म्हणजे निर्दोष सुंदर

शशी रघुपति, जन्मापासूनंच आहेत, हें ग्रंथारंभींच सांगून सुचवून ठेवलें कीं *जेथें कुठें रघुपतीस चंद्राची उपमा दिली असेल तेथें निर्दोष पूर्ण चंद्र समजावा.* प्रत्येक ठिकाणीं हें सांगणें शक्य नाहीं. असें जर येथें सांगितलें नसतें तर '*रावणशशिराहू*' (३।२८।६) मधील रावणशशी व रघुपतिशशी यांची बरोबरीच सिद्ध झाली असती ! या दोन रूपकांत स्थलांतर ७६०० ओळींचें आहे !

३. *विमल विधु-पूषण* (१।२०।६)– (१) हें रामनामांतील म आणि रा यांचें वर्णन असून रा = राम, आणि म = लक्ष्मण हें १।२०।३ मध्यें पूर्वीच सांगितलें आहे. येथें *राम-रवीला* (पूषण) *विमल* हें *विशेषण लावलें* व सांगून ठेवलें कीं पुढें मानसांत जेथें रघुपतीस सूर्य म्हटलें असेल तेथें विमल-दोषरहित = निर्दोष सूर्य समजावा. असें कुठें तरी वर्णिलें नसतें तर *सूर्याच्या ठिकाणचे बारा दोष* रघुपतीस चिकटवतां आले असते. किती सावधगिरी !

२. दशरथास *रविकुलरवि* (२।१५४।४) म्हटलें आहे.

क्षीण नृपति कौसल्ये भासत । जाणे *रविकुलरवी* मावळत ॥

जर रघुपतीला विमलपूषण (रवि) म्हटलें नसतें तर दशरथ जीव व राम परमात्मा यांची व्यावहारिक समता सिद्ध झाली असती ! आणि 'जीव किं ईश समान' हा मानससिद्धान्त खंडित झाला असता, असत्य ठरला असता. एक साधी उपमा वापरतांना किती गोष्टींचा समन्वय साधला याचा विचार करावा व गोस्वामींची कला अद्भुत अपूर्व ! म्हणावें.

४. अमित महिमा अति (१।३५।२)

(१) '**नदी पुनीत *अमित महिमा अति* । वदुं न शके शारदा विमलपति ॥**'
हें अयोध्येजवळील शरयू नदीचें वर्णन आहे. 'महिमा अमित. अति' असें म्हटलें. साहित्य समालोचक म्हणतील कीं येथें अति शब्द 'निरर्थक' आहे; पण, 'तिच्या स्नानें विना प्रयासा *मम समीप* नर पावति *वासा*' (७।४।६) असें श्रीप्रभूंनीं सांगितलें आहे. (क) 'चित्रकूट *महिमा अमित* महामुनी कथितात' (२।१३२) पण चित्रकूटला वस्ती केल्यानें *रामसमीपता मुक्ति* अनायासें मिळत नाहीं; कारण तसा उल्लेख मानसांत नाहीं. शरयू स्नानानें ती मुक्ति अनायासें मिळते. आतां सांगावें कीं शरयूवर्णनांत जो '*अति*' शब्द घातलां तो निरर्थक कीं सार्थक ? आणि अति आवश्यक ? तो 'अति' नसता तर मानसवचनांत असंबद्धता उत्पन्न झाली असती. बाल. दो. ३५; उत्तर. दो. ४ आणि अयोध्या. दोहा १३२ यातील अंतराचा विचार करावा ! व उत्तरकांडांतील (७।४।६) हें रामवचन नसतें तर असंबद्धता व 'अति' शब्दाची 'निरर्थकता' सिद्ध झाली असती कीं नाहीं हें ठरवावें. (ख) '***महिमा* नामरूपगुणगाथा । सकल अनंत *अमित* रघुनाथा ॥**' (७।९१।३) यांतसुद्धां **महिमा** *अमित अति* नाहीं. संपूर्ण मानसांत 'महिमा अमित अति' असें फक्त **शरयूबद्दलच**

म्हटलें आहे. *महिमा अमित* दोघांचा वर दाखविला; आणखी १।२३५; २।२८९।२; ३।११।२ व ६।२।३ या चार ठिकाणीं चौघांचा महिमा अमित आहे. शरयूवर्णनांत 'अति' शब्द नसला तर सर्वांचा महिमा समान ठरून (७।४।६) या वचनानें असंबद्धता उत्पन्न झाली असती.

५. दो. १।३७ पुलक ***वाटिका–बाग–वन*** सुख–सु वि हं ग–विहारु ।

सु–मनाचि माळी स्नेह जल सिंचत लोचनिं चारु ॥

हें मानसरूपकांत आहे.

दो. १।२१२ **सुमन *वाटिका बागवान* विपुल *विहंग* निवास ।**

हें जनकपुरीच्या बाहेरचें दृश्य बाहेरून येत असलेल्या रामलक्ष्मणांस दुरून दिसलें. वाटिकाबागवन दोन्ही ठिकाणीं आहेत; पण एकांत सुविहंग व एकामध्यें विहंग असा फरक कां? याचें किंवा मागें दाखविलेल्या २।३ भेदांचें स्पष्टीकरण कोणाहि टीकाकारानें केलेलें नाहीं! या भेदाचें कारण *विहार* व *निवास* या भेदानें कवींनीं सुचविलें आहे. (क) एकांतील वाटिकाबागवनांत विहंग विहार करीत आहेत, व दुसऱ्यांतील वाटिकाबागवनांत विपुल विहंग (वृक्षांवर) निवास करीत आहेत. कोणते पक्षी अधिक चांगले दिसतील व सुखद वाटतील? इकडून तिकडे भराऱ्या मारीत विहार करणारे अधिक चांगले असें कोणीहि सांगेल! म्हणूनच विहार करणाऱ्यांना सु–विहंग म्हटलें. यांत 'सु' जोडलें नसतें तर दोघांची समता ठरून असंबद्धता निर्माण झाली असती कीं नाहीं? (ख) निवास करणारे स्थानासक्त वाटतात पण विहार करणारे तसे वाटत नाहींत. सार हें कीं सुखरूपी सुविहंग मानसांत कुठें विशिष्ट ठिकाणींच राहतो असें नाहीं, तर तो सर्वत्र विहार करीत असलेला अनुभवास येतो! हें अगदीं अक्षरशः सत्य आहे. परंतु सु–मनरूपी माळ्यानें नेत्ररूपी दोन झाऱ्यांनीं स्नेहजलाचें सिंचन केलें तरच हें अनुभवास येणार! किती सुंदर रूपक! व किती अलौकिक दक्षता व सुसंबद्धता!!

६. भरत–प्रेम–दशावर्णन.

(१) **भरतदशा त्या समयीं कैसी । *जल–अलि गति जल–ओघीं* जैसी ।**
(२।२३४।७)

येथें दृष्टान्त सांपडला; पण जेव्हां दृष्टान्त उरला नाहीं तेव्हां —

(२) **प्रजा *जणूं ईतीभय दुःखित* । मारी ग्रह तापत्रय–पीडित ॥**

'*जात सुराज–सुदेशिं सुखावे* । होइ भरत गति तशी स्वभावें ॥
(२३५।३–४)

येथें उत्प्रेक्षा केली; पण भरताची प्रेमदशा कविकल्पनातीत झाल्यावर —

(३) **'प्रणति करित युगबंधु चालती । प्रीति वदत *लाजते भारती* ॥** (२३८।२)

मनुष्याला, कवीला कल्पना करतां न आली तरी सरस्वती देवी (भारती) एखादी

उत्प्रेक्षा शोधून काढील असें कोणी म्हणेल, म्हणून येथें सांगतात कीं भारती वाग्देवी-सुद्धां लाजली; तिलाहि उत्प्रेक्षासुद्धां करतां येईना. पण प्रेम याहूनहि अधिक वाढलें. (४) 'बघुनि भरतगति *अकथ अतीवहि*' (२३८।५) आतां ती गति = दशा, अति अकथनीय झाली. सरस्वतीला वर्णन करवेना ती दशा अकथनीय ठरली. तिच्यापेक्षां ही दशा अधिक प्रेमाची आहे म्हणून अति अकथनीय, अति अनिर्वचनीय. प्रेमदशेच्या भिन्न भिन्न भूमिकांचें वर्णन करीत असतां पुनरुक्ति नाहीं; निरर्थक अनिर्वचनीय म्हणणें, विसंगति इत्यादि कांहीं लेशमात्र आहे काय ? म्हणूनच अशा कलेला अपूर्व म्हणणें ओघानेंच प्राप्त झालें.

सूचना — वरील (६।२) यांतील २३५।३–४ या चौपायांत ईतीभय, मारी, ग्रह व तापत्रयपीडित प्रजेचा सु–राज्याच्या सुदेशांत प्रवेश उपमानास घेऊन उत्प्रेक्षा केली आहे; पण त्यापूर्वींच अयोध्येच्या प्रजेचें असें वर्णन विविध रूपकांनीं केलेलें आहे. 'अनेक उत्प्रेक्षांचे नमुने' यांत पुढील पांचव्या प्रकरणांत दिसेल. ही उत्प्रेक्षा केवळ कविकल्पना नसून तशी वस्तुस्थिति पूर्वी प्रत्यक्ष दाखविली आहे. अशा प्रकारचा समन्वय कुठें पाहिला आहे काय ? इतके नमुने पुरे होतील. 'सांग रूपकें' हें पुढील प्रकरण आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।४ 卐 卐 卐

सांग रूपकें

श्रीमद्‌गोस्वामी तुलसीदासांच्या मानसाचा विस्तार फार न होण्याचें एक कारण त्यांनीं मुक्तहस्तें केलेला रूपकालंकाराचा उपयोग हें एक आहे. याचा दुसरा फायदा हा होतो कीं जे विषय सर्वसाधारण जनसमाजास कंटाळवाणे वाटतात त्यांचें वर्णन नित्य-परिचित वस्तूंच्या रूपकानें सांगोपांग केल्यामुळें त्यांचें श्रवण करणें कंटाळवाणें वाटत नाहीं व मननचिंतनास आधार मिळतो.

१. जीं उपमानें रूपकांत वापरलीं असतील त्यांचें ज्ञान ज्याला जितकें जास्त असेल तितका तो त्या त्या रूपकाचा विस्तार त्या त्या शास्त्रादिकांनुसार अधिकाधिक करील, व अधिक आनंदाचा आस्वाद घेऊं शकेल. (क) साहित्यशास्त्राची परिभाषा व व्याख्यादिक सर्वसाधारण लोकांस 'कानडीनें केला मराठी भ्रतार' असें वाटतें; पण तेंच वर्णन मानसरूपकांत केल्यानें साधे श्रोते-वक्तेहि त्यांत रंगतात. ज्ञानदीप हें रूपक असें आहे कीं, आबालवृद्ध कोणीहि मनुष्य त्या रूपकाच्या आधारें त्या अति रूक्ष विषयाचेंसुद्धां सहज ग्रहण करूं शकेल. तेंच वर्णन वेदान्तशास्त्रपद्धतीनें करावयाचें तर, एक मोठा ग्रंथ होईल. रूपकांतील उपमानें सर्वांच्या नित्य परिचयांतील असल्यानें कोणालाहि विषयाचें आकलन करतां येतें; उदा० — सात्त्विक श्रद्धेला धेनु ठरवून

ज्ञानदीपकांत तिचा चारा, दूध काढणें, तापवणें, विरजणें इत्यादि सर्व नित्यपरिचित क्रियांना ज्ञानतूप तयार करीपर्यंत व दिवा लावण्याचें वगैरे वर्णन आहे; त्यामुळें विषय समजणें आणि मनन करणें सोपें जातें. (ख) तुलसीमानसांतील अलंकारांत बहुजनपरिचित वस्तूंचाच उपमानांत उपयोग केला आहे.

२. *उपमेय व उपमान, इत्यादिकांत सर्वत्र लिंगसाम्य आहे;* जेथें नसेल तेथें कांहींतरी विशेष हेतु आहे असें समजावें. या वैशिष्ट्यामुळें अर्थनिर्णय करणें अधिक सोपें जातें. हिंदी भाषेंत दोनच लिंगें असल्यानें हें मानसांत विशेष प्रयत्नानें साधलें आहे. मराठींत तीन लिंगें आणि मूळांतल्याच उपमादिकांचा अनुवाद करणें क्रमप्राप्त, यामुळें मराठींत हें वैशिष्ट्य सर्व ठिकाणीं साध्य झालें आहे असें नाहीं.

३. उत्तर हिंदुस्थानांतील प्रसिद्ध साहित्यशास्त्रज्ञ श्रीगोस्वामींना रूपकालंकराचे बादशहा म्हणतात; पण *या प्रस्तावनेंत त्यांस रूपकसम्राट म्हटलें आहे.*

४. मागील अनेक प्रकरणांत मानसांतील मुख्य मुख्य महत्त्वाच्या रूपकांचा निर्देश केला गेला आहे; त्याशिवाय साधुसमाजप्रयाग व जनकपुरींतील पूर्णचंद्रोदय, अयोध्याकांडांत तर पुष्कळच सांग रूपकें आहेत :— अयोध्यासागर, भिल्लीण व मधाचें मोहोळ, रोषतरवार, विषमज्वर, करुणारसकटक, श्येनानें शिकार, कपटसुरी बलिपशु, इंगळा चावणें, प्रेममदिरा, वराहावतार व भरतविवेक, मार्कंडेय व अक्षयवट प्रयाग-राजा, चित्रकूट-विवेकभूपति, उच्चाटनप्रयोग, भरतभारती मराली, सात ईतीचें रूपक इत्यादि अनेक सांग रूपकें या कांडांत आहेत; त्यांची यादी फार मोठी होईल. अयोध्याकांड सांग-निरंगरूपकांचा एक सागरच आहे असें वाटतें. सर्व उपमानें सुपरिचित असल्यानें आणि सर्वांगीण अद्भुत, अपूर्व काव्यकलासौंदर्यानें मानसांतील अयोध्याकांड हा वाचकांचा अत्यंत आवडीचा विषय झाला आहे.

५. निरंगरूपकांत कांहीं अशीं आहेत कीं एकेक छोटा ग्रंथच लिहितां येईल. 'साधुचरित शुभचरित कपासी' हें अगदीं साधें दिसणारें रूपक आहे; पण कापूस हें सर्व लोकांच्या चांगल्या परिचयाचें उपमान असल्यानें त्या एका उपमानाच्या विस्तारानें साधुचरित्राचा जेवढा बोध करतां येईल व चित्तांत ठसेल तितका बोध साधुलक्षणांच्या एका ग्रंथानें होणार नाहीं. बोंडांत कापूस तयार झाल्यापासून कपडा शिवून, वापरून, फाटून चिंध्या होईपर्यंतचीं त्याचीं सर्व स्थित्यंतरें, त्या कापसावर केले जाणारे आघात व संस्कार, त्याचा दूरदूर प्रवास इत्यादि सर्व गोष्टी वाचकांच्या व श्रोत्यांच्या चांगल्या परिचयाच्या आहेत.

शरिराचें मुख आणि अवयव या एका रूपकानें राजधर्म सांगितला आहे. 'आवळा' व 'बोर' या रूपकांनीं आत्मज्ञान व विश्वज्ञान यांविषयीं दोन ग्रंथ लिहितां येतील. 'जीभ-दशन' रूपकानें संत व खल यांच्या स्वभावांतील ३२।३२ गुण-अवगुण मानसाधारें सहज दाखवितां आले आहेत. 'रावणशशि' रूपकानें चंद्राचे १६ दोष

मानसाधारें दाखवितां येतात. रूपकांचा जेवढा विस्तार कोणी करील तेवढ्यास आधारभूत वचनें मानसांतच सांपडतात, हें परम आश्चर्य गूढार्थचंद्रिका अवलोकनानें प्रतीतीस येईल व पुढील प्रकरणानें ही गोष्ट पटेल.

इतर अलंकारांत मानसांतील उत्प्रेक्षा व उपमा चित्तास चकित करतात. शंभर मुख्य अलंकार व त्यांचे पोटभेद यांचीं उदाहरणें मानसांत आहेत; व हिंदी साहित्य पंडितांनीं स्वतंत्र ग्रंथांत तीं दाखविलेलीं आहेत. या सर्व अलंकारांचीं नुसतीं नांवें गूढार्थचंद्रिकेंत देणेंहि इष्ट वाटलें नाहीं मग प्रस्तावनेंत किती देणार !

या लेखांत ज्या उदाहरणांचा नामनिर्देश केला आहे तीं कांडांतील क्रमानुसार असतीलच असें नाहीं. लिहितां लिहितां जीं उदाहरणें जशीं सहज आठवलीं तशीं तीं लिहिलीं गेलीं आहेत. मानसांतील प्रत्येक रूपकादीचा विस्तार गूढार्थचंद्रिकेनें यथामति केला आहे.

ल. ठे. — मानसांतील उपमा, रूपक, दृष्टान्त, उत्प्रेक्षा इत्यादि अलंकारांच्या उपयोगांत हें एक अद्‌भुत वैशिष्ट्य आहे कीं जेथें एकाहून अधिक उपमादि अलंकार एकाच उपमेयांत वापरले आहेत तेथें प्रत्येकांत कांहीं विशिष्ट हेतु आहे. केवळ एखादा सिद्धान्त ठसविण्यास ाठीं अनेक उपमादिकांच्या मालिका कुठेंहि नाहींत हें निरपवाद सत्य गूढार्थ चंद्रिकेंत प्रततिसि येईल.

(क) जेथें अनेक उपमादिक आहेत तेथें त्यांचा क्रमसुद्धां सहेतुक आहे उदाहणार्थ —

राम *काम* शतकोटि सुभगतन । *दुर्गा*कोटि अमित अरिमर्दन ॥
***शक्र*कोटिशत सदृश विलासहि । *नभ* शतकोटि अमित अवकाशहि ॥**
***मरुत*कोटि ... *रवि*शतकोटि ... *शशि*शतकोटि (७।८१ रा) *काल* कोटि शत... धूमकेतु शतकोटि– (८१ म) प्रभु अगाध कोटि पाताल**—इत्यादि.

१. काम ब्रह्मलोकनिवासी, २. दुर्गा कैलासनिवासी, ३. शक्र स्वर्गलोकनिवासी ४ नभ-अंतरिक्ष लोक,५ मरुत्–वायु,६ रवि = तेज,७ चंद्र = शीतलता–जल, ८ काल = मृत्यु या पृथ्वीवर अनुभवास येतो व धूमकेतूचे परिणाम पृथ्वीवरच दिसतात = पृथ्वी ९ पाताल. असा यांतील क्रम ठराविक व शास्त्रोक्त आहे कीं नाहीं ? सर्वांत ब्रह्मलोक श्रेष्ठ म्हणून प्रथम लोकक्रम वरून खालीं घेतला, नंतर पंचभूतक्रम वरून खालीं असा घेतला तो पाताळापर्यंत ! हिंदी टीकांत असल्या अनेक वैशिष्ट्यांचा विचारच केलेला नाहीं.

अशा प्रकारें अनेक रीतींनीं दिसणारी अलौकिक काव्यालंकार-कला कोणा एखाद्या महाकवीच्या काव्यांत आहे काय ?

विमल नभीं नक्षत्रें गणती । जलनिधिजलिं जलचर किति वदती ॥
अगणित-मानसगुण ते वर्णिति । केवल अल्प लिही ही जडमति ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।५ 卐 卐 卐

अनेक उपमादिक सहेतुक

श्रीरामचरितमानसांत जेथें जेथें अनेक उपमानांचा उपयोग केला आहे तेथें तेथें विशिष्ट विविध धर्मांचें सादृश्य वर्णन करण्यासाठीं अनेकत्व आहे असें नक्कीं समजावें. उपमेयाच्या ज्या ज्या गुणांचें वर्णन करावयाचें असतें ते सर्व एकाच उपमानांत असतातच असें नाहीं; म्हणून अनेक उपमानें घेणें भाग पडतें. याच कारणास्तव मानसांत उपमादिक अलंकारांचा उपयोग केलेला आहे. कालिदासादि प्रसिद्ध कवींनीं-सुद्धां हा नियम पाळला नाहीं. मानसांतील या विशेष नियमामुळें विस्तार वांचला आहे. प्रत्येक उपमा, रूपक, दृष्टान्त, उत्प्रेक्षादि सहेतुक आहेत आणि कांहीं तरी विशेष भावार्थ सांगण्यासाठीं आहेत.

अनेक उपमानें असतील तेथें प्रत्येक उपमानांतील सादृश्य व भेद शोधून काढला कीं त्या प्रत्येक गुणाच्या वर्णनपर आधार मानसांतच इतरत्र सांपडतात हें *मानसांतील अलंकार कलेचें अपूर्व वैशिष्ट्य आहे*. एका उपमानानें दाखविलें जाणारें जेवढें सादृश्य सृष्टिनिरीक्षक व व्यवहारचतुर विचारी विवेकी शोधून काढील तितक्या सर्वांस मानसांत आधार आहेत; तसे आधार मानसांत नसल्यास आपण केलेली कल्पना चुकीची किंवा सदोष आहे असें नक्कीं समजावें. उपमेंतून शोधून काढलेल्या गुणांचें सादृश्य त्या उपमेयाच्या मानसांतील इतर ठिकाणच्या वर्णनांत असले तरच अर्थ बरोबर लागला असें ठरेल. या नियमाचा भंग झालेला या लेखकास तरी आढळल्याचें स्मरणांत नाहीं. मात्र मानसांतील सर्व समानार्थक वचनें अन्तश्चक्षूंपुढें चलचित्रपटाच्या गतीनें नाचलीं तरच हें घडणार ! समग्र मानसमुखोद्गत असलें तरी हें घडेलच असें नाहीं. *असें घडण्यास श्रीहरि-गुरु-कृपाच व्हावी लागते.*

सूचना — श्रीरामगुणवर्णनांत शरिराच्या सुगंधाचें वर्णन मात्र मानसांत नाहीं. मानस नाट्यमहाकाव्य असल्यानें श्रीरघुनाथास पाहणाऱ्या व्यक्ती त्यांच्या त्या नील-वर्णावर व लावण्यावर इतक्या लुब्ध होतात कीं मन आणि नेत्र यांशिवाय बहुतेक इंद्रियें स्तंभितच होतात. प्रभु बोलतात तेव्हां कान जागे होतात. घ्राणेंद्रिय फार स्थूल असल्यानें प्रथम तें स्तंभित होतें; त्यामुळें कोणाला सुगंधाचा अनुभव आला नाहीं, म्हणून 'सुगंध' नाहीं.

मानसांतील वचनाधारें अर्थ सिद्ध झाला व तो *अन्य मानसवचनांशीं अविरोधी असला* तरच शुद्ध गूढार्थ–कवीच्या मनांतील भावार्थ–हातीं लागला असें जाणावें; अन्यथा कल्पनांचे उंच मनोरे मानसांतील एकाच वचनाच्या फुंकरीनें धुळीस मिळतात. जेथें अनेक उपमानें आहेत त्यांना मानसांतील अन्य आधार सांपडले म्हणजे कवीच्या काव्यकौशल्याची व रचनाकलेची अद्भुत जादू दिसते आणि *कविकलेचें व स्वतः*

वरील हरिकृपेचें कौतुक वाटतें व काया पुलकित होते.

मानसांतील या कलेचा शोध १९४४ त लागला व संशोधन सुरू झालें. १९५२ मध्यें ' कांहीं रमणीय भाव ' आणि ' कांहीं उपमादिकांचें विश्लेषण ' या मथळ्याखालीं स्वतंत्र चोपड्यांत लेखन सुरू झालें व दुरूह वाटणाऱ्या बऱ्याच वचनांचें स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकालेखनारंभापूर्वींच लिहिलें गेलेलें आढळलें.

गूढार्थचंद्रिकालेखनानें निःसंदेहपणें खात्री झाली कीं **' अनेक उपमादिक सहेतुक '** *या सिद्धान्तास मानसांत अपवाद नाहीं.* ' संत विटप सरिता गिरि धरणी । सर्वांची परहितार्थ करणी ॥ ' अशा सुभाषितरूप असणाऱ्या वचनांतील उपमानेंसुद्धां सहेतुक आहेत. ही चौपाई सुभाषित तर आहेच, पण संतांच्या ठायीं असणाऱ्या सद्गुणांचें वर्णन करण्यासाठीं विटप, सरिता, गिरि, धरणी हीं चार उपमानें वापरलीं आहेत. या चौघांत असणाऱ्या जेवढ्या सद्गुणांची कल्पना करतां येईल तेवढे सर्व सद्गुण संतलक्षग-वर्णनांत सांपडतात. फार कशाला, पृथ्वी, क्षमा, मही, अवनी, वसुंधरा इत्यादि धरणीवाचक शब्दांनीं सुचविलें जाणारें विशाल हृदय, क्षमाशीलता, पूज्यता, रक्षकता, दैवीसंपत्तिमत्व इत्यादि गुणसुद्धां मानसांतच सांपडले ! ' संत विटप सरिता गिरि धरणी ' हा लेख सुमारें ५०० ओळींचा झाला आहे. तो मानसमणि मासिकांत प्रसिद्ध झाला असून गूढार्थचंद्रिका उत्तरकाण्ड परिशिष्टांत तो आहे.

१. **उपमा** — मानसांतील सर्व उपमांचें विश्लेषण करून त्यांत मानसाधार द्यावयाचें म्हटल्यास असलीं छापील ७१८ शें पृष्ठें पुरणार नाहींत ! या लेखांतल्या केवळ ६ उदाहरणांचीं १३।१४ तरी छापील पृष्ठें होतील ! तरी मोठीं विस्तृत उदाहरणें यांत मुळींच नाहींत; बालकांडांतील सहज लक्षांत राहणारा व सर्वांस फार प्रिय असा दोहाच प्रथम घेऊं.

(१) *नील सरोरुह नीलमणि नील नीरधर श्याम ।*

लाजति तनु शोभा बघुनि कोटि कोटि शत काम ॥ (बाल. १४६)

भगवान श्रीराम मनुशतरूपांपुढें प्रगट झाले त्या वेळचें हें वर्णन आहे. मनूच्या नेत्रांस प्रभु कसे दिसले याचें हें साररूप वर्णन आहे. येथें *असें वाटतें* कीं प्रभूच्या तनूच्या श्याम वर्णालाच या तीन उपमा दिल्या आहेत व अनुप्रास सौंदर्यासाठींच आहेत; परंतु नुसत्या श्याम वर्णाचा प्रभाव दाखविणें हा एकच हेतु तीन उपमा देण्यांत नाहीं. या तीन उपमांनीं सुचविलेल्या इतर अनेक गुणांचें निदर्शन करण्यासाठीं त्या आहेत व अनुप्रास हा हेतु नाहीं.

शंकरांच्या गौर वर्णाच्या वर्णनांतसुद्धां याच हेतूनें व या उपमांनीं सुचाविलेले गुण सुचविण्यासाठींच तीन उपमा आहेत. रामशिव यांत श्यामगौर या वर्णभेदाशिवाय इतर सर्व गुण सारखेच आहेत हें त्यायोगें सुचविलें आहे. (उत्तर. मं. श्लोक ३ रा) ' कुन्द इन्दु दर गौर सुंदरम् ', रामवर्णनांत प्रथम दाखविलें कीं नील = श्याम (अमर पाहा.)

(अ) नील सरोरुह – ' सरोरुह ' च कां वापरला याचा उलगडा ' *शब्दकला अतुला तुलसीची* ' या पुढील लेखांत पाहावें. सरोरुह = तलावाच्या जलांतून वर येऊन जलावर दिसणारें कमल; कमलांत १ सौंदर्य, २ कोमलता, ३ प्रसन्नता–प्रफुल्लता, ४ सुगंध, ५ मधुरता, ६ स–रसता, ७ तेजस्विता आणि ८ अलिप्तता हे आठ गुण सूक्ष्मनिरीक्षकास दिसतात. या आठ गुणांचें श्रीरामवर्णनांत उल्लेख आहेत ते पाहाः— **१ सुंदर** — *कुन्देन्दीवरसुन्दरौ* (किष्किंधा श्लो. १) लक्ष्मण कुन्दसुन्दर व राम इन्दीवर–नील कमल–सुंदर. **२ कोमलता** दोन प्रकारची असते शरिराची व मनाची. (क) *कोमलपदगामी* (४।१।८) यांत **शरिराची कोमलता** दिसली. (ख) **चित्ताची कोमलता**–*कोमलचित्त* कृपालु रघुवर (५।१४।४). **(३) प्रसन्नता** — ' सरसिजनयनं *सर्वदा सुप्रसन्नम्* ' (उत्तर. मं. श्लो. १). **(४) सुगध** —मनूला सुगंध आला नाहीं याचें कारण ' हष विवश *तनुभान* विसरती । (१।१४७।७) ' छविसमुद्र हरिरूप विलोकुनि । टकमक बघति नयनपट रोखुनि ' (१।१४८।५) डोळे आणि मन त्या रूपावर खिळल्यामुळें बाकीचीं इन्द्रियें निष्क्रिय, तटस्थ झालीं आहेत; म्हणून सुगंध आला नाहीं. वाल्मीकि रामायणांत रामलक्ष्मणांच्या शरिरांच्या सुगंधाचा उल्लेख फक्त सीतेनेंच केला आहे. ' न हि गन्धमुपाघ्राय रामलक्ष्मणयोस्त्वया । शक्यं संदर्शने स्थातुं शुना शार्दूलयोरिव ' (सुंदरकांड). **(५) मधुरता** — (प्रिय वाटणें) ' *मूर्तिस मधुर* मनोहर देखे ' (१।२१५।८). **(६) स–रसता** — ' पदकमल परागा रस–अनुरागासम मन मधुप *करी पाना* ' (१।२११ छं.). **(७) तेजस्विता** — ' ज्यांच्या यशाप्रतापापुढतीं । शशिमलीन रवि शीतल गमती ।। ' (१।२९२।२). **(८) अलिप्तता** — *शोक न हर्ष* जरा रघुरावा । तुजला रामस्वभाव ठावा ।। (२।१२।३).

या आठ गुणांत कोमलता दोन प्रकारची आहे म्हणून नऊ गुण झाले.

(ब) नीलमणि उपमा कां ? (नील) सरोरुहाचे सर्व गुण दिवसेंदिवस कमी होतात; म्हणून अन्यत्र ' *तरुण अरुण अंबुज* सम ' असें चरणांना म्हटलें आहे. '*तरुण तमाल नील* तनु शोभे ' एवढ्याचसाठीं म्हटलें. ज्याच्या नीलवर्णांत कमीपणा येत नाहीं व ज्यांत इतर अनेक समान गुण आहेत ते दाखविण्यासाठीं ही उपमा दिली.

१ उज्ज्वलता, २ निर्मलता, ३ स्वयंप्रकाशित्व, ४ एकरसता (सदा एक स्थिति), ५ कठिणपणा, ६ अचलता–स्थिरता, ७ शोभा, ८ दुर्मिळपणा व ९ पावनता. नीलवर्ण तिघांत आहेच.

(१) उज्ज्वलता – ' वर्णा *विशद* रामगुणगाथा' (१।३४।३) **विशद = उज्ज्वल. (२) नित्य निर्मलता** – ' *विशुद्ध बोधविग्रह* ' (अत्रिस्तुतींत) (३।४।५). **(३) स्वयंप्रकाशित्व** – *स्वयंप्रकाशरूप* भगवानहि (१।१२६।६). **(४) एकरसता** — ' जे *त्रयकालिं एकरस* राहत ' (१।३४१।८). **(५) कठिणता** – ' कुलिशाहुनिहि *कठोर अति*... ' (७।१९।–). **(६) अचलता** –' हिमगिरि कोटि *अचल* रघुवीर '

(७।९२।३). (७) **शोभा**—' *शोभाढ्यं* पीतवस्त्रं ' (७ मं. १). (८) **दुर्मिळपणा** – ' जन्म जन्म मुनि ज्ञिजति साधनीं। अंतीं राम न येइ आननीं ॥ ' (४।१०।३). (९) **पावनता** – ' स्पर्शत पद *पावन* ' (१।२११ छं. १).

याप्रमाणें नील मण्याच्या ठिकाणचे नऊ गुण मानसांतच सांपडले. आणखी चिंतन केल्यास आणखीहि कांहीं गुण निघतील व मानसांत आधारहि सांपडतील. ' चिंतामणि ' वर्णनांतील (७।१२०) सर्व गुण येथें घेतां येतील.

(**क**) **नील नीरधर** — दोन उपमांनीं १८ गुण सांगितले तरी १ गंभीरता (शब्दाची), २ शब्दमार्दव, ३ शब्दमधुरता, ४ आर्द्रता, ५ शीतलता, ६ जलधरता, ७ निर्हेतुक जलदातृता (उपकारशीलता), ८ आकाशनिवास आणि ९ दावाग्निविनाशकता, हे गुण सांगण्यासाठीं नीलनीरधराची उपमा द्यावी लागली.

(१) **गंभीरता**—हा मेघांचा मुख्य गुण आहे. नीलकंज *वारिद-गंभीर* (१।१९९।१). (२) **शब्दमृदुता**—भाषणांत मार्दव ' श्रवुनि गूढ *मृदु वच* रघुपतिचे ' (१।२८४।६). (३) **मधुरवाणी**—' मधुर मधुर गर्जति घन— ' (६।१३।२) ' माते वदति *मधुर वचनाला* ' (२।४०।४). (४) **आर्द्रता**—वाणींत प्रेमरसार्द्रता– ' माग माग वर होइ *नभगिरा* । *मिश्र कृपामृत* परम गंभिरा ' (१।१४५।६) हें त्याच प्रकरणांतील वचन आहे. आणखी २।३०७।१ पाहा. (५) **शीतलता**—हा जलाचा स्वभावगुण आहे. ' वदति *वच जलसम* रघुकुल भानु ' (१।२७६). (६) **जल(नीर)धरता**– ' *कृपा-वारिधर राम* खरारी ' (६।७०।४). (७) **निर्हेतुक जलदातृत्व** —' (परोपकारीपणा) — ' हेतुरहित जगिं जुग उपकारी। *तुम्हि* तुमचे सेवक *असुरारी* ' (७।४७।५). (८) **आकाशनिवास** — प्रभु हृदयाकाशांत राहतात. ' *हृदय-गगनिं* मम इंदुसे संतत *वसा* निकाम ' (३।११।–) आणि (९) **दावाग्नि विझविणारे**— ' कामद *घन दारिद्र्यदावि* हे ॥ ' (१।३२।८; २।१०२।५)

याप्रमाणें या तीन उपमानांत नीलवर्णसाम्य असून प्रत्येकांत ९।९ विशेष गुण आहेत; व त्यांतील प्रत्येक मानसांतील रामवर्णनांतच सांपडला. येथें फक्त १।१ अवतरणच दिलें आहे. प्रत्येक गुणदर्शक पुष्कळ वचनें आणखी आहेत !

अशा प्रकारचेच सर्व गुण शंकरांच्या ठिकाणीं आहेत ते ' कुन्द-इन्दु-दर-गौर सुंदरं ' (उत्तर. मं. श्लोक ३) यांतून वाचकांनीं काढावे व आधार मानसांत शोधावे, सांपडतीलच. वरील आधारभूत वचनांचें निरीक्षण केल्यास दिसेल कीं साती सोपानांतील वचनें घ्यावीं लागलीं आहेत !

२. दृष्टान्त-अलंकाराचा नमुना (७।७३।१–६)

अशि रघुपति लीला उरगारी !। दनुज-विमोहक जन-सुखकारी ॥ १ ॥

जे *मति मलिन विषयवश कामी*। *प्रभुवर लादति मोहा* स्वामी ! ॥ २ ॥

मलिनबुद्धि, विषयी आणि कामी आपला मोह प्रभूवर लादतात असें भुशुंडी गरुडास

म्हणाला. आतां दृष्टान्त देतातः—

नयनदोष जैं ज्याला होतो । पीतवर्ण शशि तैं म्हणतो तो ॥३॥

ज्या जैं दिग्भ्रम होइ खगेश्वर । म्हणे पश्चिमे उदित दिनेश्वर ॥४॥

नौकारूढ पळत जग पाहे । मोहें मानि अचल मी आहें ॥५॥

भ्रमति बाल, ना भ्रमति गृहादी । वदति परस्पर मिथ्यावादी ॥६॥

१. स्वतःस झालेला मोह-भ्रम दुसऱ्यावर लादणें कसें घडतें हें दाखविण्यास *चार दृष्टान्त कां?* आपल्या ठिकाणचे दोष दुसऱ्यांत दिसणें ही गोष्ट चारी दृष्टान्तांत सामान्य आहे.

(क) कोण लादतात हें आधीं सांगितलें आहे. (१) मतिमलिन, (२) विषय-वश, (३) कामी. या तीन प्रकारांमुळें चार प्रकारचे भ्रम उत्पन्न होतात व ते दुसऱ्यांवर लादले जातात. तसेंच हे तीन प्रकारचे लोक आपला मोहभ्रम भगवंता-वर लादतात.

दृष्टान्त १ ला — नयनदोष जैं ज्याला होतो । पीतवर्ण शशि, तैं म्हणतो तो ॥ ३ ॥

नयनदोष = कावीळ रोग डोळ्यांना झाला म्हणजे सर्व शुभ्र पदार्थ त्याला पिवळे दिसतात, तसाच चंद्र पिवळा दिसतो. जो वर्ण चंद्रांत नाहीं तो त्याला चंद्रांत दिसतो. असें दिसणें हें नेत्र या ज्ञानेंद्रियांत झालेल्या दोषामुळें घडतें. पूर्वी अनेक वेळां चंद्र पाहिला असतां व चंद्र पिवळा नसतो हें माहीत असतां चंद्र पिवळा आहे असें म्हणणें हें *ज्ञानेंद्रियांतील दोषानें मालिन बुद्धींत भ्रम उत्पन्न झाल्याचें लक्षण आहे.* जो निर्मलमति शुद्धबुद्धि आहे तो म्हणेल कीं काविळीमुळें मला चंद्र पिवळा दिसत असला तरी चंद्र पिवळा असणें शक्य नाहीं !

(क) तसेंच प्रभु रघुनाथ पांचभौतिक देहधारी दिसत असले तरी त्यांचा देह पंचभूतात्मक नाहीं.

' चिदानंदमय आपली काया । *विगत विकार* कळे अधिकाऱ्या ॥ (२।१२०।५) ज्यांच्या बुद्धींत विकार-मल नाहीं ते म्हणजे *मलिनमति नसणारे* रघुनाथास मनुष्य मानणार नाहींत. जे मानतील त्यांची बुद्धि मलिन आहे असें ठरेल. नेत्राचा विषय रूप आहे. देहेंद्रियादि सर्व नेत्रांचा विषय आहे.

दृष्टान्त २ रा — जैं ज्या दिग्भ्रम होई खगेश्वर । म्हणे पश्चिमे उदित दिनेश्वर ॥ ४ ॥

(१) या उदाहरणांत भ्रमाला कारण नेत्रदोष नाहीं किंवा इतर कोणत्याहि इंद्रियांतील दोष कारण नाहीं. सूर्य उगवत आहे, उगवला, हें नेत्र पाहतात व तें पाहूनच बोलणारा तसें सांगतो. पश्चिमेस उगवला असें वाटण्याचें कारण ज्ञानेंद्रियदोष नाहीं, किंवा कर्मेंद्रियदोष नाहीं. हा केवळ *बुद्धिभ्रमाचा परिणाम आहे.* (क) कांहीं लोक जाणतात कीं भगवान अवतरले आहेत; सूर्योदयाप्रमाणें ते प्रगट झाले आहेत; पण पूर्वेस न उगवतां पश्चिमेस कसे उगवले ? उलटें कसें झालें ? म्हणजेच

परमात्मा असून राक्षसाच्या पोराच्या नागपाशांत कसे सांपडले? *हाच संशय गरुडाला आला होता.* पूर्वेचा पश्चिमेस उगवणें म्हणजे अगदीं उलटें होणें. भृकुटि-विलासानें जो सृष्टीचा संहार करतो-करूं शकतो तो प्रभु मेघनादाच्या मायानागपाशांत बांधला जाणें म्हणजे पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवणें आहे. हा केवल *मलिनमतीचाच दोष आहे.* यांत ज्ञानकर्मेंद्रियांनीं दोष निर्माण केलेला नाहीं. पहिला दृष्टान्त व हा दुसरा दृष्टान्त यांतील भेद व हेतु आतां ध्यानीं आला असेल. वक्ता भुशुंडी आहे, *श्रोता गरुड आहे.*

दृष्टान्त ३ रा — नौकारूढ चलत जग पाहे। मोहें मानि अचल मी आहें ॥५॥ येथें *पाहण्यांत भ्रम आहे* पण नेत्रांत दोष नाहीं. येथें गतिभ्रम आहे. स्थिर पदार्थांत चरता आलेली दिसत आहे; व ती सत्य मानणें हा बुद्धीचा भ्रम आहे. झाडें, घरें, गांव इत्यादि अचल आहेत हें ज्याला माहीत आहे तो म्हणेल कीं नौका चालत असल्यानें स्थिराच्या ठिकाणीं चरता दिसत आहे. पण ती सत्य नाहीं.

(ख) नेत्रांत दोष नसतां हा भ्रम मलिन बुद्धीला कां झाला? **पाहणारा स्वतः** गतिमान **नौका रूपी विषयाला वश झाला आहे,** त्यामुळें नौकेची गति समोरच्या **स्थिर** विषयांत दिसली. नेत्रांना विपरीत दिसलें व तें मलिन बुद्धीनें खरें मानलें. या विपरीत ज्ञानाचें कारण स्वतः गतिमान पदार्थांत असणें हें आहे. नौकेसह आपण धांवत आहोंत या गोष्टीचें **अज्ञान विपरीत ज्ञानाच्या सत्यतेला कारण झालें; पण यांत स्वतःचें शरीर व कर्मेंद्रियें गतिमान नाहींत.** *विषयवश झालेल्या मलिन मतीनें मानलें कीं अचर चर झालें व चर अचर आहे* (नौका व स्वतः). **हा केवलाद्वैतसिद्धांतांतील परस्पराध्यासाचा दृष्टान्त** आहे. *जडचेतन ग्रंथि* हें अशा अध्यासाचेंच दुसरें नांव आहे.

२. सतीला व पार्वतीला मोह झाला होता कीं रघुनाथ जर भगवान असते तर सीताहरणानंतर ते सीतेला शोधीत रानावनांत भटकत रडत कशाला राहिले असते? भगवान सर्वज्ञ असल्यानें ती कुठें आहे इत्यादि सर्व त्यांस सहज कळलें असतें इत्यादि. सतीला जें दिसलें त्या सर्व चलनवलनादि क्रिया दिसल्या आणि त्या तिनें खऱ्या मानल्या; रघुनाथावर, रामावर लादल्या. आपली स्वतःची बुद्धिनौका मायेच्य प्रवाहांत वाहात चालली आहे हें तिला कळलें नाहीं. या स्वतःच्या अज्ञानामुळें विपरीत ज्ञान उत्पन्न झालें व तें रघुनाथावर लादलें गेलें. काकभुशुंडीनें गरुडास सांगितलेली ही **कथा शंकर पार्वतीला सांगत आहेत. मलिनमति असून विषयवश झालेल्या लोकांच्या भ्रमाला हा दृष्टान्त आहे.**

दृष्टान्त ४ था–भ्रमति बाल, ना भ्रमति गृहादी।–वदति परस्पर मिथ्यावादी ॥६॥ मुलें 'गिरगिर माता' खेळतात तेव्हां दोन्ही हात लांब पसरून तीं स्वतःच्या भोंवतीं गरगर फिरत असतात. घर, छप्पर, भिंती वगर फिरत नसतात पण 'भ्रमति गृहादी'

असें तीं मिथ्यावादी मुलें एकमेकांस सांगत असतात. ' भ्रमति बाल, ना भ्रमति गृहादी '
पण ' भ्रमति गृहादी ' असें मिथ्यावादी परस्पर वदती.

१. या दृष्टान्तांत मुलांचे देह व हातपाय हीं कर्मेंद्रियें भ्रमण करीत असतात, तशीं नौकेंतील किंवा आगगाडींतील माणसांचीं भ्रमत नसतात हा भेद या दोन दृष्टान्तांत आहे. आपण स्थिर आहोंत असें तीं मुलें मानीत नाहींत; आपण फिरत आहोंत हें त्यांस माहीत असतें तरी त्या जागेंतील भिंती व सर्व स्थिर पदार्थ गरगर फिरत आहेत असें त्यांस दिसतें व तें खरें मानून स्वतःच्या देहादिकांनीं निर्माण केलेली गति घरादिकांवर लादली जाते.

(क) येथें बाल = अज्ञानी. हा *दृष्टान्त भरद्वाजांच्या शंकेला व आरोपाला धरून आहे.* आपण अचल आहोंत असें तीं अज्ञानी मुलेंसुद्धां मानीत नाहींत. भरद्वाजांना स्वतःबद्दलचें अज्ञान नव्हतें पण रामाच्या ठिकाणीं त्यांस विपरीत ज्ञान दिसलें. भरद्वाज या कथेचे श्रोते आहेतच, ' येइ रोष रणीं वधिला रावण ' असा आरोप त्यांनीं रामावर केला होता (१।४६।८).

(ख) गरगर फिरण्याचा खेळ खेळून त्यानें सुख मिळविण्याची *कामना* झाली व त्यामुळें त्यांनीं स्वतःचा मोह घरादिकांवर लादला. **मलिनमति कामी लोकांच्या भ्रमाला हा दृष्टान्त आहे.**

सिंहावलोकन — विषय केवल बौद्धिक असल्यानें सिंहावलोकन करणें इष्ट आहे.

१. पहिला दृष्टान्त ज्ञानेंद्रियांच्या दोषांमुळें मलिन बुद्धींत उत्पन्न झालेला भ्रम दाखवतो, रूप-वर्ण-भ्रम येथें मुख्य आहे. (क) असेच पुष्कळ लोक भगवंताच्या राम-कृष्णादि अवतारांस मनुष्य समजतात व त्यांचा अपमान करतात.

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ (भगवद्गीता)

(ख) कथाश्रवण करणाऱ्या सती–पार्वतीनें असेंच केलें.

२. दुसरा दृष्टान्त केवळ मलिनबुद्धीनें उत्पन्न होणाऱ्या भ्रमाचा आहे. यांत ज्ञानेंद्रियें वा कर्मेंद्रियें मूळ कारण नसतात. (क) येथें खगेश्वर हें संबोधन आहेच, भगवंताच्या मायेनें मलिनमति केलेल्या गरुडासारख्या ज्ञानी भक्ताच्या मोहाला हा दृष्टान्त आहे. (ख) हा गरुडासाठीं आहे. (ग) ज्ञानी असणारे पुष्कळ भक्तलोक असेंच करतात.

३. तिसरा दृष्टान्त परस्पराध्याससिद्धान्त दाखविण्यासाठीं आहे. (क) हा दृष्टान्त विषयवश मलिनबुद्धीच्या भ्रमाला आहे. (ख) सती पार्वतीसारख्या भक्तिहीन असून स्वतःस ज्ञानी समजणारांच्या भ्रमाला हा दृष्टान्त आहे. (ग) हा पार्वतीला उद्देशून आहे.

४. चौथा दृष्टान्त कामी मलिनबुद्धीच्या भ्रमाला हा दृष्टान्त आहे. (क) देह कर्मेंद्रियांच्या गतीनें मलिनबुद्धींत उत्पन्न होणाऱ्या मोहाला-भ्रमाला हा दृष्टान्त आहे.

(ख) हा भरद्वाजांस उद्देशून आहे. (ग) ज्ञानाभिमानरहित भरद्वाजांसारख्या ज्ञानी लोकांत हरिमायेनें उत्पन्न होणाऱ्या भ्रमाला हा दृष्टान्त आहे.

कोणते हेतु साधले ? (१) मोहभ्रम उत्पन्न होण्याची सूक्ष्म शास्त्रीय मीमांसा केली. (२) मलिन बुद्धि हें सर्व प्रकारच्या मोहांचें कारण असतें हा सिद्धान्त सुचविला. (३) अद्वैतवेदान्ताचा अध्यासवाद सुचविला. (४) विषयवश होणें व कामना असणें ही मोहभ्रमाचीं दुसरीं कारणें सांगितलीं. (५) 'मतिमलिन विषयवश कामी' हे उपक्रमांतील शब्द सकारण आहेत हें दाखविलें (या शब्दांनींच ही दृष्टि या बुद्धीला दिली). (६) गरुडासारखे ज्ञानी भक्त कसे मोहित होतात हें दाखविलें. (७) सती-पार्वतीसारखे भक्तिहीन ज्ञानाहंकारी कसे मोहित होतात हें दाखविलें. (८) भरद्वाजां-सारखे ज्ञानाहंकाररहित ज्ञानी कसे मोहांत पडतात हें दाखविलें. (९) मोहाचे चार सूक्ष्म भेद दाखविले.

चार दृष्टान्त सहेतुक सापेक्ष कीं तीन दृष्टान्त निरर्थक हें आतां वाचकांनीं ठरवावें. मोहाची इतकी सूक्ष्म व सुंदर मीमांसा वेदान्त ग्रंथांत व टीकांत तरी आहे काय ? हें सर्व अपूर्व अद्भुत आहे ! याच विषयाची चर्चा बालकांडांत रामकथेच्या उपक्रमांत आहे. येथेंसुद्धां चार दृष्टान्तच आहेत. (१।११७।१-४) गूढार्थचंद्रिकेंत विस्तार केला आहे.

३. अनेक उत्प्रेक्षांचा नमुना – संदर्भ — अयोध्येंतलि प्रजेसह भरत चित्रकूटास जात असतां प्रजा मागें येत आहे व भरतादि पुढें पायीं चालत चित्रकूटच्या आसमंतात भागांत प्रवेश करतात त्या वेळचें भरताच्या प्रेमदशेचें वर्णन आहे.

प्रजा जणूं इतीभय दुःखित । मारी, ग्रह, तापत्रय, पीडित ॥
जात सुराज-सुदेशिं सुखावें । होइ भरत-गति तशी स्वभावें ॥ (२।२३५।३-४)

गूढार्थ-चंद्रिका उताराच पाहा :— (अ) **ईतिभय,** (ब) **मारी,** (क) **ग्रह आणि** (ड) **तापत्रयपीडित**

(१) **ईति सात आहेत 'अतिवृष्टिरनावृष्टिर्मूषकाः शलभाः शुकाः ।**
स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः ॥'

उत्तरार्धांत पाठभेद आढळतो.

'प्रत्यासन्नाश्च राजानः षडेता ईतयः स्मृताः ॥'

पण गोस्वामीजींनीं सात ईतीच दाखविल्या असल्यानें (स्वतःच्या पठनांतील पाठ बाजूस ठेवून) तोच पाठ वर घेतला आहे.

सात ईतींचें मानसांत साम्य (१) अतिवृष्टि — अयोध्येंत आनंदभर अधिक अधिक अधिकाति (अधिक + अति) (१।३५९) असें बालकांडाच्या शेवटीं पुढील कथेचें सूचन केलें आहे. अधिक, अधिक, अति अधिक आनंदभर = ***आनंदाची अतिवृष्टि*** अनपेक्षितपणें अयोध्या-प्रजेवर एकाएकीं सुरू झाली. रामराज्याभिषेक प्रत्यक्ष

पाहण्यास सांपडणार या आनंदाची ही अतिवृष्टि झाली.

(२) **अनावृष्टि** — पण दुसऱ्या दिवशीं सकाळींच आनंदाची वृष्टि करणारे मेघ पळाले. १४ वर्षे अयोध्येकडे ढुंकून पाहणार नाहीं अशी घोर गर्जना करून व अयोध्येवर *अशनिपात* करूनच गेले.

' कौसल्या करि काय बिघाडा । ज्यास्तव *वज्र* तुम्हीं *पुरिं पाडा* ॥ ' (२।४५।८)

(**अशनि = वज्र, अमर**) असें अनावृष्टिनिमित्तभूत कैकयीला तिच्या प्रिय सर्वांनींच विचारलें आहे; म्हणूनच या अयोध्याकाण्डाच्या मंगलाचरणांत ' इंद्रवज्रा ' आहे. इंद्रच वृष्टीची देवता आहे.

(३) **मूषक – काळ हा सर्वांत मोठा मूषक आहे.** (मूषक = उंदीर, मूषक = चोरी करणारा)

' जननिमिषें *करि काळ कुचाळी । ईतिभीति* जशि पिकतां साळी ॥ '

(२।२५३।१)

हें भरतवचन आहे. काळाच्या कुचाळीला ईतिभीतीचाच दृष्टान्त दिला आहे. *काळ हा महाभयंकर मूषक ठरला.*

(४) **शलभाः** – टोळधाड. टोळधाड एकाएकीं येते व तेथें भर दिवसां अंधार पडतो ! एका रात्रींत सर्व पीक खाऊन सपाट केलेलें आढळतें. ३३ कोटी देवरूपी शलभांनीं एकाएकीं अयोध्येंत गडद अंधार पाडला.

' दिसे अयोध्या भीषण भारी । *काळरात्र* कीं जणुं *अंधारी* ॥ ' (२।८३।५)

सर्व महासुखाचें पीक सपाट केलेलें सकाळींच दिसलें. (**क**) या देवतांनींच संगनमत करून सरस्वतीची पायधरणी केली; व सरस्वतीला गुप्तपणें पाठवून कुबडीची व कैकयीची बुद्धि फिरवून सर्व सुखपीक एका रात्रींत सफा केलें.

' उच्चनिवास नीच करतूती । शकति न पाहुं परावि विभूती ॥ ' (२।१२।६)

असें देवांविषयीं सरस्वतीनेंच म्हटलें आहे. टोळसुद्धां उच्च–उंच आकाशांतून येतात व नीच कृतीच करतात. दुसऱ्यांचें सुख-समाधान-ऐश्वर्यरूपी पीक त्यांना पाहवत नाहीं. हां हां म्हणतां सर्व विभूतीचा विनाश करून जातात ते पुन्हां कित्येक वर्षें येत नाहींत. असेंच देवांनीं केलें.

(५) **शुक** — पोपट, कुबडी ही शुकी आहे. तिनें आपल्या गोड गोड शब्दांनीं आपल्या मालकिणीला अशी वश केली कीं रामराज्यरूपी सुपीक खाऊन टाकण्याची तिची मनीषा पूर्ण झाली.

' रामतिलक ऐकुनि उर जळला ॥' तेव्हां

' कुमति कुजाति विचारा ती करि । रात्रिंच होइ अकार्य कशापरिं ॥'(२।१३।२-३)

(६) **स्वचक्र** — आपसांतील यादवी. *कैकयीच स्वचक्र बनली.* अशी यादवी सुरू झाली कीं गांवें शहरें ओस पडतात.

‘ पाडि अयोध्यें उजाड कैकायि ’. दशरथ कैकयीला

‘ बसवुनि विनवी धरून चरणां । तूं दिनकर कुल-कुठार बन ना ॥ ’

पण ती स्वकुलकुठार बनलीच.

‘घर शाकारुनि लावी अग्नीस’ (२।४७।३) **‘होइ आग रघुवंश-वेणुवनिं’** (२।४७।४);

(७) **परचक्र** — दुसऱ्या राजानें स्वारी करणें. भरत कैकयीला सामील असलाच पाहिजे असें लोकांना वाटत होतेंच. ‘ सहसमाज पुर-राज्य भोगणें ’ असें भरत येतांच कैकयीनें त्यांस सांगितलें आहे. (अ) परचक्र किंवा स्वचक्र *यशस्वी झालें कीं* मुख्य राजपुत्रांस कैद किंवा हद्दपारी व राजाचा मृत्यु या गोष्टी घडतातच. रामलक्ष्मणसीता यांना हद्दपारी व दशरथ मरण या गोष्टी घडल्याच.

याप्रमाणें २३५।३ मध्यें उल्लेखिलेल्या ईतींचें साम्य मानसांतहि सांपडलें.

(ब) मारी = महामारी, वाखा. हा फार वाईट असाध्य रोग आहे; निदान त्या काळीं तरी होता. ‘ कुरोगास या औषध नाहीं ’ (२।२१२।२). रामवियोग—कुरोगें मृतवत ’ (२।१५८।७).

(क) ग्रह — ग्रहदशेचा फेरा, साडेसाती,

‘ दशरथपुरिं ये चित्तिं सहर्षा । दुःसह दुःखद जणूं ग्रहदशा ॥’ (२।१२।८)

हें सरस्वतीविषयीं म्हटलें आहे. *सरस्वती = ग्रहदशा.*

‘ प्रचिति करुनि नव कुभांड रचते । पुर-*साडेसाती* तैं वदते ॥’ (२।१७।४)

कुबडी = अयोध्यापुरीची साडेसाती.

(ड) तापत्रय — तीन ताप—आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक. देवांनीं दुःखाचें मूळ रचलें हा आधिदैविक, कुबडी व कैकयी या दोघी प्रत्यक्ष कारण झाल्या व ताप दिला तो आधिभौतिक व या तापानें जें दुःख शोकादि भोगावें लागलें तो आध्यात्मिक ताप. राम, लक्ष्मण व सीता यांच्या विरहाचे तीन ताप.

‘ सहित समाज भरत आले जणूं । नाथवियोगजतापतप्ततनु ॥ ’

सात ईति, मारी, ग्रह (दशा) आणि तापत्रय यांनीं सर्व अयोध्याप्रजा पीडित झालेली आहे हें मानसांतील याच कांडांतील वचनांनीं ठरलें. सात ईति, मारी, ग्रहदशा व तापत्रय = १० उत्प्रेक्षा.

आतां विचार करावा कीं या १० उत्प्रेक्षा सहेतुक आहेत कीं नाहींत व त्यांना आधार मानसांतच सांपडले कीं नाहीं !

४. सुभाषितांचा एक नमुना — मानसांतील सुभाषितेंसुद्धां सहेतुक असून प्रकरणार्थास व ग्रंथविषयास धरूनच वापरलीं आहेत.

संदर्भ —सुंदर तरुणीचें कपटरूप घेतलेली विधवा शूर्पणखा प्रथम श्रीरामास विनंति करून त्यांची पत्नी होण्याची इच्छा प्रगट करते; म्हणजेच प्रणयभिक्षा मागते. त्यांनीं लक्ष्मणाकडे बोट दाखविल्यावर ती लक्ष्मणाजवळ जाते; तेव्हां तिला लक्ष्मण म्हणतात,

श्रुणु ! सुंदरी दास मी यांचा । पराधीन, नाहिं तुला सुखाचा ॥ (३।१७।१३)
दास इच्छि सुखमान *भिकारी* । *व्यसनी* धन, सुगती *व्यभिचारी* ॥
***लोभि* इच्छि यश *चार* गुमानी । *बघाति काढूं नभ दुध हे प्राणी* ॥** (३।१७।१५-१६)
अर्थ — हे सुंदरी ! ऐक, मी यांचा सेवक, दास आहें; मी पराधीन आहें; त्यामुळें तुझ्या सुखाला कारण होऊं शकणार नाहीं; माझ्यापासून तुला सुख होणार नाहीं. (कारण कीं) जो सेवक सुखाची व मानाची इच्छा करतो तो आकाशाचें दूध काढूं पाहतो ! (मलाच सुख व मान मिळणें अशक्य; मग मी तुला सुख कसें देऊं शकेन हा भावार्थ आहे.)

येथें असें वाटतें कीं चालू प्रकरणाशीं एवढ्या एका वचनाचाच संबंध आहे व बाकीचीं पांच वाक्यें केवळ सुभाषितें म्हणून वापरलीं आहेत. हीं सहा वचनें सुभाषितें तर आहेतच पण चालूं प्रकरणांशीं व भावी कथेशींसुद्धां त्यांचा संबंध आहे. तोच आतां दाखवावयाचा आहे.

(१) सुख मान भिकारी इच्छी — भिकारी बनलेल्यानें–भीक मागणारानें–सुखाची व मानाची इच्छा करणें आकाशाचें दूध काढणें आहे. तूं *प्रणयाची भीक मागत* एकाकडून दुसऱ्याकडे जात येत आहेस; आणि तुला आपल्या सौंदर्याचा अभिमान आहे.

मम अनुरूप पुरुष बघतांही । शोधुन लोकत्रयांत नाहीं ॥ (१७।९)
असें ती रघुवीरास म्हणाली आहे. आपल्या सौंदर्याचा मान राखला जावा असें तुला वाटतें. पण हा महामूर्खपणा असून तुझ्या पदरांत (भिक्षेच्या झोळींत) अपमान, तिरस्कार, निंदा, क्रोध इत्यादि पडणारच; कारण भीक मागणाराला या गोष्टी मिळतातच व त्या मुकाट्यानें पदरांत घ्याव्या लागतातच. (क) 'शूर्पणखा जी रावण भगिनी' (१७।३) ती भिकारीण बनली त्या अर्थीं रावण भिकारी बनणारच; आणि कोणीतरी त्याचा अपमान, मानभंग इत्यादि करणारच. एका माकडानें रावणाच्या दरबारांतच त्याची चांगली रेवडी उडविली आहेच पुढें.

(२) व्यसनी धन इच्छी — तो आकाशाचें दूध काढूं पाहतो. व्यसनी धनहीन व्हावयाचाच. (क) एका पुरुषाकडून दुसऱ्याकडे जाण्याचें व्यसन तुला लागलें आहे. तूंच म्हणालीस कीं त्रैलोक्यांतले सर्व पुरुष शोधून पाहिले. अर्थात तूं व्यभिचारिणी आहेस; व्यभिचारव्यसन तुला लागलेलें आहे; तेव्हां तुला प्रणय धन कसें मिळणार ? (ख) कवि सुचवितात कीं रावण व्यसनी आहे, तेव्हां आतां त्याचें धन ऐश्वर्य लवकरच नष्ट होणार व तो भिकारी बनणार.

'**देशकोष शुद्धिस भुललासी । करिसि पान निजसी दिनरातीं** ॥ (३।२१।६-७)
असें ही भिकारीण कुलटाच रावणास म्हणणार आहे.

(३) सुगती व्यभिचारी — व्यभिचारी व्यक्तीला सद्गति मिळणें शक्य नाहीं.

तूं व्यभिचारिणी असल्यामुळें तुला दुर्गति प्राप्त होणार आहे. (क) रावण व्यभिचारी आहेच. सुचविलें कीं त्याची दुर्गतिच होणार. कोल्हे, कुत्र्रीं, गिधाडें यांनीं त्याचीं शिरें व बाहू भक्षिले आहेतच.

(४) **लोभी यश इच्छी** — लोभीं माणसाला त्याच्या घरांतलीं व कुटुंबांतील माणसेंसुद्धां चांगला म्हणत नाहींत, मग जगांत यश कुठलें ? (क) तुला परपुरुषाचा लोभ आहे; तुझी अपकीर्ति होईल. नाक, कान गमावून लवकरच तसें होणार आहे. (ख) कवि सुचवितात कीं रावणाला परस्त्रीलोभ उत्पन्न होऊन त्याची अपकीर्ति होणार आहे; आणि कुटुंबांतील व्यक्तीसुद्धां त्यास वाईट म्हणतील. हें सर्व पुढें घडलें आहे.

(५) **इच्छि यश चार गुमानी** — चार = गुप्त हेर, गुमानी = गर्विष्ठ, घमेंडखोर. गर्विष्ठ व घमेंडखोर गुप्त हेराला आपल्या कार्यांत यश मिळणार नाहीं. त्याची हेरगिरी प्रगट होईल. (क) तूं गुप्त रूपानें कपटसुंदरी बनून आली आहेस, पण तुझें कपट लवकरच बाहेर पडेल. (ख) रावण गुप्त रूपानें येईल पण त्यास यश मिळणार नाहीं; त्याचें खरें रूप बाहेर पडेल हें कवींनीं सुचविलें आहे. अशी ही काव्यरचना अपूर्व अद्भुत आहे कीं नाहीं ?

यांतच आणखी चमत्कार पाहा :— हीं सर्व वचनें रामसेवकांना कशीं लागू पडतात पाहा.

(१) **दास इच्छि सुखमान** — रामसेवक म्हणविणारांनीं ऐहिक व स्वर्गादि सुखाची इच्छा, आशा, बाळगूं नये व त्यांनीं मान सन्मान प्रतिष्ठेची इच्छाहि बाळगूं नये. या इच्छा बाळगून रामसेवक होण्याचा प्रयत्न आकाशाचें दूध काढण्यासारखा महामूर्खपणाचा आहे.

(२) **इच्छि सुख मान भिकारी** — ते जर भिक्षा मागून भजन करीत असतील तर त्यांनीं सुखाची व मानाची कल्पनासुद्धां मनांत आणूं नये व अपमानादिकांस अमृतमय भिक्षा मानावी.

(३) **व्यसनी धन इच्छी** — ***रामसेवेचें व्यसन*** चालवावयाचें असेल तर त्यांनीं धनाला कल्पनेनेंसुद्धां थारा देऊं नये. ‘ परम अकिंचन हरिला प्रिय अति ’.

(४) **सुगती व्यभिचारी इच्छी** — जे भक्तींत व्यभिचार करतील, ‘ अव्यभिचारिणी भक्ति ’ (भगवद्गीता) न करतां अनेक देव-देवतांना भजतील, त्यांस सुगति मिळणार नाहीं.

‘ म्हणवि दास मम, नर आशा करि । वदा कुठें विश्वास खरा तरि ’ ॥ (७।४६।३) असें श्रीरामच म्हणतात.

(५) **लोभि इच्छी यश** — धनादिविषयलोभी व्यक्तींसारखा ज्यास भगवद्भजनाचा लोभ असेल त्याला घरचीं मंडळी चांगला म्हणणार नाहींत; त्यानें कीर्तीला थारा देऊं नये.

'कामि नरा प्रिय नारि जशी लोभि जना प्रिय दाम ।
मज रघुनाथ निरंतर व्हा प्रिय तसेंचि राम ॥ (७।१३०।-)

सेवकानें रघुनाथाचें रूप व रामनामरूपी दाम–धन यांचा सदा लोभ धरावा. यश कीर्ति यांच्याकडे बघूंसुद्धां नये.

(६) **इच्छी यश चार गुमानी** — हरिसेवकानें गुप्त हेराप्रमाणें गुप्त राहून भजन करावें; व चार पुरुषार्थांची इच्छा, घमेंड गर्वासह सोडावी–त्यागावी तरच त्याला पराभक्ति मिळविण्यांत यश येईल; रामसेवकानें या सहा गोष्टी वर सांगितल्याप्रमाणें न पाळण्यांत त्याचे सर्व प्रयत्न आकाशाचें दूध काढण्याच्या प्रयत्नांसारखे ठरतील. आतां सार पाहावें.

(१) हीं सहा सुभाषितें वापरण्यांत हेतु आहेत कीं नाहींत ? (२) त्यांतून प्रकरणार्थ प्रकरणाधारेंच निघाला कीं नाहीं ? (३) त्यांनीं पुढील कथेची सूचना दिली कीं नाहीं ? (४) रामसेवकाचा साधनमार्ग पथ्य व अनुमानासह सांगितला कीं नाहीं ? (५) या सर्व गोष्टी मानसाधारेंच ठरल्या कीं नाहीं ? याचा विचार वाचकांनीं करावा व असें काव्य व असा ग्रंथ कुठें असला तर शोधावा !

५. रूपकांचें उदाहरण — आकाशवाणी ऐकल्यानंतर मनुराजानें म्हटलें:—
'श्रुणु सेवक-**सुरतरु-सुरधेनु** !' (बाल. १४६।१)

(१) सुरतरु आणि सुरधेनु हीं दोन रूपकें कां ? हीं परस्पर पूरक आहेत. एकांतील न्यून दुसऱ्यांत व दुसऱ्यांतील न्यून पहिल्यांत पूर्ण होतें.

(क) **सुरतरु** = कल्पवृक्ष, स्थावर असतो; त्याच्याजवळ सेवकास जावें लागतें, तो स्वतः सेवकाजवळ येत नाहीं. भगवान सेवकाजवळ जाऊन त्याची इच्छा पुरवितात. '**राम** सदा सेवकरुचि रक्षिति ' म्हणून सुरधेनु रूपक करावें लागलें. सुरधेनु जंगम आहे, भक्ताजवळ जाऊं शकते.

(ख) कल्पवृक्ष मागितल्याशिवाय देत नाहीं; पण सुरधेनु 'भाववत्स भेटत पान्हवते' (७।११७।११).

(२) **सुरधेनु** — कामधेनु-ग्रीष्माच्या चंडकिरणाच्या तापापासून आपल्या भक्ताचें संरक्षण *आपल्या छायेनें* करूं शकत नाहीं. ती वाटेल त्याची इच्छा पुरवीत नाहीं. सुरतरूच्या खालीं जाऊन बसतांच कांहीं न मागतांहि तापहरण सहज होतें. हा चांगला, हा वाईट हा भेद सुरधेनूजवळ आहे; तो कल्पवृक्षाजवळ नाहीं.

'देवतरुसा स्वभाव देवा । संमुख विमुख न कधिं कोणा वा ॥ ८ ॥
निकट जाति जाणून तरु छाया शुच शमवीच ।
मागत अभिमत लभे जगीं राव रंक शुचि नीच ॥ (२।२६७).

असें भरत रघुनाथास म्हणाले आहेत.

(३) सुरतरु आणि सुरधेनु यांत आणखी गूढार्थ आहेत ते चंद्रिकेंत दिसतील.

६. आणखी एकच सुंदर नमुना — संदर्भ–रावणानें बिभीषणाला लाथा मारल्या व 'जा, त्या दोन तापसांना जाऊन भेट' इत्यादि आज्ञा दिली तेव्हां तो —

हर्षित रघुपतिकडे निघाला। मनीं करित किति मनोरथांला ।।
निरखिन जाउनि चरणाब्जांना। अरुण मृदुल सेवक-सुखदांना ।।
पद लागत तरली ऋषिनारी। जे दंडकवन पावनकारी ।।
जे पद जनकसुता हृदिं धरते। कपट-कुरंगा-संगिं धावते ।।
हर-उर-सरिं सरोज पद जेही। अहो भाग्य *मी पाहिन ते ही ।।*
दो. – मन ज्या पदपादुकांमधिं राहि भरत लावून।
***तें पद आज बघेन* या नेत्रिं अतां जाऊन ।।** (सुंदर. ४२।४-८ व दोहा)

(१) बिभीषण मनोरथ करीत चालला आहे कीं— (क) '*निरखिन जाउनि चरणाब्जांना*' यानें *उपक्रम* केला; व '*मी पाहिन ते ही*' यानें *उपसंहार* केला. (ख) 'सेवकसुखदांना' यानें सुखप्राप्ति हें फल सांगितलें. (ग) 'पावनकारी पद लागत तरली ऋषिनारी' यानें *दृष्टान्तासह उपपत्ति* सांगितली. (घ) 'ते पद आज बघेन' यानें *अभ्यास* सांगितला. (ङ) 'कपटकुरंगासंगिं धावते (धावणारे)' यानें *अपूर्वता* सांगितली. (च) 'हर-उर-सरिं सरोज' झालेले यानें *अर्थवाद* म्हणजे महिमा सांगितला.

चरणकमलांचें वर्णन करणारीं सर्व वाक्यें सहेतुक आहेत कीं नाहींत हें यावरून ठरवावें. उपक्रमोपसंहारादि सहा व दृष्टान्त, या सात गोष्टी दाखविणें हा *बाह्य हेतु आहे*.

(२) चौ. ६, ७ व ८ यांत चार प्रकारांनीं चरणांचें वैशिष्ट्य सांगितलें आहे व त्यांत बिभीषणाचा संबंध आहेच.

चौ. ६ – (१) 'पद लागत तरली ऋषि नारी'—गौतमऋषींच्या शापानें अहल्या शिळेसारखी होऊन राहिली होती; तसाच विप्रांच्या शापानेंच बिभीषणाला अति तमोगुणी असा राक्षस देह प्राप्त झाला आहे. (क) पूर्वजन्मांत 'धर्मरुचि' सचिव असतां त्याच्या प्रतापभानु राजाला सपरिवार राक्षस होण्याचा शाप विप्रांनीं दिला होता. सचिव राजाच्या परिवारांतला असल्यानें त्यास राक्षसदेह मिळाला.

सचिव धर्मरुचि होती जयाला। बंधु विमातृज तो लघु झाला ।।
नांव बिभीषण......... (१।१७६।४-५)

(ख) ऋषिनारी फार पापी होती. बिभीषण म्हणतो कीं 'मीहि फार पापी राक्षस आहें'

'सहज अघप्रिय तामस देह। जसा उलूक तिमिरीं स्नेह ।।' (५।४५।८)
'तामस तनु अणुसाधन नाहीं। प्रीति न पदसरसिज मनि कांहीं' (५।७।३)

प्रभुचरणस्पर्शानें अहल्या पापमुक्त होऊन तिचा उद्धार झाला. मलाहि आतां प्रभुचरण-स्पर्शलाभ होईल व मीहि सर्व पाप विनिर्मुक्त होईन आणि माझा उद्धार प्रभु करतील. (ग) प्रभु स्वतः तिच्याजवळ चालत गेले व तिनें न सांगतांहि चरणस्पर्श केला;

मी स्वतः त्यांच्याजवळ गेल्यावर मला चरणस्पर्शाचा लाभ मिळेलच मिळेल.

(२) ' दंडकवन पावनकारी ' — दंडकारण्याला मुनींच्या शापानें उग्रता आली होती. तेथें घोर निशाचर राहात होते. दण्डकारण्य स्थावर, जड, स्वत. शरण जाऊं न शकणारें, तरी प्रभु गेले व तें शापमुक्त होऊन मनोहर झालें—पावन झालें. मी तर शरण जाणार आहें; मग प्रभु माझा त्याग कसा करतील ? (क) तेथील निशाचरांचा वध करून त्यांना मोक्ष दिला (३।२०) तसेंच माझ्या निशाचरत्वाचा—राक्षसी स्वभावाचा-विनाश करतील. ' भजन घडे ना तामस तनुनें ' असें रावणसुद्धां म्हणाला आहे. ' तामस तनु साधन अणु नाहीं ' असें बिभीषण म्हणाला आहे. तमोगुणी स्वभावाचा विनाश झाला म्हणजे मग भजन घडेल. त्या चरणांनीं जड, शापित, अरण्य पावन केलें; मी राक्षस असलों तरी चेतन प्राणी आहें; मीहि पावन होईन.

चौ. ७ — (१) ' जे पद जनकसुता *हृदिं धरते* ' — चरणांच्या ध्यानानें शांति-सुखलाभ दाखविला. मी शत्रूचा भाऊ, म्हणून माझा स्वीकार केला नाहीं तर मी जानकीप्रमाणें विरहव्याकुळ होऊन, चरणकमलांचें ध्यान करीत तेथेंच सागरतीरा-वरील वनांत राहीन. (क) पण असें करण्याचा प्रसंग माझ्यावर येणारच नाहीं. मी कपटी आहें, रावणानें भेद घेण्यासाठीं गुप्त हेर पाठविला आहे असें जरी प्रभूला वाटलें तरीहि ते माझी इच्छा पूर्ण करतील; कारण ' कपट कुरंगासंगें धावते ' (धावणारे) प्रभूच ते आहेत. महाकपटी, मायावी मारीचाच्या पाठीशीं ते धावत गेले व त्याची अंतरींची इच्छा पूर्ण केली. (ख) मारीचाची इच्छा पाहाः—

चिंतुनि असें दशानन-संगा । — निघे, रामपदिं प्रीति अभंगा ॥
मनीं हर्ष अति तया दाखविन । स्नेही परम आज मी पाहिन ॥
छंद — प्रियतम परम निज बघुनि लोचन सुफलुनी सुखि होइं मी । ... ॥
निर्वाणदायी क्रोध ज्यांचा भक्ति अवशा वश करी ।
निजपाणिं शर सधून *तो मज वधिल सुख-सागर हरि* ॥

इ. इ. दो. २६ च्या सर्वच चौपाया पाहाव्या. याप्रमाणें माझा वध करण्यासाठीं माझ्या मागें धांवले तरी मला प्रभुचरण दिसतील व मी सुखी होईन.

चौ. ८ — (१) ' हर-उर-सरिं सरोज पद जेही ' बिभीषण विचार करीत चालला आहे कीं आमच्या कुळांतील इष्ट देव (शंकर) हर सर्व विश्वाचा संहार करण्यास समर्थ असूनसुद्धां ते प्रभुचरणांचें ध्यान सेवकभावानें करीत राहतात. अशा प्रभूचे चरण *मला* आज *प्रत्यक्ष दिसतील !* (क) सेवकांचें पाप, ताप, दैन्य, अज्ञानादि हरण करणाऱ्या हरांससुद्धां प्रभुदर्शन अति दुर्लभ झालें आहे. मी नीच, पामर, तमोगुणी, राक्षस व *रावणाचा भाऊ* असून मला आज चरणदर्शन सहज सुलभ होणार हें आश्चर्य नव्हे काय ? माझें भाग्य खरोखरच फार मोठें ! अहो ! भाग्य ! (ख) ज्या विषयाचा उपक्रम केला त्याचा उपसंहार येथें केला, आतां सिंहावलोकन-

पूर्वक विचार करीत दृष्टान्तादाखल एक विरुद्ध उदाहरण देतात.

दोहा — ' मन ज्या पद–पादुकांमधिं राहि भरत लावून ।
तें पद आज बघेन या नेत्रिं अतां जाऊन ॥ '

(२) ' राहि भरत ' — चरणपादुकांच्या आधारावर भरत जिवंत राहिले आहेत, **' या कांहीं अवलंबन (आधार) देवा । लंघिन अवधि करुनि यत्सेवा ॥'** (२।३०७।८) **' करुणानिधिचे चरणपीठ जे । प्रजाप्राण यामीक धीट ते ॥'** (२।३१६।५–८ पाहा).

(क) ' मन लावून राहि ' – त्या चरणपादुकांवर मन लावून भरतास आपल्या मनाचें समाधान करावें लागत आहे. भरत प्राणप्रिय बंधु असून प्रत्यक्ष चरणसेवेचा लाभ नाहीं ! मी प्रभूच्या घोर शत्रूचा बंधु, भयानक दुष्ट राक्षस, असा अगदीं विरुद्ध-धर्मी असून मला प्रत्यक्ष चरणदर्शन, स्पर्श, भाषण इत्यादि लाभ मिळून प्रभुचरणसेवा करण्यास सांपडणार; हा लाभ आजच आत्तांच मिळणार; तेव्हां माझें अहो ! भाग्य ! (ख) सीता साक्षाज्जगज्जननी, अर्धांगी असून तिला प्रत्यक्ष दर्शन नाहीं ! विरहानें झुरत योगिनीसारखी राहिली आहे. (ग) हर महादेव शंकर काशींत ' राम ' महा-वाक्याच्या उपदेशानें कृमिकीटपतंगादि सर्व जिवांना मोक्ष देणारे ! पण त्यांनासुद्धां या रूपाचें दर्शन साक्षात् नाहींच ! मानसपूजेंतील दर्शनादिकांवर हृदयांत बघतच समाधान मानून स्वस्थ बसावें लागत आहे ! (घ) भरत बंधु असून सर्वस्वाचा त्याग करून मुनिवेषानें, नगराबाहेर राहून तपश्चर्या करीत त्यास काष्ठपादुकांवर समाधान मानावें लागत आहे. (ङ) मी सर्व प्रकारें हीन असून मला दर्शन, स्पर्श, संभाषण, सेवा इत्यादि सुखाची लयलूट होणार ! तेव्हां माझ्या भाग्याची तुलना कोणाशीं करणार !

(३) वरील विवेचनांत दाखविलेल्या हेतूंनीं पूर्णता झाली असें नाहीं; आणखी पाहावें :—(क) अहल्या व दण्डकवन या विप्रशापसंबंधीं उल्लेखांनीं बिभीषणाची *पूर्वजन्म स्मृति दाखविली*. (ख) जानकी कपटकुरंगामागें धावणाऱ्या प्रभुरूपाचें ध्यान करते, यानें *परचित्तविज्ञान दाखविलें*. (ग) मारीचाच्या उदाहरणानें मारीचाच्या मनांतील गुप्त हेतु कळल्याचें म्हणजे *भूतकालाचें अन्तर्ज्ञान* दाखविलें. (घ) मारीचाप्रमाणें प्रभु-बाणानें मरण्याची तयारी दर्शविली. (ङ) शंकरांच्या उदाहरणानें सेव्यसेवक भावानें ध्यान करीत राहण्याची तयारी दर्शविली. (च) भरताच्या उदाहरणानें दाखविलें कीं प्रभूची आज्ञा शिरसावंद्य मानून सर्व ममतेचा व सर्वस्वाचा त्याग करून भरतासारखा तपस्वी होण्यास तयार आहे.

असे हे विविध हेतु उपक्रमोपसंहारादि सर्व लक्षणांसह अवघ्या पांच ओळींत कोणीं कुठें दाखविले आहेत काय ?

याप्रमाणें केवळ ६ उदाहरणें घेऊन स्पष्टीकरण केलें व आवश्यक तेवढाच विस्तार केला तरी लेखमर्यादेचें थोडेसें अतिक्रमण करावें लागलेंच ! (क) प्रस्तावनेंत देण्याच्या हेतूनें नमूद करून ठेवलेल्या १६ उदाहरणांपैकीं केवळ ६ लहान लहान नमुनेच स्पष्ट

करून दाखविले तरी इतकें लिहावें लागलें. मानसांतील सर्व उपमादिकांचें असें स्पष्टीकरण करण्यास किती पृष्ठें लागतील याचें गणित मानसाचीं १०८ पारायणें, त्या विषयाकडे लक्ष ठेवून, केल्यावर मग करावें म्हणजे फार चूक होणार नाहीं. फार सुंदर स्थळांपैकीं कांहींचा स्थाननिर्देश व कांहींचा नामानिर्देश करूनच हें प्रकरण संपविणें भाग आहे.

बाल. १४६।४–६; १६७।७–८; २५६।७–२५७।१; २६७।१–४; ३५०।६–८; अयोध्या. १५२।२ व ८०।८; २२८।१–२३२।४; उत्तर ८९ रा–९० रा; ९१।३–९२; 'संत विटप सरिता गिरि धरणी' (१२५।६); अयोध्याकांडांत सुमंत्र शृंगवेरपुराहून निघाल्यापासून दशरथ-भेटीपर्यंतच्या वर्णनांतील सर्व उपमादिक; लंका कांडांतील विराट स्वरूपवर्णनांत (१५।१–१५) असलेल्या २५ रूपकांची सहेतुक सार्थकता, व पूर्वींच्या प्रकरणांत सुचविलेलीं सर्व सांगनिरंग रूपकें यांचें स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिका दाखवील, किंवा मागील ६ उदाहरणांप्रमाणें वाचकांनीं स्वतः विचार व मानसांत शोध करावा.

येथें स्पष्ट करून दाखविलेल्या उदाहरणांवरील मानसपीयूषटीका मुद्दाम तुलनेस घ्यावी अशी सविनय प्रार्थना आहे. 'शब्दकला अतुला तुलसीची' हें पुढील प्रकरणसुद्धां वाचकांस आश्चर्यचकित करणाऱ्या अद्भुत अनुपम काव्यकलेचा अल्प परिचय देणारा एक अत्यल्प नमुना आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।६ 卐 卐 卐

शब्दकला अतुला तुलसीची

श्रीरामचरित–मानसांतील अनेक अपूर्व, अद्भुत काव्यकलांपैकीं कांहींचे नमुने पूर्वींच्या व पुढल्या विविध प्रकरणांत प्रकरणानुरोधानें दाखविले आहेत.

मानसांतील शब्दयोजना-कलेसारखी शब्दकला जगांतील कोणत्याहि ग्रंथांत सांपडणार नाहीं; याविषयीं तिळमात्र संशय नाहीं. मानसांतील शब्दकलेविषयीं व्यापक व सविस्तर पद्धतीनें लिहावयाचें म्हटल्यास ८।१० शें पृष्ठांचा छापील ग्रंथ तयार होईल. हें विधान अतिशयोक्ति आहे असें या लेखकानेंच ६।७ वर्षांपूर्वीं म्हटलें असतें; तेव्हां वाचक म्हणाले तर नवल नाहीं. पण असें वाटणें केवळ काल्पनिक, अनुमानाचेंच, असल्यामुळें प्रत्यक्ष प्रमाणानें खात्री होईल कीं वरील विधान अतिशयोक्ति नसून अगदीं शुद्ध सत्य आहे. प्रत्यक्षापुढें अनुमान व तर्क यांना माघार घ्यावी लागते; म्हणूनच शब्दकलेच्या अनेक प्रकारांपैकीं फक्त एकाचींच कांहीं उदाहरणें या लेखांत दिलीं आहेत.

ब्रह्मा, शंकर, रघुनाथ, भवानी, सीता, हनुमान, जनक (राजा), इन्द्र, अगस्ति, दशमुख, कमल, भृंग, वृक्ष, जल इत्यादि नामांचे पर्यायवाचक शब्द त्यांच्या धात्वर्थानें वापरून अनेक मनोहर व आश्चर्यकारक गूढार्थ प्रदर्शित केले आहेत. कुठें पुनरुक्तिवदाभास, श्लेष, इत्यादि अलंकारांची निर्मिति केलेली आहे. अशा अनेक प्रकारांनीं शब्दांचा उपयोग त्यांच्या धात्वर्थानुसार करून, शब्दलाघवांत परम मनोहर अर्थगौरव व भावगांभीर्य भरलेलें आहे. वाचकांस कंटाळवाणें वाटणार नाहीं अशा रीतीनें लिहिण्याचा प्रयत्न यथाशक्ति केला आहे.

१. **संदर्भ**—वनगमनप्रसंगीं लक्ष्मणास वनांत बरोबर येण्यास अनुज्ञा व मातेची आज्ञा घेऊन या अशी आज्ञा मिळाली तेव्हां इच्छा नसूनहि लक्ष्मण सुमित्रेकडे गेले त्या वेळीं,

' जाउनि नत शिर जननिपदांसी । *मन रघुनन्दनजानकीपासी* ॥ (२।७३।४)

जनकराजा प्रजापरिवारासह श्रीरामसीता यांना भेटण्यास चित्रकूटास जात असतां

'गिरिवर बघति *जनकपति* जेव्हां । नमन करिति सोडुनि रथ तेव्हां ॥ (२।२७५।२)

***मन तिथं जिथं रघुवर-वैदेही* । विण मन तन सुख दुःख कसें ही** ॥ (२।२७५।४)

लक्ष्मणाचें मन-*रघुनन्दन जानकीपाशीं* आणि जनकपतीचें मन *रघुवर वैदेहीपाशीं* असा शब्दभेद कां केला? *हा शब्दभेद लक्ष्मण आणि जनकपति यांच्या तत्कालीन भावनांतील* भेद दाखविण्यासाठीं केला आहे.

(१) रघुवंशी मंडळींस आनंद देणारे ते रघुनन्दन आणि चिदानंदलहरी, आनंदाकार झालेली वृत्ति ती जानकी (अर्थ टीकेंत सिद्ध केला आहे). वनांत जाण्याची परवानगी श्रीरामानें दिली आणि लक्ष्मणास परमानंद झाला व वाटलें कीं ' झाला लाभ महा गत हानी '. श्रीरघुनाथ लक्ष्मणास परमानंददायक झाले आहेत व जानकी आनंदमयच आहे; त्यामुळें वनांत त्यांच्याबरोबर गेल्यानें सदासर्वदा आनंदीआनंद होणार हा विचार सारखा घोळत आहे, म्हणून मन सुमित्रेकडे न जातां रघुनंदनजानकीपाशीं राहिले व तन सुमित्रेकडे गेलें व चरणांवर डोकें ठेवलें.

(२) जनकराजांची भावना पाहा :— **(क)** मन *रघुवर-वैदेहीपाशीं* आहे; राम, रघुनंदन, रामचंद्र इत्यादि शब्द न वापरतां रघुवर = रघुकुलश्रेष्ठ हा शब्द वापरला.

' रघुकुल रीतिस कदा खंड ना । जावो प्राणहि वचन – भंग ना ॥ ' (२।२८।४)

हीं *रघुकुलांतील पुरुषांची रीत* आहे हें *जनकपति* जाणतात. राम तर रघुवर = सर्व रघुकुळांत श्रेष्ठ आहेत; ते कधींहि वचनभंग करणार नाहींत असा विचार जनकपति करीत आहेत.

(३) येथें मिथिलापति, विदेह, नाहींत; ते *जनकपति* आहेत. जनक कुळाचे स्वामी आहेत. जानकी जनककुलांतील आहे. १४ वर्षांच्या दण्डकारण्यानिवासांत

तिचें काय होईल याचा विचार जनकपतीचें मन करीत आहे. विचार करतां करतां निष्कर्ष निघाला कीं जनककुळांतील कन्या आहे पण वनवासांत ती वैदेही होणार ! तिचा देह राहीलसें वाटत नाहीं !

(४) ज्या परिस्थितींत राम व सीता आहेत त्या परिस्थितींतील आपल्या जावयाला व कन्येला भेटण्यास जाणारा प्रेमळ कन्यापिता कोणत्या प्रकारचे विचार करीत जाईल ? जावई माझ्या सांगण्यानें परत येतील काय ? आपण तसें सांगणें आपल्या कुळाला शोभेल काय ? आणि जावई परत न आले तर आपल्या सुंदर, परम कोमल व कोवळ्या पोरीचें काय होईल ? कन्येला परत नेलें तर काय होईल इत्यादि गोष्टींचा विचारच मुलीचा प्रेमळ पिता करीत जाईल कीं नाहीं ?

(५) जगांतील सर्व नातीं ज्याच्या मनाला तृणासमान वाटतात; ज्यानें सर्वस्वावर पाणी सोडलें आहे; 'प्रभूस्नेहिं शिशु मी प्रतिपालित' असें जो मनःपूर्वक समजतो; घरीं राहणें ज्यास महाहानि वाटते; व प्रभूंबरोबर वनांत जाणें ज्यास महा लाभ वाटतो त्यास, रामचंद्राबरोबर वनांत जाण्याची परवानगी मिळतांच त्याचें मन जे विचार करील ते येथें अशा शब्दभेदानें प्रगट केले आहेत. रघुनंदनजानकी, आणि जनकपति, रघुवरवैदेही यां शब्दांनीं किती व्यापक अर्थ व भावना प्रगट केल्या !

असलेंच आणखी एक उदाहरण —

दो० *कैकयनंदिनि* मंदमति करि कटु कुटिल पणास ।
दे *रघुनंदन जानकिस* सुखसमयीं दुःखास ।। (२।९१–)

असें निषादराज लक्ष्मणाला म्हणाला.

(१) **रघुनंदन व जानकी** रघुवंशांतील सर्वांनाच आनंद देत असत. कैकयी रघुवंशांतलीच म्हणून तिलाहि रघुनंदन सदा आनंदवीत असत व जानकीसुद्धां तिला आनंदाकार करीत असे. म्हणूनच त्याच रात्रीं कैकयीच कुबडीला **म्हणाली —**

विधि देइल जर जन्म कृपायुत । देवो सीता सून राम सुत ।।
राम मला प्रिय प्राणांहुनि तर' (२।१५।७–८)
'स्नेह विशेष करिति माझ्यावर । प्रेमपरीक्षा केली म्यां बरं ।। ६ ।।

(२) **कैकयनंदिनि** – कैकय देशाच्या राजाची कन्या कैकयी; ती कैकयनंदिनी ठरली ! आपल्या पितृकुळाला आनंद देणारी निपजली ! नातवाला राज्य मिळालें व लेकीच्या हातीं सर्व सत्ता आली कीं त्या कन्यापित्याला आनंद होणारच ! *कन्या उभयकुलानन्ददायिनी झाली* पाहिजे; कैकयी रघुकुलानंददायिनी तर नाहींच झाली; पण रघुकुलांतील सर्वांस आनंद देणाऱ्यांनासुद्धां ती आनन्ददायिनी झाली नाहीं ! उलट तिनें सर्वांस आनंद देणाऱ्यांना महा दुःख दिलें व तेंहि सुखाच्या समयीं ! कैकयी, रघुनाथ, रघुवर, सीता इत्यादि दुसरे शब्द वापरून वरील साधार अर्थ सहज निघाला असता काय ?

२. धरणी, अवनि, मेदिनी, मही इत्यादि – या सर्व शब्दांचा साधारण अर्थ पृथ्वी हा आहे; पण मानसांत हे विशेष अर्थानें वापरले आहेत. प्रत्येकाच्या विशेषार्थात भेद आहे.

(१) धरणी – ' सीता पितरप्रेमवश विकल भुले तनुभान ।
***धरणिसुता* धीरा-धरि … सुजाण ॥ '** (२।२८६)

धरणिसुता = भूमिकन्या, भूकन्या-सीता. *धारण करणारी ती धरणी*. येथें धीर धारण करण्याचा संबंध आहे, म्हणून धरणी शब्द वापरून *धरणिसुता* या नांवाची सार्थकता, ' *यथा नाम तथा कृतिः* ' धीरा धरि या शब्दांनीं दाखविली. सीता व धरणिसुता हे दोन शब्द एकाच दोह्यांत वापरून *पुनरुक्तिवदाभास हा अलंकार निर्माण केला*. ' धरणिसुता ' न म्हणतां ' ती ' हें सर्वनाम वापरलें असतें तर काव्य-सौंदर्य व अर्थगांभीर्य असें साधलें असतें काय ? भूकन्या, भूमितनया हे शब्द वापरून नांवाची सार्थकता दिसली असती काय ?

सूचना—*धरणी-धरणि; धरा*, हे *शब्द असतील तेथें कांहीं तरी धारण करण्याचा संबंध आहे असें मानसांत नक्की समजावें*. कांहीं ठिकाणीं धारण करण्याचा संबंध अगदीं स्पष्ट आहे. उदा० १।१२१।७; १।१६७।८; १।१८४; १।२६०।८; १।३५५।६; २।२३३।१; ६।३२।४; इत्यादि कांहीं ठिकाणीं इथल्यापेक्षांही अधिक गंभीर आणि आनंददायक भावार्थ आहे. धरनि, धरनी वगैरे मिळून ६० वेळां आहेत. मराठींत सर्व ठिकाणीं असतीलच असें खात्रीनें आज सांगवत नाहीं. रुजवात घेण्यास वेळ नाहीं. मात्र महत्त्वाच्या सर्व ठिकाणीं आहेच आहे. *असेंच इतर शब्दांचें आहे*.

(२) अवनि, मही; (२।२५२।६)

' बघुनि सरल सीते दो भावां । राणिस कुटिल पुरा पस्तावा ॥
***अवनि*-यमां मागत कैकेई । *माहि* न ठाव *विधि* मरण न देई ॥**

कैकई पश्चात्तापदग्ध होऊन अवनीजवळ ठाव मागते व यमाजवळ मरण मागते. पण मही ठाव देत नाहीं व विधि मरण देत नाहीं. (क) अवनि व मही या दोन शब्दांनीं ' *पुनरुक्तिवदाभास* ' *हा अलंकार निर्माण केला*. अवनि = रक्षण करणारी (अव् रक्षणे); मही—पूज्य, पूजनीय (मह् पूजायाम्). (ख) मला तुझ्या उदरांत ठाव देऊन या पश्चात्ताप-दाहापासून आणि लोकलज्जेपासून माझें *रक्षण* कर अशी विनंति भूमीला ती ' अवनि ' (रक्षण करणारी) आहे हें जाणून कैकयी करते. (ग) भूमी कैकयीला जणूं सांगते कीं मी *अवनि* असलें तरी मी *मही* आहें (पूज्य-पूजनीय आहें) मी जर विधि = नियम, प्रारब्धानें ठरविलेलें विधान भंग करीन तर माझ्या मही नांवाला कलंक लागेल म्हणून मी *अवनि* असूनही ठाव देत नाहीं. *मी विधीनें, विधिपूर्वक अवन करणारी आहें*. हे गूढार्थ इतर पर्यायांनीं दिसले असते काय ? *अवनि शब्द असेल तेथें रक्षण करण्याचा संबंध शोधावा*. २।६४।४ मध्यें ' *अवनिकुमारी* ' शब्द आहे तेथें हाच

अर्थ आहे पण फारच महत्त्वाचा आहे. २।३०८।४; २।३१३।४; ५।१२।८; ६।१२१।१९. अवनि, अवनी मिळून १४।१५ ठिकाणीं आहे.

(३) **मेदिनी** —(२।१९२।२). मेदयुक्त असलेली किंवा मेदमय झालेली (पृथ्वी).

प्राण देहिं तों फिरूं न चरणीं । रुंडमुंडमय करूं *मेदिनी* ॥

असें निषादराजाचें सैन्य राजास आश्वासन देत आहे. 'रुंडमुंडमय करूं कि धरणी' असें सहज म्हणतां आलें असतें व यमक उत्तम साधलें असतें; पण रुंडमुंडांना धारण करण्यांत *धरणी*चें वैशिष्ट्य नाहीं. मेदिनी शब्दानें सुचविलें कीं पृथ्वीला रुंडमुंडमय करूंच करूं पण *तिला मेदिनी* करूं. मेदमज्जामांसरक्त यांचा चिखल पाडून मेदिनी नांवाची सार्थकता करून दाखवूं. भू , भूमि, क्ष्मा, क्षमा, धरा, धरणी, अचला, पृथ्वी, वसुंधरा इत्यादि पृथ्वीवाचक शब्द असेच त्यांच्या व्युत्पत्तीच्या अर्थानुसार वापरले आहेत.

३. पंकज, सरोज, सरोरुह, पद्म इत्यादि :— पंकज = चिखलांत *जन्मलेलें*, सरोज-सरोवरांत जन्मलेलें, सरोरुह—तलावांतून वर आलेलें, पद्म—गति वाचक, पद—स्थान-वाचक आहे (पद गतौ).

(१) **पंजक**–'*संत चरण पंकजिं* सुप्रेमा' (३।१६।९) संतांच्या चरणांना म्हणजे लक्ष्मणें संतांना पंकज म्हटलें. (क) पंकज (कमल) चिखलांत जन्माला येऊनसुद्धां चिखलापासून व त्याच्या सर्व दोषांपासून मुक्त असतें; तसेंच संत या जगरूपी तलावां-तील मायारूपी कर्दमांत-पंकांत, विषयरूपी जलांत जन्माला येऊनसुद्धां या जगांतील माया व विषयजल यांपासून अलिप्त, मुक्त असतात, हें कांहीं न सांगतां पंजक शब्दानें सुचविलें. इतका व्यापक अर्थ कमल आदि शब्दांतून सहज निघाला नसता. (ख) शिवाय संतचरणिं अतिप्रेम (सुप्रेमा) कां करावयाचें हेंहि सुचविलें. ज्याचा संग करावा त्याचा रंग लागतोच; इत्यादि. या चरणांतील पंकज शब्दांत अधिक व्यापक अर्थ आहे; पण तो देण्याचें हें स्थान नव्हे; (गूढार्थचंद्रिका पाहा).

(२) **सरोरुह–'नील सरोरुह नीलमणि नील नीरधर श्याम**' (१।१४६।–) असें मनुशतरूपांपुढें *प्रगट झालेल्या भगवंताच्या रूपाचें वर्णन* आहे. येथें पंकज, सरोज, सरसिज, जलज, इत्यादि 'ज' कारांत शब्द वापरला असता तर 'जन्मास आले' असा अर्थ निघूं शकला असता, पण तेथें *जन्मास आले नसून भगवान प्रगट झाले आहेत*. दिसत नव्हते ते एकाएकीं दिसूं लागले. (रुह् प्रादुर्भावे) पाण्याच्या आंत असलेलें वर आलें म्हणजे दिसतें. तसेंच सर्वव्यापक भगवान दृश्य रूप धारण केलेले एकदम समोर दिसले.

(३) **सरोज–'जे पदसरोज मनोज-अरि-उर-सरिं सदैव विराजती ॥**' (१।३२४ छंद) मनोजाचे-मदनाचे शत्रु जे शंकर त्यांच्या उर-हृदय-रूपी सरोवरांत जे पद-सरोज विराजतात ते रामपद असें पुढें म्हणतात. येथें पदसरोज न म्हणतां 'चरणपंकज'

म्हटलें असतें तर वृत्तदोष उत्पन्न झाला नसता; पण अनर्थ झाला असता कीं शंकरांच्या हृदयांत पंक आहे; हा अर्थ वाचकांस उचित वाटतो का ? शिवाय चरण = भ्रमण हा अर्थ सुद्धां खोटाच ठरला असता. पंकज असण्यास पंक असलाच पाहिजे; पण मदनाचें दहन करणाऱ्या शंकरांच्या हृदयांत पंक नाहीं म्हणून पंकज म्हणणें महा अनर्थ. **(क)** 'पदसरोज' नें सुचविलें कीं प्रथम तें पद तेथें नव्हतें पण कांहीं काळानें ते शिव हृदयसरोवरांत जन्मास आलें. सरोरुह म्हटलें असतें तर *पूर्वींपासूनच होतें असा अर्थ झाला असता*. जलज म्हटलें असतें तर *हृदयाची विशालता* जशी सर-सरोवर शब्दानें सुचविली जाते तशी *सुचविली गेली नसती*. डबक्यांतसुद्धां जलज असतें.

(४) **पद्म** — '*वन्दे गुरुपद-पद्म*-परागा' (पद गतौ) पद्म शब्द गतिवाचक आहे. गुरु-संत असतातच, पण सर्वच संत गुरु होऊं शकत नाहींत-पात्रता नसते. पद्म शब्दानें सुचविलें कीं सद्‌गुरुपदांचा प्रभाव गतिदायक आहे. परमगति = मोक्ष किंवा इतर उत्तम गति त्या पायांच्या कृपेनेंच मिळूं शकेल. इतर कमलवाचक शब्द असेच हेतुपूर्वक धात्वर्थानुसार वापरले आहेत. कमल = कं जलं अलति भूषयति, किंवा कम कान्तौ यापासून झाला आहे. (४।१७।२ पाहा.)

४. जनक (मिथिलापति) **विदेह** – जेथें व्यवहारमग्नता, प्रवृत्तिपरता, जनक म्हणजे पिता व त्याचें कर्तव्य *इत्यादि संबंध असेल तेथेंच 'जनक' शब्द मिथिलापतीस वापरला आहे*. जेथें देहभावरहित दशा, निवृत्तिपरता, निर्मम-निरहंकार स्थिति, इत्यादि सुचवावयाचें असेल *तेथेंच विदेह शब्द* जनकराजास *वापरला आहे*.

(१) **विदेह — सहमुनिवृंद सहर्ष निघाले । उप-*विदेहपुर* सुशीघ्र आले ।।**
पुर-रम्यता *राम* जैं पाहाति । सानुज हर्षा *विशेष* पावति ।।
(बाल. २१२।४–५)

विदेहपुर — विदेह शब्दांत भावार्थ हा आहे कीं ज्याचें स्वतःच्या देहावरच प्रेम नाहीं, जो देहभानावरही नसतो त्याच्या नगराजवळ आले, विदेहराजाचें नगर असल्यामुळें तें सुंदर, सुशोभित शृंगारलेलें नसेल अशी कल्पना होती; पण नगर चांगलें साफ दिसूं लागलें तेव्हां कल्पना चुकीची ठरली व अनुभव अगदीं निराळा आला तो पुढल्या चौपाईत सांगितला कीं राम 'जो आनंदसिंधु सुखराशी' त्याला सुद्धां विशेष म्हणजे अपेक्षेपेक्षां जास्त हर्ष झाला. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

(२) **विदेह** — 'वदा विदेहें केविं जाणलें' (१।२९१।८) दशरथराजा जनकदूतांस विचारतात कीं माझ्या प्राणप्रिय कोमल, कोवळ्या वयाच्या व विश्वामित्र मुनींबरोबर असणाऱ्या बालकांना *विदेहानें कसें जाणलें, ओळखलें* तें सांगा. भावार्थ हा कीं ज्याला स्वतःच्या देहाचेंच भान नसतें त्यानें माझ्या रामलक्ष्मणांस सम्राटकुमार म्हणून बहुधा ओळखले नसतील, व त्यांचा योग्य मानसन्मान झाला नसेलच !

(३) अशाच औपरोधिक अर्थानें

'*बोलति बंदी* वचनावर ऐका सब महिपाल ।
आम्ही सांगू *विदेह-पण* भुज उचलून, *विशाल* ॥' (१।२४९)

भाटांच्या भाषणांतील भाव हा आहे कीं ज्याची स्वतःच्या देहगेहादिकांवर ममता नाहीं, त्याला इतरांच्या सुखदुःखांची काय कल्पना असणार ? धनुष्याचा भंग कोणी करूं शकणार नाहीं; व राजा ममतारहित असल्यानें प्रतिज्ञाभंग करणार नाहीं, व सीतेला रामासारखा सुंदर पति अनायासें मिळण्यासारखा असून, तिला अविवाहित राहावें लागेल. इ. इ. सर्व लोकांच्या भावना '*विशाल विदेहपण*' या शब्दांनीं सुचविल्या आहेत. निर्दय, व्यवहारशून्य इत्यादि अर्थ गर्भित आहेत. (गूढार्थचंद्रिकेंत विस्तार पाहा.)

'जनक' शब्द प्रवृत्तिपरता, प्राकृत पुरुषासारखे लोकव्यवहार इत्यादि संबंधसूचक वापरला आहे. *यांत अपवाद नाहींत.* जनकदूत, जनकपत्रिका, जनकपुरी असेंच म्हटलें आहे. प्रवृत्तिपरता असून विदेह शब्द आहे तेथें वक्रोक्ति आहे हें वरील उदाहरणांत आधींच दाखविलें आहे. मानसांत 'विदेह' फक्त २७।२८ वेळां आहे व जनक १०० पेक्षां जास्त वेळां वापरला आहे.

ल. ठे. — 'धेनुधूलि *वेला* विमल' झालेली पाहून विप्रांनीं *विदेहाला भानावर आणल्यानंतर* (१।३१३।१) पासून पाणिग्रहण होऊन सप्तपदीला प्रारंभ होईपर्यंत ३२४ छंद ३ पर्यंत 'विदेह' मुळींच नाहीं; ८ वेळां 'जनक'च आहे. पण श्रीरामास सीता समर्पण करून प्रार्थना करूं लागतांच जनक 'विदेह' बनले व प्रार्थना करतां आली नाहीं ! विवाह-विधींत नांवाचे विदेह होतें; पण त्या श्यामसुंदर मनोहर रूपानें त्यांस शेवटीं खरेच विदेह केले आहेत.

५. सीता–जानकी–वैदेही

(१) सीता—

उद्भवस्थितिसंहार–कारिणीं क्लेशहारिणीम् ।
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥ (बाल. मं. श्लो. ५)

अशी जी मूलप्रकृति, महामाया, आदिशक्ति किंवा ब्रह्मविद्या ती सीता; अथवा ब्रह्मविद्येच्या योगानें उत्पन्न होणारी जी शक्ति ती सीता; किंवा सीता = शीता (अ. व्या. सु.) शीतलता देणारी; यांपैकीं एखादा अर्थ सुचविणें असेल तेथें सीता शब्द वापरला आहे. हिंदी मानसांत सीता शब्द १४२ वेळां वापरला आहे पण बाल व अयोध्या काण्डांत सीता शब्दाऐवजीं सिय, सीय किंवा सीया हे शब्द एकंदर ३०९ वेळां वापरले आहेत तेथें सीता शब्दाचे हे अर्थ असतीलच असें नाहीं; त्यामुळें मराठींत या दोन काण्डांत सीता शब्दाची प्रतीति मिळेलच असें नाहीं; *अरण्य-काण्डापासून पुढें वरील अर्थाची प्रतीति मिळेल.*

(२) **जानकी** — हा शब्द जनकराजाची कन्या या अर्थानें जनकराजाचा संबंध दर्शविण्यास किंवा आनंददायिनी (चिदानंदलहरी), किंवा रामभक्ति (= रामवल्लभा) हे अर्थ सुचवावयाचे असतील तेथेंच वापरला आहे. उदा०— हा गुणखाणि *जानकी सीते !* (३।३०।७) असें सीताहरणानंतर विलाप करतांना रघुनाथ म्हणाले. जानकी = आनंददायिनी, व सीता = शीता, शीतलता देणारी. भावार्थ हा कीं आतां माझा सर्व आनंदच गेला व शीतलता नाहींशी झाली; त्यामुळें विरहाग्नीचा ताप आतां कसा सहन होईल ?

(क) **ल. ठे.**—रामास शीतलता पाहिजे ती कुठें मिळेना व सीतेला (शीतेला) अग्नि (रा = राम) पाहिजे होता तर कोणी देईना व कुठें मिळेना ! अशोकानें आग दिली असें तिला वाटलें पण ती ठरली राम–कर–मुद्रिका ! सुंदरकांडांतील रामसंदेश व त्यापूर्वीचा सीतेचा विलाप व अग्नि मागणें हीं प्रकरणें पाहावींत म्हणजे कौतुक वाटेल. (गूढार्थचंद्रिका पाहा).

(३) **पुष्पवाटिकाप्रकरणांत** — दो. २२७।१ पासून २३५।१ पर्यंत जानकी एकदांही नाहीं, सीता ५ वेळां आहे; पण २३५।२ मध्यें जानकी कुठें व कां आहे पाहा :—

प्रभु जैं जात *जानकी* जाणी । सुखस्नेह–शोभा–गुणखाणी ॥ २ ॥
परमप्रेममय मृदु मसि करिती । चारु चित्त-भित्तीवर लिहिती ॥ ३ ॥

जानकी जात आहे असें जेव्हां प्रभूंनीं जाणलें, तेव्हां त्यास आनंददायिनी झालेली ती जाणार म्हणजे आनंदच जाणार असें वाटलें; म्हणून तिला आपल्या सुंदर चित्तरूपी भिंतीवर चित्रित करून ठेवली ! बाहेर न दिसली तरी आंत पाहतां येईल व ती आनंद देईल.

(४) **विवाहप्रकरणांत** — दो. ३१० पासून ३२५ छंदापर्यंत जानकी एकदांसुद्धां नाहीं; *सीता* सात वेळां आहे, सर्वश्रेयस्करी, सर्वक्लेशहारिणी *ब्रह्मविद्या* (सीता) रामचंद्रांस समर्पण केल्याशिवाय जानकी = रामवल्लभा = ज्ञानोत्तरभक्ति, पराभक्ति प्राप्त होत नाहीं, हा मानसांतील श्रुतिसिद्धान्त असल्यामुळें रामविवाह झाला असें म्हटल्यावरच जनकानें जानकी शब्द ३२५ छंद ३ मध्यें वापरला आहे. ३२५।१ मध्यें आहे तो कवींनीं याच अर्थानें वापरला आहे. कोणताहि विशेष उल्लेख न करतां असे गूढ भावार्थ या शब्दकलेनें भरून ठेवलेले दिसल्यावर साश्चर्य आनंद वाटून परम आदर कां उत्पन्न होणार नाहीं ?

(५) **सीता —‘ संहारकारिणी ’** (मं. श्लो. ५) **माया** (५।३६।९-१०).

‘ **दुःखद तव कुल–कमल वनासी ।** *आली सीता* ***शीत निशासी*** ॥ ’ (५।३६।९) असें मंदोदरी रावणास म्हणाली. शीत निशा येऊन कमलवनांचा जसा संहार–नाश करते तसा तुझ्या कुळाचा संहार करण्यास **सीता आली आहे.**

ऐका नाथ ! विना सीतार्पण । तव हित करिति न शिवचतुरानन ॥ (५।३६।१०)

त्या संहारकारिणी सीतेला जर तुम्हीं रघुनाथास परत दिली नाहींत तर ती तुमचा विनाश करण्यास कारण होईल; व शिव–शंकर व ब्रह्मदेवसुद्धां तुमचें रक्षण करूं शकणार नाहींत.

(६) **वैदेही** — **' श्रुणु ! देवा रघुवीर कृपाकर । चर्म मृगाचें या अति सुंदर ।।**
सत्यसंध ! या वधुनि, चर्म तें । प्रभु ! आणा वैदेही **वदते** ।।
(३।२७।४–५)

वैदेही विदेहाचीच कन्या ! बापसे बेटी सवाई असलेली, जिला विषयवासना स्वप्नांतसुद्धां शिवत नव्हती, जिनें कधींच कांहींहि मागितलें नव्हतें, *अशी वैदेही* असून तिला तो सुवर्णमृग खरा वाटून त्याच्या चर्माची इच्छा झाली ! व तें आणण्याची आज्ञाच तिनें दिली हें आश्चर्य नव्हे काय ? ' हरिइच्छा भावी बलवान अति ' हें सुचविलें. रघुवीर, प्रभु, आणि सत्यसंध हे तिन्ही शब्द सहेतुक आहेत. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

(७) **वैदेही** — (सुंदर कां. ५।७). हनुमन्तानें रावणाच्या शयनागारांत काय काय पाहिलें, कसा कसा विचार केला व ' गुणखाणि जानकी सीता ' त्यांत नाहीं हें कसें ठरविलें *इत्यादि सर्व गोष्टी केवळ एका ' वैदेही ' शब्दानें सुचवून ठेवल्या आहेत.*

(क) रावणाच्या अंतःपुरांतील स्त्रियांच्या वर्णनांत वाल्मीकि रामायण सर्ग ९, १०, ११ खर्ची पडले आहेत; पण त्यांचें सारसर्वस्व श्रीतुलसीच्या अतुल शब्दकला-चातुरीनें परम माधुरीमय रीत्या एका शब्दांत सांगितलें आहे.

' दिसे करित तो मंदिरिं शयना । दिसे न वैदेही कपिनयनां ।। ७ ।।

तेथें रावणाच्या अंतःपुरांत, शयन केलेला रावण दिसला पण कपीच्या नयनांस *वैदेही दिसली नाहीं.*

(ख) वैदेही स्वभावतःच देहबुद्धिरहित, देहाभिमानरहित, विषयवासनाविहीन असणारी; त्यांत पतिव्रताशिरोमणि; रामचंद्रांसारख्या एकमेव अद्वितीय पतीच्या विरहानें शोकमग्न असणारी व त्यामुळें अतिकृशहि झालेली असणार.

' भोग रोगसम भूषण भारहि । यमयातना सदृश संसारहि ।। '
(२।६४।५)

इत्यादि प्रकारें पतिविरहित दशेचें जिनें वर्णन केलें आहे; ती विषयभोगांस स्पर्शसुद्धां करणार नाहीं, भूषणें तिच्या अंगावर दिसणार नाहींत; देहासक्ति नसल्यानें व राम-विरहपीडित असल्यानें स्नान, केशप्रसाधन, खाद्यपेयें इत्यादींचा तिरस्कार करणारी– अशीच *वैदेही* असणार; इत्यादि विरहिणी, पतिव्रताशिरोमणि वैदेहीचीं लक्षणें असणार असें रामदूत-कपीनें मनाशीं ठरविलें व तशा लक्षणांनीं युक्त वैदेही त्या अंतःपुरांत निरखून पाहतां त्यास दिसली नाहीं. तेथील शेकडों स्त्रियांचीं लक्षणें वैदेहीच्या अगदीं उलट दिसलीं.

(ग) वाल्मीकि रामायण सर्ग ११ श्लोक १–४१ यांत ज्या ज्या कारणांनीं हनुमंतानें ठरविलें कीं ' रावणाच्या जवळ झोपलेली ही स्त्री सीता असणें शक्य नाहीं ' तीं सर्व कारणें व ते सर्व विचार श्रीगोस्वामींनीं *एकच शब्द*, **वैदेही** *वापरून सुचविलें !*

आर्या - काव्यप्रतिभा अनुपम अतुला श्रीतुलसिचीहि शब्दकला ।
श्रीहरि-गुरु-प्रसादें प्रज्ञामन-मधुप मधुर रसिं रमला ॥

श्रीतुलसीच्या अतुल *कपीनें* (हनुमंतानें) परस्त्रियांचें सौंदर्य, त्यांचे परपुरुषांनीं अदर्शनीय अवयव; त्यांनीं भोगलेले विविध ग्राम्य, निंद्य भोग, इत्यादींचें एका अक्षरानेंहि वर्णन न करतां *वैदेही शब्दानें* सर्व जाणलें व सांगितलें.

(घ) *कपिनयनां* — येथें कपि शब्द कं आनंदं पिबति = कपि; रामकार्य करण्याच्या परम आनंदांत सर्व इंद्रियें व नयन रत असणारा, असा असल्यानें वाल्मीकीच्या हनुमंतासारखा पश्चात्ताप वगैरे यास झाला नाहीं.

६. राम, रघुवीर, रामचंद्र, रघुराया इत्यादि.

(१) **राम** — ' जो आनंदसिंधु सुख राशी । – तो सुखधाम राम तन्नाम ' (१।१९७।५-६) हा राम शब्दाचा मुख्यार्थ आहे. (क) *राम* – रमु क्रीडायाम्, *क्रीडा-लीला करणारा* या अर्थानेंहि राम शब्द वापरला आहे.

राम आणि रामु मिळून १४ शें पेक्षां अधिक वेळां राम शब्द मानसांत आहे. या सर्व ठिकाणीं संशोधन करणें समयाभावानें आज ६।७ वर्षांत घडलें नाहीं; म्हणून इतर *शब्दाप्रमाणें छातीठोकपणें उल्लेख करणें या जडमतीत जमत नाहीं !*

(२) **रघुवीर** – हा शब्द सुमारें १४४ वेळां वापरला असून सहा प्रकारच्या वीरतेपैकीं एक किंवा अधिक प्रकारची वीरता प्रत्येक ठिकाणीं दिसते. मराठींत फक्त एकाच ठिकाणीं रघुवीर ऐवजीं ' रघुराज ' घातला आहे तो अनुप्राससौंदर्यासाठीं आहे.) ' श्री रघुवीर वीरता ' प्र. प्र. १३।१३ पाहा.)

(३) **रामचंद्र** — १५।१६ वेळां आहे व त्या सर्व स्थलांतील वचनांच्या उपयोगानें निर्माण झालेला लेख प्र. प्र. ५।४ आहे.

(४) **रघुराया** — १९ ठिकाणीं सहेतुक आहे. प्र. प्र. ५।५ पाहा.

(५) **रघुनाथ** — सुमारें ९२ वेळां वापरला असून अनाथास सनाथ करणें किंवा अशाच प्रकारें ' नाथ ' शब्दाचा संबंध आहे.

(६) रघुराज, रघुराव किंवा रघुराणा (रघुराई, रघुराऊ इ.) — रघुवंशांतील राजाच्या कर्तव्याचा संबंध असेल तेथेंच आहे.

(७) **रघुपति** — रघुकुलाचे स्वामी या अर्थानेंच वापरला आहे.

(८) **रघुवर**—रघुकुलोत्तम, रघूत्तम, रघुकुलश्रेष्ठ. रघुवंशाचें ब्रीद पालन करणारांत श्रेष्ठ या अर्थानें वापरला आहे, एक उदाहरण पूर्वीं दिलें आहे. (*मानसांत श्रीरामसहस्रनाम सापडेल असें अनेक वेळां वाटलें व अद्याप वाटतें !* पण वेळेचा अभाव !)

(९) **रामभद्र** — मानसांत फक्त एकदांच आहे. (२।१९६।७) भद्र = कल्याण. सुखानंद कल्याणकारी हा अर्थ आहे.

७. शिव, शंभु, शंकर, इत्यादि – शंकराच्या नामाचे मानसांतील बहुतेक पर्याय सतीमोह प्रकरणांत आहेत व तें प्रकरण ' **मानस गूढार्थ चांद्रिका नमुना** ' नांवानें प्रसिद्ध झालें आहे. त्यांतच **दक्षकुमारी** सतीच्या सर्व नामांचा विशिष्ट उपयोग स्पष्ट केला आहे.

८. गिरिजा, पार्वती, शैलसुता —

(१) **गिरिजा**=गिरि–जा. ' गिरि जड सहज ' त्याचीच मुलगी गिरिजा ! म्हणून मुख्यतः जडता, अविवेक इत्यादि-दर्शक वापरला आहे. क्वचित् पर्वताची विशालता, परोपकारिता, अचलता, इत्यादि गुणनिदर्शक आहे. प्रत्येक ठिकाणीं कांहींतरी हेतु आहे व त्या त्या नांवानें सुचविला जाणारा गुणसमुच्चय अभिप्रेत आहे.

(२) **शैलसुता** — शिलांचा मोठा समुच्चय तो शैल त्याचीच कन्या ! कठोरता, काठिन्यदर्शक किंवा पर्वतांचे गुणदर्शक आहे.

९. हनुमान, पवनसुत, पवनतनय इत्यादि–श्रीरामप्रियतम, शिवावतार, श्रीअंजनी-नंदनाच्या अनेक नामांचा असाच सहेतुक उपयोग मानसांत केला आहे. त्यांतील कांहींचा भावार्थ उदाहरणांनीं प्रगट करून बाकीच्यांचें वर्णन अतिसंक्षेपानें करणें भाग आहे.

हनुमान (हनूमान, हनू), पवनसुत, पवनतनय, समीरसुत, प्रभंजनसुत, मारुति, मारुतसुत, मरुत्सुत, मरुतसुत, हे किंवा या अर्थाचे शब्द आणि कपि हीं नांवें मानसांत हनुमंतास वापरलीं आहेत. प्रत्येक ठिकाणीं नामाच्या अर्थानुसारच नामाचा उपयोग केला आहे.

(१) **हनुमान** — हें मुख्य नांव आहे. अतुलितबुद्धि किंवा अतुलित बल, पराक्रम, यांचा संबंध जेथें आहे तेथेंच हनुमान दिसेल. नामबोधक फार क्वचित् आहे.

(२) *पवनसुत*–पवन = पावन करणारा वायु, त्याचा सुत. (पुञ् प्रसवे, प्रसूतिवाचक आहे) पावनतेची उत्पत्ति हें कार्य जेथें असेल तेथें *पवनसुत* दिसेल.

(३) *पवनतनय* — (तन् विस्तारे) पावनतेचा विस्तार करणें हें कार्य असेल तेथेंच पवनतनय दिसेल.

(४) मारुत, मरुत, मरुत्–' येन वृद्धेन येन विना वा म्रियन्ते स मारुतः ' जो वाढल्यानें किंवा ज्याच्यावांचून मरण येतें तो मारुत, मरुत, मरुत्. तसेंच मारुतसुत, मारुति इत्यादि. [१] सागरलंघनास प्रारंभ केला तेथें

कितिदां तरि *रघुवीरा* स्मरला । *पवनतनय* बल बहुत उसळला ॥
***हनुमान* दे ज्या शैलिं पदाला । तो तत्क्षण गेला पाताळा ॥**
जैसा अमोघ रघुपतिबाण । त्याच तऱ्हें गेले *हनुमान* ॥

(१) वीराचें कार्य करावयाचें आहे म्हणून रघुवीराचें स्मरण केलें. (क) पावनत्वाचा विस्तार करणार हें ' पवनतनय ' नें सुचविलें. मैनाकाला स्पर्श करून त्याला अधिक पावन केलें आहेच. (ख) हनुमान शब्दानें सूचित अतुलित बलाची प्रतीति ' शैल पाताळांत गेला ' यानें दाखविली; पुन्हां हनुमान शब्द वापरला त्यानें अतुलित बुद्धि-बळाची प्रतीति मैनाकाला दिलेल्या उत्तरानें दाखविली.

(२) **सुरसा प्रकरणांत** पवनसुत व कपि हे शब्द वारंवार आहेत. एखाद्या रबराच्या बंद पिशवींत पवनाची अधिकाधिक प्रसूति-उत्पत्ति आपोआप व्हावी त्याप्रमाणें पवन-सुताचा कपिदेह भराभर मोठा होत गेला. तिला माता ! संबोधण्यानें पावनत्वाची उत्पत्ति केली. स्त्री असल्यानें तिला स्पर्श केला नाहीं यांतसुद्धां पवनसुतपणाच आहे. '*हनुमान्* वदले मला ग्रससिना ' यांत दोन अर्थ आहेत. ' मला कां गिळीत नाहींस ? ' हा वाह्यार्थ आहे व ' मला तूं गिळूं शकणार नाहींस.' हा गूढार्थ आहे. यांत बुद्धिवैभव आहे, आत्मविश्वासबल आहे व वचनचातुरी आहे. हें सर्व एखाद्या माकडानें सहज खेळ करावा त्याप्रमाणें लीलेनें केलें म्हणून ' कपि ' आहे.

(३) **छायाग्रह (सिंहिका) प्रकरणांत :—**

हनुमतासि **तसा छल ती करि ।** *कपि* **जाणे तत्कपट शीघ्र परि ॥**
तिज मारुनि *मारुतसुत* **वीर । गत वारिधी-पार मतिधीर ॥**

(क) **हनुमंत** यानें सांगितलें कीं अतुलित बल व अपार बुद्धिबल दिसणार. (ख) **कपि** – त्या घोर राक्षसीनें कपटानें-मायेनें फसवून ओढलें तरी कपि आनंदीच राहिला. (कं आनंदं पिबति). (ग) **मारुतसुत**–तिला कसें मारलें हें यानें सुचविलें आहे. अति सूक्ष्म, नसल्यासारखाच होऊन तिच्यांत शिरला व असा अपार वाढला कीं तिला मरण आलें. मारुत शब्दाचा अर्थ आधींच दिलेला पाहावा. (घ) **ज्याच्या-वांचून मरण येतें** या अर्थाचें उदाहरण :— रघुवीर येत आहेत वगैरे समाचार सांगण्यासाठीं विप्ररूपानें भरताकडे गेल्यावर कोण कोठले वगैरे भरतानें विचारलें तेव्हां,

' *मारुतसुत* मी **आहें वानर । हनूमान मम नाम कृपाकर ! ॥** (७।२।८)

त्या दिवशीं हनुमान-मारुति जर गेले नसते तर भरताचे प्राण राहिले नसते. आपोआप प्राण गेला असता किंवा अग्निप्रवेश केला असता. मारुतसुत भरतास भेटला नसता तर भरतास मरण आलें असतें. ' येन विना म्रियन्ते.' अशी आहे ' शब्दकला तुलसीची ! '

सूचना :— या शब्दाच्या उपयोगांत चार अपवाद लंकाकांडांत मुद्दाम केलेले दिसतात. ६५।७ मारुतसुतानें कुंभकर्णाला ठोसा मारल्यावर तो व्याकुळ होऊन खालीं कोसळला पण लगेच उठला; पण कुंभकर्णाच्या मुष्टिप्रहारानें मूर्छित पडलेला *मारुत-सुत* पुष्कळ वेळानें शुद्धीवर आला आहे. शरीरसामर्थ्यानें कुंभकर्ण श्रेष्ठ ठरला ! *ही रामाची इच्छा ! दर्शविली.* (क) ७३।८ मध्यें मेघनादाच्या मायायुद्धांत मारुतसुत असून व्याकुळ झाला आहे व ९५।८ मध्यें रावणाबरोबरच्या युद्धांत दोघांची बरोबरी

झाली आहे; पण त्यापूर्वीं दोघांनाहि हनुमंतानें मूर्छित पाडलें आहे! असें असतां आतांच उलट कसें झालें? 'उमे! करिति रघुपति नर-केली!' ही रामाची लीला दाखविली आहे. यांत हेतु हा कीं कोणाहि महावीर भक्ताला अभिमान, अहंकार होऊं नये!

लंकाकांडांत औषधी-आनयन प्रकरण (५६।९–६१) — या प्रकरणांत हनुमंताच्या नांवाच्या उपयोगाची खरी कसरत मोठी मनोहर आहे. यांत हनुमान शब्द फारच थोडा वापरला आहे. उड्डाण सुरूं करतांनासुद्धां हनुमान नाहीं! *प्रभंजनसुत* आहे. या भेदानें प्रथमच सुचविलें कीं नुसत्या देहबळाचेंच कार्य मुख्यतः घडेल. बुद्धिबल-श्रेष्ठता फारशी दिसणार नाहीं.

(१) **प्रभंजनसुत** – प्रभंजन = मोठा सोसाट्याचा मोडतोड करीत जाणारा वारा. याच्या कृतींत विवेक नसतोच. 'रामकार्य केल्याबिना कुठला मज विश्राम' असें ज्यानें विनयानें निक्षून सांगितलें व तसें केलें त्या वेळीं तो प्रथम निघतांनाच *हनुमान होता,* (५।१।८) मैनाकास उत्तर देतांनाहि *हनुमान होता.* (५।१।–) पण या वेळीं निघतांना हनुमान नसून प्रभंजनसुत आहे. 'निघे प्रभंजनसुत *बल भाषुनि* (६।५६।१). (**क**) या वेळीं कपटमुनीचा आश्रम खरा वाटला; त्या वेळीं सिंहिकेचें कपट ओळखलें. (**ख**) त्या वेळीं सहज ओळखलें कीं रावणाच्या अंतःपुरांत वैदेही नाहीं. या वेळीं औषधी ओळखतां आली नाहीं. (**ग**) त्या वेळीं सागरलंघन करून दोन अहोरात्र परिश्रम केले तरी विश्रांति घेण्याची किंवा जल पिण्याची इच्छा झाली नाहीं. या वेळीं कपटमुनीचा आश्रम दिसतांच जल पिऊन श्रम-परिहार करण्याची इच्छा झाली! (**घ**) सीताशोधापेक्षां हें औषधी नेण्याचें रामकार्य अधिक त्वरेनें करणें जरूर असतां विश्रांति घेण्याची इच्छा होऊन मुनीच्या आश्रमांत उतरलेहि. या सर्व गोष्टींचा मेळ *हनुमान शब्द दुर्मिळ!* यांत बसतो. (अध्यात्मदृष्टीनें फार सुंदर कारण आहे पण येथें विषयांतर नको. गूढार्थचंद्रिका पाहा).

(२) त्या मकरीलासुद्धां ओळखूं शकले नाहींत. पण कालनेमीचा वध करतांना देह-बलाबरोबरच बुद्धिबलाचा चांगला उपयोग केला; म्हणून तेथून निघतांना हनुमान आहे. (**क**) त्या आश्रमाचें दर्शन झालें तेथें मारुतसुत आहे; त्याची प्रतीति मकरीवध व कालनेमीवध यांनीं पुढें आली.

(३) वायु, समीर, प्रभंजन यांत जसा उत्तरोत्तर वेग व जोर वाढलेला दिसतो तसेंच वायुसुत, समीरसुत व प्रभंजनसुत वापरले तेथें दिसेल–दिसतो.

(४) यांत कपि शब्दाचा सामान्य अर्थहि पुष्कळ ठिकाणीं आहे. जेथें बुद्धि, शक्ति, गति, आवेश, ठार मारणें, वा आनंदमयता दिसत नाहींत व साध्या वानरासारखी दशा झालेली दिसते–असते, तेथें कपि शब्द वापरला आहे. उदाहरणें देऊन स्पष्ट करून दाखविणें आतां अशक्य झालें आहे. (उदाहरणांचें टांचण तयार आहे; पण !)

१०. लक्ष्मण (लछिमन), **रामानुज, सौमित्रि**— लक्ष्मण शब्द मूळ मानसांत फक्त एकदां आहे व तोहि संस्कृत श्लोकांत अरण्यकांडारंभीं. हिंदींत नामकरणाच्या वेळचें नांवच लछिमन आहे. मराठींत त्या ठिकाणीं सर्वत्र लक्ष्मण आहे. (१) **लक्ष्मण** = लक्ष्मणधाम रामप्रिय; (२) **रामानुज** = रामसेवक (रामानुग) या अर्थानें (३) **सौमित्रि** उत्तम मित्रतासूचक आहे. फक्त ७ वेळांच आहे.

११. रामसखा, निषादराज, गुह इत्यादि (१) **रामसखा** — राममित्रास शोभणारें किंवा रामसेवकास शोभणारें कार्य करणारा. (२) **निषाद** – जातिस्वभाव-दर्शक, वनमार्ग, शिकार इत्यादि सहज जाणणारा. (३) **निषादराज** – निषादांतील सद्गुणांची उत्कटता दाखविणारा किंवा राजाचें कर्तव्यसूचक आहे. (४) **गुह**– लपवालपव, कपट इत्यादि-दर्शक. (५) नावाडी (केवट)–नाविक-तारणें, संकटांतून, अडचणींतून पार पाडणें इत्यादि दर्शविण्यास वापरला आहे. अपवाद नाहींत.

१२. कौशिक, विश्वामित्र. (१) **कौशिक** — जेथें महाराजाचा अनुभव, क्षत्रिय-श्रेष्ठाचा स्वभाव, प्रजावात्सल्य इत्यादि पूर्वायुष्यांतले सद्गुण व तदनुसार कर्तव्य, किंवा पूर्वचरित्र विशेष दाखविणें असतें तेथें कौशिक, गाधिज, गाधिसुत आहेत. (२) **विश्वामित्र** – घोर तपचर्या व त्यायोगें प्राप्त ऐश्वर्य, प्रभाव, साधुत्व, जगमित्रता इत्यादि दर्शविणारा हा शब्द आहे.

१३. कुंभज, अगस्ति (**अगस्त्य**). (१) **अगस्ति** — अगम्-अस्यति. विंध्य-पर्वताला खालीं पडावयास लावणारा = अगस्ति. व त्याचें स्तंभन करणारा अगस्त्य. पण या दोन्ही अर्थांनीं अगस्ति वापरला आहे. या कृतीनें त्यांनीं जगावर उपकार केले म्हणून स्वतःच्या तपश्चर्येच्या प्रभावानेंच उपकार करणारा या अर्थानें, हा अर्थ-निदर्शक अगस्ति शब्द वापरला आहे. (२) **कुंभज,** घटज–लहान मूर्ति पण महान कीर्ति हा भाव दाखविण्यासाठीं, तीन आचमनांत सागर शोषण केलें यासंबंधानें वापरला आहे.

१४. रावण, दशानन. (१) **रावण** — शत्रूंना रडविणारा, विश्वविदित प्रतापी, अजिंक्य, अति दुष्ट, राक्षसाधम इत्यादि भावार्थदर्शक हा शब्द आहे. (२) दशानन, दशमुख, दशकंठ, दशशीर्ष इत्यादि शब्द दहा डोकीं, वीस कान, वीस डोळे, वीस बाहू इत्यादि आणि देहाची विशालतादर्शक वापरला आहे.

१५. गरुड, हरियान, खगेश, उरगारि इत्यादि. (१) **गरुड** — पंख असलेला असा शब्दार्थ आहे. पंखांचा संबंधसूचक किंवा विशेषनाम आहे. (२) **वैनतेय** – विनतासुत, विनय, नम्रता, यांचा संबंधसूचक आहे. (३) **हरियान** (हिं. हरिजान) मानसांत हरियान हा लेख उत्तरकाण्ड परिशिष्टांत पाहावा. ‘ मानस में हरिजान ’ हा लेख मानसमणींत प्रसिद्ध झाला आहे. हरियान ९ वेळां वापरला आहे. भगवंताचें वाहन हा असामान्य मोठेपणा, भगवंताच्या स्पर्शानें पावनता इ. दर्शक आहे.

याशिवाय हरि-यान हरींकडे गमन, हरिमार्ग, (भक्तिमार्ग) हरीचें गमन इत्यादि विविध गूढ, गूढतर, गूढतम भावार्थांनीं वापरलेला आहे ! परम आश्चर्यकारक कला दिसते. (४) **खगेश, खगेश्वर** – खगांवर सत्ता चालविणारा, खगश्रेष्ठ इत्यादि अर्थांनीं वापरला आहे. खगराज, खगपति, उरगारि, उरगाद, भुजगाद, पन्नगारि इत्यादि सर्व धात्वर्थानुसारच वापरले आहेत. विहंगपति, खगपति यांतसुद्धां सूक्ष्म भेद आहेत व मानसांत पाळले आहेत. येथें किती देणार !

१६. तरु, विटप—(१) **तरु** — तरन्ति अनेन, ज्यानें तरतात तो, तारक हा अर्थ दर्शविणारा आहे. (२) **विटप** – हा शब्द विटपी या अर्थानें वापरला आहे. अंशीकरितां अंश वापरणें हा एक अलंकार आहे. माणसांकरितां डोकीं, डोळे, मराठींत वापरतातच. मोठमोठ्या शाखा असलेला वृक्ष = विटप. या अर्थानेंच हा वापरलेला आहे. वृक्ष शब्द मूळांत असल्याचें आढळलें नाहीं. पादप फक्त पांच वेळां आहे. तरु व विटप ४८ व ४५ वेळां वापरले आहेत. १।२३२।३ मध्यें लता; ३।१०।११ मध्यें तरु आणि ४।८।८ मध्यें विटप या शब्दांचे भावार्थ गूढार्थचंद्रिकेंत पाहिल्यावर आश्चर्यानें थक्कच व्हावें लागेल.

१७. अग्नि (अगिनि), पावक, कृशानु, अनल. (१) **अग्नि** — हा गतिवाचक शब्द आहे. मूळांत अगिनि असा कठोरतारहित करून वापरला आहे; मराठींत ' अग्नि 'च वापरावा लागला. वह्नि कठोर; मानसांत नाहीं. (२) **कृशानु** – (**कृसानु**) कृश करणारा, विनाश करणारा अग्नि या अर्थानें वापरला आहे. (३) **अनल** – कधीं तृप्ति न पावणारा या अर्थानें वापरला आहे. मदन-अनल, विषय-अनल, म्हटलेलें दिसेल. विषयपावक, कामपावक म्हटलेलें सांपडणार नाहीं. कारण कामवासना, विषयेच्या कधीं तृप्त-पूर्ण होत नाहीं. (४) **पावक** – पावन करणारा, पावन करणें दाखविण्यासाठींच वापरलेला दिसेल. योग–अग्नि असाच उल्लेख बहुधा मिळेल फक्त एकदां योगपावक आहे पण सहेतुक आहे. योगकृशानु म्हटलेलें दिसणार नाहीं. (१।२१०।५ गूढार्थचंद्रिका पाहा).

१८. सूर्य, भानु, रवि, दिनकर, दिवाकर — (१) **सूर्य** — गतिदर्शक, कर्मप्रवर्तक इत्यादि सूचक आहे, पण उच्चारांत कठोर असल्यानें हिंदी मानसांत वापरलेला नाहीं. (२) **भानु, भास्कर** – आकाश अभ्राच्छादित असतां सूर्याला भानु, भास्कर म्हणतां येणार नाहीं. प्रकाशमान दैदीप्यमान सूर्य या अर्थानेंच वापरला आहे. (३) **दिनकर, दिवाकर** – मानसात मोहाला निशा, रात्र म्हटलें असल्यानें दिनकर–दिवाकर = ज्ञानरूपी दिवस करणारा या अर्थानें बऱ्याच ठिकाणीं दिसेल; विशेषतः रूपकादि अलंकारांत हा गूढार्थ आढळेल. (४) **तरणि** – तारणारा, उद्धार करणारा या अर्थानें आढळतो. (५) **रवि** – या शब्दाचा भरणाच जास्त आहे, रूयते-स्तूयते स्तुत्य, प्रशंसनीय यासंबंधानें बऱ्याच ठिकाणीं दिसतो. रविवंश, रविकुल, रविमणि

इत्यादींत हाच संबंध आहे.

१९. जल, वारि, पाणी, पाथ, नीर इत्यादि. (१) **जल आणि वारि** — पाप, मल, इत्यादि दूर करणें हें सुचवितात. मात्र सर्वत्र याच अर्थानें वापरले आहेत असें खात्रीपूर्वक सांगण्यास संशोधन करावें लागेल. (२) **पाणी** – (सं. पानीय) पिण्यास योग्य असें जल. ' भूवर पडतां पाणि गढुळलें ', (४।१४।६). (३) **पाथ** – (पा रक्षणे) संरक्षण करणारें जल; गंगा, शरयू इत्यादि पावनसरितांचें. (४) **नीर** – नेलें जाणारें, निश्चयानें सुख देणारें इत्यादि विविध अर्थदर्शक आहे. ' नील *नीरधर* श्याम ' (१।१४६) यांत सुखदायकत्व अभिप्रेत आहे. या अशा अर्थभेदांनुसार कल्पनातीत भावार्थ प्रगट होतात. (गूढार्थचंद्रिका, २।१०१।६; २।१०१; २।२८३।१ नमुन्या दाखल पाहणें).

२०. भृंग, भ्रमर, मधुप, मधुकर—(१) **भृंग व भ्रमर** —गुंजारव करीत भ्रमण करणारा. (२) **मधुकर** — फुलांतील रस-मधु-मकरंद घेऊन संग्रह करणारें; सारग्राहक, या अर्थाचें निदर्शन करण्यासही वापरला आहे. (३) **मधुप** — मधुपान करीत बसलेला. इतर शब्द असेच धात्वर्थानें वापरले आहेत.

२१. कर, पाणि— (१) **कर** (हात)– हा कृतिवाचक, कृतिदर्शक शब्द आहे. (२) **पाणि** (हात) पा–रक्षणें रक्षणाचा संबंधदर्शक वापरला आहे.

२२. चरण, पद, पाद—(१) **चरण** — गमन, आणि भ्रमण इत्यादि सूचक आहे. (२) **पद** — धाम, सद्गति, प्राप्ति इत्यादि दर्शक वापरला आहे. (**क**) भगवंताविषयीं वक्ता पदकमल, चरणकमल इत्यादि शब्द जेव्हां वापरतो तेव्हां तेथें तो दास्य-भक्ति, सेव्यसेवक-संबंधसूचक असतो.

२३. पुरुष, नर, मनुज — (१) **पुरुष** — हा शब्द मर्दपणा, पौरुषसूचकच वापरला आहे. ' पुरुष मनोहर निरखत नारी ' (३।१७।५) टीका पाहावी. (२) **नर** = ' नॄन् पूर्वपुरुषान् उत्तमां गतिं नयन्ति ' पूर्वजांना उत्तम गतीला नेणारा तो नर या अर्थानें धर्माचरणी मनुष्यसूचक बऱ्याच ठिकाणीं आढळतो. (३) **मनुज** –मनुपासून जन्मलेला हा अर्थ कांहीं ठिकाणीं आहे.

२४. सुर, देव, विबुध, अमर इत्यादि — (१) **सुर** — हा विशेष प्रमाणांत सामान्यार्थानेंच वापरला आहे. दोन मात्रांचा व कोमल असल्यानें याचा उपयोग जास्त प्रमाणांत केलेला दिसतो. देव, अमर, विबुध, वृंदारक, व लेख (= देव) हे मात्र धात्वर्थानुसार वापरले आहेत आणि विविध रमणीय भावार्थ प्रदर्शिले आहेत.

२५. ब्रह्मा, विरंचि, चतुरानन, विधि (१) **ब्रह्मा** — वृद्धि करणारा, (२) **विरंचि** (विरिंचि) = विशेष किंवा विरुद्ध रचना करणारा या अर्थानुसारच वापरला आहे; उदाहरण ' पुनरुक्तिवदाभास ' (प्र. ८।९) प्रकरणांत पाहावें. (३) **विधि** – हा शब्द इतरांपेक्षां जास्त वापरला आहे जसा सुर. कांहीं ठिकाणीं विधि = ***विधान***

ठरविणारा हा अर्थ आहे. (४) **चतुरानन** – चार मुखांचा; गूढार्थ चतुर + आनन = चतुर वक्ता.

अशा रीतीनें दुसरे पुष्कळ शब्द वापरले आहेत. थोड्या शब्दांचीं उदाहरणें देऊन बाकीच्यांचें अतिसंक्षेपानें वर्णन केलें तरी लेखमर्यादा ओलांडली गेलीच. 'थोड्यानें उमजे सुज्ञांना' म्हणून अतिसंक्षिप्त वर्णनसुद्धां येथें थांबविणें भाग आहे.

या प्रकरणांतील वर्णनांची मानसपीयूष टीकेंतील वर्णनांशीं कृपया तुलना करून पाहावी ! 'त्वरा वा गतिनिदर्शन-कला' हें पुढलें प्रकरण आहे. कार्यांतील त्वरा वा गति सुचविण्यासाठीं फारच रम्य नाट्यकलेचा उपयोग केला.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।७ 卐 卐 卐

त्वरा वा गतिनिदर्शन-कला

एखाद्या कार्यांतील त्वरा किंवा गमनांतील शीघ्र गति निदर्शनास आणण्यासाठीं मानसांत, त्या ठिकाणीं आवश्यक असणारें—वाटणारें कांहीं वर्णन गाळलें आहे. त्वरा वा गति जितकी जास्त तितका अध्याहार जास्त करावा लागतो. त्वरेचें एकच उदाहरण घेऊं.

१. कार्यांतील त्वरानिदर्शन उदाहरण – संदर्भ – रामचंद्रास यौवराज्याभिषेक करण्याचा मनांतील विचार दशरथांनीं *वसिष्ठगुरुजींकडे जाऊन* त्यांस निवेदन केला. त्यांनीं संमति देतांना सांगितलें कीं,

'*त्वरा करा* न विलंब नृप' (२।२।४)

त्याप्रमाणें घरीं येतांच सचिवांना आणवून गुप्त खाजगी सभेंत त्यांची संमति मिळतांच सचिवांस सांगितलें,

दोहा – 'भूप कथिति, मुनिराजजी आज्ञा देतिल कांहिं ।
रामराज्य-अभिषेकिं *ती सत्वर पूर्ण करा* हि ॥' (२।५।–)

असें हें त्वरेचें लोण वरून खालीं भराभर चाललें आहे.

जेथें दशरथानें सचिवांस आज्ञा दिली तेथें मुनिराज = वसिष्ठ हजर नाहींत; ते अयोध्येच्या दक्षिणेस नगराबाहेर आपल्या आश्रमांत आहेत; असें असतां वरील दोह्याच्या पुढल्याच चौपाईत काय दिसतें पाहा :—

'म्हणति मुनीश मुदित मृदु वाणीं । आणा शीघ्र तीर्थवर पाणी ॥' (२।६।१)

इत्यादि. राजाज्ञेप्रमाणें सचिव त्या सभेंतूनच गेले; वसिष्ठांकडे पोंचले व रामराज्याभिषेकासाठीं काय काय तयारी करावयाची तें सांगावें अशी विनंति वसिष्ठांस केली इत्यादि मुळींच सांगितलें नाहीं व एकदम मुनिश्रेष्ठच बोलूं लागले.

एवढा सगळा भाग अध्याहृत कां ठेवला ? एवढ्या मजकुराच्या ओळी उच्चारण्यास जितका वेळ लागला असता तेवढ्या वेळांत मुनिराजांचें अर्धे अधिक भाषण होऊन गेलें असतें. सार हें कीं सचिवांनीं जी अति त्वरा केली ती दाखविण्यासाठीं एवढा भाग अध्याहृत ठेवला.

मानसनाट्य-महाकाव्य आहे. पडद्यापुढून एका बाजूनें दशरथ घरांत गेले व दुसऱ्या बाजूनें सचिव पळत गेले हें प्रेक्षकांना दिसलें. पुढल्या प्रवेशाचा पडदा वर ओढण्यास जो वेळ लागला तेवढ्यांत नवीन प्रवेशाच्या दृश्यांत सचिव गेले, नमस्कार केला व विनंति केली. पडदा वर जातांच प्रेक्षकांस दिसलें कीं सचिव हात जोडून बाजूस उभे आहेत व मुनिराज बोलूं लागले. सचिवांनीं केलेली त्वरा नाटकांत अशीच दिसेल.

सूचना :— येथें टीकाकार निराधार कल्पना कशा करतात व त्या मानसांतील संदर्भांशीं विसंगत कशा आहेत याची चर्चा वरील दोहा व चौपाई यांच्या टीकेंत गूढार्थ-चंद्रिकेंत मुद्दाम पाहावी.

२. **गतिनिदर्शनाचें एक उदाहरण संदर्भ** — हनुमान सागर लंघनास निघून त्यांनीं उड्डाण केलें, तेव्हां :—

जैसा अमोघ रघुपति बाण । त्याच तऱ्हें गेले हनुमान ॥

जलनिधि रघुपतिदूत-विचारीं । मैनाका तूं हो श्रमहारी ॥ (५।१।८-९)

दो. — हनुमान कर लावी त्याला करी प्रणाम ।

रामकार्य केल्याविना कुठला मज विश्राम ॥ (५।१।–)

हनुमान आकाशांतून अद्भुत-वेगानें रामबाणासारखे चाललेले पाहून जलनिधीनें विचार केला कीं हा रामदूत आहे. हा दमला तर रामकार्याचा विनाश होईल; व हा रामदूत खाऱ्या पाण्यांत पडून मरेल; म्हणून यास विश्रांति घेतां येईल अशी सोय करणें जरूर आहे. असा विचार करून जलनिधि मैनाकाजवळ गेला, त्यास सर्व हकीकत सांगितली व म्हणाला कीं हे मैनाका तूं श्रमहारी हो. यांतील किती मजकूर ९ व्या चौपाईंत गाळला याचा विचार करावा.

वाल्मीकि रामायण सुंदरकांड सर्ग १ मध्यें सागर विचार करूं लागल्यापासून (श्लोक ८७) मैनाकास सांगणें पुरें झालें श्लोक १०० मध्यें; आणि मैनाकाचें वर येणें, त्यानें हनुमन्तास विनंति करणें व हनुमन्ताचें उत्तर १३२ पर्यंत आहे; म्हणजे **एकूण ४५ श्लोकांत हें वर्णन आहे. पण येथें केवळ तीन ओळींत !**

(२) मैनाक केव्हां, कसा व किती उंच वाढला; त्यावर जल, फल, मूल, द्रुम, लता, इत्यादि रमणीयता कशी होती; त्यानें हनुमन्तास काय प्रार्थना केली; हें सर्व येथें अध्याहृत ठेवलें आहे. 'हनुमान कर लावी' इत्यादि वर्णन केलें आहे. (क) हनुमान इतक्या द्रुत गतीनें जात होते कीं त्यांच्याबरोबर कल्पनेनें जात असतां सर्व गोष्टी वर्णन करणें कवीला अशक्य झालें. (ख) रामकार्यांत किती त्वरा केली पाहिजे

हें येथें दाखविलें.

(३) ल. ठे. — मानसांतील हनुमन्तानें दिलेलें उत्तर वाल्मीकि व अध्यात्म रामायण इत्यादींतील उत्तराहून अत्यंत श्रेष्ठ व रामसेवकांचें ब्रीदवाक्य होण्यास अगदीं योग्य असें अद्वितीय आहे. एकमेवाद्वितीय काव्यांत हनुमंताच्या मुखांत असें उत्तर नसेल तरच नवल !

नाट्यकाव्यांत लांबलचक वर्णनाची आवश्यकता नसते व असूं नये. सागरानें मैनाकाकडे जाणें व लगेच त्यानें जलांतून वर येऊन वाढणें इत्यादि गोष्टी आणि पर्वतावरील निसर्ग रमणीयता इत्यादि रंगभूमीवर (चित्रपटांत) प्रत्यक्षच दिसतात!

येथें जितका संक्षेप केला आहे तेवढा मानसांत कुठेंहि नाहीं. संक्षेप करून त्वरा-गति-निदर्शन केल्याचीं ४०।५० तरी उदाहरणें आहेत. येथें प्रत्येक प्रकाराचें १।१ उदाहरण दिलें. *श्रीतुलसींच्या अतुलनीय कलेचे मासले दाखवून मानसाच्या अवलोकनाची दिशा दाखविणें इतकाच हेतु येथें आहे.*

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।८ 卐 卐 卐

विरोधानें उठावदार चित्रें

अगदीं संक्षिप्त वर्णनानें दोन विरोधी भावनांचीं व स्वभावाचीं उठावदार चित्रें निर्माण करण्याच्या कलेचे थोडे नमुने पाहावे.

शेक्सपीअरच्या हॅम्लेट नाटकांत दोन व्यक्तींचें पुष्कळ वर्णन करून मग म्हटलें कीं, ' Look at this picture and that हें चित्र पाहा नि तें चित्र पाहा ! ' तसें विस्तृत वर्णन न करतां व हें चित्र पाहा नि तें चित्र पाहा इत्यादि कांहीं न सांगतां स्वभावचित्रनिर्मिति कशी केली आहे पाहा :—

१. श्रीरामराज्याभिषेकाची तयारी घाईघाईनें चालली आहे त्या समयींचें वर्णन आहे :—

अयोध्येंतील **' पुरुष परस्पर वदती नारी ॥**

उद्यां मुहूर्त विलंब न फार किं । पुरविल विधि अभिलाषा-सार किं ॥

कांचन सिंहासनिं सह सीते । बसतां राम, किं होइ मनीं तें ॥

उजाडेल कधिं सर्वहि म्हणती ॥ (अयोध्या. ११।३–६)

हें नगरजनांच्या भावनेचें व स्वभावाचें चित्र आहे. स्वर्गस्थ देवांच्या भावनेचें व स्वभावाचें हें चित्र पाहा:—

देव कुचाळी विघ्न विनवती ॥

त्यां नगरोत्सव क्षण बघवे ना । चोरा चांदणि रात्र रुचे ना ॥

आवाहुनि शारदेस विनवति । घडि घडि धरिती पायां पडती॥ (अयोध्या. ११।६–८.)

यावर मल्लिनाथीची आवश्यकता नाहीं. या दोन शब्दचित्रांकडे पाहून, त्यांच्या भावनांची व स्वभावाची, मनुष्य व स्वर्गांतील देव यांची, तुलना करून कोणतें आवडतें तें ठरवावें आणि 'उच्च निवास नीच कर्तूती' असा निष्कर्ष काढावा. निरंकुश सत्ताधीश आणि साधारण जनसमाज यांत अशीं भिन्न चित्रें हल्लींसुद्धां दिसतात कीं नाहीं याचा विचार करावा.

२. रामराज्याभिषेक–वनवास प्रकरणांतील उदाहरण :— अयोध्येंतील लोक आपसांत म्हणतात,

'भ्रमूं योनिं जे जे कर्मानें । तिथें अम्हां द्यावें ईशानें ॥
दास अम्हीं स्वामी सीतापति । हें नांदो नातें अंताप्रति ॥
अशि अभिलाषा पुरिं सर्वां हो !।

आतां अयोध्येंतीलच हें पाहा दुसरें चित्रः—

'कैकयसुता-हृदयिं अति दाहो ॥
कोण न नासे मिळुनि कुसंगति । नाहिं चतुरता उरत नीचमतिं ॥
(अयोध्या. २४।५–८)

एक चित्र आहे राममित्र आणि अयोध्येंतील पुरुषांचें, व दुसरें चित्र कोणाचें आहे हें चित्रांतच दिसतें ! एक सुसंगतीच्या परिणामाचें व दुसरें नीचांच्या कुसंगतीचें अशीं हीं दोन चित्रें आहेत.

३. दशरथ–कैकयी—

दो० — **सांज-समयिं सानंद नृप जाती कैकयि-गेहिं ।**
निष्ठुरतेप्रति गमन करि जणुं कीं स्नेह सुदेहि ॥ (अयोध्या. दो. २४)

कैकयीरूपी निष्ठुरतेकडे सुंदर देहधारी स्नेह दशरथांच्या रूपानें चालला जात आहे. चेतनोक्तीनें दोन चित्रें !

◆◆◆◆

८।९

शब्दांतील पुनरुक्तिवदाभास

श्रीतुलसीरामायणांत 'पुनरुक्तिवत् आभास' या अलंकाराचे प्रकार व उदाहरणें पुष्कळ आहेत. समानार्थक दिसणाऱ्या दोन शब्दांतील पुनरुक्तीविषयीं या प्रकरणांत लिहावयाचें आहे. पर्याय म्हणून वापरल्या जाणाऱ्या शब्दांतील सूक्ष्म भेद न समजल्यामुळें अर्धवट शब्दज्ञानी म्हणतात व म्हणतील कीं पुनरुक्ति दोष आहे. कोणी टीकाकार दोषनिराकरणाचा प्रयत्न करतात व समाधान मानतात; पण *माननें आणि होणें यांत महदंतर !* क्षुधाशांति होणें आणि झाली असें माननें यांसारखाच भेद !

ज्या उदाहरणानें प्रथम मार्ग दाखविला व एक दृष्टि दिली तेंच प्रथम पाहा :—

१. लंकिनी सांगते, '*ब्रह्मा* **देउनि वरा रावणा । गत** *विरंचि* **मज वदुनि लक्षणा ॥ विकल होसि तूं कपिच्या मारें । तदा समज, हत निशिचर सारे ॥**' (५।४।६–७)

(१) **ब्रह्मा** = ब्रह्मदेव = विरंचि हा अर्थ पुष्कळांस माहीत असल्यानें असें मत होतें कीं येथें द्विरुक्तिदोष आहे.

मानसपीयूष–संपादकांनीं सुंदरकाण्डाची प्रथमावृत्तीची एक प्रत पाठविली व तींत नसलेले भावार्थ लिहून पाठविण्याची गळ घातली तेव्हां हिंदी टीका लिहीत असतां आरंभींच ही भासमान द्विरुक्ति दिसली. हिंदी टीकाकारांनीं केलेलें समाधान पाहिलें; पण या चिकित्सक बुद्धीचें समाधान झालें नाहीं. तेव्हां आंतून प्रेरणा मिळाली कीं त्या दोन शब्दांच्या अर्थांतील भेद पाहावा. '*अमरव्याख्यासुधा*' ही अमरकोषाची टीका काढून पाहिली तेव्हां असा आनंद झाला कीं टाळी वाजविली गेली ! तो अर्थ असाः– ब्रह्मा = वृद्धि करणारा. 'बृंहति वर्धयति प्रजाः बृहि वर्धने' (अ. व्या. सु.)

(२) ब्रह्मा देउनि वरा रावणा — रावणाला वर दिला, म्हणजेच त्याचें ऐश्वर्य, सत्ता, शक्ति, शौर्य, वीर्य, धैर्य इत्यादींची वृद्धि केली म्हणून ब्रह्मा (हिंदींत ब्रह्म) शब्द यथार्थानें वापरला. नांव विश्वंभर आणि पोट भरत नाहीं स्वतःचें ! असें घडलें नाहीं. रावणासारख्याची वृद्धि झाली कीं कुठें तरी आणि कोणाच्या तरी सुख, संपत्ति, सत्ता, ऐश्वर्य इत्यादींचा क्षय होणारच ! (क) इतरांचा हा क्षय केव्हांतरी थांबवावा लागणारच. अर्थात् रावणाच्या क्षयाची व्यवस्था करावी लागणारच. ही व्यवस्था केली केव्हां व प्रत्यक्ष दिसेल केव्हां याची खूण विरंचिनें लंकिनीला–लंकादेवीला सांगितली होती.

(३) रावणाची वृद्धि, भरभराट करणारा वर त्यास दिला आणि ब्रह्मदेव ब्रह्मलोकास जाण्यास निघाले त्याच दिवशीं 'विरंचीनें' रावणाच्या विनाशाचें पूर्वलक्षण, जातां जातां लंकिनीस सांगितलें. (क) **विरंचि**–(विरिंचि) = विरुद्ध रचना, विरुद्ध यत्न, करणारा. 'विरंचि' आणि 'विरिंचि' हे दोन्ही शब्द रिच् रेचयति किंवा 'रिच प्रतियत्ने' विरुद्ध यत्न करणें यांपासून बनले आहेत. *विशेष रचना* किंवा *विरुद्ध रचना – प्रयत्न, करणारा तो विरंचि.*

(४) *ज्या वेळीं रावणाला वर दिला त्याच वेळीं त्याच्याविरुद्ध रचना–योजना–* (उपाय) *करून ठेवली गेली; हें विरंचि शब्दानें सांगितलें.* ती रचना म्हणजेच रामावताराची व त्यांतील मुख्य घटनांची योजना त्याच दिवशीं निश्चित केली गेली. (क) हे अर्थ सांपडले नसते तर असा उल्लेख करावा लागला असता कीं या भासमान द्विरुक्तीचा उलगडा अद्याप झाला नाहीं व टीकाकारांनीं केलेलें समाधान समाधानकारक नाहीं. या एका प्रसंगामुळेंच श्रीतुलसीदासांच्या पावन शब्दकला माधुरीचा उत्तम रसास्वाद पुढें पदोपदीं घेतां आला, हें केवळ *श्रीहरिगुरुकृपेनें*

ग्रंथावलोकनाची प्रेरणा दिल्यामुळेंच घडलें !

२. **प्रेमें** *वायस* **फार पाळले ।** *काक* **निरामिष कधीं जाहले ॥** (१।५।२)

या चौपाईत *वायस* आणि *काक* हे दोन शब्द वापरल्यानें द्विरुक्तिदोष दिसतो; पण हा दोष नसून अलंकार आहे. **वायस** शब्द 'वय गतौ' **विशिष्ट गतिदर्शक आहे;** आणि **काक** 'कै शब्दे' **विशिष्ट आवाजदर्शक आहे.** भावार्थ हा कीं कावळ्याची कुटिल-दुष्ट, गति-चाल, रीत, मनाची ठेवण आणि त्याचा कठोर कर्कश आवाज यांतसुद्धां बदल होणार नाहीं. काकनिरामिष होणार नाहीं हें सांगून शिवाय वरील अर्थ ध्वनित केला. हा द्विरुक्तिदोष नाहीं हें ठरविण्यासाठीं *टीकाकारांनीं विणलेलें कल्पनांचें जाळें* (मानसपीयूषमध्यें) *मुद्दाम पाहावें.*

३. **मग** *नारद* **पोचले** *शिवा***प्रति । जित मी कामा गर्वे मनाप्रति ॥**
मारचरित *शंकरांस* **सांगति । प्रिय अति जाणुन** *महेश* **शिकवलि ॥**
(बाल. १२७।५-६)

पहिल्या चरणांत नारद शब्द वापरला म्हणून तो पुढील तीन चरणांत पुन्हां वापरला नाहीं; किंवा मुनि इत्यादि पण नाहीं. शिव शब्द प्रथम चरणांत असून पुढें सर्वनाम न घालतां शंकर आणि महेश हे आणखी दोन शब्द वापरले. शिव = शंकर = महेश म्हणून येथें पुनरुक्तिदोष आहे असें वाटतें, व साधारण लोक आणि साहित्यिकसुद्धां म्हणतात !

(१) **शिव** — शिवं शान्तमूर्तिं, 'चिदानन्दरूपः शिवः' अशांकडे नारद गेले. भावार्थ हा कीं नारदांनीं प्रणाम वगैरे केला नाहीं तरी शिव शिवच राहिले; त्यांनीं नारदाचें स्वागत, विचारपूस वगैरे कांहीं केलें नाहीं किंवा रुद्रहि बनले नाहींत, निष्क्रिय शान्त राहिले. पण नारदाला कामजयाचा मोठा गर्व झाला आहे त्यामुळें त्यास विनीत, शांत, स्वस्थ राहवेना.

(२) **शंकर** — शं-कर, शं = कल्याण, करणारा तो शंकर; कैलासनाथ असे आहेत. रामभक्तांचें, शरणागतांचें कल्याण करणारे आहेत हें जाणूनसुद्धां व ते 'रामभूपप्रिय' आहेत हें माहीत असूनसुद्धां त्यांस शंकर असें हरिगुणगान ऐकविलें नाहीं; आणि शंकरांसारख्यांनासुद्धां मार देऊन नरम करणारा जो मार-मदन-कामदेव त्याचें चरित्र म्हणजे स्वतःच्या कामविजयाचें चरित्र सांगितलें !

(३) शंकरांनीं विचार केला कीं हरिप्रिय देवर्षींची ही वृत्ति शं-कर नाहीं; त्याचें कल्याण करणारी नाहीं. शिवाय शंकरासही नारद प्रिय आहेत, म्हणून त्या हरिभक्ताचें *शं-करण्यासाठीं शंकरांस महेश बनावें लागलें.*

(४) **महेश** — महान् ईश. आपली मोठी ईशन शक्ति वापरून नारदाचें कल्याण करण्याचें त्यांनीं ठरविलें. शंकरांनीं विचार केला कीं आपणांस व श्रीहरीस प्रिय असलेला हरिभक्त नारद अहंकाररूपी अर्बुद (कॅन्सर, मानसरोगप्रकरण पाहा.) रोगानें

पछाडला गेला आहे. त्याचा हा दुर्धर रोग सौम्य औषध देऊन बरा करण्यासाठीं **आपली** महेशता नाहीं वापरायची तर केव्हां वापरायची ! असें ठरवून महेशांनीं **नारदास** सौम्य शब्दांत थोडा हितोपदेश करून धोक्याची सूचना दिली आहे.

ल. ठे. — सतीमोहप्रकरणांतसुद्धां आपल्या संशयहरणशक्तीचा उपयोग होत नाहीं असें *हरास* दिसलें तेव्हां ते *महेश* झाले व पुन्हां कांहीं सूचना दिल्या. (१।५१।५–दो. ५१)

याप्रमाणें मानसांतील प्रत्येक ठिकाणच्या भासमान द्विरुक्तींतून किती तरी गूढार्थ **प्रगट होतात; पण शब्दांची व्युत्पत्ति पाहावी** लागते. पूर्वी ' शब्दकला ' प्रकरणांत **अवनि व मही आणि सीता व धरणिसुता हे** शब्द आहेत तेथें भावार्थ स्पष्ट केला आहे. आतां इतर उदाहरणें घेऊं.

४. हिं.—नाम जीहँ जपि जागहिं जोगी। बिरति बिरंचि प्रपंच बियोगी॥

म.–नाम जपुनि मुखिं जागे योगी। *विरत विरंचि-प्रपंच-वियोगी* ॥ (बाल. २२।१)

(१) हिंदींत बिरति = विरतियुक्त असा अर्थ येथें आहे. जीहँ = जिभेनें, बिरत = विरक्त. (क) विरंचि प्रपंचवियोगी = ब्रह्मदेवानें विशेष तऱ्हेनें निर्माण केलेल्या प्रपंचापासून वियोगी–वियोग झालेला, असा मुखानें नाम जपून (नामयोगी) होतो. (ख) विरत आणि विरंचिप्रपंचवियोगी यांचा अर्थ सारखाच. विरंचि-प्रपंच = जगांतील सर्वविषय; त्यांचा वियोग होणें म्हणजे विषयवैराग्य प्राप्त होणें. हाच अर्थ ' बिरत ' शब्दाचा आहे; म्हणून येथें पुनरुक्तिदोष दिसतो. (ग) हा पुनरुक्तिदोष नाहीं असें ठरविण्यासाठीं *टीकाकारांनीं केलेलें कल्पनांचें प्रदर्शन मुद्दाम पाहावें !* (मानसपीयूष पाहा.)

(२) **विरंचिप्रपंच** = विरुद्ध गोष्टींची रचना (मिश्रण) असलेला प्रपंच. ' शब्द-कला '–प्रकरणांत नमुना २५ वा पाहा. गुण आणि दोष परस्परविरुद्ध असून ते विरंचिप्रपंचांत असतात; म्हणून विरंचिप्रपंच = गुणदोषमय प्रपंच – ' श्रुति इतिहास पुराणिं निवेदित। *विधी प्रपंच गुणागुण मिश्रित* ॥ ' (१।६।४). गुणागुण = गुण-दोष. समन्वयपद्धति नीट लक्षांत घ्यावी. (क) विरंचिप्रपंचाचा वियोग होणें म्हणजे त्या प्रपंचांतील गुणदोषांपासून दूर राहणें, त्यांच्याकडे न पाहणें. विरत झाल्यावर, वैराग्य प्राप्त झाल्यावर दुसऱ्यांच्या गुणदोषांकडे पाहणें, त्यांची चर्चा करणें या गोष्टी घडतात कीं नाहीं ? बहुधा जास्तच घडतात ! जोंपर्यंत गुणदोषदर्शन केलें जातें–गुणदोष सत्य वाटतात, तोंपर्यंत वैराग्य असूनही तो जीव जागा झाला नाहीं असेंच ठरतें. (ख) जागा होणें म्हणजे मोहनिद्रा नष्ट होणें; पण गुणदोष मायाकृत असून सत्य वाटणें चालूं आहे तोंपर्यंत मोहनिद्रेंतील हें गुणदोषस्वप्न चालूं आहेच. ' गुणदोष पाहणें हा अविवेक आहे. ' उत्तर. दो. ४१ श्रीरामवचन पाहावें.

द्विरुक्ती दोष आहे असें आतां म्हणवेल काय ? —विरंचि शब्दांतूनच रहस्य बाहेर

पडलें ना ? आधार मानसांतच सांपडला कीं नाहीं ? कल्पनांचे मनोरे रचावे लागले काय ? गोस्वामींच्या शब्दकलेचें रहस्य कळणें जरूर आहे कीं नाहीं याचा विचार वाचक करतीलच ! आतां एक निराळा प्रकार पाहूं :— क्रियाद्विरुक्तीचा आभास पाहूं.

५. यांतील भासमान क्रिया द्विरुक्तींत तर फारच भावपूर्ण, रमणीय नाट्य आहे. संदर्भ कळण्यासाठीं पूर्वीच्या दोन चौपाया जास्त घेतल्या आहेत. शंकरांच्या बरोबर जगज्जननी भवानी दक्षकन्या (सती) आहे व उभयतां अगस्त्याश्रमांतून उत्तरेकडे जात आहेत. जात असतां प्रभु रघुनाथ वनांतच दिसले.

शंभु समयिं त्या रामा पाहति । हर्ष हृदयिं अति विशेष पावति ।।
लोचनभर छविसिंधुस निरखुनि । भेटुं न जाती कुसमय समजुंनि ॥
जय सच्चिदानंद जगपावन । *चालति* **वदुनि मनोजविनाशन ।।**
शिव **पथिं** *चालत जाति* **सह सती ।** (बाल. ५०।१–४)

(१) समोर दूर अंतरावर राम दिसले. शंकरांस अति विशेष हर्ष झाला. तें रूप डोळे भरून निरखून पाहिलें; पण समय प्रतिकूल जाणून भेटण्यास गेले नाहींत. वाटेंत थांबून दुरूनच दर्शन घेतलें; परंतु हात जोडून नमस्कार करणेंसुद्धां प्रभु-प्रतिकूल म्हणून तसा नमस्कारसुद्धां केला नाहीं. ' जय सच्चिदानंद जगपावन ' असें उभ्या उभ्याच म्हणाले आणि चालले मनोजविनाशन ! असा *एकदां चालण्याचा उल्लेख केला.*

(२) ' शिव सतीसह पथिं *चालत जाति* ' *असें पुन्हां* म्हटलें; म्हणून ही द्विरुक्ति दोषार्ह आहे असें म्हणतात ! पण हा भ्रम आहे. तो छविसिंधु—शोभासिंधु पाहून अति विशेष हर्ष झाला. व *शंभु* होते ते *शिव झाले*. त्या परम आनंदमय अवस्थेंत सर्व परिस्थितीचा विसर पडला आणि एकटेच भरभर निघाले चालत ! सती बरोबर आहे याचें भान राहिलें नाहीं. शिव असे झपाट्यानें एकटेच चालूं लागले हें पाहिल्यावर पतिव्रता सती झपझप पावलांनीं मागें जाणारच ! ती चाहूल लागली तेव्हां जरा भानावर आले, सती मागें राहिली याची आठवण झाली, तेव्हां जरा थबकले तों आलीच सती जवळ ! आणि चालले तिला बरोबर घेऊन ! किती सुंदर नाट्य आहे ! भाषण मुळींच नाहीं; सर्व अभिनयच, कृतीच ! भक्तिरस प्रतिपादक, आनंदमग्नतादर्शक आणि *स्मरा राम गृह दारा विसरुनि ॥* हें शिक्षण देणारी ही मनोहर नाट्यकला आहे कीं द्विरुक्तिदोष ?

मानसांतील सर्व भासमान द्विरुक्तींचें स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकेंत दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१० 卐 卐 卐

यमक-विषमता-कला

श्रीरामचरित मानसांत मोरोपंतांसारखें यमकास प्राधान्य दिलेलें नाहीं; तथापि यमकें सुंदर आहेत. चौपायांत चार मात्रांचें यमक आणि सोरठा दोहा यांत तीन मात्रांचें (उपान्त्य दीर्घ) यमक हा नियम पाळलेला आहे; अपवाद फारच थोडे आहेत, मराठी अनुवादांत चार मात्रांचीं यमकें सर्वत्र राखतां आलीं आहेत असें नाहीं.

दोहा सोरठा वृत्तांतील यमकांत कांहीं ठिकाणीं मुद्दाम वैषम्य निर्माण केलेलें आहे व तें सहेतुक आहे. तींच उदाहरणें येथें मुख्य आहेत; तथापि चौपायांतहि यमक-विषमतेचीं उदाहरणें आहेत; त्यांतील १।२ प्रथम घेऊं. उदाहरणांत हिंदींत आणि मराठींत पूर्ण साम्य आहे.

१. हिं. – प्रति संबत अति होइ अ*नंदा* ।
मकर मज्जि गवनहिं मुनि*बृंदा* ॥

म. – हा दरसाल लुटिति आ*नंद* । मज्जुनि मकरिं फिरति मुनि*वृंद* ॥ (बाल. ४५।२)

हिंदींत नंदा, कंदा, धंदा, बंदा असें यमक पाहिजे होतें. मराठींत नंद, कंद, छंद, बंद, मंद असें पाहिजे होतें. अं अंच्याऐवजीं अं ऋं असें उपान्त्यस्वर यमकांत आले. यानें हें सुचविलें कीं मुनिवृंद परत गेल्यामुळें भरद्वाजाश्रमांत आतां आनंदाची पीछेहाट होणार, कारण ऋं वर्ण 'अं 'च्या पुष्कळ मागला आहे. संतसमागमांत व संतसंगतींत हरिहरकथा श्रवण करण्यांत जो आनंद मिळत होता तो आतां पुष्कळ कमी होणार.

२. श्रीराम, सीता व लक्ष्मण अगस्त्याश्रमांत आल्यावर त्यांनीं श्रीरामप्रभूची पूजा केली त्या वेळीं इतर मुनिसमूह सभोंवतीं बसला होता; त्या समयींच्या वर्णनांत असलेंच उलट क्रमाचें उदाहरण आहे.

हिं. – जहँ लगि रहे अपरमुनि*बृंदा* । हरषे सब बिलोकि सुख*कंदा* ॥

म. – तेथिल सकल अपर मुनि*वृंदा* – । हर्ष, विलोकुनि सब सुख*कंदा* ॥

(अरण्य. १२।१३)

(१) येथें यमकविषमता पूर्वीसारखीच आहे पण क्रम उलटा आहे. वृंदाच्या नंतर कंदा आहे. ऋंच्या पुष्कळ पुढें अं आहे, म्हणून सुचविलें कीं आनंद, हर्ष पुष्कळ वाढला. (क) दोन्ही उदाहरणांतील कार्यकारण संबंधांत पूर्ण समन्वय आहे. हा किंवा असला भावार्थ एकाही टीकाकारानें काढला नाहीं. टीकेचीं पानेंच्या पानें भरलीं आहेत; पण हें यमकवैशिष्ट्य कां ? व यमकदोष कां नाहीं असा प्रश्नच कोणीं उपस्थित केला नाहीं. अशा महत्त्वाच्या अनेक ठिकाणीं बहुतेक टीकाकार मौन धरतात ! संस्कृत ग्रंथांच्या टीकांतसुद्धां पुष्कळ वेळां हेंच दिसतें ! (ख) चौपायांत विषम यमकांचीं आणखी कांहीं उदाहरणें आहेत पण तीं क्षीराब्धींत जशी खसखस ! मात्र

जेथें विषमता आहे (हिंदींत) तेथें ती सहेतुक विशेष भावदर्शक आहे.

३. हिं. — मुनि जेहि ध्यान न पावहिं नेति नेति कह *बेद* ॥
कृपासिंधु सोइ कपिन्ह सन करत अनेक बि*नोद* ॥

म. — ध्यानिं न पावति ज्यास मुनि नेति वानिती *वेद* ॥
तेंच कृपानिधि कपिंसवें करिति अनक वि*नोद* ॥ (लंका. दो. ११७ रा)

१. येथें वेद विनोद यमक वापरून हें सुचविलें कीं वेद कुठें आणि व्यावहारिक विनोद कोठें ! यांत जसें जमीनअस्मानाचें अंतर तसेंच 'पामर पशु अति कामी', 'कपि चंचल सब रीतीं हीन' असे कपि कुठें ! आणि परमात्मा भगवान राम कुठें ! पण भक्तीला वश होऊन त्यांच्याशीं विनोद करीत आहेत.

२. ल. ठे. — पूर्वार्धात येथल्यासारखाच अर्थ असून उत्तरार्धांत परिस्थिति भिन्न असल्यानें यमकविषमता नाहीं.

हिं. — बेद बचन मुनिमन अगम सो प्रभु करुना *ऐन* ।
बचन किरातन्ह के सुनत जिमि पितु बालक *बैन* ॥

म. — वेदवचन मुनि-मन-अगम ते प्रभु करुणा*वास* ।
भिल्लवचन परिसति जसे जनक बालवचन*ास* ॥ (अयो. दो. १३६)

चित्रकूटाच्या भिल्लांचें भाषण प्रभूंनीं ऐकून घेतलें त्याविषयीं वरील दोहा आहे. परमात्मा सर्वांच्याच प्रार्थना ऐकून घेतात; म्हणून यांत कांहीं विषमता नाहीं; म्हणून यमकविषमता नाहीं.

४. बिभीषण रावणास उपदेश करतो, मंत्र सांगतो त्यांतील दोहा :—

हिं. — काम क्रोध मद लोभ सब नाथ नरक के *पंथ* ।
सब परिहार रघुबीरहि भजहु भजहिं जेहि *संत* ॥

म. — काम कोप मद लोभ सब नाथा ! नरका *पंथ* ॥
सोडुनि सब, रघुवीरही भजा भजति ज्या *संत* ॥ (सुंदर. दो. ३८)

१. उपदेश श्रवण करतांना रावण क्रुद्ध होऊन, बिभीषणास दुरुत्तरें बोलून लाथा मारून हाकलून दिल्याचें वर्णन पुढें याच उपदेशाच्या प्रकरणांत आहे. (क) पंथ व संत या विषम यमकानें सुचविलें कीं हें बोलणें रावणास *विषम* वाटणार, त्यास *विषम* होणार. तो अन्तर्वेग विषमज्वरार्तासारखा अंतःसंतप्त होणार, त्याला अन्तर्दाह होणार; नंतर त्यास वात व भ्रम होऊन तो प्रलाप करणार व त्यांत उन्मत्त होऊन उपदेशक गुरूला *विषम* (= विपरीत) *दक्षिणा (लाथा)* देणार ! यमकांत '*संथ*' शब्द पाहिजे होता; पण *संथ*पणें उपदेश ऐकून घेणें रावणास शक्य नव्हतें; रावणाच्या जवळ *संथ*पणा नव्हता; मग '*संथ*' तेथें कसा येईल ? बिभीषण संत आहे म्हणून 'संत' आला, *यमकविषमता परिस्थितींतील विषमतादर्शक आहे.* इतकीं उदाहरणें पुरेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।११ 卐 卐 卐

अल्पशा क्रियाभेदानें गूढ भावार्थ

१. अत्रि-आश्रमा प्रभु जैं गेले। श्रवत महामुनि हर्षित झाले ॥

वपु पुलकित *मुनि* उठुनि *धावले*-।-बघुनि, शीघ्रगति *राम चालले* ॥

(१) अत्रि मुनि श्रीरामास भेटण्यास धावत निघाले. ते धावत येत आहेत हें बघून *राम शीघ्र गतीनें चालले*. राम कां धावले नाहींत अशी शंका साहजिकपणें येते.

(क) चित्रकूटच्या अरण्यांतील हा भाग आहे. रामचंद्रांच्या मागें सीता व सीतेच्या मागें लक्ष्मण आहे. राम धावले कीं सीतेला धावावें लागणार व ती मागें पडणार. श्रीरामाच्या गतीनें तिला धावतां येणार नाहीं. (ख) लक्ष्मण सीतेच्या मागें आहेत; राम धावले कीं रामसेवक लक्ष्मणानें धांवणें जरूर; पण त्यामुळें सीता एकटी मागें राहणार; किंवा राम-लक्ष्मण एकाच वेळीं मुनीला भेटणें अशक्य होणार; पण असें करणें रघुनाथाच्या बंधुप्रेमाला अशक्य होतें; म्हणून राम शीघ्र गतीनें चालले; तरी-सुद्धां सीतेला धावावें लागलें असेलच !

(२) धावणें व शीघ्र गतीनें चालणें इतका अल्प भेद करून रघुनाथाची सीतेला वनांत जपण्याची दक्षता, लक्ष्मणाविषयींचें प्रेम आणि मुनींच्याविषयीं आदर इतक्या गोष्टी सहज दाखविल्या. (क) राम जर सावकाश चालले असते तर अहंकार व मुनींविषयीं अनादर व्यक्त झाला असता. (ख) सम्राटपुत्रानें धावत जाणें शोभलें नसतें असें वाटणारांस पुढील उदाहरणाचा आहेर करणें उपयुक्त ठरेल.

२. संदर्भ — सुग्रीवादि कपिगणांसह पुष्पक विमानानें नन्दिग्रामाजवळ येतांना श्रीरघुनाथास दिसलें कीं फार मोठा जनसमाज सामोरा येत आहे. असें दिसतांच पुष्पक खालीं उतरवून प्रभु पुष्पकांतून उतरले; अर्थात् सीता, लक्ष्मण व सर्व कपिदळ पाठोपाठ उतरलेंच. पुढें चालत जात असतां स्पष्ट दिसलें कीं,

आले भरतासवें सकल जन। श्रीरघुवीर-वियोगें कृशतन ॥

वामदेव नी *वसिष्ठ मुनिवर*। *दिसतां*, प्रभु महिं ठेवुनि धनुशर ॥

***धावुनि धरति* गुरुपदजलरुह। *अनुजासह* अति पुलकित तनुरुह ॥**

(उत्तर. ५।१–३)

येथें अरण्यासारखें सीतेचें संरक्षण दक्षतेनें करण्याची आवश्यकता नव्हती; म्हणून सीतेला मागें टाकून दोघे बंधु धावत धावत गेले ! सर्व अयोध्यावासी लोकांसमक्ष आणि सर्व कपिसेनेदेखत धावले ! फार काय कौसल्यादि मातासुद्धां धावतच आल्या आहेत ! अत्रिभेटीच्या वेळीं इतर कोणीच नव्हतें तरी धावले नाहींत ! निरुत्तर करणारें उत्तर उत्तरकांडांत मानसांतच मिळालें !

३. उदाहरण धावणें आणि चालणें यांचेंच आहे पण भावार्थ अगदीं भिन्न आहे.

वालीवध प्रकरणांत —

रघुपति देति सुकंठा धाडुनि । निकट जाइ गर्जे बल पावुनि ॥
ऐकत धावे क्रोधें वाली । **स्त्रीकर धरि पद, समजुत घाली** ॥ (४।७।२६-२७)

तिनें केलेला उपदेश श्रवण केला पण त्यास मान न देतां

दो० — प्रिये भीरु ! तो म्हणे बघ समदर्शी रघुनाथ ।
मला कदाचित वधिति जरि तरि होईन सनाथ ।। (४।७)
' चले वदुनि हें अति अभिमानी । ' (४।८।१)

(१) सुग्रीवाची गर्जना कानीं पडतांच वाली इतक्या त्वरेनें धावला कीं अवघ्या चार शब्दांत तें धावणें सांगावें लागलें. (क) तारेनें केलेला उपदेश ऐकल्यावर मात्र *चले-चालत निघाला.* या इतक्याशा शब्दभेदानें सुचविलें कीं वालीचा तो पहिला आवेश, ती त्वरा, आणि तो क्रोध यांचा आतां मागमूस राहिला नाहीं. तारेला इष्ट असा तिच्या उपदेशाचा परिणाम झाला नाहीं, तरी त्या उपदेशानें त्यास क्रोध, साहस व अविचार यांतून काढून विवेकाच्या भूमिकेवर आणलें.

(२) ' ऐकत धावे क्रोधें वाली ' आणि ' चले वदुनि हें अति अभिमानी ' या दोन चरणांत मात्रा १६।१६ च आहेत. कोणता चरण उच्चारण्यास जास्त वेळ लागतो, व आवेश कोणत्या चरणांत जास्त आहे याचा अनुभव नुसत्या उच्चारानें वाचकांनीं घ्यावा. पहिला चरण चटकन उच्चारला जातो व प्रत्येक शब्दाबरोबर आवेश वाढता आहे. दुसऱ्याला जास्त वेळ लागतो व आवेश ओसरला आहे. (क) दुसऱ्या चरणांत एक शब्द व तीन अक्षरें जास्त आहेत म्हणून जास्त वेळ लागतो असें म्हणणारांस श्रीगोस्वामीजी पुढील दोन चरण बहाल करतात :— ' कंकण किंकिणि नूपुर वाजति ' आणि ' नूपुर कलित कंकणें वाजति ' यांत मात्रा सारख्या, अक्षरें १२।१२, शब्द चार चारच ! तरी दुसरा चरण उच्चारण्यास थोडा जास्त वेळ लागतोच. शिवाय दोघांच्या उच्चारानें गतिभेद व तालभेदही दाखविला जातोच ! कारण काय तें साहित्यविशारदांनीं व साहित्याचार्यांनीं शोधून सांगावें. **नुसत्या शब्दांच्या रचनेनें किती विविध मजा दाखवितां येतात याचा अनुभव मानसांत भरपूर घ्यावा.**

४. रावणानें आपल्या अति बलाढ्य सेनेला कपिसैन्यावर हल्ला करण्याचा हुकूम दिला. त्यानंतर

यदा खबर ही कपी पावले । जय जय जय रघुवीर! *धावले* ॥ (लंका. ७९।१३)
छंद — *धावति* विशाल कराल मर्कट भल्ल काल-समान ते ।
जणुं पक्षयुत बहु उडति भूधरवृंद नाना वर्ण ते ।। इत्यादि.

यांत ' धावले ' एवढेंच शब्दानें सांगितलें पण कसे धावले वगैरे छंदांतील शब्दांच्या ध्वनीनें व कठोर वर्णांनीं—अक्षरांनीं दाखविलें आहे. हेच कपि जेव्हां—

धावे क्रुद्ध परम दशकंधर । सन्मुख *जाती* हुप् हुप् वांदर ॥

पादप उपल शैल (हिं. सैल) **बहु उपटिति । एका वेळे त्यावर टाकिति ॥**
(६।८२।१–२)

(१) या दोन प्रसंगांत कपींच्या गतींत, आवेशांत, क्रोधांत व उत्साहांत कांहीं फरक पडला कीं नाहीं ? तो कां पडला व कविसम्राटांनीं काय फरक करून तो दाखविला याचा विचार करावा. (**क**) पहिल्या प्रसंगीं मोठ्या क्रोधानें, उत्साहानें, आवेशानें व विजयाच्या आत्मविश्वासानें *धावले*; कारण समोरून चाल करून येणारें रावणाचें सैन्य होतें. दुसऱ्या प्रसंगीं ' धावे क्रुद्ध परम दशकंधर ' हें पाहतांच कपिवृंद जणूं अगदीं निराळेच झाले ! धावण्यास धीर उत्साह नाहीं, क्रोध जिरला, विजयाची आशा नुरली तेव्हां ' सन्मुख जाति ' समोर जाऊं लागले, ' हुप् हुप् ' करीत; उड्या मारीत जाऊं लागले.

दोन्ही ठिकाणचे शब्द ऐकणारांच्या उत्साहांतसुद्धां फरक पडेल ! पहिल्या वेळचे शब्दही वीर, धीर, कठोर, कर्कश आहेत. दुसऱ्या वेळचे पादप उपल सैल (शैल) अगदीं पुळपुळीत !

अर्थ व भाव स्पष्ट न सांगतां थोड्या शब्दांत ते पुष्कळ भरून ठेवण्याची ही शब्दरचना–कला मनो-हर आहे ! हिचा आस्वाद आतां इतर स्थानीं वाचक सहज घेऊं शकतील.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१२ 卐 卐 卐

एका शब्दानें विशाल भावार्थ

१. **मंत्र**—श्रीरघुनाथ अगस्त्याश्रमांत गेल्यावर अगस्तींनीं त्यांची पूजा केली; त्या वेळीं त्यांचे पुष्कळ शिष्य तेथें सभोंवतीं बसलेले होते. पूजा वगैरे उरकल्यावर :—

' मग रघुवीर मुनीशा सांगति । प्रभु ! न गुप्त कांहीं अपणांप्रति ' ।
जाणा कारण मम आगमना । तात ! नको सांगणें आपणां । (अरण्य. १३।१–२)

(१) असें रघुवीर म्हणाले तरी रामशोभेवर लुब्ध झालेली ती मुनिमंडळी तेथून हलेना, तेव्हां अति नयनागरानें युक्ति केली व म्हणाले कीं

***मंत्र* अतां प्रभु ! मज तो देणें** ॥ (अरण्य. १३।३)

मंत्रोपदेश देतांना गुरुशिष्यांशिवाय इतर कोणी जवळपास असूं नये ही गोष्ट त्या मुनिसमुदायास स्वानुभवानें माहीत होती; म्हणून हें वाक्य कानीं पडतांच बाकीचे सर्व मुनि भराभर उठून गेले असतील. मंत्र = गुरुमंत्र, जपाचा मंत्र किंवा सल्लामसलत. रघुवीरानें मंत्र शब्द दुसऱ्या अर्थानें वापरला; पण हेतु साधलाच. ' सल्ला द्या ' असा अर्थ अगस्तींनीं घेतला. . .

(२) ' **मंत्र द्या** ' म्हणण्यानें आणखी एक गोष्ट साधली. राम परमात्मा आहेत

अशी त्या इतर मुनींची अनुमानानें झालेली भावना पुसून टाकली. (क) आपला प्रभाव गुप्त ठेवून दण्डकारण्यांत राहावयाचें आहे. निशाचरवध करण्यासाठीं वनांत जात आहेत हेंहि गुप्त ठेवावयाचें आहे, म्हणून इतर मुनिसमुदाय जवळ असेपर्यंत २।। चौपायांत अगदीं मोघम बोलले. 'मंत्र' शब्द न वापरतां 'सल्ला' शब्द वापरला असता तर ते मुनि गेले नसते. 'युक्ति मंजु मणि शिपा सुंदर' (१।३७।४) असें जें म्हटलें त्या माणि शिंपल्याचें हें एक फार सुंदर उदाहरण आहे. शिंपल्यांतले मुक्तामणि कोणाला दिसत नाहींत–कळत नाहींत; फक्त तज्ज्ञ जाणतात. *तो मंत्र* कोणता हें मुनिसमुदाय निघून गेल्यावर सांगतात.

२. **'मुनीद्रोहि मी मारिन जेणें'** (३।१३।३). (१) *मानसांतील रघुवीरानें जपानुष्ठानाचा मंत्र मागितला नाहीं व मुनिराजांनीं दिला नाहीं.* येथें वापरलेला मुनीद्रोहि शब्दसुद्धां विशाल अर्थ सांगतो, इतर ठिकाणीं निशाचरांस विश्वद्रोही, सुरद्रोही, परद्रोही, विप्रद्रोही असें म्हटलें आहे. बाल. २१०।३ मध्यें मारीचास मुनिद्रोही म्हटलें आहे. हीं दोनच उदाहरणें आहेत. (क) **मुनीद्रोही** = मुनींचे वैरी, यानें सुचविलें कीं आपण मुनीश आहांत; निशाचरांनीं मुनींना व इतरांना कसें छळलें, अनेक मुनींचा संहार कसा केला, निशाचरांचा स्वभाव कसा आहे, कोणत्या उपायानें ते सहज मारतां येतील म्हणजे त्यांस मारण्यास सबळ कारण मिळेल इत्यादि सर्व तुम्ही जसें जाणतां तसें इतर मुनि जाणत नाहींत; कारण आपण दण्डकारण्यांत निशाचरांच्या जवळपास निर्भयपणें राहिला आहांत. 'पंचवटींत जाऊन राहा' हा मंत्र कुंभजांनीं शेवटीं श्रीरघुवीरांस सांगितला आहे.

३. **श्रीरघुवीराचें प्रयाण-वर्णनः— निघे कटक कुणि वर्णुं किं शकति ।** (५।३५।८)

छंद — चीत्करति दिग्गज कंपभू, गिरिलोल, सागर खळबळे ।
मनीं हर्षयुत रविसोम, सुरमुनिनाग–किंनर दुख टळे ॥
कट्कटति मर्कट विकट भट बहु कोटि कोटी धावती ।
जय राम ! प्रबल प्रताप कोशलनाथ ! गुणगुण वानती ॥ १ ॥
सहुं शकत भार न, फार अहिपाति वार फारहि मोहतो ।
धरि दशनिं कितिदां कमठपृष्ठ कठोर, केवीं शोभतो ॥
रघुवीर रुचिर प्रयाण प्रस्थिति जाणुनी अति शोभना ।
जणुं कमठखर्परिं सर्पराज किं लिहिति अविचल पावना ॥ २ ॥

(१) या कपिप्रयाणानें झालेला परिणाम अधिक घोर व व्यापक कीं रघुवीरानें धनुर्भंग केला त्याच्या ध्वनीचा परिणाम अधिक घोर व व्यापक ? हा प्रश्न मानसवाचकांस, शेंकडों पारायणें करणारांस वा मानस मुखोद्गत असणारांस विचारल्यावर सर्व हेंच सांगतील कीं हा प्रयाणानें झालेला परिणाम अधिक घोर व व्यापक. (क) सर्व वाचक असें म्हणाले तर नवल नाहीं; पण १५।२० मानस टीकाकारांपैकीं एकानेंहि

खरें मर्म बाहेर काढलें नाहीं ! (ख) बालकांडांतील तें वर्णन केवळ *एकाच छंदांत* आहे; पण तेथें *एकच* शब्द असा घातला आहे कीं *त्या एकानेंच* त्या घोर ध्वनीचा परिणाम अधिक भीषण व व्यापक ठरतो. (ग) कपिप्रयाणवर्णनांत सांगितलें कीं सर्पराज शेष आपल्या दशनांनीं (दातांनीं) कूर्माच्या कठोर पाठीला वारंवार धरतो; म्हणजेच कपिप्रयाणानें कूर्म कंपायमान झाला नाहीं आणि विव्हळूं लागला नाहीं. तसें झालें असतें तर शेष आपल्या दंतांनीं कूर्माच्या पाठीला धरूं शकला नसता व उत्प्रेक्षेंत सांगितल्याप्रमाणें प्रयोणाची प्रस्थिति त्या पाठीवर लिहूं शकला नसता.

(२) धनुर्भंगाच्या घोर ध्वनीचा परिणाम पाहा :—

रामें भग्न धनू मधिं तत्क्षण । भुवनिं भरे ध्वनि कठोर भीषण ।।

छंद — **भुवनांत घोर कठोर रव रविवाजि उत्पथिं धावती ।**
चीत्करति दिग्गज डोलमहि, अहि *कूर्म* कोलहि *विवळती* ।।
सुर असुर मुनि कर कानिं देती सकल विकल विचारती ।
कोदंड खंडिति राम, तुलसी सकल जय उच्चारती ।।

(क) धनुर्भंगाच्या ध्वनीनें अहि (शेष), कूर्म आणि कोल (वराह) सुद्धां विवळूं लागले. घाबरून जाऊन विव्हल झाले.

(३) कपिप्रयाणांत दोन छंद आहेत, त्यांच्या ओजस्वी शब्दांच्या जोरांत वाचणारा इतका वाहात जातो कीं, या एका छंदांत असलेलें वर्णन त्यास वाचवूं शकत नाहीं; *कूर्मसुद्धां विव्हळतो इकडे लक्षच जात नाहीं*. (क) विव्हळत असलेल्या कूर्माच्या पाठीला विव्हळत असलेला सर्पराज कसा धरूं शकेल व धनुर्भंगस्थिति लिहिणार तरी कसा ? व उत्प्रेक्षा कशी करतां येईल ? धनुर्भंगपरिणाम वर्णनांतील इतर शब्दांनींसुद्धां हेंच ठरतें कीं तो ध्वनि कपिप्रयाणाच्यापेक्षां अधिक भीषण व अधिक व्यापक होता; पण तें दाखविण्याचें स्थान हें नव्हे !

(४) एखाद्या विषयाच्या वर्णनाच्या काव्यसरितेच्या रसाच्या धारेंत वाचकांस वाहवत नेऊन, तुलना करून अर्थनिश्चय करणाऱ्या बुद्धिशक्तीस स्तंभित करण्यांतच कवीच्या *काव्यकलेचें मयसभारचना-कौशल्य आहे. काव्यरूपी मयसभा* **मानसांत पुष्कळ ठिकाणीं तोंडघशीं पाडते.**

(क) लक्ष्मणभरतचरित्र, जनकपुरी व अयोध्यापुरी वर्णन, जनकपुरीललना व अयोध्यापुरीललना वर्णन, जनकराजाचें ऐश्वर्य व दशरथाचें ऐश्वर्य यांचें वर्णन यांत असेंच उलटें दिसतें. असें होण्याचें कारण येथील उदाहरणांतल्यासारखे १।२ महत्त्वाचे शब्द असतात ते दृष्टिआड होतात हेंच आहे.

४. ' **आली** सीता शीत-निशासी ' रावणास पहिला उपदेश करतांना मंदोदरी म्हणाली,

‘ दुःखद तव कुल–कमलवनासी । *आली* सीता शीत–निशासी ॥ ’ (५।३६।९)

(१) तुमच्या कुलरूपी कमलवनाला दुःख देणारी (मारून टाकणारी) शीत (हिम) निशेसारखी सीता *आली* आहे. येथें दृष्टान्त आहे. सीता *आली* असें म्हटलें. बर्फ पडणारी रात्र जशी कोणी-महावीर आपल्या प्रतापानें वगैरे आणूं शकत नाहीं, तशीच तुम्हीं सीतेला आणणें शक्य नव्हतें. ती आपण होऊनच *आली* आहे, व तुमच्या कुळाचा संहार करण्यास *आली* आहे. तुमची ताकद नव्हती तिच्या अंगाला हात लावण्याची ! एका हुंकारानें तिनें तुमचें भस्म केलें असतें; पण तिचीच येण्याची इच्छा होती म्हणून ती *आली*.

(२) ‘ आली ’ या शब्दानें एक पौराणिक कथा सुचविली आहे. रावणानें आणून आपल्या पलंगाखालीं लपवून ठेवलेली एक पेटी मंदोदरीनें एक दिवस उघडून पाहिली; तेव्हां तिला त्या पेटींत एक परम रूपवती कन्या दिसली ! ती पेटी ब्रह्मनिष्ठाच्या राज्यांत पुरून टाकण्याचा सल्ला मंदोदरीनें दिला. त्याप्रमाणें ती पेटी घेऊन रावण निघाला तेव्हां त्या कन्येनें स्पष्ट सांगितलें कीं या वेळीं मला पोचविलेंस तरी मी पुन्हां लंकेंत येईन आणि तुझा व तुझ्या कुळाचा विनाश करीन. ही गोष्ट मंदोदरीनें ऐकली होती; म्हणून ‘ *आली* ’ असें म्हणून मंदोदरीनें रावणास पूर्वींची आठवण दिली आहे. (क) एका शब्दानें विशाल अर्थ सांगितल्याचीं पुष्कळ उदाहरणें मानसांत आहेत. गूढार्थचंद्रिकेनें रहस्य प्रगट केलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१३ 卐 卐 卐

चौपायांची किंवा चरणांची पुनरुक्ति

श्रीरामचरितमानसांत, एकाहि शब्दाचा बदल न करतां कांहीं थोड्या चौपायांची व अनेक चरणांची पुनरुक्ति आढळते. पुनरुक्ति हा काव्यदोष मानला जातो; पण :—

‘ विषादे विस्मये कोपे हर्षे दैन्येऽवधारणे ।
प्रसादे चानुकम्पायां पुनरुक्तिर्न दूष्यते ॥

या आठ ठिकाणीं पुनरुक्ति दोष नाहीं. अशा प्रकारच्या पुनरुक्तींचीं उदाहरणें मानसांत आहेतच; पण शीर्षकानें सुचविलेल्या पुनरुक्ति या नियमांत बसत नसूनहि त्या दूषण नसून भूषण आहेत.

असलीं पुनरुक्तिस्थानें मानसांत २७ सांपडलीं आहेत. नजरचुकीनें कांहीं राहिलींहि असतील; कारण कीं *या लेखकास श्रीरामचरितमानस मुखोद्गत (पाठ) नाहीं.* उत्तर हिंदुस्थानांतील मानसव्यास, रामायणी वगैरे पुष्कळांत श्रीमानसरामायण अगदीं कंठस्थ (मुखोद्गत) असतें; व अशा एका रामायणींनीं ‘ *मानस-रहस्य* ’ नामक

पुस्तकांत (गीता प्रेस, गोरखपूर) फारच थोड्यांचा उल्लेख केला आहे. इतर मोठमोठ्या मानसमहापंडितांनीं आपल्या टीकांत २१३ पुनरुक्तींपेक्षां जास्त दाखविल्या नाहींत! त्यांस दिसल्याच नसतील! किंवा हेतूंचा उलगडा करतां न आल्यानें मौनाचा अवलंब केला असेल!

सांपडलेल्या सर्व पुनरुक्तींची जंत्री अयोध्या १११।७ च्या टीकेंत दिली आहे. मानसांतील या पुनरुक्ति दूषण नसून काव्यभूषण आहेत कारण त्यांत खालील हेतूंपैकीं कोणता तरी हेतु आहे.

१ पूर्ण साम्य दर्शविणें, २ अल्प पुनरुक्तीनें पुष्कळ ग्रंथ-विस्तार वांचविणें, ३ तुलना करण्यास प्रवृत्त करणें, ४ जनस्वभावोक्तिनिदर्शन, ५ वागण्याची ठराविक पद्धति दर्शविणें.

१. *मंगलभवन अमंगलहारी* । **उमेसहित जें जपति पुरारी** ।

(१।१०।२) रामनामाविषयीं.

मंगलभवन अमंगलहारी । **तो द्रवु दशरथअजिरविहारी** ।

(१।११२।४) रामाविषयीं.

या पुनरुक्तीनें राम आणि 'राम'नाम यांची पूर्ण समानता दाखविली.

२. *राम-सिता-लक्ष्मण-छवि बघती* । ***प्रेमें ग्रामनारिनर वदती*** ।। (२।८९।१)

राम-सिता-लक्ष्मण-छवि बघती । ***स्नेह-विकल नरनारी बनती*** ।।

(२।१११।८)

राम-सिता-लक्ष्मण-छवि बघती । ***मिळे नयनफळ सौख्य पावती*** ।।

(२।११४।३)

(१) या एका चरणाची आवृत्ति अशी तीन ठिकाणीं झाली—केलेली—आहे. प्रत्येक ठिकाणीं दुसरा चरण अगदीं भिन्न आहे. ग्रंथविस्तार वांचविण्याची व सर्व मार्गस्थ लोकांच्या स्वभावाचें साम्य दाखविण्याची ही काव्यकला आहे! या तीन चौपायांतील द्वितीय चरणांची अन्योन्य ठिकाणीं देवघेव करावयाची आहे. एका चरणाच्या द्विरुक्तीनें दोन चरणांचा विस्तार प्रत्येक ठिकाणीं वांचविला. (क) या पुनरुक्तींच्या मागला-पुढला संदर्भही शेष दोन दोन ठिकाणीं भरतीस घ्यावयाचा आहे.

उदा. — ' **लक्ष्मण सीतेसहित रघुपती । जैं जैं गांवाजवळुनि निघती** ।।

ऐकत बाल वृद्ध नारी नर । जाति काज गृह विसरुनि सत्वर ।।

रामासितालक्ष्मणछावि बघाति । **मिळे नयन फळ सौख्य पावति** ।।

सजल विलोचन पुलक शरीरां । सर्वंहि मग्न बघुनि युग वीरां ।।

दशा तयांची नाहिं वर्णवत । सुरमणिरास रंक जणुं पावत ।।

(२।११४।१-५)

यांतील तिसऱ्या चौपाईच्या पहिल्या चरणाची पुनरुक्ति पूर्वीं दोन ठिकाणीं आहे. येथील तो एक चरण सोडून बाकीच्या ४॥ चौपाया मागल्या पुनरुक्तीच्या दोन स्थळीं

अध्याहृत ध्यावयाच्या आहेत, म्हणजे ९ चौपायांचा विस्तार वांचविला. याप्रमाणेंच मागील दोन पुनरुक्तींच्या पुढचा व मागचा संदर्भ येथें अध्याहृत ध्यावयाचा आहे. अशा या युक्तीनें ग्रंथविस्तार कितीतरी वांचला ! प्रत्येक ठिकाणीं कांहीं नाविन्य दाखवितां आलें, तेंच तेंच सांगावें लागलें नाहीं, इत्यादि अनेक हेतु साधले. *शिवाय विविध खेडेगांवांतील लोकांचा स्वभाव जवळजवळ अगदीं सारखा हें दाखवितां आलें.*

आतां ही पुनरुक्ति, दोष म्हणावा कीं सौंदर्यपरिपोष म्हणावा? कीं भावोद्बोधक, स्वभावनिदर्शक व विस्तारनिवारक अपूर्व काव्यकला गणावी !

३. वर मागा अशी आकाशवाणी ऐकल्यावर मनुराजा म्हणाले,

' श्रुणु सेवक–सुरतरु – सुरधेनु । विधिहरिहरवंदित-पद-रेणू ॥
सेवत सुलभ सकल सुखदायक । **प्रणतपाल सचराचरनायक ॥**
जर अनाथहित ! स्नेह अम्हांवर । द्यावा प्रसन्न होउनि हा वर ॥

(१। १४६।१-३)

सनकादि चौघे मुनि श्रीरघुनाथाची स्तुति करीत म्हणातात,

' द्यावि भक्ति रघुपति अति पावनि । त्रिविधतापभवदुःख–विनाशनि ॥
प्रणत काम-सुरधेनु कल्पतरु । व्हावें प्रसन्न द्या प्रभु ! हा वरु ॥
भववारिधि-कुंभज रघुनायक । *सेवत सुलभ सकल सुखदायक* ॥

(उत्तर. ३५।१-३)

(१) ' *सेवत सुलभ सकल सुखदायक* ' या चरणाची अक्षरशः पुनरुक्ति आहे व अंशतः पुनरुक्ति बिंदुरेखांकित दोन चरणांची आहे. (क) सनकादि मुनि आणि मनु यांच्या भावना अगदीं समान आहेत हें प्रथम दाखविलें. (ख) मनूच्या प्रार्थनेंतील शेष तीन चरण सनकादींच्या प्रार्थनेंत भरीला घेणें. (ग) तिसरें हें दाखविलें कीं जे ' भववारिधिकुंभज ' रघुनायक सनकादिकांस दिसले व ते तसेच पांच मन्वंतरांपूर्वी मनुशतरूपांनीं ' दर्शन द्या ' असा वर मागितल्यावर त्यांस अवतारपूर्वकाळीं दिसले. (घ) दर्शन दिल्यावर ' त्रिविधतापभवदुःखविनाशनि । अति पावनि ' (७।३५।१ वर पाहा) भक्ती मागण्याचा मनूचा बेत होता पण प्रभूंनीं आपल्या मायेनें त्यांची बुद्धि फिरवून ' पुत्र व्हा ' असा वर त्यांच्याकडून मागविला. तेथें जें मर्म सांगितलें वा ध्वनित केलें नव्हतें तें या पुनरुक्ति–युक्तीनें उत्तरकांडांत ध्वनित केलें. (मनुशतरूपाप्रकरण–टीका पाहावी.) अशी ही अप्रतिम काव्यकला आहे.

एक वचन बालकाण्डपूर्वार्धांत व दुसरें वचन (पुनरुक्ति) उत्तरकाण्डपूर्वार्धांत म्हणजे पुष्कळ अंतरावर असल्यानें ही द्विरुक्ति दिसतच नाहीं. हजार पारायणें केलेल्यांससुद्धां दिसली नाहीं !

४. जनस्वभावोक्ति–निदर्शन —शृंगवेरपुरास गेल्यावर सीतारामलक्ष्मणांस पाहून स्त्रिया म्हणतात,

'माय बाप ते वद सखि ! कैसे । जे धाडिति वनिं बालक ऐसे ॥'
कोणि म्हणति कृत भलें, नृप भला । लोचन-लाभ किं विधिनें दिधला ॥
(२।८९।२-३)

पुढें यमुनातीरस्थ ग्रामनारी म्हणतातः—
'माय बाप ते वद सखि ! कैसे । जे धाडीति वनिं बालक ऐसे ॥'
(२।११११७)

या दोन ठिकाणीं संपूर्ण चौपाईची पुनरुक्ति आहे. यानें हें दाखविलें कीं जेथें जेथें राम, सीता व लक्ष्मण जातात तेथें प्रथम स्त्रियांना एक गोष्ट वाईट वाटते आणि त्या-विषयींच त्या प्रथम आपसांत चर्चा करतात व रामलक्ष्मणांच्या मायबापांस दोष देतात. सहज वात्सल्यपूर्ण स्त्रीहृदयाचें स्वभावचित्र या स्वभावोक्तीच्या पुनरुक्तीनें दाखविलें. (क) पहिल्यांतील दुसरी चौपाई दुसऱ्या ठिकाणीं भरतीस घ्यावी हें सुचविलें.

५. ठराविक पद्धति दाखविणें.

पुढें रामलक्ष्मण माघारीं । **तापसवेषिं विराजति भारी** ॥
मधें सिता शोभतसे कैसी । ब्रह्मजिवांमधिं माया जैसी ॥
पुन्हां वदें छवि जशि मनिं वसते । जणुं मधुमदनमधें रति लसते ॥
पुन्हां देउं उपमा हृदिं शोधित । जणुं बुध-विधुमाधिं रोहिणि शोभित ॥
प्रभुपदचिन्हयुगामाधिं सीता । चालत पथिं पद टाकि सुभीता ॥
सीतारामपदांकां राखुनि । लक्ष्मण चालति उजवीं घालुनि ॥
राम अनुज सीता-सुप्रीती । वाचातीता वदूं कशी ती ॥
मग्न विहग मृग रूप विलोकुनि । राम पथिक ने चित्ता चोरुनि ॥
(२।१२३।१-८)

अत्रि-आश्रमांतून निघून पुढें जातांना :—
'पुढें रामलक्ष्मण माघारीं । **मुनिवर वेष शोभतो भारी** ॥
मध्यें श्री शोभतसे कैसी । ब्रह्मजिवांमधिं माया जैसी ॥ (३।७।२-३)

एक चरण आणि एक चौपाई यांची अक्षरशः पुनरुक्ति आहे; फक्त सीता = श्री हें सुचविलें आहे. आणि एका चरणाची पुनरुक्ति अंशतः आहे.

(१) हेतु (क) वनांतील मार्गानें राम, सीता व लक्ष्मण चालत जात असतां कोणत्या क्रमानें चालत असत हें दाखविणें. (ख) अयोध्याकाण्डवर्णनांतील पुढल्या ६ चौपाया येथें भरतीस घ्यावयाच्या हें दाखविणें. (ग) जेथें वर्णन नसेल पण तिघांच्या वनप्रवासाचें वर्णन असेल तेथें प्रत्येक ठिकाणीं ही चालण्याची पद्धति गृहित धरणें हें दाखविणें. (घ) सीता व लक्ष्मण यांच्या भावना व त्यांची चालण्याची विशेष पद्धति प्रत्येक ठिकाणीं गृहित धरावी हें दाखविणें. (ङ) या तिघांच्या दर्शनाचा प्रेक्ष-

कांवर (पशुपक्षीसुद्धां) होणारा परिणाम प्रत्येक प्रवासवणनांत प्रत्येक ठिकाणीं गृहित समजावा हें सुचविणें. या सर्व गोष्टी प्रत्येक ठिकाणीं वर्णन करणें शक्य नसल्यानें एके ठिकाणीं सविस्तर वर्णन करून व त्यांतील मुख्य क्रमाची पुनरुक्ति दुसऱ्या ठिकाणीं-करून ठेवून वरील सर्व गोष्टी सुचविल्या.

प्रथम निर्दिष्ट केलेल्या पांच प्रकारांचीं उदाहरणें क्रमानें स्पष्ट करून दाखविलीं. याप्रमाणेंच इतर पुनरुक्तींचें स्पष्टीकरण गूढार्थचंद्रिकेंत आढळेल; नजरचुकीनें कांहीं राहिलीं नसतील असें म्हणवत नाहीं; कारण आधींच मंद असलेल्या स्मरणशक्तीस आतां पासष्टी कष्टी करूं लागली आहे ! त्यामुळें असें स्पष्ट लिहावें लागतें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१४ 卐 卐 卐

पर्याय-शब्दादि-निदर्शन आणि त्याचें महत्त्व

श्रीरामचरितमानसांतील अनेक काव्यकला-कौशल्यांपैकीं एका शब्दास वा शब्द समुच्चयास समानार्थक शब्दादि, पुढें किंवा मागें सुचवून अर्थ स्पष्ट करून ठेवणें ही एक कला आहे. असे खुणेचे पर्याय ध्यानीं न आल्यास श्रीगोस्वामींना अपेक्षित असलेला एकच निश्चित अर्थ कळत नाहीं; आणि मतामतांचा गलबला, वादविवाद व संशय यांना मोकळें रान सांपडतें. कांहीं महत्त्वाचीं उदाहरणें येथें नमुन्यादाखल दिलीं आहेत.

१. साधु, संत, बुध, सज्जन व सुजन हे शब्द समानार्थक वापरले आहेत. हें न कळल्यास बुध = शास्त्रज्ञ, पंडित, विद्वान् असा अर्थ घेतला जाईल. हिंदी टीकांमध्यें असें घडलें आहे. यांपैकीं सज्जन, सुजन व बुध हे क्वचित् सामान्य अर्थानेंहि वापरले आहेत.

(क) बुध = ज्ञानी भक्त.

राम ! चरित तव ऐकुनि पाहुनि । सुख *बुधांस* जड जाती मोहुनि ॥ (२।१२७।७)
हें वाल्मिकि वचन आहे. बुध शब्दाचा पर्याय कुठें आहे ?

व्हा प्रसन्न हें द्या वरदान । *साधुसमाजिं* काव्यसन्मान ॥
जो प्रबंध *बुध* ना आदरती । वृथा बाल कवि ते श्रम करती ॥ (बाल. दो. १४।७,८)

येथें *बुध = साधु* हा पर्याय बालकांडारंभींच सुचविला आहे. साधु = ज्ञानी भक्त हें प्रयागरूपकांत (१।२) त्यापूर्वींच स्पष्ट केलें आहे.

(ख) साधु = संत. ' मुदमंगलमय *संतसमाजहि* ' (१।२।७) असा उपक्रम केला आणि ' लाभ चारि फल या तनुं *साधुसमाज* प्रयागिं ' (१।२) असा त्या प्रकरणाचा उपसंहार करून *संत = साधु* हें सुचविलें. (अरण्य. ४५।६) ' श्रुणु मुनि

संतगुणांना वदतों ' असा उपक्रम आहे आणि ' श्रुणु मुनि *साधूंचे गुण* जितके ' (४६।८) असा उपसंहार संतलक्षणांचा केला आहे.

(ग) साधु = सुजन. ' *सुजनसमाज* सकलगुणखाणी ' (१।२।४) असें संत–साधु–समाजवंदनांत आधींच म्हटलें आहे.

(घ) साधु = सज्जन.

' ***सज्जन*** **सकृत सिंधुसम कोणी। जया वृद्धि विधु पूर्ण बघोनी** ॥ (१।८।१४)

दोहा–' **भाग्य अल्प अभिलाष अति एक असे विश्वास।**

श्रवणें *संत* सुखावती खल करतिल उपहास ॥ (दो. ८)

ज्यांस चौपाईंत *सज्जन* म्हटलें त्यांसच त्या चौपाईच्याच दोह्यांत *संत* म्हटलें. याप्रमाणें **मानसारंभीं** वंदनप्रकरणांतच साधु, संत, बुध, सज्जन व सुजन हे समानार्थी असल्याचें दाखविलें आहे.

२. **विधि = ब्रह्मदेव; विधि = दैव; विधि = विधान; विधि = जगत्कर्ता = ईश्वर = राम** हे सर्व अर्थ मानसांत वापरले आहेत, पण कांहीं ठिकाणीं विधि = जगत्कर्ता = ब्रह्मदेव हा अर्थ घेण्यानें अनर्थ सिद्ध होतो. असा अनर्थ टीकाकारांनीं केला आहे; आणि मग स्वतःच शंका काढून आणखी घोटाळा निर्माण केला आहे. (उदा.१।६।३–९ व दोहा.)

बऱ्यां वाइटां *विधिनें सृजिलें* । गणुनि दोष गुण वेदिं निवडिले ॥ ३ ॥

माया ब्रह्म जीव जगदीश्वर ॥ ७ ॥ **निगमागमीं गुणदोषविभक्ती** ॥ ९ ॥

जडचेतन गुणदोषमय *कर्ता निर्मि जगास*।

संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषांस ॥ ६ ॥

देइ *विधाता विवेक* हा जैं। गुणिंहि रमे मन त्यजि दोषां तैं ॥ १ ॥

(क) *विधीनें* जग सृजिलें असा उपक्रम केला, *कर्ता* निर्मि जगास असा उपसंहार केला; मध्यें निर्माण केलेल्यांचे परस्परविरोधी नमुने दिले आहेत व ' जगदीश्वर ' हा उल्लेख त्यांत आहे. विधि = ब्रह्मदेव हा अर्थ घेतल्यास **ठरेल** कीं ब्रह्मदेवानें जगदीश्वराला निर्माण केलें; पण हें म्हणणें अनर्थकारक आहे; पण टीकाकारांना हाच अर्थ घेतला आहे! जगाचा कर्ता कोण हें मानसांतच अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें सांगितलें आहे. (ख) ब्रह्मदेव स्वतःच म्हणतात,

' **जो सृष्टि उपजवी त्रिविधा बनवी कोणी साह्य न दूजे** ' (१।१८६ छंद)

(ग) ***आदि शक्ति जी निर्मि जगा या* । *ती* ही मम अवतरेल *माया*** ॥

असें प्रभु रामचंद्रांनीं सीतेकडे बोट दाखवून मनुराजास सांगितलें आहे. (१।१५२।४) ' **मम** *मायासंभव संसारीं* ' (७।८६।३), ' *अखिल विश्व हें मत्कृत* **जाणा** ' (७।८७।७) असें रघुनाथ राम म्हणाले आहेत. अशीं पुष्कळ वचनें आहेत. **यावरून** *ठरलें कीं बालकाण्डातील वरील वर्णनांत विधि = कर्ता = विधाता = राम.* ते

आपल्या मायेकडून उत्पत्ति करवितात. २।१२६ छंद, ३।१५।६; बाल. मं. श्लोक ५ व टीका पाहावी. कांहीं ठिकाणीं असे धागेदोरे जमवावे-जोडावे लागतात तेव्हां प्रकरणानुसारी पण मानस-अविरोधी अर्थ सांपडतो. (ब) यालाच पुढल्या चौपाईत *बुद्धि देणारा विधाता* म्हटलें आहे. बुद्धिदाता ब्रह्मदेव नसून 'बुद्धि देणें भगवंताचें' हें सर्व प्रसिद्ध आहे. *विधि = कर्ता = विधाता = जगदीश = राम – रघुनाथ* हें *समीकरण लक्षांत न ठेवल्यास कांहीं ठिकाणीं अर्थांचा महा अनर्थ होईल.*

३. भजन = भक्ति :—

प्रभु सुख सकल देउं म्हणती जरि। देउं भक्ति निज वदले ना परि।।
***भक्तिहीन* गुण सब सुख तैसें। लवण विना शाकादिक जैसें ।।**
***भजनहीन* सुख कवणे काजा ।।** (७।८४।४–६)

भक्तिहीन = भजनहीन, भजन = भक्ति, हें सिद्ध झालें. याचा अर्थ असा नव्हे कीं सर्वच ठिकाणीं भजन म्हणजे भक्ति हा अर्थ घेणें; पण भजन = भक्ति हा अर्थ पुष्कळ ठिकाणीं आहे, *संदर्भानुसार घेतला पाहिजे.*

४. पुण्यपुरुष = धर्मशील = सुकृती ? येथेंसुद्धां विस्ताराची आवश्यकता नाहीं-वसिष्ठवचनांत पाहा.

ऐकुनि गुरु वदले सुखघूर्णित । मही *पुण्यपुरुषा* सुखपूरित ।
सागरिं सरिता जाति जशाही । जरी *कामना तयास नाहीं* ।।
तशि न मागतां सुखसंपत्ती । सहज *धर्मशीलासी* जमती ।।
तुम्हि गुरु विप्र धेनु सुर सेवी । तशि पुनीत कौसल्या देवी ।।
जगीं तुम्हांसम *सुकृती* कांहीं । भूत न, नाहीं, होणें नाहीं ।। (१।२९४।१–५)

यावरून ठरलें कीं पुण्यपुरुष = धर्मशील = सुकृती = गुरुविप्रधेनुसुरसेवी; परंतु अनुपान " तशि पुनीत अर्धांगी देवी " पाहिजे आणि पथ्य 'कामना नाहीं' हें पाहिजे. **ज्याची पत्नी पुनीत धर्मशील देवी आहे व जो निष्काम बुद्धीनें गुरुविप्रधेनुसुरसेवक आहे तो धर्मशील.** सहधर्मिणी हें नांव पत्नीला यामुळेंच आहे. पत्नीपाणिग्रहण केल्यापासून तिचें पापग्रहण करावें लागतें व पुण्य समर्पण करावें लागतें ! म्हणून **एकटा पुरुषच सुकृती असून धर्मशील = पुण्यपुरुष होऊं शकत नाहीं.**

याप्रमाणें कुठें पर्याय अगदीं जवळ सांपडतो तर कुठें दूरवर शोधावा लागतो व कुठें शास्त्रसिद्धान्तानुसार विचार करून कोणता पर्याय ग्राह्य हें ठरवावें लागतें.

उपक्रमोपसंहारांत बरेच पर्याय सांपडतात. सावध राहून, पूर्वापर संगतीचा विचार करून, संतसंगतींत श्रवण पठण केल्यास मानस सुगम आहे. वाचकांच्या व वक्त्यांच्या बुद्धीला विचारप्रवण करून सतत जागृत–सावध ठेवण्यासाठीं अशा विविध कला मानसांत वापरल्या आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१५ 卐 卐 卐

मर्यादा-पालन-दक्षता

श्रीरामचरितमानसांत श्रीगोस्वामींनीं भक्ति, शास्त्र, धर्म, शिष्टाचार इत्यादींच्या मर्यादा-पालनांत इतकी दक्षता बाळगलेली दिसते कीं सखोल तत्त्वान्वेषी दृष्टीनें मानसाभ्यास न केलेल्या पट्टीच्या विद्वानांना कांहीं शंका विचारल्या तर उत्तर देतां येणें कठिण पडेल !

१. वंदनांत क्रम—मंगलाचरणापासून पुढें अनेकांना वंदन केलें आहे. (क) प्रथम ग्रंथसंबंधीं देवतांना वन्दन व नंतर पृथ्वीतलावर सर्वांत श्रेष्ठ जे सद्गुरु (गुरु) त्यांना वंदन; त्यांच्या खालोखाल विप्र श्रेष्ठ म्हणून गुरूनंतर विप्रांस वंदन व नंतर संतसमाजादिकांस. (ख) **कुटुंबांत सर्वश्रेष्ठ, माननीय माता;** नंतर पिता, आचार्यगुरु (पुरोहित, कुलगुरु, उपाध्याय) मातृदेवः भव, पितृदेवः भव, आचार्यदेवः भव असाच श्रुतिप्रतिपादित क्रम आहे. (ग) जेथें '*गुरुमातापिता*' असा उल्लेख असेल तेथें मातेपेक्षां श्रेष्ठ असणारे गुरु = सद्गुरु, परमार्थगुरु हाच अर्थ निरपवाद समजावा. गुरुपितामाता, किंवा मातापितागुरु असा उल्लेख असेल तेथें गुरु = विद्यागुरु, आचार्य, उपाध्याय हा अर्थ आहे. ***या मर्यादेचा भंग कुठेंच झाला नाहीं.***

२. **धर्मशास्त्रमर्यादा**—पालनाची दक्षता :—

'धूम कालिमा कुसंगिं बनतो। लिहिति कारण शाइ जैं शुभ तो' (१।७।१९)

'लिहिति पुराण' च्या ऐवजीं 'लिहिती वेद' असें कां म्हटलें नाहीं ? **'वेदानां लेखकाश्चैव ते वै निरयगामिनः'** (म. भा. अनु. २३।७२) वेद लिहिणारे नरकांत पडतात असें महाभारतांत म्हटलें आहे. (क) नमस्कार केव्हां करूं नये, धर्मकार्यांत पत्नीनें वामभागीं केव्हां असावें इत्यादि अनेक शास्त्रमर्यादांचें दिग्दर्शन प्रत्यक्ष कृतीनें केलेलें आहे.

नाव्यमहाकाव्य लिहीत असतां व लिहिलेलें खोडावयाचें नाहीं असा केलेला नियम पाळीत असतां शास्त्रमर्यादापालनाची केवढी दक्षता ! **मर्यादापुरुषोत्तमाचें चरित्र लिहिणारानें किती शास्त्रज्ञानसंपन्न असलें पाहिजे व किती दक्षता बाळगली पाहिजे याचा विचार करावा !**

३. तीर्थादिकांस चालत जावें.

'रामजन्मदिनिं कीं श्रुति वानति। *तीर्थ* सकल पुरिं *चालत* ठाकती ॥

श्रुति असें वर्णन करतात कीं रामजन्माच्या दिवशीं सर्व तीर्थें *अयोध्येंत चालत येतात*. तीर्थें तीर्थास जातात तेव्हां तींसुद्धां चालत जातात; मग मनुष्यांनीं अनवाणी गेलें पाहिजे यांत नवल काय ? तीर्थयात्रेस, देवगुरुदर्शनास वाहनांत बसन गेल्यानें तीर्थयात्रेचें फल मिळत नाहीं. 'तीर्थें अयोध्येंत येतात' असें म्हटल्यानें, वाहना-

दिकांतून येतात असा अर्थ होऊं शकला असता, पण तें निषिद्ध आहे म्हणून ' चालत ' शब्द वापरला ! हीच दक्षता !

(क) पुत्रकामेष्टियज्ञांत पावक प्रगट होऊन त्यानें पायस दिलें व

' नृप तैं प्रिय नारी बोलावत । *कौसल्यादी आल्या चालत* ॥ ' (१।१९०।१)

यज्ञमंडप शरयूच्या पलीकडे, या चक्रवर्ती महाराजाच्या प्रिय राण्या, ज्येष्ठाचा उन्हाळा, दुपारची वेळ ! तरी चालत गेल्या. देवदर्शन व प्रसादग्रहण करणें होतें, *' रामतीर्थि पदिं चालत जाती । '* (२।१२९।५) हें एक भक्ताचें लक्षण आहे.

४. पुरुषाच्या वामभागीं त्याची पत्नीच.–पत्नीशिवाय इतर स्त्रियांस पुरुषांनीं आपल्या वामभागीं बसवूं नये, किंवा त्यांनीं बसूं नये. पुरुषाच्या वामभागीं बसण्याचा अधिकार फक्त त्याच्या पत्नीचा, शंकरांनीं सतीचा पत्नीभावनेनें त्याग केला व ते समाधि लावून बसले. समाधींतून जागृत झाल्यावर सतीनें

' जाउनि शंभुपदीं कृत वंदन । *देती* शंकर *सन्मुख आसन* ॥ (१।६०।४)

शंकरांनीं सतीला वामभागीं आसन न देतां *परस्त्रीप्रमाणें समोर दिलें*. हेच शंकर पार्वतीशीं विवाह झाल्यावर काय करतात पाहा :—

शंभुपाशीं गत जननि भवानी ॥

प्रिया जाणुनी कृत अति आदर । *वामभागिं दे शुभासना हर* ॥ (१।१०७।२–३)

मागील ठिकाणीं ' समोर ' हा शब्द गाळणें व येथें ' वामभागिं ' न ठेवणें (अनुवादांत) म्हणजे अर्थाचा व मर्यादेचा खून करणें ठरेल कीं नाहीं ?

५. आयुर्वेद-शास्त्रमर्यादा — श्रीराम अवतीर्ण होऊन नंतर नवशिशु झाले व रुदन करूं लागले तेव्हां

' प्रिय अति शिशुरुदनाला ऐकत । *शीघ्र* येति राण्या सब *चालत* ॥

हर्षें *धावति* चहुंदिशिं *दासी* । (१।१९३।१-२)

राण्या म्हणजे कैकयी, सुमित्रा व इतर; त्या प्रसूतिगृहाजवळ *शीघ्र चालत आल्या*. दासी मात्र धावतच नगरांत गेल्या; असें कां ? कोणी म्हणतात सम्राटाच्या राण्यांनीं धावणें शोभणार नाहीं म्हणून नाहीं आल्या धावत. पण हें म्हणणें श्रीरामचरितमानस श्रवण-पठन न केलेल्यांना शोभेल कदाचित्. कौसल्यादि राण्या सर्व प्रजेच्या देखत अगदीं उघड्या जागेंत धावल्या आहेत. ' धावति माता कौसल्यादिक । ' (७।६।९) शिवाय हें उत्तर अप्रासंगिक आहे. तसा शिष्टाचार असता तरी, अंतःपुरांत, चिरकाल अपेक्षित नवीन जन्मलेल्या बालकाचा तो रडण्याचा आवाज ऐकल्यावर त्या शिष्टाचाराची किंमत कोणीं बाळगली असती ?

(क) सुमित्रा व कैकयी गरोदर असून १।२ दिवसांत प्रसूत होण्याच्या स्थितींत होत्या; अशा गरोदर स्त्रियांनीं धावूं नये असा वैद्यशास्त्राचा, आरोग्यशास्त्राचा, गर्भिणीनें पाळावयाचा नियम आहे. सुमित्रा व कैकयी यांचा अधिकार इतर राण्यांपेक्षां

मोठा; म्हणून बाकीच्या राण्यांनीं त्यांच्यापुढें जाणें अयोग्य; म्हणून सर्वच भराभर चालत गेल्या. केवढी सावधगिरी व 'सहज बोलणें हित-उपदेश'! या उदाहरणाधारें वक्त्यानें गर्भिणीधर्म-प्रतिपादन करावेत हा हेतु आहेच.

६. **शास्त्रमर्यादा** – किष्किंधा काण्डांतील विस्तृत वर्षावर्णनांत इंद्रधनुष्य पडल्याचें वर्णन नाहीं, वर्षावर्णनांत तें असावें असा साहित्यिकांचा दंडक आहे. (बाल. ३४७।१–६) वर्षारूपक संक्षिप्त असून व लंकेंतील (६।८७।२ – ९) वर्षारूपकही विस्तृत नसून त्यांत इन्द्रधनुष्यवर्णन आहे, मुख्यें वर्षावर्णनांत कां नाहीं? शास्त्रमर्यादापालन-दक्षता हें याचें उत्तर आहे. इंद्रधनुष्य पडलेलें पाहण्यास हरकत नाहीं; पण तें कोणीं कोणास दाखवूं नये असा शास्त्रनियम आहे. तें वर्षाऋतूचें दैनंदिन दृश्य श्रीरघुनाथानें लक्ष्मणास दाखविलें आहे. सर्वशास्त्रज्ञ, सर्वज्ञ, मर्यादापुरुषोत्तम शास्त्रमर्यादा-भंग करून लक्ष्मणास इन्द्रधनुष्य कसे दाखवितील? धर्मनीति-शिक्षण देण्याची व शास्त्रमर्यादा पालनाची ही केवढी जागरूकता!

७. **परस्त्रीस आलिंगन नाहीं** – (१) मनुशतरूपांना दर्शन दिल्यावर, मनु-राजांनीं दण्डवत नमस्कार केला तेव्हां त्याच्या मस्तकावर प्रभूंनीं हात ठेवला; पण त्यांस भेटले नाहींत किंवा हृदयाशीं धरलें नाहीं. तसें केलें असतें तर *शतरूपेलाहि* भेटावें लागलें असतें; पण ती परस्त्री, व माता-कन्या-भगिनीहि नाहीं, म्हणून तें अशक्य होतें. ही गोष्ट रामावतारापूर्वीची स्वायंभुव मन्वंतरांतली. (क) शबरी एवढी प्राणप्रिय, परमभक्त पण तिलासुद्धां आलिंगन नाहीं! कौसल्यामातेला रघुनाथानें व व सीताकन्येला जनकराज-पित्यानें आलिंगन दिलें आहे. शबरीनें पायांना मिठी मारली आहे. सुनयनेनें-जनकराणीनें-प्रभूचे पाय धरले आहेत.

८. **स्त्रियांनीं साष्टांग नमस्कार** किंवा दण्डवत नमस्कार करूं नये. स्त्रियांनीं साष्टांग नमस्कार घालणें किंवा छाती जमिनीला लावणें शास्त्रविरुद्ध आहे म्हणून हें *वर्णन मानसांत नाहीं*. स्त्रियांनीं प्रभूचे पाय धरल्याचीं दोन उदाहरणें वर दिलीं आहेत. मर्यादापालक पुरुषोत्तमाचें चरित्र लिहिणारे श्रीतुलसीदास! मर्यादापालक सर्वशास्त्रज्ञ, महाकवि असले तरच योग्य! असें मर्यादापालन *रामविजयांत*सुद्धां नाहीं.

९. **वेषाचा मान राखणें** – यति-*संन्यासीरूपानें* सीतेजवळ *गेलेला* दशानन

वदुनि कथा नानाविध शोभन। प्रीति नीति भय दावि विलोभन॥
तेव्हां सीता वदे 'तुम्हीं यति असतां। *स्वामी! तुम्हीं वच खलसें वदतां*'॥
(३।२८।११ – १२)

असें म्हणाली. तुम्हीं दुष्ट, खल आहांत असें म्हणाली नाहीं; पण त्यानें दशाननरूप प्रगट केल्यावर

'धरुनि धीर दृढ सीता वदते। *थांब खला!* प्रभु आले बध ते॥ (३।२८।१४)

सीता त्यास *खल* म्हणाली. संन्यासी वेषाचा अपमान करणें पाप असल्यानें त्यानें

दुष्टासारखें कामी भाषण केलें तरीसुद्धां त्यास '*स्वामी ! तुम्हीं*' म्हणाली. **वेषाचा मान राखणें कर्तव्य आहे. ती व्यक्ति कोणी कशी कां असेना !**

कोटांचा मान, खुर्चीचा मान, गणवेषाचा मान, गादीचा मान इत्यादि आम्हीं राखतों पण साधुवेषाचा, मातापितरांचा, मास्तरांचा मान राखीत नाहीं ! हें हितावह कीं कसें याचा विचार विसाव्या शतकांत करणें जरूर आहे.

आणखी पुष्कळ नमुने प्रस्तावनेंत बसण्यास पुढें येत आहेत पण मर्यादाभंग करणें इष्ट नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१६ 卐 卐 卐

स्तुतींत स्तुतिकर्त्यांच्या भावना

श्रीरामचरितमानसांतील कामनिक स्तुतींत असें दिसतें कीं स्तुतिकर्त्यांच्या प्रबल कामना व भावना स्तुतींत प्रतिबिंबित झाल्या आहेत. ज्ञान किंवा मोक्षप्राप्तीसाठीं कोणींच स्तुति केली नाहीं. कामनिक स्तुति फार थोड्या आहेत.

१. भानुप्रताप राजा (प्रतापभानु) स्वतःच्या बाहुबलानें पृथ्वी जिंकून भानुप्रताप राजा सार्वभौम राजा झाला होता. तो परम धर्मशील व निष्काम होता. त्याला कपटमुनि भेटल्यावर राजानें त्याची जी स्तुति केली तिच्यांत त्याच्या भावनेचें चित्र उमटलें आहे; तो राजा परिचय देतांना म्हणतो,

भुललों मी कीं फिरत शिकारीं । येउन बघुं पद *भाग्यें भारी* ।।

आम्हां अपलें दर्शन दुर्गम । *संनिध दिसतो भाग्योदय मम* ।। (१।१५९।६-७)

(१) पहिल्या चौपाईतील भावना स्वाभाविक आहे. संतदर्शन भाग्यानेंच होतें हें खरें. सर्व ऐहिक सुख, कीर्ति, सत्ता, ऐश्वर्य, संतति इत्यादींच्या परमोच्च शिखरावर पोचलेला असतां 'संनिध दिसतो भाग्योदय मम' असें म्हणाला. ऐहिक सुख, संपत्ति, सत्ता इत्यादि लाभणें म्हणजेच भाग्योदय होणें असें समजतात व ज्योतिषी लोकांस विचारतात कीं आमचा भाग्योदय कधीं आहे ? (क) 'संनिध दिसतो भाग्योदय मम' या वचनानें दिसतें कीं राजाच्या मनांत कांहीं तरी फार मोठी कामना जागृत झाली आहे; व योग्य संधि मिळतांच तो ती प्रगट करील.

(२) '**नृप वदला, विज्ञान निधान– । जे अपणांसम गताभिमान ।।**

ते स्वरूप निज सतत *लपवती* । वसुनि कुवेषीं कुशल पावती ।।' (१।१६१।१-२)

प्रतापभानूनें आपल्या मनांतील कामना लपवून ठेवली आहे म्हणून त्याच्या तोंडांतून लपवालपवीची भाषा निघाली.

(क) या दोन्ही गोष्टी त्या अति चाणाक्ष दांभिक कपटी मुनीनें ताडल्या व आपल्या अलौकिक तपोबलाचें बरेंच लांबलचक वर्णन करून सांगितलें कीं,

'निःसंशय मी प्रसन्न आतां । *माग मना जें रुचेल ताता!*॥ (१६४।५)

'*नृप हर्षित परिसुनि शुभ* वचना । विविधा विनवी धरुनी चरणां'॥

ज्याच्या मनांत कोणतीच कामना नाहीं, त्याला वरील मुनीचें वचन *शुभ* वाटणार नाहीं; व मनाला रुचेल तें माग म्हटल्यावर कांहीं पारमार्थिक मागणी करणें असेल तर हर्ष होईल पण राजा ज्ञानी किंवा भक्त नव्हता व त्यांची आवडही नव्हती. अशा माणसाला तें वाक्य ऐकून हर्ष होणार नाहीं व त्यामुळें तो मुनीचे पायही धरणार नाहीं, म्हणून ठरतें कीं काय मागावें हें नृपानें आधीं निश्चित केलें आहे व तें तो आतां मागणार; म्हणून म्हणतो,

'कृपासिंधु! मुनि दर्शनिं तूझे । चारी पदार्थ करतलिं माझे ॥

तरिही प्रभुला प्रसन्न पाहुनि । *होऊं अशोक* अगम वर मागुनि'॥

दो.— जरामरण रुजरहित तनु रणिं अजिंक्य होईन ॥

करिन कल्पशत राज्य महि एकछत्र रिपुहीन॥ (१६४)

असें मागितलें. ज्याच्या मनांत कामना नाहीं, ज्यानें हजारों मोठे याग निष्काम ईश्वरार्पण बुद्धीनें केले आहेत तो 'रुचेल तें माग' असें *ऐकल्याबरोबर तत्क्षणीं* अशा प्रकारचा वर चटकन मागेल हें शक्य आहे काय?

'संनिध दिसतो भाग्योदय मम' असें म्हणाला तेव्हां कांहीं तरी मागण्याची इच्छा झाली होती. नंतर कपटी मुनि साखरपेरणी करीत बोलत असतां विचार करून मागणी निश्चित केली तेव्हां 'तें स्वरूप निज सहज लपवती' असें म्हणाला व ज्या संधीची वाट पाहात मागणी मनांत घोळीत बसला होता, ती 'माग मना जें रुचेल ताता!' या शब्दांनीं मिळतांच चारी पुरुषार्थ करतलावर आहेत असें म्हणत चटकन मागितली.

२. **विदेहराजकुमारी-सीता** — पुष्पवाटिकेंत श्रीरघुवीराचें अचानक दर्शन होऊन त्यांच्यावर सीतेचें पतिभावनेनें प्रेम उत्पन्न झालें. त्यांची मूर्ति वारंवार हृदयांत धारण करून खगमृग-विलोकनाच्या मिषानें पुनः मागें वळून बघत बघत सीता परत निघाली. तलावासमीप असलेल्या ज्या *गौरिनिकेतांत* प्रथम पूजन केलें (१।२२८।४-६) होतें तिकडे चालली. (२३५।१)

जाणुन शिवधनु कठिण, कळवळे । राखुनि शामल मूर्ति उरिं, वळे ॥

पुन्हां *भवानी-भवनीं* आली । पदिं वंदुनि, कर जुळुनि म्हणाली ॥

जय जय *गिरिवर-राजकिशोरी* । जय *महेश-मुखचंद्रचकोरी* ॥

जय *गजवदन-षडाननमाये* । जगज्जननि! दामिनि-दुति काये ॥

आदि मध्य ना तव अवसान न । श्रुती प्रभावा अमित जाणत न ॥

***भवभव-विभव-पराभव-कारिणि । विश्वविमोहिनि स्ववश विहारिणि* ॥**

(१।२३५।१,४-८)

दोहा :— *पतिदेवता-सुनारिमाधिं प्रथम अंब* तव रेख ।
महिमा अमित, न वदुं शकति अयुत शारदा शेष ॥
तुज सेवतां सुलभ फल चारी। *वरदायिनी पुरारी-प्यारी* ॥ (२३३।१)

(१) पूर्वी ' गिरिजागृह ', ' गौरिनिकेत ' असें म्हटलें असतां येथें **' भवानीभवन '** म्हटलें. भवानी ही भवाची (शिवाची) उत्पादक शक्ति आहे, मृडानी संरक्षक शक्ति आहे व शर्वाणी संहारक शक्ति आहे. (भव, मृड, शर्व = महेश) गिरिजेनें, गौरीनें आपली उत्पादक शक्ति प्रगट करावी या हेतूनें तिची प्रार्थना करण्यासाठीं देवीच्या देवळांत आली.

(२) **गिरिवरराजकिशोरी** — सीता स्वतः विदेहराजकुमारी आहे. गौरीचें लग्न शिवाशीं होऊन ती भवानी होण्यापूर्वीं (भवन) ती गिरिवरराजकिशोरी होती. किशोरी = कुमारी. (क) उमा–गौरी घोर तप करीत असतां,

क्षीण बघुनि अति उमा-शरीरा । *ब्रह्मगिरा* गगनीं गंभीरा ॥
दो०— सुफल मनोरथ होइ तव श्रुणु *गिरिराजकुमारि* ।
क्लेशां दुःसह थांबवी मिळति अतां त्रिपुरारि ॥

(ख) सीता स्वतः विदेहराजकुमारी आहे व मनानें श्रीरामास पति वरलें आहे; म्हणून गिरिजेला तिच्या तपश्चर्याकाळांतील आठवण करून देण्यासाठीं ' गिरिवर-राजकिशोरी ' शब्द वापरला व सुचविलें कीं माझी हल्लींची मनःस्थिति त्या वेळच्या तुमच्या मनस्थितिसारखी आहे. तुम्हीं नारदवचनावर विश्वास ठेवून, गिरिराज-कुमारी–असतांच शंकरांस पति मानलें; मीं नारदवचनावरच विश्वास ठेवून श्रीरघुवीरास पतिभावनेनें हृदयांत धारण केलें आहे. ' नारदवच सीता स्मरे उपजे प्रीति पुनीत । ' (१।२२९ पाहा). तुझी चिंता जशी ब्रह्मगिरेनें दूर केली तशी तूं आपल्या वाणीनें माझी चिंता दूर कर.

(३) **महेश-मुखचंद्रचकोरी** — तूं महेशमुखचंद्राकडे चकोरीसारखी सतत बघत बसतेस व सदा परम सुखी राहतेस. मी नुकतीच रामचंद्रमुखचंद्रचकोरी झाल्यें आहें; पण हें भाग्य तुझ्यासारखें सतत लाभलें तर उपयोग !

' स्नेह अधिक वपुभान न राहे । *शरद शशिस जणुं चकोरि पाहे* ॥ '
(१।२३२।३ पासून पाहा)

सीता अशी ' रामचंद्रमुखचंद्रचकोरी ' आधीं बनलीच आहे; परंतु त्या कोमल बाहूंनीं भवधनुष्यभंग होणें अशक्य वाटत आहे.

(क) **' जय गजवदन-षडानन-माये ...** कायें ' याचें साम्य व स्तुतींतील येथें न दाखविलेल्या इतर शब्दांचें साम्य गूढार्थचंद्रिकेंत पाहावें, येथें जास्त विस्तार नको.

(४) **' भवभव-विभव-पराभव-कारिणि '** — ही रचना केवळ अनुप्रासासाठीं आहे असें सर्वांस वाटतें; पण अनुप्रास गौण आहे, श्लेष मुख्य आहे. भव = महेश = शिव त्यांच्या पासून भव म्हणजे उत्पत्ति आहे ज्याची तें भवभव = शिवधनुष्य, महेशकार्मुक;

त्याचें विभव = वैभव, ऐश्वर्य; अभंग, अति जड, अति कठोर इत्यादि. भवभव-विभव = शिवधनुष्याचें ऐश्वर्य, प्रभाव; त्याचा पराभव = विनाश, भंग, करविणारी (= कारिणी) तूंच आहेस, हें *भवभवविभव-पराभवाचें कार्य रघुपतीकडून तूं करवून घे, ही या वचनांतील मुख्य भावना आहे*. वाच्यार्थ येथें देण्याची आवश्यकता नाहीं.

(५) **विश्वविमोहिनि** — इतर सर्व वीर महावीरादिकांस पक्कें मोहून टाक, व धनुष्यभंग त्यांना करतां येणार नाहीं असें कर.

(६) **स्ववशविहारिणि** — तूं म्हणशील कीं तें भवाचें धनुष्य ! तें मोडविण्यास मी स्वतंत्र कुठें आहें ? तूं परवश नसून 'स्व-वश' आहेस. (स्वः वशे यस्याः सा स्ववशा) तूं आपल्या पतीला वश करून ठेवलें आहेस, व तूं आपल्या इच्छेप्रमाणें विहार करतेस.

(७) **'पतिदेवता-सुनारिमधिं...**रेख ' पतीला देवता मानणाऱ्या सर्व पतिव्रतांत तूं श्रेष्ठ आहेस, मीसुद्धां पतिदेवताच आहें. रघुपतिशिवाय इतर कोणावर माझें प्रेम नाहीं व मी इतर कोणास वरणार नाहीं; पण मी परवश आहें, म्हणून तूंच माझी इच्छा पूर्ण करून माझ्या पातिव्रत्याचें रक्षण कर; आणि —

(८) **'वरदायिनी पुरारी-प्यारी** ' — तूं जशी पुरारीप्यारी (प्रियतमा) आहेस तशी मी रघुपतिप्यारी होईन असा वर मला दे. अधिक विस्तार गूढार्थचंद्रिकेंत दिसेल.

विदेहराजकिशोरीच्या भावना गिरिराजकिशोरीला समजल्या व तिनें स्वतः आपल्या वाणीनें सीतेला पाहिजे असलेला आशीर्वाद दिला आहे.

या दृष्टीनें ही स्तुति परम रमणीय आहे. आधार मानसांतच भरून ठेवून चमत्कृति-प्रधान शब्दरचना अशी केली आहे कीं एकाहि टीकाकाराला हें रहस्य आजपर्यंत दिसलेलें नाहीं. हें भाग्य महाराष्ट्राच्या वांट्याचेंच होतें असें ठरतें. 'नटमाया न बाधि नटदासा ' हेंच यांतील मर्म आहे.

निष्कामस्तुतींत–सूचना — (१) अरण्य. ४१ व पुढील चौपाई यांत नारदाची इच्छा अगदीं प्रगट दिसते. (२) उत्तर. दो ५० (चौपाया सोडून) पासून ५१ पर्यंतच्या नारदस्तुतींत प्रभुनिर्याण होत असतां नारदाचें हृदय वारंवार भरून येत आहे हें यतिभंगानें छंदोभंग वारंवार निर्माण करून दाखविलें आहे. (३) अरण्यांतील सुतीक्ष्णस्तुतींत बालकभक्ताच्या विचारांतील धरसोड, अधीरता व मातृप्रेमभावना मोठ्या मार्मिक रीतीनें दाखविली आहे.

अशा रीतीनें प्रत्येक स्तुतींत स्तुतिकर्त्याची भावना व हृदयस्थिति कमी-अधिक प्रमाणांत दिसते. विस्तारमर्यादाभंग करणें योग्य नसल्यानें आणखी स्पष्टीकरण करतां येत नाहीं.

तुलसी-काव्य-कला-मर्मातें । दाखवि हरि-गुरु-कृपाच मातें ॥
देति सदा परमानंदाते । जडमति दासा हरि-गुरु दाते ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१७ 卐 卐 卐

भौतिक लीलेवर दैवी प्रकाश

श्रीरामचरितमानस वाचीत असतां, इतर रामायणांत सहसा न दिसणारी, एक विशेष गोष्ट दिसते कीं परमरामभक्त व जगदुपकारी कविराज एखाद्या निर्हेतुक परम स्नेही वाटाड्यासारखे वाचकांस व श्रोत्यांस महामोहमार्गापासून दूर ठेवून, रामभक्तिमय स्वहितपथावर ठेवण्यासाठीं प्रकाशदीप दाखवून सावध राहण्याच्या सूचना देत आहेत. जिथें श्रीरघुनाथ विषयी, सर्वसाधारण माणसासारख्या नरलीला करतात तिथें त्या लीला ऐकून श्रोत्यांचें मन भगवद्भावना विसरून, श्रीरघुनाथास मनुष्य मानून संशय संदेहाच्या फासांत अडकण्याची शक्यता असते. कारण,

' निर्गुण रूप सुलभ अति सगुण न जाणे कोणि ।

सुगम अगम चरितां श्रवुनि जाति मुनीहि भुलोनि ॥ (७।७३)

अशा प्रत्येक ठिकाणीं कविसम्राट श्रीतुलसीदास वाचकांस दैवी प्रकाश देऊन भगवद्भावना जागृत करतात. हा प्रकाश पदोपदीं मिळतो. येथें प्रत्येक कांडांतलें १।१ च उदाहरण घेऊं.

बाल.—गत गुरुगृहिं रघुराव पढाया । अल्प कालिं सब विद्या आल्या ॥ (२०।४) परमात्मा असते तर ते विद्या शिकण्यास गुरुगृहीं कशाला जाते ? सर्वज्ञ सर्वदर्शी प्रभूला गुरु काय पढविणार ? इत्यादि आत्मघातकी शंकासुर उत्पन्न होऊं नयेत म्हणून मार्गदर्शक दिवा दाखवितात.

श्वास सहज ज्याचा श्रुति चारी । हरि तो *पढतो कौतुक भारी ॥* (२०।५) गुरुगृहीं जाऊन, राहून, पढणें हें एक कौतुक, क्रीडा केली इतकेंच ! त्यांना अज्ञात असें कांहीं नाहीं पण नरलीला करून ' धर्ममार्गचरित्रेण ' (रा. पू. ता. उ.) दाखवीत आहेत.

अयोध्या.—सांगत विविध कथाप्रसंगां । राम विलोकिति गांग-तरंगां ॥
सचिवा अनुजा प्रियेसि सांगति । विबुध-नदी-महत्ती अधिका अति ॥
करतां स्नान पथश्रम हरले । शुचि जल पितां मुदें मन भरलें ॥
स्मरतां ज्यांस सरे श्रमभारहि । त्यां श्रम लौकिक हा व्यवहारहि ॥
(८७।५-८)

संभाव्य शंका — चिदानंदमय निर्विकार देह आहे असें म्हणतात तर श्रम होणें आणि तहान लागणें हे विकार कसे उत्पन्न झाले ? इत्यादि संशयपिशाच मानगुटीस बसण्याची शक्यता दिसतांच महामांत्रिक वाटाडे प्रकाश पाडतात कीं ज्यांच्या स्मरणानें जन्ममरणाचे मोठे श्रम सरतात ते देवच हे आहेत; नरलोकांत नर बनले आहेत म्हणून लोकांसारखे व्यवहार करीत आहेत इतकेंच.

अरण्य.—त्या वननिकटिं दशानन आला । तैं मारीच कपटमृग झाला ॥
अति विचित्र, ना जाइ, वर्णिला । कनकदेह मणिखचित बनविला ॥
सीता परम रुचिर मृग पाहत । अंग अंग सुमनोहर भासत ॥
श्रुणु देवा रघुवीर कृपाकर । चर्म मृगाचें या अति सुंदर ॥
सत्यसंध ! या वधुनि चर्म तें । प्रभु ! आणा वैदेही वदते ॥ (२७।१-६)

हें ऐकतांच पांचभौतिक देहधारी अज्ञानी पुरुषासारखे त्या कपटमृगाच्या मागें श्रीरघुवीर धावत जाण्याच्या आधींच आमचे कृपाळु मार्गदर्शक दैवी प्रकाश पाडून मर्म दाखवितात कीं रघुवीर सर्वज्ञ आहेत; तो कपटमृग आहे, कशासाठीं व कां आला आहे वगैरे सर्व जाणूनच आतां —

रघुपति जाणुनि सर्व कारणा । उठति हर्षी, सुरकार्यसाधना ॥ (२७।६)

हें मर्म सांगणारा कोणी आप्त रावणास भेटला नाहीं म्हणून त्याला वाटलें कीं राम भगवान नसून मनुष्य आहेत. ' असंभवं हेम मृगस्य जन्म तथापि रामो लुलुभे मृगाय ' असें कांहीं ग्रंथकार म्हणतात; त्यांस इथल्यासारखा कोणी मार्गदर्शक भेटला नाहीं म्हणा किंवा अज्ञानी लोक काय म्हणतील हें त्या वचनानें दाखविलें म्हणा.

किष्किंधा. — अंगदादि दूतांना सुग्रीवानें आज्ञा दिली व ते दक्षिण दिशेकडे निघाले. चालूं लागले तेव्हां : —

' पवनतनय शिर नमवि शेवटीं । जाणुनि कार्या *प्रभु* घे निकटीं ॥
पाणिसरोरुह मस्तकिं लावुनि । करमुद्रिका दिली जन जाणुनि ॥
विविधा सीतासांत्वन करणें । वदुनि विरह बल वेगें वळणें ॥ (२३।९-११)

सीतेच्या शोधासाठीं दूत पाठविणारा मनुष्य अज्ञानीच असला पाहिजे वगैरे संशयसर्प डसण्याचा संभव जाणून सावध करण्यासाठीं घंटा वाजवितात कीं,

' प्रभु जरि जाणति सर्वहि वार्ते । राजनीति राखिति सुरपाते ॥ (२३।१३)

ते प्रभु = सर्व-समर्थ आहेत; सर्व कांहीं जाणतात, पण राजनीति संरक्षण करण्या-साठीं हें असें केलें.

सुंदर. — मग सर्वज्ञ सर्व-उर-वासी । सर्वरूप सबरहित उदासी ॥
वदति वचन नीती-प्रतिपालक। कारण मनुज दनुजकुल-घातक ॥ ' (५०।३-४)

असें आधीं हडसून खडसून बजावून मगच मनुजलीलेचें वर्णन करतात,

' श्रुणु कपीश वीरहि लंकापति । तरणें केविं गभीर अपांपति ॥
संकुल मकर उरग झष नाना । अति अगाध अति दुस्तर जाणा ॥ ' (५०।५-६)

लंका. — या कांडांत पदोपदीं प्राकृत पुरुषासारख्या नरलीला वर्णन करावयाच्या असल्यानें, वाचकांनीं सदा सावध राहावें म्हणून कांडारंभीं मंगलाचरणांतच नगारा वाजवून सुचविलें आहे :—

' रामं कामारिसेव्यं, भवभयहरणं, कालमत्तेभसिंहं ।

योगींद्रं ज्ञानगम्यं गुणनिधिमजितं निर्गुणं निर्विकारम् ॥
मायातीतं सुरेशं खलवधनिरतं ब्रह्मवृन्दैकदेवं । इत्यादि.

हें आरंभींच सांगितलेलें मर्म वाचकादि विसरतील म्हणून कथावर्णनांतसुद्धां वारंवार प्रकाशाचा झोत कविराज पाडतातच.

उत्तर. — सीते सुंदर सुतयुग झाले । लवकुश निगमागमीं गाइले ॥
उभय विजयि विनयी गुणमंदिर । प्रतिबिंब किं हरिचें अति सुंदर ॥
झाले दो दो सुत भावांप्रति । सकल रूपगुण-शीलवंत अति ॥ (२५।६-८).

हें ऐकून श्रम होईल म्हणून हेमगर्भाची मात्रा चाटवितात कीं :—

दो० — *ज्ञान-गिरा-गोऽतीत अज मायामनगुणपार ।*
तो सच्चिदानंद घन करि नरचरित उदार ॥ (२५)

याप्रमाणें प्रत्येक सोपानांतील १।१ च उदाहरण येथें दिलें असलें तरी अशीं उदाहरणें प्रत्येक सोपानांत-कांडांत-पुष्कळच आहेत. वाचकांची भगवद्भावना जागृत ठेवण्यास साधन झालें व वारंवार हरिगुणगान करतां आलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ८।१८ 卐 卐 卐

श्लेष-अलंकार

श्लेष म्हणजे दोन अर्थ होऊं शकतील अशी काव्यरचना. एका शब्दांत, समासांत किंवा वाक्यांतच श्लेष असूं शकतो. मानसांत सर्व प्रकार आहेत पण थोडे आहेत.

श्लेषांचा अर्थ वाक्यश्रवण करतां करतां सहज ध्यानीं येत नाहीं; आणि रसोत्पत्ति व भावोत्पत्ति श्रवणाबरोबरच होत नाहीं. मानस *अभिनेय महाकाव्य* (अग्निपुराणांत हा प्रकार सांगितला आहे) असल्यानें यांत लांबलचक यमकें जशीं नाहींत तसेंच *श्लेष नसल्यासारखेच आहेत*. महाकाव्य असल्यानें सर्व अलंकार असणें जरूर म्हणूनच श्लेषांचा उपयोग केलेला दिसतो. असलेल्या सर्व श्लेषांचे अर्थ गूढार्थचंद्रिकेच्या प्रकाशांत आले आहेत. 'भवभव-विभव-पराभव-कारिणि' हें एक उदाहरण मागल्या (प्र. प्र.८।१६) या प्रकरणांत सहज आलें आहे.

१. बालकांड — खलवंदनांत :

हिं० — बहुरि सक्र सम बिनवउँ तेही । *संतत* *सुरानीक* *हित* जेही ॥
म. — पुन्हां शक्रसम विनविं तयांतें । *संतत* *सुरानीक* *हित* ज्यांतें ॥ (४।१०)

(१) **सुरानीक** शब्दांत श्लेष आहे. पदच्छेदानुसार दोन अर्थ होतात असें भासतें. सुर + अनीक, आणि सुरा + नीक असा पदच्छेद १७।११।५३ ला गूढार्थ-चंद्रिका लिहिण्याच्या वेळेपर्यंत ही बुद्धिसुद्धां सर्व हिंदी टीकाकारांप्रमाणें घेत होती; पण त्या वेळींच प्रकाश मिळून या अर्थांतील अनेक दोष दिसले.

(क) सुर + अनीक हा पदच्छेद योग्य आहे कारण कीं दोन्ही शब्द संस्कृत आहेत व सुरानीक हा षष्ठीतत्पुरुष समास घेतां येतो. (ख) पण सुरा + नीक यांत सुरा हें संस्कृत नाम आणि नीक हें हिंदी विशेषण ठरतें. तेव्हां सुरानीक या समासाचा विग्रह कसा करणार ? सुरानीका असें म्हणावें लागेल. पण नीका हें पुल्लिंगी रूप आहे, नीकी हें स्त्रीलिंगी आहे. संस्कृत व हिंदी अशा शब्दांचे समास मानसांत नाहींत. (ग) शिवाय नीक = चांगली आणि '*हित*' यांत थोडी द्विरुक्ति होतेच.

(२) हे सर्व दोष डोळे मिटून मान्य केले तरी 'संतत' शब्द आड येतो. खलांना—सर्वच खलांना मद्यपान करणें संतत चांगलें हितें (हितकारक, प्रिय) वाटतें कायँ ? संतत = सदा, सर्वकाळ. या प्रश्नाचें उत्तर 'नाहीं' असेंच द्यावें लागेल. (क) उत्तरकांडांत प्रभूंनीं जीं खललक्षणें सांगितलीं आहेत त्यांत 'सुरापान करणें' हें लक्षण नाहीं. तेव्हां सुरानीक याचा अर्थ काय ?

(३) 'सुर' शब्दाचेच दोन अर्थ होतात. सु = समृद्धि, ऐश्वर्य, किंवा सु = कष्ट, पीडा. '*सु* पूजायां भृशार्थेऽनुमति - *कृच्छ्र-समृद्धिषु*' (मेदिनी). 'स्यात् *कष्टं कृच्छ्रम्* आभीलम्' (अमर). सु = समृद्धि, देणारा = सुर = देव. सु = कष्ट देणारा, पीडा देणारा सुर = कामक्रोधादि विकार, मानसरोग. (सु राति ददाति = सुरः) म्हणून सुरांचें देवांचें अनीक = सुरानीक हा एक अर्थ शक्राकडे लागतो. आणि पीडा देणारांचें अनीक, सैन्य हा खलांकडे लागतो. (क) या अर्थाला मानसांत पोटभर आधार आहेत. मोहकामक्रोधादि विकारांस मायेचें *सैन्य* म्हटलेंच आहे.

'विश्वा राही व्यापुनी *मायाकटक* प्रचंड ।

सेनापति कामादि, भट दंभ कपट पाखंड ॥ (उत्तर. ७१)

या सैन्यालाच मानसरोग म्हटलें आहे व ते जिवांना *संतत पीडा देतात* असें स्पष्टच म्हटलें आहे.

'एक रोगवश नर मरति बहु, असाध्य या व्याधि ।

***संतत जीवा पीडिती* पावे कशी समाधि** ॥ (उत्तर. १२१)

'संतत' शब्द खलांकडे घेतांना 'संतत सुरानीक' म्हणजे संतत पीडा देणारांचें सैन्य; ज्यांस हितकारक वाटतें, असा निर्दोष अर्थ मानसाधारें निघाला. व खल-लक्षणांत प्रभूंनीं असेंच वर्णन केलें आहे.

'कामक्रोधमदलोभ*परायण* । निर्दय कपटी कुटिल *मलायन* ॥'

दंभकपट हृदिं, सुवेषधारी......इत्यादि (७।३९।४ पासून पाहा.)

म्हणून सुरानीक = काम क्रोधादि मायाकटक, आणि सुरानीक = देवांचें सैन्य असे दोन अर्थ सिद्ध झाले.

२. 'प्रगट वदे ना जरी भवानी । *हर हृदयस्थित* जाणे ज्ञानी ॥ (बाल. ५१।५)

(१) भवानीनें आपल्या मनांतला संशय जरी प्रगट करून सांगितला नाहीं तरी

हृदयस्थित ज्ञानी हरानें तो जाणला; '**हृदयस्थित हर**' हा एक अर्थ प्रगट आहे.

(२) **हर-हृदयस्थित** असा एक शब्द घेतला कीं हराच्या हृदयांत असणाऱ्या सर्वज्ञ (ज्ञानी) रामचंद्रांनीं जाणला हा दुसरा अर्थ सिद्ध होतो; व हाच या सतीमोहप्रकरणांत फार महत्त्वाचा आहे. गूढार्थचंद्रिका पाहा. (हा अर्थ हिंदी टीकांमध्यें नाहीं).

३. नारदाचें स्वागत करून त्यांस आसनावर बसविल्यानंतर पार्वतीपिता हिमगिरि त्यांस विनवितात,

दो० — त्रिकालज्ञ सर्वज्ञ तुम्हिं *गति सर्वत्र* तुम्हांस ॥

वदा बघुनि मनिं *मुनिवर* तनया दोष-गुणांस ॥ (बाल. दो. ६६)

तुम्हीं त्रिकालज्ञ व सर्वज्ञ असून तुमचें गमन (गति) सर्वत्र होत असते (तरी) हे ! मुनिवर, मनांत पाहून (विचार करून) मुलीचे दोषगुण सांगा.

(१) उपवर झालेल्या मुलीचे दोषगुण त्रिकालज्ञ सर्वज्ञ असा कोणीहि मुनि सांगूं शकेल; ते दोषगुण जाणण्यासाठीं 'गति सर्वत्र तुम्हांस' हें सांगण्याची जरुरी काय ?

(क) असें सांगण्यांत हेतु इतकाच आहे कीं तुम्ही सर्वत्र संचार करीत असल्यामुळें या मुलीच्या दोषगुणांच्या दृष्टीनें अनुरूप असा एखादा वर कुठेंतरी पाहण्यांत आला असेलच. म्हणून '**वदा** बघुनि मनिं मुनि **वर**, तनया दोषगुणांस ॥' भाव हा कीं या मुलीला योग्य वर कोण तें वदा-सांगा व वराचे व तनयेचे (मुलीचे) दोषगुण सांगा.

(ख) हा अर्थ घेतल्यानेंच 'गति सर्वत्र तुम्हांस' या वाक्याची सार्थकता, उपयुक्तता, सिद्ध होते. अन्यथा हें वाक्य निरर्थक ठरेल; व *निरर्थक* हा *वाक्यगत काव्यदोष* कवीच्या माथीं मारला जाईल.

(२) नारद सर्वज्ञच असल्यानें विनंतींतील खोच त्यांनीं जाणली; आणि म्हणूनच पार्वतीचा भावी पति कोण हें सुचवून त्याचे ११ दोषगुण म्हणजे दोषरूप दिसणारे गुण व्याजस्तुतीनें सांगितले व थोडा विनोद कौतुकी मुनीनें केला. पार्वतीचे ११ गुण सांगितले आहेत.

अशी ही काव्यरसाची मजा आहे.

'अनुपम साहित्यकला-नमुने' हें आठवें मुख्य प्रकरण व त्यांतील शेवटचें १८ वें प्रकरण येथें समाप्त झालें.

या व मागल्या *चार मुख्य प्रकरणांत* मुख्यतः श्रीगोस्वामींच्या मानसांतील अनुपम, अद्भुत, अपूर्व व सर्वांगसुंदर काव्यकलेचें निदर्शन विविध अंगांनीं अनेक प्रकारचे मानसांतील नमुने देऊन केलें; पण नुसत्या परम मनोहर काव्यरसास्वादनानें मनुष्याची इतिकर्तव्यता होत नाहीं व समाधान होत नाहीं; म्हणून आतां दार्शनिक सिद्धान्त वगैरे अनेक नव्या दालनांतून जावयाचें आहे. त्या दालनांतसुद्धां वाचकांस मनमुराद आनंद उत्तरोत्तर अधिकाधिक मिळत राहील अशी खात्री वाटते. 'मानसांतील दार्शनिक सिद्धान्त' हें पुढलें मुख्य प्रकरण आहे.

◆◆◆◆

९ : मानसांतील दार्शनिक सिद्धान्त

卐 卐 卐 ९।१ 卐 卐 卐

श्रीरामचरितमानस वेदान्तदर्शनानुसारी

प्रास्ताविक — श्रीरामचरितमानसाची रचना श्रीमद्भागवताप्रमाणें ज्ञानोत्तर-प्रेमभक्ति प्रतिपादक अशी केलेली आहे. श्रीतुलसीदास श्रीरामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैती सांप्रदायांतले असल्यानें उत्तर-हिंदुस्थानांतील बहुतेक सांप्रदायिक टीकाकार व साधु श्रीगोस्वामीजींस विशिष्टाद्वैती समजतात व त्याप्रमाणें मानसांतील सिद्धान्तांचें निरूपण करतात. ज्ञानाविषयींचा मानस-सिद्धान्त काय याचा पक्षपातविहीन दृष्टीनें विचार केल्यास *श्रीमद्गौडपादाचार्य व श्रीमच्छंकराचार्य यांच्या वेदान्तमतांस अनुसरूनच श्रीरामचरितमानसाचा ज्ञानविषयक सिद्धान्त आहे*. तथापि —

१. सर्व–सांप्रदाय–संग्राहक आहे— ज्याप्रमाणें ब्रह्मसूत्र, उपनिषदें, श्रीभगवद्गीता व श्रीमद्भागवत यांत विविध वेदान्तसांप्रदायिकांस आपापल्या मतास आधारभूत सिद्धान्त सांपडतात व त्या त्या सांप्रदायांच्या आचार्यांनीं आपापल्या मतानुसार हे ग्रंथ लावले आहेत, त्याप्रमाणेंच मानसांत जागोजागीं अशीं विविध वचनें व वर्णनें आहेत कीं सर्व वेदान्त सांप्रदायिकांस श्रीरामचरितमानस आपापल्या मताप्रमाणें लावतां येईल. मात्र ब्रह्मसूत्रादि ग्रंथ द्वैतपर लावतांना ज्या प्रकारची कसरत द्वैती आचार्यांस करावी लागली तशी मानसांतील वचनें लावतांना करावी लागते हें निर्विवाद सत्य आहे.

(**क**) ब्रह्मसूत्र, उपनिषदें, भगवद्गीता व श्रीमद्भागवत हे ग्रंथ जसे सर्वसांप्रदाय-मान्य झाले व सर्वमतसंग्राहक असल्यामुळें खरोखर सांप्रदायातीत राहिले, सांप्रदायिकांच्या बंदिवासांत राहिले नाहींत; तसाच *श्रीरामचरितमानस हा देशभाषांतील अनुपम आद्वितीय ग्रंथ सांप्रदायाच्या कुंपणांत* अडकून *राहिला नाहीं*.

२. श्रीमद्भगवद्गीता राजाश्रय नसतां, बायबल सोसायट्या व मिशनरी यांच्या-सारखा अर्थप्रवाहाचा व प्रचारकांचा लोंढा तिला सर्व जगांत ढकलण्यासाठीं तिच्या पाठीशीं नसतां आपल्या स्वतःच्या अलौकिक मनोहरतेनें, दिव्य तेजानें व अनुपम ओजादि गुणांनीं सर्व देशांत व सर्व प्रमुख भाषांत प्रसृत झाली; तसेंच किंवा त्याहूनहि अधिक श्रीरामचरितमानसाचें .झालें आहे, होत आहे व होईल. याच्या अनेक कारणांपैकीं एक मुख्य कारण म्हणजे त्यांतील सिद्धान्त सर्व मतांचा संग्रह व समन्वय **करणारे** आहेत.

३. श्रीरामचरित मानस '**छओ सास्त्र सब ग्रंथन को रस**' (साही शास्त्रें व ग्रंथ

यांचा रस) आहे असें श्रीतुलसीदासच रामायणाच्या आरतींत म्हणाले आहेत. श्रीमानसाच्या सर्व लोकप्रियतेस इतर अनेक कारणें आहेत, पण त्यांचा विचार येथें अनावश्यक आहे.

४. कोणत्याहि दार्शनिक सिद्धान्ताचा विचार करतांना खालील गोष्टींचा विचार करावा लागतो. हें जग, त्याचा कर्ता, जग कसें झालें, ज्याला प्रत्येक जण ' मी ' म्हणतो तो कोण, आणि त्याचा, जगाचा व कर्त्याचा संबंध काय हा विचार करणाऱ्या शास्त्रास '*दर्शन*' असें म्हणतात. वैशेषिक, न्याय, सांख्य, योग, पूर्वमीमांसा उत्तरमीमांसा (वेदान्त) हीं सहा दर्शनें मुख्य होत.

(क) श्रीमच्छंकराचार्यादि पांच सांप्रदाय जसे वेदान्त दर्शनानुसारी आहेत तसेंच श्रीरामचरितमानस वेदान्तदर्शनानुसारी आहे इतकें सध्यां सांगितलें म्हणजे पुरे. (ख) वेदान्तदर्शनांत ब्रह्म, माया, ईश्वर, जीव व जगत् यांचा विचार प्रामुख्यानें केलेला आहे.

५. सर्व वेदान्त-सांप्रदाय ब्रह्म हें जगाचें मूळ (कारण) मानतातच; पण ब्रह्म आणि ईश्वर, ब्रह्म आणि जीव, ईश्वर-जीव, ईश्वर-ब्रह्म आणि जग, जीव आणि जग इत्यादि संबंध आणि यांचें तात्त्विक स्वरूप यांविषयीं वेदान्तमतानुयायांत अनेक मुख्य भेद आहेत; म्हणूनच मानसांत कोणत्या मताचें प्रतिपादन केलें आहे हें जाणण्याची इच्छा जिज्ञासूंना होते; आणि म्हणूनच या प्रस्तावनेंत तें दाखविण्याची आवश्यकता आहे.

या विषयाचें सांगोपांग विवेचन त्रिविधरामस्वरूप, अवतारहेतुकथन, चिदानंद-मय रघुपतिविग्रह, इत्यादि पुढील ११ प्रकरणांत श्रीमानस-वचनांधारें केलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।२ 卐 卐 卐

त्रिविध रामस्वरूप

निर्गुण (अगुण) निराकार ब्रह्म, सगुण निराकार ईश्वर आणि सगुण साकार रघुपति दशरथनंदन राम, *अशा तीन प्रकारांनीं श्रीरामस्वरूपाचें वर्णन मानसांत साती सोपानांत आहे.*

१. ब्रह्म = राम.

(१) '**व्यापी ब्रह्म एक अविनाशी । सच्चिद्घन आनंद-सुराशी ॥** (१।२३।६) ब्रह्म एक, व्यापी = व्यापक, अविनाशी व सच्चिदानंदघन आहे.

(क) **अगुण अखंड अनादिह अंत न । ज्या चिंतिति परमार्थवादि जन ॥**

नेति नेति जें वेदिं निरूपित । निजानंद निरुपाधि निरुपमित ॥

अगुण = गुणरहित = निर्गुण, अखंड, अनादि, अनंत, उपमारहित, नित्यानंदस्वरूप असें असून वेद त्याचें नेति नेति (न इति) असें वर्णन करतात; व परमार्थी लोक

त्याचें चिंतन करतात, असें ब्रह्म आहे. (मानसांत निर्गुण शब्दाऐवजीं 'अगुण' शब्दच अधिक वापरला आहे व तोच अधिक यथार्थ आहे. भागवतांत 'अगुण' वापरलेला आहे.)

२. **अशा या ब्रह्मालाच राम म्हणतात :—** (१।११६।८,५,६)

> **'*व्यापी ब्रह्म राम*' जग जाणे । परमानंद परेश पुराणें ॥**
> **राम सच्चिदानंद दिनेशीं । नाहीं मोहनिशा लवलेशीं ॥**
> **सहज-प्रकाशरूप भगवाना । अरुणोदय विज्ञान कदा ना ॥**

रामच ब्रह्म; तें व्यापक, परमानंदस्वरूप, परेचेहि ईश, पुराणें = सनातन (जुनें) व सच्चिदानंदस्वरूप आहे. (क) सूर्य सहज प्रकाशरूप असल्यानें, अरुणोदय, सूर्योदय, दिवस, रात्र त्यास माहीत नाहींत त्याप्रमाणेंच रामाच्या ठिकाणीं ज्ञान, विज्ञान, अज्ञान इ० कांहीं नाहीं, म्हणजेच ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान इत्यादि त्रिपुटीरहित केवल ज्ञप्ति मात्र आहे.

(ख) '**निर्मम *निराकार* निर्मोह । नित्य निरंजन सुखसंदोह ॥**
> **प्रभू प्रकृतिपर... । ब्रह्म निरीह विरज–अविनाशी ॥**' (७।७२।७,६).

पूर्वीच्या वर्णनांत निराकार शब्द नव्हता तो येथें आहे. प्रकृतिपर = मायातीत, निर्गुण' निराकार, ब्रह्म हें एका रामस्वरूपाचें वर्णन आहे.

२. ईश्वर = राम.

> **श्रुति सेतुपालक *राम तुम्हि जगदीश* माया जानकी ।**
> **जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधीकल बघुन कीं ॥** (२।१२६ छं.)

(१) पूर्वील निर्गुण निराकार ब्रह्माच्या वर्णनांत जगाचा व गुणांचा वगैरे संबंध मुळींच नाहीं. तें प्रकृतिपर = मायातीत आहे. येथें जगदीशत्व, श्रुतिसेतुपालकत्व व करुणा या गुणांचा व मायेचा संबंध जोडला आहे; म्हणजेच हें सगुण ब्रह्माचें वर्णन आहे; अर्थात् *निर्गुण निराकार ब्रह्म व सगुण ब्रह्म असे दोन प्रकार झाले.* (१।२३।१ पाहा.) 'ब्रह्मरूप दो निर्गुण सगुणहि' ब्रह्माचीं दोन स्वरूपें असतात एक निर्गुण आणि एक सगुण, दोन्ही अनुपम, अकथनीय = अनिर्वचनीय, अनादि आणि अगाध आहेत. (१।२३।१ पाहा.)

(क) अशा सगुण' ब्रह्मालाच *जगदीश राम* म्हटलें व अशा सगुण ब्रह्मासह असलेल्या सीतेला माया म्हटलें; म्हणजेच मायायुक्त जें ब्रह्म तेच जगदीश राम.

(२) पण हा जगदीश-ईश्वर-साकार कीं निराकार ?

> '**कोणि यदन्त न आदि समजले । मति-अनुमानें निगम असं वदले ॥**
> **चले *अपद* ऐके विण कानां । *कर्म करांविण* करि विध नाना ॥**
> **भोगी सकल रसां *मुख नाहीं* । अति पटु वक्ता *वाणि विना* ही ॥**
> **स्पर्शे *तनुविण अचक्षु* पाहे । *घ्राण न*, गंध अखिल घेताहे ॥**
> **अशी अलौकिक करणी बहुपरिं । तन्महिमा ये वर्णाया तरि ? ॥**

श्रुति बुध गाती ज्या असे मुनि धरिती यद्ध्यान ।
तो दशरथसुत भक्तहित कोसलपति भगवान ।। (१।११८).

यांतील ४–८ या चौपायांवरून स्पष्ट होतें कीं जो जगदीश भगवान तो असा निराकार आहे. या वर्णनांत सर्व अवयवांचा , मुखाचा व ' तनु 'चा निषेध केला आहे; आणि गुणांचाच उल्लेख आहे; म्हणून *जो जगदीश राम* = ईश्वर, *तो सगुण निराकार आहे.* सगुण निराकाराची कल्पना येण्यास दृष्टान्त आकाश, वायु व जल आहेत. यांच्यांत गुण आहेत पण आकार नाहीं, याप्रमाणें माया + ब्रह्म मिळून जगदीश होतो. यालाच उपासनाभेदानें भिन्न भिन्न नांवें आहेत, मानसांत यालाहि राम म्हटलें आहे.

(३) ब्रह्म व ईश्वर यांत भेद काय ? *निर्गुण ब्रह्म उपाधिरहित आहे.* ' निरुपाधि निरुपमित ' (१।१४४।५) ' नामरूपयुग ईश-उपाधी । अकथ अनादि–' (१।२१।२) नाम आणि रूप या दोन ईशाच्या उपाधि आहेत व त्या दोन्ही अनादि व अनिर्वचनीय आहेत. म्हणजे निर्गुण निराकार ब्रह्म निरुपाधिक आहे व सगुण निराकार ब्रह्म सोपाधिक आहे. सोपाधिक ब्रह्म = ईश्वर हें ठरलें. (क) ही ईशाची उपाधि म्हणजेच माया, विद्यामाया होय, ती नामरूपात्मक, अनादि, अनिर्वचनीय आहे असें म्हटलें. ज्ञान्याला माया मिथ्या आहे, हें ' माया ' प्रकरणांत दाखविलें आहे. (७।७३ म पाहा)

(ख) ईश्वर एक, स्वतंत्र (स्ववश) असून माया त्याला वश असते, व तो मायेचा प्रेरक मायापति आहे.

' ***ईशाविवश माया*** **गुणखाणी । *भगवान स्ववश* जीव परवश ते** ॥ (७।७८।६-७)

' *मायापति* भगवान ' (७।६२ म) ही विद्यामाया होय. याप्रमाणें ठरलें कीं निर्गुण निराकार ब्रह्म = राम, आणि सगुणनिराकार ब्रह्म = राम, अशा द्विविध रामस्वरूपांची सिद्धि केवळ मानसवचनांच्या आधारेंच झाली,

३. रघुवंशभूषण राम कोण ?

(१) कसं न वदां असं रघुकुलकेतू । पालक सतत तुम्हीं श्रुतिसेतू ।।
श्रुतिसेतुपालकराम तुम्हि जगदीश, माया जानकी ।
जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधीकल बघुन कीं ॥ (२।१२६ छं.)

असें वाल्मीकि रघुकुलकेतु श्रीरघुनाथासच म्हणाले आहेत. जगदीश (= ईश्वर) आणि माया = रघुपति राम आणि सीता.

(क) श्रुति बुध गाति ज्या असें मुनि धरिती यद्ध्यान ।
तो दशरथसुत भक्तहित कोसलपति भगवान ॥ (१।११८)
' प्रथित पुरुष जो प्रभानिधि प्रगट परावर नाथ ॥
रघुकुलमणि मत्स्वामि ते, वदुनि नमिति शिव माथ ॥ (१।११६)

यावरून ठरलें कीं निर्गुण ब्रह्म, ईश्वर व रघुपति राम एकच. हीं तिन्हीं स्वरूपें एकच आहेत.

(२) निर्गुण ब्रह्म आणि सगुण साकार रघुपति एक कसे ? शंकर उमेला सांगतात तें ऐकावें.

' *सगुणीं अगुणीं* कांहिं न *भेदाहि* । गाती मुनि पुराण बुध वेदहि ।'
जो अलक्ष अज अरूप *अगुणी* । भक्तप्रेमें होतो सगुणी ॥
जो गुणरहित सगुण तो केवीं । जल जलगार अलग ना तेवीं ॥ (१।११६।१–३)

येथें सगुण शब्दानें दोन्हीं प्रकारच्या सगुणांचा बोध होतोच; पण जल आणि जलगार दृष्टान्तानें सुचविलें कीं सगुण निराकार ब्रह्म (जल)च सगुण साकार ब्रह्म (जलगार) होतें. तथापि गुणरहित = अगुण ब्रह्मालाच जलाचा दृष्टान्त दिला असल्यानें या वाक्यांतून भिन्न भिन्न मतांना आपला अर्थ ग्रहण करतां येतो.

(क) निर्गुण ब्रह्म आदिमायेच्या साह्याशिवाय सगुण साकार होऊं शकत नाहीं हें मनुशतरूपाख्यानांत शब्दांनीं न सांगतां कृतीनें प्रात्यक्षिक दाखविलें आहे.

' वसे निरंतर अभिलाषा मनिं । तो प्रभु परम *बघावा लोचनिं* ॥
***अगुण* अखंड अनादिहि अंत न । ज्या चिंतिति परमार्थवादिजन ॥**
नेति नेति जें वेदिं निरूपित । निजानंद *निरुपाधि* निरुपमित ॥
शंभु विरंचि विष्णु भगवाना । उद्भव अंशें ज्यांच्या नाना ॥
असा प्रभुहि सेवक वश असतो । भक्तांस्तव'लीलातनु धरतो ॥ (१।१४४।३–७)

असा जो प्रभु तो उघड्या डोळ्यांनीं – चर्मचक्षूंनीं – पाहावा अशी इच्छा होती. त्यांनीं अशा एकट्या प्रभूचें दर्शन मागितलें असतां दर्शन दिलें रामसीता यांनीं ! (१।१४८।४).

' भृकुटि विलासिं जिचे जग होतीं । रामवामदिशिं सीता हो ! ती ॥ '

(ख) मनूची अभिलाषा सांगणाऱ्या वरील पांच चौपायांचें निरीक्षण केल्यास स्पष्ट दिसतें कीं ' अगुण अखंड...' पासून ' निरुपाधि निरुपमित ' (चौ. ४ – ५)पर्यंत केवळ *निर्गुण ब्रह्माचें वर्णन आहे*; आणि ' शंभुविरंचि 'पासून दोन चौपायांत (६ – ७) *सगुणनिराकाराचें वर्णन आहे.*

येथें हें स्पष्ट दाखविलें कीं निर्गुण ब्रह्मच मायोपाधियुक्त होऊन सगुण निराकार (= ईश्वर) बनतें; व ईश्वरसुद्धां मायेच्या साह्यानेंच सगुण साकार, नयनविषय, होऊं शकतो.

येथें सुद्धां सांप्रदायिक मतभेदांस भरपूर वाव आहे.

४. ब्रह्म व ईश्वर अव्यक्त अगोचर इत्यादि.

(१) **' बलमप्रमेयमनादिमजमव्यक्तमेकमगोचरम् । '** (३।३२ छं. २).

' ज्या श्रुति निरंजन विरज अज ही ब्रह्म विभु वाखाणती ' (३।३२ छं. ३)

' गोविन्द गोपर द्वन्द्वहर विज्ञानघन *धरणीधरं* ' ॥

बलम् अप्रमेयम् = अप्रमेयम् बलम्, व धरणीधरं हीं विशेषणें ईश्वर व रघुपति यांसच

लागू आहेत. ब्रह्म, विभु, अगोचर, अव्यक्त इत्यादि ब्रह्म व ईश्वर यांसच लागू आहेत. याप्रमाणें एकाच जटायुकृत स्तुतींत त्रिविध रामस्वरूपाचा उल्लेख असून ही स्तुति रघुपति-रामाची आहे. यानें **तिन्ही स्वरूपांची तात्त्विक अभिन्नता दाखविली.** *ब्रह्म व ईश्वर व्यक्त नाहींत*; इंद्रियांचे विषय नाहींत; पण *ब्रह्मच रघुपति रूपानें नयन-गोचर होतें*, व्यक्त होतें.

(क) ' मन बुद्धि-गुण-गो-पर बघें मी प्रभुसि.' (३।६ छंद) मन, बुद्धि, इन्द्रियें व गुण (= विषय) यांच्यापलीकडे असणारें म्हणजेच या कोणालाहि जाणतां न येणारें, यांचा विषय नसलेलें जें ब्रह्म तें मीं प्रत्यक्ष पाहिलें असें अत्रिमुनि श्रीरघुनाथाविषयीं त्यांनाच सांगतात.

(२) **वि. ल. ठे.** – बालकाण्ड मंगलाचरणांतच (श्लो. ६ वा) त्रिविध रामस्वरूप, माया व जग यांविषयीं सांगितलें आहे.

' यन्मायावशवर्तिविश्वमखिलम् ब्रह्मादि देवाऽसुरा ।
यत्सत्त्वादमृषेव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः ॥
यत्पादप्लव एक एव हि भवाम्भोधेस्तितीर्षावतां ।
वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम् ॥

ब्रह्मदेवादि सर्व देव व असुरांसुद्धां सर्व विश्व ज्याच्या मायेला वश होऊन वागतें; ज्याच्या सत्तेवर (अस्तित्वामुळें) दोरीवरील सर्पभ्रमासारखें हें *सर्व विश्व असत्य नसल्यासारखें भासतें* व या भवसागरांतून तरून जाण्याची इच्छा असणारांना ज्याचे पायरूपी नौका हा एकच आधार आहे, त्या सर्व कारणांच्या अतीत असलेल्या हरीला राम नांवाच्या ईशाला, मी वन्दन करतों.

(क) ' पाद ' शब्दानें सगुण साकार स्वरूपाचा, ईश शब्दानें ईश्वराचा व अशेष कारणपरं हारिम् यानें निर्गुण स्वरूपाचा बोध केला आहे; आणि तिन्ही एकच हेंहि दाखविलें आहे. पहिल्या व दुसऱ्या चरणांत सांगितलें आहे कीं *विश्व* हें ब्रह्मरूपी *अधिष्ठान सत्तेवरील भ्रम आहे* व सर्व ब्रह्मदेवादि विश्व मायावश आहे.

(ख) *निर्गुण निराकार*, *सगुण निराकार* व *सगुण साकार* हे प्रयोग श्रीग्रंथराज दासबोधांत वरील अर्थानेंच केलेले आहेत. निर्गुण ब्रह्म, ईश्वर व अवतार यांतील भेद सहज ध्यानांत राहण्यास वरील तीन नांवें फार उपयुक्त असल्यानें त्यांचा उपयोग येथें केला.

(ग) या *त्रिविध रामस्वरूपाचें वर्णन साती सोपानांत आहे*. महत्त्वाच्या सव स्तुतींत हें आढळतें. श्रुति, गीता इत्यादि ग्रंथांतील वचनें या प्रस्तावनालेखनांत मुद्दामच वापरलीं नाहींत; तरी इतका विस्तार झालाच. गूढार्थचंद्रिकेंत प्रत्येक ठिकाणच्या टीकेंत श्रुति, गीता व श्रीमदाचार्य-ग्रंथ यांतील समानार्थक अवतरणें भरपूर दिलीं आहेत. एकंदर ५३ उपनिषदांतील आधार द्यावे लागले आहेत !

या प्रकरणांत फक्त स्वरूपलक्षणांचाच विचार कर्तव्य होता. म्हणून इतर आनुषंगिक विषय व तटस्थ लक्षणें यांचा विचार येथें केला नाहीं.

(३) **वि. ल. ठे.** —*मनुष्यदेह हा मोक्षाचा ताम्रपट* (Charter of liberty) असला तरी पूर्वसुकृतानुसार व पूर्वसंस्कारानुसार श्रद्धा व प्रकृतिभेदांमुळें सर्वच मनुष्यें केवलाद्वैत सिद्धान्त पचविण्यास अधिकारी असतात असें नाहीं; म्हणून अधिकारभेदानुसार पूर्वमीमांसा व माध्वांचा द्वैतसिद्धान्त यांपासून अज्ञात सिद्धान्तापर्यंतच्या विविध मतांची आवश्यकता समाजांत असते. हें जाणूनच विविध वेदान्तमतांना मानसांत भरपूर वाव ठेवलेला आहे. मात्र पूर्वमीमांसाशास्त्रानुसारी कर्म या कलिकालांत जवळजवळ अशक्य असल्यानें, आणि *स्वर्गप्राप्ति म्हणजे मोक्ष हा सिद्धान्त भ्रामक* असल्यामुळें इतर वेदान्तदर्शनकारांप्रमाणेंच पण निराळया पद्धतीनें, त्या सिद्धान्ताचे वाभाडे काढले आहेत. ‘ इन्द्रादि देवांचा स्वभाव ’ (प्र. प्र. १५।१) व ‘ ज्ञान, मोक्ष, वैकुंठ ’ (प्र. प्र. ९।९) इत्यादि प्रकरणांत त्याविषयीं साधार विस्तार पाहावा.

(क) विविध प्रकरणें पाडण्यानें बऱ्याच अवतरणांची पुनरुक्ति झाली असली तरी प्रत्येक विषयाचें निश्चित ज्ञान होण्यास स्वतंत्र प्रकरणांची आवश्यकता असतेच. यामुळें मानसांतील सिद्धान्तभूत महत्त्वाचीं वचनें वाचकांच्या सहज लक्षांत राहतील. निर्गुण ब्रह्म किंवा ईश्वर-परमेश्वर, सगुण साकार कां होतात म्हणजे अवतार कां घेतात याचा विचार पुढील प्रकरणांत पाहावा.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।३ 卐 卐 卐

अवतारहेतु-कथन

श्रीबालकाण्डांत पार्वतीनें जे बारा प्रश्न विचारले त्यांत —

प्रथम विवंचुनि वदा कारणहि । ब्रह्म अगुण कां धरि वपु सगुणहि ॥ (१।११०।४)
हा एक प्रश्न आहे; निर्गुण ब्रह्म सगुण ब्रह्म होऊन देह कां धारण करतें, याचें कारण सांगावें; म्हणजेच अवतार घेण्यांत हेतु काय ? या प्रश्नाच्या उत्तरांत महेशांनीं अवतार हेतु सांगितले आहेत. प्रत्येक काण्ड सोपान असल्यामुळें साती सोपानांत अवतार हेतूंचें वर्णन आहे. येथें बालकाण्डांतील वर्णन देऊन इतर काण्डांतील फक्त स्थलनिर्देश केला आहे. पूर्व लेखनांत सविस्तर वर्णन आहे.

बालकाण्ड – अवतारहेतुकथन. महेश उमेस सांगतात,

हरिअवतारा हेतु कोणते । इदमित्थं वदले न जात ते ॥ २ ॥
राम अतर्क्य बुद्धिमनवाणीं । अमचें मत हें, ऐक, शहाणी ॥३ ॥

तदपि *संत मुनि वेद पुराणें* । *वदति कांहीं* जें मति–अनुमानें ॥ ४ ॥
सुमुखि सांगतों तुजला तैसें । *कारण मजहि समजलें* जैसें ॥ ५ ॥

संतादिकांचें मत सांगतों आणि मलाहि जें कारण समजलें तें सांगतों.

१. हरि अवताराला हे इतके अमुकच हेतु असतात असें सांगतां येणें अशक्य आहे; कारण कीं राम मनानें, बुद्धीनें व वाणीनें अतर्क्य आहेत, हें आमचें मत तूं शहाणी आहेस म्हणून तुला सांगितलें. (क) अवतार घेणारे परमात्मा असतात आणि हेतु कोणता हें सांगणारा कोणी तरी जीव असतो. मोठमोठे प्रसिद्ध राजकारणी पुरुष एखादी फार महत्त्वाची गोष्ट करतात तेव्हां त्यांचे मुख्य हेतु त्यांनाच माहीत असतात. अनुमानानें तर्कानें जितकें जाणतां येईल तितकें जाणून कोणी इतरांस सांगतात; किंवा ते महापुरुष जेवढे सांगतील तेवढे कळतात. पण सर्व हेतु सांगणें हितकर ठरतेंच असें नाहीं; म्हणून ते स्वतः सर्व हेतु सांगतील असें म्हणवत नाहीं.

(ख) जिवाजिवांच्या व्यवहारांत जर असें असतें तर ईश्वर आणि जीव यांच्या-उपाधिभेदांमुळें *भगवंताचे हेतु कोणालाच पूर्णपणें कळणें शक्य नाहीं*. अवतार-कार्यावरून मग अनुमानानें ठरवितात; असें आपलें मुख्य मत सांगून मग प्रचलित मतें व आपलें स्वतःचें मत शंकर सांगतील.

‘जैं जैं येते धर्मा ग्लानी । माजति असुर अधम अभिमानी ॥ ६ ॥
करिति अनीति, न वदली जाई । सीदति विप्र धरा सुर गाई ॥ ७ ॥
तैं तैं प्रभु वपु विविधा धरती । *सज्जन* पीडा कृपाब्धि हरती ॥ ८ ॥

दो.— स्थापि सुरां, असुरां वधुनि, निज राखी श्रुतिसेतु ॥
जगिं विस्तारिति विमल यश **रामजन्मि हा हेतु ॥ १२१ ॥**
तें यश गाति भक्त भव तरती । भक्तहिता तनु कृपाब्धि धरती ॥ १ ॥

(सज्जन = संत = साधु)

दोह्याच्या पूर्वार्धापर्यंत ‘संत-मुनि-वेद-पुराण’ मत सांगितलें. भ. गीता ४।७-८ या श्लोकांवरील हें भाष्यच आहे!

‘जगिं विस्तारिति विमल यश,’ व **‘तें यश गाति भक्त भव तरती। भक्तहिता तनु कृपाब्धि धरती ॥’** यांत शंकरांनीं स्वतःस कळलेलें कारण सांगितलें.

अवतार घेण्यांत मुख्य हेतु भक्तांचें हित करणें हा असतो. प्रल्हाद-बिभीषणांसारखे जे महाभगवद्भक्त, महाभागवत, असतात त्यांचें हित करणें हा मुख्य हेतु असतो. आणि अवतारकाळांत जें चरित्र केलें जाईल त्याच्या साह्यानें तत्कालीन इतर भक्तांनीं व भविष्य-कालीन भक्तांनीं सुखानें तरून जावें **हा दुसरा हेतु असतो.** *बालकाण्डांत इतरत्र आणि इतर कांडांत या शिवकथित मुख्य हेतूचाच प्रामुख्यानें उल्लेख केलेला आहे.* सुंदरकांडांत **श्रीरघुनाथ बिभीषणास सांगतात,**

‘संत समान तुम्हां प्रिय मातें । प्रार्थुनि इतरिं न धरुं देहातें ॥ (५।४८।८)

इतर कोणाच्या प्रार्थनांमुळें अवतार घेत नसून बिभीषणासारख्या संतांच्या प्रार्थनेनेंच देह धारण करतात.

२. प्रत्येक विशिष्ट अवतार घेण्यापूर्वीं जीं विशेष कारणें घडतात तीं भिन्न भिन्न असतात व *अवतारकाळापूर्वीं लाखों वर्षें तीं घडतात* हें चार कल्पांतील अवतारांचीं कारणें देऊन मानसांत सांगितलें आहे. (क) रामावतार त्रेतायुगांत होतो हें बालकांडांत (४८।१ व पुढें) आणि किष्किंधाकाण्ड (२८।७) यांत सांगितलें आहे. (ख) '**संभवामि युगे युगे**' (भ. गीता) याचा अर्थ *प्रत्येक कल्पामध्यें* असा मानसांत स्पष्ट केला आहे.

'*कल्पीं कल्पीं प्रभु अवतरती* । **चारुचरित नानाविध करती** ॥ (१।१४०।२) खालील स्थळीं अवतारहेतुकथन पाहावें.

३. **बालकाण्ड** — १३।३-५; ५१ छंद; १४४।१-७; १५२।१-४; १९२. **अयोध्याकांड** – दो. ९३; १२६ छंद; १२७।५-६; २१९।४-६. **अरण्यकाण्ड** – ४।४-५ व १०; ३।२३।३. **किष्किंधाकाण्ड** – मंगलाचरण श्लोक १ मध्यें सूचित; दो. १; ९।५; २६; २८।७; ३० छंद. **सुंदरकांड** – २१।७; ३९।३-४; ४८।८. **लंकाकांड**–६।७-८; ४८ रा; ४८ म; ११०।७-८; १११।३–५. **उत्तरकांड**–१३।१; ७२ रा; ११४।१२.

वर निर्दिष्ट केलेल्या *ठिकाणीं भक्तहितसाधन व चरित्रनिर्मिति हाच मुख्य* हेतु *सांगितला आहे*. प्रभु भगवान अवतार कां घेतात हें सांगितल्यानंतर, अवतारदेह पंचभूतांचा असतो कीं नाहीं व तो कर्मविपाकानुसार घ्यावा लागतो कीं काय याविषयीं सांगणें क्रमप्राप्त आहे. पुढील प्रकरणांत याविषयीं मानसांतील सिद्धान्त स्पष्ट दाखविला आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।४ 卐 卐 卐

चिदानन्दमय रघुपति-विग्रह

श्रीरघुपति रामचंद्रांचा विग्रह (= देह) सच्चिदानंदमय आहे हा सिद्धान्त अगदीं स्पष्टपणें अयोध्याकाण्डांत वाल्मीकि ऋषींनीं श्रीरघुपतीसच सांगितला आहे; व अशा अर्थाचीं वचनें प्रत्येक काण्डरूपी सोपानांत आहेत.

१. अवतारदेह प्रारब्धकर्मप्राप्त नाहीं. (१) मनुराजास वर दिल्यावर प्रभु स्वतःच म्हणाले कीं,

'**इच्छामय** *नरवेषा* **घेइन** । *प्रगट* **निकेतीं तुमच्या होइन** ॥' (१।१५२।१) इच्छामय = केवळ स्वतःच्या इच्छेनें धारण केलेला. (भागवत १०।१४।२ मध्यें

ब्रह्मदेवानेंच म्हटलें आहे, '*स्वेच्छामयस्य न तु भूतमयस्य*' ब्रह्म व ईश्वर मायातीत आहेत व ईश्वर *मायापति*, मायाप्रेरक, मायानियंता आहे हें मागील प्रकरणांत (९।२) दाखविलें आहे, *कर्म मायाजनित असतें* म्हणून ईश्वर व ईश्वरावतार कर्मातीत आहेत. '**कर्म शुभाशुभ तुम्हां न बाधी**' (१।१३७।४) असें शाप देतांना नारदच भगवंतास म्हणाले आहेत.

(क) यावर शंका घेतली जाईल कीं नारदाच्या व वृंदेच्या शापामुळें देह धारण करावा लागला असें मानसांतच वर्णन आहे. पण ही शंका अंधगजन्यायाची आहे. शाप देतांना नारदच काय म्हणाले तें वर मोठ्या अक्षरांत दिलें आहे. शिवाय नारदानें शाप दिल्यावर प्रभूंनीं आपल्या मायेला आकर्षून घेतलें तेव्हां नारदास पश्चात्ताप झाला व नारद म्हणाले कीं,

'***ठरो मृषा मम शाप कृपाला!*** । **म्हणति 'मदिच्छा' दीनदयाळू ॥**'

प्रभूच्या इच्छेनेंच नारदांनीं शाप दिला व तो प्रभूंनीं मान्य केला. 'धरुनि शाप शिरिं हर्ष हृदिं—' (१।१३७). जलंधर पत्नी वृन्देनें शाप दिला तेव्हां '*हरि तच्छापा प्रमाण मानी*।' (१।१२४।१) प्रभूंनीं तिचा शाप प्रमाण मानला. त्यांनीं मान्य केला नसता, स्वीकारला नसता तर त्याचा परिणाम झाला नसता. म्हणजे तेथेंहि प्रभूची इच्छाच कारण आहे; प्रभूंनीं केलेलें कर्म नव्हे. '*प्रभु अवतरती स्वेच्छया*' (४।२६).

(२) **श्रीरघुपतीचा देह सच्चिदानंदघन स्वरूप आहे :—**

विप्रधेनुसुरसंतहित धारीति मनुज अवतार ।

स्वेच्छेनें निर्मित तनू माया—गुण—गो—पार ॥ (१।१९२)

श्रीरघुपतीचा देह माया-गुण-गो-पार आहे. जी मनुजतनु धारण केली ती मायातीत, गुणातीत व इन्द्रियातीत आहे. मायागुणगोपार आहे. फक्त सच्चिदानंदघन ब्रह्म; म्हणजेच '**चिदानंदमय रघुपतिविग्रह**' **आहे हें ठरलें.** '*विशुद्धबोधविग्रहम्*' (*अरण्य*. ४।५). केवळ विशुद्ध ज्ञानस्वरूप रघुपति देह आहे असें अत्रि म्हणाले. *लंका*. ब्रह्मस्तुति ११।३; *किष्किंधा*. २६।१२; *सुंदर*. ३९।१—२ पाहा.

अयोध्याकाण्डांत—श्रीरघुनाथ-वाल्मीकि संवादांत अगदीं सांगोपांग वर्णन आहे. वाल्मीकि श्रीरघुनाथास म्हणतात,

सोरठा—'**रामा तव स्वरूप वचन-अगोचर बुद्धिपर ।**

व्यक्त न गम्य अरूप नेति नेति वदती निगम ॥ १२६ ॥

विश्व दृश्य आपण बघणारे। विधि-हरि-शंभुस नाचविणारे ॥ १ ॥
मर्म न तुमचें त्यांसहि कळतें । **तुम्हां जाणतिल अन्य कवण ते ॥ २ ॥**
तो जाणे ज्या जाणूं देतां । तुम्हिच होत तो तुम्हां जाणतां ॥ ३ ॥
तुमचे कृपें तुम्हां रघुनंदन । **जाणति भक्त भक्त—उर—वंदन ॥ ४ ॥**

चिदानंदमय अपली काया । विगत विकार कळे *अधिकाऱ्या* ॥ ५ ॥
धृत नरतनू संत सुरकाजा । कृति वच जशिं कीं प्राकृत राजा ॥ ६ ॥
राम ! चरित तव ऐकुनि पाहुनि । सुख बुधांस जड जाती मोहुनि ॥ ७ ॥
योग्यच तुमचें वचन वागणें । ***सांगा योग्य किं नटें नाचणें*** ॥ ८ ॥

१. या दहा काव्यपंक्तींत अवतारविषयक सर्व सिद्धान्त एकत्र आहेत हें सुज्ञांस सहज कळेल. यांतील तिरप्या टाईपांतील वचनें गूढार्थचंद्रिकेंत वारंवार आधारास घेतलेलीं दिसतील. (क) श्रीरघुनन्दनाचा देह चिदानन्दमय असल्यानें तो पंचभूतें व त्रिगुण यांचा म्हणजे प्रकृतिजनित नाहीं. त्यामुळें तो विगतविकार आहे. सर्व देह विकाररहित आहे. कोणतेहि विकार त्या देहास नाहींत. जन्मादि सहा विकार नाहींत, क्षुधातृषादि षडूर्मीरूपी सहा विकार नाहींत किंवा कामक्रोधादि कोणतेहि विकार नाहींत. (ख) पण हें मर्म जो कोणी विकाररहित अधिकारी असेल त्याला 'तुमच्या कृपें' कळतें.

श्रीएकनाथसदनीं माधवजी राहि वर्षं बाराही ।
रहित विकार असोनी कळलें नाथांस मर्म परि नाहीं ॥

'तो जाणे ज्या जाणूं देतां' हेंच खरें. या प्रकरणावरील विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पाहावा.

२. अशा प्रकारें श्रीरघुनंदनाचा देह विकाररहित सच्चिदानंदमय असून त्याच्याकडून इतर माणसांसारख्या सर्व क्रिया होतांना दिसतात व ज्ञानी भक्तांनासुद्धां विकार दिसतात याचें कारण प्रबला अति रघुपतिची माया आहे. म्हणून पुढल्या प्रकरणांत मायेविषयीं मानसांतील सिद्धान्त सांगणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।५ 卐 卐 卐

माया

श्रीरामचरितमानसांतील मायेचें वर्णन मुख्यतः केवलाद्वैत *सिद्धान्ताशीं* अगदीं जुळणारें आहे.

'*उद्भव-स्थिति-संहारकारिणीं* **क्लेशहारिणीम् ।**
सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥ (बाल.मं.श्लो.५)

हें आदिमायेचें मूलप्रकृतीचेंच वर्णन आहे.

'*श्रीरामसान्निध्यवशात्* जगदानन्ददायिनी ।
उद्भवस्थितिसंहारकारिणी सर्वदेहिनाम् ॥
सा *सीता* भवति ज्ञेया *मूलप्रकृतिसंज्ञिता* ॥ (रा. उ. ता. १।३–४)
आदिशक्ति जी निर्मि जगा या । ती ही मम अवतरेल ***माया*** ॥ (१।१५२।४)

श्रीरामसंन्निध असलेल्या सीतेकडे बोट दाखवून रामच हें मनुराजास म्हणाले आहेत.

' एक रची जग गुण वश जीतें । *प्रभू-प्रेरिता स्वबल न तीतें*॥' (३।१५।६) वरील श्रुतिवचनाचेंच स्पष्टीकरण मानसांतील वरील वचनांत आहे; नीट निरखून पाहावें. वाल्मीकि म्हणतात,

' श्रुति सेतु-पालक राम *तुम्हि जगदीश माया जानकी* ।
जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधी-कल बघुन कीं ॥ ' (२।१२६ छंद)

करुणानिधीचा कल पाहून म्हणजेच त्यांची प्रेरणा मिळाल्यास (प्रभूप्रेरिता) *ही सीता आदिशक्ति-मूलप्रकृति जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करते, व गुण हिला वश असतात.* आणखी पाहा :—

रामाच्या **' वामभागीं शोभे अनुकूला । आदिशक्ति छविनिधि जगमूला ॥**
जिचे अंश उपजाति गुणखाणी । अगणित रमा उमा ब्रह्माणी ॥
भृकुटिविलासिं जिच्या जग होतीं । रामवामदिशिं सीता हो ! ती ॥ (१।१४८।२-४)

उद्भवशक्ति ब्रह्माणी ब्रह्मदेवाची, पालनशक्ति रमा विष्णूची आणि संहारशक्ति उमा महेशाची; **या सर्व शक्ति आदिशक्ति सीतेचे अल्पांश आहेत.**

१. ही आदिशक्ति, मूळमाया जिवाचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण करणारी आहे.

' श्रुणु रघुवीरप्रिय वैदेही । कोण न महिमा तव जाणे ही ॥
लोकप होति **विलोकनिं तव नर । तुज सेविति सब सिद्धि बद्धकर** ॥ ' (२।१०३।५–६)

(क) हीच प्रभूच्या प्रेरणेनें पंचक्लेश हरण करणारी व सर्वश्रेय करणारी आहे. ' क्लेशहारिणीम् , सर्वश्रेयस्करीं रामवल्लभां सीतां ' (मं. श्लोक १). अविद्या अज्ञान हा मुख्य क्लेश आहे. ' दारुण *अविद्यापंच*–जनित विकार श्रीरघुवरहरी ' (७।१३० छं.) यानें ठरलें कीं **राम आणि सीता मिळूनच कल्याण करूं शकतात. एकटें ब्रह्म किंवा एकटी माया कांहींच करूं शकत नाहींत.**

२. ब्रह्म आणि माया भिन्न कीं अभिन्न ? रामसीता, सीताराम = ब्रह्ममाया मायाब्रह्म; यांत मुख्य कोण आणि राम व सीता भिन्न कीं अभिन्न ?

(१) **गिरा–अर्थ, जलवीचिसम म्हणती भिन्न, न भिन्न ॥**
वंदूं सीतारामपद परम जयां प्रिय खिन्न ॥ (१।१८।–)

' गिरा अर्थ ' यांत गिरा स्त्रीलिंगी व अर्थ पुल्लिंगी; यानें सीता मुख्य हें सुचविलें; आणि ' जलवीचि ' मध्यें वीचि स्त्रीलिंगी नंतर घालून जल = राम मुख्य हें सुचविलें; म्हणजेच दोन्हीं सारखींच हें सिद्ध केलें; *कोणी मुख्य नाहीं व कोणी गौण नाहीं.*

(क) ' म्हणती भिन्न न भिन्न ' म्हणतात भिन्न पण भिन्न नाहींत, म्हणजेच अभिन्न आहेत. या अवतरणांत म्हणती भिन्न न, भिन्न; असा अन्वय केला कीं द्वैती सांख्य व विशिष्टाद्वैतादि *नामधारि अद्वैती* व द्वैती माध्व यांस भरपूर आधार मिळतो. श्रीमद्भागवतांत १०।१४ ब्रह्मस्तुतींत श्लोक १४ वा यांत अशीच मजा आहे.

' नारायणोऽङ्गं नरभूजलायनात्तच्चापि सत्यं न तवैव माया '

' तत् च अपि सत्यं न तव माया एव ' असा अन्वय केला कीं जग मिथ्या हा सिद्धान्त निघतो. व ' तच्च अपि सत्यं एव न तव माया ' असा अन्बय केला कीं द्वैत्यांचे सिद्धान्त निघतात ! अशा या व्यवस्थेमुळेंच ' मानस में केवलाद्वैत ' आणि ' मानस में विशिष्टाद्वैत ' हे दोन लेख कल्याण मासिकाच्या ' *वेदान्त-अंकांत* ' एकापुढें एक येऊं शकले. केवलाद्वैती अभिन्न निमित्तोपादानच जगत्कारण मानतात; पण हा या लेखाचा विषय नाहीं.

३. जगदुत्पादक विद्यामाया (आदिशक्ति, मूलप्रकृति)

(१) या आदिशक्ति, *आदिमायेलाच प्रभूंनीं विद्यामाया म्हटलें आहे.* ही जिवांना दुःखद किंवा बंधन करणारी नाहीं. मूलप्रकृति बंधक किंवा दुःखद नाहीं असें अद्वैती मानतातच; आणि म्हणूनच ईशसृष्ट बंधक नाहीं.

व्यापि न हरिसेवका अविद्या । व्यापी प्रभुनीं प्रेरित विद्या ॥

' दास विनाश न होतो यास्तव । ' (७।७९।२-३).

(क) प्रभूंनीं मायेचे भेद सांगितलेले पाहा :—

ऐका वदें तिचे भेदांना । *विद्या*, अपर *अविद्या* जाणां ॥ ४ ॥

एक दुष्ट जी सुदुःखरूपी । जीवश जीव पडे भवकूपीं ॥ ५ ॥

जिला वश झाल्यानें जीव भवकूपांत पडतो ती दुष्ट अति दुःखस्वरूप आहे, *तीच अविद्या*. यावरून ठरलें कीं दुसरी जी *विद्यामाया ती दुष्ट नाहीं, दुःखस्वरूप नाहीं, बंधक नाहीं*. मोक्षाकारक = ' सर्वश्रेयस्करी, ' ' क्लेशहारिणी ' आहे हें आरंभींच मंगलाचरणाच्या ५ व्या श्लोकांत सांगितलें आहे. अविद्येचा विनाश केल्याशिवाय सर्वश्रेय होत नाहीं; म्हणूनच सीतेला विद्यामायेला ' क्लेशहारिणी ' म्हटलें आहे.

' एक रचीं जग गुण वश जीतें । प्रभूप्रेरिता स्वबल न तीतें ॥ '

हें विद्यामायेचें प्रभूनीं दिलेलें लक्षण आहे. (३।१५।६) विद्येनेंच अविद्येचा नाश होतो असें श्रीमदाचार्यहि सांगतात —

विद्याऽविद्यां निहन्त्येव तेजस्तिमिरसंघवत् । (आत्मबोध)

(ख) सीता शब्दांतील स्, इ, ई, त्, अ आणि आ या वर्णांचा होणारा अर्थ मंत्रशास्त्रानुसार असाच आहे:—सर्वकारण, सर्ववर्णात्मक, पुष्टिदायक, क्षोभ नष्ट करणारी, वाक्प्रसाद देणारी, निर्मलत्व देणारी, धनधान्यादि संपत्ति देणारी, मृत्यूपासून सोडविणारी, सर्वव्यापक, सर्वत्र असणारी, आणि शरणागतास आश्रय देणारी अशी जी ती सी (अक्षमालोपनिषद्) हीं सर्व विशेषणें मानसांत रामगुणवर्णनांतही आहेतच.

४. विद्यामायेचा प्रभाव. (१) नारदमुनि स्वानुभवानें गरुडास थोडक्यांत सांगतात :

' खगा ! प्रबल रामाची माया ॥ ४ ॥

जी ज्ञानी-चित्ता अपहरते । बलात्कारिं मनिं विमोह करते ॥ ५ ॥

जी नाचवि बहु वेळां मजला। व्यापी तीच विहगपति तुजला ' ॥ ६ ॥

या मायेच्या प्रभावाचें सुंदर वर्णन नारदमोहप्रकरणांत (बालकांड) आणि गरुड व भुशुंडी-मोहप्रकरणांत (उत्तरकांड) आहे. पुढल्या प्रकरणांत पुष्कळ नमुने दिले आहेत हिनें मोहित केलेल्यास दुःख झालेंसें वाटतें, दिसतें; पण तें कडु औषधासारखें परम हित करून सुख देण्यासाठीं असतें. ही बंधनकारक नाहीं. गळयाला लागलेला फास कापून टाकतांना थोडें कापून रक्त आलें, जखम झाली, तरी फास कापून मृत्यूपासून सोडविणाऱ्या व्यक्तीनें दुःख दिलें, गळा कापला, असें कोणी म्हणणार नाहीं. विद्यामाया असेंच करते.

५. **अविद्या माया–(१)** ***मी माझें तूं तुझेंचि माया।*** **करते जी वश जीव-निकाया॥**
गो–गोचर जोंवर मन जातें। समजा सकल बंधु ! माया ते॥ (३।१५।२-३)

पहिल्या चरणांत अविद्या मायेची व्याख्या दिली. दुसऱ्या चरणांत तिचा प्रभाव सांगितला आणि तिसऱ्या चरणांत तिची व्याप्ति सांगितली. (क) अविद्यामायेचा संबंध ज्या दृश्य वा चिन्त्य जगासी येतो तेंसुद्धां मायाकृत हेंहि सुचविलें. (ख) ग्रंथाच्या मंगलाचरणांत (श्लो. ६) '*यन्माया* 'वशवर्तिविश्वमखिलं ब्रह्मादि-देवाऽसुराः' या चरणांत अविद्या मायेचा अन्तर्भाव असून तिची व्याप्तीहि सांगितली आहे. सर्व विश्व दोन्ही मायांना वश झालेलें असतें. ब्रह्मदेवासारखेसुद्धां वश होतात मग इतर जिवांचें काय सांगावें, व मानव वश होतील यांत नवल काय? विषयी, साधक आणि मुमुक्षु अविद्येला वश झालेले असतातच. आणि *ब्रह्मादि शंकरांसारखे ज्ञानी विद्यारूपी राममायेला वश होऊं शकतात*. श्रीरघुनाथाची तशी इच्छा झाली कीं शिवब्रह्मादिसुद्धां राममायेला वश होतात. (ग) तथापि *शिवब्रह्मादि या अविद्यामायेलासुद्धां भिऊन असतात.*

' शिवचतुरानन डरती जीतें। काय इतर जीवां गणती ते॥ ' (७।७१।८)
हें अविद्यामायेविषयीं आहे.

विश्वा राही व्यापुनी मायाकटक प्रचंड।
सेनापति कामादि, भट दंभ कपट पाखंड ॥ (७।७१ रा)

(२) काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे माया सेनेचे सेनापति आहेत आणि दंभ, कपट, पाखंड इत्यादि अगणित मनोविकार त्या सेनेंतले वीर (भट) आहेत. (क) यांनाच मानसांत कोठें खल दुर्जन, कोठें मानसरोग, कोठें शत्रु तर कोठें मायेचा परिवार म्हटलें आहे.

(१) ' नारद भव विरंचि सनकादिक। ' (७।७०।६) पासून ' हा *मायापरिवार* किं सगळा। प्रबल भिंति न कुणि वर्णुं किं शकला॥ ' (७।७१।७) पर्यंत पाहणें.

(२) ' तात ऐक *मानसरोगांना*। ' (७।१२१।२८) पासून ' रामकृपें सब रोग विनाशति। असा सुयोग कधीं जर पावति॥ ' (७।१२२।५) पर्यंत पाहा.

(३) ' हृदयिं वसति **खल नाना** तोंवर । लोभ मोह मद मान नि मत्सर ॥ '
इत्यादि (५।४७।१-४) पाहा.

(४) मम बल भक्तां स्वबल तयांना । **काम कोप हे रिपु** उभयांना ।। (३।४३।९)
असें प्रभु नारदांस म्हणाले. म्हणूनच शिवचतुराननसुद्धां यांना भितात आणि

' हें जाणुनि पंडित मज भजती । ज्ञानलाभिंहि न भक्ती त्यजती ॥ ' (३।४३।१०)
असें प्रभु नारदास म्हणाले.

६. माया सत्य कीं असत्य ?

(१) ***यत्सत्यत्वें जड*** जी माया । ***गमे सत्यशी*** मोह-सहाया ।। ८ ॥
दो० – रजत शुक्तिमधिं भासतें यथा भानुकरिं वारि ।
मृषा त्रिकाळिंहि तरि कुणि शक्त न, जो भ्रम वारि ॥ (१।११७)

१ माया जड आहे. २ ती सत्य नसून सत्य असल्यासारखी भासते. ३ ती त्रिकाळींहि मृषा (असत्य, मिथ्या) आहे. ४ ती रामाच्या सत्यत्वावर भासते. म्हणजेच *मायेला प्रातिभासिक सत्ता आहे. पारमार्थिक सत्ता नाहीं.*

(**क**) या दोह्यांत *दोन दृष्टान्त* दिले ते *केवलाद्वैत सांप्रदायांतील दोन मतांस अनुलक्षून आहेत.* ब्रह्म, उपादान व मायानिमित्त मानणारा एक पक्ष आहे; आणि माया, उपादान व ब्रह्मनिमित्तकारण मानणारा एक पक्ष आहे. (भागवत १०।८७।३१ वेदस्तुति, श्रीधरी टीका पाहावी). विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पाहावा. (**ख**) दोह्यांत मृषा = असत्य म्हटलें असलें *तरी अर्थ मिथ्या आहे.*

' रघुवीराची दासि ती जरि *मिथ्या* ज्ञानास । ' (७।७१ म)
असें मानसांतच म्हटलें आहे. मिथ्या म्हणजे सत्यहि म्हणतां येत नाहीं व असत्यहि म्हणतां येत नाहीं अशी. वंध्यापुत्र भ्रमानेंसुद्धां दिसत नाहीं म्हणून तो असत्य म्हणतां येतो; पण शुक्तिका रजत दिसते, मृगजळ दिसतें; म्हणून असत्य म्हणतां येत नाहीं; कारण प्रातिभासिक सत्ता तरी आहे; तथापि ज्ञानाच्या सप्तमभूमिकेंत ती असत्यच आहे. (**ग**) हा सिद्धान्त ग्रंथाच्या मंगलाचरणांतच सुचविला आहे —

' यत्सत्त्वात् अमृषा इव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः । '
दोरीच्या अधिष्ठानावर, सत्य नसलेला सर्प सत्य असल्यासारखा भासतो तशीच ब्रह्माच्या सत्य अधिष्ठानावर सत्य नसलेली माया सत्यशी भासते.

(२) वर दिलेलें (१।११७) हें अवतरण व मंगलाचरण *हा उपक्रम आहे;* आणि ७।७१ म हें अवतरण *उपसंहार आहे*. असें उपक्रमोपसंहारांत साम्य आहे. अजातवादी असत्य म्हणतील; व विवर्तवादी मिथ्या म्हणतील व म्हणतातहि; म्हणून एके ठिकाणीं ' मृषा त्रिकाळिंहि ' असें म्हटलें. व ' मिथ्या ज्ञानास ' ज्ञान झाल्यावर मिथ्या असें एकदां (७।७१ म) म्हटलें.

(**क**) दोरी सर्पासारखी भासते तेव्हां, त्यापूर्वी आणि सर्पभ्रम नष्ट झाल्यावर म्हणजे

वर्तमान, भूत व भविष्य या तिन्ही काळांत दोरी दोरीच असते, सर्प मुळींच नसतो म्हणून तत्त्वतः मृषा म्हणजे असत्य; पण भ्रमकाळांत सर्प दिसतो म्हणून मिथ्या, पण दोरीचें (अधिष्ठानाचें) ज्ञान झाल्याशिवाय सर्पभ्रम व त्याची सत्यता नष्ट होत नाहीं.

(३) **माया अव्यक्त आहे** हेंहि मानसांत सांगितलेंच आहे. 'अव्यक्तमूलमनादि' असें मायासंभूत जगाचें वर्णन रूपकानें केलें आहे. (७।१३ छं. ५)

(४) '*मी माझें तूं तुमचें माया*' अशी जी **माया तीच जडचेतन ग्रंथि,** ही ग्रंथीसुद्धां 'मृषा' आहे असें ज्ञानदीपक प्रकरणारंभींच सांगितलें आहे.

'जडचेतानिं पडली ग्रंथि जी । जरी मृषा सुटणें कठिण ती ॥ (७।११७।४)

याप्रमाणें माया, तिचे विद्या व अविद्या हे दोन प्रकार, त्यांचीं लक्षणें, व्याप्ति, प्रभाव, इत्यादि सर्व गोष्टी केवळ मानसाधारें व्यवस्थितपणें सिद्ध झाल्या. 'मी माझें तूं तुमचें' इत्यादि कल्पना जगांतील पदार्थांविषयींच उत्पन्न होतात म्हणून आतां जग व जीव यांचा विचार पुढील दोन प्रकरणांत करणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।६ 卐 卐 卐

जग

श्रीरामचरितमानसांत जगाचें स्वरूपहि दार्शनिक दृष्ट्या अनेक ठिकाणीं अगदीं स्पष्ट सांगितलें आहे.

१. जगाचा कर्ता कोण? ईशप्रेरित माया. (१) जगाची उत्पत्ति ईश्वराच्या प्रेरणेनें माया करते. हिलाच मागील प्रकरणांत आदिशक्ति, आदिमाया, मूलप्रकृति, म्हणजे विद्यामाया म्हटलें आहे. 'आदिशक्ति जी निर्मि जगा या ।'

(क) ***एक रची जग गुण वश जीतें । प्रभुप्रेरिता* स्वबल न तीतें ॥** (३।१५।६)

(ख) **श्रुति सेतुपालक राम तुम्हिं जगदीश माया जानकी ।**
जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधीकल बघुन कीं ॥ (२।१२६ छंद)

जगदीशाची माया जगदीशाच्या प्रेरणेनें जगाची उत्पत्ति, पालन आणि संहार करते. पण ही माया मृषा, मिथ्या आहे हें सिद्ध झालें आहे; म्हणून तिचें कार्य, जगसुद्धां असत्य, मिथ्या, मृषा असणारच.

२. जग असत्य, मिथ्या – (**प्रातिभासिक**)

(१) '**यत्सत्त्वात् *अमृषेव* भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः ।**'

सकलम् = 'विश्वम् अखिलम्' सर्व विश्व असत्य नसल्यासारखें, दोरीवरील सर्पासारखें, भासतें (बाल. मं. श्लो. ६). म्हणजेच सर्व विश्व–*जग मिथ्या आहे,* रज्जुसर्पासारखी केवळ *प्रातिभासिक सत्ता* आहे.

(क) मिथ्यहि सत्य गमे ज्या नेणुनि । जसा भुजग रज्जू न ओळखुनि ।।
जाइ लया जग जया जाणतां । स्वप्नींचा भ्रम जसा जागतां ।।
(१।११२।१-२)

जगाचें अस्तित्व स्वप्नभ्रमासारखें आहे. ज्या आत्म्याच्या–ब्रह्माच्या–अधिष्ठानावर जग भासतें त्या अधिष्ठानाचें–ब्रह्माचें ज्ञान नसणें हें जग सत्य वाटण्याचें कारण आहे. दोरीचें ज्ञान नसणें हें सर्प वाटण्याचें कारण असतें. म्हणजेच *अज्ञान* हें *जगत्सत्यत्व भ्रमाचें कारण आहे*. 'यदबोधाज्जगद्भाति प्रबोधे सत्यसत् भवेत्' या आचार्योक्तीचाच विस्तार येथें आहे. ज्या अधिष्ठानावर जगद्भ्रम भासतो त्याच्या ज्ञानानें–ब्रह्मज्ञानानें जग लयास जातें, म्हणजे त्याचें सत्यत्व लयास जातें. येथें प्रातिभासिक सत्ता व *विवर्तवाद सांगितला*.

(ख) राही हरि-आश्रित जग यापरि । जरि असत्य देतें दुःखा तरि ।। (१।११८।१)
जग असत्य हा अजातसिद्धांत येथें सांगितला. 'अगा जें जाहलेंचि नाहीं' (दासबोध) जग असत्य असून सत्य वाटतें व त्यामुळें तें दुःख देतें; दुःख होतें.

रजत शुक्तिमाधिं भासतें यथा भानुकरिं वारि ।
मृषा त्रिकाळिंहि तरि कुणि शक्त न जो भ्रम वारि ।।

३. जगाला पारमार्थिक सत्ता नाहीं—वरील सिद्धान्तच अधिक स्पष्ट करून सांगतात कीं जगाला पारमार्थिक सत्ता नाहीं.

योग वियोग शुभाशुभभोगहि । शत्रुमित्र मधले, भ्रमरोगहि ।। ५ ।।
जन्ममरण जोंवर जगजाल । संपद् विपद् कर्म नी काल ।। ६ ।।
धरणि धाम धन पुर परिवारहि । स्वर्ग नर्क जितका व्यवहारहि ।। ७ ।।
श्राव्य दृश्य मन्तव्यहि कांहीं । मोहमूल परमार्थें नाहीं ।। ८ ।।
स्वप्नीं होइ भिकारि नृप होइ रंक नाकेश ।
जागत लाभ न हानि लव तसा प्रपंच अशेष ।। (२।९२)

बाकीच्या कांडांत पाहा — ३।३९।५; ४।७।१८-२०; ५।२१।४-५; ६।७७; ७।४१; ७।७८।८; ७।८६।३-४; याप्रमाणें सर्व सोपानांत हा सिद्धान्त सांगितला कीं, १ जग मायाकृत आहे; २ तें सत्य नाहीं; मिथ्या, असत्य आहे; ३ तें जड आहे; ४ गुणदोषभेद, सुखदुःखादि द्वंद्वें, इत्यादि सर्व दृश्य व मनानें चिंतन करण्यासारखे सर्व विषय म्हणजेच जग, मायिक, स्वप्नभ्रमासारखें असत्य आहे तरी दुःख देतें आणि *सर्वांचें कारण* जगाचें व मायेचें अधिष्ठान जें ब्रह्म = राम, त्याचें *अज्ञान* हेंच *आहे*. आणि अधिष्ठानाचें-राम-ब्रह्माचें ज्ञान झाल्याशिवाय जग-भ्रम आणि दुःखादिक यांचा नाश होणार नाहीं.

४. मिथ्या असून दुःख कसें देतें ?

स्वप्नीं शिर जर कोणिं कापलें । जागृतिविण कधिं दुःख हरपलें ।। (१।११८।२)

दोरीवरचा सर्प खोटा, पण दिसल्यावर बोबडी वळते ती खरी. स्वप्नांतील मरण दुःख, शोक खोटा पण उशी भिजते तें रडणें खरं. ' अज्ञानमेवात्र हि मूलकारणम् ' हें वर सांगितलेंच आहे.

५. एकटें ब्रह्म किंवा एकटी माया जगाचें कारण नाहीं.

भृकुटिविलासिं जिच्या जग होतीं । राम वामदिशिं सीता हो ! ती ॥

उमे राम भृकुटिच्या विलासें । विश्व उपजुनी पुनरपि नासे ॥

' *कारणकार्यपरं* ' असें रामाविषयीं म्हटलें आहे. ' *जगकारण* ' असेंहि म्हटलें आहे.

' *मम मायासंभव संसारीं* । जीव चराचर किती प्रकारीं ॥

प्रिय मम *सगळे* म्यां *उपजविले* । ' (७।८६।३-४)

ब्रह्म आणि माया मिळून जगकारण आहेत हा सिद्धान्त अशा प्रकारें दाखविला. माया जड आहे, स्वबळ न तीतें इत्यादि पूर्वीं सांगितलें आहे. एकटे राम (ब्रह्म) किंवा एकटी सिता (माया) जग उत्पन्न करूं शकत नाहींत.

६. जग गुणभूतमय आहे.

' जडचेतन *गुणदोषमय कर्ता निर्मि जगास* । '

जड = जडपंचभूतमय, चेतन = ब्रह्म, गुण = सद्गुण, दोष = अवगुण, गुणदोष हे गुणच आहेत. 'तीन अवस्था *त्रिगुण* ' (७।११७) मुख्य गुण तीन आहेत. सत्त्व, रज, तम हे तीन गुण आहेत. ' बहु *रज सत्त्व* अल्पही *तामस* ' (७।१०४।४) असा त्रिगुणांचा उल्लेख आहे. (क) *गुणदोष मायानिर्मित* आहेत, ' *मायाकृत गणदोष* अनेकहि ' (७।४१।–) *त्रिगुणांची उत्पत्ति मायेनें केलेली आहे.*

(ख) *गगन समीर अनल जल धरणी* । यांची नाथ ! सहज जड करणी ॥

त्वां *प्रेरित मायेनें निर्मित* । सृष्टि हेतु ' (५।५९।२–३)

आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी या पंचभूतांची उत्पत्ति प्रभुप्रेरित मायेनें केली आहे; व हीं पंचभूतें जड आहेत. (ग) चेतनब्रह्म सर्वव्यापक सर्वत्र आहेच; आणि ' जड चेतन गुणदोषमय कर्ता निर्मि जगास ' म्हणजेच जग त्रिगुण आणि पंचभूतें यांचें केलेलें आहे. *गुण भूतमय आहे* हें ठरलें.

७. जग अनादि पण सान्त (१) ' *अव्यक्तमूलमनादितरु* – ' (७।१३ छंद ५) अव्यक्त = मूळमाया, आदिशक्ति, मूळप्रकृति या जगाचें मूळ आहे आणि जगरूपी तरु *अनादि* आहे.

(क) या नामरूपात्मक जगाचा संहार महाकल्पान्तकाळीं होतो, हरिप्रेरणेनेंच माया ' जग × × × × × हरी करुणानिधीकल बघुन कीं ', ' संहारकारिणी सीता ' (बाल. मं. ५) अशा रीतीनें दृश्य जगाचा अंत झाला तरी बीजरूपानें तें असतेंच (मायेमध्यें). ' जीव मुक्त होईपर्यंत त्याचे कर्मसंस्कार नष्ट होत नाहींत; म्हणून पुढील कल्पारंभीं पुन्हां उत्पत्ति होऊन जग दृश्यरूपांत येतेंच.

‘ कल्प कल्प एकैका नर्की । पडति दूषिती श्रुति जे तर्की ॥ ’

असा जीव अनेक कल्पें नरकांत पडतो, यावरून वरील सिद्धान्त निघाला. *ईशसृष्ट जग कल्पान्तसमयीं नष्ट होतें;* **पण जीवसृष्ट** जग **नष्ट होत नाहीं हें ठरलें.**

८. जगाचा लय केव्हां होतो ?

जाइ लया जग *जया जाणतां* **। स्वप्नींचा भ्रम जसा जागतां ॥**

आत्मा = ब्रह्म = राम हा बोध दृढ झाला म्हणजेच त्या जीवाचें जग लय पावतें—नष्ट होतें, यालाच ‘ पंचप्रलय ’ समासांत (दासबोध) ‘ विवेक प्रलय ’ असें म्हटलें आहे.

याप्रमाणें ‘ जग ’ या विषयाबद्दलचे मानसांतील सिद्धान्त पृथक्करणपद्धतीनें मानसांतील वचनांनींच यथामति स्पष्ट करतां आले.

ल. ठे. — जग मिथ्या, मृषा, असत्य, असे अगदीं स्पष्ट उल्लेख मानसांत अनेक ठिकाणीं उपक्रमोपसंहारादि लक्षणांनीं युक्त असून सांप्रदायिक मतवादी मानसवचनांनींच जगाची सत्यता सिद्ध करतात ! हें करणेंसुद्धां सोपें नाहीं; म्हणून त्यांचीं मतें त्यांना लखलाभ होवोत. विनयपत्रिकेंतसुद्धां जग असत्य, मिथ्या असल्याचे उल्लेख पुष्कळ आहेत.

असत्य, जड, असून सत्य वाटणारें हें जग ज्याला दुःख देतें त्याचें म्हणजे जिवाचें स्वरूप वगैरेचा विचार करणें आतां ओघानेंच प्राप्त झालें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।७ 卐 卐 卐

जीव

श्रीरामचरितमानसांत प्रत्येक सोपानांत, कमीअधिक प्रमाणांत, जिवाचें वर्णन आहे. तीं वचनें संगतिवार लावलीं म्हणजे जिवाचें सहज स्वरूप (तात्त्विक) मायिक स्वरूप इत्यादि विविध विषय, सहजस्वरूपप्राप्तीची साधनपरंपरा आणि त्याची प्राप्ति, यांची मांडणी करतां येते.

मानसांत सर्व प्रकारच्या वेदान्तदर्शन-मतांचा संग्रह असल्यानें कांहीं ठिकाणीं सर्वमतसंग्राहक शब्दयोजना केलेली आहे; तथापि ‘ माया ब्रह्म जीव जगदीश्वर ’ (७।१६।७) असे चार सांगून ब्रह्म आणि जगदीश्वर एकच म्हणण्यास जागा ठेवलेली नाहीं. कांहीं ठिकाणीं ‘ ब्रह्म ’ ऐवजीं ईश्वर शब्द वापरला आहे.

१. जिवाचें तात्त्विक (सहज) स्वरूप.

ईश्वर–अंश जीव अविनाशी । चेतन अमल सहज सुखराशी ॥ (७।११७।२)

‘ जीव नित्य ’ (४।११।५) येथें ईश्वर शब्द सर्वमतसंग्राहक आहे; पण प्रकरण-अविरोधी व ग्रंथवचन अविरोधी *अर्थ ‘ ब्रह्म ’ असा एकच होतो;* त्याच ज्ञानदीप

प्रकरणांत '*सोऽहमस्मि* ही वृत्ति अखंडा।' (७।११८।१) असें म्हटलें आहे. वरील अवतरणांत ईश्वर = जगदीश, जगत्कर्ता असा अर्थ घेतल्यास 'सोहमस्मि' यांत सः = 'ईश्वर, अहम् अस्मि' असा अर्थ घ्यावा लागेल व जीव आणि ईश्वर समान ठरतील, पण '*जीव किं ईश समान*' हा सिद्धान्त मानसाच्या उपक्रमांत (बाल. दो. ६९) व उपसंहारांत (उत्तर. दो. १११ म) यांत सांगितला आहे. जीव ईशसमान होऊं शकत नाहीं या मानस-सिद्धान्ताशीं वरील अर्थानें विरोध उत्पन्न होईल म्हणून 'ईश्वर–अंश' = ब्रह्माचा अंश असाच अर्थ घेणें सयुक्तिक व सुसंगत आहे. ब्रह्माचा अंश कसा पडूं शकेल या शंकेचें उत्तर हेंच कीं ब्रह्माचा अंश घटाकाश, मठाकाश यांच्यासारखाच ! ब्रह्माचा अंश पडूं शकत नाहीं म्हणूनच ब्रह्म–अंश = ब्रह्म च. जसा ब्रह्माचा अंश पडूं शकत नाहीं तसा ईश्वराचाहि पडूं शकत नाहीं; कारण तोहि निराकार आहे. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' (भ. गीता) '*जीवो ब्रह्मैव न अपरः*' हेंच वरील *पाहिल्या अवतरणांत ध्वनित केलें आहे*. (७।११७।२). (क) जीव–चेतन, अमल, सहज सुखराशी व अविनाशी आहे. चेतन = चित्, अविनाशी = सत्, सहजसुखराशी = आनंदघन = सच्चिदानंदघन आहे. अमल = मायामलरहित आहे; मायाजनित विकाररहित आहे. हेंच *ब्रह्माचें स्वरूपलक्षण आहे*. 'जीव नित्य' (४।११।५) हें जिवाचें मूळचें, सहज स्वरूप आहे. असा असून तो दुःखी कां असतो व दिसतो ?

२. जिवाचें मायिक स्वरूप

'*तो प्रभु मायेला वश झाला । शुक मर्कट सम बंधानें पडला ॥*' (७।११७।३) तो = तात्त्विक जीव प्रभु = स्वतंत्र, समर्थ असून मायेला वश झाला व बंधनांत पडला. शुक = पोपट, राघू, पढतमूर्ख, आणि मर्कट मूर्ख; हे स्वतंत्र असून धान्यकणांच्या व चण्यांच्या म्हणजे विषयांच्या आशेनें बंधनांत पडतात; तसा जीव विषयांच्या आशेनें आपलें सहज स्वरूप विसरून बंधनांत पडला. शुक पढतमूर्ख (मूर्खपंडित) व मर्कट मूर्ख कसा याचा खुलासा गूढार्थचंद्रिकेंत पाहावा.

'*माया ईश न आपणां जाणे म्हणती जीव*।' (३।१५)

माया, ईश आणि आपण यांचें तात्त्विक स्वरूप जो जाणत नाहीं तो जीव. आपलें तात्त्विक स्वरूप विसरला; आपण आणि ईश्वर तत्त्वतः एक ब्रह्मच आहोंत हें विसरला; आणि माया असत्य, मिथ्या आहे हा अनुभव विसरला तो जीव. असा जो अज्ञानी झाला तो मायेला वश होतो; म्हणजे अहंता ममतायुक्त होतो व भेदबुद्धि उत्पन्न होते.

'***मी माझें तूं तुमचें माया*** । *करते जी वश जीव-निकाया* ॥' (३।१५।२) मी = अहंता, माझें = ममता; तूं तुमचें = भेदभाव, द्वैत. यांचें अस्तित्व चित्तांत असणें, यांनीं चित्तांत प्रवेश करणें म्हणजेच मायेला वश होणें, *मायेच्या बंधनांत सांपडणें*. 'अहं मम इत्ययं बंधः' (श्रुति)

'एक दुष्ट जी सुदुःखरूपी । जी-वश *जीव* पडे भवकूपीं ॥' (३।१५।५) या अहंमयरूपी अविद्या-मायेला वश झाला कीं तो जीव भवकूपांत पडतो व अति दुःखी होतो.

(**क**) जीव असा मायेला वश झाला कीं,

'जड चेतानिं पडली ग्रंथि जी । जरी मृषा सुटणें कठिण ती ॥' (७।११७।४) जड चेतनाची गाठ बसते-पडते; ती जरी मृषा असली तरी सुटणें फार कठिण आहे. *येथें* नित्य व अनित्य, चेतन व जड यांचा *परस्पराध्यास सांगितला* आहे. दोन दोऱ्यांची गाठ मारतांना एकमेकींचीं टोकें एकमेकींवर ठेवून पूर्वी नसलेला संबंध जसा जोडला जातो तसें घडतें.

(**ख**) स्वतः सच्चिदानंदघन नित्य, निर्मल असतां मी दुःखी, मी मरणशील, मी अज्ञानी इत्यादि जडाचे धर्म आपल्यावर लादतो; व जो आनंद विषयांत नाहीं तो त्यांच्यापासून मिळविण्याची इच्छा करतो, आशा बाळगतो; ते विषय सत्य, नित्य, सुखमय वाटूं लागतात. आपल्या सच्चिदानंदघन, नित्य अमल स्वरूपाचा विसर पडून अहंताममतादिमय मायेला वश झाला म्हणजे तो अज्ञानी जीव विपरीत ज्ञानी होतो. म्हणजेच जड चेतनग्रंथी पडते व तो जीव 'भवकूपीं पडे'.

३. जीव संसारी बनतो (संसारी = संसरणशील)

(**१**) **तैंहुनि *जिव* बनला संसारी । ग्रंथि सुटे न, सुख न लव-ारीं ॥** (७।११७।५) संसारी होतो म्हणजेच जन्ममरणपरंपराचक्रांत सांपडतो.

(**क**) **आकर चार, लाख चौऱ्यायशीं । योनीं भ्रमे *जीव* अविनाशी ॥**
फिरे सदा मायेनें प्रेरित । प्रकृती-काल-कर्म गुण-घेरित ॥ (७।४४।४–५)

चार खाणींत आणि ८४ लक्ष योनींत तो अविनाशी जीव फिरत-भटकत राहतो. तो काल, कर्म, गुण व प्रकृति (स्वभाव) यांनीं घेरलेला असतो; पुन्हां जन्मणें, पुन्हांहि मरणें असें चालू असतें. जीव अविनाशी असल्यामुळें त्याचा नाश होत नाहीं; पण धारण केलेल्या देहाचा नाश होतो.

(**ख**) *'भूवरि पडतां पाणि गढुळलें । जणुं मायेनें जीव वेष्टले ॥'* (४।१४।६) पिण्यास योग्य असें मेघांतील निर्मल जल खालीं जमिनीवर पडतांच गढूळ बनतें; व परस्वाधीन मलीन होऊन वाहात-भ्रमण करीत राहतें तसेंच तत्त्वतः अमल, सुखस्वरूप व ज्ञानस्वरूप असलेल्या जिवाचें होतें.

(**ग**) येथें सुचविलें कीं गढूळ झालेल्या पाण्यांतील माती व इतर दोष काढून टाकले गेले म्हणजे तें जल जसें मूळचें होतें तसें शुद्ध होऊं शकतें त्याप्रमाणें जीव मूळचें सहजस्वरूप पावूं शकतो.

(**घ**) याप्रमाणें संसारी झालेला जीव सतत दुःखें भोगीत असतो. 'दुःसह दुःख जन्मतां मरतां' (७।१०९।७) पण सर्व दुःखांचें मूळ आहे जडचेतन ग्रंथी; ती

सोडली पाहिजे; परंतु 'ग्रंथि सुटे न, सुख न लवभारीं।' म्हणून 'श्रुति पुराण बहु उपाय वदती।'.

४. जिवांचे तीन वर्ग— ग्रंथी सोडण्याच्या उपायांच्या संबंधानें जिवांचे तीन वर्ग पडतात.

विषयी, साधक, सिद्ध ज्ञानी। *त्रिविध जीव* जगतीं श्रुति वानी॥ (२।२७७।३)
यांतील (१) विषयी, जीव ग्रंथी सोडण्याचा उपायच करीत नाहींत. (२) ग्रंथी सोडण्याचा-चे उपाय-साधन जे करतात ते साधक; व (३) ज्यांनीं ग्रंथी सोडली ते सिद्ध म्हणजे ज्ञानी. यांतील साधक जीव उपाय करतात पण 'न सुटे आधिकाधिकच घट्ट ती।' ती सुटत तर नाहींच पण अधिकाधिक घट्ट होत जाते; कारण

***जीव* हृदयिं तम विशेष मोहो। ग्रंथि सुटे कशि शके न पाहों॥** (७।११७।७)
जिवाच्या हृदयांत मोह = अज्ञानरूपी अंधार विशेष आहे, असतो; त्यामुळें ग्रंथी दिसतच नाहीं, मग सोडणार कशी? व

ग्रंथिभेद ती (बुद्धि) करूं शके जर। होइ *जीव* मग कृतार्थ हा तर॥ (७।११८।५)
ग्रंथी सोडण्याचें कार्य करणारी असते बुद्धि, तिला ग्रंथिभेद करतां आला तर जीव कृतार्थ होतो. *जीव स्वतः हें करूं शकत नाहीं.*

५. श्रीरघुपतीचें साह्य घेतलें पाहिजे—(१) गांठ स्वतःस सुटत नाहीं असें ठरल्यावर मनुष्य चांगल्या डोळस मित्राकडे जातो व त्याचें साह्य घेतो; तसाच या जगांत जिवाचा एक मित्र आहे. 'ब्रह्म *जीव* सम सखे सहज ते।' (१।२०।४) 'ब्रह्म *जीव*से स्नेहि सहज वर।' (१।२१७।४) येथें ब्रह्म = परमात्मा राम रघुपति असा अर्थ आहे.

व्यापी ब्रह्म एक अविनाशी। सच्चिद्धन आनंद-सुराशी॥
असुनि असा *प्रभु* हृदिं अविकारी। दुःख दैन्य जग*जीवां* भारी॥ (१।२३।६-७)
निर्गुण निराकार ब्रह्म निष्क्रिय असल्यानें तें कोणास साह्य वगैरे करूं शकत नाहीं म्हणून ब्रह्म = सगुण ब्रह्म असा अर्थ घेणें जरूर आहे; म्हणून रघुपतीची मदत घेतली पाहिजे; कारण

(क) **ज्ञान अखंड एक सीतावर। मायाविवश *जीव* सचराचर॥**
ईशविवश माया गुणखाणी। मायाविवश *जीव* अभिमानी॥
भगवान् स्ववश *जीव* परवश ते॥ (७।७८।४,६-७).

माया प्रभु रामाच्या रघुपतीच्या ताब्यांत आहे, आणि मायेच्या ताब्यांत जीव असतो. प्रभु राम 'मायावश परिछिन्न जड' नाहींत. ते स्वतंत्र आहेत. तेच मायेचें बंधन सोडवूं शकतील. पण त्यांनाच कां?

(ख) **'चेतनास जो जड करी जडा करी चैतन्य।**
अशा समर्था रघुपतिसि भजति *जीव* ते धन्य॥ (७।११९)

होतात आणि मग

व्यापिति मानस रोग न, भारी । ज्यां वश *जीवां* दुःखें सारीं ॥(७।१२०।८)
म्हणून रघुपतीला शरण जाऊन त्यांचें भजन करावें.

(ग) **स्वार्थ साच जगिं हाच जिवाचा । प्रेम रामपदिं तन-मन-वाचा ॥** (७।९६।१)
म्हणून त्यांच्याशीं विरोध करूं नये.
'त्यासि विरोध नका करूं नाथा ! ।' कारण कीं **'जीव-काल-कर्में ज्या हातां'** (६।६।९).

' प्राणां प्राणहि *जिवा* जिव सुखासि सुख तुम्हिं राम ' (२।२९०।–)
असा राम रघुपति असून **' आनंदासिंधु सुखरासी, सुखधाम '** आहे. (१।१९७।६).

(घ) श्रीरघुपतिविमुख राहून वाटेल तितकीं साधनें केलीं तरी जिवाला सुख मिळणार नाहीं.

' *जीवा* सुख न हरी-प्रतिकूला ॥
अंधारें जरि रविस गिळावें । रामविमुख, न *जीव* सुख पावे ॥ (७।१२२।१६,१८).

६. रघुपतीस शरण गेल्यानें काय होईल ?

(१) **सन्मुख होइ *जीव* मम जेव्हां । जन्म कोटि अघ नासे तेव्हां ।।** (५।४४।२)
पापनाश झाल्यानें त्या जिवास रघुपतिकथेची आवड उत्पन्न होईल.

' आत्मघातकी *जीव* मूर्ख ते । ज्यांना रघुपति कथा न रुचते ॥ (७।५३।६)
आत्मघातकी होणें नसेल तर आवडीनें श्रीरघुपतिकथा श्रवण करावी. अन्यथा
जिहिं या जलिं मानस ना क्षालित । ते कातर कलिकालें वंचित ॥
तृषित बघुनि रविकर-भव वारी । भ्रमतिल *जिवमृग* दुःखी भारी ॥ (१।४३।७-८)

(क) आणि त्यांनीं सतत रामनामनिरत व्हावें कारण,
' त्रयकालीं चहुयुगीं त्रिलोकीं । नाम जपुनि बहु *जीव* विशोकी ॥ ' (१।२७।१)
श्रीरघुपतीस शरण जाऊन श्रीरामचरितमानस-कथा-श्रवण व रामनामजप केल्यानें रामप्रेम प्राप्त होईल; हाच *जिवाचा* खरा स्वार्थ आहे. (७।९६।१) पण :—

७. अनुपान पाहिजे.

(१) **विश्वासाविण भक्ति ना द्रवति न तीविण राम ।**
स्वामिंहि रामकृपेविण *जीवा* नहिं विश्राम ॥ (७।९० रा)

रामप्रेम उत्पन्न होण्यास पूर्वकथित साधन करीत असतां गुरु, राम व वेदपुराणशास्त्र यांवर *पूर्ण विश्वास पाहिजे.* (क) ' सकल लाभ *जीवा* जगीं *ईश यदा अनुकूल* '। (१।३४१) येथें ईश = शंकर असा अर्थ आहे. ' *शंकरभजन*विना नर भक्ति न मम लभतात ।। ७।४५; (१।१३८।७ पाहा.) (ख) शिवाय सदा *दीनता*, लीनता असली पाहिजे; कारण रघुपति दीनबंधु, दीनदयाळु आहेत. दीनता, लीनता नसेल तर अतिशय प्रबल हरिमाया-विद्यामाया मोहित करील. *औषध* व *अनुपान असलें तरी*–

८. कुपथ्याचा त्याग केला पाहिजे.

(१) '**तोंवर *जीवा* कुशल नहिं स्वप्निं मना विश्राम ।**
जों न राम भजती *त्यजुनि शोकधाम जो काम* ॥'

शोकधाम असणाऱ्या कामाचा त्याग केला पाहिजे. (क) अशा रीतीनें कुपथ्यत्याग-पूर्वक, त्रिविध अनुपानयुक्त रामकथाश्रवण व रामनामजप हें साधन केलें म्हणजे *जीव* जागा होईल.

'**जाणा तैंच *जीव* जगिं जागा । पावे विषयविलासिं विरागा** ॥ (२।९३।४)
आणि मग ' ज्ञान अखंड एक सीतावर ' अखंड ज्ञान प्राप्त होईल.

'**ज्ञान होइ मोहभ्रमभंगहि । तैं रघुनाथ चरणिं अनुरागहि** ॥ ' (२।९३।५)

'**स्वार्थ साच जगिं हाच जिवाचा । प्रेमरामपदिं तनमनवाचा** ॥ (७।९६।१)
असें रामप्रेम प्राप्त होईल; व त्याचें फल :

९. **सहजस्वरूपप्राप्ति** — त्या प्रेमाच्या प्रभावानें ' मम दर्शनफल ' (३।३६।९) श्रीरामदर्शनरूपी फल प्राप्त होईल, शबरीला झाला तसा सगुणसाक्षात्कार होईल. अशी हरिप्राप्ति झाली म्हणजे,

सरिताजल जलनिधिमधिं जाउनि । *होइ अचल जिव* इव *हरि पावुनि* (४।१४।८)
जिवाचें भ्रमण थांबून तो अचल होईल; म्हणजेच श्रीरघुनाथ म्हणतात कीं,

'**मम दर्शन-फल परम अनूप** (अनुपम)। **लभे जीव निज सहजस्वरूप** ॥ ' (३।३६।९)
श्रीरामदर्शनाचें परम अनुपम फल म्हणजे जिवाला आपलें शुद्ध सहजस्वरूप प्राप्त होणें. याला दृष्टान्त देतात,

'**जाणुनि गंगाजल-कृत वारुणि । पान करिति ना संत तया कुणि** ॥
गंगे मिळतां पावन जैसें । *ईश* अनीशीं अंतर तैसें ॥' (१।७०।१–२)

मायिक जीव गंगाजलानें तयार केलेल्या मदिरे(वारुणी)सारखा आहे, तो अपवित्र आहे. तीच मदिरा गंगेंत पडली म्हणजे गंगा व मदिरा हा भेद राहात नाहीं; त्याप्रमाणें किंवा सरिता सागरांत मिळाल्याप्रमाणें (४।१४।८) जीवब्रह्म एकरूप होतात; तोंपर्यंत त्यांच्यांत भेद राहणारच. या दोन दृष्टान्तांनीं जीवब्रह्म-ऐक्यच दाखविलें आहे. आणखी सबळ पुरावा पाहा :—

तो जाणे ज्या जाणूं देतां । *तुम्हीच होत तो तुम्हां जाणतां* ॥ (२।१२७।३)
' ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति ' याचाच हा पूर्ण अनुवाद आहे. हें वचन कैवलाद्वैत-वेदान्त-सिद्धान्ताशिवाय इतर सर्व वेदान्त-मत-विरोधी आहे; म्हणून मागें दिलेल्या १।७०।२ मधील *ईश*चा अर्थ ब्रह्म असाच घेणें जरूर आहे.

१०. **जीव ब्रह्म होतो** (आहेच) **ईश्वर होत नाहीं** — ब्रह्म असलेल्या जिवालाच तो मायामुक्त झाला म्हणजे ब्रह्म असल्याचा अनुभव येतो, म्हणजे जीव ब्रह्म होऊं शकतो पण जीव ईश्वर होऊं शकत नाहीं. ' जीव किं ईशसमान ' (१।६९ व ७।१११ रा) कारण कीं दोघांच्या उपाधि भिन्न आहेत. अविद्या ही जिवाची उपाधि आहे व

विद्या ही ईशाची उपाधि आहे. *उपाधित्यागानें दोघे ब्रह्मच आहेत*. ज्ञान-प्रकरणांत याविषयीं अधिक खुलासा होईल.

११. जीव अनंत अगणित आहेत — ' *जीव अनेक* एक माकान्त ' ईश्वर, राम एक आहे; जीव अनेक आहेत.

' **विविध जीव भूजल-नभवासी** ॥ ' (१।८।१)

' ***अमित जीव*** **जगीं खाणीं चारी** ॥ (१।३५।४)

असे अगणित जीव असले तरी सहजस्वरूपप्राप्ति नर-जीवच करूं शकतो म्हणून पुढील प्रकरणांत ' नरतनु 'चा विचार करणें प्राप्त झालें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।८ 卐 卐 卐

नरतनुसम नहिं देह दुजा वर

संतांच्या बहुमान्य झालेल्या बहुतेक ग्रंथांत व श्रुतिपुराणादिकांत नरदेहाचें श्रेष्ठत्व वर्णिलेलें आढळतें. श्रीरामचरितमानसांतसुद्धां ' नरतनु ' विषयीं पुष्कळ वर्णन आहे.

उत्तरकाण्डांतील भक्ति-गीतेंत (४३।१ – दो. ४६) आणि सप्त प्रश्न विवरणांतच आवश्यक तेवढें वर्णन आहे.

(१) श्रीरघुनाथ अयोध्यापति लोकांस सांगतात, (४३।७–४४)

' ***बहु भाग्यें मानुष तनु मिळली*** । ***सुरदुर्लभ*** **सद्ग्रंथिं गाइली** ॥ ७ ॥
साधन धाम *द्वार मोक्षाचें* । **मिळुनि, न मिळविति परलोका जे** ॥ ८ ॥
दो.–पावति दुःख परत्र ते शोचति शिर बडवीति ।
काळा कर्मा ईश्वरा वृथा दोष लावीति ॥ ४३ ॥
नरतनु भववारिधींत तारू । **सन्मुख मरुत कृपा मम चारू** ॥ ७ ॥
कर्णधार सद्गुरु दृढ नावे । ***दुर्लभ*** **साज सुलभतें पावे** ॥ ८ ॥
जो न तरे भवसिंधु, नर **पावुनि यां सर्वांस** ।
तो कृतघ्न जडधी लभे गति जी आत्मघ्नास ॥ ४४ ॥ '

(२) ' सर्वां दुर्लभ कवण शरीर ' — या सप्त प्रश्नांतील पहिल्या प्रश्नाचें उत्तर भुशुंडी गरुडास देतात,

' ***नरतनुसम नहिं देह दुजा वर*** । **तया याचिती जीव चराचर** ॥
नर्क नाक अपवर्गा निसणी (शिडी) । **ज्ञान विरति शुभ भक्ति वितरणी** ' ॥ १० ॥

(क) वरील अवतरणांत नरतनूची श्रेष्ठता, दुर्लभता, तिचा मुख्य उपयोग कसा व कोणता करावा, आणि तसा न करतील त्यांना काय फळ मिळतें इत्यादि गोष्टी थोडक्यांत सांगितल्या. (ख) भुशुंडीनें सांगितलें कीं नर्क, स्वर्ग, मोक्ष व हरिभक्ति यांच्याकडे नेणारी ही शिडी आहे. ही जशी जिकडे लावाल तशी ती तुम्हांस (जिवाला) तिकडे नेईल.

या शिडीचा उपयोग नरकाकडे जाण्यास, नरकांत पडण्यास, करणें हा महामूर्खपणा आहे हें जाणूनसुद्धां पुष्कळ नरजीव हिला तिकडेच लावतात हें आश्चर्य प्रत्यक्ष दिसतें!

(३) हिचा दुरुपयोग कोणता हें रघुनाथ कळवळून सांगतात,

‘ या तनुचें फळ विषय न भाई ! । स्वर्गहि अल्प, अंति दुखदाई ॥
नरतनु मिळुनि *विषयीं मन देती* । सुधा देति ते शठ विष घेती ॥
तया भला कधिं म्हणे न कोणी । गुंजा घेइ परिस टाकोनी ’ ॥ (७।४४।१-३)

(क) भुशुंडी सांगतात,

‘ ती (नर) तनुधर हरि भजती न जे नर । होति विषयरत मंद मंदतर ॥
काचखंड ते बदला घेती । करगत परिस टाकुनि देती ॥ ’ (७।१२१।११-१२)

(४) *सुरदुर्लभ कां ?* श्रीरघुनाथ सांगतात,

‘ आकर चार लाख चौऱ्यायशीं । योनीं भ्रमे जीव अविनाशी ॥
फिरे सदा मायेनें प्रेरित । प्रकृती काल–कर्म–गुण घेरित ॥
कधितरि करुणेनें नरदेहीं । धाडि ईश, विण हेतू स्नेही ॥ ’ (७।४४।४-६)

चार खाणींत व ८४ लक्ष योनींत भ्रमण करणाऱ्या मनुष्येतर प्राण्यांस व स्वर्गस्थ देवांस स्वतःच्या साधनानें किंवा कर्तबगारीनें मनुष्यदेह मिळवितां येत नाहीं. बाकीच्या सर्व योनी भोगयोनी आहेत. ‘ कुरुक्षेत्र असून धर्मक्षेत्र ’ फक्त मनुष्य देहच आहे. ईश्वराला एखाद्या जिवाची करुणा–दया येते तेव्हांच **ईश्वर कृपाळूपणें नरतनु देतो; त्याच्या कृपेनेंच नरतनु मिळते.** ईश्वर जिवाचा निर्हेतुक स्नेही असल्यानें त्याला केव्हांतरी करुणा येते; व तो नर देहामध्यें त्या जीवाला धाडतो.

‘दुर्लभं त्रयमेतद्दै *देवानुग्रहहेतुकम्* मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ।’ इत्यादि वचनें हेंच सांगतात.

(५) *इतर जिवांपेक्षां मनुष्य ईश्वरास अधिक प्रिय.* श्रीरघुनाथ भुशुंडीस सांगतात,

‘ मम माया-संभव संसारीं । जीव चराचर किती प्रकारीं ॥
प्रिय मम सगळे म्यां उपजविले । प्रिय इतरांहुनि नर मज गमले ॥ ’ (७।८६।३,४)

मनुष्यांत श्रीरामास उत्तरोत्तर अधिक प्रिय काय हें यापुढें सांगितलें आहे.

वरील सर्व ठिकाणीं गूढार्थचंद्रिकेंत भरपूर विस्तार झाला आहे. इंग्रजी लेखकांनींसुद्धां मनुष्य-शरिराला ‘ The most wonderful machine in the world ’ ‘ जगांतलें अत्यन्त आश्चर्यकारक यंत्र ’ म्हटलें आहे. जिवानें भवसागर तरून जाऊन परम सुखी व्हावें हा नरदेह देण्यांत कृपाळु ईश्वराचा हेतु आहे.

हा हेतु मनुष्यदेहानें कसा साधतां येतो याविषयीं मानसांतील सिद्धान्त व विवेचन यांचें दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. ‘ ज्ञान, मोक्ष व वैकुंठ ’ हें पुढील प्रकरण त्यासाठींच आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।९ 卐 卐 卐

ज्ञान, मोक्ष व वैकुंठ

श्रीरामचरित-मानसाच्या मंगलाचरणांतच श्लोक २,६ व ७ यांत ज्ञान व मोक्ष यांविषयीं मुख्य सिद्धान्त *सुचवून ठेवला आहे.*

१. मानसांतील सिद्धान्त – ' यन्मायावशवर्ति-विश्वमखिलम् ', ' भवाम्भोधेस्तितीर्षावताम् ', 'यत्पादप्लवः एक हि' (श्लो. ६), स्वान्तःसुखाय (श्लो. ७) व 'पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरम् ' (श्लो. २) या वचनांत हा सर्व विषय सुचविला आहे.

(१) (क) (ये) *स्वान्तःस्थम् ईश्वरं पश्यन्ति* (ते) सिद्धाः (भवन्ति) — विषयी, साधक, सिद्धज्ञानी, असे त्रिविध जीव जगांत असतात (२।२७७।३). यांत सिद्ध = ज्ञानी असें स्पष्टच सांगितलें आहे. जे स्वान्तःस्थ ईश्वराला (ब्रह्माला) पश्यन्ति = अनुभवितात, त्याचा अपरोक्ष साक्षात्कार ज्यांस होतो ते सिद्ध म्हणजे ज्ञानी होतात.

(ख) ' रामाख्य, ईश, हरि ' (श्लो. ६) राम नांवाचा ईश्वर जो हरि = ब्रह्म त्याचा साक्षात्कार अपरोक्षानुभूति ज्यास होते तो सिद्ध होतो; त्याला ज्ञानी म्हणतात. कोणीं बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध असे चार वर्ग मानले तरी जीवन्मुक्तांसच सिद्ध म्हणतात.

(ग) '*यन्मायावशवर्तिविश्वम्*' — यानें सुचविलें कीं मायेच्या बंधनांतून सुटलें पाहिजे तरच स्वान्तःसुखलाभ होईल; व भवसागरांतून तरेल (भवाम्भोधेस्तितीर्षावताम्), मुक्त होईल. **स्वान्तःस्थ ब्रह्माचा साक्षात्कार झाल्यानेंच मायाबंधनांतून मुक्त होऊन स्वान्तःसुख होईल.**

(घ) मायाबन्धन तोडणारें **ज्ञान प्राप्त करण्याचें मुख्य साधन-उपाय** - '*यत्पादप्लवः एकः एव*' या शब्दांनीं *सगुणसाकार रामाची भक्ति हेंच साधन सुचविलें आहे. ज्ञान व मोक्ष यांचें फल स्वान्तःसुख हें सुचविलें आहे.* मंगलाचरणांत सुचविलेल्या या सिद्धांतांचाच विकास सर्व रामचरितमानसांत, प्रत्येक सोपानांत निरनिराळ्या प्रकारें केला आहे.

(२) भव – संसृति; पुनःपुन्हां जन्मास येणें व देहत्याग करणें व धारण करणें, हें संसृतिचक्र या जगांतील सर्व जिवांच्या पाठीशीं लागलेलें असतें हें ' जीव ' प्रकरणांत मानसाधारें पाहिलें. हें थांबविण्याचें साधन जिवानें आपल्या जगाचा प्रलय करणें हें आहे.

' जाइ लया जग जया *जाणतां* । स्वप्नींचा भ्रम जसा जागतां ॥

**वंदुं बालरूपा *त्या रामा । सिद्धि सुलभ* ***जपतां यन्नामा॥*' (१।११२।२–३)

जागृति आल्यानें स्वप्नभ्रम व त्यापासून होणारें दुःख नष्ट होऊन सुख होतें; तसेंच *ज्याला जाणलें असतां* स्वप्नभ्रमासारखें (असलेलें) *जग लयास जातें तो राम.*

' निर्गुणरूप सुलभ अति सगुण न जाणे कोणि ॥' (७।७३)

हा मानससिद्धान्त आहे. म्हणून येथें राम = रघुपति हा अर्थ घेतां येत नाहीं. 'व्यापी ब्रह्मराम', 'ब्रह्मराम चिन्मय अविनाशी' हें रामस्वरूप जाणणें हा एकच उपाय मायामुक्त होण्याचा आहे. रघुपति राम चर्मचक्षूंनीं पाहतां येतो पण *जाणतां* येत नाहीं. निर्गुण ब्रह्म राम चर्मचक्षूंनीं पाहतां येत नाहीं पण जाणतां येतें व *जाणणें सुलभ अति आहे*. (७।७३ वर पाहा) यावरून ठरलें कीं **'ब्रह्मराम चिन्मय अविनाशी' चें ज्ञान हेंच मायाबंधनमुक्ति, दुःखमोक्ष व नित्य *स्वान्तःसुख*प्राप्तीचें साधन आहे. ही *ज्ञानसिद्धि* वंदन, नामस्मरणादि सगुण भक्तीनें सुलभ आहे.**

'ज्ञान मोक्ष दे श्रुति करि गाना।' (३।१६।१)

२. ज्ञानाचें लक्षण काय ? (१) श्रीरामचंद्रांनीं रामगीतेंत लक्ष्मणाला सांगितलें आहे,

'ज्ञान, जिथें मानादिक नाहीं। *ब्रह्म समान सर्व जागीं पाही*॥' (३।१५।७)
मानादिक नाहीं म्हणजे 'अमानित्वमदम्भित्वमहिंसाक्षांतिरार्जवम्' पासून 'तत्त्वज्ञानार्थदर्शनम्' पर्यंत (भ. गीता १३।७-११) सांगितलेल्या वीस (२०) लक्षणांनीं संपन्न होऊन समान असणारें ब्रह्म सर्व जगांत पाहणें—अनुभवणें म्हणजे ज्ञान; म्हणजेच 'सर्वं खलु इदं ब्रह्म', 'न इह नाना अस्ति किंचन' या श्रुतिसिद्धांतांचा दृढ साक्षात्कार सतत होणें *याचें नांव ज्ञान*.

(क) दृढ *अन्वयबोधालाच येथें ज्ञान म्हटलें आहे*. यालाच कोणी अद्वैती विज्ञान म्हणतात. अशा ज्ञानी महापुरुषांनाच 'ब्रह्मलीन *विज्ञानी*' (७।५४।५ मध्यें) म्हटलें आणि अशांना श्रीरघुनाथानेंच 'ज्ञान्यांहुनिही प्रिय *विज्ञानी*' (७।८६।६) म्हटलें आहे. प्रचलित मतांचे दोन प्रकार दाखविले. या ज्ञानाचें साधन व फळ त्यांनींच रामगीतेंतच सांगितलें आहे,

(ख) **'विरतिस धर्म, योग दे ज्ञाना। *ज्ञान मोक्ष दे* श्रुति करि गाना॥'**
(३।१६।१)

श्रुतिपुराणोक्त वर्णाश्रम धर्माचरणानें वैराग्य (अपर) प्राप्त होतें; वैराग्य असेल तर योग साधतो, योगानें ज्ञान होतें व *ज्ञानानें मोक्ष मिळतो*.

(ग) '*मोक्ष सकल सुखखाण*' (७।८३) असें श्रीरघुनाथानेंच सांगितलें आहे.

ल. ठे.—*ज्ञानप्राप्तीचें साधन रघुपतिभक्ति* हें मंगलाचरणांतच सांगितलें, तेंच महेशमुखानें बालकाण्डांतच अधिक स्पष्ट केलें व यानें ज्ञान*सिद्धि* सुलभ असें सांगितलें. '*सिद्धिसुलभ* जपतां यन्नामा' (१।११२।३).

(क) अरण्यकाण्डांत श्रीरघुनाथमुखानें धर्म, वैराग्य, योग, ज्ञान व मोक्ष ही परंपरा सांगितली. म्हणजेच भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग हे दोन मार्ग दाखविले आणि *भक्तिमार्ग सुलभ अति*, हें ग्रंथारंभींच सांगितलें व सुचविलें कीं **मानसांत भक्तिमार्गालाच मुख्य मान आहे.**

३. ज्ञानदीप

(१) **विरतिस धर्म योग दे ज्ञाना। ज्ञान मोक्ष दे श्रुति कारि गाना ॥** (३।१६।१) या एका ओळींत ज्ञानमार्गाची जी परंपरा सांगितली तिचाच विस्तार उत्तरकाण्डांत परिशिष्ट-प्रकरणांत *'ज्ञानदीप'* **या प्रकरणांत** केला आहे. ४७ ओळींचें तें एक अप्रतिम सांग रूपक असल्यानें त्या प्रकरणाची गूढार्थचंद्रिका छापील ४०।४५ पृष्ठें भरेल एवढी झाली आहे, ज्ञानदीप-प्रकरणांतसुद्धां शेवटीं ज्ञानमार्गाला फार गौणत्वच दिलें आहे.

' ईश असा संयोग आणि जैं । *शके कदाचित सुटूं* ग्रंथि तैं ॥ '

सर्व साधनें ईश्वराच्या कृपेनें जमलीं तरी ग्रंथि सुटेलच असें सांगतां येत नाहीं. *कदाचित सुटूं शकेल* असें ज्ञानदीप प्रकरणाच्या उपक्रमांत म्हटलें आणि उपसंहारांत स्पष्ट सांगतात कीं,

' हरिमाया अति दुस्तर तरवेना विहगेश ॥ ' (७।११८ रा)

' वदत कठिण समजत कठिण साधत कठिण विवेक ।
घुणाक्षरें न्यायें घडे तरि विघ्नेंहि अनेक ॥ ११८ म ॥
ज्ञानाचा पथ कृपाण-धारहि । पडत खगेश ! न लागे वारहि ॥
जर निर्विघ्न पथा लंघावें । तर कैवल्य परम पद फावे ॥
अतिदुर्लभ कैवल्य परमपद । संत पुराणानिगम आगम वद ॥
स्वामि ! मुक्ति ती रामा भजतां । येई जबरिनें इच्छा नसतां ॥ ' (७।११९।१-४)

यावरून ठरलें कीं केवळ ज्ञानमार्गाला मानसांत मान नाहीं. या मार्गानें मोक्ष मिळत नाहीं असें मात्र म्हटलेलें नाहीं; हें वरील उपक्रमोपसंहारावरून ठरतें.

(२) अरण्यकांडांतील रामगीतेंतील **ज्ञानमार्गाचें वर्णन अवघ्या तीन ओळींत आहे;** आणि त्यानंतर लगेच **१३ ओळींत भक्तिमार्गाचेंच वर्णन प्रभूंनीं केलें** व भक्तिमार्गाचीच श्रेष्ठता सांगितली; आणि त्या सर्व प्रकरणास *भक्तियोग* असेंच उपक्रमोपसंहारांत म्हटलें. ' जेणें पदरति उद्भवे ' असा उपक्रम आहे व ' भक्तियोग परिसुनी सुखावे ' असा उपसंहार आहे.

(३) श्रीरघुवीर अरण्यकाण्डांतच नारदास सांगतात,

' श्रुणु मुनि हर्षें तुला सांगतों । त्यजुनि भरवसा मज जो भजतो ॥
त्यास सदा मी रक्षीं ताता । जशी बालका जपते माता ॥
धरुं अहि अनल वत्स शिशु जाई । निवारते नकळत जशि आई ॥
प्रौढ होइ तैं त्याच सुतावरि । प्रीति करी, *पूर्वीसम ना परि* ॥
प्रौढतनयसम मजला ज्ञानी । बालक सुतसम दास अमानी ॥
***सम बल भक्तां* सबल तयांना । काम कोप हे रिपु उभयांना ॥**
हें जाणुनि पंडित मज भजती । *ज्ञानालागींहि न भक्ती त्यजती* ॥ ' (३।४३।४-१०)

(४) अरण्यकांडांत शबरीला श्रीरघुनाथ सांगतात,

' भक्तीहीन नर शोभे कैसा । दिसे *वारि*विण वारिद जैसा ॥ '

आणि शबरीला जी नवविधा भक्ति सांगितली तिच्यापैकीं

' एकहि नवांमधें ज्यापासीं । कुणिहि नारिनर चर अचरासी ॥
तो प्रिय भामिनि अतिशय मजला । '

असा उपसंहार केला.

(५) श्रीरघुनाथच उत्तरकांडांत अयोध्याजनांस सांगतात,

' बंधू ! सुलभ सुखद हा मार्गहि । वेदपुराणकथित मम भक्तिहि ॥
ज्ञान अगम्याहि विघ्नें पार न । साधन कठिन मना आधार न ॥
करुनि कष्ट जरि मिळे कुणाला । भक्तिहीन ती प्रिय नहिं मजला ॥ (७।४५।१–३)

(६) श्रीरघुनाथ भुशुंडीला सांगतात, (७।८६।१–१०) मम-मायासंभव संसारांत सर्वच जीव मला प्रिय आहेत; पण त्यांत मनुष्य, ब्राह्मण, वेदपाठी, धर्मशील, विरागी, ज्ञानी, विज्ञानी (ब्रह्मलीन) आणि अनन्यगतिक दास हे उत्तरोत्तर अधिकाधिक प्रिय आहेत; असें सांगून म्हणाले कीं,

' भक्तिहीन जरि विरिंचि असला । तो प्रिय सब जीवांसम मजला ॥ '

तो पशुपक्षी-कृमि-कीट पतंगांच्या इतकाच प्रिय; पण

' जीव भक्तिमान् नीच जरि महा । प्राणप्रिय मज वाणा मम हा ॥ '

(७) स्तुति करतांना वेद म्हणतात,

' जे ज्ञान-मान-विमत्त तव भवहराणि भक्ति न आद्रिती ।
ते प्राप्त सुरदुर्लभ पदादपि पडत आम्हां अढळती ॥ (७।१३।३)

(क) शंकर, पार्वती व गोस्वामी यांनींहि असेंच सांगितलें आहे.

(८) सुंदरकाण्डांत बिभीषणाला रघुवीरानें असेंच सांगितलें आहे. (४८।२ पासून पाहा.) किष्किंधाकाण्डांत सुग्रीवाला ज्ञानवैराग्य प्राप्त झाल्यावर त्यानें भक्तीच मागितली, व तारेला ज्ञान दिल्यावर तिनें भक्तीच मागितली. अयोध्याकाण्डांत भरद्वाजस्तुतीच्या शेवटीं व वाल्मीकिसंवादांत भक्तीचेंच वैशिष्ट्य वर्णन केलें आहे. भरतचरित्र ज्ञानोत्तर प्रेमभक्तिमयच आहे.

(९) काकभुशुंडी सांगतात, (७।११९।५–६)

(क) **' स्थळविण जळ कधिं राहुं न शकतें । यत्न कोटिही करून विविध ते ॥**
तसें मोक्षसुख बघ खगराया । टिकुं न शके हरिभक्ति विना या ॥ '

(ख) **' सेवक सेव्य भावविण भवतरण न उरगारि । '** (७।११९ रा)

(ग) **ज्ञाना केवळ श्रम जे करती । ते जड, गृहिं सरधेनू त्यजिती ॥**
दुधासाठिं अर्कास धुंडिती ।
' श्रुणु ! खगपति हरिभक्ती त्यागाति । अन्य साधनीं सुख जे इच्छिति ॥

ते शठ महासिंधु विण तरणी । *तरुनि* पार कांक्षिति जड करणी ॥ '

(घ) **रामचंद्र भजनाविण इच्छी पद निर्वाण ॥**

ज्ञानवंत अपि तो नर पशु, विण पुच्छ विषाण ॥ (७।७८ रा)

४. कलियुगांत ब्रह्मज्ञान — केवळ ज्ञानमार्गानें मोक्ष मिळविणें आणि तो शेवटपर्यंत निभावणें अत्यंत दुर्लभ व अशक्यासारखें असतां कलियुगांत काय घडतें तें भुशुंडी गरुडास सांगतात,

' ब्रह्मज्ञानच नारिनर वदति, दुजी नहिं बात ॥

कौडीलागीं लोभवश करिति विप्रगुरुघात ॥ ' (७।९९ रा)

५. कैवल्य—या सर्व विघ्नांतून पार पडून, पतन न पावतां, दृढ ज्ञान शेवटपर्यंत टिकलें तर काय फळ मिळतें तें सांगतात, ' तुम्हिच होत तो तुम्हां जाणतां । ' (२।१२७।३) असें वाल्मीकि श्रीरामास म्हणाले. ' ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति । ' (श्रुति) याचाच अनुवाद हें वचन आहे.

(क) **' सरिता-जल जलनिधिमधिं जाऊनि । होइ अचल जिव इव हरि पावुनि ॥'** (४।१४।८)

नदी सागरांत मिळाली म्हणजे तिचें नामरूप जाऊन ती सागरच होते; नदी व सागर हा भेद उरत नाहीं. तसाच हरिप्राप्ति = ब्रह्मप्राप्ति झालेला जीव जीवरूपानें उरत नाहीं, म्हणजेच अंश-अंशी एकच होतात, जिवाचें तात्त्विक स्वरूपसुद्धां निराळें राहात नाहीं. अद्वैतवेदान्ताची कैवल्याची हीच व्याख्या आहे. अचल होतो म्हणजे जन्म-मरणचक्रांत भ्रमण करणें थांबतें.

(ख) हा *कैवल्यमोक्ष देहपातानंतर मिळतो* हें शबरीच्या उदाहरणानें दाखविलें आहे. (३।३६ छं.) यालाच सायुज्य, निर्वाण इत्यादि म्हणतात.

(ग) मायाबंधनांतून सुटून सदा सर्वदा स्वान्तःसुख-संदोह व निर्भय होणें म्हणजेच भवसागरांतून तरणें.

(घ) ' निर्वाणशान्तिप्रदम् ' (५ मं. श्लो. १) ' भवभयहरणं ज्ञानगम्यं ', (लंका. मं. श्लो. १) याप्रमाणें सर्व सोपानांत कमीअधिक प्रमाणानें या विषयाचें वर्णन आहेच, पण सर्वत्र भक्तीनेंच सुलभता व भक्तीचीच श्रेष्ठता वर्णिली आहे ती दाखविलीच.

(ङ) बालकांडाच्या उपक्रमांत अगदीं साररूपानें सांगितलें कीं,

' शमयमनियमचि फुलें ज्ञान-फल । *हरिपदरति* रस वेद वदे कल ॥ ' (१।३७।१४).

रस नसलेलें फळ फेकून देण्यासारखेंच असतें. शमयमनियमादि फुलें आहेत, ज्ञान फल आहे आणि प्रेमभक्ति हा त्या फळांतील रस आहे. यांत ज्ञानाचा अधिकारी व प्रेमभक्तीचा अधिकारी सुचविला आहे. विवेकवैराग्यसंपन्न व शमादि संपत्तियुक्त असेल तोच ज्ञानाचा अधिकारी हें रामगीतेंत ' विरतिस धर्म योग दे ज्ञाना । ' यानें सुचविलें आहे.

६. महावाक्योपदेश.

(१) **मला परम अधिकारी जाणुनि ॥**

करुं लागले ब्रह्म-उपदेश । अज अद्वैत अगुण हृदयेश ॥

अकल अनीह अनाम अरूप । अनुभवगम्य अखंड अनूप ॥

मन गोऽतीत अमल अविनाशी । निर्विकार निरवधि सुखराशी ॥

तें तूं त्यांत तुझ्यांत न भेदहि । **वारि वीचि इव गाती वेदहि॥** (उत्तर. १११।२-६)

(क) परम अधिकारी = ' त्रिविध *एषणा गेल्या* गाढ ' (७।११०।१३) आणि

' मनोवासना एक न जागे । **केवल रामचरणिं लय लागे** ' ॥ (७।११०।६)

(ख) ' तें तूं त्यांत तुझ्यांत न भेद हि । ' हा ' तत् त्वम् असि ' या महावाक्याचाच थोडा विस्तृत अर्थ आहे. हा उपदेश प्राप्त झाल्यानंतर तो साधक

तीन अवस्था त्रिगुण त्या काढि कापसांतून ॥

तूल तुरीया पिंजुनी जाडी वात वळून ।

असा पेटवी दीप तेजराशि विज्ञानमय ॥ (७।११७)

ही राजयोगाच्या अभ्यासाची भूमिका सांगितली आहे.

' सोऽहमस्मि ही वृत्ति अखंडा । दीपशिखा ती महा प्रचंडा ॥ '

आत्म-अनुभव सुखप्रकाश ॥ ' (७।११८।१-२ व पुढें पाहा.)

याप्रमाणें या आत्मानुभव सुखरूपी प्रकाशांत जड चेतनग्रंथी बुद्धि निर्विघ्नपणें सोडूं शकली तर जीव कृतकृत्य होतो हें सार आहे.

(२) **' राम ' हा महामंत्रसुद्धां महावाक्यच** आहे. आणि वरील सामवेद-महावाक्यासारखाच त्याचा अर्थ आहे.

' महामंत्र जो महेश जपती । काशीं मुक्ति हेतु उपदिशती ॥ ' (१।१९।३)

या महामंत्राला उपनिषदांत महावाक्य म्हटलें असून त्याचा अर्थहि दिला आहे. (१।१९।३ गूढार्थचंद्रिका पाहा.)

(क) काशींत मरण्यानें **सायुज्य मुक्ति** मिळते ती या ' राम ' महावाक्याचा उपदेश महेश करतात म्हणून मिळते. सर्व पुण्यपापात्मक कर्मांचा क्षय होऊन **ज्ञानानेंच मिळते** हेंहि मानसांत स्पष्ट सांगितलें आहे. (किष्किंधा. सं. सो. १ गूढार्थचंद्रिका पाहा.)

७. ज्ञान कोणीं दिलें तरच मिळतें. (१) अज्ञानावरण स्वतःचें स्वतःस बाजूस सारतां येत नाहीं.

(क) **तारा विकल, दिसत रघुराया** । *दिधलें ज्ञान निरसली माया ॥*

क्षिति-जल-पावक-गगन-समीर । पंचरचित अति अधम शरीर ॥

तनु ती प्रगट पुढें निद्रित तव । जीव नित्य रडसी कोणास्तव ॥

उपजे ज्ञान **चरणिं मग नमुनी । परमभक्ति वर घेइ मागुनी ॥** (४।११।३-५)

येथें शब्दशक्तीनें ज्ञान दिधलें तेव्हां उपजलें.

(ख) रावणवधानंतर दशरथ श्रीरघुवीरास भेटण्यासाठीं स्वर्गांतून आले तेव्हां

प्रेम पूर्विचें रघुपति जाणुनि । *ज्ञान दिलें* **दृढ पित्या** *विलोकुनि* **॥**

उमे मुक्त दशरथ ना झाले । कारण, भेदभक्तिनें धाले ॥

सगुणोपासक मोक्ष न घेती **। तयां राम निजभक्ती देती ॥** (६।११२।५-७)

येथेंसुद्धां *ज्ञान दिलें* असेंच म्हटलें **पण तें '** विलोकुनि ' म्हणजे *दृष्टीनें दिलें*. या दृष्टीलाच *श्रीज्ञानदेवींत* ' गुरुकृपादृष्टि ' म्हणून तिचा महिमा १२ व्या अध्यायारंभीं मंगलाचरणांतच गाइला आहे.

(ग) **स्पर्शानें ज्ञान देणें** हा तिसरा प्रकार सुग्रीवाच्या बाबतींत आढळतो. वालीवधापूर्वी

सुग्रीव वारंवार नमी पदिं शीसा । प्रभु जाणुनि मनिं हर्ष कपीशा ॥

उपजे ज्ञान*; वचन मग बोले ।** ***नाथकृपें **मम मनचि अलोलें ॥**

पायाला मस्तकाचा स्पर्श होतांच नाथकृपें ज्ञान उपजे आणि मन अचंचल, स्थिर, शान्त झालें. (४।७।१४-१५). ' स्थिर मन कीं निज-सौख्यावीण । ' (७।९०।७) आत्म-सुखप्राप्तीशिवाय मन कधीं स्थिर-अचंचल-अलोल होत नाहीं.

(घ) **केवळ संकल्पानें ज्ञान देणें** हा चौथा प्रकार आहे. हा प्रकार मारीचाच्या बाबतींत आढळतो. मारीचाला मर्मीं मार्गण (बाण) मारला तेव्हां

तदंतरींचें प्रेम पाहुनी । ***मुनिदुर्लभगति*** **दिधली** *प्रभुनीं* ॥ (३।२७।१७)

मुनिदुर्लभगति = सायुज्य – कैवल्य – मोक्ष. हा दृढ आत्मज्ञानाशिवाय मिळत नाहीं. बाकीच्या तीन प्रकारांचा उपयोग येथें केलेला नाहीं. **मानसिक संकल्पानें ज्ञान दिलें म्हणून मुक्त झाला.** येथील *प्रभु* शब्द सहेतुक आहे. ' राम **सत्यसंकल्प प्रभु** ' (५।४१).

(ङ) ' दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः । ' (वेदान्तकेसरी) असें श्रीमद् आचार्य म्हणतात.

८. ज्ञानोत्तरभक्तींत दोन प्रकार – भक्तिमार्गानें ज्ञानप्राप्ति आणि ज्ञानप्राप्तीनंतर प्रेमभक्ति म्हणजेच ज्ञानोत्तर भक्ति हाच मानसांतील मुख्य सिद्धान्त आहे. ' श्रुति-सिद्धान्त मानसीं अद्भुत ' (प्र. प्र. ५।६) प्रकरण पाहा. ज्ञानोत्तर भक्तींत मानसांत दोन प्रकार स्पष्ट आहेत. (क) आत्मज्ञान झाल्यानंतरसुद्धां भेदभावानें भक्ति करणें हा एक प्रकार; याला ' भेदभक्ति ' असेंच म्हटलें आहे. दशरथ ' *भेदभक्तिनें* धाले ' असें म्हटलें आहे. ' आधिं घेतला *भेदभक्ति* वर । ' (३।९।२) असें शरभंगाविषयीं म्हटलें आहे. या प्रकारांत *शरभंग, सुतीक्ष्ण, शबरी* व *काकभुशुंडी* हीं *चारच उदाहरणें मानसांत आहेत*. (ख) दुसरा प्रकार ज्ञानोत्तर अभेदभक्ति करणारांचा. यांत भरद्वाज, वाल्मीकि, अत्रि, अगस्त्य, नारद, वसिष्ठ, हनुमान, शबरी, विश्वामित्र, बिभीषण, जनकराजा इत्यादि अनेक उदाहरणें आहेत.

९. नित्यमुक्त – नित्यवैकुंठ — जे ज्ञानोत्तर-भक्तिसंपन्न असतात त्यांतील कांहीं

कैवल्य मोक्षापेक्षांही दुर्लभ अशी नित्यमुक्ति प्राप्त करून नित्यवैकुंठांत निवास करतात.

(१) **त्रिपादविभूति महानारायणोपनिषदांत** एकापेक्षां एक श्रेष्ठ सहा वैकुंठांचा उल्लेख असून शेवटच्यास सर्वश्रेष्ठ '*सुदर्शन वैकुंठ*' हें नांव आहे. विदेह कैवल्य नको असणारे ज्ञानी भक्त, नित्यमुक्त होऊन तेथें राहतात. **यावरील शंकांचें समाधान त्या उपनिषदांतच पाहावें.**

(२) ज्ञानोत्तर अभेदभक्तिसंपन्न, **सर्वजनमान्य श्रीएकनाथमहाराजांनीं** आपल्या चतुःश्लोकी भागवतांत (चतुःश्लोकी भागवतावरील ओवीबद्ध टीका) नित्यवैकुंठ व अनित्यवैकुंठ असे भेद दाखवून सांगितलें आहे कीं ज्ञानरहितभक्त अनित्यवैकुंठांत राहतात आणि ज्ञानीभक्त, विदेहकैवल्याचीसुद्धां इच्छा नसणारे **नित्यवैकुंठांत चिदानंदमय-नित्यदेहानें राहतात.**

(३) 'आम्हीं वैकुंठीचे वासी ' असें आपल्या अभंगांतच म्हणणारे **भक्तशिरोमणि तुकोबा** *जेथून आले होते तेथें वैकुंठासच गेले.*

(४) **यथार्थदीपिकाकार** वामनांनीं यथार्थदीपिकेच्या १४।२ या श्लोकावरील विवेचनांत श्रीएकनाथांप्रमाणेंच नित्यवैकुंठ व अनित्यवैकुंठ यांचें प्रतिपादन केलें आहे.

(५) **पद्मपुराण उत्तरखंड** – अध्याय २६९ (आनंदाश्रमप्रत) श्लोक ३४७ मध्यें स्पष्ट उल्लेख आहे कीं **वैकुंठांत राहणारे नित्यमुक्त असतात.**

यथा विमाने *वैकुण्ठे नित्यमुक्तैर्महात्मभिः ।*
तथा सर्वैः समारुह्य ऋक्षवानरराक्षसैः ॥ ३४७ ॥
अयोध्यां प्रस्थितो रामः स्तूयमानः सुरोत्तमैः ॥

(क) **श्रीदासबोधांत** शंकर व ब्रह्मदेव यांना नित्यमुक्त म्हटलें आहे.

(६) **मानसांत** वैकुंठवासी सगुणोपासकांचा संकेत जांबवंतानें केला आहे. हें वैकुंठवासी नित्यमुक्तच भगवदिच्छेप्रमाणें भगवंताच्या अवतारापूर्वींच विविध रूपांनीं पृथ्वीतलावर अवतरतात.

प्रभु अवतरती स्वेच्छया सुरगोद्विजमहिसाठीं ॥
सगुणोपासक राहती त्यजुनि मोक्ष सब पाठिं ॥ (४।२६ गूढार्थ चंद्रिका पाहा.)

(७) **ल. ठे.** — जीवन्मुक्त ज्ञानी देहपातानंतर विदेह कैवल्य पावतात म्हणजे त्यांचा सहजस्वरूप अमल झालेला जीव कायमचा ब्रह्मांत लीन होतो; जशी सरिता सागरांत मिळते इ० पूर्वीं सांगितलेंच आहे.

'यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रे अस्तंगच्छन्ति नामरूपे विहाय ।' (श्रुति)
किंवा **'जले जलं वियद् व्योम्नि तेजस्तेजसि वा यथा '**

(क) जीवन्मुक्त अष्टधा प्रकृतिजनित देहानें जसे देहपातापर्यंत येथें राहतात; म्हणजे त्यांचा **जीवभाव नष्ट झालेला असला तरी निज सहजस्वरूप अमल झालेला जीव असतोच**, तसाच नित्यमुक्तांचाहि असतो; पण त्यांचा देह अविनाशी चिदा-

नंदमय नित्य असतो. नित्यवैकुंठच चिदानन्दमय आहे. तेथें चिदानंदमय देहानें राहून अभेदभक्ति करतात, जशी जीवन्मुक्तदशेंत तें येथें करतात, करीत असत.

(८) **मानसांत वैकुंठाचा उल्लेख** अनेक ठिकाणीं आहे.

'··· **सकल वैकुंठा वानति। वेदपुराणविदित जगिं जाणति ॥** ' (७।४।३) असें रामप्रभूंनींच म्हटलें व वैकुण्ठाला त्यांनींच *मम धाम* (रामधाम) म्हटलें आहे. '*ममधामदा* पुरी सुखराशी ' (७।४।७). मानसांत अनेक स्थळीं वैकुंठाला रामधाम म्हटलें आहे.

करा कल्पभर राज्य तुम्हि मजला स्मरा मनांत ।
मग *मम धामा जाल* **कीं** *जिथें संत जातात* ॥ (६।११६ ड्रा)

संत = ज्ञानीभक्त हें पूर्वीं दाखविलें आहेच. ['रामधामदा पुरी सुशोभन ' (१।३५।३)] असें श्रीरामप्रभूंनीं बिभीषणास सांगितलें आहे. अयोध्येंतील सर्व जीव रामावतारसमाप्तिकाळीं रामधामास गेल्याचा उल्लेख पार्वतीच्या प्रश्नांतच आहे. (**क**) कोणाला गति मिळाली-दिली हें '*राम आणि सद्गति देणें*' (प्र. प्र. १३।९) यांत दिसेल.

१०. विनयपत्रिकेंतील सिद्धान्त —श्रीतुलसीदासांचा दुसरा सुप्रसिद्ध ग्रंथ *विनय-पत्रिका* हा आहे. त्यांत ठायीं ठायी जग असत्य, मिथ्या, अभेदप्राप्ति इत्यादि उल्लेख आहेत. जग मिथ्या किंवा असत्य हें फक्त केवलाद्वैताचेंच मत आहे. दोनतीन नमुने पाहा :—

(१) केसव कहि न जाइ का कहिये (पद १११)चा अनुवाद —

हरि वदवे न काय तरि वदणें ॥

बघुनी तव रचना विचित्र अति, समजुनि मनिं, मुग गिळणें ॥ ध्रु० ॥
शून्यभित्तिवरि चित्र, रंग नहिं, तनुविण काढि चितारी ॥
धुउनि जाइ ना, मरणभीति तन, दुःख बघुनि मनिं भारी ॥ २ ॥
रविकरनीर वसे अति दारुण मकर त्यांत करि वसती ।
वदनहीन तो गिळी चराचर पान करूं जे बघती ॥ ३ ॥
कुणी सत्य, कुणि असत्य मानी, प्रबल उभय कुणि वदती ॥
तुलसी जे *तरतील तिन्ही भ्रम ते अपणां ओळखती* ॥ ४ ॥

(२) 'द्वैतरूप तमकूप परौं नहिं ' (पद ११६।४) द्वैतरूपी अंधारकूपांत मीं पडूं नये.

(३) '**श्रुति गुरु साधू स्मृतिसंमत हें** *दृश्य असत् दुखकारी* ।
त्यजुनि तया रघुपति भजल्याविण कोण विपत्ति निवारी ॥ ' (पद १२०।४)

(हा अनुवाद हा लेख लिहितांनाच झाला.) अशीं वचनें आणखी पुष्कळ आहेत. आतां सुज्ञ वाचकांनींच ठरवावें कीं श्रीतुलसीदास केवलाद्वैती होते कीं विशिष्टाद्वैती ?

११. शब्दज्ञानानें मुक्त व गरुड पुराण :— सध्यां कलियुग चालू आहे; कलियुगांत ब्रह्मज्ञान किती स्वस्त व व्यापक होईल याविषयीं मानसांत म्हटलें आहे कीं,

'ब्रह्मज्ञानच नारि-नर वदति दुजी नहिं बात ।
कौडीलागीं लोभवश करिति विप्रगुरुघात ॥' (७।९९ रा)

या भाकिताप्रमाणें हल्लीं अशा ब्रह्मज्ञानी: नारी-नरांची संख्या महाराष्ट्रांत झपाट्यानें वाढत आहे म्हणून अशा ज्ञानाबद्दल गरुड पुराणांत काय म्हटलें आहे तें दाखवून हें प्रकरण समाप्त होईल.

" **संसारज-सुखासक्तं** *ब्रह्मज्ञोऽस्मीति वादिनम् ।*
कर्मब्रह्मोभय भ्रष्टं तं त्यजेदन्त्यजं यथा ॥ ६४ ॥
गृहारण्यसमा *लोके गतव्रीडा दिगंबराः* ॥
चरन्ति गर्दभाद्याश्च विरक्तास्ते भवन्ति किम् ॥ ६५ ॥
षड्दर्शनमहाकूपे *पतिताः पशवः खग* (= **गरुड !**) ॥
परमार्थं न जानन्ति पशुपाशनियन्त्रिताः ॥ ६६ ॥
इदं ज्ञानमिदं ज्ञेयमिति चिंतासमाकुलाः ॥
पठन्त्यहर्निशं शास्त्रं परतत्त्वपराङ्मुखाः ॥ ७४ ॥
पठन्ति वेदशास्त्राणि बोधयन्ति परस्परम् ॥
न *जानन्ति परं तत्त्वं दर्वी* (पळी, ओगराळें, चमचा) *पाकरसं यथा* ॥७८॥
संसारमोहनाशाय शब्दबोधो न हि क्षमः ।
न निवर्तेत तिमिरः कदाचिद्दीपवार्तया ॥ ८१ ॥
अद्वैतं **हि शिवं प्रोक्तं** *क्रियाऽऽयासविवर्जितम्* ॥
गुरुवक्त्रेण लभ्येत नाधीतागमकोटिभिः ॥ " (१६।९०)

ज्ञान, मोक्ष व वैकुण्ठ यांविषयीं मानसांतील मत पृथक्करणपद्धतीनें यथामति निवेदन केलें. श्रीमानसांत ज्ञानाचें व मोक्षाचें मुख्य साधन रघुपतीची सगुण रामाची भक्ति आहे व भक्तिमार्गांत शैव वैष्णवादि झगडे आढळतात; म्हणून मानसांत याविषयीं काय सांगितलें आहे हें पाहणें जरूर आहे. राम-शिव अभेद असल्याचें मानसमत पुढील प्रकरणांत पाहावें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ९।१० 卐 卐 卐

श्रीमानसांत राम-शिव अभेद

श्रीरामचरितमानस ज्ञानोत्तर रामभक्तिप्रतिपादक असून श्रीरामचरित्रवर्णनपर असलें तरी त्यांत शिवचरित्रहि भरपूर आहे. इतकेंच नव्हें तर श्रीरामाचें त्रिविध स्वरूप जसें वर्णिलें आहे तसेंच त्रिविध शिवस्वरूपहि वर्णिलें आहे. ग्रंथाच्या उपक्रमोपसंहारांत शिवचरित्र विस्तारानें असून मधेंमधें संक्षिप्त आहे.

प्रत्येक काण्डाच्या मंगलाचरणांत श्रीरामवंदन आहे तसेंच कांहीं तरी हेतूनें शंकरासहि मंगलाचरणश्लोकांत वंदन आहे. सुन्दरकाण्ड मंगलचरणांतच फक्त शिव-वंदन नाहीं. तेथें हनुमंतास वंदन करून या युक्तीनें हनुमान शिवावतार असल्याचें सुचविलें आहे. बाल, अयोध्या व अरण्य या कांडांत तर शिववंदन श्लोक रामवंदनापूर्वी आहेत! शिवभक्तांनीं (शैवांनीं) केलेलें शिववर्णन बाजूस ठेवलें तरीसुद्धां इतर वचनांनीं मानसांत राम-शिव-अभेद दाखविला आहे.

(१) भवानी माया शिव भगवान :—

तुम्हि माया भगवान शिव सकल-विश्वपितृमाय।
निघति नमुनि मुनि शिरपदीं। ...' (१।८१)

असें *सप्तर्षी पार्वतीला म्हणाले.*

'राम तुम्हि जगदीश माया जानकी। (२।१२६ छं.)

(२) 'प्रेरक तुम्हि *सर्वांतरीं* द्या आशि मति रामास।' (२।४४) हें दशरथ-वचन आहे.

(क) ***विधि वदले प्रभु! अंतर्यामी।* तदपि भक्तिवश विनवूं स्वामी॥'**
(१।८८।८)

हें ब्रह्मदेव *शंकरांस म्हणाले.* 'प्रेरक *हृदिं* रघुवंशविभूषण', '*राम* सूत्रधर *अन्तर्यामी*', *हृदयस्थ* प्रेरक, *अन्तर्यामी दोघेहि.*

(३) '*चिदानंद सुखधाम* शिव *विगतमोहमदकाम*।' (१।७५), 'वन्दे *बोधमयं नित्यम्*' (बाल मं. श्लो. ३) 'विशुद्ध-*बोधविग्रहम्*' (३।४।५) 'शुद्ध सच्चिदानन्दमय', 'सुखधाम राम'.

(४) **'वरदाता *प्रणतार्तिविभंजन। कृपासिंधु* सेवकमनरंजन** (१।७०।७) असे शिव आहेत. '*प्रणतार्तिभंजन* पण माझा।' (६।९४।१) असें श्रीरघुवीरच म्हणाले आहेत. '*कृपासिंधु* बहुपरिं समजावति॥' (२।८३।४).

(५) '*चरितासिंधु गिरिजारमण* वेद न पावति पार।' (१।१०३।–), '*चरितसिंधु रघुनायक* ठाव किं पावे कोणि।' (७।१२३ म).

(६) 'श्रुतिमार्गा मम होईल खंडन।' (७।१०७।४) असें म्हणून महेशांनीं

त्या शूद्रास शाप देऊन दंड केला. म्हणजे *शंकर श्रुतिसेतुपालक ठरले*; ' श्रुतिसेतु-पालक राम ' (२।१२६ छं.)

(७) ' नील सरोरुह नीलमणि नील नीरधर शाम । ' (१।१४६) असें रामरूपाचें वर्णन आहे. या तीन उपमांनीं सुचविलेले सर्व गुण शंकरांच्या ठिकाणीं अशाच तीन उपमांनीं दाखविले आहेत— ' कुन्द-इन्दु-दर-गौर सुन्दर । ' (उत्तर मं. श्लो. ३)

(८) ' खलानां दण्डकृत् ······ शंकरः ' (लंका. मं. श्लो. ३) ' खलखंडन ' (६।१११।११) राम आहेत.

(९) ' जटा मुकुट···लोचन नलिन विशाला । लावण्यनिधि '(१।१०६।–) सर्व, सर्वगत (व्यापक) सुरवरः, सर्वाधिपः, शशिनिभः इत्यादि शतशः विशेषणें राम आणि शिव यांच्या वर्णनांत सारखीं आहेत.

सूचना — वरील तुलनेंत बालकांडांत सतीनें किंवा पार्वतीनें केलेल्या व उत्तर-कांडांत शिवभक्त विप्रानें केलेल्या वर्णनांतील एकहि वचन घेतलेलें नाहीं !

२. सगुण साकार शिवाचें ध्यानयोग्य वर्णन

यस्यांके च विभाति भूधरसुता देवापगा मस्तके ।
भाले बालविधुर्गले च गरलं यस्योरसि व्यालराट् ॥
सोऽयं भूतिविभूषणः सुरवरः सर्वाधिपः सर्वदा ।
शर्वः सर्वगतः शिवः शशिनिभः श्रीशंकरः पातु माम् ॥

(अयोध्या मं. श्लो. १)

३. शिवचरित्र – (१) श्रीरामचरितमानसाची मूळ रचना शंकरांनींच केली. श्रीतुलसीदास शंकरांनाच गुरु, पिता, माता, इत्यादि मानतात. हिंदींत रामचरित लिहिण्यास शंकरच प्रेरक झाले. शंकरांच्या कृपेचें फळ म्हणजेच श्री ' रामचरितमानस कवि तुलसी '.

(२) सतीमोहप्रकरणांत शंकरच मुख्य नायक आहेत. पुढें ८७ हजार वर्षें समाधि, सतीदेहत्याग, पार्वतीतपश्चर्या, सतीमरणानंतरची शिवमनःस्थिति, पार्वतीशीं विवाह करण्यास तयार झाले ते रामविनंतीनें, पुन्हां समाधि, कामदहन, रतिवरदान. पार्वतीशीं विवाह, षण्मुखजन्म आणि पार्वतीचे कांहीं प्रश्न व त्यांचें समाधान सर्व शिवचरित्र बाल. दो. ४३ पासून १८३ पर्यंत आहे असें म्हटलें तरी चालेल.

(३) त्यानंतरसुद्धां देवांच्या सभेंत शंकरांनीं सल्ला दिला आहे व त्याप्रमाणेंच ब्रह्मदेवानें प्रभूला प्रार्थना केली आहे. (१।१८५।४-८). (क) रामजन्म झाल्यावर शंकर भुशुंडीसह विप्ररूपानें रामदर्शनास आले आहेत. नंतर बालवायसरूपानें काकभुशुंडीबरोबर ४।५ वर्षें अयोध्येंत राहिले आहेत. (गूढार्थचंद्रिका पाहा.) श्रीरघुवीरविवाहांत उमेसह हजर आहेत व देवांना हितोपदेश केला आहे.

(४) किष्किंधाकाण्डांत कपिसैन्य आलें तें शिवजींनीं पाहिलें आहे. लंकाकांडांत

रामरावणयुद्ध पाहण्यास अंतरिक्षांत हजर आहेतच; आणि रावणवधानंतर जवळ येऊन स्तुति केली आहे. उत्तरकाण्डांत रामराज्याभिषेकाच्या वेळीं प्रगट रूपानें येऊन स्तुति केली आहे.

(५) उत्तर. दो. ५२ पासून अखेरपर्यंत पुनःपुन्हां शंकरांचा संबंध आहेच. काकभुशुंडीकथेंत शूद्रचरित्रांत शिवजींनीं त्यास घोर शाप दिला आहे. शिवभक्त विप्र-गुरूनें रुद्राष्टकानें स्तुति व शिवाय प्रार्थना केल्यावर त्या विप्राला वर दिला आहे व त्याच्या प्रार्थनेनें विप्र-गुरु-विष्णुद्रोही शूद्रावर कृपेची अपार वृष्टि केली आहे.

(६) जेथें रामभक्तीचा मुख्य सिद्धान्त, किंवा रामस्वभावाचें कांहीं वैशिष्ट्य वा चरित्रांतील कांहीं रहस्य सांगावयाचें असेल तेथें श्रीरामभूपप्रिय शंकर वक्ते आहेतच ! अयोध्याकांडांतच शिवजी फारसे दिसत नाहींत. ग्रंथाच्या उपसंहारांत दो. १२६।१ पासून १२९ पर्यंत शिवजी असून त्यांनीं अनेक सिद्धान्त सांगितले आहेत.

३. श्रीरघुनाथच शिवमहिमा सांगतात. (१) श्रीराममुखानेंहि राम-शिव अभेद अगदीं स्पष्ट सांगितला आहे :—

‘ स्थापुनि लिंग सविधि कृत पूजा । प्रिय मज शिवसम नाहीं दूजा ॥
शिवद्रोहि मम भक्त म्हणवतो । स्वप्निंहि तो नर मज न पावतो ॥
शंकर-विमुख भक्ति मम वांछति । तो हि नारकी मूढ अल्पमति ॥
दो०— मद्द्रोही प्रिय शंभु ज्यां शिवद्रोहि मम दास ।
ते नर करती कल्पभर नरकीं घोर निवास ॥ ’ (६।२।६-८ व दो.)

शिवपुराण ज्ञानसंहितेंत अध्याय ५ मध्यें शिवानें विष्णूला हाच सिद्धान्त सांगितला आहे.

(क) (बालकांडांत) नारदांनीं अभिमानानें शंकरांचा थोडा अपमान केला, त्यांच्या उपदेशाचा तिरस्कार केला म्हणून प्रभूंनीं आपल्या मायेचा सपाटा दाखवून नारदाची फटफजीती केली आणि नारदास मायामुक्त केल्यावर शंकरशतनामाचा जप करण्याचें प्रायश्चित सांगितलें व बजावलें,

‘ प्रिय शिवसम मजला नाहिं कोणी । ही प्रतीति सोडा न चुकोनी ॥
कृपा पुरारि न करिति जयासी । भक्तिलाभ मम मुनि ! न तयासी ॥ ’ (१।१३८।६-७)

(ख) पुन्हां उत्तरकाण्डांत सांगतात,

‘ अन्य गुप्त मत एक तें कथितों जोडुनि हात ॥
शंकर-भजन विना नर भक्ति न मम लभतात ॥ ’ (७।४५)

४. इतर कांहींचें मत (१) याज्ञवल्क्य भरद्वाजास सांगतात, (१।१०४।४-६ व पुढें)

‘ अहो ! धन्य तव जन्म मुनीश्वर । तुम्हां प्राणसे प्रिय गौरीश्वर ॥
शिवपद-कमलीं रति ना ज्यांसी । ते स्वप्निंहि ना प्रिय रामासी ॥
विश्वनाथ पदिं प्रेम छलाविण । हेंच रामभक्ताचें लक्षण ॥ ’

(२) **बाल. मंगलाचरणांतच** ' वन्दे बोधमयं नित्यं *गुरुं शंकररूपिणम् ।* ' असें म्हटलें आहे.

(३) काशींत मरणारांस राममंत्रोपदेशानें सायुज्यमुक्तिदाते म्हणून अनेक ठिकाणीं वर्णन आहे.

५. स्वामिसखा सेवक सियपतिचे (सिय = सीता) (१।१५।४). (१) बालकांडांत वंदन प्रकरणांतच वरील सिद्धान्त सांगून रामशिव-अभेदाचें सारसर्वस्व दाखविलें आहे. श्रीरघुनाथ शिवपार्थिव पूजा नित्य नियमानें करतात म्हणजे शंकर सीतापतिरामाचे स्वामी आहेत. रामेश्वराची स्थापना करून यथाविधि पूजा केली आहे. शंकर रामभजन, रामनामजप, रामकथाश्रवण, रामस्तुति इत्यादि करतात 'म्हणजे शंकर रामसेवक आहेत. ' रामं कामारिसेव्यम् ' दोघे भेटले म्हणजे सख्यभावानें वागतात म्हणून सखा आहेत.

(क) शिवपुराणांतील उल्लेख पाहा :—

' इक्ष्वाकुश्चापि मान्धाता सगरो नहुषस्तथा ।
दिलीपश्चैव तत्पुत्रो, *राजा दशरथस्तथा ॥* '

इत्यादि शिवपूजन करीत असत व

' कौसल्या पार्थिवांश्चक्रे **ऋष्यादिष्टा स्वयं सती ।**
रामश्चैव तथा नित्यं पार्थिवान् समपूजयत् ॥
तद्वंशे ये समुत्पन्नास्ते ते शिवमपूजयन् । '

(ज्ञानसंहिता अ० ६२ श्लो. ८-१२ पाहा.)

६. राम-शिव-अभेद शास्त्रसंमत. श्रीगोस्वामींनीं हें सर्व हेतुपूर्वक किंवा कपोल-कल्पित लिहिलें असें नाहीं. ' नानापुराणनिगमागमसंमत ' असलेलाच रामशिव (शिव—विष्णु) अभेद त्यांनीं स्पष्ट केला.

(१) **पद्मपुराण** उत्तरखंड अध्याय २७० मध्यें श्रीरामराज्याभिषेकाच्या वेळीं शंकर प्रगटरूपानें आले व त्यांनीं त्या दरबारांतच रामसीता यांची स्तुति केली; तिच्यांतच शंकरांनीं राम-शिव अभेद स्पष्ट बोलून दाखविला आहे.

' सीता देवी च रुद्राणी भवान् रुद्रो महाबलः ।
सीता देवी महाकाली महाकालो भवान् सदा ॥
सीता लक्ष्मीर्भवान् विष्णुः सीता गौरी भवान् शिवः । '

इ., ही सर्व स्तुति उत्तर कांडाच्या टीका परिशिष्टांत दिलेली पाहावी.

(२) **ब्रह्मपुराण** अध्याय १२३ मध्यें श्रीरामानें शंकरांची स्तुति केली आहे.

कृताञ्जलिपुटो भूत्वा रामस्तुष्टाव शंकरम् ॥
रामउवाच ' नमामि शंभुं पुरुषं पुराणं नमामि सर्वज्ञमपारभावम् । '

इत्यादि श्लोक १९५-२०६ पाहा. (क) त्या ब्रह्मपुराणांतच अध्याय २२६ मध्यें महेश्वर म्हणतात,

' कर्मपाशनिबद्धानां नराणां दुःखभागिनाम् ।
नान्योपायं प्रपश्यामि वासुदेवात्परं द्विजाः ' ॥ ७ ॥

(३) **शिवपुराणांत** स्पष्ट उल्लेख आहे कीं ब्रह्मा विष्णु आणि महेश यांत भेद नाहीं.

' एते परस्परोत्पन्ना धारयन्ति परस्परम् ।
परस्परेण वर्धन्ते परस्परमनुव्रताः ॥
क्वचिद्ब्रह्मा क्वचिद् विष्णुः क्वचिद् रुद्रः प्रशस्यते ।
नात्रैव तेषामाधिक्यं ऐश्वर्यं चातिरिच्यते ॥
अयं परस्त्वयं नेति संरम्भाभिनिवेशिनः ।
यातुधाना भवन्त्येव पिशाचा वा न संशयः ॥ '

या तिघांत अमुक श्रेष्ठ अमुक कनिष्ठ वगैरे भेद मानणारे राक्षस किंवा पिशाच योनींत जन्मास जातील यांत संशय नाहीं.

(४) **स्कंदपुराणांत** रामेश्वरस्थापनावर्णनांत शंकर म्हणाले कीं मी ' बहुव्रीहिः रामेश्वर आहें ', राम म्हणाले कीं ' रामेश्वर षष्ठीतत्पुरुष आहे ' व सर्व मुनि म्हणाले कीं, ' रामेश्वर कर्मधारय समास आहे. ' याचेंच सार ' स्वामिसखासेवक सियपतिचे ' (१।१५।४) यानें मानसांत सांगितलें आहे. (क) श्रीमद्भागवतांतही शिवविष्णु अभेदच प्रतिपादित आहे.

७. असें असून श्रीगोस्वामीजींचे कांहीं सांप्रदायिक म्हणतात कीं सीतेनें केलेलें भवानीपूजन व श्रीरघुनाथानें केलेलें पार्थिवपूजनादि मानसांत प्रक्षिप्त असलें पाहिजे ! कोणी शैव म्हणतात कीं शिवद्रोह वाढविण्यासाठीं गोस्वामींनीं सतीमोह वगैरे कथा कपोलकल्पित लिहिल्या; तर कोणी म्हणतात ते प्रच्छन्न शैव होते ! हा सर्व सांप्रदायिक दुरभिमानाचा व अज्ञानमोहान्धतेचा आत्मघातकी महा घोर परिणाम आहे. या सर्व आक्षेपांचा यथोचित समाचार गूढार्थचंद्रिकेंत घेतला आहे.

मानसांत देवीची उपासना व गणपतीची उपासना यांविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत, पंचायतन पूजेचेंहि वर्णन आहे.

मानसांतील *दार्शनिक सिद्धान्त* हें नववें मुख्य प्रकरण आणि त्यांतलें दहावें प्रकरण रामशिव–अभेद येथें समाप्त झालें. आतां ज्ञानोत्तरभक्तीचीं म्हणजेच भवतरणाचीं साधनें कोणतीं याचा विचार करणें जरूर आहे.

१०. भवतरणोपाय-श्रीरामभक्तिमार्गानें ज्ञान व प्रेमभक्ति यांची प्राप्ति होऊन भवसागर तरून जाणें सुलभ आहे हें मागल्या प्रकरणाचें सार आहे. आतां या मार्गातील मानसोक्त विविध साधनें कोणतीं हें पाहावयाचें आहे. अविद्याजनित पंचक्लेशांचा संहार झाल्या-शिवाय सुखप्राप्ति (भवतरण) नाहीं; म्हणून प्रथम *पंचक्लेशनिवारक कोण* तें पाहूं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।१ 卐 卐 卐

पंचक्लेशनिवारक

(१) श्रीरामवल्लभा सीता —

' उद्भवस्थितिसंहारकारिणीं क्लेशहारिणीम् ।

सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥ ' (बाल. मं. श्लो. ५)

आधीं क्लेशनिवारण करून मग सर्वश्रेय करते म्हणजेच भवसागरांतून तारते. सीता = ब्रह्मविद्या, आणि रामवल्लभा = रामभक्ति हें पूर्वी दाखविलें आहे.

(२) साधुसमाज — ब्रह्मविद्या व भक्ति मिळविण्याचें स्थान संतसमाज, संतसमागम हें आहे; म्हणून त्याचाच उल्लेख मानसांत नंतर केला आहे.

सकल – सुलभ सब दिन सब देशां सादर सेवत शमवी क्लेशां ॥

अकथ अलौकिक तीर्थराज हा । उघडा महिमा सद्य फलद हा ॥

(१।२।१२–१३)

साधु समाजाला तीर्थराज प्रयाग म्हटलें आहे. साधु कसे असतात हें भरतचरित्रानें सविस्तर दाखविलें आहे म्हणून,

(३) भरताचरण —

भरताचरण पुनीत परम ही । मधुर मंजु मुद–मंगलकरही ॥

हरण कठिण कलिकलुषें क्लेशाहि । महामोह–तामि–दलन–दिनेशाहि ॥

(२।३२६।५-६)

ज्या संतांच्या संगतीनें क्लेशनिवारण होतें त्यांचें आचरण कसें असावें हें भरताच्या उदाहरणानें दाखविलें आहे. अशा परम पुनीत आचरणी संतांच्या संगतीनें कठिण कलिकलुषांचा–पापांचा विनाश होतो; मग महामोहरूपी तमी–रात्री–चें दलन म्हणजे संहार होतो व पंचक्लेशांचा (अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश) विनाश होतो; पण तेथें —

(४) हरिभजन केलें पाहिजे — म्हणून क्लेशनिवारक भरताचरणानंतर हरिभजनाचा उल्लेख सांपडतो.

उगवति सोळा पूर्ण शशि तारागण-समुदाय ।

सकल गिरिंस दव लाविला रविविण रात्र न जाय ॥ (७।७८ म)

' हरिभजनाविण तसा खगेशा । नाश नव्हे जिवांचे क्लेशां ॥ १ ॥

म्हणून भरतासारख्या संतांच्या संगतींत राहून हरिभजन केलें पाहिजे.

व्यापि न हरि सेवकां अविद्या व्यापी प्रभुंनीं प्रेरित विद्या ।

(५) भुशुंडी आपला अनेक जन्मांतील अनुभव सांगतात,

'**अतां स्वानुभव सांगु खगेशा !**। *बिण हरिभजन नाश क्लेशां ना*' (७।८९।५) *येथें गुरुप्रचीति सांगितली, मागील वचनांस शास्त्रप्रचीति* सांगितली.

(६) **श्रीरामचरित्रश्रवण —**

'**प्रथम***जन्मचरिता* **अतां ऐका सांगु खगेश ।**

श्रवणें **प्रभुपदिं होइ रति तेणें** *टळती क्लेश* ॥ (७।९६।–)

जेथें हें वचन आहे तेथें 'प्रथमजन्मचरित' म्हणजे भुशुंडीच्या पहिल्या जन्माचें चरित्र असा अर्थ आहे; पण शब्दरचना अशी मार्मिक आहे कीं क्लेशनिवारक प्रकरणांत तें वचन जसेंच्या तसें सुसंबद्ध बसलें !) हरिभजन कोणतें हें येथें सांगितलें. संतांच्या संगतींत राहून नंतर प्रथम श्रीरामजन्मादिचरित्राचें श्रवण करावें; म्हणजे पूर्वी (परिच्छेद ३ मध्यें) सांगितलेलें फल (मोहनाश = ज्ञान) मिळेल व प्रभुपदरतिरूपी रस ११३७।१४ पाहा.) म्हणजे प्रेमभक्ति उत्पन्न होऊन क्लेशनिवारण होईल. परंतु—

(७) **गुरुकृपा व शिवकृपा झाली पाहिजे —**

'**मी कृतार्थ झाल्यें अतां** *कृपें तवहि विश्वेश* ।

रामभक्ति दृढ उपजली *गेले सगळे क्लेश* ॥' (७।१२९।–)

उमा महेशांस सांगते कीं श्रीरामचरित तुमच्या मुखानें श्रवण करून तुमच्या कृपेनेंच कृतार्थ झालें; म्हणजेच दृढ रामभक्ति उपजली आणि सगळे क्लेश गेले. बालकांडांत उमेनें म्हटलें आहे कीं 'त्रिभुवन*गुरु तुम्हि*' (१।१११।५) गुरुमुखानें श्रीरामचरित्र श्रवण करीत असतां जेव्हां **शिवकृपा होऊन गुरुकृपा होईल तेव्हांच दृढरामभक्तिलाभ होईल व पंचक्लेश टळतील.**

'**कृपा पुरारि न करिति जयासी । भक्तिलाभ मम मुनि ! न तयासी** ॥ (१।१३८।७) असें प्रभुवचन आहे. त्याचाहि सुंदर समन्वय येथें झाला. (क) कृतार्थ होणें म्हणजे काय हें पण येथें सांगितलें. पंचक्लेश नष्ट झाले, दृढरामभक्ति उपजली म्हणजेच जीव कृतार्थ होतो. (ख) येथें शिष्यश्रोत्यानें स्वानुभव म्हणजे **आत्मप्रचीति सांगितली.** गुरुकृपा केव्हां होते हें आतां अगदीं शेवटीं सांगतात,

(८) **श्रीरघुवर कृपा —**

पांच सात चौपाया मनोहर जाणुनी नर उरिं धरी ।

दारुण अविद्यापंचजनित विकार श्रीरघुवर हरी ॥ (७।१३०। छं. २)

दारुण अविद्यापंच = अविद्यादि दारुण पंचक्लेश श्रीरघुवर हरण करतात. ५ + ७ = १२ मनोहर चौपाया (बाल. दो. १९९ च्या अंगभूत असलेल्या) जो मनुष्य हृदयांत धारण करील त्याचे सर्व (पंच) क्लेश आणि त्यांपासून होणारे विकार श्रीरघुवर हरण करतात. येथें रामरूपाचें ध्यान सुचविलें आहे. हें रघुवरकृपाप्राप्तीचें सोपें साधन सुचविलें आहे. रघुवरानें कृपा केली तरच सद्गुरुकृपा होते. रघुवरकृपेनेंच संतदर्शन—

समागमादि सर्व योग जुळतात. (क) प्रारंभीं सीता रामवल्लभा व शेवटीं श्रीरघुवर असा उल्लेख केला. दोघांपैकीं एकच कांहीं करूं शकत नाहीं; दोघांच्यामुळें सर्व होतें, म्हणून सीता-रामवल्लभा आरंभीं म्हटलें व श्री (= सीता) रघुवर असें शेवटीं म्हटलें.

ल. ठे. — क्लेश (कलेस, कलेसा, कलेसु व कलेसू) शब्द असलेलीं एकंदर २५ वचनें मानसांत आहेत पण त्यांतील १८ ठिकाणीं क्लेश = अविद्यादिपंचक्लेश हा अर्थ नसून कष्ट, श्रम, पीडा हा साधा व्यावहारिक अर्थ आहे. पंचक्लेश या अर्थाचे क्लेश शब्द असलेलीं ७ वचनेंच आहेत व एकांत *अविद्यापंच* असा क्लेशचा अर्थ आहे; एकूण हीं ८ वचनेंच आहेत. (बालकांडांत २, अयोध्याकांडांत १ व उत्तरकांडांत ५) तीं ज्या क्रमानें मानसांत आहेत त्याच क्रमानें येथें घेतलीं आहेत. उपक्रमोपसंहारयुक्त व सुसंगत असा एक स्वतंत्र विषय या वचनांतून सहज सिद्ध झाला; यांत विविध प्रचीतियुक्त मुख्य साधनसाध्य परंपराहि दाखविली आहे ! अशा प्रकारची अद्भुत रचना दुसऱ्या एखाद्या ग्रंथांत आहे काय ? पंचक्लेशनिवारक कोण कोण आहेत इतकेंच दाखविण्याच्या हेतूनें प्रस्तावनापूर्वतयारींत हीं वचनेंच फक्त एका पृष्ठावर लिहिलेलीं आहेत. त्यांतून असा सुसंबद्ध विषय बाहेर पडेल ही कल्पनाच आज (२३।४।५६) लेखनारंभापर्यंत नव्हती ! **ज्याची कथा तोच करी। बोलविता राम हरि ।। हेंच खरें.**

संतसंगतींत श्रीरामचरितमानस श्रवण हें मुख्य साधन असलें तरी आणखी पुष्कळ भवतरणोपाय प्रत्येक सोपानांत सांगितले आहेत. त्यांतील कांहीं अगदीं सोपे आहेत त्यांस *भवसागरसेतु* असें नांव दिलें आहे; तेच पुढल्या प्रकरणांत आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।२ 卐 卐 卐

भवसागर-सेतु

(१) **रामनाम — राम भल्लकपिकटक जमवती । श्रम सेतूस्तव अल्प न करती ।।**
नाम घेत सुकतो भवसागर । (१।२५।३–४)

(२) **रामचरित्र — शुद्ध सच्चिदानन्दमय – कंद भानुकुलकेतु ।**
मनुज सदृश करिती *चरित संसृतिसागरसेतु* ।। (२।८७)

(३) **रामनाम — एकवार *यन्नामा* स्मरती । नर अपार भवसागर तरती ।।** (२।१०१।३)

(४) **श्रीरघुनाथ — अतिनागर *भवसागर सेतुः* ।**
त्रातु सदा दिनकरकुलकेतुः ।। (३।११।१४)

(५) **रामनाम — पापिहि ज्यांच्या नामा स्मरती ।**
अति अपार भवसागर तरती ।। (४।२९।३)

(६) **रघुनायकगुणगान-श्रवण — सकल सुमंगल-दायक *रघुनायकगुणगान* ।**
सादर ऐकति *तरति ते भवनिधि विणजलयान* ।। (५।६०।–)

(७) **रामनाम — नाथ ! *नाम तव सेतु* चढुनी भवनिधि तरति नर** । (६ मं. सो.

सूचना — २, ३, ५ यांत 'तरति' म्हटलें पण कसे तें सांगितलें नव्हतें, तें '*जलयानविण*' = नौकेशिवाय असें ६ व्यांत सांगितलें; आणि नौकेशिवाय म्हणजे *सेतु चढुनी* हें ७ व्यांत सांगून सुचविलें कीं २, ३, ५, ६ सेतुच आहेत.

(८) **रामेश्वरसेतुदर्शन —**

'**मम कृत सेतु-दर्शना करतिल । ते अश्रम भवसागर तरतिल** ॥ (६।३।४)
परंतु तो सेतु सध्यां अस्तित्वांत नाहीं म्हणून हा भवसागरसेतु या युगांत नाहीं.

(९) **हरिभक्ति — हरिं नरा भजन्ति येऽतिदुस्तरं तरन्ति ते** ॥ (७।१२२)
अतिदुस्तर = भवसागर.

वरील नऊ अवतरणांकडे पाहिल्यास दिसतें कीं (क) प्रत्येक सोपानांत सेतु आहे. (ख) राम, रामनाम, रामचरित्रश्रवण, रामगुणगानश्रवण, भक्ति आणि रामेश्वरसेतुदर्शन हे सर्व सेतु असल्यानें समान आहेत. (ग) तथापि या सहा प्रकारांत नामाला अधिक महत्त्व दिलें आहे; कारण कीं पहिल्यानेंच श्रीरघुनाथापेक्षां रामनामाचें महत्त्व अधिक हें दाखविलें आहे, आणि पुढें तीन वेळां रामनामसेतु दाखविला. सर्व स्वानुभवी संतांचा अनुभव असाच आहे.

यांहूनसुद्धां सोपें साधन–भवतरणोपाय पुढील प्रकरणांत आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।३ 卐 卐 卐

भवतारक श्रीअयोध्यापुरी

१. '**वंदुं अयोध्यापुरी *सुपावनि*** ' (१।१६।१)

२. *रामधामदा पुरी* **सुशोभन । लोकीं सकल विदित अतिपावन** ॥
अमित जीव जगिं खाणीं चारी । *त्याजि तनु अवधिं, नये संसारीं* ।।
......**सकल सिद्धिदा सुमंगलाकर** (१।३५।३-५) अवधिं = अयोध्येंत.

(क) *त्रिविध ताप भवरोग-विनाशनि* । (६।१२०।९)

३. श्रीरघुवीर (उत्तरकांडांत) सुग्रीवादिकांस सांगतात,
'**यदपि सकल** *वैकुंठा वानाति* । **वेदपुराण विदित जगिं जाणाति** ॥ ३ ॥
प्रिय न अयोध्येसम **मज** *तेंहीं* । **या मर्मा विरळा जाणे हीं** ॥ ४ ॥
जन्मभूमि मम पुरी सुशोभन । शरयु उत्तरे वाहे पावन ॥ ५ ॥
तीच्या स्नानें विना प्रयासा । ममसमीप नर पावे वासा ॥ ॥ ६ ॥
प्रिय अति मज येथले निवासी । *ममधामदा पुरी सुखरासी* ॥ ७ ॥

४. भुशुंडी आपल्या पूर्वजन्मांतील इतिहास सांगतांना म्हणतो,
'**जरि वसलों रघुपति-नृपधानीं । तरि न तदा ये महिमा ध्यानीं** ॥

अतां अयोध्या-प्रभाव अवगत । हा निगमागम पुराण सांगत ॥

जन्मि कुण्याहि वसे कोशलपुरिं । रामपरायण तो होइल **तरि** ॥

जीव अयोध्या-प्रभाव जाणति । जैं उरिं राम धनर्धुर राहति ॥ (७।९४।४-७)

ज्यानें कोणत्याही जन्मांत कांहीं काळ अयोध्येंत वास केला असेल तो पुढें रामपरायण होतो, व राम धनुर्धर हृदयांत वास करतात.

५. *रघुपतिपुरीं जन्म* **तव झाला । मम भजनीं लाविलें मनाला** ॥

अनुग्रहें मम *पुरी-प्रभावें । रामभक्ति* **तव** *हृदयिं उद्भवे* ॥ (७।१०९।९-१०)

असें महाकाल शिवांनीं उज्जयिनींत आकाशवाणीनें सांगितलें. अयोध्यापुरीच्या प्रभावानें रामभक्ति उद्भवते पण शंकरांचा अनुग्रह लागतोच. (७।४५ पाहा).

◆◆◆◆

卐 卐 卐 १०१४ 卐 卐 卐

भवरोगहारक औषधी

दोषनिवारण करून रोगहरण करणाऱ्या औषधांत चूर्ण, मुळी, अमृत, अंजन, रस इत्यादि विविध प्रकार असतात. तसेच मायाजनित त्रिदोष व त्यांचें मूळ यांचा विनाश करून भवरोगहरण करणारीं विविध औषधें मानसांत आहेत.

१. **अमृत मुळीमय चूर्ण** — गुरुपदरज

वन्दे *गुरुपदपद्मपरागा* । सुरुचि सुवास सरस अनुरागा ॥

***अमृतमुळीमय चूर्ण* सुचारू । शमन सकल भवरुज परिवारू** ॥ (१।१।१-२)

श्रीसद्गुरुचरणरज हें अमृतमुळीचें सुंदर, रुचिकर, सुवासिक, स-रस व प्रीति उत्पन्न करणारें चूर्ण आहे; तें भवरोगाच्या सर्व परिवाराचें व भवरोगाचें निर्मूलन कर यांचा विनाश करणारा तो शमन = यमराजच आहे. *शमनो यमराड् यमः* (अमर).

२. **अंजन – नयनामृत; गुरुपदरज–अंजन**

***गुरुपदरज* मृदु मंजुल *अंजन* । *नयनामृत* दृग्-दोषविभंजन** ॥

तत्कृत विमल विवेकविलोचन । ' (१।२।१-२)

श्रीगुरुपदरज-अंजन नयनामृत आहे. यानें ज्ञानरूपी नेत्र निर्मल होतो व भेददृष्टि, द्वैतदृष्टि, दोषदृष्टि इत्यादि दृष्टिदोष नष्ट होतात. एका नेत्ररोगांत दोन चंद्र, दोन सूर्य इत्यादि सर्व दोन दोन दिसतें.

३. **प्रकाश** – तेज, **श्रीगुरुपदनखप्रकाश**. रोग बरे करण्यास विविध प्रकाशांचासुद्धां उपयोग होतो, हें आधुनिक रोगचिकित्सकांस विचारून पाहावें.

***श्रीगुरुपदनख-मणिगण जोती* । स्मरतां *दिव्यदृष्टि* हृदिं होती** ॥

दलन मोहतम सुप्रकाश तो । महाभाग्य ज्या हृदयीं पडतो ॥

हृदय-विलोचन विमल उघडती । दुःखदोष भवशार्वर झडती ॥ (१।१।५-७)

श्रीगुरुचरणनखें दहा मणि आहेत; त्यांचा प्रकाश हृदयांत पडला कीं '*ज्ञानविराग नयन* उरगारी (७।१२०।४); ज्ञानविराग हे हृदयांतील उरगांचे अरि आहेत; ते उघडतात, हृदयांत शिरलेल्या (उरग) अज्ञान-मोह-काम-क्रोधादिकांचे शत्रु आहेत. त्यांनीं भवरूपी रात्रींतील (= शार्वर) दुःख दोष नष्ट होतात.

४. **विमल-विभूती** – (अंगारा)– गुरुपदधूलि. मांत्रिकानें दिलेल्या विभूतीनें कांहीं रोग नष्ट होतात.

'**सुकृति शंभुतनु *विमलविभूती* । मंजुल मुदमंगला प्रसूती** ॥ (१।१।३) श्रीगुरुचरणांची धूळ ही सुंदर विमल विभूती आहे. तिनें सुंदर मोद व मंगल = कल्याण यांची उत्पत्ति होते.

५-६. सर्पमंत्र व सर्पमणि — रामगुणगण (१।३२।९) '*मंत्र, महामणि* विषयां व्यालां' सर्प चावला कीं मंत्रानें किंवा महामण्यानें (सर्पमण्यानें) विष उतरवतां येतें, म्हणून हीं दोन औषध झालीं. महामणि = सर्पमणि, नागाच्या डोक्या त असतो तो. यानें सर्पविष उतरतें.

अहि-अघ-अवगुण मणि ना ग्रहतो । हरि विष, दुःख अधनता ओ ॥ (२।१८४।८).

(**क**) सर्पमणि ही कविकल्पना नसून अगदीं अलीकडेसुद्धां एकानें पाहिलेला, असा दुर्लभ मणि आहे. १।३।१० च्या टीकेंत माहिती पाहावी. रामगुणगण सर्पमंत्र व सर्पमणि आहेत ते विषयरूपी सर्पांचें विष हरण करून, दुःखनाश करून दैवी संपत्ति देतात; व अज्ञानरूपी दारिद्र्य नाहींसें करतात. 'निकट मोहदारिद्र्य येत ना' (७।१२०।४).

७. रस—भक्तिरस (२।२०८) **हरिपदरतिरस** (१।३७।१४) त्रिभुवनकीर्तिरस, माणिकरस, रस-सिंदूर, सूतशेखर (रस), हेमगर्भरस इत्यादि अनेक रसौषधि असतात. (रस = पारा, सूत = पारा) या सर्व प्रकारच्या रससिद्ध औषधांस रसायनें म्हणतात. मानसांत रामभक्तिरस मुख्य आहे. यालाच हरिपदरतिरस म्हटलें आहे.

भरत तुम्हांस कलंक हा अम्हां जगा उपदेश ।
*रामभक्तिरस***सिद्धि-हित शुभ हा समय गणेश** ॥
'**हरिपदरति रस वेद वदे कल**' (१।३७।१४).

वरील दोह्यांत कलंक, रस, रससिद्धि इत्यादींचे २।२ अर्थ आहेत. यांत रसप्रक्रिया, रससिद्धि इत्यादींचें सुसंबद्ध वर्णन आहे. (गूढार्थ चंद्रिका पाहा.)

(**क**) रससिंदूर व माणिकरस **कफहारक** आहेत; *लोभ हा कफ आहे*. हेमगर्भ व समीरपन्नगरस **वातहारक** आहेत; *काम हा वात आहे*. या रसांनीं मोह = मूर्च्छा, हरण होते. सूतशेखररस **पित्तहारक** आहे; *क्रोध पित्त* आहे. (मानसरोग पाहा.) हे सर्व रोग, सर्व दोष भक्तिरससेवनानें बरे होतात. याप्रमाणें ही तुलना पुष्कळ वाढेल.

८. सबीज मंत्र — अनन्यशरण जाणें. (२।१८३।२) सबीज मंत्रांनीं कांहीं रोग

बरे होतात. सबीज महामृत्युंजय मंत्रानें ज्वर, पिशाचबाधा (=उन्माद) इत्यादि बरे होतात. २४ अक्षरी सबीज हनुमानमंत्रानें प्लीहारोग बरे होतात, इत्यादि पुष्कळ आहेत.

‘ एकचि निश्चित दिसे मनासी । कीं प्रभातिं चलणें प्रभुपासीं ।। ’

इत्यादि जें भरत म्हणाले, त्यांत प्रभुचरणीं शरण जाण्याचा निश्चय हाच सबीज मंत्र आहे.

भरतवचन सकलां प्रिय गमलें । रामस्नेहामृतिं पाकवलें ॥

लोक वियोग-*विषय-विषिं जळतां । जागाति मंत्र सबीज ऐकतां॥* (२।१८४।१-२)

पर्यंतची गूढार्थचंद्रिका पाहावी. २।१८३।२ या हिंदी चौपाईंत खरोखरच ए, आँ, इ इत्यादि बीजें भरून ठेवलेलीं आहेत. पुष्कळ प्रयत्न करूनसुद्धां आँ हें पाशबीज मराठींत घालतां आलें नाहीं. (भाषाभेद !)

‘ चलाच वनिं रामाकडे । भरत*मंत्र शुभ फार* । ’

हाच सबीज शुभ मंत्र आहे.

बाल व अयोध्याकांडांतील मुख्य औषधांचा विचार येथपर्यंत केला. आतां अरण्य-काण्डांत पथ्य व अनुपान सांगतात.

९. पथ्य व अनुपान — कित्येक रोगांना पथ्यपालन हेंच औषध असतें.

दीपशिखेसम युवतितनु होइ न मना पतंग ।
काममदां त्यज रामभज कर संतत सत्संग ॥ (३।४६ म)

स्त्रीदेहादिकांच्या चिंतनाचा आणि काममदांचा त्याग हें पथ्यपालन सांगितलें, राम-भजन हें औषध आहे आणि संतत सत्संग करणें हें अनुपान सर्वच औषधांना लागू पडतें; सर्व औषधांना पथ्य पण येथें सांगितलें तेंच.

१०. अमृत – रामनामामृत – संसारामयभेषज.

संसारामयभेषजं सुखकरं श्रीजानकीजीवनम् ।
धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम् ।।

(किष्किंधा. मं. श्लो. २)

या सर्व श्लोकांत अमृताची महती वर्णिली असून हें काण्डच नामपर आहे. सर्व सापानांत हें औषध आहेच. *अमृतारिष्ट* वगैरे वैद्यशास्त्रांत आहेत.

११. काढा, आसव **भवभेषज रघुनाथयश** — कांहीं औषधें अशीं असतात कीं कोणत्या रोगावर उपयोग करावा हें त्यांच्या नांवानेंच कळतें. उदा० — बाळंतकाढा, श्वासकुठार, कृमिकुठार, कासकुठार, ज्वरांकुश, महाज्वरांकुश, दद्रुगजकेसरी, वातविध्वंस इत्यादि, तसेंच *भवभेषज* नांवाचें हें प्रभावी औषध आहे.

***भवभेषज रघुनाथयश* जे ऐकति नरनारि ।**
त्यांचे सर्व मनोरथ सिद्ध करी त्रिपुरारि ।। (४।३० रा)

१२. दाहक्रिया – डाग देणें. लंकादहन. वात, कावीळ, आमांश (आंव) इत्यादि रोग औषधानें बरें होत नाहींत असें वाटलें कीं विशिष्ट ठिकाणीं दाहक्रिया केल्यानें (डाग दिल्यानें) बरे होण्याचा संभव असतो. वाताला कानशिलावर व टाळूवर, काविळीला मनगटाच्या मणिबंधाजवळ, आमांशाला बेंबीच्याखालीं पोटावर, इत्यादि प्रकारें डाग देतात. (क) हनुमन्तानें रावणास नामामृत घेण्याचा उपदेश केला, रघुनाथास शरण जा हा सबीज मंत्र उच्चारला; पण तो ऐकेना तेव्हां लंकादहन ही दाहक्रिया केली.

रामनामविण शोभे न गिरा । त्यजुनि मोह मद कर किं विचारा ।। (५।२३।३)
हा नामामृत घेण्याचा उपदेश केला. आणि

'मोहमूल बहु *शलद* **त्यागा तम** *अभिमान* ।
भजा राम रघुनायक कृपासिंधु भगवान ॥ ' (दो. २३)

हा सबीज मंत्र उच्चारला. तम = भ्रमतम (१।११५) वात झाला म्हणजे भ्रम उत्पन्न होतो. रावणास कामवात होऊन त्यांत भ्रम झाला त्यामुळें हा सबीज मंत्र त्याला जणूं ऐकूंच गेला नाहीं; तेव्हां **लंकादहनरूपी दाहक्रिया केली.** पण रावणाला अभिमान-अहंकाररूपी अर्बुद = कॅन्सर झाला आहे. ' अहंकार अर्बुद अति दुःखद ' (७।१२१।३५) हा रोग शस्त्रक्रियेनें-छेदन-(ऑपरेशन) केल्यानें कदाचित् बरा होतो.

१३. शस्त्रक्रिया — कॅन्सरची. लंकाकांडांत रावणानें दोन गोष्टींची वारंवार फुशारकी मारली आहे. आपल्या हातांनीं शिरकमळें काढून (कापून) तीं महेशांस अग्नींत समर्पण करणें आणि बाहूंनीं शंभुसहित कैलास उचलणें. म्हणूनच अंगद म्हणाला कीं,

' शिर-गिरि-कथा मनीं राहिली । वीस वेळ यास्तव गाइली ॥ ' (६।२९।७)

म्हणजेच त्याला डोक्यांत आणि बाहूंत कॅन्सर झाला आहे. या दोन गोष्टींचा व बाहुबळानें विश्व जिंकल्याचा अहंकार-कॅन्सर झाला आहे. एकदां शस्त्रक्रिया करून तो बरा होतोच असें नाहीं. म्हणूनच रघुवीरानें रावणाचीं शिरें आणि बाहू अनेक वार कापून टाकले तरी तो रोग बरा झाला नाहीं. तेव्हां,

१४. अमोघ रामबाण-भवहारक **सूचिक्रिया** (इन्जेक्शन)

' मनसंभव दारुणदोषहरं । ***मद*** मारमुधाममता ***शमनं*** । '

असे *मद* = अहंकाररूपी कॅन्सर रोग *शमन* करणारे सद्वैद्य रघुवीर असल्यानें (१।१३३।१–२ पाहा) शेवटीं रावणाच्या बेंबींत एक इंजेक्शन दिलें आणि मग ताबडतोब अखेरची शस्त्रक्रिया केली. ' सायक एक नाभिसर शोषी ' हेंच तें इंजेक्शन आणि ' दुजें लागलें भुज शिरिं रोषीं ' (६।१०३।१) डोक्यांतील व बाहूंतील कॅन्सरची *शस्त्रक्रिया पूर्ण यशस्वी झाली; पण रोगी मेला*. असें अनेक वेळां घडतें.

रघुवीर-शरतीर्थीं त्यजुनि तनु पावतिल गति निश्चितीं । (५।३ छं. ३)

म्हणजेच रघुवीराचा अमोघ बाण भवरोगहारक आहे. रावणास उत्तम गति दिली व त्याचा भवरोग नष्ट केला.

१५. भवरोग–महाऽगद — राम. स्वतः रामच भवमहारोगाचें महा अगद (औषध) आहेत.

‘ तव नाम जपामि नमामि हरी ! । *भवरोगमहाऽगद* **मान-अरी** ॥’ (७।१४।९) असें शंकरांनीं म्हटलें आहे.

१६. भूमिरोग-निवारक राम

‘ दशशीस-विनाशन वीस भुजा । *कृत दूरि महा महि भूरि रुजा* ॥ (७।१४।२) रुजा = रोग (अमर पाहा). दश शीर्षांचीं दहा शिरें व वीस बाहू यांचें खंडन करून रघुवीरानें महीला झालेला महा रोग (रुजा) दूर केला, असें शंभु म्हणाले.

१७. रामकथा–**सुधा**

‘ काढिति मथुनि *कथा-सुधा* **भक्तिमाधुरीमंत** ॥ (७।१२० म)

श्रुणु खगपति ही *कथा* **पावनी** । **त्रिविधताप** *भवभयनाशनी* ॥ (७।१५।१) सुधासिंधु, सुधारस इत्यादि औषधें असतातच.

१८. चिंतामणि रामभक्तिचिंतामणि सुंदर. त्रैलोक्यचिंतामणि नांवाची एक मात्रा असते. **‘ रामभक्तिचिंतामणि** सुंदर ’ (७।१२०।२) पासून पुढें पाहा.

रामभक्तिमणि ज्या उरिं राही । दुःखलेश **त्या स्वामिंहि नाहीं** ॥ (१२०।९)

‘ सब सुखदानि भक्तिमणि ’ (१२०।१५)

‘ भक्ति करित यत्नां विण कष्टा । *संसृतिमूल अविद्या* **नष्टा** ॥ (७।११९।८)

१९. रघुपतिभक्ति **मुळी संजीवनि**

सद्गुरुवैद्यवचनिं विश्वासहि । संयम हा कीं विषयाशा नहिं ॥

रघुपति-भक्तिमुळी संजीवनि । **अनुपाना श्रद्धा अति पावनि** ॥

सुखें याचपरिं रोग नाशती । **ना तर कोटि उपायिं न जाती** ॥ (७।१२२।६–८) येथें उपसंहार करतांना आणखी थोडें पथ्य सांगितलें व निराळें अनुपान सांगितलें. प्रकृतिभेदाप्रमाणें व दोषभेदाप्रमाणें पथ्य व अनुपान यांत बदल करावा लागतो.

२०. संजीवनि मुळी – रामकथा

संजीवनि-मुळि भवरोगा **ती** । *रामकथा* **श्रुतिसूरी गाती** ॥ (७।१२९।२) असें शिवजी म्हणाले.

२१. नाम-भवभेषज — यस्य *नाम-भवभेषज* **घोर** *हरी त्रयशूल* (७।१२४ रा) हें भुशुंडीवचन आहे.

यालाच पूर्वी (१० पाहा) संसारामयभेषज नामामृत म्हटलें, ही द्विरुक्ति नसून उपसंहाररूपानें प्रभाव वर्णिला आहे. अमृता = आवळकटी, अमृता = गुळवेल, हरीतकी = बाळहिरडा, अमृतं = यज्ञशेष, पीयूष, जल, तूप, अयाचितवृत्ति, व मोक्ष इतके

अर्थ आहेत. अमृत (पु०) धन्वन्तरि, देव; म्हणून संजीवनिमुळीं अनेक वर्णिल्या तरी बिचकण्याचें कारण नाहीं. *एकच नांव अनेक वनस्पतींना असतें याचें उदाहरण दिलेंच आहे.*

या वर्णनावरून एक गोष्ट निःसंशयपणें दिसून येते कीं तुलसीदासांनीं वैद्यशास्त्राचा सखोल अभ्यास केला असला पाहिजे. श्रीमानसोपलब्ध श्रीतुलसीचरित्रांत जें दाखविलें त्याला हा आणखी एक सबळ पुरावा आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।५ 卐 卐 卐

श्रीमानसांत एकादश गीता

१. मागील प्रकरणांत सांगितलेल्या औषधींचें प्रतिपादन उपदेशरूपानें अनेक स्थळीं केलें आहे; म्हणून त्यांस 'गीता' हें नांव देणें सयुक्तिक ठरतें. (क) उत्तर हिंदुस्थानांतील श्रीमानसभक्तांनीं फक्त तीन उपदेशांना 'गीता' हें नांव दिलें आहे. श्रीगोस्वामींनीं स्वतः हें नामकरण केल्याचा पुरावा नाहीं. श्रीरामानुज लक्ष्मणानें निषादराजास जो उपदेश केला त्यास *लक्ष्मण गीता* म्हणतात. श्रीरामानें लक्ष्मणास जो उपदेश केला त्यास *रामगीता म्हणतात*; आणि श्रीरघुनाथानें अयोध्यावासी लोकांस जो उपदेश केला त्यास *पुरजन गीता* म्हणतात.

या तीन उपदेशांप्रमाणेंच श्रीमानसांत आणखी पुष्कळ महत्त्वाचे उपदेश आहेत, व त्यांतही जीवाच्या परम हिताचा-परमार्थाचाच उपदेश केलेला आहे; म्हणून त्यांनाहि संदर्भानुसार विशेषनामें देणें जरूर आहे. अशा नामभेदानें संदर्भ सहज ध्यानीं येतो म्हणून या लेखांत हा नवीन उपक्रम केला गेला आहे. साती सोपानांत गीता आहेत. कांडानुक्रमानें त्यांचें नामकरण पुढें केलें आहे.

बालकांडांत (१) श्रीशिवगीता — 'ब्रह्म अगुण कां धरि वपु सगुणहि'। या पार्वतीच्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी शंकरांनीं जो उपदेश केला त्यांत ज्ञानभक्ति इत्यादि मुख्य सिद्धान्त आहेत. या भागास श्रीशिवगीता म्हणावें. 'अधिकारी नारी नाहीं जरि' पासून 'रघुपतिकथा वदावी सदया' पर्यंत अधिकारी-कथन आहे. ज्या शंकेचें समाधान करण्यासाठीं ही गीता सांगितली ती १।१०८।५ पासून १०९।२ पर्यंत आहे; व मुख्य उपदेश १।१११।५ नंतर सुरू होतो. १।१२०।३ मध्यें ही गीता समाप्त होते. हा उमाशंभुसंवाद आहे.

अयोध्याकांडांत (२) श्रीलक्ष्मण गीता — लक्ष्मणानें निषादराज गुहास जो उपदेश केला आहे त्यास हेंच नांव दिलेलें आहे व तें योग्य आहे. दो. ९१ पासून ९४।१ पर्यंत.

अरण्यकांडांत — सोळा उपदेश असले तरी गीता नांव देण्यासारखे तीन आहेत. हें काण्ड मायापुरी असल्यानें गीतांची संख्या जास्त आहे. (३) **पतिव्रतागीता** — अनसूयेनें सीतेला जो पतिव्रताधर्माचा सांगोपांग उपदेश केला आहे तो भाग (दो. ५।१–६।१) पतिव्रतागीता या नांवानें ओळखावा. (४) **श्रीरामगीता** — (१४।५–१७।१) लक्ष्मणाचे पांच प्रश्न व त्यांचें निरूपण या भागास श्रीरामगीता हें नांव प्रचलित आहे व तें योग्य आहे. (५) **शबरीगीता** — (३५।७–३६।७) यांत नवविधाभक्तिकथन आहे.

किष्किंधाकाण्ड — अवघें सुमारें ३९० ओळींचें आहे; त्यामुळें त्यांतील गीता नाम देण्यासारखा उपदेश चार ओळींचाच आहे; (२३।४–२३।७) पण त्यांत कर्म, ज्ञान व प्रेमभक्ति यांचें कथन साररूपानें क्रमशः केलेलें आहे. या भागास (६) **सुग्रीवगीता** हें नांव योग्य ठरेल, कारण तो सुग्रीवानें रामदूतकपींना केलेला उपदेश आहे. वरवर पाहणारास मुख्यार्थ ध्यानीं येत नाहीं, पण फारच सुंदर गूढार्थ आहे ! टीकाकारांनीं येथें सावळागोंधळ उडविला आहे.

सुन्दरकाण्डांत — बिभीषणानें रावणास जो उपदेश केला आहे (३८।४–३९ रा) त्याला (७) **बिभीषणगीता** हें नांव देणें योग्य आहे.

लंकाकाण्डांतील बिभीषणाच्या संदेहजनित प्रश्नाचें निमित्त करून श्रीरघुवीरानें जें *धर्ममय-रथाचें वर्णन केलें आहे* तें व बिभीषणाचें त्यानंतरचें भाषण या भागास (८०।१–८० म) (८) **धर्मगीता** म्हणणें अयोग्य ठरणार नाहीं.

उत्तरकाण्डांत तीन गीता आहेत (९) **श्रीराम-भक्तिगीता** — (४३।१–४७।८) श्रीरघुनाथानें पुरजनांस बोलावून जो उपदेश केला व त्यानंतर त्यांनीं जी स्तुति केली त्या भागास श्रीराम-भक्तिगीता म्हणणें वस्तुस्थितिनिदर्शक ठरेल. यांत *रामचंद्रांनीं* मुख्यतः *रामभक्तीचेंच प्रतिपादन केलें आहे*. (१०) **श्रीभुशुंडीगीता** —(११५।८–१२० म) ज्ञान व भक्ति यांत अंतर किती या गरुडाच्या प्रश्नाचें उत्तर देण्यांत भुशुंडीनें जें रामरहस्य, ज्ञानदीप व भक्तिचिंतामणि यांचें वर्णन केलें त्या सर्व भागांत ज्ञान व भक्ति यांचेंच निरूपण आहे; म्हणून त्या भागास ज्ञानभक्तिगीता म्हणतां येईल पण वक्ता कोण, श्रोता कोण, इत्यादि बोध त्या नांवानें होणार नाहीं म्हणून *भुशुंडीगीता* हें नांव अमान्य होणार नाहीं असें वाटून तेंच दिलें आहे. (११) **सप्तप्रश्नगीता** — (१२१।१–१२२ अखेर) गरुडानें शेवटीं सप्तप्रश्नात्मक प्रश्न विचारला व त्याचें भुशुंडीनें जें विवरण केलें त्यास *सप्तप्रश्न* म्हणतात. पण या सप्त प्रश्नांतच नरजन्माच्या कृतार्थतेच्या दृष्टीनें ज्ञातव्य असलेल्या सर्व गोष्टींचें फारच मुद्देसूद न्यायघटित ग्रथन केलेलें असून त्याचें निरूपणसुद्धां फार मार्मिक व मनोहर आहे. या भागास *सप्तप्रश्नगीता* हें नांव देणें अयथार्थ ठरणार नाहीं.

याप्रमाणें अरण्यकांडांत तीन व उत्तरकांडांत तीन गीता असून इतर पांच कांडांत

१।१ अशा एकंदर अकरा-एकादश-गीता आहेत व एकंदर सात वक्ते आहेत. त्यांत चार गीतांचे वक्ते प्रभु रामचंद्र आहेत, दोन भुशुंडीनें कथित आहेत व शिव, लक्ष्मण, अनसूया, सुग्रीव व बिभीषण हे पांच वक्ते असून यांनीं १।१ गीता सांगितली आहे. या सर्व ठिकाणीं गूढार्थचंद्रिकेंत आवश्यक तेवढा विस्तार केला गेला आहे. याप्रमाणें नरजीवसाधक साधन करूं लागला तरी त्यानें पुराणनिगमागमेतिहास श्रवण करणें जरूर आहे असें मानसांतील वर्णनावरून ठरतें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।६ 卐 卐 卐

वेद-इतिहास-पुराण-कथा-श्रवण

श्रीरामचरित-मानसांत पुराण-श्रवणाचा महत्त्वाचा उल्लेख प्रथम स्वायंभुवमनुकथेंत आहे. (१।१४३।८)

(१) **कृश शरीर मुनिपट परिधाना ।** *श्रवण नित्य सत्संगिं पुराणा* ॥

कल्पारंभींच्या पहिल्या म्हणजे *स्वायंभुव मन्वंतरांतसुद्धां पुराण-श्रवण चालूं होतें हें यानें दाखविलें आहे*. हें आधुनिकांस अशक्य वाटेल, पण असें वाटणें हा मोह आहे; व अशक्य आहे असें म्हणणें म्हणजे अल्पश्रुतत्व प्रगट करणें किंवा विश्वास व श्रद्धा यांचा अभाव दर्शविणें आहे. वेदांच्या बरोबरच इतिहास-पुराणादि प्रगट झाल्याचा स्पष्ट उल्लेख-पुरावा सर्वमान्य अशा बृहदारण्यक-उपनिषदांत (२।४।१०) आहे.

(क) **अरे अस्य महतः भूतस्य निःश्वसितमेतत्**, यद् ऋग्वेदः, यजुर्वेदः, सामवेदः, अथर्वांगिरसः, **इतिहास, पुराणं**, विद्या, उपनिषदः, श्लोकाः, सूत्राणि, अनुव्याख्यानानि, व्याख्यानानि, अस्य एव एतानि सर्वाणि निःश्वसितानि । ' (बृह. उ. २।४।१०)

(ख) **पुराणं** या एक वचनानें ठरलें कीं ज्ञानकोश, हा जसा एक ग्रंथ तसाच ' पुराण ' हा एक ग्रंथ-विषय आहे. १८ पुराणें व १८ उपपुराणें हे ' पुराण ' ग्रंथाचे विविध भाग होत. याहून इतर मत मानणें हें ' पाखंडी हरिपदविमुख जाणारी मृषा न साच । ' (१।१।१४) अशांचें लक्षण आहे.

सर्वस्वाचा, सर्व साम्राज्याचा, त्याग करून वृद्धपणीं वनांत गेल्यावरसुद्धां मनुमहाराजा संतमुखानें पुराण श्रवण करीत असत हें ठरलें.

(२) **भानुप्रताप** (प्रतापभानु) सार्वभौम राजा *पुराणश्रवण* करीत असे.

प्रतिदिन देइ विविधविध दानां । *ऐके श्रुति वर शास्त्र-पुराणां* ॥ (१।१।१५।५)

(३) **श्रीरामचंद्र, विवाहापूर्वी**

' *श्रुतिपुराण* **ऐकति मन लावुनि । स्वयें कथिति अनुजां समजावुनि** ॥ '

(१।२०५।६)

बालपणापासूनच पुराणादि श्रवण करावें हें येथें दाखविलें. हें उपनयनानंतरचें वर्णन आहे हें ध्यानांत ठेवावें. हें श्रवण भोजनापूर्वींचें आहे असें (उत्तर. २६।१–३ वरून) ठरतें.

(४) **प्रवासांतसुद्धां पुराणश्रवण करावें.**

भक्तिहेतु किति कथापुराणें । कथिलीं विप्रें प्रभु जरि जाणे ॥ (१।२१०।८)
येथें विप्र = विश्वामित्र, यज्ञरक्षणानंतर सिद्धाश्रमांतलें हें वर्णन आहे. *स्वतःस माहीत असलें तरी संतमुखानें विप्रमुखानें भक्तिकथा-पुराण श्रवण करावें हें दाखविलें.*

(५) **निशामुखीं दे मुनि अनुशासन । सर्वंहि करिती संध्यावंदन ॥**
वदत कथा इतिहास-पुराणां । क्रमिति रुचिर युग निशियामांना ॥
(१।२२६।१–२)

येथें वेदश्रुति-उल्लेख नाहीं. कारण ही रात्रीची वेळ आहे. प्रवासांत असतां पुराण-श्रवणाची वेळ निश्चित असेलच-साधेलच असें नाहीं हें आधीं या व मागल्या उदाहरणां-वरून दाखविलें आहे. जनकपुरींत गेले त्या दिवशींचें हें वर्णन आहे. सकाळीं पायीं प्रवास, दोन प्रहरांनंतर भोजन व थोडी विश्रांति; चौथ्या प्रहरांत नगरदर्शनास जाऊन सायंकाळीं परत आले; तरीसुद्धां १४।१५ वर्षें वयाचे सम्राटकुमार मध्यरात्रीपर्यंत आनंदानें कथापुराण श्रवण करीत बसले !

(६) दुसऱ्या दिवशीं पुष्पवाटिकेंतून आल्यावर

‘ मिळत सुमन मुनि करुनि पूजना । आशीर्वाद देति उभयांना ।
कृतभोजन मुनिवर विज्ञानी । सांगु लागले कथापुराणीं ॥
विगत दिवस..............’ (२३७।३–६)

आज भोजनानंतर विश्रांतीला सवड न देतांच कथापुराण सांगूं लागले व सूर्यास्ता-पर्यंत कथा चालली. **भोजनानंतर कथा सांगितली म्हणून येथेंसुद्धां श्रुति-वेद-उल्लेख नाहीं.**

प्रवासांत असतां सवड सांपडेल त्या वेळीं कथापुराणश्रवणकथन करावें; पण भोजनानंतर वेद-श्रुति सांगूं नयेत हें दाखविलें.

(७) **राजानें कथापुराणादि श्रवण केव्हां, कोठें, कसें करावें—**

दो०—करुनि शौच सब सहज शुचि पावन सरितास्नान ।
नित्यकर्म कृत **पितृनिकट चौघे यति सुजाण ॥** (१।३५८)
भूप बघुनि पुत्रां हृदिं धरती । आज्ञा मिळतां सहर्ष बसती ॥
जमे सभा, **पाहुनि रामासी । मानुनि नयनलाभ सीमासी ॥**
मग मुनि वासिष्ठ **कौशिक** *आले ।* **शुभासनीं बसविलें नृपालें ॥**
पूजुनि सपुत्र पायां प्रणमाति । बघुनि राम युग गुरु अनुरागति ॥
कुलगुरु धर्मेतिहास सांगाति । भूप सकल राण्यांसह ऐकति ॥ (१।३५९।५)

सकाळीं प्रातः स्नानसंध्यादि नित्यकर्म उरकल्यावर राज-सभागृहांत सर्व पुरजनादि

सभासद, पुत्र व राण्या यांच्यासह राजानें श्रुति, पुराण, धर्म, इतिहास इत्यादींचें श्रवण करावें. श्रोत्यांनीं वक्त्याच्या आधीं सभेंत हजर असावें. वक्त्याची पूजा मानसन्मान राजानें करावा; आणि कुलगुरूंनीं देशकालपरिस्थित्यनुरूप विषयाचें यथार्थ कथन करावें. (गूढार्थचंद्रिका पाहा.) येथें नसलेला वेदपुराणांचा उल्लेख पाहा :—

(८) '*करुनि सकाळिंच शरयू-मज्जन । बसाति सभेंत सर्वें द्विज सज्जन ॥*
वेदपुराणां वसिष्ठ वर्णिति । ऐकति राम **सकल जरि जाणति ॥**
भोजन अनुजांसमेत करती । ' (उत्तर. २६।१–३)

हें वर्णन राज्याभिषेकानंतरचें आहे. मागलें रामविवाहानंतरचें, दशरथ राजा असतां जें घडत असे त्याचें आहे. रामअयोध्याधिपति, सम्राट, झाल्यावरसुद्धां, पूर्वींच्या दशरथराजांच्या पद्धतीप्रमाणेंच प्रातःकर्म उरकल्यावर राजसभेंत पुराणादि कथाश्रवण करीत असत.

(ख) *वेद-कथनश्रवणाचा उल्लेख येथें आहे व भोजनाचा उल्लेख नंतर आहे. भोजनानंतरच्या कथाश्रवणांत श्रुति-वेद यांचा उल्लेख नाहीं.* या अन्वयव्यतिरेकानें सांगितलें कीं वेदश्रुतिकथन-श्रवण स्नानसंध्यादि केल्यावर सकाळीं भोजनापूर्वीं करावें. भोजनानंतर श्रुति-वेद-कथन-श्रवण करूं नये.

राजानें प्रजाजन व सर्व परिवार यांच्यासह नित्य श्रवण करावें हें भानुप्रताप, दशरथ व रामचंद्र या तीन सम्राटांच्या चरित्रानें दाखविलें.

(९) चित्रकूटास वनवासांत —

' वटछाये वेदिका विरचली । सुंदर सीतेनें करकमलीं ॥ '

दो०— **' बसुनि समुनिगण जेथ नित सीताराम सुजाण ।**
श्रवति कथा इतिहास सब आगम निगम पुराण ॥ ' (२।२३७)

नित = नित्य.

इतिहास – ' धर्मार्थ–काम–मोक्षाणाम् उपदेशसमन्वितम् ।
पूर्ववृत्तकथायुक्तं इतिहासं प्रचक्षते ॥ '

ल. ठे. — एकंदर नऊ ठिकाणीं कथापुराणादि श्रवणाचे उल्लेख करून कोठेंहि पुनरुक्ति न करतां आवश्यक अशा सर्व गोष्टींचा बारीकसारिक तपशिलासुद्धां उल्लेख करून हा विषय थोडक्यांत प्रतिपादिला आहे.

इतर कांडांत खालील ठिकाणीं श्रवणकथनाचे उल्लेख आहेत. अरण्य. १४।५–१७।२; किष्किंधा. १३।६-७; सुंदर. दो. ६ व १३।४-७; लंका. २।७ पासून ३।४ पर्यंत; व ११९।९ – १२०।९; याप्रमाणें साती सोपानांत कथाश्रवणाचे उल्लेख आहेत.

सद्यःपरिस्थितींत संस्कृत भाषेचा लोप होत चालल्यानें,वेद, इतिहास, पुराण, शास्त्रादि श्रवणाची शक्यता फारच थोडी आहे; म्हणून नानापुराणनिगमागमसंमत व ' छओ-सास्त्र सब ग्रंथन को रस ' सहा शास्त्रें व सर्व ग्रंथांचा रस असें जें श्रीरामचरितमानस

त्यांचें तरी *श्रवण करावें*. श्रवणापूर्वी त्यांचा महिमा समजणें जरूर आहे. पुढील प्रकरणांत तेंच आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।७ 卐 卐 卐

श्रीरामचरितमानसाचा प्रभाव

श्रीरामचरितमानसकथा-श्रवणाचा प्रभाव यापुढे मानसांतील अवतरणें काण्डशः देऊन दाखविला आहे.

बालकाण्ड — (१) श्रीतुलसीदास सांगतात,

‘ जे स्नेहें ही कथा सांगतिल । सावधान समजुनी ऐकतिल ॥
होतिल रामचरण – अनुरागी । कलिमलरहित सुमंगल–भागी ॥ ’
(१५।१०-११)
भ्रम संदेह मोह निज हरणी । करूं *कथा भवसरितों–तरणी* ॥ (३१।४)
सद्‌गुण–सुरगण–अंब–अदितिसी । रघुवर *भक्ति प्रेम परमितिसी* ॥
(३१।१४

‘ रामचरित *चिंतामणि* चारू ’ (३२।१)
रामचरित – राकेशकर सदृश सुखद सर्वांस ॥
सज्जन कुमुदचकोर मन हितकर अतिलाभास ॥ (३२ म)

दो. – ‘ श्रद्धा पथधन ना जयां नहिं संतांची साथ ।
त्यांना मानस अगम अति ज्यां प्रिय नों रघुनाथ ॥ (दो. ३८)

(२) याज्ञवल्क्य सांगतात,

‘ महामोह महिशेष विशालहि । रामकथा कालिका करालहि ॥
रामकथा शशिकिरणसमाना । संतचकोर करिति यत्पाना ॥ ’ (४७।६-७)

(३) शंकर सांगतात,

‘ रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुखदानि ।
सत्समाज सुरलोक, हें कळुनि न ऐके प्राणि ! ॥ ’ (११३)
रामकथा सुंदर करटाळी । संशय विहगां दूर पिटाळी ॥
रामकथा कलिविटपकुठारी ॥ (११४।१-२)
‘ तें यश गाति भक्त भव तरती ’ (१२२।१)

(४) श्रीराम सांगतात,

‘ करिन चरित भक्तांस सुखावह ॥
जें सभाग्य नर सादर ऐनि । तरतिल भव ममतामद टाकुनि ॥ ’ (१५२।२।३)

अयोध्याकाण्ड—वर्णू रघुवर विमल यश *जें दायक फलचार* ॥ (मं. दो. १)
नरतनुधर करिती *चरित*श्रवण *तुरवि जगजाळ* ॥ (दो. ९३)
' मनुजसदृश करिती *चरित संसृति-सागर-सेतु*। '

अरण्यकाण्ड— ' कलिमल-शमन दमन मना, राम सुयश सुखमूल ।
सादर ऐकति जे तयां राम राहि अनुकूल ॥ ६ रा ॥
रावणारि यश पावन जे ऐकति गातात ।
ते जपयोगविरागविण रामभक्ति लभतात ॥ ४६ रा ॥

किष्किंधाकाण्ड—
' त्रैलोकपावन सुयश सुरमुनि नारदादिक वानिती ।
......जे श्रवत गातहि वदत समजत परम पद नर लभतसे ॥ (छं.)
भवभेषज रघुगाथयश जे ऐकति नरनारि ॥
त्यांचे सर्व मनोरथां सिद्ध करी त्रिपुरारि ॥ ३० रा ॥

सुंदरकाण्ड — हें चरित कलिमलहर यथामति तुलसिदासें गाइलें ॥
' सुखभवन संशयशमन, दमन विषाद, रघुपति गुणगणां ।
गा त्यजुनि आशा सब भरंवसा ऐक संतत शठ मना !
(छंद) सकल सुमंगलदायक रघुनायक गुणगान ।
सादर ऐकति *तरति तें* भवनिधि विण जलयान ॥ ६० ॥

लंकाकाण्ड —
(१) जगपावनि कीर्तिस विस्तरतिल । गा–गाउनि भवनिधि नर तरतिल ॥
(६६।३)

(२) श्रीरघुवीर सांगतात,
' मम सहित शुभ ही कीर्ति तुमची गाति जे प्रेमें अती ।
संसारसिंधु अपार पार किं नर विनाश्रम पावती ॥ ' (१०६ छं.)
तुमची = कपींची.

(३) हें रावणारिचरित्र पावन रामपदरति दे सदा ।
कामादिहर विज्ञानकर सुर सिद्ध मुनि गाती मुदा ॥ (छंद)
जे रघुवीर-समरजय-चरिता श्रवति सुजाण ।
विजय विवेक विभूति त्यां नित्य देति भगवान ॥ १२१ म॥

उत्तरकाण्ड — यांतील विषयाचीं वचनें इतकीं आहेत कीं बाकीच्या सहा कांडांतील अवतरणें कमी भरतील; म्हणून येथें संक्षेपानें देणें भाग आहे.

(१) **श्रीरामराज्याभिषेककथेचा प्रभाव** — ' श्रृणु खगपति ही कथा पावनी ' (१५।१) पासून ' मोहनदीतें सुंदर तरणी ' (१५।७) पर्यंत.

(२) गुण परिसुनि सुखसमाधि भारी । त्यजुनी श्रवति परम अधिकारी ॥

दो. – जिवन्मुक्तही ब्रह्मपर श्रवति त्यजुनी ध्यान।
जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण ॥ ४२ ॥

(३) विमल कथा हरिपददायिनी श्रवणभक्ति दे अनपायिनी ॥ (५२।२-५)

(४) पार्वती म्हणते,
' रामचरित ऐकुनि जे धाती। त्यां न कळे रसविशेष जाती ॥ ' पासून
आत्मघातकी जीवहि जड ते। ज्यांना रघुपति कथा न रुचले ॥ ' (५३।१-६).

(५) शंकर गरुडास सांगतात,
' तदा सकल संदेहोभंग। जैं बहुकाळ करिति सत्संग ॥ ' पासून
' विण सत्संग न हरिकथा त्यांविण मोह न जात ॥
मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात ' ॥ ६१ ॥ पर्यंत.

(६) मुनिदुर्लभ हरिभक्ति नर पावति विना प्रयास।
जे ही कथा निरंतर ऐकति युत विश्वास ॥ दो. १२६ ॥

(७) रामचरणिं रति वांछि जो अथवा पद निर्वाण।
तो ही कथा निरंतर करो श्रवणपुटिं पान ' ॥ १२८ ॥

(८) शंकर, याज्ञवल्क्य व तुलसीदासकृत उपसंहार (१२९।१-१३०) पाहावा.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०१८ 卐 卐 卐

संतदर्शन व सत्संगमहिमा

श्रीरामचरितमानस-श्रवणाचा प्रभाव मागील प्रकरणांत पाहिला; पण सत्संगाशिवाय हरिकथा नाहीं असें प्रभाव सांगतांना शिवजींनींच सांगितलें आहे (७।६१) व प्र. प्र. १०१७ मध्यें हेंच सिद्ध झालें आहे कीं संतकृपा = सद्गुरुकृपा झाल्याशिवाय क्लेशनाश वगैरे साध्य होत नाहीं; म्हणून या प्रकरणांत संतदर्शन = भेट व सत्संग-महिमा यांचा विचार करणें भाग आहे. संतदर्शन होणेंसुद्धां पूर्वपुण्याईचें फळ आहे; मग दीर्घ काळ सत्संग लाभण्यास परम पुण्यसंग्रह म्हणजे भाग्य पाहिजे हेंच खालील वचनांचें सार आहे असें दिसेल.

बालकाण्ड — (१) ***विण सत्संग विवेक न होतो।***
रामकृपेविण सुलभ न हो ! तो ॥ (३।७)

संतांची संगति रामकृपेशिवाय सुलभ नाहीं.

(२) **' *येउनि बघुं पद भाग्यें भारी* । ' ' आम्हां अपलें दर्शन दुर्गम ॥ '**
असें अत्यन्त धर्मशील प्रतापभानु राजा म्हणाला, हा सिद्धान्त सत्य आहे; तो मुनि मात्र संत नव्हता. (१५९।६–७)

(३) जनकराजांना विश्वामित्राचें दर्शन झाल्यावर ते म्हणतात,

'मुनि ! तव पददर्शन मज घडतां । सुकृत-प्रभाव, न ये मज वदतां ॥ (२१७।१)

दो. २ रा व ३१८ पाहा.

अयोध्याकाण्ड — (४) श्रीरघुनाथ वाल्मीकीस म्हणतात,

दो. — **'प्रभुदर्शन मज हा मम पुण्यप्रभाव खूप'** ॥

'बघुनि पाय मुनिराय आपले । अमचें सकलहि सुकृत सुफळलें ॥'

(१२५, १२६।१)

या काण्डांत संतसाधुमहिमा भरताचरणानें प्रत्यक्ष दाखविला आहे.

अरण्यकांड—(५) अगस्ति ऋषींनीं जो वर मागितला त्यांत सत्संग मागितला आहे.

'अविरल भक्ति विरति *सत्संगा* । द्या पदकमलीं प्रीति अभंगा ॥' (३।१३।११)

याबरून ठरलें कीं *रामदर्शनापेक्षांहि सत्संग दुर्लभ* आहे. उत्तरकांडांत शंकरांनीं वर मागितला त्यांत सत्संगाची मागणी आहे.

(६) **'प्रथमभक्ति संतांची संगति'** (३५।८) **'मजहुनि अधिक मानि संतांही'** (३६।३).

किष्किंधाकांड — (७) दो.— **पहा लक्ष्मणा मोरगण नाचति जलद बघून ।**

असा विरतिरत मुदित गृहिं हरिभक्ता पाहून ॥ १३ ॥

हरिभक्त = संत. येथें हें दाखविलें कीं *गृहस्थाला संतदर्शन फार दुर्लभ !*

(८) **निशिशशि शरदातपा निवारी । जसें *संतदर्शन अघ वारी*** ॥ (१७।७).

सुंदरकांड — (९) लंकिनीला हनुमंताचें दर्शन होऊन तो रामदूत असल्याची सप्रमाण खात्री झाल्यावर ती म्हणते,

'तात ! पुण्य मम अती बहूत । दृष्ट नेत्रिं *रामाचा दूत* ॥

***स्वर्गमोक्ष सुख* घालितां एका तुलागिं तात ।**

सकल मिळुनि *ना तोलवे सुख लव सत्संगांत* ॥ दो. ४ ॥

(१०) बिभीषण हनुमंतास म्हणतो,

'अतां भरंवसा मज हनुमंता । *विण हरीकृपें भेट नाहिं संतां* ।

कृत रघुवीरें कृपावलोकन । दिलें स्वयें तैं तुम्हि मज दर्शन ॥ (७।४-५)

लंकाकांड — बिभीषणाला आधींच लंकेंतून हाकलून दिल्यानें लंकेंत संत नव्हता, किंवा संत महिमादि जाणणारा अथवा वर्णन करणारा कोणी नव्हता. यामुळें संत-दर्शन व सत्संग यांचें वर्णन या कांडांत नाहीं. संतस्वभावाचें व संतांना मिळणाऱ्या रामधामाचें वर्णन आहे.

लंका निशिचर निकर निवासहि । येथें कुठला सज्जनवासहि ॥' (५।६।१)

या रामदूतवचनाची सत्यता या काण्डांत जाणून बुजून दाखविली आहे; अन्यथा उपमा-दृष्टांतांच्या निमित्तानें किष्किंधाकांडासारखें वर्णन करतां आलें असतें.

उत्तरकाण्ड — या कांडांतील कथा रामराज्य सुरू झाल्यानंतरची असल्यानें संतदर्शन

व सत्संग यांची आवड सर्वांना अतिशय असणारच; त्यामुळें या कांडांत या विषयाचें वर्णन बालकांडापेक्षांही जास्त आहे.

(१) श्रीरघुनाथ सनकादिकांच्या दर्शनानंतर म्हणाले,

' तुमचें (संतांचें) दर्शन अघराशीहर ।।
बहुभाग्यें सत्संग लाभतो । विनाश्रमहि भवसंग पावतो ।।
दो. — ' संतसंग अपवर्गद– ' (३३)

(२) *भक्तिगीतेंत* रघुनाथ सांगतात,

' भक्ती स्वतंत्र सब सुखदानी । विण सत्संग न पावे प्राणी ।।
पुण्यपुंजाविण भेट न संतां । सत्संगति करि संसृति अंता ।।
पुण्य एक जागिं समान आनन । मनक्रतिवचानें विप्रपदपूजन ।।' (४५।५–७)

(३) **तदा सकल संदेहां भंग । ज बहु काळ करिति सत्संग ।।** (६१।४)

(४) **भेटति संत विशुद्ध तयाला । रामकृपें अवलोकिति ज्याला ।।** (६९।७)
रामकृपें तव दर्शन घडलें । अनुग्रहें तव संशय उडले ।। ८ ।।

(५) **रामसिंधु घन सज्जन धीर । चंदन तरु हरि संत समीर ।।**
सकल-फलहि हरिभक्ति सुशोभन । संतकृपेविण कुणाहि लाभ न ।।
हें समजुनि जो करि सत्संगा । रामभक्ति त्या सुलभ विहंगा ! ।। (१२०।१७-१९).

(६) **सत्संगति दुर्लभ संसारा । निमिष घडीभर एकहि वारां ।।**
आज धन्य मी धन्य अति सर्वपरीं जरि हीन ।
संतसमागम राम दे जाणुनि निज जन दीन ।। १२३ रा ।।

(७) **गिरिजे संतस्मागम सम न लाभ जगिं आन ।**
तो न मिळे हरिकृपेविण गाती वेद-पुराण ।। १२५ म ।।

(८) **रामकथेचे ते अधिकारी । सत्संगति ज्यांना प्रिय भारी ।।** (१२८।६)

वि. ल. ठे. – सत्संग-संत-समागम करणें म्हणजे संतमुखानें विश्वासयुक्त श्रद्धेनें मन लावून हरिकथादि श्रवण-कथन करणें असा अर्थ येथें आहे. (७।६१।४–६ पाहा.)

सिंहावलोकन – (१) संत-समागम, सत्संग करणें म्हणजे संतांच्या संगतींत राहून दीर्घकाळपर्यंत विमलहरिकथा-श्रवण-कथन विश्वासाश्रित श्रद्धेनें मन लावून करणें (७।६१।४–६ व १२३ रा. पाहा)

(२) संत-गुरु-मुखानें हरिकथा श्रवण केल्याशिवाय मोह-संशय-भ्रम यांचा विनाश होत नाहीं. मोहादिकांचा विनाश झाल्याशिवाय रामपदीं दृढ अनुराग प्राप्त होत नाहीं. (७।६१)

(३) संतदर्शन, संतभेट व संतसमागम यांचा लाभ रामकृपेशिवाय होत नाहीं.

(४) पुष्कळ मोठा पुण्याचा संग्रह असेल, तर त्या सुकृताच्या-भाग्याच्या प्रभावानें रामकृपा होते व संतदर्शनादिकांचा लाभ त्या पुण्याच्या व कृपेच्या प्रमाणांत होतो.

संतदर्शनानें पाप नष्ट होतें.

(५) संतसंगतीनें व संतकृपेनेंच धर्म, अर्थ, काम व मोक्ष अथवा भक्ति मिळते.

(६) संतसंगतीशिवाय व संतकृपेशिवाय भवविनाश होत नाहीं.

(७) संतसंगति हेंच साधन व हीच फलरूपसिद्धि आहे. १।३।८ पाहा.

(८) संतसंगति ही एक स्वतंत्र भक्ति आहे. तिनें सर्व प्रकारच्या साधनांचें फल मिळून कृपासाध्य असलेली प्रेमभक्ति त्या संतांच्या कृपेनेंच मिळते.

(९) पुण्यसंग्रह असून दीनता = लीनता व परम नम्रता नसेल तर हरिकृपा होत नाहीं.

(१०) ईश्वर, शास्त्र व सद्‌गुरु यांवर विश्वासाश्रित सात्त्विक श्रद्धा नसेल व ज्यांना रघुनाथ प्रिय नसेल आणि संतसंगति नसेल त्यांना श्रीरामचरितमानस अति दुर्गम आहे. (१।३८ पाहा).

(११) सर्वांत मोठें पुण्य म्हणजे प्रेमानें विप्रसेवा-पूजा करणें. या वचनाचा या प्रकरणाशीं प्रत्यक्ष संबंध नसला तरी त्याच्याशिवाय चक्रापत्तींतून सुटतां येत नाहीं व या विषयाची पूर्तता होत नाहीं, म्हणून तें येथें देणें भागच होतें. (७।४।५७ पाहा).

(१२) याशिवाय श्रीरघुनाथाचें एक गुप्त मत आहे तें ७।४५ मध्यें पाहावें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।९ 卐 卐 卐

नाऽपृष्टः कस्यचिद् ब्रूयात्

मागील कांहीं प्रकरणांत साधक श्रोत्याच्या दृष्टीनें विचार केला. श्रवण करण्यास कोणीतरी वक्ता, उपदेशकर्ता पाहिजेच; म्हणून आतां उपदेश करणाऱ्या वक्त्याच्या दृष्टीनें या व पुढील कांहीं प्रकरणांत मानसांतील वचनांधारें विवेचन करावयाचें आहे. उपदेश केव्हां व कोणास करावा याचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे. या विषयींचा शास्त्रसिद्धान्तच या लेखाचें शीर्षक आहे.

विनयानें, जिज्ञासुवृत्तीनें व निरहंकारानें विचारल्याशिवाय कोणीं कोणास उपदेश करूं नये असा नियम आहे. गुरु, माता, पिता, कुलगुरु, वडील बंधु, मित्र, पति, स्वामी, धर्मगुरु, सचिव इत्यादि या नियमास अपवाद आहेत. यांनीं शिष्य, पुत्र, कन्या इत्यादिकांस त्या त्या अधिकारानें त्यांच्या हितासाठीं प्रसंगोपात किंवा रोज उपदेश करणें चुकीचें नाहीं. पण ज्यांचा असा विशिष्ट अधिकारसंबंध नाहीं त्यांनीं कोणीं न विचारतां उपदेश करूं नये हा वरील शीर्षकाचा अर्थ आहे.

असें असलें तरी दयार्द्र हृदयाचे संत, परहितनिरत महात्मे, परदुःखदुःखी साधु पुष्कळ वेळां कोणीं न विचारतांच परमार्थाचा उपदेश करतात.

१. अधिकार असून न विचारतां केलेला उपदेश, *बहुधा फुकट जातो.*

(१) **महेशांनीं सतीला** — पत्नीला, तिनें न विचारतां केलेला उपदेश *फुकट गेला*. म्हणून पार्वती अति आर्त बनून शरण येऊन तिनें प्रश्न विचारीपर्यंत शंकरांनीं त्या विषयाचा पुन्हां नुसता उल्लेखसुद्धां तिच्याजवळ केला नाहीं.

(२) (क) **अयोध्याकाण्डांत** *कैकयीला* दशरथानें केलेला उपदेश *व्यर्थ गेला*. (ख) कैकयीच्या मैत्रिणींनीं तिला केलेला उपदेश *फुकट गेला* व उलट ती वाघिणी-सारखी त्यांच्याकडे पाहूं लागली. हे दोन्हीं उपदेश व्यावहारिकच आहेत. (ग) बृहस्पतींनीं सुरपतीला केलेला उपदेश *निष्फळ ठरला* कारण त्यानें त्याच गोष्टीबद्दल सरस्वतीला गळ घातली, (हे *गुरुशिष्य*).

(३) **अरण्यकाण्डांत** *मारीच सुहृदानें* रावणास केलेला उपदेश *व्यर्थ गेला*.

(४) **किष्किंधाकाण्डांत** — कार्येषु मंत्री भार्या तारा, हिनें वालीस केलेला उपदेश *निरर्थक ठरला*. (क) रघुपतिसखा म्हणून पावसाळ्यापूर्वी सुग्रीवास बोलावून आणून उपदेश केला तो *सफल झाला नसला* तरी त्यास कारण रामाचीच इच्छा. (ख) वर्षा-ऋतूनंतर *हनुमानसचिवानें* सुग्रीवास केलेला उपदेश *अर्धवट सफल झाला*. (ग) सीता-शोधार्थ जाणाऱ्या रामदूतांस सुग्रीवानें (स्वामीनें) केला तो उपदेश *यशस्वी झाला*.

(५) **सुन्दरकांडांत** — (क) अशोकवाटिकेंत मंदोदरीनें (कार्येषु मंत्री भार्या) *रावणास केलेला उपदेश तत्काल सफल झाला*. पुलस्ति मुनि-आजोबा-यांनीं रावणास पाठविलेला उपदेशपर संदेश *उपयोगी पडला नाहीं*. (ग) मंदोदरीनें (कार्येषु मंत्री) रावणास घरीं केलेला पहिला उपदेश *कवडीमोल ठरला*.

(६) **लंकाकांडात** मंदोदरीनें तीन प्रसंगीं (तीन वेळां) रावणास उपदेश केला पण *उपड्या घड्यावर पाणी !* (क) कुंभकर्णा(सुहृदा)नें रावणास सांगितलें तें *त्यानें ऐकलें नाहीं*. (ख) श्रीरघुनाथानें सखा बिभीषणास रणांगणांत उपदेश केला तो *यशस्वी झाला*.

(७) **उत्तरकाण्डांत** (क) श्रीरघुनाथानें सुग्रीवादिकांस केलेला उपदेश—*सुफल झाला*. (ख) विप्र गुरूनें शूद्र शिष्यास केला त्याचा *परिणाम गुरुद्रोहाची उत्पत्ति !*

२. अधिकार असणाऱ्यानें विचारणाऱ्यास केलेला उपदेश.

(१) **बालकाण्ड** —(क) नारदानें हिमवंतास–सुफल. (ख) वसिष्ठांनीं दशरथांस (पुत्रकामेष्टि) — सुफल. (ग) विश्वामित्रानें जनकराजास (सीताविवाहाविषयीं) —सुफल झाला.

(२) रघुनाथानें भरद्वाजांस मार्ग व वाल्मीकींस स्थान विचारलें. दोघांनीं सांगितलें व त्याप्रमाणें रघुनाथानें केलें. (क) कौसल्येनें भरतास (वाहनांत बसण्या-विषयीं)—सफल झाला. (ख) कैकयीनें भरतास राज्य स्वीकारण्याविषयीं केला तो *फुकट गेला !*

(३) अगस्त्यांस मंत्र विचारला व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें रघुवीर पंचवटीस राहिले. (क) लक्ष्मणानें प्रश्न विचारले व प्रभुरामचंद्रांनीं उपदेश केला–*सुफल झाला.*

(४) **किष्किंधाकाण्ड** — हनुमन्तानें सहकारी जांबवंतास विचारल्यावरून त्यानें केलला उपदेश *पूर्ण यशस्वी झाला.*

(५) **सुंदरकांड**––(**क**) बिभीषण सचिवानें दूतहननाविषयीं रावणास केलेला; तत्काल सफल. (**ख**) पुन्हां बिभीषण सचिवानें रावणास केला; फलः *हकालपट्टी ! व लाथा मिळाल्या.* (**ग**) माल्यवंत मातामह, जरठ सचिव, यानें रावणास केला; फलः *अपमान पदरांत पडला !*

(६) **लंकाकांड**––(**क**) प्रहस्त, पुत्र, मंत्री, यानीं रावणास केला; फलः *तिरस्कार पदरांत घ्यावा लागला.* (**ख**) माल्यवंत सचिवानें रावणास केला. *बक्षीस : अत्यंत अपमान !*

(७) **उत्तरकांड** — विचारल्यावरून पण न विचारलेल्या मार्गाचा-निर्गुणाचा-उपदेश लोमशांनीं विप्रास केला ! *परिणामः वादविवाद, खंडनमंडन, कुतर्क* इत्यादि.

३. अधिकार नसतां न विचारणाऱ्यास उपदेश.

(१) **बालकांड** — शंकरांनीं नारदांस केला *निष्फळ ठरला.*

(२) **अयोध्याकाण्ड** — लक्ष्मणानें निषादराजास; त्यामुळें गुरु झाले व *तो रामभक्त बनला.*

(३) **अरण्यकाण्ड** — (**क**) अनसूयेनें सीतेला केला; *सुफल झाला.* (**ख**) जटायूनें रावणास केला. फळः मरण ! (**ग**) नारदानें जयन्तास–सफल झाला.

(४) **किष्किंधाकांड** (**क**) संपातीनें रामदूतांसः सफल झाला. (**ख**) चंद्रमा मुनीनें संपातीला–सफल, (**ग**) तपस्विनीनें कपींना केला; सफल झाला.

(५) **सुंदरकाण्ड** (**क**) हनुमंतानें रावणास; दक्षणाः अपशब्द व पुच्छदहन. (**ख**) शुक हेरानें रावणास; फळः *लाथा खाव्या लागल्या* !

(६) **लंकाकांड** — अंगदानें रावणास–*आकाशाच्या निळ्या रंगानें वस्त्र रंगविण्यासारखा निष्फळ* !

(७) **उत्तरकांड** — असा उपदेश कोणीं कोणास केला नाहीं ! कारण *रामराज्य !*

४. अधिकारी शरणागतास उपदेश.

(१) **बालकाण्ड**—याज्ञवल्क्यांनीं भरद्वाजांस व महेशांनीं पार्वतीस, पूर्णपणें सुफल.

(२) **अरण्यकाण्ड** — श्रीरामचंद्रांनीं नारदांस, पूर्णपणें सुफल.

(३) **उत्तरकांडांत** — (**क**) गरुडास भुशुंडीनें केला तो पूर्ण यशस्वी झाला (**ख**) प्रभूंनीं भरतास केला तो सुफल झाला.

५. निष्कर्ष — वरील चार प्रकारांतील अनुभवांचा विचार करतां ठरलें कीं,

(१) अधिकारी शरणागतास केलेला उपदेश त्याचें परम कल्याण करतो.

(२) न विचारतां व अधिकार नसतां सुशील, नम्र सज्जनांना केलेला उपदेश सफल होतो.

(३) अहंकारी सत्ताधीशांस त्यांच्या मर्जीविरुद्ध केलेला उपदेश, सुहृदांनीं केलेला असो, त्यांनीं विचारल्यावरून केलेला असो किंवा न विचारतां केलेला असो तो निष्फळ ठरतो व अधिकारानुरूप, अपमान, तिरस्कार, शिक्षा, मरण इत्यादि पदरांत पडतात.

(४) हरिमायेनें मोहित झालेल्या सज्जनांस त्यांनीं न विचारतां, शरण न येतां, केलेला उपदेश निष्फळ ठरतो; पण तेच पश्चात्तापदग्ध होऊन शरण आले म्हणजे उपदेश सफल होतो.

(५) अहंकारी सत्ताधीशांस केलेला उपदेश त्यांच्या मर्जीविरुद्ध नसेल तरच सफल होतो.

(६) '**उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये।**' याची सत्यता पढतमूर्ख रावणाच्या चरित्रांत दिसते.

यावरून उपदेशकांनीं योग्य तो धडा शिकावा; परंतु **कर्तव्य असेल तेथें परिणामाकडे न पाहतां उपदेश केलाच पाहिजे.**

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।१० 卐 卐 卐

समाजोपदेश-पद्धति

मागील प्रकरणांत मानसांतील व्यक्तिविषयक उपदेशांचें निरीक्षण केलें. बहुजन समाजास त्यांच्या हितासाठीं, प्रेमानें उपदेश करण्याची पद्धति कशी असावी हें दाखविणाऱ्या मानसांतील वचनांचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे.

यास मुख्य आधार भक्तिगीतेच्या आरंभीं श्रीरघुनाथानें जी प्रस्तावना केली तिच्यांत आहे.

' बोलाविति *रघुनाथ* एकदां। गुरु आले द्विज नगरजन तदा॥

∘ × ......

गुरु मुनि बसले ब्राह्मण सज्जन। वदले वचन भक्त-भव-भंजन॥

× ......

ऐका पुरजन! मम वचनासी! *सांगुं न ममता धरून मनासी॥*
ना अनीति, ना सत्तें वदतों। **ऐका**, *करा रुचे जर* **मग, तो॥**
सेवक तो प्रियतम मम तोही। मम अनुशासन मानी जोही॥
जर मी बंधु! वदेन अनीती। मला निषेधा त्यजुनी भीती॥ (७।४३।१-६)

(१) एकदां श्रीरघुनाथानें बोलावल्यावरून गुरु वसिष्ठ, वामदेवादि मुनि, ब्राह्मण आणि सर्व पुरजन, राजसभागृहांत आले. (क) बसण्याचा क्रम गुरु, मुनि, ब्राह्मण

आणि सज्जन या शब्दक्रमानें दाखविला आहे. यानें सुचविलें कीं सर्व *श्रोते वर्णाश्रमधर्ममर्यादा पालन करणारे असावेत.* हेंहि दाखविलें कीं *सर्व पुरजन सज्जन आहेत*, होते. मुनींचा उल्लेख पहिल्या चौपाईत राहिला होता तो दुसरींत योग्य स्थानीं केला. यानें ठरलें कीं—

(२) (क) श्रोत्यांचा समाज मिश्र आहे. चारी वर्णांचे व आश्रमांचे लोक श्रोत्यांत आहेत.

(ख) केला जाणारा उपदेश श्रोत्यांनीं विनंति केलेली नसतां वक्त्याच्या इच्छेनें केला जाणार आहे.

(ग) ' रघुनाथ ' शब्दानें सुचविलें कीं रघुवंशाचे स्वामी या नात्यानें बोलावलें; सर्वांनीं यावें या हेतूनें असें केलें.

(घ) सर्व मंडळी अधिकारानुसार योग्य जागीं बसल्यावर रघुनाथानें बोलण्यास प्रारंभ केला, पुरजन वगैरे शब्दांतील भाव टीकेंत पाहावे.

(ङ) ' भक्त-भव-भंजन ' शब्दानें सुचविलें कीं भवाचा विनाश करणाऱ्या विषयाचें —भक्तीचें प्रतिपादन करणार आहेत.

वक्त्यानें कोणत्या गोष्टी वर्ज्य केल्या पाहिजेत तें प्रथम सुचविलें आहे; त्यांत चार सूत्रें आहेत.

(१) **' सांगुं न ममता धरुन मनासी '** — भाव हा कीं धन, प्रतिष्ठा, मान, सन्मान, कीर्ति, मानपत्र, थैल्या, निवडणुकींत यश मिळविणें, अमुक एक राजकीय, सामाजिक पक्ष, इत्यादि कशाचीहि ममता वक्त्यानें मनांत बाळगूं नये. पूर्ण निःस्वार्थी व पक्षाभिमानरहित बुद्धीनें श्रोत्यांचें हित, परमहित व्हावें या कळकळीनेंच बोलावें.

(२) **' ना अनीति वदतों '** — अनीतीचें प्रतिपादन करूं नये; धर्मविरुद्ध, वेदशास्त्रपुराणविरोधी, शिष्टाचारविरुद्ध, अन्यायानें, द्वेषादिकानें बोलूं नये; परदोषवर्णन करून आपले व आपल्या पक्षाचे गोडवे गाण्यासाठीं बोलूं नये.

(३) **' ना सत्तें वदतों '** — ' राजा या अधिकारानें मी बोलत नसून तुमच्यापैकीं एक पुरजन, तुमचा बंधु या नात्यानें बोलणार आहें ' असें श्रीरघुनाथ म्हणाले. बोलावणें *रघुनाथानें* पाठविलें होतें; त्यामुळें त्या अधिकारानेंच बोलणार असा गैरसमज कोणाचा होऊं नये म्हणून ही प्रस्तावना करावी लागली. यानें सुचविलें कीं मी वक्ता शहाणा, श्रोते मूर्ख, मी मोठा, मी अधिकारी, इत्यादि कोणत्याहि प्रकारचें दडपण वक्त्याच्या बाजूनें श्रोत्यांच्या मनावर पडणार नाहीं, राहणार नाहीं असा प्रयत्न प्रस्तावनेंत केला पाहिजे. **स्वतःच्या सामाजिक वा राजकीयादि अधिकाराचा, सत्तेचा, प्रतिष्ठेचा, विद्वत्तेचा, श्रीमंतीचा इत्यादि कोणताहि संबंध उपदेश करण्यांत असूं नये.**

(४) माझें म्हणणें, माझा उपदेश श्रोत्यांनीं मानलाच पाहिजे, न मानल्यास अमुक शिक्षा, दंड भोगावा लागेल; किंवा दुष्परिणाम, दुःख भोगावें लागेल, इत्यादि भाषा

तर राहोच; पण *श्रोत्यांनीं आपल्या उपदेशाप्रमाणें* **वागलेंच** *पाहिजे असें वक्त्यानें मनांतसुद्धां आणतां नये.*

(क) **' ऐका, करा रुचे जर, मग तो '** — माझ्या उपदेशाप्रमाणें तुम्ही कराच असा माझा आग्रह नाहीं. **उपदेशाप्रमाणें करणें न करणें या बाबतींत श्रोत्यांस पूर्ण मोकळीक पाहिजे.** सर्व भाषण शेवटपर्यंत शांतपणें श्रवण करावें एवढीच अपेक्षा वक्त्यानें बाळगावी.

(ख) स्वतःचे नोकर, हाताखालचे लोक, भाऊ (भ्राते), पक्षाचे लोक इत्यादिकांनासुद्धां या बाबतींत **पूर्ण मतस्वातंत्र्य असावें व तें खरोखरीचेंच असावें.** मतस्वातंत्र्याचा नगारा वाजविणाऱ्या वर्तमानकालीन दिखाऊ, दबाऊ, विकाऊ, लांचखाऊ, नामधारी मतस्वातंत्र्यासारखें नसावें.

४. वरील चार सूत्रांत सांगितल्याप्रमाणें वक्त्याची मनोवृत्ति आणि उक्ति असावी आणि शिवाय श्रोत्यांना एक मुभा असावी. (क) ' मी जर अनीति वदेन—वदलों, तर भीति सोडून, कोणताहि संकोच न बाळगतां, तुम्ही मला निषेधा, ' असें वक्त्यानें श्रोत्यांस *मनापासून आधींच स्पष्ट सांगितलें पाहिजे*. याचा अर्थ हा कीं अनीतीचें, धर्मविरुद्ध, ' नानापुराणनिगमागमसंमत ' नसलेलें वक्ता बोलेल तर त्याचा निषेध करण्याचा, त्यास तोंडावर तसें बजावण्याचा हक्क, स्वतंत्रता व मुभा कोणाहि श्रोत्याला असावी. (ख) श्रोत्यांचा एक प्रेमळ बंधु या भावनेनेंच उपदेशकानें प्रेमानें, कळवळ्यानें व तळमळीनें बोलावें. अशा उपदेशांत सत्ता, जबरी, गुंडागिरी, फंडगिरी, भीड, प्रलोभन, मध्यस्थी, भय इत्यादींचा कांहीं उपयोग होत नाहीं. (ग) कोणी उपदेशाप्रमाणें वागले नाहींत तरी वक्त्याला रोष, विषाद, अप्रीति, असमाधान, वेळ फुकट गेला इत्यादि कांहीं वाटतां उपयोगी नाहीं; व उपदेशाप्रमाणें न वागणारांवरील पूर्वींचें प्रेम आणि ममता कमी होतां उपयोगी नाहीं.

५. *उपदेशक एवढें सांगूं शकतो कीं* ' सेवक तो *प्रियतम* मम तोही । मम अनुशासन मानी जोही ॥ ' अनुशासन = उपदेश. प्रियतम न होणें म्हणजे अप्रिय होणें असा अर्थ होऊंच शकत नाहीं. न ऐकेल तो प्रिय, प्रियतर जसा आधीं होता तसा राहीलच; पण ऐकणारा प्रियतम होईल, सर्वांत जास्त प्रिय होईल. स्वामीला—मालकाला जें आवडतें तें करणें व त्याच्या सांगण्याप्रमाणें वागणें हा सेवकधर्मच आहे.

सूचना — गुरु, माता, पिता, इत्यादि अधिकारक्षेत्रांत त्या त्या अधिकारानें उपदेश करणें जरूर आहे. (क) समाजसेवक, देशसेवक-सेविका, स्वयंसेवक-सेविका, धर्मप्रचारक, परमार्थोपदेशक, कीर्तनकार, कथेकरी, हरिदास, हरदास, प्रवचनकार, पुराणिक, व्याख्याते, ग्रामसेवक इत्यादींनीं वरील नियमांचें पालन करणें जरूर आहे. **पण आज काय दिसतें !**

◆◆◆◆

५ ५ ५ १०।११ ५ ५ ५

यथाश्रुत यथामति वेदपुराणानुकूल कथन

वक्त्यांनीं कसें वर्णन-कथन-करावें हें मानसांतील वक्त्यांच्या उदाहरणांवरून दिसतें-कळतें; म्हणून क्रमशः तींच अवतरणें दिलीं आहेत.

मानसांत मुख्य चार वक्ते आहेत. (१) श्रीतुलसीदास, (२) श्रीयाज्ञवल्क्य, (३) शंभु व (४) भुशुंडी. यांपैकीं कोणीहि असें म्हणाले नाहींत कीं, 'मी सर्व कांहीं सांगतों किंवा कांहीं नवीन सांगतों. प्रत्येक जण असेंच म्हणतो कीं, 'मी अमक्या-जवळून श्रवण केलेली किंवा अमक्यानें अमक्यास सांगितलेली कथा सांगतों; व तीसुद्धां यथामति म्हणजे बुद्धि-शक्तीप्रमाणें सांगतों.'

सच्चिदानंदघन परमात्म्याशिवाय बाकी सर्व **प्रकृतिनिर्मित जग अपूर्ण आहे.** पुरुषाची बुद्धि मर्यादित आहे. परिपूर्ण परमात्म्याचें वर्णन अपूर्ण अशा बुद्धीनें कोण किती करणार ? 'हरि अनंत हरिकथा अनंता' असें मानसांत म्हटलें आहेच. वक्ते

१. **श्रीतुलसीदास**—(१) श्रीरामचरितमानसाची पूर्वपरंपरा सांगून म्हणतात कीं,

'*गुरु वदले मज ती कथा सूकरखेतिं* सुजाण ॥
बालपणें नुमजे तशी, तैं मी फार अजाण ॥ (१।३० रा)
वारंवार परी गुरु सांगति । *कांहिं समजली मला यथामति* ॥
ती करीन मी भाषाबद्धाहि । जिनें होइ मम मनीं प्रबोधहि ॥
ज्ञानबुद्धिबल अंतरीं जेवीं । प्रेरी हरि मज वदेन तेवीं ॥'

(क) '*नानापुराण निगमागम संमतं*............
रघुनाथगाथाभाषानिबन्धमतिमंजुलमातनोति ॥' (मं. श्लो. ७)

(२) उपसंहारांत —

'यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशंभुना दुर्गमम् ।
श्रीमद्रामपदाब्जभक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम् ॥
मत्वा तद्रघुनाथ-नामनिरतं स्वान्तस्तमः शान्तये ।
भाषाबद्धमिदं चकार तुलसीदासस्तथा मानसम् ॥
(उत्तर. उपसंहार श्लो. १.)

२. **याज्ञवल्क्य**—

(१) 'करि संशय ऐसेचि भवानी । महादेव विस्तृत वाखाणी ॥
दो. – अतां *यथामति सांगु* तो *उमाशंभुसंवाद* ॥' (१।४७)

(२) 'रामचरित अति अमित मुनीशा ! । वदवे ना शतकोटि अहीशां ॥
तदपि *यथाश्रुत वदेन* मुनिवर' (१।१०५।३-४)

(३) उपसंहारांत – हा शुभ *शंभुसंवाद* । सुखसंपादनशमन विषाद ॥
रघुपतिकृपें *यथामति गीत* ॥ (७।१३०।१।२)

३. श्रीशंभु उमेला सांगतात,

(१) ' तदपि *यथाश्रुत* तुजसि *यथामति* ।
वदतों, बघुनि तुझी प्रीती अति ॥ (१।११४।५)
श्रुणु शुभ कथा भवानि रामचरितमानसविमल ।
जी भुशुंडि वाखाणी ऐके खगनायक गरुड ॥ ' (१।१२० म)
हरिगुण नाम अपार कथा रूप अगणित अमित ॥
मी *निजमति अनुसार वदतों* सादर उमे श्रुणु ॥ ' (१२० द्रा ॥)

(२) उपसंहारांत — गिरिजे ! ऐक विशद ही कथा ।
मी सब वर्णित *मम मति यथा* ॥
उमे ! कथा सब रुचिर वर्णिली । *भुशुंडिनें जी गरुडा कथिलि* ॥
(७।५२।१,६)

(३) पुन्हां शेवटच्या उपसंहारांत ' कथा *यथामति मीं सांगितली* ' ।

(४) यथाश्रुत यथामति सांगतों इतकेंच म्हणून कोणी थांबलें नाहींत; कोणाजवळ श्रवण केली हें प्रत्येकानें सांगितलें; आणि यथामति कां याचें कारणही सांगितलें.

४. काकभुशुंडी —

(१) रामकथा *वर्णिली यथामति* (७।१५।६)
' कथा *यथामति* रुचिर *वदुं* अतां, ' (७।७४।१)
जस सत्संगीं समजलें तसें कथित अपणांस । (७।९२ रा)
' पक्षपात मुळिं इथें न करतों । *वेदपुराण संत मत वदतों* ॥ (७।११६।१)

इतकें सर्व प्रकारें सांगितलें तरीसुद्धां कोणाजवळ श्रवण केलें हें सांगितलें न गेल्यानें गरुडानें स्पष्टच विचारलें कीं,

' स्वामी रामचरित सरनामी । प्राप्त कुठें सांगा नभगामी ॥ (७।९४।४)

तेव्हां भुशुंडीनें लोमश मुनीजवळ श्रवण केल्याची सर्व हकीकत सांगितली; व लोमशानें सांगितलें कीं शंभुकृपेनें मला ही कथा प्राप्त झाली.

(२) भुशुंडी उपसंहारांत सांगतात,
' *कथित* हरिचरित्र अनुपम । व्याससमासें *यथाबुद्धि* मम ॥ ' (७।१२३।१)

शंभु-महादेव, भुशुंडी, याज्ञवल्क्य यांसारखे त्रिकालज्ञ, सर्वज्ञ, सर्वदर्शी, करतलामलकवत् आत्मज्ञान असणारे व करबदरवत विश्वज्ञान असणारे काय करतात व कसें सांगतात हें वर दाखविलें. (क) आधुनिक लेखक, वक्ते, उपदेशक काय करतात व कसें बोलतात याचा विचार करावा, आणि कोणते, कोणाचे ग्रंथ वाचावेत, कोणाचें वक्तव्य श्रवण करावें हें वाचकांनीं ठरवावें.

स्वतः प्रभु रामचंद्र – (१) श्रीरघुनाथ भरतादिकांस संत लक्षणें सांगतांना म्हणाले–

' संतलक्षणें श्रुणु बंधो !, तीं न अगणित, *वेदपुराणीं ख्याती* ॥ (७।३७।६)

उपसंहारांत पाहा—

सकल पुराणीं वेदीं निर्णित कथित ...... (७।४९।२)

(२) भगवान या नात्यानें बोलतांनासुद्धां म्हणतात, (७।८६।१)

' श्रुणु मम बाणा अतां विमल अति । सत्य सुगम *निगमादिक वानाति* ॥ '

असें कथन न केल्यास त्रिविध प्रतीतींपैकीं *शास्त्रप्रतीति* नष्ट होते; म्हणून वक्त्यांनीं प्रथम शास्त्रप्रतीति सांगावी. नंतर कोणाजवळ श्रवण केलें हें सांगण्यानें *गुरुप्रतीति* सांगितली जाते. तसाच वक्त्याचा स्वतःचा अनुभव म्हणजे *आत्मप्रतीति* सांगणेंसुद्धां आवश्यक असतें. (प्र. प्र. १०।१ मध्यें पाहा). पुढील प्रकरणांत या वक्त्यांची आत्म-प्रतीति सांगणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।१२ 卐 卐 卐

श्रीमानस-वक्त्यांचे अनुभव

१. काकभुशुंडी गरुडास सांगतात, (७।८९।५ – ९।१।२)

अतां स्वानुभव सांगु खगेशा । विण हरिभजन नाश ना क्लेशां ॥ ५ ॥

श्रुणु ! खगराया ! रामकृपेविण । रामप्रभुता कळणें शक्य न ॥ ६ ॥

न जाणतां परि न ये प्रतीती । विनाप्रतीति न उपजे प्रीती ॥ ७ ॥

प्रीतिविना नहिं भक्ति-सुदृढता । खगनाथा जशि जल चिक्कणता ॥ ८ ॥

सोरठा–**गुरुविण नोहे ज्ञान किं होइ विरागविण ॥**

गाती वेदपुराण सुख किं मिळे हरिभक्तिविण ॥ ८९ रा ॥

कधिं विश्रामा ठाव, तात ! सहज संतोषविण ॥

चले किं जलविण नाव मरमर केले कष्ट तरि ॥ ८९ म ॥

संतोषाविण काम न नासे । काम तिथें स्वप्निं न सुख भासे ॥ १ ॥

रामभक्तिविण काम न मरती । स्थलावीण तरु कधीं उगवती ॥ २ ॥

विज्ञानाविण समता ये ना । नभावीण अवकाश असे ना ॥ ३ ॥

श्रद्धेवीण धर्म कधिं न घडे । महीवीण कीं गंध सांपडे ॥ ४ ॥

तेज तपाविण कधिं कीं पडतें । रस किं जलाविण जगीं खगपते ॥ ५ ॥

बुधसेवेविण शील किं मिळतें । प्रभु ! तेजाविण रूप किं दिसतें ॥ ६ ॥

स्थिर मन कीं निजसौख्यावीण । स्पर्श किं होइ समीर-विहीन ॥ ७ ॥

कवणहि सिद्धि किं विश्वासाविण । भवभयनाश किं हरिभजनाविण ॥ ८ ॥

दोहा– विश्वासाविण भक्ति ना, द्रवति न तींविण राम ॥
स्वप्निंहि रामकृपेविण जीवा नहिं विश्राम ॥ ९० रा ॥
सोरठा–हें जाणुनि मतिधीर त्यज कुतर्क संशय सकल ॥
भज हि राम रघुवीर करुणाकर सुंदर सुखद ॥ ९० म ॥
वर्णित हा मी नाथ ! *यथामति* । प्रभुचा प्रताप-महिमा खगपति ॥ १ ॥
युक्ति विशेषें जरा न कथिला । *हा सब निज नयनीं अनुभाविला* **॥ २ ॥**

'स्वानुभव सांगुं' असें म्हणून उपक्रम केला आणि *'हा सब निज नयना अनुभविला'* असा उपसंहार केला. ८९।५ पासून सिद्धान्तवचनें व सुभाषितें यांची मालिकाच आहे ! शिवाय या भागांत पुढील ज्ञानदीप व भक्तिचिंतामणि यांचें सार गूढ भाषेंत भरलेलें आहे. गूढार्थचंद्रिकेंत सर्व स्पष्ट दिसेल.

२. शंकरांचा अनुभव.

'उमे ! सांगतों तुज अनुभव मम । सत् हरिभजन जगत् स्वप्नासम ॥' (३।३९।५)

३. श्रीतुलसीदासांचा अनुभव. (१।२३।३-५)

(१) प्रौढि सुजन ! माना न जनाची । रति रुचि *वदे प्रतीति मनाची* ॥ ३ ॥
एक दारुगत दिसतो एक । पावक-युगसा ब्रह्मविवेक ॥ ४ ॥
***उभय अगम; युग नामें सुगमचि* । ब्रह्म *राम यांहुनि गुरु नामचि* ॥ ५ ॥**

निर्गुण ब्रह्म व सगुण राम यांच्यापेक्षां 'राम' नाम गुरु = श्रेष्ठ, मोठें आहे अशी गोस्वामीच्या मनाची प्रतीति = अनुभव आहे.

(२) उपसंहारांत—

'सुंदर सुजाण कृपानिधान अनाथिं करतो प्रीति जो ।
तो एक राम अकामहित निर्वाणदायक नान्य तों ॥
ज्याच्या कृपालेशामुळें *मतिमंद तुलसीदासही* ।
***पावे परम* विश्राम तो प्रभु राम, सम कोठें नाहीं ॥** (७।१३०छंद३)

४. याज्ञवल्क्य—यांचा श्रोता श्रवणांत मग्न होऊन तटस्थ झाल्यामुळें यांनीं आपला अनुभव सांगितला नाहीं.

अशा प्रकारें शास्त्र, गुरु व आत्मप्रतीतिमान संत-गुरु वक्ता अपार पूर्वपुण्याईनें लाभल्यावर अधिकारी श्रोत्यानें श्रवण कसें करावें हें सांगणें क्रमप्राप्त आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।१३ 卐 卐 卐

कथा-श्रवण कसें करावें

१. **श्रीगोस्वामी सांगतात, '*श्रवण* कथन बुध *करिती सादर*।'** (१।१०।६)

(क) जे **स्नेहें** ही कथा सांगतिल-। *सावधान समजुनी* ऐकतिल ॥ (१।१५।१०)

(ख) श्रवा सुजन ! *मन लावुनि सादर*।' (१।३५।१३)

२. **याज्ञवल्क्य** — '*मन लावुनि* ताता ! श्रुणु *सादर*।' (१।४७।५).

३. **महेश** — '*सादर* ऐक गिरीश कुमारी !' (१।११४।२).

अशा सूचना मानसांत पुष्कळ वेळां आढळतात. याप्रमाणें **स्नेहानें, सादर, सावधान, समजुनी, आणि मन लावून श्रवण करावें. हेंच अन्य प्रकारें श्रीरघुनाथानें लक्ष्मणास सांगितलें आहे.**

तात ! समासिं सांगुं समजावुनि। *ऐका मति मन चित्ता लावुनि* ॥ (अरण्य. १५।१) **गूढार्थचंद्रिका उतारा** देणेंच योग्य. 'मति मन चित्ता लावुनि ऐका' हे पांचच शब्द पण अर्थ किती व्यापक आहे पाहा. (१) *मन लावुनि* – एखाद्या गोष्टीच्या श्रवणांत मन लागण्यास त्या गोष्टीची परम प्रीती, फार गोडी, असावी लागते; (स्नेह *सुचविला*) प्रीति, गोडी, पुष्कळ असली तरी ढेकरा, पोटशूळ, तहान इत्यादींची सुरवात झाली कीं मन कसें लागणार ? म्हणून *आरोग्य पाहिजे*. श्रवणांतील विक्षेपांचें विस्तृत वर्णन श्रीदासबोधांत (१८।१०) पाहावें. सिनेमांत रात्रीं १२ पर्यंत ज्यांना डुलकीसुद्धां येत नाहीं अशांना रामकथाश्रवणांत वाटेल त्या वेळीं डुलक्या वगैरे येतात, हें प्रीतीच्या अभावाचें लक्षण आहे.

(क) *विश्वासयुक्त श्रद्धा* असल्यावांचून प्रीति उत्पन्न होत नाहीं.

(ख) मन लागण्यास इन्द्रियें ताब्यांत असावीं लागतात. 'इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।' (भ. गीता) म्हणून *दम पाहिजे*.

(ग) वैराग्य असून मन एकाग्र करण्याची संवय असल्याशिवाय मन श्रवणांत लागणार नाहीं म्हणून मनोनिग्रह = *शम पाहिजे*. याप्रमाणें विश्वास, श्रद्धा (आदर) वैराग्य, शम, दम व निरोगी शरीर-*तितिक्षा* यांची आवश्यकता सुचविली. निरोगी शरीर असेल तरच तितिक्षा येऊं शकेल. ('*स्नेहें मन लावून*' झालें).

(२) *मति लावुनि*–मति = बुद्धि. श्रवणांतील अर्थाचा निश्चय करून तो ग्रहण करण्याचें काम बुद्धीचें आहे. बुद्धि कुशाग्र नसेल तर ऐकतां ऐकतां निश्चित निःसंदेह अर्थ समजणार नाहीं. समजलें असें वाटेल; पण 'स्थळत्याग होतां सवेंच जाते' (समर्थ, करुणाष्टक) असें घडेल; म्हणून *सूक्ष्म विवेक*शक्ति पाहिजे (*समजुनी = मति लावून*).

(२) *चित्ता लावुनि* — चित्ताचें कार्य अनुसंधान आहे. चित्त जर व्यग्र असेल

तर अनुसंधान सुटेल; तें टिकण्यास चित्ताचा *उपरम पाहिजे*. सावधान चित्ता लावुनि = उपरमयुक्त.

(४) स्नेहें, सादर (श्रद्धेनें), मन लावून, समजूनें आणि सावधान (स + अवधान) या पांच अटी इतर सर्व वक्त्यांनीं मिळून सांगितल्या. त्याच येथें मन लावून, मति लावून व चित्ता लावून यांनीं सांगितल्या. विवेक, वैराग्य, विश्वास, श्रद्धा, शम, दम, तितिक्षा आणि उपरम (उपरति) इतक्या गोष्टींची आवश्यकता सिद्ध झाली.

सूचना — 'सादर ऐका' असें जेथें जेथें म्हटलें असेल तेथें 'मति मन चित्तां लावुनि ऐका' असाच अर्थ घेणें जरूर आहे.

(५) 'ऐका *त्यजुनि मान* मम शिकवण' (५।२२।७). 'प्रिय ! ऐका वच *कोप टाकुनी*।' (६।६।४) 'श्रुण रावण सोडुनि चातुर्या' ६।२७।१ येथें चातुर्य = धूर्तता, शठता. मान, क्रोध, धूर्तता, कुटिलपणा इत्यादींचा त्याग केला पाहिजे. प्रत्येक कांडांत श्रवणाविषयीं वचनें आहेत.

सूचना — श्रोत्यानें प्रश्न केव्हां व कसे विचारावेत याचें विस्तृत विवेचन ३।१४।५–६ च्या टीकेंत पाहावें.

अशी श्रवणाची पात्रता येण्यास विवेक, वैराग्य व शमदमादि संपत्ति आधीं मिळविलेली पाहिजे. 'शमयम नियमचि फुलें' आलीं पाहिजेत; तरच रामकथा श्रवणानें 'ज्ञानफल' व 'हरिपदरतिरस' (१।३७।१४) मिळेल, मिळूं शकेल. यम नियमांचें पालन करून स्वधर्माचरण करण्यानेंच हीं फुलें येतात म्हणून पुढील मुख्य प्रकरणांत (११ व्या) कर्म विपाकाचा विचार करणें ओघानेंच प्राप्त झालें. तथापि अशा पद्धतीनें श्रवण करणाऱ्या मानसाच्या श्रोत्यांना श्रवणानें काय अनुभव आले हें आधीं दाखविणें भाग आहे. पुढल्या प्रकरणांत हे अनुभव सांगून नंतर कर्मविपाक हें ११ वें मुख्य प्रकरण सुरू होईल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १०।१४ 卐 卐 卐

श्रीमानस-श्रोत्यांचे अनुभव

१. उमा-पार्वती – (१) दो. १०८ मध्यें विचारलेल्या शंकेचें समाधान महेशांनीं शिवगीतेंत केल्यावर उमा म्हणते,

'परिसुनि तुमचें वच सम शशिकर । फिटे मोह शरदातप अतितर ॥
तुम्हि कृपाळु सब संशय हरले । रामस्वरूप मज आकळलें ॥
नाथ कृपें पळविला विषादा । (१।१२०।१–३)

(२) पुन्हां सर्व रामचरित्र ऐकल्यावर —

'श्रवुनि कथा शुभ उमा हर्षली। अति विनीत मृदु वाणी वदली ॥
धन्य धन्य मी धन्य, पुरारी ! । रामगुणां श्रुत भवभयहारी ॥
दो०– तुमच्या कृपें कृपायतन अतां कृतार्थ, न मोह ॥
विदित राममहिमा प्रभु चिदानंदसंदोह ॥
स्रवत नाथ आनन-शशी कथासुधा रघुवीर।
श्रवणपुटीं पिउनियां मन तृप्त नव्हे मतिधीर ॥ (७।५२।८ व दो० ५२ म)

(३) पुरवणी प्रश्नांचें विवेचन श्रवण केल्यावर सांगते,
'श्रवुनि कथा सब हृदिं अति भरली ! रुचिर गिरा गिरिजा उद्गिरली ॥
नाथ कृपें मम गत संदेहो। रामचरणिं नव उपजे स्नेहो ॥
मी कृतार्थ झाल्यें अतां कृपें तवहि विश्वेश।
रामभक्ति दृढ उपजली गेले सगळे क्लेश ॥ (७।१२९।७-८ व दोहा)

२. गरुड स्वानुभाव सांगतात,

(१) ऐकुनि रामकथा खगनाहो। वदला, मनीं परम उत्साहो ॥
गेला मम संदेह श्रुत सगळें रघुपतिचरित ॥
रामपदाब्जीं स्नेह तवाचि कृपें वायसतिलक ॥ ((७।६८ रा)

(२) भुशुंडी मोहकथा व राममहिमा श्रवण केल्यावर,
घडिघडि काकचरणिं शिर नमवी। प्रभु सम गणुनी प्रेम वाढवी ॥
गुरुविण भवनिधि कोणि न तरती। जरि विरिंचि शंकर सम असती ॥
संशय सर्प तात ! मज डसला। दुःसह लहरि कुतर्क वाढला ॥
तव रूपें गारुडि रघुनायक। मजला जगविति जनसुखदायक ॥
गेला तुमच्या कृपें मोह मम। रामरहस्य समजलें अनुपम ॥ (७।९३।४-८)

(३) काकाचें पूर्वचरित्र श्रवण केल्यावर गरुड म्हणाला,
'प्रभो ! प्रसादें तव, हृदयीं मम। संशय शोक न मोह नसे भ्रम ॥
पावन रामगुणग्रामां श्रुत। चित्त तव कृपें विश्रामें युत ॥ (७।११५।५-७)

(४) भुशुंडीगीता व सप्तप्रश्नगीता श्रवण केल्यावर शेवटीं,
'ऐकुनि भुशुंडिवचन शुभ प्रभुपदिं बघुनी स्नेह।
प्रेमसहित वदले गिरा गरुड विगतसंदेह ॥
मज कृतकृत्य करी तव भाषण। जें रघुवीर भक्तिरस-मिश्रण ॥
रामचरणिं नव रति उपजली। मायाजनित विपद नासली ॥
मोह जलधिं जहाज जाहलां। दिधलें नाथ विविध सुख मला ॥
मज करवेना प्रत्युपकारा। पायां पडतों वारंवारां ॥
माझें जीवन जन्महि सुफलित। नाथकृपेनें सब संशय गत ॥
समजा सदा मजसि निज किंकर ॥ (७।१२४ म–१२५।१०)

३. याज्ञवल्क्यांचा श्रोता — यांचा श्रोता श्रवणांत भावसमाधिमग्न असल्यामुळें न बोलतांच त्याचा अनुभव दिसतो.

४. श्रीतुलसीदासांचे श्रोते — हेंच सांगतात कीं श्रीरामचरितमानसाचें श्रवण केल्यानें अधिकारी श्रोता तर कृतार्थ होतोच पण अनधिकारी श्रोतेसुद्धां अधिक सुखी, अधिक नीतिमान् होतात व मंत्रमुग्ध होऊन श्रवण करतात.

येथें हें चालू प्रकरण व भवतरणोपाय हें १० वें मुख्य प्रकरण समाप्त झालें. कर्म-विपाक हें पुढलें मुख्य प्रकरण आहे.

जयमानस-गुरु गंगादास । अपली कृपा सुखद दासास ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१ 卐 卐 卐

श्रीरामचरितमानसाची रचना 'नानापुराणनिगमागम-संमत' असल्यानें यांत पूर्वजन्म, पुनर्जन्म, जिवाचें नित्यत्व आणि कर्मानुसार फलभोग यांविषयींचे उल्लेख म्हणजेच कर्मविपाकांविषयींचे उल्लेख साती सोपानांत आहेत.

१. श्रीमद्भगवद्गीतेंत जे कर्मसिद्धान्त सांगितले आहेत तेच मानसांत आहेत. कर्माच्या पुण्यप्रभावानें स्वर्गप्राप्ति **म्हणजेच मोक्ष हा पूर्वमीमांसकांचा सिद्धान्त मानसांत** भगवंतासच **मान्य नाहीं.** श्रीरघुनाथ सांगतात,

'**नरतनुचें फल विषय न भाई** । *स्वर्गहि अल्प, अंतिं दुखदाई* ।' (७।४४।१)

'**ते तं भुंक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।**' (भ. गीता)

(क) स्वर्गसुख अनित्य असून तेथेंहि दुःख, भय, चिंता, पळापळ, लंढाया, इत्यादि सर्व आहे, हें स्वर्गस्थ इन्द्रादि देवांच्या स्वभावादिवर्णनांत मानसांत जागोजागीं दाखविलें आहे.

२. **चार खाणी व ८४ लक्ष योनी** — जीव नित्य आहे हें 'जीव' या प्रकरणांत पूर्वींच दाखविलें आहे.

'**आकर चार लाख चौऱ्यायशीं– । योनीं भ्रमे जीव अविनाशी ॥**

फिरे सदा मायेनें प्रेरित । **प्रकृती काल *कर्मगुण* घेरित** ॥ (७।४४।४-५)

जीव मायेच्या प्रेरणेनें काल, कर्म, गुण व प्रकृती (स्वभाव) यांनीं घेरलेला असतो व भ्रमण करीत असतो; पण 'बंध-मोक्षदहि सर्वपर *मायाप्रेरक शीव*' (३।१५) शीव = शिव = ईश्वर.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । *भ्रामयन्* **सर्वभूतानि** *यंत्रारूढानि मायया* ॥ (भगवद् गीता) या श्लोकाचाच विस्तार वरील वचनांत आहे.

'***असुनि असा प्रभु हृदिं अविकारी*** । **दुःख दैन्य जगजीवां भारी** ॥' (१।२३।७)

मायाप्रेरक शिव-ईश्वर सर्व जिवांच्या हृदयांत निवास करतो व तो अविकारी आहे. भगवद्गीता श्लोकांत यंत्र कोणतें तें सांगितलेलें नाहीं पण तें कर्मयंत्र आहे. सुखाच्या आशेनें कर्मयंत्रांत बसतो व ईश्वराच्या प्रेरणेनें माया त्याला भ्रमवितेफिरविते. हें जत्रांतील-उरसांतील पाळण्यांसारखें आहे. मनुष्य तेथें स्वतः जाऊन, पैसे देऊन, त्या यंत्रांत (पाळण्यांत) बसतात व त्या पाळण्याचा मालक-स्वामी नोकराकडून पाळणे भ्रमवितो. भ्रमविणारी व्यक्ति जर सुंदर स्त्री असेल तर जास्त पैसे देऊनसुद्धां त्या पाळण्यांत बसणारांची खूप गर्दी होईल. ही मायानटी तशीच आहे. भगवान मायेकडून भ्रमवितात.

(३) कर्मयंत्र म्हणजेच विश्व असें म्हणणें अयोग्य नाहीं.

कर्मप्रधान विश्वा राखित । जो करि जसें तसें फळ चाखित ॥ (२।२१९।४)

कर्म करी जो त्या फळ मिळती । निगमनीति अशि सगळे वदती (२।७७।८)

म्हणे कौसिला दोष कुणा नहिं । **कर्म सुखदुःखें क्षति लाभहि** ॥

(क्षति = हानि) (२।२८२।३)

कोणि कुणा सुखदुःख न दाता । निजकृत कर्मयोग ते भ्राता ! ॥ (२।९२।४)

सुखदुःखलाभहानि इत्यादि ज्याच्या त्याच्या कर्मांचें फळ असतें.

४. ' फल युगलविध कटुमधुर । ' —(७।१३ छं. ५) --- कटु फल दुःख व मधुर फल सुख, पापकर्मांचें फळ दुःख व पुण्यकर्मांचें फळ सुख.

(क) ' ***करिति पाप पावति दुःख*** भय रुज वियोग शोक । ' (७।११० रा)

' **सुख वांछिति मूढ, न *धर्मरति*** । ' (७।१०२।२)

' न मागतां ***सुखसंपत्ती । सहज धर्मशीलासी जमती*** ॥ ' (१।२९४।३)

(धर्म = पुण्य प्र. प्र. ८।१४, पर्याय निदर्शन पाहा.) पापात्मक, धर्मविमुख, धर्मविरुद्ध (अधर्मी, निधर्मी) कर्मांचें फळ दुःखभोग; आणि धार्मिक, पुण्यात्मक कर्मांचें फळ सुखभोग हें ठरलें. उदा. ' **प्रजा पाळि अति वेदविधिं** *अवलव कुठेंहि नाहिं* । ' (१।१५३) त्याचा परिणाम—

'प्रजे न लेश दुःख, ***सुख भारी । धर्मशील*** सुंदर ***नरनारी*** ॥'(१।१५५।२)

पापलेश नाहीं म्हणून दुःखलेश नाहीं. आणि नरनारी धर्मशील असल्यामुळें भारी सुख त्यांना मिळालें.

५. हा धर्म कोणता ?

' ***वर्णाश्रम निजनिज धर्म-निरत वेदपथिं लोकं*** ॥

वर्तति, *पावति सदा सुख नहिं भय रोग न शोक* ॥ ' (७।२०)

वेदशास्त्रपुराणानुसार वर्णाश्रमधर्माप्रमाणें कर्म करणें व निषिद्ध, वेदशास्त्रादिविरुद्ध कर्म न करणें म्हणजेच धर्माचरण करणें, *धर्मशीलता*. वेदशास्त्रविरुद्ध आचरण-व्यवहार-कर्म-करणें आणि वेदशास्त्रादिकांनीं कर्तव्य म्हणून सांगितलेलें न करणें म्हणजे पापशीलता. वेदविधींचें पालन व निषेधांचा त्याग म्हणजेच धर्म = पुण्य = सुकृत. पुण्याला शुभ व पापाला अशुभ म्हटलेलें आहे.

६. कर्मफलदाता कोण ?

कठिण कर्मगति जाणि ***विधाता*** । जो ***शुभअशुभ सकल फलदाता*** ॥(२।२८२।४)

' कोणि म्हणे जर भला ***विधाता । सकलां*** म्हणति ***उचित- फलदाता*** ॥

(१।२२२।५)

शुभ वा अशुभ-कर्म अनुसारें । ईश देइ फल हृदयविचारें ॥ (२।७७।७)

जन्महेतु सकलां पितृमाता । ***कर्म-शुभाशुभ देइ विधाता*** ॥ (२।२५५।६)

'**त्यासि (*प्रभुशीं*) विरोध नका करुं नाथा । जीव, कालकर्में ज्या हातां** '(६।६।९)

(क) *श्रीराम* भरतास सांगतात,

'**मोहें पाप विविध आचरती । स्वार्थनिरत परलोक नाशती ॥**
कालरूप *मी* त्यांना भ्राता । *शुभ वा अशुभ कर्मफल दाता* ॥ ' (७।४१।४-५)

म्हणून ठरलें कीं *विधाता = ईश = प्रभु = राम कर्मफलदाता* आहे.

७. कर्मफल केव्हां मिळतें ?

'**शरद जाणुनी आले खंजन । *फळे सुकृत* जसं *सुसमयि शोभन*** ' (४।१६।६) *सुकृताचें शोभन* फळ सुसमयीं – *योग्य वेळीं मिळतें*. यानें हेंहि ठरलें कीं, दुष्कृताचें – पापाचें – अधर्माचें अशोभन – दु:खरूप – फळ योग्य वेळींच मिळतें. ही योग्य वेळ कोणती हें विधाता–ईश्वर जाणें. ' कठिण कर्मगति जाणि विधाता ' (२।२८२।४) कर्मांची फळ देण्याची गति ईश्वराशिवाय इतर कोणास कळणें शक्य नाहीं.

(क) अति तीव्रतम् कर्मांचें फळ या जन्मांतच मिळूं शकतें. उदा.—दशरथांच्या हातून चुकून तापसहत्या झाली त्याचें फळ त्याच जन्मांत मिळालें. सीता अविवाहित असतां तिनें शुकशुकींचा वियोग त्यांच्या इच्छेविरुद्ध केला म्हणून त्याच देहानें सीतेला गरोदरपणीं पतिवियोग सहन करावा लागला. (पद्म. पाताल अ. ५७)

(ख) अत्यंत तीव्रतम **कर्मांचें फळ क्वचित ताबडतोब** मिळतें. उदा. सुरपतिसुतानें काकरूपानें दुर्वर्तन केलें तेव्हां त्याचें फळ थोड्याच वेळानें एक डोळा द्यावा लागला.

(ग) **याच्या उलट** — मनुशतरूपानीं तपश्चर्या करून भगवान पुत्र होण्याचा वर मिळविला स्वायंभुव मन्वंतरांत ; आणि भगवान पुत्र झाले वैवस्वत मन्वंतराच्या २४ व्या त्रेतायुगांत ! म्हणजेच कर्मीत कर्मी पांच मन्वन्तरें व २३ महायुगें गेल्यावर त्या कर्माचें फळ मिळालें । म्हणून म्हटलें कीं –' कठिण कर्मगति जाणि विधाता. '

(८) **प्रारब्धकर्मभोग–भागि** — या जन्मांत केलेलें सर्वच कर्म या जन्मांत फळ देतें असें नाहीं. जीव जें फल भोगतांना दिसतो त्यांतलें बरेंचसें पूर्वीच्या जन्मांत केलेल्या कर्मांचें फल असतें, व क्वचित या जन्मांतल्या कर्मांचें असतें. या जन्मांतच जें भोगावयाचें असतें त्यास प्रारब्धभोग किंवा भावि म्हणतात. प्रारब्ध कर्मांचे जे भोग ते *प्रारब्धभोग*, दैव, भावि इत्यादि नामांनीं ओळखलें जातें. प्रारब्धकर्माचें फळ भोगल्याशिवाय गत्यंतर नसतें. यालाच ब्रह्मलिखित म्हणतात; हें सहसा टळत नाहीं.

(क) '**हिमवंता श्रुणु ! मुनि म्हणे ब्रह्मलिखित जें भालिं ॥**
देव दनुज नर नाग मुनि कुणि न शक्त जो टाळी ॥ (१।६८)
'**पुससिल कीं तूं विधिचें अंकां ।**
देसि वृथा कां जननि कलंका ।। (१।९७।८)
रामाज्ञा कुणि मोडुं न शकती । *कठिण कमगति नसे स्ववश ती* ॥

(ख) कित्येक वेळां असें दिसतें कीं,

' कोणि एक अपराध करि, भोगी दुजा फळास ॥

अति विचित्र भगवंतगति जगीं कळे कोणास ॥ (२।७७।–)

पण जें दिसतें तें तसें सत्य असतेंच असें नाहीं; कारण कीं कर्माची कठिण गति भगवान जाणतात. आणि भगवन्ताची गति त्यांच्या इच्छेशिवाय कोणास कळत नाहीं; **' पण कर्म करी जो त्या फळ मिळती '** हें ठरलेलें आहे. **' हरि इच्छा भावी बलवान् अति '** (१।५६।६) **असें भगवान शिव म्हणाले.**

' तुलसी जाशि भवितव्यता तैसे मिळे सहाय ।

आपण ये त्यापाशीं कीं त्याला घेऊन जाय ॥ (१।१५९म)

' भूप विकल मति भुले भ्रमानें । भावीवश वच ये न मुखानें ॥ (१।१७३।८) हें *प्रतापभानुचें घडलें.* **भूपति ! भावी ना टळे जरि न दोष तव कांहीं** (१।१७४).

उमा *पार्वती मातेला म्हणते,*

***कामीं लिखित* जर नाथ बावळा । द्यावा कां मग दोष कुणाला '** (१।९७।७)

' जें दुःख सुख मम लिखितभाळीं जाई तेथें मिळतसे (१।९७ छंद)

कैकयींविषयीं म्हणतात, **' मनीं प्रतीति *भाविवश* आली '** (२।१९।१)

दशरथांविषयीं सांगतात —

' तुलसी ! *नपति भवितव्यतावश* काम कौतुक मानि तें ॥ ' (२।२५ छंद

वसिष्ठ भरतास म्हणाले— **' पहा भरत !**

भावीप्रबल हानिलाभ जीवनमरण यशअयश विधिहातिं ' (२।१७१।)

सुमंत्र दशरथांस समजावतात—

' जन्ममरण सुखदुःखें भोगहि । विरह लाभ हानी प्रिय-योगहि ॥

स्वामी ! काल कर्मवश घडतीं । बलपूर्वक जशि दिवस रात्र तीं ॥ (२।१५०।५-६)

रात्रीचें किंवा दिवसाचें आगमन कोणास चुकवितां येत नाहीं, तसेंच प्रारब्धकर्मभोग चुकवितां येत नाहींत; तें ठरलेल्या वेळीं भोगावे लागणारच हें निश्चित असून,

' सुखिं हर्षति जड दुःखीं रडती । धीर मनीं उभयां सम गणती ॥ ' (चौ. ७)

सुमंत्र स्वतःविषयीं म्हणाले—' वाटे विधिनें मज दिलें हें यातना-शरीर । ' (२।१४६।–).

९. प्रत्येक जिवाचें प्रारब्ध भिन्न असतें—म्हणूनच,

' एक पित्याचे जरि सुत सारे । होति पृथक गुण-शीलाचारें ॥

पंडित कुणि तापस वा ज्ञाता । कोणि शूर धनवान् कुणि दाता ॥

कुणि सर्वज्ञ धर्मरत कांहीं ॥......कुणि पितृभक्त...... ॥ इ. (७।८७।१–४)

याप्रमाणें ठरलें कीं प्रारब्धकर्मभोग, ब्रह्मलिखित, कर्म, भावी, भवितव्यता, विधि, दैव चुकवतां येत नाहीं, हें *अनिच्छाप्रारब्ध होय.*

१०. स्वेच्छा व परेच्छा प्रारब्ध — अनिच्छा प्रारब्ध म्हणजे ब्रह्मलिखित टळत

नाहीं; पण स्वेच्छा व परेच्छा प्रारब्ध टाळतां येतात. सागर कसा तरून जावा असें रघुनाथानें सचिवांना विचारलें. सागराजवळ जाऊन त्यास प्रार्थना करावी असें बिभीषणानें सांगितल्यावर रघुनाथ म्हणाले,

' कथित सखे चांगल्या उपाया । करूं, होइ जर दैव सहाय ॥ (५।५१।१)

पण ' लक्ष्मणास हा मंत्र न भावे । रामवचें अति दुःखा पावे ॥ २ ॥

नाथ ! कोण तो दैव-भरोसा । सिंधु शोषणें करुनी रोषा ।। ३ ॥

दैव चि गति कीं भ्याड मनाची । दैव दैव ओरड अलसांची ।। ४ ।। (५।५१२)

प्रभूंनीं बिभीषणाच्या इच्छेप्रमाणें केलें नसतें व तीन दिवसांनंतर जें केलें तें त्याच वेळीं केलें असतें तर तीन दिवस जे कष्ट सोसले ते सोसावे लागले नसते. येथें परेच्छा व स्वेच्छा यांच्या संयोगानें फल भोगावें लागलें.

(**क**) कोणाचे अज्ञात संकल्प, दृष्टिशक्ति इत्यादींचें फल प्रयत्नांनीं चुकवितां येण्यासारखें असतें; म्हणून *अपायाला उपाय केला पाहिजे.*

११. कर्मानुसार जन्म —' जनि कर्मवश ज्या योनिं ' जनि = जन्म. (४।१० छं.) कर्मानुसार कोणत्या तरी जन्मास जावें लागतें. ' भ्रमूं योनिं जे जे कर्मानें ' (२।२४।५)

हरि गुरुनिंदक दर्दुर होतो । जन्म सहस्र तीच तनु लभतो ।।

द्विजनिंदक बहु नरकां भोगुनि । जगीं जन्मतो वायस होउनि ॥ इ.

(७।१२१।२३–२७ पाहा.)

(**क**) मनुशतरूपा पांच मन्वंतरांनंतर दशरथ-कौसल्यारूपानें जन्मास आलीं प्रतापभानु, अरिमर्दन, धर्मरुचि इत्यादि सर्व राक्षसदेहानें जन्मले इत्यादि उल्लेख पुष्कळ आहेत. काकभुशुंडीनें, आपल्या पूर्वजन्मांची हकीकतच सांगितली आहे.

१२. ' अन्ते मतिः सा गतिः ' — मरणकाळीं जी वासना पुढें आली असेल त्याप्रमाणेंहि जन्म होतो.

(**क**) योगाग्नीनें देहत्याग करतांना सतीनें केलेल्या संकल्पामुळें ती पार्वतीरूपानें जन्मली. योगाग्नीनें देहत्याग करणारे मुक्त होतात असा नियम असूनसुद्धां अंतकाळच्या संकल्पामुळें ती मुक्त झाली नाहीं. (१।६५।५-६ पाहा.)

(**ख**) अरण्यकांडांत शरभंग

—मग योगाग्नींत देह जाळला । रामकृपें वैकुंठा गेला ॥

परि हरिलीन न झाला मुनिवर । *आधि घेतला भेदभक्ति* वर ॥ (३।९।१-२)

१३. कर्मप्रधान विश्वा राखित —

' न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । ' (भ. गीता.)

जन्मास आलेल्या जिवाला कर्म करावेंच लागतें. याप्रमाणें कर्मयंत्रावर चढलेला जीव संसृतिचक्रांत फिरत राहतो; म्हणून या कर्मयंत्रांतून सुटण्याचा उपाय सांगणें जरूर आहे.

(**क**) *निष्कामकर्म करून तें ईश्वरार्पण करावें.* (१।१५६।१–२)

हृदयीं कांहीं फलाकांक्षा नाहि । भूप विवेकी परम सुजाणहि ॥
करि जो धर्म कर्म मनवाणीं । वासुदेविं नृप अर्पि ज्ञानी ॥

(ख) शूर्पणखा रावणास सांगते,

'**हरिस सुकर्म न करतां अर्पण । श्रम फल...करुनि ॥**' (३।२१।८–९)

सत्कर्म करून तें हरिला समर्पण न केलें तर त्या कर्माचें फल श्रमच! कर्म म्हणजे स्वधर्माचरण असा अर्थ आहे. (प्र. प्र. ६।६ *धर्म* पाहा.)

१४. अशा कर्म-धर्म-आचरणाचें फळ वैराग्य प्राप्ति हें आहे. '*विरतिस धर्म* (योग) दे ।' (३।१६।१) *यमनियमपालनयुक्त, निष्काम, ईश्वरार्पित, वेदपुराणोक्त धर्माचें फळ अपर वैराग्यप्राप्ति हें आहे.*

१५. केवळ ज्ञानमार्गानें कर्म बंधनांतून सुटणें अत्यंत दुष्कर आहे हें ' दार्शनिक सिद्धान्त ' या (९ व्या) मुख्य प्रकरणांत दाखवून नंतर सुलभ भवतरणोपाय कोणते हें ' भवतरणोपाय ' या (१० व्या) मुख्य प्रकरणांत दाखविलें.

'**त्यागिति कर्म शुभाशुभदायक भजतीं मज सुरनर मुनिनायक ॥**'

(७।४१।३-६ पाहा.)

असें भगवानच म्हणाले आहेत. शुभाशुभदायक = पुण्यपापदायक; म्हणजेच सकामकर्म आणि ईश्वरार्पित न केलेलें नित्यनैमित्तिकादि कर्म; यांचा त्याग करून म्हणजेच निष्काम ईश्वरार्पित कर्म करीत जे संत-सद्गुरु–मुखानें श्रीरामचरितमानस श्रवण (कथन) करतील ते संसृतिचक्रांतून सुटतील असा मानसांतील–श्रुतिसिद्धान्त आहे.

असें साधन करून जे रामभक्तिसंपन्न होत नाहींत त्यांस पुन्हां जन्म घ्यावा लागतो. त्या पुढल्या जन्मांत पूर्वजन्मींचे बलवान संस्कार जिवाच्या स्वभावांत व परिस्थितींत दिसतात; हें पुढील प्रकरणांत दाखविलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १।१२ 卐 卐 卐

पूर्वजन्म–संस्कार

पूर्वजन्मांतील संस्कार किती बलवान असतात याचें दिग्दर्शन मानसांत फारच मार्मिक रीतीनें केलेलें आढळतें. त्यांतील कांहीं नमुने येथें दिले आहेत.

१. प्रतापभानु व अरिमर्दन. (१।१५३।५ पासून दोहा १५३ पाहा.)

धनी ज्येष्ठसुत जो राज्यातें । म्हणती प्रतापभानु तयातें ॥ ५ ॥
अवर पुत्र अरिमर्दन नामा । भुजबल अतुल अचल संग्रामा ॥ ६ ॥
परम मित्रता त्या भावांची । प्रीति दोषछलहीना साची ॥ ७ ॥

सचिव सुजाण बंधु बलवीरहि । स्वतां प्रतापपुंज रणधीरहि ॥ २ ॥
सैन्य संगिं चतुरंग अंत ना। रणझुंझार सुभट ना गणना ॥ (१५४।२–३).

या दोन्ही भावांना विप्रशापामुळें राक्षसदेह मिळाला; *ऐश्वर्य प्राप्तीविषयीं शापानुग्रह झालेला नाहीं.* 'जा रजनीचर हो नृपा मूढा सहपरिवार।' (१।१७३). इतकाच शाप असतो.

' श्रुणु मुनि यथासमय *तो राजा* । झाला निशिचर सहित समाजा ॥
दशशिर तया वीस भुजदंडहि । रावण नाम वीर बलिवंडहि ॥
भूपानुज अरिमर्दन नाम । कुंभकर्ण झाला बलधाम ॥ ' (१७६।१-३)

(१) प्रतापभानु चक्रवर्ती राजा झाला होता तो स्वतःच्या प्रतापानें; पराक्रमानें तसाच तो रावणजन्मांत झाला; पण तामस देह व घोर तप यांची भर पडल्यानें त्यानें लोकपालांससुद्धां जिंकलें.

(२) प्रतापभानु आणि अरिमर्दन यांच्यांत निष्कपट, निर्दोष, खरें प्रेम होतें तसेंच रावणकुंभकर्ण यांच्यांत होतें, हें कुंभकर्णास जागें केल्यावर त्यांचा जो संवाद झाला (६।६२।८–६३।७) त्यांत दाखविलें आहे.

(**क**) अरिमर्दन जसा ' भुजबल अतुल, अचल संग्रामा ' होता तसाच कुंभकर्ण रावणापेक्षां बाहुबळानें श्रेष्ठ होता हें लंकेंतील युद्धांत दोघांच्या वर्णनांत स्पष्ट दिसतें. रावण मनांत कचरला, बाहुबल कमी पडूं लागलें कीं राक्षसी मायेचा, कपटयुद्धाचा आश्रय करी; तसें कुंभकर्णानें केलें नाहीं. हनुमंताच्या मुष्टीनें रावणास मूर्छा आली पण कुंभकर्णाच्या मुष्टीनें हनुमान मारुतसुत असून मूर्च्छित पडला आहे. या दृष्टीनें तुलना केल्यास पूर्वजन्मसाम्य दोघांत पुष्कळ आढळतें.

(३) प्रतापभानु कर्ममार्गांत निपुण होता; त्यानें हजारों मोठमोठे याग केले होते; तसाच रावण कर्ममार्गांत प्रवीण, यज्ञयागकर्मांत कुशल व अग्निहोत्र, अग्निशाळा असलेला होता; पण तामसी देहानें व वराच्या अहंकारानें त्यानें तामसी कर्म केलें इतकाच फरक.

(४) प्रतापभानु धर्मशील, सात्त्विक होता; पण तो हरिभक्त असल्याचा किंवा हरिपदप्रीतिमान असल्याचा उल्लेख त्याच्या चरित्रांत मुळींच नाहीं. राक्षसदेहाची व वर सामर्थ्याची जोड मिळाल्यानें रावण हरिविरोधी, विष्णुद्रोही बनला.

(५) पूर्वजन्मांत, निष्काम ईश्वरार्पित कर्म करणाऱ्या प्रतापभानूला सकाम, महा-कपटी, राज्यलोभी, दुष्ट, दंभी कपटमुनि(नृपा)ची थोडीशी संगति मिळाल्याबरोबर

जरा मरण रुज रहित तनु रणिं अजिंक्य होईन ।
करिन कल्पशत राज्य महि एकछत्र रिपुहीन ॥ (१।१६४)

अशी वासना उत्पन्न झाली होती. तिचा संस्कार इतका प्रबल कीं त्यानें राक्षसजन्मांत घोर तपश्चर्या करून ती इच्छा पूर्ण करण्याच्या बुद्धीनें मरणरहित होण्याचा वर

मागितलाच; पण तें अशक्य ठरल्यानें, नरवानर यांची सवलत ठेवली ती याच समजुतीनें कीं देवविजयी महाप्रतापी राक्षसास नर किंवा वानर मारतील हें अशक्य आहे. जरारोगरहित झालाच. एकछत्री महिराज्यच नव्हे तर तो स्वर्गाचासुद्धां राजा झाला. राज्य कल्पशत ऐवजीं १४ महायुगें म्हणजे १४ चौकड्या राज्य केलेंच. **भक्तिहीन परमधर्मशील सज्जनाच्या मनांत अल्प कुसंगतीनें उत्पन्न झालेली भोग-वासना किती बलवान असते हें येथें दाखविलें आहे.**

२. धर्मरुचि सचिव – बिभीषण

***सचिव धर्मरुचि* हरिपदिं प्रीती । नित्य शिकवि नृपहितार्थ नीति ॥** (१।१५५।३)
सचिव धर्मरुचि नांव जयाला । बंधु विमातृज तो लघु झाला ॥ (१।१७६।४-५)
पूर्व जन्मांत परस्परांचें प्रेम होतें पण भाऊ नव्हते; त्यामुळें बिभीषण सावत्र भाऊ झाला; पण पूर्वजन्म-संस्कारबलानें असा झाला :—

(१) **नाम बिभीषण विदित जनांना ।** ***विष्णुभक्त तो निधि विज्ञाना ॥***
(२) " **नृपहितकारक सचिव शहाणा ॥** " ***'नित्य शिकवि नृपहितार्थ नीती'*** (१।१५४।१, १५५।३)

असा होता तो राक्षस झाल्यावरसुद्धां रावणाचा सचिवच झाला; आणि नृपहितकारक नीतीच नेहमीं शिकवीत राहिला.

(३) पूर्वीं तो प्रतापभानूला हरिभक्तीचे धडे शिकवीत नसे; तसेंच बिभीषणानेंहि केलें; पण रघुवीरास शरण जाण्यांतच राजाचें व वडील भावाचें हित आहे असें ठरलें तेव्हांच त्यानें रामभक्ति शिकविली आहे.

३. कैकयी-मंथरा — (१) **समान संस्कार समान कार्य** करविण्यासाठीं त्या त्या व्यक्तींना एकत्र कसे आणतात याचें उत्तम उदाहरण कैकयीच्या बरोबर तिच्या पित्यानें मंथरेला पाठविणें हें आहे. *टीकेंत साधार स्पष्टीकरण केलें आहे.*

(२) कैकयीच्या मातेचे पतिविरोधी संस्कार कैकयींत जागृत झाले व त्यांनीं कसें कार्य केलें हेंहि पाहण्यासारखें आहे. वाल्मीकि रामायणांत सुमंत्रानें कैकयीचा जो अधिक्षेप केला आहे (अयोध्या सर्ग. ३५।१६–२७) त्यांत तिच्या मातेच्या स्वभावाचें वर्णन आहे; व मंथरेचा पूर्वेतिहासहि वाल्मीकि रामायणांत आहे; म्हणून मानसांत तें वर्णन नाहीं. अयोध्या दो. १२ व २०।४ च्या टीकेंत विस्तार पाहावा.

४. सती-दक्षकुमारी — सतीचें वर्णन करतांना *'सती जगजननि भवानी'* (१।४८।२) या तीनच गोष्टींचा उल्लेख प्रथम केला; चौथी गोष्ट (जन्म-कुल) अध्याहृत ठेवली गेली; पण सती शिवापमान करणार हें सुचविण्याचें ठरतांच दक्षसुता, दक्षकुमारी, प्रजेशकुमारी इत्यादि शब्दांनीं तो जन्मसंबंध अनेक वेळां सांगितला. दक्षाच्या स्वभावाचे शिवविरोधी, शिवापमानकारक संस्कार जागृत होऊन त्यांनीं दक्षकुमारी सतीकडून शिवापमान करण्याचें कार्य करविलें, म्हणूनच पूर्वीं विवाह ठरवितांना कुल, शील,

इत्यादींचा तपास करीत असत; पण आज तें लक्षांत कोण घेतो! तथापि दुष्परिणाम चुकत नाहींत.

आणखी पुष्कळ उदाहरणें मानसांत आहेत; पण विस्तारभयास्तव देतां येत नाहींत. वाचकांनीं या दृष्टीनें मानसांतील चरित्रांचें अवलोकन करावें.

पूर्व संस्कारांचा परिणाम मनुष्यांतच दिसतो असें नसून गायी, कुत्रीं, घोडीं, मांजरें इ. पशूंतसुद्धां दिसतो. गायागायांच्या स्वभावांत भिन्नता दिसते ती पूर्वसंस्कारांमुळेंच. तसेंच इतर पशु व पक्षी यांचें आहे; पण स्वभावांत बदल करण्याचें साधन त्या प्राण्यांत नाहीं; तें फक्त मनुष्य प्राण्यांनाच शक्य आहे. कर्मानें स्वभाव बनलेला असतो व कर्मानें स्वभावांत बदल होऊं शकतो. सुस्वभाव बनविण्यासाठींच धर्मशास्त्र व धर्माचरण आहे. हा धर्म म्हणजे वेदशास्त्रपुराणोक्त वर्णाश्रमधर्म होय. मानसांतील याचें वर्णन पुढील प्रकरणांत दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।३ 卐 卐 卐

श्रीमानसांत वर्णाश्रमधर्मादि

ब्राह्मणादि चार वर्ण आणि ब्रह्मचर्यादि चार आश्रम यांचे उल्लेख मानसांत कमी-अधिक प्रमाणानें साती सोपानांत आहेत. ब्राह्मण (विप्र, द्विज), क्षत्रिय (नृप, भूप), वैश्य व शूद्र हे चार वर्ण, आणि ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास हे चार आश्रम होत. या वर्णांचे व आश्रमांचे जे धर्म ते वर्णाश्रम धम. वेदपुराणोक्त सनातन धर्म मुख्यत्वें वर्णाश्रमधमपालनावर अवलंबून आहे.

वर्णाश्रमधर्माची ग्लानि किंवा उन्नति मुख्यतः राजसत्तेवर अवलंबून असते. जेथें राजा धार्मिक–धर्मशील असून राजधर्माचें-भूपधर्माचें उत्तम पालन करणारा असतो किंवा अशी राजसत्ता असते तेथें प्रजा सुखी असते; म्हणून मानसांत इतरांपेक्षां राज-सत्तेचें–राजाचें वर्णन अधिक आहे. मानसांतील या विषयांचे उल्लेख आतां काण्डशः द्यावयाचे आहेत.

(क) श्रुतिस्मृतिपुराणोक्त वैदिक सनातन धर्मच या प्रकरणांत मुख्य आहे. महा-काव्यलक्षणांतील ‘ अर्थ, धर्म, काम, मोक्ष ’ या प्रकरणांत (प्र. प्र. ६।६) इतर दृष्टींनीं विचार केला आहे तो पुन्हां अवलोकन करून हें प्रकरण वाचावें.

बालकाण्ड — या कांडांत प्रतापभानुचरित्रांत, दशरथचरित्रांत आणि जनक-पुरीवर्णनांत मुख्य उल्लेख सांपडतात. भार्गवदर्पविमर्दन प्रकरणांत मुख्यतः ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या धर्मांचें दिग्दर्शन केलेलें आहे. गूढार्थचंद्रिकेंत ठिकठिकाणीं स्पष्टीकरण व साधार विस्तार केला आहे.

(१) ' करुनि विश्व वश भुजबळें स्वपुरीं करी प्रवेश ।
अर्थ धर्म कामादि सुख सेवी समयिं नरेश ॥ १५४ ॥
भानूप्रताप नृपबलशाली– । कामधेनु भूमी शुभ झाली ॥
प्रजे न लेश दुःख, सुख भारी । धर्मशील सुंदर नरनारी ॥ २ ॥
सचिव धर्मरुचि हरिपदिं प्रीती । नित्य शिकवि नृपहितार्थ नीती ॥
गुरु, सुर, संत, पितर, भूदेवां । पूजी भूप सदा करि सेवा ॥
भूपधर्म जे वेदीं वानित । सादर सकल करी सुख मानित ॥
प्रतिदिन देइ विविध दानां । ऐके श्रुतिवर शास्त्रपुराणां ॥
विविध कूप कासार वापिका । सुंदर बागा सुमन वाटिका ॥
विप्रवास सुरसदनें सुंदर । सर्व तीर्थिं नृप निर्मि मनोहर ॥ ८ ॥
दो. ' वेदपुराणीं उक्त जे एक एक सब याग ।
वार हजार नृप करी सहित अनुराग ॥ १५५ ॥
हृदयीं कांहिं फलाकांक्षा नहि । भूप *विवेकी* परम सुजाणाहि ॥

(येथें विवेकी = आत्मज्ञानी हा अर्थ नाहीं.) परम सुजाण = अत्यंत व्यवहार–चतुर, नीतिनिपुण ज्ञानी = कर्म मार्गाचें ज्ञान असलेला;

करि जो धर्म-कर्म-मन-वाणीं । वासुदेविं नृप अर्पी ज्ञानी ॥

(क) यापुढील प्रतापभानुचरित्र वाचतांना खालील भेद ध्यानांत ठेवावा. मनुराजा वानप्रस्थ झाला तेव्हां,

***बळें सुता राज्यार्पण* केलें । काननिं नारीसमेत गेले ॥** (१।१४३।२)

प्रतापभानूचा पिता वानप्रस्थ झाला तेव्हां,

ज्येष्ठ *सुता* नृप *करि राज्यार्पण* । हरिसाठीं वनिं गेला आपण ॥ (१।१५३।८)

येथें ' बळें ' = जबरीनें = त्याची इच्छा मुळींच नसतां, हा उल्लेख नाहीं. पुढें राजाला उत्पन्न झालेल्या प्रबल कामनेचें बीज यांत दिसतें. (ख) शरण न येतां युद्धांतून पळून गेलेल्या एका राजाकडे प्रतापभानूनें विजयमदानें दुर्लक्ष केलें. या दोन गोष्टी त्याच्या पुढील विनाशास मूळ कारण आहेत; हा हरिभक्त नव्हता हें तिसरें कारण आहे. (ग) ' यथा राजा तथा प्रजाः ', ' राजा कालस्य कारणम् ' (म. भा.) राजा वेदधर्मपालक होता म्हणून प्रजा धर्मशील होती आणि यामुळें प्रजेला कोणतेंहि दुःख लेशमात्र नव्हतें; आणि सुख भरपूर मिळत होतें.

२. दशरथ राजा—

(१) रघुकुलमणि जे अयोध्याधिपति । नामें दशरथ विदित वेदिं अति ॥
धर्मधुरंधर गुणधी ज्ञानी । हृदयिं भक्ति मति शारंगपाणीं ॥
कौसल्यादी स्त्रिया प्रिय सब आचरण पुनीत ।
पति–अनुकूला प्रेम दृढ हरिपदकमलिं, विनीत ॥ १८८ ॥

दशरथाचें आणखी वर्णन २९४।१–४ यांत आहे तें पाहावें.

३. परशुरामगर्व-हरणांत — यांत श्रीगीताप्रतिपादित

> **शमोदमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
> **ज्ञानं विज्ञानमास्तिक्य ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥**

हे ब्राह्मणाचे नऊ गुण भृगुपतीनें घालविल्याचें दाखविलें आहे. विप्राच्या नऊ गुणांनीं रहित झाल्यावर ते जातीनें ब्राह्मणच राहिले आहेत. त्या प्रकरणांत दाखविलेले ब्राह्मणधर्म व क्षत्रियधर्म टीकेंत स्पष्ट केले आहेत. या प्रकरणाच्या शेवटीं ब्राह्मण धर्म स्वतंत्रपणें दाखविले आहेत. भूपधर्म हें स्वतंत्र प्रकरण पुढें (११ वें) आहे.

४. या काण्डांत जातकर्म, नामकरण, कर्णवेध, चौल, उपनयन व विवाह या संस्कारांचें वर्णन आहे. आणि दुग्धप्राशन, सूर्यावलोकन, भूम्युपवेशन (बालकाला भूमीवर ठेवणें), अन्नप्राशन (उष्टावण) इत्यादींचे उल्लेख १९८।८ पासून १९९ पर्यंत ध्वनित आहेत; ते काळाच्या निदर्शनासह टीकेंत उघड करून दाखविले आहेत. ‘ बालकांचे व इतर संस्कार ’ हें या प्रकरणांतील एक (८ वें) प्रकरणच आहे.

(क) मुंज झाल्यावर *ब्रह्मचर्याश्रमाचें* पालन, विद्यापठनासाठीं गुरुगृहीं वास व गुरुसेवा या गोष्टी धनुर्भंगापर्यंतच्या चरित्रांत दाखविलेल्या आहेत.

(ख) *वानप्रस्थाश्रमाचें* पालन कसें करावें हें मनुशतरूपाचरित्रांत दाखविलें आहे.

(ग) *वैश्यधर्म* जनकपुरींत नगर शृंगारणें व मंडपरचना करणें या वेळीं दाखविला आहे. अयोध्येंतील व्यापारी तर पाहिजे असेल त्यास पदार्थ फुकट देत असत !

(घ) शूद्रांच्या सेवाधर्माचें वर्णन सेवकधर्माच्या निमित्तानें मुख्यतः अयोध्याकाण्डांत आहे. सेवकधर्मप्रकरण पाहावें.

अयोध्याकाण्ड —

> ***शोच्य विप्र*** **जो वेदविहीन । त्यजुनी स्वधर्म विषयीं लीन ॥**
> ***शोच्य नृपति*** **जो नीति न जाणत । प्रजा प्राणशी प्रिय ना वाटत ॥**
> ***वैश्य*** **कृपण धनवान *शोच्य* तो । जो न अतिथि-शिव-भक्ति जाणतो ॥**
> ***शूद्र*** **विप्र-अपमानि *शोच्य* तो । मानी ज्ञानगर्वि बहु वदतो ॥**

याप्रमाणें क्रमशः चार वर्णांचे धर्म सुचविले व धर्माविरुद्ध आचरण कोणतें तें स्पष्ट सांगितलें, आतां आश्रमधर्म पाहा :—

> ***ब्रह्मचर्य*** **जो व्रत ना पाळी । शोच्य किं *बटु* गुर्वाज्ञा टाळी ॥ ८ ॥**
> ***शोच्य गृही*** **जो मोहवश कर्मपथाला त्यागि ॥**
> ***शोच्यहि यती*** **प्रपंचरत जो न विवेकि विरागि ॥ १७२ ॥**
> ***वानप्रस्थहि*** **शोका जोगा । त्यजुनि तपा ज्या आवड भोगां ॥ १ ॥**

शूद्रधर्मवर्णनानंतर स्त्रीधर्मवर्णन आहे.

> **‘ शोचनीय पतिवंचक *नारी* । कुटिल कलहप्रिय इच्छाचारी ॥ ७ ॥**

मानवधर्म सुचवितात — ज्यांना वर्णाश्रमधर्माचा आदर वाटत नसेल व आपण पशु नसून मानव आहोंत असें जे मानीत असतील व 'मानवधर्म, मानवधर्म' असें म्हणण्यांत ज्यांस आनंद वाटत असेल त्यांनीं पुढील तीन चौपयांत सुचविलेल्या मानव-धर्माचें परिपूर्ण आचरण करावें, व सर्व लोकांकडून करवावें; मानवधर्मास लज्जास्पद असणाऱ्या राक्षसधर्माचा व पशुधर्माचा त्याग करावा. **एवढेंच सर्वांनीं केलें तरी सर्व राष्ट्रच नव्हे तर सर्व जग सुखी होईल.**

शोच्य पिशुन विण हेतू क्रोधी । जननि जनक गुरु बंधु विरोधी ।।
शोच्य सर्वपरिं पर-अपकारी । निज तनु-पोषक निर्दय भारी ।।
सर्वपरीं अति शोच्य सतत तो । जो छल त्यजुनी हरिस न भजतो ।।(१७३।२-४)

कोणाची चहाडी, निंदा करूं नये, परदोषदर्शन व चर्चा सोडावी. आई, बाप, गुरु, बंधु, इत्यादिकांशीं विरोध न करतां त्यांची सेवा करावी. दुसऱ्याचें अहित करणें, दुसऱ्यांस पिडा, त्रास देणें, दुःख देणें इत्यादि अपकार करणें सोडावें व दुसऱ्यांचें हित करावें, परोपकार करावे. आपल्या सुखाकडे पाहूं नये. म्हणजेच स्वार्थी बनूं नये. निर्दयपणा सोडून दयाशील व्हावें, आणि मानवाचें मुख्य कर्तव्य म्हणजे छलकपट, अन्य भरवंसा, आशा इत्यादि सोडून हरिभजन करावें. असें जो करील तोच मानव म्हणण्यास योग्य ! **या मानवधर्माचें पालन न करतां नुसतें वर्णाश्रमधर्माचें पालन केल्यानें समाज व व्यक्ती सुखी होणार नाहींत**; व संसृतिविनाश तर नाहींच होणार.

अरण्यकाण्ड — (१) '**जपयोग धर्मसमूहिं मनुजा भक्ति अनुपम मिळतसे** ।। (६ छं.)

(२) '**प्रथम विप्रपदिं परमा प्रीती । *स्वःस्वकामिं* निरती श्रुति रीतीं** ।। (१६।५)

(३) प्रभु गंधर्वाला सांगतात :—

श्रुणु गंधर्वा तुला सांगतों । ब्रह्मकुलद्रोहि न मज रुचतो ।। ८ ।।
त्यजुनी कपट तनमन वचनिं जो भूसुर सेवील ।।
मी विधि शिव सुर सर्वही त्याला वश होतील ।।३३।।
शापिति ताडिति परुष भाषती । विप्रपूज्य अस संत सांगती ।। १ ।।
विप्रपूज्य गुण शील विहीनहि । ज्ञानिं निपुण गुणगणीं शूद्र नहि ।।

यावरून ठरलें कीं वर्णभेद जन्मानें आहे. गुणकर्मावरून जन्मानंतर ठरविणें चूक आहे.

(४) **धर्म सकल सरसिज-वृंदाही । अधम सौख्यदा *स्त्री* हिम दाही ।।**

किष्किंधाकांड — या काण्डांत वर्षा व शरद वर्णनांत उपमादिकांच्या योगें विविध विषयांचें प्रतिपादन केलें आहे; त्यांत वर्णाश्रमधर्माचें व मानव धर्माचेंहि वर्णन आहे; तें संकलित करून टीकेंत दिलें आहे तें—

(१) **ब्राह्मण** — पाखंडवादांत न शिरतां वेदादि सद्ग्रंथांचें पठन पाठन करून त्यांचें संरक्षण करावें व वेदधर्ममार्ग लुप्त-गुप्त होऊं देऊं नये.

(क) **क्षत्रिय राजा** —

‘ पंकजरेणु रुचिर अशि धरणी । जशि नय निपुण नृपाची करणी ॥ ’
राजा शेतकऱ्यासारखा असावा; विजयादशमीला त्यानें विजयासाठीं बाहेर पडावें.

(ख) **वैश्य** — ‘ उपकाऱ्याची संपत्ती जशि ’–इतर वर्णाश्रमी लोकांवर उपकार करण्यांत त्यानें आपली संपत्ति खर्च करावी.

(ग) **शूद्र** — द्विजद्रोह, द्विजापमान करूं नये.

(घ) **स्त्रीधर्म –फुटुनि बांध अतिवृष्टिं वाहती । स्त्रिया स्वतंत्रा जशा बिघडती ॥**
स्त्रियांनीं स्वतंत्र होऊं नये; व धर्मनीतिशास्त्रमर्यादांचा भंग करूं नये.

(२) **आश्रमधर्म** — ब्रह्मचाऱ्यांनीं-बटूंनीं वेदाध्ययन वगैरे करावें.

(क) **गृहस्थ** — ‘ **जसा विरतिरत मुदित गृहि हरिभक्ता पाहून** ’ ॥ १३ ॥
धर्माचरणानें वैराग्यसंपन्न होऊन गृहस्थानें हरिभक्त दर्शन-समागम करण्यांत आनंद मिळवावा.

(ख) **वानप्रस्थ** — ‘ साधक मन जसं मिळत विवेक । ’ तपश्चर्यारूपी साधन करून वानप्रस्थानें ज्ञान मिळवावें.

(घ) **संन्यास–‘स्थगित पथिक ठिकठिकाणिं नाना । जशिं इंद्रियें निपज जैं ज्ञाना**’ ॥
पूर्वाश्रमांत प्राप्त झालेलें ज्ञान दृढ करून इंद्रियें पूर्ण वश करावीं.

सुंदरकाण्ड — (१) विप्ररूपधर हनुमंताचा बिभीषणानें योग्य सन्मान केला आहे. ‘ विप्रपूज्य ’ हें दाखविलें आहे.

(क) विप्रवध, विप्रहत्या हें फार मोठें पाप आहे हें दाखविलें आहे.

(ख) **खलमंडलिं दिनरात वसतसां । सखे ! धर्म निर्वाह तरी कसा ॥**
खल संगतींत राहून ब्राह्मणांनीं स्वधर्मपालन करणें फारच कठिण आहे.

(ग) **क्षत्रिय — शरणागतास जे त्यजिति निज अनहित मानून ।**
ते नर पामर पापमय, हानि त्यांस देखून ॥ ४३ ॥
भूपधर्माचें आणखी वर्णन भूपधर्मप्रकरणांत पाहा.

या काण्डाचा बराचसा कथाभाग लंकेंत व सागरतीरावर घडला असल्यानें वर्णाश्रम-धर्माचें वर्णन फार थोडें आहे.

लंकाकांड — वर्णाश्रमधर्माचें वर्णन करण्यास या काण्डांत फारसा वावच नाहीं; तथापि अल्पांशानें वर्णन आहेच.

(१) **कवच अभेद्य विप्र-गुरु-पूजा । यासम विजय-उपाय न दूजा ॥**
(२) **सखे धर्ममय असा रथ जया । जिंकण्यास रिपु कुठें नहिं तया ॥**
दो. ८०।५ पासून *धर्ममय रथाच्या* रूपकानें **मानव-‘ धर्मगीता** ’च सांगितली आहे.

(३) रथांत बसून युद्धासाठीं निघतांना श्रीरघुवीर ‘ विप्रचरणपंकाजि शिर नमति ’ (९०।१).

(४) रावणादिक सगळे उत्तम विप्रकुळांत जन्मूनसुद्धां विप्रशापामुळें पापरूपच

होते तथापि अग्निहोत्र, यज्ञयाग, संध्यादि नित्यकर्म आणि शिवपूजन ते करीत असत. यज्ञांच्या योगें त्यांनीं असामान्य सामर्थ्य मिळविलें होतें हें मेघनादाच्या व रावणाच्या यज्ञवर्णनांत स्पष्ट दिसतें. ते तामस यज्ञ करीत असत इतकेंच (टीका पाहा).

उत्तरकाण्ड — (१) रामराज्यांत सर्व लोक वर्णाश्रमधर्माचें पालन पूर्णपणें करीत असत :—

राम राज्यिं बसतां लोकत्रय । झाले हर्षित विगत शोकभय ।। ७ ।।

कोणि कुणासि न करिति शत्रुता । **प्रभुप्रतापें** ***गता विषमता*** ।। ८ ।।

'गता विषमता' याचा अर्थ बाह्य विषमता असा भलताच करतील हें जाणून स्पष्ट बजावतात,

दो० – '*वर्णाश्रम निज निज धर्म-निरत वेद पथिं लोक* ।।

***वर्तति*, पावति सदासुख, नहिं भय रोग न शोक '** ।। दो. २०

(**क**) वेद शास्त्रोक्त वर्णाश्रमधर्माप्रमाणें बाह्य आचरणांत व व्यवहारांत जे भेद व जी विषमता राखणें आवश्यक आहे, तेवढी राखली जात होती, पण मनांत भेद नव्हता, मनांत विषमता नव्हती; म्हणून —

प्रीति परस्पर सब नर करती । *रत निजधर्मिं यथा श्रुति नीती* ॥

रामभक्तिरत पुरुष नारी । सकल परमगतिचे अधिकारी ' (२१।२,४).

(**ख**) '**सब उदार सब पर-उपकारी ।**

पुरुष एकपत्नीव्रतधारी । त्या मनवचकृतिं पतिहितकारी ।। (२२।७–८).

(**ग**) '**धर्म चारि चरणीं जगिं राही । पूर्ण, सदा स्वप्निंहि अघ नाहीं** ॥ (२१।३)

(२) कलिप्रभाव वर्णनांत (दो. ९६–१०२) वर्णाश्रमधर्मादिकांचें विस्तृत वर्णन आहे, तें ग्रंथांत व गूढार्थ चंद्रिकेंत पाहावें.

ब्राह्मण कसा असावा – भार्गवदर्पविमर्दन-प्रकरणांतील ब्राह्मणधर्माविषयीं वचनें:—

(१) कृपा विप्र उरिं फार असावी–*कृपाशीलता*. (२) त्यजा विप्रवर रोष–*अक्रोधता*. (३) कोटिकुलिशसम शब्दां धारा– *तपोबल, शाप-अनुग्रह-सामर्थ्य असावें*. (४) 'जर संतोष न '–*संतोष* असावा. (५) बाल–दोषगुण गणति न साधू–*परदोषपराङ्मुखता*. (६) अश्रम गुरु-आनृण्य पावतो–*देवर्षि पितृ-ऋणमुक्तता*. (७) ज्ञानि सुशील धीर तुम्हि सम–*ज्ञान, विज्ञान, सुशील, समता*. (८) क्षमा विप्र अपराध आमचे–*क्षमाशीलता*. हीं वचनें बाल. दो. २६९–२८४ पर्यंत आहेत. (९) धन्य विप्र निज धर्म न टाळी (७।१२७।६) आणखीं बरींच वचनें पूर्वीं दिलीं आहेत; कलिवर्णनांत (उत्तरकांड) आणि इतरत्रसुद्धां बरींच आहेत.

उपसंहार — अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह यांच्या पायावरच वर्णाश्रमधर्माचें आचरण झालें पाहिजे; हें महाकाव्यलक्षणांत प्र. प्र. ६।६ मध्यें '*धर्म*' वर्णनांत पूर्वींच दाखविलें आहे. अशा प्रकारच्या धर्माचरणानेंच वैराग्य उत्पन्न होऊन, मन-

मति-चित्त लावून रामकथा श्रवण करतां येईल व कर्मबंधांतून सुटतां येईल. अशा प्रकारच्या धर्माचरणानें बाह्य विषमता राहूनसुद्धां मानसिक समता व परस्पर प्रीति उत्पन्न होते; हें रामराज्यवर्णनांत सिद्ध झालें आहे व अनुभवानेंहि सहज सिद्ध होतें. वादविवादानें मात्र होत नाहीं ! हें असें घडण्याचें कारण म्हणजे कर्मविपाक-सिद्धांतातील एकच महत्त्वाचें सूत्र सर्वांच्या मनांत, वाचेंत व कृतींत उतरलें होतें. ते तसें कृतींत, मनांत व वाणींत बिंबल्याशिवाय बाह्य समता कितीहि वाढविली तरी द्वेष, मत्सर, वैर, स्वार्थ इत्यादींचा अभाव होणार नाहीं. त्याच सूत्राचा मानसांत दिसणारा प्रभाव पुढील प्रकरणांत दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।४ 卐 卐 卐

कोणि कुणा सुख दुःख न दाता । निज कृत कर्मभोग ते भ्राता ! ॥

वर्णाश्रमधर्माचें पालन करणारा असो वा नसो, वरील कर्मविपाकसिद्धान्त मनांत ठसून कृतींत व वाणींत उतरल्याशिवाय कोणालाहि कोणत्याहि प्रयत्नानें दुःखरहित होतां व राहतां येणार नाहीं. **या सिद्धान्ताचा सक्रिय अवलंब केल्याशिवाय मानसिक सुख, शान्ति, समाधान बाह्य समतेनें मिळणार नाहीं.**

हा कर्मविपाक-सिद्धान्त मानसांत लक्ष्मणगीतेंत श्रीरामानुजानें (सुमित्रानंदनानें) निषादराजास सांगितला आहे. हा सिद्धान्त मानसांतील पुष्कळ व्यक्तींच्या रक्तांत भिनलेला दिसतो; त्यामुळें आपल्यावर कोसळलेल्या आपत्तींचें, दुःखांचें खापर, दुःखदायक दिसणाऱ्या व्यक्तींवर न फोडतां बहुधा सर्वच व्यक्ती आपल्या स्वतःच्या कर्माला, दुर्भाग्याला, दैवाला, दोष देतांना दिसतात. वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्याच्या व हिताच्या दृष्टीनें असें घडणेंच आवश्यक आहे.

आपल्यावर आलेल्या दुःखसंकटादिकांस कोणीतरी 'क्ष' व्यक्ति प्रत्यक्ष कारण झालेली दिसत असून त्या व्यक्तीस कारण न मानतां, वाईट न म्हणतां, त्या व्यक्तीला तोंडावर किंवा मागें दोष न देतां, निंदा न करतां, **आपल्यावर आलेल्या संकटांचें, महा अनर्थांचें, असह्य दुःखांचें कारण आपलें स्वतःचें पूर्वकर्म, प्रारब्ध, अभाग्य' दुर्दैव आहे असें मानणेंच शास्त्रशुद्ध आहे; हेंच सुविचारी सक्रिय विवेकी धर्माचरणाचें लक्षण आहे.**

अशी भावना भारतांतसुद्धां दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालल्यानेंच बाह्य समता वाढविण्याचा अट्टाहास चालू असूनसुद्धां असंतोष, परस्पर द्वेष, मत्सर, वैर, तिरस्कार यांचा वणवा कुटुंबांपासून सर्व देशांत दिवसेंदिवस जास्तच पसरत आहे ! श्रीरामचरितमानसांतील मुख्य मुख्य प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं (विशेषतः बाल व अयोध्या कांडांत)

ही भावना सदा सक्रिय जागृत असल्याचें पदोपदीं प्रत्ययास येतें. इतर प्रचलित रामायणांत अशी वस्तुस्थिति नाहीं. ज्या *अध्यात्म रामायणांत हा वरील सिद्धान्त सांगितला आहे, त्यांतसुद्धां तो इतका सक्रिय व व्यापकतेनें प्रगट झालेला आढळत नाहीं !*

कोणी कोणास सुख किंवा दुःख देत नाहीं; सुखदुःखांचें कारण ज्याचें त्याचें कर्म आहे हें '*कर्मविपाक*' (११।१) प्रकरणांत दाखविलें आहे.

आपल्यावर आलेल्या दुःखांचें खापर आपल्याच कर्मांवर फोडलेलें, मानसांत वारंवार दिसत राहिल्यानें श्रोत्यांच्या व वक्त्यांच्या हृदयांतसुद्धां ही भावना हळुहळु बिंबते, व द्वेष, वैर, विरोध इत्यादि मनोविकारांची उत्पत्ति होण्यास आळा बसतो. अशा भावनेनें स्वतःची सहनशीलता व धैर्य वाढून समाजांत द्वेष, वैर, परदोषचर्चा, परनिंदा इत्यादींना ओहोटी लागते; व समाजांतही समाधान वाढून परस्पर स्नेहाचे, प्रेमाचे व नात्याचे संबंध दुरावत नाहींत. श्रीमानसाच्या सद्यःफलदायी अनेक वैशिष्ट्यांपैकीं हें एक आहे.

स्वतःवर दुःख कोसळलेलें नसून, अनेकांवर असह्य दुःख कोसळल्याचें ऐकल्यावर त्या दुःखास कारण झालेल्या व्यक्तींच्या नांवाचा कोळसा उगाळीत न बसतां, वाईटांतून चांगलें काय निष्पन्न झालें किंवा होण्यासारखें आहे हें पाहण्याची वृत्ति अगदीं अशिक्षित, जंगली, रानटी, खेडवळ अशा लोकांतसुद्धां असलेली मानसांत दिसते. अनिष्ट घटनेचा अशा प्रकारें विचार करणें समाजस्वास्थ्याच्या व स्वतःच्या समाधानाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. आतां मानसांतील उदाहरणें पाहूं.

१. सती-दक्षकुमारी — सतीनें शंकराशीं-पतीशीं-कपट केलें, असत्य बोलली, सीता बनल्याचें व परीक्षा घेतल्याचें लपवून ठेवलें; पति आपला परित्याग करणार हें तिला तर्कानें कळतांच ती स्वतःशींच म्हणते,

'मग मनिं तर्क करी सती जाणति सब सर्वज्ञ ।
म्यां कृत कपटा शंभुसी नारि सहज जड अज्ञ' ।। **५७ रा** ।।
सोरठा–**'पयसम भाव जलास बघा प्रीतिची रीति बरि ।**
भिन्न होइ रस-नास आम्ल कपट पडतांच परि' ।। ५७ म ।।

तिनें इतर कोणास दोषी न ठरवितां आपला अपराध ओळखून स्वतःसच दोष दिला; एवढेंच नव्हें तर ती म्हणाली,

'कृपासिंधु शिव परम अगाधहि । प्रगट न वदले मम अपराधहि ।।

(१।५८।२ गूढार्थचंद्रिका पाहा).

२. महेश-रुद्र-शंकर — जे फार क्रोधी, उतावीळ, लहरी असा समज आहे, त्या शंकरांशीं सतीनें कपट केलें; धादांत खोटें बोलली तेव्हां,

'ध्यान धरुनि तैं शंकर पाहति । सर्व सतीकृत कपटा जाणति ।।

तदा राममाये शिर नमिलें। जिनें सतीमुखिं मृषा वदविलें ॥ (१।५६।४-५). सतीनें अपराध केला, ती खोटें बोलली, ती पापीण आहे, असें मनांतसुद्धां आलें नाहीं व ठरविलें कीं ' हरि-इच्छा भावी बलवान् अति ' (१।५६।६). आजच्या स्त्रीदाक्षिण्यवादी कोणत्या पतीनें असें मानलें असतें व कपटाबद्दल एक अक्षरसुद्धां उच्चारलें नसतें ?

३. **प्रतापभानु सम्राट** — कपटमुनि बनलेल्या राजानें प्रतापभानूचा विश्वासघात करून केवढा घोर विनाश व वंशोच्छेद केला ! तरीपण त्यानें त्या कपटी मुनीबद्दल एकहि वाईट शब्द उच्चारला नाहीं ! कीं त्याला पकडून आणण्याचा प्रयत्न केला नाहीं; राजानें *आपलीच चूक ओळखली.*

४. **पार्वती**– ' **कां बावळा वर निर्मि विधि जो तुजसि सौंदर्यास दे ॥** (१।९६ छंद) इत्यादि म्हणून पार्वतीची आई विधीला व नारदाला दोष देऊं लागली; तेव्हां कन्या पार्वती आईची समजूत घालते कीं,

' कर्मि लिखित जर नाथ बावळा । *द्यावा का मग दोष कुणाला* ॥
पुसशिल कीं तूं विधिचे अंकां । घेसि वृथा कां जननि कलंका ॥

छंद —' जें दुःख सुख मम लिखित भाळीं-जाइं तेथें मिळतसे '।

५. **दशरथ सम्राट (अयोध्याकांड)**—कैकयीच्या दुष्ट हेतूंमुळें व तिच्या कपटामुळें रामचंद्रासारख्या निरपराधी पुत्रास १४ वर्षे मुनिव्रत वेष, आहार स्वीकारून वनवास भोगावा लागणार व स्वतःस मरण येणार हें स्पष्ट झाल्यावर आणि कैकयीनें केसानें कंठ कापला हें कळल्यावरसुद्धां *मानसांतील दशरथ* तिला दोष न देतां, तिच्यावर क्रोध न करतां, तिला अपशब्दही न बोलतां मनांत काय म्हणतात पाहा—

(क) दो. — घडे काय कोण्यासमयीं *हृतनारीविश्वासें* ' (२।२९)

' मीं स्त्रीवर विश्वास ठेवला म्हणून माझा घात झाला.' ' तिनें माझा विनाश केला ' असें मनांतसुद्धां आलें नाहीं ! नंतर तिला विनवितात कीं,

(ख) प्रिय हास रुष सोडुनी माग करुनि सुविवेकें ॥
तर पाहिन डोळे भरुनि भरता नृपाभिषेक ॥ ३२ ॥
वदें स्वभावें छल न मनाही। जीवन मम रामाविण नाहीं ॥ ३३।२ ॥

इत्यादि विनविल्यावर कैकयी म्हणते:

(ग) ' द्या किं अयश घ्या वदून ' नाहीं ' । बहूप्रपंच न रुचे मलाही ॥
राम साधु तुम्ही साधु शहाणे । रामजननि साध्वी मी जाणें ॥
चिंति कौसिला भलें मम जसें । देइन तिज विख्यात फळ तसें ॥

इत्यादि स्पष्ट बोलून अत्यंत रोषानें ताडकन उठली तेव्हां दशरथ म्हणतात, ' नारि मिषें शिरिं मृत्यू नाचे ॥ ' (३४।५) स्त्रीला निमित्त करून माझा मृत्यु माझ्या डोक्यावर नाचत आहे.. स्त्री मला मारीत आहे असें मनांतसुद्धां म्हणाले नाहींत ! *दशरथ जें म्हणाले तेंच सत्य आहे; हेंच सज्जनांचें लक्षण आहे.*

(घ) राजा बोलत नाहीं असें पाहून कैकयीनें आपल्या कोमल मुखानें पुष्कळ आग पाखडली तेव्हां दशरथ तिला स्पष्टच म्हणाले–

' श्रवुनि मर्म वच नृप म्हणे वद, *तव दोष न कांहि* ।
पिशाच्चसा लागून तुज वदवि काळ मम पाहि ॥ ३५ ॥ '

तूं जें बोललीस त्यांत तुझा कांहीं दोष नाहीं, बोल तूं; माझा काळच पिशाच्चासारखा तुला लागून तुझ्याकडून वदवीत आहे. वाल्मीकींतील दशरथ या प्रसंगीं इतके विवेकी, सहनशील, शान्त, अक्रोध व तत्त्वनिष्ठ आहेत काय ?

६. **कौसल्या** (१) –वनवासास जाण्यापूर्वी राम कौसल्येची अनुज्ञा व निरोप घेण्यास गेले. तिला वाटलें कीं राज्याभिषेकापूर्वी नमस्कार करण्यास प्रियतम पुत्र आला आहे. अशा भावनेंत दंग असलेल्या कौसल्येला वनवासाची सर्व हकीकत कळली तरी ती *कैकयीविरुद्ध एक शब्दसुद्धां बोलली नाहीं;* आणि उलट, पुष्कळ विचार करून मनांत म्हणते,

' म्हणूं वनीं जा तरि अतिहानी । संकट–चिंता–व्याकुळ राणी ॥
स्त्रीधर्मां समजुनी शहाणी । रामभरत सुतयुग सम मानी ॥
राममाय ती स्वभाव–सरला । वदे धरुनि भारी धीराला ॥
धन्य बाळ ! करिसी कीं इष्टाचि । सर्वधर्मीं पित्राज्ञा श्रेष्ठचि ॥ (५५।५–८)

(क) यापेक्षांहि मोठें आश्चर्य व परमोच्च आदर्श पाहा : —

' जर केवळ पित्राज्ञा ताता ! । जाइ न; अधिक मानुनी माता ॥ १ ॥
***माय बाप* जर कथिती जावें । वन किं अयोध्याशत समजावें ॥ २ ॥**

येथें माय = कैकयी माता. आणखी पाहाः —

(ख) **' आज *सुकृत सकलांचें सरलें* । *काल कराल उलटला* ठरलें ॥**
विविधा विलपुनि चिकटे चरणां । *परम अभागिनि मानि आपणां* ॥

कैकयीला यत्किंचित दोष न देतां म्हणाली कीं सर्व लोकांचें पुण्य संपलें, आणि स्वतःचें परम अभाग्य फळास आलें. वाल्मीकि रामायणांतील कौसल्या अशी आहे काय ? नीट तपासून सांगावें !

(ग) कौसल्या भरताला म्हणाली,

' नको मानुं मनिं हानी–ग्लानी । *काळकर्मगति अघटित गणुनी* ॥
द्यावा दोष न कुणाहि ताता ! । सर्वस्वीं मज वाम विधाता ॥ (१६५।६-७)

७. **लक्ष्मण** — मानसांतील लक्ष्मणानें वनगमन–समयीं दशरथ, कैकयी किंवा दैव इत्यादि कोणाचा व कशाचा विचारच केला नाहीं. यांपैकीं कोणाच्या किंवा भरताच्या नांवाचा उच्चारहि केला नाहीं. प्रभुबरोबर वनांत जावें हा एकच विचार परम प्रबल आहे. वाल्मीकींचा लक्ष्मण बापाला, भरताला वगैरे ठार मारण्याची भाषा श्रीरघुनाथाजवळ कौसल्येसमोर बोलला आहे !

८. सुमित्रा — लक्ष्मणाकडून रामवनवासाची वार्ता कळतांच पहिल्या दुःखावेगांत—

दो.— ***स्मरुनि* सुमित्रा रामसिता रूप, सुशील, सुभाव ॥**

नृपस्नेह* मस्तक पिटि *पाषिण साधी डाव ॥ ७३ ॥

असें वैधव्याची कल्पना पुढें येऊन 'पाषिण साधी डाव' एवढें कैकयीविषयीं एकदां बोलून गेली; पण पुन्हां कैकयीबद्दल एक शब्दही न बोलतां प्रिय ज्येष्ठ पुत्रास सांगते कीं,

'**राम जाति वनिं तुमचें भाग्यहि । ताता ! कांहीं कारण नान्यहि** ।। (७५।३)

तुमच्या भाग्यानेंच राम वनांत जात आहेत, दुसरें कांहींसुद्धां कारण नाहीं ! येथें **अत्यंत वाईटांतून अत्यंत चांगलें काढलें !**

९. सीता — 'सेवासमयीं '***दैव वनि धाडी***' (६९।४) इतकेंच कौसल्येला म्हणाली आहे.

१०. वसिष्ठ, अरुन्धति, सुमंत्र इत्यादि— वसिष्ठ, अरुन्धती, सुमंत्र इत्यादि कोणीच कैकयीला दोष दिलेला नाहीं. किंवा भरताविषयीं संशय आलेला नाहीं. भरत आल्यावर दरबारांत वसिष्ठ भरतास म्हणाले कीं,

'***हानिलाभ* जीवनमरण, यश अपयश *विधिहातिं*'** (दो. १७१।–)

'**हें जाणुनि कोणा द्या दोषा । वृथा कुणावर करणें रोषा ॥**' (१७२।१।–)

वाल्मीकींतील वसिष्ठ ज्या प्रसंगीं कैकयीवर खूपच रागावले आहेत त्या वल्कलें समर्पणप्रसंगीं मानसांत कोणीहि कैकयीला दोषसुद्धां दिला नाहीं. वाल्मीकी रामायणांतील सुमंत्रानें कैकयीची खूप हजेरी घेतली आहे व तिच्या आईचें चरित्र वर्णिलें आहे !

११. नगर–नर

(१) **विधि ऐकवुनि काय ऐकवी । काय दाखवुनि काय चाखवी ॥**'

असा सर्वांनीं प्रथम दैवालाच दोष दिला; पण नंतर (क) एक म्हणति भंल नृपें न केलें' (२।४८।२–४९।१)

(ख) '**धर्म परम जे सुज्ञ जाणती । ते न दोष भूपास लावती** ॥

(ग) 'एक म्हणति कीं भरत सम्मती' (घ) 'उदासीन कुणि ऐकुन असती'

(ङ) '**एक म्हणति हें असत्य वदणें । प्राणप्रियहि राम भरतासी** ॥'

(च) शेवटीं **उपसंहारांत** 'एक विधात्या दूषण देती.' (४९।१) याप्रमाणें अयोध्यानगरांतील पुरुषांत कैकयीला, राजाला, किंवा भरताला दोषी ठरविणारे फार थोडे आहेत; व त्या थोड्यांचें इतरांनीं खंडण केलें आहे. उपक्रम व उपसंहार विधीला दोषी ठरविणाराच आहे.

१२. कैकयीच्या प्रिय सखी व पुरनारी—कैकयीच्या प्रिय सखींनीं तिची नाना प्रकारें गोड कोमल शब्दांनीं समजूत घातली !—

'**सखी करिति उपदेश, श्रवणिं मधुर परिणामिं हित**' ।

कानिं न घे लवलेश कुटिल कुबडिनें प्रबोधित ॥ दो. ५० ॥
न वदे, भारि दिसे फुगलेली । बघे मृगिस बाघीण भुकेली ॥ १ ॥

तरी सुद्धां त्या कांहीं कठोर न बोलतां

' व्याधि असाध्य समजुनी त्यजती । म्हणत ' मंदमति, अभागि ' फिरवी ॥
बुडविलि दैवें राज्य करत ही । हिनें कृत जसें कुणी करि नही ॥
विलपति यापरिं पुरनरनारी । ***देति कुचाळिस गालिहि भारी*** **॥**

कांहीं लोकांनीं शोकाच्या पहिल्या आवेगांत कैकयीला नांवें ठेवलीं पण बहुजन समाजांत थोडे अपवाद असावयाचेच.

१३. भरद्वाज मुनि — मानसांतील भरद्वाजांनीं भरताबद्दल मुळींच संशय घेतला नाहीं व कैकयीलाही दोष दिला नाहीं. भेट झाल्याबरोबरच भरद्वाज सांगतात,

' भरत ! अम्हां सब वृत्त मिळालें । विधि-करणीशिं इलाज न चाले ॥
दोहा०—**' तुम्हीं ग्लानि मनिं नका करूं मायकरणि चिंतून ॥**
तात ! *न कैकायि दोषि*, **गत गिरा मतिस फिरवून ॥**
तुमचें तात ! विमल यश गातिल । महती लोकहि वेद पावतिल ॥
(२०६,२०७।२)

(क) वाल्मीकि रामायणांतील भरद्वाज मुनि त्रिकालज्ञ सर्वज्ञ असून त्यांनीं भरता-विषयींचा आपला संशय उघड उघड प्रगट केला आहे !

१४. वनांतील खेडवळ लोक — सहज वात्सल्यमय हृदय असणाऱ्या गांवोंगांवच्या स्त्रियांनीं प्रथम,

' मायबाप ते वद सखि कैसे । जे धाडिति वनिं बालक ऐसे ॥ '

असें म्हटलें पण लगेच दैवाला दोषी ठरवून **वाईटांतून चांगला निष्कर्ष त्यांनीं सुद्धां काढला.**

' नारीनर विव्हळ फिरतां अति । देती दोष मनीं दैवाप्रति ॥ (११९।१)
भला म्हणाति अति कुणि नरनाहो । देइ अम्हां जो लोचन लाहो ॥

सूचना — राजाला किंवा कैकयीला दोष देणाऱ्या अल्पशा लोकांचीं मतें येथें या लेखकासुद्धां अनेक टीकाकारांप्रमाणें लपवून ठेवतां आलीं असतीं; पण वस्तुस्थितीची लपवालपव करून कांहीं मिळवावयाचें नाहीं. **लपवालपव करून प्रदर्शन करणें हा महान लेखकापराध आहे; अन्याय आहे; आणि रामभक्त, म्हणविणारांनीं करणें परम अन्याय आहे.**

१५. भरत — भरत येत असल्याचें कैकयीस समजतांच, विधवा झालेली कैकयी, दशरथाचें प्रेत घरांत असतांच, नटून थटून भरतास ओवाळण्यासाठीं आरती घेऊन राज-द्वाराजवळ गेली, व भरत इतर कोणास भेटण्यापूर्वीं, त्याला ओवाळून आपल्या महालांत घेऊन आली. त्याच्यासाठीं मोठ्या युक्तीनें राज्य कसें मिळविलें वगैरे सांगितलें; आणि

मध्यें हळूच दशरथनिधनाचा उल्लेख केला, आणि राज्यारूढ होण्याविषयीं सांगितलें. रामप्रेमी हृदयास झालेल्या व्यथेच्या व पितृनिधनदुःखाच्या पहिल्या भरांत मानसांतील भरतमुद्धां कैकयीला टाकून बोलला. परंतु वाल्मीकि रामायणांतील भरतवचनांशीं तुलना करतां मानसांतील भरत फारच सौम्य ठरतो. त्यानंतर पुढें शेवटपर्यंत अनेकांनीं समजावून सांगितल्यावरसुद्धां भरत स्वतःसच त्या सर्व अनर्थाचें कारण मानून सदा विषण्ण आहे. हें भरतचरित्रांत पदोपदीं आढळतें.

१६. **लक्ष्मण** – या लेखाचें शीर्षक मानसांत जेथें बाहेर पडलें तें उदाहरण घेऊन हें प्रकरण संपविणें भाग आहे. असलीं आणखी कितीतरी उदाहरणें मानसांत आहेत. वाचकांनीं या दृष्टीनें मानसावलोकन करावें; बाल आदि सर्व कांडांत उदाहरणें पुष्कळ आहेत.

श्रीरघुनाथ व सीता वनवासापूर्वीं कोठें, कशा प्रकारच्या शय्येवर झोपत असत हें ज्यानें पाहिलें असेल तो श्रीरामजानकी तृणपर्णशय्येवर, नदीकांठीं, झाडाखालीं, उघड्यावर, पांघरण्यास वस्त्र नाहीं, अशा स्थितींत वल्कलधारी झोपलेलीं पाहून, पाषाण असला तरीसुद्धां शोक करीत पाझरूं लागेल; मग निषादराज विषादभाजन झाला व त्यानें,

दो० — ' कैकयनंदानि मंदधी करि कटु कुटिल पणास ।
दे रघुनंदन जानकिस सुखसमयीं दुःखास ॥ ' (२।९१।–)

असें म्हटलें तर नवल नाहीं. पण श्रीरामानुज लक्ष्मणास हें ऐकवलें नाहीं; कैकयीला दोष दिलेला त्यास रुचला नाहीं व त्यानें उपदेश करण्यास प्रारंभ केला; त्यांत :—

' कोणि कुणा सुखदुःख न दाता । निजकृत कर्मभोग ते भ्राता ।। '

हें पहिलें सूत्र आहे. नंतर हें सर्व जग मायिक आहे, मोहमूलक आहे वगैरे सांगून,

' अशा विचारें रोष नसावा । वृथा दोष; कोणा ना द्यावा ॥ ' (९३।१)

कोणालाहि दोष देणें वृथा आहे हा सिद्धान्त सांगितला; त्यापुढील विषयाचा संबंध या प्रकरणाशीं नाहीं.

परदेशांत, परधर्मी देशांत व निधर्मी रशियांत सुद्धां श्रीतुलसीमानसाचा प्रसार सहज होत आहे याचें मुख्य कारण :—

आदर्श-नीति-शिक्षक तुलसी-मानस समान आन नही ।।
चंद्रिं चकोरांसम जन सहृदय आश्चर्यचकित-आनन ही ॥ प्रज्ञा. ॥

पहिल्या दोन व अरण्यादि पुढील कांडांत आणखी पुष्कळ नमुने आहेत; येथें अगदीं थोडे दिले आहेत. कर्मविपाकाचा हा सिद्धान्त हृदयांत मुरून जर नेहमीं विचारांत व कृतींत उतरला तर स्वतःस व इतरांस समाधानानें राहतां येईल व वर्णाश्रमधर्मपालनाचें योग्य फळ पदरांत पडेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११५ 卐 卐 卐

प्रातःस्नान–संध्यादिक

श्रीरामचरित-मानसांत वर्णाश्रमधर्माचे उल्लेख सर्व सोपानांत आहेत हें मागील एका प्रकरणांत दाखविलें गेलें. वर्णाश्रम-धर्मानें सांगितलेल्या त्रैवर्णिकांच्या नित्यकर्माचें प्रतिपादन प्रत्यक्ष उदाहरणांनींच केलेलें आहे. श्रीरामचंद्रच आपल्यां आचरणानें मानसांत धर्ममार्ग दाखवितात. 'धर्ममार्गं चरित्रेण' (रा. पू. ता. उ.)

१. विवाहापूर्वींचें वर्णन. (१) **उषःकाळीं उठावें** — उषःकाल म्हणजे सूर्योदयापूर्वीं पांच घटिका. 'उषःकालिं रघुनायक उठतीं।' (१।२०५।७).

(क) दोन प्रहर रात्र उलटून गेल्यावर विश्वामित्र गुरुजींची चरणसेवा करून नंतर झोपले; तरी १४।१५ वर्षांचे सम्राट कुमार उषःकाळींच उठले.

उठले लक्ष्मण गत निशा कुक्कुटरव ये कानिं।

गुरुचेपूर्वीं जगत्पति राम जागले ज्ञानि॥ (१।२२६।–) नंतर,

(२) **शौच-स्नान व प्रातःसंध्यादि** नित्यकर्म करावें.

'शौचां करती स्नाना जाउनि। मुनिपादिं नमिती स्वकर्म सारुनि॥' (१।२२७।१)

पहाटेसच शौचादिकांसाठीं गांवाबाहेर गेले; व नदींत स्नान करून तेथेंच प्रातःसंध्यादि स्वकर्म सारुनि—उरकून, परत येऊन गुरुजनांना वंदन केलें.

(३) **सायंसंध्या — 'निशामुखीं दे मुनि अनुशासन।**

सर्वहि करिती संध्यावंदन'॥ (१।२२६।१)

टीकेंत ठिकठिकाणीं शास्त्राधार देऊन विस्तार केला आहे. सायंसंध्येसाठीं नगराबाहेर नदीतीरावर गेले आहेत. (१।२३७।६ पाहा).

२. विवाहानंतरचें वर्णन —

'प्रातःशुचिकाळीं प्रभु जागति। अरुणचूड वर बोलूं लागति॥'

"नमुनि विप्र सुर गुरुपितृमाते।"

दो०– करुनि शौच सब सहज शुचि, पावन सरिता-स्नान॥

नित्यकर्म कृत पितृनिकट चौघे येति सुजाण॥ (१।३५८।–)

पूर्वींप्रमाणेंच कोंबडा आरवतांच उठले; विप्र-सुर-गुरु इत्यादींचें स्मरण व त्यांस मानसिक व अप्रत्यक्ष वंदन करून नगराबाहेर शरयूतीरीं जाऊन सर्व प्रकारचें शौच, प्रातः स्नान, संध्यादिक नित्यकर्म करीत असत हें दाखविलें. प्रातःस्नान संध्यादिकांचे आणखी उल्लेख २।८७।७; २।८९।६; २।९४।२–३; या ठिकाणीं पाहावे.

(४) **देवपूजन** — विश्वामित्रांबरोबर असेपर्यंत शिवपूजनाचा उल्लेख नाहीं; कारण कीं ब्रह्मचर्याश्रमांत गुरुसेवाच मुख्य आहे. त्या आश्रमांत देवपूजा नाहीं. गुरुसंन्निध असतां शिष्यानें (गृहस्थही) इतर देवतांचें पूजन स्वतःच्या इच्छेनें करूं नये असा

नियमच आहे. (रामचंद्रिका पाहा.)

(**क**) **करुनि रघुकुल-नाथ मज्जना । पार्थिव पूजुनि करिती नमना** ॥ (२।१०३।१) हे त्या दिवशीं सकाळीं दुसरें स्नान आहे. नंतर *शिवपार्थिव पूजन* केलें; व नंतर प्रवासास निघाले आहेत. मध्यें वस्ती करून प्रातःकाळीं (सूर्योदयापूर्वी तीन घटकांचा काळ),

(**ख**) **प्रातःकृत्यां रघुपति उरकुनि । तीर्थराज बघति प्रभु जाउनि** ॥ ' (२।१०५।२) पायीं अनवाणी प्रवासांतसुद्धां प्रातःस्नान, प्रातःसंध्या-पार्थिवपूजन, इत्यादि प्रातःकाळचें नित्यकर्म उरकून प्रवासास निघत. यानें दाखविलें कीं प्रवासांतसुद्धां नित्यकर्माचा लोप किंवा काललोप करूं नये.

५. तीर्थक्षेत्रांत काय करावें ?

(१) **जेथून तीर्थादिकांचें दर्शन होईल तेथें वाहनांतून उतरून (सुद्धां) साष्टांग नमस्कार पुरुषांनीं करावा;** स्त्रियांनीं नुसता नमस्कार करावा.

' *उतरति राम देवसरि देखत* । *हर्षति अति* करतात दण्डवत ॥ लक्ष्मणमंत्री; सीताप्रणमत ' (२।८७।२–३)

शृंगवेरपुरास जेथून गंगादर्शन झालें तेथील हें वर्णन आहे.

सूचना — स्त्रियांनीं साष्टांग नमस्कार करूं नये ही शास्त्राज्ञा येथें क्रियेनें दाखविली; म्हणून ' सीताप्रणमत ' असें निराळें सांगितलें. बाकीच्यांनीं साष्टांग नमन केलें. शास्त्र-मर्यादारक्षणाची ही दक्षता ! नंतर —

(२) **तीर्थमहिमा प्रथम श्रवण करावा —**

सीते अनुजा गुहास सांगति । स्वमुखें तीर्थराज महिमा अति ॥ (२।१०६।१) हा नियम येथें दाखवावयाचा होता म्हणून शृंगवेरपुरास वर्णन केला नाहीं; व दर्शनाचा विधि शृंगवेरपुरास दाखविला म्हणून येथें वर्णन नाहीं.

(३) **तीर्थस्नानादि —**

***मोदें स्नान* करुनि *शिवपूजन* । केलें सविधितीर्थदेवार्चन** ॥ (२।१०६।६) सकाळीं स्नान करून नित्यकर्म उरकलें होतें; तरी *तीर्थांत गेल्यावर तीर्थ स्नान* केलें. तीर्थ देवतांचें पूजन कर्तव्य असल्यानें त्यापूर्वी इष्ट देवतेचें *शंकराचें* पूजन (पार्थिव) केलें. नंतर त्या तीर्थांतील देवतांच्या पूजनाचा जो विशेष विधि त्याप्रमाणें तीर्थ देवतांचें पूजन केलें. जवळ धनादिक नसल्यानें व प्रभाव प्रगट करावयाचा नसल्यामुळें विप्रांस दान दिल्याचा उल्लेख नाहीं. तो लंकेतून येतांना त्रिवेणीस आले तेथें आहे. (६।१२० म पाहा.) भरतानें त्रिवेणींत स्नान केल्यावर विप्रांस दान मान दिल्याचें वर्णन (२।२०४।४) आहे.

(४) **विप्रास दान मान देणें —**

तैं येउनी त्रिवेणिस नमलें ॥

सविधि सितासित नीरीं स्नाती । *दान मान विप्रांना देती* ॥
असें भरतचरित्रांत घडलें.

(५) **संतदर्शन** – तीर्थदर्शन, नमन, तीर्थमहिमाश्रवण, स्नान व इष्टदेव व तीर्थदेवपूजन व विप्रांस दान देणें इतकें झाल्यावर त्या तीर्थक्षेत्रांतील संतांचें दर्शन घ्यावें, त्यांस दंडवत नमस्कार करावा. ' प्रभूभरद्वाजाप्रति येती करत दण्डवत ' (२।१०६।७). (क) भरतसुद्धां भरद्वाजदर्शनास गेले आहेत. (२।२०६।३-४ पाहा). **तीर्थयात्रेंत-संतदर्शन ही बाब सर्वांत जास्त महत्त्वाची असून आज तेवढें नक्की गाळलें जातें;** सर्व तीर्थयात्रा शास्त्रविधीला सोडून कशी केली जाते हें टीकेंत दाखविलें आहे. (१।१०८ व २।२०८।५ टीका पाहा).

सूचना — असा हा सर्व क्रम येथपर्यंत दाखविला. सर्व ठिकाणीं तेंच तेंच वर्णन करणें अयोग्य असल्यानें पुढें फारसें वर्णन नाहीं. (क) लक्ष्मण श्रीरघुनाथास गुरु, भगवान इत्यादि सर्वस्व मानून सेवक भावानें वागत असल्यानें, लक्ष्मणानें कोणत्याहि देवाचें पूजन केल्याचा उल्लेख मानसांत नाहीं हें अगदीं योग्यच आहे.

६. **पंचायतन पूजा** — अयोध्यावासी पंचायतनपूजा करीत असत.

स्नान करुनि पूजिति नरनारी । *गणपति गौरी पुरारि तमारी* ॥
रमारमण (२।२७३।४-५)

१. येथें दिलेला क्रम कोणत्याहि एका पंचायतनाचा नाहीं व हें सहेतुक आहे. ज्याचें जें मुख्य दैवत असेल त्याप्रमाणें पंचायतन देवताक्रम निराळा असतो. पांची-पंचायतनें मांडण्याची पद्धति टीकेंत दिली आहे. टीकाकारांनीं येथें अनर्थ केले आहेत व क्रम एकहि दिला नाहीं.

७. **ब्रह्मयज्ञ वैश्वदेवाचा उल्लेख** —

' दलफल विविध मूल कंदांना । पावन सुंदर सुधा-समानां ॥ ८ ॥
सादर सर्वां रामगुरु धाडिती बहु तात्काळ ॥
पुजुनि *पितर सुर अतिथि गुरु* करूं लागले फराळ ॥ (२।२७९ टीका)

(**क**) सुरांच्या आधीं ' पितर ' उल्लेख करून ब्रह्मयज्ञ व पितृतर्पण सुचविलें. ' सुर ' शब्दानें देवयज्ञ = वैश्वदेव सुचविला; ' अतिथि ' शब्दानें भूतयज्ञ, पितृयज्ञ व *अतिथियज्ञ* सुचविले. हेंच *पंचमहायज्ञ* ! गुरु = गुरुपूजन = नैवेद्यसमर्पण सुचविलें.

सूचना —हा उल्लेख मिथिलासमाज व अयोध्यासमाज यांविषयीं आहे.

(**क**) श्रीरघुनाथ कंदमूलफलाहारी होते म्हणून कोणी अन्नग्रहण केलें नाहीं. अडीच प्रहर उलटून गेल्यावर स्नान करून नंतर ब्रह्मयज्ञादि करून सर्वांनीं फलाहार केला आहे; तोपर्यंत कोणी पाणीसुद्धां प्यायले नाहींत.

(**ख**) हेंहि दाखविलें कीं जेथें हवनीय अन्न अप्राप्य असेल तेथें जो आहार मनुष्य करील त्यानेंच वैश्वदेवादि करावेत. शास्त्राधार टीकेंत दिले आहेत.

प्रातःकाळीं पहाटेस उठल्यापासून भोजनापर्यंतचा व सायंसंध्याविधि थोडक्यांत येथवर दाखविला; नित्य कर्मानंतरचें आवश्यक कर्तव्य वेदइतिहासपुराणकथाश्रवण स्वतंत्र प्रकरणांत आधींच दाखविलें आहे.

८. **भोजनानंतर विश्रांति** —(निद्रा नव्हे) —

ऋषिसमेत रघुवंशमणि कृत भोजन विश्राम (१।२१७।–)

९. **रात्रीचें भोजन** — पुरुषांचें रात्रीचें जेवण पांच घटका रात्र होईपर्यंतच योग्य.

बहुपरिं करितां भोजना घडी पंच गत राति ।। (१।३५४।–)

१०. **रात्रीं झोपतांना भगवत्स्मरण** — (१) सांगुनि गत विश्रामगृहिं *ध्यात रामचरणांस* ' (दशरथ) (१।३५५). (२) *स्मरत शंभु गुरुविप्रपद* डोळा लागे त्यांस ' (१।३५७) हें रामचंद्रांचें वर्णन आहे.

या प्रकरणांत आणि पूर्वीं, वर्णिल्याप्रमाणें धर्माचरण केल्याचें फळ पुढील प्रकरणांत पाहावें.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।६ 卐 卐 卐

सकल-सुकृत-फल

सकल सुकृताचें म्हणजे धर्माचरणाचें फल काय हें मानसांत विविध प्रकारांनीं सांगितलें आहे. ' सकल सुकृतफल ' व ' सकल साधनफल ' यांनीं युक्त असलेलीं मानसांतील सर्व वचनें खालीं दिलीं आहेत. त्यांतील कांहीं वचनें विशिष्ट क्रमानें घेतलीं कीं एक भक्ति-सोपान कसा तयार होतो हें शेवटीं थोडक्यांत दाखविलें आहे.

१. **वेदपुराण-संत-मत हें हो । सकल *सकृत फल रामीं स्नेहो*** ' (१।२७।२)

२. ***सकलसुकृत फल भूरि भोगसे*** । **जगहित निरुपाधि साधु लोकसे** ' ।।

हें *रामगुणगणांचें* वर्णन आहे. (१।३२।१३)

३. ***जनकसुकृतमूर्तिच वैदेही*** । ***रामाचि दशरथ-सुकृत सदेही*** ।। १ ।।

आम्हीं सकल *सब सुपुण्यरासी* । **जन्मुनि जगतिं जनकपुरवासी** ।। ४ ।।

जिहिं *जानकी राम छवि दृष्टहि* । **सुकृति अम्हांसम अधिक कोणि नहिं** ।।

आणिक बघुं रघुवीरविवाहू । घेउं यथेष्टहि लोचनलाहु ।। (१।३१०।१,४-६)

४. **बसलीं वरासनिं रामजानकि मुदित मन दशरथ अती ।**

तनु पुलक किति निज *सुकृतसुरतरु* बघुनि फल *नव लागती* ।।

(१।३२५छंद १)

५. **रूप बघुनि घ्या नयनीं भारी । प्रिय पाहुणे भूपसुतचारी ।। ३ ।।**

सुज्ञे ! कवण सुकृत ज्या लागुनि । नयन–अतिथि कृत विधिनें आणुनि ।।

(१।३३५।३-४)

अयोध्याकांड—

(६) ' आज सुकृत सकलांचें सरलें । काल कराल उलटला ठरलें ॥ ' (५७।५)
असें रामवनवासानें घडलें असें कौसल्या म्हणाली.

(७) सकलसुकृतफल हेंच *महानाहि* । स्नेह *रामसीतापदिं* सहजहि ॥ (७५।४)

(८) भरद्वाजांस सीतारामलक्ष्मण–दर्शन झालें त्या वेळीं
' *लोचन गोचर सुकृतफल* करि विधि जणुं आणून ' ॥ १०६ ॥

(९) *सर्व करुनि* रति रामपदिं मागति एक फलाहि ।
तन्मन–मंदिरिं रहा.युग रघुनंदन सीताहि ॥ १२९ ॥

(१०) सकल साधनां सुफल सुशोभन । लक्ष्मण राम नि सीता दर्शन ॥ (२१०।४)

(११) सेवकहित तो स्वामीसेवा । – करणें त्यजुनि सकल सुखहेवा ॥
आज्ञापालन कोटि हिताचें ॥ ५ ॥

हें स्वार्थहि परमार्थी साराचि । फल सब सुकृत सुगति शृंगाराचि ॥ (२६८।४-६)
हें भरत रामास म्हणाले.

अरण्यकाण्ड —

(१२) जपयोगधर्मसंमूहिं मनुजा भक्ति अनुपम मिळतसे ॥ ६ छंद ॥

(१३) योग यज्ञ जप तप कृत देई– । प्रभुसि, भक्ति वर मागुन घेई ॥ ८।७ ॥

किष्किंधाकाण्ड—

(१४) त्यजिति जसे *श्रम* मिळत हरि–भक्ति आश्रमी चारी ॥ १६ ॥

श्रम = जप तप योगादि साधन, सत्कर्म, धर्माचरण. श्रम कोणते तें अयोध्याकाण्डांत स्पष्ट सांगितलें आहे.

' आत्रि आदि मुनिवर बहु वसाति । *जप·तपयोग* करिती तनु कसती ॥
श्रमां सफल सकलांच्या करणें । (२।१३२।७-८)

सुकृताचें फल भक्ति मिळविल्यासच श्रम थांबतात हें येथें सुचविलें.

सुन्दरकाण्ड —

(१५) कळला राम स्वभाव ही ज्या । उमे भजनाविण नान्य रुचे त्या ॥ (३४।३)
असें शंकर म्हणाले. सर्व सत्कर्म, सुकृत, सर्व साधन यांचें सुफल हरिभक्ति आहे; व भक्तिमान महा नीच असला तरी श्रीरामास प्राणप्रिय वाटतो. हा रामस्वभाव ज्याला माहीत आहे, तो सुकृताचें व साधनाचें उत्तम फल टाकून इतर मागेल कशाला ! सुचविलें कीं सर्व साधनश्रम व जन्ममरणाचे श्रम चुकवावयाचे असतील तर भक्तीशिवाय इतर कोणत्याहि फळाची रुचि असतां नये.

ल. ठे. — किष्किंधा व सुंदर यांतील भक्त साधनहीन, अनन्यगतिक, दीन असल्यामुळें या दोन कांडांत सुकृतफल किंवा ' साधनफल ' शब्द नाहींत, ' *कांहिं न साधन भजन जाणतों* ' हनुमान म्हणाले. (४।३।३)

लंकाकांड —

(१६) कुंभकर्ण बिभीषणास म्हणाला,

' ***धन्य, धन्य,*** तूं ***धन्य*** **बिभीषण । झालासी निशिचरकुलभूषण ॥**

बंधु ! वंश तूं केला भास्वर । भजुनि राम शोभासुखसागर ॥ (६४।८-९)

धन्य = सुकृती, ' *सुकृती पुण्यवान् धन्यः* ' (अमरे) सुकृत = पुण्य.

उत्तरकांड —

(१७) वसिष्ठ – ' **तैं हृदिं विचार केला योगमखव्रतदान ॥**

ज्या स्तव करणें तो मिळे धर्म न यासम आन ॥ ४८ ॥

' **जप तप नियम योग निजधर्म । श्रुतिसंभव नाना** *शुभकर्म* ॥

ज्ञान दया दम तीर्थीं मज्जन । वदति धर्म जितके श्रुति–सज्जन ॥

आगम निगम पुराण अनेकहि । श्रवुनि पढुनि फल तों प्रभु ! एकहि ॥

तव पदपद्मीं प्रीति निरंतर । ***सकल साधनां हें फल सुंदर ॥***

मळें धुउनि कार्धि मळ किं नासतो । वारि मथुनि कुणि घृत किं पावतो ॥

प्रेमभक्ति–जलविण रघुवर तो । अभ्यंतर मल कधीं न जातो ॥ (७।४९।१-६)

(१८) भुशुंडी — **व्रत जप तप मख शम दम दान । विरति विवेक योग विज्ञान ॥**

सकलां फल रघुपतिपदिं प्रेमहि । त्याविण कोणि न पावे क्षेमहि (९५।५-६)

(१९) **सकल फलहि हरिभक्ति सुशोभन ।** (१२०।१८)

(२०) **शंकर** — ' **तीर्थाटन साधन नाना गण । योग विरक्ती ज्ञाननिपुणपण ॥**

कर्म धर्म नाना व्रतदानें । शम-दम-जप-तप-यज्ञ-साधनें ॥

द्विज-गुरु सेवा भूतसदयता । विद्या विनय विवेक महत्ता ॥

साधन जितकें श्रुति वाखाणी । सर्वां फल हरिभक्ति भवानी ! ॥

(१२६।४–७)

२. निष्कर्ष — यांतील मुख्य वचनें संगतिवार घेतलीं कीं भक्तिसोपान तयार होतो. कंसांतील अंक यापूर्वी दिलेल्या अवतरणांचे आहेत.

१ – (१७) *जपतपयोगादि साधनें* शुभ म्हणजे निष्काम व ईश्वरार्पण करून केलीं तर विमल पुण्यसंग्रह होईल.

२ – (२) त्याचें फळ म्हणजे हरिकृपेनें श्रीरामगुणगणश्रवणाची आवड उत्पन्न होईल व निरुपधि साधु लोकांचें म्हणजे निष्कपटी संतांचें दर्शन होऊन हरिकथाश्रवणाचा लाभ मिळेल.

३ – (१ व १८) त्या श्रवणाचें फल रामस्नेह, रघुपतिपदिं प्रेम उत्पन्न होईल.

४ – (७) तो सीतारामस्नेह सहज म्हणजे यत्नांवाचून वाढणारा व कमी न होणारा असा दृढ होईल.

५ – (१९।२०) यालाच हरिभक्ति-रामभक्ति असें म्हणतात.

६ – (४ व ९) अशा भक्तीला वश होऊन श्रीरामजानकी हृदयरूपी वरासनावर = सिंहासनावर विराजतील. (दशरथ = जीव).

७ – (८ व १०) अशा भक्तीचें बाह्य, दृश्य फल म्हणजेच श्रीरामलक्ष्मण व सीता लोचनगोचर होतील, साक्षात चर्मचक्षूंनीं दर्शन होईल. तेव्हां मग भक्ति वर मागावा (१३ पाहा).

८ – (३ व ५) अशा प्रकारें नेत्रांचें, जन्माचें व जीवनाचें साफल्य होईल. नर-तनुरूपी जनकपुरींत जन्मल्याची सफलता होईल.

९ – (१४) अशी सफलता झाली म्हणजे तो आश्रमी जीव *श्रम*मुक्त होईल.

१० – (१६) असा असेल तो कुलभूषण व कुलाचा उद्धारक होतो.

११ – (११) मग श्रीरामाज्ञापालन इतकेंच त्याचें कर्तव्य उरतें.

१२ – (१५) हें असें सर्व व्हावयास पाहिजे असेल तर संत-सद्गुरु-मुखानें राम-स्वभाव जाणून भक्तीशिवाय इतर कशाचीहि (मोक्षाचीसुद्धां) आवड किंवा इच्छा शिल्लक ठेवूं नका.

१३ – (६) जोंपर्यंत रामवियोग आहे तोंपर्यंत आपलें सुकृत लयास गेलें आहे; रामाबरोबर वनवासास गेलें आहे असें समजावें.

१४ –(१२) **उपसंहार** – ‘ *जपयोगधर्मसमूहिं* ’ मनुजा भक्ति अनुपम मिळतसे.

याप्रमाणें सगळीं (वीस) वचनें विषयक्रमानें घेतलीं आहेत. यांत उपक्रम व उप-संहार दाखविलाच आहे. अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ति हीं लक्षणेंसुद्धां यांत आहेत. विषय, अधिकारी, संबंध व प्रयोजन म्हणजे अनुबंध चतुष्टयसुद्धां यांत आहे व दृष्टान्तहि आहेच; पण विस्तारभयास्तव लेखणी आवरावी लागत आहे.

अशा प्रकारें उत्तम सुकृताचा संग्रह होण्यास गृहस्थाश्रमांत पत्नी *सहधर्मचारिणी* असावी लागते; म्हणून आतां नारीधर्म-निदर्शन करणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।७ 卐 卐 卐

नारी-धर्म

श्रीरामचरितमानसांत नारीधर्माचे उल्लेख अनेक ठिकाणीं आहेत. ‘ *वर्णाश्रमधर्म* ’ प्रकरणांत कांहीं नारीधर्म साररूपानें पूर्वींच दाखविले आहेत; तथापि थोडें विस्तृत विवेचन करणें जरूर आहे; नाहींतर सुशील नारी म्हणतील कीं पक्षपात केला आहे.

१. कन्येला वर कसा असावा (पाहावा)

पतिस वदे एकान्तीं मयना । नाथ न उमजें मी मुनिवचना ॥
जर घर, वर, कुल असेल अनुपम। द्यावी *वरा अनुरूप सुता* मम ॥ (१।७१।२-३)
घर = जमीनजुमला, संपत्ति, कुल, आणि वर अनुरूप पाहिजेत.

२. नारीधर्मांचा उपदेश करणें. विवाहानंतर कन्या प्रथम पतिगृहीं जाण्यास निघते त्या वेळीं मातापित्यांनीं व मुलीच्या जाणत्या सखींनीं नारीधर्मांचा उपदेश तिला करावा.

(१) **जननि उमे बोलावुनि घेई । अंकीं, सुंदर शिकवण देई ॥**

संतत कर शंकरपदपूजा । *नारिधर्म पतिदेव न दूजा* ॥

पूजा = सेवादि. (१।१०२।२-३)

(क) सोरठा – **पयसम भाव जलास बघा प्रीतिची रीति बरि ।**

भिन्न होइ–रस नास आम्ल कपट पडतांच परि ॥ (१।५७)

चुकूनसुद्धां पतीशीं कपट, लपवालपव न केली तरच प्रीति राहील.

(२) सीता प्रथम सासरीं जाण्यास निघाली तेव्हां—(१।३३४।३-६) राण्या,

सीते कितिदां *अंकीं घेती* । आशीर्वाद शिकवण देती ॥

‘ *सासु-सासरा-गुरु सेवा कर । पतिकल बघुनि पाळ आज्ञा* बरं ! ॥ ’

स्नेह-विवश अति सखि सुज्ञानी । नारिधर्म शिकविति मृदु वाणीं ॥

सखींनीं शिकविलेल्या नारीधर्मांचा विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पद्य रूपानें आहे.

(क) मुलींना मेण्यांत बसवितांना जनकराजा—

भूप मुलींना बहु समजाविति। *नारिधर्म कुलरीती शिकाविति* ॥ (१।३३९।१)

येथेंसुद्धां टीकेंत विस्तार दिसेल. कुलरीतींची माहितीसुद्धां या वेळीं प्रेमानें सांगावी.

३. स्त्रियांनीं पतिगृहीं कोणती भावना बाळगावी. (१) पार्वतीची माता वरातीच्या वेळीं विश्वेश्वरास (जावयाला) विनविते,

‘ नाथ ! उमा मत्प्राणसी *गृहकिंकरी करा* हि ॥ ’ (१।१०१)

(२) धनुर्भंगापूर्वी प्रेमपण करतांना सीतेची भावना :—(१।२५९।४-५)

‘ मम पण, तनमनवचानें सत्य अति । रघुपति पदसरसिजीं चित्तरति ॥

तर *भगवंत* **सकल-उरवासी ।** *करतिल मजला रघुवर-दासी* ॥ ’

(३) सीतामाता रामास निरोप देतांना विनविते, (१।३३६ छंद)

‘ परिवार पुरजन मज नृपांना प्राण सीता जाणणें ।

तुलसीश ! बघुनी स्नेह शीलहि *किंकरी निज मानणें* ॥ ’

मी पतिदेवाची प्रिय (= निज-अगदीं अंतरंगांतील) दासी आहें या भावनेनें स्त्रियांनीं वागावें म्हणजे त्या पतीला प्रियतम होतील; व एकत्र झालेल्या दूधपाण्या-सारखें त्यांचें प्रेम राहील,

‘ महापुरें झाडें जातीं ’ । तेथें लोहाळे वाचती ॥ (तुकोबा)

जी सर्वांहुन लहान होते । ती सर्वांमधिं मोठी ठरते ॥ प्रज्ञा ॥

जें अणूहून लहान आहे तेंच आकाशापेक्षां विशाल आहे. बाल. दो. ३२६ पासून पुढील वर्णनांत सुशील स्त्रियांच्या अंगच्या अनेक सद्गुणांचें दर्शन होतें.

४. पति-वियोग कसा वाटला पाहिजे. (१) (अयोध्याकांडांत) वनगमनाच्या आधीं सीता रघुनाथास म्हणते,

'प्राणनाथ! करुणायतन सुंदर सुखद सुजाण ।
तुम्हि रघुकुल कुमुदेंदु विण, *सुरपुर नर्कसमान* ।। ६४ ।।
माता पिता स्वसा प्रिय बंधू । प्रिय परिवार सुहृद-संबंधू ।।
सासु सासरा गुरु सहकारी । सुत सुंदर सुशील सुखकारी ।।
नाथ! *पतिविना स्नेह नि नातें । तापद तरणिहुनी स्त्रीला तें* ।। ३ ।।
भोग रोगसम भूषणभारहि । यमयातनासदृश संसारहि ।। ५ ।।
देह *जिवाविण जलाविण सरिता* । **नाथ!** *तशिच पुरुषाविण वनिता* ।। ७ ।। ' इत्यादि
मी सुकुमारि नाथ वनजोगे । तुम्हां उचित तप, मज सुख भोगें ? ।।

(६७।८ पर्यंत पाहणें).

५. पतिपत्नी-संबंध कसा असावा — शृंगवेपुरास सुमंत्रानें दशरथांचा निरोप श्रीरघुनाथास सांगितल्यावर राम सीतेला म्हणाले,

'श्वशुर, सासु, गुरु नी प्रिय परिजन । कष्ट, जाल तर, होति निवारण ।। '
तेंव्हां वदे श्रवुनि पतिवच वैदेही- । पहा प्राणपति परमस्नेही ! ।।४।।
प्रभु ! करुणामय परम विवेकी । *छाया देहा त्यजुनि वसे कीं* ।।५।।
प्रभा **जाइ कुठं** *भानुस* **सांडुनि । कुठें** *चंद्रिका* **चंद्रा टाकुनि** ' ।।६।।

पतिपत्नीसंबंध देहछाया, भानुप्रभा व चंद्रचंद्रिका यांच्यासारखा असावा हें सुचविलें आहे.

पण हल्लीं घरोघर झालेल्या कवि-कवयत्रीकृत मंगलाष्टकांत **दोरा सुई हा संबंध इष्ट मानला जातो.** सुईनें छिद्रें पाडावीं व तीं दोऱ्यानें बुजवावीं ! आणि सुई असते परक्याच्या हातांत ! दोरा निसटून सुटला म्हणजे काय ? शिवाय ह्या दोन जड वस्तूंचा संबंध ! दोघांनाहीं तिसऱ्या व्यक्तीच्या ताब्यांत राहावें लागतें ! (विस्तार टीकेंत पाहावा.) या चार संबंधांपैकीं कोणता वा कोणतें इष्ट तें वाचकांनीं गूढार्थ-चंद्रिकेंत निरखून ठरविणें चांगलें !

६. पतिसेवा व पतिव्रता (पतिव्रता-गीता अरण्यकाण्ड) सीतेचें निमित्त करून अनसूयेनें स्त्रीधर्माचें फार सुंदर वर्णन केलें आहे. (५।५ दो. ५)

माता पिता बंधु हितकारी । सकल मितप्रद राजकुमारी ! ।।
वैदेही ! अमितद भर्तांही । *अधम नारि जी सेवित नाहीं* ।।६।।
वृद्ध रोगवश निर्धन जडमति । अंध बधिर कोपिष्ट दीन अति ।।८।।
करि अशाहि पतिच्या अपमाना । नारि भोगि यमलोकिं यातना ।।
हें व्रत एक धर्म हा नेमहि । पतिपदिं तनूवचनें प्रेमहि ।।९।।

यापुढें पतिव्रतांचें उत्तम, मध्यम, निकृष्ट आणि अधम असे चार वर्ग सांगितले

आहेत. त्यांतील अधम नारीचा समावेश पतिव्रतांमध्यें करण्यांत **श्रीगोस्वामींनीं परम औदार्य दाखविलें आहे.** आधुनिक स्त्रीदाक्षिण्यवादी, सुशिक्षितसुद्धां त्या अधम नारीला पतिव्रता म्हणेल असें वाटत नाहीं ! पण जोंपर्यंत शरिरानें परपुरुषदूषित झाली नाहीं तोंपर्यंत ती पतिव्रताच आहे.

पतिस विरोधी जिथें जन्मते। तरुणपणीं विधवा बनतें ।।१९।।

पर्यंत पाहणें. शेवटीं पातिव्रत्याचें फल सांगितलें आहे.

' सहज अपावन नारि *पतिसेवें शुभगति मिळावि* ।

यश गाती श्रुति चारि अझुनि तुलसि का प्रिय हरिसि ' ।।५।।

७. कार्येषु मंत्री—किष्किंधा काण्डांत तारेनें वालीला केलेल्या उपदेशाच्या निमित्तानें व मंदोदरीनें सुंदर व लंकाकाण्डांत रावणास केलेल्या उपदेशानें ' कार्येषु मंत्री ' हा स्त्रियांचा अधिकार दाखविला आहे. आणि

' मूढ धरीशी तूं अतिं अभिमाना । नारीमंत्र न घेशी कानां ।। '

या रघुवीरवचनानें दाखविलें आहे कीं, प्रेमळ, सेवाप्रिय, नम्र *पतिव्रता स्त्रीनें* ज्ञातांपायां पडून *केलेल्या सूचना उपदेश न मानणारा मूढ होय.* अशा स्त्रियांना पतिहित साधण्यासाठीं पतीला कार्याकार्य विचार सांगण्याचा अधिकार आहे; तें **सचिवाप्रमाणें त्यांचें कर्तव्य आहे;** पण **' करणेषु दासी ' असेल तिनेंच हा अधिकार वापरावा.**

८. पातिव्रत्यभंगापेक्षां मरण बरें (सुंदरकाण्डांत)

(१) दशमुख-सीता संवादांत (९।२–१०।७) दाखविलें आहे कीं सच्छील पतिव्रता स्त्रिया प्रारब्धवशात, कामी, प्रबल दुर्जनाच्या पारतंत्र्यांत पडल्या असल्या तरी त्यांनीं त्या दुर्जनाकडे पाहूंसुद्धां नये, आणि आपलें पातिव्रत्य, सच्छील, भ्रष्ट करण्यापेक्षां मरण पत्करावें. ज्यांची अशी पतिनिष्ठा असते त्यांना रावणासारखे खलसुद्धां भितात.

(२) मंदोदरी आदि सर्व राण्यांना तुझ्या दासी करीन पण तूं एकवेळ माझ्याकडे पाहा (९।४-५) असें मंदोदरीच्या देखत रावणानें सीतेला सांगितलें; व नंतर तो जेव्हां सीतेला ' मारुं धावला बोलां ऐकुनि ' (१०।७) तेव्हां राक्षसराजाची पट्टराणी, व राक्षसकन्या असणाऱ्या मंदोदरीनें रावणाला नीति सांगून स्त्रीहत्यापापापासून वांचविलें ! यानें हें दाखविलें कीं स्वतःवर कांहींहि परिणाम होवो पण पतीला पापकर्मापासून परावृत्त करणें हें स्त्रीचें कर्तव्य आहे. मंदोदरीचें केवढें औदार्य ! व पतिनिष्ठा !

(३) पतिविरहांत, पारतंत्र्यांत, सतीनें कसें राहावें हें सुन्दर कांडांतील सीतेच्या राहणीनें दाखविलें आहे. ८।६–दो.८; व ३१।५ — दो. ३१ पूर्वार्धापर्यंत पाहावें.

९. पति–अकीर्ति वांचविण्याचा प्रयत्न करणें.

(१) ' दूतिमुखें पुरजनोक्ति कळली ' (५।३६।४) पासून पुढें. यांत हें दाखविलें

आहे कीं राणीनें आपले गुप्त स्त्रीदूत ठेवून आपल्या राजाविषयीं प्रजा काय म्हणते याची माहिती मिळवून जरूर तेव्हां पतीची अकीर्ति वांचविण्यासाठीं राजास हितोपदेश करावा. जें राणीचें कर्तव्य तेंच इतर स्त्रियांचें. दूती नसल्या तरी लोक पतीविषयीं काय म्हणतात हें कानीं आल्यास व अकीर्ति होत आहे असें दिसल्यास राणीप्रमाणेंच पतीला हितोपदेश करून अकीर्ति वांचविण्याचा प्रयत्न करावा.

१०. सती पतिव्रतांस साह्य करावें.

(१) दुर्जनांच्या दुष्टपणामुळें पतिविरहिणी झालेल्या सती पतिव्रतेस संकटकाळीं सुशील स्त्रियांनीं धीर देऊन तिची निराशा, भय इत्यादि दूर करण्याचा प्रयत्न करावा हें सीता-त्रिजटा संवादांत लंकाकाण्डांत व सुंदरकांडांत दाखविलें आहे. (५।११–१२।६) आणि (६।९९।१–१००।१).

(२) **सीतेचें अग्निदिव्य** — (दो. १०८–१०९ छं.) अग्निदिव्य करूनसुद्धां आपलें चरित्र निष्कलंक असल्याचें सिद्ध करून पतिविरहांतून मुक्त व्हावें हा आदर्श दाखविला.

वि. सूचना० — हल्लींच्या काळांत अग्निदिव्य यशस्वी होणार नाहीं असें बहुधा शेंकडा शंभर वाचक म्हणतील, म्हणूनच कीं काय १९५४ सालीं **उत्तर प्रदेशांतील एटा जिल्ह्यात गंजहुडवारा गांवीं एका १४।१५ वर्षांच्या स्त्रीनें अग्निदिव्य केलें व तें यशस्वी झालें.** या विषयींची साधार हकीकत कल्याण मासिकाच्या १९५४ च्या डिसेंबरच्या अंकांत (पृ. १४९७) छापलेली आहे. 'सतीत्वकी अग्निपरीक्षा' हा लेख पाहावा. हें अग्निदिव्य अग्निपुराणोक्त पद्धतीशीं बरेंच जुळतें असें केलें गेल्याचें ठरतें. सीतेचें अगदीं भिन्न आहे. गूढार्थचंद्रिका माहिती पाहावी.

११. पतिसेवेचा आदर्श— (उत्तरकाण्डांत)

राहि सदा पति-अनुकूल सीता । शोभा खाण सुशील विनीता ॥ ३ ॥
कृपासिंधुची प्रभुता जाणुनि । चरणकमल सेवी मन लाउनि ॥ ४ ॥
जरी गृहीं सेवक सेवकिणी । विपुल, सदा सेवाविधिं गुणी ॥ ५ ॥
स्वकरें गृह-परिचर्या करते । रामचंद्र-आज्ञा अनुसरते ॥ ६ ॥
कृपासिंधु सुख मानिति जेणें । तें श्री करि सेवा विधि जाणे ॥ ७ ॥
कौसल्यादि सासवा गेहीं । त्यांस सेवि मद मान नसेही ॥ ८ ॥

सूचना — पतीच्या सहज संमतीनें स्त्रियांनीं गुरु करणें व जप पूजादि करणें शास्त्रसंमत आहे; हें १।१९।६ च्या टीकेंत साधार दाखविलें आहे.

सप्त सोपानांत नारीधर्माचें वर्णन आहे त्यांतील फक्त मुख्य मुख्य भागच वर दाखविले आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।८ 卐 卐 卐

बालकांचे व इतर संस्कारादि

श्रीरामचरितमानसांत बालकांच्या संस्कारांचें व विधींचें वर्णन किंवा गूढ उल्लेख केलेले आहेत व इतर संस्कारांचेंहि वर्णन आहे.

१. जातकर्म – बालक जन्मास आल्यावर नाळ कापण्यापूर्वी हा संस्कार करावयाचा असतो. पुत्रजन्म समाचार ऐकतांच,

परमानंदपूर्णमन राजा। वदे वाजवा विविधा वाजां ॥
बोलवुं वसिष्ठ गुरुला धाडति। द्विजांसहित नृपसदना ठाकति ॥
अनुपम बालक जाउन बघती। रूपराशि गुण वदत न सरती ॥
श्राद्धा नांदीमुख करुनि *जातकम* संवादि।
नृप विप्रां दे दान बहु धेनु वसन कनकादि ॥ (१।१९३।६)

(१) जातकर्म संस्कारांचें महत्त्व, त्याचा विधि, त्यांतील मुख्य मंत्र व त्यांचा सारांश इत्यादींचा विस्तार टीकेंत आहे. नूतन बालकास पहिले तीन दिवस गाईचें दूध पाजणें शास्त्रविरुद्ध कसें आहे व त्याचा त्या मातेवर काय दुष्परिणाम होतो हें सविस्तर दाखविलें आहे.

(क) *नवीन जन्मलेल्या बालकाची जन्मपत्रिका नालच्छेदनापूर्वी करावी* असें सहेतुक धर्मशास्त्र असून कांहीं ज्योतिषी उलटे भ्रम कसे पसरवितात हें टीकेंत दाखविलें आहे.

२. **नामकरण – (नांव ठेवणें)** (१।१९७।२–१९८।१)

(१) **' नामकरण अवसरास जाणुनि। बोलाविले नृपें ज्ञानी मुनि ॥ २ ॥**
पूजुनि भूप म्हणे मुनि देवा। मनिं निर्धारित नांवें ठेवा ॥ ३ ॥

वसिष्ठ मुनींनीं अर्थानुसार चौघा पुत्रांचीं नांवें ठेवलीं व तीं राम, भरत, शत्रुघ्न व लक्ष्मण या क्रमानें ठेवलीं; चौ. ५,६ मध्यें रामनाम सांगितलें; चौ. ७ मध्यें भरत, आठवींत शत्रुघ्न व संपूर्ण दोह्यांत लक्ष्मण नांवाचें वर्णन केलें; म्हणजेच रामनाम ठेवण्यांत दोन चौपाया, भरताचें एका चौपाईंत, शत्रुघ्नाचें एका चौपाईंत आणि लक्ष्मणाच्या नामांत एक दोहा असा भेद कवींनीं केला. दोन चौपायांच्या ६४ मात्रा व दोह्याच्या ४६ मात्रा ६४; ४६; ६४ = ६ + ४ = १०; आणि ४६ = ४ + ६ = १० च इतकें येथें पुरें.

(क) नामकरणांत क्रम असा कां हें उपसंहारांत सुचविलें आहे.

' ठेविति नांवें गुरु सुविचारीं। वेदतत्त्व नृप ! तव सुत चारी ॥

चारीसुत = वेदतत्त्व, म्हणून नामकरणाचा क्रम लौकिक नाहीं. हीं नांवें अध्यात्म-दृष्टीनें ठेवलीं आहेत. उपनिषदांत जो संबंध आहे तोच या नामकरणांत दाखविला

आहे; विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पाहावा.

(ख) नामकरण, पाळण्यांत घालणें, बारसें, कितव्या दिवशीं झालें हें शब्दांनीं न सांगतां काव्यपंक्तिसंख्येनें सुचविलें आहे. 'श्रीतुलसी-संकेत अद्भुतहि' या प्रस्तावना प्रकरणांत व टीकेंत स्पष्टीकरण केलें आहे. नामकरण १३ व्या दिवशीं झालें; कारण क्षत्रियपुत्र.

(ग) (१) शत्रुघ्नाचें नामकरण लक्ष्मणापूर्वी कां ? (२) वेदतत्त्व = ब्रह्म – परमात्मा = चार पुत्र कसे ? (३) लक्ष्मणच रामप्रिय कां ? (४) लक्ष्मणच उदार कां ? (५) लक्ष्मणच सर्वजगा आधार कसा ? (६) लक्ष्मण शत्रुघ्नसहोदर कां ? (७) लक्ष्मणच लक्षणधाम कसा ? (८) अध्यात्म रामायणांतील नामकरणांत अध्यात्म आहे कीं मानसांतील नामकरणांत अध्यात्म आहे ? या शंकांचें समाधान केवल अध्यात्म दृष्टीनेंच होऊं शकतें व तें गूढार्थचंद्रिकेंत आहे. टीकाकारांनीं गोंधळ घातला आहे.

३. गोदुग्धप्राशनविधि — २८ व्या दिवशीं — 'वर पर्यंकिं अंकिं कधि अंबा। गोंजारी अति छकुल्या ! प्रिय ! बा !' ॥ (१।१९८।८) या चौपाईंत गोदुग्ध-प्राशनविधि ध्वनित आहे. (टीका पाहा). त्यापुढला विधि जलपूजनाचा आहे; पण त्यांत बालकाचा संबंध नसतो.

४. सूर्यावलोकन, निष्क्रमण व भूम्युपवेशनविधि — पहिल्या १२ महिन्यांतील बालकाचे सर्व विधि दो. १९९ च्या चौपायांत ध्वनित आहेत; व ते सर्व ध्वनि गूढार्थचंद्रिकेंत स्पष्ट केले गेले आहेत.

***अरुण चरण* पंकज नख जोती। कमलदलीं बसलीं जणुं मोतीं ॥**

या चौपाईंत सूर्यावलोकन, निष्क्रमण आणि भूम्युपवेशन हे तिसऱ्या, चौथ्या व पांचव्या महिन्यांतले विधि ध्वनित केले आहेत. सूर्यावलोकन म्हणजे बालकास सूर्यदर्शन करविणें; निष्क्रमण म्हणजे मुलाला देवदर्शनास वगैरे घराच्या बाहेर घेऊन जाणें व भूम्युपवेशन म्हणजे मुलाला खालीं जमिनीवर ठेवणें.

५. अन्नप्राशन (उष्टावण) 'दो दो दशन नि अधर अरुण वर' (चौ. ८) यांत उष्टावण सुचविलें आहे. दशन = 'चावणारा' हा अर्थ दन्त, रद, दांत इत्यादि अन्य शब्दांत नाहीं. (टीका पाहा.) हा संस्कार ६, ८, १०, १२ या महिन्यांत योग्य वेळीं करावा असें शास्त्र आहे. ६ वा भाद्रपद व १० वा पौष हे अशुभ असल्यानें, अति शुभ कार्तिकमासांत उष्टावण झालें (८ वा महिना) हें सुचविलें आहे.

६. शीतळ शिमगा — १२ वा महिना फाल्गुन. 'वपुवरि *पिवळें पातळ* झबलें' यानें शीतळ शिमगा सुचविला आहे. पिवळें पातळ झबलें अयोध्येंतील थंडींत, म्हातारपणीं झालेल्या एकुलत्या एक सम्राटपुत्राला कौसल्या माता निष्कारण घालील हें अशक्य आहे. रंगपंचमीच्या दिवशीं केशरी तलम कपडे मुलांच्या अंगावर घालून

शीतळ शिमगा मोठ्या थाटानें साजरा करतात. याप्रमाणें एका वर्षापर्यंतचे सर्व संस्कार वा विधि या चौपायांत अति गूढ ध्वनीनें पण अत्यंत मार्मिकपणें सुचविलेले आहेत.

७ – ८. कर्णवेध व चौल (चूडाकरण–शेंडी ठेवणें). (१) कर्णवेध = कान टोचणें हा संस्कार तिसरें वर्ष पुरें होईपर्यंत शास्त्रानुसारं करतां येतो. अगदीं लहान, अति कोमल, अति लाडक्या मुलांना दुःख होईल म्हणून हा संस्कार बारशाच्या दिवशीं केला नसावा.

जाउनि गुरु कृत चूडाकरणा । विप्र *पुन्हां बहु लभति दक्षणा* ॥ (२०३।३)

आधीं कर्णवेध विधि केला व नंतर त्याच दिवशीं चौलकर्म केलें. प्रथम कर्णवेध संस्काराची दक्षणा मिळाली व नंतर *पुन्हां* चूडाकरणाची दक्षणा मिळाली. यापूर्वी कर्णवेधाचा उल्लेख नाहीं; पण कर्णवेधविधि थाटानें केला होता असा उल्लेख अयोध्याकाण्डांत आहे.

***कर्णवेध* उपवीत विवाहां । सर्व बरोबर *कृत उत्साहां* ॥** (२।१०।६)

असें श्रीरघुनाथवचन सर्व बंधूंच्या विषयीं आहे. कर्णवेध उत्साहानें–उत्सव करून केला होता हें ठरलें. तिसऱ्या वर्षाच्या फाल्गुनांत हे दोन्ही संस्कार झाले. टीकेंत धर्मशास्त्राधारें सविस्तर चर्चा केलेली आहे.

९. उपनयन (मुंज–उपवीत)

यदा चारि ते कुमार बनती । गुरुपितरौ *व्रतबंधा* करती ॥ (२०४।३)
गत गुरुगृहिं रघुराव पढाया । अल्प कालिं सब विद्या आल्या ॥

व्रतबंध = ब्रह्मचर्य व्रताचें ग्रहण ज्यांत होतें तो *उपनयन संस्कार*. यज्ञोपवीत = जानवें. धारण केलें जातें म्हणून पुढें (२।१०।६) उपवीत म्हटलें आहे. मुंज (मोळ) नांवाच्या दर्भाची मेखला कमरेला बांधली जाते म्हणून मौंजीबंधन–मुंज म्हणतात. गुरूच्या व वेदांच्या उप = समीप नयन केलें जातें म्हणून उपनयन म्हणतात.

१०. *विवाह* — श्रीरघुवीर-विवाह–या संस्काराचे व श्रीरघुवीर विवाहाचें सांगोपांग वर्णन मानसासारखें कोणत्याहि प्रचलित रामायणांत नाहीं. गणपतिपूजनापासून सर्व बारीक सारीक विधींचें वर्णन आहे. विवाह मार्गशीर्ष मासांत झाला इतकाच स्पष्ट उल्लेख मानसांत आहे. शुद्ध पंचमीला झाला असें जनकपुरींतील परंपरेनें चालत आलेल्या विवाहोत्सवतिथीवरून ठरतें.

बालकांड पूर्वार्धात शिवपार्वतीविवाहवर्णन आहे; त्यांत संक्षेपानें वर्णन आहे. दशरथ मरणानंतर (अयोध्याकाण्डांत) शेवटच्या संस्काराचें सविस्तर वर्णन आहे. श्रीरघुनाथास चित्रकूटास पितृनिधनवार्ता कळल्यावर शास्त्रनियमाप्रमाणें अशौच पालन करून त्यांनीं पुन्हां क्रिया केली आहे.

प्रत्येक ठिकाणीं शास्त्राधारांसह सविस्तर चर्चा गूढार्थचंद्रिकेंत आहे. शास्त्रविधींचें पालन करणें जितकें आवश्यक आहे तितकेंच कुलरीतिपरंपरांचें संरक्षण करणें कर्तव्य आहे. हेंहि मानसांत स्पष्ट दाखविलें असल्याचें पुढील प्रकरणांत कळेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।९ 卐 卐 卐

कुलरीति-परंपरा-रक्षण

जीवन्मुक्त ज्ञानी असले तरी त्यांनींसुद्धां कुलरीतिपरंपरा व लोकरीति यांचें पालन व संरक्षण केलें पाहिजे हें मानसांत स्पष्ट सांगितलें आहे. जनकानें-विदेही ब्रह्मनिष्ठानें-सुद्धां हें करून-करवून घेतलें आहे.

धनुर्भंगानंतर सीतेनें श्रीरघुवीराला जयमाला घातल्यानें स्वयंवरपद्धतीनें विवाह झालाच. नंतर त्या धनुर्यज्ञमंडपांतच परशुराम येऊन परत गेल्यावर जनक राजा विश्वामित्रांस विनंति करतात,

' प्रभू प्रसाद ! राम धनु खंडिति ।। '
मज कृतकृत्य करिति दो भ्राते । स्वामी सांगा अतां उचित तें' ।।
ऐक वदति मुनि, नृपा प्रवीण । होता विवाह चापाधीन ।।
धनु तुटतांच किं विवाह झाला । विदित नाग नर सुर असुरांला ।।
तरिं जाउनि करणें अतां *वंशिं जसा व्यवहार* ॥
द्विज-कुलवृद्ध नि ***गुरूमतें वेदविहित आचार*** ॥ २८६ ॥

रामसुकीर्ति-कविता शरयू ' लोकवेदमत-मंजुलकूला–' आहे. लोकमत व वेदमत या दोन तटांच्या मधून वाहणारी आहे, हें शरयूरूपकांत उपक्रमांतच सांगितलें आहे. कोणताहि विधि-संस्कार करावयाचा असेल तेव्हां कुलरीतिरिवाज व वेदशास्त्रोक्त आचार या दोन्हींचें पालन केलें पाहिजे. कुलरीतिरिवाज कुळांतील वृद्धांना विचारून त्यांच्या मतानें केले पाहिजेत; आणि वेदविधि गुरुजींच्या–कुलगुरूंच्या––कुलपुरोहितांच्या सांगण्याप्रमाणें केले पाहिजेत.

आज असें दिसतें कीं लोकरिवाज, भपका इत्यादि गोष्टी शक्तीबाहेर खर्च करून-सुद्धां सहज केल्या जातात; पण कुलवृद्धांना कोणी विचारीत नाहींत व कुलपुरोहित यजमानाच्या मताप्रमाणें शास्त्रविरुद्धसुद्धां 'चालेल' म्हणून संमति देतात.

विदेही जनकराजा व जनकराणी यांनीं कुलरीति वगैरे सर्व कुलवृद्ध, व कुलपुरोहितांच्या सांगण्याप्रमाणें केलें आहेच; पण दशरथांनींसुद्धां केलें आहे.

(१) **सहवसिष्ठ शोभति नृप कैसे । सुरगुरुसंगिं पुरंदर जैसे ॥**
करुनि वेद-कुल-विधींस **॥ राजा ।... निघति** ' (१।३०२।२)

(क) श्रीरघुवीरांस घेऊन वधूमंडपांत जाण्यास निघतांना दशरथ
करुनि गुरुवचें कुलविधि **राजा ।... निघति** ॥ (१।३१३।८).

(२) **विवाहकार्यांत** —
समयोचित विधींना व्यवहारां कुलगुरुयुगल कारिति आचारां ॥
छंद – *कुलरीति रवि सप्रीति सांगत आदरें संपादिलें* । (१।३२३।८ व छंद २)

सर्वांत अति कुलवृद्ध रवि; त्यांनीं रविकुलरीति सांगितली तसें केलें.

(३) *जनकराणी*—**राणी श्रवुनि पुरोहितवाणी । प्रमुदित सखींसमेत शहाणी ।। *विप्रवधू, कुलवृद्धा आणुनि ।* गाति सुमंगल *कुलविधि सारुनि* ।।** (१।३२२।३-४) विश्वामित्रांच्या आज्ञेशीं तुलना करावी. '*द्विजकुलवृद्ध* इ. इ.'

(४) वरात अयोध्येंत घरीं आल्यावर *लक्ष्मीपूजनांत* (१।३५० म)

लोकरीति जननी करति वरवधु संकुचतात ।।

पाहुन मोद _विनोद_ अति सस्मित राम मनांत ।।

(५) याशिवाय औक्षण करणें, अंगावरून ओवाळून टाकणें आरत्या, जेवतांना उखाणे, घास देणें, इ, इ. अनेक लोकरीतींचें वर्णन आहे.

(६) **संशोधकांस कार्य** — अयोध्येंत वरात येऊन सर्व विवाहविधि व लोक-रीतिरिवाज उरकले असें पाहून सर्व देव परत गेले. नंतर दशरथांनीं पुत्र व पुत्रवधू यांना मांडीवर घेऊन त्यांचें लाड करण्याची नवीन पद्धति सुरू केली असें दिसतें; *महाराष्ट्रांत जी सुनमुखाची पद्धति आहे तिला शास्त्राधार किती व नसल्यास ही पद्धति केव्हांपासून कशी अस्तित्वांत आली याचें संशोधन करावें.*

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१० 卐 卐 卐

पुत्र-शिष्य-धर्म

पूर्व प्रकरणांत आवश्यक म्हणून ठरविलेलें कुलरीतिपरंपरादिकांचें संरक्षण होण्यास पुत्र धर्मशील व्हावे लागतात; नाहींतर श्रीरघुनाथानें म्हटल्याप्रमाणें 'कुपुत्रहि उपजतां कुलसद्धर्मविनाश' (४।१५ म) होतो. म्हणून आतां या प्रकरणांत पुत्रधर्मांचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. पुत्र आणि शिष्य यांचे धर्म सारखेच असल्यानें आणि शिष्य हा सप्तपुत्रांपैकीं एक असल्यानें पुत्र-शिष्य-धर्म असें शीर्षक घातलें.

दौहित्रः पोषितः शिष्य आरामश्च जलशयः ।

सद्ग्रंथकरणं पुत्रः सप्तपुत्राः प्रकीर्तिताः (आनंद रामायण)

आतां विशेष चर्चा न करतां मानसांतील वचनेंच शक्य तों देणें चांगलें. श्री रामचरित्रांतच पुत्रशिष्यधर्माचें प्रात्यक्षिक दाखविलें आहे; म्हणून तेंच मुख्यतः पुढें दिसेल.

१. **उषःकालिं रघुनायक उठती । *माय पिता गुरु यां शिर नमती* ।। आज्ञा घेति करितिं पुरकाजा । बघुनि चरित हर्षित मनिं राजा ।।** (१।२०५।४,६-८) मुंजीनंतरचें व विश्वामित्रांबरोबर जाण्यापूर्वीचें हें वर्णन आहे. या वेळीं वय १४ वर्षांचें सुद्धां नव्हतें.

(क) **भोजन सानुज समित्र करती । *ताताम्बा आज्ञा अनुसरती* ॥**
***श्रुतिपुराण ऐकति मन लावुनि । स्वयें काथिति अनुजां समजावुनि* ॥**

(ख) विश्वामित्रांबरोबर जाण्यास निघतांना,

जननिभवनिं गेले प्रभु निघति *नमुनि पदिं शीस* ॥
'तुम्हि मुनि ! पिता आन नहि कोणी ॥'

असें म्हणून दोघांस मुनींच्या स्वाधीन केल्यावर,

पुरुषसिंह युग वीर *हर्षें निघति* मुनि भयहरण ॥ (१।२०८ म)

२. विश्वामित्राश्रमांत गेल्यावर,

रघुपति वदति सकाळीं कीं मुनि ! । यज्ञ करावा निर्भय, जाउनि ॥
मुनिसमूह होमा करुं लागति । आपण मखसंरक्षक राहति ॥ (२१०।१-२)

यज्ञरक्षणाविषयीं मुनि आज्ञा देतील तेव्हां मग पाहूं असें वाटलें नाहीं. उजाडल्याबरोबर स्वतःच मुनींस सांगितलें. आज्ञेची वाट पाहणें हें उत्तम पुत्र, शिष्य, सेवक यांचें लक्षण नाहीं. आज्ञेची वाट न पाहतां ठरलेली किंवा अपेक्षित वा दिसणारी सेवा करणें ह *उत्तमाचें लक्षण दाखविलें*.

३. **भक्तिहेतु किति कथापुराणें । *कथिलीं विप्रें प्रभु जरि जाणे* ॥**

गुरुजी सांगत असलेली कथा वगैरे शिष्यास माहीत असली तरी कांहीं न बोलतां श्रवण करावें. मुनीश्वराकडून विद्याप्राप्ति झाल्यापासूनच दोघे बंधू गुरुपदपंकज सेवा करूं लागले; पण तें वर्णन पुढें येईल.

४. जनकपुरीच्या बाहेर एका आमराईंत पोचल्यावर नगरांत प्रवेश न करतां विश्वामित्र श्रीरघुवीरास म्हणाले,

कौशिक वदले 'रुचे मम मना । इथें उतरुं रघुवीर सुजाणा ॥'
बरें नाथ ! तैं कृपाब्धि वदले । *मुनिवृंदांसह तिथें उतरले* ॥ (१।२१४।६-७)

चक्रवर्ती राजाचे १४ वर्षांचे, प्राणांहून प्रिय पुत्र गुरुजींच्या बरोबर खुशीनें आमराईंत उतरले ! हे दिवस उन्हाळ्याचे नसून आश्विन महिना चालूं होता. गुरु जिथें ज्या परिस्थितींत राहतील तिथें तसें शिष्यानें-पुत्रानें राहावें. विश्वामित्र पिता आहेतच.

५. **ऋषिंसमेत रघुवंशमणि कृत भोजन विश्राम ॥** (१।२१७)

गुरुजींच्या आधीं जेवले नाहींत व भोजनानंतर गुरुजींनीं विश्रांति घेतली तेव्हां दोघां भावांनीं विश्रांति घेतली.

६. लक्ष्मणास जनकपुरी दाखवून येण्यासाठीं गुरुजींची परवानगी अगदीं संकोचानें व अति विनयानें मागितली आहे.

वडिलांची आज्ञा । घेतल्या वांचोनि । कोठें घरांतुनि । जाऊं नये ॥

असें शिकविणाऱ्या कविता पूर्वी शालेय पुस्तकांत होत्या व त्या लहान वयांतच शिकविल्या जात असत; त्या सुशील-संवर्धक होत्या म्हणूनच जणूं त्यांचें उच्चाटन झालें !

(क) गुरुजींची परवानगी कशी मागतात पाहा.

अति विनयें, लाजतां, स्मितानन । *वदले पावुनि गुरु-अनुशासन* ॥ (२१८।८)
कांहीं विचारावेंसें वाटतें तें विचारूं कां ? असें अति विनयानें, लाजत लाजत, प्रसन्न मुखानें आधीं विचारलें व नंतर विचारण्यास अनुज्ञा मिळाल्यावर म्हणाले कीं,

' आज्ञा अपली मिळेल मज जर । नगर दाखवुनि आणिन सत्वर ॥'

तैं मुनीश वदले सप्रीती । ' राम तुम्हि न कशि राखां नीती ॥'

' आज्ञा द्या ' असेंसुद्धां म्हणाले नाहींत. आज्ञा द्या असें म्हणणें, तोंड वाकडें करून, अप्रसन्न होऊन, रडक्या मुद्रेनें, हट्ट करून, विचारणें हा पुत्रधर्म किंवा शिष्यधर्म नाहीं.

(ख) लक्ष्मणास नगरी व मखमंडप दाखविण्यांत, नगरींतील प्रेमळ बालकांच्या प्रेमळ वागणुकीमुळें थोडा उशीर झाला तेव्हां,

बघुनि कौतुका निघति गुरुकडे । उशिर जाहला भीति मनिं पडे ॥
भीतिस भिववी धाक जयाचा । तो प्रभाव दाखवि भजनाचा ॥ (२२५।६-८)
' नगर दाखवुनि आणिन सत्वर ' असें परवानगी मागतांना म्हटलें होतें; पण तसें घडलें नाहीं. याबद्दल संकोच वाटला, लाज वाटली.

प्रेमें सभय विनीत अति संकोचित दोघेहि ।
गुरुपद पंकजिं नमुनि शिर आज्ञेनें बसलेहि ॥ (२२५)

गुरुविषयीं प्रेम व आदरयुक्त भीति असावी. अपरिहार्य कारणामुळें कबूल केल्याप्रमाणें घडलें नाहीं तरीसुद्धां भीति व लज्जा वाटली !

(ग) **वाल्मीकि रामायण, भावार्थ रामायण इत्यादींत** अशा प्रकारचे आदर्श नीति शिक्षणाचे सक्रिय धडे गिरवलेले नाहींत ! आज्ञा मिळाल्यानंतर बाहेर जातांना नमस्कार करून जावें, परत आल्यावर नम्रपणें नमस्कार करावा व बसण्याची आज्ञा मिळाल्यावर बसावें.

(घ) वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं वागतांना या नियमांचें पालन कोणी न सांगतां, हल्लींसुद्धां करतात; पण मातापितागुरु यांच्याशीं वागतांना मात्र अलीकडे अरेरावी सुरूं झाली आहे, हें समाजाचें व देशाचें दुर्दैव आणि अवनतीचें लक्षण नव्हे काय ?

७. संध्यावंदनादिसुद्धां गुरु-आज्ञेनें करीत असत हें पूर्वीं दाखविलें आहे.

८. सकाळीं प्रवासास निघाल्यापासून सर्व दिवसांत कथापुराण सांगण्यास सवड झाली नाहीं; व आज चतुर्दशीयुक्त कोजागरी पौर्णिमा असल्यानें,

' वदत कथा इतिहास पुराणा । क्रमिति रुचिर युग निशियामांना ॥ (२२६।२)
मध्यरात्रींपर्यंत मुनींनीं कथा सांगितली ती श्रवण केली.

ल. ठे. — सकाळीं अनवाणी, पायीं चालत आले; मध्याह्नानंतर भोजन झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन नगरदर्शन करून आले; नंतर नगराच्या दुसऱ्या दिशेला जाऊन संध्यावंदन करून आले. नंतर भोजन, फराळ वगैरे कांहीं नाहीं ! आणि मध्य-

रात्रींपर्यंत कथाश्रवण केलें; तरी त्यानंतरसुद्धां राम-लक्ष्मण झोपले नाहींत.

९. **गुरुपादसेवनभक्ति.**

मग मुनिवर जाऊन झोपले । दाबिति पायां बंधुयुग भले ॥
ज्यांच्या चरणसरोजालागीं । करिति विविध जप योग विरागी ॥
बंधू-जणुं ते प्रेमें जितले । गुरुपदपंकज सेवे रतले ॥
वारंवार देति आज्ञा मुनि । रघुवर करती शयना जाउनि ॥ (२२६।३–६)

पूर्वीं दाखविल्याप्रमाणें सर्व दिवसभर व रात्रीं १२ वाजेपर्यंत दमलेले असून पेंगत, जांभया देत पादसेवा केली नाहीं, आनंदानें सेवा केली.

(क) अशा प्रकारच्या सेवेंत आज्ञाभंग दोष नाहीं उलट भूषण आहे,(टीका पाहा). तीन-चार वेळां सांगितल्याशिवाय अशी सेवा सोडूं नये.

(ख) लक्ष्मण रामसेवक असल्यामुळें त्यानंतर लक्ष्मण रामचरणसेवा करूं लागले इत्यादि २२६।७–८ टीकेसह पाहा. पुन्हां लक्ष्मण रामाच्या आधीं उठले व राम गुरूच्या आधीं *जागे* झाले. (२२६ पाहा).

१०. नंतर नगराबाहेर जाऊन नदीतीरीं शौचस्नानादि करून आले. (२२७।१) 'प्रातःस्नान संध्यादि' प्रकरण पाहावें.

११. परत येऊन वंदन करून पुन्हां गुरुसेवाकार्य करण्यास, पूजेसाठीं फुलें, तुळशी वगैरे आणण्यास गेले. तेथील अनपेक्षित घटनेमुळें फुलें घेऊन येण्यास बराच उशीर झाला; पण त्या पुष्पवाटिकेंत घडलेली सर्व हकीकत कौशिकास सांगितली; कांहींसुद्धां लपवून ठेवलें नाहीं. (२३७।१–३).

(क) एका परम रमणीय राजकन्येचें अचानक दर्शन होऊन तिच्यावर पत्नी-भावानें प्रेम बसलें इत्यादि गोष्टी आपल्या बरोबरीच्या सावत्र भावाला व आपल्या गुरूला सांगितल्या; यानें श्रीरघुवीराची ऋजुता-वीरता प्रतीतीस आली. अशा गोष्टीसुद्धां गुरुपासून लपवून न ठेवल्यानेंच कल्याण होतें हें पुढें दाखविलें आहे. अशा गोष्टी लपविणेंसुद्धां छल कपटच होय.

गुरुशि कपट करतां नव्हे ज्ञान विमल हृदयांत ॥ (१।४५)

१२. फुलें उशीरां मिळाल्यामुळें सर्व मुनींना पूजेस उशीर झाला व भोजनासही उशीर झाला; तरी कौशिकमुनि कांहीं बोलले नाहींत; पण न बोलतांच शिक्षेची थोडी चुणूक दाखविलीच; आज भोजनानंतर विश्रांति नाहीं; आणि भोजन झाल्या-बरोबर पुराणकथा सांगण्यास सुरुवात केली व सूर्यास्त झाला तरी थांबविली नाहीं.

विगत दिवस, गुरु-आज्ञा मिळतां । उभय बंधु गत संध्येकरितां ॥

१३. ज्या रघुवीराचें मन जानकीवर आसक्त झाल्याचें चंद्रोदयवर्णनांत दिसतें ते स्वतः होऊन धनुर्मखमंडपांत गेले नाहींत; विश्वामित्र चला म्हणाले तेव्हां गेले. सर्व राजांनीं प्रयत्न केला पण नामर्द ठरले. 'वीरविहीन मही मी जाणें' इत्यादि जनकानें

बोलून दाखविलें तरीसुद्धां सामर्थ्य असूनही श्रीरघुवीरानें सीतेकडे किंवा धनुष्याकडे पाहिलेंसुद्धां नाहीं.

(क) '**उठा राम! भंगा भवचापा। वारा तात जनकपरितापा** ॥' (२५४।६) अशी आज्ञा विश्वामित्रानें दिली तेव्हांच उठले! गुरूच्या आज्ञेशिवाय कोणतेंही लौकिक किंवा पारमार्थिक कार्य करावयाचें नाहीं हा आदर्श येथें दाखविला.

१४. दशरथ राजा भरतादिकांसहित जनकपुरींत आल्यानंतर —

ऐकत तातागमना भ्राते। उर न पुरे अति आनंदातें ॥

संकोचें वदुं शकति गुरुस ना। पितृदर्शन लालसा बहु मना ॥ (३०७।५-६)

पित्याला भेटण्याची प्रबल इच्छा आहे, पण विश्वामित्राजवळ ती गोष्ट बोलण्यास धीर होईना. गुरुपेक्षां पित्यावर अधिक प्रेम आहे असें ठरलें असतें.

१५. विवाहानंतरचें एकच उदाहरण (जनकपुरींतलेंच) घेऊं (१।३३०।३-४)

उषःकालिं भूपतिमणि जागति। याचक गुणगण गाऊं लागति ॥

बघुनि कुमारांसहित वधू वर। मोद अमित मनिं कसा वदूं बरं ॥

उषःकाळीं दशरथ राजा उठल्याबरोबर चौघेहि पुत्र आपापल्या सुंदर वधूसह पित्यास नमस्कार करण्यास गेले हें दाखविलें आहे. लग्न झाल्यानंतरसुद्धां वडिलांच्या पूर्वी उठून पूर्वीसारखेच वंदन करीत असत हें येथें दाखविलें.

मानसांत पुत्र व शिष्यधर्माचें दिग्दर्शन पुढील काण्डांतसुद्धां आहे. कांहीं नमुने येथें दाखविले.

आदर्श नीतिशिक्षक तुलसीमानससमान आन नहीं ॥

याची प्रतीति मानसांतील कोणत्याही चरित्रांत पाहावी.

अयोध्याकांडांतील कांहीं वचनें.

(१) **श्रीरघुनन्दन कैकयीस म्हणाले,**

'**श्रुणु जननी तो सुत बहु भागी। जो *पितृमातृवचानिं अनुरागी* ॥**

तनय *मातृपितृ तोषविणारा*। दुर्लभ जननि! सकल संसारा ॥ ८ ॥

दो. — 'मुनिगण मिलन विशेषिं वन मजसि परम हितकारि ॥

पित्राज्ञा त्यांतहि तुजसि जननी संमत भारि ॥ ' (४१।७-८ व दो.)

(२) **कैकयी श्रीरामास म्हणाली,**

'**तुम्हि न तात! *अपराधालायक*। *जननी-जनक-बंधु-सुखकारी*** ॥

राम *सत्य* जें कांहीं *वदतां*। *तुम्हि पितृमातृ वचनरत* असतां ॥ ' (४३।३-४)

(३) **श्रीराम म्हणतात,**

'***धन्य जन्म*** जगतीतलिं त्याचें। ***प्रमुदित पिता चरित्रें ज्याचें*** ॥

करतालिं चारी पदार्थ त्यातें। *प्राणप्रिय ताताम्बा ज्यातें* ॥

जन्म-सफलता आज्ञापालन ॥ (४६।१-३)

(४) वनवासास जाण्यापूर्वी कौसल्येची अनुज्ञा घेण्यास गेले तेव्हां, वडिलांनीं मला वनवास दिला असें न म्हणतां व कैकयीचा उल्लेखही न करतां, राम म्हणाले,

'देति तात मज काननराज्य। कार्य बहुत मज तेथें प्राज्य ॥
चुकुनि न घाबरि हो स्नेहास्तव। अंब देई आनंद कृपा तव ॥'

(५) कौसल्या श्रीरामास म्हणाली,

'राज्य अर्पण्या शुभदिन काढति। वनिं कोण्या अपराधें धाडति ॥
सांग वासरा मजसि निदानू। कोण भानुकुळीं होइ कृशानू ॥' (५४।७-८)

(क) याचें उत्तर द्यावयाचें म्हणजे भरतजननीच्या कपटी कुटिल कारस्थानाचा पाढा आपल्या मुखानें आपल्या जननीसमोर वाचावा लागला असता; म्हणून आदर्श-नीतिशिक्षक, धर्मवीर श्रीरघुनाथानें कारण सांगितलें नाहीं; तेव्हां

बघुनि रामकल सचिवसुत कारण सब समजावि ॥ (५४)

(६) 'सर्वधर्मि पित्राज्ञा श्रेष्ठचि ॥ (५५।८)
जर केवळ पित्राज्ञा ताता !, जाइं न। अधिक जाणुनि माता ' (५६।१)

(७) कौसल्येसमोर सीतेशीं बोलण्याची वेळ आली तेव्हां —

वदण्या मातेसमोर लाजति। साजे समया समजुनि बोलति '॥

(८) श्रीरघुनाथ लक्ष्मणास सांगतात,

माय–बाप–गुरु–धनी वच सहज मान्य करतात।
जन्मलाभ ते लुटिति जगीं व्यर्थ न तर जगतात ॥ दो. ७ ॥

(९) निषादराज आपल्या सैनिकांस सांगतो,

'ज्याची साधुसमाजिं न गणना। स्थान रामभक्तांत ज्यास ना ॥
वृथा जगे जगिं तो भूभारु। जननी–यौवन–विटप–कुठारू ॥' (१९०।७-८)

आणखी पुष्कळ वचनें आहेत; पण येथें इतके नमुने पुरेत. पुत्रशिष्यधर्माविषयींचे मानसांतील वेदशास्त्रानुसारी बरेच सिद्धान्त या लेखांत दाखविले गेले आहेत. वर्णाश्रमादि वेदशास्त्रोक्त धर्मांचें पालन प्रजेकडून होणें न होणें ही गोष्ट मुख्यतः राजावर व राजसत्तेवर अवलंबून असते; म्हणून आतां भूपधर्माचें अवलोकन करणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।११ 卐 卐 卐

भूप – धर्म

श्रीरामचरित–मानसांत भूपधर्माचें थोडक्यांत निदर्शन प्रतापभानु–चरित्रांत बालकाण्डांत केलें आहे. (१।१५५।१–१५६।२).

भानूप्रताप नृप–बलशाली। कामधेनु भूमी शुभ झाली ॥
प्रजे न लेश दुःख, सुख भारी। धर्मशील सुंदर नरनारी ॥

सचिव धर्मरुचि हरिपदिं प्रीती । नित्य शिकवि नृपहितार्थ नीती ॥
गुरु सुर संत पितर–भूदेवां । पूजी भूप सदा करि सेवा ॥
भूपधर्म जे वेदीं वानित । सादर सकल करी सुख मानित ॥
प्रतिदिन देइ विविधाविध दानां । ऐके श्रुति, वर शास्त्र–पुराणां ॥
विविध कूप कासार वापिका । सुंदर बागा सुमन–वाटिका ॥
विप्रवास सुरसदनें सुंदर । सर्वतीर्थिं नृप निर्मि मनोहर ॥
दो.–वेद पुराणीं उक्त जे एक एक सब याग ॥
वार हजार हजार नृप करी सहित अनुराग ॥ १५५ ॥

म्हणूनच पुढील जन्मीं —

' सुनासीर शतसदृश तो संतत करी विलास ॥ (६।००।–)

(सुनासीर = इन्द्र) हें सर्व करण्यांत,

' हृदयीं कांहिं फलाकांक्षा नहि । भूप विवेकी परम सुजाणहि ॥
करि जो धर्म कर्म-मन-वाणीं । वासुदेविं नृप अर्पी ज्ञानी ॥ ' (१।१५६।१–२)

कर्ममार्गांत परम सुजाण = ज्ञानी होता; प्रजेनें विधियुक्त धर्माचरण करावें म्हणून स्वतः निष्काम ईश्वरार्पण करून कर्म करीत असे. (टीका पाहा.)

अयोध्याकांड – प्रजापालन व प्रजासंतोष हें राजाचें व राजसत्तेचें मुख्य ध्येय व कर्तव्य या काण्डांत अनेक वेळां दाखविलें आहे.

(१) वनगमन-प्रसंगीं **श्रीरघुनाथ लक्ष्मणास सांगतात** कीं, ' घरीं—
रहा करा सकलां परितोष । ना तर तात ! घडे बहु दोष ॥ '
जिथें प्रजा प्रिय दुःखी भारी । तो नृप खचित निरयअधिकारी ॥ (७१।५–६)

(२) **वसिष्ठ सांगतात,** **' पाळा प्रजा शोक परिहरणें ॥ '** (१७५।१)
' कौसल्यादि सकलही *माता । प्रजा-सुखें सुख लाभति* ताता ॥(१७६।६)
असें भरतास सांगितलें.

(३) **कौसल्या श्रीरघुनाथास सांगते,**
' तुजविण भरता नृपां *प्रजे दुःसह होती क्लेश* ॥ ५५ ॥
' *प्रजादुःखहर* ये हो सत्वर ॥ ' (६८।६)
' *प्रजा* सचिव सब *माता* परिजन । तूंच बाळ ! सकलां अवलंबन ॥ '
(१७६।४) असें कौसल्या भरतास म्हणाली. यांत प्रजेचा उल्लेख प्रथम !

(४) **श्रीरघुनाथाचा भरतास निरोप,**
' *पाळा प्रजा कर्म मन वाणीं* । ' ' नीति न सोडा राज्य पावतां । '

(५) **श्रीरघुनाथ भरतास** चित्रकूट **येथें सांगतात,**
(क) **' तुम्हि मुनि-मातृ-सचिव वच पाळा । मही *प्रजा* नगरी *सांभाळा* ॥ '**
(ख) दो. – *मुख्य मुखासम पाहिजे* **खाण्यापिण्यास एक । '**

पाळि पोषि अंगां सकल तुलसीसहित विवेक ।। ३१५ ।।

' **इतकें राजधर्म–सर्वस्वहि ।** ' या दोह्याची गूढार्थ चंद्रिका पाहा.

प्रजापालन, प्रजादुःखहरण आणि प्रजेस संतुष्ट ठेवणें यांविषयीं आणखी पुष्कळच वचनें आहेत. हल्लींच्या भारतांतील स्वराज्यांत या तीन गोष्टी साधल्या जातात का? याचा विचार करावा.

(ग) ' **सेवक करपद नयनसे स्वामी मुखासमान ।** ' ।। ३०६ ।। असें पाहिजे.

अरण्यकाण्ड – आणखी कांहीं भूप-क्षत्रिय-धर्मांचें वर्णन या काण्डांत आहे.

(१) ***क्षत्रिय** अम्हि **मृगया** वनिं करतों । तुमच्या सम **खल-मृगां धुंडतों*** ।। (१९।९)

खल-दुर्जनरूपी हिंस्र पशूंनां हुडकून काढून त्यांचा संहार करावा हें दाखविलें. म्हणूनच **किष्किंधाकाण्डांत स्वराज्यांतील सुराज्याचें मुख्य लक्षण सांगितलें आहे कीं, ' खल–उद्यम सरले.'** ' कीं *स्व-सुराजिं खलोद्यम सरले* ' (४।१५।३) चोऱ्या, दरोडे, खून, लुटालूट, आगी लावणें, फसवेगिरी इत्यादि उद्यम (उद्योग) करणारे खलच असतात. उत्तरकाण्डांत रामराज्यांत वर्णिलें आहे कीं,

मोह मान मद मत्सर *तस्कर* । कुठें *न चाले* यांच हुन्नर ।। (७।३१।६)

तस्कर = **चोर, दरोडेखोर, लुटारू, भामटे,** (इत्यादि) **यांचे, उद्योग बंद पडले; हेंच सुराज्याचें मुख्य लक्षण आहे. हीच प्रजेच्या संतोषाची मुख्य कसोटी आहे.** जगांतील कोणत्यातरी *शाहींत* हें लक्षण दिसतें का याचा शोध घ्यावा.

(२) श्रीरघुवीरानें खराच्या दूताबरोबर धाडलेल्या उत्तरांत **धर्मयुद्धाचीं लक्षणें** दिसतात. (**क**) कोणीहि युद्धाला आह्वान दिलें तरी स्वीकारणें, (**ख**) सज्जनांचें पालन करणें, (**ग**) दुष्टांचा संहार करणें, (**घ**) लढाईतून पळून जाणारावर प्रहार न करणें, (**ङ**) शरण न आलेल्या शत्रूवर दया न करणें, (**च**) युद्धांत छल-कपट न करणें, (**छ**) शत्रु अधिक बलवान असला तरी लढून मारणें किंवा मरणें म्हणजेच युद्धांतून पळून न जाणें, (**ज**) युद्धाच्या वेळीं स्त्रिया आदि बिनलढाऊ वर्ग सुरक्षित राहील अशी व्यवस्था आधींच करणें.

(३) **आणखी कांहीं राजधर्म** — शूर्पणखा रावणास सांगते,

' क्रोधें अति बोले वचनासी । देश कोष शुद्धिच भुललासी ।।
करसि पान निजसी दिनरातीं । शुद्धि न तिळ तव शिरीं अराती ।।
राज्यनीतिविण धर्माविण धन । हरिस सुकर्म न करतां अर्पण ।
येइ विवेक न विद्या शिकुनी । *श्रम फल पहुनी करुनि पावुनी ।।*
भूप कुमंत्रें* यति संगानें । मानें ज्ञानहि *लज्जा पानें ।।
नाशति शीघ्र असें नय वदे । ' (२१।६-१०)

यांतील सर्व विधानें रावणास लागू आहेत. (टीका पाहा.)

किष्किंधाकाण्ड — (१) राज्याच्या सात अंगांपैकीं *मित्र, सचिव* व *सैन्य* यांची प्राप्ति सुग्रीवसख्यानें झाली आहे. रावणाशीं युद्ध करण्यास कोषाची आवश्यकता नाहीं.

(२) 'प्रजे भरति (जशि) मिळत सुराजे ।' प्रजेची सर्वांगीण भरभराट हें चांगल्या राजाचें व सुराज्याचें लक्षण आहे.

(३) राजाच्या आश्रिताशीं वा मित्राशीं विरोध म्हणजे राजाशींच विरोध-वैर; हा सिद्धान्त वालीसंवादांत आहे.

'मम भुजबल-आश्रित तो कळुंनि । मारूं बघसि अधम अभिमानी ।।' (४।९।१०)

(क) कांहीं वचनें 'वर्णाश्रमधर्म' प्रकरणांत दिलीं आहेत.

सुन्दरकाण्ड. (१) गुप्त हेर पाठवून शत्रूकडील माहिती मिळविणें. शत्रूच्या मुख्य स्थानाकडे जाण्याचा मार्ग इ. जाणणें; आणि राजाच्या सहा गुणांपैकीं '*यान*' म्हणजे *शत्रूवर स्वारी करण्यासाठीं प्रयाण* हा गुण इतक्या गोष्टी या काण्डांत प्रामुख्यानें दाखविल्या आहेत.

(२) शत्रु-दूत-वध (हनन) करूं नये.

'नीतिविरुद्ध न वधणें दूता ।', 'दण्ड दुजा प्रभु कांहिं करावा ।'

(३) सचिवांनीं राजाला मत देतांना कसें द्यावें—

सचिव वैद्य गुरु हे प्रिय लोभ-भयें वदतील ।
राज्य धर्म तनु तीनि तरि सत्वर विनाशतील ।।

सचिवानें राजाशीं वागतांना वैद्य व गुरु यांच्या कर्तव्याचेंहि पालन केलें पाहिजे व लोभानें किंवा भयानें राजाला जें प्रिय तेंच बोलूं नये. (मानसमणि जुलई १९५४ पाहा).

(४) शरण आलेल्या बिभीषणाला आश्रय देण्यानें द्वैध = भेद या एका राजगुणाचें कार्य मानसांत याच काण्डांत सहज साधलें आहे.

(क) संधि, विग्रह, *यान*, आसन, द्वैध व *आश्रय* हे सहा भूपगुण आहेत. अन्य राजाचा *आश्रय* करण्याची आवश्यकता श्रीरघुवीरास नाहीं. राहिलेले तीन गुण लंकाकांडांत दिसतील.

लंकाकांड. (१) अंगदास दूत म्हणून पाठवून **संधि** करण्याचा प्रयत्न केला.

(२) **आसन** = योग्य संधीची वाट पाहात राहणें; हा गुण या कांडांत (१।१४—दो. ११ टीका पाहा.) दाखविला आहे.

(३) **विग्रह** = युद्ध करून शत्रूचा संहार केला आहे.

(४) **'नाथ! वैर तों त्यासी करणें । बुद्धि-बळें ज्या शक्य जिंकणें ।।**
तुम्हि रघुपतिमाधिं अंतर कैसें । खलु खद्योत दिवाकरिं जैसें' ।। (६।६।५-६)

अशी राजनीति मंदोदरीनें रावणास सांगितली.

(५) **'संत वदति अशी नीति दशानन! । वृद्ध नृपें सेवावें कानन'**।। (६।७।३) असें मंदोदरीनेंच रावणास सांगितलें आहे.

(६) **राजा** — मतिबलतेजधर्मगुणराशी असावा.

(७) **दूत**— मतिबलगुणधाम व परमचतुर असावा. (६।१७।३ व ६,७ पाहा).

(८) दूतानें संधीचा प्रयत्न करून हें साधावें.

' ***रिपुहित अमचें कार्य घडावें*** । **असें शत्रूशीं तुम्हीं वदावें** ' ॥ (६।१७।८)
या दोन्ही गोष्टी अंगदानें साधल्या आहेत. (टीका पाहा.)

(९) युद्धांतून पळून जाणाऱ्या आपल्या सैनिकांशीं राजानें कसें वागावें—

' निजदल विचलित जैं ये कळुनी । फिरवि सुभट लंकेश खवळुनी ॥

जो रणविमुख कळे मम कानां । त्या मी वधिन कराल कृपाणां ॥

भक्षित सकल भुक्त भोगांना । रणांगणीं प्रिय मानां प्राणां ॥

सन्मुख मरणाहि वीरां शोभा ॥ तेव्हां **' ते त्यजिती प्राणांच्या लोभा ॥'**
(६।४२।६–१०) याचेंच दुसरें उदाहरण अरण्य. २०।२।३ पाहा.

(क) ' सुभट आणवुनि दशमुख बोले । रणी सन्मुख ज्याचें मन डोले ।
बरें तयानें अतां पळावें । बरें नव्हे किं विमुख रणिं व्हावें ॥ ' (७८।४।५)

(१०) (क) रावण मेघनादादि सर्व महावीर राक्षसांनीं अनेक वेळां कपटयुद्ध, मायायुद्ध केलें आहे.

(ख) पळणाऱ्या कपिसैन्यावर रावणानें दाही धनुष्यांनीं बाणांचा वर्षाव केला आहे.

(ग) मूर्च्छित पडलेल्या लक्ष्मणास उचलून पळवून नेण्याचा निष्फळ प्रयत्न दोन वेळां केला.

(११) श्रीरामलक्ष्मणांनीं किंवा कपिवीरांनीं केव्हांही कपटाचा आश्रय केला नाहीं.

(क) मूर्च्छितावर, पळणारावर प्रहार केला नाहीं.

(ख) रावण मारला जातांच वैर-शत्रुत्व संपलें व त्याची उत्तरक्रिया बिभीषणाकडून यथाविधि करविली. शत्रूच्या राजधानींत लटालूट व जाळपोळ इत्यादि अनीति केली नाही.

उत्तरकाण्ड — या कांडांतलि कांहीं वचनें ' वर्णाश्रमधर्म ' प्रकरणांत दिलीं आहेत. राजनीतिविषयक पुष्कळ वचनें ' रामराज्यवर्णन ' या प्रकरणांत आहेत.

१. वेद-इतिहास–धर्म-पुराण–कथाश्रवण राजानें स्वतः नित्य करावें व प्रजेकडून करवावें हें पूर्वीं ' वेद-इतिहास-पुराण-कथाश्रवण ' या प्रकरणांत दाखविलें आहे. अवशिष्ट राहिलेले विषय ' श्रीरामराज्यवर्णन ' या प्रकरणांत आहेत.

याप्रमाणें भूपधर्म आणि राजनीति यांचें मानसांतील कांहीं नमुने येथें दाखविले.

राज्यशासनपद्धति कशी असावी याचा आदर्श नमुना श्री तुलसीदासांनीं मानसांत दाखविला आहे तो पुढील प्रकरणांत पहावा.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१२ 卐 卐 卐

श्रीतुलसी-शासन-पद्धति

श्रीमद्गोस्वामींनीं १४ वर्षें अखिल भारतांत पायीं तीर्थाटन केलें, त्यामुळें ठिकठिकाणीं चालत असलेल्या राज्यशासनपद्धतींचें त्यांस अवलोकन करतां आलें. अकबर, जहांगीर व शहाजहान या तीन मोगल बादशहांची शासनपद्धति व तिचे धर्म, नीति, समाज, व राष्ट्र यांवर झालेले परिणाम त्यांनीं पाहिले व अनुभविले होते; त्यामुळें शासनपद्धति कशी असावी हें त्यांनीं विवेकें विचारें विवंचूनि पाहिलें व अत्यंत इष्ट वाटणारी त्रिदल शासनपद्धति त्यांनीं अयोध्याकांडांत सुचविली आहे; पण या गोष्टीकडे टीकाकारांचें लक्ष गेलेलें नाहीं.

एक दिवस दशरथ दरबारांत बसलेले असतां व वसिष्ठ तेथें हजर नसतां,

सहज घेइ नृप करिं मुकुराला । वदन बघुनि सम करि मुकुटाला ॥
श्रवण-समीप बघत सित केशां । जरठपणा जणुं करि उपदेशा ॥
दे युवराज्य नृपा रामाला । घे किं जन्म-जीवन-लाभाला ॥ (२।६–८)

१. २।४ केस पांढरे झालेले आज सहज दिसले; त्यामुळें सहज ठरलें कीं वृद्धपण आलें. आतां राज्याच्या व लोकसेवेच्या जबाबदारींतून मुक्त होऊन शेष आयुष्य तरी हरिचिंतनांत स्वस्थपणें घालवावें असें सहजच वाटलें, व त्यासाठीं कर्त्या झालेल्या रामास युवराज करावें असें सहज ठरलें.

(क) वाल्मीकि रामायणांत आरसा, पांढरे केस व जरठपणा यांचा उल्लेख नाहीं; पण कांहीं उत्पातादिकांवरून दशरथांस वाटलें कीं आपला मरणकाळ जवळ आला आहे तरी रामास युवराज करणें योग्य. त्यांनीं आपला विचार लगेच दरबारांत बोलून दाखविला आहे. सभेची नाममात्र अनुमति मिळाल्यावर मग *तयारीविषयीं वसिष्ठ पुरोहितांस* विचारलें आहे. पांढरे केस, आरसा व *जरा* यांचा उल्लेख रघुवंशांत आहे.

मानसांतील पद्धत्यनुसार दशरथ स्वतंत्र, स्वयंसिद्ध व्यक्तिनिष्ठ शासक नाहींत. *सर्वाधिकारी गुरु वसिष्ठ आहेत* म्हणून त्यांची आज्ञा मिळण्यापूर्वीं, मनांत आलेला विचार, राजानें सभेंत सांगितला नाहीं किंवा सचिवांनाही कळूं दिला नाहीं.

हा विचार मनिं करुनि नृप सुसमय सुदिन मिळून ।
प्रेमें पुलकित तनु मुदित *विनवि गुरुस जाऊन* ॥ दो. २ ॥

ल. ठे. – पुरोहिताचें कार्य असतां दशरथांनीं वसिष्ठांस बोलावणें पाठविलें आहे; पण गुरु किंवा सर्वाधिकारी नात्यानें वसिष्ठाचें कार्य असतें तेव्हां दशरथ स्वतः वसिष्ठांकडे जातात असें मानसांत निरपवाद दिसतें. हें राज्यसंबंधीं कार्य असल्यानें दशरथ स्वतः एकटे गेले आणि *गुरूंना विनवूं लागले.* ‘ आज्ञा दिली, सूचना दिली ’ असें नाहीं.

(क) **श्रुणु मुनिनायक! भूप म्हणाले । राम सर्वपरिं लायक झाले ॥** (३।१)
भूप शब्दानें भूमिपालनाचें कार्य सुचविलें आहे.

(ख) **बघुनि गुरुवरा प्रसादखाणी । वदति *भूप* हर्षित *मृदु* वाणीं ॥ १ ॥**
करणें नाथ! राम युवराजा । वदा *कृपायुत* ' सजवा साजां ' ॥ २ ॥
मी असतां हा उत्सव व्हावा । लोकीं लोचनलाभ लुटावा ॥ ३ ॥

काय इच्छा असेल ती सांगा असें वसिष्ठांनीं म्हटल्यावर वसिष्ठ *फार प्रसन्न* आहेत (प्रसादखाणी) असें पाहून पुन्हां *भूपच* बोलत आहेत व तेंसुद्धां *मृदुवाणीं* = हलक्या आवाजानें. *फार प्रसन्न आहेत* आतां *नको म्हणणार नाहींत* हें जाणलें तेव्हां मनांतला विचार हळूच प्रगट केला; **पण** तोहि ' नाथ ' ! या संबोधनानें. या सर्व गोष्टींवरून ठरलें कीं वसिष्ठांची संमति मिळाली तरच राजानें मनांत आणलेलें विधायक (= बिल) मंत्रिमंडळाच्या संमतीसाठीं मांडतां येईल. वसिष्ठांची संमति नसेल तर नवीन विधायक (बिल) मांडतांच येणार नाहीं; याचा अर्थ असा कीं,

(ग) कोणतेंहि **नवें बिल तयार करण्याचा अधिकार फक्त राजाचा,** *तो सर्वाधिकारी गुरूचा किंवा मंत्रिमंडळाचाहि नाहीं.*

(घ) **राजानें नवीन बिलास प्रथम सर्वाधिकाऱ्याची** संमति मिळवावी; व *संमति मिळाली तरच तो प्रस्ताव* (= बिल) *मंत्रिमंडळाच्या संमतीसाठीं मंत्रिमंडळापुढें राजानें मांडावा.*

दो. — **त्वरा करा न विलंब नृप सजवा सारा साज ।**
सुदिन मंगल तोच जैं राम होति युवराज ॥४॥

अशी सर्वाधिकारी वसिष्ठांची संमति मिळाली. आतां हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढें तांतडीनें मांडला जाईल.

३. वाल्मीकि रामायणांत भूप दशरथ पुष्कळच स्वतंत्र दिसतात. काय व कधीं करावयाचें याचा आधीं मनांत निश्चय करून, सभेची व मांडलिक राजांची नाममात्र संमति घेणारे ते आहेत. *वाल्मीकि रामायणांतील वसिष्ठ फक्त पुरोहित आहेत.* **वाल्मीकींचे दशरथ स्वतंत्र, स्वयंसिद्ध व्यक्तिनिष्ठ शासक आहेत. श्रीतुलसीदासांनीं श्रीमानसांत व्यक्तिराज्याचा निर्दोष आदर्शच निर्माण केला आहे.**

४. आले मंदिरिं मुदित महीपति । सेवक सचिव सुमंत्रा आणति ॥ (५।१)
सेवकांस पाठविलें व त्यांनीं सुमंत्रास व इतर सर्व सचिवांस बोलावून आणलें. मानसांतील सचिवांनीं राजाला हात जोडून वंदन न करतां ' जय जीव ' असें म्हणण्यानेंच केलें.

(क) यानें सुचविलें कीं, सचिव सेवक व राजा स्वामी असा संबंध नसून, जवळजवळ बरोबरीचें नातें दिसतें. म्हणजेच मंत्र्यांना खरें संपूर्ण मत-स्वातंत्र्य असून, पक्षशिस्तीचा काटेरी लगाम त्यांना लावलेला नाहीं. पक्षाच्या स्वार्थासाठीं राष्ट्राच्या व

प्रजेच्या हिताचा बळी न देणाऱ्या पक्षांतीत मंत्रिमंडळांत तो प्रस्ताव आतां मांडला जाईल. दशरथांच्या मंत्रिमंडळांत वामदेवांसारखे ऋषि आणि सुमंत्रासारखा सूत जातीचा सचिवहि होता.

(ख) आशीर्वादात्मक नमनानें हेंहि सुचविलें कीं, मंत्री राजाचे हितेच्छु व हितकर्ते असले पाहिजेत. अशा मंत्रिमंडळापुढें दशरथ प्रस्ताव मांडतात :—

(ग) मंत्रिमंडळाची ही जादा बैठक दशरथांच्या राजवाड्यांत अगदीं गुप्तपणें भरली आहे. (वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस, लघुलेखकांस व गुप्त पोलीसांससुद्धां बंदी आहे ! (म्हणजे असावी). एखाद्या सचिवानें विरुद्ध मत दिलें तर त्याच्याविषयीं प्रजेंत असंतोष पसरेल. प्रजा धर्मशील व कायद्यास आनंदानें मान देणारी असल्यामुळें अशा सचिवाचें आर्थिक नुकसान जरी झालें नसतें तरी तो प्रजेच्या मनांतून उतरला असता. प्रस्ताव संमत झाला नसता तर प्रजेंत मतभेद पसरले असते व दुफळी पडली असती म्हणून ही सभा अगदीं गुप्त भरली व गुप्त ठेवली गेली. दशरथांनीं प्रस्तावना करून प्रस्ताव मांडला व म्हणाले कीं,

' हें मत रुचेल जर पांचांला । अभिषेकणें मुदा रामाला ॥ ' (५।३)

त्यानंतर सर्व सचिवांनीं परम आनंदानें एकमतानें संमति दिली आहे. ही इच्छा सचिवांच्या मनांत पुष्कळ दिवस होतीच; पण नवीन प्रस्ताव मांडण्याचा अधिकार त्यांचा नसल्यानें आजपर्यंत स्वस्थ बसावें लागलें होतें. वसिष्ठांचाहि अधिकार नवीन प्रस्ताव मांडण्याचा नसल्यानें त्यांनींहि आजपर्यंत आज्ञा, सूचना दिली नव्हती.

ल. ठे. — वाल्मीकींच्या दशरथानें राज्याभिषेकाच्या तयारीची सुरवात करून, मांडलिक राजांस आज्ञापत्रें पाठवून नंतर आपला विचार भर-दरबारांत-सभेंत मांडला आहे ! (टीकेंत अवतरणें पाहा).

५. मंत्रिमंडळाची संमति मिळाल्यावर मग दशरथ सचिवांस आज्ञा देतात. ही आज्ञा कार्यकारी सचिवांना दिली,

भूप कथिति, मुनिराज जी आज्ञा देतिल कांहिं ।
रामराज्य-अभिषेकिं... ॥

येथें पुरोहिताचें कार्यक्षेत्र असल्यानें दशरथ स्वतः गेले नाहींत, व सचिवांना ही आज्ञा दिली. येथेंहि पुन्हां *भूप* शब्दच वापरला आहे. राज्याभिषेकाचा संबंध आहे; भूमिपालकाचें कर्तव्य, संस्कार व विधि यथाशास्त्र झाला पाहिजे हा हेतु आहे.

थोडक्यांत सिंहावलोकन :

(१) ही त्रिदल शासनपद्धति आहे.

(२) राजसत्ता दशरथासारख्या सत्कुलप्रसूत, वेदशास्त्रधर्मानुसारी, प्रतापवान, शीलसंपन्न, सत्यसंध, प्रजावत्सल, हरिभक्त, गुरुविप्रधेनुसुरसेवी, पक्षातीत, क्षत्रिय राजाकडे असावी.

(३) वसिष्ठांसारखा दयाळु, वेदशास्त्रधर्मनिष्ठ, सर्वशास्त्रनिपुण, ज्ञानी, महाभगवद्भक्त, ब्रह्मतेजसंपन्न महापुरुष सर्वाधिकारी असावा.

(क) राजानें करावयाच्या नवीन कायद्याच्या प्रस्तावास या सर्वाधिकाऱ्याची संमति प्रथम मिळाली पाहिजे.

(ख) नवीन कायद्याचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार या सर्वाधिकाऱ्यास नसावा.

(४) नवीन कायद्याचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार फक्त राजाकडेच असावा.

(५) सर्वाधिकारीसंमत झालेला प्रस्ताव राजानें मंत्रिमंडळापुढें मांडावा. हे कायदेमंत्री सात असावेत. मंत्री श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मनिष्ठ, प्रजेचे व राजाचे हितचिंतक, पक्षातीत, निःपक्षपाती, नीतिज्ञ, व त्या त्या शास्त्रांत प्रवीण असावेत. कायदेमंत्री नात्यानें त्यांना पूर्ण मतस्वातंत्र्य असावें. पांचांच्या मताचा उल्लेख असल्यानें एकमतानें किंवा ५/७ बहुमतानें तरी मंत्रिमंडळाची संमति मिळणें जरूर आहे. मंत्रिमंडळाची ही सभा अगदीं गुप्त भरावी. नवीन कायद्याचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार मंत्रिमंडळास नसावा.

(६) द्विदलांची अशी संमति मिळालेला प्रस्ताव कायदा समजला जावा. मंत्रिमंडळाची अशी संमति न मिळालेला प्रस्ताव रद्द समजावा.

(७) कायद्याची अंमलबजावणी करण्याची मुख्य सत्ता राजाची असावी. कार्यसचिव त्याचे साह्यकारी असावेत.

(८) राजा कसा असावा याविषयीं '*भूपधर्म*' प्रकरण स्वतंत्रपणें सांगतें तें पाहावें; व २।३०६ आणि २।३१५ दोहे पाहावे; शिवाय **दोहावलींत दो. ५०७ पासून ५२७ पर्यंतचे एकवीस दोहे पाहावेत.** त्यांत राजा व राजनीति यांचें वर्णन आहे. थोडा नमुना :—

दो० — **माळिभानुकृषिवलासम नीतिनिपुण नरपाल ।**
कधिंतरि कलियुगिं होति जें जनभाग्योदयकाल ॥ ५०७ ॥
वर्षत हर्षति लोक, न च कर्षत कळे कुणास ।
होइ भूप रविसम ***यदा भाग्योदय लोकांस*** ॥ ५०८ ॥
सुधा, सदन्न, कदन्न, फल, आम्र अशन सम मानि ।
सु–प्रभु कर घे प्रजाहित सामादिक अनुमानि ॥ ५०९ ॥

हे २१ दोहे पाहिल्यावर खात्री होईल कीं राजनीतिशास्त्र व प्रत्यक्ष अनुभव यांची सांगड घालून राजनीतीचा फारच सर्वांगसुंदर आणि सखोल विचार करून निर्णय दिलेला आहे.

या त्रिदल राज्यपद्धतींत अनियंत्रित सत्ता कोणाच्याच हातीं नाहीं. पक्ष, पक्षपात, पक्षघात, पक्षद्वेष इत्यादि भानगडी नाहींत; पांढऱ्या हत्तींचें पोषण नाहीं. अशा सर्वलोकहितावह पद्धतीचें हें आदर्श चित्र श्रीगोस्वामीजींनीं रेखाटलेलें यथामति स्पष्ट

केलें गेलें. कलियुगांत हें किती शक्य आहे याचें उत्तर वरील दो. ५०७ व ५०८ यांत आहेच !

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१३ 卐 卐 卐

मानसांत परीक्षक किंवा गुप्तचर

श्रीरामचरित-मानसांत साती सोपानांत कोणीतरी परीक्षा घेण्याचें काम केलें आहे किंवा गुप्तचरांकडून तें करविलें आहे. त्या प्रसंगांच्या निरीक्षणानें काय दिसतें पाहूं.

बालकाण्ड — १. सती दक्षकुमारी — श्रीरघुवीराची परीक्षा :— देह, इंद्रियें, वर्ण, रूप, चाल, इत्यादि सर्व प्रकारें सीता बनून सती रघुनाथाची परीक्षा पाहण्यास, ते सर्वज्ञ आहेत कीं नाहींत हें पाहण्यास व प्रभाव पारखण्यास गेली. (५०।१–५३।६) तेव्हां —

प्रभु जोडुनि कर करी प्रणामा । वदुनि तातनामा निज नामा ॥

मग पुसलें किं ' कुठें वृषकेतू । एकट फिरां काय वनिं हेतू ' ॥ (५३।७–८).

असें सर्वज्ञ रघुनाथानें करतांच लज्जित होऊन महेशांकडे परत निघाली. जें पारखण्याची इच्छा होती पण धीर झाला नाहीं तें श्रीरघुनाथाचें ऐश्वर्य-प्रभुत्व-विश्वरूपदर्शनानें प्रभूंनीं अल्पसें दाखविलें.

अशा रीतीनें परीक्षकाचीच परीक्षा झाली व ८७ हजार वर्षें प्रियपतिविरहित कंठावीं लागलीं, व शेवटीं तिच्या पित्यानेंच शिवांपमान केला व त्या निमित्तानें सतीनें योगाग्नींत देह जाळला.

भगवंताशीं गुप्त विरोध, पतीशीं कपट व पति-अपमान यांचें फळ मिळालें !

२. नारदपरीक्षा — नारदाच्या तपस्येचा भंग करण्यासाठीं इंद्रानें कामदेवालाच पाठविलें. पराजय हा शब्द ज्याच्या नांवाला कधीं स्पर्शला नव्हता त्याचा पक्का पराभव झाला.

हरिकृपाछत्राखालीं असलेल्या हरिप्रिय भगवद्भक्ताचा छळ मदनाच्या मदनाशास कारण झाला.

३. शारदेची हेरगिरी — ब्रह्मदेवानें शारदेला गुप्त रीतीनें प्रेरणा दिली. तिनें कुंभकर्णाच्या वाणींत शिरून, त्याच्या मनांत मागावयाचा नसलेला सहा महिने निद्रा व एक दिवस जागृति हा वर त्याच्याकडून मागविला. ही तर फार मोठी हेरगिरी ! हजारों वर्षांची घोर तपश्चर्या धुळीस मिळविली !

कुंभकर्ण राक्षस त्या वेळीं भगवद्भक्त नव्हता, म्हणून त्याची तशी दशा करतां आली; पण भगवद्भक्त भरताची बुद्धि फिरविण्यास जाण्याचें धाडस शारदेला करवलें नाहीं. (२।२९५।१–८ पाहा).

४. कपटी नृप व सम्राट भानुप्रताप — एक सत्तालोभी, विषयी, अधर्मी, म्याड, दुरभिमानी, दुष्ट, कपटी क्षत्रियराजा कपटमुनि बनून भानुप्रताप चक्रवर्तीराजाचा विनाश करण्याची वाट-संधि-पाहात घोर काननांत राहिला. जगज्जेता, निष्काम कर्म करून ईश्वरार्पण करणारा, अत्यंत धर्मशील, धीर वीर भानुप्रतापाची व त्या कपट-मुनीची दुर्दैवानें भेट होतांच त्यानें प्रतापभानूचा विश्वासघात करून कपटानें सर्व परि-वारासह घोर विनाश केला.

प्रतापभानु धर्मशील होता, पण हरिभक्त नव्हता; त्यामुळें त्याचें संरक्षण कोणीं केलें नाहीं!

अयोध्याकांड — १. इंद्रादि देवांनीं **शारदेला हेरगिरी करण्यास पाठविलें.** तिनें अदृश्य रूपानें कुबडीची व नंतर कैकयीची बुद्धि फिरविली.

कैकयीचें रामावर फार प्रेम होतें; पण तें भगवद्भावानें नव्हतें. ती विलासप्रिय, रूपाभिमानानें फुगलेली, पतिबलगर्वित, तमोगुणी होती. कुबडी तर मनांत रामवैरीच होती. टीका पाहा व अग्निपुराण अध्याय ६ श्लो. ८ पाहा. परंतु हें प्रभूची रुचि अनुकूल पाहूनच केलें गेलें.

२. निषादराज भरत-परीक्षेस गेला — श्रीरामप्रेमातिशयानें त्याला भरताच्या हेतूविषयीं संशय आल्यामुळें तो स्वतःच भेटीच्या निमित्तानें परीक्षा पाहण्यास गेला. **दोघेहि अनन्य रामभक्त असल्यानें निषादराज भरतभक्त, भरतसेवक बनला.**

(३) जनक राजा गुप्तचरांकडून **भरतस्वभावाची परीक्षा** करवितात — श्रीराम-वनवासादि अनर्थांची बातमी जनकांस मिळाल्यावर त्यांनीं चार गुप्तचर भरताच्या हेतूंची व स्वभावाची परीक्षा पाहण्यास पाठविले. ते यशस्वी रीतीनें सर्व समाचार मिळवून परत गेले; व जनकराजा चित्रकूटास जाण्यास निघाले. भरताला किंवा अयोध्येंतील कोणालाहि यांतलें कांहीं कळलें नाहीं. **भरत आणि जनकराजा कपटी नव्हते; दोघेहि अनन्य रामभक्त असल्यामुळें सर्व सुरळितपणें पार पडलें.**

अरण्यकाण्ड – सुरपतिसुत कावळा बनून रघुवीराच्या बळाची परीक्षा पाहण्यास गेला; पण त्या परीक्षेंत आपला एक डोळा कायमचा गमावून बसला. सुदैवानें नार-दाची भेट झाली म्हणून डोळ्यावरच भागलें नाहींतर मरणच आलें असतें. **जयन्त एकाक्ष झाला. श्रीरामविरोध व रघुकुलवधूचा छल यांचें प्रायश्चित्त इन्द्रपुत्रासमुद्धां भोगावें लागलें.**

किष्किंधाकाण्ड — महाप्रतापी व अतिबलवान अज्ञात वीरांना ऋष्यमूकाकडे येतांना दुरून पाहून त्यांच्या हेतु वगैरेची परीक्षा पाहण्यासाठीं **सुग्रीव** आपल्या **हनुमान सचिवास गुप्तरूपानें जाण्यास सांगतो.** हनुमान विप्ररूपानें जवळ आले. दोघांचाहि हेतु शुद्ध असल्यामुळें कांहीं दुष्परिणाम झाला नाहीं; उलट सुग्रीवसख्य झालें; तथापि राम आपले प्रभु भगवान आहेत एवढें ओळखल्यावरसुद्धां हनुमन्तानें आपलें कपटरूप

टाकलें नाहीं; म्हणून प्रभु त्याच्याशीं बोललेसुद्धां नाहींत! मग, त्यानें नमस्कार केल्यावर त्यास उचलून हृदयाशीं धरणें वगैरे कोठून होणार !

त्यानें कपटाचा त्याग केल्यावरच वरील सर्व गोष्टी प्रेमानें केल्या. भगवंतास कपट किती अप्रिय आहे हें हनुमंताच्या उदाहरणानें दाखवून —

निर्मल मन जन तो मज पावे। मजसि कपट छल छिद्र न भावे ।।

या प्रभुवचनाची सत्यता दाखविली.

सुंदरकांड — १. रामदूताची परीक्षा पाहण्यास सुरांनीं **सुरसा** पाठविली. रामदूताच्या बुद्धिबळाची व देहसामर्थ्याची परीक्षा पाहण्यास ती आली. परीक्षक स्त्री व परीक्ष्य रामदूत ब्रह्मचारी कपि ! **केवळ रामकृपेनें तिला जिंकलें व शुभाशीर्वाद मिळाला.** पुरुषपरीक्षक गेला व डोळा देऊन आला ! म्हणून आतां स्त्रीला पाठविलें !

२. लंकिनी — लंकापुरी देवी मशकाएवढ्या लहान कपीला चोरून लंकेंत शिरूं देत नाहीं ! तो केवळ कपि आहे कीं रामदूत हें पाहण्यासाठीं तिनें हें केलें. **या परीक्षेंत दोघांचेंहि कल्याण झालें. दुष्ट हेतु कोणाचाच नव्हता.**

३. स्वतः **हनुमान विप्र बनले** व 'रामराम' म्हणणाऱ्या लंकानिवासी पुरुषाची परीक्षा घेतली. **दोघेहि निष्पाप रामभक्त असल्यानें दोघांचेंहि कल्याण झालें.**

४. रावणानें पाठविलेल्या गुप्तचरांची हेरगिरी केवळ रामकृपेनें बाहेर पडली आणि केवळ लक्ष्मणाच्या कृपेनें त्यांनीं आपले नाककान गमावले नाहींत. **रावणाचे हेर म्हणून आले** आणि श्रीरामस्वभाव पाहून **रघुनाथाचे भाट बनून** गेले **!**

लंकाकांड — सीतेच्या सतीत्वाची परीक्षा अग्निदिव्यानें झाली. **उभयतां अत्यंत धर्मशील व निष्पाप असल्यानें उभयांस आणि सर्वांसच परमानंद झाला.** पण मर्म कोणालाच कळलें नाहीं.

उत्तरकांड — भरताचा समाचार गुप्त रूपानें मिळविण्यासाठीं श्रीप्रभूच्या आज्ञेनें **मारुतसुत विप्ररूपानें नन्दिग्रामास गेले. भरताचें रामप्रेम पाहून हनुमन्तास आपलें कपटरूप फार वेळ ठेववलें नाहीं. हनुमान भरत-प्रशंसक बनले व भरताला राम भेटल्याचा आनंद झाला.**

श्रीरघुवीरानें **हें केवळ राजनीति रक्षणार्थ केलें.** १४ वर्षांपूर्वी राज्यलोभ नसलेला सावत्र भाऊ, दीर्घ काळ सत्तेचा उपभोग घेतल्यानंतर पूर्वीसारखाच निर्विकार निर्लोभ राहील असें कोणीं समजूं नये ! **हें शिक्षण यानें दिलें गेलें.**

गुप्त दूत = हेर हे राजाचे चक्षू समजले जातात. **'राजानश्चारचक्षुषः।'** चार = चर = गुप्त हेर. चार व चर दोन्ही संस्कृत शब्द आहेत. (अमरकोष पाहा.)

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१४ 卐 卐 卐

श्रीरामराज्य-वर्णन

हल्लीं भारतांत रामराज्य आहे असें कांहीं म्हणतात; म्हणून श्रीमानसांतील श्रीराम-राज्याचें वर्णन (उत्तर. २०।७ पासून पुढें) पाहावें.

राम राज्यिं बसतां लोकत्रय । झाले हर्षित विगत शोकभय ॥ ७ ॥
कोणि कुणासि न करिति शत्रुता **। प्रभूप्रतापें गता विषमता ॥ ८ ॥**
दो०– **वर्णाश्रम निज निज धर्म-निरत, वेदपंथिं लोक–।**
वर्तति, पावति सदा सुख, नहि भय रोग न शोक ॥ २० ॥
दैहिक दैविक भौतिक तापहि । रामराज्यिं होती कोणा नहि ॥
प्रीति परस्पर सब नर करती । रत निजधर्मि यथा श्रुतिनीती ॥
धर्म चारि चरणीं जागिं राही ।–पूर्ण सदा, ***स्वप्निंहि अघ नाहीं*** **॥**
रामभक्तिरत पुरुष नारी **। सकल परमगतिचे अधिकारी ॥**
अल्प-मृत्यु नहि पीडा कांहीं । सुंदर सकल विरुज कायाही ॥
दुःखि न कोणि दरिद्री दीन न । कोणि अबुद्ध न लक्षणहीन न ॥
सब निर्दंभ धर्मरत शुची । चतुर नारिनर सब गुणरुची ॥
सब गुणज्ञ पंडित ही ज्ञानी । सकल कृतज्ञ, धूर्त नहिं कानीं ॥ ८ ॥
दो०– **रामराज्यिं नभगेश ! बघ चराचरीं जागिं कांहि ।**
काल कर्म नी प्रकृति-गुण-कृत दुःख न कोणाहि ॥ २१ ॥

यापुढें थोडें रामराज्यांतील ऐश्वर्य-संपत्ति यांचें वर्णन आहे.

सब उदार सब पर-उपकारी । विप्रचरण-सेवक नरनारी ॥
पुरुष एकपत्नीव्रतधारी । त्या मनवचकृतिं पतिहित-कारी ॥ (२२।७-८)

यानंतर राजनैतिक दृष्टीनें व नंतर प्राकृतिक दृष्टीनें वर्णन आहे,

विधु निजकरिं करि पूर्ण महि रवि वांच्छित तपतात ।
वारिद याचित देति जल रामचंद्र-राज्यांत ॥ दो. २३ ॥

पुढें दो. ३० पर्यंत अयोध्यावर्णन आहे तें पाहावें. श्रीरामप्रतापाचा परिणाम 'जेव्हां रामप्रताप दिनपति' (३१।१ पासून दो. ३१ पर्यंत) पाहणें. वाल्मीकि रामायणांत असेंच वर्णन आहे.

ल. ठे. — यांतील ' कोणि कुणासि न करिति शत्रुता । ' (**२०।८**) **इतकें घडलें आणि बाकीचीं पापें नष्ट न झालीं तरी चोऱ्या, दरोडे, खून, लुटालूट, संप, सत्याग्रह, मोर्चे, आत्महत्या या गोष्टी मुळींच घडल्या नाहींत तरीसुद्धां** ***कलियुगांतील रामराज्य आहे असें म्हणतां येईल.***

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१५ 卐 卐 卐

श्रीमानसांत सेवाधर्म—(सेवकधर्म)

सेवा हा अर्थोपार्जनाच्या अर्थशास्त्रकथित सहा प्रकारांपैकीं एक आहे. अर्थोपार्जनाचा संबंध सोडला म्हणजे परमार्थमार्गांत सेवाधर्मच मुख्य आहे. मानसांतील सेवाधर्माचें वर्णन करणारीं बरींचशीं वचनें जरी परमार्थ मार्गांतलीं असलीं तरी तीं प्रापंचिक सेवाधर्मासहुद्धां लागूं आहेत. साती सोपानांत या विषयाचें वर्णन असलें तरी अयोध्याकांडांत भरतचरित्रांत विशेष आहे. या लेखांत नुसतीं अवतरणें देणेंच भाग पडत आहे.

बालकाण्ड — **सेवक तोच कि जो करि सेवा।** (११२७११३)

(२) **देती दासी दासां बहुतर। सीतेला** ***प्रिय*** **सेवक** ***शुचितर*** ॥ (३३९।२)

अयोध्याकाण्ड —

(१) **प्रभुता त्यजुनि** ***नाथ*** **परि** ***आले*** ।—**स्नेहें, आज** ***पूत गृह झालें*** ॥
आज्ञा द्यावि **करिन तें देवा।** ***लाभ*** **सेवका स्वामीसेवा** ॥ (९।७।८)

(२) **भरत जाइ घरिं करी विचारा। परि हय गज गृह खजिना सारा** ॥
असे सकल रघुपति ***संपत्ती*** । ***त्यजुन जाउं जर विनायत्न ती*** ॥
तरि परिणामिं **भलेपण मम ना।** ***स्वामीद्रोह अघाग्रणिं गणना*** ॥
करी स्वामिहित सेवक तोही। **कोटिदोष कुणि मज देवो ही** ॥
तैं ***शुचिसेवक*** **बोलवि तेही।** ***स्वप्निं न चळले स्वधर्मिं जेही*** ॥

(३) भरत आपल्या सेवकांस सांगतात,
‘**पायीं पायिं राम तर गेले। आम्हांस्तव रथहयगज केले** ॥
उचित मला जाणें कीं मस्तकें। *सेवकधर्म कठोर समर्सित किं*’ ॥(२०३।६–७)

(४) ***हट्ट धरिन तर परम कुकर्मेंहि*** । *हरागिरिहुनि गुरु सेवक-धर्म हि* ॥
(२५३।६)

(५) **जो स्वामिस संकोचिं पाडतो। स्वहित इच्छि मति नीच दास तो** ॥
(२६८।३)

(६) *सेवकहित तों स्वामी-सेवा* ।—*करण*, **त्यजुनि सकल सुखहेवा** ॥ (२६८।४)

(७) ***दे उत्तर ऐकुनि आज्ञेला*** । ***तो सेवक लाजवि लाजेला*** ॥ (२६९।५)
आज्ञेसम न सुसाहिबसेवा। (२६८।४)

(८) ***सेवक करपदनयनसे स्वामीमुखासमान*** ॥ (३०६)

अरण्यकांड — इच्छि दास सुख मान...बघति काढुं नभ दुध ॥ (१७।१५-१६)

किष्किंधाकांड — ‘ सेवक शठ...शूलसम (७।९) ‘ स्वामिस छलविण-जीवें भावें... सेवावें ’ (२३।४). अंगदादि रामदूत श्रीरघुनाथास वंदन करून पुढें गेल्यावर ‘ पवन-

तनय शिर नमवि शेवटीं ' (२३।९). खरे, निगर्वी व सेवाप्रिय सेवक स्वामीच्या पुढें पुढें करीत नाहींत. जें कार्य पडलें असेल तें ते करतात. सागरतीराला सागर-लंघनाचा विचार चालू असतां हनुमान शेवटपर्यंत बोलले नाहींत ते याच हेतूनें. (टीका पाहा.)

सुंदरकाण्ड — राम (स्वामि) कार्य केल्याविना कुठला मज विश्राम । (दो. १) स्वामिकार्यासाठीं अपमान, लाज, निंदा, इत्यादींची क्षिति बाळगूं नये हें हनुमंताच्या चरित्रानें लंकेंत दाखविलें आहे.

प्रभु आज्ञा ज्या जैसी आहे। तसें वागतां तो सुख लाहे ॥' (५९।४)

लंकाकाण्ड—जर न राम-अपमाना डरतो । तुज देखत असं कौतुक करतो ॥ (३०।८) स्वामीचा अपमान होईल असें कांहींही सेवकानें करूं नये.

उत्तरकाण्ड — *शुचि सुशील सेवक सुमति* **कोणा प्रिय ना सांग ॥ ८६ ॥**
सर्वां प्रिय सेवक ही नीती ॥ (१६।८)

सेवक तो प्रियतम मम तोही । मम अनुशासन मानिल जोही ॥ (४३।५) याप्रमाणें साती सोपानांतील सेवकधर्माविषयींचीं *थोडथोडीं* वचनें येथें दिलीं. अन्य वचनें व अर्थादिकांचा विस्तार टीकेंत पाहावा. *वरील बहुतेक वचनें सुभाषितां सारखीं आहेत.*

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१६ 卐 卐 卐

संन्यास-धर्म

श्रीरामचरित-मानसांत संन्यास-धर्माचें विस्तृत वर्णन नसलें तरी कांहीं महत्त्वाचीं वचनें आहेत.

(१) **शोच्यहि यतीप्रपंचरत जो न विवेकि विरागि ॥** (२।१७२). विवेकी = ज्ञानी. (क) संन्याशांचे प्रकार व त्यांतील वैशिष्ट्य ३।२८।७ च्या टीकेंत दाखविलें आहे.

(२) ***पात्र*** **सकल नृप** ***उपहासासी*** । जेविं ***विराग विना संन्यासी*** ॥
(१।२५१।३)

(३) **सीता वदे यती तुम्हि असतां । स्वामी तुम्हि वच खलसें वदतां ॥** (३।२८।१२) त्रिदंडी संन्यासी बनून आलेल्या दशाननास सीता असें म्हणाली.

(४) **कुठें कुठें नदितीरिं** ***उदासी*** । **वसति बोधरत मुनि संन्यासी ॥** (७।२९।५) हें अयोध्येंतील रामराज्यांतलें वर्णन आहे. उदासी = उदासीन.

(५) ‘दंड करीं संन्यासि’ (७।२२) रामराज्यांत दण्ड हा शब्द ऐकूं येत नसे; पण दंड संन्याशांच्या हातांत दिसत असे.

दण्डत्यागं न कुर्वीत यावद् वै प्राणधारणम् । (श्रुति)

हा शास्त्रनियम येथें सुचविला आहे. शरिरांत प्राण आहे तोंपर्यंत संन्याशानें दण्डत्याग करूं नये. दण्डत्यागाच्या अधार्मिक पद्धतीचे परिणाम काय होतात व दण्डत्याग अवधूत दीक्षेंतच कसा करतां येतो हें टीकेंत साधार दाखविलें आहे.

(६) **निघति मुदित, पुर तजुनि नृप तापस वाणिक *भिकारी* ॥**
त्यजिति जसे श्रम मिळत हरि-भक्तिं *आश्रमी चारि* ॥ (४।१६).

(क) भिकारी शब्दांत (भिक्षुक =) संन्याशांचा अन्तर्भाव केलेला आहे. येथें पर्यटण करणाऱ्या संन्याशांविषयीं सांगितलें आहे.

(ख) *हरिभक्ति प्राप्त झाल्याशिवाय संन्याशांचेसुद्धां श्रम सरणार नाहीत हें सुचविलें आहे.*

(७) कलिप्रभाव वर्णनांत,

‘**वर्ण धर्म ना *आश्रम चारी* । श्रुति विरोध रत सब नरनारी** ॥.’ (७।९८।१)

चारी आश्रमांचा उल्लेख करून सुचविलें कीं संन्याशांनींसुद्धां आश्रमधर्मांचें पालन केलें पाहिजे व त्यांनींसुद्धां श्रुतिविरोध करूं नये.

(८) ***बहु दाम, सुसाजिति धाम यती*** **। विषयीं हरली नुरली विरती** ॥
(७।१०१।१)

पैसा, धन गोळा करणें, संग्रह करणें व इमारती बांधणें हें संन्याशांस लांछन आहे हे सुचविलें. विषयासक्तीनें वैराग्यहीन होणें हेंहि लांछनास्पद आहे. धाम = स्वतःस राहण्यासाठीं घर असाच अर्थ घेण्याचें कारण नाहीं. मठ, मंदिरें, संस्था, स्मारकें इत्यादि इमारती असाच अर्थ आहे, हें करणें अधर्म आहे.

याप्रमाणें मानसांत संन्यासधर्माविषयीं महत्त्वाच्या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. टीकेंत भरपूर विस्तार आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१७ 卐 卐 卐

मानसांत मित्र-धर्म

मित्रधर्मांचें वर्णन मुख्यतः किष्किंधाकांडांत सुग्रीव-सख्याच्या वेळीं केलेलें आहे.

(१) **श्रीरघुवीर सुग्रीवास सांगतात,**

‘**मित्रदुःख ज्यां न दुःखकारी । तयां विलोकत पातक भारी ॥**
दुःखगिरी निज रजसम जाणत । मित्रदुःखरज सुमेरु वाटत ॥

ज्यांस अशी मति सहज न असते । मैत्री करती कशास शठ ते ।।
कुपथ निवारुनि सुपथिं चालवी । प्रगटुनि गुण अवगुणांस लपवी ॥
देत घेत मनिं शंका न धरी । बल अनुमानें सदा हित करी ।।
विपदीं स्नेहा शतपट करती । संत मित्रगुण हे श्रुति वदती ।।
पुढें वदति मृदु दाविति ममता । मागें अहितहि मनीं कुटिलता ॥
सर्पगतीसम चित्त जयांचें । अशां कुमित्रां त्यजत हिताचें ॥
सेवक शठ, नृप कृपण, कुनारी । *कपटी मित्र शूलसम* चारी ॥'(४।७।१-९)

(२) बालकाण्डांत —

मित्र-पिता-प्रभु-गुरु-सदनाहीं । जावें जरिं आमंत्रण नाहीं ॥
तदपि विरोध जिथें कुणि मानी । जात जिथें कल्याणा हानी ॥ (६२।५-६)
घेति सवें मित्रां भावांला । जाति नित्य मृगयेस वनाला ।। (२०५।१)
भोजन सानुज *समित्र करती* । (२०५।४).

(३) अयोध्याकाण्डांत —

बालसखे परिसुनि हृदिं हर्षति । वृंद वृंद जाती रामाप्रति ।।
प्रेम पाहुनी प्रभु आदरती । क्षेम कुशल मृदु वचनें पुसती ।। (२४।१-२)

हें रामराज्याभिषेकाचा समाचार समजल्यानंतरचें वर्णन आहे.

(४) अरण्यकाण्डांत —

धैर्य धर्म *सन्मित्र* नि नारी । *आपत्कालिं परीक्षित* चारी ।। (५।७)

(५) सुन्दरकाण्डांत –रामकृपा झाली म्हणजे *अरि करिति मित्रता* (५।२)

(६) उत्तरकाण्डांत —

स्वार्थी मित्र सर्व जगिं असती । स्वप्नीं प्रभु ! परमार्थी नसती । (४७।६)

(७) लंकाकांडांत मित्रधर्म नाहीं हें योग्यच आहे !

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१८ 卐 卐 卐

वैद्य-धर्म

वैद्यानें कसें वागावें याविषयीं मानसांत थोडेंच पण आदर्शभूत वर्णन आहे.

(१) *मागि कुपथ्य गदाकुल रोगी* । *देइ न वैद्य* बघा मुनि योगी ।।
मी तसेंच *तुमचें साधिन हित* ।।

रोग्याचें हित साधणें हें वैद्याचें (डॉक्टरचें) मुख्य ध्येय असावें. रोग्यानें कुपथ्य मागितलें तरी तें त्यास देऊं नये. हें भगवंताचें वचन आहे.

(२) **सचिव वैद्य गुरु हे *प्रिय लाभ-भयें वदतील*** ॥
राज्य *धर्म तनु* तीनि *तरि सत्वर विनाशतील* ॥ (५।३७)
लाभाच्या आशेनें किंवा भयानें रोग्याला जें प्रिय वाटेल तेंच सांगू नये. तसें केल्यास रोग्याचा देह लवकरच विनाश पावेल. रोग बरा होण्याच्या दृष्टीनें जें आवश्यक तेंच सांगावें. तें रोग्यास रुचेल कीं नाहीं याचा विचार करूं नये.

(क) आपल्या आर्थिक लाभहानीचा विचार वैद्यानें करूं नये; रोग्याला न रुचणारें सांगितलें तर आपल्याला दुःखदंडादि दुष्परिणाम भोगावा लागेल वगैरे विचार वैद्यानें करूं नये.

(ख) पण रोग्याचें हित करतांना स्वतःच्या व्यक्तिधर्माचें व रोग्याच्या व्यक्तिधर्माचेंहि रक्षण केलें पाहिजे.

(३) लक्ष्मणाला शक्ति लागल्यावर **लंकेंतील सुषेण वैद्याला** त्याच्या घरासहित आणलें. तो रावणाच्या राजधानींतला, रावणाचा प्रजाजन व जातीनें राक्षस असून त्यानें कपट न करतां, न भितां औषध सांगितलें; आणि त्याचा उपाय करून लक्ष्मणास जिवंत केलें; आपल्या राजाचा मुख्य शत्रु वगैरे विचार त्यानें केला नाहीं ! ६।५५।७ पासून ६२।५ पर्यंत पाहून मुख्य भागाची गूढार्थचंद्रिका टीका पाहावी.

(४) **सद्गुरु वैद्य वचनिं विश्वासहि** । (७।१२२।६)
आपल्यावर (वैद्यावर) शास्त्रावर व औषधावर विश्वास आहे कीं नाहीं हें मात्र त्यानें पाहावें.

(क) **अनुपाना श्रद्धा आतिपावन** । (७।१२२।७).
श्रद्धेनें अनुपानासह औषध घेईल कीं नाहीं हें पाहून मगच औषध द्यावें.

(५) **व्याधि असाध्य समजुनी त्यजती** । (२।५१।१२).
असाध्य रोगास वैद्यानें औषध देऊं नये असें माधवनिदानादि ग्रंथांत सांगितलें आहे. वैद्यधर्माचें यापेक्षां अधिक वर्णन मानसांत असल्याचें स्मरणांत नाहीं. सद्गुरुविषयक कांहीं वचनें वैद्यधर्मांत सामील करतां येतील. सद्गुरु = वैद्य.

याप्रमाणें वर्णाश्रमधर्माचें व विविध व्यक्तिधर्माचें दिग्दर्शन *कर्मविपाक* या मुख्य प्रकरणांतील अनेक प्रकरणांत केलें गेलें; पण एवढ्यानेंच कर्म करणाऱ्या त्या त्या इंद्रियांची सुफलता होते असें नाहीं. सकल सुकृताची सुफलता जशी रामभक्तीनें होते तशी इंद्रियांची सुफलता कशानें होते हें दाखवून हें मुख्य ११ वें प्रकरण समाप्त होईल.

◆◆◆◆

卐 卐 卐 ११।१९ 卐 卐 卐

इन्द्रियांची सुफलता

(१) जिहिं *हरिकथा* श्रुता नहिं कानां । *श्रवणरंध्र* अहिभवनहि माना ॥ (१।११३।२) हरिकथा श्रवणानें **कानांची सुफलता** होते.

(२) ***नयनिं संतदर्शन*** **ना करती । मोरपंख-लोचन ते गणती** ॥ (१।११३।३) **नयनांची सफलता** ज्ञानीभक्त = संत-दर्शनानें किंवा

(क) **जाउनि सुफल करिन नयनांला** ॥

श्यामगात्र सरसीरुह-लोचन । जाउन बघतो त्रितापमोचन ॥ (६।६३।७-८) श्रीरघुपतीचें दर्शन झाल्यानें नेत्रांची सुफलता होते. वरील वचन रावणबंधु कुंभकर्णाचें आहे. नेत्रसफलतेचें हें वर्णन प्रत्येक काण्डांत आहे.

(३) **त्वचेची सुफलता —**

प्रेमाविवश शिशु या मिषें स्पर्शांति मनहर गात्र । पुलकित ... (१।२२४) भगवंताच्या अंगस्पर्शानें त्वचेची सुफलता होते.

(४) **जिव्हेची —रसनेची सफलता —**

धन्यास्ते कृतिनः ***पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम्*** ॥

सतत श्री रामनामामृत पान करण्यानें रसनेची सुफलता होते. (४ मं. श्लो. २).

(५) **घ्राणेंद्रियाची—नाकाची सुफलता —**

प्रभू-प्रसाद-सुभग-शुचि-वासा । घइ सदा सादर यन्नासा ॥ (२।१२९।१ टीका पाहा.)

(६) **वाणीची सुफलता —**

करण्यास पावन निज गिरेला ***रामयश*** **तुलसी वदे** ॥ (१।३६१ छं.)

गान रामगुण जीभ करी ना । ती दर्दुर-जिव्हाच खरी ना ॥ (१।११३।६).

(७) **हातांची सुफलता — कर नित** ***करिति रामपदपूजा*** ॥ (२।१२९।४). किंवा सद्गुरु-संतपूजा.

(८) **मस्तकाची सुफलता — बघत विप्र-गुरु-सुर** ***शिर नमतें*** । (२।१२९।३)

तुलणें कडू तुंब्डीशीं शिर तें । हरि गुरुपदमूलिं न जें नमतें ॥ (१।११३।४).

(९) **चरणांची-पायांची सुफलता—रामतीर्थिं पदिं चालत जाती** । (२।१२९।५) श्रीरामतीर्थांस अनवाणी चालत जाण्यांत पायांची सुफलता आहे; तसेंच संत-सद्गुरु-दर्शनास जाणें.

(१०) **हृदयाची सुफलता**—हरिचरित्रश्रवणानें ज्याला हर्ष होतो तें हृदय सुफल होय.

निष्ठुर कुलिश कठोरा छाती । हर्षें श्रवुनि न हरिचरिता जी ॥ (१।११३।७)

जे न धरिति हरिकथारति ते हृदयें ***पाषाण*** । (७।४२)

(११) देह सुफलता –

हृदयीं हरिभक्ति न आणिति जे। *जीत शवासम* गणा प्राणि ते। (१।११३।५)
ज्या देहाच्या हृदयांत हरिभक्ति निवास करील तो देह सुफल.

(१२) जन्म-सुफलता –

***रामचरणवारिज* जैं देखूं। तैं निज *जन्म-सुफलता* लेखूं॥** (७।१११।१४)
या अर्थाचीं वचनें प्रत्येक सोपानांत आहेत.

'कर्मविपाक' हें ११ वें मुख्य प्रकरण येथें समाप्त झालें. सर्व सुकृताची सुफलता, सर्व साधनांची सुफलता व नरदेहाची सुफलता रामभक्तीनेंच होऊं शकते हा सिद्धान्त येथपर्यंत अनेक प्रकरणांत व पुढेंहि आला आहे; म्हणून आतां पुढील (१२ व्या) मुख्य प्रकरणांत 'भक्ति' विषयाचें सांगोपांग विवेचन विविध प्रकरणांत केलेलें दिसेल.

जय जय भक्तिप्रिय रघुनंदन। तूं वदविशि, तव पादें करुं वंदन॥

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१ 卐 卐 卐

श्रीरामचरित-मानसांत फक्त एकच प्रकरण 'प्रतापभानु-आख्यान' असें आहे कीं ज्यांत भक्तीचा संबंध मुळींच नाहीं. फार काय दो. १५२ नंतर व १९० पूर्वी राम, रघुवर, रघुपति, रघुनाथ, रघुवीर इत्यादि रामाचें कोणतेंहि नांव नाहीं! बाकी सर्व मानस श्रीरामभक्ति-रसानें अथांग अपार भरलें आहे. भक्तीची मुद्देसूद न्यायघटित, अगदीं थोडक्यांत अशी मांडणी अरण्यकांडांत श्रीरघुनाथानेंच केली आहे. श्रोता सुमित्रानंदन श्रीरामानुज लक्ष्मण आहे. (३।१६।२ – १७।१)

१. "*वेगें जिनें द्रवें मी भाई । ती मम भक्ति* **भक्त-सुखदाई** ॥
ती स्वतंत्र अवलंब आन नहिं । ज्ञान अधीन तिच्या विज्ञानहि ॥
भक्ति **तात!** *अनुपम सुख-मूलहि । –मिळते संत यदा अनुकूलहि* ॥
भक्ति-साधनें सांगु वर्णुनी । सुगम-पंथें मज पावे प्राणी ॥
प्रथम विप्रपदिं ***परमा प्रीती*** **। स्व-स्वकर्मिं** ***निरती*** **श्रुतिरीतीं** ॥
याचें फल कीं विषय-विरागहि । मग मम धर्मिं होइ ***अनुराग*****हि** ॥
श्रवणादिक नवभक्ति दृढावति । मनिं मम-लीला ***रति*** **अति पावति** ॥
संत-चरण-पंकाजिं ***सुप्रेमा*** **। मन तन वचन-*भजन* दृढ नेमा** ॥
माय बाप गुरु बंधु देव पति । सकल मला जाणुन दृढ सेवति ॥
मम गुण गातां तनू पुलकते । गद्गद गिरा नमन-जल गळतें ॥
काम आदि मद दंभ न ***ज्याला*** **। तात! निरंतर वश मी** ***त्याला*** ॥
दो०– **वचन-कर्म-मन ममगति भजन** ***करिति*** **निष्काम ।**
हृदयकमलिं ***त्यांचे*** **सदा करतों मी विश्राम** ॥
भक्तियोग परिसुनी सुखी अति । प्रभुपदिं लक्ष्मण मस्तक नमवति ॥ "

१. अवघ्या तेरा ओळींत भक्तीची व्याख्या, तिची स्वतंत्रता, अन्य साधनांहून श्रेष्ठता, संतकृपासाध्यता, अनन्यता, रामप्रेमभक्तीचें *साधन* सहा प्रकारची *प्रेमभक्तीच*, बाह्यलक्षणें, अंतरंग लक्षणें, प्रेमभक्तीचें फळ आणि त्या फळाचेंहि फळ इत्यादि गोष्टी क्रमशः दाखविल्या आहेत.

२. मुख्य तेरा ओळींची टीका छापील २५।२६ पृष्ठें भरतील एवढी झाली आहे. *श्रवणकीर्तनादि नवविधाभक्ति साधनसाध्य आहे.* खरें आत्मनिवेदन आत्मज्ञानानेंच होत असल्यानें 'भक्तिज्ञानाची माउली' हा सिद्धान्त श्रवणकीर्तनादि साधनसाध्य भक्तीविषयीं ठरला, आणि ज्ञानानंतरची प्रेमभक्ति (संतकृपासाध्य) हा मुख्य प्रतिपाद्य विषय ठरला.

(क) १२ व्या चौपाईत '*ज्याला त्याला*' असें एकवचन कां ? दोह्यांत '*करिति*' आणि '*त्यांचे*' असें अनेकवचन कां ? आणि 'काम आदि मद दंभ न' असें एकदां म्हटल्यावर दोह्यामध्यें 'निष्काम' शब्द कां इत्यादि शंकांचें समाधान आणि श्रवणादि नवविधाभक्तीचीं लक्षणें गूढार्थचंद्रिकेंत दिसतील.

(ख) *प्रेमभक्तीला* येथें *सुखदाई* म्हटलें आणि पुढें– '*मोक्ष सकल सुखखाण*' (उत्तर. ८३ म) म्हटलें आहे. खाणींतून वस्तु खणून काढाव्या लागतात; परंतु दाता असला कीं श्रमांवांचून त्या वस्तु सहज मिळतात. या प्रेमभक्तीचेंच वर्णन मानसांत मुख्य आहे. *प्रेमभक्ति शक्य न वर्णाया । ती मधुरता सुशीतलता* या ॥ (१।३६।६) श्रीमानसांतील 'रामसुयश वर-वारी'चें हें वर्णन आहे. हिलाच नारदभक्तिसूत्रांत '*पराभक्ति*' म्हटलें आहे.

(ग) '***वेगें जिनें द्रवें मी । ... ती ममभक्ति***' ही मानसांतील भक्तीची व्याख्या अव्याप्ति-अतिव्याप्ति-दोषविहीन आहे. **व्यास, शांडिल्य, गर्ग व नारद यांच्या भक्तीच्या व्याख्या अव्याप्तिदोषयुक्त आहेत,** हें गूढार्थचंद्रिकेंत सिद्ध केलें आहे. **'श्रीतुलसीमानसभक्तिसूत्र' हा स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यासारखा आहे.**

२. नवधाभक्ति – नवधा भक्तीचीं लक्षणें श्रीरामानेंच व अरण्यकांडांतच शबरीला सांगितलीं आहेत (३५।४–३६।७)

रघुपति म्हणती 'भामिनि ! वदतों । एक भक्तिनातेंच मानतों ॥
जात पात कुल धर्म महत्ता । धन बल परिजन सुगुण चतुरता ॥
भक्तिहीन नर शोभे कैसा । दिसे वारिविण वारिद जैसा ॥
नवधा भक्ति सांगु तुज शबरी । श्रुणु सावध, धर हृदयीं दृढ बरी ॥
प्रथम भक्ति संतांची संगति । दुसरी कथाश्रवणिं मम अति रति ॥
दो०– गुरुपद-पंकज सेवा *तिसरी भक्ति* अमान ।
चौथि भक्ति मम गुणगण त्यजुनि कपट करि गान ॥
दृढ विश्वासें मंत्र – जाप मम । भजन पांचवें श्रुतिकथितोत्तम ॥
शम–दम–शील विरति बहुकर्मीं । षष्ठ सतत रत सज्जन–धर्मीं ॥
सप्तम सम मममय जग पाही । *मजहुनि अधिक मानि संतां ही* ॥
अष्टम यथालाभिं संतोषी । स्वप्निं न जाइ दृष्टि परदोषीं ॥
नवल सरल सर्वांसीं, श्रम नहि । ममचि भरंवसा खेद न हर्षहि ॥
एकहि नवांमधें ज्यापासीं । कुणिहि नारिनर–चर–अचरांसीं ॥
तो प्रिय भामिनी अतिशय मजला । भक्ति सुदृढ तुजमाजीं सकला ॥

येथें उपक्रमोपसंहारासुद्धां दहा ओळींत नवधा भक्तीचीं लक्षणें सांगितलीं. यांचें श्रवणादि नवविधा भक्तीशीं कांहीं बाबतींत साम्य आहे. आणि अध्यात्म रामायणांत 'सतां संगतिरेवात्र प्रथमं साधनं स्मृतम् ।' इत्यादि जीं भक्तीचीं साधनें सांगितलीं

त्यांच्याशीं बरेंच साम्य आहे. तेथें भक्तिसाधनें म्हटलें व येथें भक्ति म्हटलें आणि कोणतीहि एक उत्कट, दृढ असली तरी पुरें हें विशेष सांगितलें.

भक्तिहीन मानव भगवंतास आवडत नाहीं आणि भक्तीशिवाय इतर कोणत्याहि गोष्टीला भगवान मुळींच किंमत देत नाहींत इत्यादि गोष्टी येथें विशेष सांगितल्या.

३. चतुर्दशविधा भक्ति व भक्त.

चौदा प्रकारच्या भक्तीचें व भक्तांचें वर्णन अयोध्याकांडांत —

राम अतां श्रुणु सांगुं निकेतन । तिथें वसा सह सीता लक्ष्मण ॥ (१२८।३) पासून **यापरिं मुनिवर भवनें दावति ॥** (१३२।१) पर्यंत एकंदर ३९ ओळींत आहे; त्यामुळें उतारा येथें देतां येत नाहीं. वाल्मीकींनीं विनोदानें श्रीरामास राहण्यासाठीं जीं १४ स्थानें सांगितलीं ते भक्तीचेच १४ प्रकार आहेत.

प्रत्येक काण्डाच्या पूर्वार्धांत एक व उत्तरार्धांत एक असे २।२ प्रकार क्रमशः सात कांडांत आहेत. हीं भक्तींचीं लक्षणें व काण्डशः २।२ अशीं त्यांचीं १४ प्रकारांचीं उदाहरणें यांची तुलना टीकेंत पांहावी. ही चौदा प्रकारची विभागणी अशा मार्मिकतेनें केली आहे कीं सर्वसंगपरित्यागी ज्ञानी व्यक्तिपासून व्यवहारांत अत्यंत गुरफटलेल्या राजकारणी पुरुषापर्यंत, बाल, वृद्ध, तरुण, इत्यादि कोणाही व्यक्तीला, हल्लींच्या काळांतसुद्धां, या १४ प्रकारांपैकीं कोणत्या तरी एकाचा उपयोग करून भक्तिसंपन्न होतां येईल. अशा रीतीनें भक्तिप्रकारांची विभागणी इतर कोणत्याहि ग्रंथांत पाहण्यास सांपडत नाहीं.

४. त्रिविध भक्त—कनिष्ठ, मध्यम व बिभीषणासारखे उत्तम अशा तीन प्रकारच्या भक्तांचीं लक्षणें सुंदरकांडांत प्रसंगोपात्त श्रीरघुवीरानेंच सांगितलीं आहेत.

(१) '**श्रुणु निज सांगूं स्वभाव । जाणति भुशुंडि शिव गिरितनया ॥**
चराचरा द्रोही नर असुनी । येइ सभय मज शरण लक्षुनी ॥
त्यजुनि मोहमद विविध छलासी । सद्य *साधुसम करतों* त्यासी' ॥ (४८।१-३)
यांत काम, क्रोध व ममता याचा त्याग नाहीं. **हें कनिष्ठ प्रकाराचें वर्णन झालें.**

(२) **मध्यम – जननी जनक बंधु सुतनारी । तन धन भवन सुहृद परिवारीं ॥**
जी ममता ते धागे जमवुनि । वळुनि दोरि मन मम पदिं जखडुनि॥
समदर्शी इच्छा मुळिं नाहीं । हर्ष, शोक, भय मनिं नहि कांहीं ॥
***असें संत* हृदिं वसति मम कसे । लोभीहृदयीं वसे धन जसें ॥** (४८।४-७)

कनिष्ठाला साधुसम म्हटलें – संतासारखा म्हटलें व या दुसऱ्यास संत नांव दिलें. चंद्रासारखें मुख म्हटलें तरी चंद्राचे सर्व शुभ गुण मुखाच्या ठिकाणीं असतात असें नाहीं. असाच साधुसम आणि सातु–संत-यांत भेद आहे. उपमा पूर्ण समता दाखवीत नाहीं.

(३) **उत्तम** — बिभीषणासारखे—

संत समान तुम्हां प्रिय मातें। प्रार्थुनि इतरिं न धरुं देहातें ॥ ८ ॥

दो. – **सगुणोपासक परहितीं निरत नीति दृढ नेम।**

नर ते *प्राणांसम मला* **द्विजपदिं ज्यांचें प्रेम ॥ ४८ ॥**

श्रुणु तुजमाधिं सब गुण लंकापति। तुम्ही त्यामुळें मजला *प्रिय अति* ॥ १ ॥

हे सर्व गुण मानसांतील बिभीषणाच्या सुंदर काण्डांतील चरित्रांतच प्रगट झाले आहेत. (प्राणांसारखे प्रिय = अति प्रिय) आणि अशांच्या प्रार्थनेनेंच देह धारण करतो हें विशेष सांगितलें.

लोभ्याला जरी धन फार प्रिय वाटलें, प्राणांसारखें वाटलें तरी प्राणसंकट ओढवतांच सर्व धनाचा त्याग करण्यास लोभी तयार होतो. '*प्रिय न तनू प्राणांहुनि कांहीं*' (१।२०८।४) म्हणून ठरलें कीं दुसऱ्या प्रकारच्या भक्तांपेक्षां तिसऱ्या प्रकारचे भक्त अधिक प्रिय असतात. असा हा भेद येथें उघड उघड दिसत असतां टीकाकार हीं सर्व लक्षणें एकाच प्रकारचीं मानतात. (मानस पीयूष पाहा.)

५. चतुर्विध भक्त (संत)— परमोत्तम, उत्तम, मध्यम व कनिष्ठ असें त्या चौघांस म्हणतां येईल. भरतादिकांस जीं संतलक्षणें सांगितलीं त्यांत हे चार प्रकार दाखविले आहेत. *संत म्हणजे आत्मज्ञानी भक्त.*

ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं। रामभक्ति उरिं करी स्थान तैं ॥' (७।१२२।११)

(१) **परमोत्तम** – '**संतलक्षणें श्रुणु बंधो ! तीं। अगणित, वेद पुराणीं ख्याती ॥**

संत असंताची अशि करणी। जशि कुठार–चंदन आचरणीं ॥ ७ ॥

बंधु ! चंदना कुठार तोडी। तरि दे निजगुण सुगंधगोडी ॥ ८ ॥

यास्तव चढतो सुरशिरीं प्रिय जगता श्रीखंड ॥

अपकार करणाऱ्यांवरसुद्धां उपकार करून त्यांचें हित करण्याचा प्रयत्न करणारे संत येथें सुचविले. हें वर्णन भरताला उद्देशून आहे; पण भाऊ असल्यामुळें मुखावर स्पष्ट सांगितलें नाहीं. भरत ' प्रिय जगता श्रीखंड ' झालाच आहे. आणि भरताची इच्छा शिरोधार्य मानून राम आपली प्रतिज्ञा मोडण्यास तयार झालेच होते. '*चढतो सुरशिरीं*, ' ' सुरगति अतां भरतकरिं जाणा ' असें देवांना वाटलेंच. व

प्रेमें स्मरा हृदयिं भरता तरि। जो गुणशीलें ***वश रामा करि*** ॥ (२।२६५६-८ पाहा.)

असें देव एकमेकांस कानांत सांगूं लागले होतेच.

(२) **उत्तम –**

' **विषयिं अलंपट शीलगुणाकर।** *दुःखि दुःख बघतां* **सुखि सुखपर ॥**

सम *अभूतरिपु* **विमद विरागी। लोभामर्ष–हर्ष–भी त्यागी ॥**

कोमल चित्त *दया दीनांवर*। **त्रिविध भक्ति मम छलहीना वर ॥**

मानद सकलां स्वयें अमानी। भरता! ***प्राणांसम ते प्राणी*** ॥ ४ ॥

हे दीनांवर दया करतात; व दुसऱ्यांचें दुःख पाहून दुःखी होतात; म्हणजेच ते

दुःखी जर दीन नसतील तर त्यांच्यावर दया करून त्यांचें दुःख निवारण करण्याचा चंदनासारखा यांचा सहज स्वभाव नाहीं, हें ठरलें. अपकारकर्त्याला हे शत्रु मानीत नाहींत; कारण हे कोणालाच शत्रु मानीत नाहींत, कारण 'अभूतरिपु' आहेत; पण अपकारकर्त्यावरसुद्धां उपकार करणारे हे नाहींत: म्हणून वरच्यापेक्षां हे कमी प्रतीचे.

(३) **मध्यम – विगत काम मम नाम-परायण । शांति विरति विनती मुदितायन ॥ ५ ॥**
शीतलता सरलता मइत्री । प्रीति विप्रपदिं धर्मजनित्री ॥
ज्यांत तात! हीं सर्व लक्षणें । *खरा* सतत तो *संत* जाणणें ॥ ७ ॥

(४) **कनिष्ठ – शम दम नियम नीति ना सोडति । परुष वचन ना कधींहि बोलति ॥ ८ ॥**
निंदा स्तुति ज्यां सदा सम ममता मम पदकंज ।
प्राणप्रिय ते संत मज गुणमंदिर सुखपुंज ॥ ३८ ॥

दुसरा व चौथा यांस प्राणांसारखे प्रिय म्हटलें; तिसऱ्यास खरा संत म्हटलें; म्हणून हे तिन्ही प्रकार प्राणप्रिय आणि *खरे संत* मानणें जरूर आहे. मागें वर्णिलेल्या प्राणप्रिय भक्तांतच हे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन भेद दाखविले (गूढार्थचंद्रिका पाहा).

६. भक्तिविहीन ज्ञानी भगवंतास प्रिय नाहीं. भक्तीचें वर्णन उत्तरकांडांत अनेकांनीं विविधप्रकारें केलें आहे; त्यांत हेंच दाखविलें आहे कीं नुसत्या ज्ञानापेक्षां भक्ति श्रेष्ठ आहे.

(१) *भक्तिगीतेंत* श्रीरघुनाथानें अयोध्याजनांस केलेल्या उपदेशांत नरदेहाचें दुर्लभत्व, ज्ञानमार्गाची अति कष्टदता सांगून स्पष्ट सांगितलें कीं **क्वचित कोणी ज्ञानी झाला** तरी '**भक्तिहीन तो प्रिय नाहिं मजला ।**'. भक्तिमार्गाची सुलभता वर्णिली असून *संतकृपेवांचून कोणास भक्ति मिळणें शक्य नाहीं* आणि '*शंकरभजनाविना नर भक्ति न मम लभतात ।*' हें गुह्य सांगितलें आहे.

(२) श्रीरामानें भुशुंडीस भक्तिमहिमा सांगितला (७।८३ म. – ८७ म).

(३) भुशुंडीनें गरुडास भक्ति व ज्ञान यांतील अंतर सांगितलें ती भुशुंडीगीता भक्तिमहिमाच गाते.

(४) सप्तप्रश्नगीतेंत मानसरोगवर्णनांत शेवटीं भक्तीचाच प्रभाव दाखविला आहे.

(५) कलिप्रभाव व कलिधर्मवर्णनांत शेवटीं भक्तीच प्रतिपादिली आहे.

(६) उत्तरकांड दो. १२३ पासून १३० पर्यंतच्या उपसंहारांत पदोपदीं भक्तीचाच महिमा गाइला आहे. शिवाय रामराज्याभिषेकापासून सर्वत्र भक्तीचेंच प्रात्यक्षिक आहे.

(७) किष्किंधाकांडांत भक्तीचें स्वतंत्र वर्णन नसलें तरी आरंभींच्या २ व ३ या दोह्यांत आणि शेवटच्या २ दोह्यांत भक्तीच आहे. मध्यें वर्षाशरद वर्णनांत भक्तिविषयक स्फुट वचनें पुष्कळ आहेत. वालीकृत स्तुतींत व सुग्रीवगीतेंत भक्तीच मुख्य आहे.

(८) आरंभीं बालकांडांत सर्वत्र भक्तीच भरलेली आहे. एकच अपवाद या प्रकरणारंभीं दाखविला आहे. नगरदर्शन, पुष्पवाटिका, धनुर्मख, श्रीरघुवीरविवाह व

सर्व अयोध्याकाण्ड म्हणजे प्रेमभक्तीचें प्रात्यक्षिकच आहे.

(९) यापूर्वी प्रस्तावनेंतील 'मानसिं रामचंद्र', 'मानसिं श्रुतिसिद्धान्त'. 'मानसिं विश्राम', 'दार्शनिक सिद्धान्त', 'पंचक्लेशनिवारक' इत्यादि अनेक प्रकरणांत रामभक्तीचीच श्रेष्ठता वर्णिली आहे. यापुढील अनेक प्रकरणांत भक्तीचेंच विविध अंगांनीं विवेचन आहे.

श्रीरामचरितमानस श्रीराम-भक्तिरसाचें अगाध अपार मानससरोवरच आहे. त्याचें कितीहि वर्णन केलें तरी तें अपुरेंच! *त्याची गोडी चाखल्यानेंच कळते* शब्दांनीं सांगून ती कशी कळणार! भक्तींत कुपथ्य कोणतें याचा विचार पुढील प्रकरणांत पाहावा.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।२ 卐 卐 卐

कार्य-विसर व कामत्याग

भगवद्भजन करतांना इतर सर्व कार्यांचा विसर पडला पाहिजे व इतर कामनांचा त्याग केला पाहिजे; तरच प्रेमभक्तीचा लाभ होतो हा सिद्धान्त पूर्वी अनेक वेळां सांगितला आहे. याचीं मानसांतील उदाहरणें येथें द्यावयाचीं आहेत. साती सोपानांत प्रगट वा अप्रगट रीत्या हीं आहेत.

बालकाण्ड — (१) निघति भुलुनि गृहकार्यें सारीं । बाल जवान जरठ नर नारी ॥ (२४०।६) हें जनकपुरींतील लोकांचें वर्णन आहे.

(२) धावति *धामां* कामां त्यागुनि । जणूं रंक निधि लुटण्यालागुनि ॥ (२२०।२) रामलक्ष्मण जनकपुरी पाहण्यास निघाल्याचें कळल्यावर लोकांची ही दशा झाली. हे *सर्व लोक ज्ञानी आहेत*. धाम = घर व गृहकार्यें वगैरेंचा विसर पडला व कामत्याग केला. (टीका पाहा)

अयोध्याकांड — (३) श्रीराम, सीता व लक्ष्मण यमुनातीरानें जात असतां वन-मार्गावरील *गांवढळ , अज्ञानी कोळी* भिल्लांची स्थिति कशी झाली पाहा :—

तीरवासि नर नारी ऐकत, । *निज निज काजां विसरुनि धावत* ॥ (२।११०।१) श्रीगोपालकृष्णाच्या मुरलीचा ध्वनि कानीं पडतांच फक्त गोपिकांची जशी स्थिति झाली तशीच या त्रिमूर्तींच्या परम लावण्याची वार्ता कानीं पडतांच या वनवासी नारींचीच नव्हे तर *पुरुषांचीहि झाली* हें वैशिष्ट्य आहे.

(४) *ऐकत बालवृद्ध नारी नर। जाति काजगृह विसरुनि सत्वर* ॥(११४।२) मागील वचनांत बालवृद्धांचा उल्लेख नव्हता तो येथें आहे. गोपालकृष्णाच्या मुरली-नादानें बालवृद्ध आणि नर यांना आकर्षिलें नाहीं.

(५) त्यजुनि *काम, गृह* नारिनर **श्रवुनि येति धावून** ॥ २२१ ॥

अरण्यकाण्ड — (६) खरदूषण राक्षस रामलक्ष्मणांस ठार मारण्यासाठीं लढाईची तयारी करून आपल्या सर्व सैन्यानिशीं 'आले त्वरा करून धरा धरा धावत सुभट।' ॥ १८ ॥ पण रामचंद्रांस पाहतांच हे घोर राक्षस आपलें कार्य, युद्ध करणें *विसरले;* **प्रभुस बघुनि शर सोडुं न शकती। निशिचर भट सब चकित निरखती।'** (१९।१)

(७) श्रीरघुवीर आश्रमांत येत आहेत असें ऐकतांच अत्रि व अगस्तिसारख्या महाज्ञानी समर्थ मुनिश्रेष्ठांची कशी दशा झाली पाहा —

श्रवत महामुनि हर्षित झाले। वपु पुलकित मुनि *उठुनि धावले* ॥

एवढे *महामुनि अत्रि,* सप्तर्षींपैकीं एक, पण ऐकतांक्षणींच चटकन उठले व *सुटले धावत*! जें कांहीं *जपतपादि करीत बसले होते* त्याचा एकदम विसर पडला; व लहान मुलांसारखे अधीर होऊन धावले. महाज्ञानी, जीवन्मुक्त असल्यानें कामत्याग-वर्णनाची जरूरच नाहीं. असेच

(८) **श्रवत अगस्ती उठुनि धावले।** (३।१२।९)

ल. ठे. — खरदूषणांनीं कामत्याग केला नव्हता म्हणून त्यांचें प्रेम आळवावरच्या पाण्यासारखें ठरलें.

(९) लक्ष्मण काय म्हणाले पाहा — '**प्रभु-भावेंचि होय पुसता मी ॥**
वदा तें किं समजावुनि देवा। करिन *तजुनि सब* पदरज-सेवा ' ॥ (३।१४।६-७)
सेवा करतांना कामक्रोधादि समस्त विकारांचा त्याग जो करील त्यालाच ज्ञान व प्रेमभक्ति मेवा सेव्याच्या कृपेनें मिळतो.

किष्किंधाकाण्ड — (१०) अंगदप्रमुख रामदूत सीताशोधास निघाल्यावर

दो०— ' जाति सकल वन धुंडित सर सरि गिरी गुहेस ॥
रामकार्यी मन लीन ते *विसरति तनु-ममतेस* ॥ दो. २३ ॥

देहावरील ममतेचाच विसर पडल्यावर क्षुधा, काटे, कष्ट, दुःख इत्यादींचें स्मरण कसें होणार! हेच दूत सागरतीरावर पोचून, रामकार्याला वाव राहिला नाहीं असें ठरतांच, हनुमान जांबवंतांशिवाय, इतरांची देहममता जागृत झाली आहे; व त्यांत अंगद प्रमुख आहे.

(११) या दूतांना सुग्रीवानें आधींच बजावलें आहे कीं,

' बंधू! फळ हें देहा धरुनी। *राम भजावा कामा त्यजुनी* ॥ ' (२३।६)

म्हणूनच 'पामर पशु अति कामी' असून त्या विवरांत स्वयंप्रभेसारख्या एकट्या मनोहर रमणीचें दर्शन होऊनसुद्धां कोणी कोणत्याच कपिचेष्टा केल्या नाहींत. 'जननी-सम जाणति परनारी।' हें वाल्मीकींनीं सांगितलेलें *आठव्या प्रकारच्या भक्तिचें लक्षण* या चौथ्या काण्डाच्या उत्तरार्धांत या दूतांच्या ठिकाणींच सांपडलें, (४ × २ = ८) 'त्यांनीं दुरु*नी प्रणामकृत* तिज ' (२५।१) कोणी जवळसुद्धां गेले नाहींत.

सुन्दरकाण्ड — (१२) सागरलंघनाचे महा परिश्रम करून गेल्यावर सागरतीराजवळच फुलांफळांनीं लगडलेले सुंदर वृक्ष हनुमंतांस दिसले; पण रामकार्यांत मन मग्न असल्यामुळें त्यास *खाण्यापिण्याची आठवणच झाली नाहीं.*

जाउनि तिथें बघति वनशोभे । ...

नाना तरु फल फूल सुशोभन । खगमृगवृंदां बघत रमे मन ।। (३।६–७)

सुंदर फुलें, फळें, पानें, दिसल्यावर खाण्याची आठवण व इच्छा होणें अगदीं स्वाभाविक होतें; त्यांतून माकडाची जात! पण आठवणच झाली नाहीं. परंतु दोन दिवसांनीं सीताभेटीचें रामकार्य झाल्यावर, त्या अशोक वनांतील फळांनीं लवलेलीं झाडें पूर्वीपाहूनसुद्धां जणूं दिसलींच नव्हतीं तीं दिसलीं व पाहिल्याबरोबर भूक लागली व खाण्याची इच्छा पण झाली.

श्रुणु माते मज अतिशय भूक–। लागे, बघुनि रुचिर-फळ रूख ।। [वृक्ष] (१७।७)

(**१३**) **तोंवरि जीवां कुशल नहि स्वप्निं मना विश्राम ।**

जों न राम भजती *त्यजुनि शोकधाम* जो *काम* ।। ४६ ।।

लंकाकांड — (१४) श्रीरघुवीर सेतूवर उभे राहून सागराकडे पाहूं लगतांच त्या सागरांतील

' प्रगट होति सब जलचरवृंद ।। ४ ।।

मकर नक्र झष नाना व्यालहि । शत योजन तन परम विशालहि ।। ५ ।।

कांहिं असे गिळतीहि अशांना । तेहि घाबरति परी दुजांना ।। ६ ।।

मोठे मासे लहान माशांना खातात; त्या मोठ्यांना त्यांच्यापेक्षां मोठे खातात; असा त्यांचा स्वभाव असतां हे सर्व मासे स्वभाववैर विसरले व रामरूपाकडे बघत राहिले, भूक विसरले, बाकी सर्व कांहीं विसरले. **ध्यानाच्या वेळीं अशी स्थिति झाली पाहिजे.**

सूचना — येथील हें मीनांचें वर्णन अतिशयोक्त नाहीं हें अमर कोषांतील विविध जलचरवर्णन पाहिल्यानें कळेल.

(१५) मंदोदरी रावणास सांगते,

' संत वदति अशि नीति दशानन! । वृद्ध नृपें सेवावें कानन ।।

तिथें करा तद्भजना भर्ता! । जो कर्ता धर्ता संहर्ता ।।

रघुविर ते अनुरागी प्रणतां । नाथ! *भजा त्यागुनि सब, ममता* ।। ' (७।३–५)

सब = *कामक्रोधादि सर्व, आणि ममता यांचा त्याग करूनच भजन केलें पाहिजे.*

उत्तरकाण्ड — (१६) रघुकुलतिलक श्रीरघुनाथ सीता व लक्ष्मणांसह अयोध्येंत परत येत आहेत असा

समाचार पुरवासी पावति । सब नर-नारी हर्षें धावति ।। ४ ।।

उठुनि जसे* जे *तसे धावले । बाल जरठ नहिं सवें घेतले ।। ५ ।।

पोराबाळांचासुद्धां विसर पडला. ' जसे जे तसे धावले ' याचा विस्तार गोपी कशा

धावल्या त्या वर्णनांत *हरिवरदा* ग्रंथांत पाहावा.

(१७) श्रुतिसिद्धान्त हाच खगरावा ! । *भुलुनि कार्य सब राम भजावा* ।

(१८) हरिमायाकृत दोषगुण विण हरिभजन न जात ।

राम भजा कामा त्यजुनि हें चिंतुनी मनांत ॥ (७।१०४ रा)

'हरिमाया अति दुस्तर' असून तिच्या पाशांतून सुटण्यास हरिभजन-हरिभक्ति-शिवाय दुसरें मुख्य साधन नाहीं. परंतु हरिभजन करणें तें कामाचा त्याग करून केलें व भजनांत इतर सर्व कार्यांचा विसर सहज पडूं लागला तरच हरिमायेच्या पाशांतून कायमची सुटका होण्याची शक्यता आहे.

कार्यांचा विसर कसा पडावा याचीं भिन्न भिन्न उदाहरणेंच कांहीं कांडांत दिलीं आहेत व कामत्याग प्रत्येक सोपानांत अगदीं स्पष्टच सांगितला आहे. वर दिलीं इतकींच उदाहरणें मानसांत आहेत असें समजूं नये. प्रत्येक सोपानांत आणखी पुष्कळ आहेत. हा भजनविधि श्रोत्यांच्या मनांत ठसावा व भजनांतील हें पथ्य (कामत्याग) व अनुपान (कार्यविसर) काळजीपूर्वक व निष्ठेनें सेवन केलें जावें म्हणून पुनःपुन्हां उल्लेख आहेत.

यावरून असें मात्र समजूं नये कीं मानसांत सकामभक्तीला स्थानच नाहीं. सकाम-भक्ति गौण आहे इतकेंच. सकामभक्ति व भक्तींत निषिद्ध काय याचा विचार पुढील प्रकरणांत मानसाधारें पाहावा.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।३ 卐 卐 卐

सकामभक्ति व भक्तींत निषिद्ध ?

श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवत इत्यादि सर्वमान्य ग्रंथांत सकामभक्ति जशी निषिद्ध नाहीं, तशीच ती मानसांतही निषिद्ध नाहीं; पण इतर कांहीं गोष्टींचा पूर्ण निषेध केलेला आहे. या दोन्ही गोष्टी या प्रकरणांत मानसाधारें स्पष्ट दिसतील.

बालकांड — (१) **गूढ गती जे जाणूं पाहति । नाम जिभेनें जपतां जाणति ॥३॥**
सर्वज्ञता, सर्वदर्शिता इत्यादि गौण सिद्धींची इच्छा करणारे व गूढगति जाणूं इच्छिणारे म्हणजे जिज्ञासु भक्तांचा उल्लेख केला.

(२) **नाम जपति साधक लय लावुनि । होति सिद्ध अणिमादिक लाहुनि ॥**
हा अर्थार्थी भक्तांचा धनादि कामना असणारांचा उल्लेख आहे.

(३) **भक्त *आर्त* अति नामा जपती । होती सुखी सुसंकट टळती ॥ ५ ॥**
यांत आर्त भक्तांचा उल्लेख आहे.

(४) **नाम जपुनि मुखिं जागे योगी । *विरत* विरंचि-प्रपंच-वियोगी ॥**
येथें निष्काम मुमुक्षु सुचविले. याप्रमाणें चौघांना आपलें ध्येय भक्तीनें साध्य होतें हें दाखवून सांगतात,

'**रामभक्त जगिं चतुःप्रकारीं । *सुकृती अनघ उदारहि* चारी ॥**
नामाधार *चहूं चतुरां*प्रति । ज्ञानी प्रभुस विशेषें प्रिय अति ॥

या **चौघांनाहि** सुकृती = पुण्यवान = **धन्य, निष्पाप, उदार, आणि चतुर म्हटलें.** भगवद्गीतेंतील श्लोकांचें हें भाष्यच येथें दिसतें. गूढार्थचंद्रिकेंतील तुलनेंत मानसाची सरसता (सरशी) दिसेल.

किष्किंधाकाण्ड — त्रैलोक-पावन सुयश सुरमुनि नारदादिक वानती ।
जें श्रवत गातहि वदत समजत *परम पद नर लभतसे* ॥

यांत निष्काम भक्तांस परमपद = कैवल्य-प्राप्ति सांगितली. आणि —

दो. — ***भवभेषज* रघुनाथ यश जे ऐकति नरनारि ।**
त्यांचे *सकल मनोरथां सिद्ध* करी त्रिपुरारि ॥३०॥

'भवभेषज' नें मोक्षार्थी सुचविले, आणि 'सर्व मनोरथांची सिद्धि होईल' यानें जिज्ञासु, अर्थार्थी व आर्त हे *तीन सकाम भक्त सुचविले*. आरंभीं बालकाण्डांत जें विस्तारानें सांगितलें तेंच या मधल्या अति छोट्या काण्डांत संक्षेपानें सांगितलें. आतां शेवटच्या काण्डांत पाहा.

उत्तरकाण्ड —

१. **श्रुणु खगपति ही कथा पावनी । विविध ताप *भवभय-नाशनी* ॥** (१५।१)
यांत *मुमुक्षूंना मोक्षप्राप्ति सांगितली*.

या शुभ महाराज-अभिषेका । श्रवत मिळवि नर विरतिविवेकां ॥ (१५।२)
यानें *विवेकवैराग्यप्राप्ति निष्काम साधकास सांगितली*.

जे *सकाम नर* ऐकति गाती । *पावति सुख विविधा संपत्ती* ॥ (१५।३)
येथें बालकाण्ड २२ मधील तीन प्रकारचे **सकाम** सुचविले. सुख शब्दानें आर्त, आणि ' विविधा संपत्ती ' नें अर्थार्थी व जिज्ञासु सुचविले. जे वैराग्यहीन राहतील त्यांस पुढल्या जन्मांत काय मिळतें तें पाहा :—

सुरदुर्लभ सुख भोगुनि जगतीं । अंतकाळिं *रघुपति पुरिं जाती* ॥
अयोध्येंत जन्म सुचविला. आतां संकलित सार सांगतात,

मुक्त विरक्त किं विषयी ऐकति । भक्ति सुगति नव वैभव पावति ॥
मुक्त = *जीवन्मुक्त ज्ञानी भक्तिमान होतात; विरक्त ज्ञानी होऊन सद्गति-मोक्ष मिळवितात* आणि *विषयकामना असणारे नवें वैभव पावतात*. याप्रमाणें येथेंहि सकामांचा निषेध नाहीं.

२. पुन्हां उमा सांगते,

' भवसागर जो लंघूं पाही । रामकथा त्या दृढ नौकाही ।।
विषयि जनांसहि हरिगुणसागर । *श्रवणसुखद हृदया प्रसन्नकर* ।। '
(७।५३।३-४)

३. *पावति मन-कामना सिद्धि ते* । त्यजुनि कपट ही कथा गाति जे ।। (७।१२९।५) याप्रमाणें या काण्डांत आदि-मध्य-अंतीं सकामांना फलप्राप्ति स्पष्ट सांगितली आहे. इतर प्रत्येक काण्डांत अशीं वचनें आहेत पण विस्तार अनावश्यक आहे.

भक्तींत निषिद्ध काय ? वर दाखविल्याप्रमाणें सकाम भक्ति निषिद्ध नाहीं; सकाम पुढें रामकृपेनें निष्काम होऊं शकतात; पण भक्तींत अन्याश्रय वगैरे कांहीं गोष्टी अगदीं निषिद्ध आहेत. (७।४६।३)

(१) म्हणवि दास मम *नर आशा करि । वद़ा कुठें विश्वास खरा तरि* ।। असें प्रभु श्रीरघुनाथानेंच म्हटलें आहे. **इतरांची व साधनांची आशा निषिद्ध आहे.** इतरांची आशा-भरंवसा धरणें हा भक्तींत व्यभिचार आहे. भक्ति अव्यभिचारिणी असली पाहिजे. (भगवद्गीता १३।११)

(२) शिवद्रोह निषिद्ध आहे.

मद्द्रोही प्रिय शंभु ज्या *शिवद्रोहि मम दास* ।
ते नर *करती कल्पभर नरकीं घोर निवास* ।। (६।२)

असें श्रीरघुवीरानेंच म्हटलें आहे.

(३) विप्र-ब्राह्मण-द्रोह निषिद्ध आहे — कारण प्रभु ब्रह्मण्यदेव आहेत आणि ब्राह्मण-द्रोही त्यांस मुळींच आवडत नाहीं. ' *ब्रह्मकुलद्रोहि न मज रुचतो* ' (३।३३।८) असें प्रभूच म्हणाले आहेत.

(४) मद आणि माया (कपट, छल) निषिद्ध आहेत. मद = गर्व, ताठा, अहंकार; माया = छल, कपट म्हणजेच इतरांचा भरंवसा धरणें, *अनन्यगतिक नसणें.*

' निर्मल मन जन तो मज पावे । मला कपट छल छिद्र न भावे ।। ' (५।४४।५)
' त्यांमधिं जो *सोडुनि मद माया* । *भजे* मला मन वाणीकायां ।।'(७।८७।७)

असें प्रभुच म्हणाले आहेत. (७।८७।४-५ पाहा.)

भक्त बालक ध्रुव सकाम आर्त व अर्थार्थी होता; पण तो अनन्यगतिक, दीन व सरल हृदयाचा होता. तो आज पुराणादिकांत भगवद्भक्त म्हणून प्रसिद्ध आहे.

या निषेधांचा त्याग सकाम आणि निष्काम अशा दोन्ही प्रकारांत अत्यंत आवश्यक आहे. आणखी एक महत्त्वाची निषिद्ध गोष्ट मानसांत सुचविली आहे; तिचा विचार पुढील प्रकरणांत आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।४ 卐 卐 卐

कपटी पापी यांचें नांव घेणें नको

सज्जनांशीं कपट करणारे, विश्वासघातकी, रामविरोधी, गुरुद्रोही, इत्यादींच्या नांवाचा उच्चारसुद्धां करूं नये. हा नियम मानसांत न सांगतां सांगितला आहे. प्रत्येक सोपानांत उदाहरणें आहेत; त्यांतील कांहीं नमुन्यादाखल या प्रकरणांत स्पष्ट दाखविलीं आहेत; व कांहींचा नुसता निर्देश केला आहे.

बालकाण्ड. (१) पहिलें उदाहरण सतीचें-दक्षकुमारीचें —' सवें सती जगजननि *भवानी* ' असें शंभु कुंभजांकडे निघाले त्या वेळीं म्हटलें. सती हें तिच्या *माहेरचें नांव* तिच्या पतिव्रताधर्माचें निदर्शक आहे. भवानी हें तिचें नांव आहे–सासरचें नांव आहे.

तिनें रामविरोध करण्याचें ठरविलें; पतिवचनावर सती असून विश्वास ठेवला नाहीं व श्रीरघुनाथ-परीक्षेसाठीं गेली तेव्हांपासून ' भवानी ' या तिच्या प्रसिद्ध नांवाचा उच्चार कोणीं केला नाहीं. उमा शब्द वापरला असला तरी तें तिचें प्रसिद्ध नांव नाहीं. तुळजापूरची *भवानी*, प्रतापगडची *भवानी* असें म्हणतात. ' उमा ' म्हणत नाहींत. तिला पश्चात्ताप होऊं लागल्यावर मग ' भवानी ' चा उपयोग केला आहे. शंकरांना तिच्या मनांतील संशय कळण्यापूर्वी (१।५०।५ मध्यें) भवानी शब्द वापरला आहे. नंतर पुन्हां ५८।३ मध्यें आहे; त्यापूर्वी तिला आपल्या अपराधाची जाणीव होऊन तिनें स्वतःच्या दोषांचें चिंतन सुरूं केलें आहे. (५७ रा – ५८।३ पाहा). मधल्या भागांत सती, दक्षसुता, दक्षकुमारी इ. आहेत.

(२) दुसरें उदाहरण कपट–मुनीचें — धर्मशील, प्रजावत्सल, सम्राटाशीं कपट केलें, त्याचा विश्वासघात केला आणि पश्चात्ताप झाला नाहीं म्हणून त्या *सर्व प्रकरणांत त्या कपटी राजाचें नांव नाहीं*.

अयोध्याकाण्डांत कुबडी (मंथरा) हिच्या नांवाचा उच्चार कवींनीं फक्त प्रारंभीं दोनदांच केला आहे.

दो०– ' कैकयिदासी मंदधी नाम *मंथरा* जीस ' ॥ १२ ॥

शृंगारित पुर बघत *मंथरा* । ' (१३।१).

अद्याप तिचा दुष्ट हेतु प्रगट झालेला नाहीं म्हणून तिचें नांव घेणें पाप नाहीं; परंतु जेव्हां ती दासी

पुसे जनां कीं उत्सव कसला । *रामतिलक ऐकुनि उर जळला* ॥

कुमति कुजाति विचार करी ती । होई अकार्य किं कवणें रीतीं ॥

असे तिचे विचार प्रगट होतांच तिच्या नांवाचा उच्चार बंद झाला.

(क) तिचा दुष्टपणा व नांवाप्रमाणें घरभेदेपणा करण्याचा हेतु कैकयीला कळतांच तिनेंसुद्धां त्या दासीचें नांव उच्चारलें नाहीं; कुबडी, दासी, तूं, इत्यादींचाच उपयोग

कैकयीनें केला आहे. दो. १३।२ पासून २०।४ पर्यंत कैकयीनेंसुद्धां 'मंथरा' = (*ढवळाढवळ करणारी, भेद उत्पन्न करणारी*) हा शब्द वापरला नाहीं.

(ख) जेव्हां कैकयीची खात्री झाली कीं कुबडी 'भरताचें व माझें' हितकर्ती आहे, ती दुष्ट नाहीं, तेव्हां तिनें मोठ्या प्रेमानें तिला तिच्या नांवानें संबोधिलें आहे.

'बघ मंथरे! खरे वच तव तों। उजवा नेत्र नित्य मम लवतो॥ (२०।५)

(ग) नंतर एकदां कैकयीनेंच 'मंथरा' हें नांव उच्चारलें आहे. आपण केलेला पराक्रम भरतास सांगत असतां कैकयी म्हणते,

'तात गोष्ट मी सकल जुळवली। साह्य बिचारी *मंथरा* बनली॥ (१६०।१)

अरण्यकाण्ड (१) — काण्डारंभींच **'सुरपति सुत'** म्हणून **'जयन्तकथा'** सांगण्यास प्रारंभ केला. नारदाच्या दर्शनानें पाप नष्ट झालें तेव्हांच '*जयन्त*' हें इंद्रपुत्राचें नांव वापरलें आहे.

नारद देखति विकल जयन्ता। येइ दया कोमल मन संतां॥ (२।९)

नारददर्शन होईपर्यंत शठ, सुरपतिसुत, काक, वायस, मूढ मूर्ख वायस इत्यादि शब्द वापरले आहेत. श्रीरघुनाथाची परीक्षा पाहण्यास काक बनून आला व रामभक्त सीतेचा छल केला.

(२) **रावण** — कपटानें सीताहरण करण्याचें ठरविल्यापासून, म्हणजेच रावण मारीचाकडे जाण्यास निघाल्यापासून (२३।७) कपटाचा त्याग करून त्यानें आपलें दशाननरूप प्रगट केलें तोंपर्यंत *रावण* शब्द एकदांही वापरला नाहीं. (२८।१२) कारण 'रावण' हेंच त्याचें प्रसिद्ध नांव होतें. '*रावण नाम* वीर बलिवंदहि।' (१।१७६।२) तो आपलें नांव रावणच सांगत असे. '*रावण नाम* जगतिं यश भरलें।' (६।९०।४).

२३।७ पासून २८।१२ पर्यंत दशकंधर, दशशीस, दशानन इत्यादि सात वेळां आहेत. मध्यें 'रावणशशिराहू' असं श्रीरघुवीरास म्हटलें आहे. पण हें रघुवीराचें एक नवें नांव तयार झालें.

(क) मानसांतील मारीचानेंसुद्धां 'रावण' नांव घेतलें नाहीं; अग्निपुराणांत माल म्हटलें कीं,

रावणादपि मर्तव्यं मर्तव्यं राघवादपि।
अवश्यं यदि मर्तव्यं वरं रामो न रावणः॥ (अग्नि. ७।१५)

हाच विचार करतांना, *रावण* शब्द मूळांत अग्निपुरणांत दोनदां असून मानसांतील मारीचानें तो वापरला नाहीं.

उभयपरीं पाही निजमरणा। चित्तिं शरण रघुनायकचरणां॥
वधिल अभागी देतां उत्तर। कां न मरूं लागत रघुपतिशर॥' (२६।५–६)

सूचना — विचार करावा कीं मानसाच्या अनुवादांत २३।७ पासून २८।१२

पर्यंत दशमुख, दशशिर या चार मात्रांच्या जागीं रावण हा चार मात्रांचाच शब्द घातल्यानें श्रीगोस्वामींच्या काव्यांतील गूढ-भाव-रमणीयतेची हानि होईल कीं नाहीं ? असें प्रमाद ज्यांच्या हातून घडतील ते श्रीरामचरित*मानसाचे* 'चतुर सुरक्षक' नाहींत असें ठरेल.

किष्किंधाकाण्ड — (१) अंगदाची अशी भावना होती कीं, सुग्रीवानें वालीला मारविलें हा अन्याय केला; व तो (सुग्रीव) वैरभावनेनें वागत असून माझा काटा काढून टाकण्याची संधि शोधीत आहे. या भावनेमुळें अंगदानें सुग्रीवाच्या नांवाचा उच्चार केला नाहीं.

लागे सीताशोध न येथें । *कपिपति* मारिल जातां तेथें ॥

तात वधोत्तर मला मारिता । रक्षिति राम, न *तदुपकारिता* ॥ (२६।४-५)

सुग्रीव मारील असें न म्हणतां कपिपति मारील असें म्हटलें.

(क) लंकाकाण्डांत शिष्टाईस जाईपर्यंत अंगदाची ही भावना कायम आहे. लंका. दो. १२ मधील चंद्रोदयवर्णनांतील उत्तरांत ही भावना ध्वनित आहे. (गूढार्थ-चंद्रिका पाहा.)

सुंदरकाण्ड — (१) सागरांत गुप्त राहून छायेचें आकर्षण करून ठार मारणाऱ्या निशाचरीचें नांव 'सिंहिका' इतर रामायणांत सांगितलें आहे; पण मर्यादापुरुषोत्तमाच्या भक्तिरसमय चरित्रांत भक्तिमार्गमर्यादांचें दिग्दर्शन करणें जरूर असल्यानें मानसांत त्या निशाचरीचें नांव मुळींच नाहीं, कारण तिनें कपटानें रामदूताला ठार मारण्याचा प्रयत्न केला. उघड उघड विरोध केला असता तर दोष ठरला नसता. (३।१-४ पाहा.)

(२) रावणाचा गुप्त हेर शुक — (५१।८-५३।३ पाहा) इतर रामायणांत हेराचें नांव आरंभापासूनच आहे, पण मानसांत त्याच्या नांवाचा उच्चार तो रावणाकडे परत गेल्यावर रावणानें केला आहे. त्या प्रकरणांत त्या नांवाचा आणखी उल्लेख नाहीं.

(३) रावणाशीं बोलण्याचा प्रसंग सीतेवर अशोकवनांत ओढवला, तेव्हां तिनें 'रावण' नांवाचा उच्चार केला नाहीं. वाल्मीकि रामायणांत सीतेनें 'रावण' नांवानेंच त्याला संबोधिलें आहे. (५।२१।१८ पाहा.) मानसांतील सीता '*दशमुख खद्योत*' म्हणाली व नंतर त्याच्याशीं न बोलतां त्याच्या तलवारीशींच बोलली.

लंकाकाण्ड — या काण्डांतील सीता-त्रिजटा संवादांत सीतेनें रावण नांव उच्चारलें नाहींच पण दशमुख, दशानन इत्यादि नांवेंसुद्धां उच्चारलीं नाहींत.

काय होय कां वदसि न माई । कसा मरेल *विश्वदुखदाई* ॥ ४ ॥

जगवी माझें अभाग्य *त्यातें* । (९९।६) **'तो *त्या* वांचवि विधिच दुजा ना'** ॥ (९९।१०)

उत्तरकाण्ड — उत्तरकाण्डांत रामराज्य झाल्यानें नांव उच्चारूं नये अशी व्यक्ति कोणी नाहीं. तथापि, उत्तरार्धांत भुशुंडीनें गरुडास कोणत्या कोणत्या कथा सांगितल्या

हें वर्णन करीत असतां त्यांत ‘ जयन्त ’ नांव उच्चारलें नाहीं.

भरतराहणी, *सुरपतिसुतकृति* । प्रभु-मुनि अत्रि भेट मग वर्णिति ॥ (६५।८) असें *सुरपतिसुत* म्हटलें.

इतर बहुतेक काण्डांत आणखी बरींच उदाहरणें आहेत; पण किष्किंधा व उत्तर-कांडांत या अल्पमतीस आणखी आढळलीं नाहींत. बुद्धिमान वाचकांनीं शोध घ्यावा.

निषेधांचा व कुपथ्याचा त्याग करून, कामत्यागपूर्वक भजनांत कार्यविसर पडूं लागला कीं रामप्रेमप्राप्ति संतकृपेनें होईल. रामप्रेमप्राप्तीची प्रत्यक्ष प्रतीति पुढील प्रकरणांत पाहा.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२१५ 卐 卐 卐

प्रेमें येई देहिं शिथिलता

ज्याप्रमाणें अति भयानें किंवा अति शोकानें देहाचे अवयव शिथिल पडतात, हात-पाय गळून गेले असें वाटतें उठवत, चालवत, बोलवत नाहीं; त्याप्रमाणेंच भगवत् प्रेमानेंसुद्धां होतें. याचीं उदाहरणें साती सोपानांत आहेत. कांहीं ठिकाणीं शिथिलतेचे स्पष्ट उल्लेख आहेत तर कांहीं ठिकाणीं परिणामच वर्णिले आहेत. हे भक्तिरसाचे संचारी भाव होत.

बालकांड — (१) **पुत्रजनन दशरथांस कळलें । ब्रह्मानंद-मग्न जणुं झाले ॥**
प्रेम परम मनिं, पुलक वपूवरि । *करुनि धीर मति बघे उठूं परि* ॥
नामहि शुभद जयाचें श्रवणीं । तो प्रभु आला माझे भवनीं ॥
परमानंद-पूर्ण-मन राजा... । (१९३।३-६)

इतका परमानंद झाला कीं *उठण्याचा प्रयत्न करूनसुद्धां उठवेना.*

(क) दशरथांच्या अशा शिथिलतेचें सुंदर वर्णन (३०७ टीका) पाहा.

(२) जनकपुरींतून अयोध्येस जाण्यास निघण्यापूर्वी बंधूंसह रघुनाथ आपल्या सासवांचा निरोप घेऊन निघतात, त्या वेळीं *सुनयना आदि राण्यांची प्रेमदशा* झाली ती —

मंजु मधुर मूर्तिस मनिं आणति । प्रेम–शिथिलता राण्या पावति ॥ (३३७।५)

(३) बंधूंसह श्रीरामविवाह होऊन वरात अयोध्येजवळ आल्याची बातमी कौसल्यादि मातांना समजली तेव्हां —

प्रेमा-प्रमोद-वश सब माता । *गात्र शिथिल पद ये ना जातां* ॥(३४६।१)

प्रेमानें व प्रमोदानें अशी शिथिलता आली कीं एक पाऊल टाकवेना.

अयोध्याकांड — (४) शृंगवेरपुर *भरता दिसतां । ये सर्वांगीं स्नेह शिथिलता* ॥
शोभति जात ***निषादाधारीं*** *। जणुं अनुराग* ***विनय*** **तनुधारी** ॥ (१९७।१-२)

(५) जाती घालुनि मित्र-करीं कर । *स्नेह न थोडा शिथिल कलेवर* ॥ (१९८।५) या *भागावरील टीका मुद्दाम पाहावी.* श्रीरामसीता ज्या तृणपर्णशय्येवर झोपलीं ती पाहण्यास जाण्याचें नुसतें मनांत आलें तोंच हातपाय गळले. असें होणें हें सहजस्नेहाचें लक्षण आहे.

(६) **भरत व त्याचे साथीदार** — पायीं चालत चित्रकूटच्या जवळ जवळ आल्यानंतर —

मंगल शकुन होति सकलांना । स्फुरण सुखद भुज विलोचनांना ॥
सह समाज भरता उत्साहो । दिसतिल राम जाइ दुखदाहो ॥
करिति मनोरथ जे ज्यां सुचती । *स्नेह-सुरा-उन्मत्त चालती ॥*
शिथिल अंग पद पथिं लटपटती । प्रेमें विव्हळ वचनें वदती ॥ (२२५।१-४)

अरण्यकांड — (७) **सुतीक्ष्ण** — प्रभु आपल्याला भेटतील कीं नाहीं याचा विचार करतां करतां प्रभूचें एक ब्रीद आठवून जेव्हां वाटलें कीं,

होतिल आज सुफल मम लोचन । बघुनि वदन पंकज भवमोचन ॥
तेव्हां **प्रेमपूरिं मुनि बुडले ज्ञानी । वदवे ना ती दशा भवानी ! ॥**
पंथ दिशा विदिशा समजेना । कोण कुठें मी जात कळेना ॥
मागें वळे पुन्हां कधिं फिरतो । कधिं गुणगानीं नृत्या करतो ॥ (१०।८-१२.)

सुतीक्ष्णाच्या बुद्धींतच शिथिलता उत्पन्न झाली.

किष्किंधाकांड — (८) हनुमान –

' वदलों आम्हीं चरित्र अमचें । सांगा विप्र कथेसी तुमचे ॥ '

असें श्रीरघुवीरानें विप्रवेषधारी हनुमन्तास म्हणतांच —

प्रभु ओळखि, पडला, धरि चरणां । तें सुख उमे ! वर्णुं कवणा ? ॥
पुलकिततनु *ये वचन न वदना । बघत रुचिर वेषाची रचना* ॥ (२।४-६)

हनुमन्ताच्या *वाणींत* फारच *शैथिल्य* आल्यानें बोलतां येईना व *स्मरणशक्तींत शिथिलता* आल्यानें कपटवेषाचा त्याग करण्याची आठवणच राहिली नाहीं.

सुंदरकांड — (९) **' प्रभुनिरोप परिसुनि वैदेही** *। प्रेममग्न तनुभान न राही* ॥ सीता होती ती वैदेही झाली व मन, बुद्धि, वाणी यांस नुसती शिथिलताच नव्हे तर तटस्थता आली.

लंकाकांड — (१०) **कुंभकर्ण** — दशमुखानें कुंभकर्णास निद्रेंतून मुद्दाम उठविल्यावर त्यानें रावणाची समजूत घातली; पण रावण मानीलसें दिसेना तेव्हां —

' रामरूपगुण आठवित ***प्रेममग्न पळ*** **एक** ॥ (६।६३।-)

एक क्षणभरच कां होईना कुंभकर्णाची दशा सीतेसारखी झाली.

उत्तरकाण्ड — (११) **भरत** — १४ वर्षें वनवास भोगून परत येऊन श्रीराम भरतास भेटले त्या वेळीं —

पुसती कृपानिधि कुशल भरता शब्द शीघ्र न उमटती।
सुख तें शिवे! श्रुणु! वचन मन–पर जाणती जे लाभती ॥ (७।५ छं. २)

बाल व अयोध्याकाण्डांत आणखी उदाहरणें आहेत तीं वाचकांनीं शोधावीं. वर्णाश्रम-धर्मपालनपूर्वक सर्व पथ्यें संभाळून अशा प्रकारची प्रेमदशा प्राप्त होणें फारच दुर्लभ आहे हें जाणून कलियुगांतील विशेष साधन कोणतें तें आतां श्रीगोस्वामीजी सांगतील.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।६ 卐 卐 卐

कलियुगीं साधन सुलभ अति अनायास उद्धार

कलियुग इतर सर्व बाजूंनीं अति कराल, कपटी, वगैरे असलें तरी परम सौख्य व परम शान्ति प्राप्त करणें या युगांत अधिक सोपें व सर्वांना साध्य आहे. प्रत्येक सोपानांत याविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत व उत्तरकाण्डांत उपसंहार रूपानें विस्तार आहे.

बालकांड — चारी युगांतील प्रधान साधन प्रथम युगक्रमानें सांगतात —

' ध्यानें कृतयुगीं मखविधि दूजे । द्वापरीं परितोषे प्रभु पूजें ॥ ३ ॥
नाम कामतरु **कराल काळा । स्मरतां शमवि सकल जग–जाळा** ॥
रामनाम कलिं अभिमत दाता । हित परलोक लोकिं पितृमाता ॥ ६ ॥
कलियुगीं ***कर्म न भक्तिविवेकू*** *। रामनाम अवलंबन एकू* ॥ (२७।३-७)

एकू = एक, मुख्य येथें दोहावलींतील एका दोह्यानें अगदीं स्पष्ट होईल.

दो. – ***' रामनाम पूर्णांक तो शून्य साधनें आन ।***
जातां अंक न कांहिं करिं दसपट सहांक जाण ' ॥ १० ॥

एक हा पूर्णांक असून त्यावर जेवढीं शून्यें घाल तेवढी दसपट किंमत वाढेल, तसेंच रामनाम व इतर साधनें यांचें आहे. रामनामरूपी पूर्णांक नसेल तर इतर सर्व साधनें-रूपीं शून्यांची किंमत शून्य ! (बाल. दो. २६, २७ पाहा.)

रामनाम हें आधारभूत मुख्य साधन सर्व साधनांचा पाया आहे.

(२) **रामकथा** हें असेंच साधन आहे.

रामकथा ***कलिकलुषविभंजनि*** **। रामकथा कलि-पन्नग-भरणी** ॥
रामकथा कलिं कामधेनु ***वर*** **। मुळी सुजन संजीवनि सुंदर** ॥

(३) **श्रीरामगुणगण** हें असेंच तिसरें साधन आहे.

कुपथ कुतर्क कुचाळी ***कलिं*** **कपट दंभ पाखंड ।**
दहन रामगुण गण जसा अनल इंधना चंड ! ॥

रामचरित्र व रामयश यांचा समावेश रामकथेंत होतोच म्हणून तीं अवतरणें येथें दिलीं नाहींत. (ती ' रामकथा ' प्रबंधांत पाहा.)

अयोध्याकाण्ड — श्रीभरतचरित्राचें सादर व नियमानें श्रवण करणें हें एक साधन आहे :—

छंद — श्रीराम-सीता प्रेम-पीयुषमय न जन्मत भरत कीं ।
व्रत विषम शम दम नियम यम मुनि-मन अगम कुणि करत कीं ॥
दारिद्र्य दूषण दंभ दुःखानल सुयशमिषिं हरत कीं ।
कालिकालिं तुलसी सम शठां कुणि राम सन्मुख करत कीं ॥ १ ॥

दो०– भरतचरित युतनेम तुलसी सादर जे श्रवति ।
सितारामपदप्रेम होइ नाक्किं भवरस विरति ॥ ३२६ ॥

अरण्यकाण्ड — कलिमल शमन दमन मना रामसुयश सुखमूल ।
सादर ऐकति जे तयां राम राहि अनुकूल ॥ ६ रा ॥
कठिण काल मल रास ज्ञान न धर्म न योग जप ।
सांडुनि सर्वहि आस भजति राम ते चतुर नर ॥ ६ म ॥

ज्ञानमार्ग, धर्म-कर्म-मार्ग व योगमार्गादि साधन मुख्य नसून श्रीरामभजन म्हणजेच रामनाम व राम-गुण-कथा श्रवण हें साधन मुख्य आहे. दोहावली दोहा १० पाहा.

(क) कलिमल विपुल-विभंजन *नाम* = ज्यांचें *नाम विपुल कलिमलविभंजन करणारें आहे तें.*

किष्किंधाकाण्ड–*कलिमलप्रध्वंसनं चाव्ययं...संसारामयभेषजं सुखकरं...*
धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम् ॥ (मं. श्लो. २)

सुंदरकाण्ड — हें *चरित* कलिमलहर यथामति *तुलसिदासें गाइलें* ॥
सुखभवन, संशयशमन, दमन विषाद, *रघुपतिगुणगणां* ।
गा, त्यजुनि आशा सब भरंवसा ऐक संतत शठ मना ॥ ६० छंद ॥

लंकाकाण्ड — हा कालिकालमलायतन मन ! बघ करुनि विचार ।
श्रीरघुनाथनामविण नाहिं अन्य आधार ॥ १२१ म ॥

सूचना — बालकांडांत रामनाम, रामकथाश्रवण आणि रामगुणगान हीं मुख्य साधनें सांगितलीं; व अयोध्यादि पांच कांडांत यांपैकींच कोणाचा तरी 'अभ्यास' या दृष्टीनें उल्लेख केला.

उत्तरकाण्ड — उपसंहाररूपानें सर्वांचा उल्लेख आहे.

१. दो.–*कलियुग–गुणहि महान हा* **अनायास उद्धार** ॥ १०२ रा ॥
सत्यीं त्रेतीं द्वापरीं *पूजा मख नी योग* ।
देती गति ती कालिं हरि-नामें पावति लोक ॥१०२ म ॥

बालकांड २७।३शीं तुलना करून पाहावी; ध्यान = योग; कृतयुग = सत्ययुग, बालकांड २७।७ मध्यें 'रामनाम अवलंबन एकू' हें मुख्य साधन सांगितलें आणि

त्यानें कोणती गति मिळते तें वरील दोह्यांत सांगितलें. वरच्या तीन ओळींतील विषयच पुढील सात ओळींत विस्तारला आहे.

कृतयुगीं सब *योगी विज्ञानी* । *ध्यात हरिस भव तरती प्राणी* ॥
त्रेतीं यज्ञ विविध नर करती । प्रभुस कर्म अर्पुनि भव तरती ॥
द्वापरिं करुनि *रघुपति पूजा* । नर भव तराति उपाय न दूजा ॥
कलियुगीं केवळ *हरिगुणगाथा* । भव ठावा नर पावति *गातां* ॥
योगयज्ञ *कलियुगीं* ना ज्ञानहि । *एक अधार रामगुणगानहि* ॥ ५ ॥
त्यजुनि भरंवसा सब जे रामहि । *भजति गाति गुणगण सप्रेमहि* ॥ ६ ॥
तेच तराति भव संशय अल्प न । *कलियुगिं नामप्रताप गुप्त न* ॥ ७ ॥

(१) **हरिगुणगाथा** = हरिकथा, रामगुणगान आणि रामनाम यांचा प्रभाव सारखा हें सुचविलें. (क) त्यजुनि भरंवसा सब = इतर सर्वांचा व सगळ्यांचा भरंवसा हें कुपथ्य त्याज्य ठरविलें. (ख) सप्रेम = प्रेमानें, हें अनुपान सांगितलें. (ग) भवतरण हें प्रयोजन सांगितलें. (घ) चौ. २,३,४ यांत ' नर ' शब्दच आहे, नॄन् पूर्वपुरुषान् तारयति = नरः म्हणजेच *धर्मशील मनुष्य*.

(२) आतां कलीच्या *आणखी एका प्रतापाचा उपक्रम* करून चालू विषयाचा उपसंहार करतात —

एक पूत अति कलीप्रतापहि । होई मानस पुण्य पाप नहि ॥ ८ ॥
कलियुग सम युग आन ना । जर नर *युत विश्वास* ॥
गाइ रामगुणगण विमल *तरे भव न सायास* ॥ १०३ रा ॥

कलियुगांत मानसिक पुण्य होतें पण मानसिक पाप होत नाहीं हें कलियुगाचें वैशिष्ट्य इतर युगांत नव्हतें. मनानें केलेल्या पापांचें फळ इतर युगांत भोगावें लागतें; पण कलियुगांत मनानें घडलेल्या पापाचें फळ भोगावें लागत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं मानसिक पापांचा कांहींच दुष्परिणाम होत नाहीं. (टीका पाहा.) (क) ' युत विश्वास ' यानें अधिकारी सुचविला. (ख) वरील दोह्यांतसुद्धां ' नर ' शब्दच आहे.

(३) आतां *कलीचा आणखी एक प्रभाव* सांगतात,

प्रगट धर्मपद चार, हा एकचि कलीं प्रधान ।
येन केन विधि देतां दान करी कल्याण ॥ १०३ म ॥

बाकीच्या युगांत, ' देशे काले च पात्रे च ' (भगवद्गीता) देश, काल, पात्रापात्र विचार पाहून देशदोष, कालदोष, वस्तुदोष इत्यादि वर्ज्य करून सत्पात्रास यथाविधि दान दिलें तरच पुण्य पदरीं पडून कल्याण होतें; पण या कराल कलियुगांत कोणत्याहि प्रकारें, केव्हांहि, कोठेंहि आणि कोणालाहि पात्रापात्र विचार न करतां द्रव्यादिक दान दिल्यानें देणाराचें कल्याण होतें; हें कलियुगाचें दुसरें वैशिष्ट्य आहे. देश, काल, पात्र

योग्य मिळाल्यास चांगलेंच. (टीका पाहा.)

युगधर्मांची हृदयांत उत्पत्ति व युगधर्म कोणास बाधत नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत युगधर्मांची उत्पत्ति हरिमायेच्या प्रेरणेनें कशी होते वगैरे सांगून, युगधर्म (काळधर्म) कोणास बाधत नाहींत हें पुढें सांगितलें आहे.

होति हृदयिं युगधर्म जनांचे । प्रेरित मायेनें रामाचे ॥ १ ॥
शुद्ध सत्त्व समता विज्ञान । कृतमहिमा *प्रसन्न मन जाण* ॥ २ ॥
सत्त्व बहुत रज जरा कर्मरति । त्रेताधर्म *सर्वपरिं सुख अति* ॥ ३ ॥
बहुरज, सत्त्व अल्प ही तामस । द्वापरधर्म *हर्ष भय मानस* ॥ ४ ॥
राजस थोडा तामस भारी । कलिमहिमा *विरोध दिशिं चारी* ॥ ५ ॥
बुध निज मनिं युगधर्म जाणती । त्यजुनि अधर्म धर्मरति करती ॥ ६ ॥
कालधर्म ना बाधिति **त्यासी** । *रघुपति पदीं प्रीति अति* **ज्यासी** ॥ ७ ॥
नटकृत बिकट कपट खगराया । नट सेवका न लागे माया ॥ ८ ॥

दो०– हरिमायाकृत दोष गुण विण हरिभजन न जात ।
राम भजा कामां त्यजुनि हें चिंतुनी मनांत ॥ १०४ रा ॥

ल. ठे. — समाजांत व देशांत कलिधर्माचें प्राबल्य झालें तरी व्यक्तींना स्वतःच्या हृदयांतील दोषयुक्त कलिधर्माचा त्याग करून हरिभजनाच्या आधारें प्रयत्नानें वरच्या वरच्या युगाचा धर्म प्राप्त करून घेतां येतो. *सार हें कीं व्यक्तीनें स्वतःच्या सुधारणेचा प्रयत्न मनापासून केल्यास तो वरील साधनांनींच यशस्वी होईल; पण समाजास सुधारण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाहीं.* समाजाची सुधारणा राजसत्तेशिवाय होत नाहीं व राजसत्ता बहुधा कालधर्मयुगधर्मानुसारच असावयाची.

उत्तरकांडांत १२९।१; १३०।५-६; व १३० छंद व २ श्लोक पाहावेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।७ 卐 卐 卐

रामदास रामाहुनि मोठे

जे परमोत्तम भक्त असतात ते भगवंतापेक्षांही श्रेष्ठ असतात हा सिद्धान्त ' रामदास रामाहुनि मोठे ' या वचनानें उत्तरकांडांत भुशुंडीनें सांगितला आहे. (१२०।१६)

हा विश्वास मला प्रभु ! वाटे । *रामदास रामाहुनि मोठे* ॥
रामसिंधु धन सज्जन धीर । चंदनतरुहरि संत समीर ॥ (१२०।१६,१७)

रामसागर महान, अगाध, अपार, असला तरी मायारूपी क्षारानें त्याचें जल पितां येत नाहीं. तो सर्वांना सर्व देशांत सुलभ नाहीं, पार जाणें तर अशक्यवतच; पण अशा

सागराचेंच जल मेघ-घन वर्षतात व तें सर्वांना सर्व देशांत सुलभ असतें, तेंच प्राणिमात्राचें 'जीवन' आहे.

वर्षति रामसुयश वर वारी । मधुर मनोहर मंगलकारी ॥ (१।३६।४) व (१२०।१६–१७ गूढार्थ चंद्रिका पाहा.)

श्रीमद्भागवतांत अकराव्या स्कंदांत वसुदेवानें वरील अर्थाचाच सिद्धान्त सांगितला आहे. या सिद्धान्ताची प्रतीति मानसांत प्रत्येक सोपानांत मिळते; तथापि भरत आणि हनुमान या दोघांविषयींचे पुरावे सहज डोळ्यांत भरण्यासारखे आहेत.

भरत —(१) शृंगवेरपुरास गेल्यावर गंगापार जाण्यासाठीं नावाड्यास प्रार्थना, विनंत्या कराव्या लागल्या व त्याच्या अटी मान्य कराव्या लागल्या, तेव्हां राम पलीकडे जाऊं शकले. भरताच्या सेवेला शेंकडो नावा, तराफे, नवीन नावा, हात जोडून वाट पाहात आहेत. ससैन्य भरत प्रार्थना, विनंत्या न करतां पार गेले.

(२) भरद्वाज भरतास स्पष्टच सांगतात,

'आम्ही भरत असत्य न वदतों । उदासीन तापस वनिं वसतों ॥
सकल साधनां सुफल सुशोभन । लक्ष्मण राम नि सीता दर्शन ।
त्या फलास फल दर्शन तुमचें । **सर्वे प्रयागा सुभाग्य अमचें'** ॥(२।२१०।३-५)

(३) प्रयागाहून भरत यमुनेकडे जाण्यास निघाले तेव्हां,

बघुनि दशा सुर वर्षति फूल । मही मृदुल *पथ* मंगलमूल ॥ ८ ॥
दो. — करित जाति छाया जलद सुखद वहत वर वात ॥
पथ न होइ रामा तसा जैसा भरता जात ॥ (२१६।८ व दो. २१६)

(४) **पथिं जड चेतन जिव जे नाना । ज्यां बघती प्रभु दिसले ज्यांना ॥**
ते सब परमपदा अधिकारी *। भरत बघत गत भवरुज भारी* ॥ (२।२१७।१-२)

रामदर्शनानें मोक्षाचे अधिकारी बनले फक्त; पण भरतदर्शनानें त्यांचा भारी भवरोगच गेला! (टीका पाहा.)

(५) श्रीरघुवीराची सत्यसंधता मानसांतील भरताच्या सेवकभावानेंच राखली; नाहींतर भरत सांगेल तें करण्यास रघूत्तम वचनबद्ध झालेच होते.

(६) **भरत महामहिमा जलराशी । मुनिमति उभी तटीं अबलासी** ॥ (२।२५७।२) भरताचा महिमारूपी महासागर असा आहे कीं वसिष्ठमुनींची मतिसुद्धां अबलेसारखी कुंठित झाली!

(७) मिथिलापति जनक विदेहाची मतिसुद्धां भरतमहिमा जाणण्यांत कुंठित झाली आहे. (२८८।४-५)

(८) जनकराज म्हणतात,

'अमित *भरतमहिमा* **श्रुणु राणी !** । *जाणाति राम, न वदवें वाणी*,' ॥ (२८९।२)

(९) भरत चित्रकूट-यात्रेस (प्रदक्षिणेस) निघाले तेव्हां,

'मृदु चरणीं अनवाणीं चालत । महि मृदु होइ मनीं संकोचत ॥
कुश कटक कंकर कटु कुहिली । कुसळ कठोर कुवस्तु लपविली ॥
महिमृदुमंजुल मति करितसे । विविध वायु सुखदायि वहतसे ॥
सुर सुम वर्षुनि, घन छायेनें । तरु फुलफळें, तृणें मृदुतेनें ॥
मृग निरखुनि खग सुंदर बोलुनि । सेविति सब रामप्रिय जाणुनि ॥ (३११।४-८)

श्रीराम चित्रकूटावर फिरत असतां अशी अनुकूलता त्यांस लाभली नाहीं !

वरील नऊ उदाहरणांनीं हेंच दाखविलें कीं रामदास रामाहुनि मोठे म्हणूनच अयोध्याकांडांत शेवटीं म्हणतात,

' लक्ष्मण राम सिता वनिं वसती । भवनीं भरत तपे तनु कसती ॥ २ ॥
बघुनि उभय-दिशीं *वदति सर्वजन । भरत किं सर्वपरीं स्तुतिभाजन* ॥ ३ ॥

वि. ल. ठे. — तथापि हें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे कीं **' राम करूं इच्छिति तें** घडतें. ' भरताचा महिमा वाढविण्यासाठीं प्रभूंनींच सर्वांना प्रेरणा दिली आहे, व आपल्याकडे कमीपणा घेण्यासाठीं त्यांनीं स्वतःच सरिता, भूमि इत्यादींची मति मोहित केली आहे म्हणून *अयोध्याकांडांत* त्यांनीं प्रभूचा मार्ग सुखकर केला नाहीं; हें रहस्य २।१०१।३-५ च्या टीकेंत पाहावें. अरण्यकांडांत —

सरिता वन गिरि घाटहि अवघड । पति जाणुनि देतात वाट धड ॥इ.(३।७-४—५पाहा.)

हनुमान — (१) सुंदरकांडांत हनुमान सागरलंघनास निघाले तेव्हां कोणीहि न सांगतां सागरानें, रामदूत जाणून त्याला मदत करण्यासाठीं मैनाकास विनंति केली; पण,

रघुपति, रघुवीर स्वतः अन्नपाणी वर्ज्य करून सागरतीरावर कुश पसरून प्रार्थना करीत तीन अहोरात्र धरणें धरून बसले तरी सागरानें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं ! (५।५१।६-७ पाहा.)

विनति जलधि जड मानिना जरि गेले दिन तीन ॥ (५।५७।--)

(क) ' रामदास रामाहुनि मोठे ' हें अशा प्रकारें येथें सिद्ध झालें; परंतु सागरानें हें जें केलें तें प्रभूंनीं त्याची मति मोहित करून त्यास तशी बुद्धि दिल्यामुळेंच केलें. ' प्रेरकहृदीं रघुवंशविभूषण ' हेंच खरें आहे. (५।५१।५ – ५२।२ टीका पाहा.)

(२) या सुन्दरकांडांतच मेघनादानें हनुमंतास नागपाशबद्ध केलें; पण त्या नागपाश–बंधनांतून कपिश्रेष्ठ स्वतःच लीलेनें सुटला; गरुडास धाडावें लागलें नाहीं. पण लंकाकांडांत मेघनादानें रघुवीरास नागपाशबद्ध केल्यावर गरुडास धाडावें लागलें. देवर्षीनें गरुडास पाठविलें व ' खगपति सगळे खाई मायानागवरूथ ' (६।७४ रा) यानेंहि ' रामदास रामाहुनि मोठे ' हें ठरलें.

(३) लंकाकांडारंभीं (मानसांत) जो सेतु बांधला तो बांधण्यांत अगणित वानरसेना चार अहोरात्र श्रम करीत राहिली तेव्हां रघुपति व कपिकटकें यांना

पलीकडे जाण्याचा मार्ग तयार झाला; पण रामदूत वायुसुत त्या सागरावरून रामबाणासारखा सहज गेला उड्डाण करून !

(४) ' **श्रुणु सुत अनृण तुझा मी नाहीं** ' (५।३२।७) तुझ्या ऋणांतून मला सुटतां येत नाहीं असें राम हनुमंतास म्हणाले आहेत.

(५) भरद्वाजांनीं ज्या भरतास रामाहून मोठा ठरविलें तो भरत हनुमंताच्या ऋणांतून मुक्त होऊं शकला नाहीं ! ' येइ न तव ऋण मला फेडतां ' (७।२।४) असें भरत हनुमंतास म्हणाले.

किष्किंधाकांडांत — श्रीरघुवीर प्रयाण करून लंकेकडे निघाले तेव्हां त्यांस एका क्षणांत सागरतीरावर पोचतां आलें नाहीं; सर्वच मार्ग आक्रमण करावा लागला. परंतु रामदूतांस विवरांत तपस्विनी स्वयंप्रभा भेटली व तिनें सर्वांना निमिषार्धांत सागरतीरावर पोचविलें; याप्रमाणें ते अंगदादि **रामदूत रामाहून मोठे ठरले.**

लंकाकांडांत – अंगद — या कांडांत कौतुक शब्द १६ वेळां वापरला आहे; त्यांत श्रीरघुवीरानें व इतरांनीं केलेलें कौतुक = *आश्चर्य* वर्णिलें आहे, त्यांतच वालितनयानें केलेल्या कौतुकालाच फक्त *अति कौतुक* म्हटलें आहे व त्यानें रामदूत अंगदाची रामाहून श्रेष्ठता दर्शविली आहे. इतर १५ ठिकाणीं एकदांही ' *अति कौतुक* ' नाहीं.

कौतुक करवुनि सेतु सिंधुवरि । प्रभु आले, ऐके मंदोदरि ' (६।६।२)
वालितनय ! *कौतुक अति*, मजला । तात सत्य वद विचारुं तुजला ॥
यातुधान–कुलतिलक रावणा । भुजबल अतुल अशी जगीं गणना ॥
तन्मुकुटां तुम्हि चार फेकले । सांगा तात कसे सांपडले ॥ (६।३८।५-७)

अंगदाला रावणाचे चार मुकुट मिळून त्यानें रावणसभेंतून ते रघुपतीकडे झुगारणें हें रघुपतीनें सागरावर सेतु बांधविण्यापेक्षां मोठें आश्चर्य आहे. शिवाय *सागरसेतुबंधन आश्चर्यकारक वाटलें इतरांना आणि अंगदाचें हें कार्य अति आश्चर्यकारक वाटलें तें सेतु बांधविणाऱ्या श्रीरामासच !*

पुढें रामचंद्रास अति कौतुकी, परम कौतुकी असें दोनदां म्हटलें आहे पण तेथें कौतुकी म्हणजे लीलाप्रिय, खेळाडू, असा अर्थ आहे.

ल. ठे. — अनुवादांत ' अति कौतुक ' न म्हणतां ' अति अद्भुत ' शब्द घातले गेले असते तर श्रीगोस्वामीजींनीं योजिलेला भावार्थ व गूढ ध्वनि सुरक्षित राहिला असता काय ? व त्यांना अपेक्षित असलेला भाव अनुवादांतून प्रगट करतां आला असता काय ?

उत्तरकाण्डांत — वसिष्ठ रामदास आहेत हें फक्त उत्तरकाण्डांतच प्रगट केलें आहे. अयोध्या व उत्तरकांडपूर्वार्ध यांत वसिष्ठ रामाहून मोठे हें दाखविलें आहे.

राम कृपाब्धि कांहिं *मम विनती* । ऐका; मुनि कर जोडुनि म्हणती ॥ (७।४८।३)
' नाथ ! एक वर मागतों राम ! कृपेनें द्याहि ।

प्रतिजन्मीं *प्रभुपदकमल*-स्नेह न घटो कदाहि ' ॥ ४९॥

वसिष्ठांनीं येथेंच दास्यभाव प्रगट केला आहे. समग्र रामायणांत असें कुठेंच केलेलें नाहीं. रामच त्यांना हात जोडून, पायांवर डोकें ठेवून वंदन करीत व आज्ञापालन करीत असत. रामदास रामाहुनि मोठे हें वसिष्ठांच्या बाबतींत येथें प्रगट झालें.

अरण्यकाण्डांत—लक्ष्मणाची श्रेष्ठता रघुनाथानें आपल्या शब्दांनींच दाखविली आहे.

तात *वसंता बघ शोभामय* । प्रियाहीन मी, *मज उपजवि भय* ॥
विरह–विकल बलहीन मज अति एकल पाहून ।
सहित विपिन मधुकर खग मदन येइ चालून ॥ ३७ रा ॥

शोभामय वसंत पाहा असें लक्ष्मणास सांगितलें व त्याच वसंताला पाहून प्रियाहीन असल्यामुळें रघुनाथास भय वाटलें व विरहव्याकुल झाले. लक्ष्मणसुद्धां त्या वेळीं प्रियाविहीनच होता, पण त्यास भय वाटलें नाहीं किंवा विरहव्याकुळता नाहीं; उलट श्रीरघुनाथ सांगतात कीं कामदूत तुला पाहून घाबरला आणि कामदेव हल्ला न करतां तळ देऊन बसला आहे.

बघुनि बंधुसह दूत त्या सांगे; ऐकुनि मात ।
कटका थोपवि देइ तळ कामदेव कीं तात ॥ ३७ म ॥

शेवटीं स्पष्ट सांगितलें कीं,

लक्ष्मण! कामचमूला बघती । राहति धीर जगीं तन्महती ॥ (३८।११)

कामचमूला पाहून रघुनाथ भिऊन व्याकुळ झाले; पण लक्ष्मण प्रियाहीन असूनसुद्धां धीर गंभीर राहिला ! लक्ष्मण रामाहून मोठे ठरले. लक्ष्मणाची ही महती दाखविण्यासाठींच प्रभूंनीं हें नाट्य केलें आहे.

बालकांडांत — लक्ष्मणाला जनकपुरी दाखविण्यासाठीं गेले असतां —

बघुनि कौतुका निघति गुरुकडे । उशिर जाहला *भीति मनिं पडे* ॥
भीतिस भिववी धाक जयाचा । तो *प्रभाव* दाखवि *भजनाचा* ॥ (१।१२५।६-७)

विश्वामित्राची दास्यभावना मानसांत ११२ ठिकाणीं प्रगट झालेली दिसते —

तैं मुनिवर मनिं करिति विचारा । *प्रभु* अवतीर्ण हरण महिभारा ॥
याच मिषें जाउनि *पद बघतों* । विनति करुनि दो बंधु आणतों ॥
ज्ञान-विराग–सकल–गुण–अयना । *प्रभुस बघेन* भरुनि मी नयनां ॥

यांतील '*प्रभु*' आणि '*पद*' या दोन शब्दांनीं दास्यभावना प्रगट होते. 'रामदास विश्वामित्र हे रामाहून मोठे' हें याप्रमाणें दाखविलें गेलें.

याप्रमाणें साती सोपानांत 'रामदास रामाहुनि मोठे' असलेले आहेत. यांच्या खालोखाल असलेले प्र. प्र. १३।७ 'महती दासां सदा देतसां' यांत दिसतील.

असा जो आपल्या भक्तांस आपल्यापेक्षां मोठा बनविणारा देव त्याची प्राप्ति होण्यास कित्येक वेळां प्रापंचिक-ऐहिक-धर्माचा त्यागसुद्धां करावा असें एका मराठी

संताचें वचन आहे. त्या वचनाची प्रतीति मानसांत भरपूर मिळते हें पुढील प्रकरणांत दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।८ 卐 卐 卐

देव जोडे तरी करावा अधर्म

या संतवचनाची प्रतीति मानसांत सर्व सोपानांत मिळते. उपनिषदांतसुद्धां असेंच म्हटलें आहे.

श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यम् एतद् तौ संपरीत्य विविनक्ति धीरः ।
श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसः वृणीते । प्रेयः मन्दः योगक्षेमाद् वृणीते ॥

(कठ. १।२।२)

सारं हें कीं जेथें प्रेयस् म्हणजे ऐहिक किंवा स्वर्गभोगादिक अभ्युदय श्रेयाच्या म्हणजे परमार्थाच्या आड येत असेल तेथें धीर असतात ते प्रेयाचा त्याग करून श्रेयच मिळवितात. विवाह-समयींच्या प्रतिज्ञेंतसुद्धां हेंच तत्त्व संभाळलें आहे. ‘ मोक्षे नातिचरिष्ये ’ असें म्हटलें जात नाहीं ‘ आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ’ यांतसुद्धां हेंच सार आहे.

निःश्रेयसाची हानि करून अभ्युदयप्राप्ति करणें हा धर्मच नव्हे. अभ्युदय व निःश्रेयस् हीं दोन्हीं साधणें हा उत्तम पक्ष; पण तें शक्य नसेल तर निःश्रेयसासाठीं अभ्युदयाचा त्यागच योग्य. आतां मानसांतील कांहीं ठळक उदाहरणें काण्डशः पाहूं.

बालकाण्ड – सतीचा त्याग — (५६।७ – ५७।५)

सीतावेष सतीनें धरला । शिवहृदिं खेद विशेषचि भरला ॥ ७ ॥
जर करुं अतां सतीशीं प्रीती । भग्न भक्तिपथ होइ अनीती ॥ ८ ॥

दो.—**परम पुनीत न टाकवे प्रेम करिन अति पाप ।**
प्रगट महेश न जरि वदति हृदयिं अधिक संताप ॥ १।५६ ॥

तैं प्रभुपदिं शंकर शिर नमती । स्मरत राम मनिं विचार उठती ॥ १ ॥
सतीभेट या तनुनें नाहीं । चित्तिं करिति शिव संकल्पाही ॥ २ ॥
शंकर ठरवुनि असें धीर-मति । स्मरत रघुविरा निघति गृहाप्रति ॥ ३ ॥
जातां होइ गिरा नभिं सुंदर । जय महेश कृत भक्ति दृढा वर ॥ ४ ॥
अन्य असा पण कोणि न कर्ता । रामभक्त भगवंत समर्था ! ॥ (५७।५)

सतीनें शंकरांशीं कपट केलें, असत्य बोलली, त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवला नाहीं; तरीसुद्धां ती खरी सती असल्यानें व हरिमायेनें तिच्याकडून असत्य वदविलें असल्यानें ती निष्पाप आहे. पण ती सीता बनली, आपल्या उपास्याची अर्धांगी बनली त्यामुळें तिच्याशीं संबंध ठेवणें, पत्नीभावनेनें प्रेम करणें, अति पाप होय.

(**क**) ती निष्पाप असल्यानें तिचा त्याग करणें हा पतिधर्म नव्हे. असें धर्मसंकट उत्पन्न झालें; तेव्हां भक्तिमार्गसंरक्षण करण्यासाठीं, भक्तिमार्गांतील अनीति व अधर्म टाळण्यासाठीं शंकरांनीं पतिधर्माचा त्याग केला व *भक्तिधर्माचें-परमधर्माचें-संरक्षण* केलें.

सूचना — शंकरांच्या या कृतीविषयीं ज्यांना आक्षेप घ्यावेसे वाटतील त्यांनीं प्रथम गूढार्थचंद्रिका पाहावी. शंकरांनीं केलेल्या गोष्टीस अयोग्य किंवा निंद्य ठरविणें शं—कर होणार नाहीं.

२. विश्वामित्र (राजाकडे याचना) — त्यागी, तपस्वी, तेजोनिधि ब्राह्मणानें क्षत्रिय राजाकडे याचना करणें निषिद्ध आहे. असें करणें म्हणजे अपमानाचें पात्र बनण्यासारखें आहे; पण विश्वामित्रांनीं तेंच केलें.

तृणादपि लघुस्तूलः । तूलादपि च याचकः ।
वायुना किं न नीतोऽसौ । मामयं याचयेदिति ॥ (सुभा. रत्ना.)

हें माहीत असून व विश्वामित्र महामुनि असून त्यांनीं सामाजिक व वैयक्तिक धर्माचा त्याग केला.

असुर-समूह सतावति मजसी। आलों याचुं कांहिं नृप तुजसी ॥ (२०७।९)

इत्यादि याचना केल्याचा परिणाम असा झाला कीं, दशरथ म्हणाले, 'विप्र ! वचन वदलां न विचारीं । ' (२०८।२) ' अहो विप्र ! आपण विचार करून बोललां नाहींत.' ' अविचारी विप्र ' ही पदवी प्रथम पदरांत पडली ! पण,

सन्माना याचकें इच्छिणें । तें गगनाचें दूध काढणें ॥

हें शांतपणें सहन करणें भागच होतें. श्रीराम भगवान परमात्मा आहेत हें त्यांनीं जाणलें होतें, म्हणून भगवत्प्राप्तीसाठीं त्यांनीं थोडा वेळ लौकिक स्वधर्माचा त्याग केला.

अयोध्याकांड—(१) लक्ष्मण –माता, पिता, गुरु व जिनें कोणताच दोष, पाप, चूक इत्यादि कांहीं केलें नव्हतें अशी सुंदर सुशील पतिव्रता स्त्री इत्यादि सर्वांचा त्याग लक्ष्मणानें केला. दशरथ वृद्ध व पुत्रशोकानें मरणाच्या मार्गास लागलेले; भरत-शत्रुघ्न अयोध्येंत नाहींत; प्रजेचें व नगरीचें संरक्षण करण्यास कोणी नाहीं, अशी स्थिति असतां; व ही सर्व परिस्थिति रघुनाथानें लक्ष्मणापुढें मांडली असतां लक्ष्मण अति व्याकुळ झाला; वनांत जातांना तो उर्मिलेला भेटण्याससुद्धां गेला नाहीं, याचें कारण ' देव जोडे तरि करावा अधर्म ' हेंच. रामसेवा व रामसंगतीचा लाभ मिळविणें हाच मानवाचा उत्तमोत्तम धर्म, हेंच मानवाचें मुख्य कर्तव्य ! उर्मिलेकडे न जाण्याचें कारण अध्यात्मपर आहे. टीका पाहा.

(**२**) भरतानें कैकयीचा-जननीचा-अधिक्षेप केला व तिचा त्याग केला त्यांत हाच हेतु आहे. प्रह्लादानें पित्याचा, बिभीषणानें भावाचा, भरतानें जननीचा व व्रजवनितांनीं पतीचा त्याग केला तो भगवत्प्राप्तीसाठींच.

तजो पिता प्रह्लाद, बिभीषन बंधु, भरत महतारी (जननी) ।

बालि गुरु तजो, कन्त ब्रज वनितन्हि भए मुद मंगलकारी ॥ (वि. प. १७४।२)

(३) भरतानें तीर्थराजाजवळ भीक मागितली *हा अधर्म केला*. भीक मागणें हा राजाचा, क्षत्रियाचा धर्म नाहीं; त्यांतून एका राजानें दुसऱ्या राजाजवळ भीक मागणें हा मोठा अधर्म ! 'भीक मागुं सोडुनी स्वधर्मा ' (२०४।७) पण ही रामप्रेमभक्तीची भीक मागितली असल्यानें *वर्णधर्माचा थोडासा त्याग योग्य आहे.*

अरण्यकांड — (१) मानसांतील मारीच रामभक्त आहे. रामपत्नी हरण करण्याच्या कार्यांत त्यानें रावणास मनापासून साह्य केलें हा मोठा अधर्म केला; पण तो रामाच्या हातून मरून मुक्त होण्यासाठीं केला. म्हणून तो *अधर्म परमधर्मच ठरतो.* (३।२५ पासून दो. २६ पर्यंत पाहा.)

(२) *रावणानें सीताहरण केलें तें याच हेतूनें;* याविषयीं मानसांत स्पष्ट उल्लेख आहेत :

जाउनि वैर हठें तर करतों । प्रभुशरिं प्राण तजुनि भव तरतो ॥
भजन घडे ना तामस तनुनें । *मंत्रचि हा दृढ मन-वच-वपुनें* ॥ (२३।१-६ टीका पाहा.) '***मनिं पद नसुनी मानि सुखाला*** । ' (२८।१६ टीका पाहा.) पद्मपुराण, स्कंदपुराण, उपनिषद इत्यादींतील आधार गूढार्थचंद्रिकेंत दिसतील.

किष्किंधाकांड — सुग्रीवानें वालीला आह्वान दिल्यावर वाली क्रोधानें युद्धासाठीं धावला; तेव्हां तारेनें त्यास समजाविलें कीं,

' श्रुणु पति ! भेटति जे सुग्रीवा । ते युग बंधु तेजबल-शीवा ॥
कोसलेशसुत राम नि लक्ष्मण । जिंकुं शकति काळा रणिं तत्क्षण ॥ '

तेव्हां तो जें म्हणाला त्यांत त्याचें हृद्गत दिसतें—

' प्रिये भीरु ! तो म्हणे बघ समदर्शी रघुनाथ ।
मला कदाचित वधिति जरि तरि होईन सनाथ ॥ (४।७)

या त्याच्या वचनावरून स्पष्ट दिसतें कीं रघुनाथ भगवान असावेत असा संशय त्याला आला आहे, पण खात्री नाहीं; त्यामुळें तारेला अधिक स्पष्ट सांगणें शक्य नव्हतें; भगवान असले तर मोक्ष किंवा भक्ति मिळेल; नसले तर रघुनाथाच्या हातून मरण्यानें सद्गति मिळेल; अशा भावनेनें त्यानें पतिव्रता पत्नीचें सांगणें ऐकलें नाहीं *हा अधर्म केला*. वरील अनुमान पुढील वचनानें सत्य ठरतें.

घडिं घडिं बघुनि चित्त पदिं लावुनि । सुफल जन्म गणि *प्रभुस ओळखुनि* ॥ पूर्वी खात्री नव्हती हें यावरून ठरलें. रघुनाथाशीं विरोध केला तो वरील हेतूनेंच केला. त्यानें मरतांना रामप्रेमभक्तीच मागितली आहे ! (१० छंद पाहा)

सुन्दरकाण्ड—(१) मानसांतील सुन्दरकांडांतील रावण इतर रामायणांतील रावणापेक्षां पुष्कळच सज्जन आहे. अशोकवनांत त्यानें सीतेशीं जें वर्तन केलें त्यांत हेतु इतकाच आहे कीं सीतेचा छळ केला म्हणजे तिच्या प्रार्थनेमुळें तरी भगवान लवकर लंकेंत

येतील व आपला हेतु शीघ्र सिद्धीस जाईल. रावणास स्वप्न पडलें म्हणून तो अशोक-वाटिकेंत गेला हा *उल्लेख मानसांत नाहीं*. टीकेंत भरपूर ऊहापोह केला आहे.

(२) बिभीषणाला लंकेंतून बाहेर काढण्यासाठींच रावणानें त्यास लाथा मारल्या. तो विष्णुभक्त आहे हें त्यास तपश्चर्येच्या वेळेपासून माहीत होतें. बिभीषणानें कोणता वर मागितला हें रावणास ठाऊक होतेंच. रावण स्वतः विष्णुद्रोही बनला असून त्यानें बिभीषणासारख्या भक्तास हरिमंदिर बांधू दिलें, त्याच्या विष्णुभक्तींत विरोध केला नाहीं. बिभीषणाला हाकलून दिल्यानें पुलस्त्य वंशाचा उच्छेद वांचेल, लंकेंतील सर्व मर्म बिभीषणास माहीत असल्यानें तो त्यांस मदत करील हें जाणूनच लाथा मारल्या व त्या तपस्व्यांस जाऊन भेट व त्यांना नीति सांग असें म्हणाला. रावणानें बिभीषणास बंधुद्रोही वगैरे कांहीं दोष दिलेला नाहीं. टीकेंत विस्तार पाहावा.

लंकाकांड (१) अंगद शिष्टाईनंतर मंदोदरीनें रावणास उपदेश केला त्यांत तिनें आपल्या पत्नीधर्माचें व तदंगभूत ' कार्येषु मंत्री ' धर्माचें उल्लंघन केलें आहे. रावणास नीच, निर्लज्ज, पुरुषार्थहीन वगैरे म्हणाली हें अनुचित आहे. त्यापूर्वी तिनें तीन वेळां सौम्यपणें समजावून सांगितलें; पण त्यानें ऐकलें नाहीं म्हणून त्यानें रामभक्त बनून आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावें या हेतूनें ती चौथे वेळीं चंडिका बनली व शेवटचा उपाय करून पाहिला. (दो. ३५-३७)

(२) पुष्कळ दिवस युद्ध चालू आहे; राम शिरें व बाहू छाटीत खेळ खेळत आहेत, पण ठार मारीत नाहींत अशी रावणाची खात्री होतांच (दो. ९२-९३) *रावणानें पुन्हा अधर्म केला*; आणि राम क्रुद्ध होऊन लवकर ठार मारतील अशी युक्ति योजली. युद्ध न करणाऱ्या बिभीषणावर काळदंडासारखी घोर शक्ति सोडली. रघुनाथ शरणागतरक्षक आहेत हें रावण जाणत होता. रावणाचा हा डाव साधला आहे. रघुवीरानें लवकरच रावणाचा वध केला आहे.

उत्तरकांड — (१) स्वतः वसिष्ठच सांगतात,

' धंदा पौरोहित्य मंद अति । वेद पुराणें स्मृतीहि निंदति ॥
घेइ न तैं विधि वदले मजला । पुढें लाभ आहे सुत तुजला ॥
परमात्मा ब्रह्मच नर बनतिल । रघुकुल–भूषण भूपति होतिल ॥

दो. – **' तैं हृदिं विचार केला योगमखव्रतदान ।**
ज्यास्तव **करणें** *तो मिळे धर्म न या सम आन* ॥ (४८।६-४८)

ज्या **धर्मानें** भगवत्प्राप्ति **होईल तो सर्वांत उत्तम धर्म हें येथें स्पष्ट सांगितलें**. जो धर्म भगवत्प्राप्तीच्या आड येईल तो अधर्म समजून त्याचा त्याग करावा. ' देव जोडि तरि करावा अधर्म ' हें वसिष्ठवचनाधारेंच ठरलें. पुरोहिताचा निंद्य धंदा, ब्राह्मणाचा गर्हित धर्म स्वीकारल्यानें भगवत्प्राप्ति सहज सुलभ होणार हें ब्रह्मदेवाच्या वचनानें ठरल्यामुळें वसिष्ठांनीं त्या गर्हित धर्माचा स्वीकार केला.

याप्रमाणें स्वधर्माचरणानें व भक्तीनें किंवा थोडा अधर्म करून भक्तीनें किंवा सहज भगवंताच्या साकार स्वरूपाचें दर्शन झाल्यानें कोणास काय लाभ झाला किंवा कोणीं काय मिळविलें हें मानसांत पाहणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।९ 卐 卐 卐

कोणी काय मागितलें व मिळालें

श्रीरामचंद्रप्रभूचें सगुण साकार, मनुजरूपानें दर्शन झाल्यावर वर माग असें म्हटल्यावर किंवा म्हटलें नसतां मानसांत अनेकांनीं बहुधा भक्तीचीच याचना केली आहे. कांहीं अपवाद आहेतच; तथापि भक्ति याचनेंतसुद्धां वैचित्र्य आहे व तें त्या त्या याचनांचें अवलोकन केल्यानेंच ध्यानीं येऊं शकतें. म्हणून कांहीं याचना पुढें दिल्या आहेत व बाकीच्यांतील वैशिष्ट्य दाखविलें आहे.

बालकांड — (१) महेश व सती दक्षकुमारी — प्रत्यक्ष जाऊन भेटणें प्रभूच्या अवतार-कार्याच्या व इच्छेच्या दृष्टीनें अयोग्य वाटलें व म्हणून महेशांनीं —

‘ लोचनभर छविसिंधुस निरखुनि । भेटुं न जाती कुसमय जाणुनि ।।
जय सच्चिदानंद जगपावन **। चालति वदुनि मनोज–विनाशन ॥**
शिवपार्थि चालत जाति सह सती । घडिं घडिं कृपानिकेत पुलकती ॥(५०।२-४)

शंकरांनीं मनानेंसुद्धां कांहीं मागितलें नाहीं; पण जगाच्या कल्याणासाठीं गूढ प्रार्थना केली कीं जग पावन करण्यासाठीं आपल्या ऐश्वर्याचा उत्कर्ष प्रगट करा (= जय) ही घटना सीताहरणानंतरची आहे पण वर्णन बालकांडांत आहे.

(क) सतीलाहि त्याच वेळीं सहज **दर्शन घडलें; पण** तिला एक नृपपुत्रच वाटला व तिनें नमस्कारादि कांहीं केलें नाहीं; *तिला मुळींच आनंद झाला नाहीं !* **ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.**

(२) **सती** स्वतः रामचंद्राच्या अगदीं जवळ सीता बनून गेली; चांगली फजीति झाली, नंतर विश्वरूप दर्शन झालें; त्यांत जनकनन्दिनी पण दिसली; रघुनाथ भगवान आहेत हें पटलें, पण सतीनें क्षमा मागितली नाहीं किंवा इतर कांहींच मागितलें नाहीं आणि संशयनिवृत्ति पण पूर्ण झाली नाहीं ! असें कां ? **दर्शन झाल्यावर पूर्ण विश्वास बसणें व योग्य वर मागणें या गोष्टी प्रभुकृपेनें किंवा गुरुकृपेनेंच घडतात !**

(३) **नारदांनीं प्रार्थना केल्यावर** भगवान (नारायण) प्रगट झाले तेव्हां देवर्षि नारदांनीं काय मागितलें पाहा.

‘ द्यावें प्रभु मज निज रूपा या । ***अन्य उपाय न तिज पावाया ॥***
नाथ ! दास मी, ***जेणें हित मम*** **। होईल करणें तसें शीघ्रतम ॥** (१३२।६-७)

विश्वमोहिनीची प्राप्ति होणेंच नारदांस हितावह वाटलें ! **पूर्ण विश्वास, श्रद्धा, भक्ति, ज्ञान असून नारदांनीं *भलतेंच* मागितलें ! हरिइच्छा ! !**

(४) **विश्वमोहिनी – स्वयंवर मंडपांत —**

' नृपतनुधर तिथ कृपाल आले। मुद्रित कुमारि घालि जयमाले ।।

लक्ष्मीपति गत घेउनि नवरी ' (१३५।३-४)

' शेकडों राजांना व नारदांनासुद्धां भगवंताचें (रामरूपाचें) दर्शन झालें; पण भूपसमाजिं निराशा जवरी ' **कोणीं ओळखलेंच नाहीं !**

' *तुमच्या कृपें तुम्हां रघुनन्दन । जाणति भक्त* ' **हें वाल्मीकि वचनच खरें !**

(५) **क्षीरसागराच्या मार्गावर** भगवान नारदास भेटले; पण भगवान आहेत हें ओळखूनसुद्धां नारदानें त्यांची *निंदा केली व शाप दिले.* ज्ञानी, निर्मोह भक्त नारदानें हें केलें ! '*म्हणाति मदिच्छा दीनदयाळू;*' **' हरिइच्छा भावी बलवान् अति, ' हें शिववचनच खरें !**

सतीपासून हीं चार प्रकारचीं उदाहरणें मानसांत आरंभींच देऊन एक बाजू दाखविली.

(६) **मनुशतरूपा-आख्यानांत** *वर मागा* अशी आकाशवाणी झाल्यावर सगुण साकार रूपाचें दर्शन द्या असा वर मागितला. प्रगट झाल्यावर 'वर माग ' असें पुन्हां सांगितलें तेव्हां ' इच्छीं तुम्हांसमान सुत ... ' (१।१४९) असा वर मागितला ! मनुराजा अपुत्र नव्हते; ज्येष्ठ पुत्राला त्याची इच्छा नसतां साम्राज्य दिलें आणि हरिप्राप्तीसाठीं घोर तप केलें; ब्रह्मा, विष्णु, महेशांनीं अनेक वेळां दर्शन देऊन वर मागा म्हणून सांगितलें तरी ज्यांनीं कांहीं मागितलें नव्हतें, **ज्यांस भगवद्दर्शनाशिवाय कसलीहि वासना नव्हती त्यांस त्यांच्या इच्छेप्रमाणें दर्शन झाल्यावर त्यांनीं हा वर मागितला. ' प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण ', ' हरिइच्छा ' हेंच खरें** कारण आहे *अवतारलीला करण्यासाठीं ही प्रेरणा प्रभूंनींच दिली.* (गूढार्थचंद्रिका पाहा).

(७) ' देवि रुचे जो तुजसि माग वर । ' असें प्रभु शतरूपेला म्हणाले, तेव्हां नृपाच्या मागण्यांतील न्यूनता पूर्ण करण्याच्या बुद्धीनें शतरूपेनें मागितलें कीं,

' जे निज भक्त नाथ तव असती । जें सुख पावति जी गति लभती ।।

दो. — **तें सुख ती गति भक्ति ती निजपदिं त्या स्नेहास ।।**

तो विवेक ती राहणी *द्या* प्रभु ! कृपें *अम्हांस* ' ।। १५० ।।

ज्ञान, भक्ति, परवैराग्य इत्यादि परमार्थांतील सर्व गोष्टी ' द्या अम्हांस ' म्हणून दोघांच्यासाठीं मागितल्या पण, 'तुम्हीं जें मागितलें तें मीं दिलें' असें न म्हणतां

' *जी रुचि तुमच्या मनांत* **कांहीं । दिली सकल मीं संशय नाहीं ।।**

ज्ञान **अलौकिक** *तुझें* **न मातें ! । कधिं मदनुग्रहिं जाइ लयातें ।।** '

असें भगवान म्हणाले. ' तुमच्या मनांत जी रुचि असेल ती ' व ' तुझें ज्ञान कधीं लयातें

न जाइ ' यांतील भेदानें ठरविलें कीं दोघांची रुचि भिन्न आहे, हें प्रभु जाणतात; व पुत्र परमात्मा आहे हें मनूचें ज्ञान लयास जाईल; तुझें माझ्या अनुग्रहानें लयास जाणार नाहीं. हें असें प्रभु म्हणाले मात्र तोंच —

चरणिं नमुनि मनु पुनरपि वदती । 'प्रभु मम अपर असे कीं विनती ॥ ४ ॥
सुत विषयिक रति असो तव पदीं । मूढ म्हणे ना मज कुणि अगदीं ' ॥ ५ ॥

हें असें मुद्दाम मागण्याची इच्छा मनूला झाली त्यास कारणसुद्धां भगवंताची इच्छाच ! प्रभूनीं असें कां करविलें हें सांगणें विस्तारभयास्तव येथें नको. (टीका पाहा.)

ब्रह्मदेवानें स्तुति केल्यावर त्यांस प्रत्यक्ष दर्शन नाहीं.

(८) कौसल्येचें पूर्वजन्म-ज्ञान जागृत करून तिचें ज्ञान शिल्लक ठेवावयाचें होतें म्हणून प्रसूतिगृहांत प्रथम शिशु रूपानें प्रगट न होतां प्रौढ रूपानें प्रगट झाले; पण तिच्या ठिकाणीं पुत्रवात्सल्य उत्पन्न होत नाहीं असें पाहून व बाललीला करण्याची हौस असल्यानें आपल्या हास्यरूपी मायेनें तिचें ऐश्वर्यज्ञान दाबून टाकून माधुर्यभावना —पुत्रभावना तिच्या ठिकाणीं उत्पन्न केली. तेव्हां ' शिशु व्हा ' असें तिनें सांगितलें. **येथेंहि हरि इच्छा व हरिप्रेरणाच कारण झाली.** (१।१९२ छं ३,४ टीका पाहा.)

(९) दशरथ, राण्या, दासी व अयोध्यावासी वनिता—पुत्र जन्मल्याचें ऐकल्यावर एक क्षणभरच दशरथांचें पूर्वजन्मज्ञान जागृत झालें; पण पूर्व जन्मांतील मागणी-प्रमाणें तें तत्काळ लयास गेलें. राण्या, दासी व नगरनारी यांना बालप्रभूचें दर्शन झालें पण कोणासहि ओळखतां आले नाहींत. ' **तो जाणें ज्या जाणूं देती हेंच खरें.** पुत्र जन्माचे व्यवहार सुरू झाले. भगवान आल्यावर केले जाणारे व्यवहार झाले नाहींत ! फक्त वसिष्ठांस ओळख पटली, पण दर्शन होऊनसुद्धां वंदन, प्रार्थना, याचना इत्यादि व्यवहार त्यांनाहि अशक्य ! ' **राम करूं इच्छिति तें घडतें ' हें यथार्थ ठरलें.** पुढेंसुद्धां हीच गोष्ट !

(१०) **कौसल्येला विश्वरूपदर्शन —** (२०१–२०२) श्रीराम कौसल्येपुढें अवतीर्ण झाल्याबरोबर तिचें ज्ञान पूर्वजन्मांतील वर-सामर्थ्यानें जागृत झालें होतें पण तें प्रभूनीं स्वतःच्या इच्छेनें त्या वेळीं दाबून टाकलें होतें. तें ज्ञान प्रगट करण्यासाठीं कौसल्येला विश्वरूप दाखविलें; तेव्हां तिनें,

' प्रभु न अतां कधिं लागो तव माया मजलाहि ॥ २०२ ॥

असें मागणें मागितलें; पण प्रभूनीं तिला बजावलें कीं,

' अब गोष्ट कोठें न वदावी । ' (२०२।८)

(क) कौसल्येचें ज्ञान दशरथांसारखेंच लुप्त झालें असतें तर (१) पूर्वजन्मांतला वर खोटा ठरला असता. (२) वनवासाचे वेळीं रामविरहानें तिचे प्राण राहिले नसते, व भरत पोरका पडला असता. त्याच्यावर जननीप्रमाणें प्रेम करून धीर देणारी मुख्य व्यक्ति राहिली नसती. त्या दोघांच्या मागील जन्मांतच त्यांच्याकडून

आपल्या इच्छेप्रमाणें वर मागवूनही सर्व व्यवस्था पांच मन्वंतरें व २४ महायुगांपूर्वी करून ठेवली होती !

(ख) *रामावतार प्रगट झाल्यावर* मनुष्यदेहाचें पूर्ण सार्थक होईल असा वर *प्रथम मागून घेतला कौसल्येनें; म्हणजेच परिपूर्ण कल्याणकारी वर मागणारी पहिली व्यक्ति एक स्त्रीच !* त्यानंतर ताटकेनें प्रभु ओळखले नाहींत तरी तिला निजपद दिलें; म्हणजे दुसरी स्त्रीच, एक घोर राक्षसा ! वर मागून घेऊन जन्मसार्थक करणारी दुसरी व्यक्तिसुद्धां स्त्रीच, अहल्या !

(११) **विश्वामित्र** — श्रीराम परमात्मा आहेत हें ज्ञान व विश्वास श्रद्धापूर्ण असून अवताररहस्य गुप्त ठेवणें *आवश्यक असल्यानें* व 'रामगुरु' हा अधिकार स्वीकारल्यानें विश्वामित्रांनीं कोणताही वर मागितला नाहीं किंवा स्तुति केली नाहीं !

(क) **वसिष्ठांची परिस्थिति** अशीच असून *मानसांतील* वसिष्ठांनीं अगदीं शेवटीं संधि साधून स्तुति करून वर मागितला आहे.

(१२) **मारीचाला** बोथट बाणानें उडवून दिल्यावर, *राम भगवान आहेत हें त्यानें जाणलें आहे.* हें अरण्यकाण्डांत मारीचरावणसंवादांत उघड केलें आहे.

तो वदला ' ऐका दशकंधर ! । ते नररूप चराचर ईश्वर '

(३।२५।३– दो. २५ पाहा.) या ज्ञानाचा लाभ त्यानें अरण्यकांडांत घेतला हें मागील प्रकरणांत दाखविलें आहे.

(१३) **अहल्या** — (२११ छं. १–४) अति पापिणी अहल्येचा उद्धार करतांना तिला दर्शन दिलें व तीं *प्रभूला ओळखूं शकली;* पण विश्वामित्राश्रमांतील शेकडों मुनींना रामदर्शन आणि संगति यांचा लाभ कित्येक दिवस होऊनसुद्धां एकालाहि ओळख पटली नाहीं; ' तो जाणे ज्या जाणूं देती ' हा नियम आतांपर्यंत अनुभविला; यावरून ठरलें कीं अहल्यवर कृपा केली म्हणून ती जाणूं शकली.

' तुमच्या कृपें तुम्हां रघुनंदन । जाणति भक्त '

रामावतारांत जन्माचें सार्थक करणारा वर मागणारांत दुसरा क्रमांक एका पापिणी स्त्रीचा !

(१४) **जनकराजा** — आमराईंत प्रथम दर्शन झाल्याबरोबर ओळख पटली नाहीं; पण हळूहळूं वाटूं लागलें कीं हे परमात्मा असावेत; जेव्हां त्यांनीं विश्वामित्रांस विचारलें तेव्हां त्यांनीं सूचक उत्तर दिलें कीं,

' नृप तुमचें वच नव्हे अलीक ॥ हे प्रिय सर्वां जितके प्राणी ' ॥

परंतु इतकें रहस्योद्‌घाटनसुद्धां रघुनाथास बरें वाटलें नाहीं; त्यांनीं लगेच मनांत स्मित करून मुनीची बुद्धि फिरवली. लगेच परिणाम पाहा — विश्वामित्र म्हणाले,

' हे रघुकुलमणि-दशरथ आत्मज। धाडि भूप ममहिता सवें मज । ' (२१६।६-८)

सार हें कीं जनकराजाबरोबर असलेल्या मंडळींस अवताररहस्यज्ञान होऊं नये अशी

व्यवस्था प्रभूंनीं केली, फक्त जनकराजासच मर्म समजलें. ‘तो जाणे ज्या जाणूं देती।’ जनकानें **या वेळीं स्तुति, याचना केली नाहीं ही रामाचीच इच्छा!**

(१५) नगरदर्शनाच्या वेळीं जनकपुरवासी लोकांना परमानंद झाला व नेत्रसफलता झाली असें वाटलें; पण भगवान आहेत हें कोणाला कळलें नाहीं. असें नेत्रसाफल्य आणि दर्शनानंद विश्वामित्राश्रमांतील मुनींनासुद्धां नाहीं! यावरून हें ठरलें कीं न **जाणतांच रूपदर्शनानें आनंद व नेत्रसफलता होणें हेंसुद्धां श्रीरामाच्या इच्छेवरच!** म्हणूनच आधीं विश्वामित्रांनीं सूचना दिली होती कीं,

‘करा सुफल जननेत्र सब सुंदर मुख दावून ॥’ (२१८)

कोणाच्या नेत्रांची सुफलता व्हावी अशी इच्छा प्रभूला झाली तरच दर्शनानंद मिळून नेत्रसाफल्य झाल्याचा अनुभव येणार!

(१६) **धनुर्यज्ञमंडपांतील राजे** — येथें हजारों राजे जमले होते, पण रामलक्ष्मण-दर्शनानें आनंद व नेत्रसाफल्य फारच थोड्यांस लाभलें. ‘नयनानंद दान जे दाते’ (५।४५।२) असें म्हटलें तें एवढ्याचसाठीं; दात्यानें दिलें, त्याची इच्छा असली तरच मिळणार!

(१७) **परशुराम** — (२६९–२८५) भृगुपति स्वतः भगवदवतार! त्यांना राम-दर्शनानें आनंद झाला पण राम-ब्रह्म-परमात्मा आहेत हें तेहि ओळखूं शकले नाहींत! यांनीं तर जनकराजा व श्रीरामलक्ष्मण यांचा खूप अपमान केला व दोघां बंधूंना ठार मारण्यास प्रवृत्त झाले. प्रभूंनीं कृपा केली तेव्हांच जाणूं शकले; मग दोघांची स्तुति केली आणि मागितलें काय तर ‘क्षमा, क्षमामंदिर दो भ्राते.’ भक्ति किंवा मायामुक्ति मागितली नाहीं! भृगुपति = परशुराम भगवदवतार असून त्यांची ही स्थिति! ‘मग इतर पामर नरकथा ती काय, चित्तिं विचारणें.

(१८) **जनकराणी सुनयना** — राम परमात्मा आहेत हें तिनें जाणलें होतें, प्रार्थना केली आणि सासू असून भक्तिप्रेमानें पाय धरले, पण प्रेमातिशयानें कांहीं मागतां आलें नाहीं;

वदुनि राणि पद धरून राही। प्रेमपंकिं जणुं मग्न गिरा ही ॥ (३३६–३३७।१)

(१९) **जनकराजा** — (३४१।३–३४२।५) परशुरामस्तुतीनें खात्री झाली कीं राम परमात्मा आहेत. विवाह उरकून श्रीराम दशरथांबरोबर अयोध्येस जाण्यास निघाले असतां जनकराजांनीं रामचंद्रांची स्तुति सर्वांच्या देखत केली व शेवटीं मागणें मागितलें कीं,

‘घडिं घडिं मागतसें कर जोडुनि। चुकुन न मन जावो पद सोडुनि॥’

पण ते रामचंद्रांस भेटले नाहींत किंवा नमस्कार नाहीं व आशीर्वादहि नाहीं. बोलवत नाहींसें झालें होतें असेंहि नाहीं, अशी द्विधा वृत्ति होण्याचें कारण रामेच्छाच. नमस्कार करावा तर आपण सासरे, राम जांवई हा व्यवहार आड आला. आशीर्वाद द्यावा तर

परमात्मा आहेत ही भावना प्रबल आहे. **व्यवहारमर्यादा भंग सर्वांदेखत होऊं नये ही रामेच्छा कारण झाली ! रामावतारांत जन्मसाफल्य करणारा वर मागणाऱ्या पुरुषांमध्यें जनकराज विदेह पहिले ! आणि अनुक्रमांत तिसरे.**

येथें बालकांडांतील मुख्य उदाहरणें संपलीं. इतर कांडांतील प्रसंगांचें अवलोकन या दृष्टीनें वाचक आतां करूं शकतील व त्यांत हेच सिद्धान्त आढळतील.

मागण्यांतील कांहीं स्मरणीय वैशिष्ट्यें :—

१ **न मागतां भक्ति दिली** फक्त शृंगवेरपुरच्या नावाड्याला.

२ **सत्संगासह भक्ति मागितली** फक्त अगस्तिमुनि आणि शंभु (उत्तरकांडांतील स्तुतींत).

३ **दीन विषयी जनांसाठीं मागणें मागितलें** फक्त उत्तरकाण्डांत शंभूनीं; आणि उज्जयिनींतील शिवभक्त विप्रगुरूनें महेशशापित आपल्या शूद्रशिष्याला क्षमा करून त्याचें कल्याण करण्याबद्दल शंकरांजवळ.

४ **रामरूप** आणि **रामनामप्रीति मागितली** श्रीगोस्वामींनीं ग्रंथाच्या उपसंहारांत.

५ **रामलक्ष्मण या दोघांची स्तुति** केली फक्त परशुरामानें; व फक्त क्षमा मागितली !

६ **' बालकसुत सम दास अमानी 'चें उत्तम उदाहरण सुतीक्ष्ण** (सुतीक्ष्णस्तुतींत).

७ **भेदभक्ति वर मागितला** फक्त शरभंगानें; व योगाग्नींत देह जाळला प्रभुसमोर.

८ कांहीं न मागतां रामरूपाकडे पाहात योगाग्नींत देहत्याग करून **हरिपदिं लीन झाली शबरी !**

९ भरद्वाजादि सहा मुनींच्या (अयोध्या २ व अरण्य ४) भावनांची तुलना टीकेंत कोष्टकरूपानेंसुद्धां आहे.

१० योगाग्नींत देहत्याग करतांना **शिवपदकमलस्नेह मागितला सतीनें.** (भगवान प्रगट नव्हते).

११ **' राम 'नाम सकल नामांहून श्रेष्ठ** व **अघखगबधिक व्हावें असा वर नारदानें मागितला,** नारदानें (अरण्य. ४२) भगवंताजवळ मागणें मागण्यांतसुद्धां ' प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण ' हेंच अनुभवास येतें. **प्रभु ज्याला जें देऊं इच्छितात तेंच मागण्याची बुद्धि त्याला होते. अपवाद अंगद.**

भक्ति कोणीं कुठें मागितली ?—बालकांडांतील विविध प्रकारांची माहिती प्रथम दिलीच आहे.

(१) **अयोध्या.** — भरद्वाज (१०७।५-८ व दोहा). वाल्मीकींनीं स्तुति केली व कांहीं मागितलें नसलें तरी कोणा कोणाच्या हृदयांत राहा हें सांगितलें आहे. (१२५–१३२).

(२) **अरण्य.** — अत्रि (४); शरभंग (७–९।२); सुतीक्ष्ण (१०–१२।५); अगस्ति (१२।९–१३); जटायु (३२); शबरी (३५, ३६) कांहीं मागितलें

नाहीं, स्तुति केली नाहीं पण योगिवृंददुर्लभ गति मिळाली आहे; नारद (४२) स्वतःसाठीं कांहीं मागितलें नाहीं; मागणी वर दिली आहे.

(३) **किष्किंधा.**—सुग्रीवानें मागितली पण त्या वेळीं मिळाली नाहीं. (७।१४-२३); वाली (१० छंद); थोडी कामनायुक्त, तारा. (११।६).

(४) **सुंदर.** — हनुमान (३२।३–३४।२); बिभीषण (४९।४-८).

(५) **लंका.** — सर्व देव (११०); चतुरानन (१११); सुरपति (११३); या देवांनीं भक्ति मागितली पण ती त्यांस मिळाली नाहीं असें दिसतें. कारण त्यांनीं कृष्णावतारांत प्रभूचा छळ केला आहे; शंकर (११५).

(६) **उत्तर.** — चारी वेद (१३); शंभु (१४); सनकादिक (३४-३५); वसिष्ठ (४८-४९); नारद (५१); कृपादृष्टीनें अवलोकन करा इतकेंच मागितलें. भुशुंडी (८३-८४); वरील प्रत्येक ठिकाणीं स्तुतींत व याचनेंत कांहीं तरी वैशिष्ट्य आढळतेंच.

अंगदाचीच मागणी अमान्य ! (उत्तर. दो. १९).

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१० 卐 卐 卐

भक्तांस अडचणींत अकल्पित साह्य

श्रीरामचरित–मानसाचें सूक्ष्म निरीक्षण करतांना असें दिसतें कीं हरिभक्तांस–रामसेवकांस अडचणीच्या वेळीं, किंकर्तव्यमूढ झालें असतां, भावनावश होऊन अविवेकी आचरणास प्रवृत्त होत असतां, वगैरे अनेक प्रसंगीं अचानक, अकल्पित रीतीनें साह्य मिळतें, अभक्तांस तसें मिळत नाहीं व भक्तापराध करणारांस तर दण्ड-शिक्षा भोगावी लागते. येथें फक्त भक्तांस साह्य मिळाल्याचीं व अभक्तांस न मिळाल्याचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत. ‘ भक्तापराध्यांस शासन ’ हें स्वतंत्र प्रकरण (१२।१६) पुढें आहे.

बालकांड. १. दक्षकुमारी सती—ही हरिभक्त नव्हती त्यामुळें शंकर सर्वज्ञ आहेत हें माहीत असूनसुद्धां त्यांच्या शब्दावर विश्वास बसला नाहीं व रामपरीक्षा घेण्याच ठरविलें; त्यांत अनेक चुका एकीमागून एक झाल्या पण साह्य न मिळाल्यानें सुबुद्धि सुचली नाहीं. (५१।३ पासून पुढें पाहा.)

२. शंकर — रामभक्ताग्रणी; सतीनें सीतावेश घेतल्यामुळें, सीताच बनल्यामुळें, तिच्याशीं पत्नी नात्यानें संबंध ठेवणें व त्या नात्यानें प्रेम करणें पाप व अनीति ठरणार व तिचा त्याग करावा तर निष्पाप व सती आहे, अशा धर्मसंकटांत महेश पडले.

तैं शंकर प्रभुपदिं शिर नमती । *स्मरत राम* मनिं विचार उठती ॥

त्यांनीं रामप्रभूंस मनांत वंदन करून **रामनामस्मरण** उच्चार **केल्याबरोबर कोडें उलगडलें** व कर्तव्यांचा निश्चय झाला व तळमळ नष्ट झाली.

३. पुष्पवाटिकेंत सीतेचें दर्शन झाल्यावर श्रीरघुनाथाचें मन तिच्यावर आसक्त झालें. कधीं स्वप्नांतही न घडणारी गोष्ट प्रत्यक्ष कशी घडली इत्यादि विचार **मनांत येतांच ' स्फुरति शुभांगें '** (१।२३१।४), **शुभ शकुनानें अचानक मदत केली.**

अयोध्याकाण्ड. ४. निषादराज गुह — रामसखा, रामभक्त असून भरतासारख्या रामभक्ताविषयीं संशयी बनून त्यानें युद्धाची तयारी केली व युद्धाची नौबद वाजविणार तोंच **' शिंक ' रूपी शकुन झाला व सर्व अनर्थ टळला.** त्याचे **संशय रामप्रेमजनित व राजनीतीस धरून होते.** (१८९।२–१९३।४ पाहा.)

५. लक्ष्मण — वरील प्रकारेंच, पण रघुनाथास चिंताग्रस्त पाहून, भरताविषयीं संशयी बनून भरताशीं युद्धास निघण्याची तयारी करीत, श्रीरामशपथ घेते झाले; पण **इतक्यांत आकाशवाणी होऊन सर्व अनर्थ टळला. निःस्वार्थ, निष्कपटी रामसेवामूर्ति!** (२२६ सोरठ्यापासून २३१।४ टीका पाहा.)

अरण्यकाण्ड. ६. सुरपतिसुत (जयन्त) — जयन्त काममोहित झाल्याचा उल्लेख मानसांत नाहीं; *अग्निपुराणांतहि* नाहीं. त्यानें सीतेच्या चरणास चोंच न मारतां रघुपतिपरीक्षा पाहिली असती तर डोळासुद्धां गेला नसता. त्यानें रामभक्तापराध व रघुवंशी वधूचा छळ केला; **पण हेतु दुष्ट नव्हता म्हणून** पूर्ण भयग्रस्त व निराश झाला असतां **अचानकपणें देवर्षि नारदांची गांठ पडली** व प्राणांवरचें एका डोळ्यावर घालवून जगला. (३।१–२ पाहा.)

७. रावणानें जिला पळवून नेलें ती सीता लक्ष्मणास मर्मी लागतील अशीं वचनें बोलली त्यामुळें जटायूनें तिला रावणरथांतून उचलून भूमीवर ठेवलें असतां पळून जाण्यास सवड होती पण तशी बुद्धि झाली नाहीं; व रावण मूर्च्छित पडलेला असतां सीतेला उचलून रामाकडे पोंचविण्याची बुद्धि जटायूला झाली नाहीं!

(क) एका स्त्रीला राक्षस पळवून नेत आहे हें पाहिल्यावर ऋष्यमूक पर्वतावरील हनुमंतास अशी बुद्धि झाली नाहीं कीं वर उड्डाण करून तो रथ मोडून त्या स्त्रीला सोडवावें. भावार्थ रामायणांतील हनुमन्तानें हा प्रयत्न केला पण उडी रथावरून दूरवर गेली व रावण निसटला! सारांश एकच!

किष्किंधाकाण्ड. ८. रामदूत (कपिगण) — तृषेनें अत्यंत व्याकुळ झाले असतां भूमिविवरांत जलाशय असल्याचें अचूक अनुमान अचानकपणें हनुमन्तास करतां आलें; व तेथें तर **अकल्पितपणें** अशी **तपस्विनी भेटली** कीं **तिनें निमिषार्धांत सर्वांना सागरतीरावर पोंचविलें!** नाहींतर त्या विवरांतून बाहेर पडतां येणें शक्य नव्हतें.

९. रामदूत — प्रायोपवेशन करण्यास बसलेले असतां, संपाती त्यांस खाण्यास प्रवृत्त झाला व ते सर्व घाबरले; पण त्याच वेळेस जटायूची आठवण अंगदास झाली व त्यानें जटायूची कथा सर्वांस सांगितली; व ती संपातीनें ऐकली; त्याचा त्या शब्दांवर विश्वास बसला व एकदम सर्व रंग पालटला; व सीतेचा शोध संपातीकडूनच कळला!

संकटीं गोविंद उभा मागेंपुढें । कांहींच सांकडें उरों नेदी ।। हेंच दिसलें.

सुन्दरकाण्ड — या कांडांत सर्वांहून अधिक उदाहरणें आहेत.

१०. हनुमान — सर्व विघ्नें व सागर-लंघन करून, लंकिनीला जिंकून प्रवेश करून सर्व लंका शोधली तरी वैदेही दिसेना; तेव्हां श्रीरामदूताग्रणी, बुद्धिमतांवरिष्ठ ! किंकर्तव्यमूढ बनले. तोंच भगवत्कृपा मदतीस धावून येण्याची वेळ ठेपली. तिथें भिन्न हरिमंदिर दिसलें आणि

रामायुध-अंकित गृह छबि वदली ना जाय ।
नव तुलसीवन; हर्षले बघुनि तिथें कपिराय ।। ५ ।।

पण यामुळें एक नवें कोडेंच उत्पन्न झालें; तोंच अकल्पितपणें मदत मिळाली—

त्या समयींच बिभीषण जागे ।।
राम राम तो स्मरूं लागला, । हृदिं कपि हर्षित सज्जन कळला ।। (५।६।२-३)

सर्व अडचणी दूर झाल्या; विप्ररूपानें भेटले, अशोकवनाचा मार्ग व सीतेच्या भेटीची युक्ति बिभीषणाकडून कळली.

११. पुढें रावणसभेंत नेल्यावर कपीला ठार मारण्याची आज्ञा ही गुरुदाक्षिणा रावणानें दिली; तोंच बिभीषण अचानकपणें सभेंत आला **ही एक गोष्ट**; त्यानें सांगितलेली नीति रावणानें मान्य केली **ही दुसरी गोष्ट**, पुच्छ पेटविण्याची आज्ञा दिली ही **तिसरी गोष्ट**, नागपाशांतून सहज सुटतां आलें ही **चौथी गोष्ट** आणि त्या भयानक अग्नीनें **हनुमान जळाले नाहींत ही पांचवी गोष्ट** अगदीं अनपेक्षित अशीच घडली; म्हणूनच म्हटलें आहे कीं,

गरल सुधा, अरि करिति मित्रता । गोपद सिंधु, अनलिं शीतलता ।।
गरुड ! समेरु रेणुसम त्यासी । राम कृपायुत बघति जयासी ।। (५।५।२-३)

या सर्व गोष्टींची सत्यता हनुमन्ताच्या चरित्रांत मानसांत दिसते. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

१२. सीतेला अशीच **अचानक मदत मिळते** — (क) रावण सीतेला ठार मारण्यास धावल्यावर दानवकन्या, रावणाची पट्टराणी असलेली, जिला सीतेची दासी करण्याची प्रतिज्ञा रावणानें तिच्या देखत नुकतीच केली ती मंदोदरी रावणाला नीतीचा उपदेश करते व स्त्रीहत्या करूं नये म्हणून सांगते ! हें आश्चर्य नव्हे काय ? आणि रावण तें मान्य करतो; ही सर्व केवळ भगवत्कृपाच नव्हे काय ?

(ख) त्याच रात्रीं त्रिजटेला स्वप्न पडतें; ती तें सर्व सीतेचा छळ करणाऱ्या दुष्ट भयानक राक्षसींना सीतेच्या देखत सांगते, त्यांचा त्या म्हणण्यावर विश्वास बसतो व त्या सीतेचा छळ करण्याचें सोडून देऊन खूप दूर जाऊन बसतात या सर्व गोष्टी अगदीं अनपेक्षित अशाच घडल्या.

(ग) आणि म्हणूनच हनुमान सीता भेट व संवाद निर्विघ्नपणें होऊं शकले. या काण्डांत अशा आणखी पुष्कळच गोष्टी घडल्या आहेत.

१३. याच्या उलट उदाहरण रावणाचें — ज्यानें लक्षावधि मोठमोठ्या राक्षसांचा सहज चुरा केला; नागपाशबद्ध असून ज्याला मूर्छा आली नाहीं त्या कपीचे पुच्छ पेटविण्याची आज्ञा देण्याची दुर्बुद्धि रावणास झाली. बिभीषणाला कारागृहांत डांबून टाकण्याची सुबुद्धि न होतां त्यास हद्दपार करण्याची दुर्बुद्धि झाली. याप्रमाणें रावणास पदोपदीं दुर्बुद्धीच होत गेली.

लंकाकाण्ड. १४. मूर्छित सुग्रीवाला काखेंत घालून कुंभकर्ण लंकेंत नेत असतां मेल्याचें सोंग करण्याची युक्ति सुग्रीवाला सुचली; ती कुंभकर्णास ओळखतां आली नाहीं आणि मिळविलेल्या महाविजयाचा प्रसाद म्हणूनच नाक-कान गमावले आणि विजयाचें रूपांतर एका क्षणांत अति लज्जास्पद पराभवांत झालें !

१५. मेघनादानें मायायुद्ध करून सर्वांना मूर्छित पाडलें, जांबवान अति जरठ समजून त्यास कोरा ठेवलें; श्रीरामास नागपाशबद्ध करून टाकलें व अशा रीतीनें अलौकिक विजय मिळविला न मिळविला तोंच त्यास त्या अति जख्खड म्हाताऱ्यानें युद्धाचें आह्वान दिलें; मेघनादाच्याच घोर त्रिशूलानें त्याला मूर्छित पाडलें व एखाद्या मेलेल्या उंदरासारखें त्यांस लंकेंत झुगारलें !

(**क**) महाप्रतापानें मिळविलेल्या विजयाचें अशा रीतीनें लांछनास्पद पराभवांत रूपांतर झालेलें रावणास अनेक वेळां पाहण्यास सांपडलें ! अशी ही दुसरी बाजू आहे.

१६. सीता परम व्याकुळ झाली असतां तिला धीर देण्यास अंतःस्फुरणाचा शुभ-शकुन झाला. (१००।२-५).

उत्तरकाण्ड. १७. श्रीरामविरहव्यथेनें भरत अत्यंत व्याकुळ झाले असतां एकाएकीं,

भरतनयन-भुज दक्षिण स्फुरती वारंवार ।
हर्षें अति जाणुन शकुन लागे करूं विचार ॥ (मं. दो. द्रा.)
हाच भरंवसा दृढ मना अती । होति शकुन शुभ राम भेटती ॥ (१।७)

असा सर्व विचारांचा निष्कर्ष निघाला न निघाला तोंच,

रामविरहसागरिं असें मग्न भरत मन होत ।
विप्ररूपधर पवनसुत तों आला जणुं *पोत* ॥ १ रा.॥

(पोत – नौका, जहाज). एका क्षणांत अगदीं कायापालटच नव्हे तर कायाकल्पच झाला; केवळ भरताचाच नव्हे तर सर्व अयोध्येचा !

खरें पाहूं गेलें असतां, हनुमान त्रिवेणीहून अयोध्येकडे निघाले तेव्हांच अयोध्येंत सर्वत्र प्रसन्नतेचें साम्राज्य पसरलेलें दिसूं लागलें.

याप्रमाणें साती सोपानांतील परस्परविरुद्ध घटनांचीं कांहीं उदाहरणें मानसांतील अवतरणें फारशीं न देतांच दाखविलीं तरी इतका विस्तार झालाच. उत्तरकांडांत रामराज्य झालें असल्यानें प्रतिकूल गोष्टी घडल्याच नाहींत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।११ 卐 卐 卐

चतुर आणि चतुरता (चतुराई)

श्रीरामचरित-मानसांत चतुर आणि चतुरता (चतुराई) हे शब्द विविध अर्थांनीं वापरले आहेत. संदर्भावरून अर्थ समजण्यासारखा असला तरी कांहीं ठिकाणीं गोंधळ उडतो.

(१) **अगुणीं सगुणीं नाम सुसाक्षी। उभां प्रबोधक चतुर दुभाषी ॥** (१।२१।८) *हुशार, विद्वान.*

(२) ' नामाधार चहूं चतुरांप्रति ' (१।२२।७) **भक्तिमार्गाचा आश्रय करणाऱ्यांस येथें चतुर म्हटलें.** आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी ज्ञानी भक्तांविषयीं हें वचन आहे. येथें चतुर = शहाणा, **स्वहित जाणणारा.**

(३) **सावधान गाति चरितातें। रक्षक चतुर तलावा याते ॥** (१।३८।१). या = रामचरितमानसाला; चतुर = **स्वकर्तव्यदक्ष, कर्तव्यतत्पर, कार्यप्रवीण.**

(४) **नाथ! चतुर नृप याचित जो वर। कृपानिधे मजला तो प्रियतर ॥** (१।१५०।४) शतरूपा प्रभूस म्हणाली.

(५) **उतरुन तुरगावरुन वंदिलें। *परम* चतुर निजनाम न कथिलें ॥** . (१।१९८।८) चतुर = व्यवहारदक्ष, व्यवहारपटु, नीतिनिपुण. हें प्रतापभानूविषयीं आहे.

(६) **तुलसी बघुनि सुवेष *भुलती* मूढ न, चतुर नर।** (१।१६१ म). प्रतापभानूविषयींच आहे. आपणांस चतुर, *फार व्यवहारपटु* समजणारेच बहुधा दंभादिकांस फसतात.

(७) *सांडुनि सर्वहि आस भजति राम ते चतुर नर।* (३१६ म)

(८) **चतुर शेतकरि कृषी खुरपती। मान मदादि जसे बुध त्यजती ॥** (४।१७।८) **मानमदादि विकारांचा त्याग करतील ते चतुर.**

(९) **तुम्हां कासया बहुत वदावें। *परम* चतुर, मज आहे ठावें ॥** (६।१७।७) असें रघुनाथ अंगदास म्हणाले. चतुर = हुशार, दक्ष, प्रवीण. इतकीं उदाहरणें पुरेत.

चतुरता (चतुराई) —

(१) **रामभक्त तुम्हीं मन वाक्कर्मीं। जाणें तव *चतुराइ* ठीक मीं ॥**

गूढ रामगुण ऐकुं बघतसां। प्रश्न जणूं अति मूढ करितसां ॥ (१।४७।३–४) असें याज्ञवल्क्य भरद्वाजांस म्हणाले. दुसऱ्या चौपाईनें ' चतुराई = चतुरता ' चा अर्थ स्पष्ट केला आहे. *कोणतें तरी निमित्त करून श्रीरामकथा, रामगुण, रामभक्ति यांचें श्रवण करूं पाहणारांस* चतुर म्हटलें.

(२) **मन-कृति-वचनिं *चतुरता* त्यजतां। करिति कृपा रघुराजा भजतां ॥** (१।२००।६) येथें चतुरता = छल, कपट, धूर्तपणा असा अर्थ आहे.

(३) **नाहीं चतुरता उरत नीचमतिं** । (२।२४।८) चतुरता = शहाणपणा सुविचार, सुमति.

(४) **श्रीचातुरी अतां मज कळली । त्यजुनि देवगण तुम्हांस भजली ।।**
श्री = महालक्ष्मी, चातुरी = चतुरपणा, शहाणपणा. इतर देवांना न भजतां जे श्रीरामास भजतील ते चतुर, हें सुचविलें.

(५) **मी प्रसन्न तव बघुनि *चतुरता* । प्रिय अति मजला भक्ति याचिता ।।**
(७।८५।५) भक्तीची याचना भगवंताजवळ करील व मोक्षादि माग म्हटलें तरी मागणार नाहीं तोच चतुर. **मोक्षादि कांहीं न मागतां भगवंताजवळ, संतांजवळ, भक्ति मागणें ही चतुरता होय** व भक्तीसाठींच जे प्रयत्न करतील ते चतुरशिरोमणि.

चतुरशिरोमणि **तेच किं जगतीं ।· मण्यासाठिं जे सुयत्न करती।।** (७१।२०।१०) मणि = रामभक्तीचिंतामणि.

(६) अमितकोटि शारदा *चतुरता* । (७।९२।५) चतुरता = विद्वत्ता, पांडित्य, शास्त्रज्ञानप्रवीणता.

सुंदरकाण्डांत चतुर आणि चतुरता नाहीं. वरील उदाहरणांत मानसांतील चतुरता शब्दांचे सर्व विविध अर्थ आले आहेत म्हणून आणखी उदाहरणें नकोत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१२ 卐 卐 卐

भाग्यवंत आणि अभागी

श्रीरामचरित-मानसांत भाग्यवंतांचे व अभाग्यांचे विविध प्रकार दाखविले आहेत; ते पुढें दिले आहेत. अगदीं आवश्यक तेथेंच स्पष्टीकरण केलें आहे.

१. ***श्रीगुरुपदनखमणिगण जोती*** **। स्मरतां दिव्य-दृष्टि हृदिं होती ।।**
दलन मोहतम *सुप्रकाश* तो । *महाभाग्य ज्या हृदयीं पडतो* ।। (१।१।५-६)

२. **येउनि बघुं पद *भाग्यें भारी* ।। आम्हां अपलें दर्शन दुर्गम ।** (१।१५९।७)
हें *संतदर्शना*विषयीं म्हटलें आहे.

३. **सुप्रेमाधीरा पुलक शरीरा, शब्द निघेना मुखीं बळें ।**
अति महाभागिनी **पडली चरणीं युगल नेत्रिं जलधार गळे ।।** (१।२११ छं. १)
भगवंताचें दर्शन होऊन त्यांच्या पायांवर मस्तक ठेवतांना अशी दशा होणें हें *अतिमहा-भाग्य* आहे.

४. ***महाभाग्य*** **विधि रचि योगातें । होतिल नेत्र-अतिथि दो भ्राते ।।**(१।३१०।८)
श्रीराम-लक्ष्मणांचें दर्शन होणें हें महाभाग्य.

५. **छंद — जे स्पर्शतां मुनि नारि लाभे सद्‌गती जरि अघवती ।**

ते क्षालिती पद *भाग्यभाजन जनक;* जन जय बोलती ।। (१।३२४।२)

६. अयुत शारदा शेष मिळोनी। कल्पकोटि जरि बघति गणोनी ।।

मम *भाग्य* नि अपल्या गुणगाथा। सरति न वदतां श्रुणु रघुनाथा ।।

प्रत्यक्ष परमात्मा जावई मिळणें हें अमित अनंत अनिर्वचनीय भाग्य आहे. हें जनकराजाचें वचन आहे.

७. श्रुणु जननी *तो सुत बहुभागी। जो पितृमातृवचानें अनुरागी* ।। (२।४१।७) महाभाग्यवान पुत्र कोण हें येथें सांगितलें.

८. *बहुभागी वन* अभागिणि पुरी। रघुकुळटिळका त्यज जिस पुरी ।। (२।५६।५) असें अयोध्यापुरीविषयीं कौसल्येनें म्हटलें — *जेथें राम जाऊन राहतील तें वनसुद्धां महाभाग्यवान* आणि ज्या अयोध्यापुरीचा त्याग राम करतात ती पुरी अभागिनी!

९. '*भूरिभाग्य-भाजन* बनसि मजसह... ... ... ।

जर तव मन करि रामपदिं ठाव छलादि विना हि' ।। (२।७३)

असें सुमित्रा लक्ष्मणास म्हणाली. रामचरणक्षालनामुळें जनकराजांस भाग्यभाजन म्हटलें; लक्ष्मण रामाबरोबर वनांत जाऊन छलकपटविहीन रामसेवा, मन लावून, करणार म्हणून लक्ष्मण *भूरिभाग्य-भाजन* व त्यामुळें त्याची माताहि भूरिभाग्यभाजन.

१०. 'नाथ! कुशल पदपंकज बघतां। *भाग्यभाजन* जन म्हणतां'।।(२।८८।५१) हें निषादराजाचें वचन आहे. ज्याला प्रभूंनीं आपला म्हटलें तो भाग्यभाजन.

११. *रामपदांबुज धूली लागत। भूमि भूरिभाग्यहि निज मानत* ।।
(२।११३।८)

१२. निषादराज म्हणाला,

'रणीं मरण वरि गंगातीरहि। *रामकाजिं*, पळभंगु शरीरहि ।।

मी जन नीच भरत नृप भाऊ। *असें मरण बहुभाग्यें पाऊं* ।। (२।१९०।३,४)

१३. भेटुनि गुहा परम अनुरागां। पुरजन वानिति सर्व *सुभागा* ।। (२।२४४।५)

१४. जे *गुरुपद-अंबुज-अनुरागी*। लोक-वेद-संमतिं *बहुभागी* ।। (२।२५९।५)

१५. दो. — परिसुाने सुरमत सुरगुरु वदति तुम्ही *बहुभाग*।

सकल सुमंगल मूल जगिं। *भरतचरणीं अनुराग* ।। (२।२६५)

१६. बघुनी पुढें श्यामतनु राम। सीता अनुज सहित सुखधाम ।।

पडति छडीसम मग *पायांवर*। *प्रेममग्न बहु-सभाग्य* मुनिवर ।।

(३।१०।२०-२१) हें सुतीक्ष्णाचें वर्णन आहे.

१७. अगस्ति म्हणाले 'मग बहुपरिं करुनी प्रभुपूजा।

'*भाग्यवंत मजसम नाहिं दूजा* ।।' (३।१२।१२)

१८. *तोचि गुणज्ञहि तो बहुभागी। जो रघुवीर चरणिं अनुरागी* ।।
(४।२३।७)

१९. '*अम्हि सब* **सेवक** *अति* **बहुभागी** *ब्रह्मीं सगुण सतत अनुरागी* । (४।२६।१३) असें जांबवान अंगदादि रामदूतांस म्हणाला आहे.

२०. करुनि विचारा अंगद वदला । *धन्य* जटायू-सम न जाहला ॥

देह राम-कार्यार्थीं त्यागी । *हरिपुरिं जाइ परम बहुभागी* (४।२७।१)

२१. विप्ररूपधर हनुमंताला पाहून बिभीषण म्हणाला,

' कीं तुम्हि राम दीन-अनुरागी । आलां करण्या मज *बहुभागी* ॥

२२. जे पद जनकसुता हृदिं धरते । कपट-कुरंगा-संगिं धावते (धावणारे) ॥

हर-उर-सरिं सरोज पद जेही । *अहो ! भाग्य* मी पाहिन तेही ॥(५।४२।८)

बिभीषणाचे मनोरथ वर्णिले आहेत.

२३. अहो ! *भाग्य* मम *अमित अति* राम ! कृपा-सुख-पुंज ।

दिसले नयनिं विरंचि शिव-सेव्य युगल पदकंज ॥ (५।४७)

बिभीषण राक्षस आणि रामशत्रूचा, रावणाचा भाऊ असून त्यास रामदर्शन सहज घेतां आलें म्हणून *अति अमित भाग्य.*

२४.*महाभाग्य* अंगद-हनुमानां । *चरण-कमल चेपिति* परिं नाना॥(६।११।७)

२५. *जगजाहिर* तव *धर्मशीलता* । *दर्शन* अम्हांहि *भाग्यें महता* ॥

(६।२२।८)

२६. ज्यांच्या भाग्यास तुलना नाहीं ते भरत म्हणतात,

अहह ! धन्य *लक्ष्मण बहुभागी* । राम *पदारविंद-अनुरागी* ॥(७।१।३)

२७. *भरतभाग्य* नी प्रभु-कोमलता । शेष-कोटिशत थकतिल वदतां ॥(७।११।६)

२८. '*बहुभाग्यें* सत्संग लाभतो ' (७।३३।८) प्रभु सनकादिकांस म्हणाले.

२९. *बहुभाग्यें* मानुष तनु मिळली ॥ (७।४३।७)

३०. हनुमंतासम नहिं *बहुभागी* । नहि कुणि रामचरण अनुरागी ॥ (७।५०।८)

३१. '*याचित भक्ति* सकल सुखदानी । *महाभाग तुजसम नाहि कोणी* ॥' (७।८५।३) प्रभु भुशुंडीस म्हणाले.

३२.पूरितकाम राम-अनुरागी । कुणि न तुम्हांसम तात ! *सुभागी* ॥ (७।१२५।५) गरुड भुशुंडीस म्हणाले. भाग्याचें वर्णन आणखी पुढील स्थळीं पाहावें. १।१६०।२; १।१९६।२; १।२१५।१-२; २।७५; २।११०।२; २।१३५; २।२०६।३-४; २।२२३; २।२५१।१, २।२५१।८.

भाग्यवंत कोण हें सांगणारीं महत्त्वाचीं सर्व वचनें वर दिलीं आहेत, तीं विशिष्ट क्रमानें घेतल्यास त्या वचनांनीं एक स्वतंत्र सुसंगत विषय तयार होईल असा दृढ भरंवसा वाटतो; पण त्या दृष्टीनें प्रयत्न करण्यास अद्याप वेळच मिळाला नाहीं ! आतां अभागी कोण हें पाहणें उपयुक्त ठरेल.

अभागी—(१) *पर दुःखार्थ* असंत *अभागी* । (७।१२१।१५;)

(२) बगळे काक विषयि अति खळ ते। *जाति अभागि न सराजवळ ते* ॥ (१।३८।१) श्रीरामचरितमानसाजवळ श्रवणास न जाणारे *अभागी.*

(३) जाउन *न घडे स्नान अभागे* । (१।३९।२) जे जवळ जाऊनहि या मानसांत स्नान करीत नाहींत ते.

(४) अज्ञ अकोविद अंध *अभागे । विषय-बुरशि मन-मुकुरीं लागे* ॥

(१।११५।१)

(५) सीते बघुनि भूप लोलुभले। कुटिल कुपुत्र मूढ मनिं रुषले॥

उठुनी घालुनि कवच अभागी। शेखी मिरविति जागोजागीं॥ (१।२६६।१-२) परस्त्रीची अभिलाषा धरणारे अभागी.

(६) मग पस्तावसि अंतिं, *अभागी* । गाय मारसी वादीलागीं॥ (२।३६।८)

(७) कुटिल कठोर कुबुद्धि *अभागिनी । होइ आग रघुवंशवेणुवनिं* ॥ (२।४७।४) स्वतःच्या कुळाच्या नाशास कारण होणारी व्यक्ति अभागी.

(८) व्याधि असाध्य समजुनी त्यजती। म्हणत 'मंदगति *अभागी,*' फिरती॥

(२।५१।२)

(९) जे *ना साधु-संग-अनुरागी* । पथ परमार्थ विमुख *अभागी* ॥ (२।१६८।५)

(१०) वधिल *अभागी* देतां उत्तर। (३।२६।६) हें मारीचवचन आहे. सीता-हरणाची इच्छा बाळगणारा व त्यासाठीं संन्याशी बनूं पाहणारा दशानन अभागी.

(११) एक उमे *ते लोक अभागी* । त्यजुनि हरिस विषयीं अनुरागी॥ (३।३३।१)

(१२) प्रभु न असा, श्रम त्यजुनि भजति जे। ज्ञानरंक जडमति *अभागि* ते॥ (३।४५।३) जे ज्ञानासाठीं रंकासारखे कष्ट करतात पण प्रभु श्रीरामचंद्रास भजत नाहींत ते अभागी.

ल. ठे.—किष्किंधाकाण्डांत अभागी कोणी नाहीं! किष्किंधा काशीपुरी आहे, सगळे वानरादि रामसेवक, रामभक्त आहेत. वालीसुद्धां भाग्यवानच. प्रभुहातीं मरण आलें व रामभक्ति वर मागितला.

(१३) *रावण बिभीषणा जैं त्यागी* । तैंच होइ गतविभव *अभागी* ॥

(५।४२।३)

(१४) रावण नाथ! एक करि यागा। होतां सिद्ध न मरे *अभागा* ॥ (६।८५।२) या कांडांत इतर वचनें रावणाविषयींच आहेत.

(१५) *मायावश मतिमंद अभागे* । हृदयिं जवनिका बहुविध लागे॥

(७।७३।८)

(१६) त्यागुनि गुणमंदिर पति सुंदर। *नारि अभागिनी भजति पुरुष पर* ॥ (७।९९।४) कलियुगांत घडतें.

(१७) कोण असा जगिं नाथ! *अभागी* । खरी सेवि सुरधेनू त्यागी॥

(७।११०।७) रामभक्तीचा त्याग करून इतर साधनें करणारा व विषयसुख इच्छिणारा असेल तो अभागी.

याप्रमाणें अभागी लोकांतसुद्धां विविध प्रकार आहेत; पण जो रामभक्तीसाठीं प्रयत्न करीत नाहीं, भक्तिमार्गास लागत नाहीं तोच मुख्य अभागी आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१३ 卐 卐 卐

धन्य कोण

श्रीरामचरितमानसांत सुमारें ३८।३९ प्रकारचे धन्य वर्णिले आहेत. ते प्रकारः—

(१) अहो ***धन्य*** तव ***जन्म*** मुनीश्वर । तुम्हां ***प्राणसे प्रिय गौरीश्वर*** ॥
(१।१०४।४)

(२) ***धन्य धन्य*** गिरिराजकुमारी । तुम्हांसम न कुणि परोपकारी ॥
पुसिले रघुपतिकथाप्रसंगां । सकल लोक जग पावनि गंगा ॥
(१।११२।६–७)

(३) ***प्रक्षालुनि पद कृत अति पूजा*** । मजसा धन्य आज नहिं दूजा ॥
(२०७।१।३) विश्वामित्रासारखे महामुनि ज्याच्या घरीं येतील व जो त्यांची अतिपूजा करील त्याच्यासारखा धन्य नाहीं.

(४) ***धन्य जन्म*** जगतीतलिं त्याचें । ***प्रमुदित पिता चरित्रें ज्याचे*** ॥
(२।४६।१) **पुत्रजन्मधन्यता** कशांत आहे हें श्रीरघुनाथानें सांगितलें आहे.

(५) ***धन्य भरत***–जीवन या जगता । शीला स्नेहा वानित वळतां ॥
(२।१८५।३–४) श्रीरामदर्शन करवून देईल तो धन्य असा येथला संदर्भ आहे. हें अयोध्यावासी म्हणाले आहेत.

(६) **धन्यवाद नभिं मंगल मूल । त्या स्तविती सुर वर्षेति फूल** ॥ (२।१९४।२) भरतासारखा रामभक्त ज्यास प्रेमानें आलिंगन देईल *तो धन्य*. हें निषादराज-भरत भेटीच्या वेळचें वर्णन आहे.

(७) **आम्ही सानुज भरत विलोकनिं । गणलों *गेलों धन्य*…** ॥ (२।२२३।३) सानुज भरताचें दर्शन होईल तो धन्य.

(८) **गगनिं सुमन–झड *धन्य धन्य* रव । स्नेहशिथिल मुनि योगि सिद्ध तंव** ॥ (२।२८२।१ पासून २८४।६ पर्यंत पाहा.) श्रीरामासारखा पुत्र व सीतेसारखी सून वनवासांत राहिली तरी जिला चिंता नाहीं पण भरतासारख्या सावत्र पुत्राची जिला चिंता वाटते ती देवी *कौसल्येसारखी माता, धन्य धन्य होय*.

(९) *ते धन्य* तुलसीदास *आस विहाय हरिरंगीं रत* ॥ (३।४६ छंद),

(१०) **धन्यास्ते** कृतिनः *पिबन्ति* । *सततं श्रीरामनामामृतम्* ॥

(४ मं. श्लो. २)

(११) **तात!** *पुण्य* **मम** *अती बहुत* । **दृष्ट नेत्रिं रामाचा दूत** ॥ (५।४।८).
(**सुकृती पुण्यवान् धन्यः**) हनुमंतासारख्या रामदूताचें दर्शन ज्यास घडेल तो धन्य.

(१२) **धन्य** **जटायूसम न जाहला** ॥ *देह रामकार्यार्थी त्यागी* । (४।२७।७–८)

(१३) '**बहुत कृपा रघुनायक करतिल**।' असा आशीर्वाद सीतेनें दिल्यावर हनुमान म्हणाले, '**मी माते कृतकृत्यचि आतां** । *आशिष तव अमोघ* **विख्याता** ॥ (५।१७।२–६ पाहा.) *श्रीरघुनाथ बहुत कृपा करतील असा अमोघ आशीर्वाद ज्याला मिळाला तो कृतकृत्य = धन्य धन्य.*

(१४) *धन्य धन्य* **तूं** धन्य **बिभीषण** । **झालासी निशिचरकुलभूषण** ॥

बंधु वंश तूं केला भास्वर । *भजुनि राम शोभा सुखसागर* ॥ (६।६४।८-९)

(क) **चेतनास जो करी जड, जडा करी चैतन्य** ।

अशा समर्था *रघुपतिसि भजति जीव ते धन्य* ॥ (७।११९ म)

(१५) **वदुनि कुठें रामानुज राम कुठें, त्याजि प्राण** ।

वदति *धन्य तव जननी* **कपि अंगद हनुमान** ॥ (६।७६)

हें मेघनादाविषयीं म्हटलें आहे.

(१६) *धन्य* **कीश** *जो स्वामी–काजा* । **जिथ तिथ** *नाचे पिऊन लाजा* ॥
(६।२४।१) जो लाजलज्जा गुंडाळून ठेवूनसुद्धां स्वामिकार्य करील *तो धन्य.*

(१७) *धन्य अयोध्या रामहि वानी* ॥ (७।४।८) श्रीराम ज्याची प्रशंसा करतील तो धन्य.

(१८) **आज** *धन्य* **मी पहा मुनीश्वर** । **तुमचें दर्शन अघराशीहर** ॥ (७।३३।७) अनायासें संतदर्शन होईल तो धन्य. (७।६३ रा पाहा.)

(१९) *धन्य* **सती पावन तुझी** *मति* । **थोडि न** *रघुपति कथाप्रीति अति* ॥
(७।५५।७); *धन्य* **पुण्यरत पावन ती मति** (७।१२७।७); (७।९५।१ – २.पाहा. 'धन्य धन्य मति')

(२०) *धन्य धन्य* **मी धन्य पुरारी** । **रामगुणां श्रुत भवभयहारी** ॥ (७।५२।२) सद्गुरुमुखानें श्रीरामगुण श्रवण करणारा धन्य.

(२१) *धन्य देश* **जेथें सुरसरी** । (७।१२७।५)

(२२) **ती** *स्त्री धन्य* **पतिव्रत धरी**॥ (२३) *धन्य भूप* **जो नीती पाळी**॥

(२४) *धन्य विप्र* **निज धर्म न टाळी**॥ (२५) **ते** *धन्य धन्यचि* **जया प्रथम गति**॥

(२६) **जैं सत्संगति** *काळ धन्य* **तो**॥

(२७) **द्विजभक्ती दृढ** *धन्य* **जन्म** *तो* । शूद्रांविषयीं हें आहे.

(२८) ऐक उमे कुळ **धन्य तें** जगा पूज्य सुपुनीत।
श्रीरघुवीर परायण जिथं नर होइ विनीत॥ (७।१२७)

(२९) आज **धन्य** मी **धन्य अति** सर्वपरीं जरि हीन॥
संतसमागम राम दे जाणुनि निज जन दीन॥ (७।१२३ रा)

(३०) दशरथांसारखा धन्य कोणी नाहीं—
दो० – भूपमुकुटमणि! **तुम्हांसम** ऐका **धन्य न कोणि**।
जयां रामलक्ष्मणतनय विश्वविभूषण दोनि॥ (१।२८१)

(३१) **भरत धन्य** म्हणतात सुर हर्षित वर्षति फूल॥ (२।२०५)
भरत धन्य जग यशें जिंकलें। (२।२१०।६–८)

(३२) **धन्य नगर** जेथुनि हे आले॥
धन्य देश वन शैल, गांव ते। जिथ जिथ जाती, धन्य ठाव ते॥
हे आले = रामलक्ष्मण आले. (२।१२२।४–६)

(३३) **धन्य** धरणि, पथ, पर्वत, कानन। जेथें कृत तुम्हि नाथ! पदार्पण॥

(३४) '**धन्य** विहग मृग काननचारी। सफल जन्म तव दर्शनें सारीं॥'
(२।१३६।१ – २) असें चित्रकूटवासी भिल्ल कोळी श्रीरघुनाथास म्हणाले.

(३५) कोणि म्हणति अम्हि बहु न जाणतों। **धन्य** आपणां **परम** मानतों॥
पुण्यपुंज आम्ही गणु तेही। जे बघती, बघतिल दिसले ही॥
(२।१२०।७–८) ज्यांना श्रीरामलक्ष्मणवैदेहीदर्शन झालें ते धन्य.

(३६) बघुनि **राममुखपंकज** मुनिवर **लोचनभृंग**।
करिति पान आदरें अति धन्य जन्म शरभंग॥ (३।७)
४।४।६; ६।११।१९; ७।१२ छंद; पाहा.

(३७) अहह **धन्य लक्ष्मण** बहुभागी। रामपदारविंद अनुरागी॥ (७।१।३)

(३८) **रघुपति** चरित बघति पुरवासी। घडिं घडिं म्हणति **धन्य सुखरासी**॥

(३९) सुवेलशैलावर श्रीरघुपतीचें जें ध्यान (लंका. ११।२–८) वर्णिलें आहे त्याविषयीं म्हणतात,

दो० – ऐसे कृपारूप-गुण-धाम राम आसीन।
धन्य मनुज या ध्यानिं जे असति सदा लयलीन॥

सूचना — यांतील कांहीं वचनें निवडून तीं संगतवार घेतल्यास एक स्वतंत्र विषय तयार होईल असा दृढ विश्वास आहे. वेळेच्या अभावीं हें अद्याप करतां आलें नाहीं.

येथपर्यंत या १३ प्रकरणांत भक्ति व भक्त यांचें विविध बाजूंनीं निरीक्षण केलें गेलें. आतां भक्तिहीन, रामविरोधी (रामविमुख) इत्यादींविषयीं मानसाचें मत पाहणें आवश्यक आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१४ 卐 卐 卐

भक्तिहीन आणि रामविमुख

भक्तिहीन म्हणजे भक्तिमार्गाचा सादर आश्रय न करणार व रामविमुख = रामविरोधी.

(१) **' जात पात कुल धर्म महत्ता । धन बल परिजन सुगुण चतुरता ॥**
भक्तिहीन नर शोभे कैसा । दिसे वारिविण वारिद जैसा ' ॥ (३।३५।५–६)
असें श्रीरघुनाथ शबरीस म्हणाले. ज्याच्यांत वारि = जल नाहीं त्याला वारिद म्हणणेंच चूक; तें नांव त्यास लज्जास्पद आहे. त्याचप्रमाणें जात, कुल, धर्म इत्यादि सर्व चांगलें असून भक्ति नसेल तर त्यास नर म्हणणेंच चुकीचें; तो मनुष्य नव्हेच !

(२) **' सहजशील कीं हें पाप्यांचें । सदा वावडें मम भजनाचें ॥ '** (५।४४।३)
असें बिभीषणाविषयीं चर्चा चालत असतां श्रीरामच म्हणाले. ज्यांना भजन, भक्ति आवडत नाहीं ते पापी आहेत असें जाणावें.

(३) **बहुरोग वियोगिं हि लोक हत । भवदंघ्रि निरादर हा फळत ॥**
भवसिंधु अगाधहि ते पडती । पदपंकजिं प्रेम न जे करती ॥
अति दीन मलीन सुदुःखि सदा । पदपंकजिं प्रीति न ज्यांस कदा ॥
(७।१४।४ – ६) पूर्वी भक्तिहीन असण्याचें कारण सांगितलें. येथें *भक्तिहीन राहण्याचा परिणाम शंकरांनीं सांगितला.*

(४) **' ज्ञान अगम्यहि विघ्नें पार न । साधन कठिन मना आधार न ॥**
करुनि कष्ट जरि मिळे कुणाला । भक्तिहीन तो प्रिय नहिं मजला ॥ '
(७।४५।४–५) असें श्रीरघुनाथच म्हणाले.

शोकदुःखमुक्त होण्यासाठीं कोणी केवळ ज्ञानमार्गानें गेला तरी तें प्राप्त होणें फारच कठिण; व कदाचित ज्ञान लाभलेंच तरी भक्तिहीन ज्ञानी भगवंतास मुळींच आवडत नाहीं; प्रिय वाटत नाहीं आणि ' मोक्षमिच्छेत् जनार्दनात् ', ' बंधमोक्षदहि सर्व पर, मायाप्रेरक ', ईश्वर, भगवान – रामच आहेत; मग तें ज्ञान टिकणार कसें व दुःखशोकविनाश आणि शुद्ध सुखलाभ होणार कसा ? असा मनुष्य वारिविण वारिदच. येथें उपसंहार केला.

(५) **' श्रवणवंत जगीं कोण असाही । रघुपतिचरित जया प्रिय नाहीं ॥**
आत्मघातकी जीव मूर्ख ते । ज्यांना रघुपति कथा न रुचते ॥ ' (७।५३।५–६)
असें पार्वती म्हणाली.

(६) **' भक्तिहीन गुण सब सुख तैसें । बिना लवण शाकादिक जैसें ॥**
भजनहीन सुख कवणे काजा । ' (७।८४।५ – ६) हें भुशुंडीवचन आहे.

(७) **' भक्तिहीन जरि विरिंचि असला । तो प्रिय सब जीवांसम मजला ॥ '** (७।८६।९)
भक्तिहीन ब्रह्मदेवसुद्धां कृमिकीटपतंगांसारखाच मला प्रिय आहे, जास्त नाहीं असें श्रीरामच म्हणाले.

(८) ती (= नर) तनुधर हरि भजति न जे नर । होति विषयरत मंद मंदतर ।
(७।१२१।११)

(९) श्रुतिपुराण सद्ग्रंथ वदतिही । *रघुपति भक्तिविना सुख नाहीं* ॥
(७।१२२।१४)

भक्तिहीनांविषयीं आणखी पुष्कळ वचनें आहेत, कांहीं पूर्वींच्या लेखांत आलीं आहेत म्हणून अधिक विस्तार नको.

२. रामविमुख – (१) शंकर भवानीस सांगतात,

'त्वां कथिलें जें राम दुजा कुणि । श्रुति गाती ज्या ध्याति महामुनि ॥

दशरथनंदन रामाला परमात्मा न म्हणतां जे मनुष्य म्हणतात,

श्रवति वदति असं अधम ज्यां लागे मोह पिशाच ।
पाखंडी हरिपदविमुख जाणति मृषा न साच ॥ (१।११४)

(२) *रघुपतिविमुख यत्न करि कोडी । शक्त कवण भवबंधन सोडी* ॥ (१।२००।३)

(३) श्रुणु नृप ज्यास विमुख अनुतापति । यद्भजनाविण ताप न नाशति ॥ (२।४।७)

(४) न तरी वांझ बरी विते वृथा ते । रामविमुख सुत मानि हितातें ॥ (२।७५।२)

(५) लोकिंहि वेदिं विदित कवि सांगति । रामविमुख थळ नर्कि न पावति ॥
(२।२५२।७) थळ = स्थळ

(६) '*सिद्धि रामविमुखा स्वप्नीं नहि* ॥' (२।२५६।१) वसिष्ठवचन.

(७) उमे रामगुणगूढ पंडित मुनि पावति विरति ।
पावति मोह विमूढ जे हरिविमुख, न धर्मरति ॥

(८) जाइ धरुनि निजरूप पित्यासी । राखि न रामविमुख तनयासी ॥

(९) कोणि तया बस असें वदेना । *रामद्रोह्या कोणि रक्षिना* ॥
पितृ यम, माता मृत्युसमाना । सुधा विष बने श्रुणु हरियाना ॥
करी मित्र शतरिपुची करणी । त्याला विबुध नदी वैतरणी ॥
अनलाहुनि जग तप्त तयाला । जो रघुवीरविमुख कुणि झाला ॥
(३।२।५–८ टीका पाहा.)

(१०) सांगु ऐक दशकंठ पणासी । त्राता कुणि न रामविमुखासी ॥
शंभुसहस्र विष्णु चतुरानन । रामद्रोह्या रक्षुं शकत न ॥ (५।२३।७–८)

(११) रामविमुख संपत्ती सत्ता । असली नसली, प्राप्त सम गता ॥ (५।२३।५)

(१२) श्रीराम म्हणतात, ' मद्द्रोही प्रिय शंभु ज्यां शिवद्रोहि मम दास ।
ते नर करती कल्पभर नरकीं घोर निवास ॥ (६।२)

(१३) *विष्णुविमुख श्रुति संत विरोधी ॥ ... जीवत शवसम* ॥ (६।३१।३–४)

(१४) जगदात्मा प्राणाप्रिय रामहि । तद्विमुखा किं मिळे विश्रामहि ॥ (६।३५।६)

(१५) यश ज्याचें श्रुति पुराण गाती । रामविमुख कुणि सुख न पावती ॥ (६।४८।८)

(१६) त्या किं संपदा शकुन शुभ स्वप्निंहि मनिं विश्राम ।
भूतद्रोही मोहवश रामविमुख रत काम ॥ (६।७)
(१७) रामविमुख वांछिसि संपदा । शठ तूं! ... ॥ (६।९।४।८)
(१८) रावणवधानंतर विलाप करतांना मंदोदरी रावणास म्हणते,
'रामविमुख हे हाल जाहले । रडण्या कोणि न कुळीं राहिलें ॥
शिर भुज जंबुक खाति अतां हीं । रामविमुख! हें अनुचित नाहीं ॥'
(६।१०४।१०,१२)
(१९) रामविमुखतनु विधिसम पावति । कवि कोविद ना तिला प्रशंसति ॥ (७।८६।३)
(२०) प्रथम मोह बहु छळी मला ही । रामविमुख सुखनिद्रा नाहीं ॥
(२१) पुरुष नारिला त्यजुं शके जो विरक्त मतिधीर ।
न तु कामी विषयां वश विमुखचरणरघुवीर ॥ (७।११५ रा)
(२२) फुलतीं नभिं जरि बहुविध फूल । जीवा सुख न हरीप्रतिकूल ॥
अंधारें जरि रविस गिळावें । रामविमुख न जीव सुख पावे ॥
अनल जरी प्रगटला हिमांतुनि । विमुख राम सुख पावे ना कुणि ॥
(७।१२२।१६,१८,१९).

रामविमुख आणि भक्तिहीन जिवांना सुख मिळणें शक्य नाहीं, हें कळूनसुद्धां जे राम-भक्ति करीत नाहींत त्यांच्याविषयीं मानसांत काय म्हटलें आहे तें पाहिलं पाहिजे

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१५ 卐 卐 卐

दुर्दैवी मंदमति कोण ?

(१) हृदयीं हरिभक्ति न आणिति जे । *जीत शवासम* गणा प्राणि ते ॥
(१।११३।५)
(२) प्राणां प्राणहि जिवा जिव सुखास सुख तुम्हि राम ॥
त्यजुनि तुम्हां ज्यां रुचे गृह तात । *तयां विधि वाम* ॥ (२।२९०)
(३) वदत भरत-सद्भावा ऐकत । सितारामपदिं कोण नव्हे रत ? ॥
भरता स्मरतां रामप्रेम न । सुलभ जया, त्यासम जगिं वाम न ॥ (२।३०४।२-३)
(४) जातिहीन अघजन्म-महि कृता मुक्त अशि नारि ॥
विसरुनि ऐसा प्रभु मना ! । जड सुख इच्छिसि भारि ॥ (३।३६)
(५) वदा कुणा प्रभुची अशि रीती । दासांवर ममता नी प्रीती ॥
प्रभु न असा, भ्रम त्यजुनि भजति जे । ज्ञानरंक *जडमति* अभागि ते ॥
(३।४५।२-३)

(६) म्हणे हनू प्रभु *तीच विपत्ती । स्मरण भजन तव यदा न घडती* ॥
(४।३२।३)

(७) 'त्यजुनि असा प्रभु भजती आना । ते नर पशु, विण पुच्छ-विषाणां ॥'
(५।५०।१) असें शंकरांनीं पार्वतीस सांगितलें.

(८) श्रीरघुवीर-प्रतापहि तारि जलधिं पाषाण ।
मतिमंदचि रामा त्यजुनि भजति वृथा प्रभु आन ॥ (६।३)

(९) निशिचर अधम मलाकर त्यास दिलें निज धाम ।
गिरिजे ! *ते नर मंदमति* भजति न जे श्रीराम ॥ (६।७१)

(१०) बहुभाग्यें मानुषतनु मिळली । सुरदुर्लभ सद्ग्रंथिं गाइली ॥ ७ ॥
साधन धाम दार मोक्षाचें – । मिळुनि, न मिळविति पर-लोका जे ॥ ८ ॥
दो०– पावति दुःख परत्र ते शोचति शिर बडवीति ।
काळा कर्मा ईश्वरा वृथा दोष लावीति ॥ (७।४३)

(११) नर तनु भववारिधींत तारू । सन्मुख मरुत कृपा मम चारू ॥
कर्णधार सद्गुरु दृढ नावे । दुर्लभ साज सुलभतें पावे ॥ ८ ॥
दो०– जो न तरे भवसिंधु नर पावुनि यां सर्वांस ।
तो *कृतघ्न जडधी* लभे गति जी आत्मघ्नास ॥ (७।४४)

असें श्रीरघुनाथच भक्तिगीतेंत म्हणाले आहेत.

भगवद्भजन न करणारांस जड, जिवंत शव, पुच्छविषाण (शिंगें) नसलेले पशु, दुर्दैवी, मंदमति, कृतघ्न, आत्मघातकी इत्यादि म्हटलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १२।१६ 卐 卐 卐

भक्तापराध्यास शासन

श्रीहरिभक्तांना अडचणींत अकल्पित रीतीनें साह्य मिळतें व अभक्तांस तसें मिळत नाहीं हें मागें दाखविलें. भक्तांचा अपराध करणारांस शिक्षा केली जाते याचीं उदाहरणेंहि श्रीमानसांत आहेत. त्यांतील ठळक ठळक पुढें दिलीं आहेत.

'रघुनाथा हा स्वभाव जाणा । निज अपराधें क्रोध कदा ना ॥
भक्तांच्या अपराधा करती । रामरोषपावकिं ते जळती ॥ (२।२१८।४-५)

हें देवगुरु बृहस्पतींनीं इन्द्रास सांगितलें आहे. भगवंताचा अपराध कोणीं केला तरी त्यांस कधीं क्रोध येत नाहीं; पण भक्तांचा केलेला अपराध प्रभूला सहन होत नाहीं, भगवंतास फार रोष येतो व ते भक्तापराध्यांस शासन (शिक्षा) करतात.

भक्तापराध करणारांत मानसांत दोन वर्ग दिसतात. अभक्त, रामविमुख, असून भक्तापराध करणारे हा एक वर्ग; आणि स्वतः भक्त असून भक्तापराध करणारे हा दुसरा वर्ग. भक्तापराधी अभक्तांस रोषानें कडक शासन केलें जातें; आणि भक्तापराधी भक्तांस तसें शासन न करतां त्यांस आपल्या मायेनें मोहित करून चांगली आठवण राहील असें दुःख, कष्ट देऊन, त्यांची फजीती करवून प्रभु त्यांस वठणीवर आणतात.

बालकाण्ड—१. सती दक्षकुमारी—'शंकरशब्दां मीं न मानलें', 'म्यां कृत कपटा शंभुसी' असें सतीच पुढें म्हणाली. रामभूपप्रिय शंकरांचा अपमानरूपी अपराध केला म्हणून प्रभूंनीं आपल्या मायेनें तिला मोहित केलें. दीर्घ काळपर्यंत तिला पश्चात्तापाच्या भट्टींत टाकून तिचा अहंकार जिरवून तिच्यावर कृपा करण्याच्या हेतूनें सर्व केलें-करविलें.

सती कैलासास जाऊन पोहोचण्यापूर्वींच मनांतल्या मनांत पश्चात्ताप सुरूं झाला. '**निज अघ समजुनि वदवत नाहीं। ताप अव्यासम उरिं अति दाही॥**' (५८।४) अशा प्रकारें ८७ हजार वर्षें तोंड दाबून पश्चात्तापदग्ध झाल्यावर, सती मनानें रघुनाथास शरण गेली आणि आपलें पतिप्रेम तिनें पणास लावलें; तेव्हां तिच्या इच्छे-प्रमाणें त्या देहांतून तिला सोडविलें. पार्वतीदेहानें शंकरांसाठीं तप करीत असतां स्वतः प्रभूंनींच तिच्यावर कृपा केली. शिवापराधामुळेंच सतीला मोहित करून दुःख भोगविलें व शेवटीं कृपा केली.

२. दुसरें, उदाहरण नारदाचें—कामविजयाच्या अहंकारानें नारदानें शिवापराध केला; म्हणून मायामोहित करून नारदाची फटफजीती करविली व शेवटीं मायेला आकर्षून घेतल्यावर शिवशतनामाचा जप हें प्रायश्चित सांगून सावधगिरीच्या सूचना चांगलें बजावून दिल्या.

३. ताटका, सुबाहू वगैरे—भक्तापराधी अभक्तांस ठार मारलें; मारीचाच्या भक्तिहीनतेचा व दुष्ट स्वभावाचा संहार केला; आणि रावणवधनाटकांतील सीताहरण प्रवेशांतील एक फार महत्त्वाचें उपयुक्त पात्र म्हणून त्यास जिवंत ठेवलें.

अयोध्याकाण्ड — १. निषादराज गुहानें भरताविषयीं नसते संशय घेऊन त्याच्याशीं युद्ध करण्याची तयारी केली हा भक्तापराध केला पण तो स्वतःच भरतास भेटण्यास गेला म्हणून शिक्षा नाहीं.

२. लक्ष्मण—श्रीरामसेवामूर्ति लक्ष्मणास श्रीरामदुःखचिंता पाहून भरताविषयीं संशय आले व भरताच्या पाठीमागें त्याच्यावर भलतेच दोषारोप केले. श्रीरामदुःख न पाहवल्यानें आणि *लीलाप्रिय श्रीराम मौन राहिल्यानें* लक्ष्मणाचा क्रोधकृशानु भरतास युद्धांत जाळून टाकण्यास सिद्ध झाला; तेव्हां त्यास आकाशवाणीकडून वाक्ताडन करविलें.

'**अनुचित उचित कार्य कीं बघती। समजुनि कराति बरें त्या म्हणती॥**

सहसा करुनी मग पस्तावति । तेना बुध; बुध वेदहि सांगति ॥'

श्रवुनि देववच लक्ष्मण लाजति ॥ (२।२१३।३–५)

आकाशवाणीनें लक्ष्मणास अविचारी अबुध ठरविलें. *शहाण्यास शब्दाचा मार पुरता.* या शिक्षेचा परिणाम असा झाला कीं यानंतर पुढें केव्हांही लक्ष्मणानें उतावीळपणा केला नाहीं.

अरण्यकाण्ड — १. पहिल्याच दोन दोह्यांत *पाहिलें उदाहरण सुरपतिसुताचें.* रामभक्त सीतेची आगळीक केली म्हणून त्या काकरूपधारी सुरपतिसुतावर ब्रह्मास्त्र सोडलें; पण तो शरण आला म्हणून ठार न मारतां एकाक्ष करून जिवंत ठेवलें.

सो०—करी द्रोह मोहून, जरी तयाचा वध उचित ।

प्रभु सोडिती द्रवून कुणि कृपालू रघुवीरसम ॥ (३।२)

२. शूर्पणखा—जोंपर्यंत ती नुसत्या कामचेष्टाच करीत होती व विवाहाची भाषा बोलत होती तोंपर्यंत दोन्ही बंधूंनीं तिची थट्टाच केली; पण जेव्हां ती –

चिडूनि जाइ मग रामाप्रती । प्रगटी भेसुर रूपा अती ॥ (३।१७।१९-२०)

तेव्हाच तिचे नाक-कान कापण्याची खूण अनुजास केली. शूर्पणखा अभक्त, दुष्ट होती.

३. सीता — रावणानें जिला पळवून नेलें ती सीता लक्ष्मणाला वाटेल तें बोलली; त्याच्यावर भलतेच आरोप केले याबद्दल तिला १४-१४।। महिने रामविरह, लंकेंत निवास व रावणाचा व त्याच्या राक्षसींचा छळ सोसावा लागला. सीता स्वतःच म्हणते,

'हा! लक्ष्मण! तुम्हि पात्र न रोषा । *फळ आलें* कीं *मत्कृत दोषा* ॥ (३।२९।३)

जो विधि दुःसह दुःखें सहवी *लक्ष्मणास कटु वचनें वदवी* ॥' (६।९९।८)

४. रावण—सीतेला चोरून नेलें हा घोर अपराध रावणानें केला; पण तो शिवभक्त जाणून रघुवीरानें अरण्यांतूनच ब्राह्मस्त्र सोडलें नाहीं. तो जेव्हां आणखी भक्तापराध करील तेव्हां प्रभु त्याच्या वधाच्या उद्योगास लागतील.

किष्किंधाकाण्ड—१. वाली — विष्णुभक्त किंवा शिवभक्त नव्हता. त्यानें प्रथम भावाच्या स्त्रीचा बलात्कारान अपहार केला हा एक घोर अपराध घडलाच होता; पण तो मुख्य नसून त्यानें रामाश्रितापराध केला.

(**क**) **मम भुजबल आश्रित तो कळुनी । मारूं बघसि अधम-अभिमानी ॥**

श्रीरामशरणागताला ठार मारण्याचा प्रयत्न वालीनें केलेला प्रभूंनीं प्रत्यक्ष पाहिला तेव्हां मग वालीला बाण मारला. सुग्रीव रामशरणागत असल्यानें तुमचा निभाव लागणार नाहीं असें तारेनें बजावलें होतें.

(**ख**) वालीला मर्मी बाण मारून पाडलें; पण ठार मारलें नाहीं. त्यास जिवंत ठेवण्यास राम तयार होते. 'अचल करूं तनु राखी प्राणां' असें वालीला सांगितलेंहि; व त्याच्या मस्तकावर हातहि ठेवला; पण भगवंतास ओळखल्यामुळें त्यानें जगण्याचें

नाकारलें; अंगदास रामाच्या पदरांत घालून भक्ति मागून घेतली.

सुंदरकाण्ड — १. रावणानें भक्तापराध केला — बिभीषणाला लाथा मारल्या. बिभीषण शरण येईपर्यंत मानसांतील श्रीरघुपतीनें सागरलंघनाचा विचारही केला नव्हता. सागरतीरावर तळ देऊन स्वस्थ होते. बिभीषण शरण आल्यानंतरच सागरलंघनाचा विचार सुरू झाला; व रावणाच्या वधाचा निश्चयही मनांत केला; म्हणूनच बिभीषणाला आधींच लंकाराज्यतिलक सागरतीरावरच केला व लंकापति असें त्यास म्हटलें.

लंकाकांड — १. रावणानें पुन्हां भक्तापराध केला — लंकेंत युद्ध सुरू झाल्यावर व बऱ्याच राक्षसांचा संहार झाल्यावरसुद्धां रघुवीर रावणास नुसते खेळवीत राहिले. त्याचीं शिरें आणि बाहू छाटण्याचा खेळ खेळत होते; पण मर्मीं बाण मारला नाहीं (९१, ९२ पाहा). (क) बिभीषणानें रावणास युद्धाचें आह्वान दिलें नव्हतें किंवा त्यानें रावणावर शस्त्रप्रहार केला नव्हता. रामरावणयुद्ध चालू होतें व बिभीषण नुसता बाजूला उभा होता, असें असतां —

क्रुद्ध होइ दशकंठ तैं सोडी शक्ति प्रचंड ।
जाइ बिभीषण–सन्मुख जणुं काळाचा दंड ॥ ९३ ॥

रावणानें प्राणघातक शक्ति बिभीषणावर फेकली–सोडली, ती शक्ति शरणागत बिभीषणास ठार मारणार असें दिसतांच —

मागें करुनि बिभीषण सत्वर । राम घेति शक्ति अपणांवर ॥
क्षण मूर्च्छा शक्ती लागतां । *प्रभुचा खेळ* सुरां विकलता ॥ (९४।२-३)

श्रीरघुवीरशरणागताला, रामभक्ताला ठार मारण्याचा प्रयत्न रावणानें केला हें प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां मात्र तो वधार्ह ठरला.

उत्तरकांड— १. शूद्र शिवभक्तानें ज्ञानी, दयाशील शिवभक्त ब्राह्मण गुरूचा जाणून बुजून अपमान केला तेव्हां त्यास ठार न मारतां महेशांनीं त्यास घोर शाप दिला व त्याचा गर्व धुळीस मिळविला.

भक्तापराध्यांस शासन करण्याचे विविध प्रकार साती सोपानांतील वर दिलेल्या उदाहरणांत दिसून येतात.

राम आणि शिव यांचें या बाबतींत स्वभावसाम्य आहे हें उत्तरकांडांतील उदाहरणानें दाखविलें आहे. शिवपुराणांत शिव, विष्णु यांचा असाच संबंध वर्णिला आहे.

भक्तांच्या अपराधा करती । रामरोष *पावकिं* ते जळती ॥

यांतील पावक (पावन करणारा) शब्द भावगर्भित आहे. ज्यांना ज्यांना शासन केलें त्या सर्वांना पावन करून त्यांचें कल्याणच केलें आहे. या विधानाविषयीं शंका घेण्यास दोनच जागा आहेत. सुरपतिसुत (जयन्त) आणि शूर्पणखा.

(क) जयन्ताचा एक डोळा फुटल्यामुळें तो कुरूप झाला; व सुरपतीप्रमाणें व्यभि-

चार करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसला; व स्त्रियांच्या वाटेस पुन्हां जाणार नाहीं अशी जरब बसली. त्याच्या दुष्कृत्याची जिवंत जाहिरात त्याच्या मुखावरच कोरली गेली !

(ख) शूर्पणखेचे नाककान कापल्यानें तिची व्यभिचारप्रवृत्ति बंद पडली, कोणालाहि तोंड दाखविण्यास जागा राहिली नाहीं हें तिचें कल्याणच केलें . अशी *अपराध-प्रतिबंधक शिक्षा कल्याणकारी असते.*

' भक्ति ' हें बारावें मुख्य प्रकरण व त्यांतील हें सोळावें उपप्रकरण येथें समाप्त झालें. चंद्र सोळा कलांनीं पूर्ण होतो तसें हें श्रीरामचंद्रभक्तीचें प्रकरण विनाप्रयत्न सहजच १६ प्रकरणरूपी कलांनीं पूर्ण झालें.

ज्या रघुपतीची भक्ति करावयाची त्याचें मानसांतील वैशिष्ट्य दाखविणें आतां क्रमप्राप्त आहे. पुढील तेराव्या मुख्य प्रकरणांत १८ प्रकारांनीं तें दाखविलें आहे.

◆◆◆◆

१३ : स्वामी रघुपति-समान नाहीं

卐 卐 卐 १३।१ 卐 卐 卐

" स्वामी रघुपति-समान नाहीं " हा सिद्धान्त प्रत्येक कांडांत अनेक वेळां प्रतिपादन केलेला आढळतो. येथें प्रत्येक सोपानांतील १।२ वचनांचाच संदर्भासह संग्रह केला आहे.

बालकांड— १. राम तोषती प्रेमें निर्मल। मजसम जगिं कुणि मूढ अमंगल ॥ ११ ॥

दो.– शठ दासाच्या कृपानिधि राखी प्रीति रुचीस।
करि उपलां जलयान जो सुमति सचिव कपि रीस ॥ २८ रा ॥
(उपल = पाषाण, जलयान = नौका, होडी, जहाज, तारूं.)
वदति अबद्ध हृदयिं रसभरती। जन–मन जाणुनि राम रीझती ॥
प्रभुमनिं राहि न चूक कृतीची। स्मरती शतदां स्थिती हृदींची ॥
अघें व्याध इव ज्या हत वाली। करि सुकंठ मग तीच कुचाली ॥
तीच कृती मग बिभीषणाची। स्वप्निंहि रामा स्मृति न तयाची ॥
भेटत भरता त्यां गौरविलें। रघुवीरें नृपसदसिं वर्णिलें ॥

दो.– प्रभु तरुतळिं विटपीं कपी केले त्यां स्वसमान ॥
तुलसी कुठें न *रामसे स्वामी शीलनिधान* ॥ (२९।४–२९ रा)

अयोध्याकांड —१. भरत म्हणतात,

' प्रभु पितरौ गुरु सुसखा स्वामी। पूज्य परम हित अन्तर्यामी ॥
सरल सुसाहिब शीलनिधानहि। प्रणतपाल सर्वज्ञ सुजाणहि ॥
अतिसमर्थ शरणागत-हितकर। गुणग्राहि सब अवगुण-अघ-हर ॥
आपणांसम आपण सुस्वामी। स्वामीद्रोहि जगीं मजसा मी ॥' (२९८।१-४)

२. पुन्हां भरतच सांगतात, (१९९।१-७)

' अपली रीति सुबाणा महती। जगतविदित निगमागम वदती ॥
क्रूर कुटिल खल कुमति कलंकी। नीच निशील निरीश निशंकी ॥
तेही सम्मुख शरण परिसतां। सकृत् प्रणमतां अपले करतां ॥
दोष दिसुन कधिं मनिं न आणितां। श्रवुनि गुणां संतांत वानितां ॥
स्वामि कोण दासांस रक्षतो। स्वयें सकल साजां जो सजतो ॥
*निज*करणी स्वप्नीं ना स्मरतां। जन-संकोच शोच मनिं धरतां ॥
असा स्वामि नहिं दुसरा कोणी। वदें करुनि पण भुज उचलोनी ॥'

अरण्यकांड — १. अत्रिमुनींच्या आश्रमांतून निघून दुसरीकडे जातांना श्रीरघुवीर म्हणतात,

कृपानिधी मग मुनिला विनवति । ' जाऊं अनुज्ञें अन्य वनाप्रति ॥
कृपा मजवरी सतत करणें । दास समजुनी प्रीति न तजणें ॥ '
धर्मधुरंधर प्रभुवच परिसुनि । प्रेमानें वदले ज्ञानी मुनि ॥
यत्कृपेसि अज शिव सनकादिहि । वांछिति परमार्थवादि सर्वहि ॥
राम ! अकामप्रिय आपण ते । दीनबंधु मृदु वचना वदते ॥
श्रीचातुरी अतां मज कळली । त्यजुनि देवगण तुम्हांस भजली ॥
ज्यांसम, अतिशय कोणी नाहीं । शील असें कां नसेल त्यांही ॥
कसें सांगुं जा आतां *स्वामी* । वदा नाथ ! तुम्हि अन्तर्यामी ॥ ' (६।२-९)

किष्किंधाकांड १. शंकर उमेस सांगतात,

' उमे ! *रामसम जगिं हितकर्ता । बंधू प्रभु गुरु पिता न माता* ॥
सुर नर मुनि सर्वांची रीती । स्वार्थास्तव सब करिती प्रीती ॥
वालिभयें व्याकुळ दिनरातीं । तनु सव्रण चिंताज्वर छातीं ॥
तो सुकंठ केला कपिराव । अतिकृपालु रघुविरस्वभाव ॥
कळुनिहि अशा प्रभुस परिहरती । विपज्जालिं नर कां ना पडती ? ॥(१२।१–५)

सुंदरकांड —१. या काण्डांत मंगलाचरणाच्या श्लोकांतच श्रीरघुनाथाची सर्वश्रेष्ठता दाखविली आहे.

शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं *निर्वाण-शान्तिप्रदम्* ।
ब्रह्माशम्भुफणीन्द्र-सेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम् ॥
रामाख्यं जगदीश्वरं *सुरगुरुं मायामनुष्यं* हरिम् ।
वन्देऽहं करुणाकरं *रघुवरं भूपालचूडामणिम्* ।

२. दो. — रावण-कोप अनल, निज श्वास समीर प्रचंड ॥
जळत बिभीषण राखिला दिधलें राज्य अखंड ॥ ४९ रा ॥
जी संपत् शिव रावणा देति देत दशमाथ ।
बिभीषणा ती भूति दे संकोचें रघुनाथ ॥ ४९ म ॥
त्यजुनि असा प्रभु भजती आना । ते नर पशु विणपुच्छविषाणां ॥ (५०।१)

लंकाकांड —१. हनुमान आणि अंगद यांनीं लंकेंत उत्पात सुरू करून राक्षसांचा संहार करण्यास प्रारंभ केला तेव्हां त्यांना—

महा महा जे प्रमुख सांपडति । धरुनि पदां प्रभुपासिं झुगारति ॥
वदे बिभीषण त्यांच्या नामां । *त्यांसाहि राम देति निजधामा* ॥
खल नराद विप्रामिष-भोगी । पावति गति जी याचिति योगी ॥
उमे ! राम मृदु-मन करुणाकर । ' मज रिपुभावें स्मरति निशाचर ॥ '

असें समजुनी देति परमगति । *कोण कृपाल असा वद पार्वती !* ॥
श्रवुनि *असे प्रभु* **त्यजुनी श्रम नर । भजति न जडमति अभांगि पामर** ॥
(४५।१-६)

२. रावणवधानंतर मंदोदरी रावणाच्या शवाजवळ बसून विलाप करते व शेवटीं म्हणते,

दो. — ' **अहह नाथ !** *रघुनाथसम कृपासिंधु नहिं आन ।*
योगिवृंद-दुर्लभ-गति देति तुला भगवान ॥' (१०४।१२ पासून १०४पाहा).

उत्तरकांड —१. भुशुंडी गरुडास सांगतात,

' **महिमानामरूपगुण-गाथा । सकल अनंत अमित रघुनाथा** ॥
निज निज मति मुंनि हरिगुण गाती । ***निगम शेष शिव पार न जाती*** ॥
निरुपम, न उपमा आन *रामाचि राम-सम* **वदती श्रुती** ॥ ' (९१।३-४,९२ छं.)

२. भुशुंडी गरुडास सांगतात,

' ***शिव-अज-पूज्य चरण जे रघुवर*** । **कृपा राम मृदुलता किं मजवर** ॥
कुठें स्वभाव न हा श्रुत, देखूं । नाथ कुणा रघुपति-सम लेखूं ॥ ' (१२४।३-४)

३. श्रीतुलसीदासजी उपसंहारांत म्हणतात,

' *सुंदर सुजाण कृपानिधान अनाथिं करतो प्रीति जो ।*
तो एक राम अकामहित निर्वाणदायक नान्य तों ॥ '
ज्याच्या कृपालेशामुळें — मतिमंद तुलसी-दास ही ।
पावे परम विश्राम तो *प्रभु रामसम कोठें नहीं* ॥ (१३०, छं. ३)

या प्रकरणांत दिलेलें पहिलें वचन तुलसीदासजींचेंच आहे.

'स्वामी रघुपति-समान नाहीं' हें दाखविणाऱ्या वरील विविध वचनांत श्रीराम-स्वभावाचें थोडेंसें निदर्शन केलेलें आहेच तथापि श्रीमानसांतीलें रामस्वभावाचें आणखी विस्तृत वर्णन मानसांत आहे. त्याचें थोडेसें निदर्शन पुढील प्रकरणांत केलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।२ 卐 卐 卐

मानसांत श्री-रामस्वभाव

श्रीरामचरितमानसांतील सर्वच चरित्रें अत्यंत निर्दोष व परमोच्च आदर्श आहेत. इतकीं निर्दोष चरित्रें व असे परमोच्च आदर्श वाल्मीकि, अध्यात्म, आनंद, अद्भुत हीं रामायणें, प्रसन्नराघव व हनुमन्नाटक; या संस्कृत रामायणांत किंवा भावार्थ रामायण, मयूरकवीचीं रामायणें व रघुनाथपंडितादिकांचें रामायणविषयक काव्य इतक्यांत तरी नाहींत.

श्रीरामावतारास मर्यादापुरुषोत्तम म्हणतात. **'मर्यादापुरुषोत्तम' या नांवाची पूर्ण सार्थकता मानसांतच पाहण्यास सांपडते.** मानसांतील श्रीरामस्वभावनिदर्शक कांहीं वचनांचा संग्रह या प्रकरणांत केला आहे.

(१) बालकांडांतील श्रीरघुवीराच्या स्वभावाचें वर्णन मागील प्रकरणांत (१३।१) आणि 'पुत्रशिष्यधर्म' (११।१०) या प्रकरणांत सारांशरूपानें आहे तें पाहावें.

अयोध्याकांड–(२) कुणि रघुवीरासम संसारां। *शीला स्नेहा निभावणारा॥* (२४।४) स्नेहाला वश होऊन शीलांत व नैतिक आचरणांत जरासुद्धां न्यूनता येऊं न देणें हें ध्येय सर्वत्र पाळलें आहे; व इतरांससुद्धां प्रभूंनीं तेंच सांगितलें आहे. येथें शीलाचा उल्लेख स्नेहापूर्वी केला आहे तसाच अनेक ठिकाणीं आहे व नीतीचा उल्लेख प्रीतीपूर्वी केलेला आहे. '*नीती-प्रीति-पाल* रघुराजा'

(क) **मंगलसमयीं** *स्नेहवश शोक नसावा* **तात!** ॥ ४५ ॥ वनांत जाणें हा मंगलसमय वाटला. दिलेलें वचन पाळण्याची संधि दशरथांस मिळाली म्हणून त्यांनींहि रामवनगमन हा मंगलसमयच मानणें योग्य आहे हें *रघुनाथानें दशरथांस सुचविलें आहे. वनगमनसमयीं अशी विनंति दशरथांस केल्याचें उदाहरण इतर रामायणांत आहे काय ?*

(ख) '*चुकुनि न घाबरि हो स्नेहास्तव।*' (५३।८) असें कौसल्येला सांगितलें आहे. वाल्मीकी रामायणांतील राम कष्टी होऊन व जोरानें हत्तीसारखे निश्वास सोडीत कौसल्येकडे गेले आहेत. 'रामस्तु भृशमायस्तो निःश्वसन्निव कुंजरः।' वाल्मीकि रामायणांतील कौसल्याभेटींतील राम आणि कौसल्या; मानसांतील राम व कौसल्या यांच्यासारखे आदर्श, धीरगंभीर, नयनागर नाहींत. मुद्दाम तुलना करावी.

(ग) '**बाळ! न होणें** *प्रेमें कातर।*' (७०।८) असें लक्ष्मणास म्हणाले. '*शील* स्नेहार्जव-सुखसागर' (७०।७).

***नीति प्रीति* परमार्था स्वार्था । कुणि न रामसम जाणि यथार्था ॥** (२५४।५) असें वसिष्ठ म्हणाले. यांतसुद्धां शील आणि नीति यांचें स्नेह = प्रीति-पेक्षां अधिक महत्त्व दाखविलें आहे.

(३) '*स्नेहविवश ही करिल अकाज*' (७३।७) असें सुमित्रेकडे गेल्यावर रामसेवामूर्ति लक्ष्मणाससुद्धां वाटलें आहे.

याप्रमाणें अयोध्याकांडांतीलच नव्हे तर मानसांतील संपूर्ण रामचरित्रांत स्नेहापेक्षां नीतीलाच अधिक महत्त्व दिलेलें आढळतें. 'राम सदा सेवकरुचि राखिति' (२१९।७) असा सर्वसाधारण अनुभव असला तरी सेवकरुचि नीतिविरुद्ध वागावयास लावणार असें दिसतांच राम वज्राहून कठोर होऊन त्यांनीं अंगदाची रुचीच नव्हे तर अगदीं परम प्रेमानें कळवळून केलेली प्रार्थनासुद्धां अमान्य केली आहे व त्यास अयोध्येंतून किष्किंधेस परत पाठविलें आहे. रामसखा निषादानें आपल्या गांवांत चलण्याबद्दल

केलेली प्रार्थना अमान्य केली. १४ वर्षें वनवासांत बरोबर राहून सेवा करण्याची लालसा निषादराजाला होती पण त्याला फक्त दोनच दिवस राहूं दिलें व परत पाठविलें. रावणवधानंतर लंकानगरींत प्रवेश करून स्नान करून रणश्रम दूर करावेत अशी बिभीषणानें केलेली विनंति मान्य केली नाहीं.

नीति, प्रीति, परमार्थ आणि शेवटीं स्वार्थ अशा क्रमानेंच राम महत्त्व देतात. नीति-(धर्म)-रक्षणार्थ बाकी सर्व गोष्टींना गौणपणा देणें हाच मानसांतील रामचरित्राचा ध्रुवतारा आहे. नीतीलाच धर्म म्हटलें आहे. **नीतीच्या आड न येणाऱ्या प्रीतीलाच राम वश होतात; प्रीतिसाठीं नीतीचा भंग करीत नाहींत.**

(४) **करुणामय रघुनाथ गो-पती। शीघ्र परावी पिडा पावती ॥** (८५।२)

(५) **रघुनाथा हा स्वभाव जाणा। निज अपराधें क्रोध कदा ना।**
भक्तांच्या अपराधा करती। राम रोष-*पावकिं* ते जळती ॥ (२१८।४-५)
रामरोष अति भीषण *पावक*। (३।२९।१७)

तो भीषण असला तरी पावक = पावन करणारा असतो. (प्र. प्र. १२।१६ पाहा).

(६) **तरिहि समानचि राग रोष ना। पाप पुण्य गुणदोष घेत ना ॥** (२१९।३)

(७) **राम सदा सेवक-रुचि राखिति। वेद पुराण साधु सुर साक्षिति ॥** (२१९।७)

आतां इतर कांडांतील वचनें पाहावीं —

(८) **अतिकृपालु रघुनायक संतत दीनीं स्नेह।** (३।९)

उदाहरण–**श्रवत राम अति कोमल वाणी। वालिशिरीं स्पर्शति निज पाणी ॥** (४।१०।१).

(९) श्रीराम म्हणाले,
'कोटि विप्रवध पापजयाही। येतां शरण, न त्यजूं तयाही ॥' (५।४४।१)

(१०) **निर्मल मन जन तो मज पावे। मला कपट छल छिद्र न भावे ॥** (५।४४।५)

(११) **मद्द्रोही प्रिय शंभु ज्यां शिवद्रोहि मम दास।**
ते नर करती कल्पभर नरकीं घोर निवास ॥ (६।२)

(१२) **छंद—संसारिं नर या, त्रिविध पांटल-आम्र-पनसाचे समा ॥** (८६।९०छं.)

रामस्वभाव फणसासारखा – न बोलतां करणाराचा – आहे. रावणाचा पाटल वृक्षासारखा आहे. (टीका पाहा).

(१३) **'रघुनाथसम कृपासिंधु नाहिं आन।'** (६।१०४) असें मंदोदरी रावणवधानंतर म्हणाली.

(१४) **देव-तरूसा स्वभाव देवा। सन्मुख विमुख न कधिं कोणा वा ॥** (२।२६७।८)

(१५) प्रभु नारदास म्हणाले,
'मत्स्वभाव मुनि! तुम्हां ठाउका। काहिं कधीं भक्तांस लपवुं का ? ॥
प्रिय अशि वस्तुहि मला कोणती। मागुं शका ना मुनि आपण ती ॥
जनां अदेय नसे मम कांहीं ॥ (३।४२।३-५ टीका पाहा.)

(१६) **समदर्शी मज म्हणति सकलही। प्रिय मज अनन्यगति सेवकही ।।** ४।३।८)

(१७) '**शरणागतवत्सल भगवंत**' (५।४३।९) असें हनुमान म्हणाले.

(१८) '**नयनानंद-दान जे दाते**' (५।४५।२) दर्शन होऊनसुद्धां प्रभूंनीं दिला तरच आनंद मिळणार !

(१९) **गिरिजे! रघुपतिची ही रीती। संतत करती प्रणतीं प्रीती ।।** (६।३।६)

(२०) **उमे! योग जप दान तप नाना व्रत मख नेम।**
रामकृपा ना करिति जशि निर्मल करतां प्रेम ।। (६।११७ म.)

(२१) **प्रभु जन-अवगुण मनीं न आणति। स्वभावेंचि मृदु दीन बंधु अति' ।।** (७।१।६) भरत म्हणाले.

(२२) श्रीरघुनाथ स्वतः सांगतात,
सेवक तो प्रियतम मम तोही। मम अनुशासन मानी जोही ।। (७।४३।५)
'अथ रामानुशासनम्' (१३।५) हें प्रकरण पाहावें.

(२३) '**पहा स्वभाव सहज रामाचा। नुरविति कधिं अभिमान जनाचा ।।** (७।७४।५); (१।१२९।४५ पाहा.)

(२४) **सर्वां प्रिय सेवक ही नीती। दासावर मम अधिका प्रीती ।।** (७।१६।८)

(२५) '**ब्रह्मकुलद्रोहि न मज रुचतो**' (३।३३।८) असें राम स्वतः म्हणाले आहेत.

(२६) कोणी क्वचित ज्ञानसंपन्न झाला तरी श्रीरघुनाथ म्हणतात,
'**भक्तिहीन तो प्रिय नाहिं मजला ।।**' (७।४५।४).

(२७) 'प्रभु ब्रह्मण्यदेव' (१।२०९।४) असें विश्वामित्र म्हणाले.

(२८) **विस्मय** (= विषाद) **हर्ष न मुळिं रघुरावा।**' (२।११२।३)

(२९) **सेवकहितकारी *अमचा पण*।**' (१।१२९।५) असें प्रभु म्हणाले.

(३०) **मी पुरवीन मनोरथ तुमचा। सत्य सत्य *पण* सत्य *आमचा* ।।** (१।१५२।५) प्रियतम सेवकाचा मनोरथ पूर्ण करणें हा प्रभूचा पण आहे.

(३१) '***प्रणतपाल पण* प्रभु निज पाळिती ।।** (२।२६७।५).

(३२) **एकाचि *बाणा* कृपानिधाना। तो प्रिय ज्यातें गति ना आना।** (३।१०।८)

(३३) '*शरणागत भयहारी* **मम** *पण* ।।' (५।४३।८) श्रीरघुनाथ वचन आहे.

(३४) *प्रणतार्ति भंजन* **माझा** *पण* ।। (६।९४।१)

(३५) '***जीव भक्तिमान्* नीच जरि महा। *प्राणांप्रिय* मज, *बाणा* मम *हा* ।।**' (७।८६।१०) राम म्हणाले.

(३६) **यस्य** *पतितपावन बाणा* **अति** ।। (७।१३०।७)

(३७) '*दीनदयाळू ब्रीद*' (५।२७।४); ३।८।४-५ पाहा.

श्रीरामस्वभावाचें वर्णन करणारीं हीं मानसांतील कांहीं थोडीं वचनेंच वर दिलीं आहेत. २९–३७ या नऊ वचनांत श्रीरामाचे नऊ पण = प्रतिज्ञा = बाणा = ब्रीद यांचें

वर्णन आहे. शक्य तों द्विरुक्ति टाळण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मागील अनेक प्रकरणांत रामस्वभावनिदर्शक अनेक वचनें आलीं आहेत व पुढील अनेक प्रकरणांतहि बरींच येतील. श्रीमानस हा श्रीरामचरितसागरच असल्यानें कितीहि अवतरणें दिलीं तरी थोडींच !

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।३ 卐 卐 卐

श्रीरामेच्छा अनुल्लंघ्य

जें कांहीं घडविण्याची रामाची इच्छा असते तेंच घडतें; त्या इच्छेचें उल्लंघन कोणीच करूं शकत नाहींत; असें याज्ञवल्क्यांनीं भरद्वाजांस सांगितलें.

राम करूं इच्छिति तें घडतें । कोणि नसे जो करी उलट तें ॥ (१।१२८।१)
शंकरांनींसुद्धां याच अर्थाचें वचन उच्चारलें आहे,

' करिति शंभु अनुमान इथं मनां । दक्षसुता-कल्याण दिसत ना ॥
संशय हटति न मी वदतांही । विधि विपरीत भलाई नाहीं ॥
तेंच घडे जें रामा वाटे । **तर्क करुनि कां फोडूं फाटे ॥** (१।५२।७)

ज्या वेळीं कोणी सुप्रसिद्ध संत, सती इत्यादिकांकडून त्यांच्या स्वभावाविरुद्ध आचरण घडतें, तेव्हां इतरांनीं त्याविषयीं तर्क–अनुमानें–करीत बसूं नये. ' *हरि* इच्छा भावी बलवान् अति ' असें समजून शं–करासारख्या महेश्वरानें जें केलें तेंच करावें– ' असें म्हणुनि *हरिनामा जपती* । ' (१।५२।८). वरील अर्थाचीं वचनें इतर कांहीं काण्डांत आहेत.

अयोध्याकाण्ड — (१) **' रामाज्ञा कुणि मोडूं न शकती । '** (२।९९।७)
वसिष्ठांसारखे सर्व-समर्थ म्हणतात.

(२) ***विधि हरि हर रवि शशि* दिक्पालां । माये जीवां कर्मा काळा ॥**
अहिपां महिपां प्रभुता जितकी । योग सिद्धि निगमादी गदित कीं ॥
पहा विचार करून मनासी । *रामाज्ञाच शिरीं सर्वांसीं* ॥ (२।२५४।८)

ब्रह्मा विष्णु शिव हेसुद्धां रामाज्ञेच्या व रामेच्छेच्या विरुद्ध जाऊं शकत नाहींत; मग इतर मानवादि प्राणी काय करूं शकतील ! पुन्हां वसिष्ठ म्हणाले,

(३) **अपली आज्ञा सकलां मस्तकिं । विदित कृपाला गती समस्त किं ॥**
(२।२९१।४)

(४) भरत म्हणतात, **'रामाज्ञा मोडील मनांही । दर्शनिं कामिं कुणा कधिं नाहीं ॥'**
(२।९८।७)

अरण्यकाण्ड — वरील नियमाप्रमाणें घडल्याचीं उदाहरणेंच या काण्डांत आहेत. श्रीरघुवीरानें हसून जनकसुतेला सांगितलें कीं,

' पहा प्रिये व्रत रुचिर सुशीले । कांहिं करीन ललित नरलीले ॥

पावकांत तुम्हि करा निवासा । जैं मी करिन निशाचरनाशा ॥ (३।२४।१-२)

हसून असें म्हटल्याबरोबर त्या संकल्पानें अशीं चक्रें फिरूं लागलीं कीं—

(१) रावणाचा निश्चय एकाएकीं बदलला.

(२) ज्या वैदेहीनें ' अमुक करा ', ' मला अमुक द्या ' असें रघुनाथास कधीं विनविलेंसुद्धां नव्हतें तिनें सुवर्णमृगाचें चर्म आणून देण्याची आज्ञावजा विनंति केली.

(३) मारीच रामभक्त असून ' हा लक्ष्मणा ' असें कपटानें ओरडला.

(४) सीता लक्ष्मणास भलभलतें बोलली.

(५) ज्या लक्ष्मणानें रघुनाथाचा शब्द कधीं मोडला नव्हता त्याचा निश्चय ढळला.

' प्रेरित हरि लक्ष्मण मन ढळलें । ' (२८।५).

(६) रावणाला शाप देण्याची इच्छा सीतेला झाली नाहीं.

(७) जटायूचें लक्ष रावणाकडे आधीं गेलें नाहीं, इत्यादि अनेक गोष्टी चलच्चित्रपटांतील निर्जीव व्यक्तींच्या गतीप्रमाणें लागोपाठ घडल्या ! (विस्तार गूढार्थचंद्रिकेंत दिसेल.)

किष्किंधाकांड — ' *नव्हे वचन मम* मित्र ! *मृषा* हे ! । ' (७।२३) असें राम सुग्रीवास म्हणाले.

सुंन्दरकाण्ड — ' *प्रभु-आज्ञा* श्रुति वदति *अभंगा* । ' (५।५९।८) विप्ररूपधर सागर प्रभूलाच म्हणाला.

लंकाकांड — रावणाच्या अर्ध्याअधिक कटकाचा विनाश कपींनीं केल्यावर त्यानें आपल्या सचिवांना तांतडीनें बोलावून त्यांचें मत विचारलें तेव्हां माल्यवंतानें ' वैदेही परत द्या ' वगैरे सांगितल्यावर रावण त्याच्यावर फार चिडला व त्यानें त्याचा अतितिरस्कार केला तेव्हां माल्यवान आपल्या मनांतच म्हणाला कीं, ' वधूं बघति या कृपानिधान किं । ' (६।४९।४), कृपानिधान श्रीर*घुनाथाचीच* याचा वध करण्याची *इच्छा* दिसते म्हणूनच आपल्या उपदेशाचा असा उलट परिणाम झाला.

उत्तरकाण्ड — **' काल सदा दुरतिक्रम भारी । '** (९४।८) पण काळ रघुवीराच्या हातांतील कोदण्ड आहे. ' काल यस्य कोदंड ' (लंका. मं. दो.) आणि राम स्वतः ' कालकोटिशत सदृश अति दुस्तर दुर्ग दुरंत ।' (९१ म) असें असल्यामुळें श्रीरामाच्या इच्छेच्या व आज्ञेच्या विरुद्ध कोणी कांहीं करणें अशक्य आहे.

राम करूं इच्छिति तें घडतें । कोणी नसे जो करी उलट तें ॥

हें वचन दृष्टीपुढें नसेल तर मानसांत अनेक ठिकाणीं अर्थ लावतांना अनर्थ केला जातो व असंबद्धता उत्पन्न होते.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।४ 卐 卐 卐

श्रीरघुपतीला प्रिय कोण ?

(१) '**प्रिय मज शिवसम नाहीं दूजा**' असें रामच म्हणाले; म्हणजे **शंकर प्रियतम** (६।२।६). (१।१०४।५; १।१०४।८; १।१३८।६-७; अरण्य. मं. श्लो. १ पाहा.)

(२) **ब्रह्म निरंजन अगुण अज व्यापक विगत विनोद।**
तो कौसल्या-अंकिं दे प्रेमभक्तिवश मोद॥ (१।१९८) **कौसल्या अत्यंत प्रिय.**

(३) '**प्रिय तूं प्राणांहुनि रघुपतिला।**' (२।१६९।१) असें कौसल्या भरतास म्हणाली. **भरत प्रियतम,** २।२०१ छंद, व २०५।८; २०८।३; २०८।६; या चौपाया पाहाव्यात. **भरत प्राणांहून प्रिय.**

(४) शबरीला जी नवधा भक्ति सांगितली त्यांतील—
एकहि नवांमधें ज्यापासीं। **कुणिहि नारि नर चर अचरासी॥**
तो प्रिय **भामिनि!** *अतिशय* **मजला।** (३।३६।६-७)

(५) **वेगें जिनें द्रवें मी भाई। ती मम भक्ति भक्त सुखदाई॥** (३।१६।२)
माय बाप गुरु बंधु देव पति। सकल मला जाणुनि दृढ सेवति॥
मम गुण गातां तनू पुलकते। गद्गद गिरा नयनिं जल गळतें॥
काम आदि मद दंभ न ज्याला। तात! *निरंतर वश मी त्याला॥*
(३।१६।१०-१२५).

(६) **प्रौढ तनयसम मजला ज्ञानी।** ***बालकसुतसम दास अमानी*** ॥(३।४३।८) **असे भक्त प्रिय** व त्यांना प्रभु निरंतर वश असतात.

(७) प्रभु हनुमन्तास म्हणाले, '**तूं प्रिय मजला लक्ष्मण दूणें॥**' (४।३।७)

(८) '**प्रिय मज अनन्यगति–सेवकही**' (४।३।८). *हनुमान लक्ष्मणापेक्षां प्रिय व अनन्यगति सेवक प्रिय.*

(९) '**रघुपति प्रियभक्तं वातजातं**' (सुंदर. मं. श्लो. ३) '**श्रुणु सुत अनृण तुझा मी नाहीं।**' असें *प्रभु हनुमंतास* म्हणाले. (५।३२।७).

(१०) **असे संत हृदिं वसति मम कसे। लोभी-हृदयीं वसे धन जसें॥** (५।४८।७)

(११) **नर ते प्राणांसम मला** (५।४८) या दोन्ही प्रकारांचें वर्णन प्र. प्र. १२।१ मध्यें '*त्रिविधभक्त*' वर्णनांत पाहावें.

(१२) **उत्तरकांडांत** हनुमान **भरतास** म्हणाले, '**रामा प्राणप्रिय तुम्हि**' (७।२ रा)

(१३) '**प्रिय न अयोध्येसम मज तेंही।**' **वैकुण्ठापेक्षां** रामास प्रिय **अयोध्या.**
(७।४।३–४ पाहा.)

(१४) '**प्रिय अति मज येथले निवासी।**' (७।४।७) **अयोध्यावासी अतिप्रिय.**

(१५) **मुनि** हे **पहा** *सखे* **मम** *सगळे* ।......*भरताहुनि* **हे** *प्रिय* *बहु* **मजला** ॥
(७।८।७-८)

(१६) सुग्रीव बिभीषणादि सर्वांस श्रीराम म्हणाले,

'सेवा केली तुम्हीं मम अती । कशी मुखावर वर्णूं महती ॥

त्यक्त मदर्थ सदन-सौख्याला । *प्रिय* **तुम्हि** *वास्तव* **मज** *अति* **झाला** ॥
(७।१६।४-५)

गृहधन दारादिकांचें सौख्य सोडून जे रामसेवा करतात **ते रामास अतिप्रिय होतात.**

(क) **अतिशय प्रिय म्हणजे काय ?**

'अनुज राज्य वैभव वैदेही । परिजन सदनें काया, स्नेही ॥

सगळें प्रिय, न तुम्हांसम जाणा । मृषा न वदतों हा मम बाणा ॥' (७।१६।६-७)

सर्व नातेवाईकांहून आणि गृह, धन, ऐश्वर्य, दारा, देहादि **सर्वांपेक्षां प्रिय म्हणजे अतिप्रिय.**

सर्वांप्रिय सेवक ही नीती । *दासांवर* मम *अधिका प्रीती* ॥ (७।१६।८)

(१७) मानसांत भक्ति (प्र. प्र. १२।१) यांतील **चतुर्विध भक्त प्राणप्रिय** आहेत.

(१८) प्रभु भुशुंडीस म्हणाले, '*प्रिय सेवकसम कोणि न* ***मजला*** ' ॥ (७।८६।८)

(१९) *जीव भक्तिमान्* **नीच जरि महा** । *प्राणप्रिय* **मज बाणा मम हा** ॥
(७।८६।१०)

(२०) ... **जो** *सोडुनि मद माया* । **भजे मला** *मनवाणीकायां* ॥ ८ ॥

दो० — पुरुष नपुंसक नारि वा अग जग थोर किं सान ॥

सर्वभाविं भजतो छल न, प्रिय तो **मज** *अति* **जाण** ॥ (७।८७ रा)

(२१) **सत्य सांगुं** *शुचि दास प्रिय* **खग ! मजला** *प्राणसम* ॥

त्यजुनि भरंवसा आस **हें जाणुनि कर भजन मम** ॥ (७।८७ म)

(२२) *प्रिय रघुवीरा भक्तिच भारी* । **माया खलु नर्तकी बिचारी** । (७।११६।४)

(२३) *सेवक तो प्रियतम मम तोही* । *अनुशासन मानी जोही* ॥ (७।४३।५)

निष्कर्ष — या सर्व प्रकारांचें नीट निरीक्षण केल्यास एक गोष्ट ठरते कीं '**प्रिय रघुवीरा भक्तिच भारी**'. ही प्रेमभक्ति ज्या प्रमाणांत असेल, भक्तीसाठीं ऐहिक सुखोपभोगांचा, ममतेचा आणि विषयांचा त्याग ज्या प्रमाणांत केलेला असेल, दीनता व लीनता ज्या प्रमाणांत असतील आणि छल कपट अन्यभरंवसा व आशा नसतील त्या प्रमाणांत तो जीव भगवंतास प्रिय होतो.

प्रिय रघुवीरा भक्तिच भारी; हें कळलें. भारी = पुष्कळ, फार; पण एवढ्यानें किती प्रिय याची कल्पना डोळ्यांसमोर उभी राहात नाहीं; म्हणून याविषयीं स्वतंत्रपणें विचार करणें जरूर आहे. तसेंच शेवटच्या अवतरणांत 'मम अनुशासन' म्हटलें आहे तें रामाचें अनुशासन कोणतें, हेंहि ठरविणें जरूर आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।५ 卐 卐 卐

अथ रामानुशासनम्

सेवक तो प्रियतम मम तोही । *मम अनुशासन* मानी जोही ।।

हें श्रीरामाचें अनुशासन कोणतें हें श्रीमानसाधारेंच ठरविणें श्रेयस्कर होईल.

(१) दो. – ' **मित्र अतां जावें गृहीं** *भजा मला दृढ नेम* ।।

सदा सर्वगत सर्वहित जाणुनि ठेवा प्रेम ।। ' (७।१६।–) (४।३ पाहा.)

दृढ नेमानें माझें भजन करा; पण मी राम केवळ रघुपति असें न समजतां मी सर्वच आहें, सर्व चराचर सृष्टींत मीच आहें व तो मी सर्वांचा मित्र असून सर्वांचें हित करणारा आहें, हें जाणून सर्व प्राणिमात्रांवर प्रेम ठेवा, प्रेम करा, म्हणजे माझें भजन झालें. हें *सुग्रीवबिभीषणादि सर्वांस सांगितलें आहे*. हें त्यांच्या स्वभावाचा व परिस्थितीचा विचार करून सांगितलें असल्यानें अपूर्ण आहे.

(२) ' **निज भवना जा** *स्मरण मम करा । तनुमनवचनें धर्म अनुसरा* ।। ' (७।२०।२) सर्व कपिगण गेल्यावर निषादराज गुहास बोलावून आणवून त्यास हें अनुशासन दिलें आहे. मागील अनुशासनांत याची भर घालणें जरूर आहे. भाव हा कीं वर सांगितल्याप्रमाणें माझें सतत स्मरण करा पण मनानें, वाणीनें व कृतीनें स्वधर्माचें पालन केलेंच पाहिजे. हेंहि व्यक्तिसापेक्ष असल्यानें अपूर्ण आहे.

(३) **भक्त मला प्रिय सर्वदा जाणुनि हें श्रुणु ! काग ।**

तनमनवचनें मम पदीं कर अविचल अनुराग ।। (७।८५)

असें काकभुशुंडीला सांगितलें. या आज्ञेची भर मागील दोन अनुशासनांत घालणें जरूर आहे. भक्तांची संगति करा व सर्व प्राणिमात्रांवर नुसतें वाचिक प्रेम न करतां मनानें व कृतीनेंहि प्रेम करणें जरूर आहे. अनुरागांत कमीपणा–चंचलपणा–येतां उपयोगी नाहीं. भक्तांच्या संगतीनें हें सहज साधेल.

(४) त्या काकालाच आणखी सांगितलें कीं ' *सब तज भज मजला* । '(७।८६।२) पाहा.) माझ्या आज्ञेचें स्मरण ठेवा व *मोक्षादि* सर्व आकांक्षा *सोडून भजन करा.*

(५) **पुरुष नपूंसक नारि वा जीव थोर कीं सान ।**

सर्वभावें भजतो छल न **प्रिय अति तो मज जाण** ।। (७।८७ रा)

' *त्यजुनि भरंवसा आस* **हें जाणुनि कर भजन मम** । (८७ म)

माता, पिता, गुरु इत्यादि सर्व मलाच समजून म्हणजेच ममतेचा पूर्ण त्याग करून; ती सर्व ममता माझ्या ठिकाणीं ठेवून; छलकपट अन्य कोणाचा व कशाचाहि भरंवसा सोडून म्हणजेच अनन्यगतिक होऊन, साधनादिकांच्या बळावर मला प्रसन्न करण्याची आशा सोडून भजन करा.

या सर्व आज्ञा एकत्र केल्या म्हणजे रामानुशासन सिद्ध झालें. यांत भक्तीच साधन

व भक्तीच साध्य आहे. पथ्य कोणतें पाळलें पाहिजे तें सांगितलें आहे; व अनुपानाचाहि निर्देश केलेला आहे. प्रभूंनीं ज्या आज्ञा दिल्या त्या कपि, राक्षस, एक अस्पृश्य जातीचा मनुष्य व एक कावळा यांना त्यांच्या परिस्थितीचा विचार करून दिलेल्या असल्यानें त्या व्यक्तिनिष्ठ आहेत. समष्टिदृष्टीनें एक सर्वांगपूर्ण अनुशासन पाहिजे तें वर स्पष्ट केल्याप्रमाणें मानसाधारेंच सिद्ध झालें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।६ 卐 卐 卐

प्रिय रघुवीरा भक्तिच भारी

मूळ हिंदींत ' भारी ' या अर्थाचा शब्द नाहीं; पण संदर्भानुसार गूढ असलेला मुळांतील अर्थ स्पष्ट करण्यासाठीं अनुवादांत तो घातला आहे. भारी प्रिय किंवा प्रिय या शब्दांनीं किती वा कशासाठीं प्रिय इत्यादि कल्पना करतां येत नाहीं.

' भक्ति अवशा वश करी ' (३।२६ छं.) असें मारीचानें म्हटलें असलें तरी किती प्रिय याची निश्चित कल्पना येत नाहीं, हें मर्म गोस्वामींनीं मानसांतच ३।४ ठिकाणीं अति मनोहर रीत्या ध्वनित केलें आहे.

रघुवीराला भक्ति इतकी प्रिय आहे कीं ' माझी भक्ति ' असा उच्चार करण्यापूर्वी त्या भक्तीची नुसती स्मृति होतांच श्रीरघुवीर आपला रघुवीरपणा, दशरथनंदनपणा, आपण मायामानुषरूप घेतलें आहे इत्यादि सर्व विसरून जातात आणि न कळत मी परमात्मा, भगवान, या भावनेनें बोलूं लागतात. भक्तीची व्याख्या जेथें दिली आहे तेथें असेंच घडलें आहे म्हणून तेंच उदाहरण प्रथम घेऊं.

(१) **अरण्यकांडांत रामगीतेंत** — लक्ष्मणानें ज्ञान, वैराग्य, माया, भक्ति व जीव-शिव-भेद समजावून सांगा असें विनविलें त्याचें उत्तर देतांना मायेचें लक्षण सांगतांना म्हणतात कीं,

एक रची जग गुण वश जीतें । *प्रभु-प्रेरिता* स्वबल न तीतें ।।

पुढें जीवशिवभेद सांगतांना म्हणाले,

' माया ईश न आपणां जाणे म्हणती जीव ।
बंधमोक्षद हे सर्वपर मायाप्रेरक शीव ।। १५ ।।

या वर्णनांत प्रभूनें = *ईश्वरानें प्रेरिलेली माया* जग रचते असें म्हटलें. मीं प्रेरिलेली माया जग रचते असें म्हटलें नाहीं. म्हणजेच प्रभु-ईश्वर कोणी तरी निराळा आहे व बोलणारा रघुनाथ, रघुपति मी निराळा या भावनेनेंच माया, ज्ञान व परमविरागी यांचीं लक्षणें (१५।६,७,८ यांत) सांगितलीं.

(क) तसेंच जीवशिवभेद सांगतांना मायाप्रेरक शिव = ईश्वर आहे असें

सांगितलें. मी मायाप्रेरक आहे असें म्हणाले नाहींत. येथेंहि रघुनाथ व ईश्वर भिन्न आहेत. या भावनेनेंच बोलले. त्याच भावनेनें भक्तीची व्याख्या दिली असती तर,

‘ वेगें ईशा द्रवावि तात ! जी । म्हणति भक्तसुखदायि भक्ति ती ॥ ’

किंवा **‘ जिनें ईश वेगानें द्रवतो । भक्तसुखद ती भक्ती म्हणतो ॥ ’**

असें सांगावयास पाहिजे होतें; पण राहिलेला ‘ भक्ति ’ प्रश्न मनांत येतांच आपण कोणत्या भावनेनें बोलत होतों हें एकदम विसरले ! नुसतें भक्ति या शब्दाचें स्मरण होतांच इतके द्रवले कीं आपण रघुनाथ आहोंत, आपला प्रभुपणा गुप्त ठेवणें आहे, इत्यादि सर्व कांहीं विसरले आणि वर सुचविल्याप्रमाणें भक्तीची व्याख्या न सांगतां एकदम म्हणाले,

(ख) **‘ वेगें जिनें *द्रवें मी* भाई । ती *मम भक्ति* भक्त-सुखदाई ॥**

‘ मी द्रवतों, मम भक्ति ’ म्हणाले. ईश द्रवे, ईशभक्ति, हरिभक्ति असें म्हणण्याचें स्मरण राहिलें नाहीं !

‘ वेगें जिनें द्रवे हरि, भाई । ती हरिभक्ति भक्तसुखदाई ॥ ’

असें म्हणतां आलें नाहीं !

(ग) **केवढा हा भक्तीचा प्रताप** कीं भगवंतांनीं घेतलेल्या मायिक देहसंबंधाचा नुसत्या भक्ति या नांवानें भगवंतासुद्धां विसर पडला ! मग जो आपल्या हृदयांत भक्तीलाच बसवील त्याला देहत्रय संबंधाचा सहज विसर पडून तो ‘ सुखसंदोह मोहपर ’ कां होणार नाहीं ?

(२) भक्तिवर्णनाचा उपक्रम करतांना भाई व तात हीं दोन संबोधनें आलीं, म्हणजेच लक्ष्मण भाऊ आहे व त्यास आपण भक्तिलक्षणें सांगणार आहोंत एवढें स्मरण आरंभीं होतें पण पुढें ५–११ या सात चौपायांत भक्तीचें प्रतिपादन चालू असतां हा संबंधसुद्धां विसरले व १२ व्या चौपाईत उपसंहार करतांना तात शब्द पुन्हां आला. ‘ ऐका ’ हा शब्दसुद्धां या सात चौपायांत नाहीं.

(क) १५ व्या दोह्यांच्या ८ चौपायांत ‘ तात, ऐका, समजा, बंधु, ऐका व तात ’ असें सहा वेळां श्रोत्याला उद्देशून म्हटलें आहे; पण ५-११ या सात चौपायांत श्रोत्याला उद्देशून एकहि शब्द नाहीं. सार हें कीं आपण श्रोत्याला भक्तिलक्षणें सांगत आहोंत याचेंहि विस्मरण झालें; प्रभु भक्तीशीं तदाकार झाले.

दुसरें उदाहरण – किष्किंधाकांडांत वर्षा व शरद-वर्णनांत अनेक उपमादिक देतांना–

भूवर पडतां पाणि गढुळलें । जणुं *मायेनें* जीव वेष्टले ॥

सरिताजल जलनिधिमाधिं जाउनि । होइ अचल जिव इव *हरि पावुनि* ॥

(१४।६–८)

यांत मम मायेनें किंवा मज पावुनि म्हटलें नाहीं. पुन्हां १५।१० मध्यें ‘ जशि **हरिजन-हृदिं** कामनिपज ना ’ येथें **हरि**च म्हटलें. पुन्हां १६।९ मध्यें ‘ **हरिजन** इव सांडुनि सब

आस '. पण भक्तीची आठवण होतांच हरिभक्ति न म्हणतां ' जशि **मम भक्ति** एक कुणि जोडी ' (१६।१०) मम भक्ति असें चटकन बोलून गेले, पण या वेळीं सीता-विरह व्यथा असल्यामुळें ही भावना फार वेळ टिकली नाहीं; व पुढल्याच दोह्यांत हरिभक्ति शब्द वापरला.

तिसरें उदाहरण — भक्तिगीतेंत उत्तरकांडांत अयोध्यावासी लोकांना श्रीरघुनाथानें जो उपदेश केला त्यांत प्रथम, ' बोलाविति रघुनाथ एकदां ' रघुनाथच बोलावतात. (४३।१).

' काळा कर्मा ईश्वरा वृथा दोष लावीति ' ॥ ४३ ॥

यांत ईश्वर रघुनाथाहून निराळा असें दाखविलें. पुढें

कधिं तरि करुणेनें नरदेहीं । धाडि ईश विण हेतू स्नेही ॥ (४४।६)

येथपर्यंत म्हणजे आरंभापासून ८ + २ + ६ = १६ ओळींच्या वर्णनांत तीच भावना आहे. परंतु भक्तीचा विचार मनांत येतांच पुढल्याच चौपाईंत हरिकृपा, ईशकृपा न म्हणतां ' कृपा मम ' माझी कृपा असें म्हणाले. ४४।७ पासून ४६ अखेरपर्यंतच्या सर्व भाषणांत हरि, ईश इत्यादि तृतीय पुरुषी शब्द न येतां मी, मम भक्ति, दास मम, असेच प्रयोग आहेत. ' वेदपुराणकथित मम भक्तिहि ' ' म्हणवि दास मम ', ' भक्ति न मम लभतात ' असेंच म्हटलें आहे. भक्तिप्रतिपादन असल्यानें भक्तीशीं पूर्ण तदाकार झाले आहेत.

श्रीरघुवीरास भक्ति किती प्रिय आहे याची निश्चित कल्पना आतां करतां येईल; म्हणून इतकीं उदाहरणें पुरेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।७ 卐 卐 卐

महती दासां सदा देतसां

श्रीरघुनाथ जरी साक्षात् परमात्मा सर्वज्ञ, सर्वदर्शी, सर्वशक्तिमान, प्रभु असले तरी आपल्या दासांना – प्रिय भक्तांना – मोठेपणा देण्यासाठीं स्वतः अल्पज्ञ जीवाप्रमाणें वागले–वागतात हा त्यांचा स्वभाव आहे. अरण्यकाण्डांत अगस्ति ऋषींनीं हा सिद्धान्त स्पष्ट बोलून दाखविला आहे; म्हणून तेथूनच आरंभ करणें चांगलें.

अरण्यकाण्ड — (१) श्रीरघुनाथ अगस्तीशीं वागतांना अगदीं पूर्ण माधुर्य-भावानें वागले आहेत —

मग रघुवीर मुनिशां सांगति । ' प्रभु ! न गुप्त कांहीं अपणांप्रति ॥
जाणां कारण मम आगमना । तात ! नको सांगणें आपणां ॥
मंत्र अतां प्रभु ! मज तो देणें । मुनीद्रोहि मी मारिन जेणें ॥ ' (१३।१-३)

अशी अज्ञानी क्षत्रियाप्रमाणें अत्यंत नम्रपणें प्रार्थना केली; त्यामुळें मुनींना थोडें

हंसू आलें व त्यांनीं श्रीरघुनाथाची पूर्ण ऐश्वर्यभावानें स्तुति करून वर मागितला व म्हणाले कीं,

‘ महती दासां सदा देतसां । म्हणुनी मज रघुराज पुसतसां ॥ ’ (३।१३।१४)
मंत्र विचारल्यामुळें मुनि असें म्हणाले. पंचवटींत जाऊन राहावें हा मंत्र मुनींनीं सांगितला.

(२) यापूर्वीं दण्डकवनांतील मुनींना असाच मोठेपणा दिला. ३।९।५-७ पाहा.

(३) पंचवटीस जातांना जटायूशीं मैत्री करून त्याला पित्याप्रमाणें मान दिला. (दो. १३).

(४) शबरी भिल्लीण असून तिलासुद्धां मानसांतील रघुनाथानें मान दिला आहे.

जनक-सुता-शोधा भामिनी ! । जाणसि वद करिवरगामिनी ॥
पंपासरिं रघुराज जाल जर । घडे तिथें सुग्रीवसख्य तर ॥
तो सांगल देव ! रघुवीरा । जाणुनि सब पुसतां मतिधीरा ॥ (३६।१०–१२

प्रभूंनीं जर असें विचारलें नसतें तर शबरी भिल्लीण असून संत-गुरु-सेवेनेंच ती त्रिकालज्ञ सर्वज्ञ झाली होती हें जगाला कसें कळलें असतें ? महती दासां देति सदाही हेंच कारण आहे. आपल्या भक्तांचें यश जगांत पसरावें या हेतूनेंच प्रभूंनीं अशा नरलीला केल्या व अद्यापही करतातच; शिवाय त्या नरनाट्यानें ‘सुरहित दनुजविमोहन’ सहज साधलें.

किष्किंधाकांड — सुग्रीवाला मोठेपणा देण्यासाठीं विचारलें कीं,

दो० – **‘ सखे वससि कां काननीं सांग मजसि सुग्रीवश ’** ॥ ५ ॥
पावसाळा संपल्यानंतर सीताशोधासाठीं प्रयत्न करण्याची विनंति त्यास केली. सीता कुठें आहे हें जणूं माहीत नाहीं असें त्यास दाखविलें.

नारद वा वृंदा यांचा शाप खरा करणें, राजनीतीचें शिक्षण देणें, ‘ धर्ममार्ग चरित्रेण ’ दाखविणें, हनुमन्ताची कीर्ति पसरविणें, संपातीचे क्लेश हरण करून चंद्रमामुनीचा आशीर्वाद खरा करणें, स्वयंप्रभेची इच्छा पूर्ण करणें व इतर अनेक हेतु सिद्धीस नेणें या गोष्टी हनुमन्तास दूत पाठवून साधावयाच्या होत्या.

सुन्दरकांड—(१) या काण्डांत ‘ रामदास रामाहुनि मोठे ’ ठरण्याइतका मोठेपणा हनुमन्तास दिला आहे हें त्या प्रकरणांत दाखविलें आहे.

(२) हनुमन्ताच्या खालोखाल नवीन शरणागत बिभीषणाला मोठेपणा दिला आहे. सागर कसा तरून जावा याविषयीं सुग्रीवबिभीषणादि सचिवांस मत विचारलें. सुग्रीव कांहींच बोलला नाहीं. बिभीषणानें सांगितलें कीं ‘ जाउनि सागरा प्रार्थणें ’ (५०।७-८ पाहा.) या प्रार्थनेनें कांहीं होणार नाहीं हें माहित असून व लक्ष्मणाला तें अगदीं नापसंत असून बिभीषणाला मोठेपणा देण्यासाठींच तें मत मान्य केलें. तीन दिवस निर्जल उपवास करून प्रार्थना केल्या पण उपयोग झाला नाहींच; व शेवटीं लक्ष्मणाच्या मनासारखेंहि केलें.

लंकाकांड — (१) सेतुबंधनाच्या निमित्तानें नलनीलांची कीर्ति पसरविली.

(२) रामेश्वरस्थापनेनें परमप्रिय भक्त शंकरांची महती वाढविली.

(३) या कांडांत बिभीषणाला अनेक वेळां महती दिली आहे.

(क) **अवलोकुनि दक्षिणे प्रभु वदले कृपानिधान** ।। १२ म ।। व यापुढील चौपाया पहाव्यात.

(ख) **रिपु न मरे श्रम विशेष पडती । राम बिभीषण–तोंडा बघती ।**
उमे यदिच्छें काळ मरे तरि । दासप्रीति–परीक्षा प्रभु करि ॥

एकीकडे बिभीषणास मोठेपणा दिला व दुसरीकडे त्याच्या प्रीतीची परीक्षा पाहिली.

(४) या कांडांत अंगदाला परमावधीचा मोठेपणा मिळवून दिला आहे. रावणाचे चार मुकुट त्यास सहज लीलेनें मिळवितां आले व त्याचा पाय लंकेंतील इंद्रजितादिक कोणीहि महाबलवान राक्षस हालवूं शकला नाहीं; व रावणसुद्धां निस्तेज होऊन खालीं मान घालून बसला !

(५) लंकेंतील युद्धांत सर्वांत जास्त महती दिली जाबवंताला : लक्ष्मण, हनुमान व अंगदादि सर्व महाकपिवीर केव्हांना केव्हां तरी मूर्च्छित होऊन पडले आहेत. ३४।४ – ७४।९ पाहा. ज्या मेघनादानें सर्व कपिमहावीरांस गाढ मूर्छापन्न केलें व रघुपतींना नागपाशबद्ध केलें त्याला त्याच्याच त्रिशूलानें प्रहार करून जांबवंत अति जरठ असून त्यानें पक्के मूर्छित केलें व वेगानें मेलेल्या एखाद्या उंदरासारखें उचलून लंका दुर्गांत तटावरून झुगारून दिलें व त्यानें महापराक्रमानें मायायुद्धानें मिळविलेला महाविजय एका क्षणांत धुळीस मिळविला. (क) लंकेंतील युद्धांत मूर्छित पडला नाहीं व केवळ १।१ प्रहारानें विश्वविजेत्या रावणास व इंद्रजितास पक्के मूर्छित पाडलें फक्त जांबवंतानें !

उत्तरकांडांत — (१) सुग्रीव बिभीषणादि वीरांचा वसिष्ठांस परिचय करून देतांना प्रभु म्हणाले,

मुनि ! हे पहा सखे मम सगळे । समरसागरीं जहाज बनले ॥
मम हितार्थ इहिं जन्म वेचला । भरताहुनि हे प्रिय बहु मजला ॥ (८।७,८)

(२) श्रीराम बागेंत गेलेले असतां तेथें सनकादिकांस येतांना पाहिलें तेव्हां:—

' **करिति दण्डवत राम जैं मुनि येतां दिसतात ।**
स्वागत पुसुनी पीतपट प्रभु बसण्या देतात ॥ (७।३२)
प्रभु मुनिवरां धरुनि कर बसविति । परम मनोहर वचन उच्चरिति ॥
आज धन्य मी पहा मुनीश्वर तुमचें दर्शन अघ-राशी-हर ॥

इ. इ. पाहा. हें पाहून भरतादिकांस आश्चर्य वाटलें व जिज्ञासा उत्पन्न झाली कीं भगवान असून संतांस इतका मान दिला व त्यांची स्तुति केली तरी असें संतांत । जवळ असतें तरी काय ?

बालकांड —(१) विश्वामित्रांची सेवा शिष्यभावनेनें केली आहे. ' पुत्रशिष्यधर्म ' प्रकरण पाहावें.

(२) जनकराजा म्हणतात, (१।३४२।१-३ पाहा.)

' दिलें सर्वपरिं महत्त्व मजला । निज जन जाणुनि केला अपला ॥ इ.

अयोध्याकांड — (१) भरद्वाजास मार्ग विचारला.

(२) वाल्मीकींस निवासस्थान विचारलें.

(३) वसिष्ठादि चित्रकूटास आल्याचें कळतांच लगबगीनें सामोरें जाऊन दण्डवत प्रणाम करून आश्रमांत आणले आहेत.

जास्त उदाहरणें व अवतरणें देणें विस्तारभयास्तव टाळावें लागलें आहे. प्रत्येक काण्डांत आणखीं पुष्कळ उदाहरणे आहेत तीं या दृष्टीनें वाचकांनीं अवलोकन करावीं.

' महती दासां सदा देतसां ' हें वचन प्रत्येक काण्डांत अनेक वेळां सत्य करून दाखविलें आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।८ 卐 卐 卐

श्रुति-सेतु-पालक राम

श्रुति = वेद, सेतु = मर्यादा, मार्ग, पथ; श्रुतिसेतु = वेदमर्यादा, वेदधर्ममर्यादा, त्यांचें पालन, संरक्षण, करणारे राम आहेत; म्हणूनच राम प्रभूला मर्यादापुरुषोत्तम म्हणतात. हा सिद्धांत वाल्मीकि–मुनींनीं श्रीरघुवीरासच सांगितला आहे. प्रत्येक काण्डांत याचा उल्लेख आहेच.

(१) **स्थापि सुरां, असुरां वधुनि निज *राखी श्रुतिसेतु*** ॥ (१।१२)

(२) **श्रुति-सेतु-पालक राम तुम्हि जगदीश माया जानकी** ॥ (२।१२६ छंद)

(३) ' धर्म–सेतु करुणायतन ' (२।२४८।–) वसिष्ठवचन आहे. मागला श्रुतिसेतु व हा धर्मसेतु यांनीं वेदधर्मसेतु असा अर्थ सुचविला. पुढें ' वेदधर्मरक्षक ' आहेच.

(४) ' धर्म–वर्म ' (३।११।६) वर्म = तनुत्र-शरिराचें रक्षण करणारें; म्हणून धर्मवर्म = धर्मरूपी शरिराचें संरक्षण करणारे म्हणजे धर्मसंरक्षक. हें सुतीक्ष्ण स्तुतींत आहे.

(५) ' सद्धर्मवर्मौ हितौ ' – असें *किष्किंधा-मंगलाचरणांतच* म्हटलें आहे. सद्धर्म = सनातन धर्म. वेदधर्म हा सत् = सनातन, धर्म आहे हें सुचविलें. हें *रामलक्ष्मणांबद्दल* म्हटलें.

(६) **जन-रंजन खलगणभंजक जे । बंधू वेदधर्मरक्षक ते** ॥ (५।३९।४)

तें = राम व लक्ष्मण हे दोघे बंधू वेदधर्मरक्षक आहेत.

(७) **अवतार उदार अपारगुणं । महिभार-विभंजन बोधघनं** ।। (६।१११।३)
भूमिभार विभंजन हेंच धर्मसंस्थापनेचें साधन येथें सुचविलें आहे.

(८) ' श्रुतिपथपालक धर्मधुरंधर ' (७।२४।२).

(९) रघुकुल-केतू श्रुतिपथरक्षक (७।३५।८). याप्रमाणें रघुपति श्रुतिसेतुपालक असल्याचे उल्लेख साती सोपानांत आहेत.

शिवाय — महादेव शिवसुद्धां हें कार्य करतात हें दाखविण्यासाठीं उत्तरकांडांत महेशाच म्हणतात,

खल तुज मी जर करीन दंड न । *श्रुतिमार्गा मम होइल खंडन* ।। (७।१०७।४)
या वचनानें राम-शिव-अभेद प्रदर्शित केला आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।९ 卐 卐 卐

राम आणि सद्गति देणें

श्रीरामप्रभूंनीं अनेकांना विविध सद्गति दिल्याचें वर्णन मानसांत आहे. त्यांतील ' राम ' शब्दाच्या उपयोगाचें वैशिष्ट्य पाहिलें म्हणजे कविकलेचें कौतुक करावेंसें वाटतें.

बालकाण्ड — (१) *राम*शरांनीं मृग जे वधले । तनू त्यजुनि *सुरलोकीं* वसले।।
(२०५।३)

(२) *प्रभु* **ब्रह्मण्यदेव मी जाणें । त्यक्त मदर्थ पिता भगवानें** ।। (२०९।४)
पथिं जातां ताडके दावि मुनि । ऐकुनि रोषें आली धावुनि ।। ५ ।।
एकचि बाणें प्राण हरण करि । *निज पद दिधलें* **दीन बघुनि, तरि** ।। ६ ।।

(३) **क्रोधी** *मारीचासुर* **ऐकत । मुनिद्रोहि ये ससैन्य धावत** ।।
तया *राम* **फलविण शर माराति** । *शतयोजन सागरतटिं टाकति* ।।
(२१०।३-४) मारीचाची जबानी पाहा.

मुनिमख रक्षणिं कुमार ठाकति । फलविण शर रघुपति मज माराति ।।
आलों शतयोजनें क्षणामधिं । वैर बरें ना त्यांच्याशीं कधिं ।।
कीटभृंगसम मग *गति* **मातें** । *जिथें तिथें दिसती दो भ्राते* ।।

(अरण्य. २५।५-७). हें उत्तम भक्ताचें लक्षण आहे; २।१३१।७ पाहा.

राम = आनंदसिंधुसुखराशी, सुखधाम त्यांनीं मृगांना स्वर्गसुख दिलें; मारीचाला भक्तिसुख दिलें म्हणून दोन्ही ठिकाणीं राम शब्द आहे, पण ताडकेला निज पद = सायुज्य मोक्ष दिला. म्हणून तेथें राम शब्द नाहीं; प्रभु, भगवान, आहे. सायुज्यांत – जीव ब्रह्मांत कायमचा लीन होतो; तेथें सुख-आनंद देणार घेणार कोणाला ? म्हणून रामशब्द नाहीं. *हाच नियम पुढील सर्व ठिकाणीं पाळलेला दिसेल.*

अयोध्याकाण्ड — (१) श्रीरामानें या काण्डांत कोणाला सद्गति *दिली* नाहीं; पण शृंगवेरपुरच्या नावाड्याला त्यानें न *मागतां प्रेमभक्ति दिली आहे.*

देति निरोप *कृपायतन* भक्ति विमल वर देत ॥ १०२ ॥

ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं। रामभक्ति उरिं करी स्थान तैं ॥ (७।१२२।११)

म्हणून त्याला ज्ञानसुद्धां दिलेंच. याचें फळ **नित्यवैकुंठप्राप्ति** व **नित्यमुक्तता** हें आहे. ' ज्ञान, मोक्ष, वैकुंठ ' हें प्रकरण पाहावें. **यापेक्षां अधिक** श्रेष्ठ गति–**सद्गति नाहीं.**

(२) त्या नावाड्यानें श्रीरामचरणामृतानें आपल्या पितरांस तारलें.

***तारुनि पितरां* प्रभुस मग नेई प्रमुदित पार** ॥ १०१ ॥

(३) मरतांना रामनामाचा उच्चार केल्यानें दशरथांस स्वर्गगति मिळाली आहे.

अरण्यकाण्ड —(१) **विराधास–रामधाम**

त्वरित रुचिर रूपास पावला। दुःखि बघुनि *निज धामिं* धाडला ॥(३।७।७)

दुःखी होता त्यास परम सुखी केलें.

(२) **शरभंग—मग योगाग्नित देह जाळती । *रामकृपें* वैकुंठा जाती** ॥

नित्यवैकुंठांत सलोकता मुक्ति दिली व आनंदसिंधु सुखराशी केला.

(३) खरदूषणादिकांना निर्वाणपद–कैवल्य प्राप्त झालें. (दो. २० रा)

(४) **जटायू—मागुनि अविरल भक्ति वर गृध्र गाठि हरिधाम** ॥

त्याची क्रिया यथोचित निज करिं करिती *राम* ॥ (३।३२)

सरूपता नित्यमुक्ति दिली. राम शब्द आहेच.

(५) **मारीच–निर्वाण-मोक्ष** दिला. मुनिदुर्लभगति दिधली **प्रभुंनीं.** राम शब्द नाहीं.

(६) **कबंध–' नमुनी रघुपति-पद–कमलांला । निजगति पावुनि नभीं निवाला ॥**

देउनि *राम उदार* तया *गति* ' (३४।४-५)

उदार = मोठी ' उदारो दातृमहतोः ' (अमरे). **वैकुंठ दिला.**

(७) **शबरी** — *कैवल्य,*–सायुज्य दिलें.

त्यजि योगपावकिं देह, *हरिपदिं लीन* जिथुनि न परतती ॥ (३६ छंद.)

येथें *हरि* शब्द आहे.

सरिताजल जलनिधिमधिं जाउनि। होइ अचल जिव इव *हरि पावुनि* ॥ (४।१४।८)

हें कैवल्याचें लक्षण आहे.

दो. — जातिहीन अघजन्ममहि *कृता मुक्त* अशि नारि ॥

विसरुनि ऐसा *प्रभु* मना ! जड ! सुख इच्छिसि भारि ॥ ३६ ॥

मुक्त करण्याचा संबंध आहे म्हणून ***प्रभु*** शब्द आहे, *राम नाहीं.*

किष्किंधाकाण्ड — (१) **वाली** — वालीनें कर्मानुसार जन्म व त्या त्या जन्मांत *रामपदिं अनुराग* मागितला; पण, वालिस **राम धामिं निज** धाडति ॥ (४।११।१)

नित्यवैकुण्ठांत = रामधामीं पाठविलें म्हणून *राम* शब्द वापरला आहे.

सुन्दरकाण्ड. (१) **शुक** (रावण–हेर) —शुक नांवाच्या राक्षस हेराला रामकृपेनें पूर्वगति मिळाली. 'रामकृपेनें निज-गति मिळाली' (५७।१०). पूर्वी तो ज्ञानी मुनि होता पण अगस्तींच्या शापानें राक्षस झाला होता. *राम*कृपेनें पुन्हां पूर्वींचाच मुनि होऊन 'गेला निजाश्रमाला'.

लंकाकाण्ड. (१) **अनेक प्रमुख राक्षसांना** — 'राम देति निजधाम' वैकुण्ठ-धाम दिलें म्हणून राम शब्द वापरला; पण

(२) **कांहींना परमगति = मोक्ष दिला.**

'मज रिपुभावें स्मरति निशाचर ॥
असें समजुनी देति *परमगति* । कोण कृपाल असा वद पार्वति ॥
श्रवुनि असें *प्रभु*...... ।' (४५।४-६)

(३) **कुंभकर्णाला मोक्ष दिला. *प्रभु*वदनीं तत्तेज समावत** । (७१।८)

'निशिचर अधम मलाकर त्यास दिलें निज धाम ।
गिरिजे ते नर मंदमति भजति न जे *श्रीराम*' ॥ ७१ ॥

आरंभीं *प्रभु* व शेवटीं *श्रीराम* आहे, राम नाहीं. येथें निजधाम = सायुज्य मोक्ष.

(४) **रावणाला कुंभकर्णासारखीच गति दिली आहे.**

'*प्रभु*वदनीं तत्तेज समावत' (१०३।९).
'*योगिवृंददुर्लभगति* देति तुला *भगवान*' ॥ १०४ म ॥

(५) युद्धांत मेलेले सर्व राक्षस रघुपतीच्या इच्छेनें मुक्त झाले आहेत.

'त्यांचें रामाकार होइ मन । *मुक्त सकल* तुटलें भवबंधन ॥'(६।११४।७)

उत्तरकाण्ड — या काण्डांत कोणालाहि गति दिल्याचें वर्णन स्पष्ट नाहीं; तथापि रामानें अयोध्यावासी सर्व जिवांना आपल्याबरोबर निजधामास (नित्य वैकुंठास) नेल्याचें वर्णन अति गूढ ध्वनीनें केलें आहे. याची पूर्वसूचना ३२।३ मध्यें ध्वनित केली आहे आणि दोहा ५० च्या चौपायांत निर्याण–निजधामगमन–ध्वनित आहे. (गूढार्थ-चंद्रिका पाहा.)

याप्रमाणें साती सोपानांत कोणाला तरी सद्गति दिली आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१० 卐 卐 卐

भेटणें, हृदयाशीं धरणें, बसविणें

भेटणें म्हणजे गळ्यांत गळा घालणें किंवा आलिंगन देणें, हें बरोबरीचें नातें दाखवितें. लहानांनीं मोठ्यांस वंदन केल्यावर मोठीं माणसें लहानांस हृदयाशीं धरतात.

याप्रमाणें भेटणें झाल्यावर ज्याचें स्वागत, सत्कार करावयाचा असेल त्यास आसनावर बसविणें हा विधि असतो. मानसांत या विधींत अनेक प्रकार दाखविले आहेत

१ नुसतें बसविणें, २ हाताला धरून बसविणें, ३ जवळ बसविणें, ४ हाताला धरून जवळ बसविणें, ५ अति जवळ बसविणें, व ६ हाताला धरून अतिजवळ बसविणें, असे प्रकार आहेत. या भेदानें प्रेम वा आदर यांचें प्रमाण प्रदर्शित केलें आहे.

बालकाण्ड — बालकाण्डांतील रामचरित्र अनुष्टुभ सारखें आहे. अवतारचरित्रांत या काण्डांत *स्वतंत्र* चरित्र नाहीं; त्यामुळें श्रीरघुनाथानें स्वतंत्रपणें कोणास भेटणें किंवा बसविणें शक्य नाहीं. अवतारपूर्व–चरित्रांत मनुशतरूपाख्यानांत शतरूपा स्त्री असल्यानें प्रभु कोणासच भेटले नाहींत व बसविणें घडलें नाहीं. नारदमोह प्रकरणांत दोन्ही गोष्टी घडल्या आहेत. (१।१२८।५)

(१) **उठुनि रमापति (नारायण) मुदित भेटले । ऋषि समवेत निजासनिं बसले ॥**

अवतार-काळांत—बालकांड.

(१) येतां रघुपति सर्वहि उठले ।
विश्वामित्रें निकट बसविले ॥ (२१५।६) — रामलक्ष्मणांस
(२) नृपें (दशरथानें) दूत...मग निकट बसविले । (२९१।३) — *जनकदूतांस*
(३) मुदें बंधुयुग *हृदयीं धरले* । (३०७।७) — विश्वामित्रांनीं रामलक्ष्मणांस

अयोध्याकाण्ड —

(४) स्नेह विकल *लाविति हृदयाला* । (४४।३) — दशरथ रामचंद्रास
(५) घडि घडि आलिंगिति हृदयाही ॥ (४४।५) — दशरथ रामचंद्रास
(६) घे मांडीवर दे आलिंगन ।
झरे प्रेमरस पयोदिं शोधन ॥ (५२।४) — कौसल्या रघुनाथास
(७) विविधा विलपुनि चिकटे चरणीं । (५७।६) — **कौसल्येनें रामपाय धरले**
उठवुनि *राम हृदयिं तिज धरती* । (५७।८) — श्रीरामानें कौसल्येला
(८) भेट समर्पुनि करी दण्डवत । — *भेटणें* अध्याहृत–*निषादराज* व रघुनाथ
जवळ बसवुनी कुशल विचारति ॥ (८८।३-४ टीका पाहा.) — राम निषादराजास
(९) करत दण्डवत मुनि *उरिं धरती* ॥ (१०६।७) — भरद्वाज श्रीरघुनाथास
(१०) दशा न वदवे धरणि तळिं पडला दंड बनून ॥११०॥ — एक अज्ञात तापस
प्रेमें राम धरिति उरिं पुलकत । (१११।१) — राम त्या तापसास **प्रेमानें भेटले**
(११) **भरता निकट वसिष्ठ बसविती** । (१७१।४) — अयोध्या दरबारांत
(१२) करत दण्डवत बघुनि त्या भरत घेति हृदयासि ॥१९३॥ — भरत निषाद-राजास
(१३) बळें *धरिति* उठवुनि *हृदयिं भरता* कृपानिधान ॥२४०॥ — श्रीराम भरतास
(१४) राम रिपुघ्ना *भेटती प्रेमें* नावाड्यास ॥२४१॥ — राम शत्रुघ्नास व *निषादराजास*
(१५) प्रणमत *लक्ष्मण* भेटती भावें *भरत* तयास ॥२४१॥ — भरत लक्ष्मणास
(१६) *लक्ष्मण* हौसें *अनुजा* भेटति ।
निषादास मग हृदिं कवटाळति ॥ — लक्ष्मण शत्रुघ्न व गुहास

(१७) गुरुस बघुन सानुज अनुरागति ।
नमन दंडवत प्रभु करूं लागति ॥ — राम वसिष्ठांस
मुनिवर धाउनि हृदयीं धरती ।
प्रेमभरें दो भावां भेटति ॥ (२४३।४) — वसिष्ठ रामलक्ष्मणांस

(१८) दुरून दण्डवत प्रणाम केला ।
रामसख्या ऋषि **बळें भेटले** ॥ (२४३।५-६) — वसिष्ठ गुहास भेटले

(१९) ' व्याकुळ धरती प्रभुपदकमलां ।
बसविति समीप धरुनी पाणी ॥ ' — **रघुनाथ भरतास**

(२०) मागति आज्ञा नमुनि पदिं *राम धरिति हृदयासि* ॥ ३१६ ॥ — राम भरतास

अरण्यकाण्ड —

(२१) करत दण्डवत *मुनि उरिं धरता* ।
प्रेमजलें उभयां स्नपवीती ॥ (३।६) — अत्रि रामलक्ष्मणांस

(२२) पडति छडीसम मग पायावर ।
प्रेममग्न अति सभाग्य मुनिवर ॥ (११।२१) — सुतीक्ष्ण रामाच्या
धरुनि दीर्घभुजिं घेति उचलुनी ।
प्रेमें अति ठेविति हृदिं धरुनी ॥ (१०।२२) — **राम सुतीक्ष्णास**

(२३) मुनिवच परिसुनि रामा रुचले ।
हर्षें पुन्हां हृदयिं मुनि धरले ॥ (११।२२) — **पुन्हां राम सुतीक्ष्णास**

(२४) पडति बंधुयुग मुनिपदकमलीं ।
प्रेमें अति ऋषि हृदयीं कवळी ॥ (१२।१०) — अगस्ति रामलक्ष्मणांस

(२५) शबरी चिकटुनि पडली पाईं । — श्रीरामाच्या; पण स्त्री असल्यानें **भेटले नाहींत.**

(२६) करत दण्डवत घेति उचलुनि ।
ठेविति वाढवेळ हृदिं धरुनी ॥ (४१।१०) — **राम नारदास**
स्वागत पुसुनी **समीप बसविति** ।
लक्ष्मण सादर चरणां क्षाळिती ॥ — **राम नारदास**

किष्किंधाकाण्ड —

(२७) वदुनि असें व्याकुळ पदिं पडला ।
प्रगटि निजतनू प्रेमें भरला ॥ (३।४) — हनुमान रामाच्या
तैं रघुपति उठवुनि हृदिं धरती ।
निजलोचन जलसेकिं निववितीं ॥ — **अपूर्व; राम हनुमंतास**

(२८) नमुनि चरणिं शिर, भेटे सादर ।
तया भेटले सानुज रघुवर ॥ (४।७) — सुग्रीव व राम

(२९) पवनतनय शिर नमवि शेवटीं । हनुमंतास
........**प्रभु घे निकटीं** ! ।। **मस्तकावर हात, मुद्रिका दिली.**

सूचना — वालीवधानंतर सुग्रीवाला राज्य, कोष, पुर व नारी मिळाल्यावर त्यास **बोलावून आणावें लागलें.** आल्यावर **त्यानें साधा नमस्कारही केला नाहीं.** त्यानंतर लक्ष्मणाच्या क्रोधानें जागा होऊन सुग्रीव आला त्या वेळीं 'पदिं शिर नमुनि वदे, कर जोडी' (२१।१) **पण प्रभु भेटले नाहींत.**

सुन्दरकाण्ड —

(३०) येती सकल शिर नमविति पायां । अंगदादि सर्व यशस्वी
भेटे *प्रेमें अति* कपिराया ॥ रामदूतांस सुग्रीव भेटला.
भेटे पुन्हां सुकंठ तयाला । **सुग्रीव हनुमंतास २ वेळां भेटला**

(३१) स्फटिक शिळे युग बंधू बसले ।
कपि सब जाउनि पायां पडले ।। रामलक्ष्मणांच्या
भेटति सकलां **प्रेमें** रघुपति **करुणापुंज**।। २९।। **यांत प्रभु हनुमन्तास भेटलेच.**

(३२) पवनतनयकृत सुंदर चरितें ।
जांबवंत सांगति रघुपतितें ॥ (३०।६)
श्रवत कृपानिधि मनिं *अति* रुचले ।
मग *हर्षें हनुमान् हृदिं धरले* ।। (३०।७) **दोनदां भेटणें झालें.**

(३३) प्रभुवच परिसुनि बघे मुख तनु हर्षित हनुमंत ।
प्रेमाकुल पायां पडे त्राहि त्राहि भगवंत ॥३२॥
पुनःपुन्हा प्रभु उठवूं पाहत ।
प्रेममग्न उठुं नयेचि वाटत ॥१॥
प्रभुकरपंकज कपिचे शीर्षां ।
स्मरत दशा उन्मनि गौरीशा ॥२॥
प्रभु उठवुनि कपिला हृदिं धरती ।
परम निकट कर धरुनि बसविती ।। (३३।४)

वि. ल. ठे. — (१) हनुमंतास एकाच प्रसंगीं लागोपाठ तीन वेळां हृदयाशीं धरलें; व तिसऱ्या वेळीं हात धरून परम निकट बसविलें. या दोन्ही गोष्टी संपूर्ण रामायणांत इतर कोणाच्याही बाबतींत घडल्या नाहींत !

(२) मस्तकावर हात ठेवून उठवून हृदयाशीं धरणें हें तिसरें वैशिष्ट्य फक्त येथेंच घडलें आहे. ही गोष्टसुद्धां इतर कोणाच्याहि बाबतींत घडलेली नाहीं.

(३) सीताशोधास निघतांना हनुमंताच्या मस्तकावर एकदां हात ठेवला होता. येथें दुसऱ्या वेळीं ठेवला गेला. हेंसुद्धां अपूर्व वैशिष्ट्य आहे.

(३४) त्राहि त्राहि आर्तिहर शरण-सुखद रघुवीर ॥४५॥ असें
वदुनि दंडवत करीत देखुनि ।
उठति जवें प्रभु विशेष हर्षुनि ॥
श्रवुनि दीन वच प्रभु-मनिं भरला ।
धरुनि विशाल भुजीं हृदिं धरला ॥२॥
सानुज भेटुनि समीप बसविति ॥३॥

बिभीषणाला रघुनाथानें श्रीरघुवीर त्यास भेटले वगैरे नाहींत.

(३५) सागरानें पाय धरले पण,

लंकाकाण्ड —

(३६) इथें बोलविति राम अंगदा ।
येउनि तो नमि शिर कंजपदा ॥३॥
अती आदरें समीप बसवुनि ।
वदति खरारी कृपाल विहसुनि ॥ (३८।४)

(क) अती आदरें म्हणजे हाताला धरून; बसविण्यांत हाच अति आदर आहे. **अंगदास हाताला धरून जवळ बसविलें.** *पण भेटणें नाहीं, परम निकट नाहीं व मस्तकावर हातहि नाहीं !*

(ख) अंगदास लंकेंत पाठविलें त्या वेळीं जवळसुद्धां घेतलें नव्हतें.

(३७) लंकेंतून अयोध्येस परत जातांना शृंगवेरपुरास विमान उतरवून

निषादराजास भेटले व परम समीप बसविलें. पण *हाताला धरून नाहींच* बसविलें. (छंद १२१)

उत्तरकाण्ड —

(३८) मुनिराज वसिष्ठ रामलक्ष्मणांस भेटले नंतर रामलक्ष्मण व भरतशत्रुघ्न. हे चौघे चित्रकूटावरील भेटीप्रमाणेंच एकमेकांस यथाविधि भेटले.

(३९) श्रीराम व लक्ष्मण सर्व मातांना भेटले आहेत.

(४०) प्रभु उठवुनि हृदयीं धरिति
सजल नयन राजीव ॥ १८ म ॥

अंगदास त्याच्या इच्छेविरुद्ध घरीं पाठवितांना हें घडलें.

(४१) प्रभु मुनिवरां **धरुनि कर बसविति** (३३।६) **सनकादिकांस**

(४२) **पराप्रीतिनें निकट बसविलें** । (१६।३)

सुग्रीवादिकांस त्यांच्या घरीं परत पाठवितांना पण हात धरून नाहींच व रामसिंहासनावर व हे कपि संख्येनें पुष्कळ त्यामुळें किती जवळ बसविले असतील याची कल्पना करावी.

ल. ठे. — भरतादिकांस प्रभु भाऊच मानीत असल्यानें त्यांच्या मस्तकावर हात ठेवणें स्वभावतःच शक्य नाहीं.

या अवतरणांची तुलना करणें विशेष बोधप्रद होईल; पण हें कार्य वाचकांवरच सोपविणें इष्ट आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।११ 卐 卐 卐

रामहस्त मस्तकिं कोणाच्या

श्रीराम-प्रभूंनीं अनेक भक्तांच्या मस्तकावर हात ठेवल्याचें वर्णन मानसांत आहे. त्या वर्णनांतील शब्दभेदानें श्रीगोस्वामींनीं विशेष भाव प्रदर्शित केले आहेत.

बालकाण्ड उत्तरार्धांत व अयोध्या काण्डांत मुख्यतः माधुर्यभावाचेंच चरित्र असल्यानें त्यांत व लंकाकाण्डांत असलीं उदाहरणें नाहींत.

बालकाण्ड पूर्वार्धांत मनुशतरुपांच्या मस्तकावर—श्रीरामावतारापूर्वी स्वायंभुव मन्वंतरांत मनुशतरूपांना प्रभूंनीं रामरूपानें सीतेसह दर्शन दिल्यावर —

सादर निरखिती अनुपमरूपा । तृप्ति न मानति *मनु-शतरूपा* ॥ (१४८।७)

प्रभु निज कर-कंजा शिरिं ठेविति । **सत्वर करुणानिधान उठविति** ।।८।।

मनु व शतरूपा यांच्या शिरावर प्रभूंनीं हात ठेवला. कंज शब्द वापरून सुचविलें कीं, त्यांस पाहिजे असलेलें कं = *सुख*, ज = *जन्मास येणार* आहे. (क) मनु दशरथ झाल्यावर त्यांनीं रामास वंदन केलें नाहीं; पण कौसल्या झालेल्या शतरूपानें या काण्डांत विश्वरूपदर्शनाच्या वेळीं व अयोध्याकाण्डांत वनगमनाच्या वेळीं राम-चरणांवर डोकें ठेवलें आहे. पण अवतार चरित्रांत कौसल्या माता असल्यानें तिच्या मस्तकावर हात ठेवला नाहीं. श्रुति सेतु-पालक राम मर्यादाभंग कसा करतील ?

अरण्यकांडांत — जटायूच्या मस्तकावर सीताहरणानंतर सीतेला शोधीत हिंडत असतां समोर जटायू पडलेला दिसला, तेव्हां

कर-सरोज **शिरिं लाविती अति रघुवीर कृपाल ।**

बघुनि रामछवि-धाम-मुख गत पीडा सब हाल ॥ ३० ॥

जटायूच्या मस्तकावर *कर-सरोज* ठेवते झाले व त्याचे सर्व हाल व पीडा नष्ट झाली. पूर्वीच्या उदाहरणांत कंज = जलांत जन्मणारें हा शब्द वापरला. येथें सरोज-तलावांत जन्मलेलें (– कमल) हा शब्द वापरला. तलावांत असलेल्यास ताप होत नाहीं, व त्यांत श्रमपरिहार होऊन शीतलता प्राप्त होते; तसेंच जटायूचें झालें व त्याला शान्ति मिळाली.

किष्किंधाकांडांत — वाली व हनुमान—

(१) **वाली —**

श्रवत राम अति कोमल वाणी । वालिशिरीं स्पर्शाति निज *पाणी* ।। (१०।१)
येथें कर शब्द नाहीं व कमल किंवा त्या अर्थाचा कोमलता, शीतलतादर्शक शब्द नाहीं. *पाणी* = पाणि; – पा रक्षणे, *रक्षण करणारा, राखणारा,* (हात) हा शब्द आहे. प्रभु पुढें सांगतातच ' अचल करूं तनु *राखी प्राणां* ।' (४।१०।२) पण या रक्षणांत कोमलता, कृपा नाहीं म्हणून कमल शब्द नाहीं व त्याची पीडा नष्ट झाल्याचें वर्णन नाहीं. पाणि = राखणारा एवढाच अर्थ सुचविला; पुढील हनुमंताच्या उदाहरणांत पाणि शब्दच आहे पण सरोरुह आहे.

(२) **हनुमंताच्या मस्तकावर** — (२३।९,१०,१२) सीताशोधास जातांना —

' **पवनतनय शिर नमवि शेवटीं । जाणुनि कार्या प्रभु घे निकटीं** ।।
पाणि-सरोरुह **मस्तकिं लावुनि । करमुद्रिका दिली जन जाणुनि** ।।
वाटत *जन्म सुफल* **हनुमाना ।**

सरोरुह = सरोवरांतून वर आलेलें कमल. पाणि = रक्षण करणारा (हात), ' पा रक्षणे '. परिणाम असा झाला कीं जन्म सुफल झाल्याची खात्री हनुमन्तास वाटली. जटायूचे हाल व पीडा नष्ट झाली पण जन्म सुफल झाला असें त्यास वाटलें नाहीं. रक्षण करणारा प्रभूचा उजवा हात शिरावर असल्यावर जन्म सुफल होईल यांत काय नवल ! जटायूच्या बाबतींत रक्षकता नाहीं.

(**क**) ज्या *कार्यासाठीं हनुमान निघत आहेत त्या कार्यात प्रभूचा उजवा हात रक्षणकर्ता आहे हें पाणि शब्दानें सुचविलें.*

(**ख**) सरोज, सरसिज शब्द जन्मसंबंधसूचक आहेत. *सरोरुह* शब्दांत जन्माचा संबंध नाहीं. जन्म सुफलता झाली आहे. पुन्हां जन्म नाहीं.

सुन्दरकाण्डांत — हनुमान (१) ' **प्रभु-कर-पंकज** कपिचे शीर्षा । ', येथें कर = करणारा (हात) आणि पंकज = पंकांत जन्मलेलें (कमल) हे शब्द वापरले. पंकज चिखलांत जन्मून चिखलाच्या संसर्गापासून मुक्त असतें. तसा हनुमान कपिकुळांत व या भवपंकांत जिवंत राहणार असला तरी त्याला कपिस्वभावापासून व भवपंकांतून अलिप्त करणारा हात त्याच्या मस्तकावर ठेवला; व सुचविलें कीं अनपायिनी प्रेमभक्ति त्यास देणार.

उत्तरकांडांत — भुशुंडीच्या मस्तकावर

' **प्रभु मम शिरीं** *कर-सरोज* **ठेविति । दीनदयाल** *दुःख सब वारिति* ।।
(७।८३।४)

जटायूच्या वेळीं *कर-सरोज*च आहे व हाल पीडा नष्ट झाल्याचें सांगितलें आहे. येथें *करसरोज* आहे व सर्व दुःख निवारण केल्याचें वर्णन आहे.

(**क**) तेथें युद्धांतील जखमांचें दुःख दूर केलें म्हणून रघुवीर शब्द आहे व येथें

मायाजनित दुःख दूर केलें म्हणून ' प्रभु ' शब्द अगदीं योग्य आहे. मायाप्रेरक प्रभुच आहेत. किती सुंदर समन्वय आहे !

याप्रमाणें पांच कांडांत मिळून सहा ठिकाणीं वर्णन आहे, व सहा व्यक्तींच्या मस्तकावर हात ठेवला आहे. हनुमंताच्या दोन वेळां व मनुशतरूपांच्या एकाच वेळीं दोघांच्या. पुनरुक्ति कोठेंच नाहीं व प्रत्येक ठिकाणीं कांहीं वैशिष्ट्य आहे व तें वर दाखविलें गेलें आहे.

निषादराज, सुग्रीव, बिभीषण यांच्या मस्तकावर हात न ठेवण्याचें कारण ते रामसखे आहेत हें असूं शकेल. या प्रकरणांतही हनुमंताची अद्वितीयता दिसतेच.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१२ 卐 卐 卐

श्रीराम आणि एकवचनाचा उपयोग

श्रीमानसांतील रामचरित्राचें सूक्ष्म अवलोकन केल्यानें एक गोष्ट महाराष्ट्रियांच्या चटकन नजरेंत भरते ती ही कीं कोणाशींहि बोलतांना रामचंद्रांनीं स्वतःविषयीं नेहमीं एकवचन व इतरांविषयीं आदरार्थी बहुवचन वापरलें आह. हें परम लीनतेचें लक्षण आहे.

लक्ष्मण आणि भरत स्वतःस रामसेवक समजून वागत असतां खाजगी संभाषणांतसुद्धां त्यांनाहि बहुवचनानेंच संबोधिलें आहे. सीतेशीं स्वतः बोलत असतांसुद्धां हाच नियम पाळला आहे.

असें असल्यानें जेथें कुठें या नियमाच्या विरुद्ध झालेलें दिसतें; स्वतःविषयीं बहुवचन किंवा दुसऱ्यास एकवचन वापरलेलें दिसतें तेथें असें कां ? हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो; पण हिंदी टीकाकारांनीं कोणीहि हा प्रश्न उपस्थितच केलेला नाहीं ! त्यांना शंका आली नसेल असें म्हणवत नाहीं. ईश्वरभावनेनें बोलत असूनसुद्धां ज्यांनीं कधीं स्वतःविषयीं ' आम्ही ' असा प्रयोग केला नाहीं त्यांनींच, दशरथसुत रघुनाथ या भावनेनें बोलत असूनसुद्धां एका प्रकरणांत स्वतःविषयीं बहुवचनाचा प्रयोग मध्येंच सुरू केला आहे. महाराष्ट्रांत मात्र ७।८ वर्षांचीं गरीबांचीं मुलेंसुद्धां ' आम्ही ' ' आम्हांला ' अशी भाषा स्वतःविषयीं वापरूं लागलीं आहेत !

१. बालकांडात भार्गवदर्प-विमर्दनांत – दो० २७० पासून २८० पर्यंत जेथें जेथें राम स्वतःविषयीं बोलले तेथें तेथें मी, मला, इत्यादीच म्हटलें आहे. परंतु नाना प्रकारें विनवण्या केल्यानंतरसुद्धां जेव्हां भृगुपति म्हणाले कीं,

' बधु वदे कटु तुझी संमती । *तूं कर जुळुनि करिशि छलविनती* ॥
मज तोषवि करुनी संग्रामा । ना तर सोड राम निज नामा ॥

त्यज छल, कर रण, शंभूद्रोही ! । ना तर सानुज तुज वधतोंही ॥
परशु उगारुनि भृगुपति बकती । सस्मित मनीं, राम शिर नमती ॥ '

(२८१।१-४)

भृगुपतीनें जेव्हां कपटी व शंभुद्रोही हे आरोप केले तेव्हां मात्र रघुवंशी क्षत्रिय-कुमाराचें स्वाभिमानी रक्त थोडेंसें उसळलें; तरीसुद्धां भृगुपतीचा अपमान न करतां उलट

' राम म्हणति रुष सोडा मुनिवर । पुढें शीर्ष हें, कुठार करिं वर ॥' (२८१।७) इत्यादि सांगितलें पण त्यांचा रोष कमी झाला नाहीं तेव्हां मात्र स्वाभिमानाची थोडी चुणूक दाखविण्यासाठीं व तेवढ्यानें भृगुपति उमजले तर बरें *या हेतूनें स्वतःविषयीं बहुवचन वापरण्यास प्रारंभ* केला.

' *अम्हीं* तुम्हां कशि नाथ ! बरोबरि । *वदा* कुठें पद कुठें शीर्ष तरि ॥ '

' राम ' मात्र लघु नाम *आमचें* । नाम परशुसह मोठें तुमचें ॥ इत्यादि.

यापुढें स्वतःविषयीं बहुवचनच वापरलें आहे.

जो प्रारंभापासून सर्व संभाषणांत स्वतःविषयीं एकवचनच वापरीत होता तोच एकाएकीं बहुवचनानें बोलूं लागलेला पाहून भृगुपतींनीं उमजणें जरूर होतें, पण तें घडलें नाहीं. स्वतःविषयीं बहुवचन वापरल्याचें हें एवढेंच उदाहरण आहे !

इतरांना एकवचनानें संबोधन — यांत दोन प्रकार दिसतात,

(१) एकाच प्रसंगांत आधीं वचनानें संबोधून मध्येंच एकवचन वापरणें; आणि

(२) आरंभापासून शेवटपर्यंत एकवचनच वापरणें हा दुसरा प्रकार आहे. पहिल्या प्रकारांत मनुशतरूपा, नारद, हनुमान व बिभीषण हीं उदाहरणें आहेत व दुसऱ्या प्रकरांत सुतीक्ष्ण, शबरी व शृंगवेरपुरचा नावाडी हीं उदाहरणें आहेत.

(१) **मनुशतरूपा** — मनुशतरूपांसमोर प्रगट झाल्यानंतर मनूनें तें रूप निरखून पाहिल्यावर –

'वदति कृपानिधि पुन्हां, *अति* मी प्रसन्न जाणून ।
***मागा* वर जो रुचे मनिं महादानि मानून ॥ '**

असें मनूला सांगितलें. हें ऐकून *मनूनें* अत्यंत विनयानें व संकोचानें आपली दीनता प्रगट केली तेव्हां प्रभु म्हणाले,

' माग मजसि नृप संकोचाविण । तुला अदेय असें मम कांहिं न ॥

परम प्रसन्न झाल्याचें हें लक्षण आहे. मनूनें वर मागितल्यावर शतरूपेलाहि अति प्रेमामुळें एकवचनच वापरलें आहे. ' देवि रुचे जो *तुजसि* माग वर ।' (१।१५०।३) पण शेवटीं बहुवचनाचा उपयोग केला आहे.

' *व्हाल* अयोध्यापाल *तुमचा* सुत मी होइं तंव ॥ (दो. १५१).

हें रामावतारापूर्वी स्वायंभुव मन्वंतरांत घडलें आणि रामावतार वैवस्वत मन्वंतरांत झालां.

(२) **अरण्यकांडांत नारद** — ‘ **मत्स्वभाव मुनि *तुम्हां* ठाउका ।**’...

प्रिय अशि वस्तुहि मला कोणती । मागुं *शकां* नां मुनि *आपण* तीं ॥

(४१।४ – ४६।८)

याप्रमाणें प्रारंभीं बहुवचन वापरलें आहे. पण पुढें ‘ सुप्रसन्न रघुनाथा पाहति ।’ असे सुप्रसन्न झाल्यावर शेवटपर्यंत एकवचनच वापरलें आहे.

(३) **किष्किंधा व सुंदरकांडांत हनुमान** — किष्किंधाकांडांत प्रथम हनुमंतानें पायां पडून नमस्कार केला तरी प्रभु त्याच्याशीं बोललेसुद्धां नाहींत पण कपटरूपाचा त्याग करून आपली अत्यंत दीनता व साधनहीनता प्रगट केल्यावर अति प्रसन्न होऊन एकवचनच वापरलें आहे.

(क) सुंदरकांडांत प्रथम बहुवचन वापरलें आहे,

‘ ***वदा* तात! कशिं तरी जानकी -। राहे, रक्षी निज प्राण कीं ॥** (३०।८).

पण पुढें हनुमंताचें भाषण ऐकल्यावर एकवचनाचाच उपयोग केला आहे.

(४) **सुंदरकांडांत बिभीषण** — ‘ मी जाणें *तुमची* सब रीती ।’ (४६।६) इत्यादि प्रकारें दो. ४८ पर्यंत बहुवचनच वापरलें आहे; पण पुढें ४९।१ मध्यें एकवचन आहे. ४९ पर्यंत पाहा.

अरण्यकांड — (१) **सुतीक्ष्ण** —

‘असें *प्रसन्न परम मी* जाणुनि । *मागसि* तो वर देइन *तुज* मुनि ॥

***होशि* सकल गुण बोध-निधान ।** ’ (११।२३,२४)

असें तीन वेळां एकवचनच वापरलें. पूर्वी किंवा नंतर बहुवचन नाहीं. परम प्रसन्न झाले तेव्हां एकवचन वापरलें हें येथें अगदीं स्पष्ट दिसतें. ‘बालकसुतसम दास अमानी ।’ मध्यें सुतीक्ष्ण सर्वश्रेष्ठ आहे. (टीका पाहा.)

(२) **अरण्यकांडांत शबरी** — शबरीशीं पुष्कळ भाषण करूनसुद्धां एकवचनाचाच उपयोग वारंवार केला आहे. बहुवचन मुळींच नाहीं. (३।३५।७ — ३६।१० पाहा.)

(३) **अयोध्याकाण्डांत नावाडी** — त्या नावाड्याची साबडी भक्ति पाहून प्रथम-पासूनच एकवचनाचा उपयोग अनेक वेळां केला आहे. या तिन्ही व्यक्ती पूर्णपणें ‘ बालकसुतसम दास अमानी । ’ आहेत.

या दुसऱ्या प्रकारांत हीं तीनच उदाहरणें मानसांत आहेत.

(४) या सर्व उदाहरणांवरून निष्कर्ष निघाला कीं जे बालकसुतसम दास अमानी भक्त आहेत त्यांच्यावर रघुनाथ परम प्रसन्न झाले कीं प्रेमातिशयानें, भक्तवात्सल्यानें, त्यांस बालकसुतांसारखे संबोधितात, व एकवचन वापरतात.

(क) अशा दासांनीं याचना केल्यावर ‘ तथास्तु ’, ‘ एवमस्तु ’ म्हटलें आहे, पण प्रौढतनयसम ज्ञानी भक्तांनीं वर मागितल्यावर तथास्तु म्हटलें नाहीं.

(ख) अत्रि, भरद्वाज, अगस्ति इत्यादि इतर कोणासही एकवचनानें संबोधिलें

नाहीं, किंवा त्यांच्याविषयीं एकवचन वापरलें नाहीं.

'प्रौढतनयसम ज्ञानी' भक्त बनणें चांगलें कीं 'बालकसुतसम दास अमानी' राहणें चांगलें याचा विचार वाचकांनीं करावा. श्रीगोस्वामी 'बालकसुतसम दास अमानी' भक्त आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१३ 卐 卐 卐

श्रीरघुवीर-वीरता

वीर्यं चाऽक्षीणशक्तित्वं वधमानातिपौरुषम्।
अपि सर्वे दशास्थस्य रामस्याऽविकृतिश्च तत् ॥

शक्ति कधा क्षीण न होणें, अतिपौरुष दिवसेंदिवस वाढणें आणि कोणत्याहि दशेंत विकार उत्पन्न न होणें यास वीर्य म्हणतात व तें रामाच्या ठिकाणीं होतें (भगवद्गुण-दर्पणे) याच ग्रंथांत पांच प्रकारची वीरता वर्णन केली आहे.

त्यागवीरो दयावीरो विद्यावीरो विचक्षणः।
पराक्रममहावीरो धर्मवीरः सदा स्वतः ॥
पञ्चवीराः समाख्याता राम एव स पञ्चधा।
रघुवीर इति ख्यातः पञ्चवीरोपलक्षणः ॥

कोणी सदा त्याग(दान)वीर असतो, कोणी दया(कृपा)वीर असतो, कोणी विद्वान-विद्यावीर असतो, कोणी महापराक्रम(युद्ध)वीर असतो, तर कोणी धर्मवीर असतो; असे हे पांच प्रकारचे वीर असूं शकतात; ही पांच प्रकारची वीरता रामाच्याच (रघुनाथाच्या) ठिकाणीं असल्यामुळें ते रघुवीर नांवानें प्रसिद्ध झाले.

श्रीगोस्वामीजींनीं ही पांच प्रकारची वीरता श्रीरामाच्या ठिकाणीं दाखविली असून ऋजुतावीर हा सहावा प्रकारहि अनेक ठिकाणीं दाखविला आहे; व एकाच चौपाईंत ही सहा प्रकारची वीरता सुचविली आहे ती मूळ अनुवादित चौपाई (१।१३।७).

हिं. — गई बहोर गरीबनेवाजू। सरल सबल साहिब रघुराजू ॥

म० — गतप्रदायक दीनदयालहि। सरल सबल साहिब रघुराजहि ॥ (१।१३।७) ॥

(१) गई बहोर = गेलेलें परत मिळवून देणारा = गतप्रदायक = त्यागवीर, *दानवीर*.

(२) गरीबनेबाजू = दीनांवर दया करणारा = दीनदयाल = दयावीर, *कृपावीर*.

(३) सरल = **ऋजुता** – *सरलतावीर*.

(४) सबल – बलवीर = महापराक्रमवीर = *युद्धवीर*.

(५) साहिब = स्वामी, ईश = *विद्यावीर*, ज्ञानवैराग्यवीर.

(६) रघुराज — रघुवंशी राजे धर्मवीर होते म्हणून **धर्मवीर.** याप्रमाणें सहा प्रकारची वीरता रघुपति रघुराजाच्या ठिकाणीं असल्याचें या एका चौपाईत सुचविलें आहे.

मानसांत जेथें जेथें रघुवीर शब्द वापरला आहे, तेथें या सहा वीरतांपैकीं एक किंवा अधिक अथवा साही प्रकारची वीरता उपयोगांत आल्याचें दिसतें. (क) मानसांत रघुवीर शब्द १४४ वेळां आला आहे; पैकीं चार वेळां बालकाण्ड पूर्वार्धांत असला तरी तें वर्णन पुढील चरित्राचा संबंधदर्शकच आहे. रामावतारानंतर **रघुवीर शब्दाचा उपयोग प्रथम विश्वामित्रानें यज्ञरक्षणानंतर केला आहे :—**

गौतमनारी शापवश धरुनि उपलवपु धीर।

चरणकमलरज वांछिते *कृपा* **करा** *रघुवीर* ।। (१।२१०)

विश्वामित्राबरोबर निघाले तेव्हां नुसते वीर होते.

पुरुषसिंह युग*वीर* **हर्षिं निघाति मुनिभयहरण** ।। (१।२०८)

तेव्हांपासून यज्ञरक्षण होईपर्यंत विश्वामित्रांस जे अनुभव आले त्यांवरून त्यांनीं ही पदवी दिली. ते अनुभव पाहावे.

१. धर्मवीरता — पित्राज्ञा मान्य करून, मुनि मखरक्षणासाठीं, १४ वर्षांचेंच वय असतां सम्राटकुमार असून हर्षानें व उत्साहानें अनवाणी, पायीं चालत निघाले यानें धर्मवीरता दिसली.

२. त्यागवीरता — आईबापांचा, प्रिय प्रेमळ भावांचा, नोकर–चाकरांचा, सर्व महाराजभोगांचा व ऐश्वर्याचा त्याग करून, पायीं, अनवाणी मुनिवेषानें, आनंदानें निघाले, आनंदानें पायीं प्रवास केला, कधीं अप्रसन्न, खिन्न दिसले नाहींत, कीं घरची आठवणसुद्धां काढली नाहीं. यानें *त्यागवीरता* दिसली.

३. विद्यावीरता — ' अल्पकाळिं *सब* विद्या आल्या ' (१।२०४।४) ' विद्यानिधिला विद्या अर्पिति ' असें म्हटलेंच आहे. म्हणजे विश्वामित्रानें विद्या देण्यापूर्वींच राम विद्यानिधि होते.

४. दया-कृपा-वीरता — ताटकेची दया येऊन तिला ' निज पद ' दिलें; यानें दया-वीरता व दानवीरताहि दिसली.

एकचि बाणें प्राणहरण करि । *निज पद दिधलें दीन बघुनि,* **तरि** ।। (२०९।६)

तैं ऋषि हृदिं निज नाथ ओळखिती । विद्यानिधिला विद्या अर्पिति ।। (२०९।७)

याप्रमाणें मानसांत ताटकावधानंतर विद्या दिल्या आहेत. या वेळीं खेळांतल्या धनुकल्या हातांत होत्या असें गीतावली बालकांड पद १०० मध्यें म्हटलें आहे. ' केलिबान धनुधारी. '

५. युद्धवीरता — सुबाहूसारख्या घोर अजिंक्य राक्षसाला एका **पावक** बाणानें ठार मारले व यज्ञमंडपांत रक्ताचा एक बिंदुसुद्धां सांडूं दिला नाहीं; आणि

मारीचाला केवळ एका बोथट बाणानें ८०० मैल दूर सागर तीरावर फेकलें व त्याची वृत्ति रामाकार केली या सर्व गोष्टींवरून युद्धवीरता, महापराक्रमवीरता दिसली.

६. ऋजुता-वीरता — अयोध्येंतून निघाल्यापासून गौतमाश्रमापर्यंत येईतों अनेक दिवसांत अगदीं सरळ वागणूक दिसली; कपट, लपवालपव इत्यादि कांहीं दिसलें नाहीं. विश्वामित्राश्रमांत गेल्यावर सकाळीं उठल्यावर स्वतःच मुनींस सांगितलें कीं ' यज्ञ करावा निर्भय जाउनि ' (२१०।१) यानेंहि सरलता दिसली. याप्रमाणें सहा प्रकारची वीरता दिसल्यानें विश्वामित्रानें ' रघुवीर ' म्हटलें.

दो. २१० मध्यें ' कृपा करा रघुवीर ' म्हटलें यांतील ' कृपा करा ' हें शब्द स्पष्टच सांगतात कीं आपली कृपावीरता प्रगट करा.

गौतमाश्रमांत अहल्योद्धाराच्या वेळीं रघुवीर ही पदवी प्रथम दिली; पण तेथें विश्वामित्रांबरोबर असलेले मुनिवृंद व रामलक्ष्मण यांशिवाय इतर कोणी नव्हतें; म्हणून जनकपुरीच्याबाहेर आमराईंत गेल्यावर विश्वामित्रानेंच पुन्हां या संबोधनाचा उपयोग केला.

' **कौशिक वदले रुचे मम मना । इथें उतरुं** *रघुवीर सुजाणा* ' ॥ (१।२१४।६) येथें सुजाण शब्दानें विद्यावीरता, विचक्षणता सुचविली. याप्रमाणें बहुतेक ठिकाणीं विशिष्ट वीरतासूचक शब्द वापरलेला आढळतो; कांहीं ठिकाणीं पूर्वापर संदर्भानें एक किंवा अनेक वीरता विचारवंतांस दिसतात, टीकेंत बहुतेक ठिकाणीं स्पष्टीकरण आहे. १४४ पैकीं फक्त एकाच स्थळीं रघुवीरबद्दल रघुराज शब्द अनुप्राससौंदर्यासाठीं घातला आहे. (३।१४।४)

रघुवीर शब्द अनुवादांत २१, ३१, १५, ९, १४, ३४ व १९ (= १४३) वेळां काण्डशः आहे. मूळांत अरण्यकाण्डांत १६ वेळां आहे.

यांपैकीं एखादी किंवा अधिक वीरता श्रीरघुवीर पुष्कळ वेळां आपल्या हास्यानेंच कृतींत आणतात म्हणून श्रीरामहास्याचा विचार करणें इष्ट आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१४ 卐 卐 卐

श्रीरामाचें हास्य व त्याचा परिणाम

' **विधुकर-निकर विनिन्दि हासिका** ' ॥ (१।१४७।२)

इंदु अनुग्रह हृदीं प्रकाशे । सुचविति किरण मनोहर हासें ॥ (१।१९८।७)

' **माया हास** ' (६।१५।५)

(१) श्रीरामाचें हास्य पौर्णिमेच्या चंद्राच्या किरणसमूहाची निन्दा करणारें-त्यास हसणारें, त्यास लाजविणारें असतें. रघुपतिच्या हृदयांत अनुग्रह(कृपा)रूपी

इंदु (चंद्र) प्रकाशत आहे हें मनोहर हास्यरूपी किरण सुचवितात. हास्याचा एक उपयोग येथें सुचविला. **कोणावर कृपा करणें असेल किंवा कोणावर प्रसन्न झाले कीं राम मनोहर हास्य करतात.**

(२) **माया हास** — प्रभूचें हास्य हीच माया-राममाया—हरिमाया आहे. जेव्हां आपल्या अति प्रबल मायेला कोणावर प्रेरित करावयाची असतें तेव्हां श्रीराम हसतात; किंवा कांहीं अद्भुत कार्य मायेकडून गुप्तपणें करवावयाचें असेल तेव्हां हसतात; अथवा पूर्वीं प्रेरलेल्या मायेला आकर्षून घेणें असेल तेव्हां हसतात. कृपारूपी हास्य (कृपाहास्य) आणि मायारूपी हास्य (मायाहास्य) असे हास्याचे दोन मुख्य प्रकार झाले.

(क) हें हास्य मानसिक असो, स्मित असो, हास्य असो कीं विहास (मोठ्यानें खदखदा हसणें) असो परिणाम सारखाच.

१. **कृपाहास्य** (१) अर्थ सहज लक्षांत येण्यासारखें उदाहरण प्रथम घेऊं —
जयमाला समर्पणानंतर

म्हणति सखी प्रभुपद धर सीते ! । चरणां स्पर्श न करि, अति भीते ! ।।
दो०— स्मरुनि गौतमनारि गति लावि न पायां हात ।।
प्रीति अलौकिक बघुनि मनिं रघुकुलमणि हसतात ।। (१।२६५)

‘ **प्रीति अलौकिक बघुनि रघुकुलमणि हसतात** ’ हा जणूं एक नियमच सांगून ठेवला. मनांत हसणें, स्मित, हास्य, विहास इत्यादि परिस्थितीवर अवलंबून असतें. येथें गुरुजनसमाज आहे म्हणून मनांत हसले. सीतेवर प्रसन्न झाले आहेत व तिची इच्छा (चरणस्पर्श न करण्याची) पूर्ण होईल अशी कृपा मानसिक हास्यानें केली; त्यामुळें सीतेनें रामचरणस्पर्श करण्याचा विषय निराळ्या परिस्थितीनें एकदम बाजूस सारला गेला. (टीका पाहा.)

(२) **अयोध्याकांडांत होडीवाला नावाडी—**

‘ नाविकवच जैं कानिं *प्रेमळ वेडें वाकडें*॥
***विहसति करुणाखाणि* बघुनि बंधु–सीतेकडे** ।। १०० ।।

‘ प्रेमळ...वाकडें ’ शब्द स्पष्ट सांगतात कीं त्या बालकवत प्रेमळ वाणीनें प्रभु त्याच्यावर प्रसन्न आहेत. ‘ करुणाखाणि ’ शब्द सांगतो कीं त्याच्यावर कृपा करून त्याची इच्छा पुरविणार.

(३) **कृपासिंधु वदले** *स्मित करुनी* । **तें कर नाव किं जाइ न उडुनी** ॥ (१०१।१)
परंतु त्यानें शपथपूर्वक प्रतिज्ञा केली आहे कीं ‘ पाय धू आणि गंगापार घेऊन जा.’ असें स्पष्ट सांगितल्याशिवाय पलीकडे नेणार नाहीं. शरणागति स्पष्ट पाहिजे, मोघम नको; म्हणून त्याची इच्छा पूर्ण करतात.

‘ आण जला, धू शीघ्र पदांला । पार ने किं बहु उशीर झाला ।।’ (१०१।२)

(क) ' स्मित करुनी ' जें बोलले त्यांतील स्मितरूपी मायेनें गंगेची मति अशी मोहित केली कीं ती मार्ग देणार नाहीं.

एकवार यन्नामा स्मरती । नर अपार भवसागर तरती ॥

विनविति कोळया करुणाकर ते । ज्यांच्या त्रिपदां विश्व न पुरतें ॥

पदनख निरखुनि सुरसरिहर्षित । प्रभुवचनें मोहें मति कर्षित ॥ (१०१।३-५)

तिची मति मोहानें व्यापली याचें बाह्य कारण तें वचन पण अन्तस्थ खरें कारण त्या वचनाच्या आधींची *स्मितरूपी मायाच*. गंगेला मोह उत्पन्न झाला कीं समर्थ प्रभु असून नावाड्याला कसें विनविलें ? तेव्हां हे प्रभु नसावेत; यांना मार्ग देणें योग्य नव्हे. प्रसन्नता-कृपा- हास्याचीं उदाहरणें; ११२१८।४; ११२३३।५; ११२३९।७; ११२४३।५; ११३५०म; २११२८।१; २१२३९।८; ३११२।४; ६११२।९; ६१११७।४; ६१११७।८; ६१११८।२; ६१३८।४; ६१३८रा; ६११०८।१२.

सूचना — ५।५११५ मधील हास्यानें सागराची मति मोहित करून तो प्रसन्न होणार नाहीं असें केलें; कारण लक्ष्मणाच्या भाषणानें प्रभु त्याच्यावर प्रसन्न आहेत; पण बिभीषणाचा मान राखावयाचा आहे. तिसरें कार्य म्हणजे रावणाचे हेर कपिरूपानें कपिसेनेंत शिरले आहेत त्यांचें कपट बाहेर पाडावयाचें आहे. अशीं विविध कार्यें मायेकडून करविणें आहेत; त्यांत लक्ष्मणावर कृपा करणें मुख्य आहे.

मायाहास्य — (१) हास्यानें मायेला प्रेरणा देऊन कोणास तरी मोहित करणें किंवा प्रेरलेल्या मायेला हसून परत आकर्षून घेणें हा एक प्रकार आहे.

(२) कोणाच्या ठिकाणीं उत्पन्न झालेलें ऐश्वर्यज्ञान (रामप्रभु आहेत हें ज्ञान) दाबून टाकून राम मनुष्य आहेत या भावनेची उत्पत्ति करणें हा दुसरा प्रकार आहे.

(३) या युद्धांत शत्रूच्या मायेचा किंवा शत्रूचा संहार करण्याची प्रेरणा मायेला देऊन मग निमित्तमात्र बाण सोडणें हा तिसरा प्रकार आहे.

नारदमोह—(१) शंकरांच्या उपदेशाचा अव्हेर करून नारद क्षीरसागरांत गेले तेव्हां

उठुनि रमापति मुदित भेटले । ऋषिसमवेत निजासनिं बसले ॥

चराचरेश्वर *वदले विहसुनि* **। केली बहुदिनिं दया आज मुनि ॥** (११२८।५-६)

मोठ्यानें हसून आपल्या मायेला प्रेरणा दिली व मोहमात्रेचा पहिला वळसा दिला; म्हणूनच कवि सांगतात,

अति रघुपतिची प्रचंड माया । मोहि कुणा न जगीं जाता या ॥ (१२८।७)

(२) मायामोहित नारदानें प्रार्थना केल्यावर प्रगट झालेले भगवान

निजमाया बल विशाल बघुनी । दिनदयाल वदति *मनिं हसुनी* **॥** (१३२।८)

मोहाच्या मात्रेचे आणखीं वळसे हसून दिले. प्रथम प्रेरलेल्या मायेनें मायानगररचना वगैरे केली आणि नारदाच्या मनांत प्रबल कामवासना वगैरेंची उत्पत्ति केली. दुसऱ्या हास्यरूपी मायेनें शिवगणांस शाप व भगवंतास शाप देण्याइतका क्रोध उत्पन्न

केला व शेवटीं हास्य न करतां स्वेच्छेनेंच मायेला आकर्षून घेतलें.

घे निजमाया प्रबलते कृपाब्धि आकर्षून। (१।१३७) या प्रकारचीं उदाहरणें सती (१।५३।६); गंगेला मोहित केलें. (२।१०१।२); सुग्रीव (४।७।२२) व त्या मायेला हास्यानें आकर्षून घेतलें (४।२१।७). (क) ७।७७; ७।७९।४ व ७।८०।२ यांत हास्यानें भुशुंडीला मोहित केलें आहे व ७।८३।३ मध्यें मायेला आकर्षून घेण्यास सुरवात केली हास्यानेंच.

मायाहास—प्रकार दुसरा (१) कौसल्या—

ब्रह्माण्डनिकाया निर्मित माया प्रतिरोमीं ज्या वेद म्हणे।

त्या मदुदरवास वदत उपहासहि चलित धीरधी श्रवुनि बने ॥

जें ज्ञान उपजलें प्रभु *मृदु हसले*, **चरित विविधविध करुं बघती।**

माते समजावति सुकथा सांगति सुतवात्सल्या जाशि धरि तीं ॥(१।१९२ छं.३)

(क) कौसल्येच्या ठिकाणीं उत्पन्न झालेलें प्रभूच्या ऐश्वर्याचें ज्ञान म्हणजेच ऐश्वर्यभाव दाबून टाकून तिच्या ठिकाणीं पुत्रवात्सल्य उत्पन्न करण्यासाठीं मृदुमंदहास्य-स्मित करून मायेला प्रेरणा दिली; तेव्हां तो निश्चय तें ज्ञान लयास जाऊन तिनें शिशु बनण्याबद्दल प्रार्थना केली. या मायेंतून मुक्त करून तिला पुन्हां ऐश्वर्यज्ञानसंपन्न करण्यासाठीं विश्वरूप दाखवितांना—

(२) **जननी व्याकुळ राम निरखती।** *मधुर सुस्मिता* **प्रभु तैं** *करती* ॥

दो. — **दाखविले मातेसि निज अद्भुत रूप अखंड ॥**

प्रति रोमीं किति कोटी लागलें कीं ब्रह्मांड ॥ (१।२०१)

या प्रकारचीं उदाहरणें १।२१६।७ (टीका पाहा.) २।४१।६. कैकयीची विरोधी वृत्ति तशीच टिकविण्यासाठीं स्मित केलें आहे.

तिसरा प्रकार — शत्रूंची वैरबुद्धी वाढविण्यास,-त्यांच्या मायेचा संहार करण्यास किंवा शत्रूंचा वध करण्यास माया हास्य केलें आहे.

(क) वैर वाढविण्यासाठीं ३।१८।१३; ३।१९।८; ३।२३; शत्रूंच्या मायेचा किंवा शत्रूंचा संहार करण्यासाठीं अरण्यकांडांत मायेचा उपयोग केला नाहीं.

(१) **हसुनि कृपानिधि चाप जोडिती। पावक सायक सपदिं सोडिती ॥**

निशाचरमायेनें निर्माण केलेला निबिड तम नष्ट केला. (६।४७।३)

(२) मेघनादनिर्मित मायेचा विनाश करतांना — (६।५२।४–७ पाहा.)

व्याकुळ कपि अति माया बघतां।...राम *पाहुनी* **कौतुक** *हंसले* ॥

आणि मग '*एक्या बाणें हरली माया*'.

(३) **चमु चकित बघुनी** *हसुनि लाविति चापिं शर* **कोसलधनी ॥**

माया हरी हरि **निमिषिं, हर्षें सकल मर्कट वाहिनी ॥** (६।८९।३)

(४) '**मग** *हसुनि* **रघुकुलमणि** *शरांनीं तीं शिरें* **सब** *वेधती* ॥ (६।९३ छंद)

(५) रावणांनें आपल्या मायेनें असंख्य रावण निर्माण केले तेव्हां —

सुर वांनर बंधुनी विकल हसति कोसलाधीश।
कार्मुकिं लावुनि एक शर **हत सगळे दशशीश ॥ ९६ ॥**
' प्रभु हरती माया '

लंकाकांडांत युद्धाचा प्रसंग असतां राम मधूनमधून सारखे हसताना दिसतात, याचें कारण इतकेंच कीं हसण्यानें मायेला प्रथम प्रेरणा देतात व नंतर धनुष्यावर बाण लावून त्या बाणानें, त्या बाह्य निमित्तानें जें पाहिजे तें संहाराचें कार्य करतात.

याप्रमाणें श्रीरामहास्याचें यथामति विभागशः सोदाहरण विवरण केलें गेलें. गूढार्थ चंद्रिकेंत प्रत्येक ठिकाणीं स्पष्टीकरण केलेलें दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१५ 卐 卐 卐

विश्वरूप–दर्शन

श्रीरामचरितमानसांत अनेक वेळां विविध प्रकारचें विश्वरूप–दर्शन दिलें आहे. कांहीं ठिकाणीं वर्णन व उल्लेख स्पष्ट आहेत तर कांहीं ठिकाणीं नाहींत. सुंदर व लंका या दोन कांडांत विश्वरूप–दर्शन नाहीं.

बालकाण्डांत — (१) सती दक्षकुमारीला — श्रीरघुनाथ भगवान् परमात्मा नाहींत असा मोह सतीला होऊन ती सीता बनून परीक्षा पाहण्यास गेल्यावर ' रघुनाथ सर्वज्ञ नाहींत ' हा तिचा भ्रम एका नमस्कारानें व एका प्रश्नानेंच उडविला. ऐश्वर्याची परीक्षा पाहण्याची प्रथम तिची इच्छा होती पण या फजितीनें आणखी साहस करवलें नाहीं व ती सतीरूपानेंच शंकरांकडे निघाली असतां —

राम सती–दुःखास ओळखिती। जरा प्रभावा प्रगट दाखविति ॥
सती बघे कौतुक पथिं जातां। राम समोर सवें श्री भ्राता ॥
फिरुनि बघे मागें प्रभु पाही। रुचिर वेषिं सानुज सीताही ॥ (५४।३–५ पासून) 'ते रघुवर ते लक्ष्मण सीता' (५५।५) पर्यंत विश्वरूपदर्शन आहे. **या विश्वरूप-वर्णनांत केवलाद्वैतादि विविध मतांस पूर्ण वाव आहे.** (गूढार्थचंद्रिका पाहा.) **हें विश्वरूप अगदीं सात्त्विक व उपासनात्मक आहे.**

(२) **कौसल्येला विश्वरूपदर्शन** — श्रीराम अगदीं लहान; पाळण्यांतले शिशु असतांनाच कौसल्या मातेला विश्वरूप दाखवून तिचें मलिन झालेलें ज्ञान पुन्हां विमल केलें आहे.

एकें वेळ जननिनें न्हाणिला। शृंगारुनि पर्यंकिं निजविला ॥ (१।२०१।१) पासून **' प्रभु न अतां कधिं लागो तव माया मजलाहि ॥ २०२ ॥** पर्यंत पाहणें. यांत

'अगणित रवि शशि शिव चतुरानन' जीवाला बांधणारी माया व त्याला सोडविणारी भक्ति दिसली; आणि प्रतिरोमीं अनंत ब्रह्मांडें लागलेलीं दिसलीं वगैरे वर्णन आहे. सतीला दाखविलेल्या विश्वरूपापेक्षां हें फारच भयानक व अद्भुत आहे व अगदीं निराळें आहे. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

(३) **जनकपुरींत धनुर्यज्ञमंडपांत** — हें वर्णन स्पष्ट नाहीं. एकच रूप अनेकांना भिन्न ठिकाणीं आपल्यासमोर दिसलें आहे.

(क) त्या रंगभूमींत विश्वामित्रांसह प्रवेश केल्यावर जनकराजा विश्वामित्रांस,

विनति करुनि निज कथा श्रावयति । रंग–अवनि सब मुनिस दाखविति ॥
उभय कुमरवर जाती जेथें । चकित लोक अवलोकति तेथें ॥
निज–सन्मुख सकलां प्रभु दिसले । मर्म-विशेष न कुणाहि कळलें ॥(२४४।५–७)

ज्या मंडपांत चारी बाजूंस सर्व राजे व नगरलोक बसलेले आहेत तो मंडप पहात फिरत असतां ज्याला त्याला (सर्व लोकांस) रामलक्ष्मण आपल्या अगदीं समोर मुख केलेलें दिसूं लागले, पाठ कोणासच दिसली नाहीं. स्वाभाविक सृष्टिनियमांप्रमाणें ही गोष्ट अगदीं अशक्य असून घडली पण यांतील विशेष मर्म कोणासच कळलें नाहीं. सार हें कीं एकाच वेळीं उभय बंधूंचीं हजारों रूपें अशा रीतीनें प्रगट झालीं कीं प्रत्येकास रामलक्ष्मण आपल्या अगदीं समोर मुख असलेले दिसले पण इतर कोणाच्या समोर दिसले नाहींत. असें करण्यांत फार गूढ हेतु आहे; तो गूढार्थचंद्रिकेंत स्पष्ट दिसेल

अयोध्याकाण्डांत — (१) चित्रकूटच्या मार्गावरील एका गांवाजवळ —

कुणी बघुनि वटछाय भालि मृदु तृण पल्लव घालि ।।
श्रम घडिभर हरणें म्हणे जाल अतां किं सकाळीं ॥ ११४ ॥
जाणुनि मनीं श्रमित सीतेसी । घडिभर थांबति वटछायेसी ॥
मुदित नारि नर देखति शोभे । अनुपम रूपिं नयन मन लोभे ।।
टकमक सब शोभति चौफेर । रामचंद्रमुख चकोर ॥ (११५।३–५)

वडाच्या छायेंत सीताराम व लक्ष्मण बसले आहेत; सभोंवती चारी बाजूंस (चौफेर) गांवचे लोक उभे आहेत; आणि सर्व रामचंद्रांच्या मुखचंद्राकडे टक लावून बघत आहेत !

(क) चारी बाजूंस सभोंवार असलेल्या सर्व लोकांस मध्यें बसलेल्या एका मनुष्याचें तोंड पूर्णपणें चंद्रासारखें दिसणें शक्य नाहीं. 'सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः' असें बनले, पण प्रत्येकाला एकच मुख दिसलें, 'विश्वतः मुखः' अशी श्रुति आहेच. विश्वतः = सर्वतः, सर्व बाजूंनीं मुख असलेला.

श्रीराममुखदर्शन आपल्याला झालें नाहीं असें कोणासही वाटूं नये म्हणून अति प्रेमाला वश झालेल्या प्रभूंनीं ही अशी लीला केली.

(२) **अयोध्यावासी सर्व लोकांस** एका क्षणांत यथारुचि भेटले; एवढेंच नव्हे लक्ष्मण आणि गुह यांच्यासह भेटले.

आर्त लोक सब कळे **सुजाणा** । *रामा करुणाकर भगवाना* ॥
ज्या ज्या भावें जे अभिलाषिति । त्यांची रुची तशी तशि पुरविति ॥
सानुज सकलां पळांत भेटुनि । *दुःखद दाह दूर कृत दारुण* ॥
हें महत्त्व रामा बहु नाहीं । कोटि घटीं रवि एक किं राही ॥
भेटुनि गुहा परम अनुरागां । पुरजन, वानिति सर्व सुभागा ॥ (२४।१–५)

जितके लोक होते तितके राम, लक्ष्मण व गुह निर्माण केले व एका क्षणांत सर्वांन त्यांच्या त्यांच्या रुचीप्रमाणें भेटले. हें मर्म मात्र कोणाला कळलें नाहीं. यांतील हेतु तिरप्या अक्षरांतील शब्दांनीं सांगितला आहे.

अरण्यकांडांत — (१) **अगस्तींच्या आश्रमांत** गेल्यावर मुनिश्रेष्ठानें श्रीरघुवीरास सिंहासनावर बसवून

मग बहुपरिं करुनी प्रभुपूजा । भाग्यवंत मजसम नाहिं दूजा ॥ १२ ॥
तेथिल सकल अपर मुनिवृंदां । हर्ष विलोकुनि सब सुख-कंदा ॥ १३ ॥
दो. – **मुनिसमूहिं बसलेले** *सर्वांसही समोर* ।
विलोकिती शरदेंदुला जणूं निकायचकोर ॥ १२ ॥

हें अयोध्याकांडांतील पहिल्या उदाहरणासारखेंच आहे. (निकाय = समुदाय)

किष्किंधाकांडांत — (१) **प्रवर्षणगिरीवर** रामलक्ष्मण राहत असतां तेथें सर्व दिशांनीं वानरयूथ आले; त्या समयींचें वर्णन आहे. शंभु सांगतात,

' दृष्ट उमे ! त्यां कीश–कटक तें । मूर्खचि ते ' करुं गणना ' म्हणते ॥
येति रामपदिं मस्तक नमती । बघुनि वदन सब सनाथ बनति ॥
एक असा कपि चमूंत नाहीं । रामें कुशल न पुसल ज्याही ॥
प्रभुस यांत ना लव नवलावहि । व्यापक विश्वरूप रघुरावहि '॥ (२२।१-४)

सार हें कीं जितके ऋक्ष, वानर आले तितकीं लक्षावधि रूपें प्रगट झालीं व प्रत्येकास कुशल विचारलें.

सूचना —सुंदरकांडांत व लंकाकांडांत विश्वरूपदर्शनाचा प्रगट किंवा गुप्त उल्लेख नाहीं तथापि रावणानें अगणित रामलक्ष्मण कपिसैन्यांत निर्माण केले व एकदां अगणित रावण–दशानन प्रगट केले आहेत व ते युद्ध करूं लागले आहेत. (८९ छंद व ९६।१-२ पाहा.)

उत्तरकाण्डांत — बालकांडांत तीन वेळां तीन प्रकारचें विश्वरूप दाखविलें आहे. या उपसंहारकांडांतही तीन वेळां तीन प्रकारचेंच विश्वरूप दाखविलें आहे; पण बाल-कांडांतील तिन्ही प्रकारांहून हीं भिन्न आहेत.

(१) **वनवास संपवून नन्दिग्रामास परत आल्यावर** सर्व अयोध्यावासी लोकांना भेटण्यासाठीं हें प्रगट केलें आहे. अयोध्याकांडांत चित्रकूटला जसें दाखविलें तसेंच हें आहे. *येथें फक्त रामच भेटले.*

प्रेमातुर जाणुनि जन भारी। कौतुक करिति कृपाल खरारी॥
प्रगटुनि अगणित रूपें तत्क्षण। सकलां भेटति सविधि कृपाघन॥
मग रघुवीरें कृपावलोकीं। कृत सगळे नरनारि विशोकी॥
भेटति भगवान् न लागतां क्षण। उमे! मर्म ना कळे कुणा पण॥ (६।४-७)

(२) **भुशुंडीला अयोध्येंत —**

असतां रिंगणशील नृपांगणीं। करिती कौतुक पतंग-कुलमणि॥ प्रज्ञा.॥

भुशुंडी आपल्या मोहाची कथा सांगतो : —

'राम मला भ्रमचकित पाहतां। विहसति त्या श्रुणु विशेष चरिता॥
त्या लीलेचें मर्म न कोणी। जाणति अनुज न पिता न जननी॥ (७९।४,५ पासून)
मिटले नयन यदा मी भ्यालों। बघतों तों कोसल-पुरिं आलों॥ (८०।१ पर्यंत)

पाहणें. यांत रांगणाऱ्या बाल रामचंद्रानें त्या काकाला पकडण्यासाठीं हात पसरले. तो काक ब्रह्मलोकाच्या पलीकडे सप्तावरणें भेद करून पळत गेला पण रामबाहू त्याच्या मागें दोन अंगुळें अंतरावर असलेले त्याला संतत दिसले! शेवटीं घाबरला व डोळे मिटले व उघडून पाहतो तों पुन्हां आपण अयोध्येंतच, त्याच अंगणांत, असल्याचें त्याला दिसलें.

(३) **हसले राम यदा मी दिसलों। हसतांक्षणीं मी मुखीं प्रविशलों॥** (८०।२ पासून ८२ रा पर्यंत पाहा.) रांगणारे राम हसले तेव्हां तो वायस त्या बाल रामाच्या मुखांत शिरला. तेथें त्याला त्या बाल रामाच्या उदरांत कोट्यवधि ब्रह्मांडें, त्यांतील सर्व विस्तारासह व राम लक्ष्मणादि सर्वांसह (फक्त सीता नाहीं) दिसलीं. प्रत्येक ब्रह्मांडांत तो १००।१०० वर्षें राहिला; व याप्रमाणें त्या बाल रामाच्या उदरांतील ब्रह्मांडांत शंभर कल्पें भ्रमण केल्याचा अति अद्भुत अनुभव त्या बाल काकाला आला; पण अयोध्येंत प्रत्यक्ष दोन घटकाच लोटल्यां होत्या, इत्यादि सर्व अति अद्भुत आहे.

विश्वरूप म्हणजे अर्जुनास भगवंतांनीं दाखविलेलें गीतेंतलेंच असा कोता समज कोणाचा झाला असल्यास तो या प्रकरणानें दूर होईल. भागवतांत यशोदेला दाखविलें तें व ब्रह्मदेवाला दाखविलेलें या सर्वांहून निराळें आहे. सार हें कीं,

हरि अनंत हरि-रूप अनंतहि। विधि शिव कोणि न पावति अंतहि॥

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१६ 卐 卐 卐

मानसांत नभोवाणी

श्रीरामचरितमानसांत अनेक वेळां नभगिरा = नभोवाणी—आकाशवाणी झाली आहे. निरनिराळ्या ठिकाणीं नांवें भिन्न असलीं तरी *अशरीरिणी वाणी* म्हणजेच *आकाशवाणी*. शरीर न दिसतां आकाशांतून ऐकूं आलेल्या वाणीला मानसांतच आकाशवाणी

म्हटलें आहे. विसाव्या शतकांत अशा प्रकारची (शरीर, बोलणारा, न दिसतां ऐकूं येणारी) वाणी नभोवाणी नांवानें संबोधिली जाईल असें स्वप्न भविष्यदर्शी श्री गोस्वामींस पडलें असावें म्हणूनच मानसांत नभगिरा, नभवाणी, असे शब्दप्रयोग आहेत.

बाल, अयोध्या व उत्तर या कांडांतच आकाशवाणीचीं उदाहरणें आहेत. तथापि इतर सर्व कांडांत आकाशवाणीचें कार्य करणारी कोणाची तरी अनपेक्षित वाणी कानीं आली आहे. आकाशवाणीचें निदर्शन या लेखांत अगदीं संक्षेपानें केलें आहे; विस्तार गूढार्थचंद्रिकेंत आहे.

बालकांडांत सहा वेळां. (१) **शंकरांसाठीं झालेली** — ' सतीभेट या तनुनें नाहीं ' (५७।२) असा निश्चय मनांत करून शंकर सतीसह कैलासास जात असतां —

जातां होइ *गिरा नभिं* **सुंदर । जय महेश कृत भक्ति दृढा वर ॥**

अन्य असा पण कोणि न कर्ता । रामभक्त भगवंत समर्था ॥ (५७।४-५)

(२) **पार्वतीसाठीं** — पार्वती तप करीत असतां तिला धीर देण्यासाठीं झालेली –

क्षीण बघुनि अति उमा–शरीरा। *ब्रह्मगिरा गगनीं गंभीरा* ॥ ८ ॥

दो. – **सुफल मनोरथ होइ तव श्रुगु गिरिराजकुमारि ।**

क्लेशा दुःसह थांबवी मिळांते अतां त्रिपुरारि ॥ ७४ ॥

यापुढें पार्वतीची प्रशंसा करून ही ब्रह्मवाणी खरी केव्हां समजावी व घरीं केव्हां जावें वगैरे आकाशवाणीनें सांगितलें आहे.

(३) **मनुशतरूपांसाठीं** — मनुशतरूपा तप करीत असतां —

अस्थिमात्र तनु होउनि राही । तरि पीडा मनिं मनाग नाहीं ॥

प्रभु सर्वज्ञ दास निज जाणति । नृपराणी तापस नाम्या गति ॥

माग माग वर होइ नभ–गिरा **। मिश्र कृपामृत परम गंभिरा** ॥ (१।१४५।४-६)

आकाशवाणीचा परिणाम वगैरे मूळांत पाहणें योग्य.

(४) **प्रतापभानुचरित्रांतील पहिली** —

भूप वाढुं लागे तो जेव्हां । *गगनगिरा* **अशि** *झाली* **तेव्हां** ॥ ५ ॥

विप्रवृंद उठुनी गृहिं जावें । महा हानि हें अन्न न खावें ॥ ६ ॥

असे रांधिलें भूसुरमांस ॥ ७ ॥

(**क**) ही गगनगिरा = नभोवाणी खरी आकाशवाणी नसून त्या दुष्ट कालकेतु निशाचरानें आकाशांत गुप्त राहून उच्चारलेली भाषा होती. बोलणारा न दिसतां आकाशांतून वाणी ऐकूं आली म्हणून तिला गगनगिरा = आकाशवाणी = नभोवाणी असें म्हटलें. या आकाशवाणीवर त्या विप्रांचा विश्वास बसला व त्यांनीं शाप दिला.

(**ख**) हल्लींसुद्धां आधुनिक नभोवाणीनें ऐकू येणारी प्रत्येक गोष्ट, ती खरी खोटी याचा तपास न करतां, श्रोते वेदशास्त्रवचनापेक्षां अधिक सत्य मानतातच.

(५) **पुन्हां आकाशवाणी** — ब्राह्मणांनीं प्रतापभानूस शाप दिल्यानंतर—

' पुन्हां *गिरा नाभिं झाली निर्मळ* ॥

विप्र ! विचारें दिला हि शाप न । केला कांहिं नृपें अपराध न ॥ (१७४।३–४)

या वाणीला निर्मळ नभगिरा म्हणून सुचविलें कीं ती मलिन होती. आकाशवाणी अशी परस्परविरोधी असत नाहीं; परंतु कलियुगांत नभोवाणी, अंतरींचा आवाज, ईशसंदेश वगैरे ज्यांना म्हणतील त्यांत मलीनता, असंबद्धता, परस्परविरोध असूं शकतील हें दाखविण्यासाठींच जणूं पूर्वींच्या रामायणनिर्मात्यांनीं हें आधींच लिहून ठेवलें आहे. ही कथा गोस्वामींनीं कपोलकल्पित लिहिलेली नसून अनेक संस्कृत रामायणांत आहे हें पूर्वींच प्र. प्र. ४।२ मध्यें दाखविलें आहे.

(६) **रामावताराविषयीं आकाशवाणी** — ब्रह्मदेवानें प्रार्थना केल्यानंतर आकाशवाणी झाली आहे,

' बघुनि सभय सुर भूमि, ते परिसुनि वच सस्नेह ॥
होई गभीरा नभगिरा **हरणि शोक-संदेह** ॥ १८६ ॥

' भिऊं नका मुनि सिद्ध सुरेश्वर । निर्भय आतां रहा देवगण ' ॥ (१८७।१–२)

अयोध्याकाण्डांत तीन वेळां. (१) **सीतेसाठीं झालेली जलवाणी**— शृंगवेरपुरास गंगापार गेल्यावर सीतेनें गंगेला प्रार्थना करून नवस केल्यानंतर,

प्रेमळ सीताविनति ऐकली । *विमल जलीं वरवाणि जाहली* ॥(१०३।४)

जलवाणीनें सीतेचें ऐश्वर्य वर्णन करून म्हटलें कीं,

दो०— **प्राणनाथ दीरासहित कुशल कोशले याल** ।
पुरतिल मनिं सब कामना सुयश जगीं पसराल ॥ १०३ ॥

ही जलवाणी झाली असें म्हटलें पण ही अशरीरिणी वाणीच आहे; आणि वाणी, भाषा हा आकाशाचाच शब्दगुण आहे; म्हणून ही आकाशवाणीच ठरते.

(२) **भरतासाठीं त्रिवेणींत** — तीर्थराजांत – जलवाणी झाली आहे. प्रयागराजाला प्रार्थना करून भरतानें

जन्म जन्म रति रामपदिं हें वरदान न आन ॥ २०४ ॥

असा वर मागितला; तेव्हां

श्रवुनि भरतवच *मधें त्रिवेणी* **।** *होइ सुमंगलदा मृदुवाणी* ॥ (२०५।६–८ पाहा.)

ही पूर्वींच्या सारखीच जलवाणी आहे.

(३) **लक्ष्मणासाठीं** — ससैन्य भरत चित्रकूटाजवळ आल्याची बातमी रघुनाथास कळतांच त्यांची मुद्रा विषण्ण व चिंतातुर झालेली पाहून लक्ष्मणास–रामसेवामूर्तीस–भरताच्या हेतूंविषयीं संशय आले व ते त्यांनीं प्रभूंजवळ प्रगटहि केले; पण कौतुकी राम मुद्दामच मौन राहिले. लक्ष्मणाचा क्रोध वाढत गेला तरी रघुनाथ मौनच त्यामुळें परिणाम असा झाला कीं ससैन्य भरताला– रामअरीला– ठार मारण्याची शपथ

लक्ष्मणानें घेतली तेव्हां 'जग भयमग्न **होई नभवाणी**' (२।२३।१–४ पाहा). प्रभु मौन कां राहिले हें गूढार्थचंद्रिका दाखविते.

अरण्यकाण्डांत नभोवाणीचा उल्लेख नाहीं; पण नभोवाणीचें कार्य दोन वेळां घडलें आहे.

(१) मारीचाला रामबाण लागल्यावर तो पुष्कळ दूर अंतरावरून श्रीरघुनाथाच्या आवाजानें 'हा ! लक्ष्मणा !' वगैरे ओरडला. त्या वाणीनें नभोवाणीचें कार्य केलें. बोलणारा ऐकणारांस दिसला नाहीं; पण पूर्वीच्या घटनांवरून सीतेनें ती रामाची वाणी मानली आणि तें असुराचें कपट आहे असें लक्ष्मणानें जाणलें; पण कार्य नभोवाणीचेंच झालें. कालकेतु निशाचराच्या वाणीनें (नभोवाणीनें) असेंच कार्य केलें.

(२) सीतेला रथांतून आकाशमार्गानें नेणाऱ्या रावणाच्या रथापासून पुष्कळ उंच व दूर आकाशांत जटायु जें बोलला तें नभोवाणीसारखेंच आहे; 'रे रे दुष्टा कां न थांबसी' वगैरे. जटायु जर खालीं आला नसता तर ती आकाशवाणीच ठरली असती.

किंष्किधाकाण्डांत नाहीं (१) या काण्डांत आकाशवाणीचा उल्लेख नाहीं; तथापि सर्व रामदूत सागरतीरावर प्रायोपवेशनासाठीं बसलेले असतां उंच पर्वताच्या गुहेंत संपातीला वानरांचा आवाज ऐकूं गेला; व तो गुहेच्या तोंडाशीं येऊन सहज म्हणाला कीं, 'आज अहार दिला जगदीशें' इत्यादि. गुहेच्या तोंडाशीं न येतां तो हेंच म्हणाला असता तर ती कालकेतूच्या वाणीसारखी आकाशवाणीच ठरली असती. संपातीच्या त्या वाणीनें पुढील कथेची दिशा एकदम बदलली आहे.

सुंदरकाण्डांत नाहीं. या काण्डांतही आकाशवाणीचा उल्लेख नाहीं; परंतु कार्य घडलें आहे.

गुप्तपणें सीतेचें दर्शन घेऊन मशकसमान कपिरूपानें 'तरुपल्लविं बसलेला लपुनी' (९।१) हनुमान रावण निघून गेल्यावर योग्य संधि पाहून अशोक वृक्षांतून पडेल अशा रीतीनें मुद्रिका टाकतो व जरा वेळानें लपून राहिलेलेच हनुमान

रामचंद्रगुण वर्णु लागले । ऐकत सीतादुःख भंगलें ॥

हनुमान सीतेला दिसला नाहीं पण रामगुणश्रवणानें सीतेचें दुःख भंग पावलें. कालकेतूनें लपून राहून उच्चारलेल्या वाणीला गगनगिरा = आकाशवाणी म्हटलें तशीच ही आहे पण विमल आहे.

लंकाकांडांत नाहीं. यांतसुद्धां आकाशवाणीचा उल्लेख नाहीं, पण कार्य घडलें आहे.

(१) प्रभूंनीं कुंभकर्णाचा वध केल्यावर प्रार्थना-स्तुति करून सर्व देव परतले तेव्हां

'देवर्षी त्या समयिं ठाकले ॥

गगनीं मुनि हरिगुणगण गाती । रुचिर वीररस प्रभुला रुचती ॥

'शीघ्र वधा खल' वदुनि गत मुनी ॥ (६।७१।१०–१२).

नारदांनीं उच्चारलेलीं हीं वचनें नभोवाणीसारखींच आहेत. नारद श्रीरघुवीरास दिसले

इतकाच फरक आहे.

उत्तरकाण्डांत चार वेळां. या काण्डांत चार वेळां आकाशवाणी झाली आहे- उज्जनीच्या महाकालमंदिरांत लागोपाठ तीन वेळां व भुशुंडीसाठीं एकदां.

(१) महाकाळ मंदिरांत शूद्रानें विप्र गुरूचा जाणून बुजून अपमान केला तेव्हां

अति अघ गुरु-अपमान तो सहुं शकले न महेश ॥

मंदिरींच झाली नभवाणी । **रे हतभाग्य अज्ञ अभिमानी ॥**

इत्यादि सांगून महेशांनीं आकाशवाणीनें त्या शूद्रास घोर शाप दिला.

(२) शूद्राला भयभीत झालेला पाहून त्या विप्रगुरूनें रुद्राष्टकानें महाकालेश्वराची स्तुति केली तेव्हां—

श्रवुनि विनति सर्वज्ञ शिव बघुनि विप्र-अनुराग ।

मंदिरिं नभवाक् झाली **हे ! द्विजवर वर माग ॥** (१०८ रा)

हीं दुसरी आकाशवाणी.

(क) त्या विप्रानें भक्तिवर मागून दुसरा वर द्या असें विनविलें आणि

प्रभु ! तव मायावश फिरे सदा भुलुनि जड जीव ॥

क्रोध न करणें त्यावरी भगवन् करुणाशीव ॥ (१०८ चं)

हा पावेल परम कल्याणा । असें करावें कृपानिधाना ॥ (१०९।१)

असा दुसरा वर मागितला तेव्हां—

(३) पुन्हां आकाशवाणी झाली,

द्विजवच परहित-पूर्ण ऐकुनी । *एवमस्तु झाली नभवाणी* ॥ २ ॥

' दारुण पाप जरी कृत यानें । दिला शाप जरि मी कोपानें ॥ ३ ॥

तरि ही तुमची बघुनि साधुता । कृपा अधिक करूं यावर आतां ' ॥ ४ ॥

इत्यादि आकाशवाणीनें त्या शूद्रावर अपार कृपावृष्टि केली आहे. ही त्या मंदिरांत शिवानें केलेली तिसरी आकाशवाणी होय.

(४) लोमशमुनीनें काकाला अनेक अद्भुत आशीर्वाद दिल्यावर –

ऐकुनि मुनि-आशीस् मतिधीरा । *ब्रह्मगिरा नभिं होइ गभीरा* ॥

एवमस्तु तव वाक् ज्ञानी मुनि । हा मम भक्त कर्म-मन-भाषणिं ॥

(११४।५-६) ही या कांडांतील चौथी व शेवटची आकाशवाणी आहे.

याप्रमाणें मानसांतील आकाशवाणींचें यथामति दिग्दर्शन केलें गेलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१७ 卐 卐 卐

श्रीमानसातील पण (प्रतिज्ञा)

श्रीरामचरितमानसांत अनेक पणांचे (प्रतिज्ञांचे) उल्लेख आहेत. बाणा, ब्रीद हे शब्दही पण, प्रतिज्ञा या अर्थानें वापरले आहेत. श्रीरामस्वभावाशीं संबंध असलेल्या नऊ पणांचें वर्णन 'मानसांत श्रीरामस्वभाव' (प्र. प्र. १३।२) यांत शेवटीं केलें आहे. येथें बाकीच्या पणांचा संग्रह केला आहे.

बालकाण्ड — (१) **शंकरांचा पण** – 'सती भेट या तनुनें नाहीं' (१।५७।२) असा जो मानसिक संकल्प शंकरांनीं केला त्यास पण म्हटलें आहे. 'अन्य असा **पण** कोणि न कर्ता' (५७।५) **सिद्धीस गेला.**

(२) **सतीचा प्रेमपण** – सतीचा परित्याग करून शिव प्रदीर्घ काळ समाधिमग्न झाल्यावर ती पश्चात्तापानें दग्ध होऊन भगवंतास प्रार्थना करतांना आपलें पतिप्रेम पणास लावते. तेव्हां तिची प्रार्थना शीघ्र सफल होते.

प्रभु जर दीनदयाळू म्हणविति । आर्ति हरण, यश वेदहि वर्णिति ॥
तर मीं कर जोडुन तुज विनवीं । या देहा मम शीघ्र टाकवी ।।
स्नेह शुद्ध जर मम शिव चरणीं । हेंच खरें व्रत तनमनवचनीं ॥
दो० – **तर सबदर्शी प्रभो श्रुणु, करा किं शीघ्र उपाय ।**
जेणें अश्रम मरण ये दुःसह विपत्ति जाय ॥ (५९।६ – ५९)

असा प्रेम-स्नेह-पण करतांच शंकरांची समाधि लवकरच उतरली व तिचा **पण सिद्धीस गेला.**

(३) **पार्वतीचा पण** – पार्वती तप करीत असतां सप्तर्षी तिची परीक्षा पाहण्यास गेले तेव्हां ती त्यांस म्हणाली,

'कोटि जन्म हठ करिन तपासी । राहिं कुमारि किं वरिन शिवासी ।। ' (८१।५–६)

यालाच पुढें सप्तर्षींनीं पण म्हटलें आहे.

अमचा शब्द न मानिला नारद मुनि उपदेश ।
झाला तुमचा वितथ *पण* **कामा जाळि महेश ।।** (१।८९।–)

वितथ = खोटा. **हा पार्वतीचा पण सिद्धीस गेला आहे.**

(४) **पार्वतीचा प्रेम-पण** – पार्वतीनें आपलें पतिप्रेम पणास लावलें आहे.

अमचे मतें सदा शिव योगी । अज अनवद्य अकाम अभोगी ॥
मी कृत भावें शिव-सेवा **या** । *प्रेमें जर मनवाणीकायां* ॥
ऐका अमच्या *पणा* **मुनीश्वर । करितिल सत्य कृपानिधि ईश्वर** ॥ (९०।२–४)

हा पण फारच लवकर सिद्धीस गेला आहे.

(५) **जनकराजाचा पण** – धनुर्भंगाविषयींचा पण केवळ रामकृपेनें सिद्धीस गेला

आहे. (१।६४९, २५०।१ – ४ पाहा.) अवतरणांची आवश्यकता नाहीं.

(६) **सीतेचा प्रेम-पण –**

मम पण, तनमनवचांनें सत्य अति । रघुपति पदसरसिजीं चित्तरति ।।
तर भगवंत सकल-उर-वासी । करातिल मजला रघुवर-दासी ।।
स्वराज्यावरी ज्याचा स्नेहो । मिळे तया तें नहिं संदेहो ।।
बघुनि प्रभुकडे प्रेमपणा करि । (१।२५५।३ – ७)

हा पण फारच अल्पावधींत सिद्ध झाला आहे.

अयोध्याकांड (७) दशरथांचा पण – प्रतिज्ञा-वचन – दशरथांनीं पूर्वीं कैकयीला दिलेले दोन वर तिनें मागितले; तेव्हां रामशपथ, रघुकुळाचें ब्रीद व सत्य पणास लावून तिला वचन दिलें. याला तेथें पण असें म्हटलें नसलें तरी वचन = प्रतिज्ञा = पण हा अर्थ आहेच. रामचंद्रांस १४ वर्षें वनवास देऊन हा पण पुरा केला, यांत राम-कृपाच मुख्य आहे.

(८) **दशरथाचा प्रेम-पण** – ' जीवन मम रामाविण नाहीं ' (३३।२) यालाच प्रेमपण म्हटलें आहे.

ठेवुनि काय काय तो करणें । जेणें *प्रेमपण* **न मम पुरणें** ।। (१५५।६)
नृपें त्यजुनि मज सत्य पाळिलें । *प्रेमपणास्तव तनुला त्यजिलें* ।। (२६४।६)

रामचंद्रांचा त्याग करून सत्यवचनरूपी पण पाळला व तनूचा त्याग करून प्रेमपण सिद्धीस नेला.

(९) **श्री रघुनाथाचीं १४ वर्षें वनवासाची प्रतिज्ञा** (पण)–

' वर्ष चार दश वसुनि वनिं पाळून पितृवचनास ।
येइन पाहिन पाय मी म्लान करीं न मनास ' ।। ५३ ।।

असें कौसल्येला वचन दिलें. यालाच पुढें ' पण ' म्हटलें आहे. ' *निज पण मोडुनि मम पण राखति* ' (२६६।८) असें भरतानें म्हटलें. हा भरताचा पण कोणता ?

(१०) **भरताचा पण –**

वदति भरत मुनिवचना करतां । जगजीवां फळ इष्ट समस्तां ।।
करिन काननीं वास जन्मभर । याहुन अधिक न मजला सुख पर ।। (२५६।७–८)

हाच तो भरताचा पण.

हा पण पूर्ण करण्याचें रामचंद्रांनीं कसें कबूल केलें पाहा :—

नृपें त्यजुनि मज सत्य पाळिलें । प्रेमपणास्तव तनुला त्यजिलें ।। ६ ।।
कष्ट मना नृपवचन भंगतां । त्याहुनि तव संकोच-अधिकता ।। ७ ।।
त्यांत गुरूंनीं आज्ञा दिधली । पुरवुं इच्छितों सांग सगळी ।। ८ ।।
भीड सोडुनी मुदित मन सांगा करुं तें आज ।। २६४ ।।

भरत सांगतील तें करण्यास रघुनाथ वचनबद्ध झाले. यानेंच भरताचा पण राखला

गेला. हें जें रघुनाथानें कबूल केलें तें एका दृढ विश्वासावर कीं भरत आपल्या सांगण्याच्या बाहेर नाहीं. दोघांपैकीं कोणाचाच पण मोडला नाहीं; परंतु याचें मुख्य श्रेय भरतालाच देणें भाग आहे.

(११) **लक्ष्मणानें रामशपथपूर्वक केलेली प्रतिज्ञा** (सत्य शपथ) —

करिनिकरां मृगराज निर्दळी । जसा ससाणा लाव्यां कवळी ॥

तैसा सानुज ससैन्य भरता । तुडवुनि मारिन रणीं खेळतां ॥

येतिल साह्या शंकर रणिं जरि । *रामशपथ मारीन राम—अरि* ॥ (२३०।६-८)

हीं लक्ष्मणाची प्रतिज्ञा खोटी ठरली असेंच बहुतेक सर्व म्हणतील; पण हें म्हणणें अविचाराचें आहे. ' रामअरि—' रामचंद्रांचा शत्रु मारीन अशी आहे प्रतिज्ञा, भरतशत्रुघ्न राम-अरि नाहींत हें आकाशवाणीनें स्पष्ट सांगितलें आहे, ' तौं मारौं रन राम दोहाई ' असें मूळ वचन आहे, दोहाई = द्रोही, वैरी, शत्रु, अरि; आणि दोहाई = शपथ असे दोन अर्थ आहेत. (हा भाव मानसपीयुषमध्यें प्रकाशित झाला आहे.)

(१२) **भरताचा पण** —

असा स्वामि नहि दुसरा कोणी । वदें करुनि भुज उचलोनी ॥ (२९९।२—७ पाहा.)

(१३) **भरताचा प्रेमपण** — ३२५।१—२ गूढार्थचंद्रिका पाहा. हा रामप्रेमपण आहे.

सूचना — या कांडांतील पणांत हें विशेष दाखविलें आहे कीं भक्तांचे पण भगवंताच्या कृपेनेंच तडीस जातात; पण कांहीं भक्त—भरतासारखे असे असतात कीं भगवंताचा पण त्यांच्यामुळें सिद्धीस जातो. ' रामदास रामाहुनि मोठे ' या वाक्याची सत्यता या एका बाबतींत भरतचरित्रांत दाखविली आहे.

अरण्यकाण्ड — (१४) **रघुवीराचा पण** –

निशिचरहीन करीन महि पण कृत भुज उचलून । (३।९।—) खरा ठरला.

किष्किंधाकाण्ड — (१५) **वालिवधाचा पण**—प्रतिज्ञा.

श्रुणु सुग्रीवा वालिला एकाचि शरें वधीन ।

ब्रह्मरुद्रपदिं शरण जारे प्राण देहिं राही न । (४।६)

यांत पण, प्रतिज्ञा हा शब्द नसला तरी ही प्रतिज्ञाच आहे व त्याप्रमाणें वालीला एकाच बाणानें मारलें आहे.

सुन्दरकाण्ड — (१६) **रावणाचा पण** —

रावण म्हणे समुखि सुज्ञे ! श्रुणु । मंदोदरी आदि राज्ञी गणु ॥

तव अनुचरी करिन मम हा पण । एक वार मजकडे पहा पण ॥ (९।४—५)

सीतेनें त्याच्याकडे पाहिलेंच नाहीं; म्हणून त्याचा पण असत्य ठरला नाहीं; तथापि वृथा पण केला हें खरें.

(१७) **सीतेचा पण** — सीता क्रोधानें संतप्त होऊन रावणाला उलट उत्तर देते—

श्यामसरोज दामसम सुंदर । प्रभुभुज करिकरसम दशकंधर ॥

तो भुज कंठिं किं तव असि घोरा । श्रुणु हा प्रमाण पण शठ चोरा ॥ (१०।३–४)
हा पण खरा झाला आहे. या चौपायांत श्लेष आहे. (टीका पाहा.)

(१८) **हनुमन्ताचा पण —**

सांगुं, ऐक, दशकंठपणासी । त्राता कुणि न रामविमुखासी ॥ (२३।७)
हा खरा झाला आहे.

लंकाकांड — अंगदाचा पण

समजुनि रामप्रताप कोपीं । कपि सभेंत पण करि पद रोपी ॥

उचलुं शकसि शठ ! मम पायातें । फिरति राम मी हरली सीते ॥ (३४।८-९)
हा विचित्र दिव्य पण सिद्धीस गेला आहे ! येथें अंगदाच्या आत्मविश्वासाची व निष्ठेची पराकाष्ठा दाखविली आहे.

(२०) **भरताचा प्रेम-पण —** हनुमान अपरात्रीं अयोध्येवरून पर्वतासह जात असतां राक्षस समजून भरतानें एक बोथट बाण मारला तेव्हां ' राम राम रघुनायक ' म्हणत हनुमान पर्वतासह पडला व मूर्छित झाला. प्रयत्न करून जागा होईना तेव्हां भरतानें आपलें रामप्रेम व रघुपतीची कृपा पणास लावली—

जर माझी मनवाणीकाया । प्रीति रामपदकमालिं अमाया ॥

हो श्रम-शूल-हीन कपि हा तर । रघुपति अनुकूलहि मजला जर ॥

श्रवत वचन कपि उठून बसला । (६।५८।८ – दो. ५९ पाहा.)

(२१) **सीतेचा प्रेमपण —** अग्निदिव्याच्या वेळीं सीतेनें प्रेमपण केला.

जर मनवचकृतिं मम हृदयाही । गति रघुवीरविना दुजि नाहीं ॥

गति सर्वांची सुविदित अनला । *तो होवो श्रीखंड सम मला* ॥ (१०९। ७–८)
यांत सीतेनें आपलें पातिव्रत्य व रामप्रेम पणास लावलें आहे.

श्रीखंडमम पावकिं शिरे प्रभुला स्मरोनी *मैथिली* ॥ १०९ छंद ॥

उत्तरकांड — (२२) श्रीराम बाणा (पण)—

मृषा न वदतों हा मम बाणा ॥

सर्वां प्रिय सेवक ही नीती । *दासांवर मम अधिका प्रीति* ॥ (१६।७,८)
इतर कोणाहीपेक्षां आणि कशाहीपेक्षां दासांवर अधिक प्रेम करणें हा रघुनाथाचा बाणा-पण आहे.

(२३) **भुशुंडीचा पण — रघुवीराची दासि ती जरि मिथ्या ज्ञानास ॥**

रामकृपेविण ना सुटे प्रभु वदुं *करुनि पणास* ॥ ७१ म ॥
ती = माया, मूळांत ' कहउँ पदरोपि ' (पाय रोवून सांगतों) असे शब्द आहेत अर्थ ' पण करून सांगतों ' असाच आहे.

रामस्वभावाचे नऊ व हे असे २३ पण आहेत. या तेविसांत सात प्रेमपण आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १३।१८ 卐 卐 卐

श्रीराम व श्रीकृष्ण

स्वामी रघुपतिसमान नाहीं हें चालू मुख्य प्रकरण आहे. एकंदर १७ प्रकरणांत या विषयाचें मानसाधारें यथामति विवेचन झालें. या १८ व्या प्रकरणांत हें पाहावयाचें आहे कीं श्रीरामासारखे स्वामी श्रीकृष्ण आहेत कीं नाहींत. हें मानसांत दिसणें शक्य नाहीं; मुख्यतः उपनिषदें व कृष्णचरित्र यांच्या आधारेंच तुलना करणें भाग आहे.

१. जे श्रीराम तेच श्रीकृष्ण, तत्त्वतः एकच.

यो रामः कृष्णतामेत्य सार्वात्म्यं प्राप्य लीलया ।
अतोषयद्देव - मौनि पटलं तं नतोऽस्म्यहम् ॥

हा श्लोक श्रीकृष्णापनिषदाच्या मंगलाचरणांत आहे, या आधारानें निश्चित् ठरलें कीं जे श्रीराम तेच श्रीकृष्ण.

(क) श्रीगोपालनंदन गोपाल कृष्ण स्वतःच गोपालोत्तरतापिनीउपनिषदांत ब्रह्मदेवाला सांगतात,

मुक्तोहमस्मि, अक्षरोहमस्मि । सत्तामात्रं चित्स्वरूपं प्रकाशं व्यापकं तथा ।
एकमेवाद्वयं ब्रह्म मायया च चतुष्टयम् ।
रोहिणीतनयः विश्वः अकाराक्षर-संभवः ॥ १० ॥
तैजसात्मकः प्रद्युम्नः उकाराक्षरसंभवः ।
प्राज्ञात्मकोऽनिरुद्धोऽसौ मकाराक्षरसंभवः ॥ ११ ॥
अर्धमात्रात्मकः कृष्णः यस्मिन् विश्वं प्रतिष्ठितम् ॥
कृष्णात्मिका जगत्कर्त्री मूलप्रकृतिरुक्मिणी ॥ १२ ॥
प्रणवत्वेन प्रकृतिं वदन्ति ब्रह्मवादिनः ॥

अर्थ — नित्यमुक्त, अक्षर, सत्तामात्र, चित्स्वरूप, प्रकाशस्वरूप व्यापक जें एकम् एव अद्वयम् ब्रह्म तेंच मायेनें चतुर्विध झालें. रोहिणीतनय (बलराम, संकर्षण) विश्व, अकाराक्षरापासून झाला. प्रद्युम्न तैजसात्मक, उकाराक्षरापासून झाला. अनिरुद्ध प्राज्ञात्मक मकाराक्षरापासून झाला. अर्धमात्रात्मक कृष्ण असून सर्व विश्व त्यांत प्रतिष्ठित आहे, व कृष्णात्मिका रुक्मिणी मूलप्रकृति जगत्कर्त्री आहे. प्रणवत्वामुळें ब्रह्मवादी प्रकृति म्हणतात.

२. श्रीरामादि चतुष्टय आणि सीता.

(१) रामः एव परं ब्रह्म, राम एव परं तत्त्वं श्रीरामः ब्रह्मतारकम् ॥
(रामरहस्योपनिषद्)

रमन्ते योगिनोऽनन्ते नित्यानन्दे चिदात्मनि ।
इति रामपदेनासौ परंब्रह्माभिधीयते (रामपूर्वतापिन्युपनिषद्)

(क) रामोत्तरतापिनींत — **अक्षराक्षर-संभूतः सौमित्रिर्विश्वभावनः ।**

उकाराक्षरसंभूतः शत्रुघ्नः तैजसात्मकः ॥ १ ॥

प्राज्ञात्मकः तु भरतः मकाराक्षर-संभवः ।

अर्धमात्रात्मको रामः ब्रह्मानन्दैकविग्रहः ॥ २ ॥

श्रीरामसांन्निध्यवशात् जगदाधारकारिणी ।

उत्पत्ति-स्थिति-संहारकारिणी सर्वदेहिनाम् ॥ ३ ॥

सा सीता भवति ज्ञेया मूलप्रकृतिसंज्ञिता ।

प्रणत्वात्प्रकृतिः इति वदन्ति ब्रह्मवादिनः ॥ ४ ॥

अर्थ — अगदीं तंतोतंत वरच्या सारखाच आहे. सीतेच्या वर्णनांत थोडा अर्थ-विस्तार आहे इतकेंच; म्हणून पिष्टपेषण नको. श्रीमानसांत हे सिद्धान्त सुचविले आहेत. नामकरण आणि १।३२५ छंद ४ टीका पाहा. 'अध्यात्मपर अर्थाचा नमुना,' पूर्वीच दिलेला पाहावा.

उपनिषदांतील या वचनांनीं ठरलें कीं रामादि बंधुचतुष्टय व सीता तेच कृष्णादि चतुष्टय व रुक्मिणी, त्यांत तत्त्वतः लेशमात्र भेद नाहीं.

असें हें श्रुतिसिद्ध असतां स्वतःस शहाणे समजणारे पुष्कळ लोक (पंडितंमन्य) म्हणतात कीं कृष्ण पूर्णावतार व राम अपूर्णावतार !

२. पुराणांचा आधार पाहा. (१) परशुरामावतार-कथनाध्यायांत (पद्म. उत्तर. ७९–८१ आनंदाश्रम प्रत) महादेव पार्वतीस सांगतात,

' एतत्ते कथितं देवि जामदग्न्यमहात्मनः ।

शक्त्यावेशावतारस्य चरितं शार्ङ्गिणः प्रभोः ॥

नोपास्यं हि भवेत्तस्य **शक्त्यावेशान्महात्मनः ।**

उपास्यौ भगवद्भक्तैर्विप्रमुख्यैर्महात्मभिः ॥

रामकृष्णावतारौ तु परिपूर्णौ निजैर्गुणैः ।

उपास्यमानौ ऋषिभिरपवर्गप्रदौ नृणाम् ॥ ८१ ॥

सारांश — जामदग्न्य – परशुराम – अवतार भगवंताच्या शक्तिचा आवेशावतार असल्यामुळें ते उपास्य नाहींत. ब्राह्मणादि भगवद्भक्तांनीं व महात्म्यांनीं चिरस्थायी (= निज) गुणांनीं युक्त व परिपूर्णावतार असणारे राम व कृष्ण यांचीच उपासना करावी; ऋषींकडून त्यांचीच उपासना करण्यांत येते व ते दोन अवतार मनुष्यांना मोक्ष देणारे आहेत.

सूचना — बृहत्स्तोत्ररत्नाकरांत अवतारस्तोत्रांत परशुरामस्तोत्रच नसण्याचें हेंच कारण असावें असें वाटतें.

(२) पद्म. उत्तर. २६९ (आनंदाश्रम) २४३ वेंकटेश्वर-पोथी-श्लोक १–१२ पाहावेत.

मनुशतरूपा यांनीं स्वायुंभव मन्वंतरांत तप केल्यावर भगवंतांनीं दर्शन देऊन वर माग असें म्हटल्यावर तीन जन्म पुत्रत्व स्वीकारावें असा वर मागितला. **मनुशतरूपा दशरथ–कौसल्या झाल्यावर तेच भगवान राम झाले. पुन्हां वसुदेव–देवकी झाल्यावर तेच भगवान कृष्ण झाले** व कलियुगाच्या अंत्य चरणांत मनुशतरूपा हरिव्रत व देवप्रभा होतील तेव्हां तेच भगवान कल्की होणार आहेत असें स्पष्ट म्हटलें आहे. हे श्लोक बालकांड-टीकेच्या शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत.

(३) द्वादश–कलात्मक रामावतार व षोडश–कलात्मक कृष्णावतार असें म्हणून रामोपासकांना हिणविणाऱ्यांस काय म्हणावें ? राम सूर्यवंशांतले; सूर्याची पूर्णता द्वादश (बारा) कलांनीं होते. चंद्र षोडशकलात्मक आहे व चंद्रवंशात कृष्णावतार म्हणून सोळा कलांनीं पूर्णता होते हें मर्म समजत नाहीं !

(क) **' एते चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान् स्वयम् । '**
हें श्रीमद्भागवतवचन तेवढें पाठ असतें व श्रुति आणि इतर पुराणें यांच्याकडे व भागवतांतील इतर श्लोकांकडे पाठ फिरविलेली असते म्हणून असंबद्ध प्रलाप काढतात. श्रीभागवत पुराण मुख्यतः श्रीकृष्णचरित्रप्रतिपादक आहे, म्हणून त्यांत तसें म्हणणें योग्यच आहे. शिवपुराणांतील श्लोक 'राम-शिव-अभेद' या प्रकरणांत दिला आहे आणि त्याच प्रकरणांत ब्रह्मा, विष्णु व शिव यांतसुद्धां अभेद वर्णन करणारा भागवतांतलि श्लोक आहे तोहि पाहावा. **महारामायणांत इतर सर्वांना अंश कला म्हणून ' रामस्तु भगवान् स्वयम् ' असें म्हटलें आहे** तेंहि रामचरित्राच्या दृष्टीनें योग्यच आहे.

(४) **श्रीराम व श्रीकृष्ण यांत तत्त्वतः भेद नाहीं हें श्रुतिपुराणांधारें निःसंदेहपणें ठरलें.** असें असतां दोघांच्या अवतारचरित्रांत दक्षिणोत्तर ध्रुवांइतकें महदंतर आहे व साम्य मुळींच नाहीं असें बहुतेक चांगले शास्त्रज्ञ, बुद्धिमान लोकसुद्धां म्हणतात. पण साम्य मुळींच नाहीं हें म्हणणें अंधगजन्यायाचें आहे; म्हणून प्रथम दोघांच्या चरित्रांतील साम्य पाहूं.

(क) ' जन्माद्यस्य यतोन्वयात् ' हा श्रीभागवतांतील श्लोक जसा श्रीकृष्णचरित्रपर लागतो तसाच तो श्रीरामचरित्रपरसुद्धां लागतो पण तो अर्थ देण्याचें स्थान हें नव्हे.

३. श्रीराम-कृष्ण-चरित्र-साम्य. (१) दोघांनींहि प्रथम शिशुरूपानें अवतीर्ण न होतां आपल्या मूळ प्रौढ रूपानेंच आपल्या मातांस दर्शन दिलें व नंतर दोघेहि मातेच्या विनंतीप्रमाणें शिशुरूप झाले आहेत.

(२) **अवतारकार्यास** दोघांनींहि **प्रारंभ केला** तो **प्रथम स्त्रीवध करूनच !** ताटका व पूतना यांचा वध केला. दोघी घोर राक्षसीच; एक प्रगट व एक गुप्त. प्रथम स्त्रीवधच कां ?

(क) स्थूल देह-बुद्धीचा विनाश प्रथम केल्याशिवाय सूक्ष्म देहाहंकार व कारण-देहाहंकार यांचा नाश करतां येणार नाहीं हें दोघांनींहि दाखविलें.

(३) यानंतर दोघांनीं पुरुष राक्षसांचा वध करण्यास प्रारंभ केला. मारीच, सुबाहू

हे ताटकेचे पुत्र व त्यांचें सैन्य म्हणजे जसा ताटकेचाच परिवार, तसेंच तृणावर्तादि राक्षस पूतनेचा परिवार होता.

(४) खरदूषणादिकांस रावणानें दण्डकारण्यांत ठेवलें तसेंच कंसानें कुवलयापीड, चाणूर, मुष्टिक यांना ठेवलें. श्रीराम व श्रीकृष्ण या दोघांनींहि त्यांचा एकटयानें व स्वपराक्रमानें, छल, कपट न करतां सहज लीलेनें वध केला.

(५) कृष्णावतारांत मामाचा (कंसाचा), जवळच्या नातेवाईकाचा वध केला हें सर्वांस माहीत आहे. रामावतारांत त्याहूनही जवळच्या नातेवाईकाचा वध केला, पण हें कोणी विचारांतच घेत नाहींत. रावण रामाचा कोण हें आतां ठरवावें:—

ब्रह्मदेव–पुलस्त्य–विश्रवा आणि रावण; म्हणजे रावण ब्रह्मदेवाचा पणतू, (प्रपौत्र)

ब्रह्मदेव–मरीचि–विवस्वान्, आणि मनुदशरथ. म्हणजे मनुदशरथ ब्रह्मदेवाचा पणतूच. म्हणजे मनुदशरथ व रावण हे चुलत भाऊ होते. दशरथांचा पुत्र राम म्हणून **रावण रामाचा चुलत–चुलता**, व बिभीषण-कुंभकर्णही चुलत-चुलतेच. **मेघनाद प्रहस्तादि रावणपुत्र राम-लक्ष्मणांचे चुलत-चुलत-भाऊच !**

(क) मनु–दशरथाचीच कथा मानसांत मुख्य आहे व परिच्छेद २।२ मध्यें मनु दशरथ झाल्याचा पद्मपुराणांतील पुरावा दिलाच आहे.

(६) जरासंधाचा वध पहिल्याच वेळीं केला असता तर दुसरे अनेक अक्षौहिणी दुष्ट शोधून काढून मारावे लागले असते म्हणून जरासंधास १७ वेळां सोडून दिले.

(क) श्रीरघुवीराशीं युद्ध करून त्यांच्या बाणानें मरून तरून जाण्याचा निश्चय मानसांतील रावणानें (अरण्य. २३।१-५ पाहा) केला होता पण तो आपल्या मायेनें फिरवून त्याच्याकडून युक्तीनें सीताहरण (मायासीतेचें) करविलें; तें याच हेतूनें कीं लंकेंतील दुष्ट राक्षसांस मारण्यास नवीन कारण निर्माण करण्याची जरूर पडूं नये. रावणानें जशा सर्व राक्षसरूपी टोळधाडी रामशरपावकांत वारंवार होमल्या तशाच जरासंधानें कृष्णावतारांत कृष्णासमोर आणून होमल्या.

(७) कालयवनाचा वध कृष्णावतारांत **छलानें–कपटानें** मुचकुंदाकडून करविला तसाच इन्द्रजिताचा वध **धर्मयुद्धानें** लक्ष्मणाकडून करविला.

(८) कौरवांपेक्षां पांडव श्रीकृष्णाचे अधिक जवळचे नातेवाईक; तसाच सुग्रीव सूर्यपुत्र इंद्रपुत्र वालीपेक्षां अधिक जवळचा संबंधीं. कौरवपांडवांच्या भाऊबंदकींत कौरवांचा विनाश करून करवून पांडवांस राज्य दिलें तसेंच सुग्रीव-वालींच्या भाऊबंदकींत वालीचा वध करून सुग्रीवास राज्य दिलें.

(९) कंसमामाचा वध करून आजोबांना (मातामहाला) राज्य दिलें तर रामावतारांत एका चुलतचुलत्याचा वध करून दुसऱ्या चुलतचुलत्यास–बिभीषणास त्याचें राज्य दिलें.

(१०) यदुवंशाचा पूर्ण उच्छेद होऊं नये म्हणून उद्धवास बाहेर घालविलें तसेंच

रघुवंशाचा उच्छेद होऊं नये म्हणून चारी भावांच्या पुत्रांस अयोध्येच्या बाहेर राज्यें देऊन आधींच बाहेर पाठविलें.

(क) विश्रवावंशाचा उच्छेद होऊं नये म्हणून लंकेंतील युद्धापूर्वी रावणाकडून बिभीषणाला हाकलून लावविलें (मानसाप्रमाणें).

(११) रामावतारांत परशुराम, हनुमान व बिभीषण हे तिघे चिरंजीव झाले तर कृष्णावतारांत अश्वत्थामा, कृपाचार्य व व्यास हे तिघे चिरंजीव झाले.

(१२) कृष्णावतारसमाप्तीच्या वेळीं यदुवंश (उद्धवाशिवाय) यादवीनें निःशेष झाला तर रामावतार समाप्तीचे वेळीं कुशलवादी आठजणांशिवाय सर्व रघुवंश व अयोध्या-प्रजा यांस निजधामास नेल्यानें अयोध्येंत कोणीच राहिलें–उरलें नाहीं.

(१३) रामावतारसमाप्तीनंतर अयोध्या ओस पडली; तर कृष्णावतारसमाप्तीनंतर द्वारका पाण्यांत बुडाली.

याप्रमाणें येथें थोडेंसें दिग्दर्शन केलें. हें साम्य आणखी पुष्कळ वाढवितां येण्यासारखें आहे.

४. वैषम्य — श्रीरामचरित्र व श्रीकृष्णचरित्र यांतील दक्षिणोत्तर ध्रुवांसारखें अंतर दर्शविणारे कांहीं प्रसंग —

श्रीराम	श्रीकृष्ण
(१) जन्म सूर्यवंशांत शुक्लपक्षांत मध्याह्नकाळीं.	जन्म चंद्रवंशांत कृष्णपक्षांत मध्यरात्रीं.
(२) जन्म सार्वभौम राजाच्या राजमंदिरांत थाटानें.	जन्म कारागृहांत, अगदीं गुप्तपणें; वैश्य मातेचें स्तनपान.
(३) जननीला सर्व प्रकारें बाललीलांचें सुख दिलें.	जननीला स्तनपानसुद्धां देतां आलें नाहीं व पुत्र जन्माबरोबर पुत्रवियोग (८ वर्षें).
(४) सर्व संस्कार मोठ्या थाटानें, योग्य वेळीं.	संस्कार वैश्याकडून गुप्तपणें; अवेळीं.
(५) विवाह मोठ्या थाटानें विश्व-विजय-कीर्तिसह.	रुक्मिणीला पळवून आणावें लागलें व त्या वेळीं मेव्हण्याला आहेर 'तलवारीनें डोक्याचे पाट काढणें.'
(६) सम्राटाच्या राजवाड्यांत जननी-जनकांच्या प्रेमांत वाढले.	गुराख्यांच्या पोरांबरोबर रानावनांत वांसरें व गाई चारल्या व गोपाल झाले.
(७) सार हें कीं कुमारावस्थेपर्यंत व विवाहानंतर थोडीं वर्षें रामाचें आयुष्य परम सुख-ऐश्वर्य भोगांत गेलें; व १५ व्या वर्षापासून अवतारकार्यास प्रारंभ केला.	कृष्णाचें बालपण संकटमय कष्टमय स्थितींत गेलें व १५ व्या वर्षाच्या आंतच मुख्य अवतारकार्य संपविलें.

श्रीराम	श्रीकृष्ण
धर्मयुद्ध, एकपत्नी, एकवचनी इत्यादि व्रतें पाळलीं.	याच्या अगदीं विरुद्ध केलें.
(८) रघुनाथानें 'धर्ममार्गं चरित्रेण' (रा. पू. ता.) दाखविला व वेद, शास्त्र, कुल इत्यादि मर्यादांचें पालन स्वतः करून करविलें.	कृष्णचरित्रांत धर्ममार्ग उपदेशानें दाखविला; व स्वतः 'निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।' हें आधुनिक शब्दज्ञान्यांस पाठ असलेलें वचन कृतींत उतरविलें.
(९) या सर्व भेदांमुळें रामचरित्र अनुकरणीय आहे.	कृष्णचरित्र अनुकरणीय नसून त्यांनीं केलेला उपदेश अनुकरणीय आहे.

'न देवचरितं चरेत् ।' देवांच्या चरित्राचें अनुकरण सर्वच गोष्टींत करणें हितावह नसतें. 'दोष समर्था नहि हृषिकेशा ।' असें मानसवचन आहे तें कृष्णचरित्रास विशेष लागू आहे.

(१०) श्रीरामाचें १८ व्या वर्षापासून (वाल्मीकिरामायणाप्रमाणें) पुढील १४ वर्षांचें आयुष्य म्हणजे वनवास व तोहि मुनिव्रतवेषआहारादि नियम पालन करून, अति कष्टांत गेलें. राज्याभिषेकानंतरचा कांहीं काळ पूर्ण सुखासमाधानांत जातो तोंच सीता-परित्याग करावा लागला व शेष तेरा हजार वर्षें (श्रीभागवतानुसार) सीताविरहित दशेंत, सर्व माता विधवा, अशा परिस्थितींत, गेलीं. एकंदर आयुष्याच्या प्रमाणांत रामावतारांतील सुखाचा काळ फारच अल्प, (हें सर्व लौकिक-मानवी जीवनाच्या दृष्टीनें विचारणीय म्हणून लिहावयाचें.) पण शेवट गोड; सर्व अयोध्येसह निज-धामास गेले.

(क) कृष्णावतारांत याच्या अगदीं उलट. बालपणचा अल्प काळ अतिकष्ट-संकटांत, जननीजनकवियोगांत गेला तेवढाच. बाकीचा सर्व म्हणजे सुमारें १२० वर्षांचा शेष आयुष्याचा काळ परम सुखांत गेला; पण शेवट दुःखकष्टदच ! सर्व यदुवंशाचा, पुत्रपौत्रादिकांचा, संहार स्वतःच्या डोळ्यांदेखत स्वतः अवतारसमाप्ति एका व्याधाचा बाण लागून; आणि स्वतःच्या हजारों स्त्रियांना अल्पकाळ तरी वैधव्य!

दोघेहि परिपूर्णावतार असून, प्रारब्ध कर्मबंधापासून दोघेहि सदैव मुक्त असून, त्यांच्या चरित्रांतसुद्धां सुखदुःखाचे असे हेलकावे दिसतात; मग ज्यांचें सर्व आयुष्यच कर्मप्रधान असून मायाबंधनांत जखडलेलें असतें अशा मानवांनीं सदा सुखीच होण्याचा ऐहिक प्रयत्न करणें किती शहाणपणाचें ठरेल याचा विचार करावा म्हणून हा भेद दाखविला.

५. एक शास्त्रीय हितगुज. श्रीकृष्णावतारांतील रासलीलादिकांचें व एकपत्नीव्रताच्या अभावाचें बीज रामावतरांत श्रीरघुनाथानें दिलेल्या वचनांनींच पेरलें गेलें; तें असें. श्रीकृष्णोपनिषदांत प्रारंभींच म्हटलें आहे कीं,

श्रीमहाविष्णुं सच्चिदानन्दलक्षणं रामचंद्रं दृष्ट्वा सर्वांगसुंदरम्। मुनयो वनवासिनः विस्मिता बभूवुः। तं ह्योचुः नोऽवद्यम् अवतारान् वैगण्यन्ते, आलिंगामो भवान्तमिति। भवन्तरे कृष्णावतारे यूयं गोपिका भूत्वा मामालिंगथ। अन्ये ये अवतारास्तेहि गोपान्न स्त्रीश्च नो कुरु। गृह्णिमोऽवतारान् वयम्। रुद्रादीनां वचः श्रुत्वा *प्रोवाच भगवान् स्वयम्।* **अंगसंगं करिष्यामि भगवद्वाक्यं करोम्यहम्॥**

येथें श्रीरामचंद्रांस 'भगवान् स्वयम्' असें म्हटलें आहे; व जे राम तेच कृष्ण होण्याची व गोपींशीं अंगसंग करण्याची, कृष्णावतारांतील लीलांची हमी रामावतारांत रामचंद्रच देऊन ठेवते झाले आहेत. यावरून ठरलें कीं, रामावतारांतील वनवासी मुनिगण गोपीरूपानें जन्मले व रुद्रादि देव गोप जातींत अवतरून श्रीकृष्ण-पत्नी झाल्या.

उपक्रम कृष्णोपनिषदांतील मंगलाचरणानें केला म्हणून उपसंहारहि कृष्णोपनिषदांतील वचनांनींच करणें योग्य वाटलें.

एकाच परब्रह्माचे दोघेहि परिपूर्णावतार असतां रामराज्यांत सर्व लोकांना जें सुखसमाधान होतें व जी उच्च नैतिक पातळी होती तें सुख व ती नीति कृष्णावतार-समाप्तीच्या वेळींसुद्धां दिसली नाहीं; याचें मुख्य कारण म्हणजे युगधर्म व कालप्रभाव! त्रेतायुग व द्वापरयुगाचा अंतसमय! कलियुग डोकावूं लागलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

श्रीकृष्णोपनिषद् व गोपालतापिनी हीं दोन्हीं मुद्दाम लक्षपूर्वक पाहण्यासारखीं आहेत. श्रीराम व कृष्ण यांच्या उपासकांनीं तरी जरूर पाहावींत. या लेखाचा विस्तार अपेक्षेपेक्षां जास्त झाला. रामचरित्राचा व स्वभावादिकांचा विचार केल्यावर आतां इतर चरित्रांचा विचार केला पाहिजे.

तेरावें मुख्य प्रकरण समाप्त.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।१ 卐 卐 卐

रामायण ग्रंथच आदर्श व्यक्तिचरित्र व आदर्श नीतिशिक्षक समजला जातो. त्यांतही श्रीतुलसींच्या श्रीरामचरितमानसांतील व्यक्तिधर्माचा आदर्श पूर्ण निर्दोष व श्रीतुलसीसारखा परम पावन असून परमोच्च कोटीला पोहोंचला आहे. श्रीमानस सर्वांगसुंदर व अनेक अद्भुत काव्यकलांनीं परम रमणीय असें परमोत्तम व नाव्यमहा-काव्यादि अनंतगुण विभूषित असलें तरी त्यांतील परमोत्कृष्ट आदर्श नीतिशिक्षक निर्दोष चरित्रेंच रशियासारख्या निधर्मी परदेशांत त्याचा सहज प्रसार करण्यास समर्थ झालीं आहेत.

प्रत्येक चरित्र अत्यंत निर्दोष बनविण्याचा प्रयत्न कवींनीं आपलें शक्तिसर्वस्व वेंचून केला असून तो पूर्णपणें साधला आहे. कैकयी, मंथरा व रावण या कुटिल दुर्जनचरित्रांत कपटमुनीच्या चरित्राची भर बालकांडांत पडली आहे. कैकयीच्या चारित्राचें सूक्ष्म निरीक्षण केल्यानें दिसतें कीं कैकयी पूर्ण निर्दोष असल्याचें अनेक वेळां अनेक आप्तव्यक्तींकडून जाहीर केलें गेलें आहे.

रावणासारख्या विश्वपीडक विश्वविख्यात खलाचें चरित्र वैरीचरित—परमोच्च आदर्श बनविलें आहे. जेथें त्यानें थोडी रामनिंदा केलेली आढळते तेथें कवींनीं व्याज-स्तुतीच लिहिली आहे.

दशरथकैकयीसंबंधाचें सार देहधारी स्नेह व सजीव निष्ठुरता या शब्दांत मान-सांतच सांगितलें आहे. रावण, कैकयी व मंथरा आणि अशा प्रकारचीं कांहीं चरित्रें सोडून प्रत्येक व्यक्ति अत्यंत नम्र व लीन आहे. स्वतःच्या कर्तृत्वाचें व मोठेपणाचें वर्णन स्वतःच्या मुखानें कोणी करीत नाहीं. ज्या व्यावहारिक भूमिकेंत असतील त्या भूमिकेची आदर्श नीति व स्वधर्म यांचें पालन प्रत्येक जण करीत आहे. प्रत्येकजण आपल्याकडे कमीपणा घेऊन दुसऱ्यास मोठेपणा देण्यांतच शहाणपणा मानीत आहे.

जेथें रावण व भृगुपतिसारखे आत्मप्रौढी गातात तेथें अंगद व लक्ष्मणासारखे कोवळे कुमार, परम निर्भय व परम आत्मविश्वासी रामसेवक, त्यांना खालीं मान घालावयास लावतात ! कर्मविपाक सिद्धान्त आणि ‘ कोणी कुणा सुख दुःख न दाता ’ हें सिद्धान्तभूत वचन प्रत्येकाच्या कृतींत व उक्तींत उतरलें आहे.

राजधर्म, प्रजाधर्म, सेवकधर्म, पितृधर्म, मातृधर्म, बंधुधर्म, पुत्रधर्म, कन्याधर्म, पुरुषधर्म, स्त्रीधर्म, श्वश्रू व श्वशुरधर्म, सखाधर्म, शिष्यधर्म, गुरुधर्म, मित्रधर्म, वैरीधर्म, उदासीनधर्म, सचिवधर्म, वैद्यधर्म, ब्राह्मणक्षत्रियादि वर्णधर्म व ब्रह्मचर्यादि आश्रमधर्म, मानवधर्म, इत्यादि विविध धर्मांचे आदर्श परमोच्च कोटीला गेले आहेत.

वेदपुराणोक्त धर्म हा आदर्शांचा ध्रुवतारा आहे. प्रत्येक युगांतील विशेष धर्म सांगितले असून अधिकाधिक उच्च कोटीला कसें जावें याचें मार्गदर्शन केलें आहे.

हें सर्व परमोच्च आदर्श नीतिशिक्षक चरित्रचित्रण रामभक्तीच्या परम मनोहर, परम मधुर रसांत भिजवून, परम रमणीय काव्यानें विभूषित व कर्णमधुर भाषेच्या मनोहारी अद्‌भुत सुगंधानें मिश्रित केलेलें असल्यानें सर्वच चरित्रें वाचकांच्या परमादरास पात्र होतात.

या चरित्र–चित्रण–कलेचा एक असा अद्‌भुत प्रभाव आहे कीं सरस श्रेष्ठ असलेली गोष्ट वाचकांच्या व श्रोत्यांच्या चित्तास कांहीं ठिकाणीं कमी प्रतीची भासते; उदाहरणार्थ जनकपुरीवर्णनांत वाचक, श्रोते व टीकाकारसुद्धां असे वाहात जातात कीं अयोध्या, अयोध्येचें ऐश्वर्य व अयोध्येंतील ललना यांच्यापेक्षां जनकपुरी, जनकपुरींतील ऐश्वर्य व जनकपुरीललना अधिक श्रेष्ठ व सुंदर आहेत असा ठसा चित्तावर उमटतो, पण सूक्ष्म दृष्टीनें वचनांची तुलना केल्यास प्रत्येक बाबतींत अयोध्या श्रेष्ठ ठरते.

दुसरें उदाहरण लक्ष्मण आणि भरत यांचें. भरताचें चरित्र असें रंगविलें आहे कीं, भरत लक्ष्मणापेक्षां शान्त, कोमल, दयालु, अधिक सात्त्विक व अधिक भक्तिमान आहे असा ठसा चित्तावर उमटतो. पण वास्तविक सूक्ष्म विचार केल्यास स्पष्ट दिसतें कीं, लक्ष्मण भरतापेक्षां काडीमात्र कमी नाहीं; उलट श्रीरामसेवक या नात्यानें कांकणभर जास्तच आहे. लक्ष्मणाचें चरित्र मनुष्यांनीं अनुकरण करण्याच्या पलीकडील देवचरित्रासारखें असल्यानें व भरतचरित्रच अनुकरणीय आदर्श असल्यानें विरुद्ध भास निर्माण केला आहे. हीच गोष्ट अयोध्या व जनकपुरी यांची आहे. भगवंतांच्या रामपुरीचें व तिच्या ऐश्वर्यादि विविध अंगांचें अनुकरण इतरांस करतांच येणार नाहीं; म्हणून परम श्रेष्ठ जीवाची जी नगरी तीच अनुकरणीय असल्यामुळें तिचेंच प्रतिबिंब हृदयांत सहज उठेल अशी अद्‌भुत रचना केली आहे.

अशीच कला कैकयीचरित्रचित्रणांत वापरली आहे. तिचें रामावर भरतापेक्षांहि जास्त प्रेम होतें. ती सदा पति–अनुकूल वागत असे, पण देवमायेनें मोहित केली गेल्यानें तिची बुद्धि फिरली इत्यादि सर्व गोष्टी वाचक विसरतात व कैकयी दुष्ट, कुटिल, रामद्रोही, मत्सरी आहे, इत्यादि प्रकारचेंच चित्र हृदयावर उमटतें व कैकयीबद्दल अप्रीति उत्पन्न होते. कैकयीचें चरित्र अनुकरणीय नसून तिच्या चरित्रांतील दोष त्याज्य आहेत हें हृदयावर सहज कोरलें जातें.

अशा प्रकारचीं स्वभावचित्रें हृदयावर उलटसुलट उठविण्याची शब्दशक्ती व काव्यकला मानसांत परमोच्च कोटीला पोंचली आहे. सत्याची, वेदपुराणोक्त धर्माची, नीतीची आणि भक्तीची प्रीति आणि विरुद्ध असणाऱ्या असत्य, अधर्म, अनीति आणि भक्तिहीनता यांविषयीं अप्रीति हृदयावर ठसविण्याचें उत्तमोत्तम कार्य मानसांतील इंद्रादि देवांच्या चरित्रापासून रावणाच्या चरित्रापर्यंतचें प्रत्येक चरित्र सातत्यानें करतें.

चरित्रचित्रणांत सत्य, धर्म, नीति, भक्ती ही चतुःसूत्री कुठेंहि खंडित झालेली दिसणार नाहीं. हा हेतु सिद्धीस जावा म्हणून सृष्टिसौंदर्यवर्णनांतसुद्धां व युद्धवर्णनांतसुद्धां विविध उपमादि व सुभाषितें भरून ठेवलीं आहेत व हीं वर्णनें नाट्यकाव्याप्रमाणें अगदीं संक्षिप्त व सुटसुटीत आहेत व त्यांतसुद्धां ही चतुःसूत्री परम कौशल्यानें गोंवली आहे.

म. गांधी म्हणाले आहेत कीं, ' श्रद्धा व नीति शिकावयाची असेल तर ती श्रीरामचरितमानसांतच शिकतां येते व शिकावी. ' लोकमान्य टिळक म्हणाले आहेत कीं, "भारतांतील सर्व लोकांना एकाच भूमिकेवर (प्लॅटफॉर्मवर) यावयाचें असेल तर श्रीमद्भगवद्गीता व तुलसीरामायण हे दोनच ग्रंथ आहेत."

तथापि भगवद्गीता संस्कृतांत असल्यानें व संस्कृत भाषेचें पद्धतशीर उच्चाटन करण्याचा प्रयत्न यशस्वी होत असल्यानें समाजांतील सर्व थरांतील लोकांना तिचा फारसा उपयोग होत नाहीं.

विचारवंत व नीतिप्रिय पुष्कळ मुसलमानसुद्धां प्रेमानें तुलसी रामायणाचा अभ्यास करतात व मुलींच्या विवाहांत मुलींना भेट देतात याचें कारण मानसांतील रामभक्ति नसून मानसाची नीतिशिक्षक सहज अद्भुत शक्ति आहे.

मानसांतील कांहीं चरित्रांचें वैशिष्ट्य पुढील प्रकरणांत दाखविलें आहे. प्रस्तावनेच्या विस्ताराची मर्यादा ओलांडावयाची नसल्यानें कांहीं चरित्रांतील वैशिष्ट्य सविस्तर, कांहींचें अल्प विस्तारानें व कांहींचें अतिसंक्षेपानें दाखविलें आहे. प्रथम श्रीराममाता पुनीत कौसल्या देवींचें चरित्र पुढील प्रकरणांत आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।२ 卐 卐 卐

पुनीत कौसल्या देवी

तुम्हि गुरु-विप्र-धेनु-सुर-सेवी । तशि *पुनीत कौसल्या देवी* ॥ (१।२९४।४)
असें वसिष्ठ दशरथांस म्हणाले आहेत. कौसल्या पूर्व जन्मांत शतरूपा असतां भगवान रामरूपानें प्रगट होऊन दर्शन दिलें व मनूनें वर मागितल्यावर भगवान शतरूपेला म्हणाले कीं, ' देवि रुचे जो तुजसि माग वर. ' भगवंतांनींहि ' देवि ! ' म्हटलें आहे.

पूर्वजन्मांत शतरूपा असतां जो वर मागून घेतला त्याच्या प्रभावानें व प्रभूंनीं आपल्या अगदीं बालपणींच कौसल्येला आपलें विश्वरूप दाखविल्यावर तिनें

' प्रभु न अतां कधिं लागो तव माया मजला हि ' ॥ (१।२०२)

असें मागितल्यामुळें श्रीराम परमात्मा आहेत ही गोष्ट कौसल्या कधीं विसरली नाहीं. *कौसल्येचें चरित्र शुद्ध सत्त्वगुणी बुद्धिवृत्तीचें प्रतीक आहे.* कौसल्या ज्ञानी पराभक्तिसंपन्न आहे.

(१) **कौसल्या माता** — राम परमात्मा आहेत हें जाणूनसुद्धां मातेचें कर्तव्य कौसल्या कसें बजावते पाहा — विवाह होऊन परत आल्यावर एकटेच राम शय्येवर पहुडलेले असतां कौसल्या म्हणते,

' जातां मार्गी महाभयंकर । हत कशि तात ताडका दुर्धर ॥ ८ ॥

दो. – **घोर निशाचर बिकट भट समरिं न गणति कुणास ।**

कसे ससेना मारिले मारिच सुभुज खलांस ॥ ३५६ ॥

धन्य ! *मुनिकृपें* **तुमचीं सारीं । बाळ** *संकटें ईश निवारी* ॥

दोघांनीं कृत **मुनिमखरक्षण ।** *प्राप्त गुरुकृपें* **विद्या तत्क्षण ॥**

मुनिवधु तरे चरणरज लागुनि । कीर्ति राहिली विश्वा व्यापुनि ॥

अतिमानुष तव *कर्में सगळीं ।* केवळ *कौशिक-कृपेंचि घडलीं ॥ '* (१।३५७।१-६पाहा). असें बोलत आहे तेव्हां लक्ष्मण तेथें नाहीं तरी मुनिमखरक्षणाचें श्रेय रामाच्या बरोबरीनें लक्ष्मणास दिलें. रामप्रताप व कीर्ति यांचें वर्णन करून शेवटीं सर्व श्रेय केवळ कौशिक मुनींच्या कृपेला दिलें. राम परमात्मा आहेत हें जाणत असून ईशकृपेचा उल्लेख केला ! लहानांची स्तुति मुखावर करूं नये ही मर्यादा पाळली.

(क) **अयोध्याकांडांत कौसल्या माता**—वनांत जाण्यापूर्वी मातेची अनुज्ञा घेण्यास राम आले असतां, तिला त्या दुःखद घटनेची माहिती नसल्यामुळें (२।५२।१–५३।२ पाहा.)

वारंवार माय मुख चुंबित । स्नेहनीर नयनीं तनु पुलकित ॥

घे मांडीवर दे आलिंगन । *झरे प्रेमरस पयोदिं शोभन* ॥

' पिडा टळो ! स्नाना कर सत्वर । गोड घास खा दोन किं रुचिकर ॥

वडिलांजवळ जाइ मग बाळा ! । तनु कुरवंडिं, उशिर बहु झाला ॥ '

यावर जेव्हां राम म्हणाले कीं,

' देति तात मज काननराज्य । कार्य बहुत मज तेथें प्राज्य ॥' इ. इ. तेव्हां **' सुके घाबरुनि वचनें शीतल । '** फार घाबरली, व्याकुळ झाली, पण मूर्छा येऊं न देतां

धीर धरुनि सुतमुखा न्याहाळी । माता गद्गदकंठ म्हणाली ॥

'... राज्य अर्पण्या शुभादिन काढति । वनिं कोण्या अपराधें धाडति ' ॥

'...कोण भानुकुळीं होइ कृशानू ' (२।५४।२-८ पाहा.)

सचिवपुत्रानें सर्व हकीकत सांगितली तेव्हां मनांत म्हणते,

' राखिन पुत्र करूनि जर आग्रह । धर्महानि नी बंधुविग्रह ॥

स्त्रीधर्मा समजुनी शहाणी । रामभरत सुतयुग सम मानी ॥

आणि म्हणाली, **' धन्य बाळ करिसी कीं इष्टचि । सर्व धर्मीं पित्राज्ञा श्रेष्ठचि ॥**

दो. — **राज्य देउं वदुनी दिलें वन मज दुःख न लेश ॥**

तुजविण *भरत*-**नृपां प्रजे दुःसह होती क्लेश ॥५५॥**

भरताची काळजी दशरथांपेक्षां अधिक! त्याच्याबद्दल संशयलेश नाहीं, कैकयी-बद्दल एकहि वाकडें अक्षर नाहीं, राजाला मुळींच दोष दिला नाहीं, आणि रामाला राज्य देण्याचें कबूल करून वनवास दिला याबद्दल दुःख नाहीं!

(क) कैकयीला दोष देणें तर राहोच, पण काय म्हणाली पाहा —

' जर केवळ पिताज्ञा ताता! । जाई न अधिक जाणुनी माता ॥

मायबाप जर म्हणती जातें । वन किं अयोध्या शत समजावें ॥

कैकयीची आज्ञा व आपली स्वतःची आज्ञा यांत पुनीत कौसल्यादेवीला जराहि भेद रुचला नाहीं.

(ख) रामास मांडीवर घेऊन पुत्रवात्सल्यानें आलिंगन दिलें तेव्हां जिच्या पयोधरांतून वृद्धपणीं व पुत्रजन्मानंतर १७ वर्षांनीं प्रेमरसाचे (दुधाचे) पाझर वाहूं लागले तीच कौसल्या देवी त्याच प्रसंगीं इतकी धीर, गंभीर, धर्मज्ञ, शान्त, सम आहे कीं तिला मूर्छा आली नाहीं व ती वरील विचार प्रगट करूं शकली. इतकें उदात्त, निर्विकार, सहनशील, शमदमसंपन्न, परम शुद्ध, निर्दोष मातृचरित्र वाल्मीकि-रामायणांतील कौसल्येचें नाहीं. भरत आणि राम यांत पुत्रप्रेमाच्या दृष्टीनें लेशमात्र भेद मानसांतलि कौसल्येच्या ठिकाणीं नाहीं.

(२) **कौसल्या सापत्न माता** — भरत अयोध्येंत आल्याबरोबर त्यांस *प्रथम कैकयीची भेट घ्यावी लागली;* नंतर उभय बंधु गत कौसल्येप्रति ।

म्लान मलिन वसना विकल कृशतनु सुदुःखभारिं ॥ (२।१६३।-)

अशी कौसल्या भरतास दिसली, आणि अशी कौसल्या सापत्न

माता भरता बघत धावली । घेरि येइ मूर्छित महिं पडली ॥

बघुनि, भरत अतिशय विव्हळला । पडे पायिं तनुभान विसरला ॥

... 'त्रिभुवनिं मजसा कोण अभागी । तव गति अशि माते! ज्यालागीं ॥'

दो.— **भरतवचन मृदु परिसुनि उठे सावरुनि माय ॥**

घे उठवुनि हृदया तया नेत्रांतुनि जल जाय ॥१६४॥

उजू स्वभाव माय हृदिं घेई । प्रेम, *राम परत जणुं येई ॥१॥*

बघुनी स्वभाव सर्वहि म्हणती । *कां न असे अशि राममाय* **ती! ॥**

(पण अशी राममाता इतर रामायणांत नाहीं !)

घे निजांकिं माता भरताला । अश्रु पुसुनी **मृदु वदली बाळा! ॥**

बा! अझुनिहि धीर धर वासरा । शोक सोड हा अवेळिं न बरा ॥

नको मा तु मनिं हानी ग्लानी । काल-कर्मगति अघटित गणुनी ॥

द्यावा दोष न कुणीहि **ताता** *। सर्वस्वीं मज वाम विधाता ॥*

ज्या भरताबद्दल प्रजेंतील कांहीं लोकांनीं संशय घेतले त्या भरताशीं कौसल्या सापत्न माता असून अशी प्रेमानें व अभेदभावानें वागली !

कैकयीलाहि भरत चार वर्षांनींच भेटला. तिनें राजद्वाराशीं थाटामाटानें नटून सजून जाऊन भरताला आरती ओवाळून आपल्या वाड्यांत नेलें; पण ती जराहि दुःखी दिसली नाहीं आणि या सापत्नमातेच्या प्रेमाचा गंध तरी तिथें दिसला का हें नीट पाहावें.

याप्रमाणें भरताला धीर देऊन व त्याची समजूत घालून स्वतःच्या प्रारब्धासच सर्व दोष दिला. नंतर हर्षविषादरहित राहून राम वनांत कसे गेले वगैरे सांगितल्यावर भरतानें अनेक शपथा घेऊन सर्व मातांची खात्री केली कीं कैकयीनें जें केलें तें भरतास मुळींच मान्य नाहीं, व त्यास मुळींच माहीत नव्हतें. नंतर कौसल्या म्हणाली,

ज्ञान न नाशी जरि मोहासी । तूं प्रतिकूल नव्हसि रामासी ॥

' तुज हें संमत ' जे जगिं म्हणती । ते स्वप्निं न सुख सुगति पावती ॥

वदुनि असें त्यां हृदयीं धरलें । *स्रवती स्तनपय नेत्र सजळले ॥*

रामास राज्याभिषेक होणार या परमानंदाच्या भरांत त्यास मांडीवर घेऊन आलिंगन दिलें तेव्हां कौसल्येच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहूं लागल्या तशाच राम वनवासांत गेले असतां, भरताला हृदयाशीं धरून आलिंगन दिल्यावर वाहूं लागल्या. यापेक्षां आणखी १०० टक्के समान पुत्रवात्सल्याचा कोणता पुरावा पाहिजे! बाकीच्या सर्व कृती दिखाऊ, नकली असूं शकतील; पण पुत्रजन्मानंतर १८ व्या वर्षी, वृद्ध झालेली कौसल्या, कैकयीच्या–सवतीच्या सुतास–भरतास भेटते तेव्हां तिच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहूं लागतात हें कृत्रिम असूं शकेल काय? असें परम आदर्शभूत सापत्न मातेचें चरित्र जगांतील एखाद्या ग्रंथांत आहे काय?

(३) **प्रजावत्सल भरतप्रेमी कौसल्या** — दशरथाची उत्तरक्रिया उरकल्यानंतर ६।७ दिवसांनीं वसिष्ठांनीं दरबार भरवून, भरतास बोलावून, प्रेमानें जवळ बसवून दशरथ-वचन सत्य करण्यासाठीं तरी राज्याचा स्वीकार करावा असा उपदेश केला व सचिवांनीं त्यास अनुमोदन दिलें; तेथें, रामविरहानें व वैधव्यदुःखानें अति कृश झालेली कौसल्या, दशरथाची विधवा पट्टराणी, राममाता व भरताची सावत्र माता हजर आहे! व भरतास म्हणते,

' धरि कौसल्या धीर म्हणे हे ! । पुत्र पथ्य गुर्वाज्ञा आहे ॥ '

वसिष्ठांनीं आज्ञा दिली नव्हती; पण भरत राज्य स्वीकारणार नाहीं असें वाटून त्यानें राज्याचा स्वीकार करावा या अंतस्थ हेतूनें तिनें गुर्वाज्ञेचें दडपण घातलें व पुत्र शब्दही धात्वर्थानुसारी वापरला आहे. पथ्य शब्दहि भावगर्भित आहे.

तीं आदरणें हितकर मानुनि । त्यजणें खेद कालगति जाणुनि ॥

वनिं रघुपति सुरपुरिं नरराणा । तूं तर कातर असा सुजाणा ॥

प्रजा **सचिव सब माता परिजन । सकलां तूं चि बाळ ! अवलंबन ॥**

गुर्वाज्ञा शिरिं धरुनी आचर । *प्रजे पाळि* **परिजन दुःखां हर ॥**

हें सर्व सांगतांना कौसल्येला आपलें हृदय किती घट्ट करावें लागलें असेल! केवढें

विशाल व संयमी विवेकी हृदय ! ! प्रजेची काळजी मुख्य आहे. पतिवचन सत्य केलें जावें म्हणून रामाचें राज्य स्वीकारण्याचा आग्रह केला. किती विशाल, निर्विकार, निर्दोष, उदार, अभेद, भावापन्न, शांत, सुशील, कर्तव्यदक्ष, सुसंयमी हृदय !

(क) चित्रकूटला जाण्यास निघाल्यावर सर्वांच्या पुढें वाहनांत वसिष्ठादि विप्रगण आहेत; मध्यें सर्व प्रजा वाहनांतून चालली आहे व मागें सर्व राण्या पालख्या वगैरेंतून नेल्या जात आहेत. भरत-शत्रुघ्न कुठें आहेत व कोणत्या वाहनांतून कसे येत आहेत इकडे इतर कोणाचेंच लक्ष नव्हतें; पण कौसल्येचें लक्ष या गोष्टीकडे होतें. भरत-शत्रुघ्न सर्वांच्या मागें पायीं अनवाणी चालत येत आहेत असें कौसल्येला दिसतांच, पुनीत कौसल्या देवी—

ठेवावि डोली जाउनि जवळीं । राममाय मृदु वचना वदली ।।
सांगे, ऐक रथीं बस बाळा ! । प्रिय परिवार दुःखि बघ झाला ।।
चालति तुम्हि चालतां सकल जन । सकल शोककृश चलण्या शक्त न ।।
वचन धरुनि शिरिं चरणां नमुनी । बंधु उभय जाती रथिं बसुनी ।।

येथेंहि पुत्रवात्सल्य आणि पुत्रवत प्रजावात्सल्य यांना पूर आलेला आहे. (२।१८८।४-७)

(ख) चित्रकूटास कौसल्या–सुनयना भेटींत — (२।१८१।४ – २८४।६)

कौसल्या सादर सन्मानुनि । दे *आसन समयोचित आणुनि* ।।

नंतर दोन्ही बाजूंस शोकाला पूर आले, मग कौसल्या म्हणते,

म्हणे कौसिला दोष कुणा नहिं । कर्मे सुखदुःखें क्षतिलाभहि ।।
कठिण कर्मगति जाणि विधाता । जो शुभ अशुभ सकल फलदाता ।।
ईश्वर-आज्ञा शिरिं सर्वांचे । सृष्टी स्थिति लय विष अमृताचे ।।
देवि मोहवश शोक विफळ हा । विधीप्रपंच अनादि अटळ हा ।।

येथें कौसल्येची विवेकी वृत्ति व ज्ञान यांचें दर्शन होतें. सर्व दोष स्वतःकडे घेऊन इतर कोणाचा दोष नाहीं हें येथें पण सांगितलेंच. (२८२।३–७)

(ग) **म्हणे सधीरा कौसिला श्रुणु देवी मिथिलेशी ।। २८३ ।।**

राणि ! नृपांना सुसंधि साधुनि । अपल्यापरिं सांगा समजावुनि ।।
फिरवा लक्ष्मण जाति भरत वनिं । जर हें मत मानेल भूपमनिं ।।
तर सुयत्न करणें सुविचारीं । *मज चिंता भरताची सारी ।।*
स्नेह सुगूढ भरतमनिं राही । राहत दिसत भलें मज नाहीं ।।

भाव हा आहे कीं भरतास अयोध्येंत परत जावें लागलें तर भरताचे प्राण राहतील असें कौसल्येला वाटत नाहीं म्हणून तिला भरताची चिंता लागली आहे. हें पाहून वाचक म्हणतील कीं,

धन्य ! राममाता कौसल्या । कुठें वदा माता हिज तुल्या ।।
अनुपम ऐशा मातृचरित्रा । कोण अन्य कवि वर्णि पवित्रा ।। प्रज्ञा. ।।

आतांपर्यंतच्या विवेचनांत कौसल्या माता, कौसल्या सापत्न माता, कौसल्या पतिव्रता, कौसल्या सवत, दशरथपत्नी कौसल्या, प्रजावत्सल पट्टराणी, ज्ञानी, विवेकी, विनयी, देशकालादिसमयज्ञ कौसल्या पाहिली.

(४) धर्मपत्नी कौसल्या — वरच्यासारखे महत्त्वाचे कर्तव्य-तत्परतेचे अवसर सोडून कौसल्या सदा दानधर्म, विप्रपूजन, देवपूजन व भक्ति यांतच गुंग झालेली मानसांत दिसते.

कौसल्यादी *स्त्रिया* **प्रिय सब** *आचरण पुनीत ॥*
पति–अनुकूला, प्रेम दृढ हरिपदकमलिं, विनीत ॥ (१।१८८।–)
' तुम्हि *गुरु–विप्र–धेनु–सुर–सेवी* । **तशि** *पुनीत कौसल्या देवी* ' ॥ १।२९४।४

असें वसिष्ठ दशरथांस म्हणाले आहेत.

(क) रामराज्याभिषेक उद्यां सकाळीं होणार हा समाचार राणीवंशांत कळतांच सांगणारांस बक्षिसें दिल्यावर निरनिराळ्या राण्या काय करतात पाहा —

प्रेमें पुलकित मनीं अनुरागति । *मंगल कलश सकल सजुं लागति* ॥(२।८।२–६)

इतर राण्या मंगल कलश सजवूं लागल्या,

रांगोळ्यांस सुमित्रा **बहु भरि । अति सुंदर मणिमय नानापरिं** ॥ ३ ॥

पण राममाता कौसल्या काय करते पाहा —

रामजननि *आनंदमग्न अति । दे दानां अणवुनि विप्रांप्रति ॥*
ग्रामदेवि पूजुनि सुर–नागां । म्हणे देउं पुनरपि बलिभागां ॥

(१।२९५।७–८ व दोहा; १।३४५।८ व दोहा; १।३५१।१; १।३५२।२ पाहा.)

(ख) शृंगवेरपुराहून परत येऊन सुमंत्रानें श्रीरामसंदेश दशरथांस सांगितल्यावर– ' प्राण कंठगत झाले राउळ । ' (राउळ = राजा) तेव्हां कैकयीशिवाय सर्व राण्या तेथें होत्या, पण —

क्षीण नृपति कौसल्ये भासत । जाणे रविकुळ–रवी मावळत ॥
रामजननि उरिं धरि धीराला । बोले समयोचित वचनाला ॥
' नाथ ! समजुनी करा विचार किं । रामवियोग–पयोधि अपार किं ॥
तारु अयोध्या नाविक आपण । पांथिक बसले सगळे प्रिय जन ॥
धीर धरा तर पावूं पारा । ना तर बुडूं सहित परिवारा ॥
मनीं धरा प्रिय ! जर मम विनती । लक्ष्मण सीता राम भेटती ' ॥

अशा प्रकारें कौसल्येनें त्या *दुःखद, शोकाकुल दशेंतसुद्धां पतीला धीर दिला* व या प्रिय वचनानें दशरथ शुद्धीवर येऊन उठून बसले. (१५५।१)

(५) **सासू कौसल्या** — राम–वनवासाची दुःखद वार्ता सीतेला कळतांच ती व्याकुळ होऊन कौसल्येकडे आली व नमस्कार करून बसली. कौसल्येनें आशीर्वाद देऊन तिच्याकडे पाहिलें मात्र तोंच **' अति सुकुमारी बघुनि, विकळली** ॥ (५८।१)

ती अति सुकुमार सून पाहिली व कौसल्या व्याकुळ झाली. सीता खालीं मान घालून अश्रू ढाळीत आहे असें पाहून कौसल्या सासू रामास म्हणते,

' पुत्रवधू प्रिय मला लाभली । रूपराशि गुणशील–आगळी ।।
नयनपुताळशी प्रीति वाढवुनि । प्राण ठेविले तिजवर लावुनि ।।
कल्पवेलिसम *विविधा लालन– । केलें स्नेहजलें प्रतिपालन ॥*
अंक–पलंग–पीठ–झोपाळा । त्यजुनि, कठिण भुविं दे न पदाला ।।
जिवनमुळीसम जपत राहतें । 'दीपवात सार' हि ना कथिते ॥ (५९।१–६)
तात ! बसेल कशी वनिं सीता । चित्र-लिखित कपि बघुनि सभीता ।।(२।६०।४)

मधला सर्वच भाग पाहावा.

अशी सासू कोणत्या तरी रामायणांत आहे काय? मानसांतील कौसल्या सासूचा स्वभाव पाहून सुनांना वाटेल कीं सासू असावी तर अशी तुलसीदासांच्या कौसल्ये-सारखी असावी! पण अशी सासू मिळण्यास सुनेनें तुलसीमानसांतील जनककुमारी होणें जरूर आहे असें भाललेख लिहिणारे विरंचि–ब्रह्मदेव–सांगतात!

या कौसल्याचरित्राचा विस्तार जास्त झाला पण यांत थोडें रामचरित्र व भरत-चरित्रही आलें आहे. आतां सीताचरित्र सुनांनीं सुद्दाम पाहावें व त्याचें अनुकरण करावें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।३ 卐 卐 卐

श्रीसीता

जशी मानसांतील कौसल्या तशीच कौसल्येची सून सीता आहे.

(१) घरीं राहा असें श्रीरघुनाथानें सांगितल्यावर मानसांतील सीता श्रीरामावर मुळींच रागावली नाहीं. वाल्मीकींच्या सीतेनें श्रीरघुवीराची चांगलीच हजेरी घेतली आहे

(क) पतिवचन ऐकून अत्यंत व्याकुळ झाली पण धीर धरून सासूची क्षमा मागून, प्रथम सासूला म्हणते कीं,

' करुनि विचारा गमे मम मना । प्रिय–वियोगसम विश्वीं दुःख ना ।।

सासूच्या देखत पतीशीं बोलणें ' अति अविनय खोडी ' आहे असें सीतेला वाटलें; पण प्रसंगानुरूप सासूची क्षमा मागून सीता श्रीरामास विनविते कीं तुमच्याशिवाय ' सुरपुर नर्क-समान ' (६४) सप्त स्वर्गांतील सर्व सुख नरकासारखें वाटेल, आणि

' माता पिता स्वसा प्रिय बंधू । प्रिय परिवार सुहृद संबंधू ।। इत्यादि सर्व नातें
' तापद तरणिहुनि स्त्रीला तें '

' तन धन धाम धरणि नृपसत्ता । पतिविण सर्वचि शोक-इयत्ता ।।
भोग रोगसम भूषण भारहि । यमयातनासदृश संसारहि ।।

प्राणनाथ! अपणांविण जगतीं। कोणि सुखद कांहीं मज नसती ॥
देह जिवाविण जलविण सरिता। नाथ! तशिच पुरुषाविण वनिता ॥ ८ ॥
दो. — **खगमृग परिजन, नगर वन, वल्कल विमल दुकूल ॥**
नाथ साथ, सुरसदनसम पर्णकुटी सुखमूल ॥ ६५ ॥
कुश किसलयमय शय्या सुंदर। प्रभुसह मदन-शयनसम सुखकर ॥

शृंगवेरपुरास तृणपर्णशय्येवर सीतेला वल्कलें नेसलेली असतां व पांघरण्यास आकाशच असतां सहज सुखानें झोंप लागली आहे.

हार न खाइन मार्गीं चालत ॥
सम महिवरि तृण पल्लव घालिल। पाय रात्रभर दासी दाबिल ॥

इत्यादि दो. ६७ पर्यंत सर्वच पाहा.

(२) सीता स्वतःस रघुपतिदासी मानते व दोघांचा संबंध देह-छाया, प्रभाकर-प्रभा व चंद्र-चंद्रिका यांच्यासारखा समजते हें '*नारीधर्म*' प्रकरणांत पूर्वी दाखविलें आहे.

(३) चित्रकूटास गेल्यावर तेथें सीतेनें स्वतःच्या हातांनीं खूप विस्तीर्ण वेदिका तयार केली व तिच्यावर बसून मुनिमंडळीसह श्रीसीता, राम व लक्ष्मण नित्य कथा श्रवण करीत असत.

(क) तेथें सीतेनें कांहीं तुळसीहि लावून वाढविल्या होत्या.

(४) मानसांतील सीतेनें शास्त्रनियमानुसार 'राम' या पतीच्या जन्मनामाचा उच्चार मुखानें केला नाहीं. वाल्मीकि रामायण वगैरेंत सीतेनें तें अनेक वेळा उच्चारलें आहे.

(५) जनकराजा सर्व मंडळीसह चित्रकूटास आल्यावर सीतामाता सुनयना कौसल्येला भेटण्यास आली व जातांना (दोन घटका रात्र झाल्यावर) सीतेला घेऊन गली; पण सीता बापाच्या तंबूंत एक रात्रसुद्धां राहिली नाहीं! सगळ्यांना भेटली व लगेच परत आली.

(६) जितक्या सासवा होत्या तितकीं रूपें घेऊन सीतेनें त्या सर्वांची सेवा अगदीं सारखी, भेदभाव न करतां प्रेमानें व विनयानें केली (चित्रकूटास). (२।२५२।२-५ पाहा.)

(७) मानसांत जनककुमारी सीता चोरली न जातां मायासीताहरण झालें आहे. श्रीरघुनाथाच्या सूचनेप्रमाणें जनककुमारी अनलांत गुप्त राहिली आहे; पण मर्म लक्ष्मणालासुद्धां कळलें नाहीं.

(८) वाल्मीकि रामायणांत सीतेला अशोकवनांत इंद्रानें गुप्त रूपानें येऊन अमृत दिलें आहे व तें ती प्याली; पण मानसांत तसें घडलें नाहीं. मानसांतील सीतेनें पाणीसुद्धां तोंडांत घातलें नाहीं.

(९) रावणवधानंतर सीतेला लंकेंतून आणविल्यावर श्रीरघुनाथ तिला अति अप्रिय असें बोलले पण मानसांतील सीता मुळींच रागावली नाहीं कीं एक शब्द उलटून

बोलली नाहीं. काष्ठें आणून पावक प्रज्वलित करण्याची विनंति तिनें लक्ष्मणास केली आहे. वाल्मीकि रामायणांत सीता पुष्कळ तणतणली आहे व श्रीरामास उलटून बोलली आहे.

(१०) अयोध्येंत परत आल्यावर—

राहिं सदा पति-अनुकुल सीता । शोभाखाण सुशील विनीता ॥
कृपासिंधुची प्रभुता जाणुनि । चरणकमल सेवी मन लावुनि ॥
जरी गृहीं सेवक सेवकिणी । विपुल सदा सेवाविधिं गुणी ॥
स्वकरें गृहपरिचर्या करते । रामचंद्र आज्ञा अनुसरते ॥
कृपासिंधु सुख मानिति जेणें । तें श्री करि सेवाविधि जाणे ॥
कौसल्यादि सासवा गेहीं । त्यांस सेवि मद मान नसे ही ॥ (७।२४।३-८)

पूर्वींच्या विविध प्रकरणांत आलेले सीतेविषयींचें वर्णन येथें गाळलें आहे. येथें फक्त मानसांतील सीताचरित्राचें वैशिष्ट्यच दाखविलें आहे.

मागें प्रथम रामस्वभावादि वर्णन करून नंतर कौसल्याचरित्र वर्णिलें आहे; म्हणून आतां आधीं लक्ष्मणचरित्र वर्णन करून मगच सुमित्राचरित्र सांगणें इष्ट आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।४ 卐 卐 卐

श्रीरामसेवामूर्ति लक्ष्मण

मानसांतील लक्ष्मणचरित्र-चित्रणाचें हृद्गत १४।१ या प्रकरणांत पूर्वींच दाखविलें आहे. हें चरित्र कौसल्याचरित्रासारखें विस्तारानें सांगणें भाग आहे; कारण लक्ष्मणाच्या क्रोधी व उतावळ्या *दिसणाऱ्या* स्वभावामुळें पुष्कळ गैरसमज उत्पन्न झाले आहेत. मानसांतील चित्रकूटच्या ज्या भाषणामुळें लक्ष्मण भरतापेक्षां कमी दर्जाचे भासतात त्याच मानसांत भरतापेक्षां लक्ष्मणाची श्रेष्ठता दाखविली आहे पण तिकडे सहसा लक्ष जात नाहीं.

(१) वंदनप्रकरणांत, (२) नामकरणप्रकरणांत, (३) किष्किंधा-मंगलाचरणांत, (४) लक्ष्मणमूर्छेनंतरच्या रामविलापांत आणि (५) श्रीरघुनाथाच्या कांहीं स्फुट-वचनांत भरतापेक्षां लक्ष्मण श्रेष्ठ असल्याचें दाखविलें आहे. क्रमशः अवतरणें घेऊन विचार करूं या.

१. वंदनांत लक्ष्मणाची श्रेष्ठता. (१) **भरतास वंदन** —

' प्रणमीं प्रथम भरत*चरणांना* । वर्णवे न यद्व्रत नेमांना ॥
यन्मन रामपदांबुजिं राही — । लुब्ध मधुपसें त्यजि न जरा ही ॥ (१।१७।३-४)

भरत पायसाच्या चतुर्थांशाचे असून *त्यांच्या वंदनांत दोनच ओळी — चौपाया;* आणि *त्यांच्या चरणांना कमल म्हटलें नाहीं.*

(क) लक्ष्मणास वन्दन —

वंदे लक्ष्मण-पद-जलजांते। शीतल सुभग भक्त सुखदाते ॥ ५ ॥
रघुपतिकीर्ति-पताके विमले। ज्यांचें यश दण्डासम बनलें ॥ ६ ॥
शेषसहस्रशीर्ष, जगकारण। जो अवतरला भूभर-दारण ॥ ७ ॥
सदा प्रसन्न असो माझ्यावर। कृपासिंधु सौमित्रि गुणाकर ॥ ८ ॥

लक्ष्मण पायसाचा ¼ भाग असून त्यांच्या वंदनांत चार चौपाया ! पदजलज म्हटलें, आणि भक्तसुखद, शीतल, कृपासिंधु म्हटलें आणि भूभारहरणार्थ शेषाचा किंवा जगकारणाचा अवतार आहेत असें म्हटलें.

(ख) '**कृपासिंधु**' शब्द मानसांत (हिंदी) ४९ वेळां वापरला असून लक्ष्मणास १, शंकरांस ५, सद्गुरूस ३, रामलक्ष्मणांस १ व श्रीरामप्रभूला ३९ वेळां कृपासिंधु म्हटलें आहे. शिव आणि राम यांना मानसांतच जगद्गुरु म्हटलें आहे. (१।१११।५ – शिव आणि ३।४।९–राम, पाहा.) हें वंदन देवता समजून केलेलें आहे कीं साधक जीव समजून भरतासारखें केलें आहे याचा विचार करावा. **हें वंदन लक्ष्मणास भगवान मानून केलेलें आहे व त्यांची कृपा भाकली आहे. भरताचें वंदन साधक जीव मानून केलेलें आहे.** यानें व वंदनांतील विशेषणांची तुलना केल्यानें लक्ष्मणाची श्रेष्ठता सहज ठरते व सहज दिसते.

(ग) पुढें १८।९ – १० मध्यें दोनच चौपायांत रामास स्वतंत्र वंदन असून त्यांत '*भक्तविपद्भंजक सुखदायक*' आणि 'चरणकमल' हे शब्द आहेत.

२. नामकरणांत श्रेष्ठता (१।१९७।५ – ७ व दोहा १९७).

रामनामकरण — **जो आनंदसिंधु सुखरासी। त्रिजगीं पावे लवें सुखासी ॥ ५ ॥**
तो सुखधाम राम तन्नाम। दायक लोकां सब विश्राम ॥ ६ ॥
भरतनामकरण — **जोही विश्वभरण-पोषण करि। नाम तयाचें भरत जाण तरि ॥७॥**
लक्ष्मणनामकरण — *लक्ष्मणधाम राम-प्रिय* **सर्व** *जगा आधार*।
त्या गुरु वसिष्ठ ठेवी *लक्ष्मण* **नाम** *उदार* ॥ १९७ ॥

रामनामकरण दोन चौपायांत, भरतनामकरण एकाच चौपाईत व लक्ष्मणनामकरणास एक दोहा वापरला. लक्ष्मणाच्या विशेषणांचा विचार करावा म्हणजे भरतापेक्षां लक्ष्मणच श्रेष्ठ ठरतात.

३. किष्किंधा मंगलाचरण श्लोक १ ला —

कुन्देन्दीवरसुंदरौ, अतिबलौ विज्ञानधामौ उभौ।
शोभाढ्यौ वर धन्विनौ श्रुतिनुतौ गोविप्रवृन्दप्रियौ।
मायामानुषरूपिणौ रघुवरौ सद्धर्मवर्मौ हितौ।
सीतान्वेषणतत्परौ पथिगतौ भक्तिप्रदौ तौहि नः ॥

यांतील सर्व विशेषणें द्विवचनान्त आहेत; आणि लक्ष्मण-रामांचें वर्णन एकत्र आहे.

दोघांच्या शरिराच्या वर्णभेदाहून दुसरा कोणताहि भेद या दोघांत नाहीं. मंगलाचरणांत देवतावन्दनांत हा श्लोक आहे. देवता म्हणूनच लक्ष्मणरामांचें गुणसाम्य दाखविलें आहे; आणि रामाच्या पूर्वी लक्ष्मणाचा उल्लेख आहे. कुन्दसुन्दर लक्ष्मण आणि इन्दीवर-सुन्दर राम आहेत. (क) भरत आणि राम यांचें असें मंगलाचरण श्लोकांत समान वर्णन नाहींच पण चौपायादिकांत असल्यास कोणीं दाखवावें; कारण या लेखकास मानसांत सांपडलें नाहीं. श्रेष्ठ कोण ? लक्ष्मणच ना ?

४. श्रीराम-विलापांत (६।६१।१ – १७)

श्रीराम म्हणतात, ' *सदा स्वभाव* बंधु तव *कोमल* ।।

' जर वानें बंधुवियोग जाणतो । पितृवचना त्याही न मानतो ।।

जगीं *सहोदर न मिळे भ्राता* ।। (राम लक्ष्मणाला सहोदर मानतात.)

जगिं सहतों अपयशहि हवें तर । स्त्रीहानीक्षति अधिक नव्हे बरं ।।

५. इतर स्फुट वचनें – हनुमान विप्ररूपानें येऊन रामलक्ष्मणांस भेटल्यावर आणि त्यानें आपलें कपटरूप टाकल्यावर प्रभु त्यास म्हणाले कीं,

' श्रुणु कपि मानुं नको मनिं ऊणें । *तूं प्रिय मजला लक्ष्मण-दूणें* ।। (४।३।७)

मनुष्यदेहधारी सुग्रीवादि रामसखे वसिष्ठांस वन्दन करीत असतां त्यांचा परिचय देतांना प्रभु भरताच्या देखतच वसिष्ठांस सांगतात कीं, **'भरताहुनि हे प्रिय बहु मजला।'**

सुग्रीवादिकांची तुलना भरताशीं केली आणि हनुमंताची तुलना लक्ष्मणाशीं केली. सुग्रीव मानसांत हनुमंतापेक्षां श्रेष्ठ ठरतो काय ? 'श्रुणु सुत अनृण तुझा मी नाहीं।' असें हनुमन्तास सांगितलें आहे, त्याच्या मस्तकावर दोनदां हात ठेवला आहे. एकाच प्रसंगांत तीन वेळां हृदयाशीं धरलें आहे व तिसऱ्या वेळीं त्याचा हात धरून परम निकट बसविलें आहे. यांतील एकही गोष्ट सुग्रीवाच्या बाबतींत घडली नाहीं. हनुमान श्रेष्ठ कीं सुग्रीव श्रेष्ठ ? व लक्ष्मण श्रेष्ठ कीं भरत श्रेष्ठ ? आणखी कांहीं वचनें इतरत्र आहेत, पण इतकीं पुरेत.

६. लक्ष्मण भरतचरित्रांतील कांहीं तुलना – (१) लक्ष्मणानें कधीं कोणास नवस केले नाहींत. कोणत्याहि देव-देवींचें पूजन केलें नाहीं; कधीं कोणाहि नातेवाईकांचें कुशल विचारलें नाहीं कीं ब्राह्मणभोजनादि कांहीं केलें नाहीं; या सर्व गोष्टी भरतानें मामाकडे असतां केल्या आहेत व चित्रकूटास जातांना तीर्थदेवता पूजनादि केलें आहे. रामच देव, रामाशिवाय इतर देवतांना चित्तांत थारा नाहीं असें घडलें नाहीं.

(२) रामप्रेमासाठींसुद्धां लक्ष्मणानें कोणाच्याजवळ कधीं याचना केली नाहीं; भरतानें अनेकांजवळ केली आहे. राम सर्वसमर्थ असल्यानें इतरांस याचना करण्याची आवश्यकता लक्ष्मणास वाटली नाहीं.

(३) भरत स्वतःच्या इच्छेनें विवाह झाल्यावर (बायकोसहित) रामचंद्रास सोडून गेले. आणि वाल्मीकिरामायणाप्रमाणें ४ वर्षें व इतरांप्रमाणें १२ वर्षें तेथें राहिले. इतकीं

वैंष रामास सोडून त्यांस कसें राहवलें ? लक्ष्मणास आजोळ होतें, आजा राजाच होता; त्यानें बोलावलेंहि असेल पण लक्ष्मण कां गेलें नाहींत ? भरतापेक्षां लक्ष्मणाचें प्रेम जास्त कीं कमी हें यांत स्पष्ट दिसतें. भरताच्या रामप्रेमाचें सार एका दोह्यांत पाहा —

(४) **प्रेम अमृत, मंदर विरह, भरत पयोधि गभीर।**

काढि मथुनि सुर साधुहित, कृपासिंधु रघुबीर॥ (२।२३८)

रामप्रेम हें अमृत होतें; भरत गंभीर क्षीरसागर होता, त्यांत रामवनवासजनित रामविरह हा मंदर पर्वत रघुवीरानें घातला व कृपासिंधु रघुवीरानें त्याचें मंथन केलें तेव्हां रामप्रेमरूपी अमृत त्या भरतरूपी सागरांत प्रगट झालें; साधुरूपी सुरांच्या हितासाठीं रघुवीरानें तें काढलें–प्रगट केलें.

(क) विवाहापासून वनवासापर्यंतच्या ४ किंवा १२ वर्षांच्या विरहानें तें अमृत आपोआप निघालें नाहीं, असें जेव्हां श्रीरघुवीरानें पाहिलें तेव्हां त्यांनीं हा १४ वर्षांचा विरहरूपी मंदरपर्वत मुद्दाम त्यांत घातला. सार हें कीं हा १४ वर्षांचा वनवासजनित विरह जर घडला नसता, तर भरताच्या ठिकाणीं असें रामप्रेम प्रगट झालें नसतें. *पहिला विरह भरतास दुःखद वाटलाच नाहीं.*

(ख) लक्ष्मणाचें रामप्रेम प्रथमपासूनच जागृत व सक्रिय होतें.

जाणुनि निजहितपति आशिशुपण। रामचरणरत झाले लक्ष्मण॥

भरत-शत्रुहा दोन्ही भ्रात्यां। प्रभु-सेवकशी प्रीती स्तुत्या॥ (१।१९८।३-४)

भरताचें रामप्रेम लहानपणापासून इतकें दिसलें नाहीं.

(ग) एक जन्मापासूनच कोट्याधीश असलेला (रामप्रेम) धनवान व एक एकाएकीं लॉटरी लागून कोट्याधीश बनलेला धनवान, यांच्याविषयीं समाजांत जसे भावनाभेद होतात तसाच भेद लक्ष्मण आणि भरत यांच्या चरित्राकडे पाहतांना सहज पडतो. गर्भश्रीमंताच्या श्रीमंतीचें नित्य परिचयामुळें विशेष महत्त्व वाटत नाहीं; पण एकाएकीं श्रीमंत होणाऱ्यावर अभिनंदनात्मक तारा, मानपत्रें, सत्कारसमारंभ इत्यादींचा पाऊस पडतो.

७. *रघुपति कीर्ति-पताके विमले। लक्ष्मण-यश दण्डासम बनलें॥*

(१) या एका चौपाईंतच लक्ष्मणाच्या चरित्राचें सार-सर्वस्व कवींनीं मंगलाचरणांतच भरून ठेवलें आहे. (रामायण चौपाईंत ' लक्ष्मण 'च्या जागीं पूर्व संदर्भानें ' ज्याचें ' आहे) रघुपतीच्या विमल कीर्तिरूपी विमल पताकेला लक्ष्मणाचें यश दंडासारखें झालें. दंडाशिवाय पताका-ध्वजा लोकांच्या दृष्टीस पडत नाहीं; आणि ध्वजा नसलेल्या दंडाची पूजा कोणी करीत नाहीं. दोघांत परस्परसापेक्ष अविनाभाव आहे. एकावांचून दुसरें मातीमोल ! ध्वजा, गुढी उंच आकाशांत असते; गुढीची पूजा म्हणजे त्या दंडाचीच पूजा करतात.

(ख) गुढीचा वेणुदंड जसा बाहेरून पाहणारास कणखर व गांठाळ दिसतो, पण

आंत अगदीं मृदु आकाशमय असतो तसेंच लक्ष्मणचरित्र आहे. जर दण्ड कणखर, न लवणारा, न वांकणारा, न मोडणारा नसेल तर गुढी-ध्वजा उंच फडकत राहणार नाहीं व जर कदाचित दंड कोलमडून पडला कीं ध्वजा धुळींत लोळते! म्हणूनच लक्ष्मणमूर्च्छेनंतर रघुवीरानें फार शोक केला आहे.

(ग) मानसांतील लक्ष्मणाच्या चरित्राचें सार निराळ्या पद्धतीनें सांगावयाचें तर दशरथपुत्र लक्ष्मण ही व्यक्ति अस्तित्वांतच नसून, केवळ रामसेवक लक्ष्मणच सर्वत्र दृष्टीस पडतो. **रामसुखानें सुखी होणें व रामदुःखानें दुःखी होऊनही रडत, उत्साहरहित न राहतां, रामदुःख, रामापमान दूर करण्यासाठीं प्रत्यक्ष कृतान्ताचाही काळ बनणें हें लक्ष्मणचरित्राचें सुकाणूं आहे.** जो· *सुमित्रानन्दवर्धन लक्ष्मण भृगुपतीसारख्या प्रख्यात क्षत्रिय कुलद्रोही विख्यात अजिंक्य वीराच्या परशूच्या उगारण्यास डोंगराला फुंकरीनें उडविण्याचा प्रयत्न असें जामदग्न्याच्या तोंडावर निर्भयपणें म्हणतो तोच लक्ष्मण श्रीरघुनाथाच्या नुसत्या नेत्रांच्या इशाऱ्यानें एका निमिषांत एकदम प्रशांत होतो! श्रीरघुनाथास प्रतिकूल वाटणारें स्वतःस कितीहिं प्रिय वाटलें तरी न करणें, श्रीरामाचा कल पाहून वागणें व श्रीरघुनन्दनजानकीसेवा करणें हेंच लक्ष्मणाच्या जीवनांतील ध्येय, हेंच लक्ष्मणाचें साधन, भजन, पूजन, धन, गृह, संपत्ति, धर्म, प्राण, जीव, सर्वस्व! श्रीरामाच्या दुःखास, चिंतेस, अपमानास कारण होणारा लक्ष्मणाचा सहजवैरी व श्रीरामास सुख देणारा लक्ष्मणाचा परम मित्र!*

(घ) सद्‌गुरु, माता, पिता, गुरु, बंधु, धर्म, नीति, सद्गति, दुर्गति, इत्यादि कांहींच लक्ष्मणास माहीत नाहीं.

‘ गुरुपितृमाय न मज कुणि ठावें । नाथ! विश्वसा वदें स्वभावें ॥
जगिं जितकीं स्नेहादिक नातीं । प्रीती प्रचिती श्रुति निज गाती ॥
सर्व एक तुम्हि मजला स्वामी । दीनबंधु हृदयान्तर्यामी ॥
धर्म नीति शिकविणें तयाला । कीर्ति भूति सुगती प्रिय ज्याला ॥
मनतनवचनें पदिं रत झाला । **कृपासिंधु कीं त्यजणें त्याला ! ॥** (२।७२।४–८)·

असें वनगमनप्रसंगीं प्रारंभींच लक्ष्मण रामास म्हणाले. तूं घरीं राहा वनांत येऊं नकोस वगैरे रघुनाथानें म्हटलें त्यावर हें लक्ष्मणाचें कथन आहे. हें भाषण ऐकून ‘ घरीं रहा ’ असें म्हणण्याची रघुनाथाची छाती नाहीं झाली. (दो. ७२ पाहा). कारण त्यास दिसत होतें कीं तसें म्हटल्यास लक्ष्मणाचे प्राण त्याच्या देहामध्यें राहणार नाहींत.

‘ प्रभूस्नेहिं शिशु मी प्रतिपालित । ’ (२।७२।३).

असें लक्ष्मण रामप्रभूस म्हणाले व तशीच त्यांची भावना आहे. रामप्रभूबरोबर वनांत जावें याशिवाय इतर कोणताच व कशाचाहि विचार त्या वेळीं लक्ष्मणाच्या चित्तास स्पर्श करूं शकला नाहीं.

स्वतः श्रीरघुवीर आपला अपमान करून घेऊं लागले तर तेंसुद्धां लक्ष्मणास स्वस्थपणें बघवत नाहीं ! (५।५०।७ – ५।५१।५ पर्यंत पाहा)

८. **दुःखि राम, लक्ष्मणा न बघवत** — (१) लक्ष्मणचरित्रांत लक्ष्मणस्वभावाचें यथार्थ चित्र दाखविणारा विलक्षण प्रसंग म्हणजे ससैन्य भरतागमनाची वार्ता कळल्या-नंतर श्रीरामप्रभूला दुःखी व चिंतातुर झालेले पाहून लक्ष्मणाची शान्ति ढळली. त्याचा क्रोध व वीररस जागृत होऊन ससैन्य भरत शत्रुघ्नांशीं युद्ध करून रामवैरी बनलेल्यांस ठार मारण्याची भाषा बोलूनच थांबला नाहीं; रामशपथ घेऊन धनुष्यावर बाणसुद्धां लावला. लक्ष्मणाच्या या क्रोधाचें सार लंकाकांडांत लीलाप्रिय श्रीराम प्रभूंनीं विलाप करतांना सांगितलें आहे तें लक्ष्मणाच्या आक्षेपकांस दिसत नाहीं.

पाहुं न शकसि दुःखि मज अंमळ । सदा स्वभाव बंधु ! तव कोमल ।। (६।६१।३) याचेंच सार वर दिलें आहे.

(२) हा स्वभावच लक्ष्मणाच्या त्या कोपास कारण आहे. मानसांतील लक्ष्मणाच्या क्रोधास हें जें परम पावन कारण आहे तें वाल्मीकि रामायणांतील लक्ष्मणाच्या क्रोधास कारण नाहीं. ससैन्य भरतागमनसमाचार ऐकून श्रीराम खिन्न व चिंतातुर झालेले पाहून रामसेवामूर्तीला भरताच्या हेतूंबद्दल संशय आले तसे कोणाहि सेवकास आले असते. ते संशय लक्ष्मणानें प्रभूस बोलून दाखविले, तरी राम मौनीच ! ' मौनं संमतिलक्षणं ' या न्यायानें लक्ष्मणाच्या संशयकृशानूंत श्रीरामानें आपल्या सतत मौनानें जणूं तेलच ओतलें. एका शब्दानें किंवा इशाऱ्यानें अगदीं शेवटपर्यंत आपली नापसंती दाखविली नाहीं. परशुरामप्रसंगांत श्रीरघुनाथानें आपली नापसंती दर्शविली तशी येथें कां दाखविली नाहीं ? लक्ष्मणानें केलेली भरतनिंदा चिंतातुर मुद्रेनें शेवटपर्यंत कां ऐकून घेतली ? प्रभूंनीं ही लीला मुद्दामच दुहेरी हेतूनें केली. शेवटीं लक्ष्मणानें शपथ घेतल्या-वरसुद्धां एक अक्षरही बोलले नाहींत कीं डोळे वटारले नाहींत ! आणि आकाशवाणी करवून आपला दुहेरी हेतु साधला. लक्ष्मणाच्या प्रतापाचा धाक केवढा आहे व भरत किती निर्दोष आहे हें तेथील सर्व मुनिवृंदादिकांस कळावें, आपण स्वतः सांगण्यापूर्वी निःसंदेहपणें कळावें या हेतूनें राम—क्रीडाप्रिय प्रभु—मौन राहिले. या वेळच्या लक्ष्मणाच्या क्रोधांत लक्ष्मणाचा काडीमात्र दोष नाहीं. जे केवळ व्यवहारदृष्टीनेंच पाहतील ते कदाचित रघुपतीस, रघुनाथास दोष देऊं शकतील; पण श्रीरामाच्या हेतूंचा जे विचार करतील ते रामासही दोष देणार नाहींत. विस्तार गूढार्थचंद्रिकेंत पाहावा. हें मर्म ज्यास कळत नाहीं, म्हणजेच त्या प्रसंगांतील चौपाया दोह्यांचा अर्थ ज्यांस उकलत नाहीं तेच लक्ष्मणास दोषी ठरवितील !

९. **लक्ष्मणचरित्र देवचरित्र आहे** — मंगलाचरणांत व वंदनादिकांत हें आधींच दाखविलें आहे. लक्ष्मणाचें चरित्र इतरांना अनुकरण करतां येण्यासारखें नाहीं; व अंशतः अनुकरण कोणी करूं नये. ' न देवचरितं चरेत् ' हें मानसांत लक्ष्मणचरित्रानें

दाखविलें आहे. लक्ष्मणाचें अनुकरण करण्यास रामावतारांत सुमित्रानंदन लक्ष्मणच झालें पाहिजे. भरत जसे प्रगट रामस्नेहमूर्ति आहेत तसे लक्ष्मण प्रारंभापासूनच श्रीरामसेवामूर्ति आहेत. भरताचें चरित्र साधकचरित्र असल्यानें सर्वांनीं अनुकरणीय आहे; आणि म्हणूनच मानसांत वरवर पाहणारांस भरत श्रेष्ठ वाटतील असें मंयसभेसारखें चित्रण केलें आहे.

१०. लक्ष्मणपूजा आवश्यक — सर्व राममंदिरांत किंवा जेथें राममूर्तींची पूजा केली जाते तेथें,

' दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे च जनकात्मजा । '

असें असतेंच; पट्टाभिषिक्त राममंदिरांतच भरतादिक असतात; पण जेथें राममूर्ति आहे तेथें लक्ष्मणमूर्ति आहेच. पट्टाभिषिक्त रामाचीं मंदिरें फारच थोडीं आहेत.

तेषामपि (भरतशत्रुघ्न–पूजा) प्रकर्तव्या भुक्तिमुक्ति–फलेप्सुभिः ।
प्राधान्येन पृथक्त्वेन अंगत्वे रामपीठके ॥

भरतशत्रूघ्नांची पूजा स्वतंत्रपणें करावी किंवा रामपीठांगभूत करावी; पण

लक्ष्मणस्तु सदा पूज्यः प्राधान्येनेव नित्यशः ।
साफल्यं रामपूजायां यदीच्छेन्नियतव्रतः ॥

लक्ष्मणाची पूजा मुख्य मानूनच करणें आवश्यक आहे; रामपूजांगभूत करून चालणार नाहीं. जशी रामपूजा करावयाची असेल तशीच (भेद न करतां) लक्ष्मणपूजा केली पाहिजे तरच नियमनिष्ठ राहून केलेल्या रामपूजेंत सफलता मिळेल; अशीं अगस्त्य संहितेंतील वचनें श्रीरामार्चनचंद्रिकेंत आहेत. विषयाला धरून सहज ओघानें आलेलें हें उपासनारहस्य येथें अल्पांशानें दिलें आहे.

११. आणखी थोडें वैशिष्ट्य — (१) लक्ष्मणानें स्वतःविषयीं कधीं कांहींहि व कसलाहि अन्य विचार केला नाहीं. रामसंगतींत राहून निर्विकार मनानें रामसेवा व रामेच्छापूर्ति करणें व रामास सुखी करणें याशिवाय लक्ष्मणास कांहीं माहीत नाहीं.

(२) श्रीराम जरी सहोदर बंधूप्रमाणें पितृमातृतुल्य वात्सल्यानें लक्ष्मणाशीं वागत असले तरी लक्ष्मण स्वतःस रामसेवक, रामानुगच समजतात.

क्षात्र जाति रघुकुलजनन रामानुग म्हणतात । (२।२२९)

त्यास वधुन जर आज न येइन । रघुपतिसेवक कधीं न म्हणविन । (६।७५।१३)

असें लक्ष्मणच म्हणाले आहेत.

(३) लक्ष्मणाच्या एवढा त्याग रघुवंशी पुरुषांत रघुपति राम, भरत किंवा इतर कोणींहि केला नाहीं. उर्मिलेच्या त्यागाची तर कल्पनाच करणें अशक्य !

(४) ज्ञानभक्तिवैराग्यादि प्रश्न विचारण्यांतसुद्धां हेतु हाच ' करिन तजुनि सब पदरजसेवा ' असें उपक्रमांत म्हटलें आणि ' जेणें पदरति उद्भवे ' असें उपसंहारांत सांगितलें (३।१४।७ व दोहा). ' प्रभुभावेंचि होय पुसता मी ' प्रभु समजूनच प्रश्न

विचारले, बंधु समजून नव्हे.

(५) विवाहापूर्वी व विवाहानंतरसुद्धां श्रीरामपादसेवनभक्ति प्रत्यक्ष करूनच लक्ष्मण रात्रीं विश्रांति घेत हें मानसांत बालकांडांतच दाखविलें आहे. वनवासांतील काळांत तर १२ वर्षें आहार व निद्राहि नाहीं !

(६) श्रीरामप्रेमभक्तींत लक्ष्मण भरतापेक्षां एक रेसभरसुद्धां कमी नाहींतच उलट कांकणभर जास्तच आहेत; कारण एकाच प्रसंगांत अष्टसात्त्विक भावांपैकीं मूर्छेशिवाय शेष सात सात्त्विकभाव मानसांत केवळ लक्ष्मणाच्या ठिकाणींच प्रगट झाले आहेत हें अयोध्या. ७०।१ पासून पुढील टीकेंत स्पष्ट केलेलें दिसेल. लक्ष्मणाच्या प्रेमाला वाचा फुटली नाहीं आणि बहुजनसमाजांत प्रगट होण्याचा योगच आला नाहीं. भरताचें याच्या उलट घडलें !

याप्रमाणें मानसांतील श्रीरामसेवामूर्ति लक्ष्मणाच्या चरित्राचें रहस्य व वैशिष्ट्य थोडक्यांत यथामति मानसाधारेंच निवेदन केलें गेलें.

असा अनन्य रामसेवामूर्ति पुत्र जिला झाला त्या सुमित्रादेवीचें चरित्र पुढील प्रकरणांत आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।५ 卐 卐 卐

गूढप्रेमी श्रीसुमित्रा देवी

श्रीरामचरित-मानसांतील सुमित्रा सत्त्वगुणप्रधान रजोगुणी आहे. तीसुद्धां कोसल्ये-सारखी ज्ञानी रामभक्त असून श्रीराम परमात्मा भगवान आहेत हें ती जाणते. सुमित्रेला विश्वरूप दाखविलेलें नसतां किंवा कोणा सांगितलें नसतां हें रहस्यज्ञान केवळ रामकृपेनेंच झालें असें मानणें भाग आहे.

तुमच्या कृपें तुम्हां रघुनन्दन । जाणति भक्त...॥ (२।१२७।४)

सुमित्रा ज्ञानी व रामप्रेमभक्तिमती आहे हें कळणेंसुद्धां फार कठिण आहे. ती फार उत्सवप्रिय व प्रवृत्तिपर असून प्रवृत्तींत रंगलेली दिसते; म्हणूनच वर 'गूढ प्रेमी' असें म्हटलें.

(१) **प्रवृत्तिपर सुमित्रा** — श्रीराम विवाह करून परत येत असल्याचें कळतांच—

रामदर्शना अति अनुरागें । जी ती औक्षण सजवूं लागे ॥ २ ॥

विविधावाद्यें वाजुं लागलीं । मुदित सुमित्रें मंगल सजलीं ॥ ३ ॥

मंगलवस्तु जमविण्यांत प्रथम पुढाकार सुमित्रेनें घेतला. मग इतर

राण्यांनीं सब मंगल सजिलें ॥ (१।३४८।२-८ पाहा.)

(क) रामराज्याभिषेकाची बातमी कळतांच,

रांगोळ्यांस सुमित्रा बहु भरि । अति सुंदर मणिमय नानापरि ॥

सुमित्रेनेंच नानापरीचे रांगोळ्यांचे अति सुंदर चौक भरले.

(२) **ज्ञानी सुमित्रा** —चित्रकूटास जनकपट्टराणी सुनयना येऊन भेटल्यानंतर जेव्हां सुनयना म्हणाली कीं,

‘ विधिगति कुटिला । क्षीरफेन पळिवणेंच कुटिला ।।
कानिं सुधा, दिसतें गरळ करणी सकल कराल
काक घुबड बक चहुंकडे मानासिं सकृत मराल ’ ।। (२।२८१

तेव्हां **‘ शोकें वदली देवि समित्रा । विधिगति अति विपरीत विचित्रा ।।**
जो सृजि पाळी मग करि होळी । बालकेलिसम विधिमति भोळी ।।

जनकासारख्या ब्रह्मनिष्ठाच्या पट्टराणीनें म्हटलें कीं विधिमति कुटिल आहे आणि सर्व करणी कराल आहे. हें म्हणणें सुमित्रेला मानवलें नाहीं; ती विधिमतीला भोळी, बालकांच्या बुद्धीसारखी क्रीडाप्रिय म्हणाली व त्याच्या कृतीला बालकेलि = बाललीला = निर्हेतुक खेळ म्हणाली. **यांत ज्ञानी पण प्रवृत्तिपर माणसाची जागतिक घडामोडींकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टि दिसली.**

(३) **प्रसंगावधानी व व्यवहारदक्ष सुमित्रा** — सुनयना-कौसल्या संवादांत कौसल्येचें भरताच्या गूढ प्रीतिविषयींचें वगैरे भाषण

‘ ऐकुनि मग्न करुणरसिं राण्या । ’ (२।२८४।५) यांत सुमित्रा होतीच; परंतु
धरुनि सुमित्रा धीर वदतसे । ...
देवि नाडियुग यामिनी टळली । प्रेमें राममाय तैं उठली ।।

मुनि योगी सिद्ध इत्यादि स्नेहानें शिथिल झालेले असतां आणि सर्व राण्या शोकांत बुडालेल्या असतां सुमित्रेनेंच धीर धरून कौसल्येला सूचना दिली कीं देवि ! दोन घटका रात्र उलटून गेली; तेव्हां कौसल्याच उठून उभी राहिली.

(क) कोणाच्या मरणानंतर शोक समाचार घेण्यास कोणी येतात तेव्हां, येणारांनीं स्वतः उठून जावयाचें नसतें; ज्यांच्याकडे बसण्यास आले असतील ती व्यक्ति निरोप देण्यास उठली म्हणजे मग आलेल्यांनीं उठून निरोप घेऊन जाण्याचा शिष्टाचार तिकडे आहे. हा शिष्टाचार ध्यानांत घेऊन व प्रेमाचे आणि शोकाचे सागर असेच उचंबळत राहणार असें पाहून व्यवहारदक्ष, समयज्ञ, प्रसंगावधानी सुमित्रेनें अति विनयानें कौसल्येला सुचविलें.

(४) रामभक्ति व रामरहस्यज्ञान सुमित्रेच्या ठिकाणीं उत्तम प्रकारें आहेत; पण तिनें यांना व्यावहारिक प्रवृत्तींत अशीं लपविलीं आहेत कीं प्रत्यक्ष सुमित्रातनयास लक्ष्मणासहि तिच्या हृदयाचा ठाव लागलेला नाहीं.

(क) मातेची आज्ञा घेऊन या आणि वनांत बरोबर चला अशी रामानुज्ञा लक्ष्मणास मिळतांच लक्ष्मण सुमित्रेकडे गेले; पण ‘ मन रघुनन्दन जानकिपासीं ’; त्यामुळें मुख उदास दिसत होतें. तें पाहून सुमित्रेनें कारण विचारलें, तेव्हां लक्ष्मणानें सर्व वृत्तांत निवेदन केला.

' घाबरली वच कठोर परिसुनि । मृगी जणूं दब चौदिशीं निरखुनि ।।
सुमित्रेची ही दशा पाहून सौमित्रीस

' रामे, अनर्थ किं होइल आज । स्नेहविवश ही करिल अकाज ।।
आज्ञा घेण्या सभय, धजेना । 'जा वनि सवें' म्हणे, किं म्हणे 'ना' ।। (२।७३।१-८पाहा.)
ही (-सुमित्रा) स्नेहाला वश होऊन अकार्य करणार असें रामानुजास वाटलें ! यामुळें घाबरून, आज्ञा मागण्यास धीरच होईना; कारण रामाबरोबर वनांत जा म्हणेल कीं जाऊं नको म्हणेल याची खात्री वाटेना.

(ख) लक्ष्मणाच्या या शब्दांनीं व भावनेनें स्पष्ट दाखविलें कीं सुमित्रेचें रामाविषयींचें ज्ञान आणि तिची रामभक्ति यांचें ज्ञान लक्ष्मणाला काडीमात्र नाहीं. जी स्थिति जनकराज विदेहाची वर्णिली आहे तीच येथें सुमित्राचरित्रांत दाखविली आहे. **' गूढ रामपदिं करि जो स्नेहा '** ।। आणि **' योग ठेविला भोगीं लपवुनि '** । (१।१७।१-२) जनकाचा गूढ रामस्नेह व भोगांत लपवलेला योग (ज्ञान) ' प्रगट सपदिं तो रामा निरखुनि ।। तसेंच सुमित्रेचें रामप्रेम, ज्ञान, आणि रामरहस्यज्ञान या लक्ष्मणभेटींत प्रगट होत आहे. लक्ष्मणाच्या अनुमानांच्या अगदीं उलटा अनुभव येत आहे.

(ग) लक्ष्मणानें सांगितलेली रामवनवासाची कठोर वार्ता ऐकून घाबरलेली

स्मरुनि सुमित्रा रामसिता रूप सुशील सुभाव ।
नृपस्नेह, मस्तक पिटि, पापिण साधी डाव ।। (२।७३)

कैकयीचें नांव न घेतां **' पापिण साधी डाव '** असें तिच्याविषयीं म्हणाली; यानंतर केव्हांही सुमित्रा कैकयीविषयीं कांहीं बोलली नाहीं. पहिल्या शोकाच्या उमाळ्यांत वैधव्याच्या असह्य कल्पनेनें हें वाक्य बाहेर पडलेंच. ' साधी डाव ' हे दोनच शब्द, पण त्यांनीं कैकयीच्या पूर्वचरित्राचें काळें चित्र दाखविलेंच, सत्त्वगुणांत मिसळलेल्या जराशा रजोगुणाचें हें प्रदर्शन आहे; तथापि–

कुसमय जाणुनि धैर्या धरते । *सहज सुहृद* **मृदु वचना वदते ।।**

' सहज सुहृद ' शब्दांनीं जणूं सुमित्रा नांवाची व्याख्या सांगून सार्थकता सिद्ध केली. लक्ष्मणास वाटलें कीं ' ही करिल अकाज ' पण सहज सुहृद कधीं अकार्य व हानि करील हें शक्य आहे काय ? **सर्वांबरोबर सहज सुहृदासारखी वागत असे.** ती म्हणाली,

' बाळ ! तुझी माता वैदेही । पिता राम सर्वस्वी स्नेहीं ।।
अवध तिथें जिथें रामनिवास । तिथें दिवस जिथं रविप्रकाश ।।
सिताराम जर जाति वनाही । अयोध्येंत तव काजच नाहीं ।।
गुरुपितरौ स्वामी सुर बांधव । प्राणांसम सब सेव्याचि वास्तव ।।
परंतु *जीवन जीवा प्राणांप्रियही । सकल सखा निःस्वार्थि रामही ।।*
पूजनीय जे प्रिय जगिं जितके । मान्य रामनात्यानें तितके ।।
हें जाणुनि वनिं संगें जा हो । घे बाळा ! जगिं जीवन लाहो ।। ८ ।।

तिरच्या अक्षरांतील तीन चौपायांत स्पष्टच दाखविलें कीं सर्वव्यापी चैतन्य सच्चिदानंद-घन जें ब्रह्म तेच राम आहेत. (गूढार्थचंद्रिका पाहा.) आणखी सांगते कीं,

' पुत्रवती युवती जागीं तीच किं । रघुपतिभक्त जिचा सुत होत किं ॥
न तरि वांझ बरि विते वृथां ते । रामविमुख सुत *मानि हितातें* ॥ २ ॥

रामविमुख शब्द मागें घेतला कीं कैकयीवर आघात आहे; पण हा कवीच्या भावनेंतला आहे; सुमित्रेच्या नाहीं. जी रामविमुख होऊन सुतहितातें मानी, पुत्रास हितकर्ता समजते, ती वृथा विते.

केवढें विशाल हृदय ! आपल्या ज्येष्ठ व सर्वलक्षणसंपन्न पुत्रास त्यानें वनगमनाची आज्ञा मागण्यापूर्वीच स्वतःच सांगते कीं, रामाबरोबर वनांत जा, आणि कामक्रोधादि समस्त विकार सोडून अशी सेवा कर कीं सीतारामांस घरची आठवणसुद्धां होऊं नये.

' सकल-सुकृत-फल हें अति नामी । स्नेह सहज वर सीतारामीं ॥ '

हा सिद्धान्तसुद्धां सुमित्रेनें सांगितला. सुमित्रा पूर्ण निर्मोह, निर्भय, पूर्ण ज्ञानी व परम भक्तिमती, जितेंद्रिय आणि मनःसंयमी आहे म्हणूनच अशा दुर्धर प्रसंगीं, अत्यंत धीरानें, उत्साहानें, ओजानें, न्यायघटित व सोपपत्तिक असा परम दिव्य उपदेश करतां आला. तिच्या अंतरींची अशी स्थिति असून तिच्या वडील मुलालासुद्धां थांगपत्ता नाहीं ! ' यथा नाम तथा गुणाः ' **सुमित्रा सु-मित्रा आहे.** मातृप्रेम कोठेंच उसळलें नाहीं; परंतु भावी वैधव्याच्या दुःसह कल्पनेनें तिच्या स्त्रीत्वानें आणि रामविरहाच्या भीतीनें रामप्रेमानें प्रथम उसळी मारली तेवढीच. जनकराजा विदेही विख्यात ब्रह्मनिष्ठ-सुद्धां रामवनवासाच्या वार्तेनें सुमित्रेपेक्षांहि व्याकुळ झाले आहेत !

ज्ञानाचा लख्ख सूर्यप्रकाश, रामभक्तीचा पूर्णचंद्रप्रकाश आणि आदर्श जननीच्या कर्तव्याचा प्रखर अग्निप्रकाश सुमित्रेच्या अल्पशा चरित्रांत या वेळीं बाहेर पडला. प्रवृत्तिपरतारूपी धुक्यांत लपलेला सुमित्रेचा ज्ञानभानु, आणि व्यवहारतत्परता-मेघपटलानें झांकाळलेली भक्तिराकाचंद्रिका रामवनगमनाच्या वियोगतापानें व पुत्रोपदेशाच्या प्रबल प्रभंजनानें सहज दृग्गोचर होऊन त्यांनीं सुमित्रा कीर्तिसुधा सहज उपलब्ध केली !

लक्ष्मणासारख्या अनुपम रामसेवामूर्ति रामबंधूची जननी इतर रामायणांत अशी आहे कीं नाहीं याचा शोध वाचकांनीं मुद्दाम घ्यावा. अवतरणें देऊन तोलून दाखविण्याचें हें स्थान नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।६ 卐 卐 卐

रामसखा निषादराज

श्रीरामसेवेची सजीवमूर्ति लक्ष्मण ज्याचे गुरु त्या निषादराज गुहाचें मानसांतील चरित्र थोडक्यांत पाहूं.

'यथा गुरुस्तथा शिष्यः।' असें निषादराजचरित्राचें सार थोडक्यांत सांगतां येतें. जो भेद दिसतो तो एक (गुरु) रामसंगतींत व प्रपंचोपाधिरहित; आणि एक (शिष्य) रामापासून रामाज्ञेनें दूर आणि राज्याची उपाधि असलेला यामुळें आहे.

तो पूर्वीपासूनच रामसखा असावा असें मानसांतील उल्लेखांवरून ठरतें. श्रीरघुनाथ त्यास सखा मानीत असून तो स्वतःस खरा रामसेवक समजतो. तो सुग्रीवाप्रमाणें रामसेवक स्वस्थ बसला नाहीं. अगदीं पूर्ण निर्लोभ, निःस्वार्थ व निरहंकारी वृत्तीनें त्यानें रामसेवा केली, व अशा सेवेनेंच तो आपणांस धन्य मानतो.

श्रीराम परमात्मा भगवान आहेत हें रहस्य पूर्वी त्यास माहीत नव्हतें; पण श्रीरामाच्या गुप्त प्रेरणेनें लक्ष्मणास स्फूर्ति होऊन लक्ष्मणानें जो उपदेश केला त्यानें त्यास हें मर्म समजलें व उमजलें; आणि तो रामप्रेमाची सजीव मूर्तीच बनला. ज्यानें एकदां केलेल्या उपदेशानें गुह रामप्रेममूर्ति बनला तो लक्ष्मण रामस्नेहाचा सजीव पुतळा नव्हता असें कोण म्हणेल ?

१४ वर्षे रघुनाथाबरोबर राहून सेवा करावी अशी त्याची प्रबल लालसा होती व त्यानें प्रदर्शितहि केली पण 'रामाज्ञाच शिरीं सर्वां'चे असल्यामुळें तो लाभ त्याला फक्त दोन दिवसच मिळाला; यमुनातीरावरून परतावें लागलें.

(१) **निषादराज म्हणजे दुसरा लक्ष्मणच** असें सर्व अयोध्याजनांस वाटलें.

करत दण्डवत बघुनि त्या भरत घेति हृदयासि ।
लक्ष्मण–भेटचि होइ जणुं **मन न पुरे प्रेमासि** ॥ (२।१९३)

असा भरतास वाटला.

' नाम निषाद सुवचनीं सांगत । *राण्यांना* **सादर जोहारत ॥**
आशिस *देति गणुनि समलक्ष्मण* । (१९६।४-१)
पुरनरनारी *गुहा न्यहाळुनि । सुखी होति जणुं लक्ष्मण पाहुनि* ॥ (१९६।६)

(२) **श्रीरामप्रेममूर्ति गुह**—निषादराजानें चित्रकूटास वसिष्ठांस वंदन केलें तेव्हां,

पुलकित नाविक नांवा वदला । दुरुन दंडवत् प्रणाम केला ॥ ५ ॥
रामसख्या ऋषि बळें भेटले । प्रेम लुठत महिं जणुं आवरलें ॥ (२४३।६)

निषादराज अस्पृश्य जातीचा असल्यानें, श्रीराम व भरत हे जरी त्यास कडकडून भेटले होते, तरी तो समाजांत मिसळत नसे; म्हणून आपली छाया वसिष्ठांच्या अंगावर पडणार नाहीं इतक्या दुरून त्यानें दण्डवत प्रणाम केला. वसिष्ठ त्यास उचलून

घेऊन प्रेमानें भेटण्याचा प्रयत्न करूं लागले तेव्हां त्यांनीं आपणांस शिवूं नये या हेतूनें तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला; यालाच 'प्रेम लुठत महिं जणुं' राम-प्रेमच महीवर गडबडां लोळत होतें असें म्हटलें व तें वसिष्ठांनीं आवरून = गोळा करून घेतलें !

(३) **रघुनाथासाठीं मरण्याची तयारी केली** — फार मोठ्या चतुरंगिणी सेनेसह भरत येत आहेत ही बातमी कळतांच, भरताच्या हेतूंविषयीं त्यास संशय आला, व त्यानें आपलें सर्व सैन्य जमवून युद्धाची जय्यत तयारी केली. प्राण कुडींत असेपर्यंत भरतास व त्याच्या सैन्यास गंगा उतरूं द्यावयाची नाहीं; रामकार्यासाठीं रामशत्रूशीं लढून मरावयाचें असा निश्चय सर्वांनीं केला व रणढोल पिटणार तोंच डाव्या बाजूला कोणी तरी शिंकलें. या शिंकाशकुनाचा विचार होऊन भरताची परीक्षा पाहण्यासाठीं जो गुह गेला तो भरताचा सेवक बनला ! भरताच्या बरोबर आपल्या पुष्कळ सैनि-कांसह गेला व भरताची सर्व प्रकारें उत्तम सेवा केली.

(क) वाल्मीकि रामायणांत त्रिकालज्ञ, सर्वज्ञ, सर्वसमर्थ, भरद्वाज मुनींनासुद्धां भरताच्या हेतूंविषयीं शंका आली आहे ! गुह तर राजा, रामसेवक, शूरवीर ! त्यास शंका येऊन तो युद्धाची तयारी करील यांत नवल काय ? या प्रकरणांतील गुहाचीं एक-दोन वचनें पाहा—

'भरतासवें लढूं रणरंगा । जगतां उतरुं न देणें गंगा ॥
रणीं मरण, वरि गंगातीरहि ।– रामकाजिं, पळभंगु शरीरहि ॥
मी जन नीच भरत नृप भाऊ । असें मरण बहुभाग्यें पाऊं ॥
स्वामिकाजिं रण घोर करीनाहि । **चौदा भवनं यशें धवळीनहि ॥**
प्राणां अर्पिन रघुनाथास्तव । **मुदमोदक मन दो हातां तंव ॥**
ज्याची साधुसमाजिं न गणना । स्थान रामभक्तांत ज्यास ना ॥
वृथा जगे जगिं तो भूभारू । जननी यौवन-विटप कुठारू' ॥

मानसांतलि हें प्रकरण मोठें आहे तें प्रत्यक्षच पाहावें (२।१९०।२ – २०३).

(४) **गुप्तपणें रामदर्शन** — श्रीरामसेवेंत राहतां आलें नाहीं तरी रामसखा गुप्तपणें मधूनमधून चित्रकूटास जाऊन रामदर्शन घेऊन परत येत असे, असें मानसांतील उल्लेखांवरून ठरतें. गूढार्थचंद्रिकेंत सिद्ध केलें आहे. तुलसीदासांच्या इतर ग्रंथांतील उल्लेख स्पष्टच सांगतात कीं, रघुवीरांचा कुशल समाचार निषादराज भरतास अयोध्येंत कळवीत असे. गूढार्थचंद्रिकेंत पदें देऊन अर्थ स्पष्ट केला आहे.

(५) **मानसांतील रामसखा गुह** — देशकाल परिस्थितिज्ञ, प्रसंगावधानी, व्यव-हारनिपुण, प्रजावत्सल, राजनीतिज्ञ, शकुनादिशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रवेत्ता, निष्काम, निर-हंकारी रामसेवक आहे.

(क) श्रीराम त्यास एकंदर तीन वेळां भेटले (गळ्यांत गळा घालून) **प्रथम**

भेटींत त्यास जवळ बसविलें आहे, त्यानें दिलेलीं कंदमूलफलें प्रभूंनीं भक्षण केलीं आहेत. माझ्या पुरांत प्रवेश करावा अशी प्रार्थना त्यानें प्रथम भेटीनंतर श्रीरघुनाथास केली आहे. दुसरें आलिंगन त्यास चित्रकूटास व लंकेंतून परत येतांना विमान मुद्दाम गंगातीरावर उतरवून त्यास परम प्रेमानें कडकडून भेटले व परमसमीप बसविलें आहे. हें भाग्य सुग्रीवास लाभलें नाहीं !

(ख) निषादराजानें कोणतेंहि मागणें रघुनाथाजवळ मागितलें नाहीं; तो कोण-त्याहि प्रकारें रघुनाथाचा ऋणी नाहीं; उपकृत नाहीं; तरीसुद्धां त्यानें अनन्य भावानें, परम लीनतेनें, सहज स्नेहानें सेवा केली आहे.

(ग) सुग्रीव आणि बिभीषण हे दोन रामसखे आहेत व शरणागत असून रघु-वीराचे अत्यंत ऋणी आहेत, पण त्यांनीं या गुहासारखी रामसेवा केली नाहीं. सुग्रीव तर फारच मागें पडतो ! त्याचें प्रेमही निषादराजाच्या तोडीचें नाहीं.

(घ) गुह रघुवीराबरोबर पुष्पकांतून अयोध्येस गेला असें अनुमानानें ठरतें; अयोध्येंत गेल्यावर तो निराळ्या जागेंत राहिला आहे. तेथें कोणी त्यास भेटल्याचा उल्लेख नाहीं. सुग्रीवादिकांना निरोप दिल्यानंतर गुहास एकट्यालाच बोलावून घेऊन भूषणें, वस्त्रें व प्रसाद दिला आहे, परंतु त्यास निरोप देतांना श्रीरघुनाथ आलिंगन देऊन स्पर्श करून भेटले नाहींत; परंतु त्यासच सांगितलें कीं,

‘ निजभवना जा स्मरण मम करा । *मनकृतिवचनें धर्म अनुसरा* ’ ॥

ल. ठे. — ‘ मनकृतिवचनें धर्म अनुसरा ’ असें सुग्रीवादिकांस सांगितलें नाहीं, भावार्थ हा कीं वनवासकाळीं व प्रवासांत असतां मी, भरत व गुरुमहाराज तुम्हांस आलिंगन देऊन भेटलों असलों तरी तुमचा जो जन्मतः धर्म आहे त्याचेंच मनानें, वाणीनें व कृतीनें पालन करा. आतां माझी अस्पृश्यता गेली असें मनांतसुद्धां आणूं नका. इ. इ.

वि. ल. ठे. — जें आणखी कोणास सांगितलें नाहीं तें फक्त गुहालाच सांगितलें आहे. **‘ सखे ! बंधु मम तुम्हि सम भरतहि ।** *येत जात जा नगरीं सततहि* ’ ॥ (७।२०।३) हें त्याच्या सेवेचें व विशेष प्रेमाचें बक्षीस त्यालाच फक्त मिळालें आहे. प्रथम सांगित-लेल्या गोष्टीबद्दल त्याला मुळींच विषाद वाटला नाहीं.

श्रवत वचन उपजे सुख भारी । पायां पडे नयनिं बहु वारी ॥ ४ ॥
चरणनलिन हृदिं धरि ये भवना । प्रभूस्वभावा वदे परिजनां ॥ (७।२०।५)

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।७ 卐 卐 卐

कपिराजा सुग्रीव

सुग्रीवाची भेट झाली व पावकसाक्षिक सख्य झालें. सुग्रीवास सांपडलेलें सीतेचें वस्त्र त्यानें रघुनाथास दाखविलें तेव्हां राम फार शोकाकुल झालेले पाहून सुग्रीव म्हणाला,

' त्यजा शोकं मनिं धरा सुधीर ॥

करिन सुसेवा सर्व तऱ्हेनें । येउनि भेटे जानकि जेणें ॥ (४।५।७-८)

नंतर सुग्रीवाची सर्व हकीकत त्याच्या मुखानें ऐकल्यावर आणि॰ तो वालीला शत्रु मानीत असून त्याचा वध करणें जरूर आहे असें ठरल्यानंतर रघुवीरानें वालिवधाची प्रतिज्ञा केली.

नंतर सुग्रीवास रामचरणस्पर्शानें आत्मज्ञान होऊन तो वैराग्याची भाषा बोलूं लागला; पण रघुवीराची प्रतिज्ञा मिथ्या होणें अशक्य असल्यामुळें वालीचा वध करून त्यास रामधामीं धाडलें; तारेला आत्मज्ञान व भक्ति दिली व सुग्रीवास राज्याभिषेक करवून अंगदास युवराज करविलें.

याप्रमाणें ' पावे राज्य, कोष, पुर, नारी ' असें झाल्यावर सुग्रीव रामदर्शनाससुद्धां आला नाहीं. बिभीषण असा कृतघ्न झाला नाहीं. नंतर श्रीरघुवीरानें सुग्रीवास बोलावून घेतलें तेव्हां (पावसाळ्याच्या आधीं) तो आला; पण त्यानें साधा नमस्कारहि केला नाहीं. सखा जाणून रघुनाथानें नानाविध नीति शिकविली पण तो नुसतें ' हुं ' सुद्धां म्हणाला नाहीं. ' चातुर्मास जवळच पर्वतावर राहतों ' असें राम म्हणाले तरी सुग्रीवानें एक शब्दसुद्धां उच्चारला नाहीं! बिभीषण राक्षस असून राज्याभिषेक झाल्यावर दर्शनास येऊन रामचरणांस वंदन केलें आहे; नंतर देव व शंकर स्तुति करून गेल्यावर बिभीषण पुन्हां आला व

पदिं शिर नमुनि वदति मृदुवाणीं । ......

अतां दासगृह पुनीत करणें । करुनी स्नान रणश्रम हरणें ॥

बघुनि कोष मंदिर संपदा । द्यावि कृपाल कपींना मुदा ॥ इ. (६।११६।१-७ पाहा.)

हें सुग्रीवाचें वर्तन रामसेवक किंवा रामसखा या नांवास साजणारें नसून राज्यहीन वनवासी रघुवीराकडे बोलावून आणलेला **कपिराजा या नात्याचें घडलें**! म्हणूनच शीर्षक रामसखा सुग्रीव असें न देतां ' कपिराजा सुग्रीव ' असें दिलें आहे.

पावसाळा संपून शरद ऋतु अर्धा गेला तरी सुग्रीवानें तोंड दाखविलें नाहीं.

रामकार्य सुग्रीव विसरला । विषय मदानें अंध जाहला ॥

पावकसाक्षिक विसरे सख्यहि । स्मरे न कृत उपकारां अल्पहि ॥ प्रज्ञा.॥

कोवळ्या ज्ञानवैराग्यभक्तीवर विषयांचा, विषयीजनांच्या संगतीचा व सत्तेचा किती भयंकर दुष्परिणाम होतो, व तें कोवळें वैराग्य स्मशानवैराग्य कसें ठरतें याचा सहज

ध्यानांत राहील असा नमुना येथवरच्या सुग्रीव चरित्रांत दाखविला आहे.

पुढें हनुमंताच्या सांगण्यानें सुग्रीव किंचित जागा झाला व लक्ष्मणाच्या दिखाऊ क्रोधानें त्याची पूर्वीची वृत्ति बदललीं असली तरी निषादराजाचा सेवाभाव, प्रेम आणि लीनता व बिभीषणाची सेवकवृत्ति, विनय व कृतज्ञता सुग्रीव चरित्रांत दिसत नाहींत.

(१) बिभीषण शरणागतीच्या वेळीं—(५।४३।४-५)

' श्रुणु *रघुराजा* ! वदला सुग्रिव । ये दशकंठ-बंधु भेटीस्तव ।।'

प्रभु वदले कीं *सखे* काय मत । ऐका *नरपति कपीश* सांगत ।।

सुग्रीवाला कपीश न म्हणतां सर्वांच्या देखत प्रभु सखे ! = सखा म्हणाले; हें सुग्रीवाला अपमानास्पद वाटलें म्हणून पूर्वी ' रघुराजा ! ' असें म्हणाला असतां कपीश पुन्हां बोलतांना ' नरपति !' (म्हणजे साधा कोणी तरी राजा) म्हणाला. ही गोष्ट रघुपतीच्या लक्षांत आली नाहीं असें नाहीं.

(२) सागरलंघनविचाराच्या वेळीं, प्रभु रघुनाथ म्हणाले (५।५०।५,७)

' श्रुणु *कपीश* ! वीरहि *लंकापति* । तरणें केविं गभीर अपांपति ।। '

यांत प्रभूंनीं सुग्रीवाला पाहिजे असलेला मोठेपणा मागील अनुभवावरून दिला; पण मागल्या वेळीं सुग्रीवाच्या मताप्रमाणें श्रीरघुनाथ वागले नाहींत म्हणून या वेळीं तो बोललाच नाहीं; तेव्हां बिभीषण आपलें मत कसें सांगतो पाहा,

' मग लंकेश वदे रघुनायक । कोटि सिंधु-शोषक तव सायक ' ।। ७ ।।

तरी नीतिचें असें सांगणें । इ०

बिभीषणानें रघुनायकाच्या अपार प्रतापाचें वणन आधीं केलें व मग आपलें मत सांगितलें. पूर्वी सुग्रीवानें असें कांहींच केलें नाहीं व तो रघुराजास केवळ ' नरपति 'च समजला.

सुग्रीवाची वृत्ति अशी कां झाली ? (१) सुग्रीव बिभीषणाप्रमाणें यथाविधि शरण आलेला नाहीं.

(२) बरोबरीच्या नात्यानें शास्त्रविधिपूर्वक सख्य जोडलें गेलें; व

(३) सीताशोध सुग्रीवाच्या सेवकांनीं लावला. या त्रयीचा संयुक्त परिणाम असा झाला कीं राज्य मिळाल्यानंतर सुग्रीव विसरला कीं रघुनाथ भगवान प्रभु आहेत; आणि मी कपीश हा अहंकार डोकावूं लागला व सन्मान प्रतिष्ठेची आवड उत्पन्न झाली.

तिसऱ्या वेळीं सचिवांना मत विचारलें तेव्हांहि सुग्रीव कांहीं बोलला नाहीं. पूर्वी बिभीषणानें दिलेलें मत चुकीचें ठरलें व प्रभूला तीन अहोरात्र वृथा कष्ट पडले हें जाणून बिभीषण मौन राहिला; तेव्हां सुग्रीव–सचिव वृद्ध ऋक्षपति—

' वदे जांबवान् वंदुनि पायां ।।

श्रुणु सर्वज्ञ सकल हृद्वासी । मतिबल तेज धर्म गुण-रासी ।।

मंत्र सांगतों मति–अनुसारां । (६।१७।२-३)

जांबवंत ऋक्षराजा असून सर्वांत अति वृद्ध आहे. त्याच्याच बुद्धिचातुर्यानें हनुमान सीताशोधास प्रवृत्त झाला, असें असतां व रघुनाथाचा ऋणी नसतां रघुनाथास वंदन करून, मत सांगण्यापूर्वी जी प्रस्तावना करतो तशी प्रस्तावना बिभीषणानेंहि केली नाहीं! वंदन करून मत सांगणें हें दोघांकडूनही घडलें नाहीं. अधिक विनयी व अधिक प्रेमी रामभक्त कोण हें आतां वाचकांनींच ठरवावें.

हें सर्व जाणूनच अयोध्येंत निरोप देतांना आहेर केले तेव्हां,

सुग्रीवाला प्रथम अर्पिलीं– । स्वकरें, भरतें तया घातलीं ॥

प्रभु-आज्ञें लक्ष्मण लंकेशा । अर्पिति... ॥ (७।१७।६-७)

जांबवंत नीलादिकां आहेरिति रघुनाथ । (७।१७।–)

प्रथम सुग्रीवाला रघुनाथानें आपल्या हातानें वस्त्रें भूषणें दिलीं, तीं भरतानें सुग्रीवाच्या अंगावर घातलीं. नंतर बिभीषणाला लक्ष्मणाकडून देवविलीं. आणि नंतर जांबवान नलनीलादिकांस आहेर दिले. ज्याला पहिला व बरोबरीचा मान पाहिजे त्याला तसा दिला. पहिला सखा निषादराज असून त्याला या दरबारांत बोलावलें सुद्धां नाहीं! तो खरा सेवक, अमानी, अत्यंत लीन आहे. त्याला मुळींच वाईट वाटणार नाहीं हें श्रीरघुनाथास माहीत होतें. ' राम सदा सेवक रुचि राखिलि । '

ल. ठे. — वारंवार येत जा असें या कोणालाच म्हणाले नाहींत. त्यांच्या गतीच्या दृष्टीनें ते रोजसुद्धां येऊं शकले असते. शंभर योजनांचा सागर जो सहज लीलेनें, मनोरथ करीत, अल्पावकाशांत ओलांडतो तो बिभीषण रोज सहज येऊं शकला असता. निषादराजास अयोध्येस येण्यास जेवढा वेळ लागला असता तेवढ्यांत सुग्रीव दोन-चार वेळां येऊन गेला असता.

सुग्रीवाला प्रभु प्रथम-भेटींत भेटले तेवढेच. त्याला जवळहि बसविलें नाहीं. बिभीषणास प्रथम भेटींत परम प्रेमानें भेटून जवळ बसविलें आहे. फलमूलादिक दोघांनाहि दिलीं नाहींत. निषादराजास तीन वेळां भेटले. पहिल्या वेळीं जवळ बसविलें व तिसऱ्या वेळीं परम प्रेमानें भेटून परम समीप बसविलें व शेवटीं सांगितलें कीं पुनःपुन्हां वारंवार येत जा. रामप्रेम अधिक कोणावर व कां हें आतां वाचकच ठरवतील.

बिभीषणाच्या चरित्राचें सार यांत आलें असल्यानें पुनरुक्ति नको. यापुढें रामभक्त कुंभकर्णाचें चरित्र आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।८ 卐 卐 卐

रामभक्त कुंभकर्ण

श्रीरामचरितमानसांतील कुंभकर्ण रामविरोधी नसून रामभक्त आहे. कुंभकर्णास जागें केलें तोंपर्यंत रावणाचें अर्धें अधिक सैन्य आणि मोठमोठे मुख्य वीर मारले गेले होते. लक्ष्मण मूर्छेतून जिवंत झाल्याचें कळल्यावर रावणानें कुंभकर्णास उठविलें आहे.

जागे निशिचर कैसा दिसला । काळ देह धरुनी जणुं बसला ॥ ७ ॥
कुंभकर्ण वदला कीं बाबा ! । गेलीं सुकुनि मुखें तव कां बा ? ॥ ८ ॥

तेव्हां रावणानें सीताहरणापासून सर्व हकीकत सांगितली.

' ऐकुनि दशकंधर वचन कुंभकर्ण सुम्लान ।
***चोरुनि** जगदंबे अतां शठ इच्छित कल्याण !' ॥ ६।६२ ॥*

असें मनांत म्हणाला; व रावणास सांगितलें कीं,

' कृत न बरें त्वा निशिचरराया । अतां जागवा कां मज वाया ॥ १ ॥
अझुन तात ! *सोडुनि अभिमाना । भजा राम पावा कल्याणा ॥ २ ॥*
मनुज किं दशशीर्षा ! रघुनायक । हनुमंतासम ज्याचे पाइक ॥ ३ ॥
हाय ! अनिष्ट बंधु ! आचरिलें । प्रथमाचि येउनि मज न कळविलें ? ॥ ४ ॥
प्रभु ! विरोध केला त्या देवा । शिव विधि सुर करती यत्सेवा ॥ ५ ॥
कथिलें ज्ञान नारदें मला । कथितों तुला समय लोटला ॥ ६ ॥
भेट अती कडकडून माला । जाउनि सुफल करिन नयनांला ॥ ७ ॥
श्यामगात्र सरसीरुह लोचन । जाउन बघतों त्रितापमोचन ॥ ८ ॥

दो०–रामरूप-गुण आठवित प्रेममग्न पळ एक ॥ ६३ ॥

नंतर अनेक महिष खाऊन आणि मद्याचे अनेक घट पोटांत रिचवून कुंभकर्ण एकटा निःशस्त्र युद्धासाठीं बाहेर पडला.

रणमदानें धुंद झालेला कुंभकर्ण लंकेंतून बाहेर पडून एकटाच येत असलेला पाहून बिभीषण समोर आला आणि पायांवर डोकें ठेवून त्यानें आपलें नांव सांगितलें तेव्हां (६४।४ पासून पुढें,)

अनुजा उठवुनि हृदयीं धरला । रघुपतिभक्त जाणुनी रुचला ॥ ४ ॥
' तात ! लाथ मज रावण मारी । वदतां मंत्र परम हितकारी ॥ ५ ॥
त्या दुःखें रघुपतिपदिं आलों । बघुनि दीन मी प्रभुमनिं रुचलों ' ॥ ६ ॥

तेव्हां कुंभकर्ण बिभीषणास म्हणाला,

' श्रुणु सुत असे कालवश रावण । मानि अतां किं परमहित-शिकवण ॥ ७ ॥
धन्य धन्य तूं धन्य बिभीषण । झालासी निशिचरकुलभूषण ॥ ८ ॥

बंधु वंश तूं केला भास्वर । भंजुनि राम शोभा-सुख-सागर ॥ ९ ॥
तनमनवचनें त्यजुनि छल भज हं ! राम रघुवीर ।
जा मज निज पर कळत ना मीहि कालवश वीर ! ॥ ६४ ॥

वरील अवतरणांत कुंभकर्णाचें रावणावरील निर्व्याज प्रेम, रामभक्ति, सगुणाच्या ध्यानाचा अभ्यास व नारदाच्या वचनावरील दृढ निष्ठा या गोष्टी सहज प्रतीत होतात !

आकंठ मद्यपान केल्यानंतरसुद्धां असंबद्ध भाषण मुळींच नाहीं. कालवश झाला असल्यानें व रावणाच्या प्रेमासाठींच तो श्रीरामाशीं युद्ध करण्यास निघाला. रावणाला जय मिळणार नाहीं कारण तो कालवश आहे व आपणही जगत नाहीं अशी त्याची खात्री असून कांहीं शस्त्र न घेतांच युद्धासाठीं निघाला. श्रीराम परमात्मा आहेत हें जाणूनच तो युद्धासाठीं बाहेर पडला.

कुंभकर्णानें हनुमंतासहित सर्व कपिवीरांना मूर्छित पाडलें आहे. मानसांतील कुंभकर्ण शस्त्रधारी नसून त्यानें असा पराक्रम गाजविला आहे कीं कपिसैन्य पुढें उभें राहीना; व युद्ध पाहणारे देवही भयभीत झाले आहेत. कुंभकर्ण खरा निधडा वीर आहे, व त्याचें बळ केवळ बाहुबळ आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४१९ 卐 卐 卐

आदर्श वैरी रावण

श्रीरामचरितमानसांतील रावण दुष्टपणांत इतर रावणांस हार न जाणाराच आहे. रावणकुंभकर्णादिकांच्या जन्मादिकाचें वर्णन मानसांत बालकाण्डांतच आहे.

(१) **वेद–पुराण-धर्मांचा उच्छेद** करण्याचा उपदेश, भर दरबारांत त्यानें आपल्या अगणित क्रूर घोर निशाचरांस केला. गाई, ब्राह्मण, मुनि, वेदपुराणपठण-कथन, यज्ञयाग इत्यादींचा विध्वंस करण्याची आज्ञाच त्यानें सर्व निशाचरांस दिली. यज्ञयागादि होत आहेत असें कळतांच,

छंद—**जप योग विरागहि तप मख भागहि कळती जैं दशशीसा ।**
तो धांवत येई, चालुं न देई सकलहि ने विध्वंसा ॥
आचार महितला भ्रष्ट जाहला ' धर्म 'हि ये ना कानां ।
त्यां विविधा त्रासवि विदेशि घालवि वदती वेदपुराणां ॥ (१।८३)

हें सर्व स्वर्गस्थ देवांना उपाशीं ठेवून शरण आणण्यासाठीं केलें.

(२) **रावणाचा गुप्त निश्चय** — खरदूषणांच्या वधाची वार्ता शूर्पणखेकडून कळल्यावर (अरण्य.)

चिंताकुल गेला गृहीं नीज निशिं न ये त्यास ॥ २२ ॥
सुर नर असुर नागविहगांमाधिं । सम मम अनुचर कुणि न जगामाधिं ॥
मजशा खर–दूषण बलवानां । कोण वधील विना भगवाना ॥
सुररंजन भंजनमहिभारा । जर भगवंतें धृत अवतारा ॥ ५ ॥
जाउन वैर हठें तर करतों । प्रभुशरिं प्राण तजुनि भव तरतों ॥
भजन घडे ना तामस तनुनें । मंत्राचि हा दृढ मन वच वपुनें ॥
जर नररूप भूपसुत कोणी । हरिन नारि जिंकुनि रणिं दोनी ॥

वैर करणाऱ्या या ठरविलेल्या पद्धतींत हरिमायेच्या प्रभावानें जरी बदल झाला असला तरी मनानें, कृतीनें व वाणीनें प्रभूशीं वैर करून प्रभूच्या बाणानें मरूनतरून जाण्याचा रावणाचा निश्चय मात्र बदलला नाहीं.

(३) मारीच, जटायु, हनुमान, बिभीषण, पुलस्त्यमुनि (निरोपानें) माल्यवंत, मंदोदरी, प्रहस्त, अंगद, लक्ष्मण, शुकहेर, कालनेमी आणि कुंभकर्ण या **तेरा जणांनीं मिळून** एकंदर **१८ वेळां उपदेश केला** व राम परमात्मा आहेत हें सांगून वैदेहिला परत देण्याविषयीं सांगितलें पण मंदोदरी व कुंभकर्ण यांशिवाय इतरांस अपमान, दंड, शिक्षा, तिरस्कार इत्यादि दक्षणा मिळाली. प्रत्येक वेळीं रावणाचा उपदेश दृढतर होत गेला आहे.

(क) रावणानें आपला हेतु अत्यंत गुप्त ठेवला; कोणासही पत्ता लागूं दिला नाहीं व वैराचा निश्चय इतका कसोशीनें पाळला आहे कीं राम-लक्ष्मण या शत्रूंच्या नामांचा त्यानें उच्चारसुद्धां केला नाहीं. तापस, नृपसुत अशा शब्दांनींच त्यांचा उल्लेख केला. त्याच्या कापलेल्या मुंडक्यांनीं राम शब्द उच्चारला तोसुद्धां वैरभावानें !

कुठें राम, रणि मारूं पुकारुनि ॥ (६।१०३।४).

(४) **रावणाचें सीतेशीं वर्तन** — मानसांतील रावणानें अशोकवनांत सीतेशीं जें भाषण केलें त्यांत त्यानें असभ्य भाषा मुळींच वापरली नाहीं; आत्मस्तुति व रामनिंदासुद्धां मुळींच केली नाहीं.

रावण म्हणे सुमुखि सुज्ञे श्रुणु । मंदोदरी आदि राज्ञीगणु ॥
तव अनुचरी करिन मम हा पण । *एकवार मजकडे पहा पण* ॥

यापेक्षां अधिक रावण कांहींच बोलला नाहीं. यांत असभ्यपणा वगैरे नाहीं.

(क) रावणानें सीतेला पळवून नेलें, पण यतिवेषानें नव्हें. यतिवेषानें जवळ गेला; पण जेव्हां सीता कांहीं बोलली तेव्हां त्यानें आपलें दशानन रूप प्रगट केलें व रावण नांव सांगितलें. सीता रावणास खल, दुष्ट इत्यादि म्हणाली तेव्हां,

श्रवुनि वचन दशशीस कोपला । मानें पद नमुनी मानि सुखाला ॥

सीता जगज्जननी आहे हें ओळखून रावणानें तिला मनांत वंदन केलें व उचलून रथांत घातलें. लंकेंत नेल्यावरसुद्धां

हरला तो खल बहुविधा प्रीति भीति दावून ।
मग अशोक-पादप-तळिं राखी यत्न करून ॥ (३।२९ रा)

श्रीरामाच्या बाणानें मरून तरून जाण्यासाठींच, रामवैराचें अत्यंत प्रबल साधन म्हणूनच रावणानें सीताहरण केलें. याच आशयाचे उल्लेख उपनिषद्, पद्मपुराण, अध्यात्म रामायण इत्यादि अनेक ग्रंथांत आहेत. गूढार्थचंद्रिका पाहा.

मानसांतील रावणानें एकदां आपल्या मायेनें अगणित रामलक्ष्मण, एकदां असंख्य रावण व एकदां विपुल हनुमान प्रगट केले. मायासीतेचा वध किंवा इतर तशा मायांचा उपयोग मानसांतील रावणानें केला नाहीं.

मानसांतील रावण एकदांसुद्धां युद्धांतून पळाला नाहीं; व बिभीषणाला बंधुद्रोही, कुलद्रोही म्हणाला नाहीं.

सुषेण वैद्याला लक्ष्मणासाठीं लंकेंतून घरासुद्धां नेलें व परत पोचविलें या गोष्टी रावणास माहीत असून त्यानें विरोध केला करविला नाहीं किंवा सुषेणाला दंड शिक्षा केली नाहीं !

केलेल्या निश्चयाप्रमाणें पुत्र, पत्नी, बंधू, मातामह, इत्यादींचासुद्धां विरोध सोसून यानें आपलें ध्येय गांठलें. आपण मुक्त होण्यापूर्वी सर्व राक्षसांना मोक्षसत्र उघडून दिलें. कुंभकर्ण झोंपून राहिला होता व कालनेमी लंकेंत नव्हता म्हणून त्यांनाहि मोक्ष मिळेल असा प्रयत्न केला व सर्वांना मुक्त करून मग आपण मुक्त झाला.

श्रीरघुनाथाचें नरचरित्र जसें अति गूढ व अज्ञजनविमोहक तसेंच किंवा त्याहूनही रावणाचें रामविरोधी राक्षसचरित्र अति गूढ व जनविमोहकच नव्हे तर हनुमंता-सारख्यांससुद्धां रहस्य कळलें नाहीं. रावणाच्या गुप्त हेतूचा पत्ता कोणालाहि लागला नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।१० 卐 卐 卐

वालितनय अंगद

वालीनें मरतांना अंगदास श्रीरघुपतीच्या पदरांत घातलें व त्यांनीं लक्ष्मणास सुचवून अंगदास युवराज करविलें; परंतु अंगदाचें चित्त निर्भय नव्हतें व त्याचें मन सुग्रीवाविषयीं शुद्ध नव्हतें, साशंक होतें.

(१) **रामदूत सागरतीरावर** पोचण्यापूर्वींच सुग्रीवानें दिलेली एक महिन्याची मुदत संपली होती आणि सीतेचा शोध लागणेंहि अशक्य वाटूं लागलें होतें. शोध न लावतां मुदतीनंतर परत येणाऱ्यांस सुग्रीवानें देहान्त शासन आधींच जाहीर केलें होतें; म्हणून सागरतीरावर गेल्यावर अंगद म्हणाला,

' लागे सीता शोध न येथें। कपिपति मारिल जातां तेथें ॥

तात वधोत्तर मजहि मारिता। रक्षिति राम, न तदुपकारिता॥ (४।२६।४–५) आपल्याला ठार मारण्याचें योग्य निमित्त सुग्रीव शोधीत आहे अशी अंगदाची समजूत झाली आहे.

(२) **चंद्रोदय वर्णनानंतर** — (लंका. ११ म पासून पुढें)

प्रभु वदले शशिमाधिं मेचकता। कसली सांगा तुम्ही निज मतां ॥

या प्रश्नाचें अंगदानें जें उत्तर दिलें त्यावरून स्पष्ट दिसतें कीं किष्किंधा राज्याचा सारभाग सुग्रीवाच्या वांट्यास गेला हें अंगदाच्या हृदयांत सलत आहे, म्हणजे गुप्त राज्यतृष्णा व सुग्रीवद्वेष गुप्त आहे.

(३) **हे दोष रामकृपेनें एकाएकीं नष्ट झाले.** जो अंगद संपातीला पाहून भयभीत झाला होता त्या

' वदति अंगदा कृपानिधान। वालितनय मतिबलगुणधामा। इत्यादि (६।१७।५–६) अंगदाला कृपानिधान प्रभूंनीं ' मतिबल गुणधाम ' म्हटल्याबरोबर त्याचा स्वभाव एकदम पालटला व त्यानें इंद्रजितासहित सर्व राक्षसांवर भर सभेंत लंकेंत विजय मिळविला. रावणाचे चार मुकुट मिळवून त्याच्यादेखत ते रघुवीराकडे झुगारले; रावणाची फट् फजीती करून त्यास तेजोहत व निःश्रीक करून रामकार्यांत पूर्ण यश मिळविलें व वालितनय हें नाम यथार्थ ठरलें.

(क) लंकेंतील युद्धांत हनुमान-अंगद, अंगद-हनुमान ही जोडी सर्वतोमुखीं झाली आहे.

(४) **रामकृपेनें अंगद परमार्थशिखर गांठतो** — रामकृपेनें अंगदांत किती फरक पडला व त्यानें दुसरें टोंक–परमार्थाचें शिखर–कसें गांठलें हें उत्तर दो. १७ पासून १८ पर्यंतच्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें. पूर्ण प्रेमभक्ति-संपन्न, पूर्ण निरिच्छ व परम विरागी बनला; व घरींसुद्धां न जातां सतत रामसेवेंतच राहावें अशी तळमळ लागली व त्यानें तसें बोलूनहि दाखविलें, कळवळून प्रार्थना केली; पण—

(५) **अंगदाची प्रार्थना निष्फळ ठरली,** व त्यास त्याच्या इच्छेविरुद्ध घरीं जावें लागलें. श्रीरघुनाथाचे पाय चेपण्याचें महाभाग्य अंगदास लंकेंतच लाभलें (६।११।७).

याप्रमाणें मानसांतील अंगदाचें चरित्र संक्षेपानें यथामति निवेदन केलें गेलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।११ 卐 卐 卐

श्रीवसिष्ठ गुरु

श्रीरामचरितमानसांतील वसिष्ठ केवळ कुलपुरोहित-कुलगुरु नसून दशरथ, राम आणि भरत यांचे सद्गुरु आहेत.

'शिष्यादिच्छेत् पराजयम्' हा भारतीय गुरुशिष्यसंबंधांतील आदर्श गुरु वसिष्ठ आणि शिष्य भरत यांच्या संवादांत पाहण्यास सांपडतो. भरताचें निर्दोष निष्कलंक शील, त्याचें परमोत्कृष्ट रामप्रेम व बंधुप्रेम लोकांच्या दृष्टीस पडून भरताविषयींचे गैरसमज दूर व्हावेत म्हणून वसिष्ठ सद्गुरूंनीं ज्या युक्त्या योजल्या त्यांतील मर्म ध्यानीं न आल्यामुळें असा भास उत्पन्न होतो कीं भरतानें वसिष्ठांच्या आज्ञेचा भंग केला, आणि भरतानें वसिष्ठास निरुत्तर केलें; परंतु अशी वस्तुस्थिति नाहीं हें सूक्ष्म अवलोकनानें किंवा गूढार्थचंद्रिकेंत पाहिल्यानें कळेल.

ब्रह्मर्षि वसिष्ठांच्या परम उदार, परम विशाल व पूर्ण निर्विकारी हृदयाचें फारच सुंदर चित्र मानसांत दोन–तीन ठिकाणीं दिसतें.

(क) निमिवंशाचा आद्य पुरुष निमि आणि त्याचे पुरोहित वसिष्ठ यांनीं परस्परांस शाप दिले होते. पण निमिवंशी जनक सीरध्वज (सीतापिता) यांच्या कन्येच्या (सीतेच्या) विवाहांतील वसिष्ठांची वृत्ति पाहिली म्हणजे दिसतें कीं पूर्वीची घटना त्यांच्या स्मृतींत राहिलेलीच नाहीं.

(ख) ज्या विश्वामित्रानें वसिष्ठांचे शंभर पुत्र मारले व वसिष्ठाशीं द्वाडवैर केलें, ते विश्वामित्र दशरथांजवळ रामलक्ष्मणांस मागण्यासाठीं आले असतां, आणि दशरथ देण्यास नाकबूल असतां व वाल्मीकि रामायणांत विश्वामित्रांप्रमाणें मानसांतील विश्वामित्र क्रुद्ध झालेले नसतां, वसिष्ठांनीं दशरथाची समजूत घातली.

(ग) रामविवाहानंतर वरातीबरोबर विश्वामित्र अयोध्येंत आलेले असतां, भर दरबारांत विश्वामित्राची महती वसिष्ठांनीं वर्णिली.

मुनिमन अगम्य गाधिजकरणी । मुदित वसिष्ठ विविधविधि वर्णी ।।
वामदेव बदले सब साचें । कलित कीर्ति लोकत्रयिं साचें ।। (१।३५९।३–८ पाहा).

विश्वामित्रांच्या मुखावर वसिष्ठांनीं केलेली ही त्यांची प्रशंसा ऐकून सव लोकांस आनंद झाला व रामलक्ष्मणांस विशेष झाला; परंतु दशरथांस विशेष आनंद झाला नाहीं; कारण मुखावर केलेल्या प्रशंसेंत कृत्रिमता, दिखाऊपणा असूं शकतात; पण विश्वामित्र गेल्यावरसुद्धां,

वामदेव कुलगुरुहीं ज्ञानी । वानिति गाधिज–कथा स्ववाणीं ।।
मुनियश परिसुनि राव निजमनीं । अपला पुण्यप्रभाव वर्णी ।।

वसिष्ठांनीं आपल्या मुखानें विश्वामित्राची प्रशंसा केली, तेव्हां मात्र दशरथांस विशेष

आनंद झाला.

'तुलसीशासन पद्धति' या प्रकरणांत आणि 'विविध स्फुट विषय' या प्रकरणांत 'यथाधिकार व्यवहार' यांत वसिष्ठांचें आणखी वशिष्ट्य पाहावें व उत्तर. दो. ४८—४९ यांत वसिष्ठांनीं केलेली रामस्तुति पाहावी. वसिष्ठही परम अनन्य रामभक्त आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।१२ 卐 卐 卐

रामप्रेममूर्ति भरत

श्रीभरतचरित्र मानसांत मुख्यतः अयोध्याकाण्डांत आहे. अयोध्याकाण्ड उत्तरार्धास 'भरतचरित' म्हटलें असून त्याची फलश्रुतिच अयोध्याकांडाची फलश्रुति आहे. या कांडांत श्रीरामचरित आणि भरतचरितविस्तार जवळजवळ समसमान आहे. मानसांतील भरतचरित्र फारच अनुपम असून रामभक्तिपथानुयायांस अनुकरण्यास त्याच्यासारखें परमोच्च आदर्श चरित्र दुसरें नाहीं आणि अन्य कोणत्याहि रामायणांत असें भरतचरित्र नाहीं.

वेगें जिनें द्रवें मी *भाइ* । ती मम भक्ति भक्त सुखदाई ॥ (३।१६।२)
अशी मानसभक्तिसूत्रांतील भक्तीची व्याख्या आहे. नारदभक्तिसूत्रांत भक्तीची व्याख्या दिल्यानंतर दृष्टान्त 'यथा व्रजगोपिकानाम्' असा दिला, मानसभक्तिसूत्रांत 'यथा भरतस्य' असा दृष्टान्त द्यावा लागेल. अशा भक्ताच्या विस्तृत चरित्राचें नुसतें सार द्यावयाचें म्हटलें तरी पुष्कळच विस्तार करावा लागेल; म्हणून अगदीं संक्षेपानें कांहीं स्फुट वचनेंच देणें भाग आहे.

१. भरताचें रामप्रेम — (१) '**कोण जगीं प्रिय सम भरता ही**'। (२।७।७) असें वनवासापूर्वींच राम म्हणाले आहेत.

(२) '**प्राणां प्राणचि राम तूजला । प्रिय तूं प्राणांहुनि रघुपतिला**' ॥ (२।१६१।१) असें कौसल्या म्हणाली.

(३) **साक्षात् *रामप्रेम–मूर्ति* ही** ॥ (१८४।४) असें अयोध्या नरनारी म्हणतात.

(४) भरद्वाज मुनि म्हणाले,

'**भरत ! तुम्ही तर** । *रामस्नेहचि* जणूं *देहधर*' ॥ (२०८।२)

(५) भरताचें प्रेम पाहून —

'**भरत महामहिमा जलरासी । मुनिमति उभी तटीं अबलासी ॥**
पार जावया उपाय पाही । नाव तराफा जहाज नाहीं ॥ (२५७।१–२)

अशी वसिष्ठांची दशा झाली.

(६) '**विधि गणपति शिव शेष शारदा । कवि–कोविद–बुध–मतिविशारदां ॥**
भरतचरित कीर्ती करतूती । धर्म शील गुण विमल त्रिभूती ॥
समजत ऐकत सुख सकलांतरिं । शुचि गंगे, रुचि सुधे निरादरि ॥
दो० — **निरवधि–गुण निरुपम पुरुष भरत सम नान ।**
गणां सुमेरु किं शेरसमं कविकुल लजायमान ॥ २८८ ॥
वर्णुं न शकति कोणि वरवर्णी ! । जशि जलहीन मीनगति धरणी ॥
अमित भरत–महिमा श्रुणु राणी ! । जाणति राम, न वदवे वाणीं ॥

असें जनकराज विदेहानें आपल्या पट्टराणीला रात्रीं एकांतांत सांगितलें आहे.

' स्नेह रामपदिं सिद्धी साधन । हें मज दिसे भरतमत–लक्ष्मण ॥
चुकुनिहि भरत न टाळिती मनें हि रामाज्ञेस ' ॥ २८९ ॥

असें जनकराजच म्हणाले आहेत.

२. भरताची भावना — (१) भरताच्या रामप्रेमाविषयीं सर्वांचें असें मत असतां भरतास वाटतें कीं आपलें रामावर मुळींच प्रेम नाहीं; आणि ते गंगानदी, प्रयागराज, इत्यादिकांपासीं **रामप्रेमाची याचना करतात.** ' करिं परीस दारिद्र्या डरतां ' असें भरतास म्हटलेंच आहे.

(२) कौसल्या, वसिष्ठ, निषादराज, भरद्वाज व स्वतः रघुनाथही सांगते झाले कीं ' भरता ! तुम्हा पूर्ण निर्दोष आहांत '; तरीसुद्धां भरत अगदीं शेवटपर्यंत **आपणांस दोषी मानतात**; आपल्यामुळेंच रघुनाथास वनांत जावें लागलें असें मानून सदा खिन्न, उदास राहून **आपलीच निंदा करीत असतात.** भरताच्या रामप्रेमाचा प्रभाव असा आहे कीं मार्गावरील पाषाणांनासुद्धां पाझर फुटले आहेत. (२३८।८)

' **भरतभाव भूतलिं नसता जर । कोण करत चर अचर, अचर चर ॥**
कोण भरतसा रामस्नेही । जग जपि राम, राम जपि ज्याही ॥ '(२३८।८; २१८।७)

असें देवगुरु बृहस्पति सुरपतीस म्हणाले.

(३) **भरत स्वतःस रामसेवक समजतात** — ' सेवाधर्म ' प्रकरणांत दिलेलीं अयोध्याकाण्डांतील बहुतेक वचनें भरताच्या मुखांतील आहेत.

' **करी स्वामिहित सेवक तोही । कोटि दोष कुणि मज देवोही** ॥ (१८६।५)
पायीं पायिं राम तर गेले । **आम्हांस्तव रथ हय गज केले ॥**
उचित मला जाण कीं मस्तकिं । **सेवकधर्म कठोर समस्त किं** ॥ (२०१६-७)
जो स्वामिस संकोचिं पाडतो । स्वहित इच्छि मति नीच दास तो ॥
सेवकहित तों स्वामिसेवा । करणें त्यजुनि सकल–सुख–हेवा ' ॥ (२९८।३-४)

इत्यादि पुष्कळ वचनें आहेत.

(४) **सेवकधर्माची प्रतीति** पाहा — तूं म्हणशील तें मी करतों असें रघुनाथानें भरतास अभिवचन दिल्यावरसुद्धां मानसांतील आदर्श सेवक भरतानें ' अयोध्येंत चल

किंवा आपल्या पादुका द्या ' असेंहि म्हटलें नाहीं; मग प्रायोपवेशन सुरू करणें वा हट्ट धरणें दूरच राहिलें! ' चौदा वर्षे पूर्ण झाल्याबरोबर जर अयोध्येंत आला नाहींत तर मी प्राण देईन ' असें किंवा अशा प्रकारचें धमकीवजा वचन मानसांतील भरतानें उच्चारलें नाहीं.

(५) **भरताचें लक्ष्मण-प्रेम** — शृंगवेरपुरास रामशय्यादर्शन केल्यावर लक्ष्मणाची आठवण येऊन भरत म्हणाले,

' लालन योग्य चारु लघु लक्ष्मण। असा त्रिकालिं न बंधु सुलक्षण ॥
प्रिय पुरजनां लाडका पितरां। प्राणप्रिय सीतारघुवीरां ॥
कोमलमूर्ती *मृदू स्वभावाहि* **। देहा माहित गरम हवा नाहिं ॥**
ते विपत्ति अवघ्या वनिं साहति। कोटि कुलिश या हृदया लाजति ' ॥ (२००।३–४)

आणखी म्हणाले कीं,

' जीवन लाभ भला लुटि लक्ष्मण। त्यजि सब लावी रामचरणिं मन ' ॥ (१८२।७)

असें अयोध्येंतील दरबारांत चित्रकूटास जाण्यापूर्वीं म्हटलें.

' अहह! धन्य लक्ष्मण बहुभागी। राम-पदारविंद-अनुरागी ' ॥ (७।१।३)

असें उत्तरकाण्डारंभीं म्हटलें. स्वतःस रामाबरोबर वनवासांत जातां आलें नाहीं याबद्दल भरतास सदा अत्यंत पश्चात्ताप होत होता.

३. भरतचरित्र-उपसंहार व फलश्रुति—

लक्ष्मण राम सिता वनिं वसती। भवनीं भरत तपें तनु कसती ॥ २ ॥
बघुनि उभय दिशिं वदति सर्व जन। भरत किं सर्वपरीं स्तुतिभाजन ॥
ऐकुनि नेमां साधु संकुचित। दशा बघुनि मुनिराज विलज्जित ॥
भरताचरण पुनीत परमही। मधुर मंजु मृदु मंगलकरही ॥
हरण कठिण कलि कलुषें क्लेश। महामोहतमि-दलन दिनेश ॥
पापपुंज कुंजर मृगराजा। शमन सकल संताप-समाजा ॥
जनरंजन भंजन भवभारहि। *रामस्नेह-सुधाकर-साराहि* ॥
छंद - श्रीरामसीता-प्रेयपीयुषमय न जन्मत भरत कीं।
व्रत विषम शम दम नियम यम मुनि-मन-अगम कुणि करत कीं ॥
दारिद्र्य दूषण दंभ दुःखानल सुयशमिषिं हरत कीं।
कलिकालिं तुलसी सम शठा कुणि राम-सुमुख करत कीं ॥ १ ॥
भरत-चरित युतनेम तुलसी सादर जे श्रवति।
सितारामपदिं प्रेम होइ नक्किं भवरस विरति ॥ ३६१ ॥

भरतचरित्रांतील अनेक उल्लेख यापूर्वींच्या अनेक प्रकरणांत त्या त्या विषयाच्या संदर्भानें आलेले आहेत. याप्रमाणें भरतचरित्रांतील अल्पसें वैशिष्ट्य येथें दाखविलें गेलें.

भरतचरित संक्षेपें वदणें । गगनाला गवसणी घालणें ।।
यास्तव लेखनविचार नव्हता ! प्रज्ञा ! परि हृदयस्थ लिहविता ।। प्रज्ञा. ।।

आतां दशरथचरित्रांतील थोडें वैशिष्ट्य दाखवून हें १४ वें प्रकरण समाप्त होईल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १४।१३ 卐 卐 卐

श्रीदशरथ

श्रीरामचरितमानसांतील दशरथ स्वायंभुवमनूचे, वैवस्वत मन्वंतरांत २४ व्या त्रेतायुगांत झालेले अवतार आहेत. दशरथचरित्राचे उल्लेख या प्रस्तावनेंतील अनेक प्रकरणांत आले आहेत; म्हणून येथें मानसांतील दशरथांचें थोडेंसें वैशिष्ट्य दाखवावयाचें आहे.

(१) कैकयीनें विश्वासघात केला व ती दशरथांच्या अकालीं मरणास कारण झाली, तरी त्यांनीं कैकयीला काडीमात्र दोष दिला नाहीं; स्वतःच्या कर्मासच दोष दिला हें 'कोणि कुणा सुखदुःख न दाता' या प्रकरणांत दाखविलें आहे.

(क) कैकयी जरी वाटेल तें वाटेल तितकें कठोर बोलली तरी दशरथ एकहि कठोर शब्द बोलले नाहींत मग अपशब्द कोठून बोलणार ?

(२) भरत राज्याचा स्वीकार करणार नाहीं व सर्व बंधु रामसेवा करतील असें त्यांनीं कैकयीस स्पष्ट बजावलें आहे; हेंच खरें ठरलें.

' भरत न होउं इच्छि मुळिं नृपती । विधिवश जीवि वसे तव कुमती ।।
हें मम पापाचें फळ पिकलें । म्हणुन अवेळीं दैव किं फिरलें ।।
करितिल बंधु रामसेवा किल । राम-महत्ता त्रिलोक गातिल ।। (२।३६।१,२,४)

अशा कठिण प्रसंगीं इतकी शांतता, सौजन्य, क्षमाशीलता, आणि विवेकारूढता इतर रामायणांतील दशरथांत दिसत नाहीं.

पहिलें चरित्र कौसल्येचें घेतलें व शेवटीं येथें दशरथांचें अतिसंक्षेपानें दाखविलें.

मानसांतील चरित्रांचें चित्रण पूर्ण निर्दोष व परमोच्च अनुपम आदर्श आहे हें हिंदी किंवा मराठी श्रीरामचरितमानस आणि वाल्मीकि, अध्यात्म, आनंद, अद्भुत, भावार्थ हीं रामायणें व पद्मपुराण रामायण यांच्याशीं तुलना करून परिशीलन करणाऱ्या कोणाहि पक्षांध नसलेल्या सुविचारी व्यक्तीस मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

मानसांतील चरित्रचित्रणाची चव दावणारें (चवदावें) हें चौदावें मुख्य प्रकरण येथें समाप्त झालें.

अनुपम परमादर्शचरित्रें । मानसकवि-चित्रित सुपवित्रें ।।
अल्प दाखविलिं यांत यथामति । प्रज्ञाप्रेरक राम रमापति ।। प्रज्ञा. ।।

◆◆◆◆

१५ : कांहीं स्वभावनिदर्शन

卐 卐 卐 १५।१ 卐 卐 卐

इंद्रादि देवांचा स्वभाव

श्रीरामचरितमानस-वाचकांस बहुतेक सर्व सोपानांत दृष्टीस पडतें कीं इंद्रादि देवांच्या दोषांचें अगदीं स्पष्ट आणि कठोर शब्दांत नीच उपमा-दृष्टान्तांसह वर्णन केलें आहे. या वर्णनाला कोणी सुरनिंदा म्हणतील; पण ही निन्दा नाहीं. निन्दा म्हणजे नसलेल्या दोषांचा आरोप करणें. असलेले दोष वर्णन करणें म्हणजे निंदा नव्हे. तथापि परदोषवर्णन हें प्रपंचांत आणि परमार्थांत महापापापेक्षां मोठें पाप आहे; आणि परमार्थमार्गांतील आत्मघाताचा मोठा खोल खड्डा आहे. असें असतां श्रीगोस्वामींसारख्या शुद्धप्रेमळ, विशाल-उदार-हृदयी, परम विनम्र रामभक्तानें देवांचे दोष इतक्या भडक भाषेंत का वर्णन केले असा प्रश्न विचारी वाचकांच्या चित्तांत चळवळ करतो हें खरें आहे; तथापि देवांच्या स्वभावाचें चित्र दाखवून मगच वरील प्रश्नाचा विचार करणें बरें.

१. बालकाण्डांत — (१) कधीं एका स्थळीं जास्त वेळ स्थिर न राहणारे ब्रह्मलोकनिवासी देवर्षि नारद, एकदां हिमालयाच्या गुहेंत श्रीहरिकृपेनें समाधिमग्न बसले — **सहज विमलमन मग्न समाधिंत** ' (१।१२५।४) तेव्हां **सुरपति मुनिगति बघुनि भ्याला,** कारण पाहा ' **सुनासीर (इंद्र) धरि मनिं या त्रासा। सुरर्षि** इच्छी *मम पुर वासा* ।।७।। पण ब्रह्मलोकांत राहणारा सुरर्षि (देवर्षि) स्वर्गांत राहण्याची किंवा इंद्रपुरीची अथवा इंद्राच्या प्रासादाची इच्छा कशाला करील? पण इंद्रास वाटलें कीं ' सुरर्षि इच्छी मम पुरी ' आणि ' मम वासा '. नगरी अमरावती व माझा वैजयन्त प्रासाद प्राप्त व्हावा एवढ्यासाठीं देवर्षि नारद तपश्चर्या करीत बसला आहे. असें वाटून सुनासीर = उत्तम सेना असलेला इंद्र, सुरपति घाबरला व त्यानें कामदेवास (मदनास) बोलावून नारदाला परास्त करण्यासाठीं पाठविलें. त्यावर कवि तुम्हां आम्हांस सामान्य नियम दाखवितात. ' जे कामी लोलुप या जगतीं ! सकलां कुटिल काकसे डरती ।। (१२५।८) इंद्राच्या भीतीला कुटिल काकाच्या—कावळ्याच्या भ्याडपणाची उपमा दिली; हें अयोग्य केलें असें म्हणवेल काय? आतां दृष्टान्त देतात,

सुकें हाड घे पळे शठ श्वान बघुनी मृगराज ॥
' घेइल हिरुनि म्हणून जड तशि सुरपतिस न लाज ।। १२५ ॥

मृगराज–सिंह दुसऱ्यानें मारलेलें श्वापदसुद्धां खात नाहीं. तो शुष्क हाडाकडे बघेल तरी कसा ? पण सुकें हाड चघळित असलेल्या ग्रामसिंहाला–कुत्र्याला सिंह दिसला कीं तो ज्या भावनेनें व भीतीनें पळतो व त्यांत त्यास लाज वाटत नाहीं, तशी इंद्राला लाज नाहीं.

(क) निर्लज्ज कपटी, कुटिल भ्याड कुत्रे कावळे करतात तसें इंद्रानें केलें ही स्थिति जर सुरपतीची-देवराजाची तर मग स्वर्गांतील इतर देवांचा स्वभाव कसा असेल याचा विचार करावा; आणि अशा त्या स्वर्गांत जाऊन राहण्यासाठीं धर्माचरण, यज्ञयाग करणें किती इष्ट कीं अनिष्ट हें ठरवावें आणि स्वर्गांत दुःख नाहीं असें जे म्हणतात तें किती खरें हें पण वाचकांनीं ठरवावें. दोषवर्णन करण्यांतील एक हेतु आतां ध्यानांत आला असेलच.

(ख) कामदेवानें आपल्या सर्व कामकलांचा उपयोग केला पण नारदाच्या मनांत विकार उत्पन्न झाला नाहीं. ज्या कामदेवाचा कधीं कोणी पराभव केला नव्हता तो नारदानें केला. नारदाला क्रोध येऊन त्यानें शाप दिला असता तर विनाश झाला असता परभारें मदनाचा ! इंद्र निश्चितपणें सिंहासनावरच !

(ग) शिवाची समाधि भग्न करण्यासाठीं देवांनीं कामदेवालाच पाठविलें. मदन जाळला गेला, रति विधवा झाली तरी कवींनीं इंद्राला दोष दिला नाहीं. हें करणें व्यक्तिदृष्टीनें निंद्य असलें तरी सुर-पति या नात्यानें सर्व देवांचें रक्षण करण्यासाठीं. तें करणें आवश्यक होतें म्हणून निंद्य नाहीं.

' त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।। '

पूर्वीचें उदाहरण निष्कारण खोट्या भीतीनें हरिभक्ताचा छळ, व्यक्तिगत भीति, व्यक्तिगत स्वार्थ इत्यादि दोषांनीं युक्त आहे. दुसऱ्यांत अनेक देवांचें हित साधण्यासाठीं त्यांच्यातीलच एका-देवाला बळी दिलें आहे.

अयोध्याकाण्डांत — (१) उद्यां सकाळीं रामराज्याभिषेक होणार या आनंदांत अयोध्येंतील लोक गर्क होऊन

' उजाडेल कधिं सर्वंहि म्हणती ' । पण ' देव कुचाळी विघ्न विनवती ' ।।
त्या नगरोत्सव क्षण बघवेना । *चोरा चांदणिरात्र रुचेना '* (११।६-७)

शारदेला आवाहून वारंवार पाय धरून पायां पडून रामराज्यरसभंग करण्याची गळ घातली तेव्हां शारदा देवी मनांत म्हणाली

' विबुध नीचधी गणुनि चालली ।।
उच्चनिवास नीच कर्तूती । शकति न पाहुं पराचि विभूती ॥ (१२।५-६)

(क) अत्यंत अनुपम धर्मशील राजा दशरथ, धर्मशील प्रजा, सर्व लोक देवांना नेहमीं हव्यकव्यानें संतुष्ट करणारे होते. दशरथ मनुष्य राजा असून देवांना व देव राजाला दैत्यभयापासून सोडविणारा म्हणून इंद्र त्यांस सामोरें येऊन घेऊन जाई व

अर्धसिंहासनाचा मान देत असे. तोच इंद्र दशरथाच्या मरणाची व प्रजेच्या दुःखाची जरामुद्धां क्षिति न बाळगतां शारदेच्या पायां पडून तिला सांगतो कीं, ' सुखदुःखें कर्मे जीवांतर ' जिवांना सुखदुःख त्यांच्या कर्मानें मिळतें, म्हणून मानवांच्या दुःखाचा विचार करण्याचें कारण नाहीं. आणि तो सर्व अयोध्याप्रजेला दुःखांत लोटण्यास सांगतो म्हणून शारदेनें त्याचें जें वर्णन केलें तें योग्यच आहे.

(ख) **गूढार्थचंद्रिकेचा अल्पसा उतारा** — स्वार्थसाधू, परहितविघातक, दुराचरणी सत्ताधीश व लक्ष्मीपुत्र (श्रीमंत लोक) आपला स्वार्थ साधण्यासाठीं बायकांच्या सुद्धां कसे पायां पडतात व कसे कृतघ्न, कठोर बनतात हें येथें दाखविलें. गरज सरो वैद्य मरो, ही त्यांची नीति !

गुरुवचनावरसुद्धां विश्वास नसतो (१) ज्या देवांनीं भरताचें प्रेम पाहून भरत-निषादराज-भेटींत पुष्पवृष्टि केली (२।१९४।२);· प्रयागांत त्रिवेणीवाणी झाल्यावर ज्यांनीं पुष्पवर्षाव केला (२।२०५।–); भरद्वाजांनीं केली भरतप्रशंसा ऐकून ज्यांनीं भरतावर फुलांचा पाऊस पाडला. (२१०।७); भरताची अलौकिक प्रेमदशा पाहून यमुनातीरप्रवासांत ज्यांनीं भरतावर आकाशांतून खूप फुलें उधळलीं (२१६।८) त्याच देवांना त्याच दिवशीं अगदीं थोड्याच अवधींत भरताचा प्रभाव

बघुनि *सुरेशा शोचहि । भल्या भलें जग नीचा नीचहि* ॥
गुरुला म्हणे करा प्रभु ऐसें । राम भरत भेटति ना जैसे ॥ (२१७।७-८)

तेव्हां *सुरगुर* **सस्मित परिसुनि वचना ।** *गणिति अलोचन सहस्रनयना* ॥
हजार डोळे असून आंधळा रे आंधळा ! नंतर सुरगुरूनें उपदेश करून लाल बावड्या-सारखे एकदोन महत्त्वाचे सिद्धान्त सांगितले.

' मायापति सेवकास माया । करत उलटते ती सुरराया ॥ (२१८।१)
सेवकसेवें राम सुखावति । सेवकवैरें वैर करिति अति ॥ (२१९।२)

आणि उपदेश केला तेव्हां

हर्षुनि सुमनें वर्षुनि सुरपति । भरताचा सुस्वभाव वानति ॥(२२०।४)

परंतु (२) **पुन्हां येरे माझ्या मागल्या**

बघुनी रघुवर भरत भेट कीं । सुरगण सभय भरे उरीं धडकी ॥
सुरगुरु समजावति, *जडजागति* **। सुमन वर्षुनी प्रशंसुं लागति** ॥ (२४१।८)

(३) **एकदां सुरगुरुंचें ऐकलें** पण पूर्ण विश्वास बसला नव्हता, म्हणून पुन्हां घाबरले, तेव्हां गुरुजींनीं पहिल्यासारखाच उपदेश केला तो ऐकला; पण मनाशीं ठरविलें कीं, आतां गुरुजींना विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं कारण ते तेंच तुणतुणें वाजविणार ! पुन्हां जेव्हां,

' रामभक्तिमय भरत निरखलें । *स्वार्थी सुर* **हरले घाबरले** ॥ ७ ॥
राम प्रेममयचि सब दिसले । *लेख शोचवश* **अलेख बनले** ॥८॥ (लेख = देव

दो.— **स्नेह-भीड-वश रामही म्हणति खिन्न सुरराज।**
रचा प्रपंचा पंचमतिं झालें न तर अकाज ॥ (१९४)

तेव्हां *स्मरुनी प्रार्थीति* **देव** *शारदे* । **देवि पाहि ! सुर शरण, ठाव** दे ॥
इत्यादि विनंति करून शारदेला सांगितलें कीं, कांहीं तरी कपटरूपी छाया करून देवांचें पालन कर. तेव्हां शारदा देवी,

' **वदे** *स्वार्थी जड विबुधा जाणुनि* ॥
मला म्हणा किं भरतमति केरव । नेत्रिं सहस्र न मेरु दिसे तव ॥' (२९५।१-४ पाहा.)

याप्रमाणें तिसऱ्या वेळीं सुरगुरूंना न विचारतां पुन्हां सरस्वतीचे पाय धरले, तिला शरण गेले. पण ती पडली मुखर, तिनें घातले सुरपतीचे दात सुरपतीच्या तोंडांत ! याप्रमाणें गुरुवचनावर विश्वास न ठेवतां परभारें शारदेचे पाय धरले तेव्हां तिनें मारले पायपोस ! तरीसुद्धां स्वार्थी सुरांनीं आपला भ्याडपणा व कुटिलपणा सोडला नाहीं. त्यांनीं स्वतःच उच्चाटनाचा प्रयोग केला.

देखुनि दुःखी दीन दो समाजिं नर नारि सब ।
मघवा महा मलीन **मृत मारुनि मंगल बघत** ॥ ३०१ ॥
कपट–कुचाल – सीम **सुरराजे** *। परहानी प्रिय अपली काजें ॥*
काकसमान पाकरिपु–रीती । **छली मलीन, न कुठें प्रतीती** ॥

(पाकरिपु = इंद्र.) हें सर्व जाणून
'**बघुनि हसति मनिं कृपानिधान किं । श्वान युवा मघवान समान किं** ॥(३०२।८)

अरण्यकांडांत — सुरपतिसुतानें श्रीरघुपतीची परीक्षा पाहण्यासाठीं काकरूप घेतलें; पाकरिपुसुत काक बनला.

काकरूप सुरपतिसुत धरतो । शठ रघुपतिबल पाहूं बघतो ॥
पळ चरणिं चोचुनि सीतेप्रति । कारण काकहि मूढ मंदमति ॥

पाठविलें असेल सुरपतीनेंच किंवा सर्व देवांनीं मिळून; पण डोळा गेला जयन्ताचा; पुन्हां देव म्हणणारच कीं सीतेला चोंच मार असें आम्हीं सांगितलें नव्हतें !

ल. ठे. — येथील मानव समाजांत मोठे प्रतिष्ठित गणले जाणारे, सत्ताधीश, धनपति, इत्यादि लोक असेंच करतांना दिसतात कीं नाहीं हें पाहावें. पाहुण्याच्या हातून साप मारवून स्वतः नामानिराळे राहण्याची यांना संवय असते.
कठिण समय येतां संत कामास येती । जनकजननि दूजे थोरही पाठ देती ॥ प्रज्ञा. ।
असेंच जयन्तास वाटलें असेल; कारण त्याला असाच अनुभव आला.

किष्किंधाकांडांत — (१) जयन्तानें घेतलेल्या परीक्षेंत जें पाहिलें (स्फटिक शिळेवर बसून राम सीतेसह क्रीडा करीत होते) तें लक्षांत ठेवून प्रवर्षण गिरीवरील गुहेच्या तोंडाजवळ एक मोठी तशीच सुंदर स्फटिकशिला तयार करून ठेवली. हेतु हा कीं त्या शिलेमुळें रघुवीराला वारंवार सीतेची आठवण व्हावी.

(२) **वालीवधानंतर पुष्पवृष्टि नाहीं** ! मारीचाला 'गति दिलेली' पाहून' मारलें म्हणून आनंद झाला असें म्हणावयाचें नाहीं हं ! ज्या देवांना अरण्यकांडांत आनंद झाला, त्या देवांनीं वालीवधानंतर पुष्पवृष्टि केली नाहीं. वालीला एका बाणानें मारलें, त्याला रामधामास धाडलें, तरी देवांनीं पुष्पवृष्टि केली नाहीं. वालिवध मारीचवधापेक्षां अधिक दुष्कर होता ! पण मारीच देवशत्रु व वाली इंद्रपुत्र ! या भेदाचें विस्मरण झालें नसावें.

ज्या ताटकेचा व सुबाहूचा वध करण्यास जगांत कोणी समर्थ नव्हतें, त्यांचा वध केला त्या वेळीं नंदनवनांत फुलांचा दुष्काळ पडला होता !

देवांनीं केलेल्या पुष्पवृष्टींची तुलना केल्यानें हें स्पष्ट दिसतें कीं, तें त्यांचें करणेंसुद्धां स्वार्थमूलक आहे; थोडे अपवाद आहेत, पण ते नसतील तर परसुखसुखी हा खोटा अभिमान कसा धारण करतां आला असता ?

मनांत एक व भाषा वेगळी हें वालिवध, निजधाम देणें आणि पुष्पवृष्टि नसणें आणि मारीचवध, आणि 'सुगति दिली' असें म्हणून पुष्पवृष्टि करणें यावरून सिद्ध होतें. **पोटांत स्वार्थ नी ओठांत परमार्थ** हा राजेरजवाडे, अमीर, इनामदार, मोठमोठे अधिकारी, सत्ताधीश, धनपति इत्यादिकांचा स्वभावच असतो.

सुंदरकांडांत — हनुमंताची परीक्षा पाहण्यास सुरसेला पाठविलें. जयन्तासारखी एखाद्या देवाची दुर्दशा होऊं नये म्हणून रामदूत ब्रह्मचारी हनुमंताची परीक्षा पाहण्यास एक स्त्री–नागमाता–सुरसा ! शूर्पणखेचे नाककान गेले तसे सुरसेचे गेले असते तरी देवांना त्याचें सोहेरसुतक नाहींच ! शिवाय तिच्यावर कांहीं तरी टेपर ठेवलेंच असतें.

लंकाकांडांत — (१) रावणयज्ञाचा विध्वंस कपींनीं केल्यावर रावण आणीबाणीच्या युद्धासाठीं लंकेंतून निघाला आणि

> **इकडे सुर करिती स्तुति–गानें । दिधलीं दारुण दुःखें यानें ॥ ५ ॥**
> **पुरे राम या खेळविणेंही ।** *होते अति दुःखी वैदेही ॥*
> *प्रभु सस्मित जें सुरवच कानां ॥* (८६।५-७)

या देवांना वैदेहीची इतकी काळजी कीं त्यांनीं सीताहरणासाठीं रावणाला अनुकूल परिस्थिति मिळवून दिली ! वनदेव व दिक्पाल यांना सोंपवून लक्ष्मण गेले असतां सीताहरण निर्विघ्नपणें होऊं दिलें ! म्हणून तर देवांची ही भाषा ऐकतांच प्रभूंना हसूं आलें.

मागें सांगितल्याप्रमाणें अशा लोकांची भाषा अशी परमार्थी, मधुर, गोंडस, सोज्वळ असते; पण त्या भाषेच्या आड काळाकुट्ट व्यक्तिस्वार्थ, पक्षस्वार्थ वगैरे लपलेला असतो तो सुज्ञांस कळतो म्हणूनच प्रभु हसले.

(२) मातली रथ घेऊन परत गेल्यावर,

> *'देव सदा स्वार्थी* **ठाकले** *। वदति जणूं परमार्थी भले ॥*

(३) या सर्व देवांनीं रावणवधाचें श्रेय श्रीरघुवीरास दिलें नाहीं; कारण कीं त्या वेळीं त्यांस वेदान्त व कर्मविपाकसिद्धान्त आठवला; पण '**पुरे राम या खेळविणिंही**' वगैरे प्रार्थना करून 'रावणाला लवकर ठार मारा' हें सुचवितांना देवांना वेदान्ताची आठवण झाली नाहीं.

जगद्द्रोहरत हा खल कामी। नष्ट अघें निज कुमार्गगामी ॥ (११०।४)
असें म्हणाले; जणूं काय ब्रह्मदेव, वेद व शंकर यांना वेदान्त व कर्मविपाकसिद्धान्त माहीत नाहीं! व तो या सर्व देवादिकांनाच माहीत!

'**रावण नागवरा। खगनाथ यथा युत कोप धरां**' ॥
असें ब्रह्मदेव म्हणाले,

'**दशकंठ निशिचर चंड खल तम भुजबलें हृत दिनमणे**' ॥
असें चारी वेद उत्तरकांडांत म्हणाले, 'दशशीस विनाशन वसिभुजा' असें शंकर म्हणाले. रावणवध झाल्याबरोबर देवांनींच पुष्पवृष्टि रघुवीरावर केली; आणि 'खलदलविदारण' (६।१०३ छं.) यांनींच म्हटलें. **कृति, उक्ति व भावना अगदीं विसंगत! हे देव स्वतःच म्हणतात,**

'**आम्हि परम अधिकारि देवता। प्रभो!** *स्वार्थवश भक्ति विस्मृता* ॥
म्हणूनच जणूं काय ब्रह्मदेव या देवांनीं केलेल्या स्तुतीनंतरच केलेल्या स्तुतींत म्हणतात, 'धिग् जीवन देव शरीर हरे!' (६।१११।९) धिक्कार असो देवांच्या जीवनाला आणि देवशरिरांला!

उत्तरकांडांत — श्रीरामराज्याभिषेकाच्या वेळीं 'सुमनवृष्टि झड लाविति निर्जर', (७।११।१) पण सर्व जगाला परमानंददायक ठरणाऱ्या या परम मंगल समयीं देवांनीं कल्पवृक्षाच्या फुलांची किंवा त्यांच्या मालांची वृष्टि केली नाहींच. त्यांच्या सर्व कामना रावणवधानेंच पूर्ण झाल्या आहेत. रावणवधाच्या वेळींसुद्धां सुरतरुसुमनें किंवा 'सुरतरु सुमनमाला' नाहींतच; तीं देवांच्या जवळ केव्हां होतीं पाहा —

(१) सीतेचें पाणिग्रहण रघुवीरानें केलें व सप्तपदीला प्रारंभ झाला तेव्हां

वर्षती **हर्षि** *सुर सुरतरु-सुमन सुजाण।* (१।३२४)
आतां आपली कामना पुरी करण्याचें साधन निश्चित झालें हें उत्तम प्रकारें जाणून त्यांनीं कामतरूंच्या फुलांची वृष्टि केली.

(२) पण रघुनाथास घरजांवईच ठेवलें असतें तर पुढील कट करणें कठिण झालें असतें म्हणून ती धुगधुग होतीच त्यामुळें त्या वेळीं पूर्ण आनंद झाला नाहीं. पण वरात अयोध्येंत दशरथपुरींत प्रवेश करते तेव्हां मात्र परम आनंद झाला व '**सुरतरु-सुममाला सुर वर्षंति**' कामतरुकुसुमांच्या मालांची वृष्टि केली; कारण कीं अयोध्येंतून आतां वनवासांत पाठविणें सहज शक्य आहे अशी खात्री झाली.

रावणवध झाला म्हणजे सर्व साधलेंच. साधावयाचें कांहीं उरलें नाहीं, म्हणून

त्या वेळीं कल्पवृक्षांचीं फुलेंसुद्धां नाहींत मग माळा कुठल्या ! ‘ गरज सरो नि वैद्य मरो ’ ही वृत्ति या प्रसंगांवरून दिसली कीं नाहीं ?

श्रीगोस्वामींनीं देवस्वभावाचें यथार्थ वर्णन केलें, तें कां केलें हें आतां निराळें सांगण्याची आवश्यकता राहिली नाहीं. ‘ काकसमान पाकरिपुरीती ’ असें इंद्राबद्दल म्हटलें आहे; म्हणून आतां काकरीतीचें अवलोकन केलें पाहिजे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १५।२ 卐 卐 卐

काक-स्वभावादि

श्रीरामचरितमानसांत पहिल्या तीन व शेवटच्या दोन कांडांत काकस्वभावाचें विस्तृत वर्णन आहे. तें पाहिलें म्हणजे खात्री होईल कीं श्रीगोस्वामींचें सृष्टिनिरीक्षण फार सूक्ष्म होतें व त्यांस काकांचा उपसर्ग फार झाला असावा. काक दुर्जनाचें-खलाचें प्रतीक आहे.

शकुनाधम सबरीतिं अपावन । (७।१२३।८) कावळा सर्व पक्षिजातींत नीच, आणि सर्व प्रकारें अपवित्र आहे. जात, स्वभाव, भक्ष्य, शब्द, वर्ण, बुद्धि, कृति, गति इत्यादि सर्व नीच व अपावन आहे.

(१) **जात — हो सपदीं पक्षी चांडाल ।** (७।११२।१५) पक्षिजातींत **चांडाल** आहे. काकस्पर्श झाला तर सचैल स्नान करावें लागतें.

(२) **स्वभाव** — शकुनाधम, शकुन = पक्षी; स्वभाव **अधम**–नीच आहे.

(क) **सकलां कुटिल काकसे डरती ॥ भ्याड** पण सर्वांच्याबरोबर **कुटिलपणा** करणारे.

(ख) *छली मलीन, न कुठें प्रतीती ।* (२।३०२।२) कोणावरही विश्वास नाहीं. छल कपट करणारे व मनानें मलीन.

(ग) **काक म्हणती कलकंठ कठोर चि ।** (१।९।१) कलकंठ = कोकिळ, कावळे म्हणतात कीं कोकिळेचा आवाज कर्कश !

(घ) *कामी* **काक** *विषयि अति ।* (१।३८।३, ५ पाहा.)

(ङ) **वायस इव** *सर्वां घाबरसी ।* (७।११२।१४) अति **अविश्वासी**, अति **संशयी**.

(च) **काकहि** *मूढ मंदमति ।* (३।१।७)

(३) **भक्ष्य अपावन—प्रेमें वायस फार पाळले । काक निरामिष कधीं जाहले ? ॥** (१।५।२). घाणेरडें, कुजकें, नासकें अन्न, मांस, चर्म, अमेध्य यांना फार प्रिय

(४) **शब्द** – आवाज **अति कर्कश**, कठोर.

खग कंक काक शृगाल । कट्कटति कठिण कराल ॥ (३।२० छं.)

(५) **वर्ण**–काळा कुट्ट.

(६) बुद्धि–नीच.

(७) **कृति**–कुटिल, कपटी, फसवी, संशयग्रस्त.

(८) **गति** – कुटिल.

(९) **द्विजनिंदक बहु नरकां भोगुनि। जगीं जन्मतो वायस होउनि॥** (७।१२१।२४)

काक **कंक भुज घेउनि पळती।** *एकेकांचे हिसकुनि गिळती* ॥

कांहीं खाद्य दिसलें कीं काव काव करून आपल्या जातभाईस बोलावतात; पण बलवान असतात ते इतरांस खाऊं देत नाहींत, सारखे टोचीत असतात आपापसांतसुद्धां दुष्टच!

(१०) **अपशकुन — नगरि शिरत किति कुशकुन घडती।**

काक कुठायीं कटु ओरडती ॥ (२।१५८।४)

(११) **फार क्वचित शुभ शकुन—उजवा काक सुशेतीं दिसला** ॥ (१।३०३।३) उजव्या बाजूस पीक उभें असलेल्या शेतांत नुसता (ओरडत नसलेला) दिसेल तरच शुभ शकुन समजावा.

खल-स्वभाव-वर्णनांत अनेक वेळां काकांची उपमा दिलेली आहे. याप्रमाणें मानसांतील वचनाधारें हें काकस्वभावादि वर्णन तयार झालें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १५।३ 卐 卐 卐

स्त्री-स्वभाव

'श्रीतुलसीदास आणि नारीवर्ग' आणि 'नारीधर्म' हीं प्रकरणें प्रथम वाचून मग हें प्रकरण वाचावें. मानसांत प्रत्येक सोपानांत स्त्री-स्वभावाचें वणन न्यूनाधिक प्रमाणांत आहे.

बालकाण्ड — (१) सती दक्षकुमारी म्हणते,

'म्यां कृत कपटा शंभुसी। *नारि सहज जड अज्ञ* ॥ ५७ रा ॥

(२) पुष्पवाटिका व धनुर्भंग प्रकरणांतील सीताचरित्राकडे पाहिल्यास *सच्छील स्त्रियांच्या स्वभावांतसुद्धां पुढील स्वभावगुण दिसतात* — चंचलता, भीरुता, अति कोमलता, संशयीपणा, दृढ आत्मविश्वासाचा अभाव, मनाचा कमकुवतपणा, शीलसंरक्षणाची अति चिंता, लज्जा, संकोच, व त्यामुळें लपवालपव, अधीरपणा इत्यादि.

अयोध्याकांड —

(१) **देइ न उत्तर, घेइ उसासूं। नारिचरित करि ढाळी आसूं** ॥ (१३।६) दुःख शोकाचें नाटय सहज करतां येतें व चटकन डोळ्यांत अश्रू आणतां येतात. '**नेत्रिं कपटजल आणि कैकयी।** (३।१५९) डोळ्यांत अश्रू आणणें, रडणें हें स्त्रियांचें प्रभावी हत्यार आहे. त्यानें मोठमोठे वीरसुद्धां जिंकले जातात.

(२) **विहसुनि लपवी अशिहि तिडिक ते । चोरनारि जशि उघड न रडते ॥** (२७।५) दुःख, शोक, संताप लपवून ठेवणेंसुद्धां त्यांना सहज साधतें. हें वचन कैकयीविषयीं आहे.

(३) **घडे काय कोण्या समयीं, हत नारी विश्वासीं** ॥ २९ ॥ असें दशरथ स्वानुभवानें म्हणाले.

(४) **'स्त्रीस्वभाव' कवि वदती सत्याचि । विविधा कपट अगाध अगम्याचि** ॥ (४७।७)

(५) *नारिहृदयगति नुमजे विधिही* । **सकल कपट अघ अवगुण खनिही** ॥' (१६२।४) कैकयीच्या कृतीवरून भरत म्हणाले आहेत.

(६) *काय न करि अबला प्रबल* । (४७) सुविचारांशिवाय बाकी वाटेल तें करील. (टीका पाहा).

अरण्यकाण्ड — (१) शूर्पणखाचरित्रांतील वर्णन असती–व्यभिचारिणी–स्त्रीचें अद्भुत चरित्र आहे. तें सामान्य स्त्रीस्वभावाचें वर्णन नाहीं. 'तुलसीदास आणि नारीवर्ग' या प्रकरणांत चर्चा पाहावी.

(२) **राखा स्त्री हृदयामधिं तरिही । युवती शास्त्र नृपति वश नाहीं** ॥ (३७।९)

(३) **लोभा इच्छा दंभ बल कामा केवल नारि** ॥ (३८ म) कामाचें बळ नारी आहे.

(४) नारदास श्रीराम सांगतात,

काम कोप लोभादि मद प्रबल मोहदल भारि ।
त्यांत *सुदारुण दुःखदा मायारूपी नारि* ॥ ४३ म ॥
श्रुणु मुनि पुराण वेद व संत । म्हणति मोहवनिं नारि वसंत ॥ १ ॥
जप तप नेम-जलाशय भारी । ग्रीष्म बनुनि शोषी त्यां नारी ॥ २ ॥
काम कोप मद मत्सर भेकां । स्त्री वर्षा हर्षा दे एका ॥ ३ ॥
दुर्वासना कुमुद निकुरंबक । त्यां स्त्री शरद सदा सुखदायक ॥ ४ ॥
धर्म-सकल सरसिज-वृंदाही । अधम सौख्यदा स्त्री हिम दाही ॥ ५ ॥
ममता यवासगण पालवतो । नारि शिशिर ऋतु ज वावरतो ॥ ६ ॥
अघ-उलूक-संघां सुखकारी । नारि निबिड रजनी अंधारी ॥ ७ ॥
मति बल शील सत्य सब मीन । नारी गळ वदति कीं प्रवीण ॥ ८ ॥

दो०—**अवगुणमूलहि शूलदा प्रमदा सुदुःखखाण** ॥ (४४)

यांत वर्णिलेले सर्व दुष्परिणाम विश्वमोहिनीच्या नुसत्या दर्शनानें नारदाच्या बाबतींत घडले हें टीकेंत तुलना करून दाखविलें आहे. या वर्णनांत गोस्वामींच्या पूर्वचरित्रांतील अनुभवांचें प्रतिबिंब आहे. 'मानसोपलब्ध तुलसीचरित्र' पाहा.

(५) **दीपशिखेसम युवतितनु** होइ न मना पतंग ॥ ४६ म ॥ असें कवि आपल्या मनास म्हणाले.

किष्किंधाकाण्ड — स्त्रिया स्वतंत्रा बिघडती ॥ (१७।४)

सुन्दरकाण्ड — रावण मंदोदरीस म्हणाला,

' भित्रा नारी-स्वभाव साचें । मंगलांत भय मन अतिकाचें ' ॥ (३७।२)

लंकाकाण्ड — रावण मंदोदरीस म्हणाला,

' स्त्रीस्वभाव सत्याचि कवि वदती । अवगुण आठ सदा हृदिं वसती ॥

साहस माया अनृत चपलता । भय अशौच अविवेक अदयता ॥ (१६।२-३)

यांत कांहीं गुण परस्परविरोधी आहेत, त्यामुळें हे आठ गुण एकाच प्रसंगीं प्रगट होणें शक्य नाहीं.

उत्तरकांड — **' नारीं विष्णु-माया प्रगट '** (११५ म)

आणखी वचनेंहि आहेत, पण येथें प्रत्येक सोपानांतील कांहीं महत्त्वाचे नमुने दिले.

देवांचा व पशुपक्षी वगैरे प्राण्यांचा स्वभाव बदलत नाहीं; व त्यांनीं केलेल्या बऱ्या-वाईट कर्मांचें फळही त्यांस पुढील जन्मीं भोगावें लागत नाहीं. परंतु मनुष्यस्वभाव सुसंगति व भगवद्भक्ति यांच्या बळावर प्रयत्न केल्यास बदलूं शकतो. वेदपुराणधर्मानुसार निष्ठेनें आचरण केल्यासही बदलतो; हें पुढील प्रकरणांत दिसेल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १५।४ 卐 卐 卐

किरात-स्वभावादि

श्रीरामचरितमानसांत उपमारूपकादिकांच्या निमित्तानें किरात भिल्ल इत्यादि वनांत राहणाऱ्या जातींचे धंदे व स्वभाव यांचें विस्तृत वर्णन केलें असून त्यांचें दैनंदिन जीवन कशा प्रकारचें असतें हेंहि वर्णिलें आहे. या किरातादिकांच्या वर्णनावरून गोस्वामींची सूक्ष्म निरीक्षणशक्ति, चौकसबुद्धि किती व्यापक होती याची साक्ष पटते.

(१) **मधाचें मोहोळ काढणें** कुबडी विषयीं सांगतात — (२।१३। २-४)

पुसे जनां कीं ' उत्सव कसला । रामतिलक ' ऐकुनि उर जळला ॥ २ ॥

कुमति कुजाति **विचार करीती । होइ अकार्य किं कवणें रीतीं** ॥ ३ ॥

पाहुनि पोळें किराति कुटिला । कसें मिळे **कीं चिंति युक्तिला** ॥ ४ ॥

आग्या मधमाशांचें फार मोठें मोहोळ-पोळें कुठें असतें, किती अडचणीच्या जागीं असतें, तें कोणत्या युक्तीनें, कसें काढतात व त्या माशांचा स्वभाव यांची सांगोपांग माहिती डोळ्यांनीं पाहिली असल्याशिवाय हें रूपक अत्यंत समर्पक रीतीनें निर्दोष असें करतांच येणार नाहीं; इतकेंच नव्हे तर ही माहिती ज्यांना असेल तेच या रूपकाचा अर्थ सुसंगत रीत्या स्पष्ट करूं शकतील. अत्यंत मोठें मोहोळ, त्यांतील मध, जेथें लागलें आहे तें दुर्गम स्थान, आग्या मधमाशा, असें अत्यंत मोठें मोहोळ काढण्यास लागणारी सामुग्री, इत्यादि सर्व गोष्टींचा संबंध कुबडी भिल्लीण आणि राम-

राज्याभिषेक होऊं न देणें यांच्याशीं निर्दोष रीत्या दाखवितां आला पाहिजे. या सर्व गोष्टी गूढार्थचंद्रिकेंत स्पष्ट झाल्या असून कोष्टक रूपानेंहि दिसतील. या एकाच रूपकानें कुबडीचें सर्व कुटिल कारस्थान उघड व विस्तृत करतां येतें. या रूपकाचा टीकेंत झालेला विस्तार पाहिला म्हणजे 'धन्य धन्य मानसकवि तुलसी' असे सहजोद्गार निघतील. मधाचीं मोहोळें काढणें हा एक धंदा आणि कुमति कुजाति कुटिल हें स्वभाव-निदर्शन यांत केलें आहे.

(२) गाण्यानें हरिणांना पकडणें —

घडिं घडिं सादर तिला विचारित । *शबरीगानें मृगी* **जणुं मोहित** ॥ (१७।१)

कैकयी हरिणी कुबडी भिल्लीणाच्या मधुर गानानें जणू मोहित झाली; आतां तिच्या पाशांत पडून जन्मभर दुःखी होणार हें सुचविलें. गायनानें हरिणांना पकडणें हा भिल्ल जातींतील फासे-पारधी जातीच्या लोकांचा धंदा आहे. विस्तार गूढार्थ चंद्रिकेंत पाहावा.

(३) इतर पशू पकडणें —

दो०-**परिसुनि चिंतुनि शपथ अति हसुनि उठे मतिहीन ।**
साजि भूषण बघुनी मृगा पाश जणूं भिल्लीण ॥ २६ ॥

येथें कैकयी भिल्लीण दशरथ पशूला पाशांत पकडूं पाहात आहे.

(४) ससाण्याच्या साह्यानें पक्षी पकडणें —

कुमति हसुनि वच करवुनि गाढीं । कुमत कुविहग टोपि जणुं काढी ॥ (२।२८।८)

दो०- **भूप मनोरथ सुभग वन सुख सुविहंग समाज ।**
जशि भिल्लीण सोडूं बघे वचन भयंकर बाज ॥ २८ ॥

भिल्ल लोक ससाणा (बाज–श्येन) नांवाचा, पक्ष्यांची शिकार करणारा पक्षी पाळगतात व त्यांच्या साह्यानें पक्षी पकडतात एवढेंच माहीत असणारांस याच्यासारखं सांग निर्दोष रूपक करतां येणार नाहीं. ससाणा कुठें ठेवतात, त्याची टोपी म्हणजे काय, ती कां घालतात, केव्हां काढतात, कसा सोडतात, तो पक्षी कसे पकडतो, त्याचा वेग कसा, किती असतो इत्यादि या शिकारीची माहिती असल्याशिवाय येथल्या-सारखें विशाल अर्थ-प्रतिपादक रूपक करतां येणार नाहीं. हें कैकयी भिल्लिणीचें वर्णन आहे. या रूपकाचा निर्दोष विस्तार करण्यासही वरील माहिती पाहिजेच. टीकेंत विस्तार केला गेला असून कोष्टकरूपानेंहि तुलना आहे.

(५) वनाला वणवा लावणें — भिल्ल–भिल्लिणी, वनाच्या आसपास राहणारे असले लोक, अरण्याला आग-वणवा-दव-दाव लावतात, हें आजच्या अरण्यसंरक्षकांना (फॉरेस्ट गार्ड) सुद्धां कदाचित माहीत नसेल; पण गोस्वामींनीं तें क्रूर कर्म आपल्या डोळ्यांनीं पाहिलें असेल म्हणून खालील रूपक केलें.

नगर सफल वन गव्हर भारी । खग मृग विपुल सकल नरनारी ॥

विधि करि किरातिनी कैकइला । दव दुःसह दशदिशीं लाविला ॥

सहुं न शकति रघुवर-विरहानल । लोक सकल पशुं लागति विव्हळ ॥(८४।२-३)

ससे, पशु, पक्षी यांना अल्प श्रमानें पकडण्याची भिल्लिणींची सोपी युक्ति म्हणजे वनाला चारी बाजूंनीं आग लावणें. त्या वनांतील पशुपक्षी वगैरे प्राणी जीव घेऊन सैरावैरां पळत सुटतात; व ठिकठिकाणीं लावून ठेवलेल्या पाशांत–फासांत, खाड्यांत वगैरे सहज पडतात; सशांना तर काठ्यांनीं झोडपून मारतात. शिवाय वणव्यानें पुष्कळ वृक्ष मरतात, पडतात व नंतर ते नेतां येतात. आपल्या स्वतःच्या अल्प स्वार्थासाठीं मोठमोठ्या वनांचा विनाश करून वनांतील अगणित प्राण्यांना निष्कारण दारुण दुःख देतात.

येथपर्यंत भिल्ल–किरातांच्या मुख्य धंद्यांचें दिग्दर्शन केलें; आतां स्वभावाचें दिग्दर्शन करतात.

(१) **आपल्या सम्राटाविषयीं अत्यंत प्रेम व आदर** — श्रीरघुनाथ चित्रकूटास गेल्यावर त्यांचें दर्शन घेऊन —

पुनः पुन्हां प्रभुला जोहारुनि । वचन विनीत वदति कर जोडुनि ॥ ८ ॥

दो० — **नाथ ! सनाथ अतां अम्ही सब, दिसतां प्रभु–पाय ।**

अमच्या भाग्यें आगमन अपलें *कोसलराय* ॥ १३५ ॥

श्रीराम अयोध्याधीश आहेत इतकेंच यांना माहीत आहे; पण ते म्हणतात,

'**धन्य धरणि पथ पर्वत कानन । जेथें कृत तुम्हि नाथ ! पदार्पण ॥**

धन्य विहगमृग कानन चारी । सफल जन्म तव दर्शनिं सारीं ॥

आम्हि सपरिजन धन्याचि सगळे । रूप नेत्रभर दिसलें अपलें ॥

आम्ही सेवा करूं सर्वपरिं । ठेवुं दूर अहि वाघ सिंह करि ॥

आम्ही सेवक, समेत परिजन । संकोचाविण देणें शासन ॥' (१३६।१-८)

(२) अयोध्या दो. ११०।१ पासून १२४ पर्यंत या लोकांच्या सहज प्रेमाचें चित्र फारच सुंदर रेखाटलें आहे तें सर्वच पाहावें.

(३) **अयोध्येंतील लोक चित्रकूटास आल्यावर** — (२५०।१ – २५१।६)

'**चित्रकूटनिवासी — कोलि किरात भिल्ल वनवासी** ॥ (२५०।१)

स्नेहमग्न मृदु वचनें म्हणती । प्रेम ओळखुनि साधु मानती ॥ ५ ॥

आम्हि नीच अति सुकृती आपण । रामकृपेनें घडलें दर्शन ॥ (६।२५०)

प्रिय पाहुणे तुम्ही वनिं आलां । सेवे योग्य न भाग्य आम्हांला ॥ १ ॥

द्यावें काय तुम्हां जी ! स्वामी । *इंधनपत्र-मित्र* **तों आम्ही** ॥ २ ॥

हीं अमची अति मोठी सेवा । *वस्त्र पात्र कीं चोरुं न देवा* ॥ ३ ॥

अम्हि *जड जीव जीवगण-घाती । कुटिल कुचाली कुमति कुजाती* ॥ ४ ॥

पाप करत रात्रीं दिन जाताहि । **नहिं कटिं पट नहिं खाचा भरताहि** ॥ ५ ॥

स्वप्नीं कधिं कोणा रुचि धर्मा । ' (२५१।६)

पण हा त्यांचा स्वभाव कशानें बदलला तें पण सांगतात,

हा रघुनंदन दर्शन महिमा ॥

जिथुनी प्रभुपदपद्म पाहिले । दुःसह दुःख न दोष राहिले ।। (२५१।६-७)

या भिल्ल कोळ्यांचा असा हा स्वभाव असून प्रेमानें किती विनयी बनले आहेत सत्य सांगत आहेत हें अवलोकनीय आहे. स्वभावचित्र व स्वभावोक्ति मनोहर आहेत. श्रीतुलसीदास चित्रकूटला राहात असतां व त्यांच्या पायीं प्रवासांत या वन्य जातीचे त्यांना जे उभयविध अनुभव आले तेच अयोध्याकांडांत जागोजागीं चित्रिलेले दिसतात.

प्रयागासारख्या तीर्थराजांत राहणाऱ्या, सुशिक्षित वर्णाश्रमी लोकांत यांच्या सारखी नम्रता व प्रेम मानसांतील वर्णनांत दिसतें कीं काय हें नीट लक्ष देऊन पाहावें. गोस्वामी प्रयागांतही राहात होतेच. तेथील ' ग ' ची बाधा झालेल्या नागर लोकांच्या स्वभावाचा अनुभवसुद्धां त्यांस होताच; त्याचेंच प्रतिबिंब प्रयाग येथील वर्णनांत पडलेलें दिसतें. सद्यःस्थितींतसुद्धां खेडवळ अशिक्षित आणि शहरी सुशिक्षित लोकांच्या स्वभावांत असाच फरक आढळतो !

कौसल्येनें प्रसंगोपात्त थोडें वर्णन केलें आहे.

भिल्ल कोळि कन्याच कानना । रचि विरंचि, सुख विषयिं विदित ना ॥

उपल–जंतुशा स्वभाव कठिना । तया क्लेश कधिं वाटे वनिं ना ॥ (६०।१-२)

सूचना–कौसल्येच्या दृष्टीनें वन्य जातींना विषयभोगसुख नाहीं असें वाटलें **तें योग्यच आहे.** पण त्यांनासुद्धां विषयभोग–सुखदुःख असतेंच. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांचच विषय आहेत. हे ज्या पदार्थांतून मिळावयाचे ते भिन्न भिन्न असले तरी विषय पांचच आणि ते सुखदुःखदायक वाटतातच. प्रकृतिभेद, स्वभावभिन्नता, देहाची व मनाची घडण, व सहनशक्ति यांतच खरा भेद असतो.

अशा अडाणी समजल्या जाणाऱ्या लोकांच्या स्वभावांत सुसंगतीनें जितका लवकर बदल होतो तितका सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या नागरी लोकांच्या स्वभावांत होत नाहीं हें मात्र व्यावहारिक सत्य आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १५।५ 卐 卐 卐

कलि-स्वभाव (प्रभाव) वर्णन

कलियुगांतील वेदधर्म विरोधी, अनैतिक, पापी प्रवृत्तीचें वर्णन प्रत्येक कांडांत कमी जास्त प्रमाणांत आहेच; पण उत्तरकाण्डांत बराच विस्तार केला आहे. कलीचा पुनीत प्रताप व आत्मोद्धाराची सुलभता उत्तरकांडांतच विशेष वर्णिली आहे; त्याचें सार ' कलियुगीं साधन सुलभ अति अनायास उद्धार ' प्र. प्र. १२।६ यांत पूर्वीच दिलें आहे.

बालकाण्ड — जे जात किं कलिंकालिं करालीं । कृति काकांची वेष मराली ॥
गति कुपथीं श्रुतिपथा सांडिती । कपट काय कलिपंक भांडिं तीं ॥
वंचक, मिरविति रामभक्त वर । काम कोपकनकांचे किंकर ॥ (१२।१-३)
कलि केवल मलमूल मलीनहि । पाप पयोनिधिं जनमन मीनहि ॥(२७।४)
कालनेमि कलि कपट निधानू ॥ (२७।८)
कनककशिपु कलिकाल ॥ दो. २७ ॥

अयोध्याकांड — सकल कलुष कलि सावज भिन्न । (१३३।३)
दारिद्र्य दूषण दंभ दुःखानलकलिकालिं ॥ (३२६ छंद)

अरण्यकांड — कठिण काल मलरास ज्ञान न धर्म न योग जप ॥ ६ म ॥

किष्किंधाकांड — धर्म जसे कलि येतां पळती । (१५।९).
पाखंडीवादें गुप्त होती सद्ग्रंथ ॥ १४ ॥

सुंदरकांड — कलिमल, (६ छं.)

लंकाकांड — कलिकल्मषौघ (मं. श्लो. २) हा कलिकाल मलायतन' (१२१ म)

उत्तरकाण्ड — दो. — असे मनुज खल अधम युगिं कृत नी त्रेता नाहिं ।
द्वापरिं होतिल कांहिं, बहु वृंद चि कलीयुगांहि ॥ ४० ॥
तो कलिकाल कठिन उरगारी । पापपरायण सब नरनारी ॥

दो. — ग्रस्त कलिमलें धर्म सब लुप्त सकल सद्ग्रंथ ।
दांभिकिं निजमतिं कल्पित प्रगटविले बहु पंथ ॥ ९७ रा ॥
होति मोहवश लोक सब ग्रसी लोभ शुभ कर्म ।
श्रुणु हरियाना ज्ञान निधि सांगु कांहिं कलिधर्म ॥ ९७ म ॥

कलिधर्म = कलिस्वभाव

वर्णधर्म ना आश्रम चारी श्रुतिविरोधरत सब नरनारी ॥
श्रुति विकती द्विज भूप प्रजाशन । कोणि न मानि निगम-अनुशासन ॥
तोच मार्ग जो ज्याला रुचतो । पंडित तो जो शेखि मिरवतो ॥
मिथ्यारंभ दंभरत जेही । त्यांस संत म्हणती सगळेही ॥
तोच चतुर जो परधनहारी । सदाचारि जो दंभ बहु करी ॥
वदती असत्य मस्करि जाणाति । त्यांसच कलियुगिं गुणवान् समजति ॥
त्यागी श्रुतिपथ निराचार जो । कलियुगिं तो ज्ञानी विरक्त तो ॥
ज्याचीं नखें जटाहि विशाला । तो प्रसिद्ध तापस कलिकाला ॥

दो० — अशुभवेष-भूषण-धर भक्ष्याभक्ष्या खाति ।
ते योगी ते सिद्ध नर कलियुगिं पुजिले जाति ॥ ९८ रा ॥
परापकाराचार त्यां गौरव ते मान्य अति ।
तन मन वच शठ फार त्यां कलियुगिं वक्ते म्हणति ॥ ९८ म ॥

भुशुंडी ज्या कलियुगांत शूद्र होता त्या कलियुगांतील पूर्वीचे अनुभव तो सांगत आहे; तें कलियुग-स्वभाववर्णन दो० १०२ पर्यंत आहे. तें सगळेंच वाचनीय, मननीय व सद्यः परिस्थितीशीं तुलनीय आहे; पण बरेंच विस्तृत असल्यानें येथें मधल्या चौपाया गाळून फक्त दोहेच देणें इष्ट वाटतें.

दो० — **ब्रह्मज्ञानच नारिनर वदति, न दुसरी बात।**
कौडीलागीं लोभवश करिति विप्रगुरुघात ॥
शूद्र भांडती द्विजांसह आम्हि किं कांहीं न्यून।
ब्रह्म जाणि तो विप्रवर बघती संतापून ॥ ९९ म ॥
होति वर्णसंकर कलिं भिन्नसेतु सब लोक।
करिति पाप पावति दुःख भय रुज वियोग शोक ॥ १०० रा ॥
श्रुतिसंमत हरिभक्तिपथ संयुत विरति विवेक।
तो न धरिति नर मोहवश कल्पिति पंथ अनेक ॥ १०० म ॥
श्रृणु खगेश कलि कपट हट द्वेष दंभ पाखांड।
मान-मोहमारादि-मद—व्याप्त सदा ब्रह्मांड ॥ १०१ रा ॥
तामस धर्म करिति नर व्रत जप तप मख दान।
देव न वर्षी धरणीं उप्त न उगवे जाण ॥ १०१ म ॥
श्रृणु भुजगारी काल कलि मल-अवगुण-आगार ॥ १०२ रा ॥

आतां मधले कांहीं छंद नमुन्यादाखल पाहा —

बहु दाम सुसाजिति धाम यती। विषयीं हरली नुरली विरती ॥
तपसी धनवंत दरिद्र गृही। कलि कौतुक ये वदतां न च ही ॥
पितरां सुत मानिति तोंवर ही। अबलानन जोंवर दृष्ट नही ॥
नृप पापपरायण धर्म नही। जन दंड-विडंबित संततही ॥
नहि मानि पुराण न वेदहि जो। हरिसेवक संत खरा कलिं तो ॥
सब लोक वियोग विशोक हृत। वरणाश्रम धर्म अचार गत ॥
दम दान दया नहिं जाणपणा। जडता परवंचनताऽति धना ॥
तनु पोषक सर्वहि नारिनर। भरले परनिंदक विश्वभर ॥

ल. ठे. — कलिवर्णनांत दो. १०१ – १०२ मध्यें तोटक छंद वापरला आहे. **तोटक = कलह करणारा. आणि कलि = कलह**, विरोध, वैर. कलींत कलहाचें प्राधान्य म्हणून वृत्तसुद्धां तोटक = 'कलह करणारें' या अर्थाचें वापरलें.

येथें १५ वें मुख्य प्रकरण 'कांहीं स्वभाव निदर्शन' पुरें झालें. पुढील सोळाव्या मुख्य प्रकरणांत मानसांतील विविध शिष्टाचारादि विषयांचें वर्णन आहे.

◆◆◆◆

१६ : शिष्टाचारादि विविध विषय-वर्णन

卐 卐 卐 १६।१ 卐 卐 卐

शिष्टाचार-दिग्दर्शन

श्रीरामचरितमानसांत शास्त्रानुसारी अनेक शिष्टाचारांचें दिग्दर्शन प्रत्यक्ष कृतीनेंच केलें आहे; व त्या निमित्तानें त्या त्या शास्त्रादि नियमांची सूचना देऊन ठवली आहे.

१. भेटीस-दर्शनास जाणें. — राजा, राजपुत्र, संत इत्यादींच्या भेटीस, दर्शनास, जातांना रिक्तहस्तें जाऊं नये; कांहीं तरी भेट न्यावी व ती ज्याला न्यावयाची असेल त्याच्या अधिकारास व परिस्थितीस शोभेल अशी योग्य न्यावी. (उदा० संन्याशाच्या दर्शनास जातांना पैसे, सिगारेटचें पाकीट अशा वस्तू नेणें योग्य नव्हे.) हें निषादराज-रामभेट व निषादराज-भरतभेट या दोन प्रसंगीं (२।८८।१–७ व २।१९३।१–दोहा १९३) दाखविलें आहे. नेलेली यथोचित भेट पुढें ठेवून यथोचित वंदनादि करावें.

२. नमन — परस्परांचे संबंध व अधिकार यांस अनुसरून नमनांत विविध भेद दाखविले आहेत. साष्टांग नमनाचा उल्लेख कोठेंच नाहीं; पण त्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या दण्डवत नमस्काराचें वर्णन अनेक ठिकाणीं आहे. श्रेष्ठांना, विप्रांना, संत, मुनी इत्यादींना दण्डवत केल्याचे उल्लेख आहेत. शिष्यांनीं गुरूला पायावर डोकें ठेवून व क्वचित दण्डवत प्रणाम केले आहेत. मित्रादिकांनीं गळ्यांत गळा घालून भेटावें; कनिष्ठांनीं वंदन केल्यावर वरिष्ठांनीं-श्रेष्ठांनीं आशीर्वाद देऊन कुशल विचारावें. प्रेमानें, विनयानें, मधुरवाणीनें बोलून नमस्कार करावा.

' सुजन समाज सकल गुणखाणी । प्रेमें करीं प्रणाम सुवाणीं ॥ १।२।४ ॥ करीं = मी करतों.

(क) परिचय नसतां वंदन करतांना पित्याचें नांव, स्वतःचें नांव, जात, गांव वगैरे सांगून नमस्कार करावा.

(ख) अस्पृश्यादिकांनीं जोहार केल्याचें वर्णन आहे. महाराष्ट्रांत ही चाल होतीच. (दामाजी नाटकांत पाहा.)

(ग) स्त्रियांनीं साष्टांग किंवा दण्डवत केल्याचें एकहि उदाहरण नाहीं. त्यांनीं देव-गुरुविप्र यांनासुद्धां साष्टांग नमस्कार करूं नये. पति, गुरु व देव यांशिवाय कोणाच्या पायालाहि स्पर्श करूं नये हें कृतीनें दाखविलें आहे.

(घ) एका हातानें प्रणाम निषिद्ध आहे.

(ङ) **नमस्कार करून हात जोडून बोलणारा कांहीं तरी याचना करणार असें नक्की समजावें. ही याचना-मुद्रा आहे.**

(च) नीचांनीं-दुष्टांनीं केलेलें नमन भावी दुःखाचें पूर्वचिन्ह समजून जपून वागावें.

'नमन नीचकृत दुःखद फारहि। सम अंकुश धनु अहि मार्जारहि' (३।२४।७)

(छ) प्रणम्य-वंद्य-असूनसुद्धा वंदन केव्हां करूं नये हे दाखविण्यासाठीं मानसांत दोन उदाहरणें दिलेलीं आहेत. एक बालकाण्डांत रामलक्ष्मण पुष्पवाटिकेंतून फुलें वगैरे घेऊन आले त्यावेळीं विश्वामित्रांस वंदन केलें नाहीं; व त्यांनींहि आर्शिवाद दिला नाहीं; कारण त्यावेळीं दोघांच्या हातांत फुलें होतीं. (१।२३७।१–४ टीका पाहा.) दुसरें उदाहरण अयोध्याकांडांत, वनवासाची वार्ता कळण्यापूर्वीं राम सुमंत्राबरोबर दशरथांकडे आले; त्यावेळीं दशरथ व्याकुळ होऊन आडवे पडलेले होते; म्हणून तेव्हां श्रीरघुनाथानें नमस्कार केला नाहीं. सचिवानें राजाला उठवून बसविल्यावर मग रघुनाथानें नमस्कार केला. (२।३९ – ४३।२ पर्यंत पाहा.)

(३) विवाहकंकण सुटेपर्यंत वधूवरांनीं माता, पिता, गुरु, विप्र व देव (गुरु शब्दानें सासू, सासरा इत्यादिकांचें ग्रहण होतें) **यांशिवाय इतर कोणास वंदन करूं** नये; कारण कीं **तोंपर्यंत वधूवर लक्ष्मीनारायण–स्वरूप असतात.**

(४) गुरु, विप्र, संत, व्याही इत्यादि माननीयांचें यथोचित स्वागत करून त्यांस हात धरून योग्य आसनावर बसवावें.

(५) पुत्रपौत्र शिष्यादिकांचें गुण, महती इत्यादि त्यांच्या तोंडावर वर्णन करूं नये. हीं उदाहरणें पुढें स्वतंत्र प्रकरणांत दिलीं आहेत.

(६) जीवन्मुक्त-ज्ञानी-भक्त इत्यादींचा व्यवहार विदेह जनकराजाच्या विस्तृत चरित्रानें दाखविला आहे. (१।२१४।८ – २८९; ३०४।५ – ३४३।६; आणि २।२०७।४ – ३२२।७ पर्यंत पाहा). **तो पाहिल्यानें भारतीय साम्यवादाची यथार्थ कल्पना येईल**; व समाजांत बाह्य समता उत्पन्न होणें शक्य नाहीं हें दिसेल. जीवन्मुक्त-समदृष्टि यांचें हें उदाहरण आहे.

(७) संध्यावंदनादि नित्यकर्म केल्याशिवाय नैमित्तिक कर्म करूं नये याचें उदाहरण दशरथचरित्रांत जनकपुरींत गोदान करण्याच्या वेळीं दाखविलें आहे.

(८) दान देतांना दात्याची भावना व भाषा कशी असावी हें त्या गोदान-वर्णनांतच दाखविलें आहे.

(९) गुरु वगैरे श्रेष्ठांना विनंति करून कांहीं परवानगी मागावयाची असेल किंवा कांहीं प्रश्न, शंका विचारणें असेल तर आधीं नमन करून विचारण्याची परवानगी नम्रपणें मागावी हें नगरदर्शनास जाण्यापूर्वीं रामचरित्रांत दाखविलें आहे.

(१०) **वचन-पालन —**

माझे प्राण नाथ। सुत दोनी। *तुम्हि मुनि पिता आन नहिं कोणी* ॥ (१।२०८।१०)

असें म्हणून आपलें पितृत्व निवृत्त करून रामलक्ष्मणांस विश्वामित्राच्या हवालीं केल्यावर दशरथ सम्राट असून पुत्रांच्याबरोबर नोकरचाकर, पैसा, वस्त्रें, पाथेय इत्यादि कांहींसुद्धां दिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांचा कुशल समाचार कळण्यासाठीं सम्राट दशरथानें कांहींही व्यवस्था केली नाहीं. यांत केवढा त्याग, सहनशीलता व इन्द्रियनिग्रह करावा लागला असेल याची कल्पना इतरांस करतां येणें अशक्य आहे. वाटेल तें सहन करावें पण वचनास बाध येऊं देऊं नये हें येथें दाखविलें आहे.

वेदशास्त्रपुराण-धर्म-नीति-लोकाचार-पालनाचें आदर्श निदर्शन श्रीमानसांत पदोपदीं केलें आहे; त्यांतील कांहीं नमुने वर दाखविले, पण हें सागरांतील गुप्त रत्नें दाखविण्यासारखेंच झालें आहे; या दृष्टीनें विचार करून वाचकांनीं पुष्कळसे आदर्श पाहणें आतां शक्य होईल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।२ 卐 卐 卐

वस्तूचें वा व्यक्तीचें महत्त्व चार गोष्टींवर

जन्म (**कुल**), **रूप, शील आणि संगति** या चार गोष्टींवरून वस्तूचें वा व्यक्तीचें महत्त्व ठरविलें जातें असें मानसांतील वर्णनावरून सिद्ध झालें आहे. श्रीरघुवीरानें केलेलें वर्णनच प्रथम घेऊं.

१. जन्म सिंधुमाधिं, बंधु विष, दिनमलीन सकलंक ।
सीतामुखसमता किं या *चांद बापुडा* रंक ॥ (१।२३७)

चंद्राची हीनता सिद्ध करण्यासाठीं चार गोष्टींचा उल्लेख केला.

(१) **जन्म सिंधुमाधिं** – सागर जड असून त्याच्या ठिकाणीं अनेक दोष आहेत; म्हणून जन्म हीन कुलांत हें ठरलें.

(२) **बंधु विष** – चंद्राची आणि हालाहल विषाची उत्पत्ति सागरांतूनच झाली म्हणून विष चंद्राचा वडीलभाऊ ! दुष्टाची संगति, हीन संगति आहे.

(३) **दिनमलीन** – दिवसां निस्तेज, म्लान, मलीन दिसतो; हा स्वभावदोष आहे. आणखी अनेक स्वभावदोष पुढील चौपायांत दाखविले आहेत; शीलानें हीन ठरला.

(४) **सकलंक** – चंद्रबिंबांत काळे डाग-कलंक आहेत; म्हणून रूप कलंकित ठरलें. चंद्र असा चारी प्रकारें हीन असल्यामुळें तो सीतामुखसमता कशी पावूं शकेल ? याच्या उलट भरतकीर्तिविधु वर्णन (२।२०९।१ – २१०।२) पाहावें.

२. शरयूनाम सुमंगलमूल (१।३९।१२). शरयू (सरयू) नदी – (१) मानसमूल, सुमानसनन्दिनि (१।३९।१३). यानें उच्च, **पवित्र कुल** (**जन्म**) सांगितलें.

(२) ' मिळे सुरसरिते ' – गंगेला मिळते व तीरावर अयोध्या नगरी आहे. यानें श्रेष्ठ, **पावन संगति** सांगितली.

(३) ' मनोहर ' – यानें **उत्तम रूप** सांगितलें (४०।१).

(४) नदी पुनीत, पावन करते, सुमंगलमूला, इत्यादींनीं **उत्तम शील**, व उत्तम प्रभाव सांगितला. याप्रमाणें चार गोष्टीच सांगितल्या आहेत व चारी उत्तम, पावन आहेत.

३. **बिभीषण** — या चारी गोष्टींनीं अति हीन असल्याचें बिभीषणान स्वतःच सांगितलें आहे.

' नाथ ! दशमुखाचा मी भ्राता । निशिचरवंशज, विबुधां त्राता ! ॥
सहज अघप्रिय तामस देह । जसा उलूकां तिमिरीं स्नेह ॥ (५।४५।७-८)

(१) निशाचरवंशांत जन्म म्हणजे **कुल अधम**,

(२) दशमुखाचा भ्राता – **संगति अधमाची** दुष्टाची,

(३) **सहज अघप्रिय, जसा उलूकां तिमिरीं स्नेह**–यानें **शील, स्वभाव अधम** ठरला,

(४) तामस देह – राक्षसाचा अधम देह, **रूप अधम ठरलें**. याप्रमाणें कुल, संगति, शील व रूप या चारी गोष्टींनीं मी अधम आहें असें बिभीषणानें सुचविलें. त्यांतच रघुनाथ चारी प्रकारांनीं श्रेष्ठ असल्याचें दाखविलें आहे.

अशीं आणखी उदाहरणें १।४८।२; १।७०।५; १।३१४।६ इत्यादि अनेक आहेत. टीकेंत त्या त्या ठिकाणीं विस्तारानें स्पष्टीकरण केलें गेलें आहे. या चार गोष्टींकडे लक्ष ठेवून **मानसाचें** निरीक्षण करावें म्हणजे काव्यकलेचा आस्वाद घेतां येईल.

कुल बदलणें शक्य नसतें व सहज रूपांत फारसा बदल करतां येत नाहीं, पण संगतीनें व हरिभक्तीनें स्वभाव बदलतां येतो, म्हणून संतसमागम व भगवद्भक्ति यांचा आश्रय प्रयत्नपूर्वक करावा. ' बुधसेवेविण शील किं मिळतें ' बुध = साधु, संत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।३ 卐 卐 卐

लहानांची महती मुखावर वर्णू नये

लहान म्हणजे वयानें, नात्यानें, अधिकारानें लहान, कमी, कनिष्ठ असलेले पुत्र, सेवक, शिष्य, भाऊ इत्यादि. हा सिद्धान्त रघुनाथानें चित्रकूटास स्पष्ट शब्दांत सांगितला आहे.

(१) **रघुनि बंधु लघु मति संकुचते । वदत मुखावर भरतमहत्ते** ॥ (२।२५९।७)

(२) **गुरुसमाजिं लघुबंधुगुण कुसमायीं वदुं शकतात ?** ॥ (२।३०४)

(३) उत्तरकाण्डांत सुग्रीवादिकांना निरोप देण्याचे वेळीं श्रीरघुनाथ प्रभु म्हणाले,
' सेवा केली तुम्हीं मम अती । *कशी मुखावर वर्णू महती* ॥ '

(७।१६।२ पासून पुढें पाहा). प्रभूंनीं असें जरी म्हटलें तरी वरील तिन्ही ठिकाणीं प्रेमभक्तीला वश झाल्यामुळें प्रभूंनीं भरतादिकांची महती प्रसंगानुरूप थोडीशी तरी वर्णिली आहेच; या नियमाचें काटेकोर पालन जनकराजा, दशरथ महाराजा व कौसल्यादि माता यांनीं बालकाण्डांत केलें आहे व तो आदर्श अनुकरणीय आहे.

मोठ्या माणसांनीं मुखावर गुणादिकांची प्रशंसा केल्यानें त्या लहानांच्या ठिकाणीं वृथा अहंकार उत्पन्न होऊन त्यांचा विनाश होणें सोपें असतें; म्हणून हा नियम पाळणें फार महत्त्वाचें कर्तव्य आहे. मुखावर केलेली मोठ्यांची प्रशंसासुद्धां शब्दशः खरी मानली जाण्याचा संभव फार कमी असतो, म्हणूनच—

' स्तुती करावी परमेश्वराची । करूं नये, व्यर्थ, कधीं नराची '

असें ४०।५० वर्षांपूर्वीच्या शालेय पुस्तकांत म्हटलें होतें.

(१) श्रीरघुवीरानें धनुर्भंग करून विदेहाचा पण सिद्धीस नेला व नंतर उपस्थित झालेलें महादुर्धर संकट (भृगुपतिकोपकृशानु) दोघा बंधूंनीं भार्गव-गर्व-परिहार करून शान्तपणें टाळलें; तेव्हां जनकराज विश्वामित्रांजवळ जाऊन त्यांस म्हणाले,

' प्रभूप्रसाद ! राम धनु खंडिति । मंज कृतकृत्य करिति हे भ्राते ॥ (१।२८६।५–६). रामलक्ष्मण तेथेंच असल्यानें जनकानें सर्व श्रेय विश्वामित्रांना दिलें. प्रभू ! आपल्या प्रसादानेंच रामचंद्रांनीं धनुर्भंग केला इ. म्हणाले. राम परमात्मा ब्रह्म आहेत हें जाणूनसुद्धां त्यास श्रेय दिलें नाहीं.

(२) दशरथ राजानें जनकपत्रिका कौसल्यादि राण्यांना वाचून दाखविली आणि—

राम नि लक्ष्मण-कीर्ती करणी । वारंवार भूपवर वर्णी ॥

परंतु शेवटीं **' म्हणुनि मुनिकृपा ' द्वारिं निघाले ॥** (१।२९५।६–७).

रामलक्ष्मण हजर नाहींत म्हणून राण्यांच्याजवळ त्या दोघांच्या कीर्तीची वगैरे मनमुराद प्रशंसा केली; तथापि ते दोघे आल्यावर पुत्रवात्सल्यरसांत वाहात जाऊन माता मुलांच्या मुखावर त्यांचा मोठेपणा गातील हें जाणून ' मुनिकृपेनेंच हें सर्व घडलें ' असें म्हणून दशरथ निघून गेले. पूर्वी केलेल्या सर्व वर्णनावर एका वाक्यानें सारवण घातलें; याचें नांव वक्तृत्वकलेचा सदुपयोग व मर्यादापालनाची दक्षता !

(३) तशी पुनीत कौसल्या देवी असल्यानें व सूचनेंतील हेतु सर्व राण्यांना कळल्यानें ३–३॥ महिन्यांनीं रामलक्ष्मण घरीं आल्यावर कौसल्यादि माता श्रीरघुवीरास काय म्हणाल्या पाहा —

' जातां मार्गीं महा भयंकर । हत कशि तात ताडका दुर्धर ॥
घोर निशाचर विकट भट समरिं न गणति कुणास ॥
कसे ससेना मारिले मारिच सुभुज खलांस ॥ ३५६ ॥
धन्य *मुनिकृपें तुमचीं सारीं* । बाळ *संकटें ईश निवारी* ॥ १ ॥
दोघांनीं कृत मुनिमखरक्षण । प्राप्त गुरुकृपें विद्या तत्क्षण ॥

मुनिवधु तरे चरणरज लागुनि । कीर्ति राहिली विश्वा व्यापुनि ॥
कमठपीठ-पविकूट-कठोर । भग्न भूपगणिं भवधनु थोर ॥
विश्वविजययश जानकि पावुनि । आला भवना बंधु विवाहुनि ॥
अतिमानुष तव कर्में सगळीं । केवळ कौशिककृपेंचि घडलीं ॥ ६ ॥

सर्व प्रताप वर्णन करीत, मधें मधें विश्वामित्र मुनींना श्रेय देत बोलल्या आणि शेवटीं त्या प्रशंसेवर एक पोतेरें फिरवलें कीं सर्व गोष्टी केवळ मुनीच्या कृपेनेंच घडल्या. तुमच्या या कोमल बाहूंत, या वयांत कुठला एवढा पराक्रम! तुम्हांला मुनिश्रेष्ठांनीं फुकटची कीर्ति मिळवून दिली इतकेंच.

दशरथांपेक्षां कांकणभर जास्त दक्षता कौसल्यादि मातांनीं घेतली. येथेंहि वक्तृत्व-केला व आदर्श नीतिमर्यादापालन यांचा प्रीतिसंगम आहेच. राम भगवान आहेत हें कौसल्या व सुमित्रा यांना माहीत असून असें बोलणें व वागणें फारच कठिण होतें. दशरथांस हें रहस्य माहीत नसल्यानें ते बोलले त्यांत कांहीं विशेष नवल नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।४ 卐 卐 卐

स्वागत सन्मानादि

कोणी पूज्य, सन्मान्य, वन्दनीय पुरुष येत आहेत असें कळतांच, ते आपल्या घराजवळ येण्यापूर्वीं सामोरें (पुढें) जाऊन त्यांचें स्वागत करून त्यांस निवासस्थानीं आणणें व यथाधिकार पूजनादि सन्मान करणें सत्यतेचें, आदराचें, लीनतेचें व प्रेमाचें लक्षण समजलें जातें; व हें धार्मिक कर्तव्यहि आहे; पूज्यपूजाव्यतिक्रम हा मोठा दोष आहे व त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. स्वागतसन्मानाचीं उदाहरणें मानसांत प्रत्येक सोपानांत आहेत.

बालकांड — (१) विश्वामित्र व दशरथ **सम्राट**

मुनि **आगमन कळे जैं राजा । भेटुं जाति सह विप्रसमाजा ॥**
करुनि दण्डवत **सन्मानें मुनि- । बसविले निज आसनिं नेउनि ॥**
प्रक्षालुनि पद कृत अति पूजा । मजसा धन्य आज नहिं दूजा ॥
भोजन नानाविधा घातलें (२०७।१४)

आणि मग आगमनाचें कारण वगैरे विचारलें.

(२) विश्वामित्रांस जनकराजा आमराईंत येऊन भेटतात.

विश्वामित्र *महामुनि* **आले । मिथिलापतिला वृत्त मिळालें ॥**
सवें सचिव शुचि भूरि भट भूसुर-वर गुरु ज्ञाति ।
असे मुदित मुनिनायका नृप भेटाया जाति ॥ २१४ ॥

प्रणमति **नृप** *शिर ठेवुनि पायां । देति* **मुदित** *आशीस मुनिराया ॥*
विप्रवृंद सब सादर वंदति । महाभाग्य जाणुनि आनंदति ॥
वारंवार पुसति कुशलाला । बसविति विश्वामित्र नृपाला ॥ ३ ॥

विश्वामित्रांनीं बसा असें सांगेपर्यंत जनकराजा बसले नाहींत.

(क) विश्वामित्र दशरथांकडे गेले तेव्हां देवडीजवळ थांबून आपण आल्याची वर्दी पाठविली होती; येथें विश्वामित्र गांवाबाहेर आमराईतच उतरले होते. तेथें मुनि व तेथें महामुनि कां ? इत्यादि शंकांचें समाधान गूढार्थचंद्रिका करते.

(३) दशरथराजा वऱ्हाडासह जनकपुरीजवळ आले तेव्हां, सम्राट व व्याही असूनसुद्धां जनकराजा स्वतः सामोरें आले नाहींत; शतानंदादिकांस पाठविले आहे. जनकराजा ब्रह्मलीन विज्ञानी असूनसुद्धां ते व्यावहारिक, शास्त्रीय व लौकिक बाह्य भेद पाळीत असलेले दिसतात. व्याहीभेट शास्त्रविधीनें व ठरलेल्या वेळींच होणें योग्य म्हणून स्वतः सामोरें गेले नाहींत.

(४) गिरिराज हिमालयानें नारदांचें स्वागत-पूजनादि केल्याचें वर्णन १।६६।५-८ मध्यें आहे.

(५) शीलनिधि राजाकडे नारद गेल्यावर त्यानें स्वागत केलें आहे. (१।१३०।८)

अयोध्याकांड — (१) श्रीरघुनाथ वसिष्ठांचें स्वागतादि करतात —

वसिष्ठांस नरपति बोलावति । रामधामिं उपदेशा लावति ॥ १ ॥
गुर्वागमन कळत रघुनाथा । द्वारिं येति पदिं नमिती माथा ॥ २ ॥
सादर अर्घ्य देति गृहिं आणिति । षोडशपरिं पूजुनि सन्मानिति ॥ ३ ॥
सीतेसह गुरुपद मग धरले । रामकमलकर जोडुनि वदले ॥ (९।१-४)

शिष्यानें गुरूचें स्वागत कसें करावें याचा क्रम व विधि दाखविला. यांत प्रथम अर्घ्य असून पुन्हां षोडशोपचारांचा उल्लेख आहे, त्यांतहि अर्घ्य असतोच.

सूचना—येथें हा स्वागतविधि यथाक्रम सर्व दिला असल्यानें पुढें मागें जेथें अशा प्रकारच्या स्वागतांत संक्षेप केला असेल तेथें हा विधि अध्याहृत घ्यावा.

(२) **श्रीरघुनाथाचें निषादराजकृत** — श्रीरघुनाथ गंगातीराला उतरले आहेत हें—

कळतां वृत्त निषाद गुहाला । मुदित बोलवी प्रिय सुहृदांला ॥
फलमूलादि भेट घे फारहि । निघे भेटुं हृदिं हर्ष अपारहि ॥
भेट समर्पुनि करी दण्डवत । प्रेमें प्रभुसि राहि अति निरखत ॥ (८८।१-३)

हा जातीनें अस्पृश्य असल्यानें यानें पूजन केलें नाहीं.

(३) **भरद्वाज** श्रीरामास सामोरें आले नाहींत; कारण त्यांस आधीं समाचार मिळाला नाहीं. भेटीचें वर्णन १०६।७ पासून १०७।४ पर्यंत पाहावें.

(४) वाल्मीकि– ' **श्रवुनि रघुवरागमन मुनि पुढें येति नेण्यास ॥** १२४ पासून १२५।४ पर्यंत भेटीचें वर्णन आहे. रघुवर या भावनेनेंच स्वागत केलें आहे.

(५) वसिष्ठादि चित्रकूटाजवळ आल्याचें कळतांच

' श्रवुनि शीलनिधि गुरु–आगमना । सितेपाशिं ठेवुनि रिपुदमना ॥
चलति सवेग राम तात्काळहि । धीर धर्मधुर दीनदयाळहि ॥
गुरुस बघुन सादर अनुरागति । नमन दण्डवत् प्रभु करूं लागति ॥
मुनिवर धावुनि हृदयीं धरती । प्रेमभरें उभयांस भेटती ॥ (२४३)

(६) मिथिलेश जनकराजा येत आहेत असें कळतांच —

बंधु, सचिव, गुरु, लोक संगतीं । गमन करिति रघुनाथ पुढतीं ॥ (२७५।१-८ पाहा)

अरण्यकांड–(१) **अत्रि**—राम येत आहेत असें ऐकतांच महामुनि हर्षित झाले व

वपु पुलकित मुनि उठुनि धावले । (३।४ पासून दो. ३ पर्यंत पाहा.)

(२) **शरभंग** — आधीं कळलें नाहीं. श्रीरामास पाहातांच हे इतके प्रेममग्न झाले कीं सर्व व्यवहार व शिष्टाचार विसरले व एकदम स्तुति करूं लागले.

(३) **सुतीक्ष्ण – प्रभु आगमन खबर जैं पावे । सत्वर करत मनोरथ धावे ॥**

(१०।३ – दो. १० पाहा.)

(४) **अगस्ति** — सानुज सीतेसह कोशलाधीश कुमार भेटण्यास येत आहेत असें कानीं पडतांच अगस्ती उठुनि धावले । (१२।९ पासून दो. १२ पर्यंत पाहा.)

सूचना — अयोध्याकांडांतील भरद्वाज व वाल्मीकि व अत्रि आदि हे चार मुनी यांनीं केलेल्या स्वागत–पूजनादिकांत विविध भेद दाखवून या सहा मुनींच्या हृदयांतील भावनांचें मोठें मार्मिक भावचित्र रंगविलें आहे. टीकेंत सविस्तर तुलना असून कोष्टक-रूपानेंहि आहे.

(५) **शबरी**–राम एकदमच शबरीच्या आश्रमांत गेले. ' शबरी बघुनि राम घरिं आले । ' (३४।५ पासून पुढें पाहणें.) कवींनीं आश्रम म्हटलें आणि शबरी घर म्हणाली तें कां आणि ' घरिं ' शब्दांतील श्लेष टीकेंत पाहणें.

(६) नारदांचें श्रीरघुनाथानें केलेलें स्वागत (४१।१० – ११ पाहा.)

किष्किंधाकांड — प्रारंभींच सुग्रीवानें हनुमन्तास पाठविलें असलें तरी स्वागत करण्यासाठीं पाठविलें नसून परीक्षेसाठीं पाठविलें आहे.

(१) सुग्रीवास मोहनिद्रेंतून जागें करण्यासाठीं रामानुज किष्किंधेजवळ गेले व क्रोधाचें नाट्य केलें तेव्हां सुग्रीवानें हनुमन्ताला तारेसह पाठविलें आहे. (२०।२ पासून दो. २० पर्यंत पाहणें.) **हें राजनीतींतील स्वागत आहे.** सुग्रीव कां गेला नाहीं व तारेला कां पाठविलें वगैरे शंकांचें समाधान गूढार्थचंद्रिका करील.

(२) स्वयंप्रभेनें विवरांत रामदूतांचें केलेलें स्वागत (२४ – २५।६ पाहा.)

सुन्दरकांड — (१) ब्राह्ममुहूर्तीं बिभीषण जागा होतांच कोणीतरी विप्र दरवाजापाशीं आला आहे असें त्याच्या शब्दांवरून ओळखतांच ' बिभीषण येति उठोनी ' (६।५ – ७ पाहणें.)

अनोळखी ब्राह्मण, मोठ्या पहाटेस, विप्रभक्षकांच्या नगरींत (लंकेंत) आला असतां विष्णुभक्त राक्षसानें केलेलें हें स्वागत आहे. भक्तांनीं भक्त ओळखण्याचें मर्म या भेटींत प्रकट केलें आहे. (गूढार्थचंद्रिका पाहा.)

लंकाकांड — श्रीरघुनाथ गंगातीरावर परत आल्याचें

ऐकुनि गुह धावे प्रेमाकुल । आला निकट परम सुखसंकुल ।। (१२९।१० व छंद)

उत्तरकांड (१) — सीतालक्ष्मणांसह श्रीराम कुशल येत असल्याचें कळल्यानंतर भरत स्वागतास जातात. दो. ३ रा व ४ रा पासून पुढला भाग पाहावा.

(२) श्रीरघुनाथ बागेंत गेलेले असतां तेथें सनकादिक मुनी येतांना दिसतांच प्रभूंनीं दंडवत प्रणाम केला व आपल्या अंगावरलि पिवळा शेला बसण्यास दिला वगैरे दो. ३२ पासून ३३ पयत पाहणें.

(३) पक्षिराज गरुडाचें काकानें केलेलें स्वागत — (६३।६ – ८)

येतां बघुनि सकल–खगराजा । हर्षें वायससहित समाजा ।।
अति आदर खगपतिचा केला । दिलें शुभासन पुसून कुशला ।।
अनुरागें खगराज पूजला । मधुर वचन मग वदे कावळा ।।

याप्रमाणें मानसांतील हीं २४ उदाहरणें वर दिलीं आहेत; पण त्यांत पुनरुक्ति कुठेंहि नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ? या उदाहरणांच्या तुलना बोधप्रद आहेत; पण येथें नकोत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।५ 卐 卐 卐

सुहृदांचा उपदेश न मानल्याचे परिणाम

सद्गुरु, संत, माता, पिता, पति, मित्र इत्यादि अत्यंत प्रेमळ सुहृदांचा उपदेश न मानल्यास विविध संकटें, विपत्ति, अकीर्ति, सत्तानाश, ऐश्वर्यहानि, अथवा मरण येणें हे परिणाम भोगावे लागतात.

दीपनिर्वाणगन्धं च सुहृद्वाक्यमरुन्धतीम् ।
न जिघ्रन्ति न शृण्वन्ति न पश्यन्ति गतायुषः ।।

सुहृदांचा हितोपदेश न मानल्याचे दुष्परिणाम प्रत्येक सोपानांत दिसतात.

बालकाण्ड — (१) शंकरांसारख्या सर्वज्ञ, सर्वदर्शी व अत्यंत प्रेमळ पतीचें वचन सतीनें मानलें नाहीं तर ८७ हजार वर्षें पतिवियोग सहन करावा लागला, व तोंड दाबून गुपचुप सर्व सहन करावें लागलें.

(क) पुन्हां दक्षाच्या यज्ञांत जाण्याच्या वेळीं ऐकलें नाहीं तर देहत्याग करण्याची पाळी आली ! व त्यामुळें इतरही पुष्कळांचा नाश झाला.

(२) नारदमुनींनीं शंकरांचा हितोपदेश मानला नाहीं तेव्हां इतकी फजीती

झाली कीं नारद होते ते तोंडांत ना रद (दन्त) असे झाले असें म्हटलें तरी चालेल.

हित उपदेशिति शंभु जरि नहि नारदा पसंत । (१।१२७)

अयोध्याकाण्ड — (१) दशरथासारख्या देहधारी स्नेहानें, शुद्ध हृदयी पतीनें हातापायां पडून नाना प्रकारें कैकयीची समजूत घातली व रामवनवासाचा वर बदलून घे असें प्रेमानें सांगितलें व न ऐकलेंस तर काय होईल हेंहि बजावून सांगितलें.

' भरत न होउ इच्छि मुळि नृपती । विधिवश जीवीं वसे तव कुमती ॥
पुन्हां स्ववश पुरि वसेल शोभन । राम सकल-गुण-निधिचें शासन ॥
करितिल बंधु रामसेवा किल । राम महत्ता त्रिलोक गातिल ॥
तुझा कलंक नि पस्तावा मम । मरुन नष्ट कधिं होइ न उपशम ॥
आतां कर जें रुचे तव मना । (३६।१-६)

या गोष्टी अक्षरशः खऱ्या ठरल्या आहेत. दशरथांस मात्र १४ वर्षेंच पश्चात्ताप सोसावा लागला.

(२) कैकयीच्या अत्यंत विश्वासांतल्या व प्रेमांतल्या सखींनीं तिला नाना प्रकारें विनवून सांगितलें. पण तिनें कोणाचेंच ऐकलें नाहीं. शेवटीं परिणाम हा झाला कीं, तिच्याएवढें दुःख कोणासच भोगावें लागलें नाहीं.

अरण्यकाण्ड — (१) रावणाला आपल्या नीच संकल्पापासून परावृत्त करण्यासाठीं मारीचानें पुष्कळ विनवून पाहिलें. पण त्याला ' गुरुसम मूढ ! करिसि मज बोधा ' (३।२६।२) ही गुरुदक्षिणा मिळाली.

(२) पक्षिराज जटायूनें स्पष्ट सांगितलें कीं, सीतेला सोडून दे व कुशल घरीं जा नाहींतर,

' रामरोष अति भीषण पावक। होइल सकल शलभ कुल तावक।। ' (३।२९।१६-१७)

रावणानें दोघांचेंहि मानलें नाहीं व परिणाम, अपकीर्ति, सर्वस्वाचा विनाश व शेवटीं मरण आलें.

(३) सीतेनें लक्ष्मणाचें सांगणें मानलें नाहीं व १४ महिने १० दिवस रावणाच्या लंकेंत रामविरहदुःखांत कंठावे लागले व शेवटीं अग्निदिव्य करावें लागलें.

किष्किंधाकाण्ड — वालीनें तारेसारख्या शुद्ध हृदयी, राजनीतिपटु, प्रेमळ पतिव्रता पत्नीचें ऐकलें नाहीं. राज्य गेलें व मरण आलें.

सुन्दर व लंकाकाण्ड — रावणाला अनेक सुहृदांनीं उपदेश केला पण कोणाचेंच ऐकलें नाहीं. परिणाम प्रसिद्धच आहे.

उत्तरकाण्ड — रामराज्यांत असें मुळींच घडलें नाहीं; पण भुशुंडीच्या पूर्वचरित्रांत शूद्रजन्मांत त्यानें दयाळू, शान्त अशा आपल्या गुरूंचें ऐकलें नाहीं व शेवटीं महेशांनीं घोर शाप दिला.

याप्रमाणें सुहृदांनीं प्रेमानें केलेला उपदेश न ऐकल्याचे असे घोर परिणाम झाले.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।६ 卐 卐 卐

स्नान-पान श्रमपरिहार-सुख

स्नान केल्याशिवाय जलपान (पाणी पिणें) सुद्धां करूं नये असा आचारधर्म व उपासनाधर्म असल्यानें मानसांत सर्व सोपानांत स्नानानंतर जलपानाचा उल्लेख सांपडतो. स्नानानें श्रमपरिहार होतो व जलपानानें सुख होतें, हेंहि पुष्कळ ठिकाणीं दाखविलें आहे. प्रत्येक सोपानांतलि १।१ च उदाहरण पुढें दिलें आहे.

बालकाण्डांत — प्रतापभानुराजा शिकारीला गेला असतां एका मोठ्या डुकराच्या शिकारीच्या नादांत घोर अरण्यांत रस्ता भुलला. भूक व तहान फार लागली तेव्हां पाणी शोधीत भटकला तोंच त्याला एक आश्रम दिसला. तेथें जातांच एक महामुनि दिसला तेव्हां,

उतरुनि तुरगावरुनि वंदिलें । परम चतुर निजनाम न कथिलें ॥ ८ ॥
तृषित बघुनि भूपास तो दाखवि तया तलाव ।
स्नान पान करि सह ह्या हर्षानें नृपराव ॥ १५८ ॥

सम्राट असून सर्व दिवसभर दमलेला, चिंतातुर झालेला व फार तृषात झालेला असतांसुद्धां आधीं स्नान केलें व मग जलपान केलें. स्नानाचा व पाणी पिण्याचा परिणाम पाहा. 'श्रम गत सकल, सुखी नृप झाला । ' (१५९।१) श्रम गेले हा स्नानाचा परिणाम व सुखी झाला हा पाणी पिण्याचा परिणाम होय. हा भेद अयोध्याकांडांतील पहिल्याच उदाहरणांत दाखविला आहे.

अयोध्याकाण्डांत —सीता व लक्ष्मण यांच्यासह ९०।९५ मैलांचा प्रवास २-२॥ प्रहरांत रथानें करून श्रीरघुनाथ शृंगवेरपुरास पोचले; व गंगेवर गेले आणि

' *करतां स्नान पथश्रम हरले । शुचि जल पितां मुद मन भरलें ॥* ' (८७।७)

स्नानानें श्रम गेले व जलपानानें सुख झालें. मागील वचनांत अस्पष्ट असलेला कारण-कार्य-संबंध येथें स्पष्ट केला. श्रीतुलसीकाव्य-कलेचा हा एक नमुना आहे.

अरण्यकाण्डांत — श्रीरामलक्ष्मण पंपासरोवरास जाऊन पोचल्यानंतरचा उल्लेख

राम पाहुनी रुचिर सरा अति । *करुनी स्नान* ***परम सुख पावति*** ॥ (४१।१)

वर्णनाचा संक्षेप करून पुनरुक्ति टाळण्याच्या कलेचा हा एक नमुना आहे. मागील (२।८७।७) वचनानें सांगितलें कीं स्नानाचा परिणाम श्रमपरिहार व स्वच्छ जल-पानाचें फळ सुख-आनंद-प्राप्ति हें असतें. येथें स्नानाचा उल्लेख करून त्याचा परिणाम अध्याहृत ठेवला व सुखाचें कारण अध्याहृत ठेवलें. पूर्ववचनाधारें स्पष्टार्थ असा कीं, स्नानानें श्रम हरले व स्वच्छ पाणी पिण्यानें सुख झालें; यांत तलावाच्या सौंदर्याची भर पडल्यामुळें परम सुखी झाले.

किष्किंधाकाण्डांत — अंगदप्रमुख रामदूत अरण्यामध्यें सीतेचा शोध करीत असतां,

लागुनि फार तृषा व्याकुळले । जळ न मिळे वन गहनीं भुलले ॥

मनिं हनुमान करिति अनुमाना । मरूं बघति सब विण जलपाना ॥ (२४। ४-५).

हनुमन्ताच्या प्रयत्नानें ते सर्व अशा दशेंतच एका विवरांत् शिरले तेव्हां,

दिसे जात उपवन वर सर विकसित बहु कंज ।

रुचिर एक मंदिरिं तिथें । स्थिता नारि तपपुंज ॥ २४ ॥

तहानेनें प्राण जाण्याची वेळ आल्यावर एक सुंदर तलाव दिसला तरी एकहि कपि पाणी पिण्यास गेला नाहीं. पुढें ती स्त्री म्हणाली कीं,

करा जलपाना । सुंदर सुरस फळें खा नाना ॥

(**क**) ते तृषेनें व्याकुळ झालेले दिसले म्हणून त्या तपस्विनीनें स्नानाचा उल्लेख न करतां व फळें खाऊन पाणी प्या असें न सांगतां 'करा जल पाना' असें प्रथम सांगितलें; पण शास्त्रधर्म मर्यादापालक रामदूत **करुनी स्नान मधुर फळ खाती** । आधीं स्नान केलें. नंतर जलपान केलें हें न सांगण्याइतके ते तृषार्त होतेच म्हणून तो उल्लेख केला नाहीं. येथें श्रमपरिहार व सुखलाभ झाल्याचा उल्लेख नाहीं म्हणून मागल्या उदाहरणांवरून अध्याहृत घ्यावा असा मोह होईल, पण पुढील संदर्भानें तें चुकीचें ठरतें.

(**ख**) 'सीता मिळेल **चिंता न करा** ।' (२५।५) असें ती तपस्विनी म्हणाली, यावरून ठरलें कीं स्नान, जलपान व फलभक्षण केल्यानंतरसुद्धां ते चिंतातुर दिसले. श्रमपरिहार स्नानानें झाला, पण सीता शोधाची चिंता लागली असल्यानें सुखी झाले नाहींत हें खरें ठरलें.

संक्षेप करण्याची ही आणखी एक युक्ति येथें दिसली. चार ठिकाणीं एकाच विषयाचें वर्णन केलें पण पुनरुक्ति कोठेंच नाहीं व प्रत्येक ठिकाणीं कांहीं तरी नाविन्य आहे, हा या काव्यकलेचा विशेष गुण सहज दिसला.

सुन्दरकाण्डांत — लंकादहनवर्णनांत शेवटीं,

उलट सुलट सब लंके जाळी । *उडी सागरीं नंतर घाली* ॥ (२६।८)

पुच्छा विझवुनि *हरी श्रम* । **पुन्हां सान होउन......** ॥ इत्यादि.

येथें स्नानानें श्रमपरिहार सांगितला; पण खारें पाणी असल्यानें जलपानाचा व त्याच्या परिणामाचा उल्लेख नाहीं.

सूचना — या काण्डांत स्नानाचा उल्लेख नसतांच फलभक्षणाचा उल्लेख एकदां आहे, हनुमंतानेंच स्नान न करतां फळें भक्षण केलीं आहेत. हा रामकार्य, युद्धक्षेत्र व शत्रुदुर्ग इत्यादि देशकाल-परिस्थितिजनित सहेतुक अपवाद आहे. विस्तार टीकेंत पाहावा. **नियमाला अपवादसुद्धां सुचविला आहे.**

लंकाकाण्डांत — रावणवधानंतर शंकर स्तुति करून गेल्यावर बिभीषण प्रभूला विनंति करतो कीं,

अतां दासगृह पुनीत कारणें । *करुनी स्नान रण-श्रम हरणें* ॥

१८ अहोरात्र रावणाशीं युद्ध केल्यानंतरच्या स्नानानें श्रमपरिहार सांगितला.

सूचना—येथेंसुद्धां पुनरुक्ति नाहीं; कारण हे श्रम निराळे आहेत. १ शिकारीचे श्रम, २ रथानें प्रवासाचे श्रम, ३ पायीं प्रवासाचे श्रम, ४ अरण्यांत हिंडण्याचे श्रम, ५ लंका-दहनादि श्रम, व ६ हे युद्धाचे श्रम; असे **हे सहा प्रकारचे श्रम सहा काण्डांतील** वरील सहा उदाहरणांत **क्रमशः वर्णिले आहेत**. यानें सुचविलें कीं शारीरिक श्रम कोणत्याहि कारणानें झालेले असोत, नदी, तलाव किंवा समुद्र यांत बुड्या मारून स्नान केल्यानें थकवा जातो.

(२) या कांडांतील आणखी एक महत्त्वाचें उदाहरण घेणें भाग आहे; कारण त्याशिवाय या विषयाची परिपूर्ति होत नाहीं. लंकेंतून त्रिवेणींत परत आल्यावर सर्वांनींच स्नान केलें.

प्रभु परतोनी त्रिवणिला हर्षित करुनी स्नान ।
कपींसहित, विप्रां बहु देति विविधविध दान ॥ १२० रा ॥

(क) येथें श्रमपरिहाराचा उल्लेख नाहीं. श्रम झाले असें वाटत असेल त्यांनीं परिहार अध्याहृत घ्यावा ! परंतु वैशाखाचा महिना, पुष्पकासारखें परम रम्य व परम सुखद विमान खूप वेगानें व पुष्कळ उंचीवरून आलें, जानकी वामांकीं आहे, भरत-भेटीचे मनोरथ व भरद्वाजादि मुनिदर्शनानें होणारा आनंद चित्तापुढें उभा आहे, विप्रांना दान देण्याचा सुयोग १४ वर्षांनीं लाभणार आहे इत्यादि अनेक कारणांचा विचार केल्यावरसुद्धां 'श्रम झाले' असें म्हणावयाचें असेल त्यांनीं म्हणावें पण या अल्प-बुद्धीला वाटतें कीं तसें मानणें अविवेकीपणाचें ठरेल.

(ख) जलपानाचा उल्लेख नसण्याचें कारण इतकेंच कीं क्षेत्रदेवतापूजन व विप्रांना दान देणें या गोष्टी करावयाच्या आहेत, म्हणून जलपान केलें नाहीं असें पूर्वसंदर्भा-नुसार व दानाच्या स्पष्ट उल्लेखावरून मानणें जरूर आहे.

उत्तरकांडांत — **'करुनि तडागीं मज्जन पाना । वटतळीं गेला हर्ष बहु मना'** ॥ (७।६३।३) गरुड नीलपर्वतावर गेला तेव्हांचें वर्णन आहे. तलावांत स्नानपान (१।१५८) करण्यानें बालकांडांत उपक्रम केला; व येथें उपसंहारांत पुन्हां तलावांत स्नान-पानाचाच उल्लेख आहे. येथें हर्ष = उत्साह हा अर्थ आहे.

विषयप्रतिपादनाची ही काव्यशैली अद्भुत नाहीं असें आतां म्हणवेल काय ?

मानसाच्या अनुवादांत स्नानापूर्वी जलपानाचा उल्लेख कोणी गद्यपद्यरचनापटु करतील तर तो अनुवाद ठरणार नाहीं व त्या अनुवादकानें रहस्य जाणलें नाहीं, श्रीतुलसीदासांच्या मर्यादापावित्र्याचा भंग केला व त्यांच्या भावसौंदर्याचा खून केला असें ठरलें कीं नाहीं ?

रामचरित–मानसिं जे स्नाना– । करिति भवश्रम नुरे तयांना ॥
करती प्रेमभक्ति जल–पाना । सौख्य परम विश्राम तयांना ॥ प्रज्ञा. ॥

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।७ 卐 卐 卐

क्रोध व त्यावरून बोध

क्रोधाची कठोर, धर्मघातकी, पापी, अविवेकी इत्यादि विविध प्रकारची करणी प्रत्येक रामायणांत ठराविक प्रसंगीं आहेच; तथापि मानसांतलि क्रोधाचे कांहीं प्रसंग प्रचलित रामायणांत नाहींत. मानसकथेंत व वाल्मीकि रामायण वगैरेंत क्रोधाचीं स्थानें बरींचशीं तींच असलीं तरी वर्णनांत व निर्माण झालेल्या परिस्थितींत पुष्कळ अंतर आहे, तें तुलना करून पाहण्यासारखें आहे.

बालकाण्ड — मानसांतलि या काण्डांत असलेले क्रोधाचे प्रसंग इतरत्र नाहींत.

(१) **रुद्राचा क्रोध** — पार्वतीतपस्या प्रकरणांत शिवसमाधीचा भंग करण्याची आवश्यकता निर्माण झाली. पार्वतीविवाह तारकासुरवधासाठीं आवश्यक ठरला. तारकासुराचा वध स्वर्गस्थ देवांच्या सुखासाठीं करण्याची आवश्यकता होती; म्हणजेच देवांच्या सुखासाठीं शिवसमाधि भंग करणें जरूर होतें, हें कार्य करणें म्हणजे बर्फाच्या तुकड्यानें भडकलेल्या ज्वालामुखींत उडी टाकण्यासारखें होतें. हें जाणून देवांनीं मदनाला मोठेपणा देऊन, पाहुण्याकडून कृष्णसर्प मारवावा तसें केलें.

या प्रकरणांत देव हे सत्ताधीश, लक्ष्मीपुत्र इत्यादींचे प्रतीक आहेत. स्वतःच्या स्वार्थपूर्तीसाठीं कोणाला तरी क्षणभर मोठें करून आपला स्वार्थ असे बडे लोक कसा साधतात हें या मदनदहन प्रकरणांत दिसतें.

(२) **नारदक्रोध** — शिवब्रह्मादिकांना जिंकणारा जो मदन त्याच्यावर नारदांनीं विजय मिळाविला, आणि क्रोधसुद्धां न येतां मदन असलेल्यास मद न असें करून सोडलें, पण त्यामुळें त्या निराश्रित, निर्वासित मदाला नारदाच्याच हृदयांत चांगला आश्रय मिळाला.

' मी जित काम असा मद शिरला ' ॥

अशा रीतीनें मद नारद-हृदयनिवासी होतांच त्याच्या भेटीला काम हळूच आंत आला. त्याची तृप्ति न झाल्यानें त्याला क्रोधरूपी अति तेजस्वी पुत्र झाला व तो इतका खवळला कीं शिवगणांस शाप देऊन त्याचें समाधान झालें नाहीं, तेव्हां कामविघातक रमापति आहेत असें मानून

अधर थरकती क्रोध मनासी । सपादें निघाति कमलापतिपासीं ॥
शाप देउं वा प्राण ठरविलें । मम उपहासा जगतिं करविलें ॥ (१३६।१-२)

क्रोधाचा आवेग इतका वाढला कीं कमलापति श्रीशेषशायी नारायणाची भरपूर निंदा केली व शाप दिले.

नारदासारख्या निर्मोह ज्ञानी विष्णुभक्ताला अहंकार अर्बुद (कॅन्सर) होऊन त्यानें प्रथम शंकरवैद्याचा अपमान केला व त्यांतून पुढें केवढी हानि झाली ! अहंकारा-

पासून कामक्रोधादि विकार नारदासारख्यांनासुद्धां कसे उत्पन्न होतात व कोणत्या थराला जातात हें येथें दाखविलें. येथें हें शिकावयाचें कीं अहंकाराचा वारा जरासुद्धां लागणार नाहीं अशी काळजी इतरांनीं सतत घेतली पाहिजे. नारदक्रोध हें कामज क्रोधाचें उदाहरण आहे.

(३) **मानी क्षत्रिय राजानें गिळून दाबून ठेवलेला क्रोध** काय करतो पाहा. युद्धांतून पळून गेलेला

नृप **रंकासम** *कोपा गिळुनी । वसे वनीं* **तापस** *मुनि बनुनी* ॥ (१५८।५)

या राजाच्या क्रोधानें कित्येक वर्षें कपट-दंभांत लपून राहून सूडबुद्धीशीं विवाह करून मुनिवेष, वनवास दुःख इत्यादि सर्व पत्करलें व त्याचा तो क्रोधच जणूं त्या उतावळ्या स्वभावाच्या विप्रांच्या मुखांतून बाहेर पडला; व त्यानें प्रतापभानूसारख्या विश्वविजयी, परम प्रतापी, परम धर्मशील महावीराचा विनाश केला.

(क) प्रतापभानूविषयीं विचार करतां त्याच्या विनाशाचें त्याच्या चित्तांतील प्रसुप्त सत्तालोभ, ऐश्वर्यलालसा व भक्तीचा अभावच कारण आहेत हें गूढार्थचंद्रिकेंत स्पष्ट दिसतें.

प्रतापभानु–आख्यान म्हणजे धर्मशील, गुणनिधि, प्रजावत्सल, निष्काम पण भक्ति-विमुख सम्राटाचा प्रसुप्त लोभ आणि त्यानें केलेल्या दिग्विजयाच्या वेळीं पळून गेलेल्या मानी, विषयी, अधर्मी, दुष्ट क्षत्रिय राजाचा झोपवून ठेवलेला क्रोध यांच्या भेटीचा चलच्चित्र बोलपटच आहे. **हा क्रोध अनेक विकारांचें अपत्य आहे.**

(४) **जामदग्न्य भृगुपतीचा क्रोध** — मानसांत परशुरामागमन धनुर्यज्ञमंडपांतच झालें असल्यानें आणि मुख्य भाग भृगुपति-लक्ष्मण-संवाद असल्यानें हें प्रकरण बहारीचें रंगलेलें सुंदर नाट्य आहे. हा क्रोध कामादिजनित नसून, स्वार्थमूलक नसून केवळ दर्पजनित आहे.

मदजनित क्रोधानें अंध झालेल्या आत्मश्लाघी, सर्व लोकविश्रुत महापुरुषाची प्रतिष्ठा, शक्ति, प्रताप, बल इत्यादि क्षीण होत चाललीं व क्रोध निष्क्रिय बनत चालला म्हणजे पूर्वीं कमावलेली अब्रू, मोठेपणा, नांव लौकिक टिकविण्यासाठीं त्याचें मन निरनिराळे आधार घेण्यासाठीं कशी धावाधाव करतें, कसें उड्या मारतें हें या भार्गव-दर्पविमर्दन प्रकरणांत उत्तम प्रकारें पाहण्यास मिळतें. दुर्बळाचा क्रोध एकावरून दुसऱ्या-वर, दुसऱ्यावरून तिसऱ्यावर या प्रमाणें कशा उड्या मारीत असतो, व आपली निष्क्रियता, दुर्बलता इत्यादि झांकून ठेवण्यासाठीं वाणीनेंच कशी आग ओकीत राहतो इत्यादि क्रोधाची विचित्र करणी या प्रकरणांत फारच मार्मिक व मनोहर पद्धतीनें दाखविली आहे.

(५) **शिवाच्या-रुद्राच्या क्रोधानें** जगाचें व देवांचें कल्याण झालें. मदन-कामदेव शरीरधारी परिच्छिन्न व्यक्त होता तो अनंग, अव्यक्त बनून सर्व विश्वाला व्यापून

राहिला, म्हणजे त्याची उन्नतीच झाली, कल्याणच झालें. रतीला पतीची प्राप्ति प्रद्युम्नरूपानें कृष्णावतारांत झाली.

(२) **नारदाच्या क्रोधानें** भगवंतास अवतारलीला करण्यास निमित्त सांपडलें व नारद कायमचे हरिमायामुक्त झाले; शंकरकृपेशिवाय हरिभक्ति-रामभक्ति मिळणार नाहीं हा सिद्धान्त प्रगट झाला. पुढील रामावतारांत रावण-कुंभकर्णांचें काम करणारे दोन नवे नट (हरगण) तयार झाले व अनेकांच्या भावी उद्धाराचें साधन-बीज निर्माण झालें.

(३) **प्रतापभानु-आख्यानांतील क्रोधानें** लाभ कोणाचाच झाला नाहीं; प्रतापभानूचा निर्वंश झाला. दुष्ट राजे स्वतंत्र झाले; म्हणजे दुर्जनांचाच ऐहिक फायदा झाला. पण रावणावतार घेण्यास योग्य असा, एक जीव, त्याच्या आकांक्षा व यज्ञयागादि कर्मफळ यांमुळें तयार झाला.

(४) **परशुरामाच्या क्रोधानें** लक्ष्मणाच्या शौर्यवीर्यप्रतापाचें, तेजाचें व रामप्रेमी हृदयाचें सर्व लोकलोकांतरांत प्रगटीकरण झालें. परशुरामावतार-समाप्ति झाली; रामावताराचें प्रगटीकरण झालें. विस्तार टीकेंत पाहावा.

अयोध्याकांड — (१) मंथरेचा-दुष्ट दासीचा दाबून ठेवलेला रघुनाथावरील क्रोध. मानसांत कारण दिलेलें नाहीं पण अग्निपुराणांत आहे. कुबडीनें केलेल्या कांहीं अपराधांबद्दल तिला रघुनाथानें पूर्वीं फरफटत ओढलें होतें. अयोध्याकांडांत शत्रुघ्नानें तिच्या झिंज्या धरून फरफटत ओढलें आहे, कुबडावर लाथ मारली आहे. कुबड फुटून दांत पडले इत्यादि फळ तिला मिळालें आहे.

(२) **कैकयीचा क्रोध** — वाल्मीकि व अध्यात्म रामायणांतील आणि मानसांतील कैकयीचा क्रोध यांत अंतर आहे. तें वाचकांनीं तुलना करून पाहावें. मानसांतील दशरथ स्नेहमूर्ति आहेत, अगदीं मऊ आहेत. ते मुळींच रागावले नाहींत. क्रोधाचें बळ जे कठोर शब्द ते दशरथ बोलले नाहींत. कौसल्या, सुमित्रा, वसिष्ठ, सुमंत्र इत्यादि कोणीच मानसांत कैकयीवर किंवा कोणावर रागावले नाहींत. वाल्मीकि रामायणांत याच्या उलट आहे.

(३) मानसांतील लक्ष्मण वनगमनाच्या वेळीं ‘ प्रभु स्नेह प्रतिपालित शिशु ’ आहे. प्रशान्त गंभीर रामस्नेहसागर आहे तर वाल्मीकि रामायणांत लक्ष्मण परम प्रक्षुब्ध भीषण गर्जना करणारा वीर्यमहासागर आहे.

(४) भरताचा कैकयीवरील क्रोध — मातेचा अधिक्षेप हा जरी व्यावहारिक अधर्म असला तरी तो ‘ देव जोडे तरि करावा अधर्म ’ या कोटींतला आहे. या क्रोधानेंच भरताच्या शुद्ध हृदयाचें आविष्करण केलें. या क्रोधानेंच कैकयीच्या सर्व दुष्ट मनोरथांस सुरुंग लावून त्यांची धूळ केली. या क्रोधानेंच कैकयीचा सवतीमत्सररूपी वैष्णवज्वर व त्यांत झालेला राज्यकामनारूपी वात एकदम उतरला. या क्रोधानेंच

कैकयीचें कल्याण केलें. हा **शुद्ध सात्त्विक रामस्नेहजनित क्रोध** आहे. वाल्मीकि रामायणांतील कैकयीची कुटिलता भरताच्या मानसांतील क्रोधापेक्षांहि अधिक तीव्र अशा क्रोधानें तत्काळ नष्ट झालेली नाहीं.

मंथरेच्या क्रोधानें तिचें नांवही उरविलें नाहीं. कैकयीच्या क्रोधाचा तिला स्वतःला इतकाच फायदा झाला कीं आपल्या त्या क्रोध–कुटिलता, कुमति, कठोरता, इत्यादिकांवर जन्मभर क्रोध करीत तोंड लपवून बसावें लागलें. भरताच्या क्रोधानें तो प्रजेचा व रामभक्तांचा कण्ठमणि झाला. चित्रकूटावरील प्रसंगांत लक्ष्मणास जो क्रोध आला त्याविषयीं लक्ष्मणचरित्रांत विस्तारपूर्वक लिहिलें आहे.

अरण्यकाण्ड — (१) रघुवीराचा सुरपतिसुतावरील क्रोध – यानें रघुवीरप्रतापाची पूर्ण परीक्षा झाली. रघुपतिप्रतापाची व देवांच्या कुटिल, नीच, कामी वृत्तीची देव देहधारी सजीव जाहिरात तयार झाली.

(२) शूर्पणखेच्या क्रोधानें तिचे नाककान लुबाडले, व तो क्रोध रावणाच्या कुलविनाशास परंपरेनें कारण झाला.

(३) मानसांतील मारीच गूढ रामप्रेमी आहे. त्याच्यावरील रावणाच्या क्रोधानें रावणकुलालाच सुरुंग लावला; मारीचाचें परम कल्याण झालें. खरदूषण-रावणादि सर्व मुक्त झाले पण ती बुची नकटी शूर्पणखा ! आपलें नाक कान नसलेलें तोंड लपवून कुठें बसली ती कोणीं ऐकलीहि नाहीं.

किष्किंधाकाण्ड — (१) वालीच्या क्रोधानें त्याचें व इतरांचें परिणामीं कल्याणच झालें. सुग्रीवापेक्षांहि वालीचाच जास्त फायदा झाला हें टीकेंत दिसेल.

(२) लक्ष्मणाच्या दिखाऊ क्रोधानें सुग्रीवाचें कल्याण केलें.

सुंदरकाण्ड — (१) लंकिनीच्या सद्धेतुमूलक क्रोधानें तिचें व रामदूताचें कल्याण झालें.

(२) हनुमंतावरील रावणाच्या क्रोधानें लंका जाळली, व प्रजेच्या मतें रावण दुष्ट महामूर्ख ठरला.

(३) बिभीषणावरील रावणाच्या क्रोधानें बिभीषणाचें परम कल्याण केलें, व रावणवधाच्या पायाचा दगड बसविला.

लंकाकाण्ड — (१) रावण-अंगद-संवादांत दोघेहि एकमेकांवर क्रुद्ध झाले आहेत; पण येथील रावणाचा क्रोध धनुर्मख-मंडपांतलि भृगुपतीच्या क्रोधाचा सहोदर आहे. त्या क्रोधानेंहि शेवटीं विलज्जित होऊन मान खालीं घातली आहे व या क्रोधानेंच रावणाचे चार मुगुट अंगदाच्या हातीं दिले आहेत. अंगदाची दिगंत कीर्ति झाली, वालितनय नांव यथार्थ ठरलें. सर्व राक्षसांच्या शौर्य, वीर्य, बल, पराक्रमांनीं माना खालीं घातल्या; व इंद्रजित हें नांव पुसलें गेलें. दो. ३४।११ नंतर लंकाकांडांतील सर्व युद्धवर्णनांत इंद्रजित हा शब्द नाहीं !

उत्तरकाण्ड — (१) मानसांतील उत्तरकाण्ड-पूर्वार्धांत कोणालाच क्रोध आला

नाहीं; कारण रामराज्यांत सर्व लोक षड्विकारजित अनघ अकाम झाले आहेत, म्हणून क्रोध नाहीं.

(२) उत्तरार्धांत महेशांना क्रोध येऊन त्यांनीं त्या शूद्राला घोर शाप दिला; पण त्याच्या विप्रगुरूच्या प्रार्थनेनें त्याच्यावर अपार कृपा केली. (ही कथा रामावतारा-पूर्वीची आहे.)

(३) लोमश ऋषींनीं विप्राला शाप देऊन तत्काळ काक केलें, पण त्या काकाचें परम कल्याणच झालें आहे.

मानसांतील क्रोधाचें नीट निरीक्षण केल्यास सामान्यतः सार निघतें कीं शंकर, नारद, इत्यादींच्या व संतांच्या-हरिभक्तांच्या क्रोधानें कोणाचें अकल्याण केलें नाहीं; उलट कल्याणच झालें आहे. हरिभक्तांवर क्रोध करणारांची हानि व अकीर्ति झाली आहे.

क्रोध ज्याला येतो तो मुनि असो, पतिव्रता असो कीं राक्षस असो क्रोधाची कार्य-प्रणाली सारखीच !

क्रोध न म्हणे हा गुरु । तयास मी कैसा मारु ।
क्रोध हा मांग पामरु । अविचारासिंधु ।। १ ।।
क्रोध न म्हणे मी पतिव्रता । नाहीं देव पतीपरता ।
न विचारी मम भर्ता । जगेल कीं मरेल ।। २ ।।
क्रोध न म्हणे वडील बंधु । कीं हा परम सच्छीलसिंधु ।
त्यास कैसा मी निखंदु । मरूं केवीं ।। ३ ।।
क्रोध सत्यासत्य नेणें । क्रोधा कठोर बोलणें ।
आवडे नेत्र वटारणें । लाल करुनी ।। ४ ।।
क्रोध धर्मा दूर सारी । क्रोध मार्दवा मारी ।
क्रोध लज्जा निवारी । नर-नारींची ।। ५ ।।
क्रोध कामांतूनि उद्भवे । क्रोध मदांतूनि संभवे ।।
लोभांतून जन्म पावे । मत्सरांतून ।। ६ ।।
क्रोध आणी लाली देहीं । अंगांची करी लाही ।
भिवया चढती वक्रही । अंग कांपे ।। ७ ।।

इत्यादि प्रकारें वरील उदाहरणांच्या साह्यानें एक समास सहज लिहितां येईल.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।८ 卐 卐 卐

भाषणाचे गुण

भाषणांतलि विविध सद्गुण दर्शविणारीं मानसांतील कांहीं वचनेंच फक्त खालीं दिलीं आहेत.

(१) **बोले सती मनोहर वाणी ।** *प्रीति–भीति–लज्जा*-**रस-खाणी ॥** (१।६१।८)

(२) **भवानी, वदली** *विवेकयुत मृदु* **वाणी ॥** (१।९७।५)

(३) **वदति** *विचारिं खऱ्या प्रिय* **वचना ।** (२।१३०।४)

(४) **वचन बोलले गिरा-सारसें ।** *हितपरिणामी कानिं शशिरससें* ॥ (२।३०४।७)

(५) *प्रेमळ* **कपिवच ।** (५।१३). **कपि मृदु वचना वदे** *विनीता* । (५।१४।८)

(६) **कपिभाषित** *भक्ति तेज बल प्रताप* **मिश्रित** ॥ (५।१७।१)

(७) **जरि कपि वदला वाणी** *अतिहित* । **भक्ति** *विवेक विरति नय* **मिश्रित ॥**

(८) *श्रुतिपुराण बुधसंमत* **वाणी । वदला बिभिषण... ॥**

(९) **प्रिय वाणी ऐकति जे वदती । ऐसे जगीं नर–निकाय असती ॥**

(१०) **वचन परमहित कर्णकठोरहि । श्रोते वक्ते प्रभु ! नर अल्पहि ॥** (६।९।८-९)

असें रावणपुत्र प्रहस्त रावणास म्हणाला.

(११) **पर–उपदेश–कुशल बहुतेकहि । जे आचरती तर बहु ते नहि ॥** (६।७८।२)

(१२) **परिसत गरुड–गिरा** *सुविनीता । प्रेमळ सरळ सुखद सुपुनीता* ॥ (७।६४।५)

(१३) **वचन** *सुखद गंभीर मृदु* **वदले रमानिवास ।** (७।८३ म)

(१४) इतरत्र मधुर, मित, हितकारक, म्हटलें आहे; आणखी कांहीं गुणांचें वर्णन आहे. ते गुण वाचकांनीं संकलित करावेत.

सार हें कीं हित, मित, सत्य, प्रिय, पण विवेक–विचारयुक्त, नम्र, पवित्र, मृदु, मधुर, श्रुतिपुराणबुधसंमत, नीतियुक्त असें भाषण करावें; व त्यांत भक्ति, ज्ञान, वैराग्य व नीतिधर्म यांचें प्रतिपादन असावें. आवश्यकतेनुसार, भीति, लज्जा, गांभीर्य इत्यादि गुणही असावेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।९ 卐 卐 卐

मानसांतील कांहीं व्याख्या वा लक्षणें

श्रीरामचरितमानसांत कांहीं वचनें अगदीं सुटसुटीत व्याख्यांसारखीं आहेत; त्यांतील कांहीं नमुने पुढें दिले आहेत.

(१) **सत्य प्रेम** कोणतें ? **वन्दुं अयोध्यापाल** *प्रेमसत्य* **ज्या रामपदिं ।**
विरहित **दीनदयाल** *प्रियतनु तृण सम परिहरालि* ॥ (१।१६)

प्रियविरहानें प्रियतनूचा त्याग करवितें तें प्रेमसत्य.

(२) **निर्मल मन** कोणतें ? *निर्मलमन* **जन** *तो* **मज पावे ।**

मला *कपट छल छिद्र न* **भावे** ॥ (५।४४।५)

ज्यांत कपट छल छिद्र नाहीं तें मन निर्मल.

(३) **विमूढ** — जो जड, कलिमलग्रासित तो विमूढ.

कलि उमजे मी जीव जड । *कलिमलग्रासित विमूढ* ॥

(४) **प्रभूचा निजदास** — अनन्यगतिक तपस्वी

प्रभू सर्वज्ञ *दास निज* **जाणति । नृपराणी** *तापस नान्या गति* ।। (१।१४९।५)

(५) **प्रजापालक राजा** — *प्रजा पाळि अतिवेदविधिं अघलव कठेंहि नाहिं* ॥ (१।१५३) वेदविधीचा पूर्ण आश्रय करून राज्यांत कुठेंहि लेशमात्र पाप होऊं देत नाहीं तो प्रजापालक.

(६) **निशाचर** कोण ? **वाढति बहु खल** *चोर जुगारी । जे परधन लंपट परदारीं* ॥ *मानिति माय पिता ना देवां । साधूंकरवीं करविति सेवा* ॥

ज्यांचें असं आचरण भवानी । जाण *सर्व निशिचर ते प्राणी* ॥ (१।१८४।१–३)

(७) **महाभाग्यवान पुत्र — श्रुणु जननी** *तो सुत बहुभागी ।*

जो पितृमातृवचानिं अनुरागी ॥ (२।४१।७)

(८) **चतुर** कोण ? *सांडुनि सर्वहि, आस, भजति राम ते चतुर नर* । (३।६ म

(९) **पाखंडवाद — हरितभूमि तृणसंकुल नुमजे कुठेंहि पंथ ।**

पाखंडी वादें **जसे** *गुप्त होति सद्ग्रंथ* ॥ (४।१४)

ज्या वादानें (मतादिकांनीं) वेदादि सद्ग्रंथ गुप्त होतात तो पाखंडवाद.

(१०) **कुपुत्र — जसा** *कुपुत्र* **हि उपजतां** *कुलसद्धर्म विनाश* । (४।१५ रा)

कुळांतील कुलधर्मादि सद्धर्माचा जो नाश करतो तो कुपुत्र.

(११) **विपत्ति** कोणती ? **प्रभु-स्मरण-भजनादि न घडणें हीच विपत्ति ।** (५।३२।३)

म्हणे हनू प्रभु *तीच विपत्ती । स्मरण भजन तव यदा न घडती* ॥

(१२) कोणतें सुकृत (पुण्य) शोभतें ? *सत्यमूल सब सुकृत शोभती* ॥ (२।२८।६)

(१३) सत्यसंध —

तन सुत धरणि धाम धन ललना । **उक्त** *सत्यसंधा तृण गणना* ॥ (२।३५।८)

सत्य पालनांत देह, गृह, सुत, धन, धरणि, दारादि ज्यास तृणासमान वाटतात तो सत्यसंध.

(१४) सेवक — *करी स्वामिहित सेवक तोहि* ॥ (२।१८६।५)

(१५) स्त्रीला व्रत, धर्मनेम कोणते ?

हें व्रत एक धर्म हा नेमहि । *पतिपादिं तनुमनवचनें प्रेमाहि* ॥

(१६) परम विरागी कोण ? (३।१५।८)

म्हणति तात *तो परम विरागी । तृणसम सिद्धी त्रिगुणां त्यागी* ॥

(१७) ज्ञान म्हणजे काय ? (३।१५।७)

ज्ञान, *जिथें मानादिक नाहीं । ब्रह्म समान सकल जगिं पाही ॥*

(१८) माया म्हणजे काय ?

मी माझें तूं तमचें माया । **करते जी वश जीव–निकाया** ॥ (३।१५।२)

(१९) भक्ति म्हणजे काय ?

वेगें जिनें द्रवें मी (भगवान) भाई । ती मम भक्ति **भक्त सुखदाई** ॥

(२०) वीर कोण ? *महा अजय संसाररिपु जिंकं शक तो वीर* ॥ (६।८० रा)

(२१) जड कोण ? (७।११५।१–२)

भक्ति अशी **जाणुनि** *परिहरती ।* **ज्ञाना** *केवळ* **जे** *श्रम करती ॥*

ते जड **गृहीं सुरधेनू त्यजिती । दुधासाठिं अर्कास धुंडिती** ॥

(२२) शठ कोण ?

श्रुणु खगपति ! *हरिभक्ती त्यागिति । अन्य साधनीं सुख जे इच्छिति ॥ ते शठ.*

(२३) पाषाणहृदयी कोण ?

जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण ॥ (७।४२)

(२४) मोठें पाप कोणतें ?

नहि असत्य सम पातकपुंजा । **गिरिसम होती कोटि किं गुंजा** ॥ (२।२८।५)

(२५) सर्वांत मोठें पुण्य कोणतें ?

पुण्य एक जगिं **समान आन न** । *मन कृति वचनिं विप्रपदपूजन ॥*

(२६) सर्वांत अधम कर्म कोणतें ? *परपीडेसम अधम न कांहीं* (७।४१।१)

(२७) जिवाचा खरा स्वार्थ कोणता ?

स्वाथ साच जगिं हाच जिवाचा । प्रेम रामपदिं मनकृतिवाचां ॥ (७।९६।१)

श्रीरामचरित–मानसांत अशा व्याख्या वा लक्षणें शेंकडों आहेत. नमुन्यादाखल प्रत्येक कांडांतील थोडीं वचनें वर दिलीं गेलीं. अशीं सर्व वचनें संकलित करणें हा एक स्वतंत्र उद्योग कोणी करण्यासारखा आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १६।१० 卐 卐 卐

मानसांतील मननीय वचनें

श्रीरामचरित–मानसांत अशीं शेंकडों वचनें आहेत कीं मानव जातींतील कोणाही व्यक्तीनें त्यांतील १।२ वचनें आपलें जीवनध्येय ठरवून, त्या वचनरूपी माणकांच्या स्वयंप्रकाशान आपली प्रत्येक कृति व प्रत्येक क्षण प्रकाशित केल्यास पूर्ण सुखसमाधान सहज प्राप्त करतां येईल. अशा अमूल्य वचनांपकीं कांहीं वचनें गूढार्थचंद्रिकेच्या वाचकांच्या सुखसमाधानासाठीं खालीं दिलीं आहेत.

(१) गुरुपदरज मृदु मंजुल अंजन । नयनामृत दृग्दोष विभंजन ॥ (१।२।१)
(२) सितामय सब जग जाणुनि । करतो प्रणति पाणि युग जोडुनि ॥ (१।८।२)
(३) रूप न दिसतां स्मरण नाम करि । स्नेहें हृदयीं रूप येत तरि ॥ (१।२१।६)
(४) जडचेतन गुण दोषमय कर्ता निर्मि जगास ।
संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषास ॥ (१।६)
(५) चूक नेणतां घडे क्षमावी । कृपा विप्र-उरिं फार असावी ॥ (१।२८।२।४)
(६) धरणीसुर सुरभी हरि-जन । यांवर अमचे कुळिं न शूरपण ॥ (१।२७३।६)
धरणीसुर = ब्राह्मण, सुरभी = धेनु, हरि-जन = हरिभक्त.
(७) नहिं असत्यसम पातकपुंजा । गिरिसम होती कोटि किं गुंजा ॥ (२।२८।५)
(८) प्रिय-प्रेम-वश घडे प्रमादू । तैं यशनाश जगीं अपवादू ॥ (२।७७।४)
(९) कोणि कुणा सुखदुःख न दाता । निजकृत कर्मभोग ते भ्राता! ॥ (२।९२।४)
(१०) मंगलमूल विप्रपरितोषू । जाळि कोटिकुळ भूसुर-रोषू ॥ (२।१२६।६)
(११) सुखिं हर्षति जड दुःखीं रडती । धीर मनीं उभयां सम गणती ॥ (२।१५०।७)
(१२) पुत्रवती युवती जगिं तीच किं । रघुपतिभक्त जिचा सुत होत किं ॥ (२।७५।१)
(१३) श्रुणु जननी तो सुत बहुभागी । जो पितृमातृवचनिं अनुरागी ॥ (२।४१।७)
(१४) करी स्वामिहित सेवक तोही । कोटि दोष कुणि मज देवो ही ॥ (२।१८६।५)
(१५) हें व्रत एक धर्म हा नेमहि । पतिपदिं तनुमनवचनें प्रेमहि ॥ (३।५।१०)
पतिस विरोधी जिथें जन्मते । तरुणपणीं ती विधवा बनते ॥ (३।५।१९)
(१६) *उपवर कन्यांसाठीं* – नारिधर्म पति देव न दूजा ॥ (१।१०२।३)
श्रुणु सुंदरि मी *सेवक* यांचा । *पराधीन नहिं तुला सुखाचा* ॥ (३।१७।१३)
(१७) एकचि बाणा कृपानिधाना । प्रिय तो ज्यातें गति ना आना ॥ (३।१०।८)
(१८) परहित मनिं वसतें ज्यांच्याही । त्यांस कांहिं जगिं दुर्लभ नाहीं ॥ (३।३१।९)
(१९) शापिति ताडिति परुष बोलती । विप्रपूज्य असं संत सांगती ॥ (३।३४।१)
(२०) दीपशिखेसम युवतितनु होइ न मना पतंग ।
काममदां त्यज राम भज कर संतत सत्संग । (३।४६)
(२१) दुःखगिरी निज रजसम जाणत । मित्र दुःख-रज सुमेरु वाटत ॥ (४।७।२)
देत घेत मनिं शंका न धरी । बल-अनुमानें सदा हित करी ॥ (४।७।५)
(२२) शत्रुमित्र सुख दुःखें जगतीं । मायाकृत, परमार्थें नसती ॥ (४।७।१८)
(२३) जळ सांचुनि सर हळ हळु भरती । जसे सुगुण सज्जनांत नमती ॥ (४।१४।७)
(२४) राम धरुनि हृदिं करा उपाया । (४।२६।४)
(२५) भवभेषज रघुनाथ यश जे ऐकति नरनारि ।
त्यांचें सर्व मनोरथां सिद्ध करी त्रिपुरारि ॥ (४।३०)
(२६) रामनामाविण शोभे न गिरा । त्यजुनि मोह-मद कर किं विचारा ॥ (५।२३।३)

(२७) निर्मल मन जन तो मज पावे । मला कपट छल छिद्र न भावे ॥ (५।४४।५)
(२८) मी जाणें तुमची सब रीती । अति नयनिपुण, न रुचे अनीती ॥ (५।४६।६)
(२९) म्हणे हनू प्रभु ! तीच विपत्ती । स्मरण भजन तव यदा न घडती ॥ (५।३२।३)
(३०) हीच उमे ! संतांची महती । अपकारां करतां हित करती ॥ (५।४१।७)
(३१) सुख-भवन, संशय शमन, दमन विषाद रघुपति गुणगणां ।
गा त्यजुनि आशा, सब भरंवसा ऐक संतत शठ मना ॥ (५।६० छं.)
(३२) जेविं कुयोगि नरां उरगारी । मोह विटप उपटवे न भारी ॥ (६।३४।१४)
(३३) विघ्न कोटिनें नीतिला सोडि संत मन काय ? ॥ (५।३४ म)
(३४) मी तूं माझें जडता त्यागा । महामोहनिशिं निजतां जागा ॥ (६।५६।७) •
(३५) बंधु ! वंश तूं केला भास्वर । भजुनि राम शोभा-सुख-सागर ॥ (६।६४।९)
(३६) त्या रथिं चाकें शौर्य नि धैर्यहि । ध्वजा पताका सत्य सुशीलहि ॥ (६।८०।५)
(३७) कवच अभेद्य विप्र गुरु पूजा । यासम विजय-उपाय न दूजा ॥ (६।८०।१०)
(३८) विश्वासयुत सब आस सांडुनि दास तव होती खरे ।
तव जपुनि नामा श्रम विना भव तरति त्या स्मरतों हरे ॥ (६।१३ छं.)
(३९) वर्णाश्रम निज निज धर्म–निरत वेदपथिं लोक- ॥
वर्तोते पावति सदासुख, नहिं भय रोग न शोक ॥ (७।२०)
(४०) बंधु ! धर्म परहितसा नाहीं । परपीडेसम अधम न कांहीं ॥ (७।४१।१)
(४१) सहज सरलता मानिं न कुटिलता । यथालाभिं संतुष्ट चित्तता ॥ (७।४६।२)
(४२) बुध सेवेविण शील किं मिळतें ॥ (७।९०।६) बुध = ज्ञानी भक्त, संत.
(४३) परम धर्म वेदोक्त अहिंसा । परनिंदा अघ अधिक गिरीशा ॥ (७।१२१।२२)
(४४) निज प्रभुमय जग पाहती करिति कुणाशिं विरोध ॥ (७।११२ म)
(४५) तें धन धन्याचि जया प्रथम गति । धन्य पुण्यरत पावन ती मति ॥ (७।१२७।७)

या पंचेचाळीस वचनांपैकीं १२ वचनांचें अखंड निष्ठेनें पालन भक्तींतील निषेध वर्ज्य करून करील तो संसृतिचक्रांतून सुटून सदा पूर्ण सुखी होईल यांत संशय नाहीं.

येथें सोळावें मुख्य प्रकरण व त्यांतील हें १० वें प्रकरण समाप्त झालें.

१७ : संकीर्ण विविध विषय

पूर्वीच्या १६ मुख्य प्रकरणांत १११ मुख्य विषयाचें प्रतिपादन विविध अंगांनीं केलें गेलें; तथापि अद्याप असे पुष्कळ विषय मानसांत आहेत कीं प्रस्तावनेच्या निमित्तानें ते वाचकांच्या अवलोकनांत येणें जरूर आहे; व ते मागील कोणत्याही मुख्य प्रकरणांत सहज सुसंगतरीत्या प्रविष्ट करण्यासारखे नसल्यानें प्रस्तावनेंतील या उपान्त्य प्रकरणांत दिले आहेत. हे विषय ११ आहेत त्यांतील पहिलें प्रकरण —

卐 卐 卐 १७।१ 卐 卐 卐

दशरथ-राजांच्या पुष्कळ राण्या होत्या

श्रीरामचरित-मानसांत कौसल्या, सुमित्रा व कैकयी या तीन राण्यांचा उल्लेख स्पष्ट आहे. एकंदर राण्या किती होत्या हें स्पष्ट सांगितलेलें नाहीं; यांत नानामतसमन्वय करणें हा हेतु आहे. कांहीं रामायणांत ७५०, कांहींत ७०० व कांहींत ३५० राण्या असल्याचे उल्लेख आहेत. मानसांत इतस्ततः विखुरलेल्या पुष्कळ वचनांवरून हें सहज सिद्ध होतें कीं दशरथांच्या पुष्कळ राण्या होत्या.

भक्तिमार्गाच्या व अध्यात्मपर अर्थाच्या दृष्टीनें अधिक राण्यांचीं नांवें व संख्या यांची आवश्यकता नाहीं; व तीन राण्यांपेक्षां अधिक राण्या होत्या एवढें ठरलें म्हणजे योग-शास्त्राच्या दृष्टीनें अर्थ करण्यास अडचण पडत नाहीं; महत्त्वाचीं २।३ वचनेंच पुरतील.

(१) **श्रीरामजन्म झाल्यावर —**

प्रिय अति शिशुरुदनाला ऐकत । शीघ्र येति राण्या सब चालत ॥ (१।१९३।१)

कौसल्या प्रसूत झाली आहे; व सर्व राण्या त्या प्रसूतिगृहाकडे त्वरेनें चालत आल्या असें म्हटलें. सुमित्रा व कैकयी यांशिवाय आणखी राण्या जर नसत्या तर ' संभ्रम चलि आई दुइ रानीं ' असें म्हणून भागलें असतें ' संभ्रम चलि आई *सब* रानीं ' असें म्हणण्याची आवश्यकता नव्हती, म्हणून ठरलें कीं पुष्कळ राण्या होत्या.

(२) सुमंत्र शृंगवेरपुराहून रिकामा रथ घेऊन येत असतां विषाद करतो कीं,

' पुसति दीन दुःखी जैं *माता* । काय *तयां* मी सांगुं विधाता ! ॥
यदा विचारिल *लक्ष्मण-आई* । सांगु निरोप काय सुखदाई ॥
***रामजननि* जैं येइ धावुनी ।** (२।१४६।१-३)

येथें इतर अनेक माता, लक्ष्मणाची आई आणि रामजननी असे उत्तरोत्तर श्रेष्ठताक्रमानें उल्लेख आहेत; व भरतजननीचें नांव उच्चारण्याची व तिचें तोंड पाहण्याची कोणा-चीच इच्छा नाहीं. यावरूनही ठरलें कीं **तिघींशिवाय अन्य राममाता होत्या.**

(३) भरतादि सर्व चित्रकूटास गेल्यावर (२४४।७ – २४५।४ पाहा) आधिं राम कैकइला भेटति ॥ ‘ मातांना सब भेटले ’ (२४४). व नंतर गुरुपत्नी व विप्रस्त्रिया यांना वंदन करून ‘ बसले नमुनि सुमित्रे–अंका ’ (२४५।३) आणि शेवटीं ‘ पडति बंधुयुग जननी पायां ’ (२४५।४). येथें कैकई, सर्व माता, सुमित्रा व रामजननी (कौसल्या) असे क्रमानें स्पष्ट उल्लेख आहेत, व या वचनांत संशयास जागा नाहीं.

दशरथास पुष्कळ राण्या होत्या हें ठरविण्यास आणखी वचनांची आवश्यकता नाहीं. आणखी अशीं दहा तरी वचनें आहेत.

(४) श्रीगीतावलींत अगदीं स्पष्ट उल्लेख आहे. (बालकांड पद ११०) मुदित मन आरती करै माता ॥ ......पालागति दुलहियन सिखावति सरिस **सासु सत साता** ’ समान आदरानें **सातशें सासवांच्या** पायां पडण्याचें नवीन सुनांना कौसल्यादि माता शिकवीत आहेत. असा ७०० इतर राण्यांचा उल्लेख आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।२ 卐 卐 卐

रघुकुल इष्टदेव भगवान शिव

श्रीरघुकुलांत श्रीवासुदेवोपासना होती हें दाखविणारे स्पष्ट उल्लेख वाल्मीकि रामायणांत आहेत; पण रामोपासना रघुकुलांत चालत असल्याचा उल्लेख वाल्मीकि रामायणांतसुद्धां नाहीं. मानसांत वाल्मीकि रामायणासारखा वासुदेवोपासनेविषयीं एकही स्पष्ट वा अस्पष्ट उल्लेख नाहीं. उलट दशरथ, भरत व राम इत्यादि शिवपूजक होते हें दाखविणारीं कमींतकमी तीस वचनें तरी आहेत.

शिवपुराणांत (पोथी) ज्ञानसंहितेंत (अध्याय ६२।८-१२ यांत) रघुवंशी राजे व राण्या शिवपार्थिव पूजन करीत असत असा स्पष्ट पुरावा सांपडला.

ईक्ष्वाकुश्चापि मान्धाता सगरो नहुषस्तथा ॥८॥
दिलीपश्चैव तत्पुत्रो, राजा दशरथस्तथा ॥
...कौसल्या पार्थिवांश्चक्रे ऋष्यादिष्टा स्वयं सती ॥
रामश्चैव तथा नित्यं पार्थिवान् समपूजयत् ॥११॥
तद्वंशे च समुत्पन्नास्ते ते शिवमपूजयन् ॥१२॥

‘ **निजकुल इष्टदेव भगवाना । पूजायास्तव करुनी स्नाना** ’ (१।२०१।२) असा उल्लेख कौसल्येविषयीं आहे. या एका ‘ भगवाना ’ शब्दाच्या आधारावर सांप्रदायिक वैष्णवांनीं कल्पनांची पोकळ इमारत उभारून दशरथ रामोपासक होते हें ठरविण्याचा प्रयत्न आपापल्या टीकांतून केला आहे. हा लेखकसुद्धां शैव नाहीं व वेडीं-वाकडीं पण रघुनाथाचींच नांवें घेतो व त्याचा एक मूढ, मंदमति दास म्हणवतो, तरी

पण सांप्रदायिक अभिमानाच्या कुंपणांत सत्य लपवून ठेवणें या बुद्धीस जमत नाहीं. श्रीमानसांतून निष्कर्ष काय निघेल तो दाखविणें हेंच कर्तव्य आहे.

(१) भगवान शब्द शंकरांना आकाशवाणीनेंच वापरला आहे.

'**अन्य असा पण कोणि न कर्ता । रामभक्त** *भगवंत* **समर्था** ॥ (१।५७।५)

हि. — **रामभगत समरथ** ***भगवाना*** —

(क) सप्तर्षी पार्वतीला म्हणतात,

'*तुम्हि माया भगवान शिव* **सकल विश्व-पितृमाय** ॥ (१।८१)

म्हणून भगवान = राम, विष्णु, वासुदेव असाच अर्थ करणें मानसाधारें चूक ठरलें.

(ख) कांहीं ठिकाणीं गणपति-पूजन-स्मरणादिकांचा उल्लेख शिवाच्या आधीं असल्यानें गाणपत्य कदाचित् म्हणतील कीं दशरथादि गणेशोपासक होते; म्हणून या भ्रमाचा निरास मानसाधारेंच करणें जरूर आहे. 'पूजा *गणपति* गुरु *कुलदेवा*' (२।६।८) असें वसिष्ठांनीं राजास सांगविलें आहे. **गणपति आणि कुलदेव भिन्न आहेत हें ठरलें**; गणपति कुलदेव नाहींत.

(२) जो ज्या देवाचा उपासक असतो तो त्याच देवाला हृदयस्थ, अंतर्यामी, सर्वांचा प्रेरक समजतो. रामाचा, विष्णूचा, उपासक हीं विशेषणें शंकरांना लावणार नाहीं व शिवोपासक विष्णूला किंवा इतर कोणाला लावणार नाहीं. कारण कीं हृदयस्थ परमात्मा, एकच आहे. दशरथ शंकरांस प्राथना करतात ती पाहा—

'*स्मरुनि महेशा प्रार्थिति* **नृपती । ऐका** *सदाशिवा* **मम विनती** ॥ ७ ॥
आशुतोषःतुम्हि लहरी दाते । जाणुनि दीन हरा विपदांतें ॥
प्रेरक *तुम्हि सर्वांतरीं द्या अशि मति रामास* ॥(२।४४)

(क) **सर्वांतरीं प्रेरक** — ईश्वर, परमात्मा, परमेश्वर ज्याला म्हणतात तोच.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ।। (भगवद्गीता)

असा सर्वांतरीं प्रेरक ईश्वर, तो एकच आहे; आणि त्यालाच दशरथांनीं महेश, सदाशिव म्हटलें.

(ख) '**द्या मति**' असें सदाशिवासच म्हटलें; म्हणजे बुद्धिदाता, दशरथांच्या भावनेप्रमाणें, सदाशिवच हें ठरलें. 'बुद्धिदाता परमेश्वर' हें सर्वमान्य आहे. उपासक आपल्या इष्ट देवालाच परमेश्वर, परमात्मा, हृदयप्रेरक, बुद्धिदाता, सर्वांतर्यामी, हितकर्ता, सुखदाता इत्यादि सर्वगुणसंपन्न समजतो. याप्रमाणें दशरथ शिवोपासक होते हें ठरविण्यास हें वरील एकच अवतरण पुरेसें आहे.

इतर विविध वचनें. (१) 'दिलीं द्विजां दानें विपुल **पूजुनि गणप पुरारि**'। (१।३४५) गणपति प्रथमपूज्य व विघ्नहर्ता म्हणून आणि पुरारि-शंकर इष्टदेव, कुलदेव म्हणून कौसल्यादि मातांनीं त्यांचें पूजन केलें व मग विप्रांना दानें दिलीं. इष्टदेवतेचें पूजन न

करतांच शिवपूजन केलें असें म्हणणें मूर्खपणाचें ठरेल. दानें देण्यापूर्वी शिवपूजन आवश्यक नाहीं; पण इष्टदेव म्हणून आवश्यक होतें.

' निजकुल इष्टदेव भगवाना ' (१।२११।२)

यांत भगवान = शिव कीं राम कीं विष्णु ?

(२) **रघुकुलमणि (= दशरथ) करि पुरीं प्रवेशा ॥**
स्मरुनि शंभु गिरिजा गणराजां ॥

वरातीसह अयोध्येंत प्रवेश करतांना असें शिवस्मरण प्रथम केलें.

(३) रामराज्याभिषेकाचें ठरविण्यासाठीं दशरथ वसिष्ठांकडे जाऊन म्हणाले,
' *शिवें* **प्रभुकृपें** *सर्व पुरविली* । *हौस* **एक ही मनीं राहिली** ॥ (२।४।४)

(४) ' **भरत राम दोन्ही किं ममाक्षी** । *सत्य सांगतों शंकर साक्षी* ॥(२।३१।६)

असें दशरथ कैकयीस म्हणाले. हीं दशरथांचीं मुख्य वचनें आहेत.

भरतानें काय केलें पाहा—

(१) **ब्राह्मणभोजन, बहु दिनिं दाना । करि** *अभिषेक शिवा* **विध नाना ॥**
मागे मनिं करि शिवा प्रार्थना । **कुशल मातृ-पितृ-बंधु-परिजनां ॥**
(२।१५७।७-८)

(२) भरतानें पण शंकरांचीच साक्ष दशरथांप्रमाणेंच काढली,
ऐकुनि कीं रघुनाथ गत वना । मुनिवेषें सहसितालक्ष्मणां ॥
पदत्राणविण चालत पायीं । *शंकर साक्षि* **जगें या घायीं !** ॥ (२।२६२।४-५)

(३) भरतानें कौसल्येजवळ शपथा घेतल्यानंतर—
त्यांची गति मज देवो शंकर । **जननि भेद हा मी जाणें तर** ॥ (२।१६०।८)

सद्गति दुर्गति दाता शंकर हें दाखविलें.

वसिष्ठ — भरतप्रेमानें द्रवून वसिष्ठ श्रीरामास सांगतात (२।२५८।८)
' मम मत राखुनि भरतरुचीला । जें कराल, शुभ, *शिव साक्षीला* ' ॥

श्रीराम — (१) जनकपुरीहून परत आल्यावर पहिल्या रात्रीं
स्मरुनि शंभु **गुरु विप्रपद डोळा लागे त्यांस** ॥ (१।३५७)

(२) अयोध्येंतून वसिष्ठद्वाराजवळून प्रयाण करतांना
प्रार्थुनि **गणपति** *गौरि गिरीशां* । **निघति...**॥ (२।८१।२)

(३) नंतर सुमंत्र रथ घेऊन आल्यावर
सितारामलक्ष्मण रथीं *शंभुस नमिति* **चढून** । (२।८५)

(४) शृंगवेरपुरास गंगापार गेल्यावर—
करुनी *रघुकुलनाथ* **मज्जना** । *पार्थिव पूजुनि करिती नमना* ॥ (२।१०३।१)

(५) शिवपूजन करून पायीं चालत निघतांना—
स्मरुनि **प्रभु गणपति** *शिवा* **गंगे नमुनि शिरास** ॥ (२।१०४)

(६) त्रिवेणींत गेल्यावर—
मोदें स्नान *करुनि शिवपूजन* // (२।१०६।३)

(७) चित्रकूटास असतां—
स्नान बंधुसह करुनी *पूजिति । त्रिपुरारिस... //* (२।२२६।८)

(८) **सहज सत्य वदुं** *साक्षी शंकर* । **भरत राहि महि तुम्हि राखा तर** ।।
(२।२६४।१)

यापेक्षां अधिक विस्ताराची व अवतरणांची आवश्यकता नाहीं. दशरथ विष्णु-वासुदेवादिपूजक होते हें मानसांतील वचनांनीं न दाखवितांच वरील सर्व वचनांचा विचार करूनसुद्धां ज्यांस म्हणावयाचें असेल कीं रघुकुल इष्टदेव भगवान शिव नसून रामच आहेत त्यांनीं सुखानें तसें म्हणावें.

महत्त्वाचीं अन्य वचनें—

(१) *इच्छित फल, विण शिव-आराधन* । **देति न कोटि योग जप साधन** ।।
(१।७०।८)

(२) *शिवपदकमलीं रति ना ज्यांसी । ते स्वप्निंहि* **ना** *प्रिय रामासी //*
(१।१०४।५)

(३) *कृपा पुरारि न कारिति जयासी । भक्तिलाभ मम* **मुनि** ! *न तयासी* ।।
(१।१३८।७)

(४) *शंकर-भजन विना नर भक्ति न मम लभतात //* (७।४५)
असें रामवचनच आहे.

या वचनाची सत्यता व यथार्थता पूर्णपणें पटविण्यासाठींच या प्रकरणांतील सर्व वचनें द्यावीं लागलीं. हीं अवलोकन केल्यावर मानसांतील 'रघुकुल इष्टदेव भगवान शिव' नाहींत असें कोण म्हणेल ?

याप्रमाणें मानसाधारें सिद्ध झालें कीं रघुकुलांतील कुलदेव आणि दशरथांचे इष्टदेव भगवान शंकर आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।३ 卐 卐 卐

जनकराजा शिवपूजक

मिथिलापति जनकराजा जरी ब्रह्मनिष्ठ होते तरी ते शिवोपासक होते.

शिवभजनाविण रामभक्ति ना । प्राप्त होइ हें विदित सुजाणा ।। प्रज्ञा. ।।

(१) जनकपुरींतील लोकच दशरथ व जनकराजा यांविषयीं म्हणाले, (१।३१०।२)
' *यांसम कोणि न शिव आराधित* । **कोणि न यांसम फलास साधित** ।।

(२) **सीता कुमारीनें** — विदेहराज किशोरीनें भवानीची स्तुति केली. त्या स्तुतींत 'जय जय **शिवमुखचंद्रचकोरी** ', ' **भवभवविभवपराभवकारिणि** ' = ' जगाची उत्पत्ति, स्थिति, लय करणारी ' असें भवानीला म्हटलें; आपल्या उपास्य देवाच्या शक्तीलाच ' उद्भवस्थितिसंहारकारिणी ' म्हणतात. या वेळीं जनककुळांतील परंपरे-प्रमाणें सीता भवानीपूजनास आली होती.

(**क**) पुन्हां धनुर्मखमंडपांत म्हणते, (१।२७५।५)

' **प्रार्थी मनिं, आर्त होउनि विकला** । *व्हा प्रसन्न शिवभवानि मजला* ॥'

(३) कुलदेवसदृश वसिष्ठ पूजुनि विनविलें

मग केली कोसलपति पूजा । *गणुनि ईशसम* **भाव न दूजा** ॥ (१।३२०छं)

(४) श्रीरामाची स्तुति करतांना जनकराज म्हणाले,

' **चिदानंद निर्गुण गुणराशी** ॥ **जें त्रयकाळिं एकरस राहत** ॥ (१।३४०।८)

नयन विषय मज होइ तें जें समस्त सुखमूल ।

सकल लाभ जीवा जगीं ईश यदा अनुकूल ॥ ३४१ ॥

इच्छित फल विण शिव-आराधन । **देति न कोटि योग जप साधन** ' ॥ (१।७१।८)

या दोन वचनांची तुलना करून ईश = शिव हेंच ठरतें कीं ईश = राम हें ठरतें ?

(५) **जनकपुरवासी म्हणतात,**

' **सखि सब** *करिल पुरारि* **पुण्यपयोनिधि भूपयुग** ' । (१।३११)

(६) शिवधनुष्य जनकांच्या कुळांत पूजेला ठेवलें होतें हें आणखी एक प्रत्यक्ष प्रमाण आहे.

उपासनापद्धति व मर्म जाणणारा कोणीहि निःपक्षपाती वाचक असेंच म्हणेल कीं मानसांतील जनकराजा शिवोपासक होते.

जनक विष्णुपूजक होते असें ठरविण्यास मानसांत एकसुद्धां वचन नाहीं.

' **शंकरभजनविना नर भक्ति न मम लभतात** ' । (७।४५)

या श्रीरामोक्त सिद्धान्ताची सिद्धि वरील निर्णय मान्य केल्यानेंच होते.

यापेक्षां अधिक पुराव्याची व विस्ताराची आवश्यकता नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।४ 卐 卐 卐

मानसांत शुभाशुभ शकुन

श्रीरामचरितमानसांत वर्णिलेल्या शकुनांत अंगस्फुरणशकुन, शिंकाशकुन व इतर प्राण्यादिकांचे शकुन असे तीन प्रकार आढळतात. कार्यारंभीं हर्ष हा शुभ शकुन यांहून निराळा असून त्याचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे. प्रत्येक सोपानांत या तीन चार प्रकारांपैकीं एक दोन बहुधा आहेतच. प्रथम अंगस्फुरणाचीं उदाहरणें घेऊं.

अंगस्फुरणशकुन — पुरुषांचीं दक्षिणांगें व स्त्रियांचीं वामांगें स्फुरणें हा शुभ शकुन असतो आणि याच्या उलट म्हणजे पुरुषांचीं वामांगें व स्त्रियांचीं दक्षिणांगें स्फुरणें हा अपशकुन–अशुभ शकुन–कुशकुन होय. मुख्यतः बाहू व नेत्र यांचें स्फुरणच शकुन म्हणून वर्णिलें आहे. या शकुनाचें फळ अयोध्याकांडांत श्रीरघुनाथानेंच स्पष्ट सांगितलें आहे.

(१) **शोभन रामाभिषेक ऐकत । उत्सव-गजर नगरिं बहु चालत ॥ ३ ॥**
सीताराम शकुन अनुभवती । सुंदर *मंगल अंगें स्फुरतीं* ॥ ४ ॥
प्रेमें पुलकित वदाति परस्पर । *सुचाविति भरतागमना प्रियकर* ॥ ५ ॥
गत किति दिन वाटे चुकलेसें । *शकुनीं वाटे प्रिय भेटेसे* ॥
कोण जगीं प्रिय सम भरताही । हेंच शकुन-फल दुसरें नाहीं. ॥ ७ ॥ (२।७)

यावरून ठरलें कीं प्रिय असलेल्याचें आगमन किंवा **प्रिय असलेल्याची भेट हें शुभांगें स्फुरण्याचें फळ आहे;** आणि **प्रिय वियोग हें अशुभांगें स्फुरण्याचें फळ आहे,** व ज्या काळीं शकुन होईल त्या काळीं प्रिय असलेल्याचा विचार करावयाचा.

(क) हे शुभशकुन सीतारामांना वनवासाच्या आदल्या दिवशीं झाले. याचें फळ भरताचें अयोध्येंत आगमन आणि सीतारामांस भेटणें असें ठरलें. हे शकुन झाल्यापासून सुमारें **२१।२२ व्या दिवशीं भरत दुःखी अयोध्येंत आले** आणि शकुनाच्या दिवसापासून सुमारें **५२ व्या दिवशीं रामभरतभेट** चित्रकूटास झाली.

(२) **पुष्प वाटिकेंत श्रीरघुवीराचीं शुभांगें** स्फुरलीं.

पाहुनि तिचे अलौकिक शोभे । सहज पूत मन माझें क्षोभे ॥
जाणे कारण सकल विधाता । स्फुरति शुभांगें बघ मम ताता ! ॥ (१।२३१।३-४)

सीतेचें दर्शन होऊन तिच्यावर मन लुब्ध झाल्यावर हा शुभ शकुन झाला. **याचें फळ प्रिय असलेल्याची भेट-प्राप्ति, हें दुसऱ्याच दिवशीं मिळालें.** धनुर्भंगानें सीताप्राप्ति झाली.

(३) त्याच दिवशीं पुष्पवाटिकेंत सीतेचीं शुभांगें स्फुरलीं.

मंजुल मंगलमूल वामांगें लागलीं स्फुरूं ॥ (१।२३६)

स्त्रियांचीं वामांगें स्फुरणें हा मंगल शकुन आहे हें येथें सांगितलें. श्रीरामप्राप्ति सीतेला प्रियतम आहे. तिलासुद्धां शकुनाचें फळ दुसऱ्याच दिवशीं मिळालें.

(क) या तीन उदाहरणांनीं दाखविलें कीं या शकुनाचें फळ १ पासून ५२ दिवसांपर्यंत मिळूं शकतें.

(४) सुन्दरकाण्डांत सीतेला व रावणाला अंगस्फुरण शकुन झाले. सीतेचीं वामांगें म्हणजे शुभांगें स्फुरलीं व रावणाचीं वामांगें म्हणजे अशुभांगें स्फुरलीं.

वैदेही प्रभु प्रयाण जाणत । वामांगें स्फुरलीं जणुं सांगत ॥
शकुन जानकिस जो जो झाला । तो तो अशकुन दशाननाला ॥(३६।५-६)

(क) श्रीरघुवीरानें मार्गशीर्ष कृष्ण अष्टमीला कपिसैन्यासह प्रयाण केलें व मार्गशी

कृष्ण चतुर्दशीला सागरतीरावर पोंचले व त्याच दिवशीं हा समाचार लंकेंत सर्वांना कळला; पण सागर ओलांडून लंकेच्या भूमींत राम गेल्याशिवाय प्रियाचें व अप्रियाचें आगमन हें फळ मिळालें असें म्हणतां येत नाहीं. पौष शुद्ध चतुर्दशीला राम सुवेल शलावर उतरले; म्हणजेच २२ **दिवसांनीं शकुनाचें एक फळ दोघांना** (सीता व रावण) **मिळालें**; पण सीतारामभेट वैशाख शुक्ल तृतीयेला झाली आहे. म्हणजे सुमारें **४ महिने १०।११ दिवसांनीं सीतेला मुख्य फळ मिळालें.**

(**ख**) शत्रूचें-अप्रियाचें-आगमन हें फळ रावणाला २२ दिवसांनीं मिळालें पण **प्रियवियोग**(बिभीषण लंकेतून गेला)**रूपी फळ १२।१३ दिवसांनींच मिळालें;** नंतर प्रियपुत्र अंगदानें मारला.

(५) अयोध्याकांडांत कैकयी कुबडोला सांगते,

‘ **बघ मंथरे खरें वच तव तों । उजवा नेत्र नित्य मम लवतो** ॥ ’(२।२०।५)

स्त्रियांना हा अपशकुन-अशकुन आहे. याचा जो अर्थ समजणें जरूर होतें तो न समजतां तिनें भलतांच अर्थ लावला. पुत्रासह दास्य करावें लागणार असा अर्थ कैकयीनें घेतला. पण या अपशकुनाचें फळ अप्रियाचें आगमन व प्राप्ति आणि प्रियवियोग हें असतें. (**क**) अप्रिय असलेलें वैधव्य आलेंच व अपशकुनांच्या वेळीं अतिप्रिय असलेल्या रामचंद्रांचा वियोग आणि पतिवियोग-पतिमरण या गोष्टी घडल्याच. त्यानंतर प्रिय असलेल्या भरतानें तिचा त्याग केला व हें प्रियवियोग फळ जन्मभर भोगावें लागलें. **रामवियोग** हें फळ **दुसऱ्याच दिवशीं** मिळालें व **पतिमरण व वैधव्य ७ व्या दिवशीं !**

ल. ठे. — अंगस्फुरणानें सुचविलेलें शुभ वा अशुभ फळ काय हें परिस्थितीचा नीट विचार करून ठरविलें पाहिजे. प्रिय कोण व अप्रिय कोण हें स्पष्ट कळलें पाहिजे. (**क**) अपशकुनांचें फळ चुकविण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. (**ख**) अपशकुनाचें फळ लवकर मिळतें.

(२) शुभांग स्फुरणानें सुचविलेलें फळ १ दिवसापासून ४ महिनेपर्यंतसुद्धां मिळूं शकतें. म्हणून त्या शकुनांचें फळ काय हें त्याच वेळीं निश्चित समजून दिवस मोजीत राहिलें पाहिजे. (**क**) अंगस्फुरण शकुनांचा असा व्यवस्थित विचारच कोणी करीत नाहीं. कांहीं तरी चांगलें होणार किंवा वाईट होणार इतकेंच समजतात; व तें फळ त्याच दिवशीं मिळालें नाहीं तर शकुन खोटा समजतात; परंतु हें योग्य नाहीं. अंगस्फुरणाचा संबंध इतर गोष्टींशीं जोडूं नये. प्रियदर्शन-प्राप्ति किंवा प्रियवियोग वा आप्रियप्राप्ति हेंच फळ समजावें. उदा० कोणाचें पत्र न आल्यानें चिंता लागली आहे व शुभांग स्फुरण झालें तर समजावें कीं १।२ दिवसांत पत्र येणार. मुदतीचा अंदाज इष्ट वस्तु व परिस्थिति यांवरून करावा.

दुसरा प्रकार : शिंका-शकुन —याचें वर्णन मानसांत फक्त अयोध्याकांडांत (२।१९२। **४–७**) आहे. या शकुनाचा अर्थ लावतांना शकुन-शास्त्रज्ञांकडूनसुद्धां कशा चुका

होतात हें मानसांतच दाखविलें आहे. शिंका शुभ कोणती व अशुभ कोणती वगैरेंचा विचार गूढार्थचंद्रिकेंत सविस्तर आहे.

सूचना — बाल, किष्किंधा व उत्तर या कांडांत अपशकुनांचें वर्णन नाहीं. अरण्य व किष्किंधाकांडांत प्रयाणकाळीं हर्ष होण्याशिवाय इतर शुभशकुनांचें उल्लेख नाहींत. अरण्यकांडांत अपशकुनांचें वर्णन आहे.

प्रकार तिसरा : इतर शुभाशुभ शकुन —(१) श्रीरघुवीराच्या विवाहासाठीं अयोध्येंतून प्रयाणाची तयारी झाली तेव्हां —

जमुं लागे बस बसुनि रथिं पुरि-बाहेर वरात ।
होति शकुन सुंदर तयां जे ज्या कार्या जात ॥ (१।२९९)

(२) **सज्ज वरात** (=मिरवणूक) **वदलि ना जाई । होति शकुन सुंदर शुभदाई ॥**
चारा चास वोम दिशिं घेई । मंगल सकल कि सांगुन देई ॥
उजवा काक सुशेतीं दिसला । सकलां नकुल विलोकत बसला ॥
त्रिविध पवन अनुकूल वहतसे । सुस्त्री शिशुसह सघट येतसे ॥
भालु वळुनि दे दर्शन राजी । सुरभी सन्मुख वत्सा पाजी ॥
मृगगण वळुनी उजवे आले । मंगल-गण जणुं दिसते झाले ॥
क्षेम विशेषहि वदे क्षेमकरि । दिसली श्यामा वाम सुतरुवरि ॥
कुणि दधिमीनां सन्मुख आणी । विज्ञ विप्रयुग पुस्तकपाणी ॥
दो०— **मंगलमय कल्याणमय अभिमत फल जे देत ।**
शकुन सत्य होण्या जणूं सर्व एकदां येत ॥ ३०३ ॥

सूचना — येथें फलप्राप्तीला तीन विशेषणें लावून हें सुचविलें कीं आज अभिमत = इष्ट वाटणारी किंवा मंगलकारक वाटणारी गोष्ट परिणामीं कल्याणकारक ठरेलच असें नाहीं. म्हणून वर्तमानकाळीं घडणाऱ्या गोष्टींनें हर्ष किंवा विषाद मानणें योग्य नाहीं. चांगलें वाईट, कल्याण अकल्याण, भविष्यकाळ ठरवितो. कांहीं शकुन मंगलकार्यसूचक असतात; कांहीं इष्ट वाटणारे फलसूचक असतात व कांहीं कल्याणसूचक असतात. तिन्ही प्रकारचे शकुन दशरथास झाले. (टीकेंत विस्तार पाहावा). क्षेमकरी = लालपंख वगैरे लक्षणांची घार. (टीका पाहा).

(३) वऱ्हाडी जनकपुरीजवळ येत आहेत असें कळतांच **जीवन्मुक्त विदेही** जनकराजानें स्वागती व भेट पाठविली त्यांत,

' *मंगल शकुन* **सुगंध सुशोभित । महीपाल नानाविध** *धाडित* ॥(१।३०५।५)

(४) विदेही जनकानें वराला मूळ पाठवितांना शुभ शकुन धाडले,

मंगल कलश *शकुन शुभ साजति ...*। **निघती सादर मूळ वराला** ॥ (१।३१३।३–५)

ल. ठे. — **महाज्ञानी, विदेही म्हणून प्रसिद्ध असलेले जनकराजा शकुन अपशकुन यांचा सक्रिय विचार करीत असत** हें दाखविलें आहे.

(५) वरातीसह दशरथ अयोध्येंत प्रवेश करतात त्या वेळीं ' होति शकुन, वर्षति सुमन देव वाद्य गजरांत ' । (३४७).

कांहीं अपशकुनांचे नमुने — (१) **अयोध्येंत अनर्थ सुरूं झाला त्याच वेळीं** मामाकडे असलेल्या भरतास अपशकुन वगैरे झाले.

अयोध्येंत जैं अनर्थ चाले । तैंहुनि कुशकुन भरता झाले ॥

रात्रि भयानक पाहे स्वप्नां । जागत करि कटु कोटि कल्पना ॥

हीं भयानक स्वप्नें कोणतीं व काय दर्शविणारी होतीं याविषयीं वाल्मिकि रामायणाच्या आधारें गूढार्थचंद्रिकेंत विस्तार आहे.

(२) **भरत अयोध्येंत येत असतां** —

नगरिं शिरत किति कुशकुन घडती । काक कुठायीं कटु ओरडती ॥

खर कोल्हे प्रतिकूल ओरडति । तदा भरतमनिं शूल घोर अति ॥

श्रीहत वन बागा सर सरिता । नगरी भारि भयाण निरखितां ॥ (२।१५८।४-६)

(३) **कैकयीला**—

' दुःस्वप्नें प्रतिरात्रीं पडतीं । मोहें केलीं तुज न उघड तीं ॥ (२।२०।६)

कैकयी अहंकारी व तमोगुणप्रधान असल्यानें ती कोणाजवळ बोलली नाहीं (पतीपासूनही लपविलीं).

(४) अरण्यकांडांत खरदूषण सैन्यासह युद्धास निघाले तेव्हां त्या अपशकुनी नकटीला पुढें ठेवलें व त्यांस पुष्कळ अपशकुन झाले.

होती अशकुन भीतिद मिति ना । मृत्यु विवश झुंडी मानिति ना ॥ (१८।७)

वाल्मिकि रामायणांत हें वर्णन विस्तृत आहे. तें लंकाकाण्ड परिशिष्टांत दिलें आहे.

(५) लंकाकांडांत रावणाचे छत्रमुकुट आणि मंदोदरीचीं कर्णफुलें तुटून फूटून भूमीवर पडलीं व कारण कांहींच कळलें नाहीं तेव्हां,

निज निज चित्तीं सचिंत सारीं । अशकुन होति भयंकर भारी ॥ (१४।२)

आणखी उदाहरणें — ६।७८।१ – ७८; ६।८६।१–२; १०२।७ – १० व छंद यांत रावणास झालेल्या अपशकुनांचें संक्षिप्त वर्णन आहे. वाल्मिकि रामायणांतील वर्णन लंकाकाण्ड परिशिष्टांत पाहावें. येथें इतका विस्तार पुरेसा आहे.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।५ 卐 卐 卐

प्रयाणसमयीं वा कार्यारंभीं हर्ष

प्रयाणसमयीं किंवा कार्यारंभीं हर्ष होणें हें कार्यसूचक असतें. हा सिद्धान्त मानसांत अन्वयंव्यतिरेकपद्धतींनीं अगदीं स्पष्ट करून दाखविला आहे. याचा स्पष्ट उल्लेख प्रथम हनुमंताच्या मुखानें सुंदरकाण्डारंभीं केला आहे. येथें हर्ष = उत्साह असा अर्थ आहे. जेथें प्रयाणसमयीं हर्ष झाला तेथें कार्य सिद्धीस गेलेलें दिसतें व हर्ष झाला नाहीं

तेथें कार्यसिद्धि नाहीं किंवा निर्विघ्नपणें झालेलें नाहीं असें आढळतें.

बालकाण्ड —

(१) **पुरुषसिंह युगवीर** *हर्षिं निघति* **मुनिभयहरण** ।। (२०८)
मुनिभयहरण कार्य उत्तम प्रकारें झालें.

(२) **कळत धनुर्मख रघुकुलनाथा** । *निघती हर्षित* **मुनिवर-साथां** ।। (२१०।१०)
विश्वामित्राश्रमांतून निघाले ते धनुर्यज्ञासाठीं; व तें कार्य पूर्णपणें यशस्वी झालें आहे.

(३) अहल्योद्धार करून तेथून निघतांना हर्ष झाला नाहीं;

निघति रामलक्ष्मण मुनिसंगें ।। (११२१२)

कारण कीं गुरूंच्या आज्ञेनें केला असला तरी परस्त्रीला-विप्रस्त्रीला-पादस्पर्श केला त्यामुळें उत्साह नाहीं; (२११ छंद १ पाहा.) पण गंगेंत स्नान केल्यानें त्या किल्मिषाचें क्षालन झाल्याचा अनुभव आला तेव्हां—

(क) तेथून निघतांना हर्ष झाला आहे.

'प्रभु ऋषिंसह तैं स्नाना करती' ।। **'सह मुनिवृंद** *सहर्ष निघाले* ' ।। (२१२।४)
व विदेहपुरास गेले आहेत. तेथें सर्वस्वीं यशस्वी झाले. या कांडांतील इतकीं उदाहरणें पुरेत.

अयोध्याकांड — (१) निषादराज गुह श्रीरघुनाथभेटीस निघाला तेव्हां—

फलमूलादि भेट घे फार हि । निघे भेटुं, हृदिं हर्ष अपार हि ।। (८८।२)

फल हें मिळालें कीं अस्पृश्य असूनसुद्धां प्रभु त्यास हृदयाशीं धरून भेटले (१९४।६ पाहा.) व त्याला जवळ बसविलें. अपार हर्ष झाला होता; व हा अपार लाभ मिळाला !

अरण्यकाण्ड —

(१) **तदा तथास्तु रमापति वदती । घटज ऋषिकडे सहर्ष निघती** ।। (१२।१)
निशाचर वधाचा उपाय (मंत्र) विचारण्यासाठीं निघाले होते. व तो हेतु सफल झाला.

(२) **सत्यसंध ! त्या वधुनि चर्म तें । प्रभु आणा वैदेही वदते** ।।

रघुपति जाणुनि सर्व कारणा । उठति हर्षिं सुर-कार्य-साधना ।।

सुरकार्य करण्यासाठीं उठतांना हर्ष झाला. फल सीताहरण निर्विघ्नपणें पार पडलें. यानेंच सुरकार्य साधणार आहे.

किष्किंधाकांड — सुग्रीवानें पूर्व, पश्चिम व उत्तर या तीन दिशांस वानर पाठविले. त्यांस निघतांना हर्ष झाला नाहीं; परिणाम स्पष्ट दिसला कीं त्यांस सीताशोध लागला नाहीं.

श्रवत वचन जेथें तिथें करिती कपी प्रयाण । (४।२२)

यांना प्रयाणसमयीं हर्ष झाला नाहीं; पण (क) अंगदादि

आज्ञा घेति पायिं शिर नमती । हर्षें निघती स्मरत रघुपती ।। (२३।८)

यांना उत्तम यश मिळालें. सीताशोध लागला.

सुन्दरकांड — (१) सागरलंघनासाठीं निघतांना हनुमान म्हणाले,

‘ होइ काज मज हर्ष विशेषीं ’ । ‘ **ध्यात** *निघे हर्षित* **रघुनाथा** ’ ॥ (१।३) प्रयाणसमयीं होणारा हर्ष (उत्साह) कार्यसिद्धिसूचक असतो हें येथें रामदूताग्रणीच्या मुखानें प्रगट केलें. (**क**) येथें हनुमन्तास *विशेष हर्ष झाला* आहे; म्हणून सुचविलें कीं कांहीं तरी *विशेष कार्य* घडणार आहे. याची प्रतीती पुढें स्पष्टच दाखविली आहे. ‘ रामकृपें कृत *विशेष कार्या* ’ (२८।४) असें सुग्रीवास भेटल्यावर जांबवंतानें सांगितलें आहे. अपार हर्ष झाला तेव्हां अपार कार्यसिद्धी पूर्वीं दाखविली आहे. शब्दयोजनेंत समन्वयाची दक्षता प्रशंसनीय आहे.

(२) सुरसा विजयानंतर निघतांना हर्ष झाला आहे.

आशिस देऊनि गेली; हर्षित गत हनुमान ।

सुरसाविजयानंतर गुप्त छायाग्रहाला मारून रामदूत सागरपार सुखानें गेला आहे.

(३) **अति लघुरूपा घेउनि शिरूं रात्रिं नगरांत** । (५।३) असें ठरवून, **मशकसमान रूप कपि धरी** । *लंके निघे स्मरुनि नरहरी* ।। (४।१) येथें निघतांना हर्ष नाहीं. मशकाएवढा लहान बनूनसुद्धां इच्छेप्रमाणें रात्रीं लंकेंत शिरतां आलें नाहीं; लंकिनीनें अडविलेंच; तिला स्पर्श करावा लागला ! भगवंताचें **स्मरण** करून निघाला तरी **हर्षाच्या अभावीं मोठें विघ्न आलेंच**.

(४) लंकिनी विजयानंतर लंकिनीचा आशीर्वाद मिळाल्यावर —

हनुमान अति लघुरूपा धरूनी । *पुरिं शिरले भगवंता स्मरुनी* ॥

हर्ष नाहीं व सर्व लंका शोधली तरी **वैदेही दिसली नाहीं.**

(५) **रामायुधअंकित गृह छवि वदली ना जाय ।**

नवलतुलसीवन, हर्षले, बघुनि तिथें कपिराय ॥

असा हर्ष झाला आणि **थोड्याच वेळानें** बिभीषणाची भेट होऊन **सीता दृष्टीस पडली.**

हर्ष आणि त्याचा अभाव यांचा परिणाम हनुमन्ताच्या चरित्रांत असा पदोपदीं दाखविला आहे. हनुमान मुख्य कार्यकर्ता असल्यानें त्याच्या चरित्रांत व श्रीरघुवीराच्या चरित्रांत हें प्रामुख्यानें दाखविलें आहे. यापुढील हनुमानचरित्राचें या दृष्टीनें वाचकांनीं सूक्ष्म अवलोकन करावें म्हणजे श्रीतुलसीशब्दकलेचें अल्पसें दर्शन होऊन आश्चर्य वाटेल.

लंकाकांड — (१) शिष्टाईसाठीं लंकेंत जाण्यास निघतांना **अंगदास हर्ष झाला.**

हें चिंतुनि युवराज, हर्षित, तनु पुलकित सहज ।

...जाई अंगद सकलां नमुनी ’ (१७ म, १८।१)

सर्व प्रकारें अलौकिक कीर्ति संपादन करून परत आला आहे. परत निघतांनाहि हर्ष झाला. (३५ रा पाहा.)

(२) लंका दुर्गावर पहिला हल्ला करण्यास कपिसेना निघाली, युद्धाचा श्रीगणेशा केला, तेव्हां

हर्षित **रामचरणिं शिर नमविति । वीर घेति गिरिशिखरें** *धावति* ।।

चांगलें यश मिळालें आहे.

(३) या काण्डांतील **हनुमच्चरित्रांतला हर्ष व त्याचा अभाव वाचकांच्या अवलोकनासाठीं राखून ठेवणें योग्य वाटतें.**

उत्तरकांड — (१) गरुड नारदाकडे निघाला तेव्हां **हर्ष नाहीं.** ' जाई व्याकुळ सुरर्षिपाशीं (५९।३) पण नारदानें ब्रह्मदेवाची वाट दाखविली ! **कार्य झालें नाहीं.** (६०।१ पाहा.)

(२) चतुराननाकडे निघाला गरुड तेव्हांहि **हर्ष नाहीं.** ' खगपति विरंचिपाशीं गेला ' (७।६०।१) त्यांनीं कलासाचा रस्ता दाखविला ! ' वैनतेय जा निकट शंकरा ' (६०।७). **कार्य झालें नाहीं.**

(३) शंकरांकडे **निघतांना हर्ष नाहीं.** ' निघे विहग ऐकत विधिवाणी ' शंकरांनीं अघळ पघळ पुष्कळ समजावून सांगितलें पण शेवटीं नीलगिरीकडे बोट दाखविलें ! (६२।२) **कार्य झालें नाहीं.**

(४) शंकरांकडून भुशुंडीकडे जाण्यास निघतांना मात्र **हर्ष झाला;** व भुशुंडीकडे **जातांच कार्यसिद्धि झाली. ' हर्षित निघे** पदीं शिर नमवुनि ' ।। (७।६२।६) .

हा सिद्धान्त निरपवाद करण्यासाठीं जेथें हर्ष होऊन परिणामीं विषाद झाला तेथें हर्षणें—हरषना हें क्रियापद न वापरतां रहसना असें त्याचें उलटें रूप करून तें वापरलें आहे. (हिंदींत)

श्रीराम हर्षविषादरहित असल्याचें वर्णन मानसांत असून त्यांस हर्ष कां झाला याचें समाधान ' रामजी को हर्ष ' या लेखांत मानसमणींत पाहावें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।३ 卐 卐 卐

विविध स्फुट विषय

श्रीमानसांतील ज्या विषयांचा विस्तार स्वतंत्र प्रकरणांत देण्याइतका नाहीं, पण जे महत्त्वाचे आहेत अशा पांच विषयांचें वर्णन या प्रकारणांत केलें आहे.

१. बाल व आर्त सारखे

(१) विश्वामित्र भृगुपतीस सांगतात,

' कौशिक वदे क्षमा अपराधू । बालदोषगुण गणाति न साधू ' ।।

(२) **' बाल-बोल ना कानीं घ्यावे '** । (१।२७९।२-३)

' गांधिल बालक समस्वभावहि । त्यांस संत डिवचीत कधीं नहिं ' ।।

(३) ' आर्त कधीं न विचारें वदतो '। (२।२५८।१)
(४) ' आर्तांचे मनिं विवेक नसतो ' ॥ (२।२६९।४)
(५) ' आर्त कोणत्या करि न कुकर्मा '। (२।२०४।७)

या वर्णनावरून सार निघतें कीं बालक आणि आर्त झालेला मनुष्य सारखेच; त्यांच्या बोलण्याला व कृतीला फारसें महत्त्व देऊं नये. **बालकांत विवेक विचार नसतो तर आर्तांची विवेक विचारशक्ति राहिलेली नसते म्हणून दोघे सारखेच.**

२. जिवंत शवासमान कोण?

(१) हृदयीं हरिभक्ति न आणिति जे। *जीत शवासम गणा प्राणि ते* ॥ (१।११३।५) हें शंभुवचन आहे.

(२) अंगद रावणास म्हणाला,

' मृता मारणें नहि पुरुषत्वहि ॥ १ ॥
कौलकामवश, कृपण विमूढहि । अति दरिद्र अयशी अति वृद्धहि ॥ २ ॥
रोगी सदा, सतत जो क्रोधी । विष्णुविमुख श्रुति–संत–विरोधी ॥ ३ ॥
तनुपोषक निंदक अघखाणी। *जीवन शवसम चौदा प्राणी* ॥ ४ ॥

या चौदांपैकीं बरींच लक्षणें रावणाच्या ठिकाणीं आहेत. (टीका पाहा.)

३. आत्मघातकी कोण? (१) रघुपतिकथा श्रवण केल्यानंतर उमा–पार्वती म्हणाली,

' आत्मघातकी **जीव मूर्ख** *ते । ज्यांना रघुपति कथा न रुचते '* ॥

(२) श्रीरघुनाथ अयोध्यावासी लोकांना उपदेश करतांना म्हणाले,

' नरतनु भववारिधींत तारू । सन्मुख मरुत कृपा मम चारू ॥
कर्णधार सद्‌गुरु दृढ नावे । दुर्लभ साज सुलभतें पावे ॥
जो न तरे भवसिंधु नर पावुनि या सर्वांस ।
तो कृतघ्न जडधी लभे गति जी आत्मघ्नास ' ॥ (७।४४।७-८ व दोहा)

४. राज्य–सत्ता–मद — (१) दक्ष प्रजापति सत्तामदानें अंध झाला.

होतां दक्ष महा अधिकारी । हृदिं अभिमानें फुगला भारी ॥
जगिं न जन्मला कोण असा ही । ज्या प्रभुता पावुनि मद नाहीं ॥ (१।६०।७-८)

(२) लक्ष्मण भरताविषयीं साशंक होऊन श्रीरघुनाथास म्हणाले —

' विषयि जीव ज प्रभुता पावति । मूढ मोहवश होती **प्रगटति** ॥
कोण दोष दे वृथाचि भरता । ....*माजे जगचि राज्यपद मिळतां* (२-८)

दो. — **शशि गुरुतल्पग, नहुष नृप करी भूसुरां यान ॥**
विमुख लोक वेदां बने अधम न वेनसमान ॥ २२८ ॥
दशशतभुज सुरपती त्रिशंकू । *कुणा राज्यपद दे न कलंकू* ॥
(२।२२८।१ – २२९।११)

(क) आकाशवाणीनंतर रघुनाथ म्हणाले,

' तात ! कथित तुम्हीं नीती सुंदर । बंधो ! *नृपमद इतरिं कठिणतर* ।।
चढे पिउनि मद भूपां त्यांही । साधुसभा जिहिं सेवित नाहीं ।।
भला भरतसा लक्ष्मण ! कोणी । विधी प्रपंची दुष्ट न कानीं ।। (२।२३०।६-८)

सत्ता-प्रभुता ही एक दारू आहे. ती पिण्यानें मद चढतो सर्व मदांमध्यें राज्यमद सत्तामद फार कठिण असतो; पण ज्यांनीं साधुसमाजसेवा व दीर्घकाळ संतसमागम केला नसेल अशानांच सत्तामद-राज्यमद चढतो.

(३) राज्यमदाचें मानसांतील एक उदाहरण वाली.

(४) राज्यमदाचा सजीव पर्वत किंवा राज्यमदाचा सजीव विशाल भयानक पुतळा म्हणजे रावण.

५. यथाधिकार व्यवहार — अधिकारानुरूप व्यवहार कसा करावा हें वसिष्ठ व दशरथ यांच्या संबंधांत दाखविलें आहे. मानसांतील वसिष्ठ दशरथ, राम, भरतादिकांचे गुरु आहेत व रघुकुलांचे कुलगुरु-कुलपुरोहित आहेत.

दशरथांच्या वागण्यांत वरील अधिकारभेदानुसार भेद आहे. ज्या ज्या वेळीं कुलपुरोहित नात्यानें वसिष्ठांची गरज लागली त्या त्या वेळीं दशरथांनीं वसिष्ठांस आमंत्रण पाठवून बोलावून आणलें आहे, व कार्यास पाठविलेंहि आहे; पण ज्या वेळीं गुरु या नात्यानें वसिष्ठांशीं बोलणें जरूर होतें त्या वेळीं दशरथ स्वतः वसिष्ठांच्या आश्रमांत जाऊन शिष्यास योग्य अशा पद्धतीनें वागले आहेत. या दृष्टीनें दशरथ चरित्राकडे न पाहिल्यास त्यांचें वागणें विसंगत वाटतें व शंका विचारण्याची पाळी येते.

वसिष्ठांनींसुद्धां यथाधिकारच व्यवहार केला आहे. अयोध्येत परत येऊन रामविवाहांगभूत लोकवेदविधि सादर उरकल्यावर दशरथ

मग गुरुपदपंकजां पूजती । प्रीति न थोडी मनीं, विनवती ।। ८ ।।

मग सर्व वधूवर व सर्व राण्यांसहित महीश यांनीं वारंवार गुरुपदांना वंदन केलें व त्यांनीं आशीर्वाद दिले. नंतर चारी पुत्र आणि आपली सर्व संपत्ति दशरथांनीं गुरुभावनेनें वसिष्ठपदीं अर्पण केली व ती स्वीकारण्याबद्दल विनंति केली; पण—

विवाहांत वसिष्ठांनीं जें कार्य केलें तें गुरु या नात्यानें केलें नसून पुरोहित नात्यानें केलें असल्यामुळें वसिष्ठ,

मुनिवर हक्क मागुनी घेती । बहुविध आशीर्वादां देती ।।

पुरोहिताच्या हक्काचें व मानाचें जेवढें घेणें योग्य होतें तेवढेंच घेतलें व तें मागून घेतलें. बाकीच्या संपत्तीवर पुरोहित नात्यानें त्यांचा अधिकार नव्हता म्हणून ती घेतली नाहीं. **याचें नांव यथाधिकार निःस्पृह व चोख व्यवहार** ! पण आज हें कोण लक्षांत घेतो !

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।७ 卐 卐 卐

तद्देशीय रीतिरिवाज

महाकाव्यनिर्मात्यांच्या ग्रंथांत, किंवा समाजांत राहणाऱ्या संत-कवींच्या मोठ्या छोट्या ग्रंथांत बहुधा त्या त्या देशांतील व काळांतील चालीरीतींचें प्रतिबिंब सहज पडत असतें. शिवाय देशाचारानुसार वर्णन नसेल तर 'आचारविरुद्ध' हा काव्यदोष निर्माण होतो. मानसांतसुद्धां उत्तर हिंदुस्थानी रीतिरिवाजांचे प्रतिबिंब आहेच.

(१) **पडदापद्धति** — क्षत्रिय कुळांत विवाहित स्त्रियांमध्यें पडदापद्धतीचे उल्लेख वाल्मीकि रामायणांतही आहेत. मानसांतसुद्धां ही पद्धति दिसते. लंकाकांडांत सीतेला लंकेतून आणलें व सीता, माण्डवी वगैरे नववधू वरातीच्या वेळीं आणल्या त्या वर्णनांवरून पडदापद्धति सिद्ध होते.

(क) **नानाविध भूषणें घातलीं । सजवुनि शिबिका रुचिर आणली ॥**
हर्षें तींत बसे वैदेही । स्मरुनि राम सुखसिंधू स्नेही ॥
वेत्रपाणी रक्षक दिशिं चारी । जाति सकल उल्हासें भारी ॥ ९ ॥
दर्शनार्थ कपि भल्ल पातले । क्रोधें रक्षक वारुं लागले ॥
तैं रघुवीर म्हणति मम माना । सखे! पायिं सीतेला आणा ॥
जननीसम बघतिल कपि सगळे । (६।१०८।७-१२)

वाल्मीकि रामायणांत रघुवीर तर बिभीषणावर रागावले आहेत कीं, तुमचे रक्षक माझ्या वानरांना काय म्हणून हाकलीत आहेत. पडदापद्धतीस अपवाद कोणते तें (वाल्मीकि रामायण युद्ध. ११७।२७ - २८ पाहा.) ते श्लोक गूढार्थचंद्रिकेंत आहेत.

(ख) रावणानें सीतेच्या भोंवतीं पाहाऱ्यावर ठेवलेल्यांत पुरुष-राक्षस कोणी नव्हते. रावण सीतेकडे गेला त्या वेळीं त्याच्या सर्व स्त्रिया त्याच्याबरोबर होत्या, इतर पुरुष कोणी नव्हता व तोहि एकटा गेला नाहीं. तरीसुद्धां सीतेनें पडदानिदर्शक एक गवताची काडी मध्यें ठेवलीच !

(ग) बालकाण्डांत रामभरतादिकांची वरात आली तेव्हां,

आरति करिति मुदित *पुरनारी* । **हर्षति बघुनि कुमर वर चारी ॥**
शिबिका पडदे सुंदर उघडुनि । सुखमय होती वधूंस निरखुनि ॥

पुरनारींनीं मेण्यांचे पडदे उघडून चारी नववधू पाहिल्या.

(२) **वरातीची पद्धति** —लग्न झाल्यावर वरातीच्या वेळीं नववधूवरांस (नवरा-नवरी यांना) एकाच वहानांत अगदीं जवळजवळ बसवून नेण्याची पद्धति महाराष्ट्रांतील सर्व हिंदूंत प्रचलित आहे.

(क) मानसांत निदान क्षत्रियांत तरी ही पद्धति दिसत नाहीं. रामभरतादिकांच्या वरातीच्या वेळीं अयोध्येस येतांना, जनकराजानें मुलींनाच आपल्या घरीं आपल्या येथील

मेण्यांत बसविल्या आहेत व रामभरतादि जानोशाच्या जागेजवळून उघड्या (बंद नसलेल्या) वाहनांत बसले व नंतर वरात अयोध्येंत आली तेव्हां प्रथम

पुरवासी राया जोहारति । फार बघुनि रामास सुखावति ॥ ५ ॥

ओवाळति बहु मणिगणचीरां । वारि विलोचनिं पुलक शरीरां ॥

आरति करति मुदित *पुरनारी* **। हर्षित बघुनि कुमर वर चारी ॥**

शिबिका पडदे सुंदर उघडुनि । सुखमय होती वधूंस निरखुनि ॥ (१।३४४।५-८) प्रथम दशरथ दिसले; नंतर राम व तिघे बंधू दिसले; ते पुरुषांना व स्त्रियांनाहि पडदे वगैरे न उघडतां दिसले. मात्र वधूंना पाहण्यासाठीं पुरनारींनीं पडदे उघडले. पुरुषांना नववधू दिसल्या नाहींत.: यावरून निःसंदेहपणें ठरलें कीं रामलक्ष्मण भरतशत्रुघ्न पुढें उघड्या वाहनांत होते व त्यांच्यामागें चारी वधू पडद्यांनीं बंद असलेल्या शिबिकांत —मेण्यांत होत्या.

(ख) तथापि शिवपार्वती वरातीच्या वेळीं (१।१०२ छंद) शंकर उमेसहित आपल्या वृषभावर बसून कैलासास गेले आहेत. शंकर ब्राह्मण, 'वन्दे ब्रह्मकुलं कलंक-शमनम्' (३ मं. १) यानें ब्राह्मण समाजांतील पद्धति सुचविली आणि रामवरातीच्या वर्णनांत क्षत्रियांतील पद्धति सुचविली.

३. वधूवरांचें विवाहांत एकत्र भोजन व एकमेकांस घास देणें प्रचलित होतें. वर्णन अगदीं स्पष्ट आहे.

(क) तथापि हें भोजन पुरुषसमाजांतच नसून केवळ स्त्रीसमाजांत झालें आहे. (१।३२७।१ पासून पुढें पाहा.)

(ख) विवाहानंतर वधूवरांनीं एकत्र जेवण्याचीं पद्धति महाराष्ट्रांत मराठे, कुणबी, आगरी वगैरे जातींत नाहीं. (निदान १९४० पर्यंत तरी नव्हती, पुढील माहित नाहीं.)

४. विड्या तोडणें, एकीबेकी खेळणें, मुठी सोडणें वगैरे हास्यविनोदाच्या प्रथेंत महाराष्ट्रांत इतर पुरुषांना तेथें हजर राहतां येतें (येत असे म्हणावें पाहिजे तर); मानसांतील वर्णनांत अशा प्रकारचे वधूवरांत खेळ वर्णिले आहेत; पण तेहि केवळ स्त्रीसाम्राज्यांतच चालत होते असें ठरतें. पुरुष फक्त एकटा नवरदेव व मुलीकडील सर्व स्त्रिया तेथें असतात असें हिंदी टीकांवरून ठरतें.

५. भोजनपद्धति (१) श्रीरघुवीरविवाहासारख्या सर्वैश्वर्यसंपन्न व्याहीभोजनांत रत्नांना कनकाचे टाके घालून केलेलीं हजारों रत्नकनक पात्रें आहेत; पण तेथें **रांगोळया, गंध लावणें, उदबत्त्या, समया, वाजंत्री इत्यादि कांहीं नाहीं.**

(क) शिवविवाहवर्णनांतसुद्धां या गोष्टींचा पूर्ण अभाव आहे;

(२) प्रथम भात वरण व तूप हे तीनच पदार्थ वाढले जाऊन, आहुति घेऊन सर्व मंडळी जेवूं लागल्यानंतर पक्वान्नें, भाज्या, चटण्या इत्यादि इतर विविध पदार्थ वाढण्यास प्रारंभ झाला आहे.

(क) पानें मांडण्याचें व वाढण्याचें काम स्वयंपाक करणारांनींच केलें आहे. महाराष्ट्रांत श्रीमंतांकडील विवाहांत पाटरांगोळ्या करणारे निराळे, वाढपी निराळे व आचारी निराळे असतात.

(३) पुरुष **जेवत असतां श्लोक वगैरे म्हणण्याची पद्धति नाहीं.** त्या पद्धतीच्या जागीं मुलीकडील **स्त्रियांनीं उखाणे घालण्याची** व ग्राम्य विनोदानें हंसें पिकविण्याची **पद्धत आहे.** या उखाण्यांत फार अश्लीलता असते असें गोस्वामींच्या इतर ग्रंथांवरून दिसतें व मानसांतील वर्णनावरून तसें अनुमान करतां येतें. या उखाण्यांनासुद्धां ‘ गारी ’ म्हटलें आहे आणि शिवीगाळ करणें यालाहि ‘ गारी ’ च म्हटलें आहे; पण अनुवादांत ‘ उखाणे ’ शब्द वापरला आहे. पूर्वीं महाराष्ट्रांत विहिणींच्या भोजनाच्या वेळीं उखाणे घालण्याची (कलहवर्धक) पद्धति होती.

(४) उत्सवांतील इतर प्रसंगीं गजमुक्ता व नवरत्नांच्या रांगोळ्यांनीं चौक भरण्याचे उल्लेख अनेक आहेत; पण शिवविवाहांत किंवा रामविवाहांत भोजनाच्या वेळीं रांगोळ्या वगैरेंचें नांव नाहीं ! यावरून ठरतें कीं भोजनसमयीं पंचज्ञानेंद्रियांस रमविणारी महाराष्ट्रीय पद्धति तिकडे नाहीं !

(क) ही पद्धत महाराष्ट्रांत कोणी व केव्हां रूढ केली हें इतिहाससंशोधक सांगू शकतील असें वाटतें.

६. **खाजगी संभाषणांत बहुवचन.** श्रीरामचरित मानसांत एक वैशिष्ट्य दिसतें व तें तिकडे आजसुद्धां आढळतें. आई, बाप, धाकटे भाऊ, मित्र, बालमित्र, यांच्या परस्परांतील खाजगी भाषणांतसुद्धां आदरार्थी बहुवचनाचा उपयोग मानसांत केला आहे. ही पद्धत चांगली कीं वाईट हा विचार करणेंच चुकीचें ठरेल. मराठी अनुवादांत मात्र हें तंत्र सर्वत्र पाळलें नाहीं, कारण कीं तसें करणें महाराष्ट्रीयांस प्रीति-न्यून झाल्याचें लक्षण वाटतें.

७. **उपरणें घेण्याची पद्धति** — उजव्या खाकेखालून डाव्या खांद्यावरून पदर मागें टाकून उपरणें घेण्याची पद्धति जशी महाराष्ट्रांत सर्वत्र रूढ होती तशीच मानसांत वर्णिली आहे. (१।३२६।७ पाहा .)

८. **मुलांकडील स्त्रिया विवाहांत नाहींत** — श्रीरघुवीरविवाहाचें जें वऱ्हाड अयोध्येंतून गेलें त्यांत स्त्रिया मुळींच नाहींत. कौसल्यादि मातासुद्धां गेलेल्या नाहींत.

(क) शिवविवाहांत मात्र देवांच्या स्त्रिया वऱ्हाडाबरोबर गेल्या आहेत; पण शाकिनी, डाकिनी, योगीनी गेलेल्या नाहींत.

९. **पायघड्या** — पायघड्यांचें वर्णन वेळोवेळीं आहे. वरातीच्या वेळीं वधूवरांना पायघड्यांवरून राजवाड्यांत नेल्याचें वर्णन आहे (१।३४९ पाहा). या वेळीं पुरुष कोणी नाहींत !

जें वैशिष्ट्य सहज आठवलें तें वर दिलें आहे. न्यून वाचक पूर्ण करतीलच.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।८ 卐 卐 卐

इतिहासादि संशोधकांस कार्य

गूढार्थचंद्रिकाटीका लिहिली जात असतां ज्या गोष्टींविषयीं निश्चयात्मक लिहितां आलें नाहीं व ज्या बाबतींत संशोधन होणें जरूर आहे, अशा बाबींची नोंद गूढार्थ-चंद्रिका उल्लेखांवरून केली आहे. वाचकांत विविध क्षेत्रांतील विविध अधिकाराच्या व्यक्ति असतात; सर्वज्ञ कोणीच नाहीं; निदान हा लेखक तरी नाहीं; म्हणून कांहीं संशोधनीय विषय खालीं दिले आहेत.

पाणी हलकें करणें — फार मोठ्या जलाशयाच्या पाण्यांतील जडपणा घालवून तें हलकें करण्यास आधुनिक शास्त्राप्रमाणें तीन मुख्य द्रव्यें वापरतात. श्रीतुलसीदासांनीं त्यांचीं आर्ति, विनय आणि दीनता या तीन द्रव्यांचा उल्लेख कविता शरयूचें पाणी हलकें करण्याच्या कामीं केला आहे. कळीचा चुना, चुनखडी व पापडखार या तीन द्रव्यांशीं यांचें तंतोतंत साम्य गूढार्थचंद्रिकेंत सिद्ध करतां आलें आहे. (१।४३।१ टीका पाहा.) पुराणादि शास्त्रांत या तीन द्रव्यांचा या कामीं उपयोग कुठेंतरी सांगितला असलाच पाहिजे. **हा उल्लेख शोधून काढणें आवश्यक आहे.**

२. वाघनख — लहान मुलांच्या अलंकारांत महाराष्ट्रांत व उत्तर हिंदुस्थानांत ' वाघनख ' नांवाचें एक भूषण (अलंकार) असे; अजूनहि क्वचित दिसतें. त्यांत दोन वाघनखें बसविलेलीं असतात. वाघनखांत असे कोणते गुणधर्म आहेत कीं त्यांचाच प्रवेश अलंकारांत आणि विशेषतः बालविभूषणांत आणि गळ्यांत घालण्याच्या आभू-षणांत व्हावा ? इतर कोणत्याहि प्राण्यांच्या नखादि कोणत्याहि भागाचा विभूषणांत समावेश नसतां वाघनखांचाच कां व्हावा ? सिंह वनराजा असतां त्याच्या नखांना हा मान कां मिळाला नाहीं ?

तंत्रग्रंथांत किंवा बालरक्षा वर्णनांत कुठेंतरी आधार सांपडेलसें वाटतें. हें संशोधन झालें पाहिजे. आधुनिक शास्त्रांनुसारही वाघनखांच्या गुणधर्मांचें पृथक्करण होणें जरूर आहे. इतर देशांत वाघनखांचा असा उपयोग होत होता काय ?

३. चामरें (चवऱ्या) कशाचीं ? चवऱ्या वनगायांच्या पुच्छांच्या करतात असा समज रूढ आहे; पण शब्दकोष म्हणतात कीं ' चमरी ' नांवाच्या हरिणांच्या पुच्छांच्या चवऱ्या (चामरें) करतात ! सत्य काय ?

४. सुतीक्ष्णाश्रम कोठें ? शरभंगाश्रम माहूर गडाजवळ उनकदेव या ठिकाणीं बोरी गांवाजवळ होता वगैरे बरीच माहिती श्री. प. प. टेंब्ये स्वामींच्या प्रवासवर्णनांत आहे. नगर जिल्ह्यांतील संगमनेरच्या पश्चिमेस असलेल्या अकोला गांवाजवळ असलेलें अगस्त्याश्रम नांवानेंच ओळखलें जाणारें स्थानच वाल्मीकि रामायणांत वर्णिलेला अगस्त्याश्रम होय याविषयीं शंकेला स्थान नाहीं; कारण वाल्मीकि रामायणवर्णन व

पंचवटीचा संबंध या गोष्टी अगदीं व्यवस्थित जुळतात. या दोन आधारांनीं संशोधन केल्यास सुतीक्ष्णाश्रमस्थानाचा पत्ता लागेल. शरभंगाश्रम व अगस्त्याश्रम यांच्यामध्यें सुतीक्ष्णाश्रम असणें जरूर आहे.

५. **कबंधवध कोठें?** श्रीराम पंचवटींतून निघाल्यानंतरच्या वाल्मीकि रामायण वर्णनांत ज्या घोर अरण्यादिकांचें वर्णन आहे त्यांतील एका दरीचें वर्णन आज जेथें भंडारदरा धरण आहे, त्याच्याशीं अगदीं जुळतें आहे. हा दराच वाल्मीकि रामायणांतलि घोर दरी असावी असें खात्रीपूर्वक वाटतें. वाल्मीकि रामायणांतील अयोमुखी राक्षसीची कथा विशेष मार्गदर्शन करणारी आहे.

६. **सुतीक्ष्ण व गुरुदक्षिणा.** श्रीरामलक्ष्मण व सीता यांचें दर्शन करविणें ही गुरुदक्षिणा अगस्तींना देण्याचें सुतीक्ष्णानें कबूल केलें होतें असें हिंदी टीकाकार म्हणतात; परंतु आधार एकही दिलेला नाहीं; व प्रो. गौडजींनीं दिलेल्या १८ रामायणांतील वैशिष्ट्यांतही उल्लेख नाहीं. या निराधार विधानावर या लेखकाचा विश्वास बसत नाहीं; तथापि हा एक संशोधनाचा विषय आहे.

७. **कबंध–गंधर्व? शाप कोणाचा?** कबंध हा पूर्वी गंधर्व होता असा उल्लेख मानसांत आहे. गंधर्व असतां त्यास कोणाचा शाप झाला याचें संशोधन होणें जरूर आहे. ' नाऽमूलं लिख्यते किंचित् ।' या वचनाचें पालन करणारे श्रीतुलसीदास होते; म्हणून आधार कोठेंतरी असलाच पाहिजे.

८. **कबंधवध पंपासरोवराच्या आसपास?** आधीं शबरीभेट व मग पंपासरोवराकडे जातांना वाटेंत कबंधवध केल्याचें वर्णन पद्मपुराण उत्तर खंडांत आहे. कल्पभेदानुसार असा भेद असूं शकेल; तथापि तो इतिहाससंशोधकांनीं निर्णय लावण्यासारखा विषय आहे.

९. **शबरीतीर्थ गोदावरींत कोठें?** श्रीरघुवीरानें गोदावरीला शाप दिल्याची व नंतर अनुग्रह करून तेथें शबरीतीर्थ निर्माण केल्याची कथा पद्मपुराणांत रामकथेंत उत्तरखंडांत आहे. हाहि संशोधनाचाच विषय आहे.

१०. **शबरीचीं उष्टीं बोरें?** शबरीनें उष्टीं **फळें** रघुनाथास दिलीं व तीं रघुनाथानें भक्षिलीं असा अर्थ पद्मपुराणांतील (उत्तरखंड) वर्णनावरून निघूं शकतो, पण **बोरांचा उल्लेख तेथें नाहीं**; यापेक्षां अधिक स्पष्ट पुरावा व बोरें भक्षिल्याचा उल्लेख शोधणें जरूर आहे; कारण कीं गुजराथी, मराठी व हिंदी भाषांतील अनेक संतकवींनीं उष्टीं बोरेंच वर्णिलीं आहेत. श्रीमानसांत किंवा तुलसीदासजींच्या अन्य ग्रंथांत उच्छिष्ट फळें भक्षिल्याचासुद्धां उल्लेख नाहीं.

११. **वेदश्रुति नदी?** वाल्मीकि रामायणाप्रमाणें तमसा-वेदश्रुति, गोमती-स्यंदिका व शृंगवेरपुर असा प्रवासक्रम आहे. मानसांत तमसा – ? गोमती, सई व शृंगवेरपुर असा प्रवासक्रम आहे. तमसा व गोमती यांच्यामध्यें हल्लीं नदी आहे कीं नाहीं व असल्यास तिचें नांव काय ? वेदश्रुति नदी हल्लीं कुठें आहे काय ? आणि स्यंदिका = सई

नदीच काय ? हल्लीं तिचें नांव काय ? श्रीगोस्वामींनीं रामायणलेखनापूर्वी चित्रकूटपासून अयोध्येपर्यंत पायीं प्रवास प्रयागावरूनच केला होता.

१२. अंशुमती नदी ? भरद्वाजाश्रमांतून निघून यमुना ओलांडल्यावर चित्रकूटाकडे जातांना अंशुमती नदी ओलांडावी लागली आहे. वाल्मीकि रामायण अयोध्या. ५५-५६ पाहा.

१३. भरताश्रम ? 'क्रोशमात्रेत्वयोध्यायाः' अयोध्येपासून फक्त एक कोसावर भरताश्रम असल्याचा उल्लेख वाल्मीकि रामायण ६।१२८।२८ मध्यें आहे. नन्दिग्राम (नन्दिगांव) आज प्रत्यक्ष पांच कोस = १० मैल आहे. अयोध्येचा विस्तार दक्षिण दिशेला चार कोस पर्यंत होता असें मानल्यासच समन्वय होऊं शकतो. नन्दिग्राम अयोध्येपासून किती अंतरावर होतें याविषयीं पुराणांत उल्लेख आहे काय ?

१४. भरतास राज्य देण्याची पूर्व कबूली ? कैकयीच्या विवाहसमयीं दशरथानें प्रतिज्ञा करून तिच्या पुत्रास राज्य देण्याचें कबूल केलें होतें असा समज महाराष्ट्रांत व उत्तर हिंदुस्थानांतही रूढ आहे. श्रीरामचरितमानसांत किंवा तुलसीदासजींच्या इतर ग्रंथांत याला काडीमात्र आधार नाहीं. तसेंच पद्म; अग्नि; वायु; ब्रह्म या पुराणांतील रामकथेंत आणि वाल्मीकि, अध्यात्म इत्यादि प्रचलित रामायणांतसुद्धां काडीमात्र आधार नाहीं. हिंदी टिकाकारांचें ग्रंथावलोकन या लेखकापेक्षां पुष्कळ व्यापक असून-सुद्धां कोणी आधार दिलेला नाहीं. परंतु ज्या अर्थी विविध भाषिक प्रदेशांत हा समज रूढ झालेला आहे त्या अर्थी संस्कृत ग्रंथांत कुठेंतरी आधार असला पाहिजे. हा आधार शोधून काढणें आवश्यक आहे.

१५. सुनमुखाची पद्धति ? विवाहानंतर सुनेला व पुत्राला मांडीवर बसवून त्यांच्या तोंडांत गोड पदार्थ घालण्याची नामशेष होत चाललेली सुनमुखाची प्रथा कोणीं, केव्हां सुरू केली याचें संशोधन झाल्यास बरें. मानसांतील वर्णनावरून अनुमान निघतें कीं ही प्रथा रामविवाहानंतर दशरथांनीं सुरू केली असावी.

आणखी पुष्कळ विषय टीकेंत सुचविलेले असले तरी येथें इतके पुरेसे आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।९ 卐 卐 卐

बिभीषणाची लंका कुठें ?

श्रीरघुवीरानें रावणाचा वध करून लंकाराज्य व लंकानगरी बिभीषणास अर्पण केल्यापासून लंका बिभीषणाची झाली; म्हणून **बिभीषणाची लंका** असें म्हणणेंच योग्य आहे. ही लंका कुठें होती व सध्यां ती कुठें आहे हें जाणण्याची इच्छा रामायणवाचकांस सहज होते. लंका दक्षिण महासागरांत होती हें निश्चित.

श्रीयुत सदाशिव कृष्ण फडके लिहितात कीं "हेमाडपंत लंकेंत गेला होता, तेथें

त्यास बिभीषण भेटला व त्याजवळून त्यानें मराठींतील मोडीलिपी आणली. अशी दंत-कथा आहे. " ते २०।२।५६ च्या पत्रांत लिहितात कीं ही दंतकथा कोणत्या ग्रंथांत आहे हें स्मरणांत नाहीं. रामायणकाळची लंका कोठची हें मात्र निश्चित सांगतां येत नाहीं; पण माझे सद्गुरु श्री. काका पुराणिक म्हणत असत कीं 'ती दर्यागर्क झाली.'

अन्य विद्यमान विकल्प – लंका म्हणजे १ सिंहलद्वीप; २ अमरकंटक पर्वत, मध्य हिंदुस्थान; ३ मालदीव बेट; ४ आस्ट्रेलिया, ५ आफ्रिकेंतील लेबॅनॉन नजीकचें बेट; ६ सीलोन; ७ दक्षिण महासागरांत दर्यागर्क झालेलें लेमुरिया खंड.

(१) **सिंहलद्वीप म्हणजेच सीलोन;** कारण कीं सीलोनमधील लोकांच्या भाषेला 'सिंघली' असें म्हणतात. सिंहलद्वीप = सीलोन म्हणजेच लंका मानणें चूक आहे कारण कीं द्वीप गणनानुसार लंकाद्वीप व सिंहल यांचे स्वतंत्र उल्लेख आहेत. (क) श्रीमान-सांतच 'सिंघलबासी' = सिंहलद्वीपनिवासी असा सिंहलद्वीपाचा उल्लेख फक्त एकदां आहे; लंका म्हणजे सिंहलद्वीप नव्हे हें दाखविण्यासाठींच मानसांत हा उल्लेख केलेला दिसतो 'जनु सिंघलबासिन्ह भयउ बिधिबस सुलभ प्रयागु' (२।२२३)

(२) **जयपूरचे पंडित पं. मोतीलाल शर्मा गौड** यांच्या शतपथ-ब्राह्मण विज्ञान भाष्य खंड ३ पृ. ३६६–६७ वरून हेंच ठरतें कीं लंका दक्षिण महासागरांत गडप झाली. "**लंका समुद्र गर्भमें विलीन हो गई है।** इधर जो महानुभाव सिंव्हलद्वीप (सिलोन) को लंका मान रहे हैं यह उनकी भ्रांति ही समझनी चाहिए। कारण द्वीपगणना के अनुसार पुराणशास्त्रमें लंकाद्वीप और सिंव्हलद्वीप दोनोंको सर्वथा पृथक माना है। साथ ही में जिस देशान्तरपर लंका की सत्ता मानी है, उस देशान्तरपर सीलोन नहीं है। ऐसी अवस्थामें देशान्तरमानानुसार सीलोन सिंव्हलद्वीप हो सकता है, न की लंका।"

(३) श्रीसमर्थ रामदास स्वामींना हनुमंतानें लंकेंत नेऊन बिभीषणाची भेट करविली असें श्रीसमर्थांचें चरित्र सांगतें. यावरून अनुमान निघतें कीं हेमाडपंत व श्रीसमर्थ यांच्यासारख्यांना लंका व लंकेंतील कल्पायु बिभीषण यांचें दर्शन होऊं शकलें; पण इतक्या प्रदीर्घ काळांत इतर कोणास झालें नाहीं; म्हणून बिभीषणाची लंका दक्षिण महासागरांत कधींच गडप झाली, व ती लंका म्हणजे दक्षिण महासागराच्या जलामध्यें विद्यमान असलेलें लेमुरिया खंडच मानणें योग्य असें या अल्प बुद्धीस वाटतें. बाकीचे विविध विकल्प भ्रांतिजनित आहेत. कल्पान्तायु चिरंजीव अश्वत्थामा नर्मदातीरीं केव्हांतरी कोणा भाग्यवंताला भेटतो त्याप्रमाणेंच जे कोणी श्रीसमर्थांच्या सारखे श्रीरामहनुमान-कृपाभाजन असतील त्यांनाच लंका व बिभीषण यांचें दर्शन होईल. सर्वसाधारण जनसमाजाच्या दृष्टीनें व भौगोलिक अस्तित्वाच्या दृष्टीनें लंकेनें जलसमाधि घेतली आहे असें मानणेंच इष्ट आहे.

श्रीरामभक्तिप्राप्तीच्या दृष्टीनें या विषयाचें विशेष महत्त्व नाहीं; म्हणून अधिक विस्तार करून अन्य मतांचें खंडन करण्यांत वेळ घालविण्याची आवश्यकता वाटत नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।१० 卐 卐 卐

चित्रकूट-पंचवटी-श्रीरामप्रवास

श्रीचित्रकूटाहून प्रभु निघाले ते अत्रिमुनींच्या आश्रमांत गेले. हा अत्रिआश्रम म्हणजे चित्रकूटच्या साधारण दक्षिणेस ५।६ कोसांवर असलेला अनसूया पर्वत होय. तेथून दक्षिणेकडे शरभंगाश्रमांत येतांना वाटेंत विराध-वध केला.

विराध-वधस्थानापासून दीड योजनावर शरभंगाश्रम असल्याचा स्पष्ट उल्लेख वाल्मीकी रामायण अरण्यकांड सर्ग ४।२१ मध्यें आहे. श्री. प. प. टेंब्येस्वामींच्या प्रवासवर्णनावरून शरभंगाश्रमस्थान निश्चित आहे. माहूरगडाच्या पायथ्यापासून ८ कोसांवर असलेलें 'उनकदेव' नांवाचें गंधकाचा वास न येणारें **ऊष्णोदकतीर्थ जेथें आहे त्याच्या आसपास शरभंगाश्रम होता.** हें स्थान **बोरी गांवाच्या जवळ आहे.** अरण्यकांड दो. ८।३ च्या टीकेंत ही माहिती सविस्तर दिली आहे.

इकडे येतांना मधल्या महानद्यांचा उल्लेख कां नाहीं याचें उत्तर मानसांत गोस्वामींनींच दिलें आहे. विराधवध-वर्णनापूर्वींच म्हटलें कीं,

'सरिता वनगिरि घाटहि अवघड। पति जाणुनि देतात वाट धड ॥
जाती जिथें देव रघुराया। तेथें करिति गगनिं घनछाया' ॥ (३।७।४-५)

यामुळें मानसांतसुद्धां चित्रकूटाहून निघाल्यानंतर नद्या ओलांडल्याचें वर्णन नाहीं.

शरभंगाश्रमांतून निघून प्रभु सुतीक्ष्णाश्रमांत आले आहेत; **हा आश्रम बोरी आणि इगतपुरी यांच्यामध्यें कुठेंतरी असला पाहिजे;** कारण कीं प्रभु सुतीक्ष्णाश्रमांतून अगस्तींच्या आश्रमांत आले आहेत. आणि वाल्मीकि रामायण-वर्णनावरून व आजच्या प्रत्यक्ष परिस्थितीवरून निःसंदेहपणें म्हणतां येतें कीं,

नगर जिल्ह्यांतील संगमनेरच्या पश्चिमेस असलेल्या अकोला गावांजवळ 'अगस्त्याश्रम' नांवाचें जें रम्य स्थान आहे तेंच वाल्मीकि रामायणांतील अगस्त्याश्रम-स्थान होय. आजसुद्धां हें स्थान तपश्चर्येला अगदीं योग्य आहे. तेथें दोन सुंदर मोठीं कुंडें व एक ओढा आहे व नाथपंथी साधूंचा मठ आहे.

(१) अगस्त्याश्रमापासून १६ मैल (दोन योजनें) दूर पंचवटी आहे असा उल्लेख वाल्मीकि व अध्यात्म रामायणांत आहे.

(२) अगस्तींनीं आपल्या अंगुलिनिर्देशानें मधूकवन (मोहाच्या झाडांचें वन) दाखवून म्हटलें आहे कीं या वनाच्या उत्तरेच्या बाजूस पर्वत चढून गेल्यावर पंचवटी आहे. म्हणजेच डोंगरांतील सरळ वाटेनें अगस्त्याश्रमापासून पंचवटी १६ मैल असल्याचें निश्चित झालें.

(३) आजच्या त्या अगस्त्याश्रमापासून डोंगरांतील रस्त्यानें उत्तरेच्या बाजूस गेल्यास पंचवटी १६ मैलच असल्याचें दिसेल. हें स्थान सह्याद्रीच्या पूर्व बाजूस

पायथ्याच्याकडेच आहे. या अकोला गांवापासूनच इगतपुरीला जाणारी मोटार सडकसुद्धां आहे. अकोल्याच्या आसपासच्या वनांत अजूनही मधुकवृक्ष-मोहाचीं झाडें विपुल आहेत.

(४) पंचवटीच्या आसपास दोन योजनांवर अगस्त्याश्रम नांवाचें दुसरें स्थान नाहीं.

(५) श्रीमानसाप्रमाणें शंभुभवानी अगस्त्याश्रमांतून उत्तरेकडे कैलासास जात असतां सीता शोध करीत दक्षिणेकडे येणाऱ्या श्रीरघुनाथाचें दर्शन त्यांस झालें आहे.

(६) पंचवटी हें नांव कां पडलें याचा उल्लेख हनुमन्नाटकांत असून त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं श्रीरामपर्णकुटींतून श्रीगोदावरीचे तरंग सहज दिसतात. यावरून ठरतें कीं पंचवटींतील श्रीकाळयारामाचें मंदिर जेथें आहे तेथें गोदावरीकडे तोंड करून श्रीरामपर्णकुटी होती.

(७) **पंचवटी** — श्रीरामचरित्रांतील पंचवटी व नाशिकजवळील पंचवटी अगदीं एक याबद्दलचा भरभक्कम पुरावा ब्रह्मपुराण अध्याय १२३ मध्यें सहज मिळाला. श्रीगौतमी कथेच्या अंगभूत श्रीरामकथा या अध्यायांत असून, हेतु रामतीर्थ कसें व केव्हां निर्माण झालें हें सांगण्याचा आहे. गौतमीतीर्थवर्णनांत उगमाच्या वर्णनानंतर पहिलेंच रामतीर्थवर्णन आहे व नंतर क्रमानें पुढील अध्यायांतून क्रमानें गोदावरीच्या मुखापर्यंतच्या तीर्थांचें वणन आहे. रामतीर्थ, लक्ष्मणतीर्थ व सीतातीर्थ यांची उत्पत्ति गोदावरींत कशी केव्हां झाली (राम गोदातटीं वनवासांत असतां) हें सांगितलें आहे. आज रामकुंड, लक्ष्मणकुंड व सीताकुंड अशीं तीनच तीर्थें पंचवटींतील गोदावरात आहेत. ज्या पंचवटींत रामलक्ष्मण व सीता वनवासांत राहात होतीं ती पंचवटी नाशिकजवळ गोदातटीं असलेली पंचवटीच यांत संशय नाहीं.

याप्रमाणें चित्रकूटपासून पंचवटीपर्यंतच्या श्रीरामप्रवासाचें वर्णन यथामति केलें गेलें.

◆◆◆◆

卐 卐 卐 १७।११ 卐 卐 卐

पंचवटी—दक्षिण-सागर प्रवास

श्रीरामप्रभु सीताहरणानंतर कोणत्या मार्गानें गेले हें ठरविण्यास वाल्मीकि रामायणांत अरण्यकाण्ड सर्ग ६९ मार्गदर्शक होईल.

पंचवटीपासून तीन कोस दक्षिणेस गेल्यानंतर क्रौंचारण्यांत प्रवेश केला; नंतर तीन कोस पूर्वेकडे जाऊन तें अरण्य ओलांडलें तेव्हां वाटत अयोमुखी नांवाच्या राक्षसीची गांठ पडली. ती ज्या दरींत राहात होती त्या दरीचें वर्णन हा मार्ग ठरविण्यास साधन आहे.

ही दरी म्हणजे आज जेथें भंडारदरा धरणाची रचना झाली आहे तीच दरी असली पाहिजे असें धरण होण्यापूर्वी सहज घडलेल्या अवलोकनावरून वाटतें.

प्रभु सीतेस शोधीत जात असतां पुणें जिल्ह्यांतील खेड गांवावरून गेले असें भीमरथी माहात्म्यांतील खेटकक्षेत्र माहात्म्यावरून ठरतें. उत्तर देशांत भागीरथी व दक्षिणेंत भीमरथी या दोनच नद्या रथी आहेत. त्यामुळें भीमास्नानाच्या निमित्तानें येणें शक्य आहे. तेथील गांवाच्या उत्तरेस दूर वनांत असलेलें तुकाई देवीचें स्थान व गांवाजवळील सिद्धेश्वर महादेवाचें स्थान यांच्या उत्पत्तीशीं श्रीरामचंद्रांचा संबंध असल्याचें वर्णन भीमरथी माहात्म्यांत आहे.

वहे-बोरगांव येथील ' वहे ' येथें प्रभु आल्याचें वर्णन सांपडतें पण हें आगमन सीताहरणानंतरचें नसून राज्याभिषेकानंतरच्या तीर्थयात्रा-प्रवासांतील असलें पाहिजे; कारण त्या वेळीं सीतामाई बरोबर होत्या हें विद्यमान स्मृतिचिह्नांवरून ठरतें.

तुळजापुराहून राम-लक्ष्मण पुढें किष्किंधेकडे गेले हें मात्र तुळजापूर येथलि दोन पुरातन गोष्टींवरून सांगतां येतें. श्रीरामवरदायिनी (भवानी)चें एक अगदीं पुरातन मंदिर उत्तरेस व घाटशिळामंदिर दक्षिणेस आहे. जेथें भवानीनें प्रभूला दर्शन दिलें तेथें श्रीरामवरदायिनीचें फार पुरातन मंदिर असून एका टेकडीवरील ज्या शिळेवर उभी राहून भवानीनें पुढील मार्ग अंगुलिनिर्देशानें दाखविला, ती शिळा घाटशिळा नांवानें ओळखतात व तेथें त्या नुसत्या एका शिळेच्या भोंवतीं एक मंदिर बांधलेलें आहे. तेथून पंपासरोवर व किष्किंधेकडे प्रभु गेले.

पंपासरोवर आजहि अस्तित्वांत आहे. **ऋष्यमूकपर्वत** तुंगभद्रा कांठच्या **अणबुंदी** गांवापासून ८ मैलांवर आहे. (गीर्वाणलघुकोष) पंपा ऋष्यमूक पर्वताजवळच आहे. मतंग पर्वताच्या शिखरालाच ऋष्यमूक म्हटलें आहे. येथेंच सुग्रीव राहात होता. येथून किंष्किधा जवळ आहे. येथून पुढील रामेश्वरपर्यंतच्या प्रवासाचें वर्णन मिळत नाहीं. निदान या नेत्रांना तरी अवलोकनास मिळालें नाहीं व कानांना ऐकण्यास सांपडलें नाहीं.

श्रीरामप्रस्थापित रामेश्वर कोणतें याविषयीं मतभेद आहेत; पण त्यांत शिरून कांहीं हातीं लागणार नाहीं.

किष्किंधेंतून निघाल्यापासून ८ दिवसांनीं सागरतीरावर प्रभु पोंचले आहेत. (पद्म व स्कंद पुराण) प्रवास हनुमंताच्या खांद्यावरून केला आहे. यावरून किष्किंधेपासून सागरतीर चारपांचशें मैलांच्या आसपास असणार आणि आज प्रत्यक्ष अंतर जवळ जवळ तेवढेंच भरेल. यापेक्षां अधिक पुरावा उपलब्ध झाला नाहीं.

सूचना — उस्मानाबाद(मराठवाड्यांत)जवळ **सीतानाहणी** नांवाचें तीर्थ आहे पण त्याचा संबंध सीताहरणानंतरच्या प्रवासाशीं असणें शक्य नाहीं; व लंकेंतून येतांना पुष्पकविमानांतूनच आले असल्यानें त्या वेळींहि सीता येथें उतरणें शक्य नाहीं. त्यानंतरच्या तीर्थयात्रा-प्रवासांतच प्रभु तेथें गेले असावे. कारण उस्मानाबाद तुळजापूरच्या जवळच आहे.

◆◆◆◆

१८ : परिशिष्ट प्रकरण

श्रीमानसगूढार्थचंद्रिकाटीका व तिची प्रस्तावना वाचणारांच्या सोयीसाठीं या शेवटच्या मुख्य प्रकरणाची आवश्यकता उत्पन्न झाली. प्रस्तावनेंतील व टीकेंतील कांहीं संदर्भांचा उलगडा व विविध सूची यांचाच या प्रकरणांत समावेश झाला आहे. मानसपीयूष व मानसमणि यांचे उल्लेख पूर्वी अनेक वेळां केलेले असल्यामुळें पहिल्या प्रकरणांत यांविषयीं आवश्यक तेवढी माहिती दिली आहे.

卐 卐 卐 १८।१ 卐 卐 卐

मानसपीयूष व मानसमणि

१. '**मानसपीयूष**' हें श्रीरामचरितमानसाच्या बृहत्कोष वजा एका हिंदी टीकेचें नांव आहे. या ग्रंथाची द्वितीयावृत्ति ५।६ महिन्यांपूर्वींच पूर्णतया प्रकाशित झाली. महिन्या दोन महिन्यांनीं निघणाऱ्या अंकांच्या रूपानें सुमारें ७ वर्षांत हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. तथापि शेवटच्या खंडांत प्रस्तावना–भूमिका–प्रसिद्ध होणार होती ती आतां प्रसिद्ध होणें अशक्य झालें आहे. पुस्तकाचा आकार कल्याण मासिकाच्या आकारासारखा आहे. विस्तार गूढार्थ चंद्रिकेच्या दुपटीपेक्षां थोडा जास्त आहे.

संपादक श्रीयुत अंजनीनंदनशरणजी B. A. LL. B. भूतपूर्व वकील आहेत. मानस पीयूषची पहिली आवृत्ति याच संपादकांनीं १९२५ च्या सुमारास काढली होती; तिच्या तिप्पट ही दुसरी आवृत्ति झाली आहे.

आजपर्यंत प्रकाशित झालेल्या वा अप्रकाशित टीका आणि विद्यमान कांहीं मोठमोठ्या पंडितांच्या व पदवीधरांच्या टीका मिळून सुमारें २०।२२ टीकांचें संकलन यांत केलेलें आहे. यांत विविध मतांचा संग्रह असल्यानें गूढार्थचंद्रिकेंत ज्यांचें समाधान होणार नाहीं त्या वाचकांना मानसपीयूषच्या सूर्यप्रकाशांत तें कदाचित मिळूं शकेल.

मानसपीयूषचे संपादकच गूढार्थचंद्रिकालेखनास मुख्य प्रेरक झाले वगैरे प्रस्तावनेच्या प्रारंभींच निवेदन केलें आहे. एवढें मोठें प्रकाशन कार्य पुन्हां होणें फारच कठिण आहे. हा ग्रंथ अवश्य संग्राह्य आहे. आज याची आवश्यकता न वाटली तरी हिंदी भाषेचा प्रचार महाराष्ट्रांत बराच झाल्यावर याची आवश्यकता वाटेल पण प्रति मिळणें अशक्य होईल.

पत्ता—संपादकः श्रीमानसपीयूष, मानसपीयूष कार्यालय, ऋणमोचन घाट, अयोध्या; जि. फैजाबाद, उत्तर प्रदेश. इतकी माहिती पुरेशी आहे.

२. 'मानसमणि' हें एका हिंदी मासिकाचें नांव आहे. हें श्रीतुलसी-मानस प्रचाराचें मुखपत्र आहे. 'श्रीमानससंघ' रामवन, सटना, या संस्थेकडून हें प्रकाशित केलें जातें. यांत केवळ रामचरितमानसाचीच चर्चा असते. सध्यां या मासिकाचें १६ वें वर्ष चालू आहे. अवघ्या १६।१७ वर्षांत या 'मानससंघा'नें अलौकिक कार्य केलें आहे. आगस्ट १९५७ पर्यंत याच्या ११९४ शाखा स्थापन झाल्या आहेत. १९५६ मार्चमध्यें १८५४ होत्या.

रामवन येथें या मानससंघानें गोशाळा, संस्कृत पाठशाळा, रामनामसंग्रह मंदिर, तुलसी-संग्रहालय इत्यादि अनेक कार्यें केलीं आहेत. साधकांच्यासाठीं चांगलीं निवाऱ्याचीं निवासस्थानें (कुटी) बांधलीं आहेत. हनुमान-मंदिर मुख्य आहे व तेथें संपूर्ण तुलसी-मानसाचा पाठ रोज होतो.

मानस-सर नांवाचा एक मोठा तलाव बांधला असून तें रामचरितमानसाचें दृश्य प्रतीक बनविलें जात आहे. चार दिशांना चार घाट असून एका घाटावर श्रीतुलसीदास-मंदिर व एका घाटावर श्रीशिवमंदिर १९५३ नंतर तयार झालीं आहेत. श्रीमारुति-मंदिराच्या सभोंवती ६५ एकर जमीन संघाची स्वतःची आहे. पारायण मंदिर, भोजनालय, छात्रनिवास इत्यादि अनेक इमारती आहेत.

ही संस्था जी. आय. पी. रेल्वेच्या सटना स्टेशनपासून रीवा संस्थान सडकेच्या बाजूला स्टेशनापासून ९ मैलांवर आहे. अगदीं एकान्त स्थान आहे. रामवन हा गांव ९॥ मैलावर सडकेवरच आहे.

श्रीशारदाप्रसादजी या संघाचे मुख्य मंत्री आहेत. तेच उत्पादक आहेत. यांनीं आपलीं गेलीं २४ वर्षें या संघाच्या कार्यांतच निरपेक्षपणें घालविलीं आहेत. ६५ एकर जमीन त्यांनींच संघास दिली आहे. संघाला मिळणारा लोकाश्रय वाढत असून सरकारी मदत मिळण्यासही प्रारंभ झाला आहे.

एकान्तांत उपाधिरहित राहून, सुसंगतीचा लाभ मिळवून साधन करण्यास योग्य असणारी अशी दुसरी संस्था अखिल भारतांत असल्याचें ऐकिवांत नाहीं. आश्विन व चैत्र नवरात्रांत सामुदायिक पारायणें होतात. लांबलांबचे कलकत्त्यापासून लोक येतात. प्रासंगिक अनेक उत्सव साजरे केले जातात. अशीं वाढत्या खर्चाचीं कामें सतत चाललीं असून स्वतः मंत्रीजी मात्र एका जुन्या पडक्या घरांत राहतात हें वैशिष्ट्य आहे!

मानसमणींत गूढार्थचंद्रिकेला दर महिन्यास आठ पृष्ठें देणार आहेत व चंद्रिकेचें स्वतंत्र प्रकाशनाचा प्रयत्न मंत्री करणार आहेत; पण गूढार्थ चंद्रिकेचा हिंदी अनुवाद करून पाठविण्याचें कार्य या हातांनीं या पुढें होणें अशक्य आहे. ज्यांच्या कृपादृष्टीनें टीका व प्रस्तावना लिहविली त्या निर्हेतुक दयासागर श्रीरघुनाथासच या कार्याची चिंता असणार. महाराष्ट्राची कीर्ति उत्तर हिंदुस्थानांत पसरावी अशी त्याची इच्छा असल्यास त्याप्रमाणें सर्व सूत्रें आपोआप योग्य वेळीं हलूं लागतील.

या संघाची ' मानस प्रकाशन लिमिटेड ' ही एक संस्था आहे. या संस्थेनें तुलसी मानसाशीं संबंध असलेलीं लहान मोठीं २२ पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. यांतील कांहीं पुस्तकांचे उल्लेख टीकेंत व प्रस्तावनेंत अनेक वेळां केले असल्यानें ही सर्व माहिती देणें क्रमप्राप्त झालें.

१९५३ च्या मार्च महिन्यांत १०।१२ दिवस रामबनला या संघाच्या एका कुटींत राहण्याचा व तेथें मानसावर प्रवचनें (हिंदींत) करण्याचा योग आला त्या वेळीं चक्षुर्वै सत्यं ठरल्यानें व दृढ परिचय झाल्यानें ही सर्व माहिती देतां आली.

पत्ता — श्रीयुत शारदाप्रसादजी, मंत्री मानससंघ. पो. रामबन, व्हाया सटना. मध्य प्रदेश.

◆◆◆◆

卐 卐 卐 १८।२ 卐 卐 卐

मानसमणि मासिकांतील लेखसूचि

मानसमणींत प्रसिद्ध झालेल्या लेखांचे उल्लेख प्रस्तावनेंत व टीकेंत कांहीं ठिकाणीं आलेले असल्यानें त्या लेखांची सूचि या प्रकरणांत दिली आहे.

क्र.	लेखाचें नांव	महिना	सन
१	मानसप्रेमी महात्मा बाबा श्रीगंगादासजी	जून	१९५१
२	मानस दोष निराकरण	नोव्हेंबर	१९५२
३	श्रीरामजीको हर्ष	फेब्रुवारी	१९५३
४	सीताहरण रहस्य	मार्च	१९५३
५	सुवल शैलपर की मृग छाला (चर्म)	एप्रिल	१९५३
६	अरण्यकांडका वैशिष्ट्य	मे	१९५३
७	मनमहुँ चरनबंदि सुख माना	जून	१९५३
८	रामचरित मानस की नींव (पाया) (१)	जुलै	१९५३
९	रामचरित मानस की नींव (पाया) (२)	ऑगस्ट	१९५३
१०	रामचरित मानस की नींव (पाया) (३)	सप्टेंबर	१९५३
११	मानस दोषारोप निराकरण	नोव्हेंबर	१९५३
१२	श्रोता वक्ता ग्याननिधि (कथा राम कै गूढ)	मार्च	१९५४
१३	ब्रह्माम्भोधि-समुद्भवं (कथा राम कै गूढ)	एप्रिल	१९५४
१४	अग्या पुनि पुनि भाइन्ह दीन्ही (कथा राम कै गूढ)	मे	१९५४
१५	सचिव वैद्य गुरु तीनि (कथा राम कै गूढ)	जुलै	१९५४
१६	जा केवल विरंचि हरि ईसा (कथा राम कै गूढ)	ऑगस्ट	१९५४

जेथें खंड पडलेला दिसतो तो वेळेच्या अभावीं लेख पाठवितां न आल्यामुळें आहे. यांतील एकाचेंहि खंडण कोणीं केलें नाहीं.

◆◆◆◆

卐 卐 卐 १८।३ 卐 卐 卐

श्रीरामवनवास–तिथिपत्र

(स्कंदपुराणांतील सीताहरणापासून)

गूढार्थचंद्रिकेंत लंकाकांड परिशिष्टांत पद्मपुराणांतील तिथिपत्र दिलें आहे. येथें स्कंदपुराणांतील तिथिपत्र खालीं दिलें आहे. दोहांत महत्त्वाचा फारसा फरक नाहीं. पुढील कालक्रमावरून दिसेल कीं मासगणना अमावास्यान्त मासांची आहे. पद्म-पुराणांतसुद्धां पौर्णिमान्त-मासगणना नाहीं.

महिना व तिथि	काय घडलें तें
माघ कृष्ण अष्टमी	विन्द मुहूर्तावर सीताहरण
माघ कृष्ण नवमी	जटायु भेट
मार्गशीर्ष शुद्ध नवमी	संपाति रामदूतांस सीतेचा शोध सांगतो.
मार्गशीर्ष शुद्ध एकादशी	मारुतीला अशोकवनांत सीतादर्शन
मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी	दिवसभर अशोकवृक्षावर बसून राहिला. रात्रीं सीतेची भेट झाली.
मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी	अक्षकुमारादिकांचा वध
मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी	इंद्रजितयुद्ध, बंधन व लंकादहन
मार्गशीर्ष पौर्णिमा	महेंद्रपर्वतावर मारुती परत आला.
मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा–पंचमी	रामदूत मधुवनांत आले.
मार्गशीर्ष वद्य षष्ठी	मधुवनाचा विध्वंस
मार्गशीर्ष वद्य सप्तमी	रामदूत-रघुवीर-भेट
मार्गशीर्ष वद्य अष्टमी	उ. फा. नक्षत्रीं विजय मुहूर्तावर सेनेसह प्रयाण
मार्गशीर्ष वद्य अष्टमी-अमावस्या	कपिसेनेसह सागर तीरावर आले.
पौष शुद्ध प्रतिपदा-तृतीया	समुद्रतीरावर राहिले.
पौष शुद्ध चतुर्थी	बिभीषण शरणागति
पौष शुद्ध पंचमी	समुद्र तरण्याचा विचारविनिमय
पौष शुद्ध षष्ठीपासून नवमी	श्रीरघुवीराचा उपवास; समुद्र शरण येतो.
पौष शुद्ध दशमी-त्रयोदशी	सेतुबंधन पूर्ण झालें.
पौष शुद्ध चतुर्दशी	सुवेल शैलावर सेनेसह उतरले.
पौष पौर्णिमा–वद्य द्वितीया	राहिलेली सर्व सेना समुद्रपार आली.
पौष वद्य तृतीया–दशमी	लंकेला कपिसेनेचा वेढा

महिना व तिथि	काय घडलें तें
पौष वद्य एकादशी	शुक-सारण हेरांचें आगमन
पौष वद्य द्वादशी	कपिसेनेची गणना
पौष वद्य त्रयोदशी—अमावस्या	रावण सैन्याची तयारी करतो.
माघ शुद्ध प्रतिपदा	अंगद-शिष्टाई
माघ शुद्ध द्वितीया	रामाचें कापलेलें मस्तक रावण सीतेस दाखवितो.
माघ शुद्ध द्वितीया—अष्टमी	राक्षस-वानर घोर युद्ध
माघ शुद्ध नवमी रात्रीं	इंद्रजितानें रामलक्ष्मणांस नागपाशबद्ध केले.
माघ शुद्ध दशमी	गरुडानें नागपाशबंधनमुक्त केले.
माघ शुद्ध दशमी—एकादशी	युद्ध बंद
माघ शुद्ध द्वादशी	हनुमंतानें धूम्राक्षाचा वध केला.
माघ शुद्ध त्रयोदशी	हनुमंतानें अकंपनाचा वध केला.
माघ शुद्ध चतुर्दशी, पौर्णिमा, प्रतिपदा	नीलानें प्रहस्ताचा वध केला.
माघ कृष्ण द्वितीया—चतुर्थी	राम-रावण युद्ध; रावण युद्धांतून पळाला.
माघ कृष्ण पंचमी—अष्टमी	कुंभकर्णास जागें करणें व भोजन
माघ कृष्ण नवमी-चतुर्दशी	कुंभकर्ण-युद्ध व वध रामानें केला
माघ अमावास्या	कुंभकर्ण-मरणामुळें युद्ध बंद
फाल्गुन शुद्ध प्रतिपदा—चतुर्थी	नरांतकादि पांचांचा वध
फाल्गुन शुद्ध पंचमी—सप्तमी	अतिकाय वध
फाल्गुन शुद्ध अष्टमी-द्वादशी	कुंभ-निकुंभवध
फाल्गुन शुद्ध त्रयोदशी—पौर्णिमा	मकराक्ष वध
फाल्गुन कृष्ण प्रतिपदा-द्वितीया	मेघनादाचा विजय
फाल्गुन कृष्ण तृतीया—सप्तमी	औषधी आणणें व युद्ध बंद
फाल्गुन कृष्ण अष्टमी	रणांत रावणानें मायासीतावध केला.
फाल्गुन कृष्ण नवमी—त्रयोदशी	पांच दिवस मेघनाद-युद्ध व त्याचा वध
फाल्गुन कृष्ण चतुर्दशी	युद्ध बंद; रावण यज्ञदीक्षा घेतो.
फाल्गुन अमावास्या	रावण युद्धास निघतो.
चैत्र शुद्ध प्रतिपदा—अष्टमी	रावण युद्ध व राक्षसांचा संहार
चैत्र शुद्ध षष्ठी—अष्टमी	राम-रावण युद्ध, रावणरथादि विनाश
चैत्र शुद्ध नवमी	लक्ष्मणास रावणशक्ति लागते; संजीवनी आणली.
चैत्र शुद्ध दशमी	दिवसां युद्ध बंद; रात्रीं राक्षस युद्धास येतात.
चैत्र शुद्ध एकादशी	मातली इंद्ररथ आणतो.

महिना व तिथि	काय घडलें तें
चैत्र शुद्ध द्वादशी-वद्य चतुर्दशी	१८ अहोरात्र राम-रावणयुद्ध
चैत्र वद्य चतुर्दशी	रावणाचा वध
चैत्र अमावास्या	रावणादिकांच्या देहांचें दहन

सूचना :— माघ शुद्ध द्वितीयेपासून ८७ दिवसांत युद्ध फक्त १५ दिवस बंद होतें. ७२ दिवस युद्ध झालें.

वैशाख शुद्ध प्रतिपदा	राम रणभूमींत राहिले.
वैशाख शुद्ध द्वितीया	बिभीषणास राज्याभिषेक
वैशाख शुद्ध तृतीया	सीतेनें अग्निदिव्य केलें व राम-सीता-भेट; ब्रह्मदेवादिकांनीं वर दिले.
वैशाख शुद्ध चतुर्थी	राम सीता-लक्ष्मणादिक कपींसह पुष्पक विमानानें निघाले.
वैशाख शुद्ध पंचमी	*१४ वर्षें पूर्ण झालीं*. भरद्वाजाश्रमांत राम रात्रीं राहिले.
वैशाख शुद्ध षष्ठी	पुष्पक विमानानें नंदिग्रामास आले.
वैशाख शुद्ध सप्तमी	श्रीअयोध्याप्रवेश व राज्याभिषेक

सूचना :— (१) सीता १४ महिने १० दिवस लंकेंत राहिली.

(२) वैशाख शुद्ध पंचमीला १४ वर्षें पुरीं झालीं; यावरून ठरलें कीं *वैशाख शुद्ध पंचमीला वनवासास प्रारंभ झाला*.

(३) सीताहरणापूर्वींच्या तिथि स्कंद व पद्म या पुराणांत नाहींत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १८।४ 卐 卐 卐

पुराणसंदर्भ-कथा सूची

क्रम	कथा कोणाची	दो. चौ.	क्रम	कथा कोणाची	दो. चौ.
	बालकांड		५	घटयोनि-अगस्ति	३।३
१	गजानन-तीन कथा	मं. सो. १	६	राहू व चंद्रसूर्य-वैर	३।३
२	यमुना नदी	२।९	७	सहस्रार्जुन	३।३
३	वाल्मीकि मुनि	३।३	८	महिषासुर	३।५
४	नारद	३।३	९	शेष	३।८

क्रम	कथा कोणाची	दो. चौ.
१०	पृथुराज	३।९
११	क. विनाश (कर्मनाशा) नदी	५।८
१२	व्यास	१४।२
१३	विदेह जनक	१७।१
१४	शुक्राचार्य	१८।५
१५	सनकादि	१८।५
१६	गणेश प्रथम पूज्य कां ?	१९।४
१७	जपुनि जेवि पार्वती	१९।६
१८	वेदांत नाम-महिमा	२२।८
१९	उपनिषदांत नाममहिमा	२२।८
२०	शतकोटि रामायण	२५।
२१	शंकरांनीं रामनाम रामायणांतून घेतलें.	२५।
२२	साज अमंगल मंगलराशि कां ?	२६।१
२३	अजामील	२६।७
२४	गज	२६।७
२५	गणिका (जीवन्ती, वैश्य स्त्री)	२६।७
२६	हिरण्य कश्यपु	२७।
२७	प्रह्लाद	२७।
२८	याज्ञवल्क्य	३०।१
२९	सूकरखेत	३० रा
३०	अश्विनीकुमार	३२।३
३१	भरणी पक्षी	३१।६
३२	चिंतामणि	३२।१
३३	अरणी	३१।६
३४	शरयू नदी	३९।१२
३५	अगस्त्याश्रम	४८।१
३६	दक्षप्रजापति	४८।२
३७	दक्षसुत	७९।१
३८	वेदशिरा मुनि	७३।
३९	मृकुंडुतनय	७३।
४०	चित्रकेतु	७९।२
४१	तारकासुर	९२।५
४२	जलंधर- जालंधर	१२४।२
४३	कालकेतु	१७०।३
४४	रावणविवाहादि	१७८।३
४५	कुंभकर्णविवाहादि	१७८।४
४६	बिभीषण विवाहादि	१७८।४
४७	माली, सुमाली, माल्यवान	१७९।१
४८	शृंगीऋषि-ऋष्यशृंग	१८९।५
४९	विश्वामित्र-जन्मकथा	२०६।२
५०	अहल्या	२१०।१२
५१	मिथिला देश	२१४।
	अयोध्याकांड	
५२	मंथरा (पूर्वचरित्र)	१२।
५३	कैकयी (पूर्वकथा)	१२।
५४	कैकयीस वर	२२।५
५५	शिबिराजा	३०।७
५६	दधीचि ऋषि	३०।७
५७	बली राजा	३०।७
५८	हरिश्चंद्र	४८।५
५९	गालव मुनि	६९।
६०	नहुष नरेश	६९।
६१	तमसा नदी	८४।
६२	शृंगवेरपुर	८७।१
६३	रतिदेव राजा	९५।४
६४	अत्रिप्रिया अनसूया	१३२।५
६५	मंदाकिनी कशी आणली ?	१३२।५
६६	ययाती	१४८।६
६७	अंधतापस-शाप	१५५।४
६८	वाल्मीकि	१९४।८
६९	श्वपच	१९४।

क्रम	कथा कोणाची	दो.चौ.
७०	शबर	१९४।
७१	खस	१९४।
७२	यवन	१९४।
७३	दुर्वास-अंबरीष	२१८।६
७४	बारशी-अंबरीष राजधानी	२१८।६
७५	शशी-गुरुतल्पग	२२८।
७६	वेन राजा	२२८।
७७	मार्कंडेय	२८६।७
७८	विंध्य-वृद्धि-निवारण	२९७।२
	अरण्यकांड	
७९	वैतरणी नदी	२।७
८०	विराध	७।६
८१	शरभंगाश्रम (उनपदेव)	७।८
८२	दंडकारण्य	१३।१६
८३	अगस्त्याश्रम	१३।१५
८४	मुनिवर उग्र शाप	१३।१६
८५	शूर्पणखा	१७।३
८६	कबंध	३३।६
८७	शबरी	३४।५
	किष्किंधाकांड	
८८	ऋष्यमूक पर्वत	१।१
८९	वाली-सुग्रीव जन्म	६।१
९०	अगस्ति तारा	१६।३
	सुंदरकांड	
९१	मैनाक पर्वत	१।९
९२	४९ मरुत-उत्पत्ति	२५।
९३	मधुवन	२८।७
९४	शुक हेराचें पूर्वचरित्र	५७।१०
	लंकाकांड	
९५	रावण व बली राजा	२४।१३
९६	रावण व सहस्रार्जुन	२४।१५
९७	द्रोणगिरी	५७।१
९८	मकरी	५७।
	उत्तरकांड	
९९	व्याध	१३० छंद १

या ९९ कथांचे संदर्भ गूढार्थ चंद्रिकेंत साधार दिले आहेत. जेथें आधार मिळाले नाहींत किंवा समाधानकारक नाहींत तेथें टीकेंत स्पष्ट उल्लेख केले आहेत. या सूचींत नसलेल्याहि कांहीं कथा टीकेंत असतील.

◆◆◆◆

卐 卐 卐 १८।५ 卐 卐 卐

गूढार्थचंद्रिकेंतील तुलना-सूची

क्रमांक	तुलनेचा विषय	दो. चौ.
	बालकाण्ड	
१	साधुचरित शुभचरित कपासी (मुद्दे ३०)	२।५
२	मुदमंगलमय संतसमाजहि। जो जगिं जंगम तीर्थराजही (मुद्दे १२)	२।७
३	हृदयसिंधुमति शुक्ति समाना (मुद्दे १७)	११।८-११
४	कलिकल्याणनिवास व कल्याणानां निधानं श्लोक (मुद्दे ८)	२६।
५	रामचरित व रामनाम (मुद्दे ३९)	३१।
६	संवाद कुठें, कोणता कल्प, राम रावण कोण ?	३६।
७	चार घाटांचीं नांवें, संवाद कोणाचे व कां ?	३६।
८	कोणत्या दिशेस कोणता घाट व कां ?	३६।
९	मानस सरोवर नकाशा लांबी रुंदी इ.	३६।
१०	चार संवादांची प्रस्तावना, प्रारंभ व उपसंहार	३६।
११	निर्गुणरूपवर्णन साती सोपानांत	३७।२-३
१२	चार पुरुषार्थ, नव रस, जप, तप, ज्ञान, विज्ञान, योग, विरागदर्शक श्री*रामनामें* (मुद्दे १९)	३९।९-१०
१३	मानस सरोवर व रामचरितमानस (मुद्दे ६३)	३७।
१४	मानस सर व रामचरितमानसदुर्गमता (मुद्दे ३२)	३९।७-८
१५	मानस व पंपा सरोवर (मुद्दे १७)	३९।७-८
१६	सुकीर्ति शरयू व शरयू नदी (मुद्दे ३०)	४१।
१७	बावीस ग्रंथप्रतिज्ञा हिंदी-मराठी	४३ रा
१८	बावीस प्रश्न व बावीस प्रतिज्ञा	४३ रा
१९	तुलसीमानस व सुकीर्ति शरयू (मुद्दे २८)	४३ रा
२०	भरद्वाज, पार्वती व गरुड-शंका	४६।
२१	भरद्वाज, पार्वती तुलना (मुद्दे १३)	४७।७-८
२२	सतीमोह व शिवपुराण	६०।३-४
२३	पार्वतीचे ११ सद्गुण, शिवाचे ११ अवगुण, हास्य रसोत्पादक तुलना	६७।
२४	शिवाचे ११ अवगुण = उत्तम सद्गुण	६७।
२५	सप्तर्षी-कथित व नारदोक्त शिवदोष	७९।६-८
२६	पार्वती-शिव-विष्णु तुलना (मुद्दे ११)	८०।१-४

क्रमांक	तुलनेचा विषय	दो. चौ.
२७	शिव-वरवेष व मानव-वरवेष (मुद्दे १८)	९२।१-५
२८	शिव-विवाहवेषांत शृंगार, रौद्र नाहींत	९२।१-५
२९	शिव समाजांत १० रसांपैकीं ८ रस	९३।
३०	उमा-शंभु-विवाहांत सर्वच अवर्णनीय	१०३।
३१	शंकरांनीं कोणकोणत्या रामरूपांस वंदन	११२।१-४
३२	नारदकृत हरिनिंदा-स्तुतिपर अर्थ	१३७।८
३३	नीलसरोरुह नीलमणि नीलनीरधर ९।९ गुण मानसांत आधार	१४६।
३४	ब्रह्मस्तुति व कौसल्यास्तुति	१९२।
३५	कौसल्या व मनुशतरूपांस दर्शन	१९२।
३६	राम, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न कुंडल्या	१९७।१-३
३७	*मुद्दाम शृंगारलेली जनकपुरी व सहज सुंदर अयोध्या : अयोध्या श्रेष्ठ* (मुद्दे १८)	२१४।१-४
३८	धनुर्यज्ञ मंडपाची रेखाकृति	२४८।६-८
३९	रुष्ट लक्ष्मण व सहज रुष्ट भृगुनंदन	२६८।
४०	परशुरामस्तुति व धर्ममय रथ	२८५।
४१	जनकपुरीपेक्षां अयोध्या रमणीय	२८९।
४२	*जनक राण्या व सर्वांपेक्षां रामपुरींतील साधारण स्त्रिया अधिक सुंदर*	२९७।१-३
४३	जणुं लाभति भूपालमणि सक्रिय चार फळांस	३२५।
४४	जणुं जीव उरिं चारी अवस्थासह विभू	३२५ छंद ४
४५	*परम तत्त्व जणुं पावे योगी* इ. ६ उत्प्रेक्षा व *कौसल्यादि राण्यांची दशा*	३५०।६-८
४६	जनकांनीं दशरथांस निरोप देणें व दशरथांनीं विश्वामित्रास निरोप देणें	३६०।
४७	बालकांड मंगलाचरण श्लोक व काण्डोपसंहार	उपसंहार

अयोध्याकांड

४८	भिल्लीण व मधाचें मोहोळ काढणें (मुद्दे १४)	१३।४
४९	ससाण्यानें पक्षी-शिकार रूपक (मुद्दे १२)	२८।८
५०	रोषतलवार–रूपक (८ मुद्दे)	३१।३
५१	रोषतरंगिणी–रूपक (२७ मुद्दे)	३४।१-[illegible]

क्रमांक	तुलनेचा विषय	दो. चौ.
५२	बसुनि फांदिवर बुंधा छाटी (१० मुद्दे)	४७।५
५३	कैकयी-सखींचा उपदेश व दशरथांनीं कैकयीस केलेल्या विनंत्या (२४ मुद्दे)	५१।४
५४	विषमज्वर–रूपक (१३ मुद्दे)	५१।५-८
५५	लक्ष्मण व रामगीतेंतील भक्तिलक्षणें	७३।३-४
५६	नगर सफल वन–किरातिनी कैकयी	८४।२-४
५७	द्विरुक्तिस्थळें व द्विरुक्तिसंग्रह	१११।७
५८	भरद्वाज, वाल्मीकी इ. ६ ची तुलना	१२५।१-४
५९	अध्यात्म रामायण श्लोक व मानसवर्णन	१२५–१२६
६०	भिल्लांच्या भाषणांत षड्विधा शरणागति	१३६।
६१	सीतेंचें आचरण व वचनें	१४०।१-८
६२	भरतयशविमलविधु व चंद्र (२० मुद्दे)	२०९।१-६
६३	भरद्वाजवचन व भरताचें उत्तर	२११।१-५
६४	रामभरतसमता	२८८।
६५	वराहावतार व भरत-विवेक	२९७।३-४
६६	भरतसाधन व शरदरूपक	३२५।१-६
६७	भरतचरित्र–रामचरित्र	परिशिष्ट
	अरण्यकाण्ड	
६८	रामविमुख व रामकृपांकित	२।६-८
६९	सागर व भवसागरमंथन	४।२
७०	अगस्त्य-सुतीक्ष्ण, गुरुशिष्य	१२।
७१	राम–सीतासाम्य	१५।६
७२	अमानित्वादि (भ. गी. १३।७-११) व मानसोक्त ज्ञानलक्षणें	१५।७
७३	रावणशशी व शशी १६ दोष	२८।६
७४	मनु–भगवान–संवाद, नारद–राम–संवाद	४३।१-६
७५	नारी षड्ऋतु व नारदमोह	४४।१-८
	किष्किंधाकांड	
७६	‘ कुन्देन्दीवर सुंदरौ ’—मधील शब्दक्रम व कांडांतील चरित्रक्रम	मं. श्लो. १
७७	‘ ब्रह्माम्भोधि समुद्भवं ’ यांतील सात विशेषणें क्रमशः सात कांडांशीं संबद्ध	मं. श्लो. २

याशिवाय बऱ्याच तुलना राहिल्या असतील. मुख्य मुख्य वर दिल्या आहेत.

◆◆◆◆

卐 卐 卐 १८।६ 卐 卐 卐

कांड-परिशिष्ठ सूचि

◆◆◆◆

टीकेस आधारभूत संदर्भ ग्रंथ सूची

(विषय विभागानुसार)

क्र.

(१) वेदादि

१ ऋग्वेद
२ यजुर्वेद
३ सामवेद
४ अथर्वण वेद
५ उच्छिष्ट ब्रह्मसूक्त
६ श्रीसूक्त
७ पुरुषसूक्त
८ त्रिसुपर्ण
९ नासदीय सूक्त
१० माध्यंदिनीय आन्हिक सूत्रावली

(२) उपनिषदें

१ ईशावास्य
२ केन
३ कठ
४ प्रश्न
५ मुण्डक
६ माण्डूक्य
७ तैत्तिरीय
८ ऐतरेय
९ छांदोग्य
१० बृहदारण्यक
११ श्वेताश्वतर
१२ कैवल्य
१३ जाबाल
१४ गर्भ

क्र.

१५ नारायण
१६ नारायण
१७ नृसिंहपूर्वतापिनी
१८ नृसिंहोत्तरतापिनी
१९ मैत्रेयि
२० शुकरहस्य
२१ तेजोबिन्दु
२२ ध्यानबिन्दु
२३ योगतत्त्व
२४ नारदपरिव्राजकाचार्य
२५ त्रिशिखा ब्राह्मण
२६ सीता
२७ योगचूडामणि
२८ त्रिपाद् विभूति महानारायण
२९ रामरहस्य
३० रामपूर्वतापिनी
३१ रामोत्तरतापिनी
३२ महा
३३ योगशिखा
३४ संन्यास
३५ अक्षमाला
३६ सूर्य
३७ कुण्डिक
३८ त्रिपुरातापिनी
३९ देवी
४० रुद्रहृदय

क्र.

४१ भस्मजाबाल
४२ गणपति
४३ गोपालपूर्वतापिनी
४४ गोपालोत्तरतापिनी
४५ कृष्ण
४६ जाबालदर्शन
४७ याज्ञवल्क्य
४८ वराह
४९ रुद्रजाबाल
५० दत्तात्रेय
५१ अन्नपूर्णा
५२ सौभाग्यलक्ष्मी
५३ मुक्तिक

(३) धर्मशास्त्र

१ मनुस्मृति
२ याज्ञवल्क्यस्मृति
३ नारदस्मृति
४ हारीतस्मृति
५ धर्मसिंधु
६ निर्णयसिंधु
७ पूर्वमीमांसा
८ आश्वलायन गृह्यसूत्र
९ संस्कार कौस्तुभ
१० श्राद्धमयूख
११ प्राप्राश्चित्तेन्दुशेखर
१२ दानचंद्रिका
१३ शूद्रकमलाकर
१४ यतिधर्मनिर्णय
१५ गायत्री पुरश्चरणपद्धति

(४) भक्तिशास्त्र

१ श्रीरामार्चनचंद्रिका
२ नारदभक्तिसूत्र

क्र.

३ नामचिंतामणि
४ मंत्रशास्त्रमंत्रशक्तियोग
५ विष्णुसहस्त्रनाम
६ रामस्तवराज
७ अगस्त्यसंहिता
८ ब्रह्मस्तुति
९ वेदस्तुति
१० गोपीगीत
११ भक्तिरसायन
१२ कुलार्णवतंत्र
१३ मेरुतंत्र
१४ दत्तात्रेयतंत्र
१५ सप्तशती
१६ मंत्रमहार्णव
१७ मंत्रदेवप्रकाशिका
२८ शिवमहिम्न
१९ श्रीधरी टीका (भागवत)

(५) वेदान्तशास्त्र, संस्कृत

१ श्रीमद्भगवद्गीता
२ श्रीगुरुगीता
३ अवधूत गीता
४ शिवगीता
५ श्रीमद् गौडपादकारिका
६ अद्वैतसिद्धि
७ ब्रह्मसूत्र
८ वेदान्तकेसरी
९ विवेकचूडामणि
१० गीताभाष्य
११ आत्मबोध
१२ साधनपंचक
१३ पंचीकरण
१४ पंचदशी

क्र.

१५ योगवासिष्ठ

१६ सर्ववेदान्तसिद्धान्तसारसंग्रह

१७ पांडवगीता

१८ श्रीरामहृदय

१९ श्रीरामगीता

२० शंकरानन्दी टीका.

(६) शास्त्र-वेदान्त, मराठी

१ विवेकसिंधु

२ श्रीज्ञानेश्वरी

३ श्रीदासबोध

४ मनोबोध

५ तुकोबाचा गाथा

६ हरिपाठ

७ यथार्थदीपिका

८ श्रीदत्तमाहात्म्य

९ श्रीगुरुचरित्र

१० हरिवरदा

११ अमृतानुभव

१२ आगमसार

१३ जनस्वभाव गोसावी

१४ केकावली

१५ गणेश

१६ एकनाथी भागवत

१७ चतुःश्लोकी भागवत (एकनाथ)

१८ परमामृत

१९ गीतामृत शतपदी

२० अभिनव रामायण

२१ संगीत सम-श्लोकी गीता

२२ वेदान्तपर भूपाळी

२३ पंचीकरणस्मृतिचंद्रिका

२४ वेदान्तसार अभंग रामायण

२५ मराठी ब्रह्मस्तुति (अप्रकाशित)

क्र.

२६ वेदस्तुति कीर्तनभास्कर (अप्रकाशित)

२७ क्रिस्तांतक

(७) इतर संस्कृत ग्रंथ

१ नीतिशतक

२ वैराग्यशतक

३ विदुरनीति

४ सिद्धान्तकौमुदी

५ शाकुंतल

६ रघुवंश

७ कुमारसंभव

८ उत्तररामचरित

९ विक्रमोर्वशीयम्

१० मेघदूत

११ शुकरंभासंवाद

१२ सुभाषितरत्नाकर

१३ सुभाषितरत्नभांडागार

२४ काशीखंड

१५ बौद्धायन संहिता

१६ महाभारत

१७ साहित्यदर्पण

१८ काव्यप्रकाश

(८) पुराण ग्रंथ

१ पद्म पुराण

२ विष्णु पुराण

३ स्कंद पुराण

४ शिव पुराण

५ वामन पुराण

६ ब्रह्म वुराण

७ अग्नि पुराण

८ नारद पुराण

९ लिंग पुराण

१० कूर्म पुराण

क्र.

११ वराह पुराण
१२ मार्कंडेय पुराण
१३ मत्स्य पुराण
१४ विष्णुधर्मोत्तर पुराण
१५ हरिवंश पुराण
१६ गरुड पुराण
१७ दत्त पुराण (श्रीटेंब्ये स्वामी)
१८ श्रीमद्‌भागवत

(९) रामायणें

१ वाल्मीकि रामायण
२ अध्यात्म रामायण
३ आनंद रामायण
४ अद्‌भुत रामायण
५ शिव रामायण
६ भावार्थ रामायण

(१०) रामायणें (मा. पी. मधून)
(आंकडे हाजरांचे)

१ हनुमन्नाटक
२ हनुमद्रामायण
३ प्रसन्नराघव
४ प्रसन्न रत्नावली
५ अनर्घराघव
६ सीताशृंगार चंपू
७ महारामायण (३५०)
८ संवृत्त रामायण (२४)
९ अगस्त्य रामायण (१६)
१० लोमश रामायण (३२)
११ रामरहस्य रामायण (२२)
१२ मंजुल रामायण (१२०)
१३ सौपद्य रामायण (६२)
१४ रामायणमहामाला (५६)
१५ सौहार्द रामायण (५०)

क्र.

१६ रामायण मणिरत्न (३६)
१७ सौर्य रामायण (६०)
१८ चांद्र रामायण (७५)
१९ मयंद रामायण (५२)
२० स्वायंभुव रामायण (१८)
२१ सुब्रह्म रामायण (३२)
२२ सुवर्चस रामायण (१५)
२३ देव रामायण (१००)
२४ श्रवण रामायण (१२५)
२५ दुरन्त रामायण (६१)
२६ चम्पू रामायण (१५)

(११) इतर संस्कृत ग्रंथ (मा. पी. मधून)

१ सत्संगविलास
२ ध्वन्यालोक
३ इतिहाससमुच्चय
४ चाणक्य नीति
५ जैमिनी पुराण
६ नन्दी पुराण
७ पाराशर पुराण
८ आदि पुराण
९ कालिका पुराण
१० तापनी संहिता
११ पुलह संहिता
१२ देवी भागवत
१३ कृत्य संहिता
१४ रुद्रयामल तंत्र
१५ वसिष्ठ तंत्र
१६ गौरी संमोहन तंत्र
१७ वीरभद्र चम्पू
१८ बृहद् विष्णु पुराण
१९ शुक्रनीति
२० कामंदकीय नीति

क्र.

२१ भक्तिरसायन सिंधु

(१२) हिंदी (मा. पी. मधून)

१ कुण्डलिया रामायण
२ भक्तमाल
३ पार्वतीमंगल (तुलसी)
४ वैराग्यसंदीपनी (तुलसी)
५ जानकीविवाहमंगल (तुलसी)

(१३) योगशास्त्र

१ पातंजल योग
२ व्यासभाष्य
३ शिवस्वरोदय
४ सौंदर्यलहरी
५ लक्ष्मीधर टीका
६ पवनविजय
७ हठयोगप्रदीपिका
८ योगतारावली
९ सोलीव सुख (मराठी)
१० प्रकाशदीपिका (मराठी)
११ महायोगविज्ञान (हिंदी)
१२ योगवाणी (हिंदी)
१३ चक्राज (लेडवीटर इंग्रजी)
१४ दि सर्पेंट पॉवर
१५ देवात्मशक्ति कुंडलिनी

(१४) वैद्यशास्त्र

१ माधवनिदान
२ योगरत्नाकार
३ चरकसंहिता
४ सुश्रुतसंहिता
५ वाग्भट
६ चिकित्साप्रभाकर
७ भिषग्भुवन (आयर्ग्ल)
८ रससिद्धि (गुजराथी)

क्र.

(१५) ज्योतिषशास्त्र

१ रत्नमाला (संस्कृत)
२ ज्योसिषसारसंग्रह
३ मुहूर्त मार्तंड
४ मुहूर्त सिंधु
५ पुरुषार्थ चिंतामणि
६ न्युमरॉलॉजी (इंग्लिश)

(१६) माणसासंबंधीं ग्रंथ

१ मानसपीयूष
२ मानसमहत्त्व
३ मानसवेदान्तदर्शन (विशिष्टाद्वैत)
४ मानसरहस्य
५ मानसप्रसंग
६ मानसमूल
७ सतपंच चौपाई
८ सब ग्रंथन को रस
९ विश्वसाहित्य में रामचरितमानस
१० मूल गोसाई चरित
११ मानसांक (गीता प्रेस)
१२ तुलसी रामायण (काशीविश्वेश्वर मुद्रणालय)
१३ मानस व्याकरण

(१७) इतर हिंदी ग्रंथ

१ विनयपत्रिका (तुलसी)
२ गीतावली (तुलसी)
३ कवितावली (तुलसी)
४ दोहावली (तुलसी)
५ मानस मणि (मासिक)
६ एक संत का अनुभव
७ गो-अंक (गीता प्रेस गोरखपूर)
८ नारी-अंक (गी. प्रे. गोरखपूर)
९ योगांक (गी. प्रे. गोरखपूर)

क्र.

१० हिंदु संस्कृति अंक (गी. प्रे. गोरखपूर)
११ स्कंदपुराणांक (गी. प्रे. गोरखपूर)
१२ गीतांक (गी. प्रे. गोरखपूर)
१३ कल्याण (मासिक)
१४ सिद्धान्त (साप्ताहिक)

(१८) **शब्दकोष**

१ अमरकोष
२ अमरव्याख्यासुधा टीका
३ गीर्वाणलघुकोष
४ द्विरूपकोष
५ एकाक्षरकोष (बनारस)
६ एकाक्षर (अग्निपुराण) कोष
७ हिंदी मराठी कोष (वैशंपायन)
८ मराठी हिंदी कोष (वैशंपायन)
९ अर्वाचीन भारतीय कोष
१० विश्वकोष (अ. व्या. सु.)

क्र.

११ रत्नकोष (अ. व्या. सु.)
१२ धरणिकोष (अ. व्या. सु.)
१३ मेदिनीकोष (अ. व्या. सु.)
१४ हैमकोष (अ. व्या. सु.)
१५ नामनिधान कोष (अ. व्या. सु.)
१६ शब्दार्णव कोष (अ. व्या. सु.)
१७ व्याडि कोष (अ. व्या. सु.)
१८ त्रिकाण्डशेष कोष (अ. व्या. सु.)
१९ वैजयन्ती कोष (अ. व्या. सु.)
२० रुद्रकोष (अ. व्या. सु.)
२१ रभसकोष (अ. व्या. सु.)
२२ कलिंगकोष (अ. व्या. सु.)
२३ शाश्वतकोष (अ. व्या. सु.)
२४ मराठी ज्ञानकोष
२५ चिल्ड्रेनस् एन्सायक्लोपिडिया (इंग्लिश)

गूढार्थ चांद्रिकेचें सूक्ष्म अवलोकन केल्यास या सूचींत नसलेले अनेक ग्रंथ आधारास घेतलेले दिसतील.

विषय-विभाग-तेरीज

१ वेदादि	१०
२ उपनिषदें	५३
३ धर्मशास्त्र	१५
४ भक्तिशास्त्र	१९
५ वेदान्तशास्त्र संस्कृत	२०
६ वेदान्त शास्त्र मराठी	२७
७ इतर संस्कृत ग्रंथ	१८
८ पुराणें	१८
९ रामायणें	६
१० रामायणें (मा. पी.)	२६
११ संस्कृत ग्रंथ (मा. पी.)	२१
१२ हिंदी ग्रंथ (मा. पी.)	५
१३ योगशास्त्र	१५
१४ वैद्यशास्त्र	८
१५ ज्योतिषशास्त्र	६
१६ मानससंबंधीं ग्रंथ	१३
१७ इतर हिंदी ग्रंथ	१४
१८ शब्दकोष	२५
	३१९

◆◆◆◆

अध्यात्मपर अर्थ–सूची

प्रस्तावनेंत अध्यात्मपर अर्थाचा नमुना दिला असल्यानें ही सूची आरंभीं दिली आहे.

क्र.	विषय	स्थान
२७	जणुं जीव उरिं चारी अवस्था सहविभू विश्राजती	१।३२५ छं. ४
२८	जनकानें जावयांना भेटतांना केलेले तीन प्रकार	१।३४२।८
२९	रामवनवासरहस्य	२।२५।१-४
३०	भरतराज्य व रामवनवास	२।२९।४-६
३१	योगसिद्धि समया जाशि माया करि यतिनाश	२।२९
३२	स्मरुनि मातृत्वातें मला जाउं नको विसरून	२।५६।८
३३	सीता तुर्या	२।६०।४-७
३४	कालरात्रि	२।८३।५-८
३५	अत्रि व अनसूया	२।१३२।५-८
३६	साथ निषादनाथ लघुभाऊ	२।२३३।४-८
३७	सीताहरणविलाप	३।२९।४
३८	कनकमृगाच्या मागें धांवणें	३।३७।५-६
३९	काम परम विरागाला भितो नुसत्या ज्ञानाला नाहीं	३।३७ रा व म
४०	हनुमान-जांबवान गुरु	४।३०।५-६
४१	त्रिविध विघ्नें	५।१।९
४२	रामकार्य केल्याविना कुठला मज विश्राम	५।१
४३	सुरसा, सिंहिका व लंकिनी विघ्नें	५।४।१-२
४४	हनुमंताचा लंकाप्रवेश व सीताशोध	५।८।४-५
४५	रावण प्रयत्नांचें सार	५।१०
४६	रामाजवळ कृशानु भानु व सीतेस अग्नि प्राप्त होत नाहीं कारण—	५।१२।७।११
४७	सीता-हनुमान-भेट	५।१७।६
४८	भवसागर तरण्याचे त्रिविध मार्ग	६।४।९ व दो.
४९	लक्ष्मण मूर्च्छा	६।५२
५०	मुनि-आज्ञें जळ पिऊं पळे श्रम	६।५७।२-४
५१	निर्भय होण्याचें साधन	६।९६ छंद
५२	वानरांचा धावा (प्रभु शब्द पाहा.)	६।९७।१
५३	दशशीस विनाशन वीसभुजा	७।१४।१-२
५४	भुशुंडी व हरिभुज	७।७९ रा

ही सूचीसुद्धां बरीच अपूर्ण आहे. आणखी पुष्कळ स्थळीं अध्यात्मपर अर्थ टीकेंत लिहिलेले आहेत.

◆◆◆◆